This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
हस्तलिखित संग्रह

दाखल क्र. M 2267 विषय दर्शन
नाव अध्यात्मरामायणार्थबोध (मुद्रित)
लेखक / लिपीकार मासिकपुस्तक वर्ष १, अंक १०
ष्ठ 335 काळ शके 1812 पूर्ण / ~~अपूर्ण~~

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीः

मासिक पुस्तक. फाल्गुन शु. ११

वर्ष १ अंक १० शके १८१२.

अध्यात्मरामायणार्थबोध.

[सटिप्पण. समूल सान्वय]

यस्तु प्रत्यहमध्यात्म-
रामायणमनन्यधीः ॥
यथाशक्ति वदेद्भक्त्या
जीवन्मुक्तः स उच्यते ॥ १ ॥

आर्यसेवक छापखान्यांत छा.
मुंबई.

सर्व हक्क पुस्तककर्त्यानें ठेविले आहेत.

पत्रें २१ पासून ३६ पर्यंत.

फुट० अं० किं० ६४ आणे.

अयोध्याकांड

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मासिक पुस्तक. श्रीः फाल्गुन शु. ११

वर्ष १ अंक १० **अध्यात्मरामायणार्थबोध.** शके १८१२.

समूल सान्वय] [सटिप्पण.

यस्तु प्रत्यहमध्यात्म-
रामायणमनन्यधीः ॥
यथाशक्ति वदेद्भक्त्या
जीवन्मुक्तः स उच्यते ॥ १ ॥

आर्यसेवक छापखान्यांत छा.
मुंबई.

सर्व हक्क पुस्तककर्त्यानें ठेविले
आहेत.

पत्रें २१ पासून ३६ पर्यंत.

फुट० अं० किं० ६४ आणे.

अयोध्याकांड

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीमद्भागवतार्थदर्शन.

भागवताचें श्रीधरी टीकेच्या आधारानें मराठी भाषांतर.

समूल सान्वय

मासिक पुस्तक.

हें पुस्तक सुरू झाल्यास अडीच वर्षें झालीं, तीन स्कंध पूर्ण छापून तयार आहेत. प्रत्येक वर्षाची आगाऊ वर्गणी ट. ख. सह रु. ३. हा ग्रंथ लवकर संपविण्यासाठीं श्रीमद्भागवतार्थदर्शन–उत्तरार्ध नांवाचें वेगळेंच त्रैमासिक पुस्तक चालू सालापासून काढीत असतों. ह्यांत दशमस्कंधापासून पुढील स्कंध निघावयाचे. ह्याची एका वर्षाची वर्गणी ट. ख. रु. ३॥, एकंदर ७॥ रुपये पाठविले असतां चालू (१८१२) सालाच्या अखेरपर्यंत निघणारे सर्व अंक, मागील अंकांसुद्धां, मिळतील.

विष्णुसहस्रनामार्थदर्शन–समूल, सटीक.

ह्यांत मूळ विष्णुसहस्रनाम, त्यावरील एक श्लोकबद्ध प्राचीन टीका, प्रत्येक नांवांतील धातु, प्रत्यय, त्याचा मराठींत पूर्ण अर्थ, इतकी व्यवस्था आहे. किं० १ रु० ट० ख० ८–

संस्कृत प्रथम पुस्तक..... .... किं० ८= ट० ख० ८॥–

म्यानेजर

आर्यसेवक छापखाना, गिरगांव, मुंबई.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अध्यात्मरामायणार्थबोध

समूल-सान्वयं-सटिप्पण.

वरील नांवाचें मासिक पुस्तक आह्मी आषाढ शुद्ध ११ शके १८१२ पासून काढण्यास प्रारंभ केला आहे. प्रत्येक महिन्याच्या शुद्ध एकादशीस ह्याचा अंक निघत असतो. केवळ मराठी वाचणाऱ्या भाविक वाचकांना तर ह्याचा चांगला उपयोग होईलच; पण विशेषेंकरून, थोडेंसें—विभक्तिज्ञानापुरतें—संस्कृत शिकलेल्या लोकांना, त्या भाषेचा अभ्यास वाढविण्यास, ह्याचा उत्तम उपयोग होईल. ह्यांत अध्यात्मरामायणाचा पदशः सरळ भावार्थ, मूळ रामायण, अन्वय व टिपांमध्यें प्रत्येक पदाचा पूर्ण अर्थ, येत असतो. प्रत्येक अंकांत १६ पत्रें (३२ पृष्ठें) येत असतात.

बालकांड पूर्ण व अयोध्याकांड अर्धें छापून तयार झालें.

वर्गणीदारांना ह्याची वर्षाची आगाऊ वर्गणी ३॥ रु. व पोस्टेज ४≡ पडेल. आषाढ शु. ११ श. १८१३ पर्यंत होणाऱ्या वर्गणीदारांना चार रुपयांत पूर्ण ग्रंथ मिळेल अशी तजवीज करण्याचा आमचा विचार आहे. पुढें किंमत जास्त होईल. टपालखर्च कोणालाही कापून दिला जाणार नाहीं.

विष्णु हरि छत्रे, म्यानेजर,
आर्यसेवक छापखाना, गिरगांव पोस्ट, मुंबई.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

-बो.
क्रम.
॥

सर्ग.	विषय.	पृ.
१	रामाकडे नारद येतात. स्तुति. येण्याचें कारण. रामाकडून त्यांना आश्वासन.	१
२	रामाला राज्याभिषेकाची तयारी. वसिष्ठ रामाला ती आनंदाची वार्ता कळवितात. आकाशवाणी– देवांची वाग्देवतेला प्रेरणा. तिचा मंथरेच्या शरीरांत संचार. ती कैकयीचे कान भरत्ये. कैकेयी तिच्या सांगीप्रमाणें वागत्ये.	६
३	दशरथ कैकयीकडे येतो. ती त्याजवळ पूर्वी देऊं केलेले दोन वर मागत्ये – (१) भरताला राज्य; व (२) रामाला वनवास. तो घाबरून तसें न करण्याबद्दल कैकयीला विनवितो. ती आग्रह सोडीत नाहीं. रामाला तेथें आणवितात. कैकेयी त्याला सर्व वृत्त सांगत्ये. राम तें आनंदानें मान्य करितो. राजाचा शोक. राम कौसल्येकडे येतो.	१८
४	कौसल्येला व लक्ष्मणाला दुःसह वार्ता कळत्ये. रामाचा लक्ष्मणाला उपदेश. कौसल्येचें सांत्वन. लक्ष्मणाचा व सीतेचा वनांत येण्याबद्दल निर्धार. तिघें राजाकडे येतात.	[illegible]८
५	नागरिक जनांचे दुःखोद्गार. वामदेव मुनि लोकांचें सांत्वन करितात. राम वल्कलें नेसून नगराबाहेर निघतो. लोकांचा त्याला परतविण्याचा निश्चय फसतो. गुहाची भेट. जटा.	४०
६	लक्ष्मणाचा गुहाशीं संवाद. तीं गंगेपार भरद्वाजाश्रमीं व पुढें वाल्मीकाश्रमीं येतात. वाल्मीकीचा वृत्तांत. तेथें वस्ती.	४९
७	सुमंत्र परत येऊन रामाचा प्रवासवृत्तांत व निरोप दशरथाला सांगतो. राजाला शापस्मृति. शापाचें कारण. दशरथाचा मृत्यु. भरत येतो. त्याला सगळें वृत्त कळतें. त्याचा शोक. वसिष्ठांचा उपदेश. दशरथाचें उत्तरकार्य.	६१
८	भरत रामाकडे जावयास निघतो. वाटेंत गुहाची व भरद्वाजाची भेट. तो चित्रकूटीं येतो.	७९
९	भरत रामाला भेटतो. रामाला पित्याची मृत्युवार्ता कळते. राम भरताला समजूत घालून परत पाठवितो व अत्रिमुनीकडे येतो.	८३

॥ ३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ श्रीबालकृष्णगुरुभ्यो नमः ॥ ॥ शंकर ह्मणाले :– पार्वति, एकदां रामचंद्र आपल्या अंतःपुराच्या अभ्यंतरीं रत्नांच्या सिंहासनावर स्वस्थ बसले होते; त्यांनीं शरीरावर सर्व अलंकार धारण केले होते; ॥ १ ॥ त्यांची अंगकांति निळ्या कमळाच्या पत्रासारखी श्यामवर्ण असून, कंठांत कौस्तुभ नांवाचा मणि लटकत होता; सीता आपल्या हातांत रत्नाच्या दांड्याची चंवरी घेऊन त्यांच्यावर वारीत होती;॥२॥ स्वतां रामचंद्र आदरपूर्वक तांबूलभक्षण आदिकरून उपचारांनीं सीतेशीं विनोद करीत होते; अशा वेळीं, नारदमुनि त्यांच्या दर्शनासाठीं, जेथें राम होते त्या स्थलीं, आकाशांतून उतरले.॥३॥

श्रीमहादेव उवाच । एकदा सुखमासीनं रामं स्वान्तःपुराजिरे ॥ सर्वाभरणसम्पन्नं रत्नसिंहासने स्थितम् ॥१॥ नीलोत्पलदलश्यामं कौस्तुभामुक्तकन्धरम् ॥ सीतया रत्नदण्डेन चामरेणाथ वीजितम् ॥ २ ॥ विनोदयन्तं तांबूलचर्वणादिभिरादरात् ॥ नारदोऽवातरद्द्रष्टुमम्बराद्यत्र राघवः ॥ ३ ॥

श्रीमहादेवः उवाच – एकदा, नारदः स्वान्तःपुराजिरे (बाकी पहिला व २ श्लोक समग्र.) [तां] तांम्बूलचर्वणादिभिः आदरात् विनोदयन्तं[11] रामं द्रष्टुं, यत्र राघवः [तत्र], अम्बरात्[12] अवातरत्[13].॥१–३॥

१ आपल्या अंतःपुराच्या मध्यभागीं. २ बसलेल्या. ३ सर्व अलंकारांनीं युक्त, अशा. ४ रत्नांच्या सिंहासनावर. ५ निळ्या कमळाच्या पाकळीप्रमाणें श्यामवर्ण, अशा. ६ ज्याचा कंठ कौस्तुभ मण्यानें सोडिला नव्हता, अशा. ७ ज्याला रत्नाचा दांडा आहे, अशा. ८ चंवरीनें. ९ ज्याला वारा घातला, अशा. १० विडा खाणें वगैरे उपचारांनीं. ११ खेळविणाऱ्या. १२ आकाशांतून. १३ उतरला.

॥२॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नारदमुनि येत आहेत, ही गोष्ट रामचंद्राच्या ध्यानींमनीं देखील नव्हती; तो दिव्यपुरुष तेथें अगदीं अवचित येऊन उभा राहिला. त्याचें शरीर शुद्ध स्फटिक मण्यासारखें किंवा शरदृतूंतील चंद्रासारखें निर्मल होतें. ॥ ४ ॥ नारदाला पाहिल्याबरोबर, सीतेसह रामचंद्र संतोषानें एकदम उठून उभे राहिले व त्यांनीं हात जोडून भक्तिपुरःसर भूमीवर मस्तक ठेवून नमस्कार केला. ॥ ५ ॥ ह्यावेळीं रामचंद्राला पराकाष्ठेचा आनंद झाला; व तो नारदाला ह्मणालाः– 'मुनिश्रेष्ठा, संसारी पुरुषांना आपलें दर्शन दुर्लभ आहे; त्यांतूनही, नारदा, ज्यांचीं मनें विषयांमध्यें अत्यंत गढून गेलीं अशा माझ्यासारख्यांना तर तें अत्यंत दुर्लभ होय. ॥ ६ ॥

[1]शुद्धस्फटिकसंकाशः [2]शरच्चन्द्र इवामलः[3] ॥ अतर्कितमुपायातो नारदो दिव्यद-
र्शनः॥४॥तं दृष्ट्वा सहसोत्थाय रामः प्रीत्या कृताञ्जलिः ॥ ननाम शिरसा भूमौ
सीतया सह भक्तिमान्॥५॥उवाच नारदं रामः प्रीत्या परमया युतः ॥ संसारिणां
मुनिश्रेष्ठ दुर्लभं तव दर्शनम्॥अस्माकं विषयासक्तचेतसां नितरां मुने ॥ ६ ॥

(बा. मू.) नारदः [4]अतर्कितं [5]उपायातः. ॥४॥ सीतया सह भक्तिमान् रामः तं दृष्ट्वा, सहसा उत्थाय, प्रीत्या कृताञ्जलिः [सन्] शिरसा भूमौ ननाम. ॥५॥ परमया प्रीत्या युतः रामः नारदं उवाच – ' मुनिश्रेष्ठ, तव दर्शनं संसारिणां दुर्लभं; मुने, [6]विषयासक्तचेतसां अस्माकं [7]नितरां [दुर्लभम्]. ॥ ६ ॥

१ स्वच्छ स्फटिकासारखा. २ शरदृतूंतील चंद्र. ३ अमलः निर्मल. ४ ध्यानीं नसतां. ५ आला. ६ विषयांत गुंतलेलीं ज्यांचीं मनें, अशा. ७ अत्यंत.

नारद अवचित आले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आज माझीं पूर्वजन्मार्जित सर्व पुण्यें पूर्णपणें उदयास आलीं; कारण, नारदा, मी संसारांत पडलों असतांही मला साधूंचा समागम घडत आहे ! ॥ ७ ॥म्हणून, हें महासमर्थमुने, मी केवळ आपल्या दर्शनानेंच कृतकृत्य झालों. आतां आपलें कोणतें कार्य माझ्या हातून घडण्याजोगें असेल, तें सांगा; ह्मणजे मी तें करितों.' ॥ ८ ॥ नंतर, नारदमुनिही त्या भक्तांवर दया करणाऱ्या रामचंद्राला ह्मणाले :– ' रामा, लोकाचाराला अनुसरणारीं असलीं भाषणें बोलून मला मोहवितोस काय? ॥ ९ ॥ तूं सर्वव्यापी प्रभु आहेस, - हें मी जाणतों. - "मी संसारी " असें तूं ह्मटलेंस, तें खरेंच आहे; - कारण, तुलादेखील संसार आहेच. पण तो इतर प्राण्यांप्रमाणें

अवाप्तं मे पूर्वजन्मकृतपुण्यमहोदयैः ॥ संसारिणा ऽपि हि मुने लभ्यते सत्समागमः ॥ ७ ॥ अतस्त्वद्दर्शनादेव कृतार्थो ऽस्मि मुनीश्वर ॥ किं कार्यं ते मया कार्यं ब्रूहि तत्करवाणि भोः ॥ ८ ॥ अथ तं नारदो ऽप्याह राघवं भक्तवत्सलम् ॥ किं मोहयसि मां राम वाक्यैर्लोकानुसारिभिः ॥ ९ ॥ संसार्यहमिति प्रोक्तं सत्यमेतत्त्वया विभो ॥ जगतामादिभूता या सा माया गृहिणी तव॥ १० ॥

मुने, मे पूर्वजन्मकृतपुण्यमहोदयैः अवाप्तम्; हि संसारिणा अपि[मया]सत्समागमः लभ्यते ! ॥ ७ ॥ (मू. प्र.).' ॥ ८ ॥ अथ नारदः अपि भक्तवत्सलं तं राघवं आह – ' राम, मां लोकानुसारिभिः वाक्यैः किं मोहयसि ? ॥ ९ ॥ विभो, त्वया " संसारी अहं " इति प्रोक्तं, एतत् सत्यं; (मू.) तव गृहिणी. ॥ १० ॥

१ पूर्वजन्मीं केलेल्या पुण्यांच्या मोठ्या उदयांनीं. २ पाविजेलें. ३ लोकांना अनुसरणाऱ्या. ४ पत्नी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो.
समू-सान्व.
सटिप्पण.
॥ २ ॥

नसून, वेगळाच आहे :- सर्व जगाचें आदि कारण जी माया ती तुझी पत्नी होय. ॥ १० ॥ तुझ्या आश्रया-मुळें तिच्या ठिकाणीं ब्रह्मदेव आदिकरून प्रजा उत्पन्न होतात. सत्त्व, रज, तम अशा तीन गुणांनीं युक्त जी माया ती तुझ्या आधारानें नेहेमीं वेगवेगळ्या रूपांनीं भासत असते. ॥ ११ ॥ ती (माया) नित्य शुक्ल, कृष्ण आणि रक्त अशा वर्णांच्या प्रजा सर्वकाळ प्रसवते. त्रैलोक्यरूप प्रचंड गृहामध्यें राहणारा गृहस्थ तूं, असें ह्मटलें आहे. ॥ १२ ॥ तूं विष्णु व जानकी लक्ष्मी; तूं शंकर व जानकी पार्वती; तूं ब्रह्मदेव व जानकी सरस्वती; तूं सूर्य व जानकी प्रभा (सूर्याची पत्नी); ॥ १३ ॥ तूं चंद्र व जानकी सुलक्षणसंपन्न अशी

त्वंत्सन्निकर्षाज्जायन्ते तस्यां ब्रह्मादयः प्रजाः ॥ त्वदाश्रया सदा भाति माया
या त्रिगुणात्मिका ॥ ११ ॥ सूते ऽजस्रं शुक्लकृष्णलोहिताः सर्वदा प्रजाः ॥
लोकत्रयमहागेहे गृहस्थस्त्वमुदाहृतः ॥ १२ ॥ त्वं विष्णुर्जानकी लक्ष्मीः
शिवस्त्वं जानकी शिवा ॥ ब्रह्मा त्वं जानकी वाणी सूर्यस्त्वं जानकी प्रभा ॥ १३ ॥
भवान् शशांकः सीता तु रोहिणी शुभलक्षणा ॥ शक्रस्त्वमेव पौलोमी सीता
स्वाहा ऽनलो भवान् ॥ १४ ॥

तस्यां (बाकी पूर्वार्ध मूळाप्रमाणें) या त्रिगुणात्मिका माया (बाकी उत्तरार्ध मूळाप्रमाणें). ॥ ११ ॥ (बा. पू.) सर्वदा सूते, त्वं (बा. मू. प्र.) ॥ १२–१४ ॥

१ तुझ्या आश्रयानें. २ नित्य. ३ पांढऱ्या, काळ्या, तांबड्या. ४ त्रैलोक्यरूप मोठ्या घरांत. ५ ह्मटलेला. ६ पार्वती. ७ चंद्र. ८ इंद्राणी. ९ अग्नि.

अयं
सर्ग
ईश्वरा
संसार.
॥ २

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रोहिणी; तूंच इंद्र व जानकी इंद्राणी; तूं अग्नि व जानकी स्वाहा; ॥१४॥ प्रभो, मृत्युस्वरूपी यम तूंच व त्याची संयमिनी शक्ति जानकी; हे जगन्नाथा, तूं निर्ऋति व शुभरूपा जानकी तामसी (निर्ऋतीची पत्नी) होय; ॥ १५ ॥ रामा, तूंच वरुण, आणि शुभलक्षणा जानकी भार्गवी होय; रामचंद्रा, तूं वायु आणि जानकी सदा[2]गति (वायूची पत्नी), असें ह्मटलें आहे. ॥ १६ ॥ रामा, तूं कुबेर आणि सीता सर्व संपत्ति, असें ह्मटलें आहे; जानकीला रुद्राणी हें नांव आहे, व तूं सर्व लोकांचा संहार करणारा रुद्र आहेस; ॥१७॥ एकंदरींत जगामध्यें स्त्रीलिंगी जितक्या ह्मणून वस्तु आहेत त्या सर्व ही सुलक्षणा जानकी होय, व पुल्लिंगी सर्व पदार्थ, रामचंद्रा, तूं होस. ॥ १८ ॥ ह्मणून, हे देवा, त्रैलोक्यामध्यें तुह्मा दोघांहून निराळी वस्तु कोण-

यमस्त्वं कालरूपश्च सीता संयमिनी[1] प्रभो ॥ निर्ऋतिस्त्वं जगन्नाथ तामसी
जानकी शुभा ॥ १५ ॥ राम त्वमेव वरुणो भार्गवी जानकी शुभा ॥ वायुस्त्वं
राम सीता तु सदागतिरितीरिता[2] ॥ १६ ॥ कुबेरस्त्वं राम सीता सर्वसंपत्प्रकी-
र्तिता ॥ रुद्राणी जानकी प्रोक्ता रुद्रस्त्वं लोकनाशकृत् ॥ १७ ॥ लोके स्त्री-
वाचकं[3] यावत्तत्सर्वं जानकी शुभा ॥ पुन्नाम[4]वाचकं यावत्तत्सर्वं त्वं हि राघव
॥ १८ ॥ तस्माल्लोकत्रये देव युवाभ्यां[5] नास्ति किंचन ॥ १९ ॥

(मू. प्र.). ॥ १५–१८ ॥ देव, (वा. मू.) अन्यत नास्ति. ॥ १९ ॥

---

१ नियम करणारी शक्ति. २ संतत गतिरूप शक्ति. ३ स्त्रीलिंगी. ४ पुल्लिंगी. ५ तुह्मां दोघांहून.

तीही नाहीं. ॥ १९ ॥ तुझ्या संबंधाच्या योगानें सृष्टि करण्यास प्रवृत्त झालेलें जें अज्ञान, त्याला "अव्याकृत (प्रकृति)" ही संज्ञा आहे. त्या अव्याकृतापासून महत्तत्त्व होतें. त्या महत्तत्त्वापासून अहंकार होतो. व त्या अहंकारापासून सर्वकार्यरूपी लिंगदेह उत्पन्न होतो. ॥ २० ॥ - तीं सर्व कार्यें - अहंकार (मन), बुद्धि, पांच सूक्ष्म भूतें (ह्यांच्याच पोटीं पांच कर्मेंद्रियें आहेत), पांच प्राण, व पांच ज्ञानेंद्रियें, हीं होत. विद्वान् लोक ह्या लिंगदेहालाच जन्म, मृत्यु, सुख, दुःख, इत्यादि विकार आहेत, असें ह्मणतात. ॥ २१ ॥ ह्या लिंगशरीराचा अभिमानी सर्वजगत्स्वरूपी (समष्टिरूपी) जो हिरण्यगर्भ त्यालाच "जीव" ही संज्ञा आहे. - ब्रह्मस्वरूप निर्विकार असतांही उपाधीमुळें संसाराचें - कारण भासतें. तो उपाधि अविद्या (अज्ञान) होय. तिच्या स्वरूपाचें निश्चयात्मक वर्णन करितां येत नाहीं व तिला उत्पत्ति नाहीं. ॥ २२ ॥

त्वदा[1]भासोदिताज्ञानमव्या[2]कृतमितीर्यते[3] ॥ तस्मान्म[4]हांस्ततः [5]सूत्रं [6]लिंगं सर्वात्मकं ततः ॥ २० ॥ अहंकारश्च बुद्धिश्च पञ्च प्राणेन्द्रियाणि च ॥ लिंगमित्युच्यते [7]प्राज्ञैर्जन्म[8]मृत्युसुखादिमत् ॥ २१ ॥ स एव जीवसंज्ञश्च लोके भाति जगन्मयः ॥ [9]अवाच्यानाद्यविद्यैव कारणोपाधिरुच्यते ॥ २२ ॥

(मू.), ततः सर्वात्मकं लिंगम्. ॥२०॥ प्राज्ञैः (मू.) लिंगं उच्यते.॥२१॥(बा. पू.) भाति; (उ.). ॥२२॥

१ तुझ्या संबंधानें सृष्टि करण्यास सिद्ध झालेलें अज्ञान (माया). २ अव्यक्त (स्पष्ट न-समजणारें). ३ ईर्यते ह्मटलें जातें. ४ महत्तत्त्व. ५ अहंकार. ६ लिंगदेह. ७ विद्वानांनीं. ८ मृत्यु सुख वगैरे ज्याला आहेत, असे. ९ जिच्याबद्दल कांहीं ह्मणतां येत नाहीं अशी व उत्पत्तिरहित.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चैतन्याला स्थूल शरीर (विराट्), सूक्ष्म (लिंगदेह), आणि कारण (अंतर्यामी ईश्वर), अशा तीन प्रकारांचे उपाधि आहेत. ह्या उपाधींनीं युक्त चैतन्याला " जीव " असें म्हणतात; व उपाधींनीं रहित चैतन्य परमेश्वर होय. ॥ २३ ॥ एकंदर सर्व संसाराचा तीन संज्ञांच्या पोटीं अंतर्भाव होतो. त्या संज्ञा जाग्रत्, स्वप्न आणि सुषुप्ति, ह्या होत. - जाग्रत् म्हणजे जागेपण, ज्यांत इंद्रियांचे व्यापार चालतात तें. स्वप्न म्हणजे ज्यांत इंद्रियांचे व्यापार न चालतां केवळ अंतःकरणाच्या वासनांप्रमाणें निरानिराळे पदार्थ उत्पन्न होतात तें. व सुषुप्ति म्हणजे झोंप, हींत इंद्रियांची किंवा मनाची कोणतीही वृत्ति चालत नाहीं. - रघुवीरा, तूं त्या संसाराहून वेगळा असून त्याला प्रत्यक्ष पाहणारा आहेस. ॥ २४ ॥ हें सर्व जग तुझ्यापासून उत्पन्न झालें असून, तुझ्या ठिकाणीं राहिलें आहे, अंतकालीं हें सगळें तुझ्या ठिकाणींच लय पावतें; म्हणून ह्या सर्व सृष्टीचें कारण तूंच आहेस. ॥ २५ ॥ दोरीला सर्प मानलें म्हणजे मनुष्याला भय वाटूं लागतें त्याप्रमाणें, आत्माला

स्थूलं सूक्ष्मं कारणाख्यमुपाधित्रितयं चितेः ॥ एतैर्विशिष्टो[१] जीवः स्याद्वियुक्तः[२]
परमेश्वरः ॥२३॥ जाग्रत्स्वप्नसुषुप्त्याख्या संसृतिर्या प्रवर्तते ॥ तस्या विलक्षणः[३]
साक्षी चिन्मात्रस्त्वं रघूत्तम ॥२४॥ त्वत्त एव जगज्जातं त्वयि सर्वं प्रतिष्ठितम्[४]॥
त्वय्येव लीयते[५] कृत्स्नं[६] तस्मात्त्वं सर्वकारणम् ॥ २५ ॥ रज्जावहिमिवात्मानं[७][८]
जीवं ज्ञात्वा भयं भवेत् ॥ परात्मा ऽहमिति ज्ञात्वा भयदुःखैर्विमुच्यते ॥२६॥

चितेः (मू. प्र.) ॥ २३–२६ ॥

१ युक्त. २ रहित. ३ वेगळा. ४ राहिलेलें. ५ लय पावतें. ६ सर्व. ७ रज्जौ. दोरीवर. ८ अहिं सर्पाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जीव असें मानिलें ह्मणजे भयरूप संसार भोगावा लागतो. तेंच पुन्हां "मी परमेश्वर" असें ज्ञान झालें म्हणजे प्राणी संसाररूप भीतीपासून आणि दुःखांपासून मुक्त होतो. ॥ २६ ॥ तूं केवळ ज्ञानरूप तेजानें सर्व शरीरांत सर्व बुद्धींना प्रकाशित करितोस, म्हणून तूंच सर्वांचा आत्मा आहेस. ॥ २७ ॥ जसा रज्जूवर सर्पाचा आरोप अज्ञानामुळें केला जातो त्याप्रमाणें तुझ्या स्वरूपीं सर्व जगाचा आरोप अज्ञानामुळें केला जातो; तुझें ज्ञान झालें कीं ह्या सर्व प्रपंचाचा लय होतो. ह्मणून ज्ञानाचा नित्य अभ्यास करावा. ॥ २८ ॥ प्राणी तुझ्या चरणांची भक्ति करूं लागले, ह्मणजे त्यांना अपरोक्ष (प्रत्यक्ष) ज्ञान होतें. - भक्तीशिवाय ज्ञानाला दुसरा मार्ग नाहीं. - ह्यावरून तुझी भक्ति करणाऱ्या पुरुषांनाच मोक्षप्राप्ति होते, असें सिद्ध आहे. ॥ २९ ॥

चिन्मात्र[1]ज्योतिषा सर्वाः सर्वदेहेषु बुद्धयः ॥ त्वया यस्मात्प्रकाश्यन्ते[2] सर्वस्यात्मा
ततो भवान् ॥ २७ ॥ अज्ञानान्न्यस्यते सर्वं त्वयि रज्जौ भुजंगवत् ॥
त्वज्ज्ञानाल्लीयते सर्वं तस्माज्ज्ञानं सदाऽभ्यसेत् ॥ २८ ॥ त्वत्पादभक्तियुक्तानां
विज्ञानं भवति क्रमात् ॥ तस्मात्त्वद्भक्तियुक्ता ये मुक्तिभाजस्त एव हि ॥ २९ ॥

त्वया चिन्मात्रज्योतिषा सर्वदेहेषु सर्वाः बुद्धयः यस्मात् प्रकाश्यन्ते, ततः भवान् सर्वस्य आत्मा. ॥२७॥ सर्वं त्वयि, रज्जौ भुजंगवत्[3], अज्ञानात् न्यस्यते[4]; त्वज्ज्ञानात् सर्वं लीयते; (बा. मू.). ॥ २८ ॥ (पू. मू.); तस्मात्, ये त्वद्भक्तिभाजः ते एव मुक्तिभाजः[5]. ॥ २९ ॥

१ केवळ ज्ञानरूप तेजानें. २ प्रगट केल्या जातात. ३ सर्पाप्रमाणें. ४ आरोपिलें जातें. ५ मोक्ष मिळविणारे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मी तुझ्या भक्तांच्या भक्तांचा व त्यांच्याही भक्तांचा दास आहें. म्हणून, हे समर्था, मजवर कृपा कर आणि मला मोहांत पाडूं नकोस. ॥ ३० ॥ तुझ्या नाभिकमलापासून उत्पन्न झालेला ब्रह्मदेव माझा पिता होय. तेव्हां हे परमेश्वरा रघुवीरा, मी तुझा नातू झालों. म्हणून मज दासाचें रक्षण कर. ' ॥ ३१ ॥ असें बोलून नारदानें रामचंद्राला अनेक वेळां नमस्कार केले. त्याच्या नेत्रांतून सारखे आनंदाश्रु वाहूं लागले. पुढें तो रामचंद्राला पुन्हा ह्मणाला :– ' रामा, मला ब्रह्मदेवानें - तुला निरोप सांगण्यासाठीं - पाठविलें आहे. ॥ ३२ ॥ रघुकुलश्रेष्ठा, तूं रावणाचा वध करण्यासाठीं अवतार घेतला आहेस. आतां राज्याच्या संरक्षणा-

अहं त्वद्भक्तभक्तानां तद्भक्तानां च किंकरः[1] ॥ अतो मामनुगृह्णीष्व[2] मोहयस्व
न मां प्रभो ॥ ३० ॥ त्वन्नाभिकमलोत्पन्नो ब्रह्मा मे जनकः[4] प्रभो ॥ अतस्त-
वाहं पौत्रो[5] ऽस्मि भक्तं मां पाहि[6] राघव ॥ ३१ ॥ इत्युक्त्वा बहुशो नत्वा
स्वानन्दाश्रुपरिप्लुतः ॥ उवाच वचनं राम ब्रह्मणा नोदितो[7] ऽस्म्यहम् ॥ ३२ ॥
रावणस्य वधार्थाय जातो ऽसि रघुसत्तम ॥ इदानीं राज्यरक्षार्थं पिता त्वाम-
भिषेक्ष्यति[8] ॥ ३३ ॥

(मू.), प्रभो, मां न मोहय[3]स्व. ॥३०॥ (मू.). ' ॥ ३१ ॥ (पू. मू.) [सन्] वचनं उवाच – 'राम, अहं ब्रह्मणा नोदितः अस्मि. ॥ ३२ ॥ (मू.). ॥ ३३ ॥

१ सेवक. २ कृपा कर. ३ मोह घाल (वेडा कर). ४ पिता. ५ नातू. ६ रक्षण कर. ७ प्रेरिलेला. ८ अभिषेक करील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

' मी सर्व समजतों.'

साठीं पिता तुला अभिषेक करील. ॥ ३३ ॥ जर तूं राज्यकार्यांत सक्त होऊन राहशील, तर रावणाचा वध करणें तुजकडून होणार नाहीं ! रामा, तूं पृथ्वीचा भार दूर करण्याबद्दल प्रतिज्ञा केली आहेस, ॥ ३४ ॥ ती खरी कर. राजश्रेष्ठा, तुझी प्रतिज्ञा सत्य असतेच (तूं प्रतिज्ञा करशील त्याप्रमाणें निःसंशय करितोसच) असें सर्वत्र प्रसिद्ध आहे. ' हें नारदाचें भाषण ऐकिल्यावर रामचंद्र हांसत हांसत त्याला ह्मणाले :–॥३५॥ ' नारदा, माझें ऐक. अरे, जगामध्यें मला समजत नाहीं असें कोठें कांहींतरी आहे काय ? - नाहीं. सगळें कांहीं मला समजतें. - मी प्रतिज्ञा केली आहे त्याप्रमाणें सगळें करीन, ह्याबद्दल अगदीं संशय नको. ॥३६॥ परंतु ह्या सर्व गोष्टी कालानुरोधानें घडतील. - कालाला मुख्यता मीच देऊन ठेविली आहे. - दैत्यांच्या स-

यदि राज्याभिसंसक्तो[1] रावणं न हनिष्यसि[2]॥प्रतिज्ञा ते कृता राम भूभारहरणाय वै ॥३४॥तत्सत्यं कुरु राजेन्द्र सत्यसंधस्त्वमेव[3] हि ॥ श्रुत्वैतद्वदितं[4] रामो नारदं प्राह सस्मितम् ॥३५॥ शृणु नारद मे किंचिद्विद्यते ऽविदितं[5] क्वचित्[6]॥प्रतिज्ञातं च यत्पूर्वं करिष्ये तन्न संशयः ॥३६॥ किंतु कालानुरोधेन[7] तत्तत्प्रारब्धसंक्षयात्[8] ॥

राम, (बा. मू.) प्रतिज्ञा कृता वै. ॥ ३४ ॥ (मू.).' रामः एतद् गदितं श्रुत्वा, नारदं सस्मितं प्राह– ॥ ३५ ॥ 'नारद, शृणु मे क्वचित् किञ्चित् अविदितं विद्यते ? यत् पूर्वं प्रतिज्ञातं, तत् करिष्ये; न संशयः ॥ ३६ ॥ (मू.) ॥

---

१ राज्यामध्यें गुंतलेला. २ मारशील. ३ ज्याची प्रतिज्ञा सत्य आहे, असा. ४ भाषणाला. ५ न समजलेलें. ६ आहे. ७ कालानुसार. ८ त्यांच्या प्रारब्ध कर्माचा क्षय झाला ह्मणजे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मूहाचीं प्रारब्ध कर्मे क्षीण झालीं ह्मणजे मी क्रमाक्रमानें त्यांचा नाश करीन व पृथ्वीचा भार उतरीन.॥३७॥ रावणाचा वध करण्याच्या उद्देशानें मी उद्यां दंडकारण्यांत जाणार आहें. तेथें मुनींचा वेष घेऊन चौदा वर्षे राहीन, ॥ ३८ ॥ व सीतेच्या मिषानें मी त्या दुष्टाचा कुलासह नाश करीन.' अशी रामाची प्रतिज्ञा ऐकिल्यावर नारदाला पराकाष्ठेचा आनंद झाला. ॥ ३९ ॥ पुढें नारदमुनींनीं रामाला तीन प्रदक्षिणा घातल्या, साष्टांग नमस्कार केला, व रामानें अनुमोदन दिलें असतां, स्वर्गलोकाच्या मार्गे गमन केलें. ॥ ४० ॥ जो मनुष्य श्रेष्ठ नारदमुनींच्या व रामचंद्राच्या ह्या संवादाचें प्रतिदिनीं भक्तिपुरःसर पठण, श्रवण, किंवा मनन

हरिष्ये सर्वभूभारं क्रमेणासुरमण्डलम्॥३७॥रावणस्य विनाशार्थं श्वो[2] गन्ता दण्डकावनम् ॥ चतुर्दश समा[4]स्तत्र ह्युषित्वा[5] मुनिवेषधृक्[6]॥३८॥ सीता[7]मिषेण तं दुष्टं सकुलं नाशयाम्यहम्॥एवं रामे प्रतिज्ञाते नारदः प्रमुमोद[8] ह॥३९॥प्रदक्षिणत्रयं कृत्वा दण्डवत्प्रणिपत्य तम् ॥ अनुज्ञातश्च रामेण ययौ देवगतिं[9] मुनिः ॥४०॥ संवादं पठति शृणोति संस्मरेद्वा यो नित्यं मुनिवररामयोः स भक्त्या॥

(मू.) हरिष्ये[1]. ॥३७॥ (बा. पू. मू.) गन्ता[3], (उ. मू.) ॥३८॥ अहं (पू.)' (उ.) ॥ ३९ ॥ मुनिः तं (मू.), रामेण अनुज्ञातः देवगतिं ययौ. ॥ ४० ॥ यः नित्यं भक्त्या मुनिवररामयोः (पू. मू.), ॥

---

१ नाहींसें करीन. २ उद्यां. ३ जाईन. ४ वर्षे. ५ उषित्वा राहून. ६ मुनीचा वेष धारण करणारा. ७ सीतेच्या बाहण्यानें. ८ अत्यंत आनंदित झाला. ९ देवलोकाच्या मार्गाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

‘ रामाला रा-
ज्याभिषेक क-
रितों.’

करितो, त्याला प्रथम वैराग्य होतें व पुढें क्रमानें ब्रह्मस्वरूपीं ऐक्यरूप मोक्ष प्राप्त होतो. मोक्षपद देवांना देखील मिळणें फार कठीण आहे.॥४१॥इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे अयोध्याकाण्डे प्रथमः सर्गः॥ १॥

शंकर ह्मणाले :– पार्वति, इकडे दशरथ राजा एकांतांत बसला असतां, आपले कुलगुरु जे वसिष्ठमुनि, त्यांना बोलावून आणून असें ह्मणाला :– ॥ १ ॥ ‘ अहो ज्ञानसंपन्न महाराज, नगरांतील सर्व लोक, व्यापारी किंवा वेदवेत्ते विद्वान्, विशेषेंकरून वृद्ध वृद्ध मंत्री रामचंद्राची वारंवार प्रशंसा करीत असतात; - तो सर्वांना प्रिय झाला आहे; - ॥ २ ॥ तसेंच, तो सर्वगुणसंपन्न असून माझ्या सगळ्या मुलांत वडील

संप्राप्नोत्यमरसुदुर्लभं विमोक्षं कैवल्यं विरतिपुरःसरं क्रमेण ॥ ४१ ॥ इति श्रीमदध्या० उमा० अयोध्याकाण्डे प्रथमः सर्गः ॥ १ ॥ श्रीमहादेव उवाच । अथ राजा दशरथः कदाचिद्रहसि स्थितः ॥ वसिष्ठं स्वकुलाचार्यमाहूय[4]ेदम[5]भाषत ॥ १ ॥ भगवन् राममखि[6]लाः प्रशंसन्ति मुहुर्मुहुः ॥ पौ[7]राश्च नै[8]गमा वृद्धा मन्त्रिणश्च विशेषतः ॥ २ ॥ ततः सर्वगुणोपेतं रामं राजीवलोचनम् ॥

सः विरति[1]पुरःसरं (बा. मू.) कै[2]वल्यं वि[3]मोक्षं संप्राप्नोति. ॥ ४१ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये अयोध्याकाण्डे प्रथमः सर्गः ॥ १ ॥ श्रीम०उ०–(मू.) ॥१॥ ‘भगवन्, (बा. मू.) रामं मुहुर्मुहुः प्रशंसन्ति. ॥२॥ मुनिपुंगव, ततः वृद्धः अहं (मू.). ॥

१ वैराग्यपूर्वक. २ ब्रह्मरूपीं ऐक्य पावणें ह्या. ३ मोक्षाला. ४ आहूय बोलावून. ५ अभाषत बोलला. ६ सगळे. ७ नगरवासी. ८ व्यापारी, किंवा वेद व वेदार्थ जाणणारे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे; ह्मणून मुनिश्रेष्ठा, मी त्या कमलनयन रामचंद्राला राज्याभिषेक करितों. आतां माझेंही पण वय झालें. ॥ ३ ॥ शत्रुघ्नासह भरत आपल्या मामाला भेटण्यासाठीं गेला आहे. तेव्हां आपण इकडे लवकरच, नाहीं उद्यांच, अभिषेक करावा, असें मला वाटतें. आपलें ह्या विचाराला अनुमोदन असावें. ॥ ४ ॥ साहित्यें जमवायाला लागावें. महाराज, आपण रामाकडे जाऊन त्याच्या कानावर ही गोष्ट घालावी. अनेक वर्णांच्या पताका नगरांत जिकडे तिकडे उभारवाव्या. ॥ ५ ॥ सोन्याचीं व मोत्यांचीं चित्रविचित्र तोरणें बांधवावीं.' नंतर दशरथराजानें आपल्या प्रधानमंडळांतील मुख्य सुमंत्रनामक प्रधानाला बोलावून आणून सांगितलें कीं, ॥ ६ ॥ वसिष्ठमुनि आज्ञा करतील त्याप्रमाणें ती ती सामग्री आणून दे; उद्यां मी रामचंद्राला युवराजपदाचा

ज्येष्ठं राज्ये ऽभिषेक्ष्यामि[1] वृद्धो ऽहं मुनिपुंगव ॥ ३ ॥ भरतो मातुलं द्रष्टुं गतः शत्रुघ्नसंयुतः ॥ अभिषेक्ष्ये श्व[2] एवाशु भवांस्तच्चानुमोदताम्[3] ॥४॥ संभाराः[4] संभ्रियन्तां[5] च गच्छ मन्त्रय राघवम् ॥ उच्छ्रीयन्तां पताकाश्च नानावर्णाः समन्ततः ॥ ५ ॥ तोरणानि विचित्राणि स्वर्णमुक्तामयानि वै ॥ आहूय मन्त्रिणं राजा सुमन्त्रं मन्त्रिसत्तमम् ॥ ६ ॥ आज्ञापयति यद्यत्त्वां मुनिस्तत्तत्समानय[9] ॥

(मू.)॥३॥ शत्रुघ्नसहितः (पू. मू.); श्वः एव आशु अभिषेक्ष्ये, (बा. मू.).॥४॥(पू. मू.) राघवं मन्त्रय, नानावर्णाः (मू.) उच्छ्रीयन्तां. ॥ ५ ॥ (मू.) तोरणानि च [उच्छ्रीयन्ताम्].' राजा मन्त्रिसत्तमं सुमन्त्रं मन्त्रिणं आहूय [आह]-- ॥ ६ ॥ 'मुनिः यत् यत् त्वां (बा. मू.) ॥

१ अभिषेक करीन. २ उद्यां. ३ अनुमोदन देणें. ४ साहित्य. ५ जमविलें जावो. ६ कळव. ७ उभारल्या जावोत. ८ अतिश्रेष्ठ प्रधानाला. ९ आण.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अभिषेक करणार आहें.' ॥ ७ ॥ सुमंत्र आनंदानें राजाला 'बरें आहे' असें म्हणून वसिष्ठमुनींला ह्मणालाः— 'महाराज, मी काय करावें - ती आज्ञा व्हावी. -' नंतर महातेजस्वी श्रेष्ठ ज्ञानी वसिष्ठमुनि त्याला ह्मणाले :- ॥ ८ ॥ 'उद्यां सकाळीं मधल्या द्वारांत सुवर्णालंकारांनीं भरलेल्या अशा सोळा कन्या उभ्या राहाव्या. ऐरावताच्या वंशांत जन्मलेला चार दांतांचा हत्ती सोन्याच्या व रत्नांच्या वगैरे अलंकारांनीं सुशोभित करून तेथें आणावा. अनेक तीर्थांतील उदकांनीं पूर्ण भरलेले सुवर्णाचे सहस्रावधि कलश ॥ ९ ॥ १० ॥ आणून ठेवावे. नऊ किंवा तीन व्याघ्रांबरें आणावीं. रत्नाच्या दांड्याचें व मोत्यांच्या आणि रत्नांच्या झि-

यौवराज्ये ऽभिषेक्ष्यामि श्वोभूते[2] रघुनन्दनम् ॥७॥तथेति हर्षात्स मुनिं किं करोमी-
त्यभाषत ॥ तमुवाच महातेजा[3] वसिष्ठो ज्ञानिनां वरः ॥ ८ ॥ श्वः प्रभाते मध्यकक्षे[4]
कन्यकाः स्वर्णभूषिताः ॥ तिष्ठन्तु षोडश गजः स्वर्णरत्नादिभूषितः॥९॥ चतुर्दन्तः
समायातु ऐरावतकुलोद्भवः ॥ नानातीर्थोदकैः पूर्णाः स्वर्णकुम्भाः सहस्रशः
॥१०॥ स्थाप्यन्तां[10] नव[11] वैयाघ्रचर्माणि[12] त्रीणि[13] वा ऽऽनय ॥

(वा.मू.)यौवराज्ये[1] अभिषेक्ष्यामि.' ॥७॥ सः (मू.) वसिष्ठः तं उवाच-॥८॥ '(वा. पू.) षोडश[5] कन्यकाः तिष्ठन्तु[6]. स्वर्णरत्नादिभूषितः ऐरावतकुलोद्भवः[7] चतुर्दन्तः[8] गजः च समायातु[9]॥(मू.)॥९॥ १०॥(पू. मू.)॥

१ तरुण (होतकरू) राजाच्या पदवीवर. २ उद्यांचा दिवस उजाडला ह्मणजे. ३ महातेजस्वी. ४ मधल्या दालनांत. ५ सोळा. ६ उभ्या राहोत. ७ ऐरावताच्या कुळांत जन्मलेला. ८ ज्याला चार दांत आहेत, असा. ९ येवो. १० ठेविले जावोत. ११ नऊ. १२ वाघांचीं चर्में (कातडीं). १३ तीन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ळमिळ्या लावलेलें शुभ्र छत्र, ॥ ११ ॥ उत्तम फुलें, वस्त्रें, तसेंच बहुमोल अलंकार एवढी सामग्री सिद्ध ठेवा. मुनिगणांना सत्कारपूर्वक - आमंत्रणें करा; - त्यांनीं हातांत दर्भ घेऊन त्या स्थलीं असावें. ॥ १२ ॥ नाचणाऱ्या कलावंतिणी, वारांगना, गवई, अलगुजें किंवा मुरली वाजविणारे, तसेच नानाप्रकारचीं वाद्यें वाजविण्यांत कुशल अशा वाजंत्र्यांनी राजवाड्याच्या अंगणांत वाजवीत बसावें. ॥ १३ ॥ आपआपलीं आयुधें घेऊन सज्ज असें हत्ती, घोडे, रथ व पायदळ हें चतुरंग सैन्य तेथें बाहेर उभें करावें. नगरांत जीं जीं देवालयें आहेत, ॥ १४ ॥ त्यांत पूजा चालू ठेवा; त्या देवतांना प्रिय असतील ते वेगवेगळे बलि द्या. राजांना

श्वेतच्[1]छत्रं रत्न[2]दण्डं [3]मुक्तामणिविराजितम् ॥ ११ ॥ दिव्यमाल्या[4]नि वस्त्राणि
दिव्यान्याभरणानि च॥ मुनयः सत्कृतास्तत्र तिष्ठन्तु कुशपाणयः ॥ १२॥[7]नर्तक्यो
[8]वारमुख्याश्च [9]गायका [10]वेणुकास्तथा ॥ [11]नानावादित्रकुशला [12]वादयन्तु नृपांगणे
॥ १३ ॥ [14]हस्त्यश्वरथपादाता बहिस्तिष्ठन्तु सायुधाः ॥ नगरे यानि तिष्ठन्ति
[15]देवतायतनानि च ॥१४॥ तेषु प्रवर्ततां पूजा [16]नानाबलिभिरावृ[17]ता ॥

(बा. उ.) श्वेतच्छत्रं, ॥११॥ (पू. मू.) तत्र सत्कृताः मुनयः [5]कुशपाणयः तिष्ठन्तु. ॥ १२ ॥ [6]नृपांगणे (मू.).॥१३॥[13]सायुधाः (बा. मू.) तिष्ठन्तु, ॥१४॥ (बा. पू.) पूजा [18]प्रवर्ततां, ॥

१पांढरें छत्र. २रत्नाचा दांडा ज्याला आहे, अशा. ३मोत्यांनीं आणि रत्नांनीं शोभविलेल्या. ४उत्तम फुलांना. ५दर्भ ज्यांच्या हातांत आहेत, असे. ६ राजाच्या अंगणांत. ७नाचणाऱ्या. ८मुख्यें मुख्य वारांगना. ९गवई. १०मुरली अलगुजीं वाजविणारे. ११अनेक वाद्य वाजविण्यांत कुशल. १२वाजवोत. १३आयुधांसह. १४हत्ती, घोडे, रथ व पायदळ. १५देवालयें. १६अनेक बलींनीं. १७युक्त. १८ चालो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वसिष्ठ राममंदिरीं आले.

- बोलावणीं पाठवा; - त्यांनीं अनेक प्रकारांचे नजराणे घेऊन लवकर येथें प्राप्त व्हावें.' ॥ १९ ॥ महातेजस्वी वसिष्ठमुनि राजाच्या सुमंत्रनामक प्रधानाला अशी आज्ञा देऊन, स्वतां रामचंद्राच्या मंदिरीं गेले. तें मंदिर अति सुंदर होतें. ॥ १६ ॥ त्रिकालज्ञानी श्रेष्ठ वसिष्ठ मुनि रथांत बसून - रामाकडे आले व त्याच्या मंदिराचीं - तीन द्वारें (चौक्या) उल्लंघून आंत आल्यावर रथांतून भूमीवर उतरले. ॥ १७ ॥ वसिष्ठ स्वतांचे (रामाचे) कुलगुरु ह्मणून रामाच्या मंदिरांत त्यांना जाण्याला प्रतिबंध अगदीं नव्हता. ते, राम अंतःपुरांत होता, तेथपर्यंत थेट गेले. गुरु आले असें कळल्याबरोबर रामचंद्र तत्काल हात जोडून ॥ १८ ॥

राजानः शीघ्रमायान्तु नानो[1]पायनपाणयः ॥ १५ ॥ इत्यादिश्य मुनिः श्रीमान्
सुमन्त्रं नृपमन्त्रिणम् ॥ स्वयं जगाम भवनं राघवस्यातिशोभनम् ॥ १६ ॥
रथमारुह्य भगवान्वसिष्ठो मुनिसत्तमः ॥ त्रीणि [6]कक्षाण्यति[7]क्रम्य रथात्क्षिति-
र्मवातरत् ॥ १७ ॥ अन्तः प्रविश्य भवनं स्वाचार्यत्वादवारितः ॥ गुरुमागत-
माज्ञाय रामस्[11]तूर्णं कृता[12]ञ्जलिः ॥ १८ ॥

(मू.) शीघ्रं आया[2]न्तु.' ॥ १९ ॥ श्रीमान् मुनिः नृपमन्त्रिणं सुमन्त्रं इति [3]आदिश्य, स्वयं राघवस्य अतिशोभनं [4]भवनं [5]जगाम. ॥ १६ ॥ मुनिसत्तमः भगवान् वसिष्ठः (मू.), ॥ १७ ॥ [9]स्वाचार्यत्वात् [10]अवारितः भवनं प्रविश्य अन्तः [प्रविष्टः]. रामः (उ. मू.), ॥ १८ ॥

---

१ अनेक उपायनें (नजराणे) हातांत घेतलीं ज्यांनीं, असे. २ येवोत. ३ आज्ञा देऊन. ४ मंदिराला. ५ गेला. ६ कक्षाणि दालनांना. ७ अतिक्रम्य उल्लंघून. ८ अवातरत् उतरला. ९ आपला गुरु ह्मणून. १० निष्प्रतिबंध. ११ तूर्णम् तत्काल. १२ ज्यानें हात जोडिले, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सामोरा आला. अंतःकरणांत गुरूबद्दल पूर्ण भक्ति असल्यामुळें त्यानें साष्टांग नमस्कार केला. इकडे जानकीनें सुवर्णाच्या पात्रांत लागलेंच उदक आणिलें. ॥ १९ ॥ सीतेसह रामचंद्रानें वसिष्ठमुनींना रत्नांच्या आसनावर बसवून भक्तिपूर्वक त्यांचे पाय धुतले, तें उदक मस्तकीं धारण केलें, व ॥ २० ॥ म्हटलें :– ' महाराज, आज आपल्या चरणकमलाचें तीर्थ धारण केल्यामुळें मी कृतार्थ झालों.' श्रीरामाचें हें भाषण ऐकून वसिष्ठ मुनींना हांसू आलें. ते ह्मणाले :– ॥ २१ ' रामा, प्रत्यक्ष पार्वतीपति शं-

प्रत्युद्गम्य[1] नमस्कृत्य दण्डवद्भक्तिसंयुतः॥स्वर्णपात्रेण पानीयमानिनायाशु[3,4] जानकी ॥ १९ ॥ रत्नासने[5] समावेश्य[6] पादौ प्रक्षाल्य[7] भक्तितः ॥ तदपः[8] शिरसा[9] धृत्वा[10] सीतया सह राघवः ॥ २० ॥ धन्योऽस्मीत्यब्रवीद्रामस्तव पादाम्बुधारणात् ॥
श्रीरामेणैवमुक्तस्तु प्रहसन्मुनिरब्रवीत् ॥२१॥त्वत्पादसलिलं[12] धृत्वा धन्योऽभूद्गिरिजापतिः ॥ ब्रह्माऽपि मत्पिता ते हि पादतीर्थहताशुभः[13] ॥ २२ ॥

भक्तिसंयुतः प्रत्युद्गम्य[1], दण्डवत् नमस्कृत्य, [स्थितः]. जानकी आशु[2] (उ. मू.). ॥१९॥ सीतया सह राघवः (मू.), ॥२०॥ रामः 'तव पादाम्बुधारणात्[11] धन्यः अस्मि' इति अब्रवीत्. (उ मू.)– ॥ २१ ॥ ' गिरिजापतिः (पू. मू.). मत्पिता (उ. मू.). ॥ २२ ॥

---

१ सामोरा जाऊन. २ तत्काल. ३ **पानीयम्** उदकाला. ४ **आनिनाय** आणिती झाली. ५ रत्नाच्या आसनावर. ६ बसवून. ७ धुवून. ८ त्या उदकाला. ९ मस्तकानें. १० धरून. ११ तुमचें चरणतीर्थ धरिल्यामुळें. १२ तुझ्या पादोदकाला. १३ चरणतीर्थानें ज्याचीं पातकें नाहींशीं झालीं असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कर तुझें चरणतीर्थ मस्तकीं धरिल्यामुळें धन्य झाला; माझा पिता ब्रह्मदेव तरी तुझ्या पादोदकानेंच निष्पाप झाला; ॥ २२ ॥ आणि तूं मला हें असें बोलून - गौरवीत - आहेस. - असें करण्यांत तुझा उद्देश एवढाच दिसतो कीं, ब्राह्मणांना पूज्य मानण्याबद्दल - लोकांना उपदेश करावा. मी तुझें सत्य स्वरूप जाणतों. तूं सर्वशक्तिमान ईश्वर लक्ष्मीसह येथें अवतरला आहेस. ॥ २३ ॥ रघुवीरा, देवांचें कार्य सिद्ध करावें, भक्तांना भक्ति करण्याला उत्तम आश्रय मिळवून द्यावा व रावणाचा वध करावा ह्या तीन कार्यांसाठीं तूं अवतार घेतला आहेस, हें मी जाणतों. ॥ २४ ॥ तरी पण, देवांचें कार्य सिद्ध होण्याकरितां मी ही गुप्त गोष्ट कोठेंही उघड करीत किंवा करणार नाहीं. रामचंद्रा, तूं मायेनें जें सर्व कांहीं करीत आहेस, ॥ २५ ॥ त्याचप्रमाणें मी आपलें योग्य वर्तन ठेवीन. तूं आपल्याला माझा शिष्य ह्मणवून घेतोस, तर मीही पण स्वतांला

इदानीं भाषसे यत्त्वं लोकानामुपदेशकृत् ॥ जानामि त्वां परात्मानं लक्ष्म्या संजातमीश्वरम् ॥ २३ ॥ देवकार्यार्थसिद्ध्यर्थं भक्तानां भक्तिसिद्धये ॥ रावणस्य वधार्थाय जातं जानामि राघव ॥ २४ ॥ तथाऽपि देवकार्यार्थं गुह्यं नोद्धाटयाम्यहम् ॥ यथा त्वं मायया सर्वं करोषि रघुनन्दन ॥ २५ ॥ तथैवानुविधास्ये ऽहं शिष्यस्त्वं गुरुरप्यहम् ॥ गुरुर्गुरूणां त्वं देव पितॄणां त्वं पितामहः ॥ २६ ॥

त्वं इदानीं[1] यत् भाषसे[2], [तस्मात्] लोकानां उपदेशकृत्[3] [असि]. (बा. मू.) जानामि[4]. ॥२३॥ राघव, (मू.). ॥२४॥ तथापि अहं (मू.),॥२५॥अहं (पू. मू.)॥ देव, त्वं गुरूणां (बा. मू.).॥२६॥

१ आतां. २ बोलतोस. ३ उपदेश करणारा. ४ जाणतों. ५ उद्घाटयामि उघड करितों. ६ अनुविधास्ये तसें करीन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुझा गुरु ह्मणवितों. वास्तविक, देवा, तूं सर्व गुरूंचा गुरु व पितरांचा पितामह आहेस. ॥ २६ ॥ तूं सर्वांच्या अंतर्यामीं राहून जगाची राहटी चालवीत असतोस. तुझें स्वरूप इंद्रियांना समजत नाहीं. सध्यां धारण केलेलें हें तुझें शरीर शुद्ध सत्त्वगुणात्मक आहे. जन्म घेणें तुझ्या स्वाधीन आहे. ॥ २७ ॥ तूं आपल्या योगमायेच्या योगानें ह्या लोकांत मनुष्यासारखा भासत असतोस. रामा, मी जाणतों कीं, उपाध्येपण करणें निंद्य आहे, व ह्या वृत्तीनें निर्वाह केला असतां दोष लागतो. ॥ २८ ॥ पण "इक्ष्वाकूंच्या कुलांत परमात्मा रामरूपानें अवतार घेणार आहे" असें पूर्वीं ब्रह्मदेवानें सांगितलेलें मला अगोदर कळलें

अन्तर्यामी जगद्यात्रावाहकस्त्वमगोचरः[1] ॥ शुद्धसत्त्वमयं देहं धृत्वा स्वाधीनसंभवम्[2] ॥ २७ ॥ मनुष्य इव लोके ऽस्मिन् भासि त्वं योगमायया ॥ पौरोहित्यमहं[3] जाने विगर्ह्यं[4] दूष्यजीवनम्[5] ॥ २८ ॥ इक्ष्वाकूणां कुले रामः परमात्मा जनिष्यते[6] ॥ इति ज्ञातं मया पूर्वं ब्रह्मणा कथितं पुरा ॥ २९ ॥

(बा. पू. मू.) त्वं ॥ (बा. उ.) देहं धृत्वा, ॥ २७ ॥ त्वं अस्मिन् लोके योगमायया मनुष्यः इव भासि. अहं पौरोहित्यं (बा. मू.) जाने. ॥ २८ ॥ "(पू. मू.)" इति, पुरा ब्रह्मणा कथितं मया पूर्वं ज्ञातम्. ॥ २९ ॥

---

१ जगाची परंपरा चालविणारा. २ स्वाधीन आहे जन्म ज्याच्या असा. ३ उपाध्येपणाला. ४ निंद्य अशातें. ५ ज्यानें उपजीविका करण्यापासून दोष आहे, अशातें. ६ उत्पन्न होईल.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होतें; ॥ २९ ॥ ह्मणून, मी तुझ्या संबंधाच्या इच्छेनें, हें निंद्यही पौरोहित्य स्वीकारून राहिलों आहें. माझी आशा ह्मणून एवढीच कीं, तुझा गुरु व्हावें. ॥ ३०॥ रामचंद्रा, तो माझा मनोरथ आतां परिपूर्ण झाला. सर्व लोकांना जी एकटी मोह घालूं शकते, ती महामाया तुझ्या स्वाधीन आहे. ॥ ३१ ॥ रघुकुलोद्धारका, - ह्मणून माझें तुझ्याजवळ मागणें इतकेंच आहे कीं, - ती माया मला अगदीं मोह उत्पन्न करणार नाहीं, असें कर. तुझ्या मनांत "गुरूवर कांहीं प्रत्युपकार करावा" अशी इच्छा असेल, तर एवढीच देणगी मला दे. ॥ ३२ ॥ सहज बोलण्याचा ओघ आला ह्मणूनच मी हें सर्व बोललों. बाकी ही गोष्ट कोठेंही बोलण्या-

ततोऽहमाशया राम तव संबन्धकांक्षया ॥ अकार्षं गर्हितमपि तवाचार्यत्वसिद्धये ॥ ३० ॥ ततो मनोरथो मेऽद्य फलितो रघुनन्दन ॥ त्वदधीना महामाया सर्वलोकैकमोहिनी ॥ ३१ ॥ मां यथा मोहयेन्नैव तथा कुरु रघूद्वह ॥ गुरुनिष्कृतिकामस्त्वं यदि देह्येतदेव मे ॥ ३२ ॥ प्रसंगात्सर्वमप्युक्तं न वाच्यं कुत्रचिन्मया ॥ राज्ञा दशरथेनाहं प्रेषितोऽस्मि रघूद्वह ॥ ३३ ॥

राम, ततः अहं तव सम्बन्धकांक्षया आशया (मू.) अकार्षम्. ॥ ३० ॥ रघुनन्दन, ततः मे (मू.). ॥ ३१ ॥ मां यथा न एव (बा. पू.), ॥ यदि त्वं गुरुनिष्कृतिकामः [तर्हि] एतत् एव मे देहि. ॥ ३२ ॥ मया [यत्] कुत्रचित् न वाच्यं, [तत्] (बा. मू.), ॥ रघूद्वह, अहं राज्ञा दशरथेन त्वां आमन्त्रयितुं प्रेषितः अस्मि; ॥

१ निंद्य. २ करिता झालों. ३ गुरूचा उतराई होऊं इच्छिणारा. ४ रघुकुलाला उद्धरणाऱ्या. ५ कळविण्यासाठीं. ६ पाठविलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सारखी नाहीं व मी बोलणारही नाहीं अशी खात्री असूं दे - बरें हें असो. रामा, आज मला दशरथ राजानें तुमकडे पाठविलें आहे. ॥ ३३ ॥ कारण इतकेंच कीं, उद्यां तुला राज्याभिषेक करणार ही वार्ता कळवावी. ह्मणून, रामा, शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें तूं आज सीतेसह उपवास ॥ ३४ ॥ कर, पवित्र रहा, भूमीवर शयन कर, व इंद्रियें स्वाधीन ठेव. रामा, आतां मी राजाच्या सन्निध जातों. तूं सकाळीं येशीलच.' ॥३५॥ असें बोलून ते राजगुरु रथांत बसून त्वरित निघून गेले. रामही लक्ष्मणाकडे पाहून हांसत हांसत असें ह्मणाला :– ॥ ३६ ॥ 'लक्ष्मणा, उद्यां मला यौवराज्याभिषेक होणार आहे. ह्या सर्व चारित्रांना मी केवळ निमित्त मात्र आहें. बाकी वास्तविक सगळ्या गोष्टी करणारा व भोगणारा तूंच होस. ॥ ३७ ॥

त्वामामन्त्रयितुं राज्ये श्वो ऽभिषेक्ष्यति राघव ॥ अद्य त्वं सीतया सार्ध[1]मुपवासं यथाविधि॥३४॥कृत्वा शुचिर्भूमिशायी[2] भव राम जितेन्द्रियः[3]॥गच्छामि राजसान्निध्यं[4] त्वं तु प्रातर्गमिष्यसि[5] ॥३५॥ इत्युक्त्वा रथमारुह्य ययौ राजगुरुर्द्रुतम्[6] ॥ रामो ऽपि लक्ष्मणं दृष्ट्वा प्रहसन्निदमब्रवीत् ॥ ३६ ॥ सौमित्रे यौवराज्ये मे श्वो ऽभिषेको भविष्यति ॥ निमित्तमात्रमेवाहं कर्ता भोक्ता त्वमेव हि ॥ ३७ ॥

राघव, त्वां राज्ये श्वः अभिषेक्ष्यति; (३४ उ. मू.) ॥३३॥३४॥ कृत्वा, (पू. मू.) भव. राम, ॥ राजसांन्निध्यं गच्छामि. (उ.).' ॥३५॥ राजगुरुः (पू. मू.) ययौ. (उ. मू.).॥३६॥(मू.) ॥३७॥

---

१ सह. २ भूमीवर निजणारा. ३ इंद्रियें स्वाधीन ठेवणारा. ४ राजाजवळ. ५ जाशील. ६ शीघ्र.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मातांना ती सु-वार्ता कळले.

माझा तर तूं अगदीं बाहेरचा प्राण आहेस (जसा शरीरांतील प्राण मला अत्यंत प्रिय तसा बाहेर तूं अतिशय प्रिय आहेस), ह्याबद्दल अगदीं संशय धरायाला नको. ' - रामचंद्र लक्ष्मणाशीं असें बोलला - व वसिष्ठगुरूंच्या आज्ञेप्रमाणें त्या दिवशीं व्रतस्थ राहिला.॥ ३८॥वसिष्ठ मुनींनींही राजाकडे जाऊन त्याला, केलेल्या सर्व व्यवस्थेचा वृत्तांत निवेदन केला. राजानें वसिष्ठमुनींच्या अग्रभागीं रामाला अभिषेक करण्याबद्दल गोष्ट काढिली, ॥ ३९ ॥ त्याच वेळीं नगरांतील एका पुरुषानें ती ऐकिली, व लागलीच, रामाची माता जी कौसल्या, तिला व सुमित्रेला कळविली. ॥ ४० ॥ ती वार्ता ऐकून दोघींनाही पराकाष्ठेचा आनंद झाला; व त्यांनीं त्या

मम त्वं हि बहिः[1]प्राणो नात्र कार्या विचारणा[2] ॥ ततो वसिष्ठेन यथा भाषितं[3]
तत्तथा ऽकरोत्[4] ॥३८॥ वसिष्ठो ऽपि नृपं गत्वा कृतं सर्वं न्यवेदयत्[5]॥वसिष्ठस्य
पुरो राज्ञा ह्युक्तं रामाभिषेचनम् ॥ ३९ ॥ यदा तदैव नगरे श्रुत्वा कश्चित्पुमान्
जगौ ॥ कौसल्यायै राममात्रे सुमित्रायै तथैव च ॥ ४० ॥ श्रुत्वा ते हर्षसंपूर्णे
ददतुर्हारमुत्तमम् ॥ तस्मै ततः प्रीतमनाः कौसल्या पुत्रवत्सला ॥ ४१ ॥

त्वं हि (मू.). ॥ ३८ ॥ (बा. ३९ मू.) यदा उक्तं, तदा एव नगरे [विद्यमानः[6]] कश्चित्[7] पुमान्[8] श्रुत्वा[9], राममात्रे[10] (४० उत्तरार्ध) जगौ[11]. ॥३९॥४०॥ ते श्रुत्वा हर्षसंपूर्णे[सत्यौ]तस्मै उत्तमं हारं ददतुः[12] (मू.) ॥ ४१ ॥

१ बाहेरचा प्राण. २ संशय. ३ सांगितलेलें. ४ करिता झाला. ५ सांगता झाला. ६ असणारा. ७ कोणीएक. ८ पुरुष. ९ ऐकून. १० रामाच्या आईला. ११ बोलला. १२ देत्या झाल्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुरुषाला उत्तम हार बक्षिस दिला. नंतर, त्या पुत्राविषयीं कनवाळू अशा कौसल्येनें संतुष्ट अंतःकरणें करून, ॥ ४१ ॥ रामाचें कार्य सिद्ध होण्यासाठीं लक्ष्मी देवीची पूजा केली. ॥ ४२ ॥ ‘ दशरथ सत्यवक्ता आहे, प्रतिज्ञा करितो त्याप्रमाणें वागतोच, पण थोडासा कामुक असून कैकयीच्या स्वाधीन आहे, ह्मणून काय करील कोण जाणे ! ’ अशा विचारांनीं कौसल्येचें मन व्याकुळ झालें होतें. ह्मणून तिनें संकटें दूर करणाऱ्या दुर्गादेवीची आराधना केली. ॥ ४३ ॥ इतक्या अवकाशांत देवांनीं वाग्देवतेला प्रेरणा केली. - ते ह्मणालेः ‘ देवि, तूं पाहिजे तितका प्रयत्न करून भूलोकीं अयोध्यानगरीस जा; ॥ ४४ ॥ आणि रामाला अभिषेक होणार आहे त्या कार्यांत ब्रह्मदेवाच्या आज्ञेवरून विघ्न कर. प्रथम मंथरेच्या शरीरांत शीर व नंतर कैके-

लक्ष्मीं पर्यचरद्देवीं रामस्यार्थ[1]प्रसिद्धये ॥ ४२ ॥ सत्यवादी दशरथः करोत्येव प्रति[3]श्रुतम् ॥ कैकेयी[5]वशगः किंतु कामु[6]कः किं करिष्यति॥इति व्याकुलचि[7]त्ता सा दुर्गां देवीमपूजयत् ॥ ४३ ॥ [8]एतस्मिन्नन्त[9]रे देवा दैवीं वाणीमचोदयं[10]न् ॥ गच्छ देवि भुवो लोकमयोध्यायां प्रयत्नतः ॥ ४४ ॥ रा[11]माभिषेकविघ्नार्थं यतस्व ब्रह्मवाक्यतः ॥ मन्थरां प्रविशस्वादौ कैकेयीं च ततः परम् ॥ ४५ ॥

(मू.) पर्यचरत्, ॥ ४२ ॥ (बा. पू. मू.) करोति एव, किन्तु (बा. मू.) ! ॥ ४३ ॥ (पू.) – ॥ ‘ (बा. उ.) गच्छ.॥४४॥ब्रह्मवाक्यतः (पू.)॥आदौ मन्थरां ततः परं कौसल्यां च प्रविशस्व[12].॥४५॥

१ कार्य पूर्ण होण्यासाठीं. २ पूजिती झाली. ३ प्रतिज्ञा केलेलें. ४ पण. ५ कैकेयीच्या अधीन असलेला. ६ कामवश. ७ व्याकुळ जीचें मन, अशी. ८ ह्या. ९ अवकाशांत. १० प्रेरिते झाले. ११ रामाच्या अभिषेकांत विघ्नासाठीं. १२ शीर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

‘उत्साह कसला आहे?’

यीच्या देहांत प्रवेश कर. ॥ ४५ ॥ हे शुभकारिणी ! पुढें विघ्न उद्भूत झालें ह्मणजे तूं परत स्वर्गलोकीं ये.’ वाग्देवतेनें ‘ बरें आहे ’ असें ह्मणून तसें केलें. तिनें प्रथम मंथरेच्या शरीरीं प्रवेश केला. ॥ ४६ ॥ मंथरा कुबडी - व कंबरेंत, छातींत आणि कंठांत अशी - तीन ठिकाणीं वांकडी होती; तरी ह्या वेळीं ती राजवाड्याच्या वर चढली, तों सगळें नगर चोहोंकडे शृंगारलें आहे, असें तिच्या दृष्टीस पडलें. ॥ ४७ ॥ जिकडे तिकडे सारखीं तोरणें बांधलीं होतीं; पताकांनीं त्याला विशेष शोभा आली होती; सर्वत्र अनेक प्रकारें आनंदोत्साह चालले होते; हें पाहिल्याबरोबर मंथरेला आश्चर्य वाटलें. ती लागलीच पुन्हां खालीं परत आली, ॥ ४८ ॥ व आईला विचारूं लागली :– ‘ आई, ह्यावेळीं नगर शृंगारण्याचें कारण काय ? कौस-

ततो विघ्ने समुत्पन्ने पुनरेहि दिवं शुभे ॥ तथेत्युक्त्वा तथा चक्रे प्रविवेशाथ मन्थराम् ॥ ४६ ॥ सा ऽपि कुब्जा[2] त्रिवक्रा[3] तु प्रासादाग्रमथारुहत्[4][5] ॥ नगरं परितो दृष्ट्वा[7] सर्वतः समलंकृतम् ॥ ४७ ॥ नानातोरणसंबाधं[6] पताकाभिरलंकृतम् ॥ सर्वोत्सवसमायुक्तं विस्मिता पुनरागमत्[8] ॥ ४८ ॥ धात्रीं[9] पप्रच्छ[10] मातः किं नगरं समलंकृतम् ॥ नानोत्सवसमायुक्ता कौसल्या चातिहर्षिता ॥ ४९ ॥

शुभे, (बा. पू, मू.) एहि[1].’ ॥ (बा. उ.) प्रविवेश ॥ ४६ ॥ (पू. मू.) ॥ सर्वतः समलंकृतं (४८ ह्याचे तीन चरण.) नगरं परितः दृष्ट्वा विस्मिता [सती] पुनः आगमत्. ॥ ४७ ॥ ४८ ॥ ४९ ॥

---

१ ये. २ कुबडी. ३ तीन ठिकाणीं वांकडी. ४ वाड्याच्या वर. ५ चढली. ६ अनेक तोरणांनीं भरलेल्या. ७ चोहोंकडे. ८ आली. ९ आईला. १० विचारूं लागली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ल्या आज अनेक प्रकारचे उत्सव करण्यांत गुंतलेली असून अत्यंत आनंदित - दिसत आहे ! - ॥ ४९ ॥ व ती श्रेष्ठ श्रेष्ठ ब्राह्मणांना नानाविध वस्त्रें देत आहे ! - तेव्हां हा प्रकार काय आहे ? ' - ह्यावर मातेनें तिला सांगितलें:– ' मंथरे, रामाला राज्याभिषेक ॥९०॥ उद्यां व्हावयाचा, म्हणून आज सर्व नगर शृंगारिलें आहे.' तें ऐकिल्याबरोबर मंथरेनें लागलेंच कैकेयीकडे जाऊन तिला सांगितलें. ॥ ९१ ॥ ह्या वेळीं ती विशालनयना कैकेयी एकांतांत मंचकावर स्तब्ध बसली होती. - मंथरा म्हणाली :- ' हा हतभागिनी ! मूर्खे ! अजून निजली आहेस काय ? मोठ्या संकटाची वेळ जवळ येऊन पोंचली ना ? ॥ ९२ ॥ तूं आपल्याला अति सुंदर मानून मोठ्या गर्वानें चालत असतेस ! पण तुला अद्यापि तथ्य प्रकार कळला नाहीं ! ॥ ९३ ॥

ददाति[1] विप्रमुख्येभ्यो[2] वस्त्राणि विविधानि च ॥ तामुवाच तदा धात्री रामचन्द्राभिषेचनम् ॥ ५० ॥ श्वो भविष्यति तेनाद्य सर्वतोऽलंकृतं पुरम् ॥ तच्छ्रुत्वा त्वरितं गत्वा कैकेयीं वाक्यमब्रवीत् ॥५१॥ पर्यंकस्थां[3] विशालाक्षीम्[4] एकान्ते[5] पर्यवस्थिताम्[6] ॥ किं शेषे[7] दुर्भगे[8] मूढे महद्भयम्[9] उपस्थितम्[10] ॥ ५२॥ न जानीषे ऽतिसौंदर्यमानिनी[11] मत्तगामिनी[12] ॥ ५३ ॥

(बा. पू.) ददाति ! तदा धात्री तां (बा. उ.) ॥ ९० ॥(पू.मू.) तत् श्रुत्वा त्वरितं गत्वा (९२पू.) कैकर्यीं वाक्यं अब्रवीत्– ' (९२ उ.)! ' ॥ ९१ ॥ ९२ ॥ (मू.) [त्वं] न जानीषे[13]. ॥ ९३ ॥

१ देते. २ उत्तम विद्वान ब्राह्मणांना. ३ पलंगावर बसलेल्या. ४ जिचे नेत्र विशाल होते, अशा. ५ एकांतांत. ६ बसलेल्या. ७ निजली आहेस. ८ हतभाग्ये. ९ मोठें भय. १० प्राप्त झालेलें. ११ मोठें सौंदर्य मानून असलेली. १२ मत्तपणें चालणारी. १३ जाणतेस.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राजाच्या कृपेमुळें उद्यां रामाला राज्याभिषेक होणार ! ! ' कैकेयीचें भाषण गोड व स्वभाव चांगला होता. ही सुवार्ता ऐकिल्याबरोबर, तिनें एकदम उठून ॥ ५४ ॥ मंथरेला महामोल रत्नजडित सुवर्णाच्या पैंजणाचा जोड बक्षीस दिला, - व म्हटलें :- ' मंथरे ही तर आनंदाची गोष्ट; आणि अशा प्रसंगीं तूं " मोठें भय उत्पन्न झालें ! " असें मला सांगतेस, हें काय ? ॥ ५५ ॥ रामाचें भाषण किती तरी मधुर ! तो मला भरतापेक्षां देखील अधिक आवडतो. कौसल्या आणि मी दोघींनाही तो सारख्या मानितो व माझी निरंतर सेवा करीत असतो. ॥ ५६ ॥ मूर्खे ! तुला रामापासून कोणती भीति उत्पन्न झाली आहे, सांग मला !' - शंकर म्हणाले :— पार्वति, वाग्देवतेनें शरीरांत प्रवेश केला - ह्या

रामस्यानुग्रहाद्राज्ञः श्वो ऽभिषेको भविष्यति ॥ तच्छ्रुत्वा सहसोत्थाय कैकेयी प्रियवादिनी ॥ ५४ ॥ तस्यै दिव्यं ददौ स्वर्णनूपुरं रत्नभूषितम् ॥ हर्षस्थाने किमिति मे कथ्यते भयमागतम् ॥५५॥ भरतादधिको रामः प्रियकृन्मे प्रियंवदः ॥ कौसल्यां मां समं पश्यन् सदा शुश्रूषते हि माम् ॥ ५६ ॥ रामाद्भयं किमापन्नं तव मूढे वदस्व मे ॥ तच्छ्रुत्वा विषसादाथ कुब्जा कारणवैरिणी ॥ ५७ ॥

राज्ञः[1] अनुग्रहात्[2](पू.).'प्रियवादिनी[3] कैकयी तत् श्रुत्वा, सहसा उत्थाय,॥५४॥(पू. मू.)ददौ. हर्षस्थाने[4] मे भयं आगतं [5]किमिति कथ्यते[6]?॥५५॥प्रियंवदः[7] रामः भरतात् मे अधिकः प्रियकृत्[8]; हि (बा. उ.) शुश्रूषते.॥५६॥मूढे, तव (बा. पू.) वदस्व.'॥अथ कारणवैरिणी[14] कुब्जा तत् श्रुत्वा, विषसाद[15].॥५७॥

१ राजाच्या. २ कृपेमुळें. ३ गोड बोलणारी. ४ हर्षाच्या प्रसंगीं. ५ कां.६ सांगितलें जातें.७ गोड बोलणारा. ८ प्रिय करणारा. ९ सारखें.१० पाहणारा. ११ सेवा करितो. १२ ओढवलें. १३ सांग. १४ कारणामुळें वैर करणारी. १५ खिन्न झाली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कारणामुळें त्या कुबडीच्या मनांत वैर उद्भवलें होतें. कैकेयीचें भाषण ऐकिल्याबरोबर तिला फार खेद झाला. - ती ह्मणाली :- ॥ ५७ ॥ 'देवि (राणीसाहेब)! माझें बोलणें ऐकून घे. तुला मोठें भय उत्पन्न झालें, हें माझें ह्मणणें अगदीं यथार्थ आहे. राजा तुला संतोषविण्यासाठीं गोड भाषणें बोलतो! ॥ ५८ ॥ पण तो कामुक व खोटें बोलणारा आहे! तुला नुसत्या गोड बोलण्यांनीं संतोषवितो आणि त्या रामाच्या आईचें मोठें कार्य करितो! ॥ ५९ ॥ हा संकेत मनांत ठरवूनच त्यानें तुझ्या मुलाला पाठवून दिलें! कैकयी! धाकव्या भावासह भरताला मामाच्या घरीं पाठविण्याचें कारण हेंच बरें!! ॥६०॥ सुमित्रेचें ठीकच होईल, यांत कांहीं संशय नाहीं; कारण, लक्ष्मण नेहमीं रामाच्या पाठोपाठ असतो; त्याला राज्याचा उपभोग मिळणारच.

शृणु मद्वचनं देवि यथार्थं[1] ते महद्भयम् ॥ त्वां तोषयन्[2] सदा राजा प्रियवाक्या[3]-
नि भाषते[4] ॥ ५८ ॥ कामुको ऽतथ्यवादी[5] च त्वां वाचा[6] परितोषयन् ॥ कार्यं
करोति तस्या वै राममातुः सुपुष्कलम् ॥ ५९ ॥ मनस्येतन्निधायैव प्रेषयामास
ते सुतम् ॥ भरतं मातुलकुले प्रेषयामास सानुजम् ॥६०॥ सुमित्रायाः समी-
चीनं[11] भविष्यति न संशयः ॥ लक्ष्मणो राममन्वेति[12] राज्यं सोऽनुभविष्यति ॥६१॥

'देवि, मद्वचनं (मू.). ॥५८॥ (बा. मू.) कार्यं करोति. ॥ ५९ ॥ एतत् मनसि निधाय एव ते सुतं प्रेषयामास, सानुजं (मू.). ॥ ६० ॥ ६१ ॥

---

१ खरोखर. २ संतोषविणारा. ३ गोड भाषणांना. ४ बोलतो. ५ खोटें बोलणारा. ६ वाणीनें. ७ मनांत. ८ ठेवून. ९ पाठवितं झाला. १० धाकट्या भावासह. ११ बरें. १२ मागून वागतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो. समू.सान्व. सटिप्पण. ॥ १४ ॥

अयो.कां. सर्ग २ कान भरले.

॥ ६१ ॥ भरताची · मात्र ह्यांत दुर्दशा होणार आहे! - एक तर त्याला रामाच्या पुढें चाकरासारखें वागावें लागेल, किंवा नगरांतून बाहेर जावें लागेल, अथवा लवकरच प्राण तरी सोडावे लागतील ! ! ॥ ६२ ॥ तूं तर दासीप्रमाणें कौसल्येची नित्य सेवा करीत राहशील ! खरोखर ! सवतीकडून झालेला अपमान सोसण्यापेक्षां मरण आलें तरी बरें ! ! ॥ ६३ ॥ ह्मणून, तूं आजच्या आज लागलीच ह्या यत्नाला लाग कीं, भरताला अभिषेक व्हावा आणि रामानें नऊ आणि पांच (एकूण चौदा) वर्षें वनवासाला जावें. ॥ ६४ ॥ असें होईल तेव्हांच, कैकेयी, तुझा पुत्र निर्भय स्थळीं चढून बसल्यासारखा होईल. ह्याला उपाय मीं पूर्वींच यो-

भरतो राघवस्याग्रे किंकरो[1] वा भविष्यति ॥ विवास्यते वा नगरात्प्राणैर्वा हाप्यते ऽचिरात् ॥ ६२ ॥ त्वं तु दासीव कौसल्यां नित्यं परिचरिष्यसि[6] ॥ ततो ऽपि मरणं श्रेयो यत्सपत्न्याः पराभवः ॥ ६३ ॥ अतः शीघ्रं यतस्वाद्य भरतस्याभिषेचने ॥ रामस्य वनवासार्थं वर्षाणि नव पंच च ॥ ६४ ॥ ततो रूढो ऽभये पुत्रस्तव राज्ञि भविष्यति॥उपायं ते प्रवक्ष्यामि पूर्वमेव सुनिश्चितम्[13] ॥६५॥

(पू. मू.), ने[2]गरात् वि[3]वास्यते वा, अचिरात् प्राणैः हा[5]प्यते वा. ॥६२॥ (पू. मू.) यत् स[7]पत्न्याः पराभवः ततः मरणं अपि श्रेयः[8] ! ॥ ६३ ॥ (मू.) वनवासार्थं अद्य यतस्व[11] .॥६४॥ राज्ञि, ततः तव पुत्रः अभये रू[12]ढः भविष्यति, (बा. मू.) उपायं ते प्र[14]वक्ष्यामि. ॥ ६५ ॥

१ चाकर. २ नगरांतून. ३ घालविला जाईल. ४ लवकरच. ५ टाकविला जाईल. ६ सेवा करशील. ७ सवतीकडून. ८ बरें. ९ नऊ. १० पांच. ११ यत्न कर. १२ चढलेला. १३ चांगलें ठरविलेल्या. १४ सांगेन.

॥ १४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जून ठेविला आहे, तो सांगतें :- ॥ ६५ ॥ पूर्वी देवांचें आणि दैत्यांचें युद्ध चाललें होतें; तेव्हां इंद्रानें दशरथ महाराजांना साह्याकरितां बोलाविलें होतें; कारण, हे धनुर्धारी महाशूर-असें सर्वत्र प्रख्यात आहे. - त्या वेळीं महाराज स्वतां ॥६६॥ तुला बरोबर घेऊन मोठ्या सेनेसह गेले होते. हे सुंदरवदने, धनुर्धारी महाराज राक्षसांशीं युद्ध करण्यांत गुंतले असतां ॥ ६७ ॥ इकडे रथाच्या आंसाचा कानखिळा तुटून पडला. ही गोष्ट महाराजांच्या लक्षांत आली नाहीं. पण, तूं - तें पाहिलेंस व - मोठ्या धैर्यानें त्या खिळ्याच्या छिद्रांत हात घालून ॥ ६८ ॥

पुरा देवासुरे युद्धे राजा दशरथः स्वयम्॥इंद्रेण याचितो धन्वी सहायार्थं महा-
रथः ॥ ६६ ॥ जगाम सेनया सार्धं त्वया सह शुभानने ॥ युद्धं प्रकुर्वतस्तस्य रा-
क्षसैः सह धन्विनः ॥ ६७ ॥ तदा ऽक्षकीलो न्यपतच्छिन्नस्तस्य न वेद सः ॥
त्वं तु हस्तं समावेश्य कीलरन्ध्रे ऽतिधैर्यतः ॥ ६८ ॥

पुरा देवासुरे[1] युद्धे, धन्वी[2] महारथः[3] स्वयं राजा दशरथः इन्द्रेण याचितः[4] [सन्] सहायार्थं ॥ ६६ ॥ शुभानने[5], (पू. मू.) जगाम.॥तस्य धन्विनः राक्षसैः सह युद्धं प्रकुर्वतः[6] [सतः], ॥६७॥तदा तस्य छिन्नः[7] अक्षकीलः[8] न्यपतत्[9], सः न वेद[10]; असितापांगि[11] त्वं तु अतिधैर्यतः[12] कीलरन्ध्रे[13] हस्तं समावेश्य[14], ॥

१ देव व दैत्य हे परस्परांचे प्रतिपक्षी ज्यांत, अशा. २ धनुर्धारी. ३ दहा हजार वीरांशीं एकटा युद्ध करण्यास पुरणारा. ४ मागितलेला. ५ जिचें मुख सुंदर आहे, अशा. ६ करणाऱ्या. ७ तुटलेला. ८ आंसाचा खिळा. ९ पडला. १० समजला. ११ जिच्या नेत्रांच्या बाजू कृष्णवर्ण आहेत, अशी. १२ मोठ्या धैर्यानें. १३ खिळ्याच्या छिद्रांत. १४ घालून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बसली होतीस. कैकेयी, तुझ्या नेत्रांचे उपांत भाग कृष्णवर्ण आहेत, - तूं कोमल बायको; बायकांच्या हातून असें धैर्याचें कृत्य घडायाचें नाहीं; पण - तूं पतीचे प्राण वांचावे, एवढ्यासाठीं हें केलेंस. महाराज शत्रूंचा विध्वंस करायाचे हें ठरलेलेंच. त्याप्रमाणें त्यांनीं सर्व दैत्यांचा वध तर केलाच. नंतर त्यांची दृष्टि तुजकडे वळली. ॥६९॥ - तुझी स्थिति व कृति पाहिल्याबरोबर - त्यांना परम आश्चर्य वाटलें आणि आनंद झाला. त्यांनीं तुला आलिंगन देऊन - ह्मटलें :- " तुझ्या मनांत इच्छित असेल तो वर माग. मी वर देण्यास सिद्ध आहें." ॥७०॥ " दोन वर मागून घे. " असें महाराज स्वतां ह्मणाले. पुढें, ते वर देण्यास सिद्ध असतां, तूं त्यांना म्हटलेंसः—"महाराज, जर मला आपण दोन वर दिले आहेत, ॥७१॥ तर ते आपल्याजवळच पुष्कळ दिवसपर्यंत

स्थितवत्यसितापांगी पतिप्राणपरीप्सया ॥ ततो हत्वा ऽसुरान्सर्वान् ददर्श त्वामरिन्दमः ॥ ६९ ॥ आश्चर्यं परमं [6]लेभे त्वामालिंग्य मुदा ऽन्वितः ॥ [7]वृणीष्व यत्ते मनसि वाञ्छितं वरदो ऽस्म्यहम् ॥ ७० ॥ [8]वरद्वयं वृणीष्व त्वमेवं राजा ऽवदत्स्वयम् ॥ त्वयोक्तो वरदो राजन्यदि दत्तं वरद्वयम् ॥ ७१ ॥ त्वय्येव तिष्ठतु चिरं न्यासभूतं ममानघ ॥ यदा मे ऽ[15]वसरो भूयात्तदा देहि वरद्वयम् ॥ ७२ ॥

पति[1]प्राणपरीप्सया स्थितवती. ततः आरि[3]न्दमः सर्वान् असुरान् हत्वा, त्वां [4]ददर्श. ॥६८॥६९॥ [5]मुदा अन्वितः (बा. मू.), [7]वृणीष्व, अहं वरदः अस्मि. ॥७०॥ स्वयं राजा " त्वं (पू. मू.) वरदः (उ. मू.) [9]दत्तं. ॥७१॥ [10]अनघ, मम [11]न्यासभूतं चिरं[12] [13]त्वयि एव ति[14]ष्ठतु. (बा. उ.) देहि. " ॥ ७२ ॥

१ पतीचे प्राण वांचविण्यासाठीं. २ राहिलेली. ३ शत्रूंस दमविणारा. ४ पाहता झाला. ५ हर्षानें. ६ पावला. ७ माग. ८ दोन वर. ९ दिलेलें. १० निष्पापा. ११ ठेव ह्मणून ठेवलेलें. १२ पुष्कळ कालपर्यंत. १३ तुजजवळ. १४ राहो. १५ प्रसंग वेळ.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

माझी ठेव ह्मणून ठेवलेले असूं द्या. तुमचें आचरण निष्पाप आहे - ह्मणून, मी मागेन तेव्हां तुह्मी तत्काल ते माझे मला द्याल, नाहीं ह्मणणार नाहींच, अशी माझी खात्री आहे. जेव्हां योग्य प्रसंग येईल तेव्हां माझे दोन्हीं वर मला द्या. " ॥ ७२ ॥ राजानें स्वतां " बरें आहे " असें ह्मणून " पतिव्रते, आतां - रणांगणांतून - मंदिरीं (शिबिरांत) जा " असें सांगितलें. कैकेयी, हा वृत्तांत मी पूर्वी तुजकडूनच ऐकिला होता, तो आतां मला आठवला. ॥ ७३ ॥ म्हणून, तूं आतां लवकर क्रोधाचा आवेश आण. व क्रुद्ध होऊन आंगावरील सर्व अलंकार काढून इकडे तिकडे अस्ताव्यस्त फेंकून दे. ॥ ७४ ॥ भूमीवरच नीज. राजा सत्याची प्रतिज्ञा करून तुझें इंच्छित कार्य करीपर्यंत रागावून मौन धरून बैस. ' ॥ ७५ ॥

तथेत्युक्त्वा स्वयं राजा मन्दिरं व्रज सुव्रते ॥ त्वत्तः श्रुतं मया पूर्वमिदानीं स्मृतिमागतम् ॥ ७३ ॥ अतः शीघ्रं प्रविश्याद्य क्रोधागारं रुषाऽन्विता ॥ विमुच्य सर्वाभरणं सर्वतो विनिकीर्य च ॥७४॥ भूमावेव शयाना त्वं तूष्णीमातिष्ठ भामिनी ॥ यावत्सत्यं प्रतिज्ञाय राजाऽभीष्टं करोति ते ॥ ७५ ॥

राजा स्वयं " तथा " इति उक्त्वा " सुव्रते, मन्दिरं व्रज " [इति च उक्तवान]. मया पूर्वं (मू.) ॥७३॥अतः अद्य शीघ्रं क्रोधागारं प्रविश्य (मू.) ॥ ७४ ॥ राजा यावत् सत्यं प्रतिज्ञाय ते अभीष्टं करोति [तावत्] भामिनी (मू.) ' ॥ ७५ ॥

---

१ जिचें व्रत चांगलें आहे, अशा. २ जा. ३ बोलला. ४ क्रोधाच्या भरांत. ५ पसरून. ६ इच्छित. ७ रागावलेली स्त्री. ८ निजणारी ९ तूष्णीम् गप्प. १० आतिष्ठ राहा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

· शंकर ह्मणालेः– पार्वति, · त्या दुष्टेच्या संगतीनें कैकेयीच्या बुद्धीला चळ झाला ! त्या कुबडीनें जें जें कांहीं सांगितलें तें तें ऐकिल्याबरोबर सगळें कैकेयीला खरेंच वाटूं लागलें ! ॥ ७६ ॥ कैकयीचें मन आतां दुष्ट झालें होतें. ती मंथरेला म्हणाली :– ‘ मंथरे ! तुला एवढी बुद्धि आली कोठून ? खरोखर तूं वांकडीतिकडी आहेस खरी, पण ह्या वेळीं मला फारच सुंदर दिसतेस ! मला नाहीं वाटलें तुला एवढी बुद्धि असेलशी ! ॥ ७७ ॥ माझा प्रिय पुत्र भरत जर राजा होईल, तर मी तुला शंभर गांव इनाम देईन. तूं मला अगदीं प्राणासारखी प्रिय वाटतेस. ’ ॥ ७८ ॥ इतकें बोलून तिनें एकदम क्रोधाचा आवेश

श्रुत्वा त्रिवक्रयोक्तं तत्तदा केकयनन्दिनी ॥ तथ्यमेवाखिलं मेने दुःसंगाहित-विभ्रमा ॥ ७६ ॥ तामाह कैकयी दुष्टा कुतस्ते बुद्धिरीदृशी ॥ एवं त्वां बुद्धि-संपन्नां न जाने वक्रसुन्दरि ॥७७॥ भरतो यदि राजा मे भविष्यति सुतः प्रियः॥ ग्रामान् शतं प्रदास्यामि मम त्वं प्राणवल्लभा ॥ ७८ ॥ इत्युक्त्वा कोपभवनं प्रविश्य सहसा रुषा ॥ विमुच्य सर्वाभरणं परिकीर्य समंततः ॥ ७९ ॥

[1]दुसंगाहितविभ्रमा के[2]कयनन्दिनी तदा त्रि[3]वक्रया उक्तं श्रुत्वा तत् अखिलं त[4]थ्यं एव मेने[5] ! ॥७६॥ [6]दुष्टा कैकयी तां आह – ‘ ते ईदृ[7]शी बुद्धिः कुतः ? (मू.), ॥७७॥ यदि मे प्रियः सुतः भरतः राजा भविष्यति, (मू.).’ ॥ ७८ ॥ (त्रा. मू.) परिकीर्य, ॥ ७९ ॥

१ दुष्टेच्या संगतीनें जिला भ्रम झाला, अशी. २ केकय राजाची कन्या. ३ तीन ठिकाणीं वांकडी अशा स्त्रीनें. ४ खरें. ५मानूं लागली. ६ जिचें अंतःकरण दुष्ट झालें, अशी. ७ अशी. ८ क्रोधाच्या आवेशाप्रत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणिला, आंगावरील सर्व अलंकार काढून क्रोधानें चोहोंकडे अस्ताव्यस्त फेंकून दिले ! ॥ ७९ ॥ भूमीवर लोळून तिनें आपलें शरीर मळविलें, मळकट वस्त्र धारण केलें, व मंथरेला ह्मटलें :-- ' कुब्जे वक्रे, माझी प्रतिज्ञा ऐक. राम वनवासाला जाईपर्यंत ॥ ८० ॥ मी अशी निजणार, नाहीं तर पुढें प्राण देणार, हा माझा निश्चय समज. तूं माझें हित चिंतणारी आहेस; तुझें कल्याण होईल. ' ॥ कैकयी असें बोलली असतां ती कुबडी (मंथरा) आपल्या घरीं गेली. इकडे कैकयीनें तसाच क्रम चालविला. ॥ ८१ ॥ - शंकर ह्मणतात :— पार्वति, दुष्टांच्या समागमाचा परिणाम कसा भयंकर होतो पहा:- मनुष्य कितीही गंभीर असो, अत्यंत दयाळु असो, चांगल्या गुणांनीं व आचारानें संपन्न असो, नीतिशास्त्रांत प्रवीण असो, शास्त्रोपदेशक

भूमौ शयाना मलिना मलिनाम्बर[1]धारिणी ॥ प्रोवाच शृणु मे कुब्जे यावद्रामो
वनं व्रजेत् ॥ ८० ॥ प्राणांस्त्यक्ष्ये ऽथवा वक्रे शयिष्ये तावदेव हि ॥ निश्चयं
कुरु कल्याणि कल्याणं ते भविष्यति ॥ इत्युक्त्वा प्रययौ कुब्जा गृहं सा ऽपि
तथा ऽ[4]करोत् ॥ ८१ ॥ धीरो ऽत्यन्त[5]दयान्वितो ऽपि सुगुणा[6]चारान्वितो वा
ऽथवा नीतिज्ञो[7] विधिवाद[8]देशिकपरो विद्या[9]विवेको ऽथवा ॥

(मू.) ॥ ८० ॥ वक्रे, तावत् एव [2]शयिष्ये, अथवा प्राणान् [3]त्यक्ष्ये. ॥ (मू.).' ॥ इति उक्त्वा कुब्जा गृहं प्रययौ. (मू.). ॥ ८१ ॥ (पू. मू.) ॥

---

१ मळकट वस्त्र धारण करणारी. २ निजेन. ३ टाकीन. ४ करिती झाली. ५ अत्यंत दयाळू. ६ चांगल्या गुणांनीं व आचारानें युक्त. ७ नीति जाणणारा. ८ विधि सांगणाऱ्या गुरूची सेवा करणारा. ९ यथार्थ ज्ञानाचा विचार करणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुष्टांची संगत धरूं नये.

गुरूची सेवा करण्यांत तत्पर, अथवा फार काय सांगावें, ब्रह्मविद्येचा विचार करणारा असो, तरी पण त्यानें दुष्टांचा जर नित्य समागम केला तर, त्या दुष्टांच्या बुद्धींवर पापांचे दृढ संस्कार बसले असल्यामुळें त्या बुद्धींनीं त्या चांगल्या मनुष्याच्या बुद्धीला देखील भ्रंश होतो व हळूहळू तो त्यांच्या सारखा दुष्ट बनतो, हें - कैकयीच्या उदाहरणावरून - उघड होतें. ॥ ८२ ॥ ह्मणून, दुष्टांचा समागम नेहमीं वर्ज्य करावा. ही राजकन्या कैकयी - मूळची सुशील असून दुष्ट मंथरेच्या समागमानें बिघडली व फसली, - त्याप्रमाणें दुष्टांची संगत धरणारा मनुष्य हटकून फसतो व स्वार्थाला मुकतो. ॥ ८३ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे अयोध्याकाण्डे द्वितीयः सर्गः ॥ २ ॥

दुष्टानामति[1]पापभावितधियां संगं सदा चेद्भजेत्तद्बुध्या परिभावितो व्रजति
तत्साम्यं क्रमेण स्फुटम् ॥८२॥ अतः संगः परित्याज्यो दुष्टानां सर्वदैव हि ॥
दुःसंगी च्यवते स्वार्थाद्यथेयं राजकन्यका ॥८३॥ इति अयो० द्वितीयः सर्गः ॥२॥

(बा. मू.) भजेत्[2] चेत्, तद्बुद्ध्या[3] परिभावितः[4] [सन्] क्रमेण स्फुटं तत्साम्यं[5] व्रजति[6] ! ॥ ८२ ॥ अतः दुष्टानां संगः सर्वदा एव परित्याज्यः[7]; यथा इयं राजकन्यका [तथा], दुःसंगी[8] स्वार्थात् च्यवते[9]. ॥ ८३ ॥ ॥ इति श्रीरामायणान्वये अयोध्याकाण्डे द्वितीयः सर्गः ॥ २ ॥

१ अति पापांचा पूर्ण संस्कार झाला ज्यांच्या बुद्धींवर, अशा. २ स्वीकारील. ३ त्यांच्या बुद्धीनें. ४ वेष्टिलेला. ५ त्यांच्या तुलनेला. ६ पावतो. ७ सोडण्यास योग्य. ८ दुष्टांशीं संगत धरणारा. ९ भ्रष्ट होतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शंकर ह्मणाले :– पार्वति, इकडे दशरथ राजा रामाचा अभ्युदय करण्याबद्दल प्रधानांना आणि मुख्य नागरिक लोकांना आज्ञा देऊन आनंदभरित होत्साता घरीं आला. ॥ १ ॥ तेथें त्याला प्रिया (कैकेयी) कोठें दिसेना; तेव्हां 'हें काय बरें असावें ! ' असा विचार उत्पन्न होऊन तो विव्हल झाला. ' जी सुंदरी मी तिच्या मंदिरांत शिरल्याबरोबर नित्य ॥ २॥ हांसत हांसत मला सामोरी यावयाची, ती आज अगदीं दिसतच नाहीं ह्याचें कारण काय ! ' ह्याबद्दल तो आपल्या अत्यंत खिन्न मनाशींच विचार करूं लागला. ॥ ३ ॥ कैकेयीच्या पुष्कळ दासी - मंदिरांत चिंताग्रस्त अशा उभ्या होत्या; - त्यांना राजानें विचारिलें :–'दासींनो!

श्रीमहादेव उवाच । ततो दशरथो राजा रामाभ्युदयकारणात् ॥ आदिश्य मन्त्रिप्रकृतीः सानन्दो गृहमाविशत् ॥ १ ॥ तत्रादृष्ट्वा[1] प्रियां राजा किमेतदिति विव्हलः ॥ या पुरा मन्दिरं तस्याः प्रविष्टे मयि शोभना ॥ २ ॥ हसन्ती मामुपायाति[2] सा किं नैवाद्य दृश्यते ॥ इत्यात्मन्येव संचिन्त्य मनसा ऽतिविदूयता[3] ॥ ३ ॥ पप्रच्छ दासीनिकरं कुतो वः स्वामिनी शुभा ॥ नायाति मां यथापूर्वं मत्प्रिया प्रियदर्शना ॥ ४ ॥

श्रीम०उ०– (पू. मू.) मन्त्रिप्रकृतीः आदिश्य, (मू.). ॥१॥ राजा तत्र प्रियां अदृष्ट्वा, (बा. पू. मू.), या पुरा मयि तस्याः (बा.मू.) ॥२॥ (बा. मू.)मनसा संचिन्त्य, ॥३॥ दासीनिकरं[4] ' मत्प्रिया प्रियदर्शना वः शुभा स्वामिनी मां यथापूर्वं[5] कुतः न आयाति ? ' [इति] पप्रच्छ[6]. ॥ ४ ॥

१ न पाहून. २ जवळ येते. ३ अति खिन्न, अशा. ४ दासींच्या समूहाला. ५ पूर्वीप्रमाणें. ६ विचारूं लागला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

‘ हें आरंभलेंस काय? ’

जिला पाहून मला फार आनंद व्हावयाचा, ती माझी प्रिया व तुमची सुशील स्वामिनी (धनीण) नेहमींप्रमाणें आज मजजवळ कां येत नाहीं ? ’ ॥ ४ ॥ त्या म्हणाल्या :– ‘ महाराज, त्यांना आज फारच क्रोध आला आहे. कारण काय तें आह्मांला कळत नाहीं. महाराजांनीं स्वतां जाऊन त्याचा निश्चय करावा.’ ॥५॥ असें दासींनीं सांगितलें तेव्हां राजा फारच भयभीत झाला. पुढें तो कैकेयीच्या जवळ जाऊन बसला व तिच्या आंगावरून हळू हळू हात फिरवीत (तिला गोंजारीत) ह्मणाला :– ॥ ६ ॥ ‘ तूं मंचक किंवा आसनें वगैरे सर्व टाकून भुईवर काय निजली आहेस ? हा भित्र्ये ! तूं माझ्याजवळ बोलत नाहींस पण ह्यामुळें मला फार खेद होत आहे, - हें तुझ्या कसें लक्ष्यांत येत नाहीं ! - ॥ ७ ॥ अलंकार काय फेंकलेस ! मळ-

ता ऊचुः क्रोधभवनं प्रविष्टा नैव विद्म[1]हे ॥ कारणं तत्र देव त्वं गत्वा निश्चे[2]तुमर्[3]हसि ॥५॥ इत्युक्तो भयसंत्रस्तो राजा तस्याः स[4]मीपगः ॥ उपविश्[5]य शनैर्देहं स्पृशन्वै पाणिना ऽब्रवीत् ॥६॥ किं शेषे वसुं[10]धापृष्ठे पर्य[11]ंकादीन् वि[12]हाय च ॥ मां त्वं खेद[14]यसे भीरु यतो मां [15]नावभाषसे ॥ ७ ॥ अलंकारं परित्यज्य भूमौ मलिनवाससा ॥ किमर्थं ब्रूहि सकलं विधास्ये तव वाञ्छितम् ॥ ८ ॥

(बा. पू.) तत्र कारणं नैव विद्महे.॥ (मू.).’ ॥५॥ (बा. मू.) पाणि[6]ना स्[7]पृशन् [8]अब्रवीत् – ॥६॥ ‘भीरु[9], त्वं (बा. पू. मू.) किं शेषे[13]? ॥ त्वं (बा. मू.)॥७॥(पू. मू.) ॥ किमर्थं [तिष्ठसि]?(बा. मू.) वि[16]धास्ये.॥८॥

१ जाणतों. २ ठरविण्यास. ३ योग्य आहेस. ४ जवळ जाणारा. ५ बसून. ६ हातानें. ७ स्पर्श करणारा. ८ बोलला. ९ भित्र्ये. १० पृथ्वीतलावर. ११ मंचक वगैरे. १२ टाकून. १३ निजतेस. १४ दुःख देतेस. १५ न अवभाषसे बोलत नाहींस. १६ करीन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कट वस्त्र नेसून जमिनीवर काय लोळतेस! तुला झालें काय तें मला सांग; तुझ्या मनांत असेल तें सर्व करीन. ॥ ८ ॥ तुला कोणी अपकार केला असेल तर, ती स्त्री असो किंवा तो पुरुष असो, त्याला मी दंड करीन अथवा देहांत शिक्षा देईन, ह्यांत अगदीं संशय धरूं नको. ॥९॥ देवि, तुझ्या मनाला ज्यानें संतोष वाटेल, तें माझ्यापुढें अवश्य सांग; ह्मणजे तें कितीही दुर्लभ असलें तरी मी आतां एका क्षणांत साध्य करीन. ॥ १० ॥ तुला माझें मन माहीत आहे; तुझें मजवर प्रेम आहे; मी तुझ्या अगदीं स्वाधीन आहें, हेंही तूं जाणतेस. असें असून मला खेद देण्याचा व्यर्थ श्रम - कां बरें करतेस ? - ॥११॥ एखाद्या दरिद्री मनुष्याला, त्यानें तुझ्या मनासारखें कार्य केलें असल्यामुळें, श्रीमंत करावयाचें आहे काय ? किंवा एखाद्या श्रीमंताला, त्यानें तुला अपकार केल्यामुळें, क्षणमात्रांत दरिद्री करणें आहे ? सांग. ॥ १२ ॥

को वा तवाहितं कर्ता नारी वा पुरुषो ऽपि वा ॥ स मे दण्ड्यश्च वध्यश्च भविष्यति न संशयः॥९॥ब्रूहि देवि यथा प्रीतिस्तदवश्यं ममाग्रतः॥तदिदानीं साधयिष्ये सुदुर्लभमपि क्षणात् ॥ १० ॥ जानासि त्वं मम स्वान्तं प्रियं मां स्ववशे स्थितम्॥ तथा ऽपि मां खेदयसे वृथा तव परिश्रमः ॥११॥ ब्रूहि कं धनिनं कुर्यां दरिद्रं ते प्रियंकरम् ॥ धनिनं क्षणमात्रेण निर्धनं च तवाहितम् ॥ १२ ॥

(मू.). ॥९॥(बा. पू.) ब्रूहि; ॥ (उ. मू.) साधयिष्ये. ॥१०॥ (बा. पू.) जानासि. ॥ (मू.)!॥११॥ ते प्रियंकरं कं दरिद्रं धनिनं, धनिनं तव अहितं क्षणमात्रेण निर्धनं च कुर्यां, ब्रूहि. ॥१२॥

१अपकाराला. २ दंड करण्यास योग्य. ३ वध करण्यास योग्य. ४ साधीन. ५मनाला. ६स्वतांच्या अधीन. ७व्यर्थ. ८शत्रु, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कोणाचा वध करविणें आहे ? किंवा एखादा देहांत शिक्षेचा अपराधी सोडायाचा आहे, बोल; ह्मणजे मी त्याप्रमाणें करितों. फार काय सांगूं ! प्रिये ! पाहिजे तर तुजकरितां मी प्राण देखील देईन ! ॥ १३ ॥ कमलनयन रामचंद्र मला प्राणाहूनही अधिक प्रिय आहे; त्याची शपथ घेऊन मी तुला सांगतों कीं, ज्यामध्यें तुझें हित असेल किंवा जें तुला प्रिय असेल, तें मी करीन. काय तें बोल मात्र.' ॥ १४ ॥ राजा रामचंद्राची शपथ घेऊन असें बोलत आहे - हें पाहून - कैकेयीनें आपले डोळे पुसले, व हळूहळू बोलण्याचा उपक्रम केला :-- ॥ १५ ॥ 'महाराज, जर प्रतिज्ञा खरी करण्याचें आपलें व्रत आहे व जर आपण शपथ वाहत आहां, तर माझी मागणी तत्काळ आतांच्या आतां सफल (परिपूर्ण) करालच. ॥ १६ ॥

ब्रूहि कं वा वधिष्यामि वधार्हो वा विमोक्ष्यते ॥ किमत्र बहुनोक्तेन प्राणान्दास्यामि ते प्रिये ॥ १३ ॥ मम प्राणात्प्रियतरो रामो राजीवलोचनः ॥ तस्योपरि शपे ब्रूहि त्वद्धितं तत्करोम्यहम् ॥१४॥ इति ब्रुवाणं राजानं शपन्तं राघवोपरि ॥ शनैर्विमृज्य नेत्रे सा राजानं प्रत्यभाषत ॥ १५ ॥ यदि सत्यप्रतिज्ञोऽसि शपथं कुरुषे यदि ॥ याच्ञां मे सफलां कर्तुं शीघ्रमेव त्वमर्हसि ॥ १६ ॥

(बा. मू.) प्राणान् ते दास्यामि. ॥ १३ ॥ अहं (मू.).' ॥ १४ ॥ सा (बा. पू.) शपन्तं राजानं शनैः नेत्रे (मू.) ॥१५॥ त्वं (मू.). ॥१६॥

१ मारीन. २ वध करण्यास योग्य. ३ सोडला जाणार. ४ शपथ करितों. ५ मागणीला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पूर्वीं देवदैत्यांच्या युद्धांत मी आपलें (दशरथाचें) रक्षण केलें, त्या वेळीं आपण संतुष्ट मनानें मला दोन वर दिले आहेत. ॥ १७ ॥ ते दोन्ही मी आपल्याजवळ ठेवीप्रमाणें ठेवले आहेत. - कारण माझा पूर्ण विश्वास होता व आहे कीं, - आपला निश्चय दृढ असतो (एकदां दिलें ह्मटलें तें द्यायाचेंच, असें आपलें व्रत आहे). त्यांतील एक वर मी हा मागून घेतें कीं, माझा प्रिय पुत्र जो भरत त्याला लवकर ॥ १८ ॥ ह्या जमविलेल्या[1] सामग्रीनें यौवराज्याचा अभिषेक करावा. आणि दुसरा वर हा मागतें कीं, रामानें त्वरित दंडकारण्यांत जावें. ॥ १९ ॥ त्यानें मुनीचा वेष धारण करून आपलें शरीर शोभवावें, जटा आणि वल्कल हे अलंकार घालावे, व कंद, मुळें, फळें खाऊन चवदा वर्षें - तेथें काढावीं, - ॥ २० ॥

पूर्वं देवासुरे युद्धे मया त्वं परिरक्षितः ॥ तदा वरद्वयं दत्तं त्वया मे तुष्टचेतसा ॥ १७ ॥ तद्द्वयं न्यासभूतं मे स्थापितं त्वयि सुव्रत ॥ तत्रैकेन वरेणाशु भरतं मे प्रियं सुतम् ॥ १८ ॥ एभिः संभृतसंभारैर्यौवराज्ये ऽभिषेचय ॥ अपरेण वरेणाशु रामो गच्छतु दण्डकान् ॥ १९ ॥ मुनिवेशधरः श्रीमान् जटावल्कलभूषणः ॥ चतुर्दश समास्तत्र कन्दमूलफलाशनः ॥ २० ॥

मया(बा. मू.)त्वया मे वरद्वयं दत्तं.॥१७॥सुव्रत,(बा. पू.)स्थापितं,(मू.)॥१८॥(मू.)गच्छतु. ॥१९॥२०॥

---

१ मिळवलेल्या साहित्यांनीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो. समू. सान्व. सटिप्पण. ॥ २० ॥

अयो. कां. सर्ग ३ 'राम उद्यां गेलाच पाहिजे.'

तो काळ गेल्यावर पुन्हां परत यावें, किंवा येण्याची इच्छा नसेल तर खुशाल वनांतच राहावें. उद्यां सकाळीं कमलनयन रामचंद्रानें अरण्यांत गेलें पाहिजे. ॥ २१ ॥ जर त्यानें किंचितही विलंब लावला तर मी आपल्यापुढें प्राण देईन ! आपली प्रतिज्ञा सत्य करा. हेंच मला प्रिय आहे.' ॥ २२ ॥ ऐकल्याबरोबर आंगावर कांटाच उभा राहावा, असें हें कैकेयीचें उग्र भाषण कानीं पडल्याबरोबर, ज्याप्रमाणें वज्राचा प्रहार लागला, असतां पर्वत कोसळून पडावा त्याप्रमाणें, दशरथ राजा - मूर्च्छा येऊन भूमीवर पडला. ॥ २३ ॥

पुनरायातु तस्यान्ते वने वा तिष्ठतु स्वयम् ॥ प्रभाते गच्छतु वनं रामो राजीवलोचनः ॥ २१ ॥ यदि किंचिद्विलम्बेत[1] प्राणांस्त्यक्ष्ये तवाग्रतः ॥ भव सत्यप्रतिज्ञस्त्वमेतदेव मम प्रियम् ॥ २२ ॥ श्रुत्वैतद्दारुणं[2] वाक्यं कैकेय्या रोमहर्षणम्[3] ॥ निपतात महीपालो[4] वज्राहत[5] इवाचलः[6] ॥ २३ ॥

तस्य अन्ते (बा. मू.) वनं गच्छतु. ॥ २१ ॥ (बा. पू.) त्यक्ष्ये ! त्वं सत्यप्रतिज्ञः (मू.).' ॥ २२ ॥ कैकेय्याः (मू.) वाक्यं श्रुत्वा, (मू.) इव निपपात[7] ! ॥ २३ ॥

---

१ विलंब लावील. २ भयंकर. ३ ऐकणाराच्या आंगावर कांटा येईल अशा. ४ पृथ्वीपति (राजा). ५ वज्रानें ताडिलेला. ६ पर्वत. ७ पडला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- कांहीं वेळानें शुद्धीवर येऊन - त्यानें हळूहळू डोळे उघडले; - “ आपल्या नेत्रांत अश्रु आलेले पाहून कैकयी कदाचित् रामाचा वध करायालाही सांगेल ! ” - ह्या मोठ्या भीतीनें त्यानें अश्रु पुसले. - ह्या वेळीं त्याला असें वाटूं लागलें कीं, - मला कांहीं दुष्ट स्वप्न पडलें कीं काय ! - पण छेः, मी चांगला जागा आहें. - मग माझ्या अंतःकरणाला भ्रम तर नाहींना झाला ! ॥ २४ ॥ असे - विचार मनांत चालले आहेत, इतक्यांत - वाघिणीसारख्या पुढें बसलेल्या पत्नीवर त्याची दृष्टि गेली. - तेव्हां तो तिला ह्मणालाः- ‘ कैकयी ! तूं सुशील असून हें असें भाषण काय बोलत आहेस ? ह्यामुळें माझे प्राण निघून जातील ! ॥ २५ ॥ कमलनेत्र रामचंद्रानें तुझा कोणता अपराध केला आहे ? तूं तर मजपुढें रामाच्या चांगल्या गुणांचें नित्य वर्णन करीत असतेस. ॥ २६ ॥ “ कौसल्या आणि मी दोघींना सारख्या मानून राम माझी नित्य शुश्रूषा करितो.”

शनैर्[2]रुन्मील्य नयने वि[3]मृज्य परया भिया ॥ दुःस्वप्नो वा मया दृष्टो ह्यथवा चित्तवि[4]भ्रमः ॥ २४ ॥ इत्यालोक्य पुरः पत्नीं व्या[5]घ्रीमिव पुरःस्थिताम् ॥ किमिदं भाषसे भद्रे मम प्राणहरं वचः ॥ २५ ॥ रामः कमपराधं ते कृतवान्कमलेक्षणः ॥ ममाग्रे राघवगुणान्वर्णयस्यनि[6]शं शुभान् ॥ २६ ॥ कौसल्यां मां समं पश्यन् शुश्रूषां कुरुते सदा ॥ इति ब्रुवन्ती त्वं पूर्वमिदानीं भाषसे ऽन्यथा ॥ २७ ॥

[1]परया भिया (बा. मू.)॥२४॥(बा. पू.) आलोक्य [आह]–॥भद्रे,(बा. उ.) भाषसे ? ॥२५॥ कमलेक्षणः (बा. पू.) कृतवान् ? (बा. उ.) राघवगुणान् वर्णयसि. ॥ २६ ॥ त्वं पूर्वं (मू.) भाषसे. ॥ २७ ॥

१ मोठ्या. २ उघडून. ३ पुसून. ४ मनाला भ्रम. ५ वाघिणीला. ६ नित्य.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असें पूर्वीं तूंच बोलत असस, आणि आतां विपरीत बोलतेस ! ॥ २७ ॥ तुझ्या पुत्राला राज्य घे; पण रामाला घरीं राहूं दे, एवढी मजवर कृपा कर. सुंदरि! रामापासून तुला अगदीं भय बाळगायाला नको.' ॥२८॥ असें बोलतांना राजाच्या नेत्रांतून सारख्या अश्रुधारा चालल्या होत्या. तो कैकयीच्या पायांदेखील पडला ! -पण तिला अगदीं द्रव आला नाहीं. - उलट तिनें क्रोधानें डोळे लाल केले व राजाला उत्तर दिलें:–॥२९॥ 'राजाधिराज ! आपल्याला कांहीं भ्रम झाला कीं काय ? पूर्वीं वचन दिलें आणि आतां विपरीत बोलतां ! जर स्वतांची प्रतिज्ञा असत्य कराल, तर आपल्याला नरकांत जावें लागेल ! ॥३०॥ रामचंद्र उद्यां सकाळीं कृष्णाजिन आणि वल्कलें आंगावर घेऊन जर अरण्यांत गेला नाहीं, तर मी गळ्याला फांस लावून घेऊन किंवा

राज्यं गृहाण पुत्राय रामस्तिष्ठतु मन्दिरे ॥ अनुगृह्णीष्व मां वामे रामान्नास्ति भयं तव ॥ २८ ॥ इत्युक्त्वा ऽश्रुपरीताक्षः[2] पादयोर्निपपात ह ॥ कैकेयी प्रत्युवाचेदं सा ऽपि रक्तान्तलोचना[4] ॥ २९ ॥ राजेन्द्र किं त्वं भ्रान्तो ऽसि उक्तं तद्भाषसे ऽन्यथा ॥ मिथ्या करोषि चेत्स्वीयं भाषितं नरको भवेत् ॥ ३० ॥ वनं न गच्छेद्यदि रामचन्द्रः प्रभातकाले ऽजिनचीरयुक्तः[5] ॥

वामे[1] ! पुत्राय राज्यं गृहाण; रामः मन्दिरे तिष्ठतु; मां अनुगृण्हीष्व[3] रामात् तव भयं न अस्ति.'॥२८॥ (मू.) इदं प्रत्युवाच–॥२९॥'(पू. मू.) भाषसे !॥ स्वीयं भाषितं(उ. मू.).॥३०॥(बा.पू.)वनं न गच्छेत्,॥

१ वक्र बुद्धीच्या स्त्रिये. २ आंसवांनीं भरले डोळे ज्याचे, असा. ३ कृपा कर. ४ तांबडे झाले डोळ्यांचे अग्रभाग जिचे, अशी. ५ हरणाचें चर्म व चिंध्या किंवा वल्कलें ह्यांनीं युक्त.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विष खाऊन तुमच्या पुढें जीव देईन ! ! ॥ ३१ ॥ ह्या लोकांत सर्व सभांमध्यें आपण "मी सत्यप्रतिज्ञ." अशी प्रौढी मिरवितां ! तुह्मी आतांच - माझें प्रिय करण्याबद्दल - रामाची शपथही वाहिली आणि - थोडासा वेळ गेला नाहीं तोंच - आपली प्रतिज्ञा असत्य करण्यास तयार होतां ! तेव्हां आतां नरकाचा मार्ग धरा - झालें ! दुसरें काय ह्मणावें ? -' ॥ ३२ ॥ प्रिय पत्नीनें असें म्हटलें, तेव्हां राजा दीन होत्साता दुःखसमुद्रांत अगदीं बुडून गेला. त्याला मूर्छा आली. व तो शवाप्रमाणें अचेतन होऊन भूमीवर पडला ! ॥ ३३ ॥ अशा दुःखामुळें त्याला ती रात्र समग्र वर्षाप्रमाणें भासली. अरुणोदय होण्याच्या वेळीं गाणारे स्तुतिपाठक

उद्बन्धनं[1] वा विषभक्षणं वा कृत्वा मरिष्ये पुरतस्तवाहम् ॥ ३१ ॥ सत्यप्रातिज्ञो ऽहमितीह लोके विडम्बसे[3] सर्वसभान्तरेषु ॥ रामोपरि त्वं शपथं च कृत्वा मिथ्याप्रतिज्ञो नरकं प्रयाहि[4] ॥ ३२ ॥ इत्युक्तः प्रियया दीनो मग्नो दुःखार्णवे नृपः॥ मूर्छितः पतितो भूमौ विसंज्ञो मृतको यथा ॥ ३३ ॥ एवं रात्रिर्गता तस्य दुःखात्संवत्सरोपमा[9] ॥ अरुणोदयकाले[10] तु बन्दिनो[11] गायका जगुः[12] ॥ ३४ ॥

[तर्हि]अहं तव पुरतः (बा. उ.) !॥३१॥त्वं सर्वसभान्तरेषु[2], अहं (मू.).'॥३२॥प्रियया इति उक्तः[5] नृपः दीनः दुःखार्णवे[6] मग्नः मूर्च्छितः विसञ्ज्ञः[7][सन्]भूमौ, यथा मृतकः[तथा],पतितः[8]॥३३॥तस्य(बा. पू.) गता, ॥ (उ.). ॥ ३४ ॥

१ वर बांधून घेणें (फांस घेणें). २ सर्व सभांमध्यें. ३ प्रौढी मिरवितोस. ४ जा. ५ ज्याला ह्मटलें, असा. ६ दुःखसमुद्रांत. ७ ज्याची शुद्धि गेली, असा. ८ पडलेला. ९ वर्षासारखी. १० अरुणोदयाच्या वेळीं. ११ स्तुतिपाठक (भाट). १२ गाऊं लागले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लोकांची उत्कंठा.

(भाट) गाऊं लागले; ॥ ३४ ॥ पण, कैकेयीला क्रोध आला होता, म्हणून तिनें त्या सर्वांचें गाणें बंद केलें. नंतर उजाडतांच मधल्या दालनांत लोक जमूं लागले. ॥ ३५ ॥ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, ऋषि तशाच कन्या, छत्र, चामर, दिव्य हत्ती, घोडा, ॥ ३६ ॥ तशाच आणखी नगरांतील मुख्य मुख्य वारांगना, नागरिक जन, इतरही देशांत राहणारे लोक आले; एकंदरींत वसिष्ठ मुनींनीं आज्ञा दिली होती, त्याप्रमाणें सर्व यथास्थित सिद्धता झाली. ॥ ३७ ॥ स्त्रिया, बाल, वृद्ध कोणालाही रात्रीं झोंप आली नाहीं. - कारण, सर्वांना अशी उत्सुकता वाटत होती कीं, - पीतांबरधारी रामचंद्र आमच्या केव्हां दृष्टीस पडतो. ॥ ३८ ॥ - सगळ्यांना सारखा रामाचा ध्यास लागला होता :- ' तो श-

निवारयित्वा[1] तान् सर्वान्कैकेयी रोषमास्थिता ॥ ततः प्रभातसमये मध्यकक्षमुपस्थिताः ॥ ३५ ॥ ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्या ऋषयः कन्यकास्तथा ॥ छत्रं च चामरं दिव्यगजो वाजी[2] तथैवच ॥ ३६ ॥ अन्याश्च वारमुख्या याः पौरजान[3]पदास्तथा ॥ वसिष्ठेन यथा ऽऽज्ञप्तं तत्सर्वं तत्र संस्थितम्[4] ॥ ३७ ॥ स्त्रियो बालाश्च वृद्धाश्च रात्रौ निद्रां न लेभिरे[5] ॥ कदा द्रक्ष्यामहे रामं पीतकौशेयवाससम्[6] ॥ ३८ ॥ सर्वाभरणसंपन्नं किरीटकटकोज्ज्वलम्[8] ॥

कैकेयी तान सर्वान् (मू.) ॥ ३५ ॥ ३६ ॥ ३७ ॥ (बा. मू.) द्रक्ष्यामहे. ॥ ३८ ॥ (मू.)॥

१ प्रतिबंध करून. २ घोडा. ३ नागरिक व देशांत राहणारे लोक. ४ चांगलें सिद्ध. ५ पावले. ६ पिंवळें रेशमी वस्त्र धारण करणारा, अशा. ७ पाहूं. ८ मुकुट व कडीं ह्यांनीं अधिक तेजस्वी दिसणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रीरावर सर्व अलंकार घालील, - मस्तकीं - मुगुट व - हातांत - कडीं घातल्यामुळें तेजःपुंज दिसेल, - कंठांत-कौस्तुभ रत्नासारखा अलंकार धारण करील; त्याची अंगकांति मेघाप्रमाणें श्यामवर्ण आहे व तो स्वभावतः शंभर मदनांपेक्षांही सुंदर आहे; - त्यामुळें इतके अलंकार घातले असतां तो अवर्णनीय सुंदर दिसेल. -॥३९॥ अभिषेक झाल्यावर तो हत्तीवर बसून बाहेर फिरायाला निघेल, त्याचें मुख हास्ययुक्त असेल, जवळच हातीं शुभ्र छत्र घेऊन उभा राहिलेला सुलक्षणसंपन्न लक्ष्मण असेल,' - हें एकसारखें मनांत घोळत होतें. - ॥४०॥ ह्यामुळें नगरांतील सर्व लोकांच्या मनांला 'उजाडतें केव्हां आणि आह्मीं रामाला पाहूं केव्हां' अशी उत्सुकता झाली होती. ॥४१॥सुमंत्र प्रधानाला 'अजून महाराज कां उठले नाहींत !' असा विचार पडला व तो हळूहळू, जेथें राजा होता,

कौस्तुभाभरणं श्यामं कन्दर्प[१]शतसुन्दरम् ॥ ३९ ॥ अभिषिक्तं समायातं गजा-रू[२]ढं स्मिताननं[३]म् ॥ श्वेतच्छत्रधरं तत्र लक्ष्मणं लक्षणान्वितम् ॥ ४० ॥ रामं कदा वा द्रक्ष्यामः प्रभातं वा कदा भवेत् ॥ इत्युत्सु[४]कधियः सर्वे बभूवुः पुरवा-सिनः ॥ ४१ ॥ नेदानीमुत्थितो राजा किमर्थं चेति चिन्तयन् ॥ सुमन्त्रः श-नकैः प्रायाद्यत्र राजा ऽवति[५]ष्ठते ॥४२ ॥

(मू.). ॥३९॥४०॥ (पू. मू.), इति सर्वे पुरवासिनः (मू.). ॥ ४१ ॥ सुमन्त्रः ' इदानीं राजा किमर्थं न उत्थितः' (बा. मू.)[तत्र][६]शनकैः [७]आयात.॥४२॥

१ शंभर मदनांहून सुंदर, अशा. २ हत्तीवर बसलेल्या. ३ ज्याचें मुख हास्ययुक्त, अशा. ४ ज्यांचीं मनें उत्सुक झालीं, असे. ५ स्थित आहे. ६ हळूहळू. ७ आला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या स्थळीं आला. ॥४२॥ त्यानें जयजयकार करून राजाला शिरसा वंदन केलें. पण, राजा अतिशय खिन्न दिसत होता. ह्मणून सुमंत्र कैकेयीला विचारूं लागला :– ॥४३॥ 'राजपत्नि, कैकेयि, तुझा उत्कर्ष होवो. महाराज आज नित्याप्रमाणें न दिसतां दुःखी दिसतात, ह्याचें कारण काय ?' कैकयी त्याला ह्मणाली :– 'महाराजांना रात्रीं झोंप आली नाहीं ॥४४॥ ते "राम, राम, राम" असें ह्मणत सारखे त्याचें चिंतन करीत होते. ह्मणून जाग्रणामुळें त्यांची प्रकृति अस्वस्थ झाल्यासारखी दिसत आहे. तूं रामाला येथें लवकर घेऊन ये. महाराजांना त्याला पहाण्याची इच्छा झाली आहे.' ॥४५॥ सुमंत्र ह्मणाला :– 'देवि, क्रोध येऊं देऊं नको. महाराजांची

वर्धयन् जयशब्देन प्रणम्य शिरसा नृपम् ॥ अतिखिन्नं नृपं दृष्ट्वा कैकेयीं समपृच्छत ॥ ४३ ॥ देवि कैकेयि वर्धस्व किं राजा दृश्यते ऽन्यथा ॥ तमाह कैकयी राजा रात्रौ निद्रां न लब्धवान् ॥ ४४ ॥ रामरामेति रामेति राममेवानुचिन्तयन् ॥ प्रजागरेण वै राजा ह्यस्वस्थ इव लक्ष्यते ॥ राममानय शीघ्रं त्वं राजा द्रष्टुमिहेच्छति ॥४५॥ सुमन्त्र उवाच ॥ अश्रुत्वा राजवचनं कथं गच्छामि भामिनि ॥

(In the verses above, the printed footnote numbers stand as: जयशब्देन[1], वर्धयन्[2], समपृच्छत[3], वर्धस्व[4], ऽन्यथा[5], लब्धवान्[6], प्रजागरेण[7], अस्वस्थ[8], लक्ष्यते[9], अश्रुत्वा[10].)

नृपं जयशब्देन वर्धयन् शिरसा प्रणमन्[सः] (मू.) – ॥४३॥ ' (बा. पू.) दृश्यते ? ' ॥ कैकयी (मू.) ॥ ४४ ॥ (दोन अर्धे मू.) त्वं शीघ्रं इह (मू.).' ॥४५॥ सु० उ० – ' भामिनि, राजवचनं (पू.)?' ॥

१ ' जय असो. ' ह्या शब्दानें. २ गौरवणारा. ३ विचारूं लागला. ४ तुझा उत्कर्ष होवो. ५ विपरीत. ६ पावलेला. ७ जागरणानें. ८ स्वस्थ नाहीं, असा. ९ दिसतो. १० न ऐकून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आज्ञा झाल्याशिवाय मी कसा बरें जाऊं ?' हें प्रधानाचें भाषण ऐकिल्यावर राजा त्याला ह्मणाला :–॥४६॥ ' सुमंत्रा, रामाची सुंदर मूर्ति पहाण्याची मला इच्छा झाली आहे; तूं त्याला लवकर घेऊन ये.' अशी आज्ञा झाल्याबरोबर सुमंत्र रामचंद्राच्या मंदिरीं गेला.॥ ४७ ॥तेथें त्याला जाण्याला प्रतिबंध नव्हताच. त्वरेनें आंत पोंचल्यावर तो रामाला ह्मणाला :– ' कमलनयना रामचंद्रा, तुझें कल्याण असो. मजबरोबर लवकर पित्याच्या मंदिरीं चल. महाराजांना तुला पाहण्याची इच्छा झाली आहे.' सुमंत्रानें असें कळविल्याबरोबर रामचंद्र तत्काल रथांत बसून त्वरेनें निघाला.॥४८॥४९॥बरोबर सारथि आणि लक्ष्मण हे दोघेजण निघाले. राजमंदिराच्या मधल्या दालनांत वसिष्ठादि - मंडळी होती, असें पूर्वी सांगितलेंच आहे;- त्यांच्याकडे नुसतें पहातच (न बोलतां)

तच्छ्रुत्वा मन्त्रिणो वाक्यं राजा मन्त्रिणमब्रवीत् ॥ ४६ ॥ सुमन्त्र रामं द्रक्ष्यामि शीघ्रमानय सुन्दरम् ॥ इत्युक्तस्त्वरितं गत्वा सुमन्त्रो राममन्दिरम् ॥ ४७ ॥ अवारितः प्रविष्टो ऽयं त्वरितं राममब्रवीत् ॥ शीघ्रमागच्छ भद्रं ते राम राजीवलोचन ॥ ४८ ॥ पितुर्गेहं मया सार्धं राजा त्वां द्रष्टुमिच्छति ॥ इत्युक्तो रथमारुह्य संभ्रमात्त्वरितो ययौ ॥४९॥ रामः सारथिना सार्धं लक्ष्मणेन समान्वितः॥

राजा तत् मन्त्रिणः वाक्यं (मू.) – ॥४६॥ '(बा. पू.) आनय.'॥सुमन्त्रः (बा. मू.) गत्वा, ॥ ४७ ॥ (४८ पू.) मया सार्धं पितुः गेहं शीघ्रं आगच्छ (बा. ४८।४९ मू.). ॥ ४८ ॥ ४९ ॥ (मू.) ॥

---

१ लगबगीनें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कल्होळ झाला.

रामचंद्रानें सत्वर पित्याच्या जवळ येऊन, त्याच्या चरणास वंदन केलें. दशरथ राजा रामाला आलिंगन देण्यासाठीं आदरपूर्वक उठून उभा राहिला.॥९०॥९१॥'रामा!' असें ह्मणून त्यानें आपले बाहु पसरले; पण तो दुःखानें मध्येंच पडला! रामानें 'हा! हा!' असे उद्गार काढीत त्याला उचलून मांडीवर घेतलें. ॥९२॥ राजा मूर्च्छित पडला असें पाहिल्याबरोबर सर्व स्त्रिया रडू लागल्या. 'रडारड काय आहे!' ह्मणून वसिष्ठही आंत आले. ॥ ९३ ॥ रामानें विचारिलें :– 'हें आहे काय? महाराजांना दुःख कोणतें झालें?' असें रामानें विचारिलें असतां, कैकेयी रामाला ह्मणाली :– ॥ ९४ ॥

मध्यकक्षे वसिष्ठादीन् पश्यन्नेव त्वरान्वितः ॥ ५० ॥ पितुः समीपं संगम्य ननाम चरणौ पितुः॥राममालिंगितुं राजा समुत्थायससंभ्रमः ॥५१॥ बाहू प्रसार्य रामेति दुःखान्मध्ये पपात ह ॥ हा हेतिरामस्तं शीघ्रमालिंग्यांके न्यवेशयत् ॥ ५२ ॥ राजानं मूर्छितं दृष्ट्वा चुक्रुशुः सर्वयोषितः ॥ किमर्थं रोदनमिति वसिष्ठो ऽपि समाविशत् ॥ ५३ ॥ रामः पप्रच्छ किमिदं राज्ञो दुःखस्य कारणम् ॥ एवं पृच्छति रामे सा कैकेयी राममब्रवीत् ॥ ५४ ॥

(मू.). ॥९०॥ (पू.) चरणौ ननाम.॥राजा (उ.) समुत्थाय,॥९१॥९२॥सर्वयोषितः (मू.). ॥९३॥९४॥

१ जाऊन. २ त्वरायुक्त. ३ पसरून. ४ उचलून ठेविता झाला. ५ सगळ्या स्त्रिया. ६ रडूं लागल्या. ७ आंत शिरला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामा, ह्या सगळ्या गोष्टीला कारण तूंच होस. ह्या दुःखाचें निरसन होण्यासाठीं महाराजांचें हितकर असें एक लहानसें कार्य त्वां केलें पाहिजे. ॥ ९५ ॥ आपली प्रतिज्ञा सत्य करण्याचें तुझें व्रत आहे; त्याप्रमाणेंच तूं महाराजांनाही स्वतांचें वचन सत्य करण्याच्या कामीं साह्य कर. पूर्वी एके वेळीं महाराजांचें मन प्रसन्न झालें असतां, त्यांनीं मला दोन वर दिले आहेत. ॥ ९६ ॥ त्यांची परिपूर्ति करणें सर्वथा तुझ्या स्वाधीन आहे. महाराजांना तुझ्याजवळ असें बोलण्याची लाज वाटते. सत्यरूपी पाशानें बद्ध झालेल्या आपल्या पित्याचें त्वां रक्षण करावें, हें मला योग्य दिसतें.॥९७॥पुत्र शब्दाचा अर्थ तरी हाच आहे कीं, - तो पुन्नामक-

त्वमेव कारणं ह्यत्र राज्ञो दुःखो[1]पशान्तये ॥ किंचित्कार्यं त्वया राम कर्तव्यं नृपतेर्हितम् ॥ ५५ ॥ कुरु सत्यप्रतिज्ञस्त्वं राजानं सत्यवादिनम् ॥ राज्ञा वरद्वयं दत्तं मम सन्तुष्टचेतसा ॥ ५६ ॥ त्वदधीनं तु तत्सर्वं वक्तुं[2] त्वां लज्जते नृपः ॥ सत्यपा[3]शेन सम्ब[4]द्धं पितरं [5]त्रातुमर्हसि ॥ ५७ ॥ पुत्रशब्देन चैतद्धि नरकात्त्राय-ते पिता ॥ रामस्तयोदितं श्रुत्वा शूले[9]नाभि[10]हतो यथा ॥ ५८ ॥

' राम, (बा. पू.) कारणं; ॥राम, त्वया नृपतेः हितं किंचित् कार्यं कर्तव्यं. ॥९५॥ (बा. पू.) कुरु.॥ सन्तुष्टचेतसा राज्ञा मम (मू.). ॥९६॥ तत् सर्वं तु त्वदधीनं; नृपः त्वां व[2]क्तुं लज्जते. (उ.). ॥ ९७ ॥ हि " पिता न[6]रकात् त्रा[7]यते " एतत् पुत्रशब्देन [उ[8]च्यते].' (मू.). ॥ ९८ ॥

---

१ दुःखाच्या शांतीला. २ बोलण्यास. ३ सत्यरूप दोरीनें. ४ बांधला गेलेल्या. ५ रक्षण करण्यास. ६ नरकापासून. ७ राखतो. ८ म्हटला जातो. ९ शूळानें. १० ताडिलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुत्रांचे तीन प्रकार.

नरकापासून पित्याचें संरक्षण करितो.' कैकेयीचें तें भाषण ऐकिल्याबरोबर राम, शूलाचा प्रहार लागल्याप्रमाणें ॥५८॥व्यथित झाला, व कैकेयीला ह्मणाला :– 'माते ! तूं मला असें काय सांगत आहेस ! - माझा तर असा निर्धार आहे कीं, - मी पित्याकारितां प्राण देखील देईन, किंवा भयंकर विष सुद्धां प्राशन करीन! ॥ ५९॥ सीतेचा, फार तर काय, कौसल्या मातेचा देखील त्याग करीन ! राज्य तर मी आतांच सोडितों ! उत्तम पुत्र त्यालाच म्हणतात कीं, जो आज्ञा मिळण्याच्या पूर्वींच, - नुसत्या धोरणानें पित्याचा हेतु जाणून त्याप्रमाणें - कार्य करितो. ॥ ६० ॥ पित्यानें आज्ञा केली असतां जो त्याचें कार्य करितो, त्याला " मध्यम पुत्र " असें म्हटलें आहे. पित्यानें काम करायाला सांगितलें असूनही जो तें करीत नाहीं, तो पुत्र केवळ मल होय, असें म्हणतात (त्याला पुत्र हें नांव शोभत नाहीं तर तो आईबापांच्या शरीरांतील मळाचा एक गोळा उत्पन्न झाला एवढेंच). ॥ ६१ ॥

व्यथितः कैकयीं प्राह किंमामेवं प्रभाषसे ॥ पित्रर्थे जीवितं दास्ये पिबेयं वि-
षमुल्बणम् ॥ ५९ ॥ सीतां त्यक्ष्ये[3] ऽथ कौसल्यां राज्यं चापि त्यजाम्यहम्[4] ॥
अनाज्ञप्तो[5] ऽपि कुरुते[6] पितुः कार्यं स उत्तमः ॥ ६० ॥ उक्तः[7] करोति यः पुत्रः
स मध्यम उदाहृतः[8] ॥ उक्तो ऽपि कुरुते नैव स पुत्रो मल उच्यते ॥ ६१ ॥

(मू.) विषं पिबेयम्[2]. ॥५९॥ अहं (पू.). ॥ [यः] पितुः कार्यं (मू.). ॥६०॥ यः पुत्रः (मू.). ॥६१॥

१ तीव्र, अस्रा. २ पिईन. ३ टाकीन. ४ त्यजामि टाकतों. ५ ज्याला आज्ञा केली नाहीं, असा. ६ करितो. ७ आज्ञा केलेला. ८ ह्मटलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

म्हणून, माझा पिता मला जें कार्य सांगत किंवा सांगणार असेल तें सर्व मी करीन. खरोखर तें कार्य मी करणारच, - ह्यांत अंतर होणार नाहीं. - राम दोन प्रकारांनीं कधींच बोलत नसतो (पूर्वींचें बोलणें परत घेऊन दुसरेंच विपरीत कांहीं तरी बोलायाचें, अशी गोष्ट रामाच्या हातून कालत्रयीं होणार नाहीं.)' ॥ ६२॥ कैकेयीनें रामाची ही प्रतिज्ञा ऐकून घेतली व बोलण्यास प्रारंभ केला. - ती ह्मणाली :-- 'रामा, तुला अभिषेक करण्यासाठीं जें साहित्य जमविलें आहे, ॥ ६३ ॥ त्याच्या योगानेंच माझ्या प्रिय भरताला राज्याभिषेक अवश्य झाला पाहिजे, - हा एक वर मी राजाजवळून मागून घेतला आहे. - दुसऱ्या वरानें मी - हें मागितलें आहे कीं, - रामा, तूं आतांच्या आतां - आंगावर वस्त्राऐवजीं - चिंध्या किंवा वल्कलें घेऊन व जटा धारण करून ॥ ६४॥ पित्याच्या आज्ञेनें आजच लवकर वनांत जावें, आणि तेथें मुनि खातात तें अन्न भक्षून

अतः करोमि तत्सर्वं यन्मामाह पिता मम ॥ सत्यं सत्यं करोम्येव रामो द्विर्नाभि-
भाषते ॥६२॥ इति रामप्रतिज्ञां सा श्रुत्वा वक्तुं प्रचक्रमे ॥ राम त्वदभिषेकार्थं
सम्भाराः सम्भृताश्च ये ॥६३॥ तैरेव भरतोऽवश्यमभिषेच्यः प्रियो मम ॥ अपरेण
वरेणाशु चीरवासा जटाधरः॥ ६४ ॥ वनं प्रयाहि शीघ्रं त्वमद्यैव पितुराज्ञया ॥

अतः मम पिता मां यत् आह, तत् सर्वं सत्यं करोमि. (मू.).' ॥ ६२ ॥ सा (पू.)–॥ 'राम ये (मू.), ॥ ६३ ॥ मम प्रियः भरतः (मू.) ॥ ६४ ॥ त्वं अद्य एव पितुः आज्ञया शीघ्रं (मू.) ॥

---

१ द्विः दोनदां (एकदां एक दुसऱ्यानें दुसरें). २ बोलतो. ३ प्रारंभ करिता झाला. ४ सिद्ध. ५ अभिषेक करण्यास योग्य. ६ चिंध्या किंवा वल्कलें हींच ज्याचीं वस्त्रें, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'महाराज कां बोलत नाहींत?'

चवदा वर्षें रहावें. ॥ ६५ ॥ हेंच पित्याचें कार्य त्वां आज करावें. रामचंद्रा, महाराजांना तुजजवळ ही गोष्ट काढण्याची लाज वाटते. ' ॥ ६६ ॥ राम म्हणाला :– 'माते ! भरतच राज्य करो. मी दंडकारण्यांत जातों. पण महाराज मजजवळ ह्याविषयीं कांहींच बोलत नाहींत, ह्याचें कारण मला समजत नाहीं. ' ॥ ६७ ॥ दशरथ राजानें रामाचें हें भाषण ऐकिलें. पुढें उभा राहिलेल्या रामाकडे पाहिल्याबरोबर त्याला पराकाष्ठेचें दुःख झालें. व त्यानें रामाजवळ दुःखाचे उद्गार काढिले; - ते असे :- ॥ ६८ ॥ ' रामा ! ह्या स्त्रीनें मला पूर्णपणें जिंकिलें आहे ! माझ्या मनाला भ्रांति झाली असून मी भलत्याच मार्गानें चाललों आहें.

चतुर्दश[1] समास्तत्र वस मुन्यन्नभोजनः[2]॥६५॥एतदेव पितुस्ते ऽद्य कार्यं त्वं कर्तुमर्हसि॥राजा तु लज्जते वक्तुं त्वामेवं रघुनन्दन॥६६॥श्रीराम उवाच । भरतस्यैव राज्यं स्यादहं गच्छामि दण्डकान् ॥ किन्तु राजा न वक्तीह मां न जाने ऽत्र कारणम् ॥ ६७॥ श्रुत्वैतद्रामवचनं दृष्ट्वा रामं पुरः स्थितम् ॥ प्राह राजा दशरथो दुःखितो दुःखितं वचः ॥ ६८ ॥ स्त्रीजितं भ्रान्तहृदयमुन्मार्गपरिवर्तिनम् ॥

(मू.) वस[3]. ॥ ६५ ॥ रघुनन्दन, त्वं (मू.) वक्तुं लज्जते. ' ॥ ६६ ॥ श्रीरा० उ० – '(पू. मू.) गच्छामि. ॥ किन्तु राजा इह मां न वक्ति[4], अत्र कारणं न जाने[5]. ' ॥ ६७ ॥ राजा दशरथः एतत् रामवचनं श्रुत्वा, पुरः[6] स्थितं रामं दृष्ट्वा, (मू.) प्राह– ॥ ६८ ॥ ' (पू.) ॥

१ वर्षें. २ मुनि खातात, तें अन्न खाणारा. ३ राहा. ४ बोलतो. ५ जाणतों. ६ पुढें. ७ स्त्रीनें जिंकिलेल्या. ८ ज्याच्या हृदयाला भ्रम झाला, अशा. ९ भलत्याच मार्गानें चालणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मणून तूं मला पदच्युत करून किंवा बंदींत टाकून हें राज्य ग्रहण कर. असें करण्यापासून तुला पाप अगदीं लागणार नाहीं.॥६९॥रामा, तूं असें केलेंस ह्मणजे मलाही असत्याचा दोष लागणार नाहीं.' दुःखानें संतप्त झालेला राजा त्यावेळीं असें बोलून विलाप करूं लागलाः-- ॥ ७० ॥ हा रामा ! हा जगन्नाथा ! अरे माझ्या प्राणवल्लभा ! मला टाकून तूं घोर अरण्यांत कसा जातोस ! ! ' ॥७१॥ दशरथराजा रामाला पोटाशीं धरून व मागें सांगितल्याप्रमाणें हंबरडा फोडून रडूं लागला. रामानें पाण्याच्या हातानें पित्याचे डोळे पुसले. ॥ ७२ ॥ तो नीतिशास्त्रांत निपुण होता; त्यानें - देशकालाला अनुरूप असें भाषण करून -

निगृह्य मां गृहाणेदं राज्यं पापं न तद्भवेत् ॥ ६९ ॥ एवं चेदनृतं[3] नैव मां स्पृशे[4]द्रघु-
नन्दन ॥ इत्युक्त्वा दुःखसंतप्तो विललाप[5] नृपस्तदा ॥ ७० ॥ हा राम हा
जगन्नाथ[6] हा मम प्राणवल्लभ[7] ॥ मां विसृज्य[8] कथं घोरं विपिनं[9] गन्तुमर्हसि
॥ ७१ ॥ इति रामं समालिंग्य मुक्तकण्ठो[10] रुरोद[11] ह ॥ विमृज्य नयने रामः
पितुः सजलपाणिना ॥ ७२ ॥ आश्वासयामास[16] नृपं शनैः स नयकोविदः ॥

मां निगृह्य[1], इदं राज्यं गृहाण[2]. तत् पापं न भवेत्.॥६९॥रघुनन्दन, (बा. पू.).'॥नृपः तदा(मू.) ॥७०॥ '(मू.)'॥७१॥(पू.).॥रामः पितुः नयने[12] सजलपाणिना[13] विमृज्य[14],॥७२॥सः नयकोविदः[15] शनैः नृपं (पू.)--॥

---

१ बद्ध करून. २ घे. ३ असत्य. ४ शिवेल. ५ विलाप करूं लागला. ६ जगाचा धनी, अशा. ७ प्राणांला प्रिय, अशा. ८ सोडून. ९ रानाला. १० ज्यानें कंठ मोकळा केला (धाय मोकलली) असा. ११ रडूं लागला. १२ नेत्रांना. १३ उदकयुक्त हातानें. १४ पुसून. १५ नीतिशास्त्रांत निपुण. १६ सांत्वन करूं लागला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राजाचें सांत्वन केलें. - तो ह्मणाला :- ‘ महाराज, आपण ज्ञानीच आहां. आतां दुःख करण्यांत काय अर्थ आहे? माझ्या धाकट्या भावाला राज्य करूं द्या. ॥ ७३ ॥ मी प्रतिज्ञा पुरी करून आपल्या राजधानींत पुन्हां परत येईन. महाराज, वनांत राहण्यापासून मला राज्यापेक्षां कोटिपटींनीं सुख अधिक होईल. ॥७४॥ - कारण त्यापासून दोन लाभ होणार आहेत :- आपल्या सत्याचें पालन होईल व देवांचेंही कार्य होईल. शिवाय, महाराज, मी वनांत राहावें ही गोष्ट कैकयीला प्रिय आहे. एतावता, माझ्या वनवासापासून पुष्कळ लाभ होणार आहेत. ॥ ७५ ॥ माझ्या मनांत आतांच जावें अशी इच्छा आहे. मातेच्या (कैकेयीच्या) मनांतील ताप तरी दूर होऊं द्या ! अभिषेकाकारितां जें साहित्य जमविलें आहे, तें आटो-

किमत्र दुःखेन विभो[1] राज्यं शासतु मे ऽनुजः ॥ ७३ ॥ अहं प्रतिज्ञां निस्तीर्य[4]
पुनर्यास्यामि ते पुरम् ॥ राज्यात्कोटिगुणं सौख्यं मम राजन्वने सतः ॥ ७४ ॥
त्वत्सत्य[6]पालनं देवकार्यं चापि भविष्यति ॥ कैकेय्याश्च प्रियो राजन्वनवासो
महागुणः[7] ॥ ७५ ॥ इदानीं गन्तुम्[8]इच्छामि व्येतु मातुश्च त्वज्ज्वरः[9] ॥ सम्भारा-
श्चोपह्रियन्ताम्[11]अभिषेकार्थमागताः ॥ ७६ ॥

(बा. मू.)मे अनुजः[2] राज्यं शासतु[3]. ॥७३॥ (पू.) यास्यामि. ॥ राजन्, वने सतः[5] मम (मू.). ॥ ७४ ॥ (मू.). ॥ ७५ ॥ (पू.) व्येतु[10]. ॥ अभिषेकार्थं आगताः (मू.). ॥ ७६ ॥

---

१ समर्था. २ धाकटा भाऊ. ३ पाळो. ४ पार पाडून. ५ असणाऱ्या. ६ तुमचें सत्य राखणें. ७ बहुगुणी. ८ गन्तुं जाण्यास. ९ मनाचा संताप. १० दूर होवो. ११ उपह्रियन्तां आटोपले जावोत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पून ठेवावें. ॥ ७६ ॥ मातेला (कौसल्येला) आश्वासन देऊन व सीतेची समजूत करून मी येथें येतों; पुढें आपल्या चरणाला वंदन करून मी सुखानें वनास जाईन.' ॥ ७७॥ राम असें बोलला व पित्याला प्रदक्षिणा घालून मातेच्या दर्शनासाठीं निघून गेला. इकडे कौसल्या रामाच्या उत्कर्षासाठीं हरीची पूजा करीत बसली होती. ॥ ७८ ॥ तिनें ब्राह्मणांकडून होम करविला व त्यांना पुष्कळ द्रव्य दिलें. सध्यां ती मौन व्रत धारण करून एकाग्र मनानें विष्णूचें ध्यान करीत होती. ॥ ७९ ॥ तो भगवान् सर्वांच्या अंतर्यामीं वास करीत असून एक पूर्ण ज्ञानरूपी प्रकाशानें भरला आहे. प्रत्येक प्राण्याच्या शरीरांत असा कांहींतरी विशेष अस-

मातरं च समाश्वास्य[1] अनुनीय[2] च जानकीम् ॥ आगत्य[3] पादौ वन्दित्वा[4] तव
यास्ये[5] सुखं वनम् ॥ ७७ ॥ इत्युक्त्वा तु परिक्रम्य[6] मातरं द्रष्टुम्[7] आर्ययौ[8] ॥ कौसल्या
ऽपि हरेः पूजां कुरुते रामकारणात् ॥ ७८ ॥ होमं च कारयामास[9] ब्राह्मणेभ्यो
ददौ धनम् ॥ ध्यायते विष्णुमेकाग्रमनसा[10] मौनमा[11]स्थिता[12]॥ ७९ ॥ अन्तस्थ[14]मेकं
घनचित्प्रकाशं[15] निरस्तसर्वातिशयस्वरूपम्[16] ॥

(पू.) अनुनीय, ॥ आगत्य, तव पादौ वन्दित्वा, सुखं वनं यास्ये. ' ॥७७॥ (मू.) कुरुते. ॥ ७८ ॥
(पू.) ददौ. ॥ (उ.) ध्यायते[13]. ॥ ७९ ॥ (मू.) ॥

---

१ आश्वासन देऊन. २ समजूत घालून. ३ येऊन. ४ नमस्कार करून. ५ जाईन. ६ प्रदक्षिणा करून. ७ द्रष्टुं पाहण्यास. ८ आययौ आला. ९ करविती झाली. १० एकाग्र मनानें. ११ मौनव्रताला. १२ स्वीकारून बसलेली. १३ ध्यान करीत बसते. १४ हृदयांत राहणाऱ्या. १५ पूर्ण चैतन्यप्रकाशरूपी, अशा. १६ सर्वांचीं अतिउत्तम स्वरूपें ज्यानें धिक्कारिलीं, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो कीं, ज्यामुळें तो दुसऱ्याहून वेगळा असें ओळखितां येतें; पण भगवंताच्या स्वरूपानें तो भेद सर्वथा दूर केला आहे (त्या स्वरूपीं भेद नाहीं).. कौसल्या अशा त्या नित्यानंदरूपी विष्णूचें हृदयकमलांत ध्यान करीत होती, - व तिचें लक्ष्य सर्वथा तिकडे लागलें होतें; ह्मणून राम पुढें उभा राहिला असतांही - तिला दिसला नाहीं. ॥ ८० ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे अयोध्याकांडे तृतीयसर्गः ॥ ३ ॥

नंतर, सुमित्रेनें ह्या रामाला पाहून त्वरित कौसल्येला कळविलें कीं, हा राम येऊन जवळ उभा राहिला आहे. ॥ १ ॥ रामाचें नांव ऐकिल्याबरोबर हिनें (कौसल्येनें) - समाधि उतरून - आपल्या दृष्टीचा प्रवाह बाहेर चालू केला, विशालनेत्र रामचंद्र दृष्टीस पडला असतां त्याला आलिंगन देऊन मांडीवर बसविलें, ॥ २॥

विष्णुं सदानन्दमयं[1] हृदब्जे[2] सा भावयन्ती[3] न ददर्श रामम् ॥ ८० ॥ इति श्रीमद० अयोध्याकाण्डे तृतीयः सर्गः ॥ ३ ॥ ततः सुमित्रा दृष्ट्वैनं[5] रामं राज्ञीं ससंभ्रमा ॥ कौसल्यां बोधयामास रामोऽयं समुपस्थितः[5] ॥ १ ॥श्रुत्वैव राम-नामैषा बहिर्दृष्टिप्रवाहिता[6] ॥ रामं दृष्ट्वा[7] विशालाक्षमालिंग्यांके न्यवेशयत्॥२॥

(मू.) सा रामं न ददर्श[4]. ॥ ८० ॥ ॥ इति श्रीरामायणान्वये अयोध्याकाण्डे तृतीयः सर्गः ॥ ३ ॥ ततः सुमित्रा एनं रामं दृष्ट्वा, ससम्भ्रमा [सती] राज्ञीं (मू.) ॥ १ ॥ एषा रामनाम (बा.पू.) [सती] ॥ विशालाक्षं (बा. उ.) ॥ २ ॥

---

१ नित्य आनंदरूपी, अशा. २ हृदयकमळांत. ३ चिंतिणारी. ४ पाहती झाली. ५ जवळ उभा. ६ बाहेर दृष्टीचा प्रवाह जिचा आहे, अशी. ७ विशाल नेत्र ज्याचे आहेत, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मस्तक हुंगिलें, निळ्या कमळासारख्या तेजस्वी अशा त्याच्या शरीरावरून हात फिरविला आणि म्हटलें :-- ‘बाळा, तूं फार भुकेलेला असशील. तुजकरितां मी गोडगोड पदार्थ - सिद्ध करून ठेविले आहेत, - ते भक्षण कर.’ ॥ ३ ॥ राम ह्मणाला :-- ‘माते ! - वडिलांनीं - आतां मला भोजनाला अवकाशच ठेविला नाहीं तर मी आज ह्या वेळीं लवकर दंडकारण्यांत जावें, असें ठरविलें आहे. ॥ ४ ॥ स्वतांची प्रतिज्ञा सत्य करायाची, असा माझ्या पित्याचा नियम आहे; त्याप्रमाणें त्यानें, कैकेयीला दिलेलें वचन सत्य करण्यासाठीं, भरताला अयोध्येचें राज्य आणि मला उत्तम असें अरण्याचें आधिपत्य दिलें. ॥ ५ ॥ आतां मी मुनीचा वेष धारण करून चवदा वर्षें त्या ठिकाणीं (अरण्यांत) राहीन व पुन्हां लागलाच परत येईन. तूं अगदीं चिंता

मूर्ध्न्यवघ्राय पस्पर्श गात्रं नी[1]लोत्पलच्छवि ॥ भुंक्ष्व पुत्रेति च प्राह मिष्टमन्नं
क्षुधार्दितः ॥ ३ ॥ रामः प्राह न मे मातर्भो[7]जनावसरः कृतः ॥ दण्डकागमने
शीघ्रं मम कालो ऽद्य निश्चितः ॥४॥ कैकेयीवरदानेन सत्यसन्धः पिता मम ॥
भरताय ददौ राज्यं ममाप्यारण्यमुत्तमम् ॥ ५ ॥ चतुर्दश समास्तत्र ह्युषि[10]त्वा
मुनिवेषधृक् ॥ आगमिष्ये पुनः शीघ्रं न चिन्तां कर्तुमर्हसि ॥ ६ ॥

(मू.) गा[2]त्रं प[3]स्पर्श, ‘पुत्र, क्षु[4]धार्दितः [त्वं] मिष्टं[5] अन्नं भुंक्ष्व[6]’ इति प्राह च.॥३॥(बा. पू.)न कृतः,॥(उ.).
॥४॥सत्यसन्धः मम पिता(बा. मू.)[8]आरण्यं ददौ.॥५॥मुनिवेषधृक् तत्र(बा.पू.),पुनः शीघ्रं(बा. उ.).॥६॥

---

१ निळ्या कमळाप्रमाणें कांति ज्याची, अशा. २ शरीराला. ३ शिवली. ४ भुकेनें पीडिलेला. ५ मधुर. ६ खा. ७ भोजनाला वेळ. ८ अरण्यसंबंधी. ९ वर्षे. १० उषित्वा राहून.

८

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करूं नकोस.' ॥ ६ ॥ तें ऐकल्याबरोबर, एकाएकीं दुःख कोसळल्यामुळें कौसल्या मूर्छित पडली, कांहीं वेळानें पुन्हां उठली; पण त्या अत्यंत दुःखानें तिच्या मनाला फारच पीडा होऊं लागली, फार तर काय, ती दुःखसमुद्रांत अगदीं बुडून गेली. अशाच अवस्थेंत तिनें रामाला ह्मटलें :– ॥ ७ ॥ 'रामा, जर तूं खरोखरच वनांत जातोस, तर मलाही बरोबर ने. तुझ्यावांचून मला अर्धा क्षण तरी जीव कसा बरें धरवेल ! ॥८॥ जशी गाय आपल्या लहान वांसराला सोडून कोठेंही राहत नाहीं त्याप्रमाणेंच, बाळा, तुला सोडून माझ्यानें अगदीं राहवणार नाहीं. तूं मला प्राणापेक्षांही प्रिय आहेस. ॥ ९ ॥ राजा प्रसन्न झाला असेल, तर त्यानें खुशाल भरताला राज्य द्यावें (त्याबद्दल माझा किंवा कोणाचाही प्रतिबंध नाहीं). तूं देखील त्याला प्रिय आहेसच; असें असतांना, तो तुला वनवासाला जाण्यास आज्ञा देतो, ह्याचें कारण काय ? ॥ १० ॥

तच्छ्रुत्वा सहसोद्विग्ना[1] मूर्छिता पुनरुत्थिता ॥ आह रामं सुदुःखार्ता[2] दुःखसागरसम्प्लुता[3] ॥ ७ ॥ यदि राम वनं सत्यं यासि[4] चेन्नय[5] मामपि ॥ त्वद्विहीना क्षणार्धं वा जीवितं धारये[6] कथम् ॥८॥ यथा गौर्बालकं वत्सं त्यक्त्वा तिष्ठेन्न[7] कुत्रचित्॥ तथैव त्वां न शक्नोमि[8] त्यक्तुं प्राणात्प्रियं सुतम् ॥ ९ ॥ भरताय प्रसन्नश्चेद्राज्यं राजा प्रयच्छतु ॥ किमर्थं वनवासाय त्वामाज्ञापयति[9] प्रियम् ॥ १० ॥

(मू.) रामं आह – ॥७॥ '(बा. पू.) नैय. ॥ (उ.) धारये ? ॥ ८ ॥ (पू.) न तिष्ठेत्, ॥ (बा. उ.) त्वां त्यक्तुं न शक्नोमि. ॥९॥ राजा प्रसन्नः चेत्, (बा. मू.) त्वां किमर्थं आज्ञापयति ? ॥ १० ॥

१ उद्विग्ना खिन्न. २ अतिशय दुःखानें गांजलेली. ३ दुःखसमुद्रांत बुडालेली. ४ जातोस. ५ ने. ६ धरूं. ७ राहते. ८ समर्थ आहें. ९ देवो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राजानें कैकेयीला वर दिला असेल, तर तिला पाहिजे असल्यास सर्वस्व द्यावें. तूं कैकेयीचा किंवा राजाचा असा काय अपराध केला आहेस - कीं, ज्यामुळें तुला वनांत गेलें पाहिजे ?- ॥ ११ ॥ पिता गुरु असल्यामुळें तुला पूज्य आहे, पण मी त्याच्याहूनही अधिक मान्य आहें. पित्यानें वनांत जाण्याला सांगितलें; पण, मुला, मी तुला जाण्याला प्रतिबंध करित्यें (" जाऊं नको " म्हणत्यें). ॥ १२ ॥ जर तूं माझ्या आज्ञेचें उल्लंघन करून राजाच्या वचनाप्रमाणें निघून जाशील, तर मी तत्काळ प्राणत्याग करून यमसदनास जाईन !' ॥ १३ ॥ लक्ष्मणाला - हा वृत्तांत कळल्यापासून - क्रोध आलेला होताच; त्यांत आतां कौसल्येचें हें भाषण ऐकिल्यावर - तो अधिकच वाढला. - त्या वेळीं त्याच्या मुद्रेवरून ' हा त्रैलोक्याचें भस्म करणार कीं काय !' असा भा-

कैकेय्या वरदो राजा सर्वस्वं वा प्रयच्छतु ॥ त्वया किमपराद्धं हि कैकेय्या वा नृपस्य वा ॥ ११ ॥ पिता गुरुर्यथा राम तवाहमधिका ततः ॥ पित्रा ऽऽज्ञप्तो वनं गन्तुं वारयेयमहं सुतम् ॥ १२ ॥ यदि गच्छासि मद्वाक्यमुल्लंघ्य नृपवाक्य-तः ॥ तदा प्राणान्परित्यज्य गच्छामि यमसादनम् ॥ १३ ॥ लक्ष्मणोऽपि ततः श्रुत्वा कौसल्यावचनं रुषा ॥ उवाच राघवं वीक्ष्य दहन्निव जगत्त्रयम् ॥ १४ ॥

वरदः राजा (बा. मू.) किं अपराद्धं[1] ? ॥ ११ ॥ राम, यथा तव पिता गुरुः, [तथा] अहं ततः[2] अ-धिका; पित्रा वनं गन्तुं आज्ञप्तः, अहं सुतं वारयेयम्[3]. ॥ १२ ॥ (बा. पू.) गच्छासि, ॥ (बा. उ.) ग-च्छामि. ' ॥ १३ ॥ (बा. पू.) श्रुत्वा, रुषा[4] ॥ (बा. उ.) दहन्[6] इव उवाच – ॥ १४ ॥

१ अपराधिलें. (आगळीक केली.). २ त्याहून. ३ **वारयेयम्** वारण करित्यें. ४ क्रोधानें. ५ त्रैलोक्याला. ६ जाळणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स होत असे. अशा स्थितींत त्यानेंही रामाला म्हटलें :-- ॥ १४ ॥ ‘रामा, भरत फार उन्मत्त झाला आहे. - राज्याच्या लोभानें - त्याच्या मनाला भ्रांति उत्पन्न झाली असावी, म्हणूनच तो कैकेयीच्या स्वाधीन राहतो व छंदानें वागत असतो. आतां मी त्याला, त्याच्या साह्यकर्त्यांना आणि मामांनाही बांधून मारून टाकितों. ॥ १५ ॥ पूर्वीच्या प्रलयकाळीं शंकरानें सर्व लोकांचें दहन करतेवेळीं - जसें उग्र स्वरूप धरिलें होतें, त्याप्रमाणेंच भयंकर रूप मी धारण करितों; - लोकांनीं आज माझा पराक्रम अवलोकन करावा. रामा, तूंही शत्रूंना दमविणारा आहेस; तर आतां स्वतांला राज्याभिषेक होण्याबद्दल यत्न कर. ॥ १६ ॥ मी हातांत धनुष्य घेऊन सिद्ध असतों, व त्या कार्यांत कोणी विघ्न आणतील तर त्यांचा वध करितों.’ लक्ष्मण असें बोलला असतां, रामानें त्याला घट्ट पोटाशीं धरून - म्हटलें :- ॥१७॥ ‘रघुकुलश्रेष्ठा लक्ष्मणा, तूं शूर व मा-

उन्मत्तं भ्रान्तमनसं कैकेयी[1]वशवर्तिनम् ॥ बध्वा निहन्मि भरतं त[2]द्बन्धून्मा[3]तुला-
नपि ॥१५॥अद्य पश्यन्तु मे शौर्यं लोकान्प्रदहतः पुरा ॥ राम त्वमभिषेकाय
कुरु यत्नमरिन्दम ॥१६॥ धनुष्पाणिरहं तत्र निहन्यां विघ्नकारिणः॥इति ब्रुव[11]न्तं
सौमित्रिमालिंग्य रघुनन्दनः ॥ १७ ॥ शूरो ऽसि र[12]घुशार्दूल ममात्यन्तहिते र[13]तः॥

‘(मू.) ब[4]ध्वा, नि[5]हन्मि. ॥ १५ ॥ [6]अरिन्दम राम, [जनाः] पुरा लोकान् प्र[7]दहतः मे शौर्यं (मू.) कुरु. ॥ १६ ॥ (बा. पू.) नि[9]हन्याम्.’॥ रघुनन्दनः (बा. उ.), ॥ १७ ॥ ‘ (बा. पू.) शूरः असि,॥

१ कैकेयीच्या स्वाधीन राहणाऱ्या. २ त्याच्या साथीदारांना. ३ मामांना. ४ बांधून. ५ मारतों. ६ शत्रूंस दमाविणाऱ्या. ७ जाळणाऱ्या. ८ पाहोत. ९ धनुष्य हातांत ज्याच्या, असा. १० मारतों. ११ बोलणाऱ्या. १२ रघुकुलांतील श्रेष्ठा. १३ संतुष्ट(तत्पर).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झें अत्यंत हित करण्यांत तत्पर आहेस. तूं ह्मणतोस त्याप्रमाणें सर्व खरें करशील हें मी पूर्णपणें जाणतों; पण, बाळा, तसें करण्याची ही वेळ नव्हे. ॥ १८ ॥ हें राज्य, शरीर वगैरे जें कांहीं दिसत आहे, तें जर सर्व सत्य असतें, तर त्याबद्दल तुझे श्रम सफल आहेत - असें ह्मणतां आलें असतें. - ॥ १९ ॥ पण हे भोग, मेघमंडळावर क्षणमात्र चमकणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें, चंचल आहेत. आयुष्य तर, अग्नीनें तापविलेल्या लोखंडाच्या पत्र्यावर टाकलेल्या उदकाच्या बिंदूप्रमाणें, - तत्काल नष्ट होणारें आहे. - ॥ २० ॥ जसा बेडूक, सर्पाच्या तोंडांत सांपडला असतांही, माशा धरूं इच्छितो, त्याप्रमाणें मनुष्य कालरूपी सर्पानें ग्रासला अस-

जानामि सर्वं ते सत्यं किन्तु तत्समयो न हि ॥ १८ ॥ यदिदं दृश्यते सर्वं राज्यं
देहादिकं च यत् ॥ यदि सत्यं भवेत्तत्र आयासः सफलश्च ते ॥ १९ ॥ भोगा
मे[1]घवितानस्थविद्युल्लेखेव चञ्चलाः ॥ आयुर[2]प्यग्नि[3]संतप्तलोहस्थजलबिन्दुवत् ॥
॥ २० ॥ यथा व्याल[4]गलस्थो ऽपि भेको[5] दंशा[6]नपेक्ष[7]ते ॥ तथा काला[8]हिना ग्र-
स्तो लोको भोगानशा[9]श्वतान् ॥ २१ ॥

ते सर्वं सत्यं (बा. उ.). ॥ १८ ॥ (बा. पू.) दृश्यते. ॥ [तत्र] (बा. उ.) ते आयासः सफलः. ॥१९॥ (मू.). ॥ २० ॥ (बा. मू.) भोगान् [इच्छति]. ॥ २१ ॥

---

१ मेघ–वितान–स्थ–विद्युल्लेखा इव. मेघरूपी आच्छादनावर राहणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें. २ आयुः आयुष्य. ३ अग्नीनें तापविलेल्या लोखंडावर ठेविलेल्या उदकाच्या बिंदूप्रमाणें. ४ सर्पाच्या जबड्यांत असलेला. ५ बेडूक. ६ माशांना. ७ (खाऊं) इच्छितो. ८ कालरूपी सर्पानें. ९ नश्वर, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तांही नश्वर भोग भोगूं इच्छितो ! ॥ २१ ॥ शरीराला भोग मिळावे एवढ्यासाठीं, मनुष्य रात्रंदिवस मोठ्या कष्टानें द्रव्यसंपादनाचे व्यवसाय किंवा वेदोक्त कर्में करीत असतो. पण हें जड शरीर तर अंतर्यामी पुरुषाहून अगदीं भिन्न दिसतें; तेव्हां पुरुषाला ह्यांपैकीं भोग तो कोणता भोगायाला मिळतो ? ॥ २२ ॥ जसें पाणपोईवर - चोहोंकडले चार लोक क्षणमात्र एकत्र जमतात,- त्याप्रमाणेंच प्राण्यांचा बाप, आई, मुलगे, भाऊ, बायका, सोयरेधायरे इत्यादिकांशीं कांहीं वेळ समागम घडतो. वाहत्या नदींत पडलेल्या काष्ठांचा आणि प्रवाहाचा संबंध जसा चंचल, तसाच मागें सांगितलेल्या मंडळीचा व प्राण्यांचा सहवास क्षणिक होय. ॥ २३ ॥ लक्ष्मी छायेप्रमाणें चंचल आहे, हें प्रत्येकाच्या अनुभवाला येतें; तारुण्य तर उदकाच्या लाटांप्रमाणें अस्थिर आहे; स्त्रीसुख केवळ स्वप्नांतील सुखाप्रमाणें होय. आयुष्य अगदीं अल्प आहे; असें असतांही

करोति दुःखेन हि कर्मतन्त्रं[1] शरीरभोगार्थमहर्निशं[2] नरः ॥ देहस्तु भिन्नः पुरुषात्समीक्ष्यते[3] को वा ऽत्र भोगः पुरुषेण भुज्यते[4] ॥ २२ ॥ पितृमातृसुतभ्रातृदारबन्ध्वादिसंगमः ॥ प्रपायामिव[5] जन्तूनां[6] नद्यां काष्ठौघवच्चलः[7] ॥ २३ ॥ छायेव लक्ष्मीश्चपला प्रतीता तारुण्यमम्बूर्मिवदध्रुवं[8][9] च ॥ स्वप्नोपमं स्त्रीसुखमायुरल्पं तथा ऽपि जन्तोरभिमान एषः ॥ २४ ॥

नरः शरीरभोगार्थं (बा. पू.) करोति. ॥ देहः तु पुरुषात् (बा. उ.) ॥ २२–२४ ॥

---

१ कर्माच्या खटाटोपाला. २ दिवसरात्र. ३ दिसतो. ४ भोगिला जातो. ५ पाणपाईवर. ६ प्राण्यांचा. ७ काष्ठांच्या आणि प्रवाहाच्या प्रमाणें. ८ पाण्याच्या लाटांप्रमाणें. ९ अस्थिर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्राणी - " मी भोग भोगितों, माझें द्रव्य - " हा अभिमान बाळगितो ! ॥ २४ ॥ संसार स्वप्नासारखा असून रोगादिकांनीं नित्य व्यापलेला आहे; त्याला " गंधर्वनगर" हेंच नांव साजतें. असें असून मूढ पुरुष त्या संसारांत सुख मानून राहतो ! ॥ २५ ॥ सूर्याच्या जाण्यायेण्यांनीं आयुष्य नित्य क्षीण होत आहे. त्यामुळें कित्येक लोक म्हातारे होतात, कित्येक मृत्यु पावतात; अशी स्थिति दिसत असूनही मनुष्य अगदींच कसा तो उमजत नाहीं - हें केवढें बरें आश्चर्य !-॥२६॥ह्याच्या बुद्धीला किती मोह पडला असतो, पहा. - काल गेला - तोच दिवस आणि तीच रात्र आज आहे, असें समजून तो भोग भोगण्यांत आसक्त होऊन राहतो;

संसृतिः स्वप्नसदृशी सदा रोगादिसंकुला ॥ गन्धर्वनगरप्रख्या मूढस्तामनुवर्त्तते ॥ २५ ॥ आयुष्यं क्षीयते यस्मादादित्यस्य गतागतैः ॥ दृष्ट्वा ऽन्येषां जरामृत्यू कथंचिन्नैव बुध्यते ॥ २६ ॥ स एव दिवसः सैव रात्रिरित्येव मूढधीः ॥ भोगाननुपतत्येव कालवेगं न पश्यति ॥ २७ ॥

(मू.) ॥ २५ ॥ (बा. पू.) आयुष्यं क्षीयते, ॥ अन्येषां जरामृत्यू (बा. उ.).॥२६॥(मू.) ॥२७॥

१ रोगादिकांनीं व्याप्त. २ ' गंधर्व नगर ' ह्या नांवाची (चंचल). आकाशांत तुरळक तुरळक ढगें आलीं असलीं म्हणजे त्यामध्यें हत्ती, घोडे, उंट, शिपाई वगैरे निरनिराळे आकार दिसून येतात. क्षणामध्यें हत्तीसारखा आकार दिसतो, लागलाच कांहीं वेळानें तो बदलून उंटाचा किंवा दुसरा कसला तरी आकार दिसूं लागतो; एकंदरींत त्यावेळीं दिसणाऱ्या आकृतींची स्थिति निश्चल अशी मुळींच राहत नाहीं. त्या आकृतींच्या समुदायाला किंवा त्यावेळच्या आकाशाला ' गंधर्वनगर ' असें म्हणतात. ३ जाण्यायेण्यांनीं. ४ वृद्धपण आणि मृत्यु ह्यांना. ५ समजलें जातें. ६ अनुपतति उड्या घालतो. ७ काळाच्या वेगाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कालाचा वेग त्याच्या लक्षांत अगदीं येत नाहीं! ॥ २७ ॥ कच्च्या घड्यांत भरून ठेवलेल्या पाण्याप्रमाणें हें आयुष्य क्षणोक्षणीं कमी कमी होत आहे! रोगांचे ओघ शत्रूंप्रमाणें शरीरावर प्रहार करीत आहेत! अरे अरे! - किती वाईट स्थिति ही!! - ॥ २८ ॥ जरा (म्हातारपण) वाघिणीप्रमाणें भीति दाखवीत पुढें उभी आहे! मृत्यु तर बरोबरच आला असून, वेळ भरते केव्हां, अशी वाट पाहत आहे! ॥ २९ ॥ ह्या शरीराला किडे, विष्ठा किंवा भस्म ह्यांपैकीं कांहींतरी नांव देणें योग्य आहे; - कारण, ह्याचा अंत ह्या तिहींपैकीं कोणत्या तरी एका प्रकारानें व्हावयाचाच (कुजत पडलें तर किडे, कोल्ह्याकुत्र्यांनीं खाल्लें तर विष्ठा, किंवा जळलें तर भस्म)! - अशी वास्तविक स्थिति असतां प्राणी त्यावर "मी" असा अभिमान ठेवितो व स्वतांला "मी राजा किंवा सर्व लोकांत प्रसिद्ध आहें" असें - अथवा अशाच प्रकारचें कांहीं

प्रतिक्षणं क्षरत्येतदायुरामघंटाम्बुवत् ॥ सपत्ना[४] इव रोगौघाः शरीरं प्रहरन्त्यहो[५]
॥ २८ ॥ जरा व्याघ्रीव पुरतस्तर्जयन्त्यवतिष्ठते[६,७] ॥ मृत्युः सहैव यात्येष समयं[८]
सम्प्रतीक्षते[९] ॥ २९॥ देहे ऽहंभावमापन्नो[११] राजा ऽहं लोकविश्रुतः ॥ इत्यस्मि-
न्मनुते[१२] जन्तुः कृमिविड्भस्मसंज्ञिते ॥ ३० ॥

एतत् आयुः(वा. पू.)क्षरति[२],॥रोगौघाः[३](उ.)-॥२८॥२९॥जन्तुः कृमिविड्भस्मसंज्ञिते[१०] अस्मिन्(मू.).॥३०॥

---

१ आम–घटाम्बुवत् कच्च्या घड्यांतील पाण्यासारखें. २ पाझरतें (नाहींसें होतें.) ३ रोगांचे समूह. ४ शत्रु. ५ प्रहरन्ति प्रहार करितात. ६ तर्जयन्ती भिववणारी. ७ उभी राहते. ८ वेळेप्रत. ९ वाट पहातो. १० किडे, विष्ठा, भस्म हीं नांवें ज्याला आहेत, अशा. ११ पावलेला. १२ मानतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तरी - मानितो ! ॥ ३० ॥ हा देह कातडी, हाडें, मांस, विष्ठा, मूत्र, रेत, रक्त इत्यादिकांनीं भरलेला आहे. ह्याला अनेक प्रकारांचे विकार व अवस्थांतरें भोगावीं लागतात. - आत्मा तर निर्विकार व परिणामहीन असें श्रुतींत ह्मटलें आहे. - तेव्हां ह्या शरीराला "आत्मा" असें, कसें बरें - ह्मणतां येईल, - सांग. लक्ष्मणा, तूं तरी ह्या देहावर अभिमान ठेवूनच लोकांना जाळूं इच्छित आहेस! ॥ ३१ ॥ अरे! देहावर अभिमान ठेवणाराच्या हातून अनेक दोष उत्पन्न होतात. देहावर "मी (आत्मा)" अशी बुद्धि ठेवणें ह्यालाच "अज्ञान" असें ह्मटलें आहे. ॥ ३२ ॥ "मी देह नव्हें तर ज्ञानस्वरूपी आहें" असें समजणें ह्याला

[1]त्वगस्थिमांसविण्मूत्ररेतोरक्तादिसंयुतः ॥ [2]विकारी [3]परिणामी च देह आत्मा कथं [4]वद ॥ [5]यमास्थाय भवांल्लोकं [6]दग्धुमिच्छति लक्ष्मण ॥ ३१ ॥ [7]देहाभिमानिनः सर्वे दोषाः [8]प्रादुर्भवन्ति हि ॥ देहो ऽहमिति या बुद्धिरविद्या सा [9]प्रकीर्तिता ॥ ॥ ३२ ॥ नाहं [10]देहश्चिदात्मेति बुद्धिर्विद्येति [11]भण्यते ॥ अविद्या संसृतेर्हेतुर्विद्या तस्या [12]निवर्तिका ॥ ३३ ॥

(दोन अर्धे मू.). ॥ लक्ष्मण, भवान् (मू.). ॥ ३१-३३ ॥

१ त्वचा (कातडी), अस्थि (हाडें), मांस, विष्ठा, मूत्र, रेत, रक्त इत्यादिकांनीं युक्त. २ धातुविकार ज्यांत आहेत, असा. ३ ज्याला बाल्य, तारुण्य वगैरे वेगवेगळ्या परिणाम पावणाऱ्या अवस्था आहेत, असा. ४ बोल. ५ राहून. ६ जाळण्यास. ७ शरीरावर अभिमान ठेवणारापासून. ८ उत्पन्न होतात. ९ ह्मटलेली. १० चैतन्य (ज्ञान) स्वरूपी. ११ ह्मटला जातो. १२ परतविणारी (दूर करणारी).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'क्रोध हाच प्रबळ शत्रु.'

"ज्ञान" असें ह्मणतात. अज्ञान संसाराला कारण होय; व ज्ञान संसाराची निवृत्ति करितें. ॥ ३३ ॥ ह्मणून मुमुक्षूंनीं ज्ञानाच्या अभ्यासाविषयीं नित्य यत्न करावा. लक्ष्मणा, तुला शत्रूंचा नाश करण्याची आवड आहे, - तर मी शत्रु कोणते तें दाखवून देतों; त्यांचा नाश कर. - अरे ! त्या मोक्षप्राप्तीच्या कार्याला काम क्रोध आदिकरून शत्रु आहेत. ॥ ३४ ॥ त्यांमध्येंही एकटा क्रोधच मोक्षप्राप्तीला विघ्न करण्यास सर्व काळ समर्थ होय. मनुष्याला एकदां क्रोधाचा आवेश आला ह्मणजे तो बापाला, भावांना, हितकर्त्यांना, मित्रांना - एकंदरींत पाहिजे त्याला - मारण्यास प्रवृत्त होतो. ॥३५॥ मनाला ताप होण्यास कारण क्रोध होय. क्रोधामुळेंच संसारांत बंधन प्राप्त होतें. क्रोधच धर्माचा क्षय करितो. ह्मणून लक्ष्मणा, क्रोध अगदीं सोडून दे. ॥ ३६ ॥ क्रोध हा एक प्रबल शत्रु होय. तृष्णा (भोगेच्छा) ही वैतरणी (यमनगराजवळ असणारी पू,

तस्माद्यत्नः सदा कार्यो विद्याभ्यासे मुमुक्षुभिः ॥ कामक्रोधादयस्तत्र शत्रवः शत्रुसूदन ॥ ३४ ॥ तत्रापि क्रोध एवालं मोक्षविघ्नाय सर्वदा ॥ येनाविष्टः[1] पुमान्हन्ति[2] पितृभ्रातृसुहृत्सखीन् ॥ ३५ ॥ क्रोधमूलो मनस्तापः क्रोधः संसारबन्धनम् ॥ धर्मक्षयकरः क्रोधस्तस्मात्क्रोधं परित्यज[3] ॥ ३६ ॥ क्रोध एष महान् शत्रुस्तृष्णा वैतरणी नदी ॥ सन्तोषो नन्दनवनं शान्तिरेव हि कामधुक्[4] ॥ ३७ ॥ ॥ ३३ ॥

(वा. पू.) मुमुक्षुभिः विद्याभ्यासे यत्नः कार्यः ॥ तत्र (उ.).॥ ३४ ॥तत्र अपि (मू.) हन्ति, [सः] क्रोधः एव मोक्षविघ्नाय सर्वदा अलं. ॥ ३५ ॥ (मू.). ॥ ३६ ॥ ३७ ॥

१ आविष्टः व्याप्त. २ मारतो. ३ सोड. ४ कामधेनु.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रक्त, केंस ह्यांनीं भरलेली घाणेरडी) नदी आहे. संतोष हें नंदनवन, व शांति ही कामधेनु होय. ॥ ३७ ॥ ह्मणून, लक्ष्मणा, तूं आतां क्षमेचा अंगिकार कर (येईल तो प्रसंग निमूटपणें सोशीत जा). असें केलेंस ह्मणजे तुला शत्रु उत्पन्न होणार नाहीं. ॥ ३८ ॥ आत्मा देह, इंद्रियें, मन, प्राण, बुद्धि इत्यादिकांहून वेगळा असून शुद्ध व स्वयंप्रकाश आहे; त्याला कोणताही विकार किंवा आकार नाहीं. जोंपर्यंत प्राण्यांना "आत्मा देह, इंद्रियें आणि प्राण ह्यांहून वेगळा आहे" असें ज्ञान नसतें, ॥ ३९ ॥ तोंपर्यंत त्यांना संसारांतील दुःखांच्या प्रवाहांपासून पीडा भोगाव्या लागतात. मृत्यूची तर अवधि हीच (हें ज्ञान झाल्यावर मग प्राण्यांना मृत्यू नाहींच). ह्मणून, तूं नित्य हृदयामध्यें "आत्मा शरीरादिकांहून वेगळा आहे" अशी भावना ठेव. ॥ ४० ॥ "मी बुद्ध्यादिकांहून भिन्न आहें" असें जाणून, बाहेर लोकव्यवहाराला अनुरूप अशी वागणूक

तस्मात्क्षान्तिं भजस्वाद्य शत्रुरेवं भवेन्न ते ॥ ३८ ॥ देहेन्द्रियमनःप्राणबुद्ध्यादिभ्यो विलक्षणः ॥ आत्मा शुद्धः स्वयंज्योतिरविकारी निराकृतिः ॥ यावद्देहेन्द्रियप्राणैर्भिन्नत्वं नात्मनो विदुः ॥ ३९ ॥ तावत्संसारदुःखौघैः पीड्यन्ते मृत्युसंयुताः ॥ तस्मात्त्वं सर्वदा भिन्नमात्मानं हृदि भावय ॥ ४० ॥ बुद्ध्यादिभ्यो बहिः सर्वमनुवर्तस्व मा खिदः ॥ भुञ्जन्प्रारब्धमखिलं सुखं वा दुःखमेव वा ॥ ४१ ॥

(बा. मू.) शत्रुः न भवेत्. ॥ ३८ ॥ (बा. मू.) भिन्नत्वं न विदुः, ॥ ३९ ॥ (बा. पू.) पीड्यन्ते. ॥ (उ.). ॥ ४० ॥ (बा. मू.) प्रारब्धं भुञ्जन, ॥ ४१ ॥

१ सहनशीळपणाला. २ पीडिले जातात. ३ नको. ४ खेद करूं. ५ भोगणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लक्षांत ठेव. ण्याची गोष्ट.

खुशाल ठेव. खेद अगदीं करूं नकोस. सुख किंवा दुःख जें कांहीं प्राप्त होईल तें प्रारब्धावर दृष्टि ठेवून भोगीत जा. ॥ ४१ ॥ - अशी वर्तणूक ठेवलीस म्हणजे - तूं संसारप्रवाहांत पडल्यामुळें, पाहिजे तो व्यवहार केलास तरी लिप्त होणार नाहींस. रघुकुलोद्भवा, बाह्यात्कारीं तूं सर्व कार्यांत कर्तृत्व मिरविलेंस, तथापि॥४२॥ अंतरीं जर तुझा स्वभाव शुद्ध आहे तर कर्मांपासून तुला लेप अगदीं होणार नाहीं. हा माझा सर्व उपदेश तूं नित्य हृदयांत वागव, ॥ ४३ ॥ ह्मणजे तुला संसारांतील कोणत्याही दुःखापासून कधींही बाधा होणार नाहीं. माते, तूंही मी सांगितलेली गोष्ट नित्य ध्यानांत ठेव. ॥ ४४ ॥ माझ्या परत येण्याची वाट पाहत राहा. तुला फार दिवस दुःख सोसावें लागणार नाहीं. ॥

प्रवाहपतितः[1] कार्यं कुर्वन्[2]नपि न लिप्यसे[3] ॥ बाह्ये सर्वत्र कर्तृत्वमावहन्[4]नपि राघव ॥ ॥ ४२ ॥ अन्तःशुद्धस्वभाव[5]स्त्वं लिप्यसे न च कर्मभिः ॥ एतन्मयोदितं कृत्स्नं[6] हृदि भावय सर्वदा ॥ ४३ ॥ संसारदुःखैरखिलैर्बाध्यसे न कदाचन ॥ त्वमप्येवं मया ऽऽदिष्टं[7] हृदि भावय नित्यदा ॥ ४४ ॥ समागमं प्रतीक्षस्व न दुःखैः पीड्यसे चिरम्[8] ॥

(मू.) ॥४२॥ (बा. पू.) नच लिप्स्यसे. ॥ (बा. उ.) भावय. ॥४३॥ अखिलैः (बा. पू.) न बाध्यसे. ॥ अम्ब, (बा. उ.) भावय. ॥ ४४ ॥ (पू. मू.) ॥

१ ओघांत पडलेला. २ करणारा. ३ लिप्त होतोस. ४ वाहण[illegible]. ५ शुद्ध अंतःकरण ज्याचें, असा. ६ सर्व. ७ सांगितल्या गोष्टीला. ८ फार वेळ.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नद्यांच्या प्रवाहांत अनेक नौका पडलेल्या असतात त्यांचें नित्य एकत्र राहणें - कधीं तरी घडतें काय ? - नाहीं. त्याप्रमाणेंच संसारमार्गांत वागणाऱ्या प्राण्यांचा नित्य एके ठिकाणीं समागम कधींच राहत नाहीं. चवदा वर्षें हीं संख्या - मोठी दिसली, तरी तो काळ - अर्ध्या क्षणाप्रमाणें निघून जाईल. ॥ ४५ ॥ ४६ ॥ आई, आतां दुःख दूर फेकून देऊन - आनंदानें मला जाण्यास - अनुमोदन दे. असें केलेंस ह्मणजे, वनामध्यें माझा काळ सुखानें जाईल.' ॥ ४७ ॥ राम असें बोलून पुष्कळ वेळ पर्यंत मातेच्या पायांवर लोटांगण घालून राहिला. कौसल्येनें त्याला उठवून मांडीवर बसविलें व अनेक आशीर्वाद देऊन त्याचें गौरव केलें. ॥ ४८॥

न सदैकत्र संवासः कर्ममार्गानुवर्तिनाम् ॥ ४५ ॥ यथा प्रवाहपतितप्लवानां सरितां तथा ॥ चतुर्दश समाः संख्या क्षणार्धमिव जायते ॥ ४६ ॥ अनुमन्यस्व मामम्ब दुःखं सन्त्यज्य दूरतः ॥ एवंचेत्सुखसंवासो भविष्यति वने मम ॥ ४७ ॥ इत्युक्त्वा दण्डवन्मातुः पादयोरपतच्चिरम् ॥ उत्थाप्यांके समावेश्य आशीर्भिरभिनन्दयत् ॥ ४८ ॥

कर्ममार्गानुवर्तिनां सदा एकत्र संवासः न. ॥ ४५ ॥ यथा सरितां (मू.). ॥ ४६ ॥ अम्ब, दुःखं दूरतः सन्त्यज्य, मां अनुमन्यस्व. एवं चेत्, मम वने (मू.).' ॥ ४७ ॥ ४८ ॥

१ कर्ममार्गांत (संसारांत) वागणारांचा. २ राहणें. ३ नद्यांच्या. ४ प्रवाहांत पडलेल्या नौकांचा. ५ आई. ६ सोडून. ७ अनुमोदन दे. ८ अपतत् पडला. ९ बसवून. १० आशीर्वादांनीं. ११ गौरविती झाली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो.
समू.सान्व.
साटिप्पण.
॥ ३९॥

अयो.कां.
सर्ग ४
लक्ष्मण 'मी येतों' ह्मणाला.

'गंधर्वांसह ब्रह्मा, विष्णु, शंकर आदिकरून सर्व देव, तूं चालत असशील, उभा असशील किंवा निद्रित असशील, तेव्हां तुझें नित्य रक्षण करोत.' ॥ ४९ ॥ असें ह्मणून व पुन्हां पुन्हां आलिंगन करून कौसल्येनें रामाला निरोप दिला. - मागें सांगितलेला उपदेश ऐकिल्यावर - लक्ष्मणाच्या नेत्रांतून आनंदाश्रु आले; त्याचा कंठ भरून आला; अशा स्थितींतच तो रामाला नमस्कार करून ॥ ५० ॥ ह्मणाला:–'रामा, माझ्या अंतःकरणांत असलेला हा संशय तूं दूर केलास. रामचंद्रा, मी सेवा करण्यासाठीं तुझ्या पाठीमागून (बरोबर) येतों. मला आज्ञा दे. ॥ ५१ ॥ रामा, एवढा मजवर अनुग्रह कर. नाहीं तर मी प्राणत्याग क-

सर्वे देवाः सगन्धर्वा ब्रह्मविष्णुशिवादयः ॥ रक्षन्तु त्वां सदा यान्तं[1] तिष्ठन्तं[2] निद्रया युतम् ॥ ४९ ॥ इति प्रस्थापयामास समालिंग्य पुनःपुनः ॥ लक्ष्मणो ऽपि तदा रामं नत्वा हर्षाश्रुगद्गदः ॥ ५० ॥ आह राम ममान्तस्थैः[5] संशयो ऽयं त्वया हृतः[6]॥यास्यामि पृष्ठतो राम सेवां कर्तुं तदादिश॥५१॥अनुगृह्णीष्व[9] मां राम नो चेत्प्राणांस्त्यजाम्यहम्॥तथेति राघवो ऽप्याह लक्ष्मणं याहि मा चिरम्॥५२॥

'(बा. मू.) त्वां र[3]क्षन्तु.'॥ ४९ ॥ इति पुनः पुनः समालिंग्य, [4]प्रस्थापयामास. (मू.) ॥ ५० ॥ (बा. मू.) [7]यास्यामि, तत् आ[8]दिश. ॥ ५१ ॥ राम, मां (बा. पू.), अहं प्राणान् [10]त्यजामि. राघवः अपि लक्ष्मणं ' तथा [11]याहि, मा चिरं ' इति आह. ॥ ५२ ॥

१ जाणाऱ्या. २ उभा असलेल्या. ३ राखोत ४ पाठविती झाली. ५ मनांत असलेला. ६ दूर केला. ७ जाईन (येईन). ८ आज्ञा दे. ९ कृपा कर. १० सोडतों. ११ जा (ये).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रीन. रामचंद्रही 'बरें तर. चल लवकर. वेळ लावूं नको.' असें ह्मणाला. ॥ ९२ ॥ पुढें तो सीतापति समर्थ ईश्वर तेथून निघाला व सीतेचें समाधान करण्यासाठीं तिच्या मंदिरीं गेला. - सीतेचा स्वभाव आनंदी असल्यामुळें तिचें मुख - नित्य हास्ययुक्त असे; तिचें भाषणही मधुर होतें. पति आला, असें पाहिल्याबरोबर ॥९३॥ तिनें सुवर्णपात्रांत असलेलें उदक घेऊन भक्तिपूर्वक त्याचे पाय धुतले. व पतीकडे पाहून त्याला विचारिलें:—'देवा, आज आपण बरोबर सैन्य असल्याशिवाय कसे ॥९४॥ आलां ! गेलां होतां कोणीकडे? आपलें शुभ्र छत्र कोठें आहे ? वाद्यें वाजत नाहींत ! मुगुट वगैरे राजचिन्हें आपल्या आंगावर दिसत नाहींत ! ॥९५॥ - ह्मटलें ह्मणजे - आज आपण मांडलिक राजांसहवर्तमान मोठ्या थाटानें यावयाचे. पण तसें आलां नाहीं, ह्याचें कारण काय ?' सीतेनें असे प्रश्न केले असतां राम हांसत हांसत तिला ह्मणाला :— ॥ ९६ ॥

प्रतस्थे तां समाधातुं गतः सीतापतिर्विभुः ॥ आगतं पतिमालोक्य सीता सुस्मितभाषिणी॥५३॥स्वर्णपात्रस्थसलिलैः पादौ प्रक्षाल्य भक्तितः ॥ पप्रच्छ पतिमालोक्य देव किं सेनया विना ॥५४॥ आगतो ऽसि गतः कुत्र श्वेतच्छत्रं च ते कुतः॥ वादित्राणि न वाद्यन्ते किरीटादिविवर्जितः ॥ ५५ ॥ सामन्तराजसहितः संभ्रमान्नागतो ऽसि किम् ॥ इति स्म सीतया पृष्टो रामः सस्मितमब्रवीत् ॥ ५६ ॥

सीतापतिः विभुः (मू.) सीता ॥ ९३ ॥ (पू.) प्रक्षाल्य, ॥ पतिं आलोक्य, पप्रच्छ — 'देव, सेनया विना किं ॥ ९४ ॥ (वा. पू.) ते श्वेतच्छत्रं च कुतः ! ॥ (उ.) ॥९५॥ (पू.).' (उ.)— ॥ ९६ ॥

१ निघाला. २ समाधान करण्यासाठीं. ३ सुवर्णाच्या पात्रांत असलेल्या उदकांनीं. ४ पाहून. ५ विचारूं लागली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'सुंदरि, आज राजानें मला दंडकारण्यांतील सर्व राज्य दिलें आहे ! म्हणून, सीते, त्याचें पालन करण्यासाठीं मी लवकरच जाणार आहें. ॥५७॥ मी आजच वनांत जाणार. तूं आपल्या सासूबाईजवळ राहून माझ्या मातेची (त्यांची) सेवा करीत जा. - तुला माहीत आहेच कीं, - आह्मीं कधीं खोटें बोलत नसतों. ' ॥ ५८ ॥ रामाच्या मुखांतून असे शब्द निघाल्याबरोबर सीतेला फार भीति वाटली. व ती रामाला ह्मणालीः– 'काय ? उदार अंतःकरणाच्या आपल्या पित्यानें आपल्याला वनाचें राज्य दिलें ! आणि तें कां म्हणून ? ' ॥ ५९ ॥ राम तिला ह्मणाला :– 'साध्वि सीते, महाराजांनीं संतुष्ट होऊन कैकेयीला वर दिले. त्यांत त्यांनीं भरताला राज्य व मला वनवास दिला आहे. ॥ ६० ॥

राज्ञा मे दण्डकारण्ये राज्यं दत्तं शुभे ऽखिलम् ॥ अतस्तत्पालनार्थाय शीघ्रं यास्यामि भामिनि ॥५७॥अद्यैव यास्यामि वनं त्वं तु श्वश्रूसमीपगा ॥ शुश्रूषां कुरु मे मातुर्न मिथ्यावादिनो वयम् ॥ ५८ ॥ इति ब्रुवन्तं श्रीरामं सीता भीता ऽब्रवीद्वचः ॥ किमर्थं वनराज्यं ते पित्रा दत्तं महात्मना ॥ ५९ ॥ तामाह रामः कैकेय्यै राजा प्रीतो वरं ददौ ॥ भरताय ददौ राज्यं वनवासं ममानघे ॥ ६० ॥

' शुभे भामिनि, राज्ञा मे अखिलं (बा. मू.). ॥५७॥ वनं (बा. पू.) ॥ मे मातुः (बा. उ.). वयं[3] मिथ्यावादिनः[4] न.' ॥५८॥ भीता सीता (बा. पू.) अब्रवीत्–॥'महात्मना पित्रा (बा. उ.)?' ॥ ५९ ॥ रामः तां आह– ' अनघे, प्रीतः राजा (मू.) ददौ. ॥ ६० ॥

१ सासूच्या जवळ असणारी. २ सेवेला. ३ आह्मी. ४ खोटें बोलणारे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कारण, कैकेयीदेवीनें त्या वरांपैकीं एकानें, मीं (रामानें) चवदा वर्षे वनांत राहावें, असें मागून घेतलें आहे. दयाळू महाराजांचा प्रतिज्ञा सत्य करण्याबद्दल निर्धार असल्यामुळें, त्यांनीं तें मागणें मान्य केलें. ॥ ६१ ॥ ह्मणून, सीते, मी आतां लवकरच जाणार. तूं त्यामध्यें विघ्न आणूं नकोस. ' हें रामाचें भाषण ऐकिल्यावर जानकी प्रीतियुक्त अंतःकरणानें ॥ ६२ ॥ त्याला ह्मणाली :–' रघुवीरा, मी आपल्यापुढें आगोदर वनांत जाणार, आपण पाठीमागून चलावें. मला घेतल्यावांचून जाणें आपल्याला योग्य नाहीं. ' ॥६३॥ मधुर भाषण करणाऱ्या प्रिय पत्नीचें -हें भाषण ऐकिल्यावर - रामाला संतोष वाटला व तो तिला ह्मणालाः– ' सीते ! मी तुला अनेक वाघांनीं व क्रूर पशूंनीं भरलेल्या अरण्यांत घेऊन जाऊं कसा ? ॥ ६४ ॥

चतुर्दश समास्तत्र वासो मे किल याचितः[1] ॥ तदा देव्या ददौ राजा सत्यवादी दयापरः ॥ ६१ ॥ अतः शीघ्रं गमिष्यामि मा विघ्नं कुरु भामिनि ॥ श्रुत्वा तद्रामवचनं जानकी प्रीतिसंयुता ॥ ६२ ॥ अहमग्रे गमिष्यामि[2] वनं पश्चात्त्वमेष्यसि[3] ॥ इत्याह मां विना गन्तुं तव राघव नोचितम्[4] ॥ ६३ ॥ तामाह राघवः प्रीतः स्वप्रियां प्रियवादिनीम् ॥ कथं वनं त्वां नेष्ये ऽहं बहुव्याघ्रमृगाकुलम्[5]॥६४॥

तया देव्या मे तत्र (मू.) राजा ददौ. ॥ ६१ ॥ (पू.).' ॥ (बा. उ.) तत् रामवचनं श्रुत्वा, ॥६२॥ 'राघव, (बा. मू.)' इति आह. ॥६३॥ (बा. पू.) तां आह –॥'अहं (बा. उ.) वनं कथं नेष्ये[6] ? ॥६४॥

१ मागितलेला. २ जाईन. ३ येशील. ४ उचितम् योग्य. ५ पुष्कळ वाघ व पशु ह्यांनीं भरलेल्या. ६ नेईन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेथें माणसें खाणारे अक्राळविक्राळ स्वरूपांचे राक्षस आहेत! सिंह, वाघ, डुकरें इकडे तिकडे फिरत असतात! ॥ ६५ ॥ सुंदरि, तेथें भोजनासाठीं - पदार्थ ह्मटले ह्मणजे - कडू आंबट अशीं फळें व मुळें होत, अपूप (पुऱ्या), निरनिराळ्या भाज्या किंवा तोंडींलावणीं कोठेंही मिळायाचीं नाहींत ! ॥ ६६ ॥ सीते, तीं फळें देखील योग्य काळीं क्वचित स्थलींच मिळतात, - नेहमीं सर्वत्र मिळतातच असा नियम नाहीं. - खडे, कांटे ह्यांनीं आच्छादून गेल्यामुळें कोठेंकोठें मार्गदेखील दिसत नाहीं ! ॥ ६७ ॥ - आतां त्या ठिकाणीं राहण्याला योग्य अशीं - गुहा, दऱ्या वगैरे किल्ल्यांसारखीं स्थलें असल्यामुळें शत्रूंना येतां येणार नाहीं - किंवा त्यांपासून पीडा सोसावी लागणार नाहीं; तथापि - तेथें रानमाशा, डांस इत्यादि जंतु फार आहेत ! एकंदरींत त्या दंडकारण्या-

राक्षसा घोररूपाश्च सन्ति मानुष[1]भोजिनः ॥ सिंहव्याघ्रवराहाश्च संचरन्ति समं[2]ततः
॥ ६५ ॥ कट्वम्लफलमूलानि भोजनार्थं सुमध्यमे ॥ [4]अपूपानि [5]व्यञ्जनानि वि-
द्यन्ते न कदाचन ॥ ६६ ॥ कालेकाले फलं वा ऽपि विद्यते कुत्र सुन्दरि ॥
मार्गो न दृश्यते क्वापि शर्कराकण्टका[7]न्वितः ॥ ६७ ॥ गुहागर्[8]ह्वरसंबाधं झिल्ली-
दं[9]शादिभिर्युतम् ॥ एवं बहुविधंदोषं वनं दण्डकसंज्ञितम् ॥ ६८ ॥

(बा. पू.) सन्ति ॥ (बा. उ.) सं[3]चरन्ति ! ॥ ६५ ॥ भोजनार्थं (बा. मू.) न विद्य[6]न्ते ! ॥ ६६ ॥ सुन्दरि, कुत्र (बा. मू.) न दृश्यते ! ॥ ६७ ॥ (मू. प्र.) ! ६८ ॥

१ माणसें खाणारें. २ चोहोंकडे. ३ फिरतात. ४ पुऱ्या. ५ भाज्या. ६ आहेत. ७ खड्यांनीं व कांट्यांनीं युक्त. ८ दऱ्या, गुहा ह्यांनीं भरलेलें. ९ झिल्ली (रानमाशा), डांस इत्यादींनीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मध्यें अनेक प्रकारांचे दोष (त्रास) आहेत. ॥ ६८ ॥ पायांनीं चालत गेलें षाहिजे. तेथें थंडी, वारा, ऊन्ह इत्यादि प्रकार आहेत. त्या अरण्यांतील राक्षस वगैरे पाहिलेस ह्मणजे एखादे वेळीं फटकन तूं प्राण सोडशील ! ॥ ६९ ॥ ह्मणून, सुंदरि, तूं घरीं रहा. माझी तुला पुन्हां लवकरच भेट होईल. ' हें रामाचें भाषण ऐकिल्यावर सीतेला वाईट वाटलें. ॥ ७० ॥ थोडासा क्रोध आल्यामुळें तिचे ओंठ फुरफुरूं लागले. अशा स्थितींत ती रामाला म्हणाली :– 'रामचंद्रा, मी तुझी पतिव्रता धर्मपत्नी; असें असतांना, मला सोडण्याबद्दल तुला इच्छा होते कशी ? ॥ ७१ ॥ तूं धर्म जाणणारा असून दयाळू आहेस. माझ्याकडून कांहीं दोष घडलेला नाहीं. तुझ्याशिवाय दुसरा मला कोणाचा आधार नाहीं. रामा, - असतना तेथें राक्षस. - मी तुझ्या-

पादचा[२]रेण गन्तव्यं शीतवातातपादिमत् ॥ राक्षसादीन्वने दृष्ट्वा[४] जीवितं हास्य[३]से

ऽचिरात् ॥ ६९ ॥ तस्माद्भद्रे गृहे तिष्ठ[४] शीघ्रं द्रक्ष्यसि मां पुनः ॥ रामस्य वचनं

श्रुत्वा सीता दुःखसमन्विता ॥ ७० ॥ प्रत्युवाच स्फुरद्वक्त्रा किंचित्कोपसमन्वि-

ता ॥ कथं मामिच्छसे त्यक्तुं धर्मपत्नीं पतिव्रताम् ॥ ७१ ॥ त्वदनन्या[६]मदोषां

मां धर्मज्ञो ऽसि दयापरः ॥ त्वत्समीपे स्थितां राम को वा मां धर्षयेद्वने॥७२॥

शीतवातातपादिमत[तत्](मू.)हास्यसे ! ॥६९॥ (बा. पू.)द्रक्ष्यसि.'॥सीता(बा. उ.)॥७०॥(बा. पू.)प्रत्युवाच–॥(उ.)त्यक्तुं कथं इच्छसे?॥७१॥राम, धर्मज्ञः दयापरः असि.(बा. मू.)मां कः वा धर्षयेत् ? ॥७२॥

---

१ थंडी, वारा, ऊन्ह, इत्यादिकांनीं युक्त. २ पायीं चालत. ३ सोडशील. ४ राहा. ५ पाहशील. ६ तुजहून वेगळा आधार नाहीं जिला, अशा. ७ निर्दोष (निरपराधी). ८ भीति दाखवील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

' मी बरोबर येतें. '

जवळ असल्यें म्हणजे मला अरण्यामध्यें कोणबरें भीति दाखवील ? ॥ ७२ ॥ फळें, मुळें वगैरे जें जें कांहीं तूं भक्षण केल्यावर अवशिष्ट राहील, तेंच मला अमृततुल्य वाटेल. मी तेवढ्यानें संतुष्ट राहून सुखानें कालक्रमणा करीन. ॥ ७३ ॥ तुझ्याबरोबर फिरत असल्यें ह्मणजे मला दर्भ, कौंश व कांटेदेखील पुष्पशय्येप्रमाणें वाटतील, ह्यांत संशय नाहीं. ॥ ७४ ॥ मी तुला क्लेश अगदीं देणार नाहीं. उलट तुझें कार्य साधण्यास (रावणाचा व इतर राक्षसांचा वध करण्याच्या कामीं, असा सीतेचा गूढ अभिप्राय) तयार असेन. लहानपणीं मला पाहून एक विद्वान् ज्योतिषी ॥ ७९ ॥ ह्मणाला आहे कीं, तुला पतीसह अरण्यवास काढावा लागेल. रामा, त्या ब्राह्मणाचें वचन सत्य होऊं द्यावें. मी तुझ्याबरोबर येईन. ॥ ७६ ॥

फलमूलादिकं यद्यत्तव भुक्तावशेषितम्[1] ॥ तदेवामृततुल्यं मे तेन तुष्टा रमाम्यहम्[2] ॥ ७३ ॥ त्वया सह चरन्त्या मे कुशाः[3] कौशाश्च[4] कण्टकाः ॥ पुष्पास्तरणतुल्या[5] मे भविष्यान्ति न संशयः ॥७४॥ अहं त्वां क्लेशये[6] नैव भवेयं कार्यसाधिनी[7] ॥ बाल्ये मां वीक्ष्य कश्चिद्धि ज्योतिःशास्त्रविशारदः ॥ ७५ ॥ प्राह ते विपिने वासः पत्या[9] सह भविष्यति ॥ सत्यवादी द्विजो भूयाद्गमिष्यामि[10] त्वया सह ॥७६॥

यत् यत् (बा. मू.) रमामि. ॥ ७२ ॥ (मू.). ॥ ७४ ॥ (बा. पू.) भवेयं[8]. ॥ (बा. उ.) मां वीक्ष्य, ॥ ७९ ॥ (बा. मू.) गमिष्यामि. ॥ ७६ ॥

१ खाऊन उरलेलें. २ आनंदानें असेन. ३ दर्भ. ४ दर्भाचाच एक प्रकार. ५ पुष्पशय्येसारखे. ६ दुःख देईन. ७ कार्य साधण्याला उपयोगी. ८ होईन. ९ पतीशीं. १० जाईन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रभो, आणखी एक थोडीशी गोष्ट मी तुला सांगत्यें. ती ऐकिलीस ह्मणजे, मला अरण्यांत न्यावें, - असें तुझ्या मनांत येईलच. पहा :– रामा, तूं - पुष्कळ ब्राह्मणांकडून अनेक रामायणें ऐकिलीं आहेस; ॥ ७७ ॥ पण त्यांत कोठेंतरी, राम सीतेशिवाय वनांत गेला, असें आहे काय, सांग. म्हणून मी तुला सर्वप्रकारें साह्य करण्यासाठीं तुजबरोबर वनांत येईन. ॥ ७८ ॥ मला टाकून जात असशील तर मी तुजपुढें प्राण देईन!' रामानें सीतेचा तो निश्चय जाणला ॥ ७९ ॥ व ह्मटलें :– ' सीते, बरें तर मजबरोबर अरण्यांत जाण्यासाठीं लवकर - सिद्ध हो. - तुझे हार व अलंकार अरुंधतीला शीघ्र अर्पण कर. ॥ ८० ॥

अन्यत्किंचित्प्रवक्ष्यामि श्रुत्वा मां नय काननम्[1] ॥ रामायणानि बहुशः श्रुतानि बहुभिर्द्विजैः ॥ ७७ ॥ सीतां विना वनं रामो गतः किं कुत्रचिद्वद ॥ अतस्त्वया गमिष्यामि सर्वथा त्वत्सहायिनी ॥ ७८ ॥ यदि गच्छसि मां त्यक्त्वा प्राणांस्त्यक्ष्यामि ते ऽग्रतः ॥ इति तं निश्चयं ज्ञात्वा[2] सीताया रघुनन्दनः ॥ ७९ ॥ अब्रवीद्देवि गच्छ त्वं वनं शीघ्रं मया सह॥अरुन्धत्यै प्रयच्छाशु हारानाभरणानि च॥८०॥

(बा. पू.) नय. ॥ बहुभिः द्विजैः (बा. उ.) ॥७७॥रामः कुत्रचित् (बा. मू.) त्वया [सह] गमिष्यामि. ॥७८॥ मां सक्त्वा, (बा. पू.) त्यक्ष्यामि. ॥ रघुनन्दनः सीतायाः (बा. उ.), ॥७९॥ (बा. पू.) गच्छ[3]. ॥ (बा. उ.) प्रयच्छ[4]. ॥ ८० ॥

१ वनाला. २ जाणून. ३ जा. ४ दे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जातांना दान-धर्म.

आपण ब्राह्मणांना सर्व द्रव्याचें दान करून अरण्यांत जाऊं.' रामचंद्रानें असें भाषण करून तत्काल लक्ष्मणाकरवीं भक्तिपुरस्सर ब्राह्मणांना बोलावून आणिलें. ॥ ८१ ॥ ते ब्राह्मण कुटुंबवत्सल, विद्वान व सुशील होते. पुढें त्या रघुकुलवरानें त्यांना गाईंचे शंभर कळप, विपुल द्रव्य, दिव्य वस्त्रें व अलंकार इतक्यांचें आनंदानें दान केलें. ॥८२॥ सीतेनें अरुंधतीला आपले उत्तमउत्तम अलंकार दिले. रामानें आपल्या मातेच्या सेवकांना स्वतांच्या अंतःपुरांत राहणाऱ्या दासांना, नगरांतील व देशांतील लोकांना तसेंच सहस्रावधि ब्राह्मणांना - देणग्या, वेतनें, दक्षिणा इत्यादि - अनेक प्रकारांनीं विपुल द्रव्य दिलें. ॥ ८३ ॥ ८४ ॥

ब्राह्मणेभ्यो धनं सर्वं दत्वा गच्छामहे वनम् ॥ इत्युक्त्वा लक्ष्मणेनाशु द्विजानाहूय भक्तितः ॥ ८१ ॥ ददौ गवां [4]वृन्दशतं धनानि वस्त्राणि दिव्यानि विभूषणानि ॥ कुटुम्बवद्भ्यः श्रुत[5]शीलवद्भ्यो मुदा द्विजेभ्यो रघुवंशकेतुः ॥ ८२ ॥ अरुन्धत्यै ददौ सीता मुख्यान्याभरणानि च ॥ रामो मातुः सेवकेभ्यो ददौ धनमनेकधा ॥ ८३ ॥ स्वकान्तः[6]पुरवासिभ्यः सेवकेभ्यस्तथैव च ॥ पौरजानपदेभ्यश्च ब्राह्मणेभ्यः सहस्रशः ॥ ८४ ॥

(बा. पू.) [1]गच्छामहे. ॥ (बा. उ.) [2]आहूय, ॥ ८१ ॥ [3]रघुवंशकेतुः (बा. मू.) मुदा ददौ. ॥८२॥ सीता (बा. पू.) ददौ. ॥ (बा. उ.) ददौ. ॥ ८३ ॥ (मू. प्र.) ॥ ८४ ॥

---

१ जातों (आपण जाऊं). २ बोलावून. ३ रघुकुलाचा झेंडा. ४ शेंकडों कळप. ५ विद्वान व सुस्वभावाचे, अशा. ६ आपल्या अंतःपुरांत राहणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लक्ष्मणानेंही आपल्या मातेला ह्मणजे सुमित्रेला कौसल्येच्या स्वाधीन केलें; व तो हातांत धनुष्य घेऊन रामाच्या पुढें येऊन उभा राहिला. ॥ ८५ ॥ नंतर राम, सीता व लक्ष्मण अशीं सर्वजणें राजवाड्यांत जायाला निघालीं. ॥ ८६ ॥ श्रीरामचंद्र सीतेला व धाकट्या भावाला बरोबर घेऊन राजमार्गानें हळूहळू चालला होता; त्यावेळीं नागरिक जन व - अभिषेकोत्सवासाठीं आलेले - देशांतील सर्व लोक कौतुकानें त्याच्याकडे पाहत होते. रामही त्यांच्याकडे आनंदमुद्रेनें पाहत होता. त्याचें शरीर श्यामवर्ण असून सहस्र मदनांप्रमाणें सुंदर होतें. त्याच्या कांतीनें सर्व दिशा सुशोभित दिसत होत्या. तो परमात्मा आपल्या चरणांच्या न्यासानें सर्व जगाला पवित्र करीत - अशा रीतीनें - पित्याच्या मंदिरीं प्राप्त झाला. ॥ ८७ ॥ इति चतुर्थः सर्गः ॥ ४ ॥

लक्ष्मणोऽपि सुमित्रां तु कौसल्यायै [1]समार्पयत् ॥ धनुष्पाणिः समागत्य रामस्याग्रे [2]व्यवस्थितः॥८५॥रामः सीता लक्ष्मणश्च जग्मुः सर्वे [3]नृपालयम् ॥ ८६ ॥
श्रीरामः सह सीतया [5]नृपपथे गच्छ[6]न् शनैः [7]सानुजः पौरान् जानपदान्[8]कुतूहलदृशः सानन्दमु[9]द्वीक्षयन्॥श्यामः [10]कामसहस्रसुन्दरवपुः [11]कान्त्या दिशो[12] [13]भासयन्पादन्[14]यासपवित्रिताऽखिलजगत्प्रापालयं तत्पितुः॥ ८७ ॥ इति चतुर्थः सर्गः ॥ ४ ॥

(मू.) ॥ ८५ ॥ (बा. मू.) [4]जग्मुः.॥८६॥(बा. मू.) तत्र पितु[15]ः [16]आलयं [17]प्राप.॥८७॥इति चतुर्थः सर्गः॥४॥

---

१ स्वाधीन करिता झाला. २ उभा राहिलेला. ३ राजाच्या मंदिरास. ४ गेले. ५ राजमार्गांत. ६ चालणारा. ७ धाकट्या भावासह. ८ कौतुक दृष्टींना वाटतें ज्यांच्या, अशा. ९ पाहणारा. १० सहस्र मदनांप्रमाणें सुंदर शरीर ज्याचें, असा. ११ तेजानें. १२ दिशांना. १३ प्रकाशविणारा. १४ पावलांच्या ठेवण्यानें पवित्र केलें सर्व जग ज्यानें, असा. १५ पित्याच्या. १६ मंदिरास. १७ पावला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शंकर ह्मणाले :- पार्वति, कैकेयीच्या वरप्रदानाचावगैरे वृत्तांत ऐकून नागरिक जनांना फार दुःख वाटलें होतें. आतां सीता आणि लक्ष्मण यांसह राम मार्गांतून चाललेला त्यांच्या दृष्टीस पडला; तेव्हां ते सर्वजण परस्परांत बोलूं लागले :-- ' अहो! हा आपल्यावर मोठाच दुःखाचा प्रसंग गुदरत आहे ! रामचंद्राचा आपलें वचन सत्य करण्याविषयीं - निश्चय असणें योग्यच होय; पण - दशरथानें विषयलंपट होऊन केवळ बायकोच्या ह्मणण्यासाठीं आपल्या त्या प्रिय पुत्राला सोडून दिलें (वनांत जायाला सांगितलें), - हें काय ! - ह्यावरून त्याला "सत्यप्रतिज्ञ" असें कसें ह्मणतां येईल ? कैकेयी तरी इतकी दुष्ट झाली कशी ? राम सत्यवचनी असून तिचें प्रिय करण्यांत तत्पर असतो. असें असतांना तिनें त्याला॥ १॥२॥३॥नगरांतून बाहेर घालविलें कसें?

श्रीमहादेव उवाच । आयान्तं नागरा दृष्ट्वा मार्गे रामं सजानकिम् ॥ लक्ष्मणेन
समं वीक्ष्य ऊचुः सर्वे परस्परम् ॥ १ ॥ कैकेय्या वरदानादि श्रुत्वा दुः[1]खस-
मावृताः ॥ बत राजा दशरथः सत्यसन्धं प्रियं सुतम् ॥२॥ स्त्रीहेतोरत्यजत्कामी
तस्य सत्यवर्ता[2] कुतः॥कैकेयी वा कथं दुष्टा रामं सत्यं प्रियंकरम्॥३॥विवासयामास
कथं क्रूरकर्मा ऽतिमूढधीः ॥ हे जना नात्र वस्[4]तव्यं गच्छामो ऽद्यैव काननम् ॥४ ॥

श्रीम० उ०-(२ऱ्या श्लोकाचें पूर्वार्ध) सर्वे नागराः मार्गे रामं (बा. १ ला मू.) ऊचुः - ' (२ रा उ.) ॥१॥२॥ कामी [सन्] (३ पू. मू.) कैकयी वा दुष्टा कथं [जाता] ! [सा] क्रूरकर्मा अतिमूढधीः [सती] सत्यं प्रियंकरं रामं कथं विवासयां[3]मास ! (बा. ४ उ. मू.) ग[5]च्छामः ! ॥ ३ ॥ ४ ॥

१ दुःखयुक्त. २ खरेपणा. ३ पाठविती झाली. ४ राहावें. ५ जातों (जाऊं).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इतकें कठोर कृत्य तिच्या हातून घडत आहे, तेव्हां तिच्या बुद्धीला खरोखरच पराकाष्ठेचा मोह पडला (चळभरला) असावा ! लोकहो ! आतां आपण येथें मुळींच राहूं नये. पत्नी आणि धाकटा भाऊ ह्यांसह रामाच्या मनांत जेथें जाण्याची इच्छा आहे, त्या वनांत आपण आजच जाऊं चला. सर्व जनहो ! पहा पहा ! जानकी पायीं चालत जात आहे ! ॥४॥५॥ ही त्रिभुवनसुंदरी सीता आजपर्यंत कधीं तरी कोणा पुरुषाच्या दृष्टीस पडली होती काय ? तीदेखील आज एवढ्या जनसमूहांत उघडी पायीं चालत आहे ! ! ॥ ६ ॥ रामही हत्ती, घोडे वगैरे कांहींएक बरोबर न घेतां पायांनीं जात आहे ! पहा हो पहा ! त्रैलोक्यामध्यें अद्वितिय सुंदर अर्थातच कोमल अशा श्रेष्ठ पुरुषाची ही स्थिति ! ॥ ७ ॥ कैकयी ह्या नांवानें ही कोणी तरी राक्षसी सर्वांचा नाश करण्यासाठीं उत्पन्न झाली असावी ! सीतेला पायीं चालतांना पाहून रामालादेखील दुःख होत

यत्र रामः सभार्यश्च सानुजो गन्तुमिच्छति ॥ पश्यन्तु जानकीं सर्वे पाद[1]चारेण गच्छतीम् ॥५॥ पुंभिः[2] कदाचिद्दृष्टा वा जानकी लोकसुंदरी ॥ सा ऽपि पादेन गच्छन्ती जन[3]संघेष्वना[4]वृता ॥ ६ ॥ रामो ऽपि पादचारेण गजाश्वादिविवर्जितः ॥ गच्छति द्रक्ष्यथ[5] विभुं सर्वलोकैकसुन्दरम् ॥ ७ ॥ राक्षसी कैकयीनाम्नी जाता सर्ववि[6]नाशिनी ॥ रामस्यापि भवेद्दुःखं सीतायाः पा[7]दयानतः ॥ ८ ॥

(मू.) जानकीं पश्यन्तु ! ॥ ५ ॥ (बा. पू.) जानकी दृष्टा वा ? (बा. उ.) पादेन गच्छन्ती ! ॥ ६ ॥ (मू.) द्रक्ष्यथ ! ॥ ७ ॥ (मू.) दुःखं भवेत् ! ॥ ८ ॥

१ पायांनीं चालून. २ पुरुषांनीं. ३ जनसमूहांत. ४ अनावृता उघडी. ५ पहाल. ६ सर्वांचा नाश करणारी. ७ पायीं चालण्यानें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असेल. ॥ ८ ॥ येथें दैवालाच प्रबल ह्मटलें पाहिजे; पुरुषाचा प्रयत्न अगदीं निर्बल होय.' सज्जनांचा समुदाय दुःखानें व्याप्त होऊन - असे उद्गार काढीत होता. - ह्या साधूंच्या समूहांत श्रेष्ठ वामदेव मुनि होते. ते ह्मणाले :- ' जनहो ! राम सीता किंवा लक्ष्मण ह्यांच्याबद्दल आपण अगदीं शोक करूं नका. मी तुह्मांला सत्य प्रकार सांगतों :- ॥ ९ ॥ १० ॥ अहो ! हा राम साक्षात् परमेश्वर आदिनारायण विष्णु होय. ही जानकी लक्ष्मीचा अवतार. हीच लोकांत योगमाया ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. ॥ ११ ॥ सांप्रत रामाच्या मागें चालत आहे, तो हा लक्ष्मण प्रत्यक्ष शेष होय. हाच राम मायेच्या गुणांनीं युक्त असला ह्मणजे निरनिराळ्या रूपां-

बलवान्विधिरेवात्र पुम्प्रयत्नो हि दुर्बलः ॥ इति दुःखाकुले वृन्दे साधूनां मुनिपुंगवः ॥९॥ अब्रवीद्वामदेवोऽथ साधूनां संघमध्यगः ॥ माऽनुशोचथ रामं वा सीतां वा वच्मि तत्त्वतः ॥ १० ॥ एष रामः परो विष्णुरादिनारायणः स्मृतः ॥ एषा सा जानकी लक्ष्मीर्योगमायेति विश्रुता ॥ ११ ॥ असौ शेषस्तमन्वेति लक्ष्मणाख्यश्च साम्प्रतम् ॥ एष मायागुणैर्युक्तस्तत्तदाकारवानिव ॥ १२ ॥

अत्र विधिः एव (बा. पू.)' ॥ साधूनां वृन्दे (उ.) ॥ ९ ॥ (बा. पू.) वामदेवः अब्रवीत् – ॥ (बा. उ.)मा अनुशोचथ. तत्त्वतः वच्मि.॥१०॥(मू.).॥११॥लक्ष्मणाख्यः (पू.) तं अन्वेति. (उ.) ॥१२॥

१ पुरुषाचा यत्न. २ दुःखानें व्याकुळ अशा. ३ समूहांत. ४ ऋषींमध्यें श्रेष्ठ. ५ समुदायामध्यें असणारा. ६ शोक करितां. ७ बोलतों. ८ सांगितलेला. ९ मागून जातो. १० तें तें स्वरूप स्वीकारणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नीं दिसून येतो :- ॥ १२ ॥ हाच रजोगुणानें युक्त होत्साता प्रथम सृष्टिकर्ता ब्रह्मदेव झाला; तसाच सत्वगुणानें युक्त होऊन त्रैलोक्याचें पालन करणारा विष्णु हाच होय; ॥ १३ ॥ व प्रलयकालीं तमोगुणरूपी होत्साता जगाचा संहार करणारा रुद्र हाच होतो. पूर्वी ह्यानें मत्स्यावतार घेऊन वैवस्वतमनुनामक आपल्या भक्ताचें, ॥ १४ ॥ त्याला नौकेंत बसवून, प्रलयकाल संपेपर्यंत रक्षण केलें. ह्याच रामचंद्रानें, पूर्वी समुद्रमंथनाच्या वेळीं मंदरपर्वत सुतलांत (पातालांत) गेला तेव्हां, ॥ १५ ॥ कांसवाचें रूप घेऊन त्या पर्वताला आपल्या पाठीवर धरिलें. हाच रघुवीर, पृथ्वी रसातळाला गेली, तेव्हां प्रलयकालीं

एष एव रजोयुक्तो ब्रह्मा ऽभूद्विश्वभावनः[1] ॥ सत्त्वाविष्टस्तथा[2] विष्णुस्त्रिजगत्प्रतिपालकः[3] ॥१३॥ एष रुद्रस्तामसो[4] ऽन्ते[5] जगत्प्रलयकारणम्[6] ॥ एष मत्स्यः पुरा भूत्वा भक्तं वैवस्वतं मनुम् ॥ १४ ॥ नाव्यारोप्य[7][8] लयस्यान्तं पालयामास राघवः ॥ समुद्रमथने पूर्वं मन्दरे सुतलं गते ॥ १५ ॥ अधारयत्स्वपृष्ठे[9] ऽद्रिं कूर्मरूपी रघूत्तमः ॥ मही रसातलं याता प्रलये सूकरो ऽभवत् ॥ १६ ॥

(बा. पू.) अभूत; ॥ तथा (उ.), ॥ १३ ॥ (मू.) ॥ १४ ॥ (मू.) ॥ १५॥ रघूत्तमः कूर्मरूपी [सन्] अद्रिं स्वपृष्ठे अधारयत्. (उ.) ॥ १६ ॥

---

१ विश्व उत्पन्न करणारा. २ सत्वगुणी. ३ त्रैलोक्याचें पालन करणारा. ४ तमोगुणानें युक्त. ५ अन्ते प्रलयकालीं. ६ जगाच्या नाशाला हेतु. ७ नावि नौकेंत. ८ आरोप्य ठेवून. ९ आपल्या पाठीवर. १० धरता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वराह झाला होता; ॥ १६ ॥ व त्यावेळीं ह्यानें आपल्या दाढेच्या टोंकावर त्या पृथ्वीला तोलून धरिलें होतें. ह्या रामचंद्रानें पूर्वीं प्रल्हादाला वर देण्यासाठीं नारसिंह रूप घेतलें, ॥ १७ ॥ व त्रैलोक्याला कांट्याप्रमाणें - दुःख देणाऱ्या - एका राक्षसाला (हिरण्यकशिपूला) आपल्या नखांनीं फाडून टाकिलें. पूर्वीं अदितीनें, आपल्या पुत्राचें (इंद्राचें) राज्य - बळीनें - बळकाविलें असें पाहून, ह्याची प्रार्थना केली होती; तेव्हां ॥ १८॥ ह्यानें वामनरूप स्वीकारून भिक्षा मागून तें राज्य पुन्हां परत घेतलें. पुढें, पृथ्वीला दुष्ट क्षत्रियांचा भार झाला होता, तो उतरण्यासाठीं ह्यानें परशुराम अवतार घेतला. ॥ १९ ॥ तोच जगाचा अधिपति सांप्रत

तोलयामास दं[1]ष्ट्राग्रे तां क्षो[2]णीं रघुनन्दनः ॥ नारसिंहवपुः कृत्वा प्रल्हादवरदः पुरा ॥ १७ ॥ त्रिलो[5]ककण्टकं र[6]क्षः पाटयामास तन्नखैः ॥ पुत्रराज्यं हृतं दृष्ट्वा ह्य-दित्या [8]याचितः पुरा ॥१८॥ [9]वामनत्व[10]मुपागम्य [11]याच्ञया चाहरत्पुनः ॥ दु[12]ष्टक्ष-त्रियभूभारनिवृत्त्यै [13]भार्गवो ऽभवत् ॥ १९ ॥ स एव जगतां नाथ इदानीं रा-[14]मतां गतः ॥ रावणादीनि रक्षांसि कोटिशो निर्ह[15]निष्यति ॥ २० ॥

रघुनन्दनः (बा. पू.) [3]तोलयामास. ॥ [4]प्रल्हादवरदः (उ.) ॥ १७ ॥ (बा. पू.) [7]पाटयामास. ॥ पुरा अदित्या (उ.) ॥ १८ ॥ (मू.) ॥ १९ ॥ २० ॥

१ दाढेच्या अग्रावर. २ पृथ्वीला. ३ तोलता झाला. ४ प्रल्हादाला वर देणारा. ५ त्रैलोक्यांतील कांटा, अशा. ६ राक्षसाला. ७ फाडिता झाला. ८ प्रार्थिलेला. ९ वामनाचें रूप १० घेऊन. ११ भिक्षेनें. १२ दुष्ट क्षत्रियांपासून - झालेला - पृथ्वीचा भार उतरण्यासाठीं. १३ परशुराम. १४ रामाच्या स्वरूपाला. १५ मारील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामरूपानें येथें प्राप्त झाला आहे. हा आतां लवकरच रावण आदिकरून कोट्यावधि राक्षसांचा निःपात करील. ॥ २० ॥ त्या दुष्टाचें मरण मनुष्याच्या हातूनच ठरलेलें आहे. दशरथ राजानेंही, विष्णु आपला पुत्र व्हावा, ह्या इच्छेनें तपश्चर्या करून त्या दुःखहर्त्या प्रभूची आराधना केली. तेव्हां तो हरि त्याचा पुत्र झाला. तोच विष्णु हा श्रीराम होय. हा रावणादिकांच्या वधासाठीं ॥ २१ ॥२२ ॥ लक्ष्मणाला साह्यार्थ बरोबर घेऊन आजच वनांत जाणार आहे. ही सीता सृष्टि, स्थिति आणि लय करणारी त्या हरीची माया होय. ॥ २३ ॥ रामाला वनांत घालविण्यास दशरथ राजा किंवा कैकेयी किंचित् देखील का-

मानुषेणैव मरणं तस्य दृष्टं दुरात्मनः ॥ राज्ञा दशरथेनापि तपसाऽऽराधितो हरिः ॥ २१ ॥ पुत्रत्वाकांक्षया विष्णोस्तदा पुत्रोऽभवद्धरिः ॥ स एव विष्णुः श्रीरामो रावणादिवधाय हि ॥२२ ॥ गन्ताऽद्यैव वनं रामो लक्ष्मणेन सहायवान् ॥ एषा सीता हरेर्माया सृष्टिस्थित्यन्तकारिणी ॥ २३ ॥ राजा वा कैकयी वाऽपि नात्र कारणमण्वपि ॥ पूर्वेद्युर्नारदः प्राह भूभारहरणाय च ॥ २४ ॥

तस्य दुरात्मनः मरणं मानुषेण एव दृष्टम्. राज्ञा दशरथेन अपि विष्णोः पुत्रत्वाकांक्षया हरिः तपसा आराधितः; तदा हरिः पुत्रः अभवत्. ॥ (बा. मू.) ॥ २१ ॥ २२ ॥ (बा. पू.) अद्य एव वनं गन्ता. ॥ (उ.) ॥ २३ ॥ (बा. पू.) कारणं न. ॥(बा. उ.) प्राह. ॥ २४ ॥

१ मनुष्याकडून. २ मुलाच्या इच्छेनें. ३ प्रार्थिलेला. ४ रावणादिकांच्या वधासाठीं. ५ जाईल. ६ साह्य आहे ज्याला, असा. ७ उत्पत्ति, स्थिति व नाश करणारी. ८ अणु किंचित्.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रण नाहींत. कालच नारदमुनींनीं पृथ्वीचा भार दूर करण्याबद्दल - ब्रह्मदेवाचा निरोप रामाला - कळविला. ॥ २४ ॥ त्यावेळीं प्रत्यक्ष रामही स्वतां ह्मणाला कीं, मी उद्यां वनांत जाईन. लोकहो! तुह्माला रामाच्या स्वरूपाबद्दल अद्यापि अज्ञान आहे, - ह्मणून मी सांगतों कीं, - तुह्मी रामाबद्दल काळजी अगदीं सोडून द्या. ॥२५॥ पृथ्वीवर जे लोक नित्य " राम, राम " असा जप करितात, त्यांना कधींही मृत्यूचें वगैरे भय वहावें लागत नाहीं; - ज्याला मृत्यूचें देखील भय नाहीं, त्याला इतरांचें भय नसायाचेंच हें काय वेगळें सांगितलें पाहिजे? ॥ २६ ॥ - अशी ज्याच्या नांवाची योग्यता, - त्या महात्म्या रामचंद्राला दुःख होईल, अशी शंका तरी - घेण्याला जागा आहे - काय? कलियुगामध्यें मुक्ति मिळण्याला साधन काय तें रामनाम होय, दुसरें कांहीं नाहीं. ॥२७॥ तो लोककर्ता प्रभु मायेनें मनुष्यरूप घेऊन लोकांचें अनुकरण करीत

रामोऽप्याह स्वयं साक्षाच्छ्वो[1] गमिष्याम्यहं वनम् ॥ अतो रामं समुद्दिश्य चिन्तां त्यजत[2] बालिशाः[3] ॥ २५ ॥ राम रामेति ये नित्यं जपन्ति मनुजा भुवि ॥ तेषां मृत्युभयादीनि न भवन्ति कदाचन ॥ २६ ॥ का पुनस्तस्य रामस्य दुःखशंका महात्मनः ॥ रामनाम्नैव मुक्तिः स्यात्कलौ नान्येन केनचित् ॥ २७ ॥ मायामानुषरूपेण[4] विडंबयति[5] लोककृत्॥भक्तानां भजनार्थाय रावणस्य वधाय च॥२८॥

रामः अपि "अहं (बा. पू.) गमिष्यामि" [इति] आह. ॥ बालिशाः! (उ.). ॥२५॥ ये मनुजाः भुवि (बा. मू.). ॥ २६ ॥ (बा. पू.) दुःखशंका का? ॥ (उ.) ॥ २७ ॥ लोककृत् (मू.) ॥ २८ ॥

१ श्वः उद्यां. २ सोडा. ३ मूर्खांनो. ४ मायेच्या मनुष्यरूपानें. ५ अनुकरण करितो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे. भक्तांना भजन करण्याला आधार मिळावा, रावणाचा वध करावा, ॥ २८ ॥ व दशरथ राजाचे मनोरथ सिद्धीस न्यावे, अशा तीन उद्देशांनीं त्या प्रभूनें हें मनुष्यरूप घेतलें आहे.' इतकें भाषण करून ते महामुनि वामदेव विराम पावले. ॥ २९ ॥ हें भाषण श्रवण केल्याबरोबर त्या ब्राह्मणांना पूर्णपणें समजलें कीं, हा रामचंद्र साक्षात् भक्तांचें दुःख नाहींसें करणारा व्यापक परमेश्वर होय. आतां त्या सर्व लोकांच्या अंतःकरणांतील संशयरूपी ग्रंथि नाहींसा झाला, व ते रामचंद्राचेंच चिंतन करूं लागले. ॥ ३० ॥ जो मनुष्य सीतारामांच्या ह्या रहस्याचें नित्य चिंतन करितो, त्याला उत्तम तत्त्वज्ञान होतें व त्याची रामचंद्रावर दृढ भक्ति जडते. ॥ ३१ ॥

राज्ञश्चाभीष्टसिद्ध्यर्थं मानुषं वपुराश्रितः ॥ इत्युक्त्वा विरराम[1]ाथ वामदेवो महामुनिः ॥ २९ ॥ श्रुत्वा ते ऽपि द्विजाः सर्वे रामं ज्ञात्वा हरिं विभुम् ॥ जहु[3]र्हृत्संशयग्रन्थिं[2] राममेवान्वचिंतयन् ॥ ३० ॥ य इदं चिंतयेन्नित्यं रहस्यं रामसीतयोः ॥ तस्य रामे दृढा भक्तिर्भवेद्विज्ञानपूर्विका[4] ॥ ३१ ॥

(पू.).' ॥ (बा. उ.) विरराम. ॥ २९ ॥ ते सर्वे अपि द्विजाः श्रुत्वा, रामं हरिं विभुं ज्ञात्वा, ॥ हृत्संशयग्रन्थिं (बा. उ.). ॥ ३० ॥ यः रामसीतयोः (मू.) नित्यं चिन्तयेत्, ॥ (उ.) भक्तिः भवेत्. ॥ ३१ ॥

---

१ थांबला. २ हृदयांतल्या संशयाच्या गांठीला. ३ जहुः टाकिते झाले. ४ चांगलें ज्ञान आहे पूर्वीं जीच्या, अशी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कैकेयी वल्कलें देत्ये.

'जनहो ! तुह्मीं रामचंद्राचे प्रिय भक्त आहां; हें रहस्य गुप्त राखा.' इतकें बोलून वामदेव मुनि चालते झाले. त्या लोकांनाही 'राम परमेश्वर होय,' असें ज्ञान झालें. ॥ ३२ ॥ इकडे रामचंद्र धाकटा भाऊ (लक्ष्मण) आणि सीता ह्यांसह निष्प्रतिबंधपणें पित्याच्या मंदिरांत शिरला व कैकेयीजवळ जाऊन तिला असें ह्मणालाः— ॥ ३३ ॥ 'माते, तुझ्या मनांत आहे त्याप्रमाणें आह्मीं तिघेंजणें दंडकारण्यांत जाण्याविषयीं अंतःकरणाचा निश्चय करून येथें आलों आहों. आतां पित्यानें आम्हांला लवकर आज्ञा द्यावी.' ॥ ३४ ॥ राम असें बोलला असतां, कैकेयीनें एकदम उठून स्वतां, रामाला, लक्ष्मणाला व सीतेला वेगवेगळीं वल्कलें दिलीं.॥ ३५॥

रह[1]स्यं गोप[2]नीयं वो यूयं वै राघवप्रियाः ॥ इत्युक्त्वा प्र[3]ययौ विप्रस्ते ऽपि रामं परं वि[4]दुः ॥ ३२ ॥ ततो रामः समाविश्य पितृगेहमवा[5]रितः ॥ सानुजः सीतया गत्वा कैकेयीमिदमब्रवीत् ॥ ३३ ॥ आगताः स्मो वयं मातस्त्रयस्ते सम्मतं वनम् ॥ गन्तुं [6]कृतधियः शीघ्रमाज्ञापयतु नः पिता ॥ ३४ ॥ इत्युक्ता सहसोत्थाय चीराणि प्रददौ स्वयम् ॥ रामाय लक्ष्मणायाथ सीतायै च पृथक् पृथक् ॥ ३५ ॥

'वः (पू.).' ॥ विप्रः (उ.). ॥ ३२ ॥ (पू.) समाविश्य, ॥ (उ.) — ॥ ३३ ॥ 'मातः (मू.) आगताः स्मः; पिता नः शीघ्रं आज्ञापयतु.' ॥ ३४ ॥ (मू.) स्वयं प्रददौ. ॥ ३५ ॥

१ गुप्त गोष्ट. २ गुप्त ठेवण्याजोगें. ३ गेला. ४ जाणूं लागले. ५ प्रतिबंध नाहीं ज्याला, असा. ६ निश्चित झाली बुद्धि ज्यांची असे. ७ आहों. ८ आज्ञा करो. ९ देती झाली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामानें वस्त्रें सोडून टाकून तीं वन्य वल्कलें परिधान केलीं. लक्ष्मणानेंही तसें केलें. पण सीतेला वल्कल कसें नेसावयाचें तें माहीत नव्हतें, ॥ ३६ ॥ ह्मणून ती तें वल्कल हातीं घेऊन लज्जेनें रामाच्या मुखाकडे पाहूं लागली. रामानें तें वल्कल घेऊन वस्त्राऐवजीं सीतेला नेसविलें. ॥ ३७ ॥ तें पाहिल्याबरोबर चोहोंकडे सर्व रानपत्न्या रडूं लागल्या. तें रडणें ऐकून वसिष्ठ मुनींना - वाईट वाटलें; - ते क्रोधानें कैकेयीची निर्भर्त्सना करीत ॥ ३८ ॥ तिला ह्मणाले :– ‘ दुष्टे, हें तुझें कृत्य फारच वाईट ! तूं एकट्या रामाला वनांत पाठ-

रामस्तु वस्त्राण्युत्सृज्य[1] वैन्य[2]चीराणि पर्यधात्[3] ॥ लक्ष्मणोऽपि तथा चक्रे सीता तन्न विजानती ॥ ३६ ॥ हस्ते गृहीत्वा रामस्य लज्जया मुखमैक्षत[4] ॥ रामो गृहीत्वा तच्चीरमंशुके पर्यवेष्टयत्[5] ॥ ३७॥ तद्दृष्ट्वा रुरुदुः[7] सर्वे राजदाराः समंततः ॥ वसिष्ठस्तु तदाकर्ण्य रुदितं भर्त्सयन्[8] रुषा ॥ ३८ ॥ कैकेयीं प्राह दुर्वृत्ते राम एव त्वया वृतः[9] ॥ वनवासाय दुष्टे त्वं सीतायै किं प्रयच्छसि[10] ॥ ३९ ॥

(मू.). ॥३६॥ (बा. पू.) लज्जया ऐक्षत. ॥ रामः तत् चीरं (उ.). ॥३७॥ सर्वे राजदाराः[6] (मू.) आकर्ण्य, रुषा भर्त्सयन् [सन्] ॥ ३८ ॥ (बा. पू.) त्वया रामः एव वनवासाय वृतः. दुष्टे ! त्वं (बा. उ.)[?] ॥ ३९ ॥

---

१ सोडून. २ अरण्यसंबंधी वल्कलें. ३ नेसला. ४ पाहती झाली. ५ नेसविता झाला. ६ राजाच्या स्त्रिया. ७ रडूं लागल्या. ८ निंदा करणारा. ९ मागून घेतलेला. १० देत्येस.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राजा रथ आ- णवितो.

त्रिण्याबद्दल वर मागून घेतला आहेस, मग सीतेला वल्कलें कां ह्मणून देत्येस? ॥३९॥ आतां, ही महासाध्वी सीता भक्तीस्तव जर रामाच्या मागून जात आहे - तर तिला वल्कलें नेसायाला नकोत. - तिनें खुशाल दिव्य वस्त्रें नेसावीं, नित्य आंगावर सर्व अलंकार धारण करावे ॥ ४० ॥ व रामाला प्रतिदिनीं रमवीत असावें. - हिला सुखी पाहून - रामाचें वनवासांतील दुःख दूर होईल.' दशरथ राजाही सुमंत्राला ह्मणाला :— 'सुमंत्रा, रथ घेऊन ये. ॥ ४१ ॥ वनांत राहणारे मुनि - रामचंद्रादि तिघांना - प्रिय आहेत, तर ह्यांनीं रथांत बसून वनांत जावें.' दशरथ राजानें असें बोलून राम, सीता आणि लक्ष्मण ह्यांच्या मुखांकडे पाहिलें. ॥४२॥ त्याबरोबर मूर्छा येऊन तो भूमीवर पडला व रडूं लागला. त्याच्या नेत्रांतून सारख्या अश्रुधारा चालल्या. रामाच्या

यदि रामं समन्वेति सीता भक्त्या पतिव्रता ॥ दिव्याम्बरधरा नित्यं सर्वाभरणभूषिता ॥ ४० ॥ रमयत्वनिशं[1] रामं वनदुःखनिवारिणी ॥ राजा दशरथोऽप्याह सुमंत्रं रथमानय ॥ ४१ ॥ रथमारुह्य गच्छन्तु वनं वनचरप्रियाः[3] ॥ इत्युक्त्वा राममालोक्य सीतां चैव सलक्ष्मणम् ॥४२॥ दुःखान्निपतितो भूमौ रुरोदाश्रुपरिप्लुतः ॥ आरुरोह रथं सीता शीघ्रं रामस्य पश्यतः[4] ॥ ४३ ॥

पतिव्रता सीता भक्त्या यदि रामं समन्वेति, ॥ [तर्हि] (उ.) ॥ ४० ॥ (बा. पू.) रामं रमयतु[2]. ' ॥ (बा. उ.) आह – ' रथं आनय. ॥४१॥ (बा. पू.) वनं गच्छन्तु.' (उ.). रामं आलोक्य, ॥४२॥ भूमौ (बा. पू.) रुरोद. ॥ (बा. उ.) रथं आरुरोह[5]. ॥ ४३ ॥

१ सतत. २ रमवो. ३ वनांत राहणारे (ऋषि) प्रिय आहेत ज्यांना, असे. ४ पाहत असतां. ५ चढली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

समक्ष सीता लागलीच रथावर चढली. ॥ ४३ ॥ राम पित्याला प्रदक्षिणा घालून रथांत बसला. लक्ष्मणही दोन खड्ग, दोन धनुष्यें आणि दोन भाते ॥ ४४ ॥ इतकें साहित्य घेऊन रथावर चढला; त्यानें सारथ्याला - लागलेंच रथ हांकण्यास - सांगितलें. दशरथ राजा म्हणाला :– ‘ सुमंत्रा, थांबरे, थांब (जरा उभा रहा)! ’ ॥ ४५ ॥ परंतु रामानें चल चल (रथ चालव. थांबवूं नको.) ’ असें सांगितलें, ह्मणून सुमंत्रानें रथ हांकलिला. राम दूर गेला असतां, राजा मूर्छा येऊन भूमीवर पडला. ॥ ४६ ॥ नगरांतील आबालवृद्ध जन व मोठेमोठे ब्राह्मण ‘ रामा ! थांब थांब (उभा रहा) ! ’ असा आक्रोश करीत रथामागून चालले. ॥ ४७ ॥ राजा पुष्कळ वेळ रडत होता. शेवटीं त्यानें आपल्या सेवकांना सांगितलें कीं, मला रामाची

रामः प्रदक्षिणं कृत्वा पितरं रथमारुहत् ॥ लक्ष्मणः खड्गयुगलं धनुस्तूणीयुगं[1] तथा ॥ ४४ ॥ गृहीत्वा रथमारुह्य नोदयामास[2] सारथिम् ॥ तिष्ठ तिष्ठ सुमंत्रेति राजा दशरथो ऽब्रवीत् ॥ ४५ ॥ गच्छ गच्छेति रामेण नोदितो ऽचोदयद्रथम् ॥ रामे दूरं गते राजा मूर्छितः प्रापतद्भुवि ॥ ४६ ॥ पौरास्तु बालवृद्धाश्च वृद्धा ब्राह्मणसत्तमाः[4] ॥ तिष्ठ तिष्ठेति रामेति क्रोशन्तो[5] रथमन्वयुः[6] ॥ ४७ ॥ राजा रुदित्वा सुचिरं मां नयन्तु गृहं प्रति ॥

रामः पितरं (मू.) ॥ ४४ ॥ (बा. पू.) नोदयापास. ॥ सुमन्त्र, (बा. उ.) ॥ ४५ ॥ (बा. पू.) अचोदयत्[2]. ॥ (बा. उ.) प्रापतत्[3] ! ॥४६॥ (मू.). ॥४७॥ राजा सुचिरं (बा. मू.) गृहं प्रति नयन्तु’

१ दोन धनुष्यांना व दोन भात्यांना. २ प्रेरिता झाला. ३ पडला. ४ ब्राह्मणांत श्रेष्ठ. ५ आक्रोश करणारे. ६ मागून गेले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुत्रवियोगानें पित्याची अवस्था.

माता जी कौसल्या तिच्या मंदिरीं घेऊन चला; ॥ ४८ ॥ तेथें मीं कांहीं वेळ तरी वांचेन; रामाची माझी ताडातोड केली, आतां ह्या दुःखामुळें मी पुढें फार दिवस जगणार नाहीं. ॥ ४९ ॥ पुढें कौसल्येच्या मंदिरीं गेल्यावरही राजा पुन्हा मूर्छा येऊन पडला, बऱ्याच वेळानें शुद्धीवर आला तरी पण स्तब्धच बसला होता (कांहीं बोलेच ना) ! ॥ ५० ॥ इकडे राम तमसानदीच्या तीरीं जाऊन तेथें सुखान राहिला. त्या प्रभूनें कांहीं भक्षण न करितां केवल उदक प्राशन करून एका वृक्षाखालीं सीतेसह शयन केलें. लक्ष्मणाला, - ' वडील बंधु पित्याप्रमाणें होय, आपण त्याची सेवा केली पाहिजे, ' हा धर्म विदित होता; व तो ह्या धर्माप्रमाणें

कौसल्याया राममातुरित्याह परिचारकान् ॥ ४८॥ किञ्चित्कालं भवेत्तत्र जीवनं दुःखितस्य मे ॥ अत ऊर्ध्वं न जीवामि चिरं रामं विना कृतः ॥ ४९ ॥ ततो गृहं प्रविश्यैव कौसल्यायाः पपात ह ॥ मूर्छितश्च चिराद्बुद्ध्वा तूष्णीमेवावतस्थिवान् ॥ ५० ॥ रामस्तु तमसातीरं गत्वा तत्रावसत्सुखी ॥ जलं प्राश्य निराहारो वृक्षमूले ऽस्वपद्विभुः ॥ ५१ ॥ सीतया सह धर्मात्मा धनुष्पाणिस्तु लक्ष्मणः ॥ पालयामास धर्मज्ञः सुमन्त्रेण समन्वितः ॥ ५२ ॥

इति परिचारकान् आह.॥४८॥तत्र (बा. पू.) तत्र(बा. पू.)जीवनं भवेत्. ॥(बा. उ.) चिरं न जीवामि. ॥४९॥ ततः कौसल्यायाः (मू. प्र.).॥५०॥विभुः (बा, ५१ मू.) सीतया सह अस्वपत्. (बा. ५२ मू.) पालयामास. ॥ ५१ ॥ ५२ ॥

१ सेवकांना. २ सावध होऊन. ३ बसलेला. ४ तमसानदीच्या तीराला. ५ निजला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नित्य वागत असे. सुमंत्रासह त्यानें हातांत धनुष्य घेऊन - रात्रभर जागत राहून सीतारामांचें - रक्षण केलें.॥९१॥ ॥९२॥सर्व नागरिक जन तेथें येऊन रामाच्या जवळ राहिले. - त्यांनीं विचार ठरविला होता कीं, - आपल्याच्यानें रामाला नगरांत परत नेववलें नाहीं, तर आपण - त्याच्या बरोबर - अरण्यांतच जाऊं.॥९३॥हा त्यांचा निश्चय समजला, तेव्हां रामाला परम आश्चर्य वाटलें. - त्यानें मनांत विचार आरंभिला कीं, - आपल्याला तर कांहीं आतां नगरांत परत जावयाचें नाहींच, पण - ह्यांना आपल्याबरोबर विनाकारण - क्लेश भोगीत राहावें लागेल; - तेव्हां येथें युक्ति काय योजावी. - शेवटीं एक निश्चय ठरवून तो सुमंत्राला ह्मणाला :– 'सुमंत्रा, रथ घेऊन ये. आतांच जाऊं चला.' ॥ ९४ ॥ ९५ ॥ अशी आज्ञा मिळाल्याबरोबर सुमंत्रानेंही रथाला घोडे जोडले. आणि राम, सीता व लक्ष्मण रथांत बसून - कोणालाही न कळवितां - सत्वर निघून गेले. ॥ ९६ ॥

पौराः सर्वे समागत्य स्थितास्तस्याविदूरतः ॥ शक्ता[1] रामं पुरं नेतुं नोचेद्गच्छामहे वनम् ॥ ५३ ॥ इति निश्चयमाज्ञाय तेषां रामोऽतिविस्मितः ॥ नाहं गच्छामि नगरमेते वै क्लेशभागिनः[3] ॥ ५४ ॥ भविष्यन्तीति निश्चित्य सुमंत्रमिदमब्रवीत् ॥ इदानीमेव गच्छामः[4] सुमंत्र रथमानय ॥ ५५ ॥ इत्याज्ञप्तः सुमन्त्रोऽपि रथं वाहैर्[5]अयोजयत् ॥ आरुह्य रामः सीता च लक्ष्मणोऽपि ययुर्द्रुतम्॥५६॥

(बा. पू.) स्थिताः, रामं पुरं नेतुं (बा. उ.) गच्छामहे[2]. ॥ ५३ ॥ तेषां (बा. पू.). ॥ अहं नगरं न गच्छामि, (बा. उ.) ॥ ५४ ॥ (मू). ॥ ५५ ॥ (बा. मू.) ययुः. ॥ ५६ ॥

---

१ समर्थ. २ जाऊं. ३ दुःख भोगणारे. ४ जातों. ५ घोड्यांनीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ते शृंगवेरजवळ आले.

- प्रथम ते लोकांना फसविण्यासाठीं - अयोध्येच्या समोर (रस्त्याला) थोडेंसें जाऊन, तेथून दूर अरण्यांत चालले. इकडे ते नागरिक जन सकाळीं उठून रामाला - शोधूं लागले; तो - दिसेना तेव्हां त्यांना फार दुःख झालें. ॥ ५७ ॥ ते रामाच्या रथाची धांव लागली होती तो मार्ग पाहत पाहत नगरांत आले व तेथें प्रतिदिनीं अंतःकरणांत सीतेसह रामचंद्राचें चिंतन करीत राहिले. ॥५८॥ सुमंत्रानें आदरपूर्वक रथ सत्वर चालविला. सीतेसह रामचंद्र मनोहर प्रदेशांकडे पाहत पाहत ॥ ५९ ॥ गंगेच्या तीरीं गेला. - तेथें शृंगवेर पुराजवळ रामानें गंगानदीचें दर्शन घेतलें व वंदन करून स्नान केलें. ह्या वेळीं त्याच्या मनाला आनंद वाटला. ॥ ६० ॥ पुढें तो रघुवीर रामचंद्र एका शिंशपा वृक्षाच्या खालीं बसला. इकडे गुहाला (शृंगवेर पुरींतील भिल्लांच्या

अयोध्याभिमुखं[1] गत्वा किञ्चिद्दूरं ततो ययुः ॥ ते ऽपि राममदृष्ट्वैव प्रातरुत्थाय दुःखिताः ॥ ५७ ॥ रथनेमिगतं[2] मार्गं पश्यन्तस्ते पुरं ययुः ॥ हृदि रामं ससीतं ते ध्यायन्तस्तस्थुरन्वहम् ॥ ५८ ॥ सुमन्त्रो ऽपि रथं शीघ्रं नोदयामास सादरम् ॥ स्फीतान् जनपदान्पश्यन् रामः सीतासमन्वितः ॥ ५९ ॥ गंगातीरं समागच्छच्छृंगवेराविदूरतः[3] ॥ गंगां दृष्ट्वा नमस्कृत्य स्नात्वा सानंदमानसः ॥ ॥ ६० ॥ शिंशपावृक्षमूले स निषसाद रघूत्तमः ॥

(मू.) ॥५७॥ (पू.). ॥ ते ससीतं रामं अन्वहं (बा. उ.) तस्थुः. ॥ ५८ ॥ (बा. पू.) नोदयामास. ॥ (बा. उ.) ॥ ५९ ॥ (बा. मू.) स्नात्वा, ॥ ६० ॥ सः रघूत्तमः (पू.) ॥

१ अयोध्येच्या समोर. २ रथाच्या धांवा गेल्या आहेत ज्यावरून, अशा. ३ शृंगवेर पुराजवळ.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राजाला) लोकांकडून, रामचंद्र आला आहे, ही मोठ्या आनंदाची वार्ता कळली. ॥ ६१ ॥ तेव्हां तो भक्ति-पूर्वक आपल्या मित्राला व धन्याला (रामाला) भेटण्यासाठीं आनंदानें फळें, मध, फुलें वगैरे घेऊन लगबगीनें आला. ॥ ६२ ॥ त्यानें रामापुढें तें उपायन (नजराणा) ठेवून भूमीवर लोटांगण घातलें. रामचंद्रानें गुहाला उठवून सत्वर घट्ट आलिंगन दिलें. ॥ ६३ ॥ पुढें रामानें कुशल प्रश्न विचारिले असतां, गुह हात जोडून ह्मणाला :– ‘ रामा, तूं सर्व जगाला पवित्र करणारा आहेस. माझा जन्म - नीच अशा - निषाद (भिल्लां-च्या) कुलांत झाला खरा; पण आज मी धन्य झालों. ॥ ६४ ॥ रघुवीरा, तुझ्या शरीराचा स्पर्श होतांच मला पराकाष्ठेचा आनंद झाला. हे रघुकुलोत्तमा, तुझ्या सेवकाचें हें नैषाद (भिल्लांचें) राज्य ॥ ६५ ॥

ततो गुहो जनैः श्रुत्वा रामागममहोत्सवम्[1] ॥ ६१ ॥ सखायं स्वामिनं द्रष्टुं हर्षात्तूर्णं समापतत् ॥ फलानि मधुपुष्पादि गृहीत्वा भक्तिसंयुतः ॥ ६२ ॥ रामस्याग्रे विनिक्षिप्य[2] दण्डवत्प्रापतद्भुवि ॥ गुहमुत्थाप्य तं तूर्णं राघवः परिषस्वजे[3] ॥ ६३ ॥ संपृष्टकुशलो[4] रामं गुहः प्रांजलिरब्रवीत् ॥ धन्योऽहमद्य मे जन्म नैषादं लोकपावन ॥ ६४ ॥ बभूव परमानन्दः स्पृष्ट्वा तेऽङ्गं रघूत्तम ॥ नैषादराज्यमेतत्ते किंकरस्य रघूत्तम ॥ ६५ ॥

(मू.) श्रुत्वा, ॥६१॥ (मू.). ॥६२॥ (बा. पू.) प्रापतत्. ॥ राघवः तं (बा. उ.). ॥ ६३ ॥ गुहः (मू.) ॥६४॥रघूत्तम, ते अंगं स्पृष्ट्वा, परमानन्दः बभूव.॥रघूत्तम, ते किंकरस्य एतत् नैषादं राज्यं ॥६५ ॥

१ रामाच्या येण्याच्या महोत्सवाला. २ ठेवून. ३ आलिंगिता झाला. ४ विचारिलें कुशल ज्याला, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो.
समू.सान्व.
सटिप्पण.
॥ ४८ ॥

अयो. कां.
सर्ग ५

तुझ्या स्वाधीन आहे. रघुकुलोद्धारका, येथें राहून तूं आमचें पालन कर. चल; आपण नगरांत जाऊं. माझें गृह पवित्र कर. ॥ ६६ ॥ हे देवाधिदेवा षड्गुणैश्वर्यसंपन्ना रामा, मी तुजसाठीं फळें मुळें मिळविलीं आहेत, तीं ग्रहण करण्याची कृपा कर. मी तुझा दास आहें.' ॥ ६७ ॥ रामचंद्र संतुष्ट होऊन त्याला ह्मणालाः— 'मित्रा, माझें वचन श्रवण कर. मी चवदा वर्षें घरांत किंवा गांवांत प्रवेश करणार नाहीं, ॥ ६८ ॥ तसेंच फळें मुळें वगैरे कांहीं दुसऱ्यानें दिलेलें खाणार नाहीं. हें तुझें राज्य सगळें माझेंच आहे, - असें मी समजतों; - कारण, तूं माझा अत्यंत प्रिय मित्र आहेस.' ॥ ६९ ॥

'हें राज्य तुझें.'
'होय माझेंच.'

त्वदधीनं वसन्नत्र पालयास्मान् रघूद्वह ॥ आगच्छ यामो नगरं पावनं कुरु मे गृहम् ॥ ६६ ॥ गृहाण फलमूलानि त्वदर्थं सञ्चितानि मे ॥ अनुगृह्णीष्व भगवन् दासस्ते ऽहं सुरोत्तम ॥ ६७ ॥ रामस्तमाह सुप्रीतो वचनं शृणु मे सखे ॥ न वेक्ष्यामि गृहं ग्रामं नव वर्षाणि पंच च ॥ ६८ ॥ दत्तमन्येन नो भुञ्जे फलमूलादि किंचन ॥ राज्यं ममैतत्ते सर्वं त्वं सखा मे ऽतिवल्लभः॥६९॥

त्वदधीनं; रघूद्वह, अत्र वसन् अस्मान् पालय. आगच्छ. नगरं यामः. मे गृहं पावनं कुरु. ॥ ६६ ॥ (बा. पू.) फलमूलानि गृहाण. ॥ (उ.).' ॥ ६७ ॥ सुप्रीतः (बा. मू.) न वेक्ष्यामि. ॥ ६८ ॥ अन्येन (बा. पू.) नो भुञ्जे ॥ एतत् सर्वं ते (बा. उ.) सखा. ॥ ६९ ॥

॥ ४८ ॥

१ मिळविलेलीं. २ कृपा कर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुढें रामचंद्रानें - गुहाकडून - वटक्षीर (वडाचा चीक) आणविलें व आदरपूर्वक, लक्ष्मणासह स्वतांच्या जटांचा मुकुट बांधिला. ॥ ७० ॥ लक्ष्मणानें तेथें दर्भ, पानें इत्यादिकांची शय्या सिद्ध केली; व सीतेसहवर्तमान रामचंद्र केवल उदक प्राशन करून त्या शय्येवर ॥ ७१ ॥ बसला. तो त्याठिकाणीं, जसा पूर्वी अयोध्या नगरीमध्यें राजवाड्याच्या गच्चीवर शृंगारलेल्या मंचकीं शयन करीत असे, त्याप्रमाणें सीतेसह - सुखानें - निजला. ॥ ७२ ॥ तेथें जवळच, लक्ष्मण आपल्याजवळ बाण, भाता आणि धनुष्य घेऊन व धनुष्य हातांत सिद्ध ठेवून, - सीतारामांला त्रास देण्यासाठीं कोणी जीव जंतु येतात कीं काय, असें - चोहोंकडे पाहत त्यांचें रक्षण करीत राहिला. त्याच्या बरोबर गुहही धनुष्य सज्ज करून तयार होता. ॥७३ ॥ इति पञ्चमः सर्गः॥

वटक्षीरं समानाय्य[1] जटामुकुटमादरात् ॥ बबन्ध लक्ष्मणेनाथ सहितो रघुनन्दनः ॥ ७० ॥ जलमात्रं तु संप्राश्य सीतया सह राघवः ॥ आस्तृतं[2] कुशपर्णाद्यैः शयनं लक्ष्मणेन हि ॥ ७१ ॥ उवास तत्र नगरप्रासादाग्रे यथा पुरा ॥ सुष्वाप[3] तत्र वैदेह्या पर्यंक इव संस्कृते ॥ ७२ ॥ ततो ऽविदूरे परिगृह्य चापं सबाणतूणीरधनुः स लक्ष्मणः ॥ ररक्ष रामं परितो विपश्यन् गुहेन सार्धं सशरासनेन ॥ ७३ ॥

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे अयोध्याकाण्डे पंचमः सर्गः ॥ ५॥

लक्ष्मणेन सहितः रघुनन्दनः (मू.) ॥७०॥ राघवः सीतया सह (मू.) आस्तृतं शयनं॥७१॥ (पू.) उवास.॥ (उ.) सुष्वाप. ॥७२ ॥ सः लक्ष्मणः (मू.) गुहेन सार्धं रामं ररक्ष.॥७३॥इति पंचमः सर्गः ॥ ५ ॥

१ आणवून. २ पसरलेल्या. ३ निजला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामाला निद्रा लागली असें पाहिल्यावर गुहाच्या नेत्रांतून सारख्या अश्रुधारा वाहूं लागल्या. तो नम्रपणें लक्ष्मणाला ह्मणाला :– ‘भाऊ ! तूं रामचंद्राकडे पाहत आहेसच. ॥ १ ॥ जो पुरुष उत्तम मंदिरांत सुवर्णमंचकीं मृदु शय्येवर शयन करीत असे, तोच आज सीतेसह दर्भांच्या आणि पर्णसमूहाच्या अंथरुणावर निजला आहे ! ॥ २ ॥ दैवानें कैकेयीला रामाच्या दुःखाला कारणभूत केलें; ह्मणूनच कैकेयीनें मंथरेच्या बुद्धीला लागून हें पाप आचरिलें !’ ॥ ३ ॥ तें ऐकून लक्ष्मण ह्मणाला :– ‘मित्रा, माझें वचन श्रवण कर.

सुप्तं रामं समालोक्य गुहः सोऽश्रुपरिप्लुतः ॥ लक्ष्मणं प्राह विनयाद्भ्रातः पश्यसि राघवम् ॥ १ ॥ शयानं कुशपत्रौघसंस्तरे सीतया सह ॥ यः शेते स्वर्णपर्यंके स्वास्तीर्णे भवनोत्तमे ॥ २ ॥ कैकेयी रामदुःखस्य कारणं विधिना कृता ॥ मन्थराबुद्धिमास्थाय कैकेयी पापमाचरत् ॥ ३ ॥ तच्छ्रुत्वा लक्ष्मणः प्राह सखे शृणु वचो मम ॥ कः कस्य हेतुर्दुःखस्य कश्च हेतुः सुखस्य वा ॥ ४ ॥

सः गुहः रामं सुप्तं समालोक्य, अश्रुपरिप्लुतः [सन्] विनयात् लक्ष्मणं प्राह–‘भ्रातः, यः भवनोत्तमे[1] स्वास्तीर्णे[2] स्वर्णपर्यंके[3] शेते[4], [तं] सीतया सह कुशपत्रौघसंस्तरे[5] शयानं[6] राघवं पश्यसि ! ॥१॥२॥ विधिना (मू.). ’ ॥ ३ ॥ (पू.) वचः शृणु – ॥ ‘(बा. पू.) हेतुः, कः सुखस्य वा हेतुः ? ॥ ४ ॥

१ उत्तम मंदिरांत. २ ज्यावर चांगलें अंथरूण आहे, अशा. ३ सुवर्णाच्या पलंगावर. ४ निजतो. ५ दर्भ, पानांच्या राशी, ह्यांच्या शय्येवर. ६ निजणाऱ्या. ७ आश्रय करून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अरे, कोणत्याही प्राण्याला दुःख किंवा सुख देण्याला कारण दुसरा आहे कोण? ॥ ४ ॥ सुख किंवा दुःख प्राप्त होण्याला कारण प्राण्यांचें पूर्वार्जित कर्म होय, दुसरें कांहीं नाहीं. ॥ ५ ॥ सुख किंवा दुःख देणारा दुसरा कोणी नाहीं. अमका अमका मला सुख अथवा दुःख देतो असें समजणें, ही दुर्बुद्धि होय. मी - सुखासाठीं उद्योग - करितों, हा अभिमानतरी व्यर्थ आहे; कारण, सर्व लोक स्वतांच्या कर्मरूपी सूत्रानें बांधले गेले आहेत; - ते स्वतंत्र मुळींच नाहींत. ईश्वर कर्माचें सूत्र चाळवील त्याप्रमाणें प्राण्यांना सुख किंवा दुःख क्रमाक्रमानें प्राप्त होतें. - ॥ ६ ॥ हितकर्ता, मित्र, शत्रु, उदासीन, द्वेषी (हाडवैरी), मध्यस्थ, बांधव ह्या सर्वांनीं स्वतांच कर्म आचरण करून ठेविलें असतें; ह्मणून ते तसतसे ठिकठिकाणीं दिसून येतात. ॥ ७ ॥ मनुष्य स्वकर्मांच्या पूर्णपणें स्वाधीन आहे. ह्मणून त्यानें, सुख किंवा दुःख जें जें कांहीं जसजसें प्राप्त हो-

स्वपूर्वार्जितकर्मैव कारणं सुखदुःखयोः ॥५॥ सुखस्य दुःखस्य न को ऽपि दाता परो ददातीति कुबुद्धिरेषा ॥ अहं करोमीति वृथा ऽभिमानः स्वकर्मसूत्रग्रथितो हि लोकः ॥ ६ ॥ सुहृन्मित्रार्युदासीनद्वेष्यमध्यस्थबान्धवाः ॥ स्वयमेवाचरन्कर्म तथा तत्र विभाव्यते ॥ ७ ॥ सुखं वा यदि वा दुःखं स्वकर्मवशगो नरः ॥ यद्यद्यथागतं तत्तद्भुक्त्वा स्वस्थमना भवेत् ॥ ८ ॥

(मू.) कारणम्.॥५॥(मू.) हि लोकः स्वकर्मसूत्रग्रथितः ॥६॥७॥ स्वकर्मवशगः नरः यत् यत् (मू.).॥८॥

१ आपलें पूर्वजन्मीं संपादिलेलें कर्मच. २ स्वतांच्या कर्मरूपी सूत्रांत बांधला गेलेला. ३ समजून येतो. ४ आपल्या कर्मांच्या स्वाधीन असणारा. ५ जसजसें येईल तसतसें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'ब्रह्मालिखित चुकत नाहीं.'

ईल, तें तें तसतसें भोगून आपलें अंतःकरण स्वस्थ ठेवावें. ॥ ८ ॥ गुहा, मला भोगप्राप्तीची तशीच भोगांच्या त्यागाची इच्छा नाहीं. ते मिळोत अथवा न मिळोत, कांहीं होवो. मी भोगांच्या कधींही स्वाधीन होणार नाहीं. - आणि माझ्यासारखीच स्थिति रामाची आहे; ह्मणून आह्मांला, कोणताही प्रसंग आला तरी, दुःख वाटत नाहीं. - ॥ ९ ॥ ज्या देशांत, ज्या वेळीं, ज्या कारणामुळें, ज्या कोणी, जें जें कांहीं शुभ किंवा अशुभ कर्म केलें असेल, त्याचें फल - तसतशा रीतींनीं - त्याला भोगावें लागतें; तें कधीं चुकायाचें नाहीं. ॥ १० ॥ ह्मणून, शुभ किंवा अशुभ कसेंही फल प्राप्त झालें तरी हर्ष किंवा शोक करण्याचें कांहीं कारण नाहीं. ब्रह्मदेवानें जें कांहीं ठरवून ठेविलें असेल, तें देवांना दैत्यांना कोणालाही चुकवितां येणार नाहीं. ॥ ११ ॥ मनुष्याचा सुखदुःखांशीं संबंध नेहमीं येतो; कारण, हें शरीर मुळीं पुण्य

न मे [1]भोगागमे वांछा न मे भोगवि[2]वर्जने ॥ आगच्छत्वथ मा ऽऽगच्छत्व [3]भोगवशगो भवे ॥९॥ यस्मिन् देशे च काले च यस्माद्वा येन केन वा ॥ कृतं शुभाशुभं कर्म भोज्यं तत्तत्र नान्यथा ॥१०॥ अलं हर्षविषादाभ्यां शुभाशुभफलोदये ॥ वि[9]धाता विहितं[10] यद्यत्तदलंघ्यं सुरासुरैः ॥ ११ ॥ सर्वदा सुखदुःखाभ्यां नरः

(बा. मू.) [4]अ [5]भवे. ॥ ९ ॥ (मू.). ॥ १० ॥ शुभा[6]शुभफलोदये हर्ष[7]विषादाभ्यां [8]अलम्. यत् यत् (मू.) [11]अलंघ्यम्. ॥ ११ ॥ नरः (बा. मू.) शरीरं उत्पन्नम्. ॥ १२ ॥

१ भोगांच्या प्राप्तीविषयीं. २ भोगांच्या त्यागाविषयीं. ३ भोगांच्या स्वाधीन राहणारा. ४ अ नाहीं. ५ होणार. ६ बऱ्या किंवा वाईट फलाची प्राप्ति झाली असतां. ७ आनंद किंवा खेद मानण्यानें. ८ पुरे. ९ ब्रह्मदेवानें. १० ठरविलेलें. ११ उल्लंघन करितां येण्याजोगें नव्हे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि पाप ह्यांच्या संयोगानें उत्पन्न झालें असल्यामुळें ह्याला सुखदुःखें चिकटलेलींच आहेत. ॥ १२ ॥ दिवसाच्या मागून रात्र आणि रात्रीच्या मागून दिवस हा क्रम जसा कधीं चुकत नाहीं, त्याप्रमाणें सुखामागून दुःख आणि दुःखाच्या मागून सुख ही परंपरा प्राण्यांना कधीं उल्लंघितां येत नाहीं. ॥ १३ ॥ पाणी आणि पंक (चिखल) हीं जशीं एकमेकांत मिळालेलीं आहेत (चिखलाच्या गोळ्यांतून, पाणी वेगळें आणि चिखल–कोरडी माती नव्हे–वेगळा, असें दाखवितां नाहीं) त्याप्रमाणेंच सुखामध्यें दुःख राहिलेलें आहे व दुःखामध्यें सुख गुरफाटलेलें आहे; एकंदरीत हीं दोन्ही एकमेकांत मिसळलेलीं आहेत, असें ह्मणतात. ॥ १४ ॥ ह्मणून विद्वान् लोक, इष्ट किंवा अनिष्ट कसेही प्रसंग आले तरी धैर्य धरून असतात. ते हा सर्व मायेचा खेळ आहे असें समजतात. ह्मणूनच त्यांना सुखप्रसंगीं आनंद वाटत नाहीं, तसाच दुःखाच्या वेळीं

प्रत्य[1]वरुद्ध्यते ॥ शरीरं पुण्यपापाभ्यामुत्पन्नं सुखदुःखवत् ॥ १२ ॥ सुखस्यानन्तरं दुःखं दुःखस्यानन्तरं सुखम् ॥ द्वयमेतद्धि जन्तूनामलंघ्यं दिनरात्रिवत् ॥ १३ ॥ सुखमध्ये स्थितं दुःखं दुःखमध्ये स्थितं सुखम् ॥ द्वयमन्योन्यसंयुक्तं प्रोच्यते [2]जलपंकवत् ॥ १४ ॥ तस्माद्धैर्येण विद्वांस ई[4]ष्टानिष्टोपपत्तिषु ॥ न हृष्यन्ति न मुह्यन्ति सर्वं मायेति भावनात्[5] ॥ १५ ॥

(मू.) अलंघ्यम्. ॥१३॥ (मू.) अन्योन्यसं[3]युक्तं प्रोच्यते. ॥१४॥ (मू.) न हृ[6]ष्यन्ति, न मु[7]ह्यन्ति.' ॥१५॥

१ संबद्ध असतो. २ पाणी व चिखल ह्यांच्याप्रमाणें. ३ एकमेकांशीं चिकटलेलें. ४ अनुकूल किंवा प्रतिकूल प्रसंग आले असतां. ५ विचारामुळें. ६ आनंद पावतात. ७ मोह पावतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मोहही पडत नाहीं.' ॥ १५ ॥ गुह आणि लक्ष्मण ह्या दोघांचा असा संवाद चालला होता, इतक्यांत आकाश स्वच्छ दिसूं लागलें (उजाडलें). रामानें स्वस्थ अंतःकरणेंकरून उदकस्पर्श केला (प्रातःकाळचे सर्व विधि आटोपले), ॥१६॥ व गुहाला ह्मटलें :– 'मित्रा, मजकरितां लवकर एक सुदृढ नौका घेऊन ये.' रामाचें भाषण ऐकिल्यावर, तो निषादांचा राजा गुह ॥ १७ ॥ स्वतांच एक दृढ सुलक्षणसंपन्न (चांगली चालणारी) नौका घेऊन आला - व ह्मणाला :- 'प्रभो, आपण सीतेला व लक्ष्मणाला बरोबर घेऊन ह्या नौकेवर आरोहण करावें. ॥ १८ ॥ मी स्वतांच ज्ञातींना बरोबर घेऊन सावधपणें ही नौका चालवून - पैल तीरीं - नेतों.' रामानें 'बरें आहे' असें ह्मणून त्या शुभलक्षणा सीतेला वर चढविलें; ॥ १९ ॥

गुहलक्ष्मणयोरेवं भाषतोर्विमलं नभः॥बभूव रामः सलिलं स्पृष्ट्वा प्रातः समाहितः ॥ १६ ॥ उवाच शीघ्रं सुदृढां नावमानय मे सखे ॥ श्रुत्वा रामस्य वचनं निषादाधिपतिर्गुहः ॥ १७ ॥ स्वयमेव दृढां नावमानिनाय सुलक्षणाम् ॥ स्वामिन्नारुह्यतां नौका सीतया लक्ष्मणेन च ॥ १८ ॥ वाहये ज्ञातिभिः सार्धमहमेव समाहितः ॥ तथेति राघवः सीतामारोप्य शुभलक्षणाम् ॥ १९ ॥

(मू.).॥१६॥उवाच–'सखे, मे (पू.)'॥(बा. उ.) रामस्य वचनं श्रुत्वा,॥१७॥स्वयं एव सुलक्षणां (पू.)॥ '(बा. उ.) नौका आरुह्यताम्.॥१८॥अहं एव (बा. पू.) वाहये.॥राघवः (उ.) सीतां आरोप्य,॥१९॥

१ भिल्लांचा राजा. २ वाहून नेतों. ३ चढवून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व तो भगवान् गुहाच्या हातांच्या आश्रयानें स्वतां नौकेवर चढला. लक्ष्मणही आगोदर आयुधें वगैरे चढवून मग आपण चढला. ॥ २० ॥ ज्ञातींसहवर्तमान स्वतां गुहानें, तीं तिघें आंत बसलीं असतां, नौका चालू केली. गंगेच्या मध्यभागीं आल्यावर जानकीनें गंगेची प्रार्थना केली :– ॥ २१ ॥ 'देवि गंगे, तुला नमस्कार असो. मी राम व लक्ष्मण ह्यांसह वनवासाहून परत आल्यें म्हणजे आदरपूर्वक मद्य, मांस, उपहार, नानाप्रकारांचे बलि, ह्यांच्या योगानें तुझी पूजा करीन.' असें भाषण केल्यावर सीता व राम हळूहळू नदी उतरून पैलतीरीं पोंचले. ॥ २२ ॥ २३ ॥

गुहस्य हस्तावालं[2]ब्य स्वयं चारुहदच्युतः ॥ आयुधादीन् समारोप्य लक्ष्मणोऽप्यारुरोह च ॥२०॥ गुहस्तान्वाहयामास ज्ञातिभिः सहितः स्वयम् ॥ गंगामध्ये गता गंगां प्रार्थयामास जानकी ॥ २१ ॥ देवि गंगे नमस्तुभ्यं निवृत्ता वनवासतः ॥ रामेण सहिता ऽहं त्वां लक्ष्मणेन च पूजये ॥ २२ ॥ सुरामांसोपहारैश्च नानाबलिभिरादृता ॥ इत्युक्त्वा पैरकूलं तौ शनैरु[6]त्तीर्य जग्मतुः[7]॥ २३॥

[1]अच्युतः (बा. मू.). ॥२०॥ (पू.) तान् वाहयामास. ॥ जानकी (उ.) – ॥ २१ ॥ '(बा. मू.) [सह] निवृ[3]त्ता अहं [4]आदृता [सती] (बा. २३ पू.) त्वां पूजये. तौ (२३ उ.). ॥ २२ ॥ २३ ॥

---

१ स्वतांच्या आनंदस्वरूपापासून भ्रंश न पावणारा ईश्वर. २ आश्रय करून. ३ परतून आलेली. ४ भक्तियुक्त, अशी. ५ दुसऱ्या तीराला. ६ उतरून. ७ गेले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो.
समू.सान्व.
सटिप्पण.

गुह परत गेला.

गुहही रामाला ह्मणाला :– ‘हे राजाधिराजा, मी तुजबरोबर येतों. मला अनुज्ञा दे. नाहीं तर मी प्राणत्याग करीन.’ ॥ २४ ॥ निषादपुत्राचें (गुहाचें) हें भाषण ऐकिल्यावर श्रीराम त्याला ह्मणाला :– ‘गुहा, मी चवदा वर्षें दंडकारण्यांत राहून पुन्हां ॥ २५ ॥ परत येईन. हें वचन सत्य - मान. - रामाचें भाषण कधींही असत्य नसतें.’ असें बोलून रामचंद्रानें त्या भक्ताला पोटाशीं धरिलें व पुनः पुनः आश्वासन दिलें. ॥ २६॥ पुढें रामानें गुहाला परत पाठविलें. तोही मोठ्या संकटानें घरीं गेला. इकडे, ह्या तिघांनीं एक पवित्र मृग मारिला, त्याच्या मांसाचा पाक केला व होम करून, ॥ २७ ॥

गुहो ऽपि राघवं प्राह गमिष्यामि त्वया सह ॥ अनुज्ञां देहि राजेंद्र नोचेत्प्राणांस्त्यजाम्यहम् ॥ २४ ॥ श्रुत्वा नै[1]षादिवचनं श्रीरामस्तमथाब्रवीत् ॥ चतुर्दश समाः स्थित्वा दण्डके पुनरप्यहम् ॥२५॥ आयास्[2]याम्यु[3]दितं सत्यं नासत्यं राममभाषितम् ॥ इत्युक्त्वाऽऽलिंग्य तं भक्तं समाश्वास्य पुनः पुनः ॥ २६ ॥ निवर्त[4]यामास गुहं सोऽपि कृ[5]च्छ्राद्ययौ गृहम् ॥ तत्र मे[6]ध्यं मृगं ह[7]त्वा प[8]क्त्वा हुत्वा च ते त्रयः ॥ २७ ॥

(बा. पू.) गमिष्यामि. ॥ राजेन्द्र, (उ.) प्राणान् सजामि.॥२४॥श्रीरामः नैषादिवचनं (बा. पू.)– ॥ अहं(उ.) स्थित्वा, पुनः अपि ॥२५॥(मू.)आलिंग्य, समाश्वास्य,॥२६॥गुहं(पू.)ययौ. ते त्रयः(उ.),२७

१ निषाद (भिल्ल) कुळांत उत्पन्न झालेल्या गुहाच्या भाषणाला. २ आयास्यामि येईन. ३ उदितम् ह्मटलेलें. ४ परतविता झाला. ५ संकटानें. ६ पवित्र अशा. ७ मारून. ८ शिजवून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भोजन केलें. पुढें सीतारामांनीं वृक्षांच्या पल्लवांवर शयन केलें. अशा रीतीनें त्यांनीं ती रात्र सुखानें घालविली. पुढें रामचंद्र सीतेला आणि लक्ष्मणाला बरोबर घेऊन ॥ २८ ॥ भरद्वाज मुनींच्या आश्रमीं जाऊन बाहेर उभा राहिला. तेथें एक बटु दृष्टीस पडला असतां रामानें त्याला ह्मटलें :– 'बटो, ॥ २९ ॥ दशरथाचा पुत्र राम सीता आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान बाहेर वनप्रदेशीं - आला - आहे, असें मुनींजवळ - जाऊन - सांग.' ॥ ३० ॥ तें ऐकतांच त्या मुनिकुमारानें तत्काल जाऊन मुनींच्या पायां पडून - त्यांना सांगितलें :- 'महाराज, रामचंद्र येऊन वनाबाहेर उभा आहे! ॥३१॥ बरोबर त्याची पत्नी आणि धाकटा भाऊही आहे.

भुक्त्वा वृक्षदले सुप्त्वा सुखमासत तां निशाम् ॥ ततो रामस्तु वैदेह्या लक्ष्मणेन समन्वितः ॥ २८ ॥ भरद्वाजाश्रमपदं गत्वा बहिरुपस्थितः ॥ तत्रैकं बटुकं दृष्ट्वा रामः प्राह च हे बटो ॥ २९ ॥ रामो दशरथिः सीतालक्ष्मणाभ्यां समान्वितः ॥ आस्ते बहिर्वनस्येति ह्युच्यतां मुनिसन्निधौ ॥ ३० ॥ तच्छ्रुत्वा सहसा गत्वा पादयोः पतितो मुनेः ॥ स्वामिन् रामः समागत्य वनाद्बहिरवस्थितः ॥ ३१ ॥ सभार्यः सानुजः श्रीमानाह मां देवसन्निभः ॥

(पू.) आसत. ॥ (उ. मू.) ॥ २८ ॥ (मू.) ॥ २९ ॥ '(बा. मू.) बहिः आस्ते' इति मुनिसन्निधौ उच्यताम्. ॥ ३० ॥ [सः] तत् श्रुत्वा, सहसा गत्वा, मुनेः (मू.). ॥३१॥ देवसन्निभः (पू.)आह– ॥

१ निजून. २ देवासारखा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या देवासारख्या तेजस्वी पुरुषानें मला सांगितलें कीं, भरद्वाजमुनींना - मी आलों आहें ही गोष्ट - योग्य दिसेल तशा रीतीनें कळव.' ॥ ३२ ॥ तें ऐकतांच मुनिश्रेष्ठ भरद्वाज लागलेच उठले आणि अर्घ्य पाद्य - वगैरे पूजासाहित्य बरोबर - घेऊन रामाजवळ आले. ॥ ३३ ॥ त्यांनीं, लक्ष्मणासह रामचंद्राचें दर्शन झालें असतां, यथाविधि पूजा करून त्याला ह्मटलें :– 'हे कमलनयना रामचंद्रा, माझ्या पर्णकुटिकेंत ॥ ३४ ॥ चल आणि, हे रघुनंदना, आपल्या पायधुळीनें तें स्थान पवित्र कर.' भरद्वाज मुनींनीं असें ह्मणून सीतेसह रामलक्ष्मणांना आश्रमांत आणिलें ॥ ३५ ॥ व भक्तिपूर्वक पुन्हां पूजा करून त्यांचें उत्तम आदरातिथ्य केलें. - पुढें भरद्वाज ह्मणाले :– 'रामचंद्रा, तपश्चर्येचें उत्तम फल कायतें तुझें दर्शन होय. - आज तुझा स-

भरद्वाजाय मुनये ज्ञापयस्व यथोचितम् ॥३२॥ तच्छ्रुत्वा सहसोत्थाय भरद्वाजो मुनिश्वरः ॥ गृहीत्वार्घ्यं च पाद्यं च रामसामीप्यमाययौ ॥३३॥ दृष्ट्वा रामं यथान्यायं पूजयित्वा सलक्ष्मणम् ॥ आह मे पर्णशालां भो राम राजीवलोचन ॥ ॥ ३४ ॥ आगच्छ पादरजसा पुनीहि रघुनन्दन ॥ इत्युक्त्वोटजमानीय सीतया सह राघवौ ॥ ३५ ॥ भक्त्या पुनः पूजयित्वा चकारातिथ्यमुत्तमम् ॥ अद्याहं तपसः पारं गतोऽस्मि तव संगमात् ॥ ३६ ॥

'(उ.) ज्ञापयस्व.' ॥३२॥ मुनीश्वरः भरद्वाजः (मू.) गृहीत्वा, रामसामीप्यं आययौ. ॥३३॥ सलक्ष्मणं रामं (मू.) मे पर्णशालां॥३४॥(मू.)उटजं आनीय,॥३५॥(पू.)चकार.॥ 'अहं तव संगमात्(मू.). ॥३६॥

१ योग्य दिसेल तसें. २ कळव. ३ रामाजवळ. ४ झोंपडीला. ५ पायधुळीनें. ६ पवित्र कर. ७ आश्रमास. ८ अतिथीच्या योग्य सत्काराला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मागम घडला, त्या अर्थी माझी तपश्चर्या परिपूर्ण झाली. ॥ ३६ ॥ रामा, पूर्वी झालेलें, सध्यां होत असलेलें आणि पुढें होणारें असें तुझें सर्व चरित्र मला विदित आहे. तूं साक्षात् परमेश्वर असून मायेनें कांहीं कार्यासाठीं मनुष्यरूप स्वीकारून राहिला आहेस, हें मी जाणतों. ॥ ३७ ॥ पूर्वी ब्रह्मदेवानें प्रार्थना केल्यावरून तूं ज्या कार्यासाठीं अवतार घेतलास, ज्याकरितां वनवास करीत आहेस व पुढें जें कांहीं करणार आहेस, ॥ ३८ ॥ तें सर्व मी, तुझ्याच उपासनेनें प्राप्त झालेल्या ज्ञानदृष्टीनें, जाणतों. ह्यापेक्षां अधिक म्यां - पामरानें - तुजविषयीं काय बरें वर्णन करावें? रघुवीरा, मी आज कृतकृत्य झालें; ॥ ३९ ॥ कारण, तुझें मला दर्शन मिळालें. तूं प्रकृतीचा नियंता परमेश्वर ककुत्स्थ[3] राजाच्या वं-

ज्ञातं राम तवोदन्तं[1] भूतं चागामिकं[2] च यत् ॥ जानामि त्वां परात्मानं मायया कार्यमानुषम् ॥ ३७ ॥ यदर्थमवतीर्णो ऽसि प्रार्थितो ब्रह्मणा पुरा ॥ यदर्थं वन-वासस्ते यत्करिष्यसि वै पुरः ॥३८॥ जानामि ज्ञानदृष्ट्या ऽहं जातया त्वदुपास-नात् ॥ इतःपरं त्वां किं वक्ष्ये कृतार्थो ऽहं रघूत्तम ॥ ३९ ॥ यस्त्वां पश्यामि काकुत्स्थं[3] पुरुषं प्रकृतेः परम् ॥ रामस्तमभिवाद्याह सीतालक्ष्मणसंयुतः॥४०॥

राम, यत्(पू.)[तत्]ज्ञातं.॥(उ.)जानामि.॥३७॥पुरा ब्रह्मणा: प्रार्थितः,(मू.॥३८॥[तद्] अहं (पू.)जात-या ज्ञानदृष्ट्या जानामि.॥(उ.)अहं कृतार्थः॥३९॥(पू.)त्वां पश्यामि.'॥(उ.)रामः तं अभिवाद्य, आह-

१ उदन्तम् वृत्तांताला. २ पुढें होणाऱ्या. ३ ककुद् म्हणजे बैलाचें वशिंड. स्थ म्ह० बसणारा. ककुत्स्थ म्ह० बैलाच्या वशिंडावर बसणारा. रघुवंशांतील एक राजा (पुरंजय) बैलाच्या वशिंडावर बसून फिरे, म्हणून त्याला "ककुत्स्थ" असें म्हणत. काकुत्स्थ म्ह० त्या ककुत्स्थाचा गोत्रज.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वाल्मीकीच्या आश्रमीं आले.

शांत अवतरला आहेस.' नंतर सीता आणि लक्ष्मण ह्यांसह रामचंद्रानें त्या मुनींना वंदन करून ह्मटलें:— ॥ ४० ॥ 'अहो ब्रह्मनिष्ठ महाराज, आह्मांसारख्या क्षत्रियबंधूंवर आपण अनुग्रह करीत असावें.' असा परस्परांचा संवाद झाला. त्या दिवशीं तीं तिघेंजणें भरद्वाज मुनींजवळ राहिलीं. ॥ ४१ ॥ सकाळीं उठल्यावर, त्या स्नान केलेल्या मुनींनीं रामाला - पुढें जाण्याचा - मार्ग दाखविला. - नंतर भरद्वाजऋषींनीं मार्ग दाखविण्यासाठीं दिलेल्या - मुनिकुमारांसह रामचंद्र त्या मार्गानें यमुना उतरून ॥ ४२ ॥ चित्रकूट पर्वताजवळ आला. ह्या ठिकाणीं वाल्मीकि ऋषींचा आश्रम होता. जातां जातां रामचंद्र त्या वाल्मीकि ऋषींच्या आश्रमीं पोंचला. तेथें ऋषिजन पुष्कळ होते. ॥ ४३ ॥ तें स्थल अनेक जातींच्या पशुपक्ष्यांनीं व्यापलें

अनुग्राह्यास्त्वया ब्रह्मन्वयं क्षत्रियबान्धवाः ॥ इति संभाष्य ते ऽन्योन्यमुषित्वा मुनिसन्निधौ ॥ ४१ ॥ प्रातरुत्थाय यमुनामुत्तीर्य मुनिदारकैः ॥ कृताप्लवेन मुनिना दृष्टमार्गेण राघवः ॥ ४२ ॥ प्रययौ चित्रकूटाद्रिं वाल्मीकेर्यत्र चाश्रमः॥ गत्वा रामो ऽथ वाल्मीकेराश्रमं ऋषिसंकुलम् ॥ ४३ ॥ नानामृगद्विजाकीर्णं नित्यपुष्पफलाकुलम् ॥ तत्र दृष्ट्वा समासीनं वाल्मीकिं मुनिसत्तमम् ॥ ४४ ॥

'ब्रह्मन्, (पू.) वयं अनुग्राह्याः.' ॥ ते अन्योन्यं (उ.) उषित्वा[1], ॥४१॥ राघवः प्रातः उत्थाय, कृताप्लवेन[2] मुनिना दृष्टमार्गेण[3] मुनिदारकैः[4] [सह] यमुनां उत्तीर्य[5],॥४२॥यत्र वाल्मीकेः आश्रमः, [तं] (४३पू.) प्रययौ.॥ अथ रामः ऋषिसंकुलं(४४पूर्वार्ध) वाल्मीकेःआश्रमं गत्वा(४४उ.)दृष्ट्वा,॥४३॥४४॥

१ राहून. २ केलें स्नान ज्यानें, अशा. ३ दृष्टमार्गेण=दर्शितमार्गेण दाखविलेल्या मार्गानें. ४ ऋषिकुमारांसह. ५ उतरून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असून फुलांनीं आणि फलांनीं सतत भरलें होतें. त्याठिकाणीं बसलेले श्रेष्ठ मुनि वाल्मीकि दृष्टीस पडले असतां, ॥ ४४ ॥ राम, लक्ष्मण आणि सीता ह्या तिघांनीं त्यांना शिरसा वंदन केलें. वाल्मीकि ऋषि - अग्रभागीं पाहतात तों - साक्षात् लक्ष्मीपतीचा अवतार त्रैलोक्यसुंदर राम त्यांच्या दृष्टीस पडला; ॥ ४५ ॥ त्याच्या बरोबर जानकी आणि लक्ष्मण हीं दोघें होतीं, जटांच्या मुकुटानें तो सुंदर दिसत होता, त्याचें रूप मदनासारखें असून नेत्र कमलाप्रमाणें मनोहर होते. ॥ ४६ ॥ त्याला अवलोकन करितांच आश्चर्यानें मुनींची दृष्टि स्तब्ध झाली (पापण्या हलत नाहींतशा झाल्या). त्यांनीं तत्काल उठून परमानंदरूपी रामचंद्राला आलिंगन दिलें. ह्या वेळीं त्यांच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले. ॥ ४७ ॥ पुढें वाल्मीकिमुनींनीं

ननाम शिरसा रामो लक्ष्मणेन च सीतया॥ दृष्ट्वा रामं रमानाथं वाल्मीकिर्लोकसुन्दरम् ॥४५॥ जानकीलक्ष्मणोपेतं जटामुकुटमण्डितम्[1] ॥ कन्दर्पसदृशाकारं[2] कमनीयाम्बुजेक्षणम्[3] ॥ ४६ ॥ दृष्ट्वैव सहसोत्तस्थौ विस्मयानिमिषेक्षणः[4] ॥ आलिंग्य परमानन्दं रामं हर्षाश्रुलोचनः ॥ ४७ ॥ पूजयित्वा जगत्पूज्यं भक्त्या ऽर्घ्यादिभिरादृतः ॥

(पू.) शिरसा ननाम.॥वाल्मीकिः(वा. उ.)रामं दृष्ट्वा,॥४५॥(मू.)॥४६॥(पू.)उत्तस्थौ. ॥ हर्षाश्रुलोचनः [सन] (उ.) आलिंग्य, ॥ ४७ ॥ आदृतः[सन]जगत्पूज्यं तं अर्घ्यादिभिः पूजयित्वा [स्थितः]. ॥

१ जटांच्या मुकुटानें सुशोभित, अशा. २ मदनासारखें रूप ज्याचें, अशा. ३ ज्याचे नेत्र मनोहर व कमळासारखे, अशा. ४ आश्चर्यानें ज्याच्या डोळ्यांच्या पापण्या लवत नाहींतशा झाल्या, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

' राहायाला स्थल दाखवा.'

सर्व जगाला पूज्य अशा त्या रामचंद्राची अर्घ्यादिक उपचारांनीं आदरपूर्वक भक्तीनें पूजा केली, मधुर अशीं फळें आणि मुळें - आणविलीं, आणि 'बा रामा! हें फळ मधुर आहे, एवढें खा.' अशी वारंवार - विनंति करून त्याच्याकडून उपहार करविला. ॥ ४८ ॥ पुढें रामचंद्र नम्रतापूर्वक हात जोडून वाल्मीकिमुनींला ह्मणाला :– 'महाराज, पित्याची आज्ञा मान्य करून आह्मी दंडकारण्यांत आलों आहों. ॥ ४९ ॥ आपण सर्व जाणतच आहां तेव्हां ह्याचें कारण मी कशाला सांगूं? (तें सांगण्याची आवश्यकता नाहीं.) आतां, जेथें मला सुखानें राहतां येईल असें एखादें स्थान आपण सांगून (दाखवून) द्या. ॥ ५० ॥ आपण सांगाल, त्याठिकाणीं मी सीतेसहवर्तमान कांहीं काल घालवीन.' रामचंद्रानें असें भाषण केलें असतां वाल्मीकिमुनि हांसत हांसत त्याला ह्मणाले :– ॥ ५१ ॥ "रामा, तूंच

फलमूलैः स मधुरैर्भोजयित्वा च लालितः[1] ॥४८॥ राघवः प्राञ्जलिः प्राह वाल्मीकिं विनयान्वितः ॥ पितुराज्ञां पुरस्कृत्य दण्डकानागता वयम् ॥४९॥ भवन्तो यदि जानान्ति किं वक्ष्यामो ऽत्र कारणम् ॥ यत्र मे सुखवासाय भवेत्स्थानं वदस्व तत् ॥ ५० ॥ सीतया सहितः कालं किंचित्तत्र नयाम्यहम् ॥ इत्युक्तो राघवेणासौ मुनिः सस्मितमब्रवीत् ॥ ५१ ॥ त्वमेव सर्वलोकानां निवासस्थानमुत्तमम्[3] ॥

[तेन] मधुरैः (बा. उ.) सः॥४८॥राघवः (बा. पू.) [सन्] वाल्मीकिं प्राह–॥ '(उ.). ॥४९॥ (पू.)किं वक्ष्यामः[2]?॥(उ.)स्थानं वदस्व.॥५०॥(बा. पू.)तत्र किंचित् कालं नयामि.'॥राघवेण(उ.)–॥५१॥(मू.)॥

१ गौरविलेला. २ सांगूं. ३ राहण्याला जागा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्व लोकांचें राहण्याचें उत्तम स्थान आहेस. तसेंच सर्व भूतें हीं तुझीं राहतीं घरें आहेत. ॥ ५२ ॥ रघुनंदना, हीं तुझीं सामान्य स्थानें सांगून दिलीं. आतां तूं "सीतेसह - राहण्याला योग्य स्थान कोणतें ?' - असा विशेष प्रश्न विचारीत आहेस, ॥ ५३ ॥ तर, हे रघुवीरा, तुझें नित्य वासाचें स्थान कोणतें तें सांगतों. लोकामध्यें जे पुरुष शांत असून - अमुक बरा अमुक वाईट अशी भेददृष्टि न ठेवितां सर्वत्र - सम दृष्टि ठेवीत असतील व कोणत्याही प्राण्याशीं द्वेषभाव न धरितां नित्य तुझी भक्ति करीत असतील, त्यांचें हृदय हें तुझें सर्वोत्कृष्ट मंदिर होय. ॥ ५४ ॥ जो मनुष्य, विहित आणि निषिद्ध अशीं सर्व प्रकारांचीं कर्में सोडून देऊन नेहमीं तुझी सेवा करीत असेल, त्याचें हृदय हेंच सीतेसह तुझें सुखमंदिर होय. ॥ ५५ ॥

तवापि सर्वभूतानि निवास[1]सदनानि हि ॥ ५२ ॥ एवं साधारणं स्थानमुक्तं ते रघुनन्दन ॥ सीतया सहितस्येति विशेषं पृच्छत[2]स्तव ॥ ५३ ॥ तद्वक्ष्यामि रघुश्रेष्ठ यत्ते नि[3]यतमन्दिरम् ॥ शान्तानां सम[4]दृष्टीनामद्वे[5]ष्टॄणां च जन्तुषु ॥ त्वामेव भजतां नित्यं हृदयं तेऽधिमन्दिरम् ॥ ५४ ॥ धर्माधर्मान्परित्यज्य त्वामेव भजतोऽनिशम् ॥ सीतया सह ते राम तस्य [6]हृत्सुखमन्दिरम् ॥ ५५ ॥

'(मू.) ॥५२॥ रघूनन्दन, ते (पू.) उक्तं ॥ (उ.) ॥५३॥ (पू.) तत् वक्ष्यामि. ॥ (बा. मू.) ते नित्यं अधिमन्दिरम्. ॥ ५४ ॥ (पू.) भजतः ॥ हृत् (उ.) ॥ ५५ ॥

---

१ राहण्याचीं घरें. २ विचारणाऱ्या. ३ ठरींव घर. ४ सर्व ठिकाणीं दृष्टि सारखी ज्यांची (ज्यांना 'अमुक चांगला, अमुक वाईट' असें वाटत नाहीं), अशा. ५ द्वेष न करणाऱ्या. ६ हृत् हृदय.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जो पुरुष - अहंता–ममता, जय–पराजय, लाभ–हानि इत्यादि - द्वंद्वें सोडून निरिच्छ होत्साता तुला शरण येऊन तुझ्या नाममंत्राचा जप करीत असेल, त्याचें हृदय हें तुझें उत्तम मंदिर होय. ॥ ५६ ॥ ज्या पुरुषांनीं अहंकार, प्रीति व द्वेष सोडिले असतील आणि मातीचें ढेंकूळ, दगड किंवा सोनें ह्यांवर सम दृष्टि ठेवून शांति स्वीकारिली असेल, त्यांचें हृदय हेंच तुझें गृह होय. ॥ ५७ ॥ जो मनुष्य तुझ्या ठिकाणीं मन व बुद्धि ठेवून नित्य संतुष्ट असल आणि आपलीं सर्व कर्में तुला अर्पण करीत असेल, त्याचें मन हेंच तुझें सुंदर गृह होय. ॥ ५८ ॥ अप्रिय वस्तूचा समागम झाला असतां जो द्वेष करील नाहीं किंवा प्रिय वस्तूची प्राप्ति झाली तरी ज्याला आनंद वाटत नाहीं तर ' ही सर्व माया आहे ' असा निश्चय ठेवून जो तुझें भजन करीत असतो, त्या पुरुषाचें मन तुझें गृह होय. ॥ ५९ ॥

त्वन्मन्त्रजापको यस्तु त्वामेव शरणं गतः ॥ निर्द्वन्द्वो[1] निःस्पृहस्तस्य[2] हृदयं ते सुमन्दिरम् ॥ ५६ ॥ निरहंकारिणः शान्ता ये रागद्वेषवर्जिताः ॥ समलोष्टाश्मकनकास्तेषां[3] ते हृदयं गृहम् ॥ ५७ ॥ त्वयि दत्तमनोबुद्धिर्यः[4] संतुष्टः सदा भवेत्॥त्वयि संत्यक्तकर्मा[5] यस्तन्मनस्ते शुभं गृहम् ॥५८॥यो न द्वेष्ट्यप्रियं[6] प्राप्य प्रियं प्राप्य न हृष्यति॥ सर्वं मायेति निश्चित्य त्वां भजेत्तन्मनो गृहम् ॥ ५९ ॥

यः (बा. मू.). ॥५६॥ ये (मू.) ते गृहम्.॥५७॥यः (मू.). ॥५८॥ यः अप्रियं प्राप्य, (मू.). ॥ ५९ ॥

१ शीत–उष्ण, लाभ–हानि, जय–अपजय ह्या जोड्यांना प्रत्येकीं ' द्वंद्व ' ह्मणतात. तीं द्वंद्वें ज्याला नाहींत, असा. २ निरिच्छ. ३ढेंकूळ, दगड आणि सोनें ह्यांना सारखीं मानणारे.४लावलीं मन व बुद्धि ज्यांनीं, असे.५अर्पिलें कर्म ज्यानें, असा.६द्वेष्टि द्वेष करितो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

-'(१) जन्मास येणें, (२) उत्पत्तीनंतर असणें, (३) वाढणें, (४) पूर्ण होणें, (५) क्षीण होऊं लागणें, व (६) नाश पावणें हे - सहा भावविकार देहाला लागू आहेत आत्म्याला नाहींत, क्षुधा आणि तृषा हे विकार प्राणाचे आहेत, तसेच सुख, दुःख आणि भीति हे धर्म बुद्धीचे होत - आत्म्याचे नव्हत, -' अशी ज्याची दृष्टि असते, ॥ ६० ॥ तो पुरुष संसाराच्या - प्राप्तीला कारण अशा पुण्य आणि पाप ह्या - धर्मांपासून मुक्त असतो; त्याचें अंतःकरण हें तुझें गृह होय. ॥ ६१ ॥ ' रामचंद्र सर्वांच्या बुद्धिवृत्तींत वास करितो, तो ज्ञानरूपी आहे, त्याचें स्वरूप - भूत, भविष्य, वर्तमान अशा - तीन्ही काळीं नष्ट होत नाहीं, त्याला परिणाम व द्वैतभाव मुळींच नाहींत; तो श्रेष्ठ ईश्वर सर्वत्र भरला असूनही अलिप्त आहे, ' अशी तुझ्याबद्दल ज्यांची दृष्टि असेल त्यांच्या हृदयकमळीं तूं सीतेसहवर्तमान वास कर. ॥ ६२ ॥ निरंतर ध्यानाच्या अभ्यासानें ज्यांचीं मनें तुझ्या स्वरूपीं निश्चल झालीं असतील, तुझ्या चरणाची सेवा करण्यांत जे त-

षड्[१]भावादिविकारान्यो देहे पश्यति नात्मनि॥क्षुत्[२] तृट्[३] सुखं भयं दुःखं प्राणबुद्ध्यो-
र्निरीक्षते॥ ६०॥संसारधर्मैर्निर्मुक्तस्तस्य ते मानसं गृहम्॥ ६१॥पश्यन्ति ये सर्वगुहा-
शयस्थं[४] त्वां चिद्घनं[५] सत्यमनन्तमेकम्॥अलेपकं सर्वगतं वरेण्यं तेषां हृदब्जे
सह सीतया वस॥ ६२॥निरन्तराभ्यासदृढीकृतात्मनां[६] त्वत्पादसेवापरिनिष्ठितानाम्[७] ॥
यः (बा. मू.) ॥६०॥ (मू.)ते गृहम्.॥६१॥(बा. मू.)पश्यन्ति, तेषां हृदब्जे सीतया सह वस.॥६२॥(पू.)॥

१ बालकांड पत्र २३ टीप ४ पहा. २ क्षुधा. ३ तृषा. ४ सर्वांच्या बुद्धिवृत्तींत राहणाऱ्या. ५ ज्ञानपूर्ण, अशा. ६ सतत अभ्यासानें ज्यांचीं चित्तें दृढ झालीं, अशा. ७ तुझी चरणसेवा करण्यांत तत्पर अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्पर असतील व तुझ्या नामकीर्तनानें ज्यांचीं पापें नष्ट झालीं असतील, त्यांच्या हृदयकमलांत सीतेसह तुझें घर आहे. ॥ ६३ ॥ रामा, तुझ्या नामाचा महिमा कोण वर्णू शकेल? आणि तो वर्णावा तरी कोणत्या प्रकारानें? तुझ्या नामाच्या प्रभावानेंच मी ह्या ब्रह्मर्षिपदवीला प्राप्त झालों. ॥ ६४ ॥ मी पूर्वीं भिल्लांच्या संगतीनें भिल्लांमध्यें वाढलों. माझ्या ठिकाणीं केवळ जन्मानें ब्राह्मणपणा होता; बाकी मी नेहमीं शूद्राप्रमाणें वागण्यांत तत्पर असें. ॥ ६५ ॥ इंद्रियें माझ्या अगदीं स्वाधीन नव्हतीं. - त्यांच्या अधीन झाल्यामुळें मी एका शूद्रस्त्रीशीं रममाण झालों. - तिच्या ठिकाणीं मला पुष्कळ पुत्र झाले. पुढें मी चोरांच्या समागमानें चोर झालों. ॥ ६६ ॥ - हातांत - नित्य धनुष्यबाण धारण करीत असल्यामुळें मी प्राण्यांना प्रत्यक्ष

त्वन्नाम[1]कीर्त्या हतकल्[2]मषाणां सीतासमेतस्य गृहं हृदब्जे ॥ ६३ ॥ राम त्वन्नाममहिमा वर्ण्यते केन वा कथम् ॥ यत्प्रभावादहं राम ब्रह्मर्षित्वमवाप्तवान् ॥
॥ ६४ ॥ अहं पुरा किरातेषु किरातैः सह वर्धितः ॥ जन्ममात्रद्विजत्वं मे शूद्राचाररतः सदा ॥ ६५ ॥ शूद्रायां बहवः पुत्रा उत्पन्ना मेऽजितात्मनः ॥ ततश्चोरैश्च सं[6]गम्य चोरोऽहमभवं पुरा॥६६॥धनुर्बाणधरो नित्यं जीवानामन्तकोपमः ॥ ६७ ॥

(मू.) हृद्[3]ब्जे सीतासमेतस्य [ते] गृहं. ॥६३॥ (पू.) वर्ण्यते ! ॥ अहं (उ.) ॥ ६४ ॥ ६५ ॥ (पू.) मे उत्पन्नाः. ॥ अहं पुरा (उ.). ॥ ६६ ॥ (मू.) [आसं.] ॥ ६७ ॥

१ तुझ्या नामकीर्तनानें. २ नाहींशीं झालीं पापें ज्यांचीं, अशा. ३ हृदयकमलांत. ४ सीतायुक्त, अशा. ५ नाहीं स्वाधीन मन ज्याच्या असा. ६ मिळून. ७ मृत्यूसारखा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मृत्यूसारखा - भासत असें! -॥६७॥ एके प्रसंगीं एका मोठ्या अरण्यामध्यें, तेजस्वी असे साक्षात् सप्तऋषि माझ्या दृष्टीस पडले. त्यांची कांति अग्नीप्रमाणें किंवा सूर्यासारखी होती. ॥ ६८ ॥ लोभानें व त्याचें सर्वस्व हरण करावें अशा इच्छेनें, 'उभे राहा,' असें ह्मणत मी त्यांच्या मागें धांवत सुटलों. मला पाहून मुनींनीं विचारिलें:—'हे अधम ब्राह्मणा, तूं आमच्या आंगावर कां येत आहेस?' ॥ ६९ ॥ मी त्यांना ह्मटलें:—'श्रेष्ठ मुनीहो! तुमच्यापासून कांहीं हरण करावें एवढ्यासाठीं - मी आलों आहें. - मला पुष्कळ बायकामुलें आहेत. त्यांना भूक लागली असेल! ॥ ७० ॥ त्यांच्या निर्वाहासाठीं मी पर्वतावर व अरण्यांत फिरत असतों.' - मला पाहतांच सर्व प्राण्यांना भय वाटत असे; पण - ह्या मुनींना किंचित् देखील भीति वाटली नाहीं. माझें

एकदा मुनयः सप्त दृष्टा महति कानने ॥ साक्षान्मया प्रकाशन्तो ज्वलनार्कसमप्रभाः ॥ ६८ ॥ तानन्वधावं लोभेन तेषां सर्वपरिच्छदान् ॥ ग्रहीतुकामस्तत्राहं तिष्ठ तिष्ठेति चाब्रवम् ॥ दृष्ट्वा मां मुनयोऽपृच्छन्किमायासि द्विजाधम ॥ ६९ ॥ अहं तानब्रवं किंचिदादातुं मुनिसत्तमाः ॥ पुत्रदारादयः सन्ति बहवो मे बुभुक्षिताः ॥ ७० ॥ तेषां संरक्षणार्थाय चरामि गिरिकानने ॥ ततो मामूचुरव्यग्राः पृच्छ गत्वा कुटुम्बकम् ॥ ७१ ॥

(बा. मू.) सप्त मुनयः दृष्टाः॥६८॥(बा. दोन अर्धें)तान् अन्वधावम्॥मुनयः मां दृष्ट्वा(बा. मू.) ? ॥६९॥ (पू.). ॥ मे बहवः (उ.) सन्ति. ॥७०॥ (बा. पू.) चरामि.॥ अव्यग्राः [ते] (उ.) गत्वा, पृच्छ.॥७१॥

१ तेजस्वी. २ अग्नि आणि सूर्य ह्यांसारखी कांति ज्यांची, असे. ३ सर्व सामग्रीला (मालमत्तेला). ४ घेऊं इच्छिणारा. ५ मागें धांवलों. ६ विचारूं लागले. ७ मुलगे बायका वगैरे. ८ पर्वतांवर व अरण्यांत. ९ व्यग्र (भयभीत) न झालेले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बोलणें ऐकून घेतल्यावर ते मला म्हणाले :–' अरे! घरीं जा आणि आपल्या कुटुंबांतील मनुष्यांना विचार कीं, ॥ ७१ ॥ मी प्रतिदिनीं ज्या कांहीं पापांच्या राशी करितों, त्यांचे वांटेकरी तुह्मी आहां कीं नाहीं. प्रत्येक मनुष्याला वेगवेगळें - विचार बरें. - ॥ ७२ ॥ तूं परत येईपर्यंत आह्मी येथें राहूं, हा निश्चय जाण. ' मी ' बरें आहे ' असें ह्मणून घरीं गेलों व मुनींनीं सांगितलें होतें त्याप्रमाणें ॥ ७३ ॥ मुलें, बायका इत्यादिकांना विचारूं लागलों. रामचंद्रा! त्यांनीं मला उत्तर दिलें:–'तें सर्व पाप तुझें तुला! आह्मी केवळ तूं मिळवून आणशील त्या द्रव्यादिकाच्या उपभोगाचे मात्र वांटेकरी!!' ॥ ७४ ॥ तें ऐकतांच मला वाईट वाटलें. - मी, ' हीं बायकामुलें कोणत्याही प्रकारें उपकार करणारीं नाहींत ' असा - विचार करून, ज्या ठिकाणीं ते सदय मनाचे मुनि उभे होते तेथें पुन्हां परत आलों. ॥ ७५ ॥ मुनींचें दर्शन होतांच माझें अंतःकरण

यो यो मया प्रतिदिनं क्रियते पापसंचयः[1]॥यूयं तद्भागिनः किंवा नेति वेति पृथक् पृथक्॥७२॥वयं स्थास्यामहे[2] तावदागमिष्यसि निश्चयः॥तथेत्युक्त्वा गृहं गत्वा मुनिभिर्यदुदीरितम्[3]॥७३॥आपृच्छं पुत्रदारादींस्तैरुक्तो ऽहं रघूत्तम॥पापं तवैव तत्सर्वं वयं तु फलभागिनः॥७४॥तच्छ्रुत्वा जातनिर्वेदो[4] विचार्य पुनरागमम् ॥ मुनयो यत्र तिष्ठन्ति करुणापूर्णमानसाः॥७५॥ मुनीनां दर्शनादेव शुद्धान्तःकरणो ऽभवम्॥

मया (पू.) क्रियते.॥(उ.)[पृच्छ].॥७२॥[यावत्]आगमिष्यसि, तावत् (बा. मू.) ॥७३॥ पुत्रदारादीन् (मू.)उक्तः,॥'तत् सर्वं (उ.).'॥७४॥(मू.)मुनयः तिष्ठन्ति,[तत्र]पुनः आगमम्. ॥७५॥ अहं(बा. पू.) ॥

१ पापांचा राशि. २ उभे राहूं. ३ ह्मटलेलें. ४ झालें वैराग्य ज्याला, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शुद्ध झालें. मी धनुष्य वगैरे टाकून देऊन त्यांना साष्टांग नमस्कार घातला - व विनंति केली - ॥ ७६ ॥ कीं, श्रेष्ठ मुनिहो! मी नरकसमुद्रांत जात (पडत) आहें. माझें रक्षण करा. मी पुढें लोटांगण घालीत आहें, असें पाहून ते श्रेष्ठ मुनि मला ह्मणाले:– ॥ ७७ ॥ 'ऊठ. ऊठ. तुझें कल्याण होवो. साधूंचा समागम कधीं निष्फळ होत नाहीं. आह्मी तुला थोडासा उपदेश करितों; त्याच्या योगानें तूं - संसारदुःखांतून - मुक्त होशील.' पुढें ते मुनि एकमेकांकडे पाहून विचार करून आपसांत - ह्मणाले :-'हा ब्राह्मण अधम व दुराचारी असल्यामुळें ॥७८॥ उपेक्षा करण्यासच योग्य आहे (ह्याला उपदेश न करितां उदासीन राहावें हेंच बरें असें खरें) तथापि, सदाचरणी पुरुषांनीं शरण आलेल्या मनुष्याचें, त्याला मोक्षमार्गाचा उपदेश करून, प्रयत्नानें रक्षण करावें.' ॥ ७९ ॥ रामा, - त्या ऋषींनीं परस्परांशीं - असें भाषण केलें - व तोंच निश्चय ठरवून, - तुझ्या

धनुरादीन्परित्यज्य दण्डवत्पतितो ऽस्म्यहम्॥७६॥ रक्षध्वं मां मुनिश्रेष्ठा गच्छन्तं निरयार्णवम्॥इत्यग्रे पतितं दृष्ट्वा मामूचुर्मुनिसत्तमाः॥७७॥उत्तिष्ठोत्तिष्ठ भद्रं ते सफलः सत्समागमः॥उपदेक्ष्यामहे तुभ्यं किंचित्तेनैव मोक्ष्यसे ॥ परस्परं समालोच्य दुर्वृत्तो ऽयं द्विजाधमः॥७८॥उपेक्ष्य एव सद्वृत्तैस्तथा ऽपि शरणं गतः ॥ रक्षणीयः प्रयत्नेन मोक्षमार्गोपदेशतः॥७९॥इत्युक्त्वा राम ते नाम व्यत्यस्ताक्षरपूर्वकम् ॥ एकाग्रमनसा ऽत्रैव मरेति जप सर्वदा ॥ ८० ॥

(बा. मू.). ॥ ७६ ॥ (पू.) गच्छन्तं मां रक्षध्वं. ॥ मुनिसत्तमाः (उ.) ॥ ७७ ॥ (पू.) सफलः, ॥ तुभ्यं किञ्चित् (उ.)॥७८॥ उपेक्ष्यः एव. तथापि (बा. मू.) रक्षणीयः. ॥ ७९ ॥ (बा. मू.) जप. ॥ ८० ॥

१ टाकून. २ नरकरूपी समुद्राला. ३ उपदेश करूं. ४ मुक्त होशील. ५ दुराचारी. ६ उलटीं अक्षरें ज्याचें स्वरूप अशा. ७ 'मरा' अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो. सम्.सान्व. सटिप्पण. ॥ ५९ ॥

अयो. कां. सर्ग ६ 'मी नामजप केला.'

नांवाचा 'मरा' अशीं विपरीत अक्षरें ह्मणून एकाग्र मनानें त्याच ठिकाणीं बसून जप करण्याविषयीं - मला आज्ञा दिली. - ॥ ८० ॥ शेवटीं, 'आह्मीं पुन्हां परत येऊं तोंपर्यंत सांगितल्याप्रमाणें नित्य जप करीत जा,' असें सांगून ते दिव्यरूपी सर्व मुनि निघून गेले. ॥ ८१ ॥ मी त्यांच्या उपदेशाप्रमाणें तसें करीत गेलों. एकाग्र मनानें जप करितां करितां अनायासानेंच मला बाह्य विषयांची विस्मृति पडत गेली. ॥ ८२ ॥ मी सर्वसंगपरित्याग केला व शरीर मुळींच हालवलें नाहीं. अशा रीतीनें बरेच दिवस निघून गेले असतां माझ्या देहावर वारूळ वाढलें ! ॥ ८३ ॥ पुढें सहस्त्र युगें लोटल्यावर ते ऋषि पुन्हां परत आले व मला 'बाहेर ये' असें ह्मणाले. तें ऐकून मी तत्काल उठून उभा राहिलों, ॥ ८४ ॥ व जसा धुक्यांतून सूर्य बाहेर यावा

आगच्छामः पुनर्यावत्तावदुक्तं सदा जप ॥ इत्युक्त्वा प्रययुः सर्वे मुनयो दिव्यदर्शनाः ॥८१॥ अहं यथोपदिष्टं तैस्तथाऽकरवमञ्जसा ॥ जपन्नेकाग्रमनसा बाह्यं विस्मृतवानहम् ॥८२॥ एवं बहुतिथे काले गते निश्चलरूपिणः ॥सर्वसंगविहीनस्य वल्मीको[1]ऽभून्ममोपरि ॥ ८३ ॥ ततो युगसहस्रान्ते ऋषयः पुनरागमन् ॥ मामूचुर्निष्क्रमस्वेति[2] तच्छ्रुत्वा तूर्णमुत्थितः ॥ ८४ ॥ वाल्मीकान्निर्गतश्चाहं नीहारा[3]दिव भास्करः ॥

यावत् पुनः (मू.) मुनयः प्रययुः. ॥ ८१ ॥ अहं तैः (बा. पू.). ॥ अहं एकाग्रमनसा (उ.).॥८२॥ (बा. मू.) वल्मीकः अभूत्. ॥ ८३ ॥ (मू.). ॥ ८४ ॥ अहं (पू.) इव निर्गतः. ॥ ॥ ५९ ॥

१ वारूळ. २ निष्क्रमस्व बाहेर नीघ. ३ धुक्यांतून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याप्रमाणें, वारुळांतून बाहेर पडलों. तेव्हां मुनिगण मला म्हणालेः– ‘ हे मुनिश्रेष्ठा, तुला वल्मीकि - अशी संज्ञा आह्मी देतों; - ॥ ८५ ॥ कारण, आतां तूं वल्मीकापासून (वारुळापासून) उत्पन्न झालास, हा तुझा दुसरा जन्म झाला. ’ ॥ हे रघुकुलश्रेष्ठा, इतकें भाषण करून ते मुनि स्वर्गमार्गानें निघून गेले. ॥ ८६ ॥ रामा, मी तुझ्या नामाच्या प्रभावानें ह्या स्थितीस प्राप्त झालों. आज साक्षात् सीता आणि लक्ष्मण ह्यांसह कमलनयन रामचंद्राचें मला दर्शन झालें; आतां मला मोक्ष प्राप्त होणार; ह्यांत संशय नाहीं. रामचंद्रा, मज-बरोबर चल मी तुला - राहण्याला योग्य - स्थल दाखवितों. तुझें कल्याण असो.” ॥ ८७ ॥ ८८ ॥ ते तेज-स्वी वाल्मीकि मुनि असें भाषण करून शिष्यसमुदायासह रामलक्ष्मणांना बरोबर घेऊन बाहेर निघाले. व

मामप्याहुर्मुनिगणा वाल्मीकिस्त्वं मुनीश्वर॥८५॥वल्मीकात्संभवो यस्माद् द्वितीयं जन्म ते ऽभवत्॥इत्युक्त्वा ते ययुर्दिव्यगतिं रघुकुलोत्तम ॥८६॥ अहं ते राम नाम्नश्च प्रभावादीदृशो ऽभवम्॥अद्य साक्षात्प्रपश्यामि ससीतं लक्ष्मणेन च॥८७ ॥ रामं राजीवपत्राक्षं त्वां मुक्तो नात्र संशयः ॥ आगच्छ राम भद्रं ते स्थलं वै दर्शयाम्यहम् ॥ ८८ ॥ एवमुक्त्वा मुनिः श्रीमाँल्लक्ष्मणेनसमन्वितः ॥ शिष्यैः परिवृतो गत्वा मध्ये पर्वतगंगयोः ॥ ८९ ॥

मुनिगणाः(उ.) ॥८५॥यस्मात् ते(मू.)ययुः.॥८६॥राम,(बा. मू.)[सह त्वां]प्रपश्यामि.॥८७॥अहं राजीवपत्राक्षं रामं त्वां[पश्यामि, अतः](बा. मू.).’॥८८॥मुनिः(बा. मू.) मध्ये गत्वा,[स्थलं दर्शयामास].८९

१ लक्ष्मण आणि इन ह्मणजे प्रभु (राम) ह्यांसहवर्तमान.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ते चित्रकूटीं राहिले.

त्यांनीं पर्वत आणि गंगा ह्यांच्या मध्यें - रामाला राहण्याजोगें स्थल दाखवून दिलें. - ॥ ८९ ॥
रामचंद्रानें - पर्वतावर राहणाऱ्या भिल्लांकडून - तेथें एक सुविस्तीर्ण शाला व एक पूर्वपश्चिम आणि एक दक्षिणोत्तर अशीं दोन सुंदर मंदिरें करविलीं. सर्व जगाचें जो (राम) वसतिस्थान, - त्यानें स्वतांला राहण्यासाठीं मंदिर करविलें! - ॥९०॥ जानकी आणि लक्ष्मण ह्यांसह रामचंद्र—एकंदरींत तीं देवांसारखीं तिघेंजणें त्या उत्तम मंदिरांमध्यें राहूं लागलीं. ॥ ९१ ॥ त्याठिकाणीं वाल्मीकिमुनि सीता आणि लक्ष्मण ह्यांसह रामाची उत्तम रीतीनें पूजा करीत. स्वर्गामध्यें इंद्राणीसह इंद्र सर्व देवांसहवर्तमान जसा आनंदानें राहतो, त्याप्रमाणें ह्या ठिकाणीं सीतेसह रामचंद्र श्रेष्ठ अशा त्या अनेक मुनींसहवर्तमान आनंदानें राहत असे. ॥ ९२ ॥

इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे अयोध्याकाण्डे षष्ठः सर्गः ॥ ६ ॥

तत्र शालां सुविस्तीर्णां कारयामास वासभूः[1] ॥ प्राक्पश्चिमं[2] दक्षिणोदक्[3] शोभनं मन्दिरद्वयम् ॥९०॥ जानक्या सहितो रामो लक्ष्मणेन समन्वितः॥तत्र ते देवसदृशा ह्यवसन् भवनोत्तमे॥९१॥वाल्मीकिना तत्र सुपूजितो ऽयं रामः ससीतः सह लक्ष्मणेन ॥ देवैर्मुनीन्द्रैः सहितो मुदा ऽऽस्ते स्वर्गे यथा देवपतिः स शच्या[4]॥९२॥

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे अयोध्याकाण्डे षष्ठः सर्गः॥ ६ ॥

वासभूः (बा. मू.) कारयामास. ॥ ९० ॥ (बा. पू.) रामः ॥ (बा. उ.) तत्र अवसन. ॥ ९१ ॥ (बा. पू.) सह रामः ॥ (बा. उ.) [सह तथा] आस्ते. ॥ ९२ ॥ इति षष्ठः सर्गः ॥ ६ ॥

१ - संसाराचें किंवा जगाचें -- वसतिस्थान असा (राम). २ पूर्वपश्चिम. ३ दक्षिणोत्तर. ४ इंद्राणीशीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इकडे सुमंत्र - रामाला गंगातीरीं सोडून परतला, तो - संध्याकाळच्या वेळीं अयोध्येंत शिरला. - नगरांत शिरतांना लज्जेमुळें - त्यानें आपलें मुख वस्त्रानें आच्छादून घेतलें. त्याचे डोळे आंसवांनीं भरून आले ! ॥ १ ॥ तो आपला रथ बाहेर उभा करून, राजाच्या दर्शनासाठीं, - मंदिरांत - गेला. तेथें त्यानें जयजयकारपूर्वक राजाची स्तुति करून त्याला प्रणाम केला. ॥ २ ॥ सुमंत्र वंदन करीत आहे, - असें पाहतांच - राजाचें अंतःकरण कळवळून आलें. तशा अवस्थेंत तो सुमंत्राला ह्मणाला :–‘ सुमंत्रा, सीता आणि लक्ष्मण ह्या दोघांसह राम कोठें आहे ? ॥ ३ ॥ तूं त्याला कोठें सोडिलेंस ? मज दुष्टाला तो काय बरें ह्मणाला ? माझ्या निर्दयपणाबद्दल सीता आणि लक्ष्मण मला काय काय ह्मणालीं ? ॥ ४ ॥ हा रामा ! हा गुणानिधे ! हा मधुरभा-

सुमन्त्रो ऽपि तदा ऽयोध्यां दिनान्ते प्रविवेश ह॥वस्त्रेण मुखमाच्छाद्य बाष्पाकुलितलोचनः॥ १ ॥बहिरेव रथं स्थाप्य राजानं द्रष्टुमाययौ॥जयशब्देन राजानं स्तुत्वा[1] तं प्रणनाम[2] ह॥ २ ॥ततो राजा नमन्तं[3] तं सुमन्त्रं विह्वलो ऽब्रवीत्॥सुमन्त्र रामः कुत्रास्ते सीतया लक्ष्मणेन च॥ ३ ॥कुत्र त्यक्तस्त्वया रामः किं मां पापिनमब्रवीत् ॥ सीता वा लक्ष्मणो वा ऽपि निर्दयं मां किमब्रवीत् ॥ ४ ॥ हा राम हा गुणानिधे हा सीते प्रियवादिनि ॥ दुःखार्णवे निमग्नं मां म्रियमाणं[4] न पश्यसि ॥ ५ ॥

(मू.)[सन्]अयोध्यां दिनान्ते प्रविवेश,॥१॥२॥(मू.)कुत्र आस्ते ? ॥३॥ त्वया रामः (बा. मू.).॥४॥५॥

१ स्तुति करून. २ नमस्कार करिता झाला. ३ वंदन करणाऱ्या. ४ मरणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

· सुमंत्र सर्व सांगतो.

षिणि सीते! मी दुःखसमुद्रांत बुडून मरणोन्मुख झालों आहें, ही माझी अवस्था तुह्मांला दिसत नाहीं!'॥५॥ अशा प्रकारें पुष्कळ वेळ विलाप करून दशरथ राजा दुःखसागरांत बुडून राहिला. राजाचा तो विलाप - ऐकिल्यावर - सुमंत्र प्रधान हात जोडून त्याला ह्मणालाः- ॥ ६ ॥ “महाराज! राम, सीता आणि लक्ष्मण ह्या तिघांना मी रथांत बसवून गंगेच्या तीरावर शृंगवेरपुराच्या जवळ नेलें. तेथें तीं तिघेंजणें उतरलीं. ॥ ७ ॥ गुहानें त्याठिकाणीं कांहीं फळें मुळें वगैरे आणिलीं; - रामानें त्याच्या (गुहाच्या) - संतोषाकरितां त्या फळांना हातानें स्पर्श मात्र केला व तीं तशींच ठेवून दिलीं (खाल्लीं नाहींत). ॥८॥ राजा, पुढें रामानें स्वतां, गुहाकडून वडाचा चीक आणवून, जटांचा मुकुट बांधिला आणि मला सांगितलें:- ॥ ९ ॥ ‘सुमंत्रा, महाराजांना

विलप्यैवं[1] चिरं राजा निमग्नो दुःखसागरे ॥ एवं मन्त्री रुन्दतं तं प्राञ्जलिर्वाक्यमब्रवीत् ॥६॥ रामः सीता च सौमित्रिर्मया नीता रथेन ते॥शृंगवेरपुराभ्याशे[2] गंगाकूले[3] व्यवस्थिताः[4]॥७॥गुहेन किंचिदानीतं फलमूलादिकं च यत् ॥स्पृष्ट्वा हस्तेन संप्रीत्या नाग्रहीद्[5]विससर्ज[6] तत्॥८॥वटक्षीरं समानाय्य गुहेन रघुनन्दनः॥जटामुकुटमाबद्ध्य मामाह नृपते स्वयम् ॥ ९ ॥ सुमन्त्र ब्रूहि राजानं शोकस्ते ऽस्तु न मत्कृते[7] ॥

राजा एवं (पू.) निमग्नः. ॥ मन्त्री प्राञ्जलिः [सन्] (बा. मू.) - ॥६॥ “(पू.) नीताः ते ॥ (उ.). ॥७॥ यत् (पू.) आनीतं, ॥ तत् संप्रीत्या हस्तेन (बा. मू.). ॥ ८ ॥ नृपते, स्वयं रघुनन्दनः (बा. मू.) आह - ॥ ९ ॥ ‘सुमन्त्र, राजानं ब्रूहि-मत्कृते ते शोकः न अस्तु. ॥

१ विलाप करून. २शृंगवेर पुराच्या जवळ. ३गंगातीरीं. ४राहिलेले. ५न अग्रहीत् नाहीं घेता झाला. ६टाकिता झाला. ७मजसाठीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सांग कीं, मजकरितां आपण शोक करूं नये; आह्मा सर्वांना अरण्यामध्यें अयोध्येपेक्षांही अधिक सुख होईल. ॥ १० ॥ मातेला वंदनपूर्वक माझा - निरोप - सांग कीं, मजकरितां आपण दुःख अगदीं करूं नये; महाराज वृद्धपणामुळें शोकानें व्याकुळ होत असतील, त्यांचें आपण सांत्वन करीत असावें.' ॥ ११ ॥ राजाधिराज, ह्यावेळीं सीतेचे नेत्र अश्रूंनीं भरून आले होते. ती रामाकडे किंचित् पाहून, दुःखामुळें सद्गदित झालेल्या वाणीनें, मला ह्मणाली ॥ १२ ॥ कीं, सासूबाईंच्या आणि श्वशुरांच्या (मामंजींच्या) चरणकमलीं माझा साष्टांग प्रणिपात सांग. असें - बोलून - व मुख किंचित् खालीं करून सीता पुढें चालूं लागली. ॥१३॥ पुढें लागलींच तीं तिघें नौकेवर चढलीं. त्या वेळीं तिघांचेही नेत्र आंसवांनीं भरले होते. तीं गंगा उतरून

साकेतां[1]दधिकं सौख्यं विपिने[2] नो भविष्यति॥ १०॥मातुर्मे वन्दनं ब्रूहि शोकं त्यजतु मत्कृते॥आश्वासयतु राजानं वृद्धं शोकप[3]रिप्लुतम् ॥ ११॥ सीता चा[4]श्रुपरीताक्षी मामाह नृपसत्तम॥दुःखगद्गदया वाचा रामं किंचिदवेक्ष[5]ती॥ १२॥साष्टांगं प्रणिपातं मे ब्रूहि श्व[6]श्र्वोः पदाम्बुजे॥इति प्ररुदती सीता गता किंचिदवाङ्मु[7]खी॥ १३॥ततस्त्वश्रुपरीताक्षा नावमारुरुहुस्तदा॥यावद्गंगां समुत्तीर्य गतास्तावदहं स्थितः ॥ १४ ॥

(मू.).' ॥ १० ॥ मे (बा. पू.) त्यजतु, ॥ (मू.) राजानं आश्वासयतु. ॥ ११ ॥ नृपसत्तम ! (बा. मू.) मां आह – ॥ १२ ॥ 'मे (पू.) ब्रूहि.' ॥ (मू.) गता. ॥ १३ ॥ (मू.). ॥ १४ ॥

१ अयोध्येपेक्षां. २ अरण्यांत. ३ दुःखानें व्यापलेल्या. ४ आंसवांनीं भरले डोळे जिचे, अशी. ५ **अवेक्षती** पाहणारी. ६ सासूसासऱ्यांच्या. ७ खालीं तोंड जिचें, अशी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कौसल्येचें लावून बोलणें.

पलिकडे गेलीं, तोंपर्यंत मी तेथें उभा होतों. ॥ १४ ॥ नंतर मी मोठ्या दुःखानें पुन्हां परत आलों." हें ऐकिल्यावर कौसल्या, रडत रडत, राजाला असें ह्मणालीः– ॥ १५ ॥ 'महाराज, कैकेयी आपली प्रिय पत्नी, ह्मणून आपण तिला वर दिला तर तिच्या पुत्रालाच राज्य द्यावें; - त्याबद्दल माझें कांहीं ह्मणणें नाहीं. - पण माझ्या पुत्राला बाहेर कां घालविलें ? ॥१६॥ हें सर्व आपण स्वतां आपल्या हातीं करून घेतलें! मग आतां रडतां कशाला ?' हें कौसल्येचें भाषण कानीं येतांच, क्षतावर (जखमेवर) अग्नि लावावा, त्याप्रमाणें, दशरथाची स्थिति झाली. ॥ १७ ॥ त्याचे नेत्र शोकाश्रूंनीं पुन्हां भरून आले. अशा स्थितींत तो कौसल्येला ह्मणालाः–"कौसल्ये, आगोदरच मी दुःखानें मरतों आहें; त्यांतून तूं पुन्हां मला दुःख कां देत्येस ? पुरे आतां! ॥१८॥खरोखर, आतांच माझे प्राण निघून जातील ! पूर्वी मी कांहीं मूर्खपणा केल्यामुळें एका मुनीनें मला शाप

ततो दुःखेन महता पुनरेवाहमागतः॥ततो रुदन्ती कौसल्या राजानमिदमब्रवीत् ॥
॥१५॥कैकेय्यै प्रियभार्यायै प्रसन्नो दत्तवान्वरम् ॥ त्वं राज्यं देहि तस्यैव मत्पुतः किं
विवासितः॥१६॥कृत्वा त्वमेव तत्सर्वमिदानीं किंनु रोदिषि॥कौसल्यावचनं श्रुत्वा
क्षते स्पृष्ट इवाग्निना॥१७॥पुनः शोकाश्रुपूर्णाक्षः कौसल्यामिदमब्रवीत्॥दुःखेन म्रि-
यमाणं मां किं पुनर्दुःखयस्य[1]लम्[2]॥१८॥इदानीमेव मे प्राणा उत्क्र[3]मिष्यन्ति निश्चयः॥

(पू.)" ॥ (मू.)– ॥१५॥ 'त्वं (पू.) दत्तवान्,॥ तस्य एव (बा. उ.) ? ॥ १६ ॥ त्वं एव तद् सर्वं (पू.) ?' ॥ (उ.) स्पृष्टः इव, ॥ १७ ॥ (मू.). ॥ १८ ॥ (मू.). ॥

१ दुःखयसि दुःख देत्येस. २ अलम् पुरे. ३ निघून जातील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दिला आहे. ॥ १९ ॥ पूर्वीं तारुण्यामध्यें मीं फार उन्मत्त होतों. मृगयेचा अतिशय छंद असल्यामुळें एकदां मी हातांत धनुष्य बाण घेऊन रात्रीच्या वेळीं मोठ्या अरण्यांत एका नदीच्या तीरीं फिरत होतों. ॥ २० ॥ मध्य रात्रीच्या वेळीं त्या ठिकाणीं कोणीएक तृषाक्रांत झालेला मुनि आला. त्याचे आईबाप तहानेनें व्याकुळ झाले होते, ह्मणून तो त्यांना उदक नेऊन देण्याच्या उद्योगांत होता. त्यानें आपला कलश उदकांत बुडविला त्यावेळीं पाणी आंत भरत असतां - ‘ बुडबुड ’ असा - मोठा शब्द होऊं लागला. ॥ २१ ॥ ती मध्यरात्रीची वेळ - असल्यामुळें, तेथें कोणी मनुष्य असेल, अशी शंका देखील मला आली नाहीं. - मला वाटलें कीं, एखादा हत्ती पाणी पीत असावा. माझा बाण, शब्दाच्या धोरणानें जाऊन, लक्ष्याला अचूक ला-

शप्तो ऽहं बाल्यभावेन केनचिन्मुनिना पुरा ॥ १९ ॥ पुरा ऽहं यौवने[2] दृप्त[3]श्चाप-
बाणधरो निशि ॥ अचरं मृगयासक्तो नद्यास्तीरे महावने ॥ २० ॥ तत्रार्धरात्र-
समये मुनिः कश्चित्तृषार्दितः[5] ॥ पिपासार्दितयोः[6] पित्रोर्जलमानेतुमुद्यतः[7] ॥ अपूर-
यज्जले कुम्भं[8] तदा शब्दो ऽभवन्महान् ॥ २१ ॥ गजः पिबंति[9] पानीयमिति[10] म-
त्वा महानिशि[11] ॥ बाणं धनुषि संधाय शब्दवेधिनमक्षिपम्[12] ॥ २२ ॥

(मू.)शप्तः. ॥१९॥ (मू.) अचरम्. ॥२०॥ (बा. मू.) अपूरयत्. तदा महान् शब्दः अभवत्. ॥ २१ ॥ (पू.) ॥ शब्दवेधिनं बाणं (मू.). ॥ २२ ॥

---

१ शापलेला. २ तारुण्यांत. ३ मत्त. ४ फिरत होतों. ५ तहानेनें व्याकुळ. ६ तृषाकुळ, अशा. ७ आनेतुम् आणण्यास. ८ घटाला. ९ पाण्याला. १० पितो. ११ मध्यरात्रीं. १२ शब्दावरून लक्ष्य वेधणाऱ्या (नेम मारणाऱ्या).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रावणाची कथा.

गत असे. मी तशाप्रकारचा एक बाण धनुष्यावर जोडून सोडला. ॥ २२ ॥ इतक्यांत, त्या ठिकाणीं कोणी तरी मनुष्य आहे असें सुचविणारा 'मेलोंरे मेलों!' असा शब्द उत्पन्न झाला! - तोच मनुष्य पुढें विवळूं लागला :- 'मी तर कोणाचाही अपराध केला नाहीं! मग मला कोणीरे मारिलें! हा दैवा! ॥ २३ ॥ माझीं मातापितरें उदकाच्या इच्छेनें माझी वाट पाहत आहेत!' हें त्या पुरुषाचें भाषण कानीं पडतांच मी भयभीत झालों व तसाच ॥ २४ ॥ हळूहळू त्या पुरुषाच्या बाजूला जाऊन - त्याला ह्मणालों :- 'स्वामी! मी दशरथ आहें. - आपण येथें आहां हें - मला विदित नव्हतें; ह्मणून माझ्या हातून आपल्याला बाण लागला. मुनिमहाराज, आतां माझें रक्षण करणें आपणाकडे आहे!' ॥२५॥ हे शब्द उच्चारतांना माझीं अक्षरें

हा हतो ऽस्मीति तत्राभूच्छब्दो मानुषसूचकः ॥ कस्यापि न कृतो दोषो मया केन हतो विधे[2] ॥२३॥ प्रतीक्षते मां माता च पिता च जलकांक्षया[3] ॥ तच्छ्रुत्वा भयसंत्रस्तस्ततो ऽहं पौरुषं वचः ॥२४॥ शनैर्गत्वा ऽथ तत्पार्श्वे स्वामिन् दशरथो ऽस्म्यहम् ॥ अजानता मया विद्धस्त्रातुमर्हसि मां मुने ॥२५॥ इत्युक्त्वा पादयोस्तस्य पतितो गद्गदाक्षरः ॥

तत्र(बा. पू.)शब्दः अभूत्. ॥ 'मया कस्य अपि दोषः(मू.).॥२३॥(बा. पू.)मां प्रतीक्षते.'॥अहं तत् पौरुषं वचः(मू.).॥२४॥तत्पार्श्वे(मू.)मां त्रातुं अर्हसि,॥२५॥इति उक्त्वा, गद्गदाक्षरः[सन्]तस्य(पू.)पतितः ॥

१ मनुष्य असें सुचविणारा. २ दैवा! ३ उदकाच्या इच्छेनें. ४ वाट पाहतो. ५ पुरुषानें उच्चारिलेल्या. ६ त्याच्या बाजूला (जवळ). ७ न जाणणाऱ्या. ८ ताडिलेला. ९ रक्षण करण्यास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अडखळत होतीं. शेवटीं मी त्याच्या पायांवर लोटांगण घातलें. त्या वेळीं तो मुनि मला ह्मणाला :— ' राजाधिराजा, भिऊं नको. ॥ २६ ॥ तुला ब्रह्महत्या लागणार नाहीं; कारण, मी तपश्चर्या करणारा वैश्य आहें. माझे आईबाप क्षुधेनें आणि तृषेनें व्याकुळ होत्साते माझी वाट पाहत आहेत. ॥ २७ ॥ त्यांना तूं, विचार - करण्यांत कालक्षेप - न करितां, लवकर उदक नेऊन दे. तूं असें केलें नाहींस, आणि जर कां माझ्या पित्याला क्रोध आला, तर तो तुला भस्म करून टाकील! ॥ २८ ॥ ह्मणून, तूं त्यांना उदक नेऊन दे, आणि वंदन करून, झालेला सर्व प्रकार निवेदन कर. मला फार पीडा होत आहे; एवढें हें बाणाचें अग्र माझ्या शरीरांतून बाहेर काढ; ह्मणजे मी प्राण सोडितों.' ॥ २९ ॥ त्या मुनीनें असें सांगितलें असतां, मी तत्काल त्याच्याशरीरांतून शैल्य बाहेर काढिलें व उदकानें भरलेला कलश घेऊन, तें

तदा मामाह स मुनिर्मा[1] भैषीर्[2]नृपसत्तम ॥ २६ ॥ ब्रह्महत्या स्पृ[3]शेन्न त्वां वैश्यो ऽहं तपसि स्थितः ॥ पितरौ मां प्रतीक्षेते क्षुत्तृड्भ्यां परिपीडितौ ॥ २७ ॥ तयोस्त्वमुदकं देहि शीघ्रमेवाविचार[4]यन् ॥ न चेत्त्वां भस्मसात्कुर्यात्पिता मे यदि कु[5]प्यति ॥ २८ ॥ जलं दत्वा तु तौ नत्वा कृतं सर्वं निवे[7]दय ॥ [8]शल्यमुद्धर मे देहात्प्राणांस्त्यक्ष्यामि पीडितः ॥२९॥ इत्युक्तो मुनिना शीघ्रं बाणमुत्पाट्य[9] देहतः॥

सः मुनिः (मू.). ॥२६॥ त्वां (मू.) मां प्रतीक्षेते.॥२७॥त्वं(पू.)उदकं देहि.॥(बा. मू.) [तदा] त्वां भस्मसात् कुर्यात्! ॥२८॥ (पू.)॥मे देहात् (उ.) प्राणान् त्यक्ष्यामि.॥२९॥मुनिना(बा. पू.)उत्पाट्य, ॥

१मा नको. २ भैषीः भिऊं. ३ लागेल. ४ न विचार करितां. ५ संतापला. ६ भस्मासारखा. ७ सांग. ८ बाणाचें अग्र. ९ उपटून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

‘ मुलगा कां येत नाहीं ! ’

दंपत्य होतें, त्या ठिकाणीं गेलों. ॥ ३० ॥ तीं दोघें अतिवृद्ध आणि अंध असून ह्या रात्रिसमयीं क्षुधेनें व तृषेनें व्याकुळ झालीं होतीं. ‘ मुलगा पाणी घेऊन येत नाहीं ह्याचें कारण काय ! ॥ ३१ ॥ आह्मा वृद्धांना दुसरा कोणाचा आधार नाहीं ! - आमच्याकडे पाहिल्याबरोबर प्रत्येकाला - वाईट वाटावें, - इतकी आमची दीन स्थिति आहे ! - ह्यावेळीं आह्मीं तहानेनें फारच व्याकुळ झालों आहों ! अशा प्रसंगीं आमचा भक्तिमान् पुत्र आमची उपेक्षा करतो काय ! ’ ॥ ३२ ॥ अशा प्रकारें तीं दोघेंजणें व्याकुळ होत्सातीं चिंता करीत बसलीं होतीं; इतक्यांत माझ्या पावलांचा शब्द त्यांच्या कानीं पडला. तो शब्द ऐकतांच पिता ह्मणाला :–‘ बाळा ! इतका विलंब कां रे केलास ? ॥ ३३ ॥

सजलं कलशं धृत्वा गतो ऽहं यत्र दम्पती ॥ ३० ॥ अतिवृद्धावन्धदृशौ क्षुत्पिपासार्दितौ निशि ॥ नायाति सलिलं गृह्य पुत्रः किंवा ऽत्र कारणम् ॥ ३१॥ अनन्यगतिकौ[1] वृद्धौ शोच्यौ[2] तृट्परिपीडितौ[3] ॥ आवां[4]मुपेक्षते किं वा भक्तिमानावयोः सुतः ॥ ३२ ॥ इति चिंताव्याकुलौ तौ मत्पादन्यासजं[5] ध्वनिम् ॥ श्रुत्वा प्राह पिता पुत्र किं विलंबः कृतस्त्वया ॥ ३३ ॥

अहं (बा. उ.) [तत्र] गतः. ॥३०॥ ‘ (पू.) ॥ (बा. उ.) न आयाति ! अत्र कारणं किंवा ! ॥३१॥ (मू.) उपेक्षते किंवा ! ’ ॥ ३२ ॥ (पू.), ॥ श्रुत्वा पिता प्राह – ‘ पुत्र, त्वया (मू.) ? ॥ ३३ ॥

१ नाहीं दुसरी गति ज्यांना, असे. २ ज्यांच्याबद्दल वाईट वाटावें, असे. ३ तहानेनें अत्यंत व्याकुळ. ४ आवाम् आह्माला. ५ माझ्या पावलाच्या ठेवण्यानें उत्पन्न झालेल्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुला, आह्माला चांगलेंसें पाणी दे आणि तूंही पी.' तीं असें बोलत असतां मी भीतीमुळें हळूहळू त्यांच्या जवळ गेलों, ॥ ३४ ॥ व नम्रतापूर्वक पायां पडून ह्मणालों :–' महाराज, मी तुमचा पुत्र नव्हें; तर मी अयोध्येचा राजा दशरथ आहें. ॥ ३५ ॥ मज दुष्टाला मृगयेचा फार छंद आहे, ह्मणून मी आज रात्रीं पशूंचा वध करीत फिरत असतां एका पाणवठ्यापासून बऱ्याच अंतरावर उभा होतों. इतक्यांत, पाण्यामध्यें होत असलेला कांहीं शब्द ॥ ३६ ॥ माझ्या कानीं आला. शब्दाच्या धोरणानें बाण सोडून लक्ष्य मारण्याची मला संवय असल्यामुळें मी एक बाण सोडला. तों, मेलोंरे मेलों–असा शब्द मला ऐकूं आला. मी भिऊन तसाच त्याच्या जवळ आलों. ॥ ३७ ॥ तेथें, जटा अस्ताव्यस्त पसरून पडलेला एक मुनिकुमार माझ्या दृष्टीस पड-

देह्यावयोः सुपानीयं पिब त्वमपि पुत्रक ॥ इत्येवं लपतोर्भीत्या[1] सकाशमगमं शनैः ॥ ३४ ॥ पादयोः प्रणिपत्याहमब्रवं[2] विनयान्वितः ॥ नाहं पुत्रस्त्वयोध्याया राजा दशरथो ऽस्म्यहम् ॥ ३५ ॥ पापो ऽहं मृगयासक्तो रात्रौ मृगविहिंसकः[3] ॥ जलावर्तोराद्[4] दूरे ऽहं स्थित्वा जलगतं ध्वनिम् ॥ ३६ ॥ श्रुत्वा ऽहं शब्दवेधित्वादेकं बाणमथात्यजम् ॥ हतो ऽस्मीति ध्वनिं श्रुत्वा भयात्तत्राहमागतः ॥ ३७ ॥ जटा विकीर्य[5] पतितं दृष्ट्वा ऽहं मुनिदारकम्[6] ॥

पुत्रक, (पू.) देहि, त्वं अपि पिब.' ॥ (मू.) भीत्या शनैः अगमम्. ॥ ३४ ॥ अहं विनयान्वितः (पू.) अस्मि. ॥ ३५ ॥ (मू.) ॥ ३६ ॥ ३७ ॥ अहं मुनिदारकं (पू.) ॥

१ विलाप करणाऱ्या. २ ह्मणालों. ३ पशूंना मारणारा. ४ पाणवठ्यापासून. ५ अस्ताव्यस्त पसरून. ६ ऋषिकुमाराला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'त्यांना मुलां-
जवळ नेलें.'

ला. त्याला पाहतांच मी भयभीत होऊन त्याची प्रार्थना केली कीं, माझें रक्षण कर, मला जीवदान दे (मारूं किंवा शाप देऊं नकोस). ॥ ३८ ॥ तो मला ह्मणाला कीं, भिऊं नको; तुला ब्रह्महत्येचें भय नलगे; तूं माझ्या मातापितरांना उदक नेऊन दे, वंदन कर आणि आपल्या जीवितासाठीं त्यांची प्रार्थना कर. ॥ ३९॥ त्या मुनीनें असें सांगितलें, तेव्हां मी ह्या ठिकाणीं प्राप्त झालों. महाराज, मी मुनीचा घात करणारा - दुष्ट पातकी - आपल्याला शरण आलों आहें. आपण दयालु होऊन माझें संरक्षण करावें.' ॥ ४० ॥ ही - पुत्रमरणाची - वार्ता कानीं पडतांच तीं दोघें दुःखानें व्याकुळ होत्सातीं धरणीवर देह टाकून अतिशय शोक करूं लागलीं. विलाप करतां करतां त्यांनीं - मला ह्मटलें :- 'बाबा! आमचा पुत्र असेल तेथें, विलंब न लावतां, आह्माला घेऊन चल!' ॥ ४१ ॥ पुढें मी त्या वृद्ध दंपत्याला, त्यांचा मुलगा होता, तेथें नेलें.

भीतो गृहीत्वा तत्पादौ रक्षरक्षेति चाब्रवम् ॥३८॥ मा भैषीरिति मां प्राह ब्रह्महत्याभयं न ते॥मत्पित्रोः सलिलं दत्वा नत्वा प्रार्थय[1] जीवितम्॥३९॥ इत्युक्तो मुनिना तेन ह्यागतो मुनिहिंसकः॥रक्षेतां मां दयायुक्तौ युवां हि शरणागतम्॥४०॥इति श्रुत्वा तु दुःखार्तौ विलप्य बहु शोच्य तम्॥पतितौ नौ सुतो यत्र नय तत्राविलंबे[2]यन् ॥ ४१ ॥ ततो नीतौ सुतो यत्र मया तौ वृद्धदम्पती ॥

(मू.)गृहीत्वा, 'रक्ष, रक्ष,' इति अब्रवम्. ॥३८॥ (मू.)प्रार्थय. ॥३९॥ तेन मुनिना (पू.)आगतः! ॥(मू.) मां रक्षेताम्! ॥४०॥ (पू.)विलप्य, ॥ पतितौ '(मू.) नय.' ॥४१॥ ततः यत्र सुतः,[तत्र](पू.) नीतौ. ॥

१ मागून घे. २ विलंब न करणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या ठिकाणीं त्यांनीं मुलाच्या आंगावरून हात फिरवून बहुत शोक केला. ॥ ४२ ॥ त्यांनीं ‘ हाय! हाय!’ असा हंबरडा फोडून ह्मटलें :– ‘ बाळा! बाळारे! मुला! आह्माला पोटभर पाणी - प्यायला - देरे! कांरे देत नाहींस?’ ॥ ४३ ॥ नंतर तीं दोघें मला ह्मणालीं :–‘राजा, आतां लवकर चिता रचून तयार कर.’ - त्यांच्या आज्ञेप्रमाणें - मी लागलीच चिता रचून तीवर तिघांना ठेविलें आणि अग्नि लावून दिला. तेव्हां तीं तिघें दग्ध होऊन स्वर्गलोकीं गेलीं. ॥ ४४ ॥ त्यांपैकीं वृद्ध पिता - मरतांना शोकाच्या आवेशांत - मला ह्मणाला :–‘ तुझीही अशीच स्थिति होईल. माझा तुला शाप आहे कीं, तूं पुत्रशोकानें मरण पावशील.’ ॥ ४५ ॥ कौसल्ये! तो शाप भोगण्याची वेळ मला सध्यां आली आहे! ह्या प्र-

स्पृष्ट्वा सुतं तौ हस्ताभ्यां बहुशोऽथ विलेपतुः॥४२॥हाहेति क्रन्दमानौ तौ पुत्रपुत्रेत्यवोचताम्॥ जलं देहीति पुत्रेति किमर्थं न ददास्यलम्॥४३॥ततो मामूचतुः शीघ्रं चि[1]तिं रचय भूपते॥मया तदैव रचिता चितिस्तत्र निवे[2]शिता॥त्रयस्तत्राग्नि[3]रुत्सृष्टो दग्धास्ते त्रिदिवं ययुः॥४४॥तत्र वृद्धः पिता प्राह त्वमप्येवं भविष्यसि॥पुत्रशोकेन मरणं प्राप्[4]स्यसे वचनान्मम ॥ ४५ ॥ स इदानीं मम प्राप्तः शापकालोऽ[5]निवारितः ॥ इत्युक्त्वा विललापाथ राजा शोकसमाकुलः ॥ ४६ ॥

तौ सुतं हस्ताभ्यां(बा. मू.). ॥ ४२ ॥ ४३ ॥४४ ॥ (मू.) वचनाद् प्राप्स्यसे. ॥ ४५ ॥ (पू.) शापकालः प्राप्तः.” ॥ (मू.) विललाप. ॥ ४६ ॥

१ चितेला. २ ठेविलेले. ३ उत्सृष्टः दिलेला. ४ पावशील. ५ न निवारिलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दशरथाचा मृत्यु.

संगाचें निवारण होणें शक्य नाहीं!" इतकें भाषण करून दशरथराजा शोकानें व्याकुळ होत्साता विलाप करूं लागला :– ॥ ४६ ॥ 'हा रामा! हा पुत्रा! हा सीते! हा गुणनिधे लक्ष्मणा! तुझ्या वियोगामुळें मला मृत्यु प्राप्त झाला रे! हा सगळा प्रसंग कैकेयीनें आणिला!!' ॥ ४७ ॥ दशरथ अशाप्रकारें विलाप करीत प्राण सोडून स्वर्गास गेला! * * * * * * * *
कौसल्या, सुमित्रा, तशाच इतरही राजपत्न्या ॥ ४८ ॥ रडूं लागल्या! सर्वजणींनीं ऊर बडवून घेऊन अतिशय विलाप केला! प्रातःकाळीं मंत्रिमंडळासह वसिष्ठमुनि तेथें आले. ॥ ४९ ॥ त्यांनीं दशरथाचें शव तैलद्रोणींत ठेविलें आणि दूतांना आज्ञा दिली कीं, तुह्मी लवकर घोडे बरोबर घेऊन (घोड्यांवर बसून)

हा राम पुत्र हा सीते हा लक्ष्मण गुणाकर ॥ त्वद्वियोगादहं प्राप्तो मृत्युं कैकेयिसंभवम्॥४७॥वदन्नेवं दशरथः प्राणांस्त्यक्त्वा दिवं गतः ॥कौसल्या च सुमित्रा च तथाऽन्या राजयोषितः ॥४८॥ चुक्रुशुश्च विलेपुश्च उरस्ताडनपूर्वकम् ॥ वसिष्ठः प्रययौ तत्र प्रातर्मंत्रिभिरावृतः॥४९॥तैलद्रोण्यां दशरथं क्षिप्त्वा दूतानथाब्रवीत् ॥ गच्छत त्वरितं साश्वा युधाजिन्नगरं प्रति ॥ ५० ॥

(बा. मू.)मृत्युं प्राप्तः! ॥४७॥ दशरथः एवं (बा. मू.). ॥४८॥ (पू.) चुक्रुशुः विलेपुः च. ॥ (बा. मू.) प्रययौ. ॥ ४९ ॥ (मू.) गच्छत. ॥ ५० ॥

१ गुणांची खाण, अशा. २ राजपत्न्या. ३ वक्षस्थलाचें ताडन करीत. ४ आक्रोश करूं लागल्या. ५ विलाप करूं लागल्या. ६ तेलाच्या डोणींत (प्रेताला दुर्गंधि सुटूं नये, ह्मणून). ७ घोड्यांसह. ८ युधाजिताच्या नगराला. ९ जा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

युधाजिताच्या नगरीला जा; ॥ ५० ॥ तेथें तेजस्वी व प्रतापशाली भरत शत्रुघ्नासह राहत आहे, त्याला माझ्या आज्ञेनें ' लवकर निघून ये ' असें सांगा; ॥ ५१ ॥ ॥ ॥ ॥ ॥ - त्याला म्हणावें, - अयोध्येस येऊन राजाचें आणि कैकेयीचेंही दर्शन किंवा भेट घे. अशी आज्ञा मिळाली असतां दूत निघाले ते त्वरेनें भरताच्या मामाकडे आले, ॥ ५२ ॥ व युधाजिताला प्रणाम करून ह्मणाले :- ' महाराज, वसिष्ठमुनींनीं कनिष्ठ बंधूसह प्रभावशाली भरताविषयीं आपल्याला निरोप सांगितला आहे कीं, भरतानें आपल्या धाकट्या भावाला बरोबर घेऊन, ॥ ५३ ॥ विचार करण्यांत वेळ न घालवितां, लवकर अयोध्येस यावें. ' ही आज्ञा कळल्याबरोबर भरत भयानें विव्हल झाला. तो लागलाच ॥ ५४ ॥ वसिष्ठ गुरूंच्या आज्ञेप्रमाणें धाकट्या भावाला बरोबर घेऊन दूतांसहवर्तमान निघाला. तो ' राजावर किंवा रामचंद्रावर

तत्रास्ते भरतः श्रीमाञ्छत्रुघ्नसहितः प्रभुः ॥ उच्यतां भरतः शीघ्रमागच्छेति ममाज्ञया ॥५१॥ अयोध्यां प्रति राजानं कैकेयीं चापि पश्यतु ॥ इत्युक्तास्त्वरितं दूता गत्वा भरतमातुलम् ॥ ५२ ॥ युधाजितं प्रणम्योचुर्भरतं[1] सानुजं प्रति ॥ वसिष्ठस्त्वाऽब्रवीद्राजन् भरतः सानुजः प्रभुः ॥ ५३ ॥ शीघ्रमागच्छतु पुरीमयोध्यामविचारयन्[2] ॥ इत्याज्ञप्तोऽथ भरतस्त्वरितं भयविह्वलः ॥५४॥ आययौ गुरुणाऽऽदिष्टः सह दूतैस्तु सानुजः ॥

(पू.) आस्ते. ॥ मम आज्ञया (मू.) उच्यतां. ॥५१॥ अयोध्यां प्रति [आगत्य] (मू.) गत्वा, ॥ ५२ ॥ (पू.) प्रणम्य, भरतंप्रति ऊचुः- '(मू.) ॥५३॥ (पू.) आगच्छतु.' ॥(मू.) त्वरितं॥५४॥(पू.)आययौ,॥

१ भरताविषयीं. २ विचार करण्यांत वेळ न घालवितां.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भरत अयोध्येस आला.

कांहीं तरी दुःखाचा प्रसंग गुजरला असावा, ' ॥ ९९ ॥ अशा चिंतेनें ग्रस्त होत्साता मार्गांत विचार करीत करीत नगरास आला. तों, नगराची शोभा अगदीं नष्ट झाली आहे, त्यांत लोकांची व्यवहारव्यापारसंबंधें चळवळ किंवा गर्दी कोठेंही दिसत नाहीं, ॥ ९६ ॥ आनंदोत्सवांनीं तर तें स्थळ मुळींच सोडून दिलें आहे, असा प्रकार त्याच्या दृष्टीस आला. तेव्हां तर त्याला - अधिकच - काळजी वाटूं लागली. पुढें तो राजवाड्यांत शिरला. - तेथील एकंदर चर्येवरून त्याचें मन त्याला सांगूं लागलें कीं, - राजलक्ष्मी हें स्थान सोडून गेली असावी. ॥ ९७ ॥ पुढें तेथें कैकेयी एकटीच आसनावर बसली आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्यानें भक्तिपूर्वक मातेच्या चरणांस शिरसा वंदन केलें. ॥ ९८ ॥ भरत आला असें पाहतांच कैकेयी प्रेमभ-

राज्ञो वा राघवस्यापि दुःखं किंचिदुपास्थितम्[1] ॥ ५५ ॥ इति चिन्तापरो मार्गे चिन्तयन्नगरं ययौ ॥ नगरं भ्रष्टलक्ष्मीकं[2] जनसंबाधवर्जितम्[3] ॥५६॥ उत्सवैश्च परित्यक्तं दृष्ट्वा चिन्तापरो ऽभवत् ॥ प्रविश्य राजभवनं[4] राजलक्ष्मीविवर्जितम् ॥५७॥ अपश्यत्कैकयीं तत्र एकामेवासने स्थिताम् ॥ ननाम शिरसा पादौ मातुर्भक्तिसमन्वितः ॥५८॥ आगतं भरतं दृष्ट्वा कैकेयी प्रेम[5]संभ्रमात् ॥ उत्थायालिंग्य रभसा[6] स्वांकमारोप्य संस्थिता ॥५९॥

(मू.) ॥५५॥ मार्गे (मू.) ॥५६॥ (पू.) ॥ (उ.) राजभवनं प्रविश्य ॥५७॥ (पू.) कैकेयीं अपश्यत्. ॥ (उ.) मातुः पादौ शिरसा ननाम. ॥५८॥ कैकेयी (मू.). ॥ ५९ ॥

१प्राप्त झालेलें. २भ्रष्ट झाली शोभा ज्याची, अशा. ३लोकांच्या समुदायांनीं सोडिलेल्या. ४राजवाड्याप्रत. ५प्रेमाच्या वेगानें. ६लगबगीनें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रानें उठून उभी राहिली व वेगानें त्याला आलिंगन देऊन मांडीवर घेऊन बसली. ॥५९॥ पुढें तिनें भरताचें मस्तक हुंगून त्याला आपल्या माहेरच्या मनुष्यांच्या कुशलतेबद्दल, प्रश्न विचारिले:– 'भरता, माझा भाऊ, तशीच भाग्यशाली माता, सर्व खुशाल आहेत ना? ॥ ६० ॥ मुला, आज तूं सुखरूपपणें माझ्या दृष्टीस पडलास, ही फार चांगली गोष्ट झाली.' मातेनें भरताला मागें सांगितल्याप्रमाणें प्रश्न केला खरा; पण त्याचीं इंद्रियें चिंतेनें अगदीं व्याकुळ झालीं होतीं, - म्हणून त्यानें त्या प्रश्नाकडे मुळींच दुर्लक्ष्य केलें. - ॥ ६१ ॥ व तो खिन्न अंतःकरणानें मातेला विचारूं लागला :–' आई! माझा पिता कोठें आहे? तूं येथें एकटी बसली आहेस - असें कां? - ॥ ६२ ॥ आमचे महाराज (पिता) तुझ्या वांचून एकांतांत कधींही बसले नाहींत : असें असून सध्यां ते येथें दिसत नाहींत! तर ते कोठें आहेत, सांग. ॥ ६३ ॥ पित्याचें दर्शन न झाल्यामुळें

मूर्ध्न्यवघ्राय पप्रच्छ कुशलं स्वकुलस्य सा॥पिता मे कुशली भ्राता माता च शुभलक्षणा॥६०॥दिष्ट्या त्वमद्य कुशली मया दृष्टोऽसि पुत्रक॥इति पृष्टः स भरतो मात्रा चिन्ताकुलेन्द्रियः॥६१॥दूयमानेन मनसा मातरं समपृच्छत॥मातः पिता मे कुत्रास्ते एका त्वमिह संस्थिता ॥६२॥ त्वया विना न मे तातः कदाचिद्रहसि स्थितः॥ इदानीं दृश्यते नैव कुत्र तिष्ठति मे वद ॥ ६३ ॥ अदृष्ट्वा पितरं मेऽद्य भयं दुःखं च जायते ॥

सा (पू.) कुशलं पप्रच्छ. ॥ (मू.)? ॥६०॥ (पू.) ॥ मात्रा इति (मू.) ! ॥६१॥६२॥ मे तातः (पू.) न स्थितः ॥ (मू.). ॥ ६३ ॥ पितरं (बा. पू.) ॥

१ चिंतेनें व्याकुळ झालीं इंद्रियें ज्याचीं, असा. २ खिन्न, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याला सर्व वृत्तांत कळतो.

माझ्या - मनाला - भीति आणि दुःख उत्पन्न होत आहे ! ' हा प्रश्न ऐकिल्यावर कैकेयी मुलाला ह्मणालीः— ' बाळा, गुणांच्या, तुला दुःख होऊन उपयोग काय ! ॥ ६४ ॥ धार्मिक व अश्वमेधादि यज्ञांनीं परमेश्वराची आराधना करणारे पुरुष ज्या गतीला जातात, त्या गतीला तुझा पिता सांप्रत गेला. तुझी पित्यावर निःसीम प्रीति होती - खरी; पण आतां शोक करून उपयोग काय ? - ' ॥ ६५ ॥ ती वार्ता ऐकतांच भरत शोकानें विव्हल होत्साता भूमीवर पडला. ' हा ताता ! मला दुःखसमुद्रांत टाकून कोणीकडे रे गेलास ! ॥६६॥ बाबा ! मला रामराजाच्या स्वाधीन केल्याशिवाय आपण कोणीकडे गेलां ! ' अशा प्रकारें विलाप करीत पुत्र भूमीवर पडला आहे, त्याचे केश अस्ताव्यस्त झाले आहेत, ॥ ६७ ॥

अथाह कैकयी पुत्रं किं दुःखेन तवानघ॥६४॥या गतिर्धर्मशीलानामश्वमेधादियाजिनाम्॥तां गतिं गतवानद्य पिता ते पितृवत्सल॥६५॥तच्छ्रुत्वा निपपातोर्व्यां भरतः शोकविह्वलः॥हा तात क्व गतो ऽसि त्वं त्यक्त्वा मां वृजिनार्णवे॥६६॥असमर्प्यैव रामाय राज्ञे मां क्व गतो ऽसि भो ॥ इति विलपितं पुत्रं पतितं मुक्तमूर्धजम् ॥ ६७ ॥

अथ कैकयी पुत्रं(बा. उ.)किम्?॥६४॥(पू.)या गतिः,॥अद्य ते पिता(उ.)!॥६५॥भरतः तद् श्रुत्वा शोकविह्वलः[सन्]उर्व्यां निपपात. 'हा तात! त्वं मां वृजिनार्णवे त्यक्त्वा, क्व गतः असि! ॥ ६६ ॥ रामाय राज्ञे मां (पू.).' ॥ (उ.) पुत्रं ॥ ६७ ॥

---

१ धर्म आचरणें, हा ज्यांचा स्वभाव, अशा. २ अश्वमेधादि यज्ञ करणाऱ्या. ३ पित्याविषयीं प्रेमळ, अशा. ४ भूमीवर. ५ दुःखसमुद्रांत. ६ न स्वाधीन करून. ७ सुटले केश ज्याचे, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- असें पाहून - कैकेयीनें त्याला उठून बसविलें आणि डोळे पुसून ह्मटलें :–'बाळा, सावध हो. तुझें कल्याण होईल अशी सर्व तजवीज मी केली आहे.' ॥ ६८ ॥ भरत तिला ह्मणाला :–' महाराज मरणसमयीं काय बोलले?' कैकेयीदेवीला भय किंवा लज्जा मुळींच नव्हती; ती शांतपणें भरताला सांगूं लागली :– ॥ ६९ ॥ "महाराज 'हा रामा! हा आनंददायका! हा सीते! हा लक्ष्मणा!' असें वारंवार ह्मणून पुष्कळ वेळ शोक करीत शेवटीं देहत्याग करून स्वर्गाला गेले." ॥ ७० ॥ भरतानें तिला विचारिलें :– 'माते! त्या वेळीं राम जवळ नव्हता काय? तसेंच लक्ष्मण आणि सीता ह्यांपैकीं कोणीच जवळ नव्हतें? तीं गेलीं होतीं कोठें?' ॥ ७१ ॥ कैकेयी ह्मणाली :– ' भरता, रामाला यौवराज्य देण्यासाठीं तुझ्या पित्यानें मोठा समारंभ चाल-

उत्थाप्य[1]ामृज्य[2] नयने कैकेयी पुत्रमब्रवीत् ॥ समाश्वसिहि[3] भद्रं ते सर्वं संपादितं मया ॥ ॥६८॥तामाह भरतस्तातो म्रियमाणः किमब्रवीत् ॥तमाह कैकयी देवी भरतं भयवार्जिता॥६९॥हा राम राम सीतेति लक्ष्मणेति पुनः पुनः॥ विलपन्नेव सुचिरं देहं त्यक्त्वा दिवं ययौ ॥७०॥ तामाह भरतो हे ऽम्ब रामः सन्निहितो न किम्॥ तदानीं लक्ष्मणो वा ऽपि सीता वा कुत्र ते गताः॥७१॥कैकेय्युवाच॥रामस्य यौवराज्यार्थं पित्रा ते संभ्रमः[4] कृतः ॥

उत्थाप्य, नयने(पू.)॥'समाश्वसिहि; ते भद्रं; मया(उ.)!'॥६८॥भरतः (पू.)?॥ (बा. उ.) तं भरतं आह – ॥ ६९ ॥ '(मू.)! ॥ ७० ॥ भरतः (मू.)? ॥ ७१ ॥ कै० उ० – ' ते पित्रा (पू.). ॥

१ उठवून. २ आमृज्य पुसून. ३ सावध हो. ४ आदरानें उपक्रम.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुझ्यासाठीं माझी खटपट.

विला होता ! पण, तुला राज्य मिळावें, ह्या उद्देशानें त्यावेळीं मी त्या कार्यांत विघ्न आणिलें. ॥ ७२ ॥ महाराजांनीं वरद होऊन पूर्वी मला दोन वर दिले होते; ते मी ह्या वेळीं मागून घेतले. त्यांपैकीं एका वरानें तुला सर्व ॥ ७३ ॥ राज्य - मागितलें; - आणि दुसऱ्यानें, रामानें मुनीसारखें व्रत स्वीकारून वनांत राहावें - असें मागून घेतलें. - महाराज सत्य आचरणाविषयीं दक्ष होते; ह्मणून त्यांनीं तुलाच राज्य दिलें;॥७४॥ आणि तुझ्या पित्यानें रामाला वनांतच पाठविलें ! सीताही पातिव्रत्य मार्गाचें अवलंबन करून रामाच्या मागून गेली. ॥ ७५ ॥ "मी चांगला (खरा भक्तिमान्) भाऊ आहें" असें दाखविण्यासाठीं लक्ष्मणही रामाच्या मागें गेला. तीं सर्वजणें वनांत गेलीं असतां, महाराज त्यांचेंच चिंतन करूं लागले. ॥ ७६ ॥ शेवटीं "राम

तव राज्यप्रदानाय तदा ऽहं विघ्नमाचरम् ॥७२॥ राज्ञा दत्तं हि मे पूर्वं वरदेन वरद्वयम् ॥ याचितं तदिदानीं मे तयोरेकेन ते ऽखिलम् ॥ ७३ ॥ राज्यं रामस्य चैकेन वनवासो मुनिव्रतम् ॥ ततः सत्यपरो राजा राज्यं दत्वा तवैव हि ॥७४॥ रामं संप्रेषयामास वनमेव पिता तव ॥ सीता ऽप्यनुगता रामं पातिव्रत्यमुपाश्रिता ॥ ७५ ॥ सौभ्रात्रं दर्शयन्राममनुयातो ऽपि लक्ष्मणः ॥ वनं गतेषु सर्वेषु राजा तानेव चिन्तयन् ॥ ७६ ॥

अहं(उ.)॥७२॥वरदेन (पू.) दत्तम्;॥इदानीं तत् मे याचितं,(उ.)॥७३॥राज्यं, एकेन च(पू.).॥(उ.) दत्त्वा,॥७४॥तव पिता वनं एव(पू.).॥(उ.)रामं अनुगता.॥७५॥लक्ष्मणः अपि(पू.).॥सर्वेषु(उ.)॥७६॥

१ चांगल्या भाऊपणाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राम" असें बडबडत ते राजाधिराज मरण पावले.' हें मातेचें वचन कानीं पडल्याबरोबर, ज्याप्रमाणें वज्राचा प्रहार लागला असतां वृक्ष मोडून खालीं पडतो त्याप्रमाणें, भरत ॥ ७७ ॥ - मूर्च्छा येऊन - भूमीवर निश्चेष्ट पडला. तें पाहून कैकेयीला दुःख झालें. ती त्या वेळीं भरताला पुन्हां ह्मणाली :– 'बाळा, तूं शोक काय ह्मणून करितोस? - मला तर शोकाचें कांहीं कारण दिसत नाहीं. - ॥७८॥ अरे! मोठें चांगलें राज्य आयतेंच प्राप्त झालें आहे; आणि तुला ह्या वेळीं शोक करावासा वाटतो, तो काय ह्मणून?' माता असें भाषण करीत असतां, - भरत तिच्याकडे इतक्या उग्र दृष्टीनें - पाहूं लागला कीं, त्यावरून तो तिला जाळीतच आहे कीं काय असा भास होई! पुढें - तो तिला ह्मणाला :- ॥ ७९ ॥ 'दुष्टे! पतीची हत्या केलीस

प्रलपन् रामरामेति ममार[1] नृपसत्तमः॥इति मातुर्वचः श्रुत्वा वज्राहत[2] इव द्रुमः[3]॥७७॥
पपात भूमौ निःसंज्ञस्तं दृष्ट्वा दुःखिता तदा॥कैकेयी पुनरप्याह वत्स शोकेन किं तव
॥७८॥राज्ये महति संप्राप्ते दुःखस्यावसरः कुतः ॥ इति ब्रुवन्तीमालोक्य मातरं प्रदहन्निव ॥ ७९ ॥ असंभाष्या ऽसि पापे मे घोरे[6] त्वं भर्तृघातिनी ॥ पापे त्वद्गर्भजातो[9] ऽहं पापवानस्मि सांप्रतम् ॥अहमग्निं प्रवेक्ष्यामि[10] विषं वा भक्षयाम्यहम् ॥ ८० ॥

नृपसत्तमः "राम, राम" इति (पू.).' ॥ (उ.) इव ॥७७॥ निःसंज्ञः भूमौ (बा. मू.) किम्? ॥ ७८ ॥ महति (पू.)?॥मातरं (उ.)–॥७९॥'(पू.) त्वं मे [8]असंभाष्या असि.॥(बा. द्वि.)अस्मि.॥(मू. तृ.).॥८०॥

१ मेला. २ वज्रानें ताडिलेला. ३ वृक्ष. ४ निश्चेष्ट. ५प्रत्यक्ष पति मरण पावला तेव्हां देखील जिला वाईट वाटलें नाहीं, त्याच निर्दय कैकयीला, पुत्र केवळ मूर्च्छित झाला असें पाहून, दुःख झालें; ह्यावरून पुत्र शोक फार दुर्धर आहे, असें सिद्ध होतें. ६ दुष्टे. ७ पतीला मारणारी. ८ जिच्याजवळ भाषण करूं नये, अशी. ९ तुझ्या गर्भी उत्पन्न झालेला. १० प्रवेश करीन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो कौसल्येला भेटतो.

त्या अर्थी तूं महापापिणी आहेस ! ! तुझ्याजवळ भाषण करणें देखील मला प्रशस्त वाटत नाहीं ! तुझ्या गर्भी माझा जन्म झाला, ह्यावरून सांप्रत मी पातकी ठरलों. आतां मी अग्नींत प्रवेश करितों, विष खातों, ॥८०॥ किंवा खड्गानें आत्महत्या करून घेऊन यमसदनास जातों ! दुष्टे ! तूं पतीचा वध केलास ह्मणून तुला कुंभीपाक नरकांत जावें लागेल ! ! ' ॥ ८१ ॥ भरत अशा प्रकारें कैकेयीची निर्भर्त्सना करून पुढें कौसल्येच्या मंदिरीं गेला. तीही भरताला पाहतांच हंबरडा फोडून रडूं लागली. ॥ ८२ ॥ त्यावेळीं भरतही तिच्या पायां पडून रडूं लागला. जिची कीर्ति - सर्व जगांत पसरली - आहे, त्या रामाच्या मातेनें (कौसल्येनें) भरताला पोटाशीं धरिलें. ती महासाध्वी ॥ ८३ ॥ अगदीं कृश झाली होती. तिचें मुख अति दीन दिसत असून, डोळ्यांतून सारखे अश्रु वाहत होते. ती भरताला ह्मणाली कीं, ' बाळा, तूं

खड्गेन[2] वा ऽथ चात्मानं हत्वा यामि यमक्षयम्[1]॥भर्तृघातिनि दुष्टे त्वं कुम्भीपाकं गमिष्यसि॥८१॥इति निर्भर्त्स्य[3] कैकेयीं कौसल्याभवनं ययौ॥ सा ऽपि तं भरतं दृष्ट्वा मुक्त[4]कण्ठा रुरोद ह॥८२॥पादयोः पतितस्तस्या भरतो ऽपि तदा ऽरुदत्॥आलिंग्य भरतं साध्वी राममाता यशस्विनी ॥८३॥ कृशा ऽतिदीनवदना साश्रुनेत्रेदमब्रवीत् ॥ पुत्र त्वयि गते दूरमेवं सर्वमभूदिदम् ॥उक्तं मात्रा श्रुतं सर्वं त्वया ते मातृचेष्टितम्[5] ॥ ८४ ॥

(पू.) यामि. ॥ (उ.)!' ॥८१॥ कैकयीं (बा. मू.). ॥ ८२ ॥ तस्याः (बा. मू.) भरतं आलिंग्य, ॥८३॥ (पू.) – ॥ 'पुत्र, त्वयि दूरं (बा. द्वि.) अभूत्. ॥ त्वया मात्रा (बा. तृ.) श्रुतम्. ॥ ८४ ॥

१ यमसदनाला. २ जातों. ३ निर्भत्सना करून. ४ मोकळा केला कंठ जिनें, अशी. ५ आईच कृत्य.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दूर गेलास, आणि इकडे हें सगळें असें झालें ! तुझ्या आईनें काय काय कृत्य केलें, तें तिनें सांगितल्यावरून तुला कळलें असेलच. ॥ ८४ ॥ माझा पुत्र रघुकुलोद्भव रामचंद्र, दुःखसमुद्रांत बुडालेल्या मला टाकून, पत्नीला आणि लक्ष्मणाला बरोबर घेऊन वनांत गेला ! त्यानें वस्त्राऐवजीं आंगावर वल्कलें पांघरलीं व आपल्या केंसांचा जटाजूट बांधिला ! ॥ ८५ ॥ हा रामा ! हा रघुवंशाधिपते ! तूं प्रत्यक्ष परात्पर ईश्वर माझ्या पोटीं आला आहेस, असें - मला समजत - असूनही माझें दुःख दूर होत नाहीं; ह्यावरून माझ्या बुद्धीला निश्चयात्मक वाटतें कीं, खरोखर दैव बलवत्तर आहे. (तूं ईश्वर असें समजत आहे, त्या अर्थी मला दुःख वाटण्याचें कांहीं कारण नाहीं; पण मला दुःख होत आहे, ह्यावरून ज्ञानापेक्षां दैवाची शक्ति अधिक, असें मला वाटतें.)' ॥८६॥ अशा प्रकारें कौसल्या अत्यंत शोकानें विलाप करीत आहे, असें पाहून भरतानें तिचे

पुत्रः सभार्यो वनमेव यातः सलक्ष्मणो मे रघुरामचंद्रः ॥ चीरांबरो[1] बद्धजटाकलापः[2]
संत्यज्य मां दुःखसमुद्रमग्नाम् ॥ ८५ ॥ हा राम हा मे रघुवंशनाथ जातो ऽसि
मे त्वं परतः परमात्मा ॥ तथा ऽपि दुःखं न जहाति[3] मां वै विधिर्बलीयानिति[4] मे
मनीषा[5]॥ ८६॥ स एवं भरतो वीक्ष्य विलपन्तीं भृशं शुचा ॥ पादौ गृहीत्वा प्राहेदं
शृणु मातर्वचो मम ॥ ८७ ॥

रघुरामचन्द्रः मे(बा.मू.)मां सन्त्यज्य, वनं एव यातः ! ॥८५॥ (पू.)मे[पुत्रः] जातः असि.॥तथा अपि मां (उ.).' ॥८६॥ (पू.) एवं विलपन्तीं वीक्ष्य, ॥ पादौ गृहीत्वा इदं प्राह–'मातः, मम वचः शृणु.॥८७॥

१ वल्कल हें वस्त्र ज्याचें, असा. २ बांधला जटांचा कलाप ज्यानें, असा. ३ सोडतें. ४ **बलीयान्** अधिक समर्थ. ५ बुद्धि.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पाय धरिले व तिला ह्मटलें :– ' माते, माझें वचन ऐकून घे. ॥ ८७ ॥ कैकेयीनें रामाच्या राज्याभिषेकप्रसंगीं जें कांहीं कृत्य केलें तें किंवा दुसरें कांहीं (मजसाठीं राज्य मागणें वगैरे) जर मला करून घडलें असेल, अथवा जर मी तिला प्रेरणा दिली (तसें करण्यास सांगितलें) असेल, ॥ ८८ ॥ तर, माते, मला शंभर ब्रह्महत्यांपासून उद्भवणारें पाप लागो. अरुंधतीसह वसिष्ठाचा खड्गानें वध केला असतां ॥ ८९ ॥ जें पाप व्हावें, तें सर्व (पातक) मला, जर ही गोष्ट पूर्वी कळली असेल तर, लागेल. ' अशा प्रकारें शपथ करून भरत त्यावेळीं रडूं लागला. ॥ ९० ॥ नंतर कौसल्येनें त्याला पोटाशीं धरून - ह्मटलें :- 'बाळा, - तुझें हृदय - मी जाणत्यें. तुला अगदीं वाटूं देऊं नको. ' इतक्या अवकाशांत, भरत आला ही वार्ता ऐकून ॥ ९१ ॥

कैकेय्या यत्कृतं कर्म रामराज्याभिषेचने॥अन्यद्वा यदि जानामि सा मया नोदिता[१] यदि ॥ ८८ ॥ पापं मेऽस्तु तदा मातर्ब्रह्महत्याशतोद्भवम्[२] ॥ हत्वा वसिष्ठं खड्गेन अरुन्धत्या समन्वितम् ॥८९॥ भूयात्तत्पापमखिलं मम जानामि यद्यहम् ॥ इत्येवं शपथं कृत्वा रुरोद भरतस्तदा ॥९०॥ कौसल्या तमथालिंग्य पुत्र जानामि मा शुचः ॥ एतस्मिन्नन्तरे श्रुत्वा भरतस्य समागमम् ॥ ९१ ॥

(पू.)यत् कर्म कृतं,॥(उ.)नोदिता,॥८८॥(बा. पू.)पापं मे अस्तु.॥(उ.)हत्वा[यत् भूयात्], ॥८९॥ अहं यदि जानामि,[तदा]मम अखिलं तत् पापं भूयात्.' भरतः(बा. मू.).॥९०॥अथ(बा. मू.)श्रुत्वा, ॥९१॥

१ प्रेरिलेली. २ शंभर ब्रह्महत्यांपासून उद्भवणारें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वसिष्ठमुनि मंत्रिमंडळाला बरोबर घेऊन राजवाड्यांत आले. भरत शोक करीत आहे, असें पाहून वसिष्ठ त्याला आदरपूर्वक ह्मणाले :– ॥ ९२ ॥ ‘भरता! दशरथ राजा ज्ञानसंपन्न व खरा शूर होता. आतां त्याचें उतार वय झालें होतें. त्यानें मर्त्यलोकींचीं सर्व सुखें भोगिलीं, विपुल दक्षिणा देऊन अश्वमेधादि यज्ञांनीं परमेश्वराची आराधना केली व रामासारखा पुत्र मिळविला; हा राम साक्षात् सकलदुःखहर्ता ईश्वर होय. शेवटीं तो महासमर्थ राजा स्वर्गी - जाऊन - देवेंद्राच्या अर्ध्या आसनास प्राप्त झाला. ॥ ९३ ॥ ९४ ॥ त्याच्याबद्दल तूं अगदीं विनाकारण शोक करीत आहेस. त्याच्या विषयीं शोक करणें अयोग्य होय : कारण, तो मोक्षप्राप्तीचा अधिकारी होऊन राहिला आहे. - शिवाय,

वसिष्ठो मन्त्रिभिः सार्धं[1] प्रययौ राजमन्दिरम्॥रुदन्तं भरतं दृष्ट्वा वसिष्ठः प्राह सादरम्॥९२॥वृद्धो राजा दशरथो ज्ञानी सत्यपराक्रमः॥भुक्त्वा मर्त्यसुखं सर्वमिष्ट्वा विपुलदक्षिणैः ॥९३॥ अश्वमेधादिभिर्यज्ञैर्लब्ध्वा रामं सुतं हरिम् ॥ अन्ते जगाम त्रिदिवं देवेन्द्रार्धासनं[2] प्रभुः ॥९४॥ तं शोचसि वृथैव त्वमशोच्यं[3] मोक्षभाजनम्[4]॥ आत्मा नित्यो ऽव्ययः शुद्धो जन्मनाशादिवर्जितः ॥ ९५ ॥

(पू.) प्रययौ. ॥ वसिष्ठः (बा. उ.)प्राह – ॥९२॥ ‘(९३पू.) ॥ सर्वं मर्त्यसुखं भुक्त्वा, विपुलदक्षिणैः अश्वमेधादिभिः यज्ञैः इष्ट्वा, हरिं रामं सुतं लब्ध्वा, ॥ प्रभुः (९४उ.) जगाम. ॥ ९३ ॥ ९४ ॥ (पू.) तं वृथा एव शोचासि. ॥ (उ.). ॥ ९५ ॥

---

१ सह. २ देवेंद्राच्या अर्ध्या आसनाला. ३ न शोक करण्याजोग्या. ४ मोक्षाचें पात्र अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आत्मानात्मविचार केलास ह्मणजे शोक करणें किती अयोग्य तें कळून येईल :- आत्मा नित्य आहे, त्याला कोणताही विकार नाहीं, तो शुद्ध असून जन्म मृत्यु इत्यादिकांनीं रहित आहे; ॥ ९९ ॥ हें शरीर जड असून अत्यंत अपवित्र होय, ह्याचा केव्हां तरी नाश व्हावयाचाच. एतावता, विचार करूं गेलें असतां कोणत्याही प्रकारें शोक करण्याला अवकाश किंवा कारण नाहीं. ॥ ९६ ॥ पिता किंवा पुत्र कोणी जरी मृत्यूच्या स्वाधीन झाला (मरण पावला) तरी, आपलें शरीर बडवून घेऊन जे कोणीं त्यांच्या-बद्दल शोक करितात ते सर्व मूर्ख होत.॥९७॥संसार मुळीं असार आहे : हें त्याचें स्वरूप ज्यांना समजतें, त्या पुरुषांना, संसारामध्यें एखाद्या वस्तूचा वियोग होणें, हें वैराग्य होण्याला कारण होतें. त्यापासूनच पुढें शांतिसुख विस्तृत होत जातें (प्राप्त होतें.) ॥ ९८ ॥ ज्या वेळीं प्राणी ह्या लोकांत जन्मास आला, त्याच

शरीरं जडमत्यर्थमपवित्रं विनश्वरम् ॥ विचार्यमाणे शोकस्य नावकाशः कथंचन ॥ ९६ ॥ पिता वा तनयो वा ऽपि यदि मृत्युवशं गतः ॥ मूढास्तमनुशोचन्ति स्वात्मताडनपूर्वकम्[1] ॥ ९७ ॥ निःसारे खलु संसारे वियोगो ज्ञानिनां यदा ॥ भवेद्वैराग्यहेतुः स शान्तिसौख्यं तनोति[2] च ॥ ९८ ॥ जन्मवान्यदि लोके ऽस्मिंस्तर्हि तं मृत्युरन्वगात्[3] ॥ तस्मादपरिहार्यो[4] ऽयं मृत्युर्जन्मवतां[5] सदा ॥ ९९ ॥

(मू.). ॥ ९६ ॥ (मू.) अनुशोचन्ति. ॥९७॥ (पू.) वियोगः, ॥ सः वैराग्यहेतुः (बा. उ.). ॥ ९८ ॥ [जनः] अस्मिन् लोके यदि (बा. मू.) अपरिहार्यः. ॥ ९९ ॥

१ आपल्या शरीराला ताडन करीत. २ विस्तारितो. ३ मागून गेला. ४ न टळण्याजोगा. ५ जन्मास येणारांना.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वेळीं मृत्यु त्याच्यामागून आला आहे. ह्मणून जन्मास आलेल्या प्राण्याला हा मृत्यु कधीं टाळतां येण्याजोगा नाहीं. ॥९९॥ सर्व प्राण्यांना जन्म किंवा मृत्यु प्राप्त होणें, हें त्यांच्या त्यांच्या कर्माधीन आहे; मनुष्य अज्ञान असला तरी, जर त्याला एवढी गोष्ट समजली आहे तर, तो बंधूंबद्दल शोक करील कसा? - कधीं करणार नाहीं. मूर्ख देखील ज्याबद्दल शोक करणार नाहीं, त्याबद्दल तत्त्वज्ञानी दुःख मानील काय? - ॥ १०० ॥ अरे! आजपर्यंत कोट्यावधि ब्रह्मांडें नष्ट होऊन गेलीं! अनेक सृष्टि विलय पावल्या! सगळे समुद्र देखील शुष्क होऊन जातात! तेव्हां ह्या क्षणिक जीविताविषयीं आस्था कसली बाळगावयाची? ॥ १०१ ॥ हलणाऱ्या पानाच्या अग्राला लागलेल्या उदकाच्या बिंदूप्रमाणें हें आयुष्य क्षणामध्यें नाहींसें होणारें आहे. भलत्याच

स्वकर्मवशतः सर्वजन्तूनां [२]प्रभवाप्ययौ ॥ वि[३]जानन्नप्यविद्वान्यः कथं शोचति बान्धवान् ॥ १०० ॥ ब्रह्माण्डकोटयो नष्टाः सृष्टयो बहुशो गताः ॥ शुष्यन्ति सागराः सर्वे कैवास्था क्षणजीविते ॥ १ ॥ [५]चलपत्रान्तलग्नाम्बुबिन्दुवत्क्षणभं[६]गुरम् ॥ [७]आयुस्त्यजत्यवेलायां कस्तत्र प्रत्ययस्तव ॥ २ ॥

यः अविद्वान् अपि, सर्वजन्तूनां प्रभवाप्ययौ स्वकर्मवशतः (बा. मू.) शोचति? ॥ १०० ॥ (पू.), ॥ सर्वे सागराः शुष्यन्ति, क्षणजीविते का एव आस्था? ॥ १ ॥ (पू.) ॥ आयुः अवेलायां त्यजति, तत्र तव कः प्रत्ययः? ॥ २ ॥

१ न जाणणारा. २ जन्ममृत्यूंना. ३ जाणणारा. ४ शुष्क होतात. ५ हालणाऱ्या पानाच्या अग्राला लागलेल्या पाण्याच्या बिंदूप्रमाणें. ६ क्षणांत नाश पावणारें. ७ आयुष्य. ८ अयोग्य वेळीं. ९ विश्वास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वेळीं तें प्राण्याला सोडून देतें (न समजतां किंवा ध्यानीं मनीं नसतां संपून जातें)! तेव्हां त्याच्यावर विश्वास तो कसला ठेवावयाचा ? ॥ १०२ ॥ जीवाला, पूर्वीच्या शरीरांत असतांना केलेल्या कर्मांप्रमाणें, पुन्हां देह प्राप्त होतो, त्या (नवीन प्राप्त झालेल्या) देहांत जीं कर्में करावीं, त्यांच्या योगानें पुढें दुसरा देह मिळतो; अशी परंपरा नित्यच चालावयाची. - अशा रीतीनें देहांचा वियोग किती वेळां झाला तरी आत्म्याचा नाश कधींही होत नाहीं; अर्थातच त्याबद्दल शोक करणें निरर्थक होय. - ॥ ३ ॥ ज्याप्रमाणें मनुष्य वस्त्र जुनें झालें म्हणजे तें टाकून देतो व नवें ग्रहण करितो, त्याप्रमाणें जीव जीर्ण शरीराचा त्याग करून पुन्हां नवीनाचा ॥ ४ ॥ नेहमीं स्वीकार करितोच. तेव्हां आतां त्याच्याबद्दल शोक करण्याला अवसर राहिला कोठें ! आत्मा कधीं मरत नाहीं, कधीं जन्मास येत नाहीं, किंवा कधीं वाढतही नाहीं.॥५॥तो सहाही

देही प्राक्तनदेहोत्थकर्मणा देहवान्पुनः ॥ तद्देहोत्थेन च पुनरेवं देहः सदाऽऽत्मनः ॥ ३ ॥ यथा त्यजति वै जीर्णं वासो गृह्णाति नूतनम् ॥ तथा जीर्णं परित्यज्य देही देहं पुनर्नवम् ॥ ४॥ भजत्येव सदा तत्र शोकस्यावसरः कुतः ॥ आत्मा न म्रियते जातु जायते न च वर्धते ॥५॥ षड्भावरहितोऽनन्तः सत्यप्रज्ञानविग्रहः ॥ आनन्दरूपो बुद्ध्यादिसाक्षी लयविवर्जितः ॥ ६ ॥

(बा. पू.) देहवान्, ॥ पुनः (उ.) देहः. ॥३॥ [जनः] यथा जीर्णं वासः त्यजति, नूतनं गृण्हाति, तथा देही जीर्णं देहं (बा. मू.) ॥ ४ ॥ सदा (बा. मू.). ॥ ५ ॥ ६ ॥

१ वस्त्राला. २ वाढतो. ३ सत्यज्ञान हें मूर्ति ज्याची, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भावविकारांनीं रहित आहे. त्याच्या स्वरूपाला इयत्ता नाहीं. तीन्ही काळीं नष्ट न होणारें निर्विषय ज्ञान हें त्याची मूर्ति होय. तो आनंदरूपी असून बुद्धि, चित्त इत्यादिकांचा साक्षी आहे. त्याचा नाश कधींही होत नाहीं. ॥ ६ ॥ भरता, 'आत्मा एकच सर्वत्र पूर्ण रूपानें भरलेला आहे; त्याच्या ठिकाणीं द्वैतभाव अगदीं नाहीं; तो सर्वत्र सारख्या सत्तारूपानें राहतो; - तोच आत्मा मी आहें' असें - पूर्णपणें जाणून शोक सोडून दे आणि आतां पुढली क्रिया कर. ॥ ७ ॥ कुलाला आनंद देणें हें तुझें कर्तव्य होय. म्हणून तूं आतां, सचिवांच्या आणि आमच्या साह्यानें, पित्याचें शव तैलद्रोणींतून बाहेर काढून, त्याचे यथायोग्य संस्कार कर.' ॥ ८ ॥ अशा प्रकारें साक्षात् वसिष्ठ गुरूंनीं बोध केला, तेव्हां भरतानें अज्ञानापासून उत्पन्न होणारा शोक सोडून देऊन पित्याची विधीप्रमाणें क्रिया केली. ॥९॥ त्याच्या पित्यानें (दशरथानें) यथाविधि अग्निहोत्र स्वी-

एक एव परो ह्यात्मा ह्यद्वितीयः समस्थितः ॥ इत्यात्मानं दृढं ज्ञात्वा त्यक्त्वा शोकं कुरु क्रियाम् ॥ ७ ॥ तैलद्रोण्याः पितुर्देहमुद्धृत्य[1] सचिवैः सह ॥ कृत्यं कुरु यथान्यायमस्माभिः कुलनन्दन ॥ ८ ॥ इति संबोधितः साक्षाद्गुरुणा भरतस्तदा ॥ विसृज्याज्ञानजं शोकं चक्रे स विधिवत्क्रियाम् ॥ ९ ॥ गुरुणोक्तप्रकारेण आहिताग्नेर्[2]यथाविधि ॥

आत्मा (बा. मू.) त्यक्त्वा, क्रियां कुरु. ॥७॥ कुलनन्दन, अस्माभिः सचिवैः [च] सह(बा. मू.)कुरु.' ॥८॥ सः साक्षात् गुरुणा (बा. मू.) अज्ञानजं शोकं विसृज्य, विधिवत् क्रियां चक्रे.॥९॥सः(बा. मू.)॥

१ बाहेर काढून. २ ज्यानें अग्न्याधान केलें (अग्निहोत्री), अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दशरथाची उत्तरक्रिया.

कारिलें होतें; ह्मणून भरतानें गुरूंनीं सांगितलेल्या प्रकारानें, शास्त्रामध्यें अग्निहोत्र्याची क्रिया करण्याचे जसजसे मार्ग सांगितले आहेत त्यांप्रमाणें, पित्याच्या शवाचे संस्कार केले. ॥ १० ॥ अकरावा दिवस आला असतां त्यानें वेदपारंगत अशा शेंकडों हजारों ब्राह्मणांना यथाविधि भोजन घातलें, ॥ ११ ॥ पित्याच्या उद्देशानें ब्राह्मणांना बहुत द्रव्य, सहस्र गाई, गांव, रत्नें व वस्त्रें दिलीं. ॥ १२ ॥ आणि पुढें तो वसिष्ठगुरु, भाऊ (शत्रुघ्न) आणि मंत्रिमंडळ ह्यांसहवर्तमान रामाचेंच ध्यान करीत तेथें आपल्या घरीं राहिला. ॥१३॥ - आतां त्याच्या मनांत विचार घोळूं लागले कीं, - सीता आणि लक्ष्मण ह्या दोघांना बरोबर घेऊन रामचंद्र

संस्कृत्य स पितुर्देहं विधिदृष्टेन कर्मणा ॥ १० ॥ एकादशेऽहनि प्राप्ते ब्राह्मणान्वेदपारगान् ॥ भोजयामास विधिवच्छतशोऽथ सहस्रशः ॥ ११ ॥ उद्दिश्य पितरं तत्र ब्राह्मणेभ्यो धनं बहु ॥ ददौ गवां सहस्राणि ग्रामान् रत्नाम्बराणि च ॥१२॥ अवसत्स्वगृहे तत्र राममेवानुचिन्तयन् ॥ वसिष्ठेन सह भ्रात्रा मन्त्रिभिः परिवारितः ॥ १३ ॥ रामेऽरण्यं प्रयाते सह जनकसुतालक्ष्मणाभ्यां सुघोरं माता मे राक्षसीव प्रदहति हृदयं दर्शनादेव सद्यः ॥

(बा. मू.) ॥ यथाविधि संस्कृत्य, ॥ १० ॥ (मू.) ब्राह्मणान् विधिवत् भोजयामास. ॥ ११ ॥ तत्र पितरं (मू.) ददौ. ॥ १२ ॥ तत्र (बा. मू.) अवसत्. ॥ १३॥ ‘ मे माता, जनकसुतालक्ष्मणाभ्यां सह रामे सुघोरं अरण्यं प्रयाते [सति], राक्षसी इव दर्शनात् एव सद्यः हृदयं प्रदहति, ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अत्यंत घोर अरण्यांत गेला, - ह्याला कारण - माझी माता होय. ह्मणून ती राक्षसी दृष्टीस पडल्याबरोबर तत्काल माझ्या अंतःकरणाचा दाह होऊं लागतो ! तेव्हां आतां आपण हें सर्व राज्य दूर झुगारून देऊन वनांत जावें आणि बुद्धि स्थिर करून, सीतेसह त्या सुहास्यवदन रामचंद्राचीच नित्य सेवा करीत राहावें. ॥ ११४ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे अयोध्याकाण्डे सप्तमः सर्गः ॥ ७ ॥

शंकर ह्मणाले:–पार्वति, महासमर्थ वसिष्ठमुनि अनेक मुनींसहवर्तमान मंत्रिमंडळाला बरोबर घेऊन राजाच्या सभेंत आले. हें सभागृह देवांच्या सभेसारखें होतें. ॥ १ ॥ त्या ठिकाणीं वसिष्ठ मुनि आसनावर ब-

गच्छाम्यारण्यमद्य स्थिर[1]मतिरखिलं दूरतो ऽ[2]पास्य राज्यं रामं सीतासमेतं स्मित[3]रुचिरमुखं नित्यमेवानुसेवे ॥ ११४ ॥ इति श्रीमद० उमा० अयोध्याकाण्डे सप्तमः सर्गः ॥ ७ ॥ श्रीमहादेव उवाच । वसिष्ठो मुनिभिः सार्धं मन्त्रिभिः परिवारितः ॥ राज्ञः सभां दे[6]वसभासन्निभामविशद्विभुः ॥ १ ॥ तत्रासने समासीनश्चतु[7]र्मुख इवापरः ॥ आनीय भरतं तत्र उपवेश्य सहानुजम् ॥ २ ॥

[अतः]अद्य अखिलं राज्यं दूरतः अपास्य, स्थिरमतिः [सन्] आरण्यं गच्छामि, [तत्र] स्मितरुचिरमुखं सीतासमेतं रामं नित्यं एव अनु[4]सेवे. ' ॥ ११४ ॥ इति सप्तमः सर्गः ॥ ७ ॥ श्रीमहा० उ० – विभु[5]ः (मू.) राज्ञः सभां अविशत्. ॥ १ ॥ (पू.) ॥ तत्र सहानुजं भरतं आनीय, उ[8]पवेश्य, ॥ २ ॥

---

१ स्थिर बुद्धि ज्याची, असा. २ फेंकून. ३ हास्यानें सुंदर मुख ज्याचें, अशा. ४ सतत सेवा करीन. ५ समर्थ. ६ देवांच्या सभेसारख्या. ७ चार मुखें ज्याला आहेत तो (ब्रह्मदेव). ८ बसवून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

‘ राम राजा. आह्मी त्याचे सेवक.’

सले. - त्यांच्याकडे पाहिल्याबरोबर पाहणाराला - ‘ हा प्रतिब्रह्मदेवच - असावा, ’ असें वाटे - त्यांनीं तेथें कनिष्ठ बंधूसह भरताला आणवून जवळ बसवून घेतलें ॥ २ ॥ आणि, त्या शत्रूंचा निग्रह करणाऱ्या (प्रतापी) पुरुषाजवळ, देशाला आणि कालाला अनुरूप असें भाषण करण्यास प्रारंभ केला:—‘बाळा, तुझ्या पित्याच्या आज्ञेप्रमाणें आह्मी आज तुला राज्याभिषेक करणार आहों. ॥ ३ ॥ हे पुरुषश्रेष्ठा, तुजकरितां कैकेयीनें राज्य मागून घेतलें; व दशरथाचा स्वतांची प्रतिज्ञा सत्य करण्याबद्दल दृढ निश्चय असल्यामुळें, त्यानें तें, आह्मा सर्वांना सांगून, प्रसिद्धपणें तुला दिलें. ॥ ४ ॥ त्याप्रमाणें आज मुनींकडून मंत्रपूर्वक तुला अभिषेक व्हावा.’ तें ऐकून भरतही ह्मणाला:—‘मुनिमहाराज, मला राज्य काय करावयाचें आहे? ॥५॥रामचंद्र राजाधिराज होय; आह्मी त्याचेच सेवक. आह्मीं उद्यां सकाळीं रामाला लवकर परत आणण्याकरितां, जाण्याचा संकल्प

अब्रवीद्वचनं देशकालोचितमरिन्दमम् ॥ वत्स राज्ये ऽभिषेक्ष्यामस्त्वामद्य पितृ-
शासनात् ॥ ३ ॥ कैकेय्या याचितं राज्यं त्वदर्थे पुरुषर्षभ ॥ सत्यसन्धो दशरथः
प्रतिज्ञाय ददौ किल ॥ ४ ॥ अभिषेको भवत्वद्य मुनिभिर्मन्त्रपूर्वकम् ॥ तच्छ्रुत्वा
भरतो ऽप्याह मम राज्येन किं मुने ॥ ५ ॥ रामो राजाधिराजश्च वयं तस्यैव किंकराः॥

अरिन्दमं[1][तं]देशकालोचितं[2] वचनं अब्रवीत्—‘वत्स,[वयं]अद्य त्वां पितृशासनात्[3] राज्ये अभिषेक्ष्यामः. ॥३॥ पुरुषर्षभ[4], सत्यसन्धः दशरथः त्वदर्थे(मू.). ॥४॥ (बा. पू.) ॥ अद्य भवतु.’(ज.). ॥५॥(६पू.)॥

१ शत्रूंना दमविणाऱ्या. २ देशाला आणि कालाला योग्य, अशा. ३ पित्याच्या आज्ञेस्तव. ४ पुरुषांत श्रेष्ठ, अशा. ५ कळवून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केला आहे.॥६॥मी, आपण, आणि त्या राक्षसी कैकेयीशिवाय सर्व माता - जाऊं चला. - कैकेयीच्या ठिकाणीं माझा मातृत्वाचा संबंध आहे खरा; पण - मला तर वाटतें - तिला आतांच्या आतां मारून टाकावें !॥७॥ परंतु स्त्रीहत्या केली असतां रघुवीर रामचंद्र मला क्षमा करणार नाहीं, - ह्मणून मी तसें करीत नाहीं. - म्हणून, उद्यां उजाडतांच, मी शत्रुघ्नाला बरोबर घेऊन पायीं चालत लवकर दंडकारण्यांत जाणार. आपण या किंवा नका येऊं. राम ज्याप्रमाणें वनांत गेला, त्याच प्रमाणें मी आंगावर वल्कलें हींच वस्त्रें घेऊन - अरण्यांत जाईन. - ॥ ८ ॥ ९ ॥ मुने, मजबरोबर शत्रुघ्नही - येणार आहे. - आह्मी रामचंद्र परत येईपर्यंत फळें आणि मुळें भक्षण करून राहूं, भूमीवर शयन करीत जाऊं व मस्तकावर जटा धारण करूं.' ॥ १० ॥

श्वः प्रभाते गमिष्यामो राममानेतुमञ्जसा॥ ६ ॥ अहं यूयं मातरश्च कैकेयीं राक्षसीं विना॥ हनिष्याम्यधुनैवाहं कैकेयीं मातृगन्धिनीम्[1]॥७॥किंतु मां नो रघुश्रेष्ठः स्त्रीहन्तारं[2] सहिष्यते[3] ॥ तच्छ्वोभूते गमिष्यामि पादचारेण दण्डकान् ॥ ८ ॥ शत्रुघ्नसहितस्तूर्णं यूयमार्यान्तु[4] वा न वा ॥ रामो यथा वने यातस्तथाऽहं वल्कलाम्बरः ॥ ९ ॥ फलमूलकृताहारः शत्रुघ्नसहितो मुने॥ भूमिशायी[5] जटाधारी यावद्रामो निवर्तते[6] ॥ १० ॥

(बा. ६ उ. ॥ ७ पू.) मातरः च गमिष्यामः. ॥ अहं अधुना एव मातृगन्धिनीं कैकेयीं हनिष्यामि ! ॥६॥७॥(बा. पू.) मां नो सहिष्यते. ॥ (बा. उ.)गमिष्यामि.॥८॥शत्रुघ्नसहितः तूर्णं[गमिष्यामि] (पू.)! यावत् रामः निवर्तते,[तावत्]मुने, शत्रुघ्नसहितः अहं, यथा(बा.९उ.,१०पू.) [भविष्यामि]. ॥९॥१०॥

१ माता असा संबंध जिचा, अशा. २ स्त्रीला मारणाऱ्या. ३ क्षमा करील. ४ येवोत. ५ भूमीवर निजणारा. ६ परततो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भरत रामाकडे चालला.

भरत असा निश्चय करून (उघड बोलून दाखवून) स्वस्थ राहिला. - तें ऐकतांच - सर्व जनांनीं आनंदभरित होऊन त्याची 'योग्य ! उत्तम !' असें ह्मणून प्रशंसा केली. ॥११॥ पुढें प्रभातकाळीं भरत जावयास निघाला; सुमंत्राच्या आज्ञेवरून घोडे हत्ती ह्यांसह सर्व सैन्य त्याच्या (भरताच्या) मागून चाललें. ॥ १२ ॥ कौसल्या आदिकरून राजपत्न्या, वसिष्ठप्रभृति ब्राह्मण एकंदर सर्व जन, कित्येक त्याच्या दोन्हीं बाजूंना, कोणी पाठीमागून, असे चालूं लागले. - त्या समाजाच्या योगानें - पृथ्वी आच्छादून गेली ! ॥ १३ ॥ त्या प्रचंड सैन्यानें शृंगवेर पुराजवळ जाऊन, शत्रुघ्नाच्या आज्ञेप्रमाणें, येथून तेथून गंगेच्या सर्व तीरावर तळ दिला. ॥ १४ ॥ ' भरत आला, ' अशी वार्ता कानीं येतांच गुहाच्या मनांत शंका उद्भवली :—

इति निश्चित्य भरतस्तूष्णीमेवावतस्थिवान् ॥ साधु साध्विति तं सर्वे प्रशशंसुर्मुदान्विताः ॥११॥ ततः प्रभाते भरतं गच्छन्तं सर्वसैनिकाः ॥अनुजग्मुः सुमन्त्रेण नोदिताः साश्वकुञ्जराः ॥ १२॥ कौसल्याद्या राजदारा वसिष्ठप्रमुखा द्विजाः ॥ छादयन्तो भुवं सर्वे पृष्ठतः पार्श्वतोऽग्रतः ॥ १३ ॥ शृंगवेरपुरं गत्वा गंगाकूले समन्ततः ॥ उवास महती सेना शत्रुघ्नपरिचोदिता ॥१४॥ आगतं भरतं श्रुत्वा गुहः शंकितमानसः ॥

भरतः (पू.). ॥ सर्वे मुदा अन्विताः तं(उ.). ॥११॥ ततः सर्वसैनिकाः प्रभाते गच्छन्तं (मू.) अनुजग्मुः. ॥१२॥(पू.)॥सर्वे भुवं(उ.)[ययुः]. ॥१३॥ शत्रुघ्नपरिचोदिता महती सेना(मू.). ॥१४॥ गुहः भरतं(पू.)॥

१ अवतस्थिवान् राहिलेला. २ घोडे हत्ती ह्यांसह. ३ आच्छादणारे. ४ बाजूंकडे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

' भरत मोठें सैन्य बरोबर घेऊन आला आहे, - असें समजतें; - ॥ १५ ॥ पण तो कांहीं दुष्ट कृत्य करण्यासाठीं तर आला नसेल ना! रामाला हा वृत्तांत अद्यापि कळलेला नाहीं (ही गोष्ट त्याच्या ध्यानींमनीं देखील नसेल)!' - ' कांहीं असो. - आपण जाऊन त्याच्या मनांत काय आहे, तें काढून घ्यावें. जर शुद्ध असेल (त्याच्या मनांत कपट नसेल), तर तो खुशाल गंगा उतरून जाईल (आह्मीं त्याला पलिकडे नेऊं). तसें नसेल तर मात्र, माझ्या सगळ्या ज्ञातींनीं आपल्या नौका गंगेच्या बाहेर ओढून ठेवून, हातांत आयुधें घेऊन सर्व दिशांकडे पाहत (ते काय काय करतात, पलिकडे जाण्याचा यत्न करतात कीं काय, ह्याबद्दल चोहोंकडून शोध ठेवीत) - त्यांना पलिकडे जाण्यास प्रतिबंध करण्यासाठीं - सिद्ध राहावें.' ॥ १६ ॥ १७ ॥ गुहानें आपल्या सर्व ज्ञातींना अशी आज्ञा दिली. व तो नानाप्रकारचीं बहुत उपायनें (नजराणे) घेऊन

महत्या सेनया सार्धमागतो भरतः किल ॥ १५ ॥ पापं कर्तुं न वाऽऽयाति रामस्याविदितात्मनः ॥ गत्वा तद्धृदयं ज्ञेयं यदि शुद्धस्तरिष्यति ॥ १६ ॥ गंगां नो चेत्समाकृष्य नावस्तिष्ठन्तु सायुधाः ॥ ज्ञातयो मे समायत्ताः पश्यन्तः सर्वतोदिशम् ॥ १७ ॥ इति सर्वान्समादिश्य गुहो भरतमागतः ॥ उपायनानि संगृह्य विविधानि बहून्यपि ॥ १८ ॥

भरतः (उ.). ॥ १५ ॥ अविदितात्मनः रामस्य (बा. १६ मू.) गंगां तरिष्यति. नो चेत्, मे ज्ञातयः नावः आकृष्य, सर्वतोदिशं पश्यन्तः सायुधाः समायत्ताः [सन्तः] तिष्ठन्तु. ॥ १६ ॥ १७ ॥ गुहः (मू.) उपायनानि संगृह्य, भरतं आगतः. ॥ १८ ॥

१ नाहीं कळलें मनाला ज्याच्या, अशा. २ तरेल. ३ सिद्ध. ४ राहोत. ५ नजराण्यांना.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भरताकडे आला. ॥ १८ ॥ त्यानें इकडे येतांना, अनेक प्रकारांचीं आयुधें घेऊन सज्ज असे ज्ञातींतील पुष्कळ लोक बरोबर घेतले होते. भरताच्या अग्रभागीं उपायनें निवेदन करून त्यानें चोहोंकडे ॥ १९ ॥ दृष्टि फेंकिली - तों त्याला पुढील प्रकार दिसून आला :- कनिष्ठ बंधूसह भरत बसला आहे; त्याच्याजवळच मंत्रिमंडळ आहे; त्यानें आपल्या मेघासारख्या श्यामवर्ण शरीरावर वस्त्राऐवजीं वल्कलें परिधान केलीं असून, जटांचा मुकुट धारण केला आहे; ॥ २० ॥ तो रामाबद्दलच शोक करीत असून मुखानें 'राम राम' असा घोष करीत आहे. - हें पाहून गुहानें - त्याला भूमीवर मस्तक ठेवून वंदन केलें, व 'मी गुह,' असें सांगितलें. ॥ २१ ॥ भरतानें तत्काल उठून गुहाला घट्ट आलिंगन दिलें आणि आदरपूर्वक कुशलप्रश्न विचारिले. ह्या-

प्रययौ ज्ञातिभिः सार्द्धं बहुभिर्विविधायुधैः ॥ निवेद्योपायनान्यग्रे भरतस्य समन्ततः ॥ ॥ १९ ॥ दृष्ट्वा भरतमासीनं सानुजं सह मन्त्रिभिः ॥ चीराम्बरं घनश्यामं जटामुकुटधारिणम् ॥ २० ॥ राममेवानुशोचन्तं रामरामेतिवादिनम् ॥ ननाम शिरसा भूमौ गुहोऽहमिति चाब्रवीत् ॥ २१ ॥ शीघ्रमुत्थाप्य भरतो गाढमालिंग्य सादरम् ॥ दृष्ट्वाऽनामयमव्यग्रः सखायमिदमब्रवीत् ॥ २२ ॥

(बा. पू.) ज्ञातिभिः सार्धं प्रययौ. ॥ (बा. उ.) अग्रे निवेद्य, समन्ततः ॥ १९ ॥ दृष्ट्वा, सानुजं मन्त्रिभिः सह आसीनं (बा. २० उ., २१ पू.) भरतं शिरसा भूमौ (बा. २१ उ.) ॥ २० ॥ २१ ॥ भरतः (पू.) आलिंग्य, ॥ अनामयं (बा. उ.) – ॥ २२ ॥

१ खुशालीला. २ मित्राला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वेळीं त्याचें (भरताचें) मन किंचित् ही व्यग्र न होतां स्वस्थ होतें (दुष्ट हेतूनें आला असता तर त्याचें मन गुहाला पाहतांच, व्यग्र झालें असतें; पण तसें कांहीं नव्हतें, ह्मणून त्याची वृत्ति बदलली नाहीं). तो गुहाला आपला मित्र समजून पुढें सांगितल्याप्रमाणें ह्मणाला :— ॥ २२ ॥ ' भाऊ ! तूं ह्या स्थळीं रामाबरोबर आनंदानें बसलास, त्या निर्मळ मनाच्या रामचंद्रानें तुला आलिंगन दिलें, - तुझी प्रीति पाहून - प्रेमाश्रूंनीं रामाचे नेत्र भरून आले, ह्यावरून ॥ २३ ॥ तूं धन्य आहेस ! सीता आणि लक्ष्मण ह्यांसह त्या कमलनयन रामचंद्राशीं पुष्कळ भाषण केलेंस, त्या अर्थीं तूं कृतकृत्य झालास ! ॥ २४ ॥ गुहा, तुझें आचरण फार चांगलें आहे. तुला ज्या स्थलीं रामाचें दर्शन झालें, तेथें मला ने. रामानें सीतेसह जेथें शयन केलें, तें स्थल मला दाखव. ॥ २५ ॥ तूं रामावर भक्ति ठेविलीस व त्याला अ-

भ्रातस्त्वं राघवेणात्र समेतः समवास्थितः ॥ रामेणालिंगितः सार्द्रनयनेनामलात्मना ॥ २३ ॥ धन्यो ऽसि कृतकृत्यो ऽसि यत्त्वया परिभाषितः ॥ रामो राजीवपत्राक्षो लक्ष्मणेन च सीतया ॥ २४ ॥ यत्र रामस्त्वया दृष्टस्तत्र मां नय सुव्रत ॥ सीतया सहितो यत्र सुप्तस्तद्दर्शयस्व मे ॥ २५ ॥ त्वं रामस्य प्रियतमो भक्तिमानसि भाग्यवान् ॥ इति संस्मृत्य संस्मृत्य रामं साश्रुविलोचनः ॥ २६ ॥

'भ्रातः, अत्र (पू.). ॥ (बा. उ.) रामेण आलिंगितः. ॥२३॥ (बा. मू.) [सहितः] रामः परिभाषितः. ॥ २४ ॥ (पू.). ॥ यः (बा. उ.) दर्शयस्व. ॥ २५ ॥ (पू.) असि.' ॥ इति रामं (उ.) ॥ २६ ॥

१ उदकयुक्त डोळे ज्याचे, अशा. २ निर्मल मन ज्याचें, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

' मजसाठीं रा-
माला दुःख!'

त्यंत प्रिय झालास, त्या अर्थीं तूं भाग्यवान् आहेस.' भरत अशा प्रकारें रामाचें वारंवार स्मरण करून नेत्रांतून आंसवें ढाळूं लागला. ॥ २६ ॥ पुढें तो गुहाच्या बरोबर, रामचंद्र रात्रौ ज्या स्थलीं राहिला होता, तेथें गेला. त्या ठिकाणीं दर्भ पसरून सिद्ध केलेलें शयनस्थल त्याच्या दृष्टीस पडलें. ॥२७ ॥ सीतेच्या आंगावरील सुवर्णालंकारांशीं घर्षण झाल्यामुळें त्या शय्येवर सुवर्णचिन्हें लागलीं होतीं. - तें स्थल दृष्टीस पडतांच - भरताचें हृदय दुःखानें संतप्त झालें व तो शोक करूं लागलाः–॥२८॥'अहो! जी जनकराजाची अतिसुकुमार कन्या सीता राजवाड्यांत, रत्नांच्या मंचकीं, उत्तम अशा मृदु शय्येवर, ॥२९॥ रामासह शयन करावयाची, त्याच सीतेनें, माझ्या दोषास्तव, रामासहवर्तमान दर्भांच्या आसनावर कष्टानें शयन करावें काय!॥३०॥धिक्कार असो मला!! कैकेयी ह्मणजे मूर्तिमान् पापाच्या राशीसारखी आहे! तिच्या उदरीं मी जन्मास आलों आणि मजकरितां पर-

गुहेन सहितस्तत्र यत्र रामः स्थितो निशि ॥ ययौ ददर्श शयनस्थलं कुशसमा[1]स्तृतम् ॥ ॥ २७ ॥ सीता[2]भरणसँल्लग्नस्वर्णबिंदुभिरञ्चि[3]तम् ॥ दुःखसंतप्तहृदयो भरतः पर्यदे[4]वयत् ॥२८॥ अहो ऽतिसुकुमारी या सीता जनकनन्दिनी॥प्रासादे रत्नपर्यंके कोमलास्तरणे शुभे ॥ २९ ॥ रामेण सहिता शेते सा कथं कुशे[5]विष्टरे ॥ सीता रामेण सहिता दुःखेन मम दोषतः ॥ ३० ॥ धिङ् मां जातो ऽस्मि कैकेय्यां पापराशिसमानतः ॥

(पू.)स्थितः, तत्र॥ (उ.) शयनस्थलं ददर्श. ॥२७॥ भरतः (मू.)–॥२८॥ 'अहो! या (मू.). ॥२९॥ (बा. पू.) सीता कुशविष्टरे (बा. उ.) कथं [शेते]? ॥३०॥ (बा. पू.) कैकेय्यां जातः अस्मि! ॥

१ दर्भाच्या पसरलेल्या. २सीतेच्या अलंकारांशीं घांसल्यामुळें सुवर्णाच्या चिन्हांनीं. ३ युक्त. ४ रडूं लागला. ५दर्भाच्या आसनांवर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मेश्वररूपी रामचंद्राला हे क्लेश सोसावे लागत आहेत! - व्यर्थ माझें जिणें!! - ॥ ३१ ॥ अहो! लक्ष्मण महाथोर खरा! जन्मास आल्याचें अत्युत्तम फल त्यानें मिळविलें; कारण, राम वनांत राहूं लागला तरी तो (लक्ष्मण) संतुष्ट मनानें नित्य त्याच्याच मागून फिरत असतो! ॥ ३२ ॥ मी जर रामाच्या भक्तांच्या दासांचा सेवक झालों, तरच माझा जन्म सफल होईल, ह्यांत संशय नाहीं. ॥ ३३ ॥ भाऊ! राम राहतो कोठें तें जर तुला विदित असेल, तर सगळें मला सांग; ह्मणजे मी त्याला आणण्याकरितां लवकर जातों.' ॥ ३४ ॥ गुहानें, भरताचें अंतःकरण शुद्ध आहे असें कळल्यावर, त्याला प्रेमपूर्वक ह्मटलें :– 'देवा (राजा) भरता, कमलनयन रामचंद्र, लक्ष्मण तशीच सीता देवी ह्या सर्वांवर तुझी इतकी

मन्निमित्तमिदं क्लेशं रामस्य परमात्मनः॥३१॥अहो ऽतिसफलं जन्म लक्ष्मणस्य महात्मनः॥राममेव सदा ऽन्वेति वनस्थमपि हृष्टधीः॥३२॥ अहं रामस्य दासा ये तेषां दासस्य किंकरः॥यदि स्यां सफलं जन्म मम भूयान्न संशयः ॥३३॥भ्रातर्जानासि यदि तत्कथयस्व ममाखिलम्॥यत्र तिष्ठति तत्राहं गच्छाम्यानेतुमञ्जसा॥३४॥गुहस्तं शुद्धहृदयं ज्ञात्वा सस्नेहमब्रवीत् ॥ देव त्वमेव धन्यो ऽसि यस्य ते भक्तिरीदृशी ॥ ३५ ॥

(बा. उ.) मन्निमित्तम्! ॥३१॥ (बा. पू.) जन्म अतिसफलं! ॥ [सः] सदा हृष्टधीः [सन्] (बा. उ.) अन्वेति! ॥३२॥ अहं, ये (बा. पू.) ॥ यदि स्यां, [तदा] मम जन्म (उ.). ॥ ३३ ॥ भ्रातः, यदि (बा. पू.) कथयस्व. ॥ (बा. उ.) गच्छामि.' ॥ ३४ ॥ (३५ पू.) – ॥ '(बा. ३५ उ.) ॥

१ मागून जातो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पलिकडे जाण्याची तयारी.

भक्ति आहे, त्या अर्थीं तूंच धन्य आहेस ! चित्रकूट पर्वताच्या जवळ, जेथून गंगानदी फार दूर नाहीं अशा ठिकाणीं, ॥ ३५ ॥ ३६ ॥ ऋषींच्या आश्रमस्थलीं कनिष्ठ बंधु (लक्ष्मण) आणि जानकी ह्या दोघांसह प्रभु रामचंद्र राहत असतो. त्या ठिकाणीं फळें, मुळें ह्यांची समृद्धि असल्यामुळें रामाला सुख होत आहे. ॥ ३७ ॥ तेथें आपण लवकर जाऊं चला. तुह्मी आतां गंगा उतरून पलिकडे चलावें.' असें बोलून गुह - बाहेर - गेला व लागलाच पांचशें नौका ॥ ३८ ॥ घेऊन आला. - त्यानें इतक्या नौका, - भरतानें सैन्यासह ती महानदी उतरून जावें, एवढ्यासाठीं आणिल्या. - त्यांमध्येंच त्यानें, भरताला विशेष आदर प्रदर्शित करण्यासाठीं - स्वतांच, राजाला योग्य अशी (उत्तम) एक नौका आणिली. नंतर गुहानें - त्या नौकेंत - ॥ ३९ ॥ भरत, शत्रुघ्न, रामाची माता (कौसल्या) आणि वसिष्ठ एवढ्यांना बसविलें, तशीच दुसरी

रामे राजीवपत्राक्षे सीतायां लक्ष्मणे तथा ॥ चित्र[1]कूटाद्रिनिकटे मंदा[2]किन्या ऽविदूरतः[3] ॥ ३६ ॥ मुनीनामाश्रमपदे रामस्तिष्ठति सानुजः ॥ जानक्या सहितो नन्दा[4]त्सुखमास्ते किल प्रभुः ॥ ३७॥ तत्र गच्छामहे शीघ्रं गंगां तर्तुमिहार्हसि ॥ इत्युक्त्वा त्वरितं गत्वा नावः[5] पञ्च[6] शतानि[7] ह ॥ ३८ ॥ समानयत्ससैन्यस्य तर्तुं गंगां महानदीम् ॥ स्वयमेवानिर्णा[8]यैकां राजनावं गुहस्तदा ॥ ३९ ॥ आरोप्य भरतं तत्र शत्रुघ्नं राममातरम् ॥

(३६ पू.) ईदृशी भक्तिः ! (३६ उ.) ॥ ३५॥ ३६ ॥ (पू.) तिष्ठति. ॥ प्रभुः (उ.). ॥ ३७॥ (मू.) नावः ॥ ३८ ॥ (बा. पू.) तर्तुं समानयत. ॥ गुहः तदा (बा. उ.) आनिनाय. ॥३९॥ तत्र (मू.) ॥

१ चित्रकूट पर्वताच्या जवळ. २गंगेच्या. ३ जवळ. ४ समृद्धास्तव. ५ नौकांना. ६ पांच. ७ शेंकडे, अशा. ८ आणिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- चांगली एक नौका आणवून - तीमध्यें कैकेयीला[1] व दुसऱ्या स्त्रियांना बसविलें, - आणि सर्वांना गंगेच्या पैल तीरीं नेलें. - ॥ ४० ॥ गंगा उतरून पलिकडे गेल्याबरोबर लागलाच भरत - सैन्यासह - भरद्वाज मुनींच्या आश्रमापर्यंत गेला. - पुढें तो, आश्रमांतील लोकांना उपद्रव होऊं नये - ह्मणून आपलें प्रचंड सैन्य बऱ्याच अंतरावर ठेवून, शत्रुघ्नासह आंत (आश्रमांत) शिरला. ॥ ४१ ॥ त्या आश्रमांत अग्नीप्रमाणें तेजस्वी भरद्वाज मुनि बसले होते. त्यांना पाहून भरतानें अत्यंत भक्तिपूर्वक साष्टांग नमस्कार घातला. ॥४२॥ त्या श्रेष्ठ मुनींनीं, हा दशरथाचा पुत्र असें ओळखून, त्याचें स्वागत केलें, पुढें, त्यानें शरीरावर जटा आणि वल्कलें धारण केलीं आहेत असें पाहून, कुशलप्रश्नपूर्वक पुढील प्रश्न विचारिले :- ॥ ४३ ॥ 'भरता ! राज्य चा-

वसिष्ठं च तथाऽन्यत्र कैकेयीं चान्ययोषितः[2] ॥ ४० ॥ तीर्त्वा गंगां ययौ शीघ्रं भरद्वाजाश्रमं प्रति ॥ दूरे स्थाप्य[3] महासैन्यं भरतः सानुजो ययौ ॥ ४१ ॥ आश्रमे मुनिमासीनं ज्वलन्तमिव पावकम् ॥ दृष्ट्वा ननाम भरतः साष्टांगमतिभक्तितः ॥ ४२ ॥ ज्ञात्वा दाशरथिं प्रीत्या पूजयामास मौनिराट् ॥ पप्रच्छ कुशलं दृष्ट्वा जटावल्कलधारिणम् ॥ ४३ ॥ राज्यं प्रशासतस्ते ऽद्य किमेतद्वल्कलादिकम् ॥ आगतोऽसि किमर्थं त्वं विपिनं मुनिसेवितम् ॥ ४४ ॥

(मू.) आरोप्य, ॥ ४० ॥ गंगां (पू.) ययौ. ॥ भरतः महासैन्यं (उ.). ॥ ४१ ॥ भरतः आश्रमे आसीनं मुनिं ज्वलन्तं[4] पावकं[5] इव दृष्ट्वा, अतिभक्तितः साष्टांगं ननाम. ॥ ४२ ॥ मौनिराट्[6] दाशरथिं (पू.). ॥ (उ.) दृष्ट्वा, कुशलं पप्रच्छ - ॥ ४३ ॥ ' (पू.) किं ? ॥ (उ.) विपिनं[7] किमर्थं आगतः असि ?' ॥ ४४ ॥

---

१ कैकेयीला मुख्य राजनौकेंत घेतलें नाहीं, हा तिचा अनादर त्यांनीं जाणून बुजूनच केला. २ दुसऱ्या स्त्रियांना. ३ ठेवून. ४ पेटलेल्या. ५ अग्नीप्रत. ६ ऋषींतील राजा. ७ अरण्यास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लावावयाचें - हें तुझें कर्तव्य, तें सोडून - आज तूं हें वल्कलादिक काय ह्मणून धारण केलेंस? अरण्यामध्यें मुनींनीं राहावें : त्याठिकाणीं तूं कशासाठीं आलास?' ॥ ४४ ॥ हें भरद्वाजमुनींचें भाषण कानीं पडतांच भरताच्या नेत्रांतून अश्रुधारा चालूं लागल्या. - तो ह्मणाला :- 'महाराज, आपण सर्वज्ञ असून सर्व प्राण्यांच्या अंतरीं वास करितां; तेव्हां आपल्याला यच्चयावत् सगळ्या गोष्टी विदित आहेत. ॥ ४५ ॥ असें असून आपण मला थोडासा प्रश्न करितां, त्याअर्थी हा मजवर आपला अनुग्रहच आहे. महाराज, कैकेयीनें रामाला राज्य मिळण्यांत विघ्न आणण्यासाठीं जें कर्म केलें तें, ॥ ४६ ॥ किंवा तो वनवासाला - कोणाच्या सांगण्यावरून कसा - गेला, इत्यादि मला कांहीं एक माहीत नाहीं (मला कळून ही गोष्ट घडलेली नाहीं); मुनिश्रेष्ठा, ह्याबद्दल मी आज आपल्या चरणयुगुलाची (दोन्ही पायांची) शपथ घेतों.' ॥ ४७ ॥ असें बोलून भरतानें मुनींच्या चरणांवर हात ठेविले, व खिन्न अंतःकरणानें - पुन्हां

भरद्वाजवचः श्रुत्वा भरतः साश्रुलोचनः ॥ सर्वं जानासि भगवन् सर्वभूताशयस्थितः[1] ॥ ४५ ॥ तथा ऽपि पृच्छसे किंचित्तदनुग्रह एव मे ॥ कैकेय्या यत्कृतं कर्म रामराज्यविघातनम् ॥ ४६ ॥ वनवासादिकं वा ऽपि न हि जानामि किंचन ॥ भवत्पादयुगं[2] मे ऽद्य प्रमाणं मुनिसत्तम ॥ ४७ ॥ इत्युक्त्वा पादयुगलं[3] मुनेः स्पृष्ट्वा ऽऽर्तमानसः[4] ॥

भरतः (पू.) ॥ '(उ.) [त्वं] सर्वं जानासि, ॥ ४५ ॥ तथापि पृच्छसे, तद् मे (पू.). ॥ (उ.) कर्म कृतम् ॥ ४६ ॥ (पू.) नहि जानामि. ॥ मुनिसत्तम, मे (उ.).' ॥४७॥ इति उक्त्वा, मुनेः (पू.)॥

१ सर्वांच्या अंतरीं राहिलेला. २ आपले दोन चरण. ३ दोन चरणांना. ४ पीडित मन ज्याचें, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

म्हटलें :— 'महाराज, माझें मन शुद्ध आहे किंवा कलुषित (गढूळ, दुष्ट) आहे, तें जाणण्यास आपण समर्थ आहां. ॥ ४८ ॥ स्वामी! रामराजा विद्यमान असतां मला राज्य काय करायाचें आहे? मुनिश्रेष्ठा, मी रामचंद्राची नित्य सेवा करून राहीन. ॥ ४९ ॥ म्हणून, ऋषिवर्य, मी रामाकडे जाऊन त्याच्या चरणापुढें लोटांगण घालीन, आणि सर्व राज्यभार अर्पण करून त्याला येथेंच ॥ ५० ॥ वसिष्ठप्रभृति मुनि, नागरिक जन आणि देशोदेशींचे लोक ह्यांच्या साह्यानें अभिषेक करीन. पुढें त्या लक्ष्मीपति प्रभूला अयोध्येस नेऊन मी त्याचा दास अति नीचाप्रमाणें त्याची सेवा करीत राहीन.' ॥ ५१ ॥ हें भरताचें वचन ऐकून भरद्वाजमुनींना आश्चर्य वाटलें. त्यांनीं त्याला आलिंगन दिलें व मस्तकाचें अवघ्राण करून त्याची प्रशंसा केली :—

ज्ञातुमर्हसि मां देव शुद्धो वा ऽशुद्ध एव वा ॥४८॥ मम राज्येन किं स्वामिन् रामे तिष्ठति राजनि ॥ किंकरो ऽहं मुनिश्रेष्ठ रामचन्द्रस्य शाश्वतः[1] ॥४९॥ अतो गत्वा मुनिश्रेष्ठ रामस्य चरणान्तिके[2] ॥ पतित्वा राज्यसंभारान्समर्प्यात्रैव राघवम् ॥५०॥ अभिषेक्ष्ये[3] वसिष्ठाद्यैः पौरजानपदैः[4] सह ॥ नेष्ये ऽयोध्यां रमानाथं दासः सेवे ऽतिनीचवत्॥५१॥ इत्युदीरितमाकर्ण्य भरतस्य वचो मुनिः॥आलिंग्य मूर्ध्न्यवघ्राय प्रशशंस सविस्मयः॥५२॥

'(उ.) मां ज्ञातुं अर्हसि. ॥४८॥ (पू.) तिष्ठति मम राज्येन किं? ॥ मुनिश्रेष्ठ, (उ.) किंकरः॥४९॥ मुनिश्रेष्ठ, (मू.) ॥ ५० ॥ (पू.) ॥ अयोध्यां नेष्ये. दासः [अहं] (बा. उ.) सेवे.' ॥ ५१ ॥ मुनिः भरतस्य (पू.) आकर्ण्य, ॥ (उ.) प्रशशंस. ॥ ५२ ॥

१ नित्याचा. २ चरणाजवळ. ३ अभिषेक करीन. ४ नागरिक आणि देशांतील लोकांशीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'एक दिवस राहून जा.'

॥ ९२ ॥ 'बाळा, हें भविष्य मी ज्ञानदृष्टीनें पूर्वीच जाणिलें होतें. तूं अगदीं खेद करूं नकोस; तुझी रामावर लक्ष्मणापेक्षांही अधिक भक्ति आहे, - असें मी पूर्णपणें जाणतों. - ॥ ९३ ॥ तुझ्या आचरणांत मुळींच दोष नाहीं. भरता, मी सैन्यासह तुझें आतिथ्य करूं इच्छितों. तूं आज सैन्यासहवर्तमान येथें भोजन करून उद्यां रामाजवळ जावेंस.' ॥ ९४ ॥ भरत ह्मणाला :–' महाराज, जशी आपली आज्ञा होईल तसें.' पुढें भरद्वाजमुनि जाऊन होमशाळेंत बसले व आचमन करून मौन व्रत स्वीकारून, ॥ ९५ ॥ इच्छित पूर्ण करणाऱ्या कामधेनूचें ध्यान करूं लागले. ते मुनि - अभ्यागतांच्या सर्व - इच्छा पुरवीत असत. पुढें, कामधेनूनें ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें सर्व अलौकिक (अतिउत्तम) पदार्थ उत्पन्न केले. ॥ ९६ ॥ भरताची

वत्स ज्ञातं पुरैवैतद्भविष्यं ज्ञानचक्षुषा[1] ॥ मा शुचस्त्वं परो भक्तः श्रीरामे लक्ष्मणादपि ॥५३॥ आतिथ्यं कर्तुमिच्छामि ससैन्यस्य तवानघ॥ अद्य भुक्त्वा ससैन्यस्त्वं श्वो गन्ता रामसन्निधिम्॥५४॥ यथा ऽऽज्ञापयति भवांस्तथेति भरतो ऽब्रवीत्॥ भरद्वाजस्त्वपः स्पृष्ट्वा मौनी[3] होम[4]गृहे स्थितः॥५५॥ दध्यौ कामदुघां[6] काम[7]वर्षिणीं कामदो मुनिः॥ असृजत्काम[8]धुक् सर्वं यथाकाम[9]मलौकिकं[10]म् ॥ ५६ ॥ भरतस्य ससैन्यस्य यथेष्टं[12] च मनोरथम् ॥

'(पू.) ज्ञातम्. ॥ (उ.) परः भक्तः.॥५३॥ अनघ, ससैन्यस्य तव (पू.). ॥ ससैन्यः त्वं (उ.) गन्तासि.' ॥५४॥ भवान् (बा. मू.) ॥५५॥ कामदः[5] मुनिः (पू.) दध्यौ. ॥ (उ.) सर्वं असृजत्[11]. ॥५६॥ (पू.) ॥

१ ज्ञानदृष्टीनें. २ जाशील. ३ मौन धरणारा. ४ होमशाळेंत. ५ इच्छित देणारा. ६ कामधेनूला. ७ इच्छित वस्तूंची वृष्टि करणाऱ्या. ८ कामधेनु. ९ इच्छेप्रमाणें. १० लोकांत न मिळणारें. ११ उत्पन्न करिती झाली. १२ यथेच्छ.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि त्याच्या सैन्याची जसजशी इच्छा होत गेली तसतशा सर्व पदार्थांची कामधेनूनें यथेच्छ वृष्टि केली. शेवटीं ते सर्व सैनिक तृप्त झाले. ॥ ५७ ॥ त्या श्रेष्ठ योगी मुनींनीं - आदरातिथ्य करतांना - आगोदर शास्त्रोक्त कर्मपद्धतीनें वसिष्ठमुनींची पूजा केली, नंतर सैन्यासह भरताला संतुष्ट केलें. ॥ ५८ ॥ कनिष्ठ बंधूसहवर्तमान भरत त्या स्वर्गतुल्य आश्रमामध्यें एक दिवस राहिला, व दुसरे दिवशीं सकाळीं उठून भरद्वाजमुनींना वंदन करून त्यांनीं अनुज्ञा दिली असतां रामाजवळ जाण्यासाठीं पुन्हां चालूं लागला.॥५९॥जातां जातां चित्रकूटाजवळ पोंचल्यावर त्यानें आपलें सैन्य दूर अंतरावर ठेविलें. आणि, रामाचें दर्शन घ्यावें, ह्या इच्छेनें तो स्वतां पुढें चालला. ॥ ६० ॥ त्या शत्रूंचा निःपात करणाऱ्या (पराक्रमी) पुरुषानें शत्रुघ्न, सुमंत्र आणि

तथा ववर्ष[1] सकलं तृप्तास्ते सर्वसैनिकाः ॥ ५७ ॥ वसिष्ठं पूजयित्वाऽग्रे शास्त्रदृष्टेन कर्मणा ॥ पश्चात्ससैन्यं भरतं तर्पयामास[3] योगिराट्[2] ॥ ५८ ॥ उषित्वा दिनमेकं तु आश्रमे स्वर्गसन्निभे ॥ अभिवाद्य पुनः प्रातर्भरद्वाजं सहानुजः ॥ भरतस्तु कृताऽनुज्ञः[5] प्रययौ रामसन्निधिम्॥५९॥चित्रकूटमनु प्राप्य दूरे संस्थाप्य[6] सैनिकान्॥रामसंदर्शनाकांक्षी[7] प्रययौ भरतः स्वयम्॥६०॥शत्रुघ्नेन सुमन्त्रेण गुहेन च परंतपः[8]॥

सकलं(बा.उ.)तृप्ताः॥५७॥योगिराट् अग्रे शास्त्रदृष्टेन कर्मणा(मू.)॥५८॥एकं(पू.)आश्रमे उषित्वा,॥(बा.द्वि.)अभिवाद्य, सहानुजः॥(बा. तृ.)प्रययौ.॥५९॥(पू.)संस्थाप्य,॥(उ.)प्रययौ. ॥६०॥ परंतपः (मू.) ॥

१ वृष्टि करिती झाली. २ योग्यांतील राजा (श्रेष्ठ). ३ तृप्त करिता झाला. ४ वंदन करून. ५ स्वीकारली आज्ञा ज्यानें, असा. ६ ठेवून. ७ रामाच्या दर्शनाची इच्छा ज्याला, असा. ८ शत्रूंना ताप देणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामाच्या आ-
श्रमाच्या खुणा.

गुह ह्यांना बरोबर घेऊन तपस्व्यांचे सर्व आश्रम शोधिले, - पण रामाचा आश्रम कोठें दिसेना; त्यानें रामाच्या शोधाशिवाय बाकीचे सर्व व्यापार - सोडून दिले होते. ॥ ६१ ॥ रामाचें मंदिर सांपडेना, तेव्हां त्यानें ऋषिमंडळाला विचारिलें :– ‘ महाराज, सीता आणि लक्ष्मण ह्यांसह रघुवीर रामचंद्र कोठें राहतो ? ’ ॥६२॥ ते ह्मणाले :– ‘ येथून पुढें, पर्वताच्या पाठीमागल्या बाजूला, गंगेच्या उत्तर तीरावर, एकांत स्थलीं रामाचें मंदिर आहे. सभोंवतीं सुंदर अरण्य असल्यामुळें तें स्थल सुशोभित दिसतें. ॥ ६३ ॥ तो आश्रम केळींच्या बनानें वेष्टिलेला आहे. त्या ठिकाणीं फळांनीं लादलेले आंबे व फणस पुष्कळ आहेत. तसेच तेथें चांफे, असणे, पुन्नाग हे वृक्षही बहुत आहेत. ’ ॥ ६४ ॥ अशा प्रकारें मुनींनीं - खुणा व दिशा सांगून - तें आ-

तपस्विमण्डलं सर्वं विचिन्[1]वानो न्यवर्तत॥६१॥अदृष्ट्[2]वा रामभवनमपृच्छदृषिमण्ड-
लम् ॥ कुत्रास्ते सीतया सार्धं लक्ष्मणेन रघूत्तमः ॥ ६२ ॥ ऊचुरग्रे गिरेः पश्चाद्गं-
गाया उत्तरे तटे ॥ विविक्[3]तं रामसदनं रम्यकानन[4]मण्डितम् ॥ ६३ ॥ सफलैराम्र-
[6]पनसैः क[7]दलीखण्डसंवृतम् ॥ चम्[8]पकैः कोवि[9]दारैश्च पुन्[10]नागैर्वि[11]पुलैस्तथा ॥ ६४ ॥
एवं दर्शितमालोक्य मुनिभिर्भरतो ऽग्रतः ॥

(मू.).॥६१॥रामभवनं(पू.)अपृच्छत्–॥‘(बा. उ.)सार्धं रघूत्तमः कुत्र आस्ते?’॥६२॥[ते]ऊचुः – ‘(बा. ६३।६४मू.)[युक्तं]रामसदनं[अस्ति].’॥६३॥६४॥भरतः मुनिभिः एवं दर्शितं रघुश्रेष्ठभवनं अग्रतः आ-

१ शोधणारा. २ विचारूं लागला. ३ एकांतांत असलेलें. ४ सुंदर वनानें सुशोभित. ५ रामाचें गृह. ६ आंब्यांनीं व फणसांनीं. ७ केळींच्या बनानें वेढलेलें. ८ चांफ्यांनीं. ९ असाण्यांनीं. १० पुन्नागांनीं. ११ पुष्कळ, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रमस्थान दाखवून दिलें असतां भरत आनंदानें सुमंत्रप्रधानासह पुढें रामाच्या मंदिराकडे जाऊं लागला. ॥ ६५ ॥ तों, कनिष्ठबंधूसह भरताला रामाचें सुंदर व अति तेजस्वी असें गृह दुरूनच दिसूं लागलें ! राम तेथें राहत असल्यामुळें त्या स्थानाला अधिकच रमणीयता आली होती. त्या ठिकाणीं अनेक मुनींचे समुदाय वरचेवर येत असत. तेथील वृक्षांच्या अग्रांवर उत्तम वल्कलें व चर्में (कृष्णाजिनें) - वाळण्यासाठीं - लावून ठेविलीं होतीं. ॥ ६६ ॥ इति **श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे अयोध्याकाण्डे अष्टमः सर्गः** ॥८ ॥

नंतर, भरत आनंदानें त्या आश्रमस्थलाच्या जवळ गेला. सीता आणि रामचंद्र ह्यांचीं पावलें जागोजाग उमटलीं असल्यामुळें तें स्थान पवित्र व अत्यंत सुंदर दिसत होतें. ॥ १ ॥ तेथें वज्र, अंकुश, कमल, व

हर्षाद्ययौ रघुश्रेष्ठभवनं मन्त्रिणा सह ॥ ६५ ॥ ददर्श दूरादतिभासुरं[1] शुभं रामस्य गेहं मुनिवृन्दसेवितम्[2] ॥ वृक्षाग्रसंलग्नसुवल्कलाजिनं[3] रामाभिरामं[4] भरतः सहानुजः ॥ ६६ ॥ इति श्रीमद० उमा० अयोध्याकांडे अष्टमः सर्गः ॥ ८ ॥ अथ गत्वाऽऽश्रमपदसमीपं भरतो मुदा ॥ सीतारामपदैर्युक्तं पवित्रमतिशोभनम् ॥ १ ॥ स तत्र वज्राङ्कुशवारिजाञ्चितध्वजादिचिह्नानि[5] पदानि सर्वतः ॥

लोक्य, हर्षात् मन्त्रिणा सह ययौ.॥६५॥सहानुजः भरतः (बा. मू.) रामस्य गेहं ददर्श. ॥६६॥ इति अष्टमः सर्गः ॥ ८ ॥ अथ भरतः (मू.) आश्रमपदसमीपं गत्वा, ॥१॥ सानुजः (मू.) ॥

१अत्यंत तेजस्वी, अशा.२मुनींच्या समूहांनीं सेविलेल्या. ३वृक्षांच्या अग्रांला चिकटलीं उत्तम वल्कलें व चर्में(कातडीं)ज्यासंबंधीं अशा. ४ रामाच्या योगानें सुंदर, अशा.५वज्र, अंकुश आणि कमलानें पूजित(युक्त)असा ध्वज इत्यादि चिन्हें ज्यांवर आहेत, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'केव्हातरी मी भाग्यवान !'

त्यांच्या सांनिध्यानें विशेष रमणीय किंवा स्पष्ट दिसणारा ध्वज, इत्यादि चिन्हांनीं युक्त अशीं रामचंद्राचीं पावलें जिकडे तिकडे उमटलेलीं भरताच्या दृष्टीस पडलीं. त्या पावलांमुळें तेथील भूप्रदेशाचें अतिशयित सौभाग्य - व्यक्त होत होतें - (ज्या अर्थीं हीं पावलें येथें लागलीं आहेत त्या अर्थीं, हा प्रदेश इतर प्रदेशांपेक्षां भाग्यशाली आहे, किंवा एकंदर पृथ्वी स्वर्गादि इतर लोकांपेक्षां अतिभाग्यवती आहे, असें प्रत्येकास वाटत असे). तीं दृष्टीस पडतांच, कनिष्ठ बंधूसह भरत त्या पायधुळींत गडबडां लोळला. ॥ २ ॥ - व आपल्याशींच ह्मणाला :- ' अहो ! ब्रह्मदेवादि देव आणि वेद, ज्याच्या पायधुळीची - आपल्याला प्राप्ति व्हावी, ह्मणून - नित्य तिचा शोध करीत आहेत, त्याच रामचंद्राच्या चरणकमलावरील चिन्हांनीं युक्त अशा ह्या भूप्रदेशांचें मला दर्शन झालें, त्या अर्थीं मीं अत्यंत धन्य आहें ! ' ॥ ३ ॥ अशा विचारामुळें एकदम

ददर्श रामस्य भुवोऽतिमंगलान्यचेष्टयत्पादरजःसु सानुजः ॥ २ ॥ अहो सुधन्योऽहममूनि रामपादारविन्दांकितभूतलानि ॥ पश्यामि यत्पादरजो विमृग्यं ब्रह्मादिदेवैः श्रुतिभिश्च नित्यम् ॥ ३ ॥ इत्यंद्भुतप्रेमरसाप्लुताशयो विगाढचेता रघुनाथभावने ॥

(मू.) रामस्य पदानि सर्वतः ददर्श, यत्पादरजःसु अचेष्टयत्. ॥२॥ 'अहो, यत्पादरजः ब्रह्मादिदेवैः श्रुतिभिः च नित्यं विमृग्यं, (मू.) पश्यामि. [अतः] अहं सुधन्यः.' ॥३॥ [सः] रघुनाथभावने (मू.) ॥

१ पृथ्वीचीं. २ ज्याच्या पायधुळींत. ३ लोळला. ४ ज्याची पायधूळ. ५ वेदांनीं. ६ शोधण्याजोगें. ७ ह्या. ८ रामाच्या चरणकमलाचीं चिन्हें ज्यांवर आहेत, अशा भूप्रदेशांना. ९ रामाच्या ध्यानकाळीं. १० विलक्षण प्रेमाच्या पाझरानें व्यापलें मन ज्याचें, असा. ११ गढलें मन ज्याचें, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विलक्षण प्रेमरस उद्भवून त्यामध्यें भरताचें अंतःकरण बुडून गेलें, त्याच्या मनाचा रामचंद्राच्या ध्यानीं एक लय लागला व आनंदाश्रूंनीं त्याचें वक्षःस्थल भिजून गेलें. अशा स्थितीमध्यें तो हळूहळू प्रभु रामचंद्राच्या आश्रमाजवळ आला. ॥ ४ ॥ तेथें बसलेला रघुवीर रामचंद्र भरताच्या दृष्टीस पडला. त्याची (रामाची) अंगकांति दूर्वेच्या पत्राप्रमाणें श्यामल असून नेत्र विशाल होते; त्यानें - मस्तकावर - जटांचा मुकुट धारिला होता - व शरीरावर - नूतन वल्कलरूपी वस्त्र धारण केलें होतें; त्याचें मुख प्रसन्न असून, प्रभा बालसूर्याप्रमाणें दिसत होती; ॥ ५ ॥ ह्यावेळीं त्याची दृष्टि शुभलक्षणसंपन्न अशा जानकीकडे लागलेली होती; व लक्ष्मण त्याच्या चरणकमलाची सेवा करीत होता. तें पाहतांच भरताच्या मनांत हर्ष आणि शोक हे

आनन्दजाश्रुस्नपितस्तनान्तरः[1] शनैरवापाश्रमसन्निधिं हरेः॥४॥स तत्र दृष्ट्वा रघुनाथमास्थितं दूर्वादलश्यामलमायतेक्षणम्[3][4]॥जटाकिरीटं[5] नववल्कलाम्बरं[6] प्रसन्नवक्त्रं[7] तरुणारुणद्युतिम्॥५॥विलोकयन्तं[10] जनकात्मजां शुभां सौमित्रिणा सेवितपादपंकजम् ॥ तदा ऽभिदुद्राव[11] रघूत्तमं शुचा[12] हर्षाच्च तत्पादयुगं त्वरा[13] ऽग्रहीत्[14] ॥ ६ ॥

(मू.) आश्रमसन्निधिं अवाप.[2] ॥ ४ ॥ (मू.) रघुनाथं आस्थितं[9] दृष्ट्वा, ॥ ५ ॥ तदा शुभां जनकात्मजां (पू.) ॥ रघूत्तमं (उ.). ॥ ६ ॥

---

१ आनंदापासून उद्भवणाऱ्या अश्रूंनीं न्हाणिलें स्तनांचें मध्य (वक्षस्थळ) ज्याचें, असा. २ पोंचला. ३ दूर्वेच्या पत्राप्रमाणें सांवळा, अशा. ४ दीर्घ नेत्र ज्याचे, अशा. ५ जटांचा मुकुट ज्याचा, असा. ६ नूतन वल्कलें वस्त्रें ज्याचीं, अशा. ७ प्रसन्न मुख ज्याचें, अशा. ८ तरुण सूर्यासारखी प्रभा ज्याची, अशा. ९ बसलेल्या. १० पाहणाऱ्या. ११ धांवत जवळ गेला. १२ शोकानें. १३ त्वरा=त्वरया वेगानें. १४ धरिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दोन्ही विकार - एकदम उत्पन्न झाले. - त्यानें धांवत जाऊन झटकर रामाचे दोन्ही पाय घट्ट धरिले. ॥ ६ ॥ रामचंद्र आजानुबाहु (ताठ उभा राहिला असतां गुडघ्यापर्यंत ज्याचे हात पोंचतात असा) होता. त्यानें आपल्या बाहूंनीं भरताला जवळ ओढून घेऊन आलिंगन दिलें, - व त्याच्या आंगावर नेत्रांतील - उदकांनीं (आनंदाश्रूंनीं) अभिषेक केला. पुढें प्रभूनें त्याला मांडीवर बसवून घेतलें आणि वारंवार घट्ट पोटाशीं धरिलें. ॥ ७ ॥ इतक्यांत, जशी तहानेनें व्याकुळ झालेली गाय उदकासाठीं धांवून येते त्याप्रमाणें, रामाच्या सर्व माता रामाला पाहण्याच्या इच्छेनें सत्वर तेथें आल्या. ॥ ८ ॥ आपली माता (कौसल्या) दृष्टीस पडतांच रामानें तत्क्षणीं उठून तिच्या चरणीं आनंदाश्रूंसह मस्तक ठेविलें. कौसल्येनेंही पुत्राला आलिंगन दिलें. - पतीचें स्मरण झाल्यामुळें - ह्यावेळीं तिला पराकाष्ठेचें दुःख झालें. ॥ ९ ॥

रामस्तमाकृष्य[2] सुदीर्घबाहु[1]र्दोर्भ्यां[3] परिष्वज्य[4] सिषिञ्च नेत्रजैः[5] ॥ जलैरथांकोपरि संन्यवेशयत्[7]पुनः पुनः संपरिषस्वजे[8] विभुः ॥७॥ अथ ता मातरः सर्वाः समाजग्मुस्त्वरान्विताः ॥ राघवं द्रष्टु[9]कामास्तास्तृषार्ता गौर्यथा जलम् ॥ ८ ॥ रामः स्वमातरं वीक्ष्य द्रुतं[10]मुत्थाय पादयोः ॥ ववन्दे साश्रु सा पुत्रमालिंग्यातीव दुःखिता ॥ ९ ॥

सुदीर्घबाहुः (पू.) जलैः सिषिञ्च[6], अथ विभुः (उ.). ॥ ७ ॥ अथ सर्वाः (मू.) [तथा], समाजग्मुः. ॥ ८ ॥ (पू.) ॥ साश्रु (उ.) [आसीत्]. ॥ ९ ॥

---

१ पुष्कळ लांब बाहु ज्याचे (आजानुबाहु), अशा. २ जवळ ओढून घेऊन. ३ बाहूंनीं. ४ आलिंगून. ५ नेत्रांतून उत्पन्न झालेल्या. ६ अभिषेक करिता झाला. ७ बसविता झाला. ८ आलिंगिता झाला. ९ पाहूं इच्छिणाऱ्या. १० द्रुतम् जलद.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामचंद्रानें कौसल्येप्रमाणें इतरही मातांना वंदन केलें. पुढें मुनिश्रेष्ठ वसिष्ठ आले असें पाहून, ॥ १० ॥ रामानें त्यांना साष्टांग नमस्कार केला व ‘आज मी कृतकृत्य झालों,’ असें वारंवार बोलून दाखविलें. नंतर सर्वांना यथायोग्य आसनांवर बसवून रामचंद्र विचारूं लागला :—॥ ११ ॥ ‘माझा पिता खुशाल आहे ना? त्याला फार दुःख झालें असेल. त्यानें मला काय काय निरोप सांगितले आहेत?’ ह्यावर वसिष्ठानें त्याला उत्तर दिलें तें येणेंप्रमाणें :— “रामचंद्रा, तुझ्या पित्याच्या ॥ १२ ॥ मनाला तुझ्या वियोगानें अतिशय ताप झाला. शेवटीं त्यानें तुझेंच चिंतन व ‘रामा! रामा! हा सीते! हा लक्ष्मणा!’ असा - घोष करीत - प्राण सोडिला!” ॥ १३ ॥ हें वसिष्ठ गुरूंचें भाषण, जसा कांहीं कानांत एखादा शूळ (रोग) शिरावा त्याप्रमाणें, रामाच्या कानांत शिरलें. तत्काळ तो ‘हाय! हाय! घात झाला!’ - असें ह्मणून - रुदन करीत भूमीवर पडला.

इतराश्च तथा नत्वा जननी रघुनन्दनः॥ ततः समागतं दृष्ट्वा वसिष्ठं मुनिपुंगवम्
॥१०॥साष्टांगं प्रणिपत्याह धन्योऽस्मीति पुनः पुनः॥[१]यथाऽर्हं मुपवेश्याह सर्वानेव
रघूद्वहः॥११॥पिता मे कुशली किं वा मां किमाहातिदुःखितः॥ वसिष्ठस्तमुवाचेदं
पिता ते रघुनन्दन॥१२॥[२]त्वद्वियोगाभितप्तात्मा त्वामेव परिचिन्तयन्॥ रामरामेति
सीतेति लक्ष्मणेति ममार ह ॥१३॥ श्रुत्वा तत्कर्ण[३]शूलाभं गुरोर्वचनमञ्जसा ॥

रघुनन्दनः तथा (पू.) नत्वा, ॥ (उ.) दृष्ट्वा, ॥१०॥ (पू.) आह. ॥ रघूद्वहः सर्वान् एव (उ.) – ॥११॥ ‘मे (पू.) मां किं आह?’ ॥ (उ.) उवाच—‘रघुनन्दन, ते पिता॥१२॥(मू.)!’ ॥१३॥ (पू.) श्रुत्वा ॥

१ योग्यतेप्रमाणें. २ तुझ्या वियोगानें अत्यंत तप्त झालें मन ज्याचें, असा. ३ कानांतील रोगासारखें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यांच्याबरोबर लक्ष्मणाची तीच अवस्था झाली.॥१४॥ते रडतात असें पाहून, त्यांच्यामागून सर्व माता तसेच दुसरेही लोक रडूं लागले. - राम विलाप करूं लागला:- 'हा ताता ! हा दयाळो ! मला टाकून आपण कोणीकडे गेलां ! ॥ १५ ॥ आपण महासमर्थ होतां ! आतां मला कोणाचाही आधार राहिला नाहीं ! यापुढें माझें लालन कोण करील !' सीता आणि लक्ष्मण ह्या दोघांनीं ह्याच्यापेक्षांही अधिक विलाप चालविला. ॥ १६ ॥ तेव्हां वसिष्ठमुनींनीं - प्राचीन राजांचीं अशाच प्रसंगांचीं चरित्रें, व संसाराची अनित्यता, इत्यादि विषयांनीं भरलेल्या - शांत भाषणांनीं त्या दुःखाचें सांत्वन केलें. पुढें ती सर्व मंडळी गंगेवर जाऊन स्नान करून शुद्ध झाली. ॥ १७ ॥ त्या ठिकाणीं त्या सर्वांनीं, - रामाच्या हातून आपल्याला - उदक मिळावें

हा हतोऽस्मीति पतितो रुदन् रामः सलक्ष्मणः॥१४॥ततोऽनुरुरुदुः[1] सर्वा मातरश्च तथाऽपरे॥ हा तात मां परित्यज्य क्व गतोऽसि घृणाकर[2]॥१५॥ अनाथोऽस्मि महाबाहो मां को वा लालयेदितः॥ सीता च लक्ष्मणश्चैव विलेपतुरतो भृशम्॥१६॥ वसिष्ठः शान्तवचनैः[3] शमयामास[4] तां शुचम्॥ ततो मन्दाकिनीं गत्वा स्नात्वा ते वीतकल्मषाः[5]॥१७॥ राज्ञे ददुर्जलं तत्र सर्वे ते जलकांक्षिणे[6]॥ पिंडान्निर्वापयामास रामो लक्ष्मणसंयुतः॥१८॥

सलक्ष्मणः रामः (बा. उ.) पतितः ! ॥ १४ ॥ '(पू.) अनुरुरुदुः. ॥ 'घृणाकर, (उ.) ! ॥ १५ ॥ महाबाहो, (पू.) मां लालयेत् !' ॥ (उ.) विलेपतुः. ॥ १६ ॥ (पू.) शमयामास. ॥ वीतकल्मषाः ते (उ.), ॥ १७ ॥ (पू.) राज्ञे जलं ददुः ॥ लक्ष्मणसंयुतः रामः

१मागून रडूं लागल्या. २दयासागरा. ३शांत भाषणांनीं. ४शमविता झाला. ५गेलीं पापें ज्यांचीं, असे. ६उदकाची इच्छा करणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशी इच्छा करीत असलेल्या दशरथ राजाला, उदक दिलें. पुढें लक्ष्मणासह रामचंद्रानें पिंडदान केलें. ॥ १८ ॥ ते पिंड इंगुदीवृक्षाच्या फळांच्या पिठाचे केले असून मधानें भिजविले होते. - शंकर ह्मणाले :– पार्वति, रानटी फळांचे पिंड करणें राजाला अयोग्य, असें वाटूं देऊं नकोस. कारण - शास्त्रांनीं असें सांगून ठेविलें आहे कीं, आपण स्वतां जें अन्न भक्षीत असूं, तेंच पितरांचें अन्न होय (तेंच अन्न पितरांना द्यावें) : - राम स्वतां फळें खात असे ह्मणून त्यानें पिंडही फळांचेच केले. - ॥ १९ ॥ ह्या वेळीं रामाचे नेत्र दुःखाश्रूंनीं भरून आले. नंतर, तो पुन्हां स्नान करून आश्रमीं गेला. त्याप्रमाणेंच, इतर मंडळीही पुष्कळ वेळ शोक करून आणि स्नान करून आश्रमांत परत आली. ॥ २० ॥ त्या दिवशीं सर्वांनीं उपो-

इंगुदी[1]फलपिण्याकरचितान्मधुसंप्लुतान्[2] ॥ वयं यदन्नाः[4] पितरस्तदन्नाः[5] स्मृति[6]नोदिताः[7]
॥ १९॥ इति दुःखाश्रुपूर्णाक्षः पुनः स्नात्वा गृहं ययौ ॥ सर्वे रुदित्वा सुचिरं स्नात्वा
ऽऽजग्मुस्तथाश्रम् ॥ २० ॥ तस्मिंस्तु दिवसे सर्वे उपवासं प्रचक्रिरे ॥ ततः परे[8]द्युर्विमले
स्नात्वा मन्दाकिनीजले ॥ २१ ॥ उपविष्टं समागम्य भरतो राममब्रवीत् ॥ राम राम
महाभाग स्वात्मानमभिषेचय[9] ॥ २२ ॥

(१९ पू.) पिण्डान् निर्वा[3]पयामास; (१९ उ.). ॥ १८ ॥ १९ ॥ (पू.). ॥ तथा सर्वे सुचिरं (उ.) आजग्मुः. ॥ २० ॥ सर्वे (मू.) स्नात्वा, ॥ २१ ॥ उपविष्टं रामं (पू.) – ‘ (उ.). ॥ २२ ॥

१ हिंगणबेटाच्या, पिठानें तयार केलेल्या. २ मधानें युक्त, अशा. ३ देता झाला. ४ जें अन्न ज्यांचें, असे. ५ तें अन्न ज्यांचें, असे. ६ स्मृतीनें. ७ सांगितलेले. ८ दुसरे दिवशीं. ९ अभिषेक करव.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'तूं राज्य कर.'

षण केलें. पुढें दुसरे दिवशीं, रामचंद्र गंगेच्या निर्मल जलांत स्नान करून बसला असतां, भरत जवळ येऊन त्याला ह्मणाला :– 'हे आनंददायका रामचंद्रा, हे भाग्यशाली पुरुषा, तूं स्वतांला अभिषेक करव, ॥ २१ ॥ २२ ॥ व पितृपरंपरेनें प्राप्त झालेल्या आपल्या राज्याचें पालन कर. तूं ज्येष्ठ बंधु असल्यामुळें मला पित्यासारखा आहेस. प्रजांचें संरक्षण करणें हा क्षत्रियांचा धर्मच होय. ॥ २३ ॥ आगोदर अनेक प्रकारचे यज्ञ करून देवांची आराधना कर, वंशविस्तारासाठीं पुत्र उत्पन्न कर, आणि पुत्राला राज्यावर बसवून मग वनामध्यें जा. ॥ २४ ॥ तुझें सध्यांचें वय वनवासाचें नव्हे. मजवर कृपा कर. माझ्या मातेनें जें कांहीं दुष्कृत्य केलें, तें त्वां मनांत देखील आणूं नये. - रामा, पित्याप्रमाणें - तूं आमचें पालन कर.' ॥ २५ ॥ भरतानें असें बोलून भक्तिपुरःसर भावाचे चरण मस्तकीं धरिले व साक्षात् रामचंद्राच्या अग्रभागीं

राज्यं पालय पित्र्यं ते ज्येष्ठस्त्वं मे पिता तथा ॥ क्षत्रियाणामयं धर्मो यत्प्रजापरिपालनम् ॥ २३ ॥ इष्ट्वा यज्ञैर्बहुविधैः पुत्रानुत्पाद्य तन्तवे ॥ राज्ये पुत्रं समारोप्य[3] गमिष्यसि ततो वनम् ॥ २४ ॥ इदानीं वनवासस्य कालो नैव प्रसीद मे ॥ मातुर्मे दुष्कृतं[5] किंचित्स्मर्तुं[6] नार्हसि पाहि नः ॥ २५ ॥ इत्युक्त्वा चरणौ भ्रातुः शिरस्याधाय भक्तितः ॥

ते पित्र्यं (पू.) मे [यथा] पिता, तथा ज्येष्ठः त्वं. ॥ यत् प्रजापरिपालनं, अयं (उ.). ॥ २३ ॥ बहुविधैः यज्ञैः इष्ट्वा[1] तन्तवे[2] (मू.) गमिष्यसि. ॥ २४ ॥ (पू.) प्रसीद[4]. ॥ मे मातुः किञ्चित् (उ.) पाहि[7].' ॥ २५ ॥ इति उक्त्वा, भ्रातुः (बा. पू.) आधाय, ॥

१ आराधना करून. २ वंशवृद्धीसाठीं. ३ बसवून. ४ कृपा कर. ५ दुराचरणाला. ६ मनांत धरण्यास. ७ रक्षण कर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भूमीवर साष्टांग नमस्कार घातला. ॥ २६ ॥ भरताची अतिशय भक्ति पाहून रामचंद्राच्या नेत्रीं प्रेमाश्रूंचें[1] भरतें आलें. त्यानें तत्काल भरताला उठवून मांडीवर[2] घेतलें व त्याच्याशीं हळूहळू भाषण करण्यास प्रारंभ केला:– ॥ २७ ॥ "बाळा (भरता), माझें बोलणें ऐकून घे. तूं ह्मणतोस तें तसेंच (खरेंच) आहे; परंतु पित्यानें मला सांगितलें आहे कीं, 'चवदा वर्षें ॥ २८ ॥ दंडकारण्यांत राहून नंतर नगरांत प्रवेश कर; सांप्रत हें सर्व राज्य मी भरताला दिलें आहे.' ॥ २९ ॥ ह्यावरून असें उघड होतें कीं, पित्यानेंच तुला

रामस्य पुरतः साक्षाद्दण्डवत्पतितो भुवि ॥२६॥ उत्थाप्य राघवः शीघ्रमारोप्यांके ऽति-भक्तितः ॥ उवाच भरतं रामः स्नेहार्द्रनयनः शनैः ॥ २७ ॥ शृणु वत्स प्रवक्ष्यामि त्वयो-क्तं यत्तथैव तत् ॥ किंतु मामब्रवीत्तातो नव वर्षाणि पञ्च च ॥ २८ ॥ उषित्वा दण्ड-कारण्ये पुरं पश्चात्समाविश ॥ इदानीं भरतायेदं राज्यं दत्तं मया ऽखिलम् ॥ २९ ॥ ततः पित्रैव सुव्यक्तं राज्यं दत्तं तवैव हि ॥ दंडकारण्यराज्यं मे दत्तं पित्रा तथैव च ॥ ३० ॥

भुवि साक्षात् (उ.). ॥ २६ ॥ राघवः स्नेहार्द्रनयनः रामः अतिभक्तितः भरतं शीघ्रं उत्थाप्य, अंके आरोप्य, शनैः उवाच – ॥ २७ ॥ 'वत्स, शृणु, प्रवक्ष्यामि. यत् (पू.) तथा एव, ॥ किन्तु, तातः (उ.) ॥ २८ ॥ दण्डकारण्ये (पू.) पुरं समाविश. ॥ मया इदं अखिलं राज्यं (उ.). ॥२९॥ (पू.) दत्तं, [इति] सुव्यक्तं[3]; ॥ तथा एव पित्रा मे (उ.). ॥ ३० ॥

१ प्रेमानें (अश्रुयुक्त) ओले नेत्र ज्याचे, असा. २ मांडीवर. ३ अत्यंत स्पष्ट.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'तें वेडांतलें भाषण.'
'छिः!'

- अयोध्येचें - राज्य दिलें; व तसेंच बाबांनीं दंडकारण्याचें राज्य मला दिलें. ॥ ३० ॥ ह्मणून, आपण दोघांनींही अत्यंत यत्नेंकरून वडिलांचें वचन पाळलें पाहिजे : जो मनुष्य पित्याच्या वचनाचें उल्लंघन करून आपल्या इच्छेस येईल तसा वागतो, ॥ ३१ ॥ तो जिवंत असून मेल्यासारखाच होय; देह पतन पावल्यावर त्याला नरकांत पडावें लागतें. त्या अर्थी तूं राज्य चालव; आह्मी दंडकारण्याचें पालन करितों. " ॥ ३२ ॥ ह्यावर भरत ह्मणाला :– ' रामा, आपला पिता अत्यंत विषयी असल्यामुळें त्याच्या बुद्धीला मोह पडला होता; बायकोनें त्याला अगदीं वश करून टाकिलें होतें; मनाला भ्रांति उत्पन्न होऊन तो वेडा झाला होता : शहाणा मनुष्य भ्रमिष्ठाचें बोलणें मनावर घेत नाहीं : त्याप्रमाणें पिता जें कांहीं बोलला असेल तें तूं खरें मानूं नकोस. ' ॥ ३३ ॥ राम ह्मणाला :–'भरता, आपला पिता विषयी किंवा बायकोच्या स्वाधीन मुळींच नव्हता.

अतः पितुर्वचः कार्यमावाभ्यामतियत्नतः ॥ पितुर्वचनमुल्लंघ्य स्वतंत्रो यस्तु वर्तते ॥ ३१ ॥ स जीवन्नेव मृतको देहान्ते निरयं[1] व्रजेत् ॥ तस्माद्राज्यं प्रशाधि[2] त्वं वयं दण्डकपालकाः ॥ ३२ ॥ भरतस्त्वब्रवीद्रामं कामुको[3] मूढधीः पिता ॥ स्त्रीजितो भ्रांतहृदय उन्मत्तो[4] यदि वक्ष्यति ॥ तत्सत्यमिति न ग्राह्यं भ्रांतवाक्यं यथा सुधीः ॥ ३३ ॥ राम उवाच । न स्त्रीजितः पिता ब्रूयान्न कामी नैव मूढधीः ॥

(पू.) कार्यं;॥यः तु(उ.)॥३१॥(पू.) ॥तस्मात त्वं (उ.)'॥३२॥भरतः रामं(मू.)[तर्हि], सुधीः[5] यथा [6]भ्रान्तवाक्यं [न गृह्णाति[7], तथा त्वया] तत् सत्यं इति न ग्राह्यम्[8]'. ॥ ३३ ॥ रा०उ०–'पिता(पू.)ब्रूयात ॥

१ नरकास. २ पालन कर. ३ विषयी. ४ वेडा ५बुद्धिमान् ६भ्रमिष्टाच्या भाषणाला. ७मनावर घेतो (खरें मानितो.)८समजावें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तसेंच, त्यानें मला जी आज्ञा दिली ती बुद्धीला मोह पडल्यामुळें दिली, असेंही नव्हे. खरें बोलण्याबद्दल त्याचा निर्धार असे; त्यानें पूर्वी कैकेयीला - वर देण्याचें - वचन दिलें होतें, - तें खोटें होऊं नये ह्मणून - भीतीस्तव - तुला राज्य व मला वन - दिलें. ॥ ३४ ॥ सत्पुरुषांना नरकापेक्षां देखील असत्याची अधिक भीति वाटत असते : ह्मणून मी देखील, - पित्यानें - कैकयीला दिलें आहे, तें हें वचन सत्य करणार. ॥३५॥ मी रघुकुलांत जन्मास आलों आहें, तेव्हां वचनाचा भंग करण्यास प्रवृत्त होईन कसा ?' हें रामाचें भाषण ऐकिल्यावर भरत म्हणाला :– ॥ ३६ ॥ 'हे सदाचरणतत्परा रामचंद्रा, तूं जसा आंगावर वल्कलें घेऊन वनांत राहणार आहेस, तसाच - तुझा प्रतिनिधि ह्मणून तुझ्याबद्दल - मी चवदा वर्षे वनांत राहतों; तूं सुखानें

पूर्वं प्रतिश्रुतं[1] तस्यै सत्यवादी ददौ भयात् ॥ ३४ ॥ असत्याद्भीतिरधिका महतां[2] नरकादपि ॥ करोमीत्यहमप्येतत्सत्यं तस्यै प्रतिश्रुतम् ॥ ३५ ॥ कथं वाक्यमहं कुर्यामसत्यं राघवो हि सन् ॥ इत्युदीरितमाकर्ण्य रामस्य भरतोऽब्रवीत् ॥ ३६ ॥ यथैव चीरवसनो वने वत्स्यामि[3] सुव्रत ॥ चतुर्दश समास्त्वं तु राज्यं कुरु यथासुखम् ॥ ३७ ॥

सत्यवादी तस्यै (उ.) ददौ. ॥३४॥ (पू.) अधिका. ॥ (उ.) एतत् सत्यं करोमि . ॥३५॥ अहं राघवः सन्[तत्]वाक्यं कथं असत्यं कुर्या ?' भरतः रामस्य(उ.)– ॥३६॥ 'सुव्रत, यथा एव [त्वं तथा अहं] चीरवसनः [सन्] वने चतुर्दश समाः वत्स्यामि; त्वं तु (मू.) कुरु.' ॥ ३७ ॥

१ कबूल केलेल्या. २ मोठ्या लोकांना. ३ राहीन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

‘ मला बरोबर ने. ’

राज्य कर. ’ ॥ ३७ ॥ ह्यावर राम ह्मणाला :– ‘ भरता, पित्यानें हें राज्य तुलाच दिलें असून वन मला दिलें आहे. त्यांत जर मी उलट प्रकार केला, तर पूर्वीप्रमाणेंच खोटेपणा पदरीं येईल ! ’ ॥ ३८ ॥ भरत ह्मणाला :– ‘ - बरें तर - मी देखील - तुजबरोबर वनांत - येईन व लक्ष्मणाप्रमाणें तुझी सेवा करून राहीन, नाहींतर प्रायोपवेशाच्या योगानें ह्या शरीराचा तरी त्याग करीन. ’ ॥ ३९ ॥ भरतानें असा आपला कृतनिश्चय - बोलून दाखविला; - व तो, उन्हामध्यें दर्भ पसरून, मनाचाही तसाच निर्धार करून, पूर्वाभिमुख बसून राहिला. ॥ ४० ॥ हा भरताचा निर्बंध पाहून रामाला परम आश्चर्य वाटलें; पुढें त्या रघुनंदनानें वसिष्ठ गुरूंना - ‘ ह्याला चार समजुतीच्या गोष्टी सांगा. ’ असा - नेत्रसंकेत केला. ॥ ४१ ॥ वसिष्ठ ज्ञानिजनांत

राम उवाच । पित्रा दत्तं तवैवैतद्राज्यं मह्यं वनं ददौ ॥ [१]व्यत्ययं यद्यहं कुर्यामसत्यं पूर्ववत्स्थितम् ॥ ३८॥ भरत उवाच । अहमप्यागमिष्यामि सेवे त्वां लक्ष्मणो यथा ॥ नो चेत्प्र[२]ायोपवेशेन त्यजाम्येत्कलेवरम् ॥ ३९॥ इत्येवं निश्चयं कृत्वा दर्भानास्तीर्य[४] चा[३]तपे॥ मनसा ऽपि विनिश्चित्य प्राङ्[५]मुखोप[६]विवेश सः॥ ४० ॥ भरतस्यापि निर्बन्धं दृष्ट्वा रामो ऽतिविस्मितः ॥ नेत्रान्तसञ्ज्ञां गुरवे चकार रघुनन्दनः ॥ ४१ ॥

रा० उ०–‘पित्रा एतत् राज्यं तव एव(पू.). ॥ यदि अहं(उ.)’. ॥३८॥ भ० उ०– ‘ (पू.) त्वां सेवे. ॥ (उ.) त्यजामि ! ॥ ३९ ॥ (पू.) आस्तीर्य, ॥ सः (उ.). ॥ ४० ॥ रघुनन्दनः रामः (पू.). ॥ ४१ ॥

१ उलट. २ मरणपर्यंत कांहीं खाणार नाहीं असा संकल्प करून बसण्यानें. ३ आतपे उन्हांत. ४ पसरून. ५ प्राङ्मुखः पूर्वेस तोंड ज्याचें, असा. ६ उपविवेश बसला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रेष्ठ. - त्यांनीं तो संकेत जाणून - एकांतामध्यें भरताला सांगितलें :– ' बाळा, मी तुला एक सिद्धांताची गुप्त गोष्ट सांगतों; ती तूं ऐकून घे. ॥४२॥ अरे, राम हा साक्षात् नारायण होय. हा ब्रह्मदेवाच्या प्रार्थनेवरून, रावणाचा वध करण्यासाठीं, दशरथाचा पुत्र झाला आहे. ॥ ४३ ॥ योगमाया देखील सीता ह्या नांवानें जनकाची कन्या होऊन राहिली आहे. शेषसुद्धां लक्ष्मणाचें रूप घेऊन नेहमीं रामाच्या पाठीमागें फिरत असतो. ॥ ४४ ॥ हीं तिघेजणें रावणाला मारण्याच्या[1] इच्छेनें तिकडे जाणार आहेत, ह्यांत संशय नाहीं. कैकेयीला वरदान, तिचें कठोर भाषण इत्यादि ॥ ४५ ॥ सर्व प्रकार देवांनीं केले आहेत. नाहीं तर ती असें

एकान्ते भरतं प्राह वसिष्ठो ज्ञानिनां वरः॥वत्स गुह्यं शृणुष्वेदं मम वाक्यात्सुनिश्चितम्॥४२॥रामो नारायणः साक्षाद्ब्रह्मणा याचितः पुरा॥ रावणस्य वधार्थाय जातो दशरथात्मजः॥४३॥योगमाया ऽपि सीतेति जाता जनकनन्दिनी ॥ शेषो ऽपि लक्ष्मणो जातो राममन्वेति सर्वदा ॥४४॥ रावणं हन्तुकामास्ते गमिष्यन्ति न संशयः ॥ कैकेय्या वरदानादि यद्यन्निष्ठुरभाषणम् ॥ ४५ ॥ सर्वं देवकृतं नो चेदेवं सा भाषयेत्कथम् ॥ तस्मात्त्यजाग्रहं तात रामस्य विनिवर्तने ॥ ४६ ॥

ज्ञानिनां वरः वसिष्ठः (पू.) – ॥ ' (उ.). ॥ ४२ ॥ (पू.) याचितः ॥ (उ.) जातः. ॥ ४३ ॥ (पू.) जाता. ॥ (उ.) अन्वेति. ॥ ४४ ॥ (पू.). ॥ यत् यत् (उ.), ॥ ४५ ॥ [तत्] (पू.) भाषयेत्[2] ॥ तात, (उ.) आग्रहं त्यज. ॥ ४६ ॥

१ मारूं इच्छिणारे. २ बोलेल.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

‘ तुझ्या पादुका दे. ’

बोलेल कशी ? ह्मणून, बाळा, रामाला परत नेण्याचा आग्रह सोडून दे, ॥ ४६ ॥ व आपलीं मोठालीं सैन्यें व भाऊ (शत्रुघ्न) ह्यांना बरोबर घेऊन परत नगरास जा. राम गणगोतासह रावणाचा निःपात करून लवकरच माघारा येईल. ’ ॥ ४७ ॥ हें वसिष्ठ गुरूंचें भाषण ऐकून भरताला आश्चर्य वाटलें. विस्मयाच्या भरांत त्याचे नेत्र प्रफुल्ल दिसूं लागले. तो रामाच्या जवळ जाऊन - त्याला ह्मणाला :- ॥ ४८ ॥ ‘ हे राजाधिराजा, तुझ्या पूज्य पादुका राज्य करण्याला दे (तुझ्या पादुका राज्यावर स्थापितों). तूं परत येईपर्यंत मी त्यांचीच सेवा करीत जाईन. ’ ॥ ४९ ॥ असें ह्मणून त्यानें एक दिव्य पादुकांचा जोड रामाच्या चरणीं जोडिला. रामानें अत्यंत प्रेमभावास्तव त्या पादुका भरताला दिल्या. ॥५०॥ भरतानें त्या

निवर्तस्व महासैन्यैर्भ्रातृभिः साहितः पुरम्॥रावणं सकुलं हत्वा शीघ्रमेवागमिष्यति॥४७॥ इति श्रुत्वा गुरोर्वाक्यं भरतो विस्मयान्वितः॥गत्वा समीपं रामस्य विस्मयोत्फुल्ललोचनः ॥ ४८ ॥ पादुके देहि राजेंद्र राज्याय तव पूजिते ॥ तयोः सेवां करोम्येव यावदागमनं तव ॥ ४९ ॥ इत्युक्त्वा पादुके दिव्ये योजयामास पादयोः ॥ रामस्य ते ददौ रामो भरतायातिभक्तितः ॥ ५० ॥ गृहीत्वा पादुके दिव्ये भरतो रत्नभूषिते ॥

(पू.) निवर्तस्व. ॥ [सः] (उ.).' ॥४७॥ भरतः इति गुरोः वाक्यं (मू.)रामस्य समीपं गत्वा, ॥ ४८ ॥ ‘(पू.) पादुके देहि. ॥ यावत् तव आगमनं, [तावत्] (उ.).' ॥४९॥ इति उक्त्वा, दिव्ये पादुके रामस्य पादयोः योजयामास. ॥ (मू.) ते ददौ. ॥ ५० ॥ भरतः (पू.) पादुके गृहीत्वा, ॥

१ परत जा. २ जोडिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रत्नजडित दिव्य पादुका घेतल्या व रामाला पुन्हां प्रदक्षिणा घालून अनेक वेळां नमस्कार केले. ॥ ५१ ॥ भक्तीमुळें भरताचा कंठ दाटून आला व शब्द अडखळूं लागला. अशा स्थितींत तो पुन्हां रामाला ह्मणालाः– 'रामा, चवदा वर्षें पूर्ण होतांच पहिल्या दिवशीं जर तूं ॥ ५२ ॥ परत आला नाहींस, तर मी मोठा अग्नि - पेटवून - त्यांत प्रवेश करीन.' रामानें 'बरें आहे.' असें ह्मणून भरताला परत जाण्यास सांगितलें. ॥ ५३ ॥ भरत महाबुद्धिवान् (समजूतदार) होता. त्यानें - रामाच्या आज्ञेप्रमाणें - वसिष्ठमुनि, शत्रुघ्न, माता, प्रधान आणि सैन्य अशा सगळ्यांना बरोबर घेऊन प्रयाणाची तयारी चालविली. ॥ ५४ ॥ ह्या वेळीं राम एकटाच बसला आहे, - अशी संधि पाहून कैकेयी त्याजकडे गेली; वाईट वाट ल्यामुळें सतत - अश्रु वाहून तिचे नेत्र विव्हल झाले होते; ती रडत रडत हात जोडून रामाला ह्मणालीः–

रामं पुनः परिक्रम्य प्रणनाम पुनःपुनः॥५१॥भरतः पुनराहेदं भक्त्या गद्गदया गिरा ॥ नवप[1]ञ्चसमान्ते तु प्रथमे दिवसे यदि ॥५२॥ नागमिष्यसि चेद्राम प्रविशामि म[2]हानलम् ॥ बा[3]ढमित्येव तं रामो भरतं सं[4]न्यवर्तयत् ॥५३॥ ससैन्यः सवसिष्ठश्च शत्रुघ्नसहितः सुधीः॥मातृभिर्मन्त्रिभिः सार्धं गमनायोपचक्रमे॥५४॥कैकेयी राममेकान्ते स्र[5]वन्नेत्रैर्जलाकुला ॥ प्राञ्जलिः प्राह हे राम तव राज्यविघातनम् ॥ ५५ ॥

(उ.) प्रणनाम. ॥ ५१ ॥ (पू.) इदं आह – ॥ ' (उ.). ॥ ५२ ॥ (पू.) प्रविशामि. ' ॥ रामः (उ.) ॥ ५३ ॥ (मू.) ॥ ५४ ॥ ५५ ॥

१ चवदा वर्षांच्या शेवटीं. २ मोठ्या अग्नींत. ३ ठीक. ४ परतविता झाला. ५ पाझरणाऱ्या नेत्रोदकानें व्याप्त.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

' रामा, तुला राज्य मिळण्यामध्यें मोडा ॥९५॥ मी घातला ! माझी बुद्धि दुष्ट खरी ! मायेनें माझ्या अंतःक-
रणाला मोह पाडला. आतां, ह्या दुष्ट कृत्याबद्दल तूं मला क्षमा कर. सत्पुरुषांमध्यें क्षमा हा गुण प्रधान
असतो. ॥ ९६ ॥ तूं साक्षात् परमेश्वर विष्णु आहेस. तुझें स्वरूप अव्यक्त असून नित्य आहे. तूं मायेनें हें
मनुष्यरूप स्वीकारून त्याच्या योगानें सर्व जगाला मोहित करीत असतोस. तुजकडून प्रेरणा मिळाल्यामुळेंच
लोक चांगलीं किंवा वाईट कृत्यें करण्यास प्रवृत्त होतात. ॥९७॥ हें जग तुझ्या स्वाधीन अर्थात परतंत्र आहे.
तें आपण होऊन करणार काय ? जशा कळसूत्री बाहुल्या गारुड्याच्या इच्छेप्रमाणें नाचतात, ॥ ९८ ॥
त्याप्रमाणें माया तुझ्या स्वाधीन असून - तुझ्याकडून प्रेरणा मिळेल तशीं - अनेक रूपें घेऊन नाचत असते.
तुझ्या मनांत देवांचें कार्य कर्तव्य असल्यामुळें तूंच मला प्रेरणा दिलीस; ॥ ९९ ॥ ह्मणून माझ्या मनांत पाप

कृतं मया दुष्टधिया मायामोहितचेतसा ॥ क्षमस्व मम दौरात्म्यं क्षमासारा[1] हि साधवः
॥ ५६ ॥ त्वं साक्षाद्विष्णुरव्यक्तः परमात्मा सनातनः ॥ मायामानुषरूपेण मोहयस्यखिलं
जगत् ॥ त्वयैव प्रेरितो लोकः कुरुते साध्वसाधु वा ॥ ५७ ॥ त्वदधीनमिदं विश्वम-
स्वतन्त्रं करोति किम् ॥ यथा कृत्रिमनर्तक्यो[2] नृत्यन्ति कुहकेच्छया[3] ॥ ५८ ॥ त्वदधीना
तथा मायानर्तकी बहुरूपिणी ॥ त्वयैव प्रेरिताऽहं च देवकार्यं करिष्यता ॥ ५९ ॥

(बा. पू.) मया कृतं. हि साधवः क्षमासाराः, [अतः] मम दौरात्म्यं क्षमस्व. ॥५६॥ (दो. अर्धे) मो-
हयसि.॥(तृ अ.)कुरुते.॥५७॥(मू.)॥(मू.)नृत्यन्ति.॥५८॥(पू.)मायानर्तकी त्वदधीना,॥(उ.)अहं प्रेरिता.

१ क्षमा हेंच तत्व ज्यांचें, असे. २ कृत्रिम (यंत्राच्या) बाहुल्या. ३ गारुड्याच्या इच्छेनें. ४ नाचतात. ५ मायारूप बाहुली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उत्पन्न होऊन मी हें अत्यंत दुष्ट कृत्य केलें. हे शत्रुदमना, ज्याचें दर्शन देवांना देखील मिळत नाहीं, तोच तूं आज माझ्या प्रत्यक्ष दृष्टीस पडलास - हें माझें महद्भाग्य ! - ॥ ६० ॥ रामचंद्रा, आमचें संरक्षण कर. जगाला वागविणारा तूंच. तुझ्या स्वरूपाचा, गुणांचा किंवा शक्तीचा अंत नाहीं. हे जगत्पते, तुला नमस्कार असो. - माझी तुजजवळ एवढी प्रार्थना आहे कीं - तूं आपल्या ज्ञानरूपी निर्मल खड्गाच्या योगानें पुत्र, द्रव्य इत्यादिकांविषयींचा माझा स्नेहपाश तोडून टाक. मी तुला शरण आहें.' हें कैकयीचें भाषण श्रवण केल्यावर रामचंद्र हांसत हांसत तिला ह्मणाला :– ॥ ६१ ॥ ६२ ॥ 'माते, तुझें भाग्य फार थोर. तूं जें मला ह्मणालीस तें खोटें नव्हे, खरेंच आहे. मी जशी प्रेरणा दिली, तशीच वाणी तुझ्या मुखांतून निघाली. ॥ ६३ ॥ - असें करण्याचें - कारण देवांची कार्यसिद्धी करावयाची, हें होय. ह्यामध्यें तुजकडे

पापिष्ठं पापमनसा कर्माचरमरिन्दम॥अद्य प्रतीतो ऽसि मम देवानामप्यगोचरः॥६०॥ पाहि विश्वेश्वरानन्त जगन्नाथ नमो ऽस्तु ते ॥ छिन्धि स्नेहमयं पाशं पुत्रवित्तादिगोचरम् ॥६१॥ त्वज्ज्ञानामलखड्गेन त्वामहं शरणं गता॥ कैकेय्या वचनं श्रुत्वा रामः सस्मितमब्रवीत्॥ ६२ ॥ यदाह मां महाभागे नानृतं सत्यमेव तत् ॥ मयैव प्रेरिता वाणी तव वक्त्राद्विनिर्गता ॥ ६३ ॥ देवकार्यार्थसिद्ध्यर्थमत्र दोषः कुतस्तव ॥

॥५९॥अरिन्दम, पापमनसा(पू.).॥(उ.)अद्य मम प्रतीतः असि. ॥६०॥ [मां](पू.)॥ त्वज्ज्ञानामलखड्गेन (बा.६१उ.)पाशं छिन्धि.॥(बा.६२पू.).' ॥ रामः (बा. ६२ उ.)– ॥६१॥ ६२॥ 'महाभागे, [त्वं]मां यत् आह, तत् (मू.)! ॥ ६३ ॥ (पू.) कुतः ? ॥

१ पुत्र, द्रव्य इत्यादिकाविषयीं २ तुझें ज्ञान ह्या निर्मल खड्गानें. ३ बंधनाला. ४ तोड. ५ मुखांतन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कैकेयीला रामाचा उपदेश.

दोष कोठून येणार? आतां तूं अयोध्येस जा, व हृदयामध्यें नित्य रात्रंदिवस माझें ध्यान करीत राहा; ॥ ६४ ॥ ह्मणजे माझ्या भक्तीच्या योगेंकरून तुझा सर्व ठिकाणचा स्नेह सुटेल आणि लवकरच तूं मुक्त होशील. माझी सर्वत्र सम दृष्टि असते. ज्याप्रमाणें मायावी मनुष्याला स्वतांच उत्पन्न केलेल्या मायिक पदार्थांविषयीं द्वेष किंवा प्रीति उत्पन्न होत नाहीं, त्याचप्रमाणें माझ्या मनांत कोणाविषयीं वैरभाव किंवा प्रेम नाहीं. भक्ति करणारांचा मी सेवक आहें. माते, ज्यांच्या बुद्धींना माझ्या मायेच्या योगानें मोह पडला असतो, ते लोक मला मनुष्यासारखाच एक मनुष्य ॥ ६५ ॥ ६६ ॥ व सुखदुःखांच्या प्रवाहांत पडलेला असें समजतात. पण वास्तविक मी तसा नाहीं. तुला मजविषयीं खरें ज्ञान झालें, ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. हें ज्ञान संसाराचा नाश करितें. ॥ ६७ ॥ घरामध्येंच तूं माझें स्मरण करीत राहा ह्मणजे तुला कर्मा-

गच्छ त्वं हृदि मां नित्यं भावयन्ती दिवानिशम् ॥ ६४ ॥ सर्वत्र विगतस्नेहा मद्भक्त्या मोक्ष्यसे ऽचिरात् ॥ अहं सर्वत्र समदृक् द्वेष्यो वा प्रिय एव वा॥६५॥ नास्ति मे कल्पकस्येव भजतो ऽनुभजाम्यहम् ॥ मन्मायामोहितधियो मामम्ब मनुजाकृतिम् ॥६६॥ सुखदुःखाद्यनुगतं जानन्ति न तु तत्त्वतः॥ दिष्ट्या मद्गोचरं ज्ञानमुत्पन्नं ते भवापहम् ॥ ६७ ॥ स्मरन्ती तिष्ठ भवने लिप्यसे न च कर्मभिः ॥

(उ.) भावयन्ती[सती]गच्छ.॥६४॥(पू.) मोक्ष्यसे.॥(उ.)॥६५॥ मे कल्पकस्य इव न अस्ति, अहं(मू.).॥ अम्ब,(मू.)॥६६॥(पू.)नतु. ॥ ते दिष्ट्या भवापहं (उ.). ॥६७॥ भवने [मां] (पू.) न लिप्स्यसे.' ॥

१ मायावी मनुष्या (गारुड्या) प्रमाणें. २ आनंदाची गोष्ट. ३ संसार दूर करणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पासून लेप होणार नाहीं. ' रामचंद्रानें असें सांगितलें तेव्हां कैकेयीला सानंदाश्चर्य वाटलें. तिनें रामाला प्रदक्षिणा घातली, ॥ ६८ ॥ भूमीवर शतशः नमस्कार केले व मोठ्या आनंदानें घरीं जाण्याची तयारी चालविली. भरत अमात्य, माता व गुरु इत्यादि सर्व जनांना बरोबर घेऊन ॥ ६९ ॥ रामचंद्राचेंच ध्यान करीत अयोध्येस गेला. तो महाबुद्धिसंपन्न पुरुष नागरिकांना व देशोदेशींच्या सर्व लोकांना अयोध्येंत ॥७०॥ नीतिमार्गाप्रमाणें वागत ठेवून स्वतां नंदिग्रामीं गेला. तेथें त्यानें सिंहासनावर पादुकांची स्थापना केली व नित्य भक्तिपूर्वक ॥ ७१ ॥ गंध, पुष्पें, अक्षता इत्यादि प्रकारांनीं त्यांची पूजा करण्याचा क्रम चालविला. तो त्या पादुकांना रामाप्रमाणें मानून प्रतिदिनीं सर्व राजोपचार (छत्रचामरादि) अर्पण करीत असे. त्यानें

इत्युक्ता सा परिक्रम्य रामं सानन्दविस्मया॥६८॥प्रणम्य शतशो भूमौ ययौ गेहं मुदाऽन्विता॥भरतस्तु सहामात्यैर्मातृभिर्गुरुणा सह॥६९॥अयोध्यामगमच्छीघ्रं राममेवानुचिन्तयन् ॥ पौरजानपदान्सर्वानयोध्यायामुदारधीः ॥ ७० ॥ स्थापयित्वा यथान्यायं नंदिग्रामं ययौ स्वयम्॥तत्र सिंहासने नित्यं पादुके स्थाप्य भक्तितः ॥७१॥पूजयित्वा यथा रामं गन्धपुष्पाक्षतादिभिः ॥ राजोपचारैरखिलैः प्रत्यहं नियतव्रतः ॥ ७२ ॥

(उ.) रामं परिक्रम्य,॥६८॥भूमौ शतशः(पू.)गेहं ययौ.॥(उ.)॥६९॥(पू.) शीघ्रं अयोध्यां अगमत्. ॥ उदारधीः (उ.)॥७०॥यथान्यायं (पू.) नंदिग्रामं ययौ.॥(उ.) ॥७१॥ (पू.) पूजयित्वा, ॥ ७२ ॥

१ उत्तम बुद्धिमान.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भरताचा नित्य क्रम.

नित्य व्रतस्थ राहण्याचा निश्चय केला. ॥ ७२ ॥ शत्रुघ्नासहवर्तमान तो फळें व मुळें भक्षण करून राही, इंद्रियें आवरून स्वाधीन ठेवी, जटा व वल्कलें धारण करी, भूमीवर निजे आणि ब्रह्मचर्य व्रत पाळी. त्यावेळीं ॥ ७३ ॥ तो (भरत), पृथ्वीतलावर जितकीं कांहीं राजकार्यें होतील, तीं सर्व पादुकांना यथास्थित निवेदन करी. ॥ ७४ ॥ साक्षात् ब्रह्मनिष्ठ मुनीप्रमाणें त्याचें मन रामचंद्राकडे सतत लागून राहिलें होतें. राम परत येण्याच्या इच्छेनें तो दिवस मोजीतच राहिला. ॥ ७५ ॥ इकडे सीता आणि लक्ष्मण ह्या दोघांसह रामचंद्र मुनिजनांबरोबर चित्रकूट पर्वतावर पूर्वीं राहत असे त्या ठिकाणींच आणखी कांहीं काळपर्यंत राहिला. ॥ ७६ ॥ पुढें, सीता आणि लक्ष्मण यांसह रामचंद्र चित्रकूटावर आहे असें कळलें तेव्हां त्याचें द-

फलमूलाशनो दान्तो[1] जटावल्कलधारकः॥अधःशायी[2] ब्रह्मचारी शत्रुघ्नसहितस्तदा ॥७३॥राजकार्याणि सर्वाणि यावंति[3] पृथिवीतले ॥ तानि पादुकयोः सम्यङ् निवेदयति[4] राघवः॥७४॥गणयन्[6] दिवसान्येव रामागमनकांक्षया[5]॥स्थितो रामार्पितमनाः साक्षाद्ब्रह्ममुनिर्यथा॥७५॥रामस्तु चित्रकूटाद्रौ वसन्मुनिभिरावृतः॥सीतया लक्ष्मणेनापि किंचित्कालमुपावसत्[7]॥७६॥नागराश्च सदाऽऽयान्ति रामदर्शनलालसाः ॥

(मू.) ॥ ७३ ॥ राघवः पृथिवीतले यावन्ति सर्वाणि (मू.). ॥ ७४ ॥ (पू.) गणयन् ॥ (उ.) स्थितः. ॥ ७५ ॥ (मू.) आवृतः वसन् किञ्चित्कालं उपावसत्. ॥ ७६ ॥ (पू.) आयान्ति. ॥

१ इंद्रियांचा निग्रह करणारा. २ खालीं (भूमीवर) निजणारा. ३ जितकीं. ४ सांगतो. ५ राम येण्याच्या इच्छेनें. ६ मोजणारा. ७ राहिला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

र्शन घेण्याच्या उत्सुकतेनें नागरिक लोक तेथें नित्य येऊं लागले. ॥ ७७ ॥ लोकांच्या झुंडीच्या झुंडी येतात असें पाहून व दंडकारण्यांतील पुढल्या कर्तव्य भागाचाही विचार करून रामानें त्या पर्वतावर राहणें सोडून दिलें. ॥ ७८ ॥ तो सीतेला व भ्राताला बरोबर घेऊन अत्रीच्या पुण्याश्रमीं गेला. तो आश्रम राहण्यास सर्वदा सुखावह होता. तेथें नागरिक लोकांची गर्दी होत नसे. ॥ ७९ ॥ तेथें अत्रिमुनि बसले होते. त्यांच्या प्रभेनें तें तपोवन प्रकाशित झालें होतें. रामचंद्र मुनींच्या जवळ जाऊन दंडवत् प्रणाम करून त्यांना ह्मणाला :– ' महाराज, मी राम वंदन करीत आहें. ॥ ८० ॥ मुने, पित्याची आज्ञा शिरसा वंद्य मानून मी दंडकारण्यांत आलों. वनवासाच्या निमित्तानें तरी आपलें दर्शन घडलें,

चित्रकूटस्थितं ज्ञात्वा सीतया लक्ष्मणेन च ॥७७॥ दृष्ट्वा[1] तज्जनसंबाधं रामस्तत्याज तं गिरिम् ॥ दण्डकारण्यगमने कार्यमप्यनुचिन्तयन् ॥७८॥ अन्वगात्सीतया भ्रात्रा ह्यत्रेराश्रममुत्तमम् ॥ सर्वत्र सुखसंवासं जनसम्बाधवर्जितम् ॥ ७९ ॥ गत्वा मुनिमुपासीनं भासयन्तं तपोवनम् ॥ दण्डवत्प्रणिपत्याह रामो ऽहमभिवादये[2] ॥ ८० ॥ पितुराज्ञां पुरस्कृत्य दण्डकानहमागतः ॥ वनवासमिषेणापि धन्यो ऽहं दर्शनात्तव ॥ ८१ ॥

(मू.)[सह]चित्रकूटस्थितं ज्ञात्वा, आयान्ति.॥७७॥रामः तज्जनसम्बाधं(मू.)तं गिरिं तत्याज.॥७८॥ [सः] (मू.)आश्रमं अन्वगात्.॥७९॥(पू.)भासयन्तं मुनिं॥(उ.)॥८०॥अहं(पू.)॥अहं(उ.)दर्शनात् धन्यः. ॥८१॥

१ त्या लोकांच्या गर्दीला. २ वंदन करितों.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'अनसूयेचें दर्शन घे.'

त्या अर्थीं मी कृतार्थ झालों.' ॥८१॥ अत्रिमुनींनीं रामाचें भाषण ऐकून घेतलें, राम हा प्रत्यक्ष परमात्मा आहे असें जाणून भक्तीनें त्याची यथाविधि पूजा केली, ॥ ८२ ॥ आणि वनांतील फळें अर्पण करून आतिथ्य केलें. पुढें रामचंद्र, सीता व लक्ष्मण सर्वजणें स्वस्थ बसलीं असतां अत्रिमुनि संतुष्ट अंतःकरणानें रामाला ह्मणाले :– ॥८३॥ 'रामा, माझी अत्यंत वृद्ध भार्या अनसूया आंत बसली आहे. फार दिवस तप करीत असल्याबद्दल तिची कीर्ति सर्वत्र प्रसिद्ध आहेच. धर्माचें तत्त्व कळत असल्यामुळें तिला धर्माचरण फार प्रिय वाटतें. हे शत्रुदमना[1], सीतेनें तिचें दर्शन घ्यावें.' कमलनयन रामचंद्रानें 'बरें आहे' असें ह्मणून सीतेला सांगितलें :–॥८४॥ ॥ ८५ ॥ 'हे शुभलक्षणे जानकी, जा. अनसूया देवीला वंदन करून पुन्हां लवकर परत ये.' सीतेनें 'बरें'

श्रुत्वा रामस्य वचनं रामं ज्ञात्वा हरिं परम् ॥ पूजयामास विधिवद्भक्त्या परमया मुनिः ॥८२॥ वन्यैः फलैः कृतातिथ्यमुपविष्टं रघूत्तमम् ॥ सीतां च लक्ष्मणं चैव संतुष्टो वाक्यमब्रवीत् ॥ ८३ ॥ भार्या मेऽतीव संवृद्धा ह्यनसूयेति विश्रुता ॥ तपश्चरन्ती सुचिरं धर्मज्ञा धर्मवत्सला ॥८४॥ अन्तस्तिष्ठति तां सीता पश्यत्वरिनिषूदन ॥ तथेति जानकीं प्राह रामो राजीवलोचनः ॥८५॥ गच्छ देवीं नमस्कृत्य शीघ्रमेहि पुनः शुभे ॥

मुनिः रामस्य वचनं श्रुत्वा, रामं परं हरिं ज्ञात्वा, परमया भक्त्या विधिवत् पूजयामास. ॥८२॥ (मू.)– ॥ ८३ ॥ 'मे (पू.) ॥ सुचिरं (उ.) ॥ ८४ ॥ अरिनिषूदन, (पू.).' ॥ राजीवलोचनः रामः (उ.) – ॥ ८५ ॥ 'शुभे, (पू.) एहि.' ॥

१ शत्रूंचा नाश करणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मणून रामाच्या आज्ञेप्रमाणें आचरण केलें (आंत जाऊन अनसूयेला वंदन केलें). ॥८६॥ सीता अग्रभागीं वंदन करीत आहे, असें पाहून अनसूयेच्या मनाला आनंद झाला. तिनें सीतेला 'बाळे, सीते,' अशीं कोमल संबोधनें देऊन आदरानें पोटाशीं धरिलें. ॥ ८७ ॥ व विश्वकर्म्यानें उत्पन्न केलेलीं दोन दिव्य कुंडलें आणि दोन स्वच्छ दुकूलें दिलीं. तिच्या मनांत सीतेबद्दल फार भक्ति होती. ॥ ८८ ॥ अनसूयेचें मुख नित्य प्रसन्न असे. तिनें सीतेच्या आंगाला दिव्य अंगराग (उटी) लाविला आणि सांगितलें :–' हे कमलवदने जानकि, मी जी ही उटी तुझ्या आंगाला लावीत आहें, हिजमध्यें असा गुण आहे कीं, हीं तुझी स्वाभाविक शोभा कधींहीं कमी होऊं देणार नाहीं. ॥ ८९ ॥ जानकि, पातिव्रत्याचा आदर करून तूं नित्य रामाच्या मागून जात

तथेति रामवचनं सीता चाऽपि तथाऽकरोत् ॥ ८६ ॥ दण्डवत्पतितामग्रे सीतां दृष्ट्वाऽतिहृष्टधीः ॥ अनसूया समालिंग्य वत्से सीतेति सादरम् ॥ ८७ ॥ दिव्ये ददौ कुण्डले द्वे निर्मिते विश्वकर्मणा ॥ दुकूले[1] द्वे ददौ तस्यै निर्मले भक्तिसंयुता ॥ ८८ ॥ अंगरागं[2] च सीतायै ददौ दिव्यं शुभानना ॥ न त्यक्ष्यतेंऽगरागेण शोभा त्वां कमलानने ॥८९॥ पातिव्रत्यं पुरस्कृत्य राममन्वेहि[4] जानकि ॥ कुशली राघवो यातु त्वया सह पुनर्गृहम् ॥९० ॥

सीता च अपि (उ.). ॥८६ ॥ अनसूया (मू.) समालिंग्य ॥ ८७ ॥ (पू.) निर्मिते द्वे कुण्डले ददौ, ॥ तस्यै निर्मले द्वे (उ.) ददौ; ॥ ८८ ॥ शुभानना दिव्यं (पू.) ॥ 'कमलानने, (उ.) न त्यक्ष्यते[3]. ॥ ८९ ॥ जानकि, (पू.). ॥ (उ.) यातु.' ॥ ९० ॥

---

१ रेशमी वस्त्रांना. २ उटीला. ३ सोडणार. ४ अन्वेहि मागून जा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो.
सप्र.सान्व.
सटिप्पण.
॥ ९४ ॥

जा. रामचंद्र तुझ्यासह पुन्हां घरीं खुशाल परत जावो.' ॥ ९० ॥ पुढें, अत्रिमुनींनीं न्यायास अनुसरून सीतेसह रामचंद्राला आणि लक्ष्मणाला भोजन घातलें. व हात जोडून पुन्हां रामाला ह्मटलें :– ॥ ९१ ॥ 'रामा, तूंच भुवनें उत्पन्न करून त्यांच्या संरक्षणाकरितां देव, मनुष्य, आणि मत्स्यकूर्मादि तिर्यक् योनींत अवतार धारण करितोस. देहाच्या गुणांनीं तुला लेप अगदीं होत नाहीं. सर्वांना मोह घालणारी माया तुला भीत असते.' ॥ ९२ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे अयोध्याकांडे नवमः सर्गः ॥ ९ ॥

अयो. कां.
सर्ग ९
'सृष्टिकर्ता व संरक्षक तूं.'

भोजयित्वा यथान्यायं रामं सीतासमन्वितम् ॥ लक्ष्मणं च तदा रामं पुनः प्राह कृताञ्जलिः ॥९१ ॥ राम त्वमेव भुवनानि विधाय तेषां संरक्षणाय सुरमा[1]नुषतिर्यगादीन् ॥ देहान्[2]बिभर्षि न च देह[3]गुणैर्विलिप्तस्त्वत्तो बिभेत्यखिलमोहकरी च माया ॥ ९२ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे अयोध्याकाण्डे नवमः सर्गः ॥९॥ अयोध्याकांडे नवानां सर्गाणां सप्तशतानि श्लोकाः॥७०० ॥ अथ ॥

(पू.) रामं लक्ष्मणं च भोजयित्वा, (उ.) रामं प्राह – ॥ ९१ ॥ '(मू.) नच, अखि[4]लमोहकरी माया त्व[5]त्तः बिभेति[6].' ॥९२॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये अयोध्याकाण्डे नवमः सर्गः॥९॥

॥ ९४ ॥

१ देव, मनुष्य पशुपक्षी वगैरे. २ धारण करितोस. ३ शरीराच्या गुणांनीं. ४ सर्वांना मोह घालणारी. ५ तुजपासून. ६ भिते.

॥ इति अयोध्याकाण्डः समाप्तः ॥ २ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्ग.	विषय.	पत्र
१	राम अत्रीच्या आश्रमांतून निघून नदी उतरून घोर अरण्यांत येतो. विराधराक्षसाचा वध. तो विद्याधर होऊन रामाचा स्तव करितो.	१
२	तीं शरभंगाश्रमीं येतात. स्तुति. मुनींच्या हाडांच्या राशी पाहून राम राक्षसांच्या वधाची प्रतिज्ञा करितो. सुतीक्ष्ण ऋषीशीं संवाद.	६
३	तीं अगस्त्यांच्या आश्रमास येतात. सत्कार. स्तुति. पंचवटींत राहण्याची सूचना.....	१३
४	तीं पंचवटींत राहतात. जटायूची भेट. रामाचा नित्यक्रम. लक्ष्मणाला उपदेश (श्लो. १९–५५ महत्वाचा विषय).	२०
५	शूर्पणखा कामातुर होऊन रामाकडे येते. तिची विटंबना. तिचा त्वेष. खरराक्षसाची चीड. राक्षस रामावर येतात. त्यांचा वध. शूर्पणखा रावणाकडे जाते व रामाचें कृत्य त्याला सांगत्ये. रावणाचे विचार (श्लो. ५८–६०).	२७
६	रावण मारीचाकडे जातो, व त्याचें साह्य मागतो. मारीच रावणाची मागणी प्रथम नाकारितो, पण शेवटीं भीतीमुळें मान्य करितो, व सुवर्णमृग होऊन पंचवटींत येतो.	३५
७	राम सीतेला अग्नींत गुप्त करून सीतेची छाया आश्रमांत ठेवितो. ही सीता तो सोन्याचा हरिण मागते. राम त्याच्या मागें जातो. मारीच 'लक्ष्मणा ! धांव. मेलों रे मेलों! ' ओरडतो. सीता घाबरून लक्ष्मणाला तिकडे जाण्यास सांगते. लक्ष्मण प्रथम जाण्याचें नाकारितो पण सीता लावून बोलत्ये ह्मणून शेवटीं जातो. इकडे रावण गोसाव्याच्या रूपानें येऊन सीतेला लांबवितो. वाटेंत त्याचें जटायूशीं युद्ध.	४१
८	रामाचे विचार. राम लक्ष्मणाला रागें भरतो व वनांत सीतेला शोधीत फिरतो. जटायूची भेट. त्याचा मृत्यु. उत्तरकार्य. स्तुति.	५०
९	कबंधराक्षसाचा वध. त्याचा वृत्तांत. स्तुति.	५८
१०	रामलक्ष्मण शबरीकडे येतात. तिचा वृत्तांत. तिला भक्तिमार्गोपदेश. ती रामाला सुग्रीवाची माहिती देऊन अग्नींत प्रवेश करून मुक्त होते	६५

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शंकर ह्मणाले :– पार्वति, रामचंद्र त्या स्थलीं एक दिवस राहिला, व - दुसरे दिवशीं - सकाळीं स्नान करून, मुनींचा निरोप घेऊन, पुढें जाण्यास सिद्ध झाला. ॥ १ ॥ - निघतांना तो मुनींला ह्मणाला :- 'मुने, दंडकारण्यांत मुनींचे अनेक समुदाय राहतात; ह्मणून त्या स्थानाला फारच रमणीयता आली आहे, - असें ऐकितों. - आह्मीं तिकडे जाण्याचा विचार योजिला आहे; त्याला आपलें अनुमोदन असावें. ॥ २ ॥ तसेंच, आह्मांला मार्ग दाखवून देण्याबद्दल शिष्यांना आज्ञा द्यावी.' त्या परमप्रसिद्ध अत्रिमुनींना रामाचें हें भाषण ऐकून हांसूं आलें. ते रघुवीराला ह्मणाले :– 'बा आनंददायका रामा, देवांना देखील आश्रय तुझा आहे. ॥ ३ ॥ सर्व जनांना मार्ग दाखविणारा तूं; तुला रस्ता दाखवून देणारा जगांत आहे कोण? तथापि, तूं

श्रीमहादेव उवाच । अथ तत्र दिनं स्थित्वा प्रभाते रघुनन्दनः ॥ स्नात्वा मुनिं स-[1]मामन्त्र्य प्रयाणायोप[2]चक्रमे ॥ १ ॥ मुने गच्छामहे सर्वे मुनिमण्डलमण्डितम् ॥ विपिनं दण्डकं यत्र त्वमाज्ञातुमिहार्हसि ॥ २ ॥ मार्गप्रदर्शनार्थाय शिष्यानाज्ञप्तुमर्हसि ॥ श्रुत्वा रामस्य वचनं प्रहस्यात्रिर्महायशाः ॥ प्राह तत्र रघुश्रेष्ठं राम राम सुरा[5]श्रय ॥ ३ ॥ सर्वस्य-[6]मार्गद्रष्टा त्वं तव को मार्गदर्शकः ॥ तथापि दर्शयिष्यन्ति तव लोकानुसारिणः ॥ ४ ॥

श्रीम० उ० – अथ रघुनन्दनः (मू.) – ॥ १ ॥ ' मुने सर्वे [वयं] यत्र मुनिमण्डलमण्डितं दण्डकं विपिनं[3], तत्र (मू.). ॥ २ ॥ (पू.).' ॥ [4]महायशाः अत्रिः रामस्यः वचनं श्रुत्वा, प्रहस्य, तत्र रघुश्रेष्ठं प्राह – ' (मू.). ॥ ३ ॥ (पू.)? ॥ तथापि, [7]लोकानुसारिणः तव दर्शयिष्यंति. ' ॥ ४ ॥

---

१ निरोप घेऊन. २ **उपचक्रमे** प्रारंभ करिता झाला. ३ अरण्यास. ४ मोठी कीर्ति ज्याची, असा. ५ देवांना ज्याचा आश्रय, अशा. ६ मार्ग दाखविणारा. ७ देऊन लोकांचें अनुकरण करणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो.
सपू.सान्व.
सटिप्पण.
॥ १ ॥

लोकांप्रमाणें अज्ञानाचें सोंग आणिलें आहेस, त्याअर्थीं हे (शिष्यांकडे बोट दाखवून ह्मणतो) तुला मार्ग दाखवितील. ' ॥ ४ ॥ अशा प्रकारें शिष्यांना आज्ञा देऊन अत्रिमुनि स्वतां थोडेसे त्याला पोंचवायास गेले. रामानें संतोषानें त्यांना परत जाण्यास सांगितलें; तेव्हां ते परत स्वाश्रमीं आले. ॥ ५ ॥ पुढें, कमलनयन रामचंद्र कोसभर चालून गेला. त्याठिकाणीं एक मोठी नदी त्याच्या दृष्टीस पडली. तेव्हां तो अत्रींच्या शिष्यांना असें ह्मणाला :– ॥ ६ ॥ ' काय हो! नदी उतरून जाण्याला कांहीं साधन आहे कीं नाहीं ? ' ते ह्मणाले :–' रामचंद्रा, येथें चांगली दृढ नौका आहे. ॥ ७ ॥ आह्मीच क्षणमात्रांत तुह्मांला पलिकडे उतरून नेऊं. ' नंतर, मुनिकुमारांनीं सीता, रामचंद्र आणि लक्ष्मण ह्यांना नौकेंत बसवून थोड्या वेळांत नदीच्या

अर. कां.
सर्ग १
ते पुढें चालले.

इति शिष्यान्समादिश्य स्वयं किंचित्तमन्वगात्॥रामेण वारितः प्रीत्या अत्रिः स्वभवनं ययौ॥५ ॥ क्रोशमात्रं ततो गत्वा ददर्श महतीं नदीम् ॥ अत्रेः शिष्यानुवाचेदं रामो राजीवलोचनः॥६॥नद्याः संतरणे कश्चिदुपायो विद्यते न वा ॥ ऊचुस्ते विद्यते नौका सुदृढा रघुनंदन ॥७ ॥ तारयिष्यामहे युष्मान्वयमेव क्षणादिह ॥ ततो नावि समारोप्य सीतां राघवलक्ष्मणौ ॥ ८ ॥ क्षणात्संतारयामासुर्नदीं मुनिकुमारकाः ॥

(पू.). ॥ रामेण प्रीत्या (मू.). ॥ ५ ॥ (पू.) ददर्श. ॥ राजीवलोचनः रामः (मू.) उवाच – ॥ ६ ॥ (मू.)? ' ॥ ते ऊचु :– 'रघुनन्दन, सुदृढा नौका विद्यते. ॥ ७ ॥ वयं एव इह युष्मान् क्षणात् तारयिष्यामहे. ' ॥ (मू.) समारोप्य, ॥ ८ ॥ मुनिकुमारकाः नदीं (पू.); ॥

॥ १ ॥

१ आज्ञा देऊन. २ पोंचवायास गेला. ३ उतरण्याविषयीं. ४ तुह्मांला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पलिकडे उतरविलें; व रामानें आनंदानें परत जाण्यास अनुज्ञा दिली असतां ते सर्वजण परत अत्रीच्या आश्रमीं गेले. ॥ ८ ॥ ९ ॥ रामलक्ष्मण पुढें चालले; तों त्यांना एक भयाण अरण्य लागलें. त्या ठिकाणीं रानमाशांचा घोंघों शब्द एकसारखा घुमत असून, अनेक प्रकारच्या श्वापदांचे समुदाय इकडून तिकडे फिरत होते; सिंह, वाघ इत्यादि हिंस्र पशूंच्या योगानें तें स्थल भयंकर झालें होतें; ॥ १० ॥ अक्राळविक्राळ स्वरूपांचे राक्षस तेथें मोठ्या प्रेमानें राहत असत; - त्यास्थळीं गेल्याबरोबर मनुष्याच्या आंगावर भीतीनें - कांटा उभा राहत असे. अशा त्या घोर अरण्यांत शिरल्यावर राम लक्ष्मणाला ह्मणाला :– ॥ ११ ॥ 'लक्ष्मणा ! येथपासून तूं आतां मोठ्या दक्षतेनें माझ्या अगदीं बरोबर चालत जा.' - असें बोलून - रामानें धनुष्याला दोरी जोडिली, हातीं बाण घतले, - आणि बोलणें पुढें चालविलें :- ॥ १२ ॥ 'लक्ष्मणा, मी पुढें

रामाभिनन्दिताः सर्वे जग्मुरत्रेरथाश्रमम् ॥९॥ तावेत्य विपिनं घोरं झिल्ली[1]झंकारनादितम्॥नानामृगगणाकीर्णं सिंहव्याघ्रादिभीषणम्॥१०॥ राक्षसैर्घोररूपैश्च सेवितं रोमहर्षणम्[2]॥प्रविश्य विपिनं घोरं रामो लक्ष्मणमब्रवीत्॥११॥इतःपरं प्रयत्नेन गन्तव्यं सहितेन मे॥धनुर्गुणेन[3] संयोज्य[4] शरानपि करे दधत्॥१२॥अग्रे यास्याम्यहं पश्चात्त्वमन्वेहि धनुर्धरः॥आवयोर्मध्यगा सीता मायेवात्मपरात्मनोः ॥ १३ ॥

(मृ.) जग्मुः. ॥९॥ तौ (मू.) विपिनं एत्य,॥१०॥रामः (पू.) ॥ घोरं विपिनं प्रविश्य (मू.)– ॥११॥'मे सहितेन(पू.).'॥(मू.).॥१२॥'अहं (मू.)[सन]अन्वेहि[5]; ॥ आत्म[6]परात्मनोः माया इव(मू.)[अस्तु].॥१३॥

---

१ रानमाशांच्या शब्दांनीं घुमलेलें. २ आंगावर शहारे आणणारे. ३ दोरीनें. ४ जोडून. ५ मागें चाल. ६ जीव आणि ईश्वर यांच्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चालतों; तूं हातीं धनुष्य घेऊन पाठीमागें चालत जा. व ज्याप्रमाणें जीव आणि ईश्वर ह्यांच्यामध्यें माया असते (माया एकच पण ती जीवाच्या ठिकाणीं आश्रयत्वानें व ईश्वराच्या ठिकाणीं विषयत्वानें ह्मणजे जीवाला ईश्वराविषयीं अज्ञान, अशाप्रकारें राहते) त्याप्रमाणें सीतेनें आपल्या दोघांच्या मध्यें चालत असावें. ॥ १३ ॥ दृष्टि चोहोंकडे असूं दे. लक्ष्मणा, तूं शत्रूंचा निग्रह करण्याच्या कामीं कुशल आहेस. दंडकारण्यांत राक्षसांचें फार भय, असें पूर्वीं आपल्या कानीं आलें होतें; - आज अपशकुन होत असल्यामुळें त्यासारखें कांहीं अरिष्ट येणार असें - दिसून येत आहे. ' ॥ १४ ॥ असें बोलत बोलत ते दीड योजन (सहा कोस) मार्ग चालून गेले. तेथें एक सरोवर त्यांच्या दृष्टीस पडलें. त्यांत कल्हारें, कमोदें, कमळें इत्यादि ॥ १५ ॥ उदकांत उद्भवणारीं पुष्पें व शीतल जल विपुल होतें. त्यामुळें तें (सरोवर) शोभिवंत दिसे. तीं तिघेंजणें सरोवराजवळ गेलीं व त्याचें उत्तम उदक प्राशन करून ॥ १६ ॥

चक्षुश्चारय सर्वत्र दृष्टं रक्षोभयं महत् ॥ विद्यते दण्डकारण्ये श्रुतपूर्वमरिन्दम
॥ १४ ॥ इत्येवं भाषमाणौ[6] तौ जग्मतुः सार्धयोजनम्[7] ॥ तत्रैका पुष्करिण्यास्ते[9]
कल्हारकुमुदोत्पलैः ॥ १५ ॥ अम्बुजैः शीतलोदेन[10] शोभमाना [11]व्यदृश्यत ॥
तत्समीपमथो गत्वा पीत्वा तत्सलिलं शुभम् ॥ १६ ॥

अरिन्दम, सर्वत्र [1]चक्षुः [2]चारय; दण्डकारण्ये [3]श्रुतपूर्वं [4]दृष्टं महत् [5]रक्षोभयं विद्यते.' ॥ १४ ॥ (पू.) [8]जग्मतुः. ॥ (मू.) [युक्ता] आस्ते, ॥ १५ ॥ (पू.). ॥ अथो (मू.) तत्सलिलं पीत्वा, ॥ १६ ॥

१ दृष्टि. २ फिरवीत अस. ३ पूर्वीं ऐकलेलें. ४ शकुनांवरून दिसलेलें. ५. राक्षसांचें भय. ६ बोलणारे. ७ दीड योजन (सहा कोस) पर्यंत. ८ गेले. ९ तळें. १० शीतल उदकानें. ११ दिसली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पाण्यापासून थोड्याच अंतरावर एका वृक्षाच्या छायेंत क्षणमात्र विश्रांति घेत बसलीं. इतक्यांत, एक भयंकर धिप्पाड प्राणी आपल्या आंगावर चालून येत आहे, असें त्यांना दिसून आलें. ॥ १७ ॥ त्याच्या तोंडांत लांब लांब दाढा होत्या; तो मोठ्यानें गर्जना करून प्राण्यांना भीति दाखवीत होता; त्यानें आपल्या डाव्या खांद्यावर शूळ (भाला) ठेविला असून त्याच्या अग्राला अनेक मनुष्यें अडकावून ठेविलीं होतीं; ॥१८॥ अरण्यांत जें कांहीं श्वापद दिसेल, मग तो हत्ती असो, बाघ असो किंवा रेडा असो, त्याचें तो भक्षण करीत होता! रामानें आपल्या धनुष्यावर दोरी पूर्वींच चढवून ठेविली होती; तें हातीं घेऊन तो लक्ष्मणाला ह्मणाला :– ॥ १९ ॥ 'भाऊ! पहा. हा धिप्पाड राक्षस जवळ आला. हा आपल्या समोर इकडेच येत आहे.

ऊषुस्ते सलिलाभ्[1]याशे क्षणं छायामुपाश्रिताः ॥ ततो ददृशुरायान्तं महासत्त्वं भयानकम् ॥ १७ ॥ [5]करालदंष्ट्रावदनं भीषयन्तं स्वगर्जितैः ॥ [7]वामांसे न्यस्त[8]शूलाग्रग्रथितानेकमानुषम् ॥ १८ ॥ भक्षयन्तं गजव्याघ्रमहिषं वनगोचरम् ॥ [11]ज्यारोपितं धनुर्धृत्वा रामो लक्ष्मणमब्रवीत् ॥ १९ ॥ पश्य भ्रातर्महा[12]कायो राक्षसोऽयमुपागतः ॥

(१७पू.) [2]ऊषुः. ॥ ततः [3]आयान्तं [4]भयानकं ॥ (१८पू.) भी[6]षयन्तं ॥ (१८उ.) ॥ वनगो[9]चरं गजव्याघ्रमहिषं भक्षयन्तं [10]महासत्त्वं ददृशुः. ॥ रामः (१९ उ.)– ॥ १७॥१८॥१९ ॥ 'भ्रातः, पश्य (पू.); ॥

---

१ उदकाजवळ. २ राहिले ३ येणाऱ्या. ४ भयंकर. ५ भयंकर दाढा मुखांत आहेत ज्याच्या, अशा. ६ भिवविणाऱ्या. ७ डाव्या खांद्यावर. ८ ठेविलेल्या शूळाच्या अग्रावर अडकाविलीं अनेक माणसें ज्याच्या, अशा. ९ वनांत दिसणाऱ्या. १० महाशक्तिमान् प्राण्याला. ११ दोरी चढविलेलें. १२प्रचंड शरीराचा.

२

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्याला पाहून भिऱ्यांना भीति वाटावयाची! ॥ २० ॥ तूं धनुष्य सज्ज करून उभा राहा. जानकि, भिऊं नकोस.' असें बोलून व बाण हातीं घेऊन राम पर्वताप्रमाणें निश्चल उभा राहिला. ॥ २१ ॥ त्या वेळीं तो राक्षस तर रामाला, लक्ष्मणाला व जानकीला पाहून मोठमोठ्यानें हांसूं लागला आणि त्यांना भीति घालीत असें बोलला :— ॥ २२ ॥ 'अरे! तुह्मी दोघेजण कोण आहां? तुमच्या शरीरावर बाण, भाते, जटा आणि वल्कलें दिसत आहेत; तुह्मी लहान असून मुनींचा वेष घेतला आहे; तुमच्याबरोबर एक स्त्री आहे; - आकृतीवरून तर - तुह्मी फार उन्मत्त दिसतां. ॥ २३ ॥ दिसण्यांत सुंदर आहां खरे; पण मला तुह्मी माझ्या तोंडांत आपोआप येऊन पडलेल्या घांसाप्रमाणें वाटतां. अरे! ह्या घोर अरण्यांत घातकी पशु राहतात; तुह्मी

आयात्यभिमुखं नो ऽग्रे भीरूणां[1] भयमावहन् ॥ २० ॥ सज्जीकृतधनुस्तिष्ठ मा भैर्जनकनन्दिनि[2] ॥ इत्युक्त्वा बाणमादाय स्थितो राम इवाचलः[3] ॥ २१ ॥ स तु दृष्ट्वा रमानाथं लक्ष्मणं जानकीं तदा ॥ अट्टहासं ततः कृत्वा भीषयन्निदमब्रवीत् ॥ २२ ॥ कौ युवां बाणतूणीरजटावल्कलधारिणौ ॥ मुनिवेषधरौ बालौ स्त्रीसहायौ सुदुर्मदौ ॥ २३ ॥ सुन्दरौ बत मे वक्त्रप्रविष्टकवलोपमौ[4] ॥ किमर्थमागतौ घोरं वनं व्यालनिषेवितम्[5] ॥ २४ ॥

(मू.)नः अभिमुखं आयाति. ॥२०॥ (पू.) ॥ मा 'भैः.' ॥ (मू.) इव स्थितः. ॥२१॥ सः तु तदा (पू.) दृष्ट्वा ॥ (मू.) — ॥ २२ ॥ '(मू.) युवां कौ? ॥ २३ ॥ (मू.) वनं किमर्थं आगतौ?' ॥ २४ ॥ ॥ ३ ॥

१ भिऱ्यांना. २ भिऊं. ३ पर्वत. ४ मुखांत शिरलेल्या घांसासारखे. ५ सर्पासारख्या दुष्ट प्राण्यांनीं सेविलेल्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

येथें आलां कशासाठीं ? ' ॥२४॥ हें राक्षसाचें भाषण ऐकून राम हांसत हांसत त्याला म्हणाला :–' अरे ! मी राम. हा माझा प्रिय बंधु लक्ष्मण. ॥ २५ ॥ आणि ही माझी प्राणप्रिया सीता. आह्मी पित्याची आज्ञा मान्य करून तुमच्यासारख्या दुष्टांना शिक्षा करण्यासाठीं येथें आलों आहों. ' ॥ २६ ॥ हें रामाचें भाषण ऐकिल्याबरोबर तो राक्षस मोठ्यानें खो खो हांसूं लागला, व ' आ ' करून आणि लगबगीनें शूळ हातीं घेऊन - रामाला ह्मणाला :- ॥ २७ ॥ ' रामा ! काय ? मी विराध ह्मणजे सर्व जगांत प्रख्यात ! आणि तूं मला ओळखत नाहींस ? अरे ! माझ्या भीतीनें तर सर्व मुनि वन सोडून येथून चालते झाले ! ॥ २८ ॥ आतां, तुह्मांला जर जिवंत राहण्याची इच्छा असेल, तर आयुधें टाकून, सीतेला सोडून पळून जा. नाहीं

श्रुत्वा रक्षोवचो रामः स्मयमान[1] उवाच तम् ॥ अहं रामस्त्वयं भ्राता लक्ष्मणो मम संमतः ॥ २५ ॥ एषा सीता मम प्राणवल्लभा वयमागताः ॥ पितृवाक्यं पुरस्कृत्य शिक्षणार्थं भवादृशाम् ॥२६॥ श्रुत्वा तद्रामवचनमट्टहासमथाकरोत् ॥ व्यादाय[2] वक्त्रं बाहुभ्यां शूलमादाय सत्वरः ॥ २७ ॥ मां न जानासि राम त्वं विराधं लोकविश्रुतम् ॥ मद्भयान्मुनयः सर्वे त्यक्त्वा वनमितो गताः ॥ २८ ॥ यदि जीवितुमिच्छाऽस्ति त्यक्त्वा सीतां निरायुधौ ॥

रामः रक्षोवचः (पू.) उवाच – ॥ ' (मू.) भ्राता. ॥ २५ ॥ (मू.) शिक्षणार्थं आगताः. ' ॥ २६ ॥ तत् रामवचनं (पू.) ॥ वक्त्रं (मू.) [आह]– ॥२७॥ 'राम, त्वं लोकविश्रुतं विराधं (पू.)? ॥ सर्वे मुनयः मद्भयात् वनं त्यक्त्वा (मू.). ॥ २८ ॥ (पू.) त्यक्त्वा निरायुधौ [सन्तौ] ॥

१ किंचित् हांसणारा. २ पसरून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तर मी तुह्मा दोघांनाही आतांच्या आतां खाऊन टाकीन.' ॥ २९ ॥ असें बोलून तो राक्षस सीतेला धरण्या-
साठीं तिच्या आंगावर धांवला. रामानें हांसत हांसतच बाणाच्या योगानें त्याचे बाहू तोडून टाकिले. ॥ ३० ॥
तेव्हां त्याचें मन क्रोधानें व्याप्त होऊन गेलें. तो आपलें अक्राळविक्राळ मुख पसरून रामावर चालून आला.
विराध धांवून येत आहे, इतक्यांत रामानें त्याचे दोन्ही पाय तोडिले! तो एक अद्भुतच प्रकार झाला!
॥ ३१ ॥ ३२ ॥ नंतर, तो राक्षस सर्पाप्रमाणें रामाला ग्रासून टाकण्यासाठीं सरकत येऊं लागला; तेव्हां
रामानें अर्धचंद्राकार बाणानें त्याचें प्रचंड मस्तक ॥ ३३ ॥ तोडून टाकिलें. तें रक्ताच्या प्रवाहासह पृथ्वीत-

पला[1]यतं न चेच्छीघ्रं भक्षयामि युवामहम् ॥ २९ ॥ इत्युक्त्वा राक्षसः सीतामाद[2]ातुमभि-
दु[3]द्रुवे ॥ रामश्चिच्छेद तद्बाहू शरेण प्रहसन्निव ॥ ३० ॥ ततः क्रोधप[4]रीतात्मा व्यादाय वि-
कटं मुखम् ॥ राममभ्यद्रवद्रामश्चिच्छेद परिधावतः ॥ ३१ ॥ पदद्वयं विराधस्य तदद्भुत-
मिवाभवत् ॥ ३२ ॥ ततः सर्प इवास्[6]येन ग्रसितुं राममापतत् ॥ ततोऽर्धचन्द्राकारेण
बाणेनास्य महच्छिरः ॥ ३३ ॥ चिच्छेद रुधिरौघे[7]ण पपात धरणीतले ॥ ततः सीता
समालिंग्य प्रशशंस रघूत्तमम् ॥ ३४ ॥

(मू.) भक्षयामि.' ॥ २९ ॥ (मू.) शरेण तद्बाहू चिच्छेद. ॥ ३० ॥ (पू.) व्यादाय, ॥ (३१
उ.) परिधावतः विराधस्य पदद्वयं चिच्छेद. (मू.) ॥ ३१ ॥ ३२ ॥ (पू.) ॥ [रामः] (मू.) ॥ ३३ ॥
(पू.) पपात. ॥ (मू.) समालिङ्ग्य, प्रशशंस. ॥ ३४ ॥

१ पळा. २ धरण्यास. ३ आंगावर धांवला. ४ तोडिता झाला. ५ क्रोधानें व्यापलें मन ज्याचें, असा. ६ मुखानें. ७ रक्ताच्या प्रवाहानें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लावर पडलें. तेव्हां सीतेनें रामचंद्राला आलिंगन देऊन त्यांची प्रशंसा केली. ॥ ३४ ॥ त्या वेळीं स्वर्गामध्यें देवगणांनीं वाजविलेल्या दुंदुभींचे शब्द निघाले, अप्सरा आनंदित होऊन नृत्य करूं लागल्या व गंधर्व आणि किन्नर गाऊं लागले. ॥ ३५ ॥ विराधाच्या शरीरापासून एक अत्यंत सुस्वरूप तेजस्वी पुरुष निघाला. त्यानें निर्मल वस्त्रें परिधान केलीं असून तापविलेल्या सुवर्णासारखे उत्तम अलंकार घातले होते; जसा आकाशांत सूर्य दिसतो, तसा तो पुरुष रामाच्या अग्रभागीं दिसूं लागला. ॥ ३६ ॥ त्यानें भक्तांचीं दुःखें दूर करणाऱ्या रामचंद्राला प्रणाम केला. - शंकर ह्मणाले :-- पार्वति, - रामचंद्र संसारप्रवाहाचा नाश करणारा होय; दयेचें केवळ उत्पत्तिस्थान असा तो प्रभु स्वतांला शरण आलेल्या जनांचीं संकटें नाहींशीं करितो.- त्याचें दर्शन होतांच - त्या पुरुषाचें मन प्रसन्न झालें व त्यानें रामचंद्राला वारंवार साष्टांग नमस्कार घातले. ॥३७॥

ततो दुन्दुभयो नेदुर्दिवि देवगणेरिताः॥ ननृतुश्चाप्सरा हृष्टा जगुर्गन्धर्वकिन्नराः ॥ ३५ ॥
विराधकायादतिभासुराकृतिर्विभ्राजमानो विमलाम्बरा[1]वृतः ॥ प्रतप्त[2]चामीकरचारुभूषणो व्यदृश्यताग्रे गगने रविर्यथा॥ ३६ ॥ प्रणम्य रामं प्रणतार्तिहारिणं भवप्र[4]वाहोपरमं घृ[5]णाकरम् ॥ प्रणम्य भूयः प्रणनाम दण्डवत्प्रपन्नसर्वार्तिहरं प्रसन्नधीः ॥ ३७ ॥

(पू.) दुन्दुभयः नेदुः. ॥ हृष्टाः अप्सराः ननृतुः; (मू.) जगुः. ॥ ३५ ॥ (मू.) [तथा पुरुषः] अग्रे व्यदृश्यत. ॥ ३६ ॥ प्र[3]सन्नधीः (मू.) रामं प्रणम्य प्रणम्य भूयः दण्डवत् प्र[6]णनाम. ॥ ३७ ॥

---

१ स्वच्छ वस्त्रानें वेष्टिलेला. २ तापलेल्या सुवर्णाप्रमाणें चकचकीत अलंकार ज्याचे, असा. ३ ज्याचें मन प्रसन्न झालें, असा. ४ संसाराचा प्रवाह शमविणाऱ्या. ५ दया करणाऱ्या. ६ नमस्कार करिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो. समू.सान्व. सटिप्पण. ॥ ५ ॥

अर. कां. सर्ग १

त्या विद्याधराची मागणी.

विराध ह्मणाला :–' श्रीरामा, हे कमलपत्रविशालाक्षा, तुझ्या पुढें उभा असलेला हा शुद्ध तेजस्वी पुरुष मी विद्याधर आहें. कारणाशिवाय क्रुद्ध होणारे प्रत्यक्ष कोपमूर्ति जे दुर्वास ऋषि, त्यांनीं मला पूर्वी शाप दिला होता; त्या शापापासून त्वां आज मला सोडविलें. ॥३८॥ इतउत्तर, संसाराची निवृत्ति व्हावी एवढ्यासाठीं, मला तुझ्या चरणकमलाचो नित्य स्मृति राहो; माझी वाणी तुझ्या नामाचें कीर्तनच करो; कानांनीं तुझें ॥ ३९ ॥ कीर्तनामृत प्राशन करीत असावें; दोन्ही हात तुझ्या चरणकमलाचें पूजनच करीत राहोत, मस्तकानें तुझ्या चरणयुगुलाला प्रणाम करावे; अशा रीतीनें माझीं सर्व इंद्रियें तुझी सेवा करण्यांत तत्पर असोत. ॥ ४० ॥ हे षड्गुणैश्वर्यसंपन्न रामा, शुद्ध अपरोक्षज्ञान ही तुझी मूर्ति होय; तूं नित्य स्वस्वरूपीं रममाण असतोस, व

विराध उवाच । श्रीराम राजीवदलायताक्ष विद्याधरो ऽहं विमलप्रकाशः ॥ दुर्वाससा ऽकारणकोपमूर्तिना शप्तः पुरा सो ऽद्य विमोचितस्त्वया ॥ ३८॥ इतः परं त्वच्चरणारविन्दयोः स्मृतिः सदा मे ऽस्तु भवोपशान्तये ॥ त्वन्नामसंकीर्तनमेव वाणी करोतु मे कर्णपुटं त्वदीयम्॥३९॥ कथामृतं पातु[2] करद्वयं ते पादारविन्दार्चनमेव कुर्यात् ॥ शिरश्च ते पादयुगप्रणामं करोतु नित्यं भवदीयमेवम्॥४०॥नमस्तुभ्यं भगवते विशुद्धज्ञानमूर्तये ॥ आत्मारामाय रामाय सीतारामाय वेधसे ॥ ४१ ॥

वि० उ० – ' (पू.) विद्याधरः अहं ॥ पुरा [1]अकारणकोपमूर्तिना (पू.) विमोचितः. ॥ ३८ ॥ (पू.) अस्तु. ॥ मे वाणी नित्यं,(वा.३९।४० मू.) एवं [मदङ्गजातं] भवदीयं एव [अस्तु.] ॥ ३९ ॥ ॥ ४० ॥ (मू.) तुभ्यं नमः. ॥ ४१ ॥

१ कारणावांचून येणारा मूर्तिमान् क्रोध. २ पातु=पिबतु प्राशन करो.

॥ ५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भक्तजनांना आनंद देतोस; तसेंच, तूं इच्छेस येईल, त्याप्रमाणें घटना करण्यास समर्थ आहेस. हे सीता-रामा, तुला नमस्कार असो. ॥४१॥ रामचंद्रा, मी तुला शरण आलों आहें; माझें रक्षण कर. तूं आज्ञा दिलीस कीं मी देवलोकीं जाईन. हे रघुवीरा, तुझ्या मायेनें मला मोह घालूं नये, - एवढी कृपा करण्याबद्दल माझी तुजपाशीं प्रार्थना आहे. -' ॥ ४२ ॥ अशा प्रकारें त्या पुरुषानें विज्ञापना केली; तेव्हां रामचंद्र प्रसन्न झाला. त्या वेळीं त्या परमोदार ईश्वरानें संतुष्ट होऊन विराधाला वर दिला - आणि सांगितलें :- ॥ ४३ ॥ 'विद्याधरा, जा. लोकांमध्यें अज्ञानाच्या दोषामुळें जे परिणाम दिसून येतात, ते त्वां माझ्या दर्शनाच्या योगानें जिंकून टाकिले[1]. ह्मणून आतां तूं ज्ञानी लोकांत श्रेष्ठ अर्थात मुक्त होशील. ॥ ४४ ॥ लोकामध्यें माझी भक्ति

प्रपन्नं पाहि मां राम यास्यामि त्वदनुज्ञया ॥देवलोकं रघुश्रेष्ठ माया मां मा वृणो-
तु ते ॥४२॥ इति विज्ञापितस्तेन प्रसन्नो रघुनन्दनः ॥ ददौ वरं तदा प्रीतो वि-
राधाय महामतिः ॥ ४३ ॥ गच्छ विद्याधराशेषमायादोषगुणा जिताः ॥ त्वया
मद्दर्शनात्सद्यो मुक्तो ज्ञानवतां वरः ॥४४॥ मद्भक्तिर्दुर्लभा लोके जाता चेन्मुक्ति-
दा यतः ॥ अतस्त्वं भक्तिसंपन्नः परं याहि ममाज्ञया ॥ ४५ ॥

राम, प्रपन्नं मां पाहि. रघुश्रेष्ठ, देवलोकं त्वदनुज्ञया यास्यामि. ते (मू.). ' ॥ ४२ ॥ तदा तेन (मू.) रघुनन्दनः प्रीतः [सन्] विराधाय वरं ददौ -- ॥ ४३ ॥ ' विद्याधर, गच्छ; त्वया मद्दर्शनात् (पू.); ॥ ज्ञानवतां वरः [भूत्वा,] (मू.) [भविष्यसि]॥४४॥ यतः लोके दुर्लभा (मू.)परं याहि.'॥४५॥

---

१ आच्छादून टाको.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

फार दुर्मिळ आहे. ती उत्पन्न झाली कीं मुक्ति प्राप्त होतेच. ह्मणून, तुझी मजवर भक्ति जडली, त्याअर्थी माझ्या आज्ञेस्तव तुला मोक्ष प्राप्त होईल.' ॥४९ ॥ रामचंद्रानें अत्यंत भयंकर राक्षसाचा वध केला, त्याला शापापासून मुक्त करून वर दिला; शेवटीं त्या राक्षसाला पुन्हां विद्याधर पदवी मिळाली : अशा प्रकारें रामाच्या चरित्राचें जो वर्णन करितो, त्या पुरुषाला, सकल पुरुषार्थांची प्राप्ति होते. ॥ ४६ ॥ इति प्रथमः सर्गः ॥१॥

विराध स्वर्गाला गेला असतां, लक्ष्मण आणि सीता ह्या दोघांना बरोबर घेऊन रामचंद्र शरभंगाच्या अरण्यांत गेला. तें स्थान सर्व प्राण्यांना सुखदायक होतें ॥ १ ॥ त्यावेळीं महाबुद्धिमान् शरभंग मुनि, लक्ष्म-

रामेण रक्षोनिधनं[1] सुघोरं शापाद्विमुक्तिर्वरदानमेवम् ॥ विद्याधरत्वं पुनरेव लब्धं रामं गृणन्नेति[2] नरो ऽखिलार्थान्[3] ॥ ४६ ॥ इति श्रीम० रा० उ० अरण्यकाण्डे प्रथमः सर्गः ॥१॥ विराधे स्वर्गते[5] रामो लक्ष्मणेन च सीतया ॥ जगाम शरभंगस्य वनं सर्वसुखावहम् ॥१ ॥ शरभंगस्ततो दृष्ट्वा रामं सौमित्रिणा सह ॥ आयातं सीतया सार्धं संभ्रमादुत्थितः सुधीः ॥ २ ॥

रामेण सुघोरं (पू.) वरदानं [कृतम्]. ॥ (मू.) एति. ॥ ४६ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये अरण्यकाण्डे प्रथमः सर्गः ॥ १ ॥ (पू.) च [सह] ॥ सर्वसुखावहं (मू.) जगाम. ॥ १ ॥ ततः सुधीः शरभङ्गः. (मू.) रामं दृष्ट्वा, संभ्रमात् उत्थितः. ॥ २ ॥

१ राक्षसाच्या नाशाप्रत. २ वर्णन करणारा. ३ सर्व इच्छित वस्तूंस. ४ पावतो. ५ स्वः गते स्वर्गाला गेला असतां.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णासहवर्तमान राम सीतेला बरोबर घेऊन आला आहे असें पाहून, लगबगीनें उठला. ॥ २ ॥
त्यानें सामोरा जाऊन तिघांनाही बहुमानपुरस्सर आश्रमीं आणिलें व आसनांवर बसवून कंद, मुळें फळें इत्यादिकांच्यायोगानें त्यांचें आदरातिथ्य केलें. ॥ ३ ॥ पुढें शरभंगऋषि आनंदानें त्या भक्तपरायण रामचंद्राला ह्मणाला :– ' रामा, मी तप करण्याचा निश्चय करून फार दिवस येथेंच राहिलों आहें. ॥ ४ ॥
मला तुझें दर्शन घडावें अशी फार इच्छा होती; - ती आज पूर्ण झाली. - रामचंद्रा, तूं प्रत्यक्ष परमेश्वर आहेस. आज माझी तपश्चर्या फळास आली. आतां मीं जें पुष्कळ पुण्य संपादन केलें आहे तें सर्व तुला अर्पण करितों, आणि नंतर मोक्षास जातों.' ॥५॥ - शंकर ह्मणाले :– पार्वति, - शरभंग मुनि पूर्ण योगी व

अभिगम्य सुसंपूज्य विष्टरेषू[1]पवेशयत्[2] ॥ आतिथ्यमकरोत्तेषां कन्दमूलफलादिभिः ॥ ३ ॥ प्रीत्या ऽऽह शरभंगो ऽपि रामं भक्तपरायणम् ॥ बहुकालमिहैवासं तपसे कृतनिश्चयः ॥ ४ ॥ तव संदर्शनाकांक्षी राम त्वं परमेश्वरः ॥अद्य मत्तपसा सिद्धं यत्पुण्यं बहु विद्यते ॥तत्सर्वं तव दास्या[3]मि ततो मुक्तिं व्रजा[4]म्यहम् ॥५॥ समर्प्य रामस्य महत्सुपुण्यफलं विरक्तः शरभंगयोगी ॥ चितिं समारोह[5]यदप्रमेयं रामं ससीतं सहसा प्रणम्य ॥ ६ ॥

(मू.) आतिथ्यं अकरोत्. ॥ ३ ॥ (पू.) रामं प्रीत्या आह – ॥' (४ उ.) ॥ अहं (मू.).'
॥ ४ ॥ ५ ॥ विरक्तः शरभङ्गयोगी (पू.) समर्प्य, ॥ (मू.) चितिं समारोहयत्. ॥ ६ ॥

१ विष्टरेषु आसनांवर. २ उपवेशयत् बसविता झाला. ३ देईन. ४ जातों. ५ समारोहत् चढला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'राम परम दयालु.'

विरक्त होता. त्यानें आपलें अपार पुण्यफल रामाला अर्पण केलें, ज्याच्या स्वरूपाला इयत्ता नाहीं त्या सीतेसह प्रभु रामचंद्राला प्रणाम केला, आणि तत्काल चितेवर आरोहण केलें. ॥ ६ ॥ ह्यावेळीं त्यानें एकसारखें रामाचें ध्यान चालविलें होतें. रामचंद्र अखिल प्राण्यांच्या हृदयीं वास करितो; त्याचें शरीर दूर्वेच्या पत्राप्रमाणें श्यामवर्ण असून, नेत्र कमलासारखे होते; त्यानें वल्कलरूपी वस्त्र धारण केलें होतें; त्याच्या मस्तकावर तेजस्वी जटांचा मुकुट दिसत होता. सीता व लक्ष्मण हीं दोघें त्याच्याजवळ होतीं. ॥ ७ ॥ - देहत्याग कारितांना शरभंगानें स्तुतिपूर्वक रामाची प्रार्थना केली, ती अशी :- 'जगामध्यें रामचंद्रासारखा दुसरा दयाळू पुरुष कोणी तरी सांपडेल काय? स्मरण केलें असतां, हा कामधेनूप्रमाणें - भक्तांचे इच्छित अर्थ पुरवितो. - मी अनन्य भावानें त्याचें नित्य चिंतन करीत आलों. तें स्मरण जाणून त्या प्रभूनें मला प्रत्यक्ष दर्शन दिलें. ॥ ८ ॥ देवाधिदेव दाशरथि प्रभु रामचंद्रानें आतां येथें पाहत राहावें. मी स्वतांचा देह दहन करून नि-

ध्यायंश्चिरं राममशेषहृत्स्थं दूर्वादलश्यामलमम्बुजाक्षम् ॥ चीराम्बरं स्निग्धजटाकलापं सीतासहायं सहलक्ष्मणं तम् ॥ ७ ॥ को वा दयालुः स्मृतकामधेनुरन्यो जगत्यां रघुनायकादहो ॥ स्मृतो मया नित्यमनन्यभाजा ज्ञात्वा स्मृतिं मे स्वयमेव यातः ॥ ८ ॥ पश्यत्विदानीं देवेशो रामो दाशरथिः प्रभुः ॥

(मू.) रामं चिरं ध्यायन् [सन आह] - ॥७॥ 'अहो! जगत्यां रघुनायकात् अन्यः [1]स्मृतकामधेनुः दयालुः कः वाः? ॥ [2]अनन्यभाजा मया नित्यं स्मृतः ज्ञात्वा मे (मू.); ॥ ८ ॥ (पू.) रामः पश्यतु. ॥ ॥ ७ ॥

१ स्मरण केला असतां कामधेनूसारखा (इच्छा पुरविणारा). २ इतराला न भजणारा, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ष्पाप होत्साता ब्रह्मलोकास जातों. ॥ ९ ॥ मेघावर विद्युल्लता असते, त्याप्रमाणें ज्याच्या वामांकावर सीता बसली आहे, तो अयोध्येचा अधिपति रघुवीर सदासर्वकाळ माझ्या हृदयीं असो.' ॥ १० ॥ शरभंग मुनीनें असें - ह्मणून - रामचंद्राचें पुष्कळ वेळ ध्यान केलें, पुढें उभ्या असलेल्या मूर्तीचें दर्शन घेतलें, अग्नि पेटविला व लागलेंच आपलें पंचभूतात्मक शरीर जाळून टाकिलें. ॥ ११ ॥ तों तो दिव्य-देहधारी होऊन साक्षात् लोकसंरक्षक प्रभूच्या पदास प्राप्त झाला. पुढें दंडकारण्यांत राहणारे सर्व मुनिजन रामचंद्राचें दर्शन घेण्यासाठीं त्या शरभंगाच्या आश्रमीं येऊन पोंचले. ॥ १२ ॥ सीता, राम

दग्ध्वा स्वदेहं गच्छामि ब्रह्मलोकमकल्मषः ॥ ९ ॥ अयोध्याधिपतिर्मेऽस्तु हृदये राघवः सदा ॥ यद्वामांके स्थिता सीता मेघस्येव तडिल्लता ॥ १० ॥ इति रामं चिरं ध्यात्वा दृष्ट्वा च पुरतः स्थितम् ॥ प्रज्वाल्य सहसा वह्निं दग्ध्वा पञ्चात्मकं वपुः ॥ ११ ॥ दिव्यदेहधरः साक्षाद्ययौ लोकपतेः पदम् ॥ ततो मुनिगणाः सर्वे दण्डकारण्यवासिनः ॥ आजग्मू राघवं द्रष्टुं शरभंगनिवेशनम् ॥ १२ ॥ दृष्ट्वा मुनिसमूहं तं जानकीरामलक्ष्मणाः ॥

अकल्मषः [अहं] स्वदेहं दग्ध्वा ब्रह्मलोकं गच्छामि. ॥ ९ ॥ (पू.) मे हृदये अस्तु, ॥ (मू.) इव स्थिता.' ॥ १० ॥ (पू.), दृष्ट्वा, ॥ सहसा वन्हि (मू.) दग्ध्वा, ॥ ११ ॥ (पू.) ययौ. ॥ (द्वि. अ.) मुनिगणाः ॥ (मू.) आजग्मुः. ॥ १२ ॥ मायामानुषरूपिणः जानकीरामलक्ष्मणाः तं मुनिसमूहं (मू.) ॥

---

१ जाळून. २ विद्युल्लता. ३ पेटवून. ४ पांच भूतें (पृथ्वी, उदक, तेज, वायु, आकाश) हींच ज्याचें स्वरूप, अशा. ५ शरीराला. ६ शरभंगाच्या आश्रमास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुनि स्तुति करितात.

आणि लक्ष्मण ह्यांनीं मायेनें मनुष्यांचीं रूपें धारण केलीं होतीं; त्यांनीं त्या मुनींच्या समुदायास अवलोकन करून तत्काल भूमीवर नमस्कार केले. ॥१३॥ रामचंद्र सर्व प्राण्यांच्या अंतरीं वास करितो; त्यानें भक्तांचीं दुःखें हरण करण्यासाठीं सध्यां धनुष्यबाण हातीं घेतले होते. मुनींनीं त्याला आशीर्वाद देऊन गौरविलें व हात जोडून ह्मटलें :— ॥ १४ ॥ 'रामचंद्रा, ब्रह्मदेवानें भूमीचा भार दूर करण्यासाठीं प्रार्थना केली ह्मणून तूं येथें अवतार घेतलास. आह्मी जाणतों कीं, तूं प्रत्यक्ष विष्णु, जानकी लक्ष्मी, तसाच लक्ष्मण ॥ १५ ॥ शेषाचा अंश, व भरत आणि शत्रुघ्न दोघे शंखचक्रांचे अवतार होत. ह्मणून आतां आगोदर तूं ऋषींची दुःखापासून मुक्तता करावीस. ॥ १६ ॥ रामचंद्रा, लक्ष्मण आणि सीता ह्यांना घेऊन आह्मांबरोबर चल. मुनि

प्रणेमुः सहसा भूमौ मायामानुषरूपिणः ॥ १३ ॥ आशीर्भिरभिनन्द्याथ रामं सर्वेहृदिस्थितम् ॥ ऊचुः प्राञ्जलयः सर्वे धनुर्बाणधरं हरिम् ॥१४॥ भूमेर्भारावताराय जातो ऽसि ब्रह्मणा ऽर्थितः ॥ जानीमस्त्वां हरिं लक्ष्मीं जानकीं[1] लक्ष्मणं तथा ॥ १५ ॥ शेषांशं शंखचक्रे द्वे भरतं सानुजं तथा ॥ अतश्चादौ ऋषीणां त्वं दुःखं मोक्तुं[2]मिहार्हसि॥१६॥आगच्छ यामो मुनिसेवितानि वनानि सर्वाणि रघूत्तम क्रमात्॥

(बा.मू.) प्रणेमुः. ॥१३॥ अथ सर्वे प्राञ्जलयः [सन्तः] (मू.) रामं आशीर्भिः अभिनन्द्य ऊचुः — ॥ १४ ॥ 'त्वं (पू.) [सन] जातः असि; ॥ (१५ उ. १६ पू.) जानीमः ॥ (मू.). ॥१५॥१६॥ रघूत्तम, सुमित्रासुतजानकीभ्यां [सह] (पू.) वनानि क्रमात् द्रष्टुं यामः.

१ जाणतों. २ मोक्तुं सोढविण्यास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्या ठिकाणीं राहतात तीं सर्व आश्रमस्थलें आपण क्रमाक्रमानें पाहण्यास जाऊं. तीं पाहिलींस ह्मणजे तुझें आह्मांवरील प्रेम दृढ होईल.' ॥ १७ ॥ अशा प्रकारें ऋषींनीं हात जोडून रामचंद्राची प्रार्थना केली; तेव्हां तो सर्वव्यापी ईश्वर मुनींचीं वनें पाहण्याकरितां त्या ऋषींबरोबर गेला. ॥ १८ ॥ त्याठिकाणीं चोहोंकडे पडलेल्या अनेक मस्तकांच्या कंवट्या (हाडें) रामाच्या दृष्टीस पडल्या. तेव्हां त्यानें ऋषींना विचारिलें :– ॥ १९ ॥ 'मुनिहो! हीं हाडें कोणाचीं व येथें कां पडलीं आहेत?' मुनींनीं त्याला सांगितलें :–' रामा! हीं ऋषींचीं मस्तकें! ॥ २० ॥ ईश्वरा! - जोंपर्यंत ऋषि समाधि लावून बसले असतील तोंपर्यंत ईश्वररूप बनलेले

द्रष्टुं सुमित्रासुतजानकीभ्यां तदा दया[१]ऽस्मासु दृढा भविष्यति ॥ १७ ॥ इति विज्ञापितो रामः कृताञ्जलिपुटै[२]र्विभुः ॥ जगाम मुनिभिः सार्धं द्रष्टुं मुनिवनानि सः ॥ १८ ॥ ददर्श तत्र पतितान्यनेकानि शिरांसि सः ॥ अस्थिभूतानि सर्वत्र रामो वचनमब्रवीत् ॥ १९ ॥ अस्थीनि केषामेतानि किमर्थं पतितानि वै ॥ तमूचुर्मुनयो राम ऋषीणां मस्तकानि हि ॥ २० ॥ राक्षसैर्भक्षितानीश प्रमत्तानां समाधितः ॥ अन्तरा[४]यं मुनीनां ते पश्यन्तो[५]ऽनुचरन्ति हि ॥ २१ ॥

(बा. मू.). ' ॥ १७ ॥ इति विज्ञापितः विभुः सः रामः (मू.) द्रष्टुं जगाम. ॥ १८ ॥ तत्र सः रामः अस्थिभूतानि सर्वत्र (पू.) ददर्श, (मू.) – ॥ १९ ॥ ' एतानि (पू.) ? ' ॥ मुनयः तं ऊचुः – (२० उ. २१ पू.), हि ते समाधितः [३]प्रमत्तानां मुनीनां (मू.) ! ' ॥ २० ॥ २१ ॥

१ आह्मांवर. २ केले अंजलिपुट ज्यांनीं, अशा. ३ भ्रष्ट झालेल्या. ४ विघ्नाप्रत. ५ मागून फिरतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असतात; ह्मणून त्या वेळीं त्यांच्यापुढें राक्षसांचें कांहीं चालत नाहीं. पण - त्यांनीं आपला समाधि उतरला कीं, राक्षस त्यांना खाऊन टाकितात; - अशा प्रकारें राक्षसांनीं आजपर्यंत अनेक ऋषि खाल्ले, - त्यांचीं हीं हाडें पडलीं आहेत ' येथें राक्षस, ऋषींच्या कर्मानुष्ठानांत व्यंग पडत आहे कोठें, अशी वाट पाहत एकसारखे त्यांच्या आसपास घिरट्या घालीत असतात ! ' ॥ २१ ॥ मुनींच्या भाषणावरून त्यांचें भय आणि दैन्य - उघड होत - होतें. तें ऐकिल्याबरोबर रामानें सर्व राक्षसांचा वध करण्याबद्दल प्रतिज्ञा केली. ॥ २२ ॥ पुढें, सीता आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान राम त्या ठिकाणीं कित्येक वर्षें राहिला. वनांत राहणारे मुनि त्याची नित्य पूजा करीत. प्रभु रामचंद्रानें क्रमाक्रमानें तेथील सर्व ऋषींचे आश्रम पाहिले. ॥ २३ ॥ २४ ॥ पुढें, तो सुतीक्ष्ण मुनींच्या आश्रमास गेला. ह्या सुप्रसिद्ध आश्रमांत ऋषींचा मोठा समुदाय होता. त्या स्थलीं

श्रुत्वा वाक्यं मुनीनां स भयदैन्यसमन्वितम् ॥ प्रतिज्ञामकरोद्रामो वधायाशेषरक्षसाम् ॥ २२ ॥ पूज्यमानः सदा तत्र मुनिभिर्वनवासिभिः ॥ जानक्या सहितो रामो लक्ष्मणेन समन्वितः ॥ २३ ॥ उवास कतिचित्तत्र वर्षाणि रघुनन्दनः ॥ एवं क्रमेण संपश्यन्नृषीणामाश्रमान्विभुः ॥ २४ ॥ सुतीक्ष्णस्याश्रमं प्रागात्प्रख्यातमृषिसंकुलम् ॥

सः रामः (पू.) वाक्यं श्रुत्वा, अशेषरक्षसां वधाय (मू.). ॥ २२ ॥ वनवासिभिः मुनिभिः तत्र सदा (मू.) ॥ २३ ॥ रघुनन्दनः तत्र (पू.) उवास. ॥ विभुः (उ.) संपश्यन [सन्] ॥ २४ ॥ (वा.पू.)

१ सगळ्या राक्षसांच्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्व ऋतूंतील - फळें फुलें वगैरे वेगवेगळे - गुण नेहमीं असत; ह्मणून प्राण्यांना तेथें सर्वकाल सुख प्राप्त होत असे. ॥ २५ ॥ राम आला, असें ऐकतांच सुतीक्ष्ण मुनि स्वतां सामोरा आला. हा मुनि अगस्त्यऋषींचा शिष्य असून राममंत्राची उपासना करण्यांत नित्य तत्पर असे. त्यानें रामाची यथाविधि पूजा केली. भक्तीमुळें त्याचे नेत्र इतके उत्कंठित झाले होते - कीं, रामाकडे कितीही वेळ पाहिलें तरी त्याला पुरे वाटेना. - ॥ २६ ॥ सुतीक्ष्ण रामाला ह्मणाला :– ' हे सीतापते, तुझ्या गुणांचा अंत नाहीं; तुझ्या स्वरूपाला देशानें किंवा कालानेंही मर्यादा नाहीं (तुझें स्वरूप अमुक देशांत किंवा अमुक कालपर्यंत असतें असें नाहीं; तें सर्वव्यापी व नित्य आहे.); शंकर आणि ब्रह्मदेव तुझ्या चरणाचा आश्रय करितात; तुझे चरण हीच संसार-

सर्वर्तुगुणसंपन्नं सर्वकालसुखावहम् ॥ २५ ॥ राममागतमाकर्ण्य सुतीक्ष्णः स्वयमागतः ॥ अगस्त्यशिष्यो रामस्य मन्त्रोपासनतत्परः ॥ विधिवत्पूजयामास भक्त्युत्कण्ठितलोचनः ॥ २६ ॥सुतीक्ष्ण उवाच ॥ त्वन्मन्त्रजाप्यहमनन्तगुणाप्रमेयं सीतापते शिवविरिञ्चिसमाश्रितांघ्रे ॥ संसारसिन्धुतरणामलपोतपाद रामाभिराम सततं तव दासदासः ॥ २७ ॥

(बा. मू.) सुतीक्ष्णस्य आश्रमं प्रागात. ॥ २५ ॥ (मू.) सुतीक्ष्णः विधिवत् पूजयामास. ॥ २६ ॥ मु० उ०– ' (मू.), त्वन्मन्त्रजापी अहं सततं तव दासदासः [अस्मि.] ॥ २७ ॥

१ तुझा नाममंत्र जपणारा. २ ज्याच्या गुणांचा अंत नाहीं, अशा. ३ ज्याच्या स्वरूपाला इयत्ता नाहीं, अशा. ४ संसाररूपी समुद्र तरून जाण्यास निर्दोष नौकारूप आहेत चरण ज्याचे अशा. ५ अभिराम मनोहरा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'मजवर कृपा केलीस.'

रूपी समुद्र तरून जाण्याला साधन उत्तम नौका होय. तूं भक्त जनांना सर्वतोपरी आनंद देतोस. रामचंद्रा, मी तुझ्या नाममंत्राचा जप करीत असतां व इतउत्तरही नेहमीं तुझ्या भक्तांचा दास होऊन राहीन. ॥२७॥ रामा, मी तुझ्या मायेच्यायोगानें पुत्र, स्त्री, गृह ह्या अज्ञानमय कूपामध्यें बुडून गेलों आहें; हे शरीर केवळ मळाचा एक सुरेखसा गोळा होय, पण ह्याच्या मोहपाशांत माझें मन गुरफाटून गेलें आहे. देवा, तुझ्या स्वरूपाचें ज्ञान किंवा दर्शन सगळ्या भुवनांत कोणाला होत नाहीं; पण तोच तूं, माझी अशी स्थिति पाहून, स्वतां मजकडे आलास. - ह्यामुळें मी कृतार्थ झालों ! - ॥ २८ ॥ तूं सर्व प्राण्यांच्या हृदयांत वास करितोस, - अर्थात सर्वांना जवळच आहेस खरा; - पण जे लोक तुझ्या मंत्राचा जप करण्यांत विमुख असतील त्यांच्यावर तूं आपलें मायाजाल पसरितोस. तुझ्या मंत्राचें साधन करण्यांत जे तत्पर असतील त्यांच्यापासून माया दूर

मामद्य सर्वजगतामविगोचरस्त्वं त्वन्मायया सुतकलत्रगृहान्धकूपे ॥ मग्नं निरीक्ष्य मलपुद्गलपिण्डमोहपाशानुबद्धहृदयं स्वयमागतोऽसि ॥ २८॥ त्वं सर्वभूतहृदयेषु कृतालयोऽपि त्वन्मन्त्रजाप्यविमुखेषु तनोषि मायाम् ॥ त्वन्मन्त्रसाधनपरेष्वपयाति माया सेवानुरूपफलदोऽसि यथा महीपः ॥ २९ ॥

(मू.) मां निरीक्ष्य स्वयं आगतः असि. ! ॥ २८ ॥ (पू.) तनोषि. ॥ माया (मू.) [तथा] सेवानुरूपफलदः असि. ॥ २९ ॥

१ पुत्र, स्त्रिया, गृह ह्या अंधाऱ्या विहिरींत. २ बुडालेल्या. ३ मलरूपी सुंदर गोळ्याच्या (शरीराच्या) मोहपाशानें ज्याचें मन बांधून गेलें, अशा. ४ पाहून. ५ राजा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होते. ज्याप्रमाणें राजा आपल्या सेवकांना त्यांनीं केलेल्या सेवेच्या महत्त्वाप्रमाणें लहान मोठें वेतन किंवा देणगी देतो, त्याप्रमाणें तूंही भक्तांना त्यांनीं केलेल्या सेवेला अनुरूप असें फळ देतोस. ॥ २९ ॥ जगाची उत्पत्ति, पालन व संहार होण्याला कारण एक तूंच आहेस. ईश्वरा, तूंच आपल्या त्रिगुणात्मक मायेच्या योगानें ब्रह्मा, शंकर व विष्णु ह्या रूपांनीं भासत असतोस. ज्याप्रमाणें सूर्य मूळचा एकच असतांना उदकाच्या अनेक भांड्यांत - प्रतिबिंबित झाला ह्मणजे - विविध रूपांचा दिसतो, त्याप्रमाणें तुझ्या मायेनें ज्यांच्या बुद्धींना मोह पडलेला असतो त्यांना तुझीं रूपें वेगवेगळीं दिसतात. ॥ ३० ॥ रामचंद्रा, तूं शुद्धसत्त्वगुणप्रधान चित्तांमध्यें वास्तव्य करितोस. आज तुझ्या चरणकमलाचें दर्शन मला घडलें, - ह्मणून मी धन्य झालों. - असत् जनांना तुझें स्वरूप कळत नाहीं; पण ज्यांचीं अंतःकरणें तुझ्या मंत्राच्या जपानें पवित्र झालीं असतात, त्यांच्या अंतरीं तूं सर्वकाळ प्रसन्न आहेस व त्यांना नित्य दर्शन देतोस. ॥ ३१ ॥

विश्वस्य सृष्टिलयसंस्थितिहेतुरेकस्त्वं मायया त्रिगुणया विधि[1]रीशविष्णू ॥ भासी[2]-
श मोहितधियां विविधाकृतिस्त्वं यद्वद्रविः सलिलपात्रगतो ह्यनेकः ॥ ३० ॥
प्रत्यक्षतोऽद्य भवतश्चरणारविन्दं पश्यामि राम तमसः परतः स्थितस्य ॥ दृग्[4]रूप-
तस्त्वमसतामविगो[5]चरोऽपि त्वन्मन्त्रपूतहृ[6]दयेषु सदा प्रसन्नः ॥ ३१ ॥

त्रिगुणया मायया (पू.) ॥ भासि; ईश, स[3]लिलपात्रगतः रविः अनेकः यद्वत्, [तथा] त्वं (मू.) [भासि.]. ॥ ३० ॥ राम, (पू.) भवतः चरणारविन्दं पश्यामि. ॥ (मू.) [असि]. ॥ ३१ ॥

१ ब्रह्मदेव. २ भासतोस. ३ उदकाच्या भांड्यांत असलेला. ४ दृष्टीला. ५ न समजणारा. ६ तुझ्या मंत्रानें पवित्र झालेल्या हृदयांत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामाचें सध्याचें स्वरूप.

रामा, वास्तविक ह्मटलें तर तुला रूप नाहीं; पण मायेच्यायोगानें व्यवहार करण्यासाठीं तूं जें हें रूप घेतलेंस त्या ह्याचें मला दर्शन मिळालें. हें स्वरूप कोटि मदनांपेक्षां रमणीय आहे; हातांमध्यें सुंदर धनुष्यबाण असून अंतःकरण दयार्द्र आहे; ह्या मूर्तीचें मुख हास्याच्यायोगानें सुशोभित दिसतें. ॥ ३२ ॥ हे सीतारामा, तूं, सध्यां शरीरावर कृष्णाजिन हेंच वस्त्र घेतलें आहेस; तुला कोणाच्यानेंही भीति दाखववत नाहीं; लक्ष्मण तुझ्या चरणकमलाची नित्य सेवा करितो; तुझी अंगकांति नीलवर्ण कमलाप्रमाणें आहे; आंगांत अनंत गुण भरले असूनही पुन्हां तूं अत्यंत गंभीर दिसतोस. माझ्या भाग्यामुळेंच तूं हा अवतार घेतलास (अशा स्वरूपाचें दर्शन मिळणें माझ्या भाग्यांत होतें ह्मणून तुला हा अवतार घ्यावा लागला). रामा, तुला मी नित्य

पश्यामि राम तव रूपमरूपिणो[1]ऽपि मायाविडम्बनकृतं सुमनुष्यवेषम् ॥ कन्दर्पकोटि[2]सुभगं कमनीय[3]चापबाणं दयार्द्रहृदयं स्मितचारु[4]वक्त्रम् ॥ ३२ ॥ सीतासमेतमजिनाम्बर[5]मप्रधृष्यं[6] सौमित्रिणा नियत[7]सेवितपादपद्मम् ॥ नीलोत्पल[8]द्युतिमनन्तगुणं प्रशान्तं मद्भागधेय[9]मनिशं प्रणमामि रामम् ॥ ३३ ॥

राम, अरूपिणोपि तव (मू.) रूपं पश्यामि. ॥ ३२ ॥ (मू.) अनिशं प्रणमामि. ॥ ३३ ॥

---

१ ज्याला रूप नाहीं अशा. २ कोटि मदनांप्रमाणें सुंदर, अशा. ३ सुंदर आहेत धनुष्य आणि बाण ज्याचे, अशा. ४ हास्यानें सुंदर आहे मुख ज्याचें, अशा. ५ चर्म हेंच ज्याचें वस्त्र, अशा. ६ कोणालाही न भिणाऱ्या. ७ नित्य सेविलें चरणकमल ज्याचें, अशा. ८ निळ्या कमळाप्रमाणें कांति ज्याची, अशा. ९ माझें मूर्तिमान् भाग्य, अशा.

॥ ११ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रणाम करितों. ॥ ३३ ॥ रामा, देश, काल इत्यादि उपाधींनीं रहित व पूर्ण[1] ज्ञानज्योतिरूप अशा तुझ्या स्वरूपाचें ज्ञान ज्यांना होत असेल त्यांना खुशाल होवो. - स्वतां मला, जर ह्मणशील, तर असें वाटत आहे कीं, - आज प्रत्यक्ष पुढें जें हें स्वरूप दिसत आहे, तेंच माझ्या ह्रदयांत निरंतर असो, ह्मणजे झालें. ह्याशिवाय दुसऱ्या कशाचीही मला इच्छा नाहीं.' ॥ ३४ ॥ त्यानें अशा प्रकारें स्तुति केली असतां राम हांसत हांसत त्याला ह्मणाला :– ' मुने, तुझें अंतःकरण माझ्या उपासनेनें निर्मळ झालें आहे, हें मी जाणतों. ॥३५॥ आणि ह्मणूनच मी तुझ्या भेटीस आलों. माझ्या भक्तीशिवाय दुसरा तरणोपाय कोणताही नाहीं. जगामध्यें जे लोक माझी उपासना करितात, ॥ ३६ ॥ व सर्व इच्छा सोडून एकनिष्ठपणें वागतात, त्यांना प्रतिदिनीं

जानन्तु राम तव रूपमशेषदेशकालाद्युपाधिरहितं घनचित्प्रकाशम्[1] ॥ प्रत्यक्षतोऽद्य मम गोचरमेतदेव रूपं विभातु ह्रदये न परं विकांक्षे[2]॥३४॥ इत्येवं स्तुवतस्तस्य रामः सस्मितमब्रवीत् ॥ मुने जानामि ते चित्तं निर्मलं मदुपासनात् ॥ ३५ ॥ अतोऽहमागतो द्रष्टुं मद्भते नान्यसाधनम् ॥ मन्मन्त्रोपासका लोके मामेव शरणं गताः ॥ ३६ ॥ निरपेक्षा[3] नान्यगतास्[4]तेषां दृश्योऽहमन्वहम् ॥

राम, [अन्ये] (पू.) जानन्तु; ॥ (मू.) विभातु; परं न विकांक्षे. ' ॥ ३४ ॥ (पू.) – ' (मू.) निर्मलं जानामि. ॥ ३५ ॥ अतः अहं द्रष्टुं आगतः. (मू.). ॥ ३६ ॥ ये (पू.) दृश्यः. ॥

१ पूर्ण ज्ञानप्रकाशरूपी. २ इच्छितों. ३ निरिच्छ. ४ दुसऱ्याकडे न गेलेले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

माझें दर्शन मिळतें. तूं केलेली ही स्तुति मला प्रिय आहे. जो मनुष्य नित्य ह्या स्तोत्राचा पाठ करील, ॥ ३७ ॥ त्याची मजवर भक्ति जडेल व त्याला निर्मल ज्ञान प्राप्त होईल. तूं माझी उपासना केल्यामुळें आतांच सर्व क्रियांपासून मुक्त आहेस. ॥ ३८ ॥ तुला देहांतीं माझ्या स्वरूपीं ऐक्य प्राप्त होईल ह्यांत संदेह नाहीं. सुतीक्ष्णा, तुझा गुरु मुनिश्रेष्ठ जो अगस्त्य त्याचें दर्शन घ्यावें अशी मला इच्छा झाली आहे; माझें मन तेथेंच कांहीं दिवस राहायाला जावें, अशाबद्दल त्वरा करितें. ' ॥ ३९ ॥ सुतीक्ष्ण मुनिही ह्मणाला :–'रामा, ठीक आहे. उद्यां आपण तिकडे जावें. महामुनींचें दर्शन घेतल्याला फार दिवस झाले ह्मणून मीही पण आपल्याबरोबर येईन. ॥ ४० ॥

स्तोत्रमेतत्पठेद्यस्तु त्वत्कृतं मत्प्रियं सदा ॥ ३७ ॥ सद्भक्तिर्मे भवेत्तस्य ज्ञानं च विमलं भवेत् ॥ त्वं ममोपासनादेव विमुक्तोऽसीह सर्वतः ॥ ३८ ॥ देहान्ते मम सायुज्यं लप्स्यसे[1] नात्र संशयः ॥ गुरुं ते द्रष्टुमिच्छामि ह्यगस्त्यं मुनिनायकम् ॥ किंचित्कालं तत्र वस्तुं मनो मे त्वरयत्यलम्[2] ॥ ३९ ॥ सुतीक्ष्णोऽपि तथेत्याह श्वो गमिष्यसि राघव ॥ अहमप्यागमिष्यामि चिरदृष्टो महामुनिः ॥ ४० ॥

यः त्वत्कृतं सदा मत्प्रियं एतत् (मू.), ॥ ३७ ॥ तस्य, मे सद्भक्तिः, विमलं (पू.). ॥ (मू.) विमुक्तः असि, ॥ ३८ ॥ (पू.) ॥ (द्वि. मू.) ते गुरुं द्रष्टुं इच्छामि. ॥ मे मनः (मू.) त्वरयति.' ॥ ३९ ॥ (पू.) – ' राघव, श्वः गमिष्यसि; ॥ (मू.) चिरदृष्टः. ॥ ४० ॥

१ पावशील. २ त्वरा करितें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- शंकर ह्मणाले :—पार्वति, - रामाचें अंतःकरण अगस्त्यमुनींशीं संभाषण करण्याविषयीं फार उत्सुक झालें होतें. नंतर, दुसरे दिवशीं सकाळीं सुतीक्ष्ण मुनि, सीता आणि लक्ष्मण ह्यांना बरोबर घेऊन रामचंद्र निघाला तो हळूहळू, ज्या ठिकाणीं अगस्त्यमुनींचा कनिष्ठ बंधु राहत असे, त्या आश्रमांत येऊन पोंचला. ॥ ४१ ॥

इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे अरण्यकाण्डे द्वितीयः सर्गः ॥ २ ॥

- शंकर ह्मणाले :—पार्वति, - सुतीक्ष्ण मुनि, जानकी आणि लक्ष्मण ह्यांसह रामचंद्र अगस्त्याच्या बंधूच्या आश्रमांत मध्यान्ह काळीं येऊन पोंचला. ॥ १ ॥ त्यामुनीनें रामाची पूजा केली व रामानेंही उत्तम उत्तम मुळें फळें वगैरे भक्षिलीं. दुसरे दिवशीं सकाळीं उठून सर्वजण अगस्त्याच्या आश्रमास आले. ॥ २ ॥ तें स्थल

अथ प्रभाते मुनिना समेतो रामः ससीतः सह लक्ष्मणेन ॥ अगस्त्यसंभाषणलोलमानसः शनैरगस्त्यानुजमन्दिरं ययौ ॥ ४१ ॥ इति श्रीम० रा० उ० अरण्यकाण्डे द्वितीयः सर्गः ॥ २ ॥ अथ रामः सुतीक्ष्णेन जानक्या लक्ष्मणेन च ॥ अगस्त्यस्यानुजस्थानं मध्याह्ने समपद्यत ॥ १ ॥ तेन संपूजितः सम्यग्भुक्त्वा मूलफलादिकम् ॥ परेद्युः प्रातरुत्थाय जग्मुस्तेऽगस्त्यमण्डलम् ॥ २ ॥ सर्वर्तुफलपुष्पाढ्यं नानामृगगणैर्युतम् ॥ पक्षिसंघैश्च विविधैर्नादितं नन्दनोपमम् ॥ ३ ॥

(मू.) रामः लक्ष्मणेन सह (बा. मू.). ॥ ४१ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये अरण्यकांडे द्वितीयः सर्गः ॥२॥ (मू.). ॥१॥ (पू.) भुक्त्वा ॥ (बा.२।३।४मू.) ब्रह्मलोकं इव अगस्त्यमंडलं जग्मुः.

---

१ पोंचला. २ पक्ष्यांच्या समुदायांनीं. ३ नंदन वनासारख्या. ४ गेले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्व ऋतूंत फळांनीं व फुलांनीं भरलेलें असे; तेथें अनेक जातींच्या पशूंचे समुदाय होते व विविध पक्ष्यांचे थवे एकसारखे शब्द करीत असत; त्या वनाला इंद्राच्या नंदनवनाची उपमा बरोबर साजे. ॥ ३ ॥ तेथें पुष्कळ ब्रह्मर्षि व देवर्षि राहत असत. मधून मधून ऋषींचे आश्रम असल्यामुळें तो प्रदेश सर्व बाजूंनीं सुशोभित दिसे. - पाहणाराला असा भास होई कीं, - हा दुसरा ब्रह्मलोकच असावा. ॥ ४ ॥ रामचंद्र आश्रमाच्या बाहेरच उभा राहून सुतीक्ष्णमुनीला ह्मणाला:–‘ सुतीक्ष्णा, तूं लवकर जा आणि अगस्त्य मुनिवर्यांना सांग कीं, लक्ष्मण आणि सीता ह्यांसह राम आला आहे. ’ ॥ ५ ॥ ‘ ही आज्ञा ह्मणजे मजवर अनुग्रहच होय.’ असें ह्मणून सुतीक्ष्ण मुनि त्वरेनें गुरूच्या आश्रमीं गेला. त्या ठिकाणीं ऋषींच्या समुदायानें वेष्टिलेले ॥ ६ ॥ अगस्त्य मुनि बसले होते. त्यांच्या सहवासाला विशेषतः

ब्रह्मर्षिभिर्देवर्षिभिः सेवितं मुनिमन्दिरैः[1] ॥सर्वतो ऽलंकृतं साक्षाद्ब्रह्मलोकमिवाप-
रम् ॥ ४ ॥ बहिरेवाश्रमस्याथ स्थित्वा रामो ऽब्रवीन्मुनिम् ॥ सुतीक्ष्ण गच्छ त्वं
शीघ्रमागतं मां निवेदय ॥ अगस्त्यमुनिवर्याय सीतया लक्ष्मणेन च ॥ ५ ॥ महाप्र-
साद इत्युक्त्वा सुतीक्ष्णः प्रययौ गुरोः ॥ आश्रमं त्वरया तत्र ऋषिसंघसमावृतम्[3] ॥
॥ ६ ॥ उपविष्टं रामभक्तैर्विशेषेण समायुतम् ॥

॥ २ ॥ ३ ॥ ४ ॥ अथ रामः आश्रमस्य (मू.) अब्रवीत् – ॥ ‘ (द्वि. अ.) सीतया लक्ष्मणेन च [सह] आगतं मां (मू.) निवेदय. ॥ ५ ॥ (मू.) गुरोः आश्रमं प्रययौ; ॥ ६ ॥ (पू.) ॥

१ मुनींच्या आश्रमांनीं. २ कळव. ३ ऋषींच्या समूहानें वेष्टिलेल्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामभक्त फार असत. ह्या वेळीं ते आपल्या शिष्यांना अत्यंत भक्तिपूर्वक राममंत्राचा स्पष्ट अर्थ सांगत होते. ॥ ७ ॥ ते श्रेष्ठ मुनि अगस्त्य दृष्टीस पडतांच महाबुद्धिमान सुतीक्ष्ण त्यांच्याजवळ गेला व साष्टांग नमस्कार घालून नम्रपणें त्यांना ह्मणालाः– ॥ ८ ॥ ‘ अहो ब्रह्मनिष्ठ महाराज, दशरथाचा पुत्र रामचंद्र सीता आणि लक्ष्मण या दोघांसह आपल्या दर्शनाकरितां आला असून बाहेर हात जोडून उभा आहे.’ ॥ ९ ॥ अगस्त्य ह्मणाले:–‘ सुतीक्ष्णा, - मोठ्या आनंदाची वार्ता सांगितलीस. - तुझें कल्याण असो. जा, त्याला लवकर घेऊन ये. राम माझ्या हृदयांत नित्य वसत आहे. मी त्याचें प्रत्यक्ष दर्शन मिळावें अशी इच्छा धरून त्याचें ध्यान करीत येथें राहिलों आहें.’ ॥ १० ॥ असें बोलून अगस्त्य मुनि स्वतां

व्याख्यातराममंत्रार्थ[1] शिष्येभ्यश्चातिभक्तितः ॥७॥ दृष्ट्वाऽगस्त्यं मुनिश्रेष्ठं सुतीक्ष्णः प्रययौ मुनेः ॥ दण्डवत्प्रणिपत्याह विनयावनतः सुधीः ॥८॥ रामो दाशरथिर्ब्रह्मन् सीतया लक्ष्मणेन च॥ आगतो दर्शनार्थं ते बहिस्तिष्ठति साञ्जलिः॥ ९॥ अगस्त्य उवाच ॥ शीघ्रमानय भद्रं ते रामं मम हृदि स्थितम् ॥ तमेव ध्यायमानोऽहं कांक्षमाणो[2]ऽत्र संस्थितः॥ १०॥ इत्युक्त्वा स्वयमुत्थाय मुनिभिः सहितो मुनिः॥

अतिभक्तितः शिष्येभ्यः (मू.) ॥ ७ ॥ मुनिश्रेष्ठं अगस्त्यं (पू.) [समीपं] प्रययौ. ॥ सुधीः [सः] (मू.)[सन्] प्राह - ॥८॥ ‘ब्रह्मन, दाशरथिः (पू.) [सह] ॥ ते दर्शनार्थं आगतः; साञ्जलिः (मू.).’ ॥ ९ ॥ अ० उ० – ‘ ते भद्रं; (पू.) रामं, शीघ्रं आनय. ॥ अहं (मू.).’ ॥ १० ॥ (पू.) ॥

१ सांगितला राममंत्राचा अर्थ ज्यानें अशा. २ इच्छिणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अगस्त्य रामाला भेटतात.

उठले व मुनींना बरोबर घेऊन परम भक्तीनें रामाला सामोरे आले. जवळ पोंचल्यावर ते त्याला ह्मणाले:-- ॥११॥ 'रामा, आलास, - फार चांगलें झालें. - तुझें कल्याण असो. तुझा समागम घडला, तेंव्हां आजचा दिवस मोठ्या आनंदाचा ! माझा प्रिय अतिथि (पाहुणा) घरीं आला, त्या अर्थीं आजचा माझा दिवस सफळ झाला.' ॥ १२ ॥ अगस्त्यमुनि सामोरे आले, असें पाहिल्यावर रामाचाही आनंद गगनांत माईना. त्यानें सीता आणि लक्ष्मण ह्यांसह धरणीवर लोटांगण घातलें. ॥ १३ ॥ त्या श्रेष्ठ मुनीनीं तत्काळ रामाला उठवून प्रेमानें दृढ आलिंगन दिलें. त्याच्या शरीराचा स्पर्श झाल्याबरोबर मुनींला आनंद होऊन त्यांच्या नेत्रांतून एकसारखे अश्रु वाहूं लागले. ॥ १४ ॥ ते श्रेष्ठ मुनि एका हातानें रामाचा हात धरून - त्याला घेऊन - आपल्या आश्रमांत गेले. त्यांच्या मनाला ह्या वेळीं पराकाष्ठेचा आनंद झाला होता. ॥ १५ ॥

अभ्यं[1]यात्परया भक्त्या गत्वा राममथाब्रवीत्॥ ११ ॥ आगच्छ राम भद्रं ते दिष्ट्या तेऽद्य समागमः ॥ प्रियातिथिर्मम प्राप्तो ऽस्त्यद्य मे सफलं दिनम्॥ १२ ॥ रामोऽपि मुनिमायान्तं दृष्ट्वा हर्षसमाकुलः॥ सीतया लक्ष्मणेनापि दण्डवत्पतितो भुवि॥ १३ ॥ द्रुतमुत्थाप्य मुनिराड्राममालिंग्य भक्तितः॥ त[2]द्गात्रस्पर्शजाल्हादस्रवन्नेत्रजलाकुलः॥ १४ ॥ गृहीत्वा करमेकेन करेण रघुनन्दनम्॥जगाम स्वाश्रमं हृष्टो मनसा मुनिपुंगवः॥ १५॥

(मू.) – ॥ ११ ॥ ' राम, (मू.).' ॥ १२ ॥ (मू.) पतितः॥ १३॥ मुनिराट् (मू.) [जातः].॥ १४॥ मनसा हृष्टः मुनिपुंगवः (पू.) करं गृहीत्वा ॥ (मू.) जगाम. ॥ १५ ॥

१ सामोरा गेला. २ त्याच्या शरीराच्या स्पर्शानें उत्पन्न झालेल्या आनंदामुळें पाझरणाऱ्या नेत्रांतील उदकानें व्याकुळ.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामचंद्र स्वस्थपणें बसला असतां अगस्त्यमुनींनीं त्याची षोडशोपचारें पूजा केली व लोकरीतीला अनुसरून वनांतील अनेक प्रकारांच्या भक्ष्य फलांचें त्याला भोजन घातलें. ॥ १६ ॥ पुढें तो पूर्णचंद्रवदन प्रभु एकांतांत सुखानें बसला असतां ज्ञानसंपन्न अगस्त्य ऋषींनीं हात जोडून त्याला असें ह्मटलें :— ॥ १७ ॥ "रामा, तुझ्या येण्याची वाट पाहत मी येथें राहिलों आहें. ज्या वेळीं पूर्वी क्षीरसमुद्रांत ब्रह्मदेवानें भूमीचा भार उतरण्याकरितां रावणाचा वध करण्याबद्दल तुझी प्रार्थना केली, ॥ १८ ॥ तेव्हांपासून, ह्या मुनींसह मी तुझें दर्शन घडावें ह्या इच्छेनें तप करीत राहिलों आहें. रामा, माझें ध्यान सर्वकाळ तुजकडेच लागलेलें असतें. ॥ १९ ॥ सृष्टीच्या पूर्वी तूं एकच होतास. हा त्रिगुणां-

सुखोपविष्टं संपूज्य पूजया बहुविस्तरम् ॥ भोजयित्वा यथान्यायं भोज्यैर्वन्यै[1]रनेकधा ॥ १६ ॥ सुखोपविष्टमेकान्ते रामं शशिनिभानन[2]म् ॥ कृताञ्जलिरुवाचेदमगस्त्यो भगवानृषिः ॥ १७ ॥ त्वदागमनमेवाहं प्रतीक्षन्[3]समवस्थितः ॥ यदा क्षीरसमुद्रान्ते ब्रह्मणा प्रार्थितः पुरा ॥ भूमेर्भारापनुत्त्यर्थं रावणस्य वधाय च ॥१८ ॥ तदादि दर्शनाकांक्षी तव राम तपश्चरन् ॥ वसामि मुनिभिः सार्धं त्वामेव परिचिन्तयन् ॥ १९॥ सृष्टेः प्रागेक एवासीर्निर्विकल्पो[4] ऽनुपाधिकः[5] ॥

(पू.) संपूज्य, ॥ (मू.) भोजयित्वा, ॥ १६ ॥ कृताञ्जलिः भगवान् अगस्त्यः ऋषिः एकान्ते (मू.) रामं इदं उवाच – ॥ १७ ॥ "(पू.) अहं ॥ पुरा (मू.) प्रार्थितः, ॥ १८ ॥ राम, तदादि तव (मू.) [अहं] मुनिभिः सार्धं वसामि. ॥ १९ ॥ (पू.) आसीः. ॥

१ वनांतील फळांनीं. २ चंद्रासारखें मुख ज्याचें, अशा. ३ वाट पाहणारा. ४ प्रपंचरहित. ५ ज्याला उपाधि नाहीं, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जगाचा उत्पत्तिक्रम.

पासून उद्भवणारा प्रपंच त्यावेळीं तुझ्या ठिकाणीं नव्हता; कारण, तूं मायारूप उपाधीनें रहित होतास. तुझ्या शक्तीला माया असें ह्मणतात; - तिचे दोन प्रकार आहेतः एक माया आणि दुसरी अविद्या : जीव हें तरी तुझेंच स्वरूप होय :- त्याच्या ठिकाणीं आश्रयत्वानें राहणारी शक्ति माया व तुझ्याविषयीं जीवाला असणारें अज्ञान ही अविद्या होय. ॥ २० ॥ तुझ्या गुणरहित स्वरूपालाच जेव्हां तीं शक्ति आवृत करिते (तीच, तुझ्याशीं स्वतांचा संबंध आहे, असें मानिते), त्या वेळीं, वेदांत शास्त्रांत निष्णात लोक तिला 'प्रधान' अशी संज्ञा देतात. ॥ २१ ॥ तिलाच कित्येक लोक 'मूल प्रकृति' ह्मणतात, कोणी 'माया,' कोणी 'संसृति,' कोणी 'बंध' अशीं वेगवेगळीं नांवें देतात. ॥ २२ ॥ तूं तिजमध्यें क्षोभ उत्पन्न केलास (तुझ्या काल्पनिक संबंधामुळें तिजमध्यें क्षोभ उत्पन्न झाला) कीं, ती माया 'महत्तत्त्व' प्रसवते. तुजकडून

त्वदाश्रया त्वद्विषया माया ते शक्तिरुच्यते ॥ २० ॥ त्वामेव निर्गुणं शक्तिरावृणोति यदा तदा ॥ अव्याकृतमिति[1] प्राहुर्वेदान्तपरिनिष्ठिताः[2] ॥ २१ ॥ मूलप्रकृतिरित्येके प्राहुर्मायेति केचन॥अविद्या संसृतिर्बन्ध इत्यादि बहुधोच्यते ॥ २२ ॥ त्वया संक्षोभ्यमाणा[3] सा महत्तत्त्वं प्रसूयते[4]॥महत्तत्त्वादहंकारस्त्वया संचोदितादभूत् ॥ २३ ॥

(१ मू.). ॥ २० ॥ वेदांतपरिनिष्ठिताः, यदा शक्तिः निर्गुणं (मू.). ॥ २१ ॥ एके (मू.). ॥ २२ ॥ (पू.); ॥ त्वया संचोदितात् (मू.). ॥ २३ ॥

१ अस्पष्ट (प्रधान) रूपी. २ वेदांतांत निष्णात. ३ चाळविलेली. ४ प्रसवते. ५ प्रेरिलेल्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रेरणा मिळाली ह्मणजे त्या महत्तत्त्वापासून 'अहंकार' उद्भवतो. ॥२३॥ महत्तत्त्वानें युक्त अशा त्या अहंकाराचे तीन प्रकार होतात; त्यांना (१) सात्त्विक, (२) राजस, आणि (३) तामस अशा तीन संज्ञा आहेत.॥२४॥ तामस अहंकारापासून सूक्ष्मभूतें होतात. रामा, त्या सूक्ष्मभूतांपासून पुढें एकापासून एक अशीं स्थूलभूतें होतात. त्यामध्यें उत्तरोत्तर क्रमानें एक एक गुण जास्त असतो. (प्रथम आकाश उत्पन्न होतें; त्याचा गुण शब्द. पुढें स्पर्श सूक्ष्मभूत व आकाश ह्यांपासून वायु उद्भवतो; त्याचा गुण स्पर्श, शिवाय त्याच्या आदिकारणाचा गुण जो शब्द तोही परंपरेनें त्या वायूंत येतो अर्थात वायूचे शब्द आणि स्पर्श हे दोन गुण होतात. वायु आणि रूप सूक्ष्मभूत ह्यांपासून अग्नि होतो; त्याचा गुण रूप, व मागील परंपरासंबंधानें आलेले गुण दोन, एकंदर अग्नीचे गुण शब्द, स्पर्श, रूप, असे तीन. अग्नि व रस सूक्ष्मभूत ह्यांपासून उदक जन्मास येतें; त्याचा गुण रस, मागील संबंधानें आलेले गुण धरिले असतां उदकाचे गुण शब्द, स्पर्श, रूप, रस हे चार. उदक व गंध सूक्ष्म भूत ह्यांपासून पृथ्वी होते; तिचा गुण गंध, शिवाय मागील क्रमाप्रमाणें आलेले गुण चार, एकंदरींत पृथ्वीचे गुण शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध असे पांच). ॥ २५ ॥

अहंकारो महत्तत्त्वसंवृतस्त्रिविधोऽभवत्॥ सात्त्विको राजसश्चैव तामसश्चेति भ-[२]ण्यते ॥ २४ ॥ तामसात्सूक्ष्मतन्मा[३]त्राण्यासन् भूतान्यतः परम् ॥ स्थूलानि क्रमशो राम क्रमोत्तर[४]गुणानि ह ॥ २५ ॥

महत्त[१]त्त्वसंवृतः (मू.). ॥ २४ ॥ राम, (पू.) अतः परं (मू.) भूतानि ॥ २५ ॥

१ महत्तत्वानें संयुक्त. २ ह्मटला जातो. ३ सूक्ष्म भूतें. ४ क्रमानें अधिक आहेत गुण ज्यांत, अशीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्रिविध अहं-
काराचीं कार्यें.

रजोगुणी अहंकारापासून - (१) कर्ण, (२) त्वचा, (३) नेत्र, (४) जिव्हा, (५) घ्राण हीं पांच ज्ञानेंद्रियें व (६) वाणी, (७) हस्त, (८) पाद, (९) गुद, (१०) उपस्थ हीं पांच कर्मेंद्रियें अशीं एकंदर दहा - इंद्रियें उत्पन्न झालीं. सात्त्विक अहंकारापासून - त्या दहा इंद्रियांच्या क्रमानें (१) दिशा, (२) वायु, (३) सूर्य, (४) वरुण, (५) अश्विनीकुमार, (६) अग्नि, (७) इंद्र, (८) विष्णु, (९) मित्र, (१०) प्रजापति, ह्या दहा - देवता आणि मन हीं उत्पन्न झालीं. त्यांपासून क्रियाशक्ति सूत्रात्मा प्राण झाला. हीं सगळीं मिळून हें सर्व कार्यें करणारें समष्टि हिरण्यगर्भरूप लिंगशरीर होय. ॥ २६ ॥ पुढें स्थूल भूतांच्या समूहापासून विराट् उदय पावला. ह्या विराट् रूपापासूनच स्थावर-जंगमात्मक सर्व जग होतें. ॥ २७ ॥ - ज्याप्रमाणें निरनिराळ्या ऋतूंत एकामागूनएक धान्यें उत्पन्न होतात, त्याप्रमाणें - काल आणि कर्म ह्यांच्या संयोगानें क्रमशः देव तिर्यक् (पशुपक्ष्यादि) व मनुष्य इत्यादि योनि

राजसानीन्द्रियाण्येव सात्विकाद्देवता मनः॥ तेभ्यो ऽभवत्सूत्ररूपं[1] लिंगं सर्वगतं[2] महत् ॥२६॥ ततो विराट् समुत्पन्नः स्थूलाद्भूतकदम्बकात्[3] ॥ विराजः पुरुषात्सर्वं जगत्स्थावरजंगमम् ॥ २७ ॥ देवतिर्यङ्मनुष्याश्च[4] कालकर्मक्रमेण तु ॥ त्वं रजोगुणतो ब्रह्मा जगतः सर्वकारणम् ॥ २८ ॥

(मू.) लिंगं अभवत्. ॥ २६ ॥ (पू.) विराट् समुत्पन्नः. ॥ (मू.) जगत्. ॥ २७ ॥ (पू.) [अभवन]. ॥ (मू.) ब्रह्मा; ॥ २८ ॥

१ सूत्रात्मा (प्राण). २ सर्वव्यापक. ३ भूतांच्या समुदायापासून. ४ देव, पशुपक्षी, मनुष्य.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्राण्याला प्राप्त होतात. तूं रजोगुणाचा स्वीकार केलास ह्मणजे सर्व सृष्टीचा उत्पादक ब्रह्मदेव होतोस. ॥ २८ ॥ सत्व गुण अंगीकारून विश्वाचें पालन करूं लागलास ह्मणजे सत्पुरुष तुला विष्णु अशी संज्ञा देतात. जगाच्या प्रलयकालीं तूंच रुद्र होतोस. तुझ्या मायेच्या भिन्न भिन्न (तीन) गुणावरून (त्यांचें कमजास्ती प्रमाणानें मिश्रण झालें असतां) ॥ २९ ॥ बुद्धीच्या निरानिराळ्या वृत्ति होतात; त्या वृत्तींना जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति अशीं नांवें आहेत. रामा, तूं त्या तिन्ही अवस्थांहून विलक्षण (तुरीय) आहेस. तूं त्यांचा साक्षी, ज्ञानरूप व विकाररहित आहेस. ॥ ३० ॥ ज्या वेळीं तुला सृष्टिरूप लीला करावी अशी इच्छा होते, त्यावेळीं तूं मायेच्या काल्पनिक संबंधाचा अंगिकार करितोस - व वास्तविक गुणरहित असूनही - गुणवानासारखा भासतोस. ॥ ३१ ॥ रामा, तुझी माया नेहमीं विद्या आणि अविद्या अशा दोन प्र-

सत्त्वाद्विष्णुस्त्वमेवास्य पालकः सद्भिरुच्यसे॥लये रुद्रस्त्वमेवास्य त्वन्मायागुणभेदतः ॥ २९ ॥ जाग्रत्स्वप्नसुषुप्त्याख्यवृत्तयो बुद्धिजैर्गुणैः ॥ तासां विलक्षणो[2] रामस्त्वं साक्षी चिन्मयो[3] ऽव्ययः[4] ॥ ३० ॥ सृष्टिलीलां यदा कर्तुमीहसे[5] रघुनन्दन ॥ अंगीकरोषि मायां त्वं तदा वै गुणवानिव ॥ ३१ ॥ राम माया द्विधा भाति विद्या ऽविद्येति ते सदा ॥ प्रवृत्तिमार्गनिरता अविद्यावशवर्तिनः[6] ॥

(पू.) ॥ अस्य (मू.) रुद्रः. ॥ २९ ॥ बुद्धिजैः गुणैः (मू.) रामः त्वं. ॥ ३० ॥ रघुनन्दन, यदा (पू.), ॥ तदा त्वं गुणवानिव मायां (मू.) ॥ ३१ ॥ राम, ते (पू.) द्विधा भाति. (मू.). ॥

१ मायेपासून उद्भवणाऱ्या. २ वेगळा, रहित. ३ ज्ञानरूपी. ४ विकाररहित. ५ इच्छा करितोस. ६ अज्ञानाच्या स्वाधीन राहणारे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'तुझे भक्त मुक्त होतात.'

कारांची भासत असते; - अर्थात तीच संसार आणि मोक्ष दोन्ही देऊं शकते. - जे प्राणी प्रवृत्तिमार्गांत (संसारांत) गढून गेलेले असतात, ते अविद्येच्या अधीन आहेत असें समजावें; जे लोक निवृत्तिमार्गांत रमून जाऊन वेदांताच्या अर्थाचा विचार करितात, व ॥ ३२ ॥ तुझी भक्ति करण्यांत निमग्न होऊन होऊन गेलेले असतात, ते विद्यामय (तत्त्वज्ञानी) होत. अविद्येच्या पाशांत पडलेले लोक नित्य संसारीच राहतात : तत्त्वज्ञानाच्या अभ्यासांत गुंतलेले असतील ते जन नित्यमुक्त होत. ॥ ३३ ॥ जगांत तुझी भक्ति करण्यांतच रमलेले व तुझ्या मंत्राची आराधना करणारे जे लोक असतील त्यांनाच तत्त्वज्ञान प्राप्त होतें, इतरांना कधीं होत नाहीं. ॥ ३४ ॥ ह्मणून ज्यांच्या अंतरीं तुजविषयीं भक्ति वसत असेल, ते जन मुक्त होत, ह्यांत संशय नाहीं. जे पुरुष तुझी भक्ति हें अमृत जवळ बाळगीत नाहींत, त्यांना स्वप्नामध्यें देखील मोक्ष

निवृत्तिमार्गनिरता वेदान्तार्थविचारकाः॥३२॥त्वद्भक्ति[1]निरता ये च ते वै विद्यामयाः स्मृताः॥ अविद्यावशगा ये तु नित्यं संसारिणश्च ते ॥ विद्याभ्यासरता ये तु नित्यमुक्तास्त एव हि ॥ ३३ ॥ लोके त्वद्भक्तिनिरतास्त्वन्मन्त्रोपासकाश्च ये॥ विद्या प्रादुर्भवेत्तेषां नेतरेषां कदाचन ॥ ३४ ॥ अतस्त्वद्भक्तिसंपन्ना मुक्ता एव न संशयः॥[2]त्वद्भक्त्यमृतहीनानां मोक्षः स्वप्ने ऽपि नो भवेत् ॥ ३५ ॥

(मू.). ॥ ३२ ॥ ३३ ॥ ये (पू.) ॥ तेषां (मू.) न [भवेत्]. ॥ ३४ ॥ ३५ ॥ ॥१७॥

१ तुझी भक्ति करण्यांत तत्पर. २ तुझी भक्ति ह्या अमृतानें रहित (तें ज्यांना मिळत नाहीं) अशांना.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मिळायाचा नाहीं. ॥३५॥ रामा, फार कशाला सांगूं ? सगळ्यांचें सार तुला थोडक्यांत सागतों कीं, सत्पुरुषांचा समागम हेंच ह्या जगांत मोक्षसाधन, असें ह्मटलें आहे. ॥ ३६ ॥ जे पुरुष सर्वत्र समदृष्टि ठेवीत असतील; - राग, द्वेष ह्यांचें कारण जी - विषयवासना ती ज्यांच्याजवळ नसेल; पुत्रैषणा, वित्तैषणा वगैरे एषणा (इच्छा) ज्यांना नसतील ह्मणजे सर्व प्रकारच्या कामना ज्यांच्या मनांतून गेल्या असतील; आणि ज्यांनीं इंद्रियनिग्रह केला असून पूर्ण शांति व तुझी भक्ति स्वीकारिली असेल, ते सत्पुरुष होत. ॥ ३७ ॥ अशा प्रकारचे पुरुष, प्रिय वस्तूची प्राप्ति किंवा विपत्ति, कसलाही प्रसंग आला तरी एकसारखी वृत्ति ठेवितात, कोणत्याही ठिकाणीं आसक्ति ठेवीत नाहींत, व सर्व कर्मांचा त्याग करून सर्वकाळ ब्रह्मरूपीं रमून गेलेले असतात;

किं राम बहुनोक्तेन सारं किंचिद्ब्रवीमि ते ॥ साधुसंगतिरेवात्र मोक्षहेतुरुदाहृता ॥ ३६ ॥ साधवः समचित्ता ये निःस्पृहा विगतैषिणः[1] ॥ दान्ताः[2] प्रशान्तास्त्वद्भक्ता निवृत्ताखिलकामनाः[3] ॥ ३७ ॥ इष्टप्राप्तिविपत्त्योश्च[4] समाः संगविवर्जिताः ॥ संन्यस्ताखिलकर्माणः[5] सर्वदा ब्रह्मतत्पराः ॥ ३८ ॥

राम, बहुना उक्तेन किं ? किंचित् (मू.). ॥ ३६ ॥ ये साधवः, [ते] (मू.) ॥ ३७ ॥ ३८ ॥

---

१ ज्यांच्या - पुत्र द्रव्य इत्यादिकांविषयीं - इच्छा नाहींशा झाल्या, असे. २ इंद्रियनिग्रह करणारे. ३ ज्यांच्या सर्व कामना नाहींशा झाल्या, असे. ४ प्रिय वस्तूची प्राप्ति किंवा संकट ह्यांतील कोणत्याही प्रसंगीं. ५ सोडिलीं सर्व कर्में ज्यांनीं, असे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥३८॥ शिवाय ते यम नियमादि अष्टांग योगाचा अभ्यास करून सिद्ध झालेले असल्यामुळें कोणताही प्रसंग आला असला तरी नित्य आनंदांत असतात. अशा सत्पुरुषांचा समागम घडला ह्मणजे प्राण्याला तुझ्या कथा ऐकण्याची रुचि लागते. ॥ ३९ ॥ रामचंद्रा, नंतर तुझ्या ठिकाणीं त्याची भक्ति उत्पन्न होते. तूं तीन्ही काळीं अखंडरूपी आहेस. तुजविषयीं भक्ति उद्भवली ह्मणजे प्राण्याला प्रत्यक्ष तत्त्वज्ञान ॥ ४० ॥ प्राप्त होतें. चतुर पुरुषांनीं अंगिकारिलेला मोक्षाचा मुख्य मार्ग हा होय. ह्मणून, रामचंद्रा, मला तुजविषयीं प्रेम ही उत्तम भक्ति ॥ ४१ ॥ प्राप्त व्हावी; आणि, हे दुःखहारका, विशेषेंकरून तुझ्या भक्तांचा मला समागम घडावा. आज तुझें दर्शन मिळाल्यामुळें माझ्या जन्माचें सार्थक झालें. ॥ ४२ ॥

यमादि[१]गुणसंपन्नाः संतुष्टा येन केनचित् ॥ सत्संगमो भवेद्यर्हि त्वत्कथाश्रवणे रतिः॥३९॥समुदेति ततो भक्तिस्त्वयि राम सनातने ॥ त्वद्भक्तावुपपन्नायां[२] विज्ञानं विपुलं स्फुटम् ॥ ४० ॥ उदेति मुक्तिमार्गोऽयमाद्यश्चतुरसेवितः ॥ तस्माद्राघव सद्भक्तिस्त्वयि मे प्रेमलक्षणा ॥ ४१ ॥ सदा भूयाद्धरे संगस्त्वद्भक्तेषु विशेषतः ॥ अद्य मे सफलं जन्म भवत्संदर्शनादभूत् ॥ ४२ ॥

(पू.) संतुष्टाः ॥ [संति]. यर्हि सत्संगमः भवेत् [तर्हि] (मू.) ॥ ३९ ॥ राम, ततः सनातने त्वयि भक्तिः (मू.) विज्ञानं स्फुटं ॥ ४० ॥ (पू.) मुक्तिमार्गः. ॥ (मू.) सद्भक्तिः [अस्तु]. ॥ ४१॥ हरे, (पू.) सदा भूयात् (मू.) सफलं अभूत्. ॥ ४२ ॥

१ यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, समाधि ह्या अष्टांगयोगरूपी गुणांनीं युक्त. २ उत्पन्न झाली असतां.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ईश्वरा, आज माझे सर्व यज्ञ सफल झाले. रामा, मी केवळ तुझ्या ठिकाणीं बुद्धि ठेवून पुष्कळ दिवस तपश्चर्या केली, त्या तपाचें फळ, आज माझ्या हातून तुझी पूजा घडली, हें होय. ॥ ४३ ॥ राघवा, सीतेसहवर्तमान तूं माझ्या अंतःकरणांत नित्य वास कर. मी चालत, बसलेला किंवा उभा, असलों तरी मला तुझें नित्य स्मरण व्हावें. ' ॥ ४४ ॥ अशाप्रकारें त्या श्रेष्ठ अगस्त्यमुनींनीं लक्ष्मीपति रामचंद्राची स्तुति केली, व त्याच्याच (रामाच्या) साठीं पूर्वी देवेंद्रानें आश्रमांत ठेवून दिलेलें धनुष्य त्याला दिलें. ॥ ४५ ॥ त्या धनुष्याबरोबर कधींही क्षीण (रिकामे) न होणारे बाणांचे दोन भाते व एक खड्ग हीं आयुधें दिलीं. तें खड्ग

अद्य मे [1]क्रतवः सर्वे बभूवुः सफलाः प्रभो ॥ दीर्घकालं मया तप्तमनन्यमतिना तपः॥
तस्येह तपसो राम फलं तव यदर्चनम्॥ ४३ ॥ सदा मे सीतया सार्धं हृदये वस राघव ॥ गच्छतस्तिष्ठतो वाऽपि स्मृतिः स्यान्मे सदा त्वयि ॥ ४४ ॥ इति स्तुत्वा रमानाथमगस्त्यो मुनिसत्तमः ॥ ददौ चापं महेन्द्रेण रामार्थे [3]स्थापितं पुरा॥ ४५॥ [4]अक्षय्यौ बाणतू[5]णीरौ खड्गं रत्नविभूषितम् ॥[6]जहि राघव भूभारभूतं राक्षसमण्डलम् ॥ ४६॥

प्रभो, अद्य मे सर्वे (पू.) बभूवुः. ॥ राम, अनन्य[2]मतिना मया (द्वि. मू.) तप्तं; ॥ इह यत् तव अर्चनं, (मू.) ॥ ४३ ॥ राघव, मे हृदये (पू.). ॥ (मू.) स्मृतिः स्यात्. " ॥ ४४ ॥ मुनिसत्तमः अगस्त्यः इति रमानाथं स्तुत्वा पुरा (मू.) चापं ददौ. ॥४५॥ (पू.) खड्गं [च ददौ]. 'राघव, (मू.) जहि,॥४६॥

---

१ यज्ञ. २ नाहीं दुसरेकडे बुद्धि ज्याची, अशा. ३ ठेविलेलें. ४ न क्षीण होणाऱ्या. ५ बाणांच्या भात्यांना. ६ वध कर.

६

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रत्नें जडवून सुशोभित केलें होतें. - तीं दिल्यावर मुनींनीं रामाला सांगितलें:- 'रामा, राक्षसांच्या समूहाचा पृथ्वीला अतिशय भार झाला आहे; ह्मणून तूं त्यांचा वध कर. ॥ ४६ ॥ हें कार्य करण्यासाठींच तूं मायेनें मनुष्यरूप घेतलें आहेस. येथून सुमारें आठ कोसांवर, गोदावरीतीरीं पवित्र अरण्यानें सुशोभित असा पंचवटी नांवाचा आश्रम आहे. हे रघुकुलभूषणा, तूं आतां आपले शेष असलेले वनवासाचे दिवस तेथें घालव. ॥ ४७ ॥ ४८ ॥ हे साधूंच्या पालका, तेथें देवांचीं बहुत कार्यें कर्तव्य आहेत, तीं करून टाक.' ॥ ४९ ॥ - शंकर ह्मणाले:—पार्वति, - ही अगस्त्य मुनींची उत्तम उक्ति व स्तुति सर्व तत्त्व सिद्धांतांनीं ओतप्रोत भरलेली आहे. ती ऐकून रामचंद्राला आनंद झाला. तो भक्तसंकटनाशक प्रभु सर्वज्ञ खरा; - पण त्या

यदर्थमवतीर्णो ऽसि मायया मनुजाकृतिः॥ इतो योजनयुग्मे तु पुण्यकाननमण्डितः॥ ४७ ॥ अस्ति पञ्चवटीनामा आश्रमो गौतमीतटे॥ नेतव्यस्तत्र ते कालः शेषो रघुकुलोद्वह ॥ ४८ ॥ तत्रैव बहुकार्याणि देवानां कुरु सत्पते ॥ ४९ ॥ श्रुत्वा तदागस्त्यसुभाषितं वचः स्तोत्रं च तत्त्वार्थसमन्वितं विभुः ॥

(पू.) अवतीर्णः आसि. ॥ (मू.) ॥४७॥ अस्ति, ॥ रघुकुलोद्वहे, तत्र ते शेषः कालः नेतव्यः. ॥४८॥ सत्पते, देवानां (मू.).' ॥ ४९ ॥ विभुः मुदान्वितः अशेषवित् हरिः (पू.) वचः, स्तोत्रं च श्रुत्वा ॥

१ पुण्यकारक अरण्यानें सुशोभित. २ रघुकुलाला उद्धरणाऱ्या. ३ घालवावा. ४ साधूंच्या रक्षणकर्त्या. ५ सर्वज्ञ. ६ सत्य अर्थानें युक्त, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वेळीं अज्ञानाप्रमाणें वागत होता; - ह्मणून त्यानें पुढें अगस्त्यमुनींचा निरोप घेऊन त्यांनीं दाखविलेल्या मार्गानें अग्रभागीं प्रयाण केलें. ॥ ५० ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे अरण्यकाण्डे तृतीयः सर्गः ॥ ३ ॥

जातां जातां मार्गामध्यें, पर्वताच्या शिखरासारखा (प्रचंड) उभा असलेला वृद्ध जटायु पक्षी रामाच्या दृष्टीस पडला. - त्याला पाहतांच रामाला - 'हें प्रकर्ण आहे काय!' असा विस्मय वाटला. ॥१॥ तो (राम) लक्ष्मणाला ह्मणाला :–' लक्ष्मणा, धनुष्य घेऊन ये. हा राक्षस पुढें उभा राहिला आहे. ह्या ऋषींचें भक्षण करणाराला मारून टाकितों. ' ॥ २ ॥ तें रामाचें भाषण ऐकतांच गृध्रराजा (जटायु) भीतीनें गांगरून गेला

मुनिं समाभाष्य मुदा ऽन्वितो ययौ प्रदर्शितं मार्गमशेषविद्धरिः ॥ ५० ॥ इति श्री० रा० उमा० अरण्यकाण्डे तृतीयःसर्गः ॥ ३ ॥ मार्गे व्रजन्ददर्शाथ शैलशृंगमिव स्थितम् ॥ वृद्धं जटायुषं रामः किमेतदिति विस्मितः ॥ १ ॥ धनुरानय सौमित्रे राक्षसो ऽयं पुरः स्थितः ॥ इत्याह लक्ष्मणं रामो हनिष्याम्यृषिभक्षकम् ॥ २ ॥ तच्छ्रुत्वा रामवचनं गृध्रराड् भयपीडितः ॥

(बा. मू.) ययौ. ॥ ५० ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये अरण्यकाण्डे तृतीयः सर्गः ॥ ३ ॥ अथ मार्गे व्रजन रामः (पू.) जटायुषं ददर्श, (मू.). ॥ १ ॥ रामः, लक्ष्मणं ' सौमित्रे, धनुः आनय; (पू.); ॥ (मू.) [एनं] हनिष्यामि ' इति आह. ॥ २ ॥ गृध्रराट् तत् रामवचनं (पू.) [सन् आह] – ॥

१ जाणारा. २ पर्वताचें शिखर. ३ मारीन. ४ गिधाडांचा राजा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- व रामाला ह्मणाला :-' रामा, तूं माझा वध करावास हें योग्य नाहीं. मी तुझ्या पित्याचा प्रिय मित्र आहें. ॥ ३ ॥ माझें नांव जटायु. रामा, तुझें कल्याण होवो. मी तुझ्या मनाप्रमाणें वागणारा आहें. ॥ ४ ॥ तुझेंच प्रिय करावें अशा इच्छेनें मी पंचवटींत राहीन. एखादे वेळीं तूं आणि लक्ष्मण दोघेहीजण मृगयेला गेलेत, ॥ ५ ॥ तर मी जानकीचें, होतील तितक्या प्रयत्नांनीं, संरक्षण करीन.' हें त्या गृध्राचें (गिधाडाचें) वचन ऐकिल्यावर रामचंद्र प्रेमळपणें त्याला ह्मणाला :—॥ ६ ॥ ' हे गृध्रराजा, फार चांगलें. तूं येथून कांहीं अंतरावर, मी राहीन त्या स्थलाच्या जवळपास, वनामध्यें राहून आपल्या इच्छेप्रमाणें माझें प्रिय करीत जा.'

वधार्हो ऽहं न ते राम पितुस्ते ऽहं प्रियः सखा ॥ ३ ॥ जटायुर्नाम भद्रं ते गृध्रो ऽहं प्रियकृत्तव ॥ ४॥ पंचवट्यामहं वत्स्ये[1] तवैव प्रियकाम्यया[2] ॥ मृगयायां कदाचित्तु प्रयाते[3] लक्ष्मणे ऽपि च ॥ ५ ॥ सीता जनककन्या मे रक्षितव्या प्रयत्नतः॥ श्रुत्वा तद्गृध्रवचनं रामः सस्नेहमब्रवीत् ॥ ६ ॥ साधु गृध्रमहाराज तथैव कुरु मे प्रियम् ॥ अत्रैव मे समीपस्थो नातिदूरे वने वसन् ॥ ७ ॥

' राम, अहं ते वधार्हः न, अहं ते (मू.). ॥ ३ ॥ ते भद्रं; (मू.) प्रियकृत. ॥ ४ ॥ अहं (पू.) वत्स्ये. ॥ (५ उ.) प्रयाते [सति] ॥ (६ पू.) रक्षितव्या. ' ॥ रामः तत् गृध्रवचनं (मू.) – ॥ ५ ॥ ६ ॥ ' गृध्रमहाराज, साधु. तथैव (मू.) मे कुरु. ॥ ७ ॥

१ राहीन. २ प्रिय करण्याच्या इच्छेनें. ३ गेलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ ७ ॥ अशा प्रकारें जटायूला उत्तम बोध करून व आलिंगन देऊन, प्रभु रामचंद्र सीता आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान पंचवटींत गेला. ॥ ८ ॥ गोदावरीच्या तीरीं पोंचल्यावर, त्यांनीं (सीता–रामांनीं) पंचवटी-मध्यें लक्ष्मणाकडून एक विस्तीर्ण मंदिर तयार करविलें. - कुशळ कारागिरीचीं कामें करण्यामध्येंही - लक्ष्म-णाची बुद्धि उत्तम प्रकारें चालत असे. ॥ ९ ॥ तीं सर्वजणें गोदावरीच्या उत्तर तीरावर त्या मंदिरांत राहूं लागलीं. त्या मंदिराच्या भोंवतीं कळंब, फणस, आंबे, इत्यादि वृक्ष पुष्कळ होते; ॥ १० ॥ ह्या एकांत स्थलीं जनसमूहापासून उपसर्ग अगदीं होत नसे; तसेंच - अतिवृष्टि, अनावृष्टि, शारीरिक व्याधि - इत्यादि पीडाही नव्हत्या. तेथें, बुद्धिवान् लक्ष्मणाच्या साह्यानें जानकीच्या मनाला विनोद करीत ॥ ११ ॥ राम-

इत्यामन्त्रितम्[1]आलिंग्य ययौ पञ्चवटीं प्रभुः ॥ लक्ष्मणेन सह भ्रात्रा सीतया रघुनन्दनः ॥ ८ ॥ गत्वा ते गौतमीतीरं पञ्चवट्या सुविस्तरम् ॥ मन्दिरं कारयामास लक्ष्मणेन सुबुद्धिना ॥९॥ तत्र ते न्यवसन्सर्वे गंगाया उत्तरे तटे ॥ कादम्बपनसाम्रादिफलवृक्षस-माकुले ॥१०॥ विविक्ते[3] जनसम्बाधवर्जिते नीरुजे[4]स्थले ॥ विनोदयन् जनकजां लक्ष्म-णेन विपश्चिता ॥ ११ ॥ अध्युवास सुखं रामो देवलोक इवामरः ॥

प्रभुः रघुनन्दनः (मू.) [च] सह पंचवटीं ययौ. ॥ ८ ॥ ते गौतमीतीरं गत्वा पंचवट्यां [स्थिताः. तत्र रामः] सुबुद्धिना लक्ष्मणेन (मू.). ॥ ९ ॥ (१० मू. ११ पू.) गंगायाः उत्तरे तटे न्यवसन्[2]. ॥ विपश्चिता लक्ष्मणेन[सह]जनकजां विनोदयन् ॥१०॥११॥रामः देवलोके अमरः इव सुखं अध्युवास[6].॥

१चांगलें सांगितलें ज्याला, अशा. २राहिले. ३लोकांच्या गर्दीनें रहित, अशा. ४नाहीं त्रास जेथें, अशा स्थळीं. ५सुज्ञ अशा. ६राहिला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यांचा नित्य क्रम.

चंद्र सुखानें राहिला. देवलोकीं देवाला जो आनंद असतो तसा - येथं रामाला होत असे. - लक्ष्मण प्रतिदिवशीं त्यांना कंद, मुळें, फळें इत्यादि ॥ १२ ॥ आणून देई. त्याचें अंतःकरण रामाची सेवा करण्याचे कामीं सदासर्वकाळ तत्पर असे. तो नित्य रात्रीं हातांत धनुष्यबाण घेऊन चोहोंकडे लक्ष्य ठेवून जागत बसे. ॥ १३ ॥ तीं तिघें प्रतिदिनीं गोदावरीच्या उदकांत स्नान करीत. सीतेला कोठें जाणें येणें झालें तर ती रामलक्ष्मणांच्या मध्यें चालत असे (पुढें राम, मागें लक्ष्मण, अशा दोघांना बरोबर घेऊन जात येत असे). ॥ १४ ॥ लक्ष्मण संतुष्ट अंतःकरणानें नित्य उदक आणून देऊन त्यांची सेवा करी. अशा रीतीनें तीं तिघें प्रतिदिनीं सुखासमाधानानें राहत. ॥ १५ ॥ एके प्रसंगीं परमेश्वर रामचंद्र एकांतांत स्वस्थ बसला असतां,

कन्दमूलफलादीनि लक्ष्मणोऽनुदिनं तयोः ॥१२॥ आनीय प्रददौ रामसेवातत्परमानसः ॥ धनुर्बाणधरो नित्यं रात्रौ जागर्ति सर्वतः ॥१३॥ स्नानं कुर्वन्त्यनुदिनं त्रयस्ते गौतमीजले ॥ उभयोर्मध्यगा सीता कुरुते च गमागमौ ॥ १४ ॥ आनीय सलिलं नित्यं लक्ष्मणः प्रीतमानसः ॥ सेवते ऽहरहः प्रीत्या एवमासन् सुखं त्रयः ॥१५॥ एकदा लक्ष्मणो राममेकान्ते समुपस्थितम् ॥

रामसेवातत्परमानसः लक्ष्मणः तयोः (बा. १२ उ. १३ पू.); ॥ धनुर्बाणधरः [सन्] (मू.) जागर्ति. ॥ १२ ॥ १३ ॥ ते त्रयः गौतमीजले अनुदिनं (मू.) कुरुते; ॥ १४ ॥ प्रीतमानसः लक्ष्मणः नित्यं सलिलं आनीय अहरहः प्रीत्या सेवते; त्रयः एवं सुखं आसन्. ॥ १५ ॥ (पू.) रामं ॥

१ जागत असे. २ जाण्यायेण्याला. ३ प्रतिदिवशीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लक्ष्मणानें विनयपूर्वक नम्र होऊन त्याला विचारिलें :– ॥ १६ ॥ ‘ हे षड्गुणैश्वर्यसंपन्ना कमलदलनयना ईश्वरा, मोक्षप्राप्तीचें निश्चित कारण कोणतें (ज्या मार्गानें गेलें असतां खात्रीनें मोक्ष मिळेल) तें तुजपासून ऐकावें, अशी मला इच्छा झाली आहे; तर तें तूं संक्षेपानें मला सांगावेंस. ॥ १७ ॥ - मोक्षाला साधन ज्ञान होय, असें मला विदित आहे; पण त्या ज्ञानाचें स्वरूप काय, तें मी तुला विचारीत आहें. - वेदांतादिकांचें श्रवण व मनन करून ज्ञान संपादन करायाचें तें कोणतें, अपरोक्ष ज्ञान तें काय, आणि त्या ज्ञानाची वृद्धि करणारीं साधनें जीं भक्ति व वैराग्य, त्यांचीं स्वरूपें कशीं, तें सर्व मला सांग. रघुवीरा, तुझ्यावांचून अन्य वक्ता पृथ्वीतलावर कोणी नाहीं. ’ ॥ १८ ॥ श्रीराम ह्मणाला :– “ बाळा, ऐक. तुला गुह्यापेक्षां अत्यंत गुप्त गोष्ट

विनयावनतो भूत्वा पप्रच्छ परमेश्वरम् ॥१६॥ भगवन् श्रोतुमिच्छामि मोक्षस्यैकान्तिकीं गतिम् ॥ त्वत्तः कमलपत्राक्ष संक्षेपाद्वक्तुमर्हसि ॥ १७ ॥ ज्ञानं विज्ञानसहितं भक्तिवैराग्यबृंहितम् ॥ आचक्ष्व मे रघुश्रेष्ठ वक्ता नान्योऽस्ति भूतले ॥ १८ ॥ श्रीराम उवाच । शृणु वक्ष्यामि ते वत्स गुह्याद्गुह्यतरं परम् ॥ यद्विज्ञाय नरो जह्यात्सद्यो वैकल्पिकं भ्रमम् ॥ १९ ॥

परमेश्वरं (मू.) – ॥ १६ ॥ ‘ भगवन, त्वत्तः (पू.) श्रोतुं इच्छामि. (मू.). ॥ १७ ॥ रघुश्रेष्ठ, (पू.) ज्ञानं ॥ मे (मू.) भूतले अन्यः वक्ता न अस्ति. ’ ॥ १८ ॥ श्रीरा० उवा० -- ‘ वत्स, (पू.) वक्ष्यामि. ॥ नरः (मू.) जह्यात्. ॥ १९ ॥

१ भक्ति, वैराग्य ह्यांनीं वाढविलेल्या. २ वास्तविक नव्हे (वंध्येचा पुत्र, सशाचें शिंग) अशा केवळ शाब्दिक व्यवहाराला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सांगतों. - 'ससाचें शिंग,' 'वंध्येचा पुत्र,' हे शब्द नुसते उच्चारायाचे मात्र, त्यांचे वाच्य पदार्थ मुळींच नाहींत, - त्याप्रमाणेंच 'सृष्टि' ह्या शब्दाचा प्रकार आहे. सृष्टि नुसता काल्पनिक भ्रम होय. मी सांगणार तें ज्ञान झालें ह्मणजे मनुष्याचा तो भ्रम तत्काळ दूर होतो. ॥ १९ ॥ प्रथम मी तुला मायेचें स्वरूप सांगतों, नंतर ज्ञानाचीं साधनें, पुढें शब्दज्ञान व तत्त्वज्ञान ॥ २० ॥ आणि शेवटीं ज्ञानाचा विषय परमात्मा हें सगळें सांगेन. ह्याचें ज्ञान झालें ह्मणजे मनुष्य संसारसागरांतून मुक्त होतो. शरीर आत्म्याहून भिन्न जड आहे. त्याच्या (शरीराच्या) ठिकाणीं 'हाच आत्मा' अशी जी बुद्धि होते, ॥ २१ ॥ तीच माया होय. तिच्या योगानेंच हा संसार कल्पिला जातो. हे कुलभूषणा, मायेचीं दोन अनादि रूपें ठरलेलीं आहेत. ॥ २२ ॥ एक विक्षेप (घोंटाळा, पसारा करणारें),

आदौ मायास्वरूपं ते वक्ष्यामि तदनन्तरम् ॥ ज्ञानस्य साधनं पश्चाज्ज्ञानं त्रि-ज्ञानसंयुतम् ॥ २० ॥ ज्ञेयं च परमात्मानं यज्ज्ञात्वा मुच्यते भयात् ॥ अना-त्मनि शरीरादावात्मबुद्धिस्तु या भवेत् ॥ २१ ॥ सैव माया तयैवासौ संसारः परि-कल्प्यते ॥ रूपे द्वे निश्चिते पूर्वं मायायाः कुलनन्दन ॥ २२ ॥ विक्षेपावरणे तत्र प्रथमं कल्पयेज्जगत् ॥ लिंगाद्यब्रह्मपर्यंतं स्थूलसूक्ष्मविभेदतः ॥ २३ ॥

(मू.) ज्ञानं ॥ २० ॥ (पू.) मुच्यते. ॥ (मू.), ॥ २१ ॥ (पू.). ॥ कुलनंदन, पूर्वं मायायाः विक्षेपावरणे द्वे रूपे निश्चिते. (मू.) जगत् स्थूलसूक्ष्मविभेदतः कल्पयेत्. ॥ २२ ॥ २३ ॥ ॥ २२ ॥

१ 'आत्मा' असा समज. २ कल्पिला जातो. ३ महत्तत्त्वापासून ब्रह्मदेवापर्यंत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रूप व दुसरें आवरण (आच्छादन) रूप. त्यांपैकीं पहिलें (विक्षेपरूप) महत्तत्त्वापासून चतुर्मुख ब्रह्मदेवापर्यंत स्थूल सूक्ष्म ह्या भेदांचें जितकें ह्मणून जग आहे त्याची कल्पना करितें; ॥ २३ ॥ दुसरें (आवरणरूप) ज्ञानरूपाला आच्छादून राहिलें आहे. ती माया शुद्ध परमात्म्याच्या आधारावर ह्या सर्व विश्वाची कल्पना करिते (सत्य स्वरूप आच्छादून जगद्रूप दाखविते). ॥ २४ ॥ जसें, भ्रांतीमुळें दोरीवर सर्पाचा भास होतो (तो सर्प खरा नव्हे, दोरी खरी) - त्याप्रमाणें परमेश्वरावर मायेनें कल्पिलेलें जग सत्य नव्हे; परमात्मा सत्य होय. - असा विचार केला ह्मणजे संसार कांहीं नाहीं. मनुष्यांना नित्य जें कांहीं ऐकूं येतें, दिसतें किंवा आठवतें, ॥ २५ ॥ तें सगळें, स्वप्नांतील अथवा मनोराज्यांतील खटाटोपाप्रमाणें, मिथ्या होय. संसाररूप वृक्षाचें बळकट मूळ देह होय, असें ह्मटलें आहे. ॥ २६ ॥ त्या देहामुळें पुत्र, स्त्रिया इत्यादिकांचा संबंध घडतो. देह नसेल तर आत्म्याला पुत्रादिकांचा संबंध आहे काय ? - नाहींच. - ॥ २७ ॥

अपरं त्वखिलं ज्ञानरूपमावृत्य[1] तिष्ठति ॥ मायया कल्पितं विश्वं परमात्मनि केवले ॥ २४ ॥ रज्जौ[2] भुजंगवद्भ्रान्त्या[3] विचारे नास्ति किंचन ॥ श्रूयते[4] दृश्यते[5] यद्यत्स्मर्यते[6] वा नरैः सदा ॥ २५ ॥ असदेव हि तत्सर्वं यथा स्वप्नमनोरथौ ॥ देह एव हि संसारवृक्षमूलं दृढं स्मृतम् ॥ २६ ॥ तन्मूलः पुत्रदारादिबन्धः किं तेऽन्यथाऽऽत्मनः ॥ २७ ॥

(बा. २४ मू.) भ्रांत्या रज्जौ भुजङ्गवत् कल्पितं. विचारे किंचन नास्ति. नरैः सदा यत् यत् (मू.), ॥२४॥२५॥ तत् सर्वं (पू.) [तथा] असत् एव॥(मू.)॥२६॥(मू.) अन्यथा, ते आत्मनः किम् ? ॥२७॥

१ वेष्टून. २ दोरीवर. ३ सर्पाप्रमाणें. ४ ऐकिलें जातें. ५ दिसतें. ६ आठवतें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- पृथ्वी, उदक, तेज, वायु, आकाश - हीं पांच महाभूतें हा स्थूल देह होय; पांच सूक्ष्म भूतें, अहंकार, बुद्धि, दहा इंद्रियें ॥ २८ ॥ चैतन्याचें प्रतिबिंब आणि मन हा लिंग (सूक्ष्म) देह होय; मूलप्रकृति हा कारण देह: क्षेत्र असें नांव देतात तें ह्याच जडसमुदायाला. ह्याला देह अशीही संज्ञा आहे. - ह्यालाच अज्ञानी लोक - 'अहं (मी, आत्मा)' असें समजतात. ॥ २९ ॥ ह्या जडसमुदायाहून जीव वेगळा आहे. तोच परमात्मा होय. त्याला जन्म आदिकरून सहा भावविकार नाहींत. त्या जीवाच्या तत्त्वस्वरूपाचें ज्ञान होण्याचीं साधनेंदेखील मीं सांगतों, ऐक. ॥ ३० ॥ जीव आणि परमात्मा हे एकाचेच पर्याय आहेत; ह्या उभयतांमध्यें भेदभाव नाहीं; तशीच त्याच्या स्वरूपाला इयत्ता (मोजमाप किंवा मुद्दत) नाहीं : - आतां, असें तत्त्वज्ञान होण्याचीं साधनें सांगतों :- मनुष्यानें ढोंग, हिंसा इत्यादि प्रकार सोडून द्यावे; ॥ ३१ ॥ दुसऱ्यानें निंदा वगैरे केली तरी सोसावी; सर्वांशीं सरळपणें

देहस्तु स्थूलभूतानां पञ्च तन्मात्रपञ्चकम् ॥ अहंकारश्च बुद्धिश्च इन्द्रियाणि तथा दश ॥ २८ ॥ चिदाभासो मनश्चैव मूलप्रकृतिरेव च ॥ एतत्क्षेत्रमिति ज्ञेयं देह इत्यभिधीयते ॥ २९ ॥ एतैर्विलक्षणो जीवः परमात्मा निरामयः ॥ तस्य जीवस्य विज्ञाने साधनान्यपि मे शृणु ॥ ३० ॥ जीवश्च परमात्मा च पर्यायो नात्र भेदधीः ॥ माना[2]भावस्तथा दम्भहिंसादिपरिवर्जनम् ॥ ३१ ॥ पराक्षे[4]पादिसहनं सर्वत्राव[5]क्रता तथा ॥

(मू.) ॥ २८ ॥ २९ ॥ (पू.) परमात्मा. (मू.) ॥ ३० ॥ (मू.) ॥ ३१ ॥ (मू.) ॥ ॥ २३ ॥

१विकाररहित. २प्रमाण किंवा इयत्ता नाहीं. ३ढोंग, हिंसा इत्यादि सोडणें. ४दुसऱ्यांनीं केलेली निंदा वगैरे सोसणें. ५अवक्रता सरळपणा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वागावें; मन, वाणी आणि शरीर ह्यांच्या योगानें उत्तम भक्तिपूर्वक सद्‌गुरूची सेवा करावी; ॥ ३२ ॥ शरीर आणि मन स्वच्छ राखावें; सदाचरणांत तत्परता ठेवावी; मन, वाणी आणि शरीर ह्यांना अन्याय करूं देऊं नये (दुसऱ्याचें अनिष्ट चिंतन न करणें, हें मनाचें नियमन; दुसऱ्याला अपशब्दांनीं न दुखावणें, हें वाणीला शिक्षण; हिंसा न करणें, हें शरीराचें दमन.); विषयांच्या इच्छा धरूं नये; ॥ ३३ ॥ अहंकार सोडावा; - लोकांना - जन्म, वार्धक्य इत्यादि दुःखें सोसावीं लागत आहेत, हें पाहून - संसाराविषयीं विरक्त व्हावें; - तसेंच, पुत्र, स्त्रिया, द्रव्य इत्यादिकांवर आसक्ति ठेवूं नये, प्रेम सोडून द्यावें; ॥ ३४ ॥ इष्ट किंवा अनिष्ट कसाही प्रसंग आला तरी चित्तवृत्ति नित्य सारखी ठेवावी; सर्वांचा अंतर्यामी जो मी राम, त्या मज-

मनोवाक्कायसद्भक्त्या[1] सद्गुरोः परिसेवनम् ॥ ३२ ॥ बाह्याभ्यन्तरसंशुद्धिः[2] स्थिरता सत्क्रियादिषु[3] ॥ मनोवाक्कायदण्डश्च[4] विषयेषु निरीहता[5] ॥ ३३ ॥ निरहंकारता जन्मजराद्यालोचनं[6] तथा ॥ असक्तिः स्नेहशून्यत्वं[7] पुत्रदारधनादिषु ॥ ३४ ॥ इष्टानिष्टागमे नित्यं चित्तस्य समता तथा ॥ मयि सर्वात्मगे रामे ह्यनन्यविषया मतिः ॥ ३५ ॥

(मू.) ॥३२॥ (पू.) स्थिरता, ॥ (मू.) ॥ ३३ ॥ (मू.) असक्तिः, स्नेहँशून्यत्वं, ॥३४ ॥ (मू.), ॥३५॥

---

१ मन, वाणी, शरीर ह्यांनीं केलेल्या उत्तम भक्तीनें. २ शारीरिक व मानसिक शुद्धता. ३ सदाचरणाविषयीं. ४ मन, वाणी, शरीर ह्यांचा निग्रह. ५ निस्पृहपणा. ६ लोकांना जन्म, वार्धक्य वगैरे येतात हें पाहणें (विरक्त होणें). ७ कोणाशीं स्नेह न ठेवणें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शब्दज्ञान व तत्त्वज्ञान.

वर अनन्यभावें बुद्धि लावावी; ॥ ३५ ॥ जेथें लोकसमुदायापासून उपसर्ग लागणार नाहीं अशा (एकांत) शुद्ध स्थानीं बसावें; संसारी लोकसमाजाशीं प्रेम कधीं ठेवूं नये; ॥ ३६ ॥ आत्मज्ञानाचा सतत उद्योग चालवावा; वेदांताच्या अर्थाचें श्रवण व मनन करीत असावें; ह्या सांगितलेल्या साधनांच्या योगें ज्ञान प्राप्त होतें. ह्यांच्या विपरीत आचरण ठेविलें तर त्याचें फळ विपरीतच (अज्ञान) मिळतें. ॥ ३७ ॥ ‘ मी बुद्धि, प्राण, मन, शरीर, अहंकार, ह्यांहून वेगळा चैतन्यरूपी असून तिन्ही काळीं नष्ट न होणारा, परम पवित्र ज्ञानमयच आहें ’ अशा प्रकारच्या सिद्धांताचा ॥ ३८ ॥ ज्याच्या (शब्दादिकांच्या) उपदेशानें बोध होतो, तें (शब्दादिक) ज्ञान, असें मी निश्चयात्मक सांगतों; ह्याचाच ज्यावेळीं प्रत्यक्ष अनुभव येतो, तेव्हां तें

जनसम्बाधरहितशुद्धदेशनिषेवणम् ॥ प्राकृतैर्जनैसंघैश्च ह्यरतिः सर्वदा भवेत् ॥ ३६ ॥
आत्मज्ञाने सदोद्योगो वेदान्तार्थावलोकनम् ॥ उक्तैरेतैर्भवेज्ज्ञानं विपरीतैर्विपर्ययः ॥ ३७ ॥ बुद्धिप्राणमनोदेहाहंकृतिभ्यो विलक्षणः ॥ चिदात्मा ऽहं नित्यशुद्धो बुद्ध एवेति निश्चयम् ॥ ३८ ॥ येन ज्ञानेन संवित्ते तज्ज्ञानं निश्चितं च मे ॥
विज्ञानं च तदैवैतत्साक्षादनुभवेद्यदा ॥ ३९ ॥

(मू.) ॥ ३६ ॥ (मू.) भवेत्. ॥ ३७ ॥ अहं (३८ मू. ३९ पू.) [इति] मे निश्चितं. ॥ यदा एतत् साक्षात् अनुभवेद्, तदा एव विज्ञानं [इति उच्यते]. ॥ ३८ ॥ ३९ ॥

१ लोकांच्या गर्दीनें रहित व शुद्ध देशांचा आदर करणें (तशा देशांत राहणें). २ लोकांच्या समुदायांशीं. ३ जाणतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तत्त्व (अपरोक्ष) ज्ञान होय. ॥ ३९ ॥ आत्मा सर्वत्र पूर्ण ज्ञानानंदरूपानें भरलेला आहे; त्याला उत्पत्त्यादि विकार नाहींत किंवा त्याच्या स्वरूपांत बदल होत नाहीं; त्याच्या ठिकाणीं बुद्धि, चित्त, अहंकार इत्यादिकांचे राग, द्वेष, लोभ, अहंभाव वगैरे धर्म नाहींत; त्याला रूपांतर, जडता इत्यादि नाहींत; ॥ ४० ॥ तो स्वतांच्या ज्ञानमय प्रकाशानें देहादिकांना प्रकाशित करितो; त्याच्या स्वरूपाला मर्यादा, आवरण, किंवा इयत्ता नाहीं; तो नित्य एकरूप व भेदभावरहित आहे; 'सत्य, ज्ञान अनंत' इत्यादि श्रुतींत सांगितलेलीं ब्रह्मरूपाचीं लक्षणें त्याचींच (आत्म्याचीं) होत. ॥ ४१ ॥ तो (आत्मा) कोणाशींही सक्त होत नाहीं; - सूर्याला कोणतीही वस्तु पाहण्यासाठीं दिवा घेण्याचें कारण नाहीं, त्याप्रमाणेंच - आत्म्याला स्वस्वरूपाच्या दर्शनासाठीं इतर साधनें लागत नाहींत; तो सर्व क्रिया किंवा वस्तु प्रत्यक्ष पाहतो. तत्त्वज्ञानाच्यायोगानें हें आत्मस्वरूप कळून येतें. प्राण्याला ज्यावेळीं सद्गुरूकडून महावाक्याचा उपदेश मिळून त्यायो-

आत्मा सर्वत्र पूर्णः स्याच्चिदानन्दात्मको ऽव्ययः॥ बुद्ध्याद्युपाधिरहितः परिणामादिवर्जितः ॥ ४० ॥ स्वप्रकाशेन देहादीन् भासयन्ननपावृतः[1]॥एक एवाद्वितीयश्च सत्यज्ञानादिलक्षणः ॥ ४१ ॥ असंगः स्वप्रभो[2] द्रष्टा विज्ञानेनावगम्यते[3] ॥ आचार्यशास्त्रोपदेशादैक्यज्ञानं यदा भवेत् ॥ ४२ ॥ आत्मनोर्जीवपरयोर्मूलाविद्या तदैव हि ॥ लीयते[4] कार्यकरणैः सहैव परमात्मनि ॥ ४३ ॥

(मू.) ॥ ४० ॥ ४१ ॥ (बा. ४२ मू.) जीवपरयोः आत्मनोः ऐक्यज्ञानं यदा भवेत्, तदा एव (मू.) लीयते; ॥ ४२ ॥ ४३ ॥

---

१ आच्छादित नसलेला. २ स्वयंप्रकाश. ३ जाणिला जातो. ४ लीन होते.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गानें जीवात्मा आणि परमात्मा ह्यांच्या ऐक्याचें ज्ञान होतें, त्यावेळींच संसाराचें मूळ कारण अविद्या आपलीं कार्यें (स्थूल) व इंद्रियें ह्यांसहवर्तमान परमात्म्याच्या स्वरूपीं लय पावते. ॥ ४२ ॥ ४३ ॥ ह्या अवस्थेला ' मुक्ति ' असें ह्मणतात. हा सर्व आत्म्यावर उपचार (कल्पिलेला आरोप) आहेः किंवा हा आत्मज्ञानाचा मार्ग होय. रघुनंदना, शब्दज्ञान आणि तत्त्वज्ञान ह्यांसहित हें परमात्म्याचें स्वरूप तुला मी सांगितलें. तो परमात्मा मीच - अर्थात मोक्षावस्था माझेंच स्वरूप होय. - परंतु, माझी भक्ति करण्याविषयीं जे जन पराङ्मुख असतील त्यांना ह्या स्वरूपाची (मोक्षाची) प्राप्ति होणें दुर्घट आहे. ॥४४॥४५॥ डोळे असले तरी रात्रीं (अंधारांत) मनुष्याला, - चोर आला कोठून, गेला कोठें, - तें चांगलेंसें समजत नाहीं; पण बरोबर दिवा घेतला ह्मणजे त्यालाच सर्व पदार्थ यथास्थित दिसूं लागतात; ॥ ४६ ॥ त्याप्रमाणें

सा ऽवस्था मुक्तिरित्युक्ता ह्युपचारो ऽयमात्मनि॥ इदं मोक्षस्वरूपं ते कथितं रघुनन्दन ॥ ४४ ॥ ज्ञानविज्ञानवैराग्यसहितं मे परात्मनः ॥ किं त्वेतद्दुर्लभं मन्ये मद्भक्तिविमुखात्मनाम् ॥ ४५ ॥ चक्षुष्मतामपि[2] यथा रात्रौ सम्यङ् न दृश्यते ॥ पदं दीपसमेतानां[3] दृश्यते सम्यगेव हि ॥ ४६ ॥ एवं मद्भक्तियुक्तानामात्मा सम्यक् प्रकाशते ॥ मद्भक्तेः कारणं किंचिद्वक्ष्यामि शृणु तत्त्वतः ॥ ४७ ॥

(पू.); आत्मनि अयं उपचारः[1]. ॥ रघुनन्दन, (४५ पू. ४४ उ.). (मू.), दुर्लभं मन्ये. ॥४४॥४५॥ (मू.) [दृश्यते,] ॥ ४६ ॥ (मू.) वक्ष्यामि; शृणु. ॥ ४७ ॥

१ आरोपित धर्म. २ नेत्र आहेत ज्यांना, अशांना. ३ दिवा जवळ घेणारांना.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्यांच्या अंतरीं मजविषयीं भक्ति वसत असेल, त्यांना आत्मस्वरूपाचा स्पष्ट बोध होतो. माझ्यावर भक्ति बसण्याचीं थोडींशीं साधनें तुला यथार्थपणें सांगतों, ऐक :–॥ ४७ ॥ माझ्या भक्तांची संगत धरावी, माझी व माझ्या भक्तांची निरंतर सेवा करावी, एकादशीचें उपोषण इत्यादि धर्म पाळावे, रामनवमीसारख्या माझ्या उत्साहाच्या दिवशीं उत्सव करावे, ॥ ४८ ॥ माझ्या कथा ऐकण्यांत, वाचण्यांत, व सांगण्यांत नित्य रममाण असावें, माझी पूजा करण्यांत दक्षता राखावी, आणि माझ्या नामाचा जप करावा. ॥ ४९ ॥ अशा प्रकारें जे लोक निरंतर वागतात त्यांची मजवर निरंतर निश्चल भक्ति जडते. - एवढें झालें कीं - मग पुढें ज्ञानप्राप्तीचें साधन तें काय राहिलें ? - कांहीं नाहीं. - ॥ ५० ॥ ह्मणून मी सांगतों कीं, माझी भक्ति करणाराला वैराग्य, शब्दज्ञान व तत्त्वज्ञान तत्काळ प्राप्त होतें; त्यापासून मनुष्याला मुक्ति मिळते. ॥ ५१ ॥

मद्भक्तसंगो मत्सेवा मद्भक्तानां निरन्तरम् ॥ एकादश्युपवासादि मम पर्वानुमोदनम् ॥ ४८ ॥ मत्कथाश्रवणे पाठे व्याख्याने सर्वदा रतिः ॥ मत्पूजापरिनिष्ठा च मम नामानुकीर्तनम् ॥ ४९ ॥ एवं सततयुक्तानां भक्तिरव्यभिचारिणी[1] ॥ मयि संजायते नित्यं ततः किमवशिष्यते[2] ॥ ५० ॥ अतो मद्भक्तियुक्तस्य ज्ञानं विज्ञानमेव च ॥ वैराग्यं च भवेच्छीघ्रं ततो मुक्तिमवाप्नुयात्[3] ॥ ५१ ॥

(पू.) [सेवा], ॥ (मू.), ॥४८॥४९॥ (बा. मू.) मयि नित्यं भक्तिः (बा. पू.) ? ॥५०॥ (मू.) ॥५१॥

---

१ न ढळणारी. २ अवशिष्यते बाकी राहतें. ३ पावेल.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लक्ष्मणा, तुझ्या प्रश्नांप्रमाणें हें सर्व मी तुला सांगितलें. जो पुरुष ह्यावर मन ठेवून असतो, त्याला मुक्ति प्राप्त होते. ॥ ५२ ॥ माझी भक्ति करीत नसेल त्याला हें ज्ञान कधींही न सांगण्याविषयीं यत्न ठेवावा. माझ्या भक्ताला मुद्दाम हांका मारून बोलावूनही ह्याचा उपदेश करावा. ॥ ५३ ॥ जो मनुष्य विश्वास ठेवून भक्तिपूर्वक ह्या उपदेशाचा नित्य पाठ करितो, तो, स्वतांवर असलेला अज्ञानावरणरूपी अंधकार नाहींसा करून, मुक्त होतो. ॥ ५४ ॥ माझा भक्तियोग करणाऱ्या पुरुषांचीं अंतःकरणें अत्यंत पवित्र व अतिशय शांत असतात; त्यांच्या मनांला माझी सेवा करण्याची पराकाष्ठेची आवड असते; ते निर्मल आत्म-

कथितं सर्वमेतत्ते तव प्रश्नानुसारतः ॥ अस्मिन्मनः समाधाय[1] यस्तिष्ठेत्स तु मुक्ति-
भाक्[2] ॥ ५२ ॥ न वक्तव्यमिदं यत्नान्मद्भक्तिविमुखाय हि ॥ मद्भक्ताय प्रदात-
व्यमाहूयापि[3] प्रयत्नतः ॥ ५३ ॥ य इदं तु पठेन्नित्यं श्रद्धाभक्तिसमन्वितः ॥
अज्ञानपटलध्वान्तं[4] विधूय[5] परिमुच्यते ॥ ५४ ॥ भक्तानां मम योगिनां सुविमल-
स्वान्तातिशान्तात्मनां[6] मत्सेवाभिरतात्मनां[7] च विमलज्ञानात्मनां[8] सर्वदा ॥

(पू.) सर्वे ते कथितं (मू.). ॥ ५२ ॥ (पू.) न वक्तव्यं. ॥ (मू.) प्रदातव्यम्. ॥५३॥ (पू.) यः इदं पठेत्, [सः] (मू.). ॥ ५४ ॥सदा उद्यतमतिः संत्सेवनानन्यधीः यः मम (पू.) ॥

१ ठेवून. २ मोक्ष पावणारा. ३ बोलावून. ४ अज्ञानरूपी पटलानें (पडद्यानें) केलेल्या अंधकाराला. ५ टाकून. ६ अत्यंत निर्मल मन ज्यांचें अशा, व अत्यंत शांत मन ज्यांचें अशा. ७माझी सेवा करण्यांत तत्पर मन ज्यांचें अशा. ८ शुद्ध ज्ञानरूप आत्मा हाच ज्यांचा जाणण्याचा विषय, अशा. ९ नित्य उद्युक्त बुद्धि ज्याची, असा. १० साधूंच्या सेवेशिवाय दुसरेकडे नाहीं बुद्धि ज्याची, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रूपाचें ज्ञान संपादण्याचा नित्य यत्न करीत असतात. जो मनुष्य अशा भक्तांच्या समागमीं राहतो, ज्ञान मिळविण्याविषयीं आपल्या बुद्धीला उद्युक्त ठेवितो, व साधूंच्या सेवेशिवाय दुसऱ्या विषयाकडे बुद्धीची प्रवृत्ति होऊं देत नाहीं, त्याच्या मोक्ष अगदीं हातांत असतो; आणि मीही त्याला नित्य दर्शन देतों. इतर साधनांनीं मोक्षप्राप्ति किंवा माझें दर्शन मिळायाचें नाहीं. ॥ ५५ ॥ इति अरण्यकाण्डे चतुर्थः सर्गः ॥ ४ ॥

त्या वेळेला त्या विस्तीर्ण दंडकारण्यांत, जनस्थानीं राहणारी एक राक्षसी फिरत असे. तिला इच्छेस येईल तसें रूप घेतां येई; तिची शक्तिही फार मोठी होती. ॥ १ ॥ एकदां, गोदावरीच्या तीरीं पंचवटीजवळ पृथ्वीपतींचीं (रामाचीं) कमल, वज्र, अंकुश ह्या चिन्हांनीं युक्त अशीं (उमटलेलीं) पावलें ॥ २ ॥

संगं यः कुरुते सदोद्यतमतिः सत्सेवनानन्यधीर्मोक्षस्तस्य [1]करस्थितोऽहमनिशं दृश्यो भवे नान्यथा ॥ ५५ ॥ इति श्रीम० उ० अरण्यकाण्डे चतुर्थः सर्गः ॥४ ॥

तस्मिन्काले महारण्ये राक्षसी [2]कामरूपिणी ॥ विचचार महा[3]सत्त्वा जन[4]स्थाननिवासिनी ॥ १ ॥ एकदा गौतमीतीरे पञ्चवट्याः समीपतः ॥ पद्म[6]वज्रांकुशांकानि पदानि [7]जगतीपतेः ॥ २ ॥

संगं कुरुते, तस्य (बा. मू.). ॥ ५५ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये अरण्यकाण्डे चतुर्थः सर्गः ॥४॥ (मू.) राक्षसी विचचार. ॥ १ ॥ (मू.) पदानि ॥ २ ॥

---

१ हातांत असलेला. २ इच्छेप्रमाणें रूप घेणारी. ३ मोठी शक्ति जिची, अशी. ४ जनस्थानीं (हल्लीं, ज्याला ‘ नासिक ’ ह्मणतात, त्या स्थलीं) राहणारी. ५ फिरत असे. ६ कमल, वज्र, अंकुश हीं चिन्हें ज्यांवर, अशा. ७ पृथ्वीच्या पतीचीं (रामाचीं).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तिच्या दृष्टीस पडलीं. तत्काल तिचें मन कामवासनेनें व्याप्त झालें! ती त्या पावलांचें सौंदर्य पाहून वेडावून गेली, व त्या खुणांवरून पाहात पाहात (सुगावा काढीत) हळूहळू रामाच्या आश्रमीं आली. ॥ ३ ॥ तेथें मदनासारखा सुंदर लक्ष्मीपति प्रभु रामचंद्र सीतेसह बसला होता, त्याला पाहतांच तिची कामेच्छा अतिशय वाढली. ॥ ४ ॥ पुढें, त्या राक्षसीनें रामाला विचारिलें :– ' तूं कोणाचा कोण ? ह्या आश्रमांत जटा, वल्कलें इत्यादि - चिन्हांचा तापसी वेष - घेऊन कां राहिला आहेस ? तुला येथें राहून कोणती गोष्ट साध्य करणें आहे ? मला सांग. ॥ ५ ॥ मी राक्षसी असून, राक्षसांचा राजा महापराक्रमी जो रावण, त्याची बहीण

दृष्ट्वा कामपरीतात्मा[1] पादसौन्दर्यमोहिता[2] ॥ पश्यन्ती सा शनैरायाद्राघवस्य निवेशनम्[3] ॥ ३ ॥ तत्र सा तं रमानाथं सीतया सह संस्थितम् ॥ कन्दर्पसदृशं[4] रामं दृष्ट्वा कामविमोहिता ॥ ४ ॥ राक्षसी राघवं प्राह कस्य त्वं कः किमाश्रमे ॥ युक्तो जटावल्कलाद्यैः साध्यं किं ते ऽत्र मे वद ॥ ५ ॥ अहं शूर्पणखा नाम राक्षसी कामरूपिणी ॥ भगिनी राक्षसेन्द्रस्य रावणस्य महात्मनः ॥ ६ ॥

(पू.) ॥ सा शनैः पश्यंती [सती] (मू.) आयात्. ॥ ३ ॥ (मू.) ॥ ४ ॥ (मू.) – 'त्वं कस्य ? कः ? जटावल्कलाद्यैः युक्तः [सन्] आश्रमे किं [वससि ?] ते अत्र [वासेन] साध्यं किं ? तत् मे वद. ॥ ५ ॥ (पू.) अहं (मू.) रावणस्य भगिनी [अस्मि]. ॥ ६ ॥

१ कामानें व्याप्त मन जिचें, अशी. २ पायांच्या सौंदर्यानें मोहित झालेली. ३ आश्रमास. ४ मदनासारख्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहें. माझें नांव शूर्पणखा. मला पाहिजे तसें रूप घेतां येतें. ॥ ६ ॥ माझा खर नांवाचा भाऊ आहे; त्याच्या जवळ मी ह्या अरण्यांतच राहत असतें. राजानें मला हें सगळें अरण्य - देणगी ह्मणून - दिलें आहे. मी येथें मुनींचें भक्षण करून निर्वाह करितें. ॥ ७ ॥ तुझा वृत्तांत समजून घ्यावा अशी माझी इच्छा आहे. तूं उत्तम वक्ता असशील - असें वाटतें; तर मी विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें - मला सांग.' राम तिला ह्मणाला :– 'मी अयोध्येच्या राजाचा मुलगा आहें. माझें नांव राम. ॥ ८ ॥ ही सुंदरी जनकराजाची कन्या माझी पत्नी होय. हिचें नांव सीता. तो अति सुंदर पुरुष माझा धाकटा भाऊ लक्ष्मण. ॥ ९ ॥ हे त्रैलोक्यसुंदरि ! तुझें मी कोणतें काम करूं, तें सांग.' शूर्पणखा कामानें व्याकुळ झाली होती. मागें सांगि-

खरेण सहिता भ्रात्रा वसाम्यत्रैव कानने[1] ॥ राज्ञा दत्तं च मे सर्वं मुनिभक्षा[2] वसाम्यहम् ॥ ७॥ त्वां तु वेदितुमिच्छामि[3] वद मे वदतां वर ॥ तामाह रामनामा ऽहमयोध्याधिपतेः सुतः ॥ ८ ॥ एषा मे सुन्दरी भार्या सीता जनकनन्दिनी ॥ स तु भ्राता कनीयान्मे लक्ष्मणो ऽतीव सुन्दरः ॥ ९ ॥ किं कृत्यं ते मया ब्रूहि कार्यं भुवनसुन्दरि ॥ इति रामवचः श्रुत्वा कामार्ता सा ऽब्रवीदिदम् ॥ १० ॥

खरेण भ्रात्रा सहिता [अहं] (पू.) वसामि[4]. ॥ राज्ञा सर्वं [वनं] मे दत्तं, (मू.) [अत्र] वसामि. ॥ ७ ॥ (पू.) मे वद. ' ॥ [रामः] तां आह – ' (मू.) [अस्मि]. ॥ ८ ॥ (पू.) मे भार्या. ॥ अतीवसुंदरः सः तु लक्ष्मणः मे कनीयान्[5] भ्राता. ॥ ९ ॥ भुवनसुंदरि, ते किं कृत्यं मया कार्यं ब्रूहि. ' ॥ (मू.) अब्रवीत् – ॥ १० ॥

---

१ वनांत. २ ऋषींना खाणारी. ३ जाणण्यास. ४ राहतें. ५ धाकटा. ६ कामानें व्याकुळ.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामाचें तिला उत्तर.

लेलें रामाचें भाषण ऐकिल्यावर ती त्याला असें ह्मणाली:- ॥१०॥ 'रामा, मजबरोबर चल. आपण पर्वतावरील अरण्यांत विहार करूं. तुझे हे कमलासारखे डोळे (सुस्वरूप) - पाहून - मी कामपीडित झाल्यें आहें. माझ्यानें तुला सोडून जाववत नाहीं.' ॥ ११ ॥ रामचंद्रानें सीतेकडे कटाक्षानें पाहून हांसत हांसत शूर्पणखेला ह्मटलें:-' बाई! ही शुभलक्षणा सीता माझी धर्मपत्नी आहे. कांहीं झालें तरी माझ्यानें हिला सोडणें होणार नाहीं. ॥ १२ ॥ तेव्हां, हे सुंदरि! सवतीमत्सराच्या दुःखांत तूं मजजवळ राहशील कशी? बाहेर माझा भाऊ लक्ष्मण आहे. तो अतिसुंदर पुरुष ॥ १३ ॥ तुला योग्य पति होईल. जा; त्याच्याबरोबर-

एहि राम मया सार्धं रमस्व गिरि[1]कानने ॥ कामार्ता ऽहं न शक्नोमि त्यक्तुं त्वां कमलेक्षणम् ॥११॥ रामः सीतां कटाक्षेण पश्यन् सस्मितमब्रवीत् ॥ भार्या ममैषा कल्याणी विद्यते ह्यन[2]पायिनी ॥ १२ ॥ त्वं तु सापत्न्य[3]दुःखेन कथं [4]स्थास्यसि सुन्दरि ॥ बहिरास्ते मम भ्राता लक्ष्मणो ऽतीवसुन्दरः॥ १३ ॥ तवानु[5]रूपो भविता पतिस्तेनैव संचर ॥ इत्युक्ता लक्ष्मणं प्राह पतिर्मे भव सुन्दर ॥ १४ ॥

'राम, (पू.) रमस्व. ॥ (मू.) त्वां सक्तुं न शक्नोमि.' ॥ ११ ॥ (पू.) — '(मू.) भार्या विद्यते. ॥ १२ ॥ सुंदरि, (पू.)? ॥ (मू.) लक्ष्मणः आस्ते; ॥ १३ ॥ (पू.) भ[6]विता; तेन एव संचर.' ॥ (मू.) — 'सुंदर, मे पतिः भव. ॥ १४ ॥

१ पर्वतावरील अरण्यांत. २ न सोडण्याजोगी. ३ सवतीमत्सराच्या दुःखानें. ४ राहशील. ५ योग्य. ६ होईल.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

च वनविहार कर.' रामानें असें सांगितलें; तेव्हां ती राक्षसी लक्ष्मणाकडे गेली व त्याला ह्मणालीः–'हे सुंदर पुरुषा, माझा पति हो. ॥ १४ ॥ भावाची आज्ञा मान्य करून आपण आतां एकमेकांच्या समागमाचें सुख घेऊं. विलंब लावूं नकोस.' कामवासनेनें मोहित झालेल्या त्या राक्षसीनें लक्ष्मणाला असें ह्मटलें. ॥ १५ ॥ तेव्हां लक्ष्मणानें तिला सांगितलें :–'हे साध्वि, मी त्या चतुर पुरुषाचा (रामाचा) सेवक आहें; अर्थात तूंही त्याची दासी होशील. जगामध्यें लोकाचें दास्य करण्यापलिकडे अधिक दुःख तें कोणतें बरें आहे ? (दास्य हें सर्व दुःखांचें स्थान होय). ॥ १६ ॥ ह्मणून, मी तुला सांगतों कीं, तूं त्याच्याकडेच जा. तुझें कल्याण होवो. तो राजा असून सर्वेश्वर आहे.' शूर्पणखा राक्षसीचें अंतःकरण दुष्ट होतें. लक्ष्मणाचें भाषण ऐकिल्यावर ती पुन्हां रामाकडे आली ॥ १७ ॥ व क्रोधानें - त्याला ह्मणालीः-

भ्रातुराज्ञां पुरस्कृत्य संगच्छावो ऽद्य मा चिरम् ॥ इत्याह राक्षसी घोरा लक्ष्मणं काममोहिता ॥ १५ ॥ तामाह लक्ष्मणः साध्वि दासो ऽहं तस्य धीमतः॥ दासी भविष्यसि त्वं तु ततो दुःखतरं नु किम् ॥ १६ ॥ तमेव गच्छ भद्रं ते स तु राजा ऽखिलेश्वरः ॥ तच्छ्रुत्वा पुनरप्यागाद्राघवं दुष्टमानसा ॥ १७ ॥ क्रोधाद्राम किमर्थं मां भ्रामयस्यनवस्थितः ॥

घोरा काममोहिता राक्षसी लक्ष्मणं 'अद्य (मू.)' इति आह. ॥ १५ ॥ लक्ष्मणः (पू.) दासः ॥ त्वं (मू.) ? ॥१६॥ (मू.) राघवं आगात्, ॥१७॥ क्रोधात् [आह]– 'राम, अनवस्थितः [त्वं] (पू.)?॥

१ समागम पावूं. २ विद्वानाचा. ३ अधिक दुःखकारक. ४ सर्व जगाचा धनी. ५ स्थिर नसणारा (चंचल). ६ फिरवतोस.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शूर्पणखेची
विटंबना.

‘ रामा, तुझ्या बोलण्यांत स्थिरता किंवा खरेपणा - कांहींच दिसत - नाहीं. अरे ! मला इकडून तिकडे विनाकारण फिरायाला कां लावित आहेस ? - जिच्या प्रेमास्तव मला असें फिरत लाविलेंस - त्या सीतेला मी आतांच येथें तुझ्या पुढें खाऊन टाकित्यें ! ’ ॥ १८ ॥ असें बोलून ती अक्राळ विक्राळ स्वरूपाची राक्षसी सीतेच्या आंगावर धांवली ! तेव्हां - लक्ष्मणानें - रामाच्या आज्ञेवरून खड्ग उचलिलें आणि त्या राक्षसीला धरून ॥ १९ ॥ तिचें नाक व कान कापून टाकिले ! लक्ष्मणाची शक्ति असामान्य होती. त्या वेळीं शूर्पणखेनें भयंकर किंकाळी फोडिली ! तिचें शरीर रक्तानें भरून गेलें ! लागलीच ॥ २० ॥ ती ओरडत ओरडत व खर राक्षसावर अपशब्दांचा भडिमार करीत त्याच्या पुढें जमिनीवर गडबडां लोळत पडली. खराचा शब्द तिच्या शब्दापेक्षांही कठोर होता. त्यानें शूर्पणखेला विचारिलें :—‘ हें काय ? ॥ २१ ॥

इदानीमेव तां सीतां भक्षयामि तवाग्रतः ॥ १८ ॥ इत्युक्त्वा विकटाकारा[1] जानकीमनुधावती[2] ॥ ततो रामाज्ञया खड्गमादाय परिगृह्य[3] ताम् ॥ १९ ॥ चिच्छेद नासां[5] कर्णौ च लक्ष्मणोऽलघुविक्रमः[4] ॥ ततो घोरध्वनिं कृत्वा रुधिराक्तवपुर्द्रुतम्[7] ॥ २० ॥ क्रन्दमाना[8] पपाताग्रे खरस्य परुषाक्षरा[9] ॥ किमेतदिति तामाह खरः खरतराक्षरः[10] ॥ २१ ॥

(मू.) भक्षयामि.’ ॥१८॥ (पू.) [बभूव]. ॥(मू.) परिगृह्य, ॥१९॥ अलघुविक्रमः[4] लक्ष्मणः (पू.) चिच्छेद[6].॥ (मू.) ॥२०॥ (पू.) खरस्य अग्रे पपात. ॥ खरतराक्षरः[10] खरः तां इति आह – ‘किं एतत् ? ॥ २१ ॥

१ भयंकर रूप जिचें अशी. २ आंगावर धांवणारी. ३ धरून. ४ नाहीं लहान पराक्रम ज्याचा, असा (पराक्रमी). ५ नाकाला. ६ तोडिता झाला. ७ रक्तानें भरलें शरीर जिचें, अशी. ८ ओरडणारी. ९ कठोर शब्द जिचा, अशी. १० अधिक कठोर शब्द ज्याचा असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुझी अशी दुर्दशा केली कोणी? आपण होऊन मृत्यूच्या मुखांत उडी घालण्यास असा कोणता प्राणी सिद्ध झाला आहे, तें मला सांग; ह्मणजे तो प्रत्यक्ष कृतांतासारखा असला तरी देखील मी त्याचा एका क्षणांत वध करीन.' ॥ २२ ॥ राक्षसी त्याला ह्मणाली:—' रामचंद्र - ह्या नांवाचा एक मनुष्य - सीता आणि लक्ष्मण ह्या दोघांना बरोबर घेऊन, दंडकारण्य निर्भय करण्यासाठीं गोदावरीच्या तीरीं राहत आहे. ॥२३॥ त्याच्या सांगण्यावरूनच त्याच्या भावानें माझी अशी अवस्था केली. खरा! जर तूं कुलीन (ज्या कुलांत जन्मास आलास त्याचा अभिमानी) व वीर असशील, तर ह्या शत्रूंचा वध करशील. ॥२४॥ मी - असा निश्चय केला

केनैवं कारिता ऽसि त्वं मृत्योर्वक्रानुवर्तिना[1]॥वद मे तं वधिष्यामि[4] कालकल्पमपि क्षणात् ॥ २२ ॥ तमाह राक्षसी रामः सीतालक्ष्मणसंयुतः ॥ दण्डकं निर्भयं कुर्वन्नास्ते गोदावरीतटे ॥ २३ ॥ मामेवं कृतवांस्तस्य भ्राता तेनैव चोदितः[5] ॥ यदि त्वं कुलजातो ऽसि वीरो ऽसि जाहि तौ रिपू ॥२४॥तयोस्तु रुधिरं[8] पास्ये[9] भक्षयै तौ सुदुर्मदौ ॥ नो चेत्प्राणान्परित्यज्य यास्यामि यमसादनम्[11] ॥ २५ ॥

(पू.) केन एवं कारिता[2] असि? [तद्] मे वद. क्षणात् कालकल्पं[3] अपि (मू.). ' ॥२२॥ राक्षसी तं आह – ' (पू.) रामः ॥ (मू.) आस्ते; ॥ २३ ॥ (पू.) [सन्] मां एवं कृतवान्. ॥ (मू.) [तर्हि] तौ रिपू[6] जहि[7]. ॥ २४ ॥(पू.) भक्षयै[10]. ॥ (मू.) यास्यामि[12]. ' ॥ २५ ॥

---

१ तोंडांत चालून जाणाऱ्या. २ करविलेली. ३ यमासारख्या. ४ मारीन. ५ प्रेरिलेला. ६ शत्रूंना. ७ मार. ८ रक्ताला. ९ पिईन. १० खाईन. ११ यमाच्या घरीं. १२ जाईन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे कीं, - रामलक्ष्मणांचें रक्त पिईन आणि त्या अत्यंत उन्मत्त मानवांना खाऊन टाकीन; हें न घडेल तर प्राण देऊन यमाच्या घरीं जाईन (मरेन)! ' ॥ २९ ॥ तें ऐकतांच खर क्रोधानें खवळून गेला. त्यानें तत्काल महाक्रूर कर्मे करणारे चौदा हजार राक्षस ॥ २६ ॥ रामाच्या आंगावर पाठविले; व त्याचा वध करण्याच्या इच्छेनें खर, त्रिशिरा, आणि दूषण राक्षस ॥ २७ ॥ असे सर्वजण लागलेच अनेक प्रकारचीं आयुधें घेऊन सज्ज होऊन रामाकडे आले. त्यांची गडबड कानीं पडतांच राम लक्ष्मणाला ह्मणाला :-- ॥ २८ ॥ ' लक्ष्मणा, मोठा कलकलाट ऐकूं येत आहे; ह्यावरून निःसं-

तच्छ्रुत्वा त्वरितं प्रागात्खरः क्रोधेन मूर्छितः ॥ चतुर्दश सहस्राणि रक्षसां भीमकर्मणाम् ॥ २६ ॥ चोदयामास रामस्य समीपं वधकांक्षया ॥ खरश्च त्रिशिराश्चैव दूषणश्चैव राक्षसः ॥ २७ ॥ सर्वे रामं ययुः शीघ्रं नानाप्रहरणोद्यताः ॥ श्रुत्वा कोलाहलं तेषां रामः सौमित्रिमब्रवीत् ॥ २८॥ श्रूयते विपुलः शब्दो नूनमायान्ति राक्षसाः ॥ भविष्यति महद्युद्धं नूनमद्य मया सह ॥ २९ ॥

(पू.) [सन्] त्वरितं प्रागात्, ॥ भीमकर्मणां रक्षसां (मू.) ॥ २६ ॥ (पू.) चोदयामास. ॥ (मू.) ॥ २७ ॥ सर्वे (पू.) [संतः] रामं शीघ्रं ययुः. ॥ रामः तेषां कोलाहलं (मू.) – ॥ २८ ॥ विपुलः शब्दः (पू.) आयान्ति ! नूनं अद्य मया सह महत् युद्धं भविष्यति ! ॥ २९ ॥

१ व्यापलेला. २ भयंकर कर्मे ज्यांचीं, अशा. ३ राक्षसांच्या. ४ वधाच्या इच्छेनें. ५ अनेक प्रकारांचीं आयुधें घेऊन सिद्ध. ६ कल्होळला. ७ ऐकूं येतो. ८ येतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शय राक्षस इकडे येत असावे. त्यांचें आज मजबरोबर तुमुल युद्ध होणार, ह्यांत संदेह नाहीं. ॥ २९ ॥ तूं महापराक्रमी आहेस. - पण मी तुला सांगतों कीं, ह्या वेळीं - तूं सीतेला घेऊन गुहेंत जाऊन तेथें बस. माझ्या मनांत, ह्या सगळ्या घोररूपी राक्षसांचा वध करावा, अशी इच्छा आहे. ॥ ३० ॥ ह्यावर आतां कांहीं बोलूं नकोस; तुला माझी शपथ आहे!' लक्ष्मण 'बरें आहे' असें ह्मणून सीतेला घेऊन गुहेंत गेला. ॥ ३१ ॥ प्रभु रामानें घट्ट कमर बांधिली, धनुष्य हातीं घेतलें, अक्षय बाणांनीं भरलेले दोन्ही भाते पाठीवर अडकाविले, अशा रीतीनें सर्व तयारी केली. ॥ ३२ ॥ इतक्यांत राक्षस येऊन रामावर विचित्र आयुधें, पा-

सीतां नीत्वा गुहां गत्वा तत्र तिष्ठ महाबल ॥ हन्तुमिच्छाम्यहं सर्वान् राक्षसा-
न् घोररूपिणः ॥ ३० ॥ अत्र किंचिन्न वक्तव्यं शापितो ऽसि ममोपरि ॥ तथेति
सीतामादाय लक्ष्मणो गह्वरं ययौ ॥ ३१ ॥ रामः परिकरं बद्ध्वा धनुरादाय निष्ठुरम् ॥
तूणीरावक्षयशरौ बद्ध्वा यत्तो ऽभवत्प्रभुः ॥ ३२ ॥ तत आगत्य रक्षांसि रामस्यो-
परि चिक्षिपुः ॥ आयुधानि विचित्राणि पाषाणान्पादपानपि ॥ ३३ ॥

महाबल, (पू.) ॥ (मू.) राक्षसान् हन्तुं इच्छामि. ॥ ३० ॥ (पू.) शापितः असि.' ॥ (मू.). ॥ ३१ ॥ प्रभुः (पू.) धनुः आदाय, ॥ अक्षयशरौ (मू.). ॥ ३२ ॥ ततः रक्षांसि आगत्य रामस्य उपरि विचित्राणि (मू.) चिक्षिपुः. ॥ ३३ ॥

१ शपथ घातलेला. २ गुहेस. ३ कांचाला. ४ सिद्ध. ५ वृक्षांप्रत. ६ फेंकिते झाले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

षाण व वृक्ष ह्यांचा वर्षाव करीत सुटले. ॥ ३३ ॥ रामानेंही सहज एका क्षणांत त्या आयुधादिकांचे तिळा-एवढाले तुकडे केले आणि नंतर एक हजार बाण सोडून सर्व राक्षसांचा धुवा उडविला. ॥ ३४ ॥ शेवटीं रघुवीरानें खर, त्रिशिरा, दूषणराक्षस ह्या सर्वांचा एका चार घटकांतच वध करून टाकिला. ॥ ३५ ॥ लक्ष्मणानेंही सीतेला गुहेंतून बाहेर आणून रामाच्या स्वाधीन केलें. रामानें सगळे राक्षस मारिले, असें पाहून त्याला आश्चर्य वाटलें. ॥ ३६ ॥ सीतेचें मुखकमल प्रसन्न झालें. त्या जनककन्येनें रामाला आलिंगन दिलें व त्याच्या शरीरावरील शस्त्रांचे व्रण धुतले. ॥ ३७ ॥ इकडे, मोठमोठाले सर्व राक्षस मेले, असें पाहिल्यावर

तानि चिच्छेद रामोऽपि लीलया तिलशः क्षणात् ॥ ततो बाणसहस्रेण हत्वा तान् सर्व-राक्षसान् ॥ ३४ ॥ खरं त्रिशिरसं चैव दूषणं चैव राक्षसम् ॥ जघान प्रहरार्धेन सर्वा-नेव रघूत्तमः ॥ ३५ ॥ लक्ष्मणोऽपि गुहामध्यात्सीतामादाय राघवे ॥ समर्प्य राक्षसा-न्दृष्ट्वा हतान्विस्मयमाययौ ॥ ३६ ॥ सीता रामं समालिंग्य प्रसन्नमुखपंकजा ॥ शस्त्रव्र-णानि चांगेषु ममार्ज जनकात्मजा ॥ ३७ ॥ सा ऽपि दुद्राव दृष्ट्वा तान्हतान् राक्षसपुंगवान् ॥

(पू.) तानि तिलशः चिच्छेद ॥ (मू.) हत्वा [स्थितः]. ॥ ३४ ॥ रघूत्तमः (मू.) प्रहरार्धेन जघान. ॥ ३५ ॥ (मू.) दृष्ट्वा विस्मयं आययौ. ॥ ३६ ॥ प्रसन्नमुखपंकजा जनकात्मजा सीता (पू.) ॥ अंगेषु (मू.). ॥ ३७ ॥ (पू.) हतान् दृष्ट्वा दुद्राव. ॥ ॥ ३१ ॥

१ अर्ध्या प्रहरानें. २ मारिता झाला. ३ अवयवांवर. ४ शस्त्रांच्या व्रणांना. ५ धुती झाली. ६ मोठ्या राक्षसांना. ७ पळाली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रावणाची बहीण शूर्पणखा लंकेंत गेली आणि ओरडत ओरडत सभेंत जाऊन रावणाच्या पायांजवळ भूमीवर लोळत पडली. आपली बहीण भयानें विव्हळ झाली आहे, असें पाहून, रावण तिला ह्मणाला :– ॥ ३८ ॥ ॥ ३९ ॥ 'बाळे, ऊठ, बसली रहा. हें तुझ्या सुंदर रूपाचें विरूप केलें कोणी ? इंद्रानें, यमानें, वरुणानें, ॥ ४० ॥ किंवा कुबेरानें ? नांव सांग. ह्मणजे एका क्षणांत त्याचें भस्म करून टाकितों !' राक्षसीनें त्याला उत्तर दिलें:–'उन्मत्ता, तुझी बुद्धि (अक्कल) अगदीं मंद झाली ! ॥ ४१ ॥ मला तर, तूं मद्य पिऊन धुंद झालेला, बायकोच्या अगदीं स्वाधीन व सर्वथा नपुंसकासारखा आहेस, असें वाटतें. राजाचे नेत्र

लंकां गत्वा सभामध्ये क्रोशन्ती पादसन्निधौ ॥३८॥ रावणस्य पपातोर्व्यां भगिनी तस्य रक्षसः ॥ दृष्ट्वा तां रावणः प्राह भगिनीं भयविह्वलाम् ॥ ३९ ॥ उत्तिष्ठोत्तिष्ठ वत्से त्वं विरूपकरणं तव ॥ कृतं शक्रेण वा भद्रे यमेन वरुणेन वा ॥४०॥ कुबेरेणाथ वा ब्रूहि भस्मीकुर्यां क्षणेन तम् ॥ राक्षसी तमुवाचेदं त्वं प्रमत्तो विमूढधीः ॥४१॥ पानासक्तः स्त्रीविजितः षण्ढः सर्वत्र लक्ष्यसे ॥

तस्य रक्षसः भगिनी क्रोशन्ती [सती] लंकां गत्वा सभामध्ये रावणस्य पादसन्निधौ उर्व्यां पपात. रावणः तां भयविह्वलां भगिनीं दृष्ट्वा प्राह – ॥ ३८ ॥ ३९ ॥ 'वत्से, भद्रे, त्वं उत्तिष्ठ ! उत्तिष्ठ ! (मू.) कृतं ? ॥ ४० ॥ अथवा कुबेरेण कृतं ? ब्रूहि. तं क्षणेन भस्मीकुर्यां.' ॥ राक्षसी तं इदं उवाच – '(मू.) [असि] ! ॥ ४१ ॥ त्वं (मू.) ! ॥

---

१ ओरडणारी. २ पायांजवळ. ३ धरणीवर. ४ इंद्रानें. ५ मद्य पिण्यांत दंग. ६ बायकोनें जिंकलेला. ७ नपुंसक.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मटले ह्मणजे चार (हेर) होत : ते तुझ्याजवळ मुळींच नाहींत; तर तूं राज्य करणार कसलें ! ॥ ४२ ॥ खर, दूषण तसाच त्रिशिरा ह्यांचा युद्धांत वध झाला ! मोठमोठाले चवदा हजार राक्षस ॥ ४३ ॥ क्षणमात्रांत रामानें मारून टाकिले ! राक्षसांना तो प्रबल शत्रु उत्पन्न झाला आहे ! त्यानें सगळें जनस्थान ऋषींना राहण्याजोगें निर्भय करून सोडिलें ! हा वृत्तांत तुला अद्याप कांहींच कळला नाहीं, तेव्हां मला तुला - नुसता मूर्ख नाहीं - शतमूर्ख ह्मणावें लागत आहे !' ॥ ४४ ॥ रावण ह्मणाला :– 'शूर्पणखे ! राम हा आहे कोण, त्यानें राक्षस कां व कसे मारिले, तें सर्व मला नीटपणें सांग. ह्मणजे मी त्याचा आणि त्याच्या सा-

चारचक्षुर्[1]विहीनस्त्वं कथं राजा भविष्यसि ॥ ४२ ॥ खरश्च निहतः संख्ये दूषणस्त्रिशिरास्तथा ॥ चतुर्दश सहस्राणि राक्षसानां महात्मनाम् ॥ ४३ ॥ निहतानि क्षणेनैव रामेणासुरशत्रुणा ॥ जनस्थानमशेषेण मुनीनां निर्भयं कृतम् ॥ न जानासि विमूढस्त्वमत एव मयोच्यसे ॥ ४४ ॥ रावण उवाच । को वा रामः किमर्थं वा कथं तेनासुरा हताः ॥ सम्यक्कथय मे तेषां मूलघातं[3] करोम्यहम् ॥ ४५ ॥

(मू.) ! ॥ ४२ ॥ असुरशत्रुणा रामेण संख्ये[2] (४३ पू.) तथा महात्मनां राक्षसानां चतुर्दशसहस्राणि क्षणेन एव निहतानि. (४४ द्वि.) त्वं (मू.) विमूढः उच्यसे. ॥ ४३ ॥ ४४ ॥ रा० उ० – 'रामः कः वा ? तेन (पू.) ? ॥ मे सम्यक् कथय. अहं (मू.).' ॥ ४५ ॥

---

१ हेर - ही राजांची - दृष्टि होय, तिनें रहित. २ युद्धांत. ३ मूळाच्या नाशाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

थीदारांचा समूळ नाश करून टाकितों.' ॥ ४५ ॥ शूर्पणखेनें सांगितलें :– ' राजा, एकदां मी जनस्थानांतून फिरत फिरत गोदावरीच्या तीरीं गेल्यें होत्यें. त्या ठिकाणीं पंचवटी नांवाचा एक प्रदेश आहे. तेथें पूर्वी पुष्कळ ऋषि राहत असत. ॥ ४६ ॥ त्या आश्रमांत रामचंद्र माझ्या दृष्टीस पडला. त्याचे नेत्र कमळासारखे आहेत; तो हातांत धनुष्य बाण धारण करितो; मूळचा तेजस्वी असल्यामुळें जटा आणि वल्कलें ह्यांच्या योगानें त्याला अधिक शोभा आली आहे. ॥ ४७ ॥ त्याचा धाकटा भाऊ लक्ष्मण देखील अगदीं त्याच्यासारखा दिसतो. रामाची भार्या इतकी सुंदर आहे कीं ती प्रति लक्ष्मीच असावी असें वाटतें; तिचे नेत्र विशाल आहेत; ॥ ४८ ॥ देव, गंधर्व, नाग, किंवा मनुष्य

शूर्पणखोवाच। जनस्थानादहं याता कदाचिद्गौतमीतटे ॥ तत्र पञ्चवटी नाम पुरा मुनिजनाश्रया ॥ ४६ ॥ तत्राश्रमे मया दृष्टो रामो राजीवलोचनः ॥ धनुर्बाणधरः श्रीमान् जटावल्कलमण्डितः ॥ ४७ ॥ कनीयाननुजस्तस्य लक्ष्मणोऽपि तथाविधः ॥ तस्य भार्या विशालाक्षी रूपिणी श्रीरिवापरा ॥ ४८ ॥ देवगन्धर्वनागानां मनुष्याणां तथाविधा ॥ न दृष्टा न श्रुता राजन्द्योतयन्ती वनं शुभा ॥ ४९ ॥

शू० उ० – अहं (पू.) याता. ॥ तत्र पुरा मुनिजनाश्रया (मू.) [अस्ति]. ॥ ४६ ॥ (मू.) रामः दृष्टः. ॥ ४७ ॥ तस्य (पू.) लक्ष्मणः अपि [दृष्टः]. ॥ (मू.) श्रीः इव भार्या [अस्ति]. ॥ ४८ ॥ राजन, वनं द्योतयन्ती[1] शुभा तथाविधा [स्त्री] (मू.). ॥ ४९ ॥

[1] प्रकाशविणारी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्यांच्यामध्यें असली स्त्री आजपर्यंत कोणाच्या पाहण्यांतही नाहीं, किंवा ऐकण्यांतही नाहीं; राजा, त्या सुंदरीचें अरण्यांत तेज फांकलें आहे ! ॥ ४९ ॥ हे वीरा, त्या स्त्रीला तुझी पत्नी करण्यासाठीं आणावें, अशा उद्योगांत मी होत्यें. पण रामाच्या लक्ष्मणनामक बंधूनें रामाच्या सांगण्यावरून माझें नाक व कान कापिले. त्याची शक्ति इतकी मोठी आहे - कीं त्याच्यापुढें माझें कांहीं चालेना ! - मग मी अत्यंत दुःखानें रडत रडत खराकडे गेल्यें. ॥ ५० ॥ ५१ ॥ त्यानेंही बरोबर राक्षसांचे अनेक सेनापति घेऊन रामावर चालून जाऊन त्याच्याशीं युद्ध केलें. पण रामाची शक्ति फारच विलक्षण ! त्यानें तत्काल एका क्षणांतच ॥ ५२ ॥ सगळे राक्षस मारून टाकिले ! ते राक्षस - कांहीं कमी होते असें नाहीं, - महापराक्रमी होते!

आनेतुमहमुद्युक्ता ता भार्यार्थं तवानघ ॥ लक्ष्मणो नाम तद्भ्राता चिच्छेद मम नासिकाम्॥५०॥कर्णौ च नोदितस्तेन रामेण स महाबलः ॥ ततो ऽहमतिदुःखेन रुदती खरमन्वगाम् ॥ ५१ ॥ सो ऽपि रामं समासाद्य युद्धं राक्षसयूथपैः ॥ ततः क्षणेन रामेण तेनैव बलशालिना ५२ ॥ सर्वे तेन विनष्टा वै राक्षसा भीमविक्रमाः ॥ यदि रामो मनः कुर्यात्त्रैलोक्यं निमिषार्धतः ॥ ५३ ॥

अनघ, अहं तव भार्यार्थं तां (पू.). ॥ तेन रामेण चोदितः सः महाबलः (बा. ५० उ.) कर्णौ च चिच्छेद. (५१ मू.). ॥ ५० ॥ ५१ ॥ ततः सः अपि क्षणेन राक्षसयूथपैः [सह] रामं समासाद्य, बलशालिना तेन एव रामेण युद्धं [अकरोत्]. ॥ ५२ ॥ तेन (पू.) राक्षसाः विनष्टाः. (मू.) ॥५३॥ ॥३३॥

१ आणण्यास. २ कडे गेल्यें. ३ गांठून. ४ बलानें शोभणाऱ्या. ५ करिता झाला. ६ अर्ध्या निमिषांत (पळांत).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामानें मनांत आणिलें, तर तो अर्ध्या क्षणांत सगळ्या त्रैलोक्याचें ॥ ५३ ॥ भस्म करून टाकील, ह्यांत संशय नाहीं, असें मला वाटतें. हे समर्था, जर ती स्त्री तुझी भार्या झाली तरच तुझें जीवित सफल होईल. ॥ ५४ ॥ ह्मणून, हे राजाधिराजा, सीता तुझी प्रियपत्नी होईल असें साधण्याचा यत्न कर. तिचे ते कमळाच्या पानासारखे नेत्र - पाहिल्यापासून माझ्या मनाचा तर निश्चयच झाला आहे कीं, - हिच्या सारखी दुसरी सुंदर स्त्री त्रिभुवनांत मिळावयाची नाहीं. ॥ ५५ ॥ रावणा, तुझी शक्ति कितीही मोठी असली तरी तुझ्यानें प्रत्यक्ष रामाच्या पुढें टिकाव धरवणार नाहीं. आतां, कांहीं कपटानें त्या रघुवीराला मोह घातलास तर मात्र सीता तुला प्राप्त होईल.' ॥ ५६ ॥ रावणानें तो वृत्तांत ऐकून घेतला, गोड गोड भाषणांनीं

भस्मीकुर्यान्न सन्देह इति भाति मम प्रभो ॥ यदि सा तव भार्या स्यात्सफलं तव जीवितम् ॥ ५४ ॥ अतो यतस्व राजेन्द्र यथा ते वल्लभा भवेत् ॥ सीता राजीवपत्राक्षी सर्वलोकैकसुन्दरी ॥ ५५ ॥ साक्षाद्रामस्य पुरतः स्थातुं त्वं न क्षमः प्रभो ॥ मायया मोहयित्वा तु प्राप्स्यसे तां रघूत्तमम् ॥ ५६ ॥ श्रुत्वा तत्सूक्तवाक्यैश्च दानमानादिभिस्तथा ॥ आश्वास्य भगिनीं राजा प्रविवेश स्वकं गृहम् ॥

(पू.) मम भाति. ॥ प्रभो, (मू.) सफलम्. ॥ ५४ ॥ राजेन्द्र (मू.) सीता ते वल्लभा यथा भवेत्, [तथा] यतस्व. ॥ ५५ ॥ प्रभो, त्वं (पू.); ॥ रघूत्तमं (मू.) प्राप्स्यसे. ' ॥ ५६ ॥ राजा तत् श्रुत्वा (पू.) ॥ भगिनीं (द्वि. अ.) प्रविवेश, ॥

१ यत्न कर. २ गोड भाषणांनीं. ३ सांत्वन करून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'राम ईश्वर असावा.'

व देणग्या, आदर सत्कार इत्यादिकांच्या योगानें बहिणीचें सांत्वन केलें, आणि आपल्या मंदिरांत प्रवेश केला. परंतु अंतःकरण चिंताग्रस्त झाल्यामुळें त्याला साऱ्या रात्रींत झोंप लागली नाहीं! ॥ ५७ ॥ त्याच्या मनांत घोळत होतें कीं :– ' राम ह्मणजे यःकश्चित् मनुष्य तो काय; आणि त्यानें एकव्यानें माझ्या खराचा व त्याचा सैन्याचा वध केला काय ! हें घडलें तरी कसें ! त्या माझ्या भावाला (खराला) स्वतांच्या शक्तीचा व धैर्याचा मोठा गर्व होता. त्याला रामानें मारिलें! ॥ ५८ ॥ अथवा, राम हा मनुष्य नसून परमेश्वरच असेल. माझ्याजवळ सैन्यसमुदाय पुष्कळ झाला आहे व मी फार प्रबल झालों आहें, ह्मणून माझा वध करण्याच्या इच्छेनें पूर्वी ब्रह्मदेवानें केलेल्या प्रार्थनेप्रमाणें प्रभु सध्यां रघूच्या कुलांत मनुष्यरूपानें

तत्र चिन्तापरो भूत्वा निद्रां रात्रौ न लब्धवान् ॥ ५७ ॥ एकेन रामेण कथं मनुष्यमात्रेण नष्टः सबलः खरो मे ॥ भ्राता कथं मे बलवीर्यदर्पयुतो विनष्टो बत राघवेण ॥ ५८ ॥ यद्वा न रामो मनुजः परेशो मां हन्तुकामः सबलं बलोघैः ॥ संप्रार्थितोऽयं द्रुहिणेन पूर्वं मनुष्यरूपोऽद्य रघोः कुलेऽभूत् ॥ ५९ ॥

(मू.)! ॥ ५७ ॥ ' मनुष्यमात्रेण (पू.) मे खरः कथं नष्टः ! ॥ राघवेण [१]बलवीर्यदर्पयुतः मे (मू.)! ॥ ५८ ॥ यद्वा रामः मनुजः न; पूर्वं [२]द्रुहिणेन संप्रार्थितः अयं परेशः [३]बलौघैः सबलं (पू.). ॥ [सन्] (मू.) मनुष्यरूपः अभूत्. ॥ ५९ ॥

१ शक्ति व उत्साह ह्यांच्या गर्वानें युक्त. २ ब्रह्मदेवानें. ३ सैन्यसमुदायांनीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अवतरला असावा. ॥ ५९ ॥ जर परमेश्वराच्या हातून माझा वध झाला तर मी वैकुंठींच्या राज्याचें पालन करीन, नाहीं तर चिरकालपर्यंत ह्या राक्षसांच्या राज्याचाच उपभोग घेईन; - दोन्ही प्रकारें आपलें कल्याणच होणार आहे. - तेव्हां आपण रामाकडे जावेंच.' ॥ ६० ॥ त्या सर्व राक्षसांच्या राजानें असा विचार केला. राम साक्षात् परमेश्वर विष्णु होय, हें त्याला कळलें होतें. - परंतु त्याच्या मनाचा असा ग्रह झाला होता कीं, - विरोधबुद्धीनेंच रामपदाची प्राप्ति करून घ्यावी, हें चांगलें; कारण, सरळ भक्तिमार्गानें भगवान् लवकर प्रसन्न होत नाहीं. ॥ ६१ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे अरण्यकाण्डे पंचमः सर्गः ॥५॥

रावणाची बुद्धि विशाल होती. त्यानें रात्रभर असा विचार करून, आपल्याला कर्तव्य काय, त्याचा

वध्यो यदि स्यां परमात्मना ऽहं वैकुण्ठराज्यं परिपालये ऽहम् ॥ नो चेदिदं राक्षसराज्यमेव भोक्ष्ये चिरं राममतो व्रजामि ॥६०॥ इत्थं विचिन्त्याखिलराक्षसेन्द्रो रामं विदित्वा परमेश्वरं हरिम् ॥ विरोधबुद्ध्यैव हरिं प्रयामि द्रुतं न भक्त्या भगवान्प्रसीदेत् ॥ ६१ ॥ इति अरण्यकाण्डे पञ्चमः सर्गः ॥ ५ ॥ विचिन्त्यैवं निशायां स प्रभाते रथमास्थितः ॥ रावणो मनसा कार्यमेकं निश्चित्य बुद्धिमान् ॥ १ ॥

अहं परमात्मना वध्यः यदि स्यां, [तर्हि] अहं (पू.); ॥ (मू.) चिरं भोक्ष्ये; अतः रामं व्रजामि. ' ॥ ६० ॥ अखिलराक्षसेन्द्रः (पू.) विदित्वा ॥ ' (मू.) द्रुतं न प्रसीदेत् ' [इति चिंतयामास]. ॥ ६१ ॥ इति पंचमः सर्गः ॥ ५ ॥ एवं निशायां (पू.) सः ॥ बुद्धिमान (उ.) कार्यं निश्चित्य ॥१॥

१ जातों. २ सर्व राक्षसांचा राजा. ३ विरोध (द्वेष) बुद्धीनें. ४ जातों. ५ लवकर. ६ प्रसन्न होईल. ७ विचार करिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एक निश्चय ठरविला. आणि उजाडतांच रथांत बसून ॥ १ ॥ तो समुद्राच्या पैल तीरीं मारीचाच्या घरीं गेला. मारीच राक्षस ऋषीप्रमाणें जटा व वल्कलें धारण करीत असे. ॥ २ ॥ ह्या वेळीं तो आपल्या हृदयांत, वास्तविक गुणरहित असून त्रिगुणात्मक प्रकृतीच्या कार्यांना प्रकाशित करणाऱ्या परमात्म्याचें ध्यान करीत होता. त्यानें समाधि उतरली तेव्हां, रावण आपल्या घरीं आला आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. ॥ ३ ॥ लागलेंच उठून त्यानें रावणाला आलिंगन दिलें व त्याची यथाविधि पूजा केली. आदरोपचार झाल्यावर रावण सुखासनीं स्वस्थ बसला असतां मारीचानें त्याला विचारिलें :– ॥ ४ ॥ ' रावणा, तूं - कोठेंही गेलास तरी बरोबर दाहापांच रथ, कांहीं तरी सेवक वगैरे असावयाचे; आणि आज तर - येथें एकाच रथा-

ययौ मारीचसदनं परं पारमुदन्वतः ॥ मारीचस्तत्र मुनिवज्जटावल्कलधारकः ॥ २ ॥ ध्यायन् हृदि परात्मानं निर्गुणं गुणभासकम् ॥ समाधिविरमे ऽपश्यद्रावणं गृहमागतम् ॥ ३ ॥ द्रुतमुत्थाय चालिंग्य पूजयित्वा यथाविधि ॥ कृतातिथ्यं सुखासीनं मारीचो वाक्यमब्रवीत् ॥ ४ ॥ समागमनमेतत्ते रथेनैकेन रावण ॥ चिन्तापर इवाभासि हृदि कार्यं विचिन्तयन् ॥ ५ ॥

उदन्वतः परं पारं मारीचसदनं ययौ. (मू.) मारीचः [आसीत्]. ॥ २ ॥ (पू.) परात्मानं ध्यायन् [मारीचः] ॥ (मू.) रावणं अपश्यद्. ॥ ३ ॥ मारीचः (पू.) पूजयित्वा ॥ (मू.) – ॥४॥ 'रावण, एतत् एकेन रथेन ते समागमनं ! ॥ (मू.) इव आभासि ! ॥ ५ ॥

१ समुद्राच्या. २ मारीचाच्या घरास. ३ गुणांस भासविणाऱ्या. ४ समाधि उतरल्यावर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निशीं (सडा) आला आहेस ! तुझ्या मनांत कांहीं तरी कार्याबद्दल विचार घोळत आहेत; ह्मणून तूं मला अ-
गदा चिंताग्रस्त झाल्यासारखा दिसतोस !॥५॥ ह्यांत कांहीं गुप्त प्रकार नसेल तर मला सर्व वृत्तांत सांग; ह्मणजे
मी तुझ्या मनांत असेल तें कार्य करीन. राजाधिराजा, मात्र तें कृत्य न्यायमार्गाला किंवा धर्माला विरुद्ध
नसावें. एकंदरींत, त्याच्या आचरणानें मला पाप न लागलें, - ह्मणजे झालें. - ' ॥ ६ ॥ रावण ह्मणालाः—
' मारीचा, दशरथ ह्या नांवाचा एक अयोध्येचा अधिपति प्रसिद्ध राजा होऊन गेला. त्याचा वडील मुलगा
राम खरा पराक्रमी आहे. ॥ ७ ॥ दशरथानें त्या आपल्या मुलाला, बायको आणि भाऊ लक्ष्मण ह्यांना
बरोबर देऊन, वनांत घालवून दिलें. अरण्य ह्मटलें ह्मणजे रानटी प्राण्यांनाच प्रिय - खरें; पण सध्यां निरु-
पायास्तव त्यांना प्रिय मानावें लागत आहे. - ॥ ८ ॥ तो राम सांप्रत घोर अरण्यामध्यें पंचवटी नांवाच्या

ब्रूहि मे न हि गोप्यं चेत्करवाणि तव प्रियम्॥न्याय्यं चेद्ब्रूहि राजेन्द्र वर्जिनं मां स्पृशे-
न्न हि ॥ ६ ॥ रावण उवाच।अस्ति राजा दशरथः साकेताधिपतिः किल ॥ रामनामा
सुतस्तस्य ज्येष्ठः सत्यपराक्रमः॥ ७॥ विवासयामास सुतं वनं वनजनप्रियम्॥ भार्यया
सहितं भ्रात्रा लक्ष्मणेन समन्वितम्॥ ८ ॥ स आस्ते विपिने घोरे पञ्चवट्याश्रमे शुभे ॥

गोप्यं न चेत् मे (पू.) करवाणि. ॥ (उ.) स्पृशेत्. ' ॥ ६ ॥ रा० उ० – ' (पू.) अस्ति किल. ॥
तस्य (मू.) सुतः [अस्ति]. ॥ ७ ॥ सः (मू.) सुतं वनजनप्रियं वनं विवासयामास. ॥ ८ ॥ सः
घोरे विपिने शुभे पंचवट्याश्रमे आस्ते ॥

१ गुप्त. २ करतों. ३ पाप. ४ लागेल. ५ वनांतील लोकांस प्रिय, अशा. ६ घालविता झाला. ७ अरण्यांत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रमणीय आश्रमांत राहत असतो. त्याची बायको - फार सुंदर आहे. - तिचे नेत्र विशाल आहेत. - तिला पाहिल्याबरोबर - लोकांना मोह उत्पन्न होतो. ॥ ९ ॥ रामानें माझ्या महापराक्रमी राक्षसांना, त्यांच्याकडून कांहीं अपराध घडला नसतां (विनाकारण), मारिलें ! खराचा वध करून, तो त्या अरण्यांत निर्भयपणें सुखानें राहिला आहे ! ॥ १० ॥ त्याचें अंतःकरण फारच निर्दय असलें पाहिजे. माझी बहीण शूर्पणखा ह्मणजे किती गरीब; तिच्याकडून त्याची कांहीं देखील आगळीक घडली नाहीं; तथापि त्यानें तिचें नाक व कान कापून टाकिले ! ॥ ११ ॥ ह्मणून मी तुला साह्यासाठीं बरोबर घेऊन तेथें जाणार, आणि राम अरण्यांत (जवळपास) नसला ह्मणजे त्याच्या प्राणवल्लभेला (सीतेला) घेऊन येणार. ॥ १२ ॥ तूं मायेनें हरिणाचे रूप घे आणि लक्ष्मणासह रामचंद्राला दूर काढून ने; इत-

तस्य भार्या विशालाक्षी सीता लोकविमोहिनी ॥ ९ ॥ रामो निरपराधान्मे राक्षसान् भीमविक्रमान् ॥ खरं च हत्वा विपिने सुखमास्ते ऽतिनिर्भयः ॥ १० ॥ भगिन्या मे शूर्पणख्या निर्दोषायाश्च नासिकाम् ॥ कर्णौ चिच्छेद दुष्टात्मा वने तिष्ठति निर्भयः ॥ ११ ॥ अतस्त्वया सहायेन गत्वा तत्प्राणवल्लभाम् ॥ आनयिष्यामि विपिने रहिते राघवेण ताम् ॥ १२ ॥ त्वं तु मायामृगो भूत्वा ह्याश्रमादपनेष्यसि॥

(उ.) सीता [अस्ति]. ॥ ९ ॥ (पू.) राक्षसान, ॥ (मू.) आस्ते. ॥ १० ॥ [सः] निर्दोषायाः मे (मू.) तिष्ठति. ॥ ११ ॥ (पू.)॥तां विपिने राघवेण रहिते[सति]आनयिष्याभि.॥ १२॥(मू.)[यदा]अपनेष्यसि, ॥ ॥ ३६ ॥

१ दूर नेशील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

क्यांत इकडे मी सीतेला उचलून आणितों. ॥ १३ ॥ तूं मला इतकें साह्य कर आणि पूर्वीप्रमाणें आपल्या आश्रमांत येऊन राहा.' रावणानें अशा प्रकारें भाषण केलें. तें पाहून (ऐकून) मारीचाला आश्चर्य वाटलें. - तो ह्मणालाः - ॥ १४ ॥ "रावणा, तुझ्या सर्वस्वी घाताला कारण असा हा उपदेश तुला केला कोणी ? - असा भलताच उपदेश करून - जो तुझा नाश झालेला पाहण्यासाठीं टपून बसला असेल, तो तुझा शत्रु होय; त्याचा प्रथम वध केला पाहिजे. ॥ १५ ॥ रावणा, रामाच्या पराक्रमाचें स्मरण झालें ह्मणजे अंतःकरण अगदीं घाबरून जातें ! लहानपणींच तो विश्वामित्राच्या यज्ञाचें संरक्षण करायाला आला होता; त्यावेळीं त्यानें एकच बाण मारून मला शंभर योजनें समुद्रांत फेंकून दिलें ! तेव्हांपासून मी अगदीं भयानें गांगरून गेलों आहे.

रामं च लक्ष्मणं चैव तदा सीतां हराम्यहम् ॥१३॥ त्वं तु तावत्सहायं मे कृत्वा स्था-स्यसि पूर्ववत् ॥ इत्येवं भाषमाणं तं रावणं वीक्ष्य विस्मितः ॥ १४ ॥ केनेदमुपादिष्टं ते मूलघातकरं[2] वचः ॥ स एव शत्रुर्वध्यश्च यस्त्वन्नाशं[3] प्रतीक्षते ॥१५॥ रामस्य पौरु-षं[4] स्मृत्वा चित्तमद्यापि रावण॥ बालोऽपि मां कौशिकस्य यज्ञसंरक्षणाय सः ॥१६॥ आगतस्त्विषुणैकेन पातयामास सागरे॥ योजनानां शतं रामस्तदादि भयविह्वलः॥१७॥

तदा अहं सीतां हरामि. ॥ १३ ॥ त्वं तु मे (पू.) स्थास्यसि[1]. ' ॥ [मारीचः] (मू.) [सन् उ-वाच] – ॥१४॥ "(पू.) ते उपदिष्टं ? ॥ (मू.) ॥१५॥ रावण, (पू.) [विकलं] ! ॥ (१६ उ.) आगतः बालः अपि सः रामः मां एकेन इषुणा[6] योजनानां शतं सागरे पातयामास; (बा.१७मू.) ॥१६॥१७॥

१ राहशील. २ मूळाचा घात करणारें. ३ टपून वाट पहात बसतो. ४ पराक्रमास. ५ विव्हळ झालें. ६ बाणानें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो.
समू.सान्व.
सटिप्पण.
॥३७॥

॥ १६ ॥ १७ ॥ त्या गोष्टींचें वरचेवर स्मरण होऊन मला जिकडे तिकडे रामच भरलेला आहे, असा भास होतो ! ॥ १८ ॥ पूर्वीचें शत्रुत्व मनांत घोळत असल्यामुळें मीं एकदां तीक्ष्ण शिंगांच्या हरिणाचें रूप घेतलें व माझ्यासारखेच (प्रतापी) पुष्कळ राक्षस बरोबर घेऊन दंडकारण्यांतही पुन्हां त्याच्या आंगावर गेलों. ॥ १९ ॥ सीता आणि लक्ष्मण ह्यांसह रामचंद्र जेथें होता, त्या ठिकाणीं जाऊन पोंचल्यावर मी मोठ्या त्वेरेनें त्यांना मारण्यास उद्युक्त झालों. रामानें मला पाहतांच एक बाण फेंकला; ॥ २० ॥ हे राक्षसाधिपते, तो बाण माझ्या वक्षस्थळाला लागला व मी गोलांच्या खात खात ह्या समुद्रांत येऊन पडलों !

स्मृत्वा स्मृत्वा तदेवाहं रामं पश्यामि सर्वतः ॥ १८ ॥ दण्डके ऽपि पुनरप्यहं वने पूर्ववैरमनुचिन्तयन् हृदि ॥ तीक्ष्णशृंगमृगरूपमेकदा मादृशैर्बहुभिरावृतो[2][3] ऽभ्ययाम् ॥ १९ ॥ राघवं जनकजासमन्वितं लक्ष्मणेन सहितं त्वरान्वितः ॥ आगतो ऽहमथ हन्तुमुद्यतो मां विलोक्य शरमेकमाक्षिपत्[4] ॥ २० ॥ तेन विद्धहृदयो[5] ऽहमुद्भ्रमन्[6] राक्षसेन्द्र पतितो ऽस्मि सागरे ॥ तत्प्रभृत्यहमिदं समाश्रितः स्थानमूर्जितमिदं भयार्दितः ॥ २१ ॥

अहं तत् एव (मू.) पश्यामि. ॥ १८ ॥ एकदा, हृदि पूर्ववैरं अनुचिन्तयन् अहं तीक्ष्णशृंगमृगरूपं[1] [धृत्वा] पुनः अपि (मू.) [सन] अभ्ययां. ॥ १९ ॥ त्वरान्वितः अहं (पू.) राघवं ॥ (मू.). ॥२०॥ राक्षसेन्द्र, (पू.) [सन] सागरे पतितः अस्मि. ॥ तत्प्रभृति[7] भयार्दितः[8] (मू.) ऊर्जितम्[9]. ॥२१॥

१ तीक्ष्ण शिंगाच्या हरिणाचें रूप. २ माझ्यासारख्या. ३ वेष्टिलेला. ४ फेंकिता झाला. ५ ताडिलें हृदय ज्याचें, असा. ६ गोलांच्या खाणारा. ७ तेव्हांपासून. ८ भयानें पीडित. ९ पीडारहित; शांत.

अरण्यकां.
सर्ग ६
'रामाशीं प्रसंग कठीण ! '

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेव्हांपासून पक्की धास्ती खाऊन मी ह्या स्थळीं राहत असतों हें स्थान अगदीं निर्भय आहे. ॥ २१ ॥ राजा, रत्न, रमणी (सुंदर स्त्री), रथ इत्यादि नुसते शब्द जरी कानीं पडले तरी - त्यांत 'र' हें अक्षर असल्यामुळें मला भास होतो कीं ' राम आला ! ' असेंच कोणी ह्मटलें! - आणि मी भयानें दचकतों! हा सर्व पदार्थांचा समुदाय उपभोग्य खरा ना ? तरी पण - जेथें तेथें राम दिसल्यामुळें - मी एकसारखा भ्याल्या-भ्याल्यासारखा असतों! माझ्या मनांत एक सारखा राम घोळत असतो ! ॥ २२ ॥ राम आला (येईल) कीं काय, अशा शंकेमुळें मी बाहेरचीं सर्व कामें सोडून दिलीं व सतत निजून असतों. तरी पण मनामध्यें त्याच्याविषयींचेच विचार चालतात; ह्मणून झोंप लागते न लागते इतक्यांत, ॥ २३ ॥ स्वप्नामध्यें रामाची

राममेव सततं विभावये भीतभीत इव भोगराशितः ॥ राजरत्न[1]रमणीरथादिकं श्रोत्रयो[2]-र्यदि गतं भयं भवेत् ॥२२॥ राम आगत इहेति शंकया बाह्यकार्यमपि सर्व[3]मत्यजम् ॥ निद्रया परिवृतो यदा स्वपे राममेव मनसाऽनुचिन्तयन् ॥ २३ ॥ स्वप्नदृष्टग-तराघवं तदा बोधि[6]तो विगत[7]निद्र आस्थितः ॥ तद्भवानपि विमुच्य चाग्रहं राघवं प्रति गृहं प्रयाहि भो ॥

भोगराशितः भीतभीतः इव [अहं] (मू.). ॥ २२ ॥ (मू.) यदा [4]स्वपे, ॥ २३ ॥ तदा [5]स्वप्नदृष्टि-गतराघवं पश्यन् (पू.) ! ॥ भो रावण, तत् भवान् अपि राघवं प्रति आग्रहं वि[8]मुच्य गृहं [9]प्रयाहि, ॥

---

१ राजा, रत्न, रमणी (सुंदर बायको), रथ इत्यादि - ज्यांत 'र' हें अक्षर प्रारंभीं आहे - असें. २ कानीं. ३ टाकिता झाला. ४ निजतों. ५ स्वप्नांत दृष्टीस पडलेल्या रामाला. ६ जागा झालेला. ७ गेली झोंप ज्याची, असा. ८ सोडून. ९ जा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मूर्ति दृष्टीस पडते आणि लागलाच मी जागा होतों! मग झोंप कांहीं लागत नाहीं ! शेवटीं बसलें राहून वेळ काढावा लागतो ! ह्मणून - मी तुला सांगतों कीं, - बा, तूंही रामाविषयींचा दुराग्रह सोडून परत जा आणि फार दिवसांपासून चालत आलेल्या राक्षसांच्या (राज्याचें) कुलाचें पालन करीत राहा. रामाची गोष्ट मनांत आणलीस किंवा त्याच्या वाटेस गेलास, तर सगळें राक्षसांचें कुल नाश पावेल ! ॥ २४ ॥ मी तुझ्या हिताची ही गोष्ट सांगत आहें. माझा उपदेश ध्यानांत घे. रामचंद्र साक्षात् परमेश्वर होय. त्याची विरोध भक्ति करूं नकोस, सरळ भक्तिमार्गानें सेवा कर. तो रघुनंदन परम दयाळु आहे. ॥ २५ ॥ शिवाय, पूर्वी नारदमुनींच्या वचनावरून मला असा वृत्तांत पूर्णपणें कळला आहे कीं, सत्य युगांत ब्रह्मदेवानें परमेश्वराची प्रार्थना केली; तेव्हां तो भक्तसंकटहर्ता प्रभु - प्रसन्न होऊन ब्रह्मदेवाला - ह्मणाला, ‘ तुझी इच्छा काय आहे, - ती मला सांग; - त्याप्रमाणें मी व्यवस्था करितों ’; ॥ २६ ॥

रक्ष राक्षसकुलं चिरागतं[1] तत्स्मृतौ सकलमेव नश्यति ॥ २४ ॥ तव हितं वदतो मम भाषितं परिगृहाण[2] परात्मनि राघवे ॥ त्यज विरोधमतिं भज भक्तितः परमकारुणिको[3] रघुनन्दनः ॥ २५ ॥ अहमशेषमिदं मुनिवाक्यतो ऽशृणवम्[4] आदियुगे परमेश्वरः ॥ ब्रह्मणा ऽर्थित उवाच तं हरिः किं तवेप्सितमहं करवाणि[5] तत् ॥ २६ ॥

चिरागतं राक्षसकुलं (मू.)! ॥ २४ ॥ (पू.) ॥ विरोधमतिं त्यज; भक्तितः (मू.). ॥ २५ ॥ (मू.) तं उवाच – ‘ तव ईप्सितं किं ? अहं तत् करवाणि. ’ ॥ २६ ॥

१ फार दिवस चालत आलेल्या. २ स्वीकार कर (मनांत घे). ३ अत्यंत दयाळु. ४ अशृणवम् ऐकिता झाला. ५ करितों.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्यावर ब्रह्मदेव ह्मणाला, ‘ हे कमलनयना ईश्वरा, आपण मनुष्याचें रूप घेऊन दशरथाचा पुत्र होऊन भूमीवर जावें आणि, आमचा शत्रु जो दशमुखी रावण, त्याचा लवकर वध करावा.’ ॥ २७ ॥ ह्यावरून - असें सिद्ध होतें कीं, - राम हा मनुष्य नव्हे, तर साक्षात् निर्विकार नारायण मायेनें मनुष्याचा वेष घेऊन भूमीचा भार दूर करण्यासाठीं वनांत आला आहे; त्याला कोणाचें किंचित्‌देखील भय नाहीं. ह्मणून, बाबा, सुखानें आपला घरीं जा कसा.” हें मारीचाचें भाषण ऐकिल्यावर रावणानें त्याला प्रत्युत्तर दिलें :— ॥ २८ ॥ २९ ॥ ‘मारीचा, राम परमेश्वर हें जर सिद्ध आहे, व तो जर ब्रह्मदेवाच्या प्रार्थनेवरून मला मारण्यासाठीं मनुष्य हो-

ब्रह्मणोक्तमरविन्दलोचन त्वं प्रयाहि भुवि मानुषं वपुः॥ दशरथात्मजभावमञ्जसा[1] जहि रिपुं दशकन्धरं[2] हरे ॥२७॥ अतो न मानुषो रामः साक्षान्नारायणोऽव्ययः ॥ मायामानुषवेषेण वनं यातो ऽतिनिर्भयः ॥२८॥ भूभारहरणार्थाय गच्छ तात गृहं सुखम् ॥ श्रुत्वा मारिचवचनं रावणः प्रत्यभाषत[3] ॥ २९ ॥ परमात्मा यदा रामः प्रार्थितो ब्रह्मणा किल ॥ मां हन्तुं[4] मानुषो भूत्वा यत्नादिह समागतः ॥ ३० ॥

ब्रह्मणा उक्तं – ‘ हरे, (पू.) [धृत्वा] प्रयाहि, ॥ दशरथात्मजभावं [प्राप्य] (मू.) जहि. ’ ॥ २७ ॥ अतः रामः मानुषः (बा. २८ मू.) भूभारहरणार्थाय मायामानुषवेषेण वनं यातः. (बा. २९ पू.) गच्छ. ” ॥ मारीचवचनं (मू.) – ॥ २८ ॥ २९ ॥ ‘ (पू.) ब्रह्मणा यदा प्रार्थितः [तदा] मानुषो भूत्वा (मू.). ॥ ३० ॥

१ लवकर. २ दशमुखी रावणाला. ३ प्रत्युत्तर सांगूं लागला. ४ मारण्यासाठीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'बऱ्या बोलानें माझें ऐक.'

ऊन प्रयत्नानें येथें आला आहे, तर ॥ ३० ॥ तो सत्यसंकल्प प्रभु आपलें कार्य लवकरच सिद्ध करील; - त्याबद्दल काळजी करून काय होणार ? - ह्मणून, मी होतील तितके प्रयत्न करून रामापासून सीता आणणारच. ॥ ३१ ॥ हे वीरा, रणांत मरण पावलों तर मी परम पदास प्राप्त होईन; नाहीं तर युद्धांत रामाला मारून निर्भयपणें सीतेचा लाभ करून घेईन. ॥ ३२ ॥ ह्मणून, - माझें तुला एवढेंच सांगणें आहे कीं, - हे भाग्यशाली पुरुषा, ऊठ; विचित्र प्रकारच्या हरणाचें रूप घे; लक्ष्मणासह रामचंद्राला आश्रमांतून लवकर पुष्कळसा लांब ॥ ३३ ॥ काढून ने, आणि नंतर लागलाच घरीं येऊन पूर्वींप्रमाणें स्वस्थ राहा. ह्याच्यापुढें

करिष्यत्यचिरादेव सत्यसंकल्प ईश्वरः॥ अतो ऽहं यत्नतः सीतामानेष्याम्येव राघवात् ॥ ३१ ॥ वधे प्राप्ते रणे वीर प्राप्स्यामि परमं पदम् ॥ यद्वा रामं रणे हत्वा सीतां प्राप्स्यामि निर्भयः ॥ ३२॥ अतोत्तिष्ठ महाभाग विचित्रमृगरूपधृक् ॥ रामं सलक्ष्मणं शीघ्रमाश्रमादतिदूरतः ॥ ३३ ॥ आक्रम्य गच्छ त्वं शीघ्रं सुखं तिष्ठ यथा पुरा ॥ अतः परं चेद्यत्किंचिद्भाषसे मद्विभीषणम् ॥ ३४ ॥

(पू.) अचिरात् एव करिष्यति. ॥ (उ.) आनेष्यामि एव. ॥ ३१ ॥ वीर, रणे (पू.) प्राप्स्यामि. ॥ यद्वा निर्भयः अहं (पू.) प्राप्स्यामि. ॥ ३२ ॥ महाभाग, (पू.) ॥ त्वं शीघ्रं सलक्ष्मणं (३३ उ. ३४ पू.) सुखं तिष्ठ. ॥ (३४ उ.) भाषसे चेत्, ॥ ३३ ॥ ३४ ॥

१ आणीन. २ पावेन. ३ अतः ह्मणून. ४ उत्तिष्ठ ऊठ. ५ चमत्कारिक हरणाचें रूप घेणारा. ६ मला भिवविणारें. ७ बोलशील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जर कां कांहीं मला भीति वाटण्यासारखें भाषण केलेंस; ॥ ३४ ॥ तर ह्या खड्गानें येथेंच तुझा वध करीन, ह्यांत अंतर होणार नाहीं, हें पक्कें समज!' मारीचानें तें भाषण ऐकून घेतलें व आपल्या मनाशींच विचार केला :– ॥ ३५ ॥ 'रामानें माझा वध केला, तर मी संसारसमुद्रांतून मुक्त होईन; आणि जर कां ह्या दुष्टाच्या हातून मरण आलें, तर मला निश्चयानें नरकांत पडावें लागेल!' ॥ ३६ ॥ अशा विचाराअंतीं, रामाच्याच हातून मरावें, असें ठरवून मारीच खडबडून उठला आणि रावणाला ह्मणाला :– 'राजा, तूं महासमर्थ आहेस; तेव्हां तुझी आज्ञा मला मानलीच पाहिजे.' ॥ ३७ ॥ असें बोलून - मारीच त्याच्याबरोबर जाण्यास सिद्ध झाला. - नंतर ते दोघे रथांत बसून रामाच्या आश्रमीं आले. मारीचानें शुद्ध सुवर्णासार-

हनिष्याम्यसिना ऽनेन त्वामत्रैव न संशयः ॥ मारीचस्तद्वचः श्रुत्वा स्वात्मन्येवान्वचिन्तयत्[1] ॥ ३५ ॥ यदि मां राघवो हन्यात्तदा[2] मुक्तो भवार्णवात् ॥ मां हन्याद्यदि चेद्दुष्टस्तदा मे निरयो[3] ध्रुवम् ॥ ३६ ॥ इति निश्चित्य मरणं रामादुत्थाय वेगतः ॥ अब्रवीद्रावणं राजन्करोम्याज्ञां तव प्रभो ॥ ३७ ॥ इत्युक्त्वा रथमास्थाय गतौ रामाश्रमं प्रति ॥ शुद्धजाम्बूनदप्रख्यो[4] मृगो ऽभूद्रौप्यबिन्दुकः[5] ॥ ३८ ॥

[तर्हि] अनेन (पू.) हनिष्यामि; न संशयः.' ॥ (मू.) – ॥ ३५ ॥ '(पू.) मुक्तः. ॥ दुष्टः (मू.).' ॥३६॥ इति रामात् मरणं निश्चित्य वेगतः उत्थाय रावणं अब्रवीत् – 'राजन्, प्रभो, तव आज्ञां करोमि.' ॥ ३७ ॥ इति उक्त्वा [मारीचरावणौ] (पू.) गतौ. [मारीचः] (मू.) मृगः अभूत्. ॥ ३८ ॥

१ विचार करिता झाला. २ मारील. ३ नरक. ४ स्वच्छ सोन्याचा. ५ रुप्याचे ठिपके ज्यावर, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सोन्याचा हरिण.

ख्या किंबहुना सुवर्णाच्याच हरणाचें रूप घेतलें; त्याच्या आंगावर रुप्यासारखे ठिपके होते; ॥ ३८ ॥ त्या हरिणाचीं शिंगें रत्नाचीं होतीं; खुर हिऱ्याचे, डोळे इंद्रनील मण्यासारखे, कांति विजेसारखी, आणि मुख सुंदर होतें. तो हरिण वनांत इकडे तिकडे बागडूं लागला. ॥ ३९ ॥ तो रामाच्या आश्रमाजवळ सीतेची दृष्टि पोंचेल अशा ठिकाणीं उड्या मारी, ॥ ४० ॥ कांहीं वेळ धांवे, पुन्हां कांहीं वेळ स्थिर उभा राही, जवळ येई, पुन्हां भयभीत होऊन पळे. कपटानें हरणाचें रूप धारण करणारा तो दुष्ट राक्षस सीतेला मोह घालण्यासाठीं अशा रीतीनें फिरत राहिला. ॥ ४१ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे अरण्यकाण्डे षष्ठः सर्गः ॥ ६ ॥

रत्नशृंगो[1] मणिखुरो[2] नीलरत्नविलोचनः[3] ॥ विद्युत्प्रभो[4] विमुग्धास्यो[5] विचचार वनान्तरे ॥ ३९ ॥ रामाश्रमपदस्यान्ते सीतादृष्टिपथे चरन् ॥ ४० ॥ क्षणं च धावत्य[8]वतिष्ठते[9] क्षणं समीपमागत्य पुनर्भयावृतः ॥एवं स मायामृगवेषरूपधृक्[10]चचार सीतां परिमोहयन्खलः ॥ ४१ ॥ इति श्रीमद० रामा० उ० अरण्यका० षष्ठः सर्गः ॥६॥

(मू.) [सः मृगः] [6]वनान्तरे विचचार. ॥ ३९ ॥ (मू.) ॥ ४० ॥ सः खलः[7] (मू.) चचार[11]. ॥४१॥

॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये अरण्यकाण्डे षष्ठः सर्गः ॥ ६ ॥

१ रत्नांचीं शिंगें ज्याचीं, असा. २ हिऱ्याचे खुर ज्याचे, असा. ३ निळ्या रत्नाचे डोळे ज्याचे, असा. ४ विजेसारखी कांति ज्याची, असा. ५ सुंदर मुख ज्याचें, असा. ६ रानामध्यें. ७ दुष्ट. ८ धांवे. ९ उभा राही. १० कपटानें हरणाचें रूप घेणारा. ११ फिरत राहिला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इकडे, रामचंद्राला रावणाचे सर्व उद्देश व व्यापार कळून आले. ह्मणून त्यानें एकांतीं सीतेला सांगितलें :– ' जानकि, माझें भाषण श्रवण कर. ॥ १ ॥ रावण संन्याशाचें रूप घेऊन तुझ्या समीप येणार आहे. म्हणून तूं तुझ्याच आकाराची एक छाया आश्रमामध्यें ठेवून स्वतां अग्नीमध्यें प्रवेश कर व माझ्या आज्ञेवरून तेथें (अग्नींत) गुप्त रूपानें एक वर्षपर्यंत राहा. सुंदरि, - भिऊं नकोस. - रावणाचा वध झाल्यावर तूं पूर्वीप्रमाणें मजजवळ प्राप्त होशील. ॥ २ ॥ ३ ॥ हें रामाचें भाषण श्रवण केल्यावर सीतेनें लागलेंच तसें केलें–मायेची सीता - निर्माण करून - बाहेर ठेवून दिली आणि स्वतां अग्नींत प्रवेश केला.॥ ४ ॥

अथ रामो ऽपि तत्सर्वं ज्ञात्वा रावणचेष्टितम् ॥ उवाच सीतामेकान्ते शृणु जानकि मे वचः ॥ १ ॥ रावणो भिक्षुरूपेण आगमिष्यति ते ऽन्तिकम् ॥ त्वं तु छायां त्वदाकारां स्थापयित्वोटजे विश ॥ २ ॥ अग्नावदृश्यरूपेण वर्षं तिष्ठ ममाज्ञया ॥ रावणस्य वधान्ते मां पूर्ववत्प्राप्यसे शुभे ॥ ३ ॥ श्रुत्वा रामोदितं वाक्यं सा ऽपि तत्र तथा ऽकरोत् ॥ मायासीतां बहिःस्थाप्य स्वयमन्तर्दधे ऽनले ॥ ४ ॥

(पू.) ज्ञात्वा ॥ एकांते सीतां उवाच – ' (मू.) शृणु. ॥ १ ॥ शुभे, (पू.) आगमिष्यति. ॥ त्वं तु मम आज्ञया त्वदाकारां छायां उटजे स्थापयित्वा अग्नौ विश. (बा. ३ मू.). ॥ २ ॥ ३ ॥ सा अपि रामोदितं वाक्यं (मू.) अंन्तर्दधे. ॥ ४ ॥

---

१ सन्याशाच्या रूपानें. २ जवळ. ३ येईल. ४ तुझ्या आकाराची. ५ आश्रमांत. ६ ठेवून. ७ शीर. ८ बहिःस्थाप्य बाहेर ठेवून. ९ अग्नींत. १० गुप्त झाली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारीचानें कपटेंकरून धरिलेलें तें हरिणरूप ह्या मायिक सीतेच्या दृष्टीस पडलें. तेव्हां ती हांसत हांसत रामाजवळ येऊन नम्रतापूर्वक ह्मणाली :– ॥ ५ ॥ 'रामचंद्रा ! पहा पहा ! तो सुवर्णाचा मृग इकडे तिकडे निर्भयपणें फिरत आहे. असा हरिण आजपर्यंत कोणी पाहिलाही नसेल ! त्याचें शरीर रत्नांनीं सुशोभित केल्यासारखें दिसतें; कारण त्याच्यावर चित्र विचित्र अनेक बिंदु आहेत. ॥ ६ ॥ रामा, तो सुंदर मृग बांधून आणून मला द्या. त्याच्याकडून माझी करमणूक होईल.' रामचंद्र 'बरें आहे (देतों)' असें ह्मणून धनुष्य घेऊन निघाला व जातांना लक्ष्मणाला ह्मणाला :– ॥ ७ ॥ 'लक्ष्मणा, तूं मोठ्या दक्षतेनें, माझी प्राणवल्लभा जी सीता, तिचें रक्षण कर. ह्या अरण्यांत अक्राळविक्राळ

मायासीता तदाऽपश्यन्मृगं मायाविनिर्मितम् ॥ हसन्ती राममभ्येत्य प्रोवाच विनयान्विता ॥ ५ ॥ पश्य राम मृगं चित्रं कानकं रत्नभूषितम् ॥ विचित्रबिन्दुभिर्युक्तं चरन्तमकुतोभयम्[1] ॥ ६ ॥ बद्ध्वा देहि मम क्रीडामृगो भवतु सुंदरः ॥ तथेति धनुरादाय गच्छन् लक्ष्मणमब्रवीत् ॥ ७ ॥ रक्ष त्वमतियत्नेन सीतां मत्प्राणवल्लभाम् ॥ मायिनः[2] सन्ति विपिने राक्षसा घोरदर्शनाः[3] ॥ ८ ॥

(पू.) ॥ मृगं अपश्यत्, ॥ (मू.) [सती] प्रोवाच – ॥ ५ ॥ '(मू.) मृगं पश्य. ॥ ६ ॥ (पू.) क्रीडामृगः भवतु.' ॥ (मू.) – ॥ ७ ॥ '(पू.) सीतां रक्ष; ॥ (मू.) राक्षसाः विपिने संति. ॥ ८ ॥

१ नाहीं कोठूनही भय ज्याला, असा. २ कपटी. ३ भयंकर दिसणारे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्वरूपें घेणारे मायावी राक्षस पुष्कळ आहेत ! ॥ ८ ॥ म्हणून, तूं येथें सावधपणें ह्या पुण्यकीर्ति साध्वीचें रक्षण करीत राहा.' ह्यावर लक्ष्मण रामाला ह्मणाला :– 'देवा ! हा हरणाचें रूप धारण करणारा मारीच राक्षस आहे. ह्याविषयीं अगदीं संशय नको. असा विलक्षण हरिण सृष्टींत असेल कोठून ?' ॥ ९ ॥ राम ह्मणाला :– 'लक्ष्मणा, जर हा मारीचच असेल, तर मी ह्याचा वध करीन, ह्यांत संदेह नाहीं. बरें हरिण असेल तर, सीतेला विसांवा मिळावा किंवा कर्मणूक व्हावी एवढ्यासाठीं, घेऊन येईन. ॥ १० ॥ आतां मी जातों, व लवकरच हरणाला बांधून घेऊन येतों. तूं दक्षतेनें सीतेच्या संरक्षणासाठीं उद्युक्त राहा.'॥ ११॥ असें सांगून रामचंद्र त्या मायावी मृगाच्या मागें धांवत गेला ! - (शंकर ह्मणतात :– पार्वति,) रामाचें

अतो ऽत्रावहितः साध्वीं रक्ष सीतामनिन्दिताम्[१] ॥ लक्ष्मणो राममाहेदं देवायं मृगरूपधृक् ॥ मारीचो ऽत्र न संदेह एवंभूतो मृगः कुतः ॥ ९ ॥ श्रीराम उवाच । यदि मारीच एवायं तदा हन्मि[२] न संशयः ॥ मृगश्चेदानयिष्यामि सीतांविश्रामहेतवे[३] ॥ १० ॥ गमिष्यामि मृगं बद्ध्वा ह्यानयिष्यामि सत्वरः ॥ त्वं प्रयत्नेन संतिष्ठ सीतासंरक्षणोद्यतः ॥ ११ ॥ इत्युक्त्वा प्रययौ रामो मायामृगमनुद्रुतः ॥

अतः त्वं अवहितः [सन्] (पू.) सीतां रक्ष. ' ॥ लक्ष्मणः रामं इदं आह – ' (मू.) ?' ॥ ९ ॥ श्रीराम उवाच – ' (मू.) आनयिष्यामि. ॥ १० ॥ अहं सत्वरः [सन्] (मू.) संतिष्ठ. ' ॥ ११ ॥ (पू.) रामः प्रययौ. ॥

---

१ कोणी निंदा केली नाहीं जिची, अशी. २ मारतों. ३ सीतेला विसांव्यासाठीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सामर्थ्य ह्मणजे केवढें प्रचंड तें लक्षांत आण :- लोकांना मोह घालणारी व जगाच्या रूपानें परिणाम पावणारी माया त्याच्या आश्रयानें राहते; ॥ १२ ॥ तो निर्विकार असून केवल चैतन्यरूप आहे; त्याच्या सर्व कामना निरंतर पूर्ण आहेत, - कारण तो आनंदमय होय. - तथापि तो त्या हरिणाच्या पाठीमागें धांवत सुटला ! - ह्यावरून उघड होतें कीं - 'भगवान् भक्तांवर दया करणारा व त्यांचीं दुःखें दूर करणारा आहे,' हें वचन सत्य होय. ॥ १३ ॥ ह्मणूनच तो, - 'हा मृग खरा नसून राक्षस आहे' हें - जाणत असूनही, सीतेची कामना पूर्ण करण्यासाठीं मृगाच्या पाठीमागें धांवला. असें न म्हणावें तर वस्तुतः राम नित्य पूर्णकाम आहे; त्याला आत्मस्वरूप कळतें; ॥ १४ ॥ तेव्हां त्या परमेश्वराला हरणाशीं किंवा स्त्रीशीं करावयाचें होतें काय ? असो. तो हरिण कांहीं वेळ अगदीं जवळ दिसे, क्षणांत धांवत सुटे, अंमळशानें गुप्त होई,॥१५॥ कांहीं वेळानें पुष्कळ लांबसा दिसे. अशा रीतीनें त्यानें रामाला - हुलकावण्या दाखवून - बऱ्याच अंतरावर

माया यदाश्रया लोकमोहिनी जगदाकृतिः ॥ १२ ॥ निर्विकारश्चिदात्मा ऽपि
पूर्णो ऽपि मृगमन्वगात् ॥ भक्तानुकम्पी भगवानिति सत्यं वचो हरिः ॥ १३ ॥
कर्तुं सीताप्रियार्थाय जानन्नपि मृगं ययौ ॥ अन्यथा पूर्णकामस्य रामस्य विदि-
तात्मनः ॥ १४ ॥ मृगेण वा स्त्रिया वा ऽपि किं कार्यं परमात्मनः ॥ कदाचिद्दृश्य-
ते ऽभ्याशे क्षणं धावति लीयते ॥ १५ ॥ दृश्यते च ततो दूरादेवं राममपाहरत् ॥
(मू.)माया यदाश्रया[वर्तते.]॥१२॥(पू.)॥हरिः(मू.)सत्यं.॥१३॥(मू).॥१४॥परमात्मनः(मू.)॥१५॥(पू.)॥

१ पुरल्या इच्छा ज्याच्या, अशा. २ जाणिला आत्मा ज्यानें, अशा. ३ समीपभागीं. ४ धांवतो. ५ गुप्त होतो. ६ दूर नेता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

काढून नेलें. तेव्हां रामाच्याही स्पष्टपणें ध्यानांत आलें कीं, हा राक्षसच आहे. ॥ १६ ॥ पुढें त्यानें एक बाण घेऊन त्या हरिणरूपी राक्षसावर सोडिला. त्याबरोबर तत्काल मारीच आपलें पूर्वींचें (खरें) रूप घेऊन भूमीवर पडला. त्याचें तोंड रक्तानें भरून गेलें. ॥१७॥ पडतां पडतां त्या राक्षसानें रामासारखा स्वर काढून 'हाय हाय ! मेलोंरे मेलों ! हे महाबाहो लक्ष्मणा ! लवकर येऊन माझें संरक्षण कर !' असे उद्गार काढिले ! ॥ १८ ॥ अज्ञानी प्राण्यानेंदेखील मरणसमयीं ज्याचें नुसतें नामस्मरण केलें तर त्याला सायुज्यमुक्ति प्राप्त होते, त्या प्रभूच्या अग्रभागीं व त्याच्या स्वरूपाचें ध्यान करीत मारीचाला मरण आलें; शिवाय प्रत्यक्ष रामचंद्राच्या हातून त्याचा वध झाला. तेव्हां त्याला मुक्ति मिळाली ह्यांत नवल तें काय ? ॥ १९ ॥ त्याच्या देहांतून बाहेर पडलेलें तेज

ततो रामोऽपि विज्ञाय राक्षसोऽयमिति स्फुटम् ॥ १६ ॥ विव्याध शरमादाय राक्षसं मृगरूपिणम् ॥ पपात रुधिराक्तास्यो मारीचः पूर्वरूपधृक् ॥१७॥ हा हतोऽस्मि महाबाहो त्राहि लक्ष्मण मां द्रुतम् ॥ इत्युक्त्वा रामवद्वाचा पपात रुधिराशनः ॥ १८ ॥ यन्नामाज्ञोऽपि मरणे स्मृत्वा तत्साम्यमाप्नुयात् ॥ किमुताग्रे हरिं पश्यंस्तेनैव निहतोऽसुरः ॥ १९ ॥ तद्देहादुत्थितं तेजः सर्वलोकस्य पश्यतः ॥

(मू.) विज्ञाय ॥ १६ ॥ (पू.) राक्षसं विव्याध. ॥ (मू.) [सन्] पपात. ॥ १७ ॥ रुधिराशनः 'महाबाहो लक्ष्मण, (पू.) त्राहि.' (मू.) उक्त्वा पपात. ॥ १८ ॥ अज्ञः अपि मरणे (मू.) [सायुज्यं प्राप्तः इति] किमुत ? ॥ १९ ॥ (पू.) [सतः] ॥

१ घेऊन. २ प्रहार केला. ३ रक्तानें भरलें मुख ज्याचें, असा ४ मूळचें रूप घेणारा. ५ शीघ्र. ६ पावेल.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारीचाला स·
द्गति मिळाली.

सर्व लोकांच्या समक्ष रामाच्याच स्वरूपीं येऊन मिळालें. ह्या वेळीं देवांना परम विस्मय वाटला. ॥२०॥ - ते ह्मणाले :- 'अहो ! हा मारीच ह्मटला ह्मणजे मुनींचा घात करणारा महापातकी! ह्यानें कर्मे केलीं काय आणि स्थान मिळविलें कोणतें ! (ह्याच्या कर्माप्रमाणें ह्याला नरकांत पचत पडणें भाग होतें, पण मुक्ति मिळाली हें आहे तरी काय?) अथवा, हा रामचंद्राचा महिमा आहे, ह्यांत संशय नाहीं. ॥२१॥ पूर्वी ह्याला एकदां रामाच्या बाणाचा प्रहार लागला होता, तेव्हांपासून हा भीतीमुळें घर, द्रव्य जेंजें कांहीं होतें तें सर्व सोडून देऊन रामाचें ध्यान करीत राहत असे. ॥२२॥ हृदयांत रामाचें सतत चिंतन चाललें असल्यामुळें ह्याचीं अखिल पापें नष्ट झालीं; शिवाय ह्याला रामाच्या हातून मरण आलें आणि अंतकाळीं रामाचें दर्शन मिळालें; ह्मणून हा त्या आनंदमय प्रभूच्या स्वरूपीं प्राप्त झाला. ॥ २३ ॥ प्राणी ब्राह्मण, राक्षस, पापी किंवा अधर्मी कसा कां असेना; देह-

राममेवाविशद्[1]देवा विस्मयं परमं ययुः ॥ २० ॥ किं कर्म कृत्वा किं प्राप्तः पातकी मुनिहिंसकः ॥ अथवा राघवस्यायं म[2]हिमा नात्र संशयः ॥ २१ ॥ रामबाणेन संविद्धः पूर्वं राममनुस्मरन्॥भयात्सर्वं परित्यज्य गृहवित्तादिकं च यत् ॥२२॥ हृदि रामं सदा ध्यात्वा निर्धूताशेषकल्मषः ॥ अंते रामेण निहतः पश्यन् राममवाप सः ॥ २३ ॥ द्विजो वा राक्षसो वा ऽपि पापी वाऽधार्मिको ऽपि वा ॥

(मू.). ॥ २० ॥ ' मुनिहिंसकः पातकी (मू.). ॥ २१ ॥ (उ.) [तद्] सर्वं भयात् परित्यज्य ॥ (पू.) ॥ [स्थितः] ॥ २२ ॥ (मू.) पश्यन् सः [रामं] अवाप. ॥ २३ ॥ (पू.) ॥

१ अविशत् शिरलें. २ मोठेपणा. ३ टाकून. ४ ताडिलेला. ५ निःशेष धुवून गेलीं सर्व पापें ज्याचीं, असा. ६ पावला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यागाच्या वेळीं रामाचें स्मरण करील तर तो उत्तम पदास पावतो. ' ॥ २४ ॥ ते देव परस्परांशीं असें भाषण करून नंतर स्वर्गी निघून गेले. इकडे रामाच्या मनांत विचार येऊं लागले कीं, " ह्या अधम दैत्यानें मरतां मरतां ॥ २५ ॥ 'हा लक्ष्मणा !' असें माझ्या भाषणाचें अनुकरण करून मग प्राण सोडिले ह्याचें कारण काय ? बरें, माझ्या उद्गारासारखे शब्द ऐकून सीतेला तरी काय वाटलें असेल ? " ॥ २६ ॥ अशा काळजीनें रामाचें अंतःकरण व्यापून सोडिलें व तो त्या लांबच्या प्रदेशांतून मागें परतला. इकडे, त्या दुष्ट मारीचाचें वाक्य कानीं आल्याबरोबर सीता ॥ २७ ॥ भिऊन गेली व अतिदुःखाकुल होत्साती

त्यजन्कलेवरं रामं स्मृत्वा याति परं पदम् ॥ २४ ॥ इति ते ऽन्योन्यमाभाष्य[1] ततो देवा दिवं ययुः ॥ रामस्तच्चिन्तयामास[2] म्रियमाणो[3] ऽसुराधमः ॥ २५ ॥ हा लक्ष्मणेति मद्वाक्यमनुकुर्वन्[4]ममार किम्[5] ॥ श्रुत्वा मद्वाक्यसदृशं[6] वाक्यं सीताऽपि किं[7] भवेत् ॥ २६ ॥ इति चिंतापरीतात्मा[8] रामो दूरान्न्यवर्तत[9] ॥ सीता तद्भाषितं श्रुत्वा मारीचस्य दुरात्मनः ॥ २७ ॥ भीता ऽतिदुःखसंविग्ना[10] लक्ष्मणं त्विदमब्रवीत् ॥

कलेवरं (मू.) याति. ' ॥ २४ ॥ ते देवाः (मू.) ॥ २५ ॥ (पू) ? ॥ सीता अपि (मू.) श्रुत्वा किं भवेत् ? ॥ २६ ॥ (मू.). मारीचस्य तत् भाषितं श्रुत्वा ॥ २७ ॥ (पू.) — ॥

---

१ भाषण करून. २ विचार करूं लागला. ३ मरणारा. ४ **अनुकुर्वन्** तसें अनुकरण करणारा (सारखा शब्द काढणारा). ५ कां. ६ माझ्या शब्दासारख्या. ७ काय. ८ चिंतेनें व्यापलें मन ज्याचें, असा. ९ परतला. १० अति दुःखानें खिन्न.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सीता लक्ष्मणावर रागावते.

लक्ष्मणाला ह्मणाली :– "लक्ष्मणा ! बाबा लवकर जा ! तुझ्या भावावर त्या राक्षसानें कांहीं तरी बिकट प्रसंग आणिला आहे ! ॥ २८ ॥ 'हा लक्ष्मणा !' असे आपल्या भावाचे शब्द ऐकिले नाहींस काय ?" ह्यावर लक्ष्मणानें तिला सांगितलें :– 'देवि जानकी ! तें रामाचें भाषण नव्हे. ॥ २९ ॥ त्या क्षुद्र राक्षसानें मरतां मरतां तसे उद्गार काढिले ! देवि ! जो राम क्रुद्ध झाला तर क्षणमात्रांत त्रैलोक्याचा देखील नाश करूं शकेल, ॥ ३० ॥ - आणि अशा अतुल प्रभावामुळें - देव ज्याचें पूजन करितात, तो प्रभु असें दीन वचन उच्चारील कसें ?' सीतेनें रागावून लक्ष्मणावर डोळे वटारिले ! तिच्या नेत्रांतून अश्रुधारा चालूं लागल्या ! ॥ ३१ ॥ अशा स्थितींत ती लक्ष्मणाला ह्मणाली :– 'लक्ष्मणा, तुझी बुद्धि मला वक्र दिसते ! दुष्टा !

गच्छ लक्ष्मण वेगेन भ्राता ते ऽसुरपीडितः ॥२८॥ हा लक्ष्मणेति वचनं भ्रातुस्ते न शृणोषि किम् ॥ तामाह लक्ष्मणो देवि रामवाक्यं न तद्भवेत् ॥२९॥ यःकश्चिद्राक्षसो देवि म्रियमाणो ऽब्रवीद्वचः ॥ रामस्त्रैलोक्यमपि यः क्रुद्धो नाशयति क्षणात् ॥ ३० ॥ स कथं दीनवचनं भाषते ऽमरपूजितः[1] ॥ क्रुद्धा लक्ष्मणमालोक्य सीता बाष्पविलोचना[2] ॥ ३१ ॥ प्राह लक्ष्मण दुर्बुद्धे भ्रातुर्[3]व्यसनम्[4]इच्छसि ॥

'लक्ष्मण, वेगेन गच्छ; ते (मू.) ॥२८॥ ते भ्रातुः (पू.) ?' ॥ लक्ष्मणः (मू.) तत् रामवाक्यं न भवेत्. ॥ २९ ॥ देवि, (पू.) [सन्] वचः अब्रवीत् ॥ यः रामः क्रुद्धः [सन्] क्षणात् (मू), ॥ ३० ॥ अमरपूजितः (पू) कथं भाषते ? लक्ष्मणं आलोक्य (मू.) सीता ॥ ३१ ॥ प्राह – '(पू.) ॥

१ देवांनीं पूजिलेला. २ आंसवें नेत्रांत जिच्या, अशी. ३ भावाच्या. ४ दुःखाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भावावर वेडा वांकडा प्रसंग यावा अशीच तुझी इच्छा असावी! भरत रामाच्या नाशाची वाटच पाहत राहिला आहे, - आणि मला वाटतें - त्यानेंच तुला - आह्मांबरोबर - पाठविलें. ॥ ३२ ॥ रामाचा नाश झाला ह्मणजे मला घेऊन जावें, एवढ्यासाठीं तूं येथें आला आहेस.- पण पक्कें लक्षांत ठेव कीं, - तुला माझी प्राप्ति होणार नाहीं. ही पहा, मी आतांच येथें प्राण देत्यें ! ॥ ३३ ॥ बायकोला हरण करून न्यावयाची तयारी आणि हें तुझें कृत्रिम रामाच्या कांहीं लक्ष्यांत आलें नाहीं. - पण मी तुला निक्षून सांगत्यें कीं, - रामाशिवाय दुसऱ्याचा—तुझा काय आणि भरताचा काय—मी आपल्याला स्पर्श देखील करून घेणार नाहीं. ' ॥ ३४ ॥ सीता असें बोलून आपल्या हातांनीं स्वतांला बडवून घेऊं लागली; आणि तिनें रडण्यास

प्रेषितो भरतेनैव रामनाशाभिकांक्षिणा[1] ॥ ३२ ॥ मां नेतुमागतोऽसि त्वं रामनाश उपस्थिते[3] ॥ न प्राप्स्यसे[4] त्वं मामद्य पश्य प्राणांस्त्यजाम्यहम् ॥ ३३ ॥ न जानातीदृशं रामस्त्वां भार्याहरणोद्यतम्[5] ॥ रामादन्यं न स्पृशामि त्वां वा भरतमेव वा ॥ ३४ ॥ इत्युक्त्वा वध्यमाना[7] सा स्वबाहुभ्यां रुरोद ह ॥ तच्छ्रुत्वा लक्ष्मणः कर्णौ पिधार्यातीव[8] दुःखितः ॥ ३५ ॥

(मू.)भरतेन एव प्रेषितः[2] [असि]. ॥३२॥ त्वं (पू.) ॥ त्वं मां (मू.) अहं प्राणान् त्यजामि. ॥३३॥ रामः (पू.) त्वां न जानाति. (मू.) न स्पृशामि[6].' ॥३४॥ इति उक्त्वा स्वबाहुभ्यां (मू.) लक्ष्मणः आह—॥३५॥

१ रामाच्या नाशाची इच्छा करणाऱ्या. २ पाठविलेला. ३ प्राप्त झाला असतां. ४ पावशील. ५ पत्नीला हरून नेण्यास तत्पर. ६ स्पर्श करीन. ७ मारून घेणारी. ८ आच्छादून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रावण आश्रमीं आला.

प्रारंभ केला. तिचें तें भाषण लक्ष्मणाला ऐकवेना; ह्मणून त्यानें कानांवर हात ठेविले. खरोखर त्याला परमावधि दुःख झालें. ॥ ३५ ॥ (तो सीतेला ह्मणाला :—) 'जानकि, तूं फारच तापट बायको आहेस. मला असें बोलतेस, त्याअर्थी तुला धिक्कार असो ! तूं येथून नाहींशी होशील ! ' असें बोलून लक्ष्मणानें सीतेला वनदेवतांच्या स्वाधीन केलें; ॥ ३६ ॥ आणि तो स्वतां अत्यंत दुःखाकुल होत्साता हळूहळू रामाकडेच जावयास निघाला. रावणाला ही संधि सांपडली. तो संन्याशाचें सोंग घेऊन ॥ ३७ ॥ सीतेजवळ आला. त्याच्या हातांत दंड कमंडलु शोभत होते. त्याला पाहिल्याबरोबर तत्काल सीतेनें नमस्कार करून भक्तिपुरःसर त्याची पूजा केली, ॥ ३८ ॥ व कंद मुळें वगैरे अर्पण करून त्याला ह्मटलें :— ' मुने, आपण आलां'

मामेवं भाषसे चण्डि धिक् त्वां नाशमुपैष्यसि॥ इत्युक्त्वा वनदेवीभ्यः समर्प्य जनकात्मजाम् ॥३६॥ ययौ दुःखातिसंविग्नो राममेव शनैः शनैः ॥ ततोऽन्तरं समालोक्य रावणो भिक्षुवेषधृक् ॥३७॥ सीतासमीपमगमत्स्फुरद्दण्डकमण्डलुः ॥ सीता तमवलोक्याशु नत्वा संपूज्य भक्तितः ॥ ३८ ॥ कन्दमूलफलादीनि दत्त्वा स्वागतमब्रवीत् ॥ मुने भुंक्ष्व फलादीनि विश्रमस्व यथासुखम् ॥ ३९ ॥

' चंडि[1] ! (पू.).' ॥ (मू.). समर्प्य[3] ॥ ३६ ॥ (पू.) ययौ. ॥ (३७ उ.) स्फुरद्दण्डकमण्डलुः[5] रावणः सीतासमीपं अगमत्. ॥ (मू.) संपूज्य, ॥ ३७ ॥ ३८ ॥ (पू.) – ॥ ' मुने, फलादीनि (मू.) विश्रमस्व[6]. ॥ ३९ ॥

१ रागीट स्त्रिये. २ पावशील. ३ स्वाधीन करून. ४ अवकाश (संधि). ५ चमकतात दंडकमंडलु ज्याचे असा. ६ विसांवा घे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

फार चांगली गोष्ट झाली. हीं फळें वगैरे भक्षण करून सुखानें विश्रांति घ्यावी. ॥ ३९ ॥ माझे पति आतां लवकरच येतील आणि आपला ह्याच्यापेक्षांही अधिक सत्कार करितील. आपल्या इच्छेस येत असेल, तर येथें बसावें.' ॥ ४० ॥ संन्यासी ह्मणाला :– 'सुंदरि, तुझें स्वरूप इतकें मनोहर दिसत आहे कीं त्याला नांव ठेवण्यास यत्किंचित् देखील जागा नाहीं. तुझे नेत्र कमलपत्राप्रमाणें आहेत. तूं कोण, तुझा पति कोण, आणि ह्या राक्षसांनीं घेरलेल्या अरण्यांत कां राहतेस, तें सांग. नंतर मींही आपला सर्व वृत्तांत निवेदन करीन.' ॥ ४१ ॥ सीतेनें उत्तर दिलें :– 'स्वामी ! अयोध्यानगरींत दशरथ ह्या नांवाचा महाशूर व श्रीमान् राजा होऊन गेला. त्याचा राम ह्मणून सर्वगुणसंपन्न ज्येष्ठ पुत्र आहे. ॥ ४२ ॥

इदानीमेव भर्ता मे ह्यागमिष्यति ते प्रियम् ॥ करिष्यति विशेषेण तिष्ठ त्वं यदि रोचते ॥ ४० ॥ भिक्षुरुवाच ॥ का त्वं कमलपत्राक्षि को वा भर्ता तवानघे ॥ किमर्थमत्र ते वासो वने राक्षससेविते ॥ ब्रूहि भद्रे ततः सर्वं स्ववृत्तान्तं निवेदये[२] ॥ ४१ ॥ सीतोवाच ॥ अयोध्याधिपतिः श्रीमान् राजा दशरथो महान् ॥ तस्य ज्येष्ठः सुतो रामः सर्वलक्षणलक्षितः ॥ ४२ ॥

इदानीं एव मे (पू.) ॥ विशेषेण (मू.) त्वं तिष्ठ.' ॥४०॥ भि० उ० – 'कमलपत्राक्षि अनघे, त्वं का ? तव भर्ता कः वा ? ॥ (द्वि.) वने ते वासः किमर्थं ? ॥ भद्रे, (मू.).' ॥ ४१ ॥ सी० उ० – '(पू.) दशरथः (मू.) रामः. ॥ ४२ ॥

१ बरें वाटतें. २ सांगतों.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो.
समू-सान्व.
साटिप्पण.
॥४६॥

अर-कांड.
सर्ग ७
सीतेचा व संन्याशाचा संवाद.

मी त्याची धर्मपत्नी जनकराजाची कन्या सीता. त्याचा लक्ष्मण नामक धाकटा भाऊ आहे; तो आपल्या भावावर पराकाष्ठेची प्रीति करितो. ॥ ४३ ॥ रामचंद्र पित्याची आज्ञा शिरसा वंद्य मानून चवदा वर्षें अरण्यांत राहायाला आला आहे. महाराज, आपला वृत्तांत ऐकावा अशी मला इच्छा आहे, तर तो निवेदन करा.' ॥ ४४ ॥ तो संन्यासी सांगूं लागला :– 'जानकी ! मी पौलस्त्याचा पुत्र राक्षसांचा राजा रावण. तुझ्या विषयींच्या कामनेनें तप्त होऊन गेल्यामुळें मी तुला आपल्या राजधानींत नेण्यासाठीं येथें आलों आहें. ॥ ४५ ॥ राम ह्मणजे वैराग्याच्या वेष घेऊन राहणारा ! त्याच्याशीं तूं करणार काय? माझ्या आश्रयानें राहा आणि मजबरोबर यथेच्छ उपभोग भोग. ॥ ४६ ॥

तस्याहं धर्मतः पत्नी सीता जनकनन्दिनी ॥ तस्य भ्राता कनीयांश्च लक्ष्मणो भ्रातृवत्सलः ॥४३॥ पितुराज्ञां पुरस्कृत्य दण्डके वस्तुमागतः॥ चतुर्दश समास्त्वां तु ज्ञातुमिच्छामि मे वद ॥४४॥ भिक्षुरुवाच॥ पौलस्त्यतनयोऽहं तु रावणो राक्षसाधिपः ॥ [1]त्वत्कामपरितप्तोऽहं त्वां नेतुं [2]पुरमागतः॥ ४५ ॥ मुनिवेषेण रामेण किं करिष्यसि मां [4]भज॥ भुंक्ष्व भोगान्मया सार्धं त्यज दुःखं वनोद्भवम् ॥४६॥

(पू.) अहं ॥ तस्य कनीयान् (मू.) [अस्ति]. ॥४३॥ [रामः] (पू.) चतुर्दश समाः वस्तुं आगतः. (मू.). ॥ ४४ ॥ भि० उ० – ' अहं (पू.) रावणः [अस्मि]. ॥ (मू.) नेतुं[3] आगतः. ॥ ४५ ॥ (पू.); ॥ मया सार्धं भोगान् भुङ्क्ष्व; वनोद्भवं दुःखं त्यज. ' ॥ ४६ ॥ ॥ ४६ ॥

---

१ तुजविषयीं अभिलाषामुळें संतप्त झालेला. २ नगरास. ३ नेण्यासाठीं. ४ आश्रय कर. ५ उपभोग घे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हें वनवासाचें दुःख सोडून दे. ' ॥ ४६ ॥ हें भाषण ऐकतांच सीता भिऊन गेली व आवेशानें त्याला थोडेंसें बोललीः तें येणेंप्रमाणें :– ' दुष्टा ! ज्या अर्थी तूं मला असें बोलत आहेस, त्या अर्थी रामाच्या हातून नाश पावशील ! ॥ ४७ ॥ क्षणभर दम धर. राम देखील आपल्या धाकल्या भावासह आतां येईलच. अरे ! मला भीति दाखविण्यास समर्थ आहे कोण ? तसा प्रयत्न करणें ह्मणजे एखाद्या क्षुद्र सशानें सिंहाच्या पत्नीला भेवडावण्याचा आव घालण्यासारखें आहे ! ॥ ४८ ॥ रामाच्या बाणांनीं छिन्न विच्छिन्न होऊन भूमितलावर (धूळ खात) पडावें लागेल - ठाऊक नाहीं अजून ! - ' हें सीतेचें वाक्य कानीं पडतांच रावण क्रोधामुळें देहभान विसरला. ॥ ४९ ॥ त्यानें आपलें प्रचंड पर्वतासारखें रूप प्रकट केलें. दहा मुखें; वीस

श्रुत्वा तद्वचनं सीता भीता किंचिदुवाच तम् ॥ यदेवं भाषसे मां त्वं नाशमेष्यसि राघवात् ॥ ४७ ॥ आगमिष्यति रामो ऽपि क्षणं तिष्ठ सहानुजः ॥ मां को धर्षयितुं शक्तो हरेर्भार्यां शशो यथा ॥ ४८ ॥ रामबाणैर्विभिन्नस्त्वं पतिष्यसि महीतले ॥ इति सीतावचः श्रुत्वा रावणः क्रोधमूर्छितः ॥ ४९ ॥ स्वरूपं दर्शयामास महापर्वतसन्निभम् ॥ दशास्यं विंशतिभुजं कालमेघसमद्युति ॥ ५० ॥

तद्वचनं श्रुत्वा भीता (पू.) उवाच–' यत् त्वं मां एवं भाषसे, [ततः] राघवात् नाशं एष्यसि. ॥ ४७ ॥ सहानुजः रामः अपि (पू.) ॥ यथा हरेः भार्यां शशकः, [तथा] (मू.)? ॥४८॥ (पू.) पतिष्यसि. ' ॥ (मू.) रावणः ॥ ४९ ॥ (मू.) स्वरूपं दर्शयामास. ॥ ५० ॥

१ सिंहाच्या. २ ससा. ३ पडशील. ४ दहा मुखें ज्याला, असें. ५ वीस हात ज्याला, असें. ६ काळ्या मेघासारखी कांति ज्याची, असें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रावण सीतेला घेऊन चालला.

हात; कृष्णवर्ण मेघासारखी कांति; असें ॥ ५० ॥ तें स्वरूप दृष्टीस पडल्याबरोबर वनदेवता आणि एकंदर सर्व प्राणी भिऊन गेले. पुढें, रावणानें - ‘ सीतेचे पाय भूमीला लागलेले आहेत तोंपर्यंत आपल्याच्यानें तिला उचलून नेणें अशक्य आहे, ’ असा विचार करून - आपल्या नखांनीं सीतेच्या पायांखालची जमीन उकरली, बाहूंनीं तिला उचलून, ॥ ५१ ॥ तोल संभाळून रथांत घातलें, आणि आकाशमार्गानें तत्काल प्रयाण केलें. ती जनककन्या ‘ हा रामा ! हा लक्ष्मणा ! ’ असें ह्मणून आक्रोश करूं लागली. ॥ ५२ ॥ दीन अबलाच ती, - भयानें इतकी गांगरून गेली कीं - तिच्यानें वर बघवेना; तिची दृष्टि खालीं भूमीकडेच लागून राहिली. सीतेचें तें दीन ओरडणें ऐकून पक्षिराज ॥ ५३ ॥ जटायु लागलाच पर्वताच्या शिखरावरून

तद्दृष्ट्वा वनदेव्यश्च भूतानि च वितत्रसुः ॥ ततो विदार्य धरणीं नखैरुद्धृत्य बाहुभिः ॥ ५१ ॥ तोलयित्वा[5] रथे क्षिप्त्वा[6] ययौ क्षिप्रं[7] विहायसा[8] ॥ हा राम हा लक्ष्मणेति रुदन्ती जनकात्मजा ॥ ५२ ॥ भयोद्विग्नमना[9] दीना पश्यन्ती भुवमेव सा ॥ श्रुत्वा तत्क्रन्दितं दीनं सीतायाः पक्षिसत्तमः ॥ ५३ ॥ जटायुरुत्थितः शीघ्रं नगाग्रात्तीक्ष्णतुण्डकः ॥

(पू.) ॥ ततः रावणः नखैः[1] धरणीं[2] विदार्य[3], बाहुभिः उत्धृत्य[4], ॥५१॥ (पू.) ययौ. ॥ (मू.) ॥ ५२ ॥ (पू.) भुवं[10] एव पश्यंती [आसीत्]. ॥ सीतायाः दीनं तत् क्रंदितं श्रुत्वा पक्षिसत्तमः ॥ ५३ ॥ नगाग्रात्[11] शीघ्रं उत्थितः तीक्ष्णतुंडकः[12] जटायुः ॥

१ भ्याल्या. २ भूमीला. ३ फाडून. ४ उचलून. ५ तोलून. ६ ठेवून. ७ जलद. ८ आकाशमार्गानें. ९ भयानें त्रस्त मन जीचें, अशी. १० भूमीला. ११ पर्वताच्या शिखरावरून. १२ तीक्ष्ण चंचु ज्याची, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उठला. त्याची चोंच - शस्त्राप्रमाणें बळकट व - तीक्ष्ण होती. तो रावणाला ह्मणाला :– ‘ अरे ! ज्याप्रमाणें यज्ञांतील मंत्रांच्या योगानें पवित्र झालेला पुरोडाश - ऋत्विजांच्या नकळत - एखाद्या कुत्र्यानें उचलून न्यावा, त्याप्रमाणें, ह्या अरण्यांतील आश्रमांत कोणी नाहीं असें पाहून तूं त्रैलोक्याधिपतीच्या पत्नीला चोरून घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत आहेस खरा; पण माझ्यापुढें जाणार कोण? (मी येथें बसलों आहें, तोंपर्यंत सीतेला नेण्याचें कोणालाही सामर्थ्य नाहीं.) ’ ॥ ५४ ॥ ५५ ॥ असें बोलून जटायूनें आपल्या तीक्ष्ण चंचूच्या योगानें त्याचा रथ मोडून टाकिला ,घोड्यांचे फाडून तुकडे उडविले, आणि पायांनीं धनुष्याचें चूर्ण

तिष्ठ तिष्ठेति तं प्राह को गच्छति ममाग्रतः ॥ ५४ ॥ मुषित्वा लोकनाथस्य भार्यां
शून्याद्वनालयात् ॥ शुनको मन्त्रपूतं त्वं पुरोडाशमिवाध्वरे ॥ ५५ ॥ इत्युक्त्वा तीक्ष्णं[10]
तुण्डेन चूर्णयामास तद्रथम् ॥ वाहान्[11] बिभेद[12] पादाभ्यां चूर्णयामास तद्धनुः[13] ॥ ५६ ॥

तं प्राह – ‘ त्वं तिष्ठ, तिष्ठ; अध्वरे[1] मंत्रपूतं[2] पुरोडाशं[3] शुनकः[4] इव, शून्यात्[5] वनालयात्[6] लोकनाथस्य[7] भार्यां मुषित्वा[8] मम अग्रतः[9] कः गच्छति ? ’ ॥ ५४ ॥ ५५ ॥ (पू.) चूर्णयामास[14] ! ॥ (मू.) चूर्णयामास[14]. ॥ ५६ ॥

१ यज्ञांत. २ मंत्रांनीं पवित्र, अशा. ३ पुरोडाशनांवाच्या होमद्रव्याला. ४ कुत्रा. ५ ज्यांत कोणी रक्षक नाहीं अशा. ६ अरण्यांतील आश्रमांतून. ७ जगाच्या अधिपतीच्या. ८ चोरून. ९ पुढून. १० तीक्ष्ण चोंचीनें. ११ घोड्यांना. १२ फाडिता झाला. १३ त्याच्या धनुष्याला. १४ चुरिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जटायुरावणां-
चा संग्राम.

करून सोडिलें. ॥ ५६ ॥ तेव्हां रावणानें क्रोधाविष्ट होऊन सीतेला सोडून दिलें आणि खड्ग घेऊन त्या बुद्धिमान् व उदार पक्षिराजाचे पंख तोडिले. ॥ ५७ ॥ तत्काल तो पक्षिराज जटायु - मरणोन्मुख होऊन - भूमीवर पडला. त्याच्या प्राणांची उर्गीच कोठें थोडी धुगधुगी राहिली होती. इकडे, रावणानें - मायेच्या योगेंकरून - पुन्हां दुसरा रथ उत्पन्न केला, त्यांत सीतेला ठेविलें आणि लागलाच - आपल्या राजधानीचा रस्ता धरिला. - ॥ ५८ ॥ सीतेला आपलें रक्षण करणारा कोणीच मिळेना, तेव्हां एकावर एक हुंदके येऊं लागले. 'हा रामा ! हा आनंददायका ! हा त्रैलोक्यनाथा रामचंद्रा ! मी संकटांत पडल्यें आहें, हें आपल्याला - अजून कसें - दिसत नाहीं ! ॥ ५९ ॥ रघुपते ! हा राक्षस आपल्या धर्मपत्नीला घेऊन चालला !

ततः सीतां परित्यज्य रावणः खड्गमाददे ॥ चिच्छेद पक्षौ सामर्षः पक्षिराजस्य धीमतः ॥ ५७ ॥ पपात किंचिच्छेषेण प्राणेन भुवि पक्षिराट् ॥ पुनरन्यरथेनाशु सीतामादाय रावणः ॥ ५८ ॥ क्रोशन्ती राम रामेति त्रातारं नाधिगच्छती ॥ हा राम हा जगन्नाथ मां न पश्यसि दुःखिताम् ॥ ५९ ॥ रक्षसा नीयमानां स्वां भार्यां मोचय राघव ॥ हा लक्ष्मण महाभाग त्राहि मामपराधिनीम् ॥ ६० ॥

ततः सामर्षः रावणः (मू.) धीमतः पक्षिराजस्य पक्षौ चिच्छेद. ॥ ५७ ॥ पक्षिराट् (पू.) पपात. ॥ रावणः (उ.) [अगच्छत्]. ॥५८॥ ' राम ! राम ! ' इति (पू.) [सीता] ॥' (उ.) ! दुःखितां मां [किं] न पश्यसि ! ' [इति विललाप]. ॥ ५९ ॥ ' राघव ! (मू.) मां त्राहि. ॥ ६० ॥

१ रागावलेला. २ तोडिता झाला. ३ रक्षण करणाराला. ४ न पावणारी. ५ राक्षसानें. ६ नेली जाणाऱ्या. ७ सोडव. ८ अपराध केला जिनें, अशा. ९ रक्षण कर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हिला सोडवा हो ! लक्ष्मणा ! तूं सद्गुणांचा केवल निधि आहेस. मी तुझा अपराध केला, - पण तें लक्षांत न धरितां आतां येऊन - माझें रक्षण कर. ॥ ६० ॥ भावोजी ! मी तुह्मांला बोलूं नयेत असे अपशब्द बोललयें ! त्या वाग्बाणांनीं तुमच्या हृदयाला क्षतें पडलीं असतील ! पण आतां मला क्षमा करा ! ' अशा प्रकारें सीतेनें एकसारखा विलाप चालविला होता. पण रावण तिकडे लक्ष न देतां, - राम येईल ह्या भीतीमुळें तिला घेऊन सत्वर वायुवेगानें निघून चालला. ॥ ६१ ॥ रावण आकाशांतून सीतेला घेऊन चालला तेव्हां ती अधोवदन (किंवा भूमीकडे दृष्टि लावून) बसली होती. इतक्यांत, पर्वताच्या शिखरावर बसलेले पांच वानर त्या कमलवदनेच्या दृष्टीस पडले. ॥ ६२ ॥ तत्काल तिनें आंगावरील अलंकार उतरिले, उत्तरीय वस्त्राचा

वाक्शरेण[2] हतस्त्वं मे क्षन्तुमर्हसि[3] देवर ॥ इत्येवं क्रोशमानां[4] तां रामागमनशंकया ॥ जगाम वायुवेगेन सीतामादाय सत्वरः ॥ ६१ ॥ विहायसा[5] नीयमाना सीता ऽपश्यदधोमुखी[6] ॥ पर्वताग्रस्थितान्पञ्च वानरान्वारिजानना ॥ ६२ ॥ उत्तरीयार्धखण्डेन विमुच्याभरणादिकम् ॥

देवर[1] ! (पू.) ! ' ॥ इति एवं आक्रोशमानां तां सीतां आदाय [रावणः] रामागमनशंकया सत्वरः विहायसा वायुवेगेन जगाम. ॥ ६१ ॥ (मू.) सीता पर्वताग्रस्थितान्[7] पंच वानरान् अपश्यत्. ॥ ६२ ॥ आभरणादिकं[8] विमुच्य[9] (पू.) ॥

१ भावोजी. २ भाषणरूपी बाणांनीं. ३ क्षन्तुम् क्षमा करण्यास. ४ ओरडणाऱ्या. ५ आकाशमार्गानें. ६ अधोभागीं मुख जिचें (केलें जिनें), अशी. ७ पर्वताच्या शिखरावर बसलेल्या. ८ अलंकार वगैरे. ९ सोडून. १० पदराच्या अर्ध्या तुकड्यानें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यानें तिला अशोकवनीं ठेविलें.

अर्धा तुकडा फाडून त्यांत बांधिले आणि ' त्यांनीं (वानरांनीं) रामाला कळवावें ' अशा उद्देशानें पर्वतावर फेंकून दिले. - पहा स्त्रियांची समयसूचकता कशी आहे ती ! असो. - ॥ ६३ ॥ पुढें तो रावण समुद्र उल्लंघून लंकेंत गेला. ॥ ६४ ॥ त्यानें सीतेला आपल्या अंतःपुरासंबंधीं एकांत स्थलांतील अशोक वनांत ठेवून दिलें; तिच्या भोंवतीं रक्षणासाठीं राक्षसी ठेविल्या, आणि मातृबुद्धीनें तिचें पालन चालविलें. ॥ ६५ ॥ - सीतेची विपन्न अवस्था किती वर्णावी ! - ती उत्तरोत्तर कृश होत चालली, नेहमीं अत्यंत दीनासारखी असे, अभ्यंगस्नान वेणी घालणें इत्यादि उपचार कधींही करीत नसे; दुःखामुळें तिचें मुख शुष्क होऊन गेलें; व ती अत्यंत व्याकुल होत्साती ' हा रामा ! हा रामा ' असा विलाप करीत त्या राक्षसांच्या मेळ्यांत

बद्ध्वा[1] चिक्षेप रामाय कथयंत्विति[2] पर्वते ॥ ६३ ॥ ततः समुद्रमुल्लंघ्य लंकां गत्वा स रावणः ॥ ६४ ॥ स्वान्तःपुरे रहस्ये तामशोकविपिने[4] ऽक्षिपत्[5] ॥ राक्षसीभिः परिवृतां[6] मातृबुद्ध्या[7] ऽनुपालयत्[8] ॥ ६५ ॥ कृशा ऽतिदीना परिकर्मवर्जिता[9] दुःखेन शुष्यद्वदना[10] ऽतिविह्वला ॥ हा राम रामेति विलप्यमाना सीता स्थिता राक्षसवृन्दमध्ये[11] ॥ ६६ ॥ इति श्रीमद० रामा० उ० अरण्यका० सप्तमः सर्गः ॥७॥

(मू.)चिक्षेप[3].॥६३॥ततः सः रावणः(मू.),॥६४॥एतां(मू.).॥६५॥(मू.) स्थिता.॥६६॥इति सप्तमः सर्गः ॥

१ बांधून. २ कथयन्तु सांगोत. ३ फेंकिती झाली. ४ अशोक वृक्षांच्या वनांत. ५ ठेविता झाला. ६ वेष्टिलेल्या. ७ ' आई ' अशा बुद्धीनें. ८ पाळिता. झाला. ९ अभ्यंगस्नान अंगमर्दन इत्यादि संस्कार वर्ज्य केले जिनें अशी. १० शुष्क होत चाललें मुख जिचें, अशी ११ राक्षसांच्या समुदायामध्यें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राहिली ! ॥ ६६ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे अरण्यकांडे सप्तमःसर्गः ॥ ७ ॥

इकडे, रामचंद्र त्या मायावी आणि इच्छेस येईल तसें रूप घेणाऱ्या मारीच राक्षसाचा वध करून परत आश्रमीं येण्यास निघाला तों दुरूनच, लक्ष्मण येत आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. ह्या वेळीं लक्ष्मण दीन झाला असून त्याचें मुख अगदीं सुकून गेलें होतें. रामचंद्र महाबुद्धिमान् व सर्वज्ञ असल्यामुळें - झालेली सर्व गोष्ट त्याला कळली होती. - पण सांप्रत त्यानें आपल्या मनाशींच असा विचार ठरविला कीं, ॥१॥२॥ ‘ मी मायेची सीता उत्पन्न केली आहे, ही गोष्ट लक्ष्मणाला माहीत नाहीं. ह्मणून, जरी मला सर्व प्रकार विदित आहे, तथापि ह्याला फसवून आपण अज्ञानी प्राण्याप्रमाणें शोक करावा. ॥ ३ ॥ कारण, जर मी उदासीन

रामो मायाविनं हत्वा राक्षसं [1]कामरूपिणम् ॥ [3]प्रतस्थे स्वाश्रमं गन्तुं ततो दूराद्ददर्श तम् ॥ १ ॥ [4]आयान्तं लक्ष्मणं दीनं मुखेन परि[5]शुष्यता ॥ राघवश्चिन्तयामास स्वात्मन्येव महामतिः ॥ २ ॥ लक्ष्मणस्तन्न जानाति मायासीतां मया कृताम् ॥ ज्ञात्वाऽप्येनं व[7]ञ्चयित्वा शोचामि प्राकृतो यथा ॥ ३ ॥ यद्यहं वि[10]रतो भूत्वा [11]तूष्णीं स्थास्यामि मन्दिरे ॥

(पू.) राक्षसं हत्वा ॥ स्वाश्रमं गंतुं[2] (मू.) ददर्श. ॥ १ ॥ महामतिः राघवः (पू.) मुखेन [उ-[6]पलक्षितं] लक्ष्मणं [दृष्ट्वा] (मू.) चिन्तयामास – ॥ २ ॥ ‘ (पू.) मायासीतां न जानाति. ॥ (मू.) यथा [8]प्राकृतः [तथा], शो[9]चामि. ॥ ३ ॥ (पू.) [12]स्थास्यामि ॥

---

१ इच्छेस येईल तें रूप घेणाऱ्या. २ जाण्यास. ३ निघाला. ४ येणाऱ्या. ५ सुकणाऱ्या. ६ युक्त ७ फसवून. ८ अज्ञानी. ९ शोक करितों. १० विराम पावलेला. ११ गपचिप. १२ राहीन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामाचे मान-
सिक विचार.

होऊन मंदिरांत स्वस्थ बसलों, तर कोट्यावधि राक्षसांच्या वधाचा उपाय सिद्ध होईल कसा? ॥ ४ ॥ जर मी एखाद्या कामुक मनुष्याप्रमाणें दुःखानें संतप्त होऊन सीतेसाठीं शोक करण्याचा आव आणिला, तरच मला क्रमाक्रमानें तिचा शोध करण्यासाठीं राक्षसांच्या राजधानीस जाण्याचा घाट जमवितां येईल. ॥ ५ ॥ मग मी आळस न करितां गणगोतासह रावणाचा वध करीन. सीता, मीच ठेविल्यामुळें, सध्यां अग्नींत गुप्तपणें राहिली आहे. रावणाचा वध केल्यावर पुन्हां तिला घेऊन मी अयोध्येस जाईन. ब्रह्मदेवाच्या प्रार्थनेवरून मला मनुष्य अवतार घ्यावा लागला आहे; ॥६॥ मी ह्या मनुष्यरूपानें कांहीं कालपर्यंत पृथ्वीवर राहीन. नंतर, जे लोक मायेनें धारण केलेल्या ह्या माझ्या मनुष्य अवताराचें चरित्र श्रवण करितील, त्यांना ॥ ७ ॥

तदा राक्षसकोटीनां वधोपायः कथं भवेत् ॥ ४ ॥ यदि शोचामि तां दुःखसंतप्तः कामुको यथा ॥ तदा क्रमेणानुचिन्वन्सीतां यास्ये ऽसुरालयम् ॥ ५ ॥ रावणं सकुलं हत्वा सीतामग्नौ स्थितां पुनः ॥ मयैव स्थापितां नीत्वा याता ऽयोध्यामतन्द्रितः ॥ अहं मनुष्यभावेन जातो ऽस्मि ब्रह्मणा ऽर्थितः ॥ ६ ॥ मनुष्यभावमापन्नः किंचित्कालं वसामि कौ॥ततो मायामनुष्यस्य चरितं मे ऽनुशृण्वताम्॥७॥

(मू.) ! ॥ ४ ॥ दुःखसंतप्तः अहं, यथा कामुकः [तथा], यदि तां शोचामि, ॥ (मू.) अनुचिन्वन् [सन्] असुरालयं यास्ये. ॥ ५ ॥ अतन्द्रितः अहं सकुलं (पू. ॥ द्वि.) सीतां नीत्वा अयोध्यां याता. ॥ ब्रह्मणा अर्थितः (मू.). ॥ ६ ॥ (पू.) वसामि. ॥ ततः (मू.) ॥ ७ ॥

१ शोधणारा. २ राक्षसाच्या घराला. ३ जाईन. ४ निराळस. ५ प्रार्थिलेला. ६ पृथ्वीवर. ७ ऐकणारांना.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आयासावांचून मुक्ति प्राप्त होईल. मात्र त्यांनीं भक्तिमार्गाचें अवलंबन केलें पाहिजे. ’ रामचंद्रानें आपल्या मनाशीं असा निश्चय ठरविला. इतक्यांत लक्ष्मण - जवळ येऊन पोंचला असें - त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां तो लक्ष्मणाला ह्मणाला :— ॥ ८ ॥ ‘ अरे ! तूं माझ्या प्रिय सीतेला सोडून इकडे आलास कां ? जानकीला राक्षसांनीं उचलून नेलें किंवा भक्षिलें नाहींना ? ’ ॥ ९ ॥ ह्यावेळीं लक्ष्मणाला सीतेचे अपशब्द आठवल्यामुळें रडूं कोसळलें. त्यानें हात जोडून रामाला सांगितलें :— “ रघुवीरा, ‘ हा लक्ष्मणा ! ’ असे राक्षसानें काढलेले उद्गार सीतेच्या कानीं गेले. ॥ १० ॥ तुझ्या भाषणासारखें तें वाक्य ऐकूं येतांच - घाबरून -

मुक्तिः स्यादप्रयासेन भक्तिमार्गानुवर्तिनाम् ॥ निश्चित्यैवं तदा दृष्ट्वा लक्ष्मणं वाक्यमब्रवीत् ॥८॥ किमर्थमागतो ऽसि त्वं सीतां त्यक्त्वा मम प्रियाम् ॥ नीता वा भक्षिता वा ऽपि राक्षसैर्जनकात्मजा ॥ ९ ॥ लक्ष्मणः प्राञ्जलिः प्राह सीताया दुर्वचो रुदन् ॥ हा लक्ष्मणेति वचनं राक्षसोक्तं श्रुतं तया ॥ १० ॥ त्वद्वाक्यसदृशं श्रुत्वा मां गच्छेति त्वरा[5] ऽब्रवीत् ॥ रुदती सा मया प्रोक्ता देवि राक्षसभाषितम् ॥ नेदं रामस्य वचनं स्वस्था भव शुचि[6]स्मिते ॥ ११ ॥

(पू.) अप्रयासेन मुक्तिः स्यात्. ’ ॥ तदा एवं निश्चि[1]त्य लक्ष्मणं (मू.) – ॥ ८ ॥ ‘ त्वं मम प्रियां सीतां त्य[2]क्त्वा (पू.) ? ॥ राक्षसैः जनकात्मजा (मू.) ? ’ ॥ ९ ॥ प्रांजलिः (पू.) सीतायाः दुर्वचः [स्मृत्वा[3]] रु[4]दन् [सन्] प्राह – ‘ तया (मू.) वचनं श्रुतं. ॥१०॥ (मू.) शुचि[6]स्मिते, स्वस्था भव. ॥११॥

१ ठरवून. २ टाकून. ३ आठवून. ४ रडणारा. ५ त्वरेनें. ६ शुभ्र हास्य जिचें, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लक्ष्मणाला दोहींकडून बोलणीं।

तिनें रडत रडत मला सांगितलें कीं, लवकर तिकडे जा. मी तिला ह्मटलें, 'देवि, हे शब्द राक्षसाचे आहेत, रामाचे नव्हत. सुहास्यवदने, स्वस्थ राहा.' ॥ ११ ॥ अशा प्रकारें मी त्या साध्वीचें सांत्वन केलें. - त्यामुळें तिचें समाधान तर झालें नाहींच; पण उलट - ती मला जे कांहीं अपशब्द बोलली ते, रामा, तुझ्यापुढें उच्चारूं देखील नयेत !॥ १२॥ मी कानांवर हात देऊन निघून तुझ्या दर्शनासाठीं इकडे आलों." ह्यावर राम लक्ष्मणाला ह्मणाला :–'लक्ष्मणा ! तथापि, तूं केलेंस हें अयोग्यच होय. ॥१३॥ अरे! बायकोचें बोलणें खरें धरून तूं त्या सुवदनेला सोडून - आलास ! हें काय? - राक्षसांनीं तिला नेलें किंवा खाल्लें असावें, ह्यांत संशय नाहीं !' ॥१४॥ रामचंद्र अशा प्रकारें चिंताग्रस्त होत्साता त्वरेनें आपल्या आश्रमांत आला. तेथें जानकी कोठें दिसेना. तेव्हां

इत्येवं सान्त्विता साध्वी मया प्रोवाच मां पुनः ॥ यदुक्तं दुर्वचो राम न वाच्यं पुरतस्तव ॥१२॥ कर्णौ पि[1]धाय निर्ग[2]त्य यातोऽहं त्वां [3]समीक्षितुम् ॥ रामस्तु लक्ष्मणं प्राह तथाऽप्यनुचितं कृतम् ॥१३॥ त्वया स्त्रीभाषितं सत्यं कृत्वा त्यक्त्वा शुभाननाम् ॥ नीता वा भक्षिता वाऽपि राक्षसैर्नात्र संशयः ॥ १४ ॥ इति चिन्तापरो रामः स्वाश्रमं त्वरितो ययौ ॥ तत्रादृष्ट्वा जनकजां विललापातिदुःखितः ॥ १५ ॥

मया (पू.) प्रोवाच. ॥ राम, [तया] यत् दुर्वचः उक्तं [तत्] तव पुरतः न वाच्यम्. ॥ १२ ॥ अहं (पू.) यातः.' (१३ उ. १४ पू.) सक्त्वा [4]अनुचितं कृतं. ॥ [सा] राक्षसैः (मू.) ! ॥ १३ ॥ ॥ १४ ॥ (मू.) अदृष्ट्वा अतिदुःखितः [सन्] वि[5]ललाप – ॥ १५ ॥

१ झांकून. २ बाहेर निघून. ३ पाहण्यास. ४ अयोग्य. ५ रडूं लागला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो अत्यंत दुःखाकुल होऊन विलाप करूं लागला :—॥१५॥'हा प्रिये! तूं गेलीस तरी कोठें? पूर्वीप्रमाणें आज मला आश्रमामध्यें दिसत नाहींस!' 'अथवा, माझी थट्टा करावी किंवा मला मोहांत पाडावें ह्यासाठीं लीलेनें कोठें लपून बसली आहेस काय?' ॥ १६ ॥ असें ह्मणून त्यानें वनामध्यें सर्वत्र शोध केला; परंतु जानकी कोठेंही सांपडेना; तेव्हां तो अरण्यांतील स्थावरजंगम पदार्थांना विचारीत सुटला :— 'वनदेवतांनो! माझी प्रिया सीता कोठें आहे, सांगा. ॥ १७ ॥ हे पशुपक्ष्यांनो! वृक्षहो! माझी प्रिया मला दाखवून द्या.' अशा प्रकारें रामानें विलाप चालविला. सीता त्याला कोठेंही ॥ १८ ॥ कांहीं केल्या दिसेना. (शंकर ह्मणाले :— पार्व-

हा प्रिये क्व गता ऽसि त्वं नासि पूर्ववदाश्रमे ॥ अथवा म[1]द्विमोहार्थं लीलया क्व वि-
ली[2]यसे ॥१६॥ इत्याचि[3]न्वन्वनं सर्वं नापश्यज्जानकीं तदा ॥ वनदेव्यः कुतः सीतां
ब्रु[4]वन्तु मम वल्लभाम् ॥१७॥ मृगाश्च पक्षिणो वृक्षा द[5]र्शयन्तु मम प्रियाम् ॥ इत्येवं
विलपन्नेव रामः सीतां न कुत्रचित् ॥१८॥ सर्वज्ञः सर्वथा क्वापि नापश्यद्रघुनन्दनः॥
आनन्दो ऽप्यन्वशो[6]चत्ताम[7]चलो ऽप्यनु[8]धावति ॥ १९ ॥

'(पू.) न असि! (मू.)!' ॥१६॥ (पू.) वनं आचिन्वन् [रामः] तदा जानकीं न अपश्यत्. ॥ '(मू.) ब्रुवन्तु. ॥ १७ ॥ (पू.) दर्शयंतु.' ॥ (मू.) न [ददर्श.] ॥ १८ ॥ सर्वज्ञः रघुनन्दनः (पू.)! ॥ आनन्दः अपि तां (मू.)! ॥ १९ ॥

---

१ मला मोह पाडण्यासाठीं. २ लपून बसलीस. ३ शोधणारा. ४ सांगोत. ५ दाखवोत. ६ **अशोचत्** शोक करिता झाला. ७ न हलणारा. ८ **अनुधावति** मागून धांवतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ति!) - वास्तविक पाहिलें तर - रामचंद्र सर्वज्ञ; - पण त्यानें अज्ञान्याचें पूर्ण सोंग आणिलें होतें! - तो परमानंदरूप असूनही सीतेसाठीं शोक करूं लागला! परमार्थतः तो कोणतीही क्रिया न करणारा, पण ह्या वेळीं सैरावैरां धांवत सुटला! ॥१९॥ - त्याचें सत्य स्वरूप ह्मटलें तर - अहंममतारहित व नित्य आनंदमय आहे; परंतु ह्यावेळीं तो 'माझी सीता! माझी बायको!' असें ह्मणत आणि अत्यंत दुःखित होत्साता विलाप करीत बसला! ॥ २० ॥ पार्वति! रघुवीर कोणत्याही ठिकाणीं आसक्ति ठेवीत नाहीं; पण त्यावेळीं मायेच्या अनुरोधानें वागत होता, - हा तथ्य प्रकार आहे. - अज्ञानी लोकांना तो आसक्त झाल्याप्रमाणें भासे; तत्त्ववेत्त्यांना मात्र तसें वाटलें नाहीं, (ते सत्य जाणत असत). ॥ २१ ॥ अशा प्रकारें रामचंद्र लक्ष्मणाला बरोबर घेऊन सगळ्या वनामध्यें शोध करीत असतां, एक मोडलेला रथ, फाटलेलें छत्र, तुकडे झालेलें धनुष्य

निर्ममो निरहंकारो ऽप्यखण्डानन्दरूपवान् ॥ मम जायेति सीतेति विललापादुःखितः ॥ २० ॥ एवं मायामनुचरन्नसक्तो ऽपि रघूत्तमः ॥ आसक्त इव मूढानां भाति तत्त्वविदां न हि ॥ २१ ॥ एवं विचिन्वन्सकलं वनं रामः सलक्ष्मणः ॥ [1]भग्नं रथं [2]छत्रचापं कूबरं पतितं भुवि ॥ २२ ॥

(मू.) [इव] विललाप! ॥२०॥ (मू.). ॥२१॥ (पू.) विचिन्वन् सलक्ष्मणः रामः (मू.) [3]भुवि पतितं [4]कूबरं ॥ २२ ॥

१ मोडलेल्या. २ छत्र आणि धनुष्य यांना. ३ भूमीवर. ४ जूं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि भूमीवर पडलेलें जूं—इतक्या वस्तु त्याच्या ॥ २२ ॥ दृष्टीस पडल्या. तेव्हां तो लक्ष्मणाला ह्मणाला :— 'लक्ष्मणा ! हें पहा ! कोणीतरी राक्षस जानकीला नेत होता; पण त्याला जिंकून दुसऱ्यानेंच तिला नेलें असावें.' ॥ २३ ॥ नंतर आणखी थोडासा प्रदेश चालून गेल्यावर तेथें रामाला पर्वतासारखें एक रक्तानें भरलेलें शरीर दिसलें. तेव्हां तो पुन्हां ह्मणाला :— ॥ २४ ॥ 'निःसंशय हा प्राणी त्या स्वरूपसंपन्न जानकीला भक्षून आतां आहारून एकांतांत स्वस्थ पडून राहिला आहे; पहा ! मी आतां ह्या राक्षसाला मारून टाकितों. ॥ २५ ॥ रघुनंदना (लक्ष्मणा) ! मला लवकर धनुष्य आणि बाण आणून दे.'

दृष्ट्वा लक्ष्मणमाहेदं पश्य लक्ष्मण केनचित् ॥ नीयमानां जनकजां तं जित्वा ऽन्यो जहार ताम् ॥२३॥ ततः कंचिद्भुवो भागं गत्वा पर्वतसन्निभम् ॥ रुधिराक्तवपुर्दृष्ट्वा रामो वाक्यमथाब्रवीत् ॥२४॥ एष वै भक्षयित्वा तां जानकीं शुभदर्शनाम् ॥ शेते विविक्ते ऽतितृप्तः पश्य हन्मि निशाचरम् ॥ २५ ॥ चापमानय शीघ्रं मे बाणं च रघुनन्दन ॥ तच्छ्रुत्वा रामवचनं जटायुः प्राह भीतवत् ॥ २६ ॥

दृष्ट्वा लक्ष्मणं आह — '(मू.) [दृष्ट्वा] अन्यः तं जित्वा तां जहार. इदं पश्य.' ॥ २३ ॥ अथ रामः (मू.) — ॥ २४ ॥ '(पू.) जानकीं भक्षयित्वा ॥ अतितृप्तः [सन्] विविक्ते (मू.) हन्मि. ॥ २५ ॥ रघुनन्दन, (पू.) शीघ्रं आनय.' ॥ जटायुः (मू.) श्रुत्वा भीतवत् प्राह — ॥ २६ ॥

१ नेता झाला. २ पर्वतासारख्या. ३ रक्तानें भरलेल्या शरीराला. ४ शुभ दर्शन जिचें, अशा. ५ आहारलेला. ६ एकांतीं. ७ निजतो ८ मारतों.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जटायु रामाची प्रार्थना करितो.

तें रामाचें वचन ऐकतांच जटायु भ्याल्यासारखा झाला, आणि रामाला ह्मणाला :– ॥ २६ ॥ 'रामचंद्रा ! मी आपल्या कर्मानेंच मरत आहें. मला मारूं नकोस. तुझें कल्याण असो. बा ! मी जटायु आहें, - राक्षस नव्हें. - मी तुझ्या भार्येला चोरून नेणाऱ्या रावणाच्या आंगावर चालून गेलों; हे शत्रुनाशका, तेथें त्याचें माझें युद्ध झालें. मी त्याचे घोडे मारिले, रथ मोडिला आणि धनुष्याचे तुकडे उडविले. शेवटीं त्यानें मजवर खड्गप्रहार केले; ॥ २७ ॥ २८ ॥ त्यामुळें मी येथें पडलों आहें. त्रैलोक्यनाथा, आतां मी प्राणत्याग करणार. मजकडे - कृपादृष्टीनें - अवलोकन कर.' रामचंद्रानें तें भाषण ऐकिलें व दीन आणि कंठीं प्राण येऊन पडलेल्या त्या जटायूकडे पाहिलें. ॥ २९ ॥ त्यावेळीं रामाचे नेत्र दुःखाश्रूंनीं भरून आले. त्यानें

मा न मारय भद्रं ते म्रियमाणं स्वकर्मणा ॥ अहं जटायुस्ते भार्याहारिणं[1] समनुद्रुतः ॥ २७ ॥ रावणं तत्र युद्धं मे बभूवारिविमर्दन ॥ तस्य वाहान्[2] रथं चापं छित्वा ऽहं तेन घातितः[3] ॥ २८ ॥ पतितो ऽस्मि जगन्नाथ प्राणांस्त्यक्ष्यामि[4] पश्य माम् ॥ तच्छ्रुत्वा राघवो दीनं कण्ठप्राणं[5] ददर्श ह ॥ २९ ॥ हस्ताभ्यां संस्पृशन्[6] रामो दुःखाश्रुवृतलोचनः[7] ॥ ३० ॥

'ते भद्रं. स्वकर्मणा म्रियमाणं (पू.). ॥ जटायुः (बा.२७उ.) रावणं समनुद्रुतः. अरिविमर्दन, मे (मू.) [स्थितः] अहं तेन घातितः, ॥२७॥२८॥ (पू.) पश्य.' ॥ (मू). ॥२९॥ (मू.) रामः [आह–] ॥३०॥

१ बायकोला नेणाऱ्याला. २ घोड्यांना. ३ मारिलेला. ४ टाकीन. ५ कंठीं प्राण ज्याचे, अशा. ६ कुरवाळणारा. ७ दुःखाश्रूंनीं भरले नेत्र ज्याचे, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आपल्या हातांनीं जटायूला कुरवाळून ह्मटलें :– ॥ ३० ॥ ‘बा जटायो! माझी सुवदना भार्या कोणी नेली, तेवढें सांग. माझ्या कार्यासाठीं तुझा वध झाला, त्या अर्थीं तूं माझा प्रिय बांधव आहेस.’ ॥ ३१ ॥ जटायु अगदीं आंत ओढलेल्या स्वरानें बोलूं लागला : त्याच्या मुखांतून अद्यापि रक्त वाहतच होतें : तो ह्मणाला :–‘रामा! रावण नांवाचा एक उग्रप्रतापी राक्षस, ॥ ३२ ॥ जनक राजाची कन्या जी सीता, तिला घेऊन दक्षिण दिशेच्या धोरणानें गेला. ह्याच्यापुढें बोलण्याची मला शक्ति नाहीं. आतां मी तुझ्या अग्रभागीं प्राण सोडितों. ॥ ३३ ॥ हे पुण्यपुरुषा रामचंद्रा, मरणसमयीं मला तुझें दर्शन घडलें, ही मोठ्या

जटायो ब्रूहि मे भार्या केन नीता शुभानना ॥ मत्कार्यार्थं हतो ऽसि त्वमतो मे प्रियबान्धवः ॥३१॥ जटायुः सन्नया वाचा वक्त्राद्रक्तं समुद्वमन् ॥ उवाच रावणो राम राक्षसो भीमविक्रमः ॥ ३२ ॥ आदाय मैथिलीं सीतां दक्षिणाभिमुखो ययौ ॥ इतो वक्तुं न मे शक्तिः प्राणांस्त्यक्ष्यामि ते ऽग्रतः ॥३३॥ दिष्ट्या दृष्टो ऽसि राम त्वं म्रियमाणेन मे ऽनघ ॥ परमात्मा ऽसि विष्णुस्त्वं मायामनुजरूपधृक् ॥ ३४ ॥

‘(पू.) भार्या केन नीता? त्वं (मू.).’ ॥ ३१॥ वक्त्रात् रक्तं समुद्वमन (मू.) रावणः ॥३२॥ मैथिलीं सीतां (मू.) त्यक्ष्यामि. ॥ ३३ ॥ अनघ, राम, म्रियमाणेन मया त्वं दृष्टः असि; दिष्ट्या! (मू.) असि. ॥ ३४ ॥

१ आंत ओढलेल्या. २ भयंकर पराक्रम ज्याचा, असा. ३ मुखांतून. ४ ओकणारा. ५ मिथिला नगरीच्या राजाच्या कन्येला. ६ दक्षिणेकडे तोंड करणारा. ७ बोलण्यास. ८ आनंदाची गोष्ट.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भाग्याची गोष्ट. तूं साक्षात् परमेश्वर विष्णु मायेनें मनुष्यरूप घेऊन राहिला आहेस. ॥ ३४ ॥ रघुवीरा, अंतकालीं तुझें दर्शन मिळाल्यामुळें मी मुक्त आहें. रामा, तूं आपल्या हातांनीं मला आणखी एकदां कुरवाळ; ह्मणजे मी तुझ्या पदास जाईन.' ॥ ३५ ॥ रामानें 'बरें आहे,' असें ह्मणून त्याच्या आंगावरून हात फिरविला. - त्याचा शुद्ध भाव पाहून रामाला संतोष वाटला व - हांसूं आलें. नंतर जटायु प्राण सोडून भूमीवर पडला. ॥ ३६ ॥ रामानें प्रत्यक्ष बंधूप्रमाणें त्याच्याबद्दल शोक केला. त्याच्या नेत्रांत दुःखाश्रूंचें भरतें आलें. पुढें त्यानें लक्ष्मणाकडून काष्ठें आणवून त्याचें दहन केलें. ॥ ३७ ॥ तदनंतर रामानें लक्ष्मणासह दुःखानें स्नान करून अरण्यांत एक मृग मारिला आणि त्याच्या मांसाचे तुकडे त्या ठिकाणीं आसपास॥३८॥

अन्तकाले ऽपि दृष्ट्वा त्वां मुक्तो ऽहं रघुसत्तम ॥ हस्ताभ्यां स्पृश मां राम पुनर्यास्यामि ते पदम् ॥३५॥ तथेति रामः पस्पर्श तदंगं पाणिना स्मयन् ॥ ततः प्राणान्परित्यज्य जटायुः पतितो भुवि ॥३६॥ रामस्तमनु शोचित्वा बन्धुवत्साश्रुलोचनः॥ लक्ष्मणेन समानाय्य काष्ठानि प्रददाह तम्॥३७॥ स्नात्वा दुःखेन रामो ऽपि लक्ष्मणेन समन्वितः ॥ हत्वा वने मृगं तत्र मांसखण्डान्समन्ततः ॥ ३८ ॥

रघूत्तम, अहं (पू.) दृष्ट्वा मुक्तः [स्यां]; राम, पुनः मां (मू.) यास्यामि. ' ॥ ३५ ॥ स्मयन् रामः (पू.) पस्पर्श. ॥ ततः जटायुः (मू.) पतितः.॥३६॥साश्रुलोचनः रामः(पू.)शोचित्वा॥ (मू.) समानाय्य तं प्रददाह. ॥ ३७ ॥ लक्ष्मणेन समन्वितः रामः अपि दुःखेन स्नात्वा तत्र वने मृगं (मू.) ॥ ३८ ॥

१ विस्मय करणारा. २ हातानें. ३ अनु बद्दल. ४ आणवून. ५ जाळिता झाला. ६ स्नान करून. ७ मांसाच्या तुकड्यांना.

जटायूचें उत्तर कार्य.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हिरण्यागार गवतानें आच्छादिलेल्या प्रदेशावर अनेक जागीं पसरून टाकिले, व 'सर्व पक्ष्यांनीं हे तुकडे भक्षण करावे, ह्यांच्या योगें पक्षिराज (जटायु) तृप्त होवो,' ॥३९॥ असा संकल्प केला. नंतर राम जटायूला ह्मणाला :– 'जटायो ! आतां माझ्या पदास जा. ह्या लोकांच्या समक्ष तुला माझी सरूपता मुक्ति मिळो.'॥४०॥ इतक्यांत लागलेंच त्या पुण्यवान् जटायूला दिव्य स्वरूप प्राप्त झालें. तो सूर्याप्रमाणें तेजस्वी अशा उत्तम विमानांत चढून बसला. ॥ ४१ ॥ शंख, चक्र, गदा, पद्म, किरीट, अलंकार ह्यांच्या योगानें आणि स्वतांच्या प्रकाशानें त्यानें आकाशाला शोभा आणिली. त्यानें पीतांबर परिधान केला होता; त्याची मूर्ति निर्मल

शाद्वले प्राक्षिपद्रामः पृथक् पृथगनेकधा ॥ भक्षन्तु पक्षिणः सर्वे तृप्तो भवतु पक्षिराट् ॥ ३९ ॥ इत्युक्त्वा राघवः प्राह जटायो गच्छ मत्पदम् ॥ मत्सारूप्यं भजस्वाद्य सर्वलोकस्य पश्यतः ॥ ४० ॥ ततो ऽनंतरमेवासौ दिव्यरूपधरः शुभः ॥ विमानवरमारुह्य [4]भास्वरं [5]भानुसन्निभम् ॥ ४१ ॥ शंखचक्रगदापद्मकिरीटवरभूषणैः ॥ द्योतयन्स्वप्रकाशेन पीताम्बरधरो ऽमलः ॥ ४२ ॥

रामः (पू.) प्राक्षिपत्[2]. ॥ 'सर्वे पक्षिणः (मू.) तृप्तः [3]भवतु,' ॥ ३९ ॥ (पू.) गच्छ; अद्य सर्वलोकस्य पश्यतः [सतः] (मू.). ॥ ४० ॥ (पू.) असौ ॥ (मू.) विमानवरं आरुह्य ॥ ४१ ॥ (पू.) ॥ [उपलक्षितः] (मू.) [6]स्वप्रकाशेन द्योतयन [आसीत्]. ॥ ४२ ॥

१ हिरव्या गवताच्या कुरणांत. २ फेंकिता झाला. ३ होवो. ४ तेजस्वी. ५ सूर्यासारख्या. ६ स्वतांच्या कांतीनें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जटायु रामाची स्तुति करितो.

होती; ॥ ४२ ॥ तशाच स्वरूपांचे चार विष्णूचे पार्षद त्याची चोंहोंकडून पूजा करीत होते; योगिजनांचे समुदाय स्तुतिपाठ गात होते; अशा स्थितींत त्यानें रामाला संबोधन देऊन सत्वर हांक मारिली, आणि हात जोडून त्या रघुनंदनाची स्तुति केली :— ती येणेंप्रमाणें :— ॥ ४३ ॥ जटायु ह्मणाला :— ‘मी परमात्मरूपी रामचंद्राला सतत वंदन करितों. - त्या प्रभूच्या शक्ति अनंत असल्यामुळें - गुण असंख्य आहेत; त्याला देशकालांची इयत्ता नाहीं; तो पुराण पुरुष होय; सगळ्या जगाचें पालन, संहार आणि उत्पत्ति ह्यांचें कारण तोच आहे; शांति हीच त्याच्या रूपाची उत्तम शोभा होय. ॥ ४४ ॥

चतुर्भिः पार्षदैर्विष्णोस्तादृशैरभिपूजितः ॥ स्तूयमानो योगिगणै राममाभाष्य सत्वरः ॥ कृताञ्जलिपुटो भूत्वा तुष्टाव रघुनन्दनम् ॥ ४३ ॥ जटायुरुवाच । अगणितगुणमप्रमेयमाद्यं सकलजगत्स्थितिसंयमादिहेतुम् ॥ उपरमपरमं परात्मभूतं सततमहं प्रणतोऽस्मि रामचन्द्रम् ॥ ४४ ॥

तादृशैः विष्णोः (पू.) ॥ योगिगणैः [1]स्तूयमानः सत्वरः [सः] (मू.) रामं [2]आभाष्य [3]तुष्टाव — ॥ ४३ ॥ ज० उ० — ‘ अहं (मू.) सततं प्रणतः अस्मि. ॥ ४४ ॥

---

१ स्तविला जाणारा. २ संबोधन देऊन. ३ स्तुति करूं लागला. ४ ज्याच्या गुणांना संख्या नाहीं, अशा. ५ ज्याला इयत्ता नाहीं, अशा. ६ सगळ्या जगाचें पालन संहार इत्यादि करणाऱ्या. ७ शांतीनें शोभा ज्याला अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याचें स्वरूप अनंत सुखमय आहे; त्याच्यावर लक्ष्मी आपले प्रेमकटाक्ष सतत फेंकीत असते; त्यानें देवेंद्र, ब्रह्मदेव इत्यादिकांचीं दुःखें दूर केलीं; तो मनुष्यांतील श्रेष्ठ प्रभु - भक्तांना - वर देण्यास उत्सुक असतो, व हस्तामध्यें धनुष्य बाण धारण करितो; अशा त्या रामचंद्राला मी निरंतर प्रणाम करितों. ॥ ४५ ॥ त्याचें स्वरूप सगळ्या त्रैलोक्यांत अति सुंदर आहे; स्तुति करण्याचा योग्य विषय तोच होय; त्याची कांति शेंकडों सूर्यांप्रमाणें आहे; भक्तांच्या इच्छा पूर्ण करणें त्याचा स्वभावच होय; तो आश्रयदाता प्रभु, प्रीतीचें आदिस्थान जें अंतःकरण, त्यांत वास करितो; मी त्या रघुनंदनाला शरण आलों आहें. ॥ ४६ ॥ त्याचें नाम संसाररूपी अरण्याला जाळून टाकणारा दवाग्नि (वणवा) होय; शंकर आदिकरून देवांनाही तो पूज्य

[1]निरवधिसुखमिन्दिरा[2]कटाक्षं [3]क्षपितसुरेन्द्रचतुर्मुखादिदुःखम् ॥ [4]नरवरम[5]निशं नतो

ऽस्मि रामं वरदमहं वरचाप[6]बाणहस्तम् ॥ ४५ ॥ [7]त्रिभुवनकमनीयरूपमी[8]ड्यं

र[9]विशतभासुरमी[10]हितप्रदानम् ॥ [11]शरणदमनिशं [12]सुरागमूले कृतनि[13]लयं रघुनन्दनं

प्रपद्ये ॥४६॥ [14]भवविपिनदवाग्निनामधेयं [15]भवमुखदैवतदैवतं दयालुम् ॥

अहं (मू.) रामं नतः अस्मि. ॥ ४५ ॥ ४६ ॥ (पू.) ॥

---

१ अत्यंत सुखरूपी. २ लक्ष्मीचे कटाक्ष ज्याच्यावर, अशा. ३ नाहींशीं केलीं इंद्र, ब्रह्मदेव इत्यादिकांचीं दुःखें ज्यानें, अशा. ४ मनुष्यश्रेष्ठास. ५ नित्य. ६ उत्तम धनुष्य व बाण हातीं ज्याच्या, अशा. ७ त्रैलोक्यांत मनोहर रूप ज्याचें, अशा. ८ स्तुति करण्याचा योग्य विषय. ९ शेंकडों सूर्यांप्रमाणें तेजस्वी. १० इच्छित देणाऱ्या. ११ आश्रय देणाऱ्या. १२ उत्तम प्रीतीच्या आश्रयभूत (चित्तांत). १३ वास करणाऱ्या. १४ संसाररूप अरण्याला दावाग्नि (वणवा) आहे नाम ज्याचें, अशा. १५ शंकर प्रभृति देवांचें दैवत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे; तो परम दयालु ईश्वर सहस्रावधि अथवा कोट्यवधि दैत्यांचा नाश करण्यासाठीं - अवतार घेत असतो; - त्याची अंगकांति सूर्याच्या कन्ये(यमुनानदी)सारखी आहे. त्या दुःखहर्त्या ईश्वराला मी शरण आलों. ॥ ४७ ॥ तो प्रभु निरंतर संसाराच्या चिंतनांत गढलेल्या जनांना दूर आहे (प्राप्त होत नाहीं); संसारापासून पराङ्मुख झालेल्या मुनींना त्याचें दर्शन नित्य मिळतें; त्याचे चरण हे संसारसमुद्र सहज तरून जाण्याचें साधन नौका होत; अशा त्या रघुकुमाराला मी शरण आलों आहें. ॥ ४८ ॥ तो परमात्मा शंकर आणि पार्वती ह्या उभयतांच्या ह्रदयांत वास करितो; तोच - कृष्णावतार घेऊन - गोवर्धननामक मोठ्या पर्वताला उचलून धरील. मोठमोठे देव आणि दैत्यांचे अधिपति त्याच्या चरणांची सेवा करितात; तो देवांना

[1]दनुजपतिसहस्रकोटिनाशं रवि[2]तनयासदृशं हरिं प्रपद्ये ॥ ४७ ॥ अवि[3]रतभवभावनातिदूरं [4]भवविमुखैर्मुनिभिः सदैव दृश्यम् ॥ [5]भवजलधिसुतारणांघ्रिपोतं शरणमहं रघुनन्दनं प्रपद्ये ॥४८॥ गिरि[6]शगिरिसुतामनोनिवासं गिरि[7]वरधारिणमीहि[8]ताभिरामम् ॥ [9]सुरवरदनुजेन्द्रसेवितांघ्रिं [10]सुरवरदं रघुनायकं प्रपद्ये ॥ ४९ ॥

(मू.). ॥ ४७ ॥ अहं (मू.) शरणं मपद्ये. ॥ ४८ ॥ ४९ ॥

१ मोठमोठे हजारों कोटि दैत्य मारणाऱ्या. २ सूर्याची कन्या जी यमुना तिच्यासारख्या (कृष्णवर्ण). ३ ज्यांना नित्य संसाराचा ध्यास, त्या जनांना दूर असणाऱ्या. ४ संसाराला पराङ्मुख. ५ संसारसमुद्र सुखानें तरून जाण्यास साधन नौका चरण ज्याचे अशा. ६ शंकर आणि पार्वती ह्यांच्या मनांत राहणाऱ्या. ७ मोठा पर्वत धरणाऱ्या. ८ चरित्रांच्या योगानें मनोहर. ९ मोठे देव व महान् महान् दैत्य ह्यांनीं सेविले चरण ज्याचे, अशा. १० देवांना वर देणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इच्छित वर देतो; अशा त्या रघुनायकाला मी शरण प्राप्त झालों. ॥ ४९ ॥ जे जन परद्रव्य आणि परस्त्री वर्ज्य करितात, दुसऱ्याचे गुण आणि ऐश्वर्यें पाहून ज्यांच्या मनांला संतोष वाटतो, तसेंच ज्यांचीं अंतःकरणें दुसऱ्याचें हित करण्याचे कामीं सदा तत्पर असतात, त्यांना ह्या कमलनयन रघुवीराची सेवा सुसाध्य आहे; मी त्या ईश्वराला शरणागत आहें. ॥ ५० ॥ त्याचें मुखकमल किंचित् हास्याच्या योगानें सुंदर व प्रफुल्ल दिसतें; मला त्याची प्राप्ति फार सुलभ रीतीनें झाली; त्याची अंगकांति इंद्रनील रत्नाप्रमाणें नीलवर्ण आहे; त्याच्या नेत्रांची शोभा शुभ्र कमलाप्रमाणें रमणीय वाटते; तो रघुपति शंकराच्या गुरूचा (पित्याचा, ब्रह्मदेवाचा) गुरु (पिता) होय; मी त्याला शरण आलों. ॥ ५१ ॥ रामचंद्रा, सूर्य ज्याप्रमाणें उदकानें भरलेल्या अनेक पात्रांत प्रतिबिंबित झाला ह्मणजे अनेकरूपी दिसतो, त्या-

[1]परधनपरदारवर्जितानां [2]परगुणभूतिषु [3]तुष्टमानसानाम् ॥ [4]परहितनिरतात्मनां सुसेव्यं रघुवरमम्बुजलोचनं प्रपद्ये ॥ ५० ॥ [5]स्मितरुचिरविकासिताननाब्जमतिसुलभं [6]सुरराजनीलनीलम् ॥ [7]सितजलरुहचारुनेत्रशोभं रघुपतिमीशगुरोर्गुरुं प्रपद्ये ॥५१॥ हरि[8]कमलजशंभुरूपभेदात्त्वमिह विभासि गु[9]णत्रयानुवृत्तः ॥

(मू.) रघुवरं प्रपद्ये.॥५०॥(मू.)रघुपतिं प्रपद्ये. ॥५१॥ जलपूरितोदपात्रेषु रविः इव त्वं इह(पू.)भासि.॥

१ दुसऱ्याचें द्रव्य व परस्त्री वर्ज करणाऱ्या. २ दुसऱ्यांचे गुण व ऐश्वर्य ह्यांच्या ठिकाणीं. ३ संतुष्ट मन ज्यांचें, अशा. ४ दुसऱ्याच्या हितास तत्पर मन ज्यांचें अशा. ५ हास्यानें सुंदर व प्रफुल्ल मुखकमल ज्याचें, अशा. ६ इंद्रनील मण्याप्रमाणें नीलवर्ण. ७ शुभ्र कमलाप्रमाणें सुंदर नेत्रांची शोभा ज्याची, अशा. ८ विष्णु, ब्रह्मदेव, शंकर ह्या रूपांच्या भेदांनीं. ९ तीन गुणांनीं युक्त.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रमाणें तूं सत्त्व, रज, तम ह्या तीन गुणांच्या अनुरोधानें वागत असलास कीं ह्या जगांत विष्णु, ब्रह्मदेव आणि शंकर अशा भेदांनीं विविध भासत असतोस; देवेंद्रानें केलेल्या स्तुतीचा विषय तूंच होस. मी तुझा स्तव करितों. ॥ ९२ ॥ रामचंद्राची मूर्ति शेंकडों कोटि मदनांप्रमाणें सुंदर आहे. शतपथ ब्राह्मणांत सांगितल्याप्रमाणें भावना ठेविली कीं त्याची प्राप्ति होणें दुर्घट नाहीं. महान् महान् योग्यांच्या अंतरीं तो नित्य प्रकाशत असतो. भक्तांचीं दुःखें दूर करणाऱ्या त्या प्रभु रघुवीराला मी शरणागत आहें. '॥९३॥ जटायूनें अशी स्तुति चालविली असतां रघुपति प्रसन्न झाला व त्याला ह्मणाला :– ' तुझें कल्याण असो. मी विष्णुरूपी आहें. तूं माझ्या उच्च पदवीला प्राप्त हो. ॥ ९४ ॥ जो मनुष्य, तूं केलेलें हें स्तोत्र नियमानें ऐकेल, लिहील, किंवा वाचीत जाईल, त्याला मरणसमयीं माझें स्मरण होईल, आणि दे-

रविरिव जलपूरितोदपात्रेष्वमरपतिस्तुतिपात्रमीशमीडे ॥५२॥ रतिपतिशतकोटिसुन्दराङ्गं शतपथगोचरभावनाविदूरम् ॥ यतिपतिहृदये सदा विभातं रघुपतिमार्तिहरं प्रभुं प्रपद्ये ॥५३॥ इत्येवं स्तुवतस्तस्य प्रसन्नोऽभूद्रघूत्तमः॥ उवाच गच्छ भद्रं ते मम विष्णोः परं पदम् ॥ ५४ ॥ शृणोति य इदं स्तोत्रं लिखेद्वा नियतः पठेत् ॥

(मू.).॥९२॥९३॥' (पू.) प्रसन्नः अभूत्. [रामः] उवाच–' ते भद्रं. (मू.) गच्छ. ॥९४॥यः इदं स्तोत्रं(पू.),॥

१ उदकानें भरलेल्या भांड्यांत. २ देवेंद्राच्या स्तुतीला विषय. ३ शंभर कोटि मदनांप्रमाणें सुंदर. ४ शतपथ ब्राह्मणांत सांगितल्याप्रमाणें भावना केली असतां लांब नसलेल्या (प्राप्त होणाऱ्या). ५ महान् महान् योग्यांच्या हृदयांत. ६ भासलेल्या. ७ पीडा हरण करणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हांतीं माझी सरूपता मुक्ति मिळेल.' ॥ ९९ ॥ रामचंद्राचें हें भाषण ऐकिल्यावर त्यावेळीं जटायुपक्ष्याचें अंतःकरण आनंदानें भरून गेलें. त्याला रामचंद्रासारखें रूप प्राप्त झालें होतेंच. आतां तो अत्युत्तम पदवीला गेला. - त्या पदाची थोरवी किती वर्णावी :- ब्रह्मदेव देखील त्या स्थानाची पूजा करितो. ॥ ९६ ॥

इति अध्यात्मरामायणार्थबोधे अरण्यकाण्डे अष्टमः सर्गः ॥ ८ ॥

नंतर, रामचंद्र लक्ष्मणाला बरोबर घेऊन दुसऱ्या अरण्यांत गेला, व तेथें पुन्हां दुःखाचा आविर्भाव आणून तत्परतेनें सीतेचा शोध करूं लागला. ॥ १ ॥ त्याठिकाणीं एक राक्षस त्या दोघांच्या दृष्टीस पडला. त्याची आकृति विलक्षण होती; त्याला छातीवरच एक मोठें थोरलें तोंड असून डोळे वगैरे कांहीं एक नव्हते.

स याति मम सारूप्यं मरणे मत्स्मृतिं लभेत् ॥५५॥ इति राघवभाषितं तदा श्रुतवान् हर्षसमाकुलो[1] द्विजः ॥ रघुनन्दनसाम्यमास्थितः स प्रययौ ब्रह्मसुपूजितं[2] पदम् ॥५६॥ इति श्रीमद० रामा० उ० अरण्यका० अष्टमः सर्गः ॥ ८ ॥ ततो रामो लक्ष्मणेन जगाम विपिनान्तरम्[3]॥ पुनर्दुःखं समाश्रित्य सीतान्वेषणतत्परः[4]॥१॥ तत्राद्भुतसमाकारो[5] राक्षसः प्रत्यदृश्यत ॥ वक्षस्येव महावक्त्रश्चक्षुरादिविवर्जितः[6]॥२॥

(मू.)याति, मरणे मत्स्मृतिं लभेत्.'॥५५॥(मू.) प्रययौ.॥५६॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये अरण्यकाण्डे अष्टमः सर्गः ॥८॥ (पू.) जगाम, ॥ (मू.) [बभूव]. ॥ १ ॥ (मू.) राक्षसः प्रत्यदृश्यत.॥२॥

१ हर्षानें व्याप्त. २ ब्रह्मदेवानें उत्तम पूजिलेल्या. ३ दुसऱ्या अरण्यांत. ४ गेला. ५ सीतेचा शोध करण्यांत तत्पर. ६ चमत्कारिक आकार ज्याचा, असा. ७ मोठें तोंड ज्याचें, असा. ८ डोळे इत्यादिकांनीं रहित. ९ दिसला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ २ ॥ त्या राक्षसाचे हात चार कोसपर्यंत हालचाल करीत होते; सर्व प्राण्यांचा प्राण घेणाऱ्या त्या महादैत्याचें नांव कबंध. ॥ ३ ॥ रामलक्ष्मण त्याच्या बाहूंमधील प्रदेशांत फिरत होते : भोंवतीं बाहूंचा वेढा पडला, तेव्हां एकाएकीं त्यांची दृष्टि त्या प्रचंड प्राण्यावर गेली. ॥ ४ ॥ तेव्हां राम हांसत हांसत लक्ष्मणाला ह्मणाला :–' लक्ष्मणा! अरे हा पहा राक्षस ! ह्याला डोकें व पाय नसून, छातीवर तोंड आहे ! ॥५॥ हातामध्यें जें जें कांहीं सांपडेल तें तें खाऊन हा निर्वाह करितो, असें मला निःसंशय वाटतें. खरोखर !

बाहू यो[1]जनमात्रेण [2]व्यापृतौ तस्य रक्षसः ॥ कबन्धो नाम दैत्येन्द्रः सर्वसत्त्वविहिंसकः॥ ३ ॥ तद्बाह्वोर्मध्यदेशे तौ चरन्तौ रामलक्ष्मणौ ॥ ददर्शतुर्महासत्त्वं तद्बाहुपरिवे[9]ष्टितौ ॥ ४ ॥ रामः प्रोवाच विहसन्पश्य लक्ष्मण राक्षसम् ॥ शिरःपा[5]दविहीनो ऽयं यस्य [6]वक्षसि चा[7]ननम् ॥ ५ ॥ बाहुभ्यां [8]लभ्यते यद्यत्तत्तद्भक्षन् स्थितो ध्रुवम् ॥ आवामप्येतयोर्बाव्होर्मध्ये संकलितौ ध्रुवम् ॥ ६ ॥

तस्य रक्षसः (पू.). ॥ [सः] (मू.) [आसीत्]. ॥ ३ ॥ (मू.) तौ रामलक्ष्मणौ [3]महासत्वं द[4]दृशतुः ॥ ४ ॥ विहसन् (पू.) पश्य; ॥ (मू.) [अस्ति] ! ॥ ५ ॥ यत् यत् (पू.) स्थितः ! ॥ (मू.) सं[9]कलितौ. ॥ ६ ॥

---

१ चार कोसपर्यंत. २ चळवळ करणारे. ३ मोठ्या प्राण्याला. ४ पाहते झाले.५ डोकें, आणि पाय ह्यांनीं रहित. ६ छातीवर. ७ मुख. ८ मिळतें. ९ वेढिलेले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आपण दोघेही ह्याच्या बाहूंमध्यें सांपडलों आहों ! ॥ ६ ॥ रघुनंदना (लक्ष्मणा) ! बाहेर निघून जाऊं ह्मटलें तर दुसरा कोठें मार्ग दिसत नाहीं. आतां येथें आपण करावें काय? हा तर आपल्याला खाणार ! ' ॥ ७ ॥ लक्ष्मणानें त्याला उत्तर दिलें :– ' रामा ! ह्यांत विचार तो काय करायाचा ? आपण दोघेही, न घाबरतां, ह्या राक्षसाचा एक एक हात तोडूं ह्मणजे झालें ! ' ॥ ८ ॥ रामानें ' बरें आहे ' असें ह्मणून खड्गाच्या योगानें राक्षसाचा उजवा हात तोडिला. लक्ष्मणानेंही तसाच त्याचा डावा भुज सहज तोडून टाकिला. ॥ ९ ॥ तेव्हां त्या दैत्याला फार आश्चर्य वाटलें. - त्यानें ह्या दोघांना विचारिलें :– ' अहो ! तुह्मी आहां कोण? - मला वाटतें - तुह्मी कोणी तरी श्रेष्ठ देव आहां; नाहीं तर माझे हात तोडण्याची, ह्या लोकांत

गन्तुमन्यत्र मार्गो न दृश्यते रघुनन्दन ॥ किं कर्तव्यमितोऽस्माभिरिदानीं भक्षयेत्स नौ[1] ॥७॥ लक्ष्मणस्तमुवाचेदं किं विचारेण राघव ॥ आवामेकैकमव्यग्रौ छिन्द्यां रक्षो[4]भुजौ ध्रुवम् ॥ ८ ॥ तथेति रामः खड्गेन भुजं दक्षिणमच्छिनत् ॥ तथैव लक्ष्मणो वामं[7] चिच्छेद भुजमञ्जसा[8] ॥ ९ ॥ ततोऽतिविस्मितो दैत्यः कौ युवां सुरपुंगवौ ॥ मद्बाहुच्छेदकौ लोके दिवि देवेषु वा कुतः ॥ १० ॥

रघुनन्दन, (पू.) ! ॥ इतः अस्माभिः (मू.) भक्षयेद् ! ॥ ७ ॥ (पू.) उवाच – ' राघव, विचारेण किं ? ॥ अव्यग्रौ[2] आवां[3] (मू.) छिन्द्यावः[5]. ' ॥ ८ ॥ (पू.) भुजं अच्छिनत्[6]. ॥ (मू.) चिच्छेद[6]. ॥ ९ ॥ (पू.) [उवाच] ' सुरपुंगवौ[9] युवां कौ ? ॥ (मू.) ! ' ॥ १० ॥

१ आपल्याला. २ न भ्यालेले. ३ आपण दोघे. ४ राक्षसाच्या हातांना. ५ तोडूं. ६ तोडिता झाला. ७ डाव्या. ८ सहज. ९ देवश्रेष्ठ.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'मी राम, तं कोण?'

काय आणि स्वर्गी देवांमध्यें काय, शक्ति आहे कोणाला?' ॥ १० ॥ पुढें कमलनयन रामचंद्रानें किंचित् हास्य करीत त्याला सांगितलें :– 'राक्षसा, दशरथराजा ह्मणून एक ऐश्वर्यवान् व बलाढ्य असा अयोध्येचा अधिपति होऊन गेला. ॥ ११ ॥ मी त्याचा मुलगा राम. हा बुद्धिमान् पुरुष माझा भाऊ लक्ष्मण. माझी भार्या त्रैलोक्यांत सुंदर अशी जनकाची कन्या सीता ह्मणून आहे. ॥ १२ ॥ आह्मी मृगयेसाठीं बाहेर गेलों होतों. इतक्यांत सीतेला कोणी तरी राक्षसानें नेलें. तिचा शोध करीत आह्मी ह्या वीर अरण्यांत आलों; ॥ १३ ॥ पण येथें तुझ्या बाहूंच्या वेढ्यांत सांपडलों. ह्मणून प्राणांचें रक्षण करण्यासाठीं आह्मांला तुझे भुज तोडावे लागले. - बरें, आतां आह्मांला एवढें सांग कीं - असें हें भयंकर रूप धारण करणारा तूं आहेस तरी

ततो ऽब्रवीद्धसन्नेव रामो राजीवलोचनः ॥ अयोध्याधिपतिः श्रीमान् राजा दशरथो महान् ॥११॥ रामो ऽहं तस्य पुत्रो ऽसौ भ्राता मे लक्ष्मणः सुधीः[1] ॥ मम भार्या जनकजा सीता त्रैलोक्यसुन्दरी ॥१२॥ आवां मृगयया यातौ तदा केनापि रक्षसा ॥ नीतां सीतां विचिन्वन्तौ चागतौ घोरकानने[2] ॥१३॥ बाहुभ्यां वेष्टितावत्र तव प्राणरिरक्षया ॥ छिन्नौ तव भुजौ त्वं च को वा विकटरूपधृक्[3] ॥१४॥

(पू.) रामः अब्रवीत् – '(मू.). ॥ ११ ॥ तस्य पुत्रः (पू.) लक्ष्मणः मे भ्राता. (मू.) सीता मम भार्या. ॥ १२ ॥ (मू.) आगतौ. ॥ १३ ॥ अत्र तव बाहुभ्यां वेष्टितौ; (पू.) तव भुजौ छिन्नौ. (मू.) त्वं कः वा?' ॥ १४ ॥

१ शोधणारे. २ भयाण अरण्यांत. ३ विक्राळ रूप धरणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कोण ? ' ॥ १४ ॥ कबंध ह्मणाला :– " रामा! ज्याअर्थीं तूं माझ्या सन्निध प्राप्त झालास, त्या अर्थीं मी धन्य झालों. मी पूर्वीं गंधर्वांचा राजा होतों. उत्तम रूप आणि तारुण्याचा भर प्राप्त झाल्यामुळें गर्वाविष्ट होऊन ॥ १५ ॥ मी सगळ्या जगांत फिरत असें. माझ्याकडे पाहिल्याबरोबर उत्तम उत्तम स्त्रियांचीं मनें मोहून जात. रामा! मी तप करून ब्रह्मदेवापासून [3]अमरपट्टा मिळविला. ॥ १६ ॥ पुढें एकदां अष्टावक्र मुनींची भेट झाली असतां मला त्यांच्या (त्या आठ ठिकाणीं वांकड्या) शरीराकडे पाहून हांसूं आलें. (मीं त्यांची थट्टा उडविली). त्यामुळें मुनींला क्रोध आला व त्यांनीं मला शाप दिला कीं, 'दुष्टा ! दुर्बुद्धे ! तूं राक्षस होशील ! ' ॥ १७ ॥ तपाच्या प्रभावानें अष्टावक्र मुनींची कांति जिकडे तिकडे फांकली होती. मी

कबन्ध उवाच॥धन्यो ऽहं यदि राम त्वमागतो ऽसि ममान्तिकम् ॥ पुरा गन्धर्वराजो ऽहं रूपयौवनदर्पितः ॥१५॥ विचरँल्लोकमखिलं [2]वरनारीमनोहरः ॥ तपसा ब्रह्मणो लब्धम[3]वध्यत्वं रघूत्तम ॥ १६ ॥ अष्टावक्रं मुनिं दृष्ट्वा कदाचिदहसं पुरा ॥ क्रुद्धो ऽसावाह दुष्ट त्वं राक्षसो भव दुर्मते ॥ १७ ॥ अष्टावक्रः पुनः प्राह वन्दितो मे दयापरः ॥ शापस्यान्तं च मे प्राह तपसा द्योतितप्रभः ॥१८॥

क० उ० – " (पू.) आगतः असि, [तर्हि] अहं धन्यः. ॥ (१५ उ. १६ पू.) अखिलं लोकं विचरन् अहं रूपयौवनदर्पितः [अभवम्]. ॥ रघूत्तम, (मू.) लब्धं. ॥ १५ ॥ १६ ॥ (पू.) [4]अहसम्.(मू.) त्वं राक्षसः भव. ॥ १७ ॥ मे वंदितः दयापरः (पू.). ॥ तपसा द्योतित[5]प्रभः [सः] (मू). – ॥१८॥

१ रूप आणि तारुण्य यांच्यायोगानें गर्वित.२ सुंदर स्त्रियांचें मन हरणारा.३मरण नसणें.४हांसलों.५चमकली कांति ज्याची असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पायां पडलों; तेव्हां दयावंत होऊन त्यांनीं पुन्हां मला शापाचा अंत सांगून दिला :– ते ह्मणाले :– ॥ १८ ॥ ' त्रेतायुगामध्यें साक्षात् नारायण दशरथाचा पुत्र होऊन येईल, व तुझे चार कोस लांब पसरलेले दोन्ही हात तोडील; ॥ १९ ॥ तेव्हां तूं शापापासून मुक्त होत्साता पूर्व रूप पावशील. ' अशा प्रकारें त्यांनीं शाप दिला असतां, मला, स्वतांचें शरीर राक्षसासारखें झालें आहे, असें दिसून आलें ! ॥ २० ॥ रामा, पुढें एके प्रसंगीं मी क्रोधानें देवेंद्राच्या आंगावर धांवून गेलों. तेव्हां त्यानेंही माझ्या मस्तकावर वज्राच्या योगें प्रहार केला. ॥ २१ ॥ रघुकुमारा, तत्काल माझें मस्तक खालीं उदरांत शिरलें व पाय मुळींच नष्ट झाले ! ब्रह्मदेवानें वर दिला होता, ह्मणून वज्रप्रहार लागला तरी मला मृत्यु आला नाहीं. ॥ २२ ॥

त्रेतायुगे दाशरथिर्भूत्वा नारायणः स्वयम् ॥ आगमिष्यति ते बाहू छिद्येते योजनायतौ ॥१९॥ तेन शापाद्विनिर्मुक्तो भविष्यसि यथा पुरा ॥ इति शप्तो ऽहमद्राक्षं राक्षसीं तनुमात्मनः ॥२०॥ कदाचिद्देवराजानमभ्यद्रवमहं रुषा ॥ सो ऽपि वज्रेण मां राम शिरोदेशे ऽभ्यताडयत् ॥ २१ ॥ तदा शिरो गतं कुक्षिं पादौ च रघुनन्दन ॥ ब्रह्मदत्तवरान्मृत्युर्नाभून्मे वज्रताडनात् ॥ २२ ॥

' नारायणः, (१९ मू.). तेन [यदा] योजनायतौ ते बाहू छिद्येते, [तदा] (२० पू.) भविष्यसि.' ॥ (बा. मू.) राक्षसीं तनुं अद्राक्षम् ! ॥ १९ ॥ २० ॥ राम, अहं रुषा (मू.). ॥ २१ ॥ रघुनन्दन, (पू.) गतं; पादौ च [गतौ]. ॥ (मू.) मृत्युः न अभूत्. ॥ २२ ॥

१ योजनाइतके लांब. २ पाहतां झालों ३ क्रोधानें. ४ आंगावर धांवलों. ५ प्रहार करिता झाला. ६ मस्तक. ७ पोटांत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

माझें मुख नाहींसें झालें, असें पाहून सर्व लोकांचीं मनें दयेनें कळवळलीं. ते देवेंद्राला ह्मणाले कीं, ' हा मुखावांचून जगेल तरी कसा ? ' ॥२३॥ तेव्हां इंद्र मला ह्मणाला, ' तुला उदरावर मुख फुटेल; आणि तुझे हात योजनाइतके लांब होतील. आतां येथून जा. ' ॥२४॥ त्यानें असें सांगितलें असतां मी येथें येऊन राहिलों. माझा नित्य निर्वाह वनामध्यें जें जें कांहीं हातांला लागे, त्याच्या भक्षणावर चालत असे. पण, हे पुण्यपुरुषा, सांप्रत तूं ते माझे बाहु तोडून टाकिलेस ! ॥ २५ ॥ - आतां माझी तुजजवळ प्रार्थना एवढीच आहे कीं, - तूं मला एखाद्या अग्नि आणि काष्ठें ह्यांनीं भरलेल्या खाड्याच्या तोंडीं टाकून दे. हे रघुकुलो-

मुखाभावे कथं जीवेद[2]यमित्यमराधिपम् ॥ ऊचुः सर्वे दयाविष्टा मां विलोक्या-
स्यवर्जितम् ॥२३॥ ततो मां प्राह मघवा जठरे[4] ते मुखं भवेत् ॥ बाहू ते योज[5]-
नायामौ भविष्यत इतो व्रज[6] ॥ २४॥ इत्युक्तो ऽत्र वसन्नित्यं बाहुभ्यां वनगोच[7]-
रान् ॥ भक्षयाम्यधुना बाहू खण्डितौ मे त्वया ऽनघ ॥ २५ ॥ इतः परं मां
श्वभ्रास्ये निक्षिपाग्नीन्धनावृते ॥ अग्निना दह्य[11]मानो ऽहं त्वया रघुकुलोत्तम ॥२६॥

सर्वे मां [1]आस्यवर्जितं विलोक्य दयाविष्टाः[संतः]अयं (मू.) ॥२३॥ ततः [3]मघवा (पू.); ते (मू.).॥२४॥ अनघ, (मू.) त्वया मे बाहू खंडितौ.॥२५॥(पू.)[9]श्वभ्रास्ये निक्षिपं . ॥ रघुकुलोत्तम, त्वया(मू.).॥२६॥

१ मुखरहित. २ जीवेत् वांचेल. ३ इंद्र. ४ उदरावर. ५ योजनाइतके लांब. ६ जा. ७ वनांत सांपडणाऱ्या. ८ **अग्नींधनावृते** अग्नि आणि काष्ठें ह्यांनीं भरलेल्या. ९ खाड्याच्या तोंडीं. १० टाक. ११ जळणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कबंध रामाची स्तुति करितो.

त्मा ! तूं अग्नीच्या योगें जाळिलेंस ह्मणजे ॥ २६ ॥ मला पूर्वरूप प्राप्त होईल. आणि मग मी तुझ्या पत्नीचा मार्ग तुला सांगून देईन. ' त्यानें असें सांगितलें असतां रामानें तत्क्षणीं लक्ष्मणाकडून एक खाडा तयार करविला, त्यामध्यें त्या राक्षसाला ॥ २७ ॥ ठेवून काष्ठांच्या योगानें दहन केलें. लागलाच त्या राक्षसाच्या शरीरापासून एक मदनासारखा सुंदर व सर्व अलंकारांनीं भूषित असा पुरुष उत्पन्न झाला. ॥ २८ ॥ त्यानें रामाला प्रदक्षिणा घातली, साष्टांग नमस्कार केला व हात जोडून भक्तीमुळें सद्गदित झालेल्या वाणीनें असें म्हटलें : — ॥ २९ ॥ गंधर्व ह्मणाला : — ' रामा, आज माझें मन तुझी स्तुति करण्यासाठीं फार त्वरेनें (उत्सुकतेनें) उचल करीतें आहे. तुझ्या स्वरूपाला देशाच्या योगें इयत्ता नाहीं (तूं अमुक प्रदेशांत

पूर्वरूपमनुप्राप्य भार्यामार्गं वदामि ते ॥ इत्युक्ते लक्ष्मणेनाशु श्वभ्रं निर्माय तत्र तम् ॥२७॥ निक्षिप्य प्रादहत्काष्ठैस्ततो देहात्समुत्थितः ॥ कन्दर्पसदृशाकारः सर्वाभरणभूषितः ॥ २८ ॥ रामं प्रदक्षिणं कृत्वा साष्टांगं प्रणिपत्य च ॥ कृताञ्जलिरुवाचेदं भक्तिगद्गदया गिरा ॥२९॥ गंधर्व उवाच । स्तोतुमुत्सहते मेऽद्य मनो रामातिसंभ्रमात् ॥ त्वामनन्तमनाद्यन्तं मनोवाचामगोचरम् ॥ ३० ॥

(पू.) भार्यामार्गं वदामि " ॥ (मू.) ॥ २७ ॥ निक्षिप्य काष्ठैः (मू.) [पुरुषः] ॥ २८ ॥ (मू.) इदं उवाच — ॥ २९ ॥ ' राम, अद्य (मू.) त्वां स्तोतुं उत्सहते. ॥ ३० ॥

१ पावून. २ पत्नीच्या मार्गाला. ३ खाड्याला. ४ निर्माण करून. ५ ठेवून. ६ जाळता झाला. ७ उठलेला. ८ मदनासारखें रूप ज्याचें, असा. ९ स्तुति करण्यास. १० उचल करितें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मात्र असतोस, असें नाहीं; तर सर्वत्र आहेस). तसें तुला आदि किंवा अंत नाहीं (तुला कालाच्या योगें मर्यादा नाहीं ह्मणजे तूं अनादि कालापासून आहेस व तुझा अंत कधींही व्हावयाचा नाहीं). मनाला तुज-बद्दल तर्क करण्याची शक्ति नाहीं व वाणीला तुझें वर्णन करितां येत नाहीं. ॥ ३० ॥ तुझें सूक्ष्म रूप - विराट् आणि हिरण्यगर्भ ह्या नांवांच्या स्थूल सूक्ष्म अशा - दोन्ही देहांहून वेगळें व ज्ञानमय असल्यामुळें योग्यांना देखील समजण्यास कठीण आहे. तुझ्यावांचून इतर सर्व दृश्य पदार्थ अनात्मक अर्थात जड होत. प्रभो, मन हें जड कोटींतच असल्यामुळें तुजहून भिन्न आहे; त्याला तुझें ज्ञान व्हावें कसें ? ॥ ३१ ॥ बुद्धि आणि आत्म्याचें प्रतिबिंब ह्यांच्या ऐक्याला जीव असें ह्मटलें आहे. बुध्यादि जड पदार्थांचें साक्षिभूत ब्रह्मच होय. अशा त्या तुझ्या रूपीं मन आणि वाणी ह्यांचा प्रवेश होत नाहीं. त्याच्या ठिकाणीं सर्व प्रपंचाचा ॥ ३२ ॥ आरोप अज्ञानामुळें लोक करितात. वस्तुतः तें निर्विकार

सूक्ष्मं ते रूपमव्यक्तं देहद्वयविलक्षणम् ॥ दृग्रूपमितरत्सर्वं दृश्यं जडमनात्मकम् ॥ तत्क-थं त्वां वि[4]जानीयाद्व्यतिरिक्तं मनः प्रभो ॥ ३१ ॥ [5]बुद्ध्यात्माभासयोरैक्यं जीव इत्यभि-[6]धीयते ॥ बुद्ध्यादिसाक्षी ब्रह्मैव तस्मिन्निर्विषये ऽखिलम् ॥ ३२ ॥ आरोप्यते ऽज्ञानव-शान्निर्विकारे ऽखिलात्मनि ॥ हिरण्यगर्भस्ते सूक्ष्मं देहं स्थूलं विराट् स्मृतम् ॥ ३३ ॥

देहद्वयवि[1]लक्षणं दृ[2]ग्रूपं (पू. द्वि. मू.); ॥ प्रभो, तत [3]व्यतिरिक्तं मनः त्वां (मू.) ? ॥ ३१ ॥ (३२ मू. ॥ बा. ३३ पू.) [त्वयि] अज्ञानवशात् अखिलं [जगत्] आरो[7]प्यते. ॥ (मू.). ॥३२॥३३॥

१ दोन्ही शरीरांवेगळें. २ ज्ञानरूप. ३ वेगळें. ४ जाणील. ५ बुद्धि आणि आत्म्याचें प्रतिबिंब ह्यांचें. ६ ह्मटलें जातें. ७ आरोपिलें जातें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व सर्वांचा आत्मा होय. हिरण्यगर्भ हें तुझें सूक्ष्म शरीर, व विराट् स्थूल देह असें ह्मटलें आहे. ॥ ३३ ॥ तुझें सूक्ष्मरूप - हृदयकमलामध्यें - ध्यान करण्याचा विषय होय. त्याचें ध्यान केलें असतां ध्यान करणारांचें कल्याण होतें; ह्मणजे ह्याचें ध्यान सिद्ध झालें असतां प्राण्याला भूत, भविष्य व वर्तमान अशा जगांतील यावत् गोष्टींचें ज्ञान होतें. ॥ ३४ ॥ अंडगोल हा तुझा स्थूल देह होय. त्याच्या भोंवतीं एकापेक्षां एक अधिक अशीं महत्तत्त्वादिकांचीं * सात आवरणें आहेत. त्यांत असलेला विराट्जीव हा धारणेचा आश्रय होय. ॥ ३५ ॥ सर्व जनांनीं अंतीं प्राप्त करून घेण्याजोगी वस्तु कायतो तूंच होस. चतुर्दश भुवनें तुझे अव-

[2]भावनाविषयो राम सूक्ष्मं ते ध्यातृमंगलम् ॥ [3]भूतं [4]भव्यं [5]भविष्यच्च यत्रेदं दृश्यते जगत् ॥३४॥ स्थूलेऽण्डकोशे देहे ते महदादिभिरावृते ॥ सप्तभिरुत्तरै[6]र्गुणैर्[7]वैराजो [8]धारणाश्रयः ॥ ३५ ॥ त्वमेव सर्व[9]कैवल्यं लोकास्ते ऽवयवाः स्मृताः ॥ पातालं ते [10]पादमूलं पार्ष्णिस्तव महातलम् ॥ ३६ ॥

राम, ध्यातृमंगलं ते सूक्ष्मं [रूपं] (पू.) ॥ यत्र (मू.) दृश्यते. ॥ ३४ ॥ सप्तभिः उत्तरगुणैः (पू.) अण्डकोशे ते स्थूले देहे (मू.). ॥ ३५ ॥ (मू.); ॥ ३६ ॥

---

१ ध्यान करणारांना हितावह. २ ध्यानाचा विषय. ३ पूर्वी झालेलें. ४ सध्यां होत असणारें. ५ पुढें होणारें. ६ उत्तरोत्तर दसपटीनें अधिक. ७ विराट् पुरुष. ८ ध्यानाचा आधार. ९ अंतीं मिळविण्याचें. १० तळवे. * (१) महत्तत्त्व, (२) अहंकार, (३) आकाश, (४) वायु, (५) अग्नि, (६) उदक, (७) पृथ्वी हीं सात आवरणें होत. हीं, पहिल्यापेक्षां दुसरें दसपटीनें मोठें, दुसऱ्यापेक्षां तिसरें दसपटीनें अधिक, अशा क्रमानें उत्तरोत्तर मोठालीं आहेत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यव असें ह्मटलें आहे : – पाताल लोक तुझा तळपाय; महातल तुझी खोंट; ॥ ३६ ॥ रसातल तुझे घोंटे; व तलातल तुझ्या पोटऱ्या, असें ह्मटलें आहे; रामा, सुतल लोक तुझे गुडघे, तसाच वितल मांड्या होत; ॥ ३७ ॥ रामचंद्रा, अतल हा तुझा मांड्यांचा वरचा सांधा, आणि पृथ्वी तुझा कटिभाग होय; स्वर्गलोक तुझें वक्षःस्थल व महर्लोक तुझा कंठभाग आहे; ॥ ३८ ॥ जनलोक हें तुझें मुख; आणि तपोलोक तुझा शंखाकार ललाट होय; प्रभो रघुवीरा, सत्यलोक तुझ्या मस्तकीं सदासर्वकाळ राहत असतो; ॥ ३९ ॥ रामा, इन्द्रादि लोकपाल तुझे बाहु; दिशा कान; अश्विनीकुमार नासिका, आणि अग्नि तुझें मुख, असें ह्मणतात; ॥ ४० ॥ रामचंद्रा, सूर्य तुझे नेत्र, व चंद्र मन असें ह्मटलें आहे; तुझ्या भ्रुकुटींची वक्रता हाच काल

रसातलं ते गुल्फौ[1] तु तलातलमितीर्यते[2] ॥ जानुनी[3] सुतलं राम ऊरू[4] ते वितलं तथा ॥ ३७ ॥ अतलं च मही राम जघनं नाभिगं नभः ॥ उरःस्थलं ते ज्योतींषि[5] ग्रीवा ते मह उच्यते ॥ ३८ ॥ वदनं[7] जनलोकस्ते तपस्ते शंखदेशगम्[8] ॥ सत्यलोको रघुश्रेष्ठ शीर्षण्यास्ते[9] सदा प्रभो ॥ ३९ ॥ इन्द्रादयो लोकपाला बाहवस्ते दिशः श्रुती[11] ॥ अश्विनौ[12] नासिके[13] राम वक्त्रं[14] ते ऽग्निरुदाहृतः ॥ ४० ॥ चक्षुस्ते सविता[15] राम मनश्चन्द्र उदाहृतः ॥

(पू.)[जंघे]इति ईर्यते; राम, ते(मू.)॥ ३७ ॥ अतलं च[ते ऊर्वोरूर्ध्वं जघनाधोभागः];राम,(पू.);॥ ते(मू.); ते ग्रीवा[6] महः उच्यते;॥ ३८ ॥ रघुश्रेष्ठ प्रभो, ते(मू.)आस्ते[10];॥ ३९ ॥ राम, ते(मू.)वक्त्रं अग्निः उदाहृतः;॥ ४० ॥(पू.)

१ घोंटे. २ ईर्यते ह्मटलें जातें. ३ गुडघे. ४ मांड्या. ५ नक्षत्रें. ६ मान. ७ मुखभाग. ८ शंखासारख्या ललाटीं असलेलें. ९ शीर्षणि मस्तकीं. १० आहे. ११ कान. १२ अश्विनीकुमार. १३ नाकपुड्या. १४ मुख. १५ सूर्य. १७

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

(मृत्यु); व तुझी बुद्धि बृहस्पति होय; ॥ ४१ ॥ रुद्र तुझा अहंकाररूप आहे; हे निर्विकारस्वरूपा, तुझें भाषण वेद होत; यम तुझ्या दाढांवर राहिला आहे; तुझ्या दंतपक्ति नक्षत्रें आहेत; ॥ ४२ ॥ तुझें हास्य ही जगाला मोह घालणारी माया होय; तुझे कटाक्षपात ही सृष्टि; तुझा पुढचा भाग धर्म, आणि पृष्ठभाग अधर्म, असें ह्मटलें आहे; ॥ ४३ ॥ रघुवीरा, तुझ्या नेत्रांच्या पापण्या मिटणें आणि उघडणें हेच रात्र आणि दिवस होत; सात समुद्र तुझें उदर; आणि, प्रभो, नद्या तुझ्या नाड्या आहेत; ॥ ४४ ॥ ईश्वरा, तुझ्या शरीरावरील लव हे वृक्षवनस्पति; तुझें रेत ह्मणजे वृष्टि; आणि ज्ञानशक्ति हा तुझा महिमा (सर्वांपेक्षां श्रे-

भ्रूभंग एव कालस्ते बुद्धिस्ते वाक्पतिर्भवेत् ॥ ४१ ॥ रुद्रो ऽहंकाररूपस्ते वाचश्छन्दांसि ते ऽव्यय ॥ यमस्ते दंष्ट्रदेशस्थो नक्षत्राणि द्विजालयः ॥ ४२ ॥ हासो मोहकरी माया सृष्टिस्ते ऽपांगमोक्षणम् ॥ धर्मः पुरस्ते ऽधर्मश्च पृष्ठभाग उदीरितः ॥४३॥ निमिषोन्मेषणे रात्रिर्दिवा चैव रघूत्तम ॥ समुद्राः सप्त ते कुक्षिर्नाड्यो नद्यस्तव प्रभो ॥ ४४ ॥ रोमाणि वृक्षौषधयो रेतो वृष्टिस्तव प्रभो ॥

ते (मू.) बुद्धिः वाक्पतिः भवेत; ॥ ४१ ॥ अव्यय, रुद्रः ते (पू.) वाचः ॥ (मू.); ॥ ४२ ॥ ते (पू.) सृष्टिः; ॥ धर्मः ते (मू.). ॥४३॥ रघूत्तम, (पू.); ॥ प्रभो, सप्त (मू.) नाड्यः;॥४४॥प्रभो, तव(पू.); ॥

१ बृहस्पति. २ भाषणें. ३ वेद. ४ दाढेवर राहणारा. ५ दंतपंक्ति. ६ कटाक्ष फेंकणें. ७ डोळ्यांची झांप व उघड. ८ दिवस. ९ उदर. १० केंस. ११ वृक्ष व ओषधि.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ष्ठपणा) ; तुझें स्थूल (विराट्) शरीर हें अशा प्रकारचें आहे. ॥४५॥ मनुष्यांनीं ह्यां तुझ्या स्थूल रूपीं आपलें मन स्थिर केलें; ह्मणजे त्यांना आयासावांचून मोक्ष प्राप्त होतो. ह्यावांचून दुसरें सुलभ मोक्षप्राप्तीचें उत्तम साधन कांहीं नाहीं. ॥ ४६ ॥ ह्मणून, रामा, मी तुझ्या स्थूल रूपाचेंच ध्यान करितों; त्याचें चिंतन केलें असतां मनुष्याच्या अंतःकरणीं प्रेमरस उद्भवतो; खऱ्या प्रेमरसाचें लक्षण हें आहे कीं, आश्रयाचें स्मरण झाल्याबरोबर मनुष्याच्या आंगावर रोमांच उभे राहतात : तशी स्थिति तुझ्या विराट् स्वरूपाचें ध्यान करणाराची होते. ॥४७॥ रामा, जीव तुझ्या स्थूल रूपाचें ध्यान करूं लागला कीं त्याला मुक्ति मिळालीच, असें समजावें. स्थूलरूपाचें चिंतन तर असोच; पण रघुवीरा, मी सांप्रत अग्रभागीं दिसत असलेल्या ह्या तुझ्या स्वरूपाचेंच ध्यान करितों. ॥४८॥ ह्याच्या हस्तांत धनुष्यबाण धरिलेले आहेत; अंगकांति श्यामवर्ण असून, जटा आणि वल्कलें ह्यांच्या योगानें

महिमा[1] ज्ञानशक्तिस्ते एवं स्थूलं वपुस्तव ॥ ४५ ॥ यदस्मिन् स्थूलरूपे ते मनः सन्धार्यते[2] नरैः ॥ अनायासेन मुक्तिः स्यादतो ऽन्यन्न हि किंचन ॥ ४६ ॥ अतो ऽहं राम रूपं ते स्थूलमेवानुभावये ॥ यस्मिन्ध्याते प्रेमरसः सरोमपुलको[4] भवेत् ॥४७॥ तदैव मुक्तिः स्याद्राम यदा ते स्थूलभावकः ॥ तदप्यास्तां तवैवाहमेतद्रूपं विचिन्तये ॥ ४८ ॥ धनुर्बाणधरं श्यामं जटावल्कलभूषितम् ॥

ते(मू.)वपुः.॥४५॥यत् नरैः ते(पू.)[तर्हि] (मू). ॥ ४६ ॥ राम, (पू.) रूपं अनुभावये[3]; ॥ (मू.) प्रेमरसः भवेत्. ॥४७॥ राम, यदा [जीवः] ते स्थूलभावकः, (मू.)तव एतत् एव रूपं विचिंतये.[5]॥४८॥ (पू.) ॥

१ मोठेपण. २ लाविलें जातें. ३ ध्यान करितों. ४ रोमांचांसह. ५ ध्यान करितों.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याला शोभा आली आहे; ही मूर्ति आपल्या मनोहर तारुण्य वयांत असून लक्ष्मणासहवर्तमान सीतेचा शोध करीत आहे. ॥४९॥ रघुनंदना, हेंच रूप माझ्या अंतःकरणीं सतत वास करो. भगवान् शंकर ह्मणजे सर्वज्ञ; पण तो देखील पार्वतीसह सर्वकाळ ॥ ५० ॥ ह्या तुझ्या स्वरूपाचेंच निर्वेधपणें ध्यान करीत असतो; रघुवीरा, तुझें नाम - जीवांना अज्ञानसमुद्रांतून - तारणारें आहे; - तें 'तत्त्वमसि' इत्यादि महावाक्यांनीं प्रतिपादिलेल्या - ब्रह्मरूप अर्थाचें वर्णन करितें; भगवान् शंकर नित्य आपलें अंतःकरण संतुष्ट ठेवून काशीक्षेत्रामध्यें मरणोन्मुख झालेल्या जीवांना त्या तुझ्या 'राम, राम' अशा नाममंत्राचा नेहमीं उपदेश करीत असतो. ह्यावरून, हे सीतापते, तूं परमेश्वर आहेस, असें पूर्णपणें सिद्ध आहे. ॥ ५१ ॥ ५२ ॥ हे सर्व जन तुझ्या मायेनें

अपीच्यवयसं[1] सीतां विचिन्वन्तं सलक्ष्मणम् ॥ ४९ ॥ इदमेव सदा मे स्यान्मानसे रघुनन्दन ॥ सर्वज्ञः शंकरः साक्षात्पार्वत्या सहितः सदा ॥५०॥ त्वद्रूपमेवं सततं ध्यायन्नास्ते रघूत्तम ॥ मुमूर्षूणां सदा काश्यां तारकं[2] ब्रह्मवाचकम् ॥ ॥ ५१ ॥ रामरामेत्युपदिशन्सदा सन्तुष्टमानसः ॥ अतस्त्वं जानकीनाथ परमात्मा सुनिश्चितः ॥ ५२ ॥ सर्वे ते मायया मूढास्त्वां न जानन्ति तत्त्वतः ॥ नमस्ते रामभद्राय वेधसे परमात्मने ॥ ५३ ॥

(मू.) ॥४९॥ (पू.) स्यात्. रघुनन्दन, ॥ (मू.) साक्षात् शंकरः सदा ॥५०॥ मुमूर्षूणां तारकं ब्रह्मवाचकं एवं त्वद्रूपं संततं ध्यायन् सदा काश्यां आस्ते, रघूत्तम, ॥ ५१ ॥ (पू.) [तिष्ठति] जानकीनाथ, (मू.). ॥ ५२ ॥ (पू.) न जानन्ति. ॥ (मू.) ते नमः. ॥ ५३ ॥

१ सुंदर वयांत (तारुण्यांत) असणाऱ्या. २ तारणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मोहून गेले आहेत; ह्मणून ह्यांना तुझ्या यथार्थस्वरूपाचें ज्ञान होत नाहीं. हे रामचंद्रा, हे मंगलदायका, हे सृष्टिकर्त्या, परमेश्वरा, तुला नमस्कार असो. ॥९३॥ हे अयोध्याधीश्वरा, तुला नमस्कार असो. लक्ष्मण तुझी सतत सेवा करीत आहे. हे जगन्नाथा, माझें रक्षण कर. मला संसारांतून तार. तुझ्या मायेनें मला मोह घालूं नये." ॥९४॥ रामचंद्र ह्मणालाः– 'हे देवगंधर्वा, तूं पुण्यवान् आहेस. तुझ्या भक्तीनें आणि स्तुतीच्या योगानें मीं संतुष्ट झालों. आतां तूं चिरकालपर्यंत राहणाऱ्या माझ्या परम पदरूपी स्वर्गास जा. योगी पुरुष आपल्या योगसामर्थ्यानें ह्या देहासह त्या लोकीं जाऊं शकतात. ॥ ९९ ॥ तूं आतां माझी जी स्तुति केलीस, ही वेदप्रतिप्रादित अर्थाला अनुलक्षून आहे. जे जन अनन्य भावानें भक्तिपुरःसर ह्या स्तोत्राचा जप करितील, ते अज्ञानापासून उद्भवणाऱ्या प्रपंचाचा निरास करून माझ्या स्वरूपास पावतील. माझें स्वरूप नित्य व अनुभवगम्य आहे.' ॥ ९६ ॥ इतिश्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे अरण्यकांडे नवमःसर्गः ॥ ९ ॥

अयोध्याधिपते तुभ्यं नमः सौमित्रिसेवित ॥ त्राहि त्राहि जगन्नाथ मां माया नावृणोतु ते ॥५४॥ राम उवाच ॥ तुष्टोऽहं देवगन्धर्व भक्त्या स्तुत्या च तेऽनघ ॥ याहि मे परमं स्थानं योगिगम्यं[1] सनातनम्[2] ॥५५॥ जपन्ति ये नित्यमनन्यबुद्ध्या भक्त्या त्वदुक्तं स्तवमागमोक्तम् ॥ तेऽज्ञानसंभूतभवं[3] विहाय[4] मां यान्ति नित्यानुभवानुमेयम्[5] ॥ ५६ ॥
इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे अरण्यकाण्डे नवमः सर्गः ॥ ९ ॥

(पू.)तुभ्यं नमः ॥ (मू.) ते माया मां न आवृणोतु.' ॥५४॥ रा०उ०–'अनघ देवगंधर्व, अहं ते (पू.) तुष्टः॥(मू.)मे परमं स्थानं याहि.॥५५॥(पू.)त्वदुक्तं स्तवं जपंति,॥(मू.)मां यान्ति.'॥५६॥इति नवमः सर्गः

१ योग्यांना समजणारें. २ नित्य. ३ अज्ञानामुळें उद्भवणाऱ्या संसारास. ४ टाकून. ५ नित्य अनुभवानें कळून येणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ते शबरीकडे आले.

अशा प्रकारें वर मिळाला असतां, तो गंधर्व जावयास निघाला, व जातां जातां रामाला ह्मणाला :–‘ रघुनंदना, तो पुढें - दिसत आहे, - त्या आश्रमांत एक शबरी (भिल्लीण) राहत असते ॥ १ ॥ ती भक्तिमार्गांत निष्णात असून तुझ्या चरणकमलावर परम प्रेम करिते. हे महाभाग्यशाली पुरुषा, तिजकडे जा; ह्मणजे ती तुला - सीतेबद्दल - वृत्तांत सर्व सांगेल. ’ ॥ २ ॥ असें सांगून तो गंधर्व सूर्यासारख्या तेजस्वी विमानाच्या योगें विष्णुपदास (स्वर्गास) गेला. (शंकर ह्मणतात :– पार्वति !) रामनामाचें स्मरण केलें असतां असें फल प्राप्त होतें. - असो. - ॥३॥ - कबंधाच्या अरण्यामध्यें - सिंह व्याघ्र इत्यादि पशूंचा फार उपद्रव होता. रामचंद्र तें भयाण अरण्य मागें टाकून हळूहळू शबरीच्या आश्रमस्थलीं येऊन पोंचला. ॥ ४ ॥ लक्ष्मणासहवर्तमान रामचंद्र येत आहे, असें दुरूनच शबरीच्या दृष्टीस पडलें. लागलीच ती आनंदानें उठून सामोरी

लब्ध्वा वरं स गंधर्वः [1]प्रयास्यन् राममब्रवीत् ॥ [2]शबर्यास्ते पुरोभागे आश्रमे रघुनन्दन ॥ ॥१॥ भक्त्या त्वत्पादकमले [3]भक्तिमार्गविशारदा ॥ तां प्रयाहि महाभाग सर्वं ते [5]कथयिष्यति ॥२॥ इत्युक्त्वा प्रययौ सोऽपि विमानेनार्क[6]वर्चसा ॥ विष्णोः पदं रामनामस्मरणे फलमीदृशम् ॥३॥ त्यक्त्वा तद्विपिनं घोरं सिंहव्याघ्रादिदूषितम् ॥ शनैरथाश्रमपदं शबर्या रघुनन्दनः ॥ ४ ॥ शबरी राममालोक्य लक्ष्मणेन समन्वितम् ॥

सः गंधर्वः वरं (पू.) – ॥ ‘रघुनन्दन, (बा. १ उ. २ पू.) शबरी आस्ते, ॥ तां [4]प्रयाहि; [सा] भक्त्या (मू.).’ ॥१॥२॥ (पू.) विमानेन विष्णोः पदं प्रययौ. (मू.) फलं. ॥ ३ ॥ रघुनन्दनः (पू.) तत् विपिनं त्यक्त्वा (मू.) आश्रमपदं [ययौ.] ॥ ४ ॥ सा शबरी (पू.) रामं [7]आरात् [8]आयान्तं आलो[9]क्य

१ जाणारा. २ भिल्लीण. ३ भक्तिमार्गांत निष्णात. ४ जा. ५ सांगेल. ६ सूर्यासारख्या तेजस्वी. ७ जवळ. ८ येणाऱ्या. ९ पाहून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आली ॥ ५ ॥ व चरणांपुढें लोटांगण घालून उभी राहिली. तिचे नेत्र आनंदाश्रूंनीं भरून आले. तिनें स्वागतप्रश्न करून उभयतांचा सत्कार केला, त्यांना उत्तम आसनांवर बसविलें, ॥ ६ ॥ व भक्तिपूर्वक उत्तम प्रकारें रामलक्ष्मणांचे पाय धुवून त्या उदकाच्या योगें आपल्या शरीरावर सिंचन केलें. नंतर शबरीनें मोठ्या आदरानें अर्घ्यादि उपचारांसहित पूजाद्रव्यांनीं लक्ष्मणासह रामाची यथाविधि पूजा केली, व रामासाठीं संग्रह करून ठेविलेलीं अमृततुल्य फळें आनंदानें भक्तिपूर्वक त्याला अर्पण केलीं, आणि विलेपनासह सुगंधिक पुष्पांच्या योगें - पुन्हां - त्याच्या चरणांची पूजा केली. ॥ ७ ॥ ॥ ८ ॥ ॥ ९ ॥

आयान्तमाराद्धर्षेण प्रत्युत्थायाचिरेण सा ॥५॥ पतित्वा पादयोरग्रे हर्षपूर्णाश्रुलोचना ॥ स्वागतेनाभि[2]नन्द्याथ स्वासने [3]संन्यवेशयत् ॥६॥ रामलक्ष्मणयोः सम्यक्पादौ प्रक्षाल्य भक्तितः ॥ तज्जलेनाभिषिच्यांगमथार्घ्यादिभिरादृता ॥७॥ संपूज्य विधिवद्रामं ससौमित्रिं [4]सपर्यया ॥ संगृहीतानि दि[5]यानि रामार्थं शबरी मुदा ॥८॥ फलान्यमृतकल्पानि ददौ रामाय भक्तितः ॥ पादौ संपूज्य कुसुमैः सुगन्धैः [7]सानुलेपनैः ॥ ९ ॥

[1]अचिरेण (बा. मू.), ॥ ५ ॥ पादयोः अग्रे (पू.) ॥ [सती] (मू.). ॥ ६ ॥ आदृता [सा] शबरी (पू.) सम्यक् प्रक्षाल्य, ॥ अङ्गं (मू.) ॥ ७ ॥ ससौमित्रि रामं (पू.) संपूज्य, ॥ शबरी रामार्थं मुदा (मू.) ॥८॥ [6]अमृतकल्पानि (९ पू.) ददौ. ॥ भक्तिसंपन्ना शबरी (बा.९उ.) कुसुमैः पादौ सम्पूज्य ॥

१ तत्क्षणीं. २ अभिनन्द्य सत्कार करून. ३ बसविती झाली. ४ पूजेनें. ५ देण्याजोग्या. ६ अमृतासारख्या. ७ उटीसहित, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शबरीचा वृत्तांत.

आतिथ्य झाल्यावर कनिष्ठ बंधूसह रामचंद्र स्वस्थ बसला असतां, महाभक्त शबरीनें हात जोडून त्याच्याशीं भाषण करण्यास प्रारंभ केला :- ती ह्मणाली :- ॥ १० ॥ " रघुवीरा, ह्या आश्रमामध्यें माझे गुरु महर्षि राहत असत. मींही आज पुष्कळ सहस्त्र वर्षें त्यांची सेवा करीत त्यांच्या सन्निध राहत असें. सांप्रत ते ब्रह्मपदीं गेले. जातांना त्यांनीं मला असें सांगितलें कीं, ' तूं स्वस्थ अंतःकरणेंकरून येथेंच राहा. ॥११॥१२॥ साक्षात् सनातन परब्रह्म परमात्मा राक्षसांचा वध आणि ऋषींचें रक्षण करण्यासाठीं दशरथाचा पुत्र राम झाला आहे. ॥ १३ ॥ तो येथें लवकरच येईल. तूं - इतर विषयांकडे लक्ष न देतां - एकनिष्ठपणें त्याचें ध्यान करीत स्वस्थ ऐस. सध्यां प्रभु चित्रकूटपर्वतावरील आश्रमांत राहत आहे. ॥ १४ ॥

कृतातिथ्यं रघुश्रेष्ठमुपविष्टं सहानुजम् ॥ शबरी भक्तिसंपन्ना प्राञ्जलिर्वाक्यमब्रवीत् ॥ ॥१०॥ अत्राश्रमे रघुश्रेष्ठ गुरवो मे महर्षयः ॥ स्थिताः शुश्रूषणं तेषां कुर्वती समुपस्थिता ॥११॥ बहुवर्षसहस्राणि गतास्ते ब्रह्मणः पदम् ॥ गमिष्यन्तोऽब्रुवन्मां त्वं वसात्रैव समाहिता ॥१२॥ रामो दाशरथिर्जातः परमात्मा सनातनः ॥ राक्षसानां वधार्थाय ऋषीणां रक्षणाय च ॥१३॥ आगमिष्यति चैकाग्रध्याननिष्ठा स्थिरा भव ॥ इदानीं चित्रकूटाद्रावाश्रमे वसति प्रभुः ॥१४॥

(बा.१०पू.) रघुश्रेष्ठं (मू.)–॥९॥१०॥"रघुश्रेष्ठ, अत्र आश्रमे मे (११पू.) ॥ स्थिताः तेषां(११उ.) अहं बहुवर्षसहस्राणि समुपस्थिता. ॥ (१२पू.) गताः. ॥ ते गमिष्यन्तः[सन्तः]मां अब्रुवन्–'(मू.)वसे.॥११॥ ॥१२॥ सनातनः परमात्मा (मू.) दाशरथिः रामः जातः; ॥१३॥ [सः] (पू.). ॥ प्रभुः(मू.). ॥१४॥

१ सेवा. २ जवळ राहिलेली. ३ जायाला निघालेले. ४ समाधानयुक्त, अशी. ५ राहा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो येईपर्यंत तूं आपल्या शरीराचें संरक्षण कर. रामाचें दर्शन झाल्यावर स्वतांचें शरीर दग्ध करून तूं त्याच्या पदास जाशील.' ॥१५॥ रामा, मी त्यांच्या आज्ञेप्रमाणें वागत आल्यें – ह्मणजे केवळ तुझें ध्यान करण्यांत तत्पर असल्यें. आजपर्यंत तुझी वाट पाहिली. आज गुरूंचें वचन फलद्रूप झालें. ॥ १६ ॥ रामचंद्रा, तुझें दर्शन माझ्या गुरूंना देखील झालें नाहीं; आणि मी केवळ मूढ व हीन जातींत उत्पन्न झालेली स्त्री असून मला झालें, - हें केवढें तरी माझें भाग्य ! - खरोखर, तुझें रूप अप्रमेय आहे. ॥ १७ ॥ तुझ्या दासाच्या दासाची किंवा अशी (दासाचा दास, त्याचा दास, पुन्हां त्याचा दास अशी) परंपरा शंभर पर्यंत अथवा

यावदागमनं तस्य तावद्रक्ष कलेवरम्[1] ॥ दृष्ट्वैव राघवं दग्ध्वा देहं यास्यसि तत्पदम्
॥१५॥ तथैवाकरवं राम त्वद्ध्यानैकपरायणा ॥ प्रतीक्ष्यागमनं ते ऽद्य सफलं गुरु-
भाषितम् ॥१६॥ तव संदर्शनं राम गुरूणामपि मे न हि ॥ योषिन्मूढा ऽप्रमेया-
त्मन्[6] हीनजातिसमुद्भवा[7] ॥ १७ ॥ तव दासस्य दासानां शतसंख्योत्तरस्य वा ॥
दासीत्वे नाधिकारो ऽस्ति कुतः साक्षात्तवैव हि ॥ १८ ॥

तस्य (पू.) रक्ष. ॥ राघवं दृष्ट्वा एव देहं [2]दग्ध्वा तत्पदं [3]यास्यसि. ' ॥ १५ ॥ (बा. पू.) [अहं] ते आगमनं प्रतीक्ष्य तथा एव [4]अकरवं (मू.) सफलं. ॥ १६ ॥ राम, (पू.) गुरूणां अपि न ! ॥ अप्रमेयात्मन्, [अहं] (मू.) योषित्[8] [अस्मि]. ॥ १७ ॥ [मम] (पू.) दासस्य ॥ (मू.) न अस्ति; साक्षात् तव एव [दासीत्वे] कुतः ? ॥ १८ ॥

१ शरीराला. २ जाळून. ३ जाशील. ४ करिती झाल्यें. ५ वाट पाहून. ६ इयत्ता नाहीं स्वरूपाला ज्याच्या, अशा. ७ नीच जातींत जन्मास आलेली. ८ बायको. ९ दासाचा दास, पुन्हां त्याचा दास अशा परंपरेनें शंभरापेक्षां पुढल्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुढेंही लागत गेली तरी त्या दासाची देखील सेवा करण्याचा मला अधिकार नाहीं; मग प्रत्यक्ष तुझी सेवा करण्याची योग्यता कोठून असेल ? ॥ १८ ॥ रामा, तुझें स्वरूप मनाला समजण्यासारखें किंवा वाणीनें वर्णन करण्याजोगें नाहीं. असें असून, तूं आज मला दिसलास कसा ? हे देवाधिदेवा ! तुझी स्तुति कशी करावी, तें मला समजत नाहीं. काय करूं ? मजवर अनुग्रह कर." ॥ १९ ॥ राम ह्मणाला :– " शबरि ! पुरुष, स्त्री, किंवा जाति, नांवें, आश्रम वगैरे विशेष, हीं कांहीं माझी सेवा करण्याचीं साधनें नव्हत. भक्ति हेंच मुख्य साधन होय. ॥ २० ॥ लोकांनीं पुष्कळ यज्ञ, दानें, तपश्चर्या, वेदाध्ययन व इतर कर्में केलीं, पण जर ते माझी भक्ति करण्यास पराङ्मुख असतील, तर त्यांना माझें दर्शन मिळणें शक्य नाहीं. ॥ २१ ॥ बाई, ह्मणून मी तुला भक्तीचीं साधनें संक्षेपांत सांगतों :– साधूंचा समागम धरणें हें पहिलें (मुख्य) साधन होय; ॥ २२ ॥ दुसरें, माझ्या कथा वाचणें; तिसरें, माझ्या गुणांचें कीर्तन करणें; चवथें, माझें प्रतिपादन

कथं रामाद्य मे दृष्टस्त्वं मनोवागगोचरः ॥ स्तोतुं न जाने देवेश किं करोमि प्रसीद[1] मे ॥
॥१९॥ श्रीराम उवाच ॥ पुंस्त्वे स्त्रीत्वे विशेषो वा जातिनामाश्रमादयः ॥ न कारणं मद्भजने भक्तिरेव हि कारणम् ॥२०॥ यज्ञदानतपोभिर्वा वेदाध्ययनकर्मभिः ॥ नैव द्रष्टुमहं शक्यो मद्भक्तिविमुखैः सदा ॥२१ तस्माद्भामिनि[2] संक्षेपाद्वक्ष्ये ऽहं भक्तिसाधनम् ॥ सतां संगतिरेवात्र साधनं प्रथमं स्मृतम् ॥ २२॥ द्वितीयं मत्कथालापस्[3]तृतीयं मद्गुणेरणम्[4] ॥

(पू.) त्वं मे कथं दृष्टः ? ॥ देवेश, (मू.) प्रसीद. " ॥१९॥ श्रीरा० उ० – '(पू.) ॥ मद्भजने कारणं (मू.). ॥२०॥ सदा मद्भक्तिविमुखैः अहं (मू.). ॥२१॥ (पू.) संक्षेपात् वक्ष्ये – ॥ (मू.) ॥२२॥ (पू.)॥

१ प्रसन्न हो. २ बाई. ३ माझ्या कथांचें वर्णन. ४ माझे गुण गाणें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणाऱ्या उपनिषद्वाक्यांचें व्याख्यान करणें, हें साधन आहे; ॥ २३ ॥ हे शुभे, गुरूची 'हा राम आहे,' अशा बुद्धीनें निष्कपटपणें नित्य सेवा करणें, हें पांचवें साधन; पुण्य आचरणाची रुचि धरणें. - चोरी वर्ज्य करणें, ब्रह्मचर्य, कसलाही संग्रह न करणें - हे नियम पाळणें, - आसन, प्राणायाम प्रत्याहार, शुद्धता, संतोष, तप, स्वाध्याय, हे - नियम धरणें धारणा, ध्यान, समाधि करणें, ॥ २४ ॥ आणि माझी पूजा करण्यावर निष्ठा ठेवणें हें सहावें साधन ह्मटलें आहे; मंत्रकल्पांमध्यें सांगितलेल्या विधी-प्रमाणें माझ्या मंत्राची सांग उपासना करणें हें सातवें अंग ह्मणतात; ॥ २५ ॥ मजपेक्षांही माझ्या भक्तांची अधिक पूजा करणें, प्राणिमात्रांच्या ठिकाणीं 'हीं रामरूप आहेत' असा भाव ठेवणें, बाह्य विषयांविषयीं वैराग्य, आणि मनाचा व बाह्य इंद्रियांचा निग्रह, ॥ २६ ॥ हें आठवें साधन; आणि माझ्या तत्त्वस्वरूपाचा विचार करणें, हें नववें साधन; शबरि ! असे भक्तीचे नऊ प्रकार आहेत. ह्यांचें साधन जो कोणी

[२]व्याख्यातृत्वं मद्वचसां चतुर्थं साधनं भवेत् ॥ २३ ॥ आचार्योपासनं भद्रे [३]मद्बुद्ध्या [४]ऽमाय-या सदा ॥ पञ्चमं पुण्यशीलत्वं यमादि नियमादि च ॥ २४ ॥ निष्ठा मत्पूजने नित्यं षष्ठं साधनमीरितम् ॥ मम मन्त्रोपासकत्वं सांगं सप्तममुच्यते ॥ २५ ॥ मद्भक्तेष्वधिका पूजा सर्वभूतेषु मन्मतिः ॥ [६]बाह्यार्थेषु वि[७]रागित्वं शमादिसहितं तथा ॥ २६ ॥ अष्टमं नवमं तत्त्व-विचारो मम भामिनि ॥ एवं नवविधा भक्तिः साधनं यस्य कस्य वा ॥ २७ ॥

मद्वचसां (मू.). ॥२३॥ (पू.) आचार्योपासनं ॥ (मू.)॥२४॥ मत्पूजने नित्यं (पू.)॥ सांगं (मू.); ॥२५॥ (पू.) ॥ तथा शमादिसहितं (मू.)॥२६॥ (पू.) भामिनि, मम तत्त्वविचारः नवमं ॥ (मू.). साधनं.॥२७॥

१माझ्या भाषणांचें. २व्याख्यान करणें. ३राम अशा बुद्धीनें. ४निष्कपटपणें. ५ गुरूची सेवा करणें. ६लौकिक उपभोगांविषयीं. ७वैराग्य.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करील, – ॥ २७ ॥ मग ती स्त्री असो, पुरुष असो, किंवा पशुपक्षी असो, – त्याची मजवर भक्ति जडते. हे सुलक्षणसंपन्न स्त्रिये ! शुद्ध प्रेम हेंच भक्तीचें लक्षण होय. ॥ २८ ॥ भक्ति उत्पन्न झाली कीं तत्काल माझ्या तत्त्वाचा साक्षात्कार होतो; व माझ्या स्वरूपाचा अनुभव सिद्ध झाला असतां लागलीच प्राण्याला त्या जन्मांतच मुक्ति ॥ २९ ॥ मिळते. ह्यावरून मोक्षाचें कारण भक्ति हें पूर्णपणें ठरतें. ज्याला पहिलें एक साधन सिद्ध झालें, त्याला क्रमानें ॥३०॥ सर्व साध्य होतें. ह्यावरून भक्ति हीच मुक्ति होय, हा निश्चय आहे. शबरि ! तूं माझी भक्ति करितेस, ह्मणून मी तुजकडे प्राप्त झालों. ॥ ३१ ॥ आतां माझें दर्शन झाल्यामुळें तुला

'तूं मुक्त होशीलच.'

स्त्रियो वा पुरुषस्यापि तिर्यग्[1]योनिगतस्य वा ॥ भक्तिः संजायते प्रेमलक्षणा शुभलक्षणे ॥ ॥२८॥ भक्तौ संजा[2]तमात्रायां मत्तत्त्वानु[3]भवस्तदा ॥ ममानुभवसिद्धस्य मुक्तिस्तत्रैव जन्मनि ॥२९॥ स्यात्तस्मात्कारणं भक्तिर्मोक्षस्येति सुनिश्चितम् ॥ प्रथमं साधनं यस्य भवेत्तस्य क्रमेण तु ॥३०॥ भवेत्सर्वं ततो भक्तिर्मुक्तिरेव सुनिश्चितम् ॥ यस्मान्मद्भक्तियुक्ता त्वं ततोऽहं त्वामु[4]पस्थितः ॥३१॥ इतो मद्दर्शनान्मुक्तिस्तव नास्त्यत्र संशयः ॥

शुभलक्षणे, (पू.) ॥ प्रेमलक्षणा (मू.). ॥ २८ ॥ (मू.) मुक्तिः ॥ २९ ॥ (पू.) कारणं इति सुनिश्चितं. ॥ (मू.) ॥ ३० ॥ सर्वं भवेत्. (मू.) ॥ ३१ ॥ (पू.) मुक्तिः; अत्र संशयः न अस्ति ॥

१ पशुपक्षी ह्या योनींत पडलेल्या. २ झाल्याबरोबर. ३ माझ्या स्वरूपाचा साक्षात्कार. ४ उपस्थितः जवळ आलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुक्ति मिळणारच, ह्यांत संशय नाहीं. तुला माहीत असेल तर मला एवढें सांग कीं, माझी कमलनयना सीता ॥ ३२ ॥ आहे कोठें ? त्या माझ्या सुरूपसंपन्न प्रियेला कोणी नेलें ? " ॥ ३३ ॥ शबरी ह्मणाली :– ' रामा, तूं सृष्टिकर्ता सर्वज्ञ देव असल्यामुळें सर्व कांहीं जाणतोस. असें असून मला विचारीत आहेस; ह्याचें कारण, प्रभो, तूं लोकांप्रमाणें वर्तन करून दाखवीत आहेस, हें होय. ॥ ३४ ॥ ह्मणून, मी, सीता सांप्रत कोठें राहत आहे, तें तुला सांगत्यें. सीतेला रावणानें नेलें असून सध्यां ती लंकेमध्यें असते. ॥ ३५ ॥ रामा, येथें जवळच पंपानांवाचें एक सरोवर आहे व त्याला लागून ऋष्यमूकनामक मोठा पर्वत आहे. ॥३६॥

यदि जानासि मे ब्रूहि सीता कमललोचना ॥३२॥ कुत्रास्ते केन वा नीता प्रिया मे प्रियदर्शना ॥३३॥ शबर्युवाच ॥ देव जानासि सर्वज्ञ सर्वं त्वं विश्वभावन ॥ तथाऽपि पृच्छसे यन्मां लोकाननुसृतः प्रभो ॥३४॥ ततोऽहमभिधास्यामि सीता यत्राधुना स्थिता॥रावणेन हृता सीता लंकायां वर्तते ऽधुना॥३५॥ इतः समीपे रामास्ते पम्पानाम सरोवरम् ॥ ऋष्यमूकगिरिर्नाम तत्समीपे महानगः॥३६॥

(मू) ॥३२॥ प्रियदर्शना मे प्रिया (मू.)?' ॥ ३३ ॥ श० उ० – ' (पू.) त्वं सर्वं जानासि; ॥ तथापि मां पृच्छसे; प्रभो, यत् [त्वं] (मू.). ॥ ३४ ॥ (पू.) [तत्] अभिधास्यामि. ॥ (मू.) वर्तते. ॥ ३५ ॥ राम, (पू.) आस्ते. ॥ तत्समीपे (मू.). ॥ ३६ ॥

१ प्रिय दर्शन जिचें, अशी. २ विश्वाची उत्पत्ति, पालन इत्यादि करणाऱ्या. ३ विचारितोस. ४ अनुसरलेला. ५ सांगेन. ६ मोठा पर्वत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'सुग्रीवाशीं सख्य कर.'

वानरांचा राजा अतुलप्रतापी सुग्रीव अत्यंत भयभीत होत्साता चौघा मंत्र्यांना बरोबर घेऊन त्या पर्वतावर नेहमीं राहत असतो. ॥३७॥ त्याला आपल्या वाली नांवाच्या भावाचें फार भय आहे. - ह्या पर्वतावर मात्र त्याला ती धास्ती नाहीं; कारण, - वालीला एका ऋषीच्या भीतीमुळें तेथें येतां येत नाहीं. प्रभो, तूं तेथें जाऊन सुग्रीवाशीं सख्य कर. ह्मणजे तो तुझें सर्व कार्य पूर्ण करील. रघुनंदना, आतां मी तुझ्या अग्रभागीं अग्नींत प्रवेश करित्यें. ॥ ३८ ॥ ३९ ॥ हे राजाधिराजा रामचंद्रा, तूं साक्षात् षड्गुणैश्वर्यसंपन्न विष्णु होस. क्षणभर उभा राहा. मी ह्या शरीराचें दहन करून तुझ्या श्रेष्ठ पदास जात्यें.' ॥ ४० ॥ शबरीनें अशा प्रकारें रामाची प्रार्थना करून अग्नींत प्रवेश केला. व क्षणमात्रांत, ती अज्ञानामुळें उत्पन्न झालेल्या बंधनाचा निरास करून,

चतुर्भिर्मन्त्रिभिः[2] सार्धं सुग्रीवो वानराधिपः॥ भीतभीतः सदा तत्र तिष्ठत्यतुलविक्रमः ॥३७॥ वालिनश्च भयाद्भ्रातुस्तदगम्यमृषेर्भयात् ॥ वालिनस्तत्र गच्छ त्वं तेन सख्यं कुरु प्रभो ॥ ३८ ॥ सुग्रीवेण स सर्वं ते कार्यं संपादयिष्यति[4] ॥ अहमग्निं प्रवेक्ष्यामि तवाग्रे रघुनन्दन॥३९॥ मुहूर्तं तिष्ठ राजेन्द्र यावद्दग्ध्वा कलेवरम् ॥ यास्यामि भगवन् राम तव विष्णोः परं पदम् ॥ ४० ॥ इति रामं समामन्त्र्य[6] प्रविवेश हुताशनम्[7] ॥

भ्रातुः वालिनः भीतभीतः अतुलविक्रमः[1] वानराधिपः सुग्रीवः (३७ मू.). ॥ तत्र ऋषेः भयात् वालिनः अगम्यं[3]; प्रभो, त्वं (बा. ३८ उ.) सुग्रीवेण सख्यं कुरु. रघुनन्दन, (३९ मू.) प्रवेक्ष्यामि[5]. ॥ ३७-३९ ॥ राजेन्द्र, भगवन, (पू.) दग्ध्वा विष्णोः (मू.) यास्यामि,'॥४०॥शबरी (पू.)प्रविवेश; ॥

१ तुलना नाहीं पराक्रमाला ज्याच्या, अक्षा.२ प्रधानांशीं.३ जाण्यास अयोग्य.४ पूर्ण करील.५ प्रवेश करीन.६ कळवून.७अग्नीप्रत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामाच्या प्रसादामुळें, अतिदुर्लभ अशा मोक्षास प्राप्त झाली. ॥ ४१ ॥ (शंकर ह्मणतात :— पार्वति !) जगन्नाथ भक्तवत्सल प्रभु रामचंद्र प्रसन्न झाला असतां प्राण्याला दुर्लभ तें काय आहे ? पहा ! शबरी अधम कुलांत जन्मास आली असून देखील त्याच्या कृपेमुळें मुक्त झाली. ॥ ४२ ॥ - भिल्लिणीला जर मोक्ष मिळाला तर - मग उत्तम ब्राह्मणकुलांत जन्मलेले सदाचरणी पुरुष श्रीरामाचें ध्यान करूं लागले असतां त्यांना मोक्ष मिळेल, हें काय पुन्हां सांगितलें पाहिजे ? ह्या शबरीच्या उदाहरणावरून रामाची भक्ति हीच मुक्ति होय, एवढें सिद्ध झालें; - ह्यांत संशय नाहीं. - ॥ ४३ ॥ हे सुज्ञ जनहो ! म्हणून - माझें तुह्माला इतकें

क्षणान्निर्धूय सकलमविद्याकृतबन्धनम्[1] ॥ रामप्रसादाच्छबरी मोक्षं प्रापातिदुर्लभम् ॥ ४१ ॥ किं दुर्लभं जगन्नाथे श्रीरामे भक्तवत्सले ॥ प्रसन्नेऽधमजन्मापि[3] शबरी मुक्तिमाप सा ॥ ४२ ॥ किं पुनर्ब्राह्मणा मुख्याः पुण्याः श्रीरामचिन्तकाः ॥ मुक्तिं यान्तीति तद्भक्तिर्मुक्तिरेव न संशयः ॥ ४३ ॥ भक्तिर्मुक्तिविधायिनी भगवतः श्रीरामचन्द्रस्य हे लोकाः कामदुघांघ्रिपद्मयुगलं सेवध्वमत्युत्सुकाः ॥

(द्वि.) निर्धूय ॥ (मू.) मोक्षं प्राप. ॥ ४१ ॥ (पू.) श्रीरामे प्रसन्ने [सति] किं दुर्लभं ? सा (मू.) ! ॥ ४२ ॥ (पू.) ब्राह्मणाः मुक्तिं यान्ति, इति किं पुनः [वक्तव्यं.] (मू.). ॥ ४३ ॥ हे बुधाः लोकाः ! भगवतः श्रीरामचन्द्रस्य भक्तिः मुक्तिविधायिनी. [तस्मात् यूयं] अत्युत्सुकाः

१ अज्ञानानें केलेल्या बंधनास. २ दूर करून. ३ नीच कुलांत जन्मलेली. ४ पावली. ५ मुक्ति देणारी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सांगणें आहे कीं, - षड्गुणैश्वर्यसंपन्न श्रीरामचंद्राची भक्ति मोक्षप्राप्तीचें साधन होय : ह्यासाठीं तुह्मी, अज्ञानाचे विविध खेळ जे मंत्रसाधनांचे खटाटोप, ते दूर झुगारून देऊन अत्यंत उत्सुकतेनें रामाची पुष्कळपणें सेवा करा. त्याचें चरणकमलयुगुल इच्छा पुरविणारी प्रत्यक्ष कामधेनुच आहे. तो श्यामसुंदर प्रभु मदनशत्रूच्या (शंकराच्या) हृदयांत नित्य वास करीत असतो. ॥ ४४ ॥ इति अरण्यकाण्डे दशमः सर्गः ॥ १० ॥

[1]नानाज्ञानविशेषमन्त्रविततिं त्यक्त्वा सुदूरे[2] भृशं रामं श्यामतनुं स्मरारिहृदये भान्तं भजध्वं बुधाः ॥ ४४ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे अरण्यकाण्डे दशमः सर्गः ॥ १० ॥

[सन्तः] (मू.) [3]त्यक्त्वा [4]स्मरारिहृदये [5]भान्तं [6]श्यामतनुं [7]कामदुघांघ्रिपद्मयुगुलं रामं [8]भजध्वम्. ॥ ४४ ॥
॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये अरण्यकाण्डे दशमः सर्गः ॥ १० ॥ समाप्तं अरण्यकाण्डं ॥

---

१ अनेक प्रकारचा व अज्ञानमूलक संसाराचा आधार जो मंत्रांचा समूह, त्याला. २ फार लांब. ३ टाकून. ४ मदनाच्या शत्रूच्या (शंकराच्या) हृदयांत. ५ भासणाऱ्या. ६ श्यामवर्ण शरीर ज्याचें, अशा. ७ इच्छा पुरविणारें चरणकमलद्वय ज्याचें अशा. ८ भजा.

॥ इति अरण्यकाण्डः समाप्तः ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्ग.	विषय.	पत्र.
१	ते पंपासरोवरावर आलेले सुग्रीवाला दिसतात. तो भिऊन शोधासाठीं त्यांच्याकडे मारुतीला पाठवितो. मारुति रामाचें मन पाहून त्या दोघांना सुग्रीवाकडे आणितो व अग्नीला साक्ष ठेवून त्यांची मैत्री जमवितो. परस्परांच्या प्रतिज्ञा. सुग्रीव रामाला वालीचा पराक्रम व त्याला मिळालेल्या शापाचा इत्थंभूत वृत्तांत सांगतो. राम पराक्रमाची परीक्षा देतो.	१
२	रामाच्या सांगीवरून सुग्रीव वालीला युद्धास बोलावितो. वालि–सुग्रीवाचें युद्ध. रामाला सुग्रीव कोणता तें कळत नाहीं ह्मणून तो बाण मारित नाहीं. सुग्रीवाचा पराजय. रामाच्या सांगण्यावरून सुग्रीव पुन्हां वालीला हांक मारितो. तारा वालीला प्रतिबंध करित्ये. तो तें न ऐकतां येऊन रामाचा बाण लागून पडतो. वाली रामाची निंदा करितो. राम त्याला मारण्याचें कारण सांगतो. वालीला सद्गति.	१
३	तारेचा शोक. तिला रामाचा उपदेश (श्लो. १२–२१ महत्त्वाचा विषय). वालीचें उत्तरकार्य. सुग्रीवाला राज्याभिषेक.	२२
४	प्रवर्षण पर्वतावर राम लक्ष्मणाला पूजेचा विधि सांगतो (श्लो. ११–३९ महत्त्वाचा विषय). हनुमान वानरांना बोलावणीं पाठवितो.	३०
५	रामाचें विरहदुःख. लक्ष्मण संतापून किष्किंधेस जातो. तारा त्याचें सांत्वन करिते. सुग्रीव त्याच्याबरोबर रामाकडे येतो.	३७
६	वानर सीतेच्या शोधासाठीं निघतात. राम मारुतीजवळ खूण देतो. गुहेंतील योगिनी वानरांचा सत्कार करून, त्यांना स्वतांचें वृत्त सांगत्ये व रामाकडे येऊन मुक्त होत्ये.	४६
७	वानरांची चिंता. ते समुद्रावर येतात. तेथें संपाति त्यांना सीता लंकेंत असल्याची माहिती देतो.	५७
८	संपातीचें वृत्त (श्लोक. १२–४६ चांगला विषय).	६५
९	समुद्रापलिकडे जाणार कोण? वानरांचें वेगवेगळें शक्तिमान. मारुतीचें अवसान.	७२

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शंकर ह्मणाले :—पार्वती, नंतर, लक्ष्मणासहवर्तमान रामचंद्र हळूहळू पंपासरोवराच्या तीरीं आला. तें महासरोवर पाहून त्याला परम विस्मय वाटला. ॥ १ ॥ त्या सरोवराचा परिघ एक चौरस कोस होता; त्यांत अपरंपार निर्मल उदक भरलें असून, जागोजाग कमळें, कल्हारें, कुमुदें व उत्पलें फुललीं असल्यामुळें उत्तम शोभा दिसत होती; ॥ २ ॥ आंत हंस, कारंडव ह्या पक्ष्यांचे थवे - विहार करीत - होते; चक्रवाक इत्यादि पक्ष्यांनीं त्याला रमणीयता आणिली होती; पाणकोंबडे, टिटव्या, क्रौंच ह्यांच्या शब्दांनीं तें सरोवर घुमून राहिलें होतें; ॥ ३ ॥ सभोंवार अनेक प्रकारच्या पुष्पलतांचे ताटवे उभे असून जमिनीवर विविध

श्रीमहादेव उवाच । ततः सलक्ष्मणो रामः शनैः[1] पम्पासरस्तटम् ॥ आगत्य[2] सरसां श्रेष्ठं दृष्ट्वा विस्मयमाययौ ॥ १ ॥ क्रोश[3]मात्रं सुविस्तीर्णमगाधा[4]मलशम्बरम् ॥उत्फु[5]ल्लाम्बुजकल्हारकुमुदोत्पलमण्डितम् ॥२॥ हंस[6]कारण्डवाकीर्णं चक्र[7]वाकादिशोभितम् ॥ जलकुक्कुट[8]कोयष्टिक्रौञ्चनादोपनादितम् ॥३॥ नानापु[9]ष्पलताकीर्णं नाना[10]फलसमावृतम् ॥ स[11]तां मनः[12]स्वच्छजलं पद्मकिञ्जल्क[13]वासितम् ॥ ४ ॥

श्रीमहादेव उवाच – (मू.). ॥ १ ॥ [तत्र सरः] (मू. २।३।४) [अस्ति]. ॥ २ ॥ ३ ॥ ४ ॥

---

१ हळूहळू. २ येऊन. ३ कोसभर. ४ अपरंपार निर्मल उदक ज्यांत, असें. ५ फुललेलीं कमळें, कल्हारें, कुमुदें, उत्पलें (ह्या सर्व कमळाच्या वेगवेगळ्या जाति आहेत.) ह्यांनीं सुशोभित. ६ हंस, कारंडव ह्या पक्ष्यांनीं व्यापलेलें. ७ चक्रवाक वगैरे पक्ष्यांनीं सुशोभित. ८ पाणकोंबडे, टिटव्या, क्रौंच ह्यांच्या शब्दांनीं घुमलेलें. ९ अनेक प्रकारच्या फुलवेलींनीं वेष्टिलेलें. १० विविध फळांनीं युक्त. ११।१२ साधूंच्या मनाप्रमाणें स्वच्छ उदक ज्यांत, असें. १३ कमलांच्या तंतूंनीं सुवासित झालेलें. ४।१

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सुग्रीवाला रामदर्शन.

फळांचे दाट थर पडले होते; त्या सरोवराचें उदक सत्पुरुषांच्या मनांप्रमाणें स्वच्छ होतें व त्याला कमल-तंतूंचा सुवास लागला होता. ॥ ४ ॥ त्या सरोवराचें उदक प्राशन केलें असतां प्राण्याची ग्लानि दूर होई. कनिष्ठ बंधूसह प्रभु रामचंद्रानें तेथें स्नान केलें, व उदक प्राशन करून त्या सरोवराच्या तीरावरील शीतल मार्गानें पुढें प्रयाण केलें. ॥ ५ ॥ रामलक्ष्मण ऋष्यमूक पर्वताच्या बाजूनें चालले होते; त्यांच्या हातांत धनुष्य बाण होते; - त्यांच्या मूर्तीकडे पाहिल्याबरोबरच पाहणाराला - ' हे इंद्रियनिग्रही आहेत ' - असें समजून येई; - जटा आणि वल्कलें ह्यांच्या योगानें शोभणारे ते पराक्रमी पुरुष मधून मधून विविध वृक्षांकडे आणि पर्वताच्या शोभेकडे पाहत असत. ॥६॥ सुग्रीव चार वानरांसह त्या पर्वताच्या शिखरावर बसला होता. राम लक्ष्मण येत आहेत, असें दृष्टीस पडतांच तो भयभीत होऊन पर्वताच्या अगदीं उच्च शिखरावर चढला,

तत्रोपस्पृश्य[1] सलिलं[2] पीत्वा[3] श्रमहरं विभुः ॥ सानुजः सरसस्तीरे शीतलेन पथा[4] ययौ ॥५॥ ऋष्यमूकगिरेः पार्श्वे[6] गच्छन्तौ रामलक्ष्मणौ ॥ धनुर्बाणकरौ दान्तौ[7] जटावल्कलमण्डितौ ॥ पश्यन्तौ विविधान्वृक्षान् गिरेः शोभां सुविक्रमौ ॥ ६ ॥ सुग्रीवस्तु गिरेर्मूर्ध्नि चतुर्भिः सह वानरैः ॥ स्थित्वा ददर्श तौ यान्तावारुरोह गिरेः शिरः ॥ ७ ॥

सानुजः विभुः तत्र उपस्पृश्य, श्रमहरं (मू.). ॥ ५ ॥ सुग्रीवः तु गिरेः मूर्ध्नि चतुर्भिः वानरैः सह स्थित्वा, (बा. ६ मू.) [च] पश्यन्तौ सुविक्रमौ[8] यान्तौ[9] तौ रामलक्ष्मणौ ददर्श; [दृष्ट्वा च] भयात् गिरेः शिरः आरुरोह,

१ स्नान करून.२ उदक.३ पिऊन.४ मार्गानें५ शिखरावर.६ बाजूवर.७ इंद्रियें स्वाधीन ज्यांच्या, असे.८महापराक्रमी.९ जाणारे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व हनुमंताला ह्मणाला :–' मित्रा ! ते महावीर कोण बरें आहेत ? तूं ब्राह्मणाचें रूप घेऊन जा आणि शोध काढून ये. तुझें कल्याण होवो. ॥ ७ ॥ ८ ॥ ते, वालीनें पाठविल्यामुळें, मला मारण्यासाठीं आले आहेत कीं काय ? त्यांच्यापाशीं संभाषण करून त्यांचें अंतर समजून घे. ॥ ९ ॥ जर त्यांच्या मनांत कांहीं पाप आहे, - असें तुला दिसून आलें, - तर हातानें - मला पळून जाण्याची - खूण कर. नम्रतेनें त्यांच्यापुढें अगदीं लीन हो, आणि ही संकेताची खूण पक्की लक्ष्यांत ठेव. ' ॥ १० ॥ हनुमान् ' बरें आहे, ' असें ह्मणून रामाकडे आला व नम्रतेनें लीन होऊन आणि रामाला नमस्कार करून

भयादाह हनूमन्तं कौ तौ वीरवरौ सखे ॥ गच्छ जानीहि भद्रं ते बटुर्भूत्वा द्विजाकृतिः ॥ ८ ॥ वालिना प्रेषितौ किं वा मां हन्तुं समुपागतौ ॥ ताभ्यां संभाषणं कृत्वा जानीहि हृदयं तयोः ॥ ९ ॥ यदि तौ दुष्टहृदयौ सञ्ज्ञां कुरु कराग्रतः ॥ विनयावनतो भूत्वा एवं जानीहि निश्चयम् ॥ १० ॥ तथेति बटुरूपेण हनूमान् समुपागतः ॥ विनयावनतो भूत्वा रामं नत्वेदमब्रवीत् ॥ ११ ॥

हनूमन्तं आह च – ' सखे, ते भद्रं; [त्वं] द्विजाकृतिः बटुः भूत्वा गच्छ, तौ वीरवरौ कौ, जानीहि. ॥ ६ ॥ ७ ॥ ८ ॥ (पू.) किं वा ? ॥ (मू.) हृदयं जानीहि. ॥ ९ ॥ (पू.), [तर्हि] कराग्रतः सञ्ज्ञां कुरु. ॥ (मू.) जानीहि. ' ॥ १० ॥ (मू.) – ॥ ११ ॥

१ ब्राह्मणासारखें रूप ज्याचें, असा. २ खुणेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो. समू-सान्त्र. सटिप्पण. ॥ २ ॥

म्हणाला :– ॥ ११ ॥ ' मनुष्यश्रेष्ठहो ! वीरपुरुषांना मान्य व तरुण असे तुह्मी आहां कोण ? सर्व दिशांकडे तुमची प्रभा फांकली आहे. ह्यावरून तुम्हीं प्रतिसूर्यच आहां असा भास होतो ! ॥ १२ ॥ माझ्या मनाला तर असें वाटतें कीं, तुह्मी त्रैलोक्यकर्ते, सृष्टीचें कारण व सर्वांतर्यामी श्रेष्ठ पुरुष (नरनारायण) आहां. ॥१३॥ तुह्मी मायेनें मनुष्यरूप घेऊन क्रीडा करण्याच्या उद्देशानें फिरतां, असें वाटतें. पृथ्वीचा भार उतरावा व भक्तांचें रक्षण करावें एवढ्यासाठीं ॥ १४ ॥ तुह्मी येथें क्षत्रियरूपानें अवतरून फिरत आहां. तुह्मी परमेश्वर असून सांप्रत लीलेनें जगाचें पालन, नाश व उत्पत्ति (राक्षसांचा नाश व इतरांचें पालन आणि सृष्टि) करण्यास उद्युक्त झालां आहां. ॥ १५ ॥

किष्किं-कां. सर्ग ? ' तुह्मी श्रेष्ठ देव आहां.'

कौ युवां पुरुषव्याघ्रौ युवानौ वीरसंमतौ ॥ द्योतयन्तौ दिशः सर्वाः प्रभया भास्कराविव ॥ १२ ॥ युवां त्रैलोक्यकर्तारावििति भाति मनो मम ॥ युवां प्रधानपुरुषौ जगद्धेतू जगन्मयौ ॥ १३ ॥ मायया मानुषाकारौ चरन्ताविव लीलया ॥ भूभारहरणार्थाय भक्तानां पालनाय च ॥ १४ ॥ अवतीर्णाविह परौ चरन्तौ क्षत्रियाकृती ॥ जगत्स्थितिलयौ सर्गं लीलया कर्तुमुद्यतौ ॥ १५ ॥

' (पू.) भास्करौ इव प्रभया सर्वाः दिशः द्योतयन्तौ युवां कौ ? ॥ १२ ॥ (पू.) मम मनः भाति ॥ (मू.) ॥ १३ ॥ (पू.) चरंतौ इव (मू.) ॥ १४ ॥ इह (मू.) ॥ १५ ॥

१ मनुष्यांत श्रेष्ठ. २ शूरांना मान्य. ३ प्रकाशविणारे. ४ तुह्मी दोघे. ५ त्रैलोक्याचे उत्पादक. ६ समजतें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

माझी इच्छा आहे. सूर्य आणि इंद्र हे दोन देव वानररूपांनीं जन्मले, असें आह्मी ऐकतों ! - तें खरें काय ? - ' ॥ १ ॥ अगस्त्यमुनि ह्मणाले :– " - रामा ! तोही प्रकार सांगतों, ऐक :- सुवर्णमय मेरुपर्वताच्या मस्तकावर मध्यभागीं रत्नांच्या योगें उज्ज्वल दिसणारें एक शिखर आहे. त्यावर ब्रह्मदेवाची शंभर योजनें विशाल अशी सभा आहे. ॥ २ ॥ एके प्रसंगीं त्या सभेमध्यें साक्षात् चतुर्मुख (ब्रह्मदेव) ध्यान करीत बसला होता; ह्यावेळीं त्याच्या दोन्ही नेत्रांतून पुष्कळसे दिव्य आनंदाश्रु पडले. ॥ ३ ॥ ब्रह्मदेवानें ते हातीं धरून किंचित् विचार केला व ते खालीं टाकिले. भूमीवर पडल्याबरोबर त्या अश्रूंपासून एक मोठा वानर उत्पन्न झाला. ॥ ४ ॥ ब्रह्मदेवानें त्याला सांगितलें :– ' बाळा ! कांहीं काळपर्यंत येथें माझ्या जवळ

रवीन्द्रौ वानराकारौ जज्ञात इति नः श्रुतम् ॥१॥ अगस्त्य उवाच ॥ मेरोः स्वर्णमयस्याद्रेर्मध्यशृंगं मणिप्रभम् ॥ तस्मिन्सभाऽऽस्ते विस्तीर्णा ब्रह्मणः शतयोजना ॥२॥ तस्यां चतुर्मुखः साक्षात्कदाचिद्योगमास्थितः ॥ नेत्राभ्यां पतितं दिव्यमानन्दसलिलं बहु ॥३॥ तद्गृहीत्वा करे ब्रह्मा ध्यात्वा किंचित्तदत्यजत् ॥ भूमौ पतितमात्रेण तस्माज्जातो महाकपिः ॥४॥ तमाह द्रुहिणो वत्स किंचित्कालं वसात्र मे ॥ समीपे सर्वशोभाढ्ये ततः श्रेयो भविष्यति ॥ ५ ॥

(मू.). ' ॥ १ ॥ अग० उ० – " (मू.) ब्रह्मणः सभा आस्ते. ॥ २ ॥ (पू.) ॥ नेत्राभ्यां बहु (मू.) पतितं. ॥३॥ ब्रह्मा (पू.) गृहीत्वा किंचित् ध्यात्वा तत् अत्यजत्. ॥ (मू.) जातः. ॥४॥ द्रुहिणः तं आह – ' (मू.) मे समीपे वस. ततः श्रेयः भविष्यति. ॥ ५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वानर सुंदर स्त्री बनला.

राहा. ह्या स्थानीं सर्व संपत्ति भरलेल्या आहेत. येथें राहिलास तर तुझें कल्याण होईल.' ॥ ५ ॥ ब्रह्मदेवानें अशी आज्ञा दिली असतां तो श्रेष्ठ वानर तेथें राहिला. ह्या गोष्टीला बरेच दिवस लोटले. पुढें एके दिवशीं तो महाबुद्धिमान् वानराधीश्वर फळें मुळें मिळविण्यासाठीं उद्योग करीत पर्वतावर फिरत होता. तेथें रत्नशिलांनीं बांधलेली व दिव्य उदकानें भरलेली अशी एक विहीर त्याच्या दृष्टीस पडली. ॥ ६ ॥ ७ ॥ तिचें पाणी प्यावयास गेला, तों उदकांत ह्याला एक छायामय वानर (ह्याचेंच प्रतिबिंब) दिसला. तो दुसरा वानर आहे, असें समजून ह्यानें पाण्यांत उडी टाकली. ॥ ८ ॥ तेथें वानर सांपडेना तेव्हां हा लागलाच बाहेर आला व पाहतो तों स्वतांचें - वानररूप पालटून त्याच्या बदली - सुंदर स्त्रीरूप बनलें आहे! तें पाहून ह्याला पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. ॥ ९ ॥ पुढें, देवेंद्र मध्यान्हसमयीं देवाधिदेव ब्रह्मदेवाची पूजा क-

इत्युक्तो न्यवसत्तत्र ब्रह्मणा वानरोत्तमः ॥ एवं बहुतिथे काले गते ऋक्षाधिपः सुधीः ॥ ६ ॥ कदाचित्पर्यटन्नद्रौ फलमूलार्थमुद्यतः ॥ अपश्यद्दिव्यसलिलां वापीं मणिशिलान्विताम् ॥७॥ पानीयं पातुमागच्छत्तत्र च्छायामयं कपिम् ॥ दृष्ट्वा प्रतिकपिं मत्वा निपपात जलान्तरे ॥८॥ तत्रादृष्ट्वा हरिं शीघ्रं पुनरुत्प्लुत्य वानरः॥ अपश्यत्सुन्दरीं रामामात्मानं विस्मयं गतः॥९॥ततः सुरेशो देवेशं पूजयित्वा चतुर्मुखम् ॥

ब्रह्मणा (पू.) तत्र न्यवसत्. ॥ (मू.) [सति], सुधीः ऋक्षाधिपः ॥ ६ ॥ (पू.) अद्रौ पर्यटन् [सन्] (मू.) वापीं अपश्यत्. ॥ ७ ॥ (मू.) निपपात. ॥ ८ ॥ वानरः तत्र हरिं (पू.) ॥ आत्मानं (मू.) अपश्यत्, विस्मयं गतः. ॥ ९ ॥ (पू.) पूजयित्वा ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रून परत जात होता. इतक्यांत ही मनोरम स्त्री त्याच्या दृष्टीस पडली. ॥ १० ॥ मदनाच्या बाणांनीं इंद्राचें शरीर अगदीं जर्जर करून सोडिलें. शेवटीं ह्या स्त्रीचा समागम झाल्यावांचूनच त्याचें उत्तम वीर्य पतन पावलें. तें बीज तिच्या वाल(केश)प्रदेशाला लागून भूमीवर आलें; ॥ ११ ॥ तों त्यापासून त्याच स्थलीं इंद्रासारखा पराक्रमी वाली उत्पन्न झाला. देवेंद्र त्या मुलाला सुवर्णमाला देऊन स्वर्गलोकीं गेला. ॥ १२ ॥ त्याच वेळीं सूर्यही तेथें आला व ह्या स्त्रीला पाहून कामवश झाला. त्यानें आपलें उग्र बीज तिच्या ग्रीवेवर (मानेवर) टाकिलें. त्यापासून लागलाच एक धिप्पाड वानर जन्मला; - हा सुग्रीव होय. - मारुतीला त्याच्या साह्यार्थ देऊन सूर्य निघून गेला. ॥ १३ ॥ १४ ॥

गच्छन्मध्याह्नसमये दृष्ट्वा नारीं मनोरमाम् ॥ १० ॥ कन्दर्पशरविद्धांगस्त्यक्तवान्वीर्यमुत्तमम् ॥ तामप्राप्यैव तद्बीजं वालदेशे ऽपतद्भुवि ॥ ११ ॥ वाली समभवत्तत्र शक्रतुल्यपराक्रमः ॥ तस्य दत्वा सुरेशानः स्वर्णमालां दिवं गतः ॥ १२ ॥ भानुरप्यागतस्तत्र तदानीमेव भामिनीम् ॥ दृष्ट्वा कामवशो भूत्वा ग्रीवादेशे ऽसृजन्महत् ॥ १३ ॥ बीजं तस्यास्ततः सद्यो महाकायो ऽभवद्धरिः ॥ तस्य दत्वा हनूमन्तं सहायार्थं गतो रविः ॥ १४ ॥

(मू.) नारीं दृष्ट्वा, ॥ १० ॥ (पू.) [सन] (मू.) उत्तमं वीर्यं त्यक्तवान्. तत् बीजं वालदेशे भुवि अपतत्. ॥ ११ ॥ (पू.) वाली समभवत्. ॥ (मू.) दत्वा दिवं गतः. ॥१२॥ तत्र (१३ मू.) बीजं असृजत्. ततः (१४पू.) अभवत्. ॥ रविः (मू.) दत्वा गतः. ॥ १३ ॥ १४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ती स्त्री ते दोन्ही पुत्र घेऊन कोठेंशी जाऊन निद्रित झाली; सकाळीं - उठून पाहते तों - आपलें शरीर पूर्वीप्रमाणें वानरासारखें झालें आहे, असें तिला दिसून आलें! ॥ १५ ॥ पुढें तो महाबुद्धिमान् ऋक्षाधिपति वानर फळें मुळें गोळा करून व त्या दोन्ही मुलांना बरोबर घेऊन - ब्रह्मसभेंत आला - आणि ब्रह्मदेवाला नमस्कार करून पुढें उभा राहिला. ॥ १६ ॥ तेव्हां ब्रह्मदेवानें त्या महावानराला बहुतप्रकारें आश्वासन दिलें व तेथें एका देवतुल्य देवदूताला हांक मारून सांगितलें :– ॥ १७ ॥ 'दूता! माझ्या आज्ञेवरून तूं ह्या वानरश्रेष्ठाला घेऊन किष्किंधेस जा. विश्वकर्म्यानें ती नगरी - ह्याच्याकरितांच - निर्मिली आहे. ॥ १८ ॥ तीमध्यें सर्व ऐश्वर्यें भरलीं आहेत. ती देवांच्या देखील हातीं लागणें कठिण. ह्या वीर राजाला त्या नगरी-

पुत्रद्वयं समादाय गत्वा सा निद्रिता क्वचित् ॥ प्रभाते ऽपश्यदात्मानं पूर्ववद्वानराकृतिम् ॥१५॥ फलमूलादिभिः सार्धं पुत्राभ्यां सहितः कपिः ॥ नत्वा चतुर्मुखस्याग्रे ऋक्षराजः स्थितः सुधीः॥१६॥ततो ऽब्रवीत्समाश्वास्य बहुशः कपिकुञ्जरम् ॥ तत्रैकं देवतादूतमाहूयामरसन्निभम्॥१७॥गच्छ दूत मया ऽऽदिष्टो गृहीत्वा वानरोत्तमम् ॥ किष्किन्धां दिव्यनगरीं निर्मितां विश्वकर्मणा ॥ १८ ॥ सर्वसौभाग्यवलितां देवैरपि दुरासदाम् ॥

सा (पू.) निद्रिता. ॥ (मू.) अपश्यत्. ॥१५॥ (पू.) ऋक्षराजः सुधीः कपिः (मू.) नत्वा स्थितः. ॥ १६ ॥ ततः [ब्रह्मा] (पू.) बहुशः समाश्वास्य, (मू.) देवतादूतं आहूय अब्रवीत् – ॥ १७ ॥ ' (वा.१८ पू.) [त्वं] वानरोत्तमं गृहीत्वा, (१८ उ.) निर्मितां (१९ पू.) ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मध्यें सिंहासनीं बसवून राज्याभिषेक करव. ॥ १९ ॥ सप्त द्वीपांमध्यें जे दुर्जय वानर आहेत, ते सगळे ह्या वानरराजाचे अंकित व सेवक होऊन राहतील. ॥ २० ॥ ज्यावेळीं साक्षात् सनातन नारायण पृथ्वीवर भारभूत असलेल्या राक्षसांच्या नाशासाठीं भूतलीं रामावतार घेईल, ॥ २१ ॥ त्या वेळीं सगळ्या वानरांनीं येऊन त्याचें साह्य करावें.' ब्रह्मदेवानें असें सांगितलें असतां, तो महाबुद्धिमान् देवदूत - वानरांसह तेथून निघाला. - ॥ २२ ॥ देवदूतानें ब्रह्मदेवाच्या आज्ञेप्रमाणें त्या वानरराजाची व्यवस्था लाविली (त्याला किष्किंधेंत राज्याभिषेक केला), आणि नंतर जाऊन तें वर्तमान ब्रह्मदेवाला कळविलें. ॥२३॥

तस्यां सिंहासने वीरं राजानमभिषेचय ॥ १९ ॥ सप्तद्वीपगता ये ये वानराः सन्ति दुर्जयाः ॥ सर्वे ते ऋक्षराजस्य भविष्यन्ति वशेऽनुगाः ॥ २० ॥ यदा नारायणः साक्षाद्रामो भूत्वा सनातनः ॥ भूभारासुरनाशाय संभविष्यति भूतले ॥ २१ ॥ तदा सर्वे सहायार्थे तस्य गच्छन्तु वानराः ॥ इत्युक्तो ब्रह्मणा दूतो देवानां स महामतिः ॥ २२ ॥ यथाऽऽज्ञप्तस्तथा चक्रे ब्रह्मणा तं हरीश्वरम् ॥ देवदूतस्ततो गत्वा ब्रह्मणे तन्निवेदयत् ॥ २३ ॥

दिव्यनगरीं गच्छ, ॥ (मू.). ॥ १८ ॥ १९ ॥ (पू.) सन्ति, ॥ ते (मू.) [च] भविष्यंति. ॥२०॥ यदा सनातनः साक्षात् (मू.) सम्भविष्यति, ॥ २१ ॥ (पू.) तस्य सहायार्थे गच्छन्तु.' ॥ (मू.) देवानां दूतः इति उक्तः. ॥ २२ ॥ देवदूतः, ब्रह्मणा (पू.) चक्रे; (मू.). ॥ २३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेव्हांपासून ती किष्किंधा नगरी वानरांची राजधानी झाली. रामा! सर्वेश्वर तूंच. तुझी ब्रह्मदेवानें प्रार्थना केली ह्मणून सांप्रत ॥ २४ ॥ तूं लीलेनें हें मनुष्यरूप धारण करून पृथ्वीचा सगळा भार उतरलास. जो सर्व प्राण्यांच्या अंतरीं राहतो, जो नित्य मुक्त व ज्ञानस्वरूपी आहे आणि ज्याचें रूप अखंड आनंदानें भरलेलें असतें, त्या ईश्वराचा (तुझा) ह्यांत पराक्रम तो केवढासा आहे? (तुला हें कार्य कांहीं मोठेंसें जड नव्हतें.)॥२५॥ तथापि, सत्पुरुष, सर्व लोकांचीं पापें नष्ट व्हावीं व त्यांना सुख मिळावें एवढ्यासाठीं, तूं लीलेनें स्वीकारिलेल्या मनुष्यरूपाच्या कीर्तीचें वर्णन करीत असतात. ॥ २६ ॥ वाली आणि सुग्रीव हे दोन्ही महावतार तुला साह्य करण्यासाठीं झाले. जो मनुष्य त्यांच्या जन्मकथांचें हें आख्यान वाचील, तो सर्व पापांपासून

तदादि वानराणां सा किष्किन्धा ऽभून्नृपाश्रयः॥ सर्वेश्वरस्त्वमेवासीरिदानीं ब्रह्मणा ऽर्थितः ॥२४॥ भूमेर्भारो हृतः कृत्स्नस्त्वया लीलानृदेहिना ॥ सर्वभूतान्तरस्थस्य नित्यमुक्तचिदात्मनः ॥ अखण्डानन्दरूपस्य कियानेष पराक्रमः ॥२५॥ तथा ऽपि वर्ण्यते सद्भिर्लीलामानुषरूपिणः ॥ यशस्ते सर्वलोकानां पापहत्यै सुखाय च ॥ २६ ॥ य इदं कीर्तयेन्मर्त्यो वालिसुग्रीवयोर्महत् ॥ जन्म त्वदाश्रयत्वात्स मुच्यते सर्वपातकैः ॥ २७ ॥

(पू.) वानराणां नृपाश्रयः अभूत्. ॥ (मू.) [सन्] सर्वेश्वरः आसीः. ॥ २४ ॥ लीलानृदेहिना त्वया कृत्स्नः (मू.) एषः पराक्रमः कियान्? ॥ २५ ॥ (पू.) ते (मू.) वर्ण्यते. ॥ २६ ॥ यः मर्त्यः (पू.) जन्म कीर्तयेत्, ॥ सः (मू.) मुच्यते. ॥ २७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुक्त होईल. ॥ २७ ॥ रामा! आतां तुजविषयींच आणखी दुसरी एक कथा सांगतों : दुष्ट रावणानें सीता चोरून नेली, त्याचें कारण असें आहे :— ॥ २८ ॥ रामचंद्रा! पूर्वी कृतयुगामध्यें, - एके प्रसंगीं - ब्रह्मदेवाचा मानस पुत्र सनत्कुमार एकांतीं बसला असतां, दशाननानें नम्रतापूर्वक नमस्कार करून त्याला प्रश्न केला: तो असा :— ॥ २९ ॥ ' मुने! देव ज्याच्या आधारानें युद्धांत शत्रूंना जिंकितात, तो महाबलाढ्य श्रेष्ठ देव लोकांमध्यें आहे कोण? ॥ ३० ॥ ब्राह्मण प्रतिदिनीं आराधना करितात कोणाची? व योगी तरी ध्यान कोणाचें करितात? मुनिवरा! आपण सर्वज्ञ आहां अर्थात सर्व प्रकारच्या प्रश्नांचीं उत्तरें आपल्याला अवगत आहेत. ह्मणून माझ्या ह्या प्रश्नाचें उत्तर मला सांगा.' ॥ ३१ ॥

अथान्यां संप्रवक्ष्यामि कथां राम त्वदाश्रयाम् ॥ सीता हृता यदर्थं सा रावणेन दुरात्मना ॥२८॥ पुरा कृतयुगे राम प्रजापतिसुतं विभुम् ॥ सनत्कुमारमेकान्ते समासीनं दशाननः ॥ विनयावनतो भूत्वा ह्यभिवाद्येदमब्रवीत् ॥२९॥ को न्वस्मिन्प्रवरो लोके देवानां बलवत्तरः ॥ देवाश्च यं समाश्रित्य युद्धे शत्रुं जयन्ति हि ॥३०॥ कं यजन्ति द्विजा नित्यं कं ध्यायन्ति च योगिनः ॥ एतन्मे शंस भगवन् प्रश्नं प्रश्नविदांवर ॥ ३१ ॥

राम, अथ दुरात्मना रावणेन यदर्थं सा सीता हृता, [तां] (मू.) कथां सम्प्रवक्ष्यामि. ॥ २८ ॥ राम, पुरा कृतयुगे दशाननः (पू. द्वि.) सनत्कुमारं (मू.) — ॥ २९ ॥ अस्मिन् लोके (पू.) कः नु, (मू.)? ॥ ३० ॥ द्विजाः नित्यं (पू.) च कं ध्यायन्ति? ॥ (मू.), एतत् मे प्रश्नं शंस.' ॥३१॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देवांचा आधार विष्णु.

सनत्कुमारानें आपल्या योगदृष्टीच्यायोगें, दशाननाच्या मनांत काय होतें तें सर्व जाणिलें व त्याला असें उत्तर दिलें :– ' बाळा! सांगतों ऐक. ॥ ३२ ॥ जो नित्य जगाचें पालन पोषण चालवितो, ज्याला जन्म मृत्यु नाहींत व देवदैत्य ज्याची सर्वकाळ स्तुति करितात, त्या निर्विकार ईश्वराला हरि, नारायण, अशा संज्ञा आहेत. ॥ ३३ ॥ ज्यानें हें सगळें स्थावरजंगमात्मक जग निर्मिलें तो सृष्टिकर्त्यांचा पति ब्रह्मदेव, त्या नारायणाच्या नाभिकमलीं जन्मला. ॥ ३४ ॥ देव त्याचा आश्रय धरून युद्धांत शत्रूंना जिंकितात; व योगी ध्यानयोगेंकरून त्याचेंच चिंतन करितात. ' ॥ ३५ ॥ महर्षींचें वचन ऐकिल्यावर दशाननानें पुन्हां प्रश्न केला :– ' मुनिवरा! दैत्य, दानव व राक्षस विष्णूच्या हातून मरण पावले असतां परलोकीं कोणत्या गतीस

ज्ञात्वा तस्य हृदिस्थं यत्तदशेषेण योगदृक् ॥ दशाननमुवाचेदं शृणु वक्ष्यामि पुत्रक ॥ ३२ ॥ भर्ता यो जगतां नित्यं तस्य जन्मादिकं न हि ॥ सुरासुरैर्नुतो नित्यं हरिर्नारायणोऽव्ययः ॥ ३३ ॥ यन्नाभिपंकजाज्जातो ब्रह्मा विश्वसृजांपतिः ॥ सृष्टं येनैव सकलं जगत्स्थावरजंगमम् ॥ ३४ ॥ तं समाश्रित्य विबुधा जयन्ति समरे रिपून् ॥ योगिनो ध्यानयोगेन तमेवानुजपन्ति हि ॥ ३५ ॥ महर्षेर्वचनं श्रुत्वा प्रत्युवाच दशाननः ॥ दैत्यदानवरक्षांसि विष्णुना निहतानि च ॥ ३६ ॥

योगदृक् (पू.) ज्ञात्वा, ॥ दशाननं इदं उवाच – 'पुत्रक, (मू.). ॥ ३२ ॥ यः नित्यं जगतां (पू.). ॥ [यः] नित्यं (मू.) [सः] अव्ययः हरिः, नारायणः. ॥ ३३ ॥ (पू.) ब्रह्मा जातः, ॥ (मू) जगत् सृष्टं,॥३४॥विबुधाः (पू.) जयन्ति. ॥ (मू.).'॥३५॥दशाननः (पू.)–॥ 'विष्णुना (मू.). ॥३६॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जातात बरें ?' श्रेष्ठ मुनीनें त्या राक्षसेश्वर रावणाला उत्तर दिलें :- ॥ ३६ ॥ ३७ ॥ 'इतर देवांच्या हातून मरण पावलेले दैत्यादिक अत्युत्तम अशा स्वर्गलोकास जातातच; पण त्यांना स्वर्गी नित्य राहतां येत नाहीं. तेथील भोग भोगण्याची मर्यादा संपली कीं ते भ्रष्ट होऊन पुन्हां भूमीवर जन्मास येतात, ॥ ३८ ॥ व पूर्वी संपादिलेल्या पुण्यपापांच्या अनुरोधानें मरण पावतात आणि पुन्हां जन्म घेतात; आतां, विष्णूच्या हस्तें ज्यांना मृत्यु आला, ते मात्र विष्णुपदीं जातात (मुक्त होतात).' ॥ ३९ ॥ मुनीच्या मुखांतून हें सर्व ऐकिल्यावर रावणाच्या मनाला हर्ष वाटला. पुढें तो विचार करूं लागला कीं, विष्णूबरोबर युद्ध तर करावयाचें; - पण तो प्रसंग घडून येतो कसा ? - ॥ ४० ॥

कां वा गतिं प्रप[२]द्यन्ते प्रेत्य ते मुनिपुंगव ॥ तमुवाच मुनिश्रेष्ठो रावणं राक्षसाधिपम् ॥३७॥ दैवतैर्निहता नित्यं गत्वा स्वर्गमनुत्तमम् ॥ भो[३]गक्षये पुनस्तस्माद्भ्रष्टा भूमौ भवन्ति ते ॥३८॥ पूर्वार्जितैः पुण्यपापैर्म्रियन्ते चोद्भवन्ति च ॥ विष्णुना ये हतास्ते तु प्राप्नुवन्ति हरेर्गतिम् ॥३९॥ श्रुत्वा मुनिमुखात्सर्वं रावणो हृष्टमानसः ॥ यो[४]त्स्येऽहं हरिणा सार्धमिति चिन्तापरोऽभवत् ॥ ४० ॥

मुनिपुङ्गव, ते प्रेत्य (पू.)?' ॥ मुनिश्रेष्ठः (मू.) रावणं उवाच – ॥ ३७ ॥ दैवतैः नित्यं निहताः ते (पू.) स्वर्गं गत्वा, ॥ (मू.). ॥ ३८ ॥ (मू.) प्राप्नुवन्ति.' ॥ ३९ ॥ रावणः (पू.) श्रुत्वा हृष्टमानसः [सन्] ॥ '(मू.) योत्स्ये' इति चिन्तापरः अभवत्. ॥ ४० ॥

---

१ परलोकीं जाऊन. २ पावतात. ३ भोग संपल्यावर. ४ युद्ध करीन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

महामुनीनें त्याच्या मनांत काय आहे तें जाणून त्याला सांगितलें :– ‘ बाळा ! तुझ्या इच्छेप्रमाणें घडून येईल ह्यांत संशय नाहीं. ॥ ४१ ॥ कांहीं दिवस वाट पहा. दशानना ! सुखी राहा (विष्णूच्या हस्तें मरण पावून सुखी होशील). ’ हे महावीरा (रामचंद्रा) ! असें सांगून सनत्कुमारमुनि पुन्हां त्याला ह्मणाले :– ॥४२॥ ‘ रावणा ! विष्णूला वस्तुतः रूप नाहीं; परंतु तो मायेच्या योगें रूप धरितो. त्याचें स्वरूप मी तुला सांगतों :– तो सर्व स्थावर पदार्थांमध्यें, नदांत व नद्यांत भरून राहिला आहे. ॥४३॥ ॐकार (सर्व वाणी), सत्यवचन, गायत्री, पृथिवी हीं सगळीं त्याचींच रूपें होत. तो शेषसर्पाच्या रूपानें सर्व जगाला आधार होऊन राहिला आहे. ॥४४॥ सर्व देव, समुद्र, काल, सूर्य, चंद्र, सूर्योदय, दिवसरात्री, यम, तसाच वायु, ॥४५॥

मनःस्थितं परिज्ञात्वा रावणस्य महामुनिः ॥ उवाच वत्स ते ऽभीष्टं भविष्यति न संशयः ॥ ४१ ॥ कंचित्कालं प्रतीक्षस्व सुखी भव दशानन ॥ एवमुक्त्वा महाबाहो मुनिः पुनरुवाच तम् ॥४२॥ तस्य स्वरूपं वक्ष्यामि ह्यरूपस्यापि मायिनः ॥ स्थावरेषु च सर्वेषु नदेषु च नदीषु च ॥४३॥ ओंकारश्चैव सत्यं च सावित्ती पृथिवी च सः ॥ समस्तजगदाधारः शेषरूपधरो हि सः ॥४४॥ सर्वे देवाः समुद्राश्च कालः सूर्यश्च चन्द्रमाः ॥ सूर्योदयो दिवारात्री यमश्चैव तथा ऽनिलः ॥ ४५ ॥

महामुनिः रावणस्य (पू.) ॥ उवाच – ‘ (मू.). ॥४१॥ दशानन, (पू.). ’ ॥ महाबाहो, मुनिः (मू.) उवाच – ॥ ४२ ॥ ‘ (पू.) तस्य स्वरूपं वक्ष्यामि. ॥ [सः] (मू.) [व्याप्तः]. ॥४३॥ सः (पू.). ॥ सः (मू.). ॥ ४४ ॥ ४५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अग्नि, इंद्र, मृत्यु, पर्जन्य, वसु, ब्रह्मा, रुद्र इत्यादि व जे दुसरे देव आणि दैत्य आहेत ते सर्व त्याचींच रूपें होत. ॥ ४६ ॥ तोच सृष्टिकर्ता ईश्वर प्रकाश पावतो, पेटतो, रक्षण करितो व लयास नेतो (सूर्य, अग्नि इत्यादि देवतांमध्यें प्रकाश, प्रज्वलन इत्यादि शक्ति आहेत त्या ह्याच्याच). तो हे सर्व व्यवहार क्रीडे-प्रमाणें सहज करितो. वस्तुतः त्या विष्णूचें स्वरूप नित्य निर्विकार आहे. ॥४७॥ त्यानें हें स्थावरजंगमात्मक सगळें विश्व व्यापिलें आहे. त्याची अंगकांति निळ्या कमलाच्या पानाप्रमाणें श्यामल असून तो विजेसारख्या वर्णाचें वस्त्र परिधान करितो. ॥ ४८ ॥ त्याच्या डाव्या मांडीवर, शुद्ध सुवर्णासारखी तेजःपुंज व नित्य निश्चल राहणारी लक्ष्मी देवी बसली असते आणि तो तिला आलिंगन देऊन तिजकडे पाहत असतो. ॥४९॥

अग्निरिन्द्रस्तथा मृत्युः पर्जन्यो वसवस्तथा ॥ ब्रह्मा रुद्रादयश्चैव ये चान्ये देवदानवाः ॥४६॥ विद्योतति[1] ज्वलत्येष[2] पाति[3] चात्तीति[4] विश्वकृत् ॥ क्रीडां करोत्यव्ययात्मा सोऽयं विष्णुः सनातनः ॥४७॥ तेन सर्वमिदं व्याप्तं त्रैलोक्यं सचराचरम् ॥ नीलोत्पलदलश्यामो विद्युद्वर्णाम्बरावृतः ॥ ४८ ॥ शुद्धजाम्बूनद[5]प्रख्यां श्रियं वामांकसंस्थिताम् ॥ सदानपायिनीं[6] देवीं पश्यन्नालिंग्यं तिष्ठति ॥ ४९ ॥

(पू.) वसवः, ॥ (मू.) [ते] च [सर्वे तद्रूपाः]. ॥ ४६ ॥ एषः विश्वकृत (पू) च इति. (मू.) विष्णुः क्रीडां करोति. ॥ ४७ ॥ (पू.) त्रैलोक्यं व्याप्तं. ॥ (मू.) [सः] ॥ ४८ ॥ (मू.) श्रियं पश्यन् आलिङ्ग्य तिष्ठति. ॥ ४९ ॥

---

१ प्रकाशतो. २ पेटतो. ३ रक्षण करितो. ४ अत्ति खातो. ५ शुद्ध (तापविलेल्या) सोन्यासारखी. ६ चंचल नसणारी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भक्तांना ईश्वर दिसतो.

देव, दैत्य, सर्प कोणीही त्याच्याकडे पाहूं शकत नाहीं. तो ज्याच्यावर कृपा करितो, त्या पुरुषालाच त्याचें (ईश्वराचें) दर्शन मिळतें. ॥ ५० ॥ भगवंताचें दर्शन यज्ञांनीं किंवा तपश्चर्येच्या योगें मिळत नाहीं, दानानें किंवा अध्ययनादिकानें लाभत नाहीं, फार तर काय पण - भक्तीशिवाय - दुसऱ्या कोणत्याही उपायांनीं मिळणें शक्य नाहीं, ॥ ५१ ॥ जे लोक ईश्वराची भक्ति करितात व आपले प्राण आणि चित्तवृत्ति सर्वथा त्याच्याकडे लावितात, त्यांचीं पापें नाश पावतात व त्यांना वेदांतरूप निर्मल दृष्टि प्राप्त होतात; ह्या दृष्टींच्या योगें त्यांना भगवंताचें दर्शन घडतें. ॥ ५२ ॥ आतां, असे कांहीं उपाय केल्यावांचूनच परमेश्वराचें दर्शन मिळावें अशी तुझी इच्छा असेल तर ऐक :— तो भगवान् त्रेतायुगामध्यें राजाचें शरीर धारण कर-

द्रष्टुं न शक्यते कैश्चिद्देवदानवपन्नगैः॥ यस्य प्रसादं कुरुते स चैनं द्रष्टुमर्हति॥५०॥
न च यज्ञतपोभिर्वा न दानाध्ययनादिभिः ॥ शक्यते भगवान्द्रष्टुमुपायैरितरैरपि
॥५१॥ तद्भक्तैस्तद्गत[1]प्राणैस्तच्चित्तैर्धूतकल्मषैः[2] ॥ शक्यते भगवान्विष्णुर्वेदान्ता[3]-
मलदृष्टिभिः ॥ ५२ ॥ अथ वा द्रष्टुमिच्छा ते शृणु त्वं परमेश्वरम् ॥ त्रेतायुगे
स देवेशो भविता नृपविग्रहः ॥ ५३ ॥

(पू.) [सः] द्रष्टुं न शक्यते. (मू.). ॥ ५० ॥ (पू.) वा (मू.) न शक्यते. इतरैः अपि उपायैः न. ॥ ५१ ॥ (मू.) तद्भक्तैः ॥ भगवान् विष्णुः [द्रष्टुं] शक्यते. ॥ ५२ ॥ अथवा [यदि] (पू.) द्रष्टुं इच्छा, [तर्हि] त्वं शृणु. ॥ (मू.) भविता. ॥ ५३ ॥

१ त्याच्यावर लागले प्राण ज्यांचे, अशा. २ धुऊन गेलीं पापें ज्याचीं, अशा. ३ वेदांत शास्त्ररूप निर्मल दृष्टि - मिळाली - ज्यांना, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णार आहे.॥५३॥देवांचें आणि मनुष्यांचें कल्याण करण्यासाठीं हरि इक्ष्वाकुकुलामध्यें महाबलाढ्य व पराक्रमी असा दाशरथि राम होईल. ॥५४॥ पुढें तो परम धार्मिक प्रभु पित्याच्या आज्ञेस्तव भाऊ आणि पत्नी अशा दोघांना बरोबर घेऊन दंडकारण्यांत फिरेल. जगाची माता जी ईश्वराची माया, ती सीतानामें अवतार घेईल.' ॥ ५५ ॥ रावणा ! हें सर्व मी तुला विस्तारानें निवेदन केलें, - आतां शेवटीं हिताची गोष्ट सांगतों कीं, - तूं त्यावेळीं सीतेसह रामचंद्राची भक्तिभावानें सेवा कर.'॥५६॥(अगस्त्यमुनि ह्मणाले :– रामचंद्रा !) राक्षसेश्वरानें हें वचन ऐकून मननपूर्वक किंचित् विचार केला. शेवटीं, तुझ्यावरोबर वैर करावयाचें असा त्याचा

हितार्थं देवमर्त्यानामिक्ष्वाकूणां कुले हरिः ॥ रामो दाशरथिर्भूत्वा महासत्त्वपराक्रमः ॥५४॥ पितुर्नियोगात्स भ्रात्रा भार्यया दण्डके वने ॥ विचरिष्यति धर्मात्मा जगन्माता स्वमायया ॥५५॥ एवं ते सर्वमाख्यातं मया रावण विस्तरात् ॥ भजस्व भक्तिभावेन तदा रामं श्रिया युतम् ॥५६॥ एवं श्रुत्वाऽसुराध्यक्षो ध्यात्वा किंचिद्विचार्य च ॥ त्वया सह विरोधेप्सुर्मुमुदे रावणो महान् ॥ ५७ ॥

हरिः देवमर्त्यानां (मू.) दाशरथिः रामः भूत्वा [अतिष्ठत्]. ॥ ५४ ॥ धर्मात्मा सः (मू.) भार्यया [सह] दण्डके वने विचरिष्यति. ॥ ५५ ॥ रावण, मया (पू.) आख्यातं. ॥ (मू.) रामं भक्तिभावेन भजस्व. ' ॥ ५६ ॥ असुराध्यक्षः महान् रावणः एवं श्रुत्वा, किंचित् (मू.) [सन्] मुमुदे. ॥ ५७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रावणाला नारद भेटले.

निश्चय ठरला. ह्या वेळीं त्या प्रतापी रावणाला फार आनंद झाला. ॥ ९७ ॥ पुढें तो युद्ध करण्याच्या इच्छेनें सगळ्या त्रैलोक्यांत फिरत असे. राजाधिराजा! ह्या कारणासाठीं—केवळ तुझ्या हस्तें स्वतांचा वध व्हावा अशा इच्छेनें—त्या अत्यंतबुद्धिमान् रावणानें तुझी राणी जानकी चोरून नेली. ॥ ९८ ॥ जो मनुष्य ही कथा ऐकेल, वाचील, किंवा ऐकूं इच्छिणारांना नित्य ऐकवील, त्याला आयुष्य, आरोग्य, अनंत सुख इच्छित वस्तूचा लाभ व अक्षय द्रव्य इतकीं फळें मिळतील. ॥९९॥ इति उत्तरकाण्डे तृतीयः सर्गः ॥३॥

एके प्रसंगीं रावण लोकांत फिरत असतां, त्याला ब्रह्मलोकांतून नुकतेच बाहेर पडलेले नारदमुनि भेटले. तेव्हां रावणानें त्यांना वंदन करून विचारिलें :— ॥ १ ॥

युद्धार्थी सर्वतो लोकान् पर्यटन्समवस्थितः ॥ एतदर्थं महाराज रावणो ऽतीवबुद्धिमान् ॥ हृतवान्जानकीं देवीं त्वया ऽऽत्मवधकांक्षया ॥५८॥ इमां कथां यः शृणुयात्पठेद्वा संश्रावयेद्वा श्रवणार्थिनां सदा ॥ आयुष्यमारोग्यमनन्तसौख्यं प्राप्नोति लाभं धनमक्षयं च ॥५९॥ इति उत्तरकाण्डे तृतीयः सर्गः॥३॥एकदा ब्रह्मणो लोकादायान्तं नारदं मुनिम् ॥ पर्यटन्रावणो लोकान्दृष्ट्वा नत्वा ऽब्रवीद्वचः ॥१॥

(पू. द्वि.) रावणः (मू.). जानकीं देवीं हृतवान्. ॥ ५८ ॥ यः (पू.) संश्रावयेत् वा, [सः] (मू.) धनं च प्राप्नोति. ॥ ५९ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये उत्तरकाण्डे तृतीयः सर्गः ॥३॥ एकदा लोकान् पर्यटन् रावणः (मू.) अब्रवीत् — ॥ १ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'भगवन् मुने! आपल्याला सगळें त्रैलोक्य विदित आहे. मला एवढें सांगा, कीं युद्ध करण्यास समर्थ असे महाबलाढ्य पुरुष कोठें आहेत. बलवंतांशीं युद्ध करावें अशी माझी इच्छा आहे.' ॥ २ ॥ मुनींनीं बराच वेळ विचार करून रावणाला सांगितलें :– 'हे बुद्धिमंता! श्वेतद्वीपांत राहणारे पुरुष शरीरानें धिप्पाड व बलाढ्य आहेत. तेथें जा. ॥ ३ ॥ पूर्वी जे लोक विष्णूची आराधना करण्यांत निमग्न असत ते व तसेच ज्यांचा वध विष्णूनें स्वहस्तें केला ते (सप्रेम भक्ति करणारे व विरोध भक्ति करणारे) तेथें जन्मले आहेत. देवांना किंवा दैत्यांना कोणालाही त्यांचा पराजय करतां येणें शक्य नाहीं.' ॥ ४ ॥ तें ऐकून रावण लागलाच मंत्र्यांसह पुष्पक विमानांत बसला आणि त्या विष्णुभक्तांशीं युद्ध करण्याच्या इच्छेनें श्वेतद्वीपाजवळ

भगवन्ब्रूहि मे योद्धुं कुत्र सन्ति महाबलाः ॥ योद्धुमिच्छामि बलिभिस्त्वं ज्ञाता ऽसि जगत्त्रयम् ॥२॥ मुनिर्ध्यात्वा ऽऽह सुचिरं श्वेतद्वीपनिवासिनः ॥ महाबला महाकायास्तत्र याहि महामते ॥३॥ विष्णुपूजारता ये वै विष्णुना निहताश्च ये ॥ त एव तत्र संजाता अजेयाश्च सुरासुरैः ॥४॥ श्रुत्वा तद्रावणो वेगान्मन्त्रिभिः पुष्पकेण तान् ॥ योद्धुकामः समागत्य श्वेतद्वीपसमीपतः ॥ ५ ॥

'(पू.) कुत्र सन्ति ? ॥ बलिभिः (मू.) ज्ञाता असि.' ॥ २ ॥ मुनिः सुचिरं ध्यात्वा आह – '(मू.), तत्र याहि. ॥ ३ ॥ ये (पू.) च विष्णुना निहताः, (मू.) अजेयाः च.' ॥ ४ ॥ रावणः तत् (पू.) योद्धुकामः [सन्] मन्त्रिभिः [सह] पुष्पकेण (मू.) समागत्य [स्थितः]. ॥ ५ ॥

१ मोठीं शरीरें ज्यांचीं, असे. २ पराभव न पावणारे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

येऊन पोंचला. ॥ ५ ॥ तेथील लोकांच्या प्रभेनें पुष्पक विमानाचें तेज नष्ट झालें; तें विमान पुढें चालेना! शेवटीं रावण त्या विमानाला आणि मंत्र्यांना सोडून देऊन पुढें चालला. ॥ ६ ॥ त्यानें श्वेतद्वीपांत पाऊल ठेविलें इतक्यांत तेथें एका स्त्रीनें (दासीनें) त्याला हातीं धरून विचारिलें:– 'तूं कोण, कुठला, व तुला कोणी पाठविलें, बोल.' ॥ ७ ॥ तेथें पुष्कळशा स्त्रिया होत्या. त्या ह्याच्या चेष्टा करीत व - पोट धरधरून - हांसत. एकीनें तो प्रश्न केला, पुन्हां दुसरीनें त्याला तसेंच विचारिलें, तिसरीनें तसेंच केलें. रावणाला त्यांच्या हातून सुटण्याला फार प्रयास पडले! ॥ ८ ॥ - स्त्रियांनीं आपल्यासारख्या वीराची विटंबना केली, हें पाहून - त्याला पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. तो दुष्ट मनांत विचार करूं लागला कीं, विष्णूच्या

तत्प्रभाहततेजस्कं पुष्पकं नाचलत्ततः॥ त्यक्त्वा विमानं प्रययौ मन्त्रिणश्च दशा-
ननः ॥ ६ ॥ प्रविशन्नेव तद्द्वीपं धृतो हस्तेन योषिता[२] ॥ पृष्टश्च त्वं कुतः को ऽसि
प्रेषितः केन वा वद॥७॥इत्युक्तो लीलया स्त्रीभिर्हसन्तीभिः पुनः पुनः॥ कृच्छ्रा[३]-
द्धस्ताद्विनिर्मुक्तस्तासां स्त्रीणां दशाननः ॥ ८ ॥ आश्चर्यमतुलं लब्ध्वा चिन्तया-
मास दुर्मतिः ॥ विष्णुना निर्हतो[४] यामि वैकुण्ठमिति निश्चितः ॥ ९ ॥

(पू.) ततः न अचलत्. ॥ दशाननः (मू.) त्यक्त्वा प्रययौ. ॥ ६ ॥ तत् द्वीपं (पू.) हस्तेन धृतः. ॥ (मू.) प्रेषितः ? वद. ॥ ७ ॥ हसन्तीभिः स्त्रीभिः (पू.) इति उक्तः ॥ दशाननः तासां स्त्रीणां हस्तात् (मू.). ॥ ८ ॥ दुर्मतिः [सः] अतुलं (मू.) यामि इति निश्चितः [बभूव]. ॥ ९ ॥

१ हललें. २ स्त्रीनें (दासीनें). ३ संकटानें. ४ मारिलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हातून मरण पावून वैकुंठाला गेलें पाहिजे. तसें करण्याबद्दल त्याचा पूर्ण निश्चय झाला. ॥ ९ ॥ पुढें, माझ्यावर विष्णु संतापेल असें कांहीं तरी कर्म केलें पाहिजे, असा निश्चय करून त्या दैत्यानें जानकीला अरण्यांतून चोरून नेलें. ॥ १० ॥ त्यानें तूं परमात्मा आहेस हें जाणूनच जानकी नेली. तो तिचें मातेप्रमाणें रक्षण करीत असे. त्याची इच्छा इतकीच होती कीं, तुझ्या हातून आपला वध व्हावा. ॥ ११ ॥ रामचंद्रा! तूं परमेश्वर आहेस व सर्व गोष्टी जाणितोस. स्वस्वरूपज्ञान हीच तुझी दृष्टि होय. मागें अमुक घडलें, पुढें अमुक होणार व सध्यां अमुक चाललें आहे — अशा तीन्ही कालीं होणाऱ्या सर्व व्यवस्था तूं प्रत्यक्ष अवलोकन करितोस. तुला कोणताही संशय राहत नाहीं. भक्तांना आपलीं चारित्रें कीर्तन करायाला मिळावीं व त्यायोगें त्यांचा पापक्षय व्हावा ह्यासाठीं तूं मनुष्यरूप स्वीकारून रावणवधादि सगळे व्यापार केलेस.

मयि विष्णुर्यथा कुप्येत्तथा कार्यं करोम्यहम् ॥ इति निश्चित्य वैदेहीं जहार विपिने ऽसुरः ॥ १० ॥ जानन्नेव परात्मानं स जहारावनीसुताम् ॥ मातृवत्पालयामास त्वत्तः कांक्षन्वधं स्वकम् ॥ ११ ॥ राम त्वं परमेश्वरो ऽसि सकलं जानासि विज्ञानदृग्भूतं भव्यमिदं त्रिकालकलनासाक्षी[1] विकल्पोज्झितः[2] ॥ भक्तानामनुवर्तनाय सकलां कुर्वन् क्रियासंहतिं[3] त्वाशृण्वन्मनुजाकृतिर्मुनिवचो भासीश लोकार्चितः ॥ १२ ॥

असुरः, ‘ अहं विष्णुः (पू.) ’ (मू.) जहार. ॥ १० ॥ परात्मानं (पू.) जहार, ॥ त्वत्तः स्वकं वधं काङ्क्षन् (मू.). ॥ ११ ॥ राम, विज्ञानदृक् (पू.) विजानासि. ईश, त्रिकालकलनासाक्षी विकल्पोज्झितः (मू.) कुर्वन मनुजाकृतिः लोकार्चितः त्वं मुनिवचः आशृण्वन भासि. ॥ १२ ॥

---

१ तीन्ही कालींचे व्यापार प्रत्यक्ष पाहणारा. २ संशयानें सोडिलेला. ३ कार्यांच्या समुदायाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ईश्वरा! त्रैलोक्य ज्याची पूजा करितें तो तूं मुनींचें (आमचें) भाषण ऐकत बसला आहेस म्हणून फारच शोभतोस." ॥ १२ ॥ अगस्त्य मुनींनीं अशाप्रकारें रामाची स्तुति केली. रामानेंही त्यांची पूजा केली. तेव्हां ते मुनि, आनंदित मनानें, मुनींसहवर्तमान आपल्या आश्रमीं निघून गेले. ॥ १३ ॥ लक्ष्मीपति रामचंद्र सीता, भाऊ आणि प्रधानमंडळ ह्यांसह एखाद्या संसारी पुरुषाप्रमाणें घरामध्यें रममाण होऊन राहिला.॥१४॥ तो विषयांवर आसक्त नव्हता तरी प्रियेसह उपभोग भोगीत असे. हनुमान् आदिकरून श्रेष्ठ वानर त्याच्या भोंवतीं असत. ॥ १५ ॥ एके प्रसंगीं पुष्पक विमान पूर्वीप्रमाणें प्रभु रामचंद्राजवळ येऊन म्हणालें :– 'देवा! मी तुझ्या आज्ञेप्रमाणें कुबेराजवळ पोंचल्यावर कुबेरानें मला तुजकडे परत पाठविलें. ॥ १६ ॥

स्तुत्वैवं राघवं तेन पूजितः कुंभसंभवः ॥ स्वाश्रमं मुनिभिः सार्धं प्रययौ हृष्टमानसः ॥ १३ ॥ रामस्तु सीतया सार्धं भ्रातृभिः सह मन्त्रिभिः ॥ संसारीव रमानाथो रममाणो ऽवसद्गृहे ॥ १४ ॥ अनासक्तो ऽपि विषयान्बुभुजे प्रियया सह ॥ हनूमत्प्रमुखैः सद्भिर्वानरैः परिवेष्टितः ॥ १५ ॥ पुष्पकं चागमद्राममेकदा पूर्ववत्प्रभुम् ॥ प्राह देव कुबेरेण प्रेषितं त्वामहं ततः ॥ १६ ॥

एवं राघवं (पू.) ॥ हृष्टमानसः [सन्] (मू.). ॥ १३ ॥ रमानाथः (पू.) [च] सह (मू.) अवसत्. ॥ १४ ॥ (उ.) [रामः] (पू.) बुभुजे. ॥ १५ ॥ एकदा (पू.) रामं अगमत्, ॥ प्राह – 'देव, ततः (मू.) त्वां प्रेषितं, ॥ १६ ॥

१ राहिला. २ भोगीत असे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- कुबेरानें मला असें सांगितलें कीं, - प्रथम तुला रावणानें जिंकिलें आणि नंतर रामानें वश करून घेतलें; ह्मणून राम पृथ्वीवर राहील तोंपर्यंत तूं त्याला वाहा, ॥ १७ ॥ व रघुवीर वैकुंठाला गेला कीं मग मजकडे ये.' तें ऐकून राम त्या सूर्यासारख्या पुष्पकविमानाला ह्मणाला :– ॥ १८ ॥ 'बा! तुझें कल्याण होवो. मी जेव्हां स्मरण करीन तेव्हां तूं मजजवळ ये. आतां जा सर्वत्र गुप्त होऊंन राहा, अशी माझी तुला आज्ञा आहे.' ॥ १९ ॥ असें सांगून रामचंद्र भाऊ, मंत्री ह्यांच्या साह्यानें नीतिशास्त्रानुसार सर्व नागरिक जनांचीं

जितं त्वं रावणेनादौ पश्चाद्रामेण निर्जितम् ॥ अतस्त्वं राघवं नित्यं वह यावद्द्-सेद्भुवि ॥ १७ ॥ यदा गच्छेद्रघुश्रेष्ठो वैकुण्ठं याहि मां तदा ॥ तच्छ्रुत्वा राघवः प्राह पुष्पकं सूर्यसन्निभम् ॥ १८ ॥ यदा स्मरामि भद्रं ते तदाऽऽगच्छ ममान्तिकम् ॥ तिष्ठान्तर्धाय सर्वत्र गच्छेदानीं ममाज्ञया ॥ १९ ॥ इत्युक्त्वा रामचन्द्रोऽपि पौरकार्याणि सर्वशः ॥ भ्रातृभिर्मन्त्रिभिः सार्धं यथान्यायं चकार सः ॥ २० ॥

'रावणेन आदौ त्वं (मू.) वसेत्, [तावत्] वह. ॥ १७ ॥ (पू.) गच्छेत्, तदा मां याहि.' [इति उक्तं च]." ॥ राघवः (मू.) पुष्पकं प्राह – ॥१८॥ 'ते भद्रं; (पू.) आगच्छ. ॥ सर्वत्र अन्तर्धाय (मू.) गच्छ. ॥ १९ ॥ सः रामचन्द्रः अपि (पू.) पौरकार्याणि (मू.) चकार. ॥२०॥

१ गुप्त होऊन. २ नागरिक जनांचीं कामें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कामें पाहूं लागला. ॥ २० ॥ त्रैलोक्यनाथ लक्ष्मीपति रामचंद्र पृथ्वीचें राज्य करीत होता, तेव्हां पृथ्वी धनधान्यांनीं भरलेली असे; वृक्ष विपुल फळें देत; ॥ २१ ॥ सगळे लोक आपापल्या धर्माप्रमाणें वागत; स्त्रिया पतींच्या सेवेंत दक्ष असत. राम राजा होता तोंपर्यंत कोणीही, आपला पुत्र मेला, असें पाहिलें नाहीं. ॥ २२ ॥ प्रभु रामचंद्र सीता, वानर आणि भाऊ ह्यांना बरोबर घेऊन उत्तम पुष्पकविमानांत बसून पृथ्वीवर फिरत असे. ॥ २३ ॥ प्रभूनें पृथ्वीवर मनुष्याच्या हातून घडणार नाहींत अशीं अनेक कार्यें केलीं. एके प्रसंगीं, ब्राह्मणाचा एक लहान मुलगा अकालीं मरण पावला असून ब्राह्मण त्याच्यासाठीं शोक करीत आहे, असें रामचंद्राला दिसून आलें. प्रभूची बुद्धि महाविलक्षण होती. असें विपरीत होण्याचें

राघवे शासति भुवं लोकनाथे रमापतौ ॥ वसुधा[1] सस्यसंपन्ना[2] फलवन्तश्च भूरु-
हाः[3] ॥२१॥ जना धर्मपराः सर्वे पतिभक्तिपराः स्त्रियः ॥ नापश्यत्पुत्रमरणं कश्चि-
द्राजनि राघवे ॥ २२ ॥ समारुह्य विमानाग्र्यं राघवः सीतया सह ॥ वानरैर्भ्रा-
तृभिः सार्धं संचचारावनिं प्रभुः ॥ २३ ॥ अमानुषाणि कार्याणि चकार बहु-
शो भुवि ॥ ब्राह्मणस्य सुतं दृष्ट्वा बालं मृतमकालतः ॥ २४ ॥

(पू.) भुवं शासति [सति], ॥ (मू.) च फलवन्तः. ॥२१॥ सर्वे (पू.) पतिभक्तिपराः. ॥ राघवे राजनि [सति], कश्चित् (मू.) न अपश्यत्. ॥ २२ ॥ प्रभुः (पू.) विमानाग्र्यं समारुह्य, (मू.) संचचार. ॥ २३ ॥ भुवि बहुशः (मू.) सुतं अकालतः मृतं दृष्ट्वा, ॥ २४ ॥

१ पृथ्वी. २ धान्ययुक्त. ३ वृक्ष.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कारण त्याला तत्काळ करून आलें : अरण्यामध्यें एक शूद्र तपश्चर्या करीत होता. रामचंद्रानें त्याचा वध करून ब्राह्मणाच्या मुलाला ॥ २४ ॥ २५ ॥ जिवंत केलें आणि शूद्राला अत्युत्तम स्वर्गलोक दिला. परमात्मा रघुवीरानें लोकांना वळण लावण्यासाठीं ॥ २६ ॥ जिकडे तिकडे कोट्यवधि शिवलिंगें स्थापिलीं. तो सर्व दिव्य उपभोगांच्यायोगें सीतेला रमवीत असे. ॥ २७ ॥ रामचंद्राला धर्माचें उत्तम ज्ञान होतें. त्यानें धर्मतः राज्य चालविलें आणि सर्व लोकांचीं पापें दूर करणारी पवित्र कीर्ति जगांत चिरकाल करून ठेविली. ॥ २८ ॥

शोचन्तं ब्राह्मणं चापि ज्ञात्वा रामो महामतिः ॥ तपस्यन्तं वने शूद्रं हत्वा ब्राह्मणबालकम् ॥ २५ ॥ जीवयामास शूद्रस्य ददौ स्वर्गमनुत्तमम् ॥ लोकानामुपदेशार्थं परमात्मा रघूत्तमः ॥ २६ ॥ कोटिशः स्थापयामास शिवलिंगानि सर्वशः ॥ सीतां च रमयामास सर्वभोगैरमानुषैः ॥२७॥ शशास रामो धर्मेण राज्यं परमधर्मवित् ॥ कथां संस्थापयामास सर्वलोकमलापहाम् ॥ २८ ॥

(पू.) रामः ॥ वने (मू.) ॥ २५ ॥ (पू.) स्वर्गं ददौ. ॥ परमात्मा रघूत्तमः (मू.). ॥ २६ ॥ (पू.) स्थापयामास. (मू.) सर्वभोगैः रमयामास. ॥ २७ ॥ परमधर्मवित् (पू.) शशास, ॥ (मू.) कथां संस्थापयामास. ॥ २८ ॥

---

१ तप करणाऱ्या. २ मनुष्यांना न मिळणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामाचे व सीतेचे गुण.

ज्याच्या चरणकमलाला सगळे लोक वंदन करितात, त्या परमेश्वरानें मायेच्या योगें मनुष्यशरीर धारण करून नीतिशास्त्रानुसार दहा सहस्त्र वर्षें राज्य चालविलें. ॥ २९ ॥ रामानें कडकडीत एकपत्नीव्रत पाळिलें (प्राचीनकाळीं राजेलोक अनेक स्त्रिया वरीत असत; असें असून, हा सर्वगुणसंपन्न राजा एके स्त्रीशींच रत व संतुष्ट राहिला. हा गुण त्या कालाच्या मानानें खरोखर असामान्य होय). तो राजर्षि (राजा असून ऋषीसारखी तपश्चर्या करणारा राम) सर्वकाळ शुद्ध राहून लोकशिक्षणासाठीं गृहस्थाश्रमांतील सर्व धर्म आचरीत असे. ॥ ३० ॥ सीतेच्या आंगीं नम्रता, इंद्रियनिग्रह, लज्जा, भीति हे गुण होते. तिला पतीचा अभिप्राय तेव्हांच ओळखितां येई. इतक्या गुणांच्या योगें ती साध्वी पतीचें मन हरण करून प्रेमपूर्वक त्याची सेवा करी. ॥ ३१ ॥ एके प्रसंगीं रघुवीर पुष्पवाटिकेमध्यें सर्व उपभोगसाहित्यांनीं भरलेल्या दिव्य

दश वर्षसहस्राणि मायामानुषविग्रहः ॥ चकार राज्यं विधिवल्लोकवन्द्यपदाम्बुजः ॥२९॥ एकपत्नीव्रतो रामो राजर्षिः सर्वदा शुचिः ॥ गृहमेधीयमखिलमाचरन् शिक्षयन् जनान् ॥ ३० ॥ सीता प्रेम्णाऽनुवृत्त्या च प्रश्रयेण दमेन च ॥ भर्तुर्मनोहरा साध्वी भावज्ञा सा ह्रिया भिया ॥ ३१ ॥ एकदाऽऽक्रीडविपिने सर्वभोगसमन्विते ॥ एकान्ते दिव्यभवने सुखासीनं रघूत्तमम् ॥ ३२ ॥

(मू.) [रामः] दशवर्षसहस्राणि राज्यं विधिवत् चकार. ॥ २९ ॥ (पू.) रामः अखिलं (मू.) शिक्षयन् आचरन् [आसीत्]. ॥ ३० ॥ साध्वी सा (पू.), ह्रिया, भिया च (मू.) च [आसीत्]. ॥ ३१ ॥ एकदा (३४ पू.) सा सीता (३२ पू.) क्रीडाविपिने (३२ उ.) ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मंदिरांत एकांतस्थलीं सुखासनीं बसला होता; ॥ ३२ ॥ त्याची शरीरकांति निळ्या रत्नासारखी होती; त्यानें आंगावर बहुमोल अलंकार घातले होते; त्याचें मुख प्रसन्न व आकृति गंभीर दिसे; तो विजेच्या राशीसारखें तेजःपुंज वस्त्र नेसला होता. ॥ ३३ ॥ सीतेचे नेत्र कमलाच्या पानासारखे असून तिनें आंगावर सर्व अलंकार धारण केले होते. ती आपल्या हातांनीं रामाचें चरणकमल कुरवाळीत त्याला ह्मणाली :- ॥ ३४ ॥ "हे देवाधिदेवा! तूं जगाचा अधिपति सनातन परमात्मा आहेस. ज्ञान आणि आनंद हे तुझें रूप होय. तुला आदि, मध्य व अंत नाहींत. तूं सर्व जगाचें कारण आहेस. ॥ ३५ ॥ रामा! आपण वैकुंठीं यावें अशाविषयीं इंद्रादि मुख्य देव अनेक प्रकारें विनवण्या करीत असतात; त्यांनीं मला एकीकडे भेट घेऊन वि-

नीलमाणिक्यसंकाशं दिव्याभरणभूषितम् ॥ प्रसन्नवदनं शान्तं विद्युत्पुञ्जनिभाम्बरम् ॥ ३३ ॥ सीता कमलपत्राक्षी सर्वाभरणभूषिता ॥ राममाह कराभ्यां सा लालयन्ती[1] पदाम्बुजे ॥३४॥ देवदेव जगन्नाथ परमात्मन्सनातन ॥ चिदानन्दा[2]दिमध्यान्तरहिताशेषकारण[3] ॥३५॥ देवदेवाः समासाद्य[4] मामेकान्ते ऽब्रुवन्वचः ॥ बहुशो ऽर्थयमानास्ते[5] वैकुण्ठागमनं प्रति ॥ ३६ ॥

(३३ मू. ३४ उ.) लालयन्ती [सती] आह - ॥ ३२ ॥ ३३ ॥ ३४ ॥ " (मू.) ॥ ३५ ॥ (पू.) समासाद्य, (उ.) बहुशः अर्थयमानाः [सन्तः] वचः अब्रुवन् - ॥ ३६ ॥

१ कुरवाळणारी. २ ज्ञानानंदरूपा. ३ सर्व जगाच्या कारणा. ४ भेटून. ५ विनवणारे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नविलें :– 'हे चिच्छक्तिरूपे देवि! रामचंद्र आह्मांला आणखी आपल्या सनातन वैकुंठस्थानाला सोडून तुजसहवर्तमान भूतलावर राहतो; ॥ ३६ ॥ ३७ ॥ जगन्माते! कमलनयन रामाला येथें राहणें आवडलें ह्याचें कारण तूं होस. तूं पुढें वैकुंठास चल. तसें झालें कीं राम ॥३८॥ वैकुंठीं येईल व आह्मांला आश्रय देईल.' त्यांनीं माझी अशी प्रार्थना केली व मी तें आपल्याला विज्ञापनापूर्वक निवेदिलें आहे. ॥ ३९ ॥ प्रभो! आतां आपल्याला योग्य दिसेल तसें करावें. मी ह्मणजे आपल्याला कांहीं आज्ञा करीत आहें असें नव्हे." सीतेचें तें भाषण ऐकिल्यावर रामानें क्षणमात्र विचार करून उत्तर दिलें :– ॥ ४० ॥

त्वया समेतश्चिच्छक्त्या रामस्तिष्ठति भूतले ॥ विसृज्यास्मान्स्वकं धाम वैकुण्ठं च सनातनम्[1] ॥३७॥ आस्ते त्वया जगद्धात्रि[2] रामः कमललोचनः ॥ अग्रतो याहि[3] वैकुण्ठं त्वं तथा चेद्रघूत्तमः ॥३८॥ आगमिष्यति वैकुण्ठं सनाथान्नः करिष्यति ॥ इति विज्ञापिता ऽहं तैर्मया विज्ञापितो भवान् ॥३९॥ यद्युक्तं तत्कुरुष्वाद्य नाहमाज्ञापये प्रभो ॥ सीतायास्तद्वचः श्रुत्वा रामो ध्यात्वा ऽब्रवीत्क्षणम् ॥ ४० ॥

'रामः (मू.) वैकुण्ठं च विसृज्य, भूतले तिष्ठति. ॥ ३७ ॥ (पू.) रामः त्वया [सह] आस्ते. त्वं वैकुण्ठं (मू.) ॥ ३८ ॥ आगमिष्यति, नः (पू.).' ॥ तैः अहं (मू.) विज्ञापितः. ॥ ३९ ॥ प्रभो, अद्य (पू.) न आज्ञापये." ॥ रामः (मू.) ध्यात्वा अब्रवीत – ॥ ४० ॥

१ सोडून. २ जगन्माते. ३ चल.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'सीते, मला तुझ्या ह्मणण्याचा सर्व अभिप्राय कळून आला. ह्याविषयीं मी तुला एक उपाय सांगतों. देवि ! लोकांमध्यें तुजविषयीं कांहीं अपवाद उठला आहे असें मिष रचून ॥ ४१ ॥ एखाद्या सामान्य मनुष्याप्रमाणें लोकापवादाच्या भीतीनें मी तुला वनांत नेऊन सोडितों. तेथें तुला वाल्मीकाच्या आश्रमाजवळ दोन पुत्र होतील. ॥ ४२ ॥ सध्यां तुझ्या उदरीं गर्भ असल्याचें चिन्ह उघड दिसत आहे. पुढें तूं पुन्हां मजजवळ येशील व लोकांच्या विश्वासासाठीं आदरपूर्वक शपथ वाहून ॥ ४३ ॥ भूमीच्या विवरांत प्रवेश करशील आणि त्या द्वारें सत्वर वैकुंठास जाशील. पाठीमागून मीही तिकडे येईन. हाच निश्चय ठरला.' ॥ ४४ ॥

देवि जानामि सकलं तत्रोपायं वदामि ते ॥ कल्पयित्वा मिषं देवि लोकवादं त्वदाश्रयम्[1] ॥ ४१ ॥ त्यजामि त्वां वने लोकवादाद्भीत इवापरः ॥ भविष्यतः कुमारौ द्वौ वाल्मीकेराश्रमान्तिके[2] ॥४२॥ इदानीं दृश्यते गर्भः पुनरागत्य मेऽन्तिकम् ॥ लोकानां प्रत्ययार्थं[3] त्वं कृत्वा शपथमादरात् ॥ ४३ ॥ भूमेर्विवरमात्रेण वैकुण्ठं यास्यसि द्रुतम् ॥ पश्चादहं गमिष्यामि एष एव सुनिश्चयः ॥ ४४ ॥

'देवि, सकलं (पू.) वदामि. ॥ (मू.) लोकवादं मिषं कल्पयित्वा, ॥ ४१ ॥ (मू.) [सन्] अपरः इव वने त्वां त्यजामि. ॥ [तव] (मू.) द्वौ कुमारौ भविष्यतः. ॥ ४२ ॥ इदानीं गर्भः दृश्यते. त्वं (पू.) आगत्य, ॥ (मू.) शपथं कृत्वा, ॥ ४३ ॥ (पू.) यास्यसि. ॥ (मू.).' ॥ ४४ ॥

---

१ रचून. २ जवळ. ३ विश्वासाकरितां.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'मला कोण
काय ह्मणतें ?'

असें सांगून त्या केवलज्ञानरूपी रामचंद्रानें सीतेला पाठवून दिलें. पुढें एकेप्रसंगीं रामचंद्र आपले गूढ मंत्रांचीं (मसलतींचीं) तत्वें जाणणारे प्रधान व सेनापति ह्यांसह सभेंत बसला होता. ॥ ४५ ॥ राम तेथें बसला असतां, हांसविण्याच्या कामांत निष्णात व अनेक गोष्टी सांगण्यांत निपुण असे (खुषमस्कऱ्ये) त्याचे मित्र त्याला हांसवीत (विनोदकथा सांगत) सभोंवतीं बसले होते. ॥ ४६ ॥ ओघानें गोष्टी बोलतां बोलतां रामानें आपल्या विजय नामक दूताला विचारिलें :– 'अयोध्येंतील नागरिक किंवा देशांतले लोक माझ्याविषयीं बरें वाईट काय बोलतात ? ॥ ४७ ॥ सीतेला, माझ्या मातेला (कौसल्येला), भावांना अथवा कैकेयीला - लोक काय ह्मणतात ? - भिऊं नकोस; खुशाल सांग. तुला माझी शपथ आहे.' ॥ ४८ ॥

इत्युक्त्वा तां विसृज्याथ रामो ज्ञानैकलक्षणः ॥ मन्त्रिभिर्मन्त्रतत्त्वज्ञैर्बलमुख्यैश्च संवृतः ॥ ४५ ॥ तत्रोपविष्टं श्रीरामं सुहृदः पर्युपासत ॥ हास्यप्रौढकथासुज्ञा हासयन्तः स्थिता हरिम् ॥ ४६ ॥ कथाप्रसंगात्पप्रच्छ रामो विजयनामकम् ॥ पौरा जानपदा मे किं वदन्तीह शुभाशुभम् ॥ ४७ ॥ सीतां वा मातरं वा मे भ्रातॄन्वा कैकयीमथ ॥ न भेतव्यं त्वया ब्रूहि शापितो ऽसि ममोपरि ॥ ४८ ॥

ज्ञानैकलक्षणः रामः (पू.), ॥ मन्त्रतत्वज्ञैः (मू.) [बभूव]. ॥ ४५ ॥ सुहृदः (मू.) हासयन्तः स्थिताः. ॥ ४६ ॥ रामः (पू.) पप्रच्छ – ॥ 'पौराः जानपदाः [च] इह किं वदन्ति ? ॥ ४७ ॥ (पू.) [किं वदन्ति]? ॥ त्वया (मू.) शापितः असि.' ॥ ४८ ॥

१ पाठवून. २ हांसविण्यांत निष्णात व गोष्टी चांगल्या जाणणारे. ३ हांसविणारे. ४ भ्यावें. ५ शपथ घातलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामानें असें सांगितलें असतां, विजय ह्मणाला :– " राजा! तुझ्याविषयीं सगळे लोक ह्मणत असतात कीं, ' रामाला आत्मतत्त्वज्ञान आहे; जें कार्य करणें अत्यंत कठिण होतें, तें सगळें रामानें पार पाडिलें. ॥ ४९ ॥ परंतु, दशाननाला मारिल्यावर राम सीतेला घेऊन व क्रोधाकडे अगदीं पाठ फिरवून, (सीतेच्या पातिव्रत्या विषयीं शंका अगदीं न धरितां) घरीं आला; त्यानें सीतेला खुशाल घरांत घेतलें! ॥ ५० ॥ त्याच्या मनाला सीतेच्या समागमानें सुख काय वाटत असेल तें असो! अहो! तिला दुष्ट रावण अरण्यांतून घेऊन गेला, त्या वेळीं आसपास कोणी मनुष्य नव्हतें - मग तेथें काय प्रकार घडला असेल कोणाला ठाऊक? - ॥५१॥ असो. आतां आह्मांला देखील, आमच्या बायकांनीं कांहीं दुराचरण केलें, तर तें सोसून निमूट बसणें भाग आहे! कारण, राजा जसा वागेल, तसें प्रजांनीं वागलेंच पाहिजे!" ॥ ५२ ॥

इत्युक्तः प्राह विजयो देव सर्वे वदन्ति ते ॥ कृतं सुदुष्करं सर्वं रामेण विदिता-
त्मना ॥४९॥ किंतु हत्वा दशग्रीवं सीतामाहृत्य राघवः ॥ अमर्षं पृष्ठतः कृत्वा
स्वं वेश्म प्रत्यपादयत् ॥ ५० ॥ कीदृशं हृदये तस्य सीतासंभोगजं सुखम् ॥ या
हृता विजने ऽरण्ये रावणेन दुरात्मना ॥ ५१ ॥ अस्माकमपि दुष्कर्म योषितां
मर्षणं भवेत् ॥ यादृक् भवति वै राजा तादृश्यो नियतं प्रजाः ॥ ५२ ॥

(पू.) प्राह – " देव! सर्वे ते वदन्ति – ॥ ' विदितात्मना रामेण सर्वं सुदुष्करं कृतं; ॥४९॥ किन्तु राघवः दशग्रीवं (मू.). ॥ ५० ॥ तस्य (पू.) कीदृशं? ॥ (मू.) रावणेन विजने अरण्ये हृता! ॥ ५१ ॥ (पू.) दुष्कर्म मर्षणं भवेत्. ॥ राजा (मू.) तादृश्यः [भवन्ति. ' इति] " ॥ ५२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'सीतेला वनांत नेऊन सोड.'

रामानें तें भाषण ऐकिल्यावर आपल्या आप्तजनांना त्याच्या सत्यत्वाबद्दल मत विचारिलें. त्यांनींही नम्रतापूर्वक उत्तर दिलें :– ' रामा! लोक हें असेंच ह्मणतात, ह्यांत संशय नाहीं. ' ॥ ५३ ॥ नंतर रामानें सचिवांना, आप्तांना आणि विजयाला निरोप दिला व लक्ष्मणाला बोलावून आणून सांगितलें :– ॥ ५४ ॥ ' लक्ष्मणा! लोक सीतेच्या संबंधानें मला मोठाच अपवाद लावितात. ह्मणून, तूं सीतेला उद्यां पहांटे अंतःपुरांतून काढून वाल्मीकिमुनीच्या आश्रमाजवळ सोडून दे, आणि रथांत बसून पुन्हां लवकर इकडे ये. ह्यावर जर एक शब्द (रदबदलीचा) मजजवळ बोलशील, तर तुला माझा वध केल्याचा दोष लागेल!' ॥५५॥५६॥ रामानें असें सांगितलें तेव्हां लक्ष्मणाला भीतीस्तव - पुढें कांहीं बोलतां येईना. - तो सकाळीं उठला व सुमं-

श्रुत्वा तद्वचनं रामः स्वजनान्पर्यपृच्छत ॥ ते ऽपि नत्वा ऽब्रुवन् राममेवमेतन्न संशयः ॥५३॥ ततो विसृज्य सचिवान्विजयं सुहृदस्तथा ॥ आहूय लक्ष्मणं रामो वचनं चेदमब्रवीत्॥५४॥लोकापवादस्तु महान्सीतामाश्रित्य मे ऽभवत् ॥ सीतां प्रातः समानीय वाल्मीकेराश्रमान्तिके ॥५५॥ त्यक्त्वा शीघ्रं रथेन त्वं पुनरायाहि लक्ष्मण ॥ वक्ष्यसे यदि वा किंचित्तदा मां हतवानसि ॥५६॥ इत्युक्तो लक्ष्मणो भीत्या प्रातरुत्थाय जानकीम् ॥

रामः तत् वचनं (मू.) अब्रुवन् – ' एवं एतत्; न संशयः. ' ॥ ५३ ॥ ततः रामः (पू.) सुहृदः [च] विसृज्य, लक्ष्मणं (मू.) वचनं अब्रवीत् – ॥ ५४ ॥ ' लक्ष्मण, मे सीतां आश्रित्य महान् (पू.). ॥ त्वं प्रातः रथेन (५५ मू. ५६ पू), यदि वा किंचित् (मू.).' ॥ ५५ ॥ ५६ ॥ (पू.) ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्राच्या साह्यानें सीतेला रथांत बसवून एकदम अरण्यांत गेला. ॥ ५७ ॥ तेथें त्यानें वाल्मीकाच्या आश्रमाजवळ सीतेला सोडून देऊन सांगितलें :– ' वहिनी! लोक दूषण देतात ह्या भयास्तव रामानें तुला वनांत सोडिलें.॥५८॥मातोश्री ! ह्यांत माझा कांहींएक अपराध नाहीं. आतां, आपण मुनींच्या आश्रमस्थलीं जावें.' इतकें बोलून लक्ष्मण लागलाच निघाला व रामाजवळ आला. ॥ ५९ ॥ इकडे सीताही दुःखानें तप्त होऊन एकाद्या वेड्यासारखी रडूं लागली. शिष्यांच्या तोंडून वाल्मीकिमुनींच्या कानीं वार्ता पोंचली कीं, - कोणी एक स्त्री आश्रमाजवळ आली असून रडत आहे. - मुनींनीं दिव्य दृष्टीच्या योगें, ती सीता आहे, असें जाणिलें; ॥ ६० ॥ पुढें काय प्रकार होणार तें सगळें त्यांना कळलें होतें. ह्मणून त्यांनीं अर्घ्यादिक उपचा-

सुमन्त्रेण रथे कृत्वा जगाम सहसा वनम् ॥५७॥ वाल्मीकेराश्रमस्यान्ते त्यक्त्वा सीतामुवाच सः ॥ लोकापवादभीत्या त्वां त्यक्तवान् राघवो वने ॥५८॥ दोषो न कश्चिन्मे मातर्गच्छाश्रमपदं मुनेः ॥ इत्युक्त्वा लक्ष्मणः शीघ्रं गतवान् रामसन्निधिम् ॥ ५९ ॥ सीता ऽपि दुःखसंतप्ता विललापातिमुग्धवत् ॥ शिष्यैः श्रुत्वा च वाल्मीकिः सीतां ज्ञात्वा स दिव्यदृक्॥६०॥अर्घ्यादिभिः पूजयित्वा समाश्वास्य च जानकीम् ॥

(मू.) जगाम. ॥ ५७ ॥ सः (पू.) त्यक्त्वा उवाच – ॥ 'राघवः (मू.) त्यक्तवान्. ॥ ५८ ॥ मातः मे कश्चित् (पू.) मुनेः आश्रमपदं गच्छ.' ॥ लक्ष्मणः (मू.) गतवान्. ॥ ५९ ॥ (पू.) [सती] अतिमुग्धवत् विललाप. ॥ दिव्यदृक् सः वाल्मीकिः (मू.) च. ॥ ६० ॥ जानकीं (पू.) ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रानीं जानकीची पूजा करून तिला आश्वासन दिलें आणि - मुनिपत्न्यांना - ‘ हिचें चांगल्या प्रकारें रक्षण करा ’ असें सांगून - तिला त्यांच्या स्वाधीन केलें. ॥ ६१ ॥ मुनींच्या आज्ञेप्रमाणें त्या स्त्रिया, सीता ही परमेश्वराची लक्ष्मी होय, असें समजून भक्तिपूर्वक तिची प्रतिदिनीं पूजा करीत आणि सर्वकाळ मोठ्या आदरानें नम्रतादिगुणांनीं तिची सेवा करीत. ॥ ६२ ॥ सीतेचा त्याग केल्यावर परमात्मा रामचंद्रही सर्व उपभोग भोगणें सोडून व वैराग्य धरून मुनींसारखे नियम आचरण करीत राहिला. (शंकर ह्मणाले :– पार्वति !) रामचंद्र हा केवळ आदि देव होता. तत्त्वज्ञान हें त्याची दृष्टि होय. मुनि त्याच्या चरणांची नित्य सेवा करितात. ॥ ६३ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे उत्तरकाण्डे चतुर्थः सर्गः ॥ ४ ॥

ज्ञात्वा भविष्यं सकलमार्पयन्मुनियोषिताम् ॥६१॥ तास्तां संपूजयन्ति स्म सीतां भक्त्या दिने दिने ॥ ज्ञात्वा परात्मनो लक्ष्मीं मुनिवाक्येन योषितः ॥ सेवां चक्रुः सदा तस्या विनयादिभिरादरात् ॥६२॥ रामोऽपि सीतारहितः परात्मा विज्ञानदृक्केवल आदिदेवः ॥ संत्यज्य भोगानखिलान् विरक्तो मुनिव्रतोऽभून्मुनिसेविताङ्घ्रिः ॥ ६३ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणे उत्तरकाण्डे चतुर्थः सर्गः ॥ ४ ॥

सकलं भविष्यं (मू.) आर्पयत्. ॥ ६१ ॥ ताः मुनियोषितः मुनिवाक्येन (पू. द्वि.) ज्ञात्वा भक्त्या दिने दिने सम्पूजयन्ति स्म, (मू.) तस्याः सेवां चक्रुः. ॥ ६२ ॥ (पू.) मुनिसेविताङ्घ्रिः रामः अपि विरक्तः [सन्] अखिलान् भोगान् (मू.). ॥ ६३ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये उत्तरकाण्डे चतुर्थः सर्गः ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ अथ श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे रामगीता ॥ श्रीसीतारामचन्द्राभ्यां नमः ॥ पार्वती–परमेश्वराभ्यां नमः ॥ पार्वतीप–रमेश्वराभ्यां नमः ॥ श्रीशंकर ह्मणाले :– पार्वति ! जगामध्यें सकल प्राण्यांना जे कांहीं आनंद आहेत किंवा होतात, त्यांचा आधार श्रीरामचंद्राची ब्रह्मानंदमय मूर्ति होय; कारण, वेदांनीं ह्मटलें आहे कीं, 'ब्रह्मानंदाच्या एका अंशावर इतर सर्व जीवन (आनंद) पावतात.' [अथवा, रामचंद्राच्या कल्याणमय

श्रीमहादेव उवाच ॥ ततो जगन्मंगलमंगलात्मना विधाय रामायणकीर्तिमुत्तमाम् ॥ चचार पूर्वाचरितं रघूत्तमो राजर्षिवर्यैरभिसेवितं यथा ॥ १ ॥

अथभगवान्शिवोरामलक्ष्मणसंवादमुखेनपरतत्त्वमुपदेष्टुमाह **ततइति** । **जगतांयानिमंगलानिआनंदास्तेषामुपजीव्यभूतंमंगलं** ब्रह्मानंदःसएवआत्मास्वरूपंतेन । तस्यैवानंदस्यान्यानिमात्रामुपजीवंतीतिश्रुतेः मंगलानांचमंगलमितिस्मृतेश्च ॥ किंच **जगतां मंगलंकल्याणंयस्मात्तादृशकल्याणरूपआत्मामूर्तिस्तेन उत्तमां**श्रोत्रादीनांमोक्षदत्वेनात्युत्तमां **रामायणकीर्तिं** वाल्मीक्यादिकृतनानाविधरामायणप्रवर्तिकांरावणवधादिजांकीर्तिं **विधाय** स्थितो **रघूत्तमः** ततःसीतापरित्यागानंतरं **पूर्वैः**स्ववंशजैराचरितं

श्रीमहादेवः उवाच[1] – रघूत्तमः[2] जगन्मङ्गलमङ्गलात्मना[3] उत्तमां[4] रामायणकीर्तिं[5] विधाय[6], ततः[7] पूर्वाचरितं[8] [प्रजापालनादि][9] राजर्षिवर्यैः[10] यथा[11] अभिसेवितं[12], [तथा[13]] चचार[14]. ॥ १ ॥

---

१ ह्मणाला. २ रघुवंशांत श्रेष्ठ (राम). ३ जगांचीं जीं मंगलें ह्मणजे आनंद, त्यांचा - मूळ आधार - मंगलरूप - जो ब्रह्मानंद, - तद्रूप मूर्तीच्या योगें. किंवा, जगांचें कल्याण होतें जीपासून, अशा मंगल मूर्तीच्या योगें. ४ फार चांगली (मोक्ष देणारी), अशा. ५ नानाप्रकारचे रामायणग्रंथ होण्याला आधार अशा कीर्तीला. ६ करून. ७ सीतेचा त्याग केल्यावर. ८ पूर्वजांनीं आचरिलेलें. ९ प्रजांचें रक्षण इत्यादि. १० राज्य आणि ऋषींसारखी तपश्चर्या हीं दोन्ही कार्ये एकदम चालविणाऱ्या थोर पुरुषांनीं. ११ जसें. १२ सेविलेलें. १३ तसें. १४ आचरण करिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लक्ष्मणाला रामाचा धर्मोपदेश.

मूर्तीपासूनच सर्व जगाचें कल्याण होतें.] त्यानें अशी मंगल मूर्ति धारण करून जी कीर्ति संपादिली तिच्या आधारावर अनेक रामायणग्रंथ झाले. ही उत्तम कीर्ति ऐकणाऱ्या लोकांना मोक्ष प्राप्त होतो. असो. - रामचंद्रानें लोकापवादास्तव सीतेचा त्याग केला, एथपर्यंत आपली कथा येऊन पोंचली आहे. - पुढेंही रामचंद्र, आपल्या पूर्वजांनीं प्रजापालन करणें, साधूंच्या कथा ऐकणें इत्यादि कर्तव्यें जशीं पाळिलीं व दुसऱ्याही महान् महान् राजर्षींनीं जे मार्ग आदरानें स्वीकारिले, त्यांच्याच अनुरोधानें वागत असे. ॥ १ ॥ लक्ष्मणाची बुद्धि फार उदार होती (शिष्याच्या आंगीं जे जे महागुण – गुरूच्या व वेदांतांच्या वचनांवर विश्वास

सौमित्रिणा पृष्ट उदारबुद्धिना रामः कथाः प्राह पुरातनीः शुभाः ॥ राज्ञः प्रमत्तस्य नृगस्य शापतो द्विजस्य तिर्यक्त्वमथाह राघवः ॥ २ ॥

प्रजापालनसत्कथाश्रवणादिकं केवलंतत्पूर्वजैरेवाचरितामितिन किंत्वन्यैरपिराजर्षिश्रेष्ठैर्यथा ऽभिसेवितं तथा चचारकृतवान् ॥ १ ॥ उदारागुरुदेवविश्वासलक्षणमहागुणवती यद्वा उदारादानशीलाबुद्धिर्यस्यतेन पुरातनीःप्राचीनराजसंबंधिनीः शुभाः धर्माधर्मनिर्णेत्रीः प्रमत्तस्यस्वगोमंडलमिश्रितब्राह्मणगोदानात्प्रमत्तस्य नृगस्य राज्ञो द्विजस्य शापात्तिर्यक्त्वमाह तेनाज्ञान-

उदार[1]बुद्धिना सौमित्रिणा[2] पृष्टः[3] रामः पुरातनीः[4] शुभाः[5] कथाः[6] प्राह[7]. अथ[8] राघवः प्रमत्तस्य[9] नृगस्य राज्ञः[10], द्विजस्य[11] शापतः[12], तिर्यक्त्वं[13] आह[14]. ॥ २ ॥

१ उदार (गुरूच्या आणि वेदांतांच्या वचनांवर विश्वास ठेवणारी उत्तम) बुद्धि ज्याची, अशा. २ सुमित्रेच्या पुत्रानें (लक्ष्मणानें). ३ प्रश्न केला ज्याला, असा. ४ प्राचीन. ५ हितकारक (धर्माधर्माचा निर्णय करणाऱ्या). ६ गोष्टी. ७ सांगता झाला. ८ नंतर (त्याच प्रसंगांत). ९ चुकलेल्या. १० राजाला. ११ ब्राह्मणाच्या. १२ शापामुळें. १३ वांकडें (सरपटत) चालणाऱ्या एका क्षुद्र प्राण्याचें जन्म. १४ सांगता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्वतंत्रतेनें जगाची राहटी चालविणारे व सर्वांच्या हृदयीं वास करणारे समर्थ नरनारायणरूपी तुह्मी ह्या लोकांत फिरत आहां, असें माझ्या बुद्धीला वाटतें.' ॥ १६ ॥ - हें मारुतीचें भाषण ऐकिल्यावर - श्रीराम लक्ष्मणाला ह्मणाला :—' लक्ष्मणा ! पहा; हा आकृतीवरून बटु दिसत आहे; पण ह्यानें सर्व व्याकरण शास्त्र अनेक वेळां ऐकिलें असावें, ह्यांत संशय नाहीं. ॥ १७ ॥ कारण, हा जें कांहीं सर्व बोलला त्यांत किंचित् देखील अपशब्द आला नाहीं !' नंतर तो ज्ञानरूपी रामचंद्र मारुतीला ह्मणाला :— ॥ १८ ॥ ' बटो ! मी दशरथाचा पुत्र राम आहें. हा माझा कनिष्ठ बंधू लक्ष्मण. पित्याची आज्ञारूप मोठें कार्य करण्यासाठीं,

स्वतन्त्रौ प्रेरकौ सर्वहृदयस्थाविहेश्वरौ ॥ नरनारायणौ लोके चरन्ताविति मे मतिः ॥ १६ ॥ श्रीरामो लक्ष्मणं प्राह पश्यैनं बटुरूपिणम् ॥ शब्दशास्त्रमशेषेण श्रुतं नूनमनेकधा ॥ १७ ॥ अनेन भाषितं कृत्स्नं न किंचिदपशाब्दितम् ॥ ततः प्राह हनूमन्तं राघवो ज्ञानविग्रहः ॥ १८ ॥ अहं दाशरथी रामस्त्वयं मे लक्ष्मणोऽनुजः ॥ सीतया भार्यया सार्धं पितुर्वचनगौरवात् ॥ आगतस्तत्र विपिने स्थितोऽहं दण्डके द्विज ॥ १९ ॥

(पू.) इह ॥ लोके चरन्तौ (मू.). ' ॥ १६ ॥ (पू.) – ' बटुरूपिणं एनं पश्य. ॥ [अनेन] अनेकधा (मू.) नूनं श्रुतं ! ॥१७॥(पू.)!' ॥ ततः ज्ञानविग्रहः राघवः हनूमन्तं प्राह – ॥ १८ ॥ '(पू.) मे अनुजः. ॥ द्विज, अहं पितुः वचनगौरवात् (मू.) आगतः, दण्डके स्थितः. ॥ १९ ॥

---

१ सर्व. २ ज्ञानरूपी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामाची मारुतीची प्रथम भेट.

सीता नामक आपल्या पत्नीला समागमें घेऊन मी अरण्यांत आलों, व तेथें दंडकारण्यांत राहिलों. ॥ १९ ॥ त्याठिकाणीं कोणी राक्षस माझ्या पत्नीला–सीतेला–घेऊन गेला ! तिच्या शोधासाठीं मी येथें आलों आहें. तूं कोण किंवा कोणाचा, तें सांग.' ॥ २० ॥ ह्यावर त्या बटूनें (मारुतीनें) उत्तर दिलें :–'रामचंद्रा, वानरांचा राजा महाबुद्धिमान् सुग्रीव, चौघां मंत्र्यांसह, पर्वताच्या शिखरावर बसला आहे. ॥ २१ ॥ सुग्रीव हा वालीचा धाकटा भाऊ. वालीचें अंतःकरण दुष्ट व पापी आहे. त्यानें ह्याला इकडे घालवून दिलें, व ह्याची भार्या स्वतां हरण करून घेतली ! ॥ २२ ॥ त्याच्या भयास्तव सुग्रीव ऋष्यमूक नांवाच्या पर्वताचा आश्रय

तत्र भार्या हृता सीता रक्षसा केनचिन्मम ॥ तामन्वेष्टुं[१]मिहायातो त्वं को वा कस्य वा वद ॥२०॥ बटुरुवाच ॥ सुग्रीवो नाम राजा यो वानराणां महामतिः ॥ चतुर्भिर्मन्त्रिभिः सार्धं गिरिमूर्धनि तिष्ठति॥२१॥भ्राता कनीयान्सुग्रीवो वालिनः पापचेतसः ॥तेन निष्कासितो भार्या हृता तस्येह वालिना॥२२॥ तद्भयादृष्यमूकाख्यं गिरिमाश्रित्य संस्थितः ॥ अहं सुग्रीवसचिवो वायुपुत्रो महामते॥ २३ ॥

तत्र केनचित् रक्षसा मम भार्या सीता हृता; (मू.) ? ' ॥ २० ॥ ब० उ० – ' यः महामतिः सुग्रीवः नाम, [सः] वानराणां राजा (मू.). ॥ २१ ॥ सुग्रीवः पापचेतसः[२] वालिनः कनीयान्[३] भ्राता; ॥ इह तेन वालिना[सः] निष्कासितः[४]; तस्य भार्या हृता. ॥२२॥ [सः] (पू.). ॥ महामते, (मू.) ॥ २३ ॥

१ अन्वेष्टुं शोधण्यास. २ दुष्ट मन ज्याचें, अशा. ३ धाकटा. ४ घालविलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

धरून राहिला आहे. हे बुद्धिमंता, मी वायूचा पुत्र सुग्रीवाचा मंत्री आहें. ॥ २३ ॥ मला लोक हनुमान् ह्या नांवानें ओळखितात. मी अंजनीच्या गर्भी जन्म पावलों. रघुवीरा, त्या सुग्रीवाशीं तुझें सख्य व्हावें, हें मला योग्य दिसतें. - कारण तुह्मी दोघेही सांप्रत समदुःखी आहां (दोघांच्याही बायका शत्रूंनीं हिरावून नेल्या आहेत). - ॥ २४ ॥ तुझी भार्या ज्यानें नेली त्याचा वध करण्याच्या कामीं सुग्रीव तुला साह्य करील. तुझ्या मनाला रुचत असेल तर चल; आतांच आपण तिकडे जाऊं.' ॥ २५ ॥ श्रीराम ह्मणाला :— 'हे वानरेश्वरा, मीही त्याच्याशीं सख्य करण्याकरितां आलों आहें. त्या माझ्या मित्राचें जें कांहीं कार्य असेल, तेंही मी निःसंशय करीन.' ॥ २६ ॥ पुढें हनुमंतानें आपलें खरें स्वरूप धारण केलें व रामाला

हनूमान्नाम विख्यातो ह्यञ्जनीगर्भसंभवः ॥ तेन सख्यं त्वया युक्तं सुग्रीवेण रघूत्तम ॥ २४ ॥ भार्यापहारिणं हन्तुं सहायस्ते भविष्यति ॥ इदानीमेव गच्छाम आगच्छ यदि रोचते ॥२५॥ श्रीराम उवाच । अहमप्यागतस्तेन सख्यं कर्तुं कपीश्वर ॥ सख्युस्तस्यापि यत्कार्यं तत्करिष्याम्यसंशयम् ॥ २६ ॥ हनूमान् स्वस्वरूपेण स्थितो राममथाब्रवीत् ॥ आरोहतां मम स्कन्धौ गच्छामः पर्वतोपरि ॥ २७ ॥

अंजनीगर्भसंभवः (पू.) ॥ रघूत्तम, त्वया (मू.) सख्यं युक्तम् ॥ २४ ॥ (पू.) सहायः भविष्यति. ॥ यदि रोचते, (मू.). ' ॥ २५ ॥ श्रीरामः उ० – ' कपीश्वर, (पू.) आगतः; ॥ तस्य (मू.) करिष्यामि. ' ॥ २६ ॥ (पू.) – ॥ ' मम स्कन्धौ (मू.) गच्छामः, ॥ २७ ॥

१ योग्य. २ पत्नीला चोरून नेणाऱ्या. ३ आवडतें. ४ खांद्यांवर. ५ चढून बसा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो.
समू-सान्त्र.
साक्षेपण.
॥ ४ ॥

म्हटलें :–' रामा, तुह्मी दोघेजण माझ्या खांद्यांवर बसा. आपण पर्वतावर जाऊं. ॥ २७ ॥ तेथें सुग्रीव, वालीच्या भीतीस्तव, मंत्र्यांसह बसला आहे.' रामानें 'बरें' ह्मणून त्याच्या स्कंधावर आरोहण केलें; तसाच लक्ष्मणही चढून बसला. ॥ २८ ॥ तत्क्षणीं त्या महाकपीनें पर्वताच्या शिखरावर उड्डाण केलें. ते रामलक्ष्मण एका वृक्षाच्या छायेच्या आश्रयानें बसले. ॥ २९ ॥ हनुमान्ही सुग्रीवाकडे जाऊन हात जोडून--ह्मणाला :–' राजा, भीति सोडून द्या. रामलक्ष्मण आले आहेत. ॥ ३० ॥ लवकर उठा. मी आपलें रामाशीं सख्य होण्याचा योग जमवून आणिला आहे. अग्नीला साक्षी

यत्र तिष्ठति सुग्रीवो मन्त्रिभिर्वालिनो भयात् ॥ तथेति तस्यारुरोह स्कन्धं रामोऽथ लक्ष्मणः ॥ २८ ॥ उत्पपात गिरेर्मूर्ध्नि क्षणादेव महाकपिः ॥ वृक्षच्छायां समाश्रित्य स्थितौ तौ रामलक्ष्मणौ ॥ २९ ॥ हनूमानपि सुग्रीवमुपगम्य कृताञ्जलिः ॥ व्येतु ते भयमायातौ राजन् श्रीरामलक्ष्मणौ ॥ ३० ॥ शीघ्रमुत्तिष्ठ रामेण सख्यं ते योजितं मया ॥ अग्निं साक्षिणमारोप्य तेन सख्यं द्रुतं कुरु ॥ ३१ ॥

(पू.) तिष्ठति. '॥ अथ सलक्ष्मणः रामः (मू.) आरुरोह. ॥ २८ ॥ महाकपिः (पू.) उत्पपात. ॥ तौ रामलक्ष्मणौ (मू.). ॥ २९ ॥ (पू.) ॥ [सन् उवाच –] ' राजन्, ते भयं व्येतु; (मू.) आयातौ ! ॥ ३० ॥ शीघ्रं उत्तिष्ठ; मया ते (मू.). ' ॥ ३१ ॥

१ बसला आहे. २ चढला. ३ मोठा वानर. ४ उडाला. ५ जवळ जाऊन. ६ दूर होवो. ७ ठेवून. ८ लवकर.

किष्किं-कां.
सर्ग १
'मैत्री करा.'
॥ ४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ठेवून लवकर त्याच्याशीं मैत्री करा.' ॥ ३१ ॥ - हें ऐकून - सुग्रीवाला अतिशय आनंद झाला. त्यानें लागलेंच रामाजवळ येऊन आनंदानें आपल्या हातांनीं एक झाडाची फांदी मोडून त्याला आसनासाठीं दिली; ॥ ३२ ॥ मारुतीनें लक्ष्मणाला दिली; व लक्ष्मणानें सुग्रीवाला दिली. सर्वजण अत्यंत आनंदयुक्त होत्साते तेथें बसले. ॥ ३३ ॥ नंतर लक्ष्मणानें रामाचा पहिल्यापासून सर्व वृत्तांत—वनवासाला येणें, सीताहरण वगैरे – सुग्रीवाला सांगून दिला. ॥ ३४ ॥ लक्ष्मणानें सांगितलेला प्रकार ऐकिल्यावर सुग्रीव रामाला ह्मणाला :– " राजाधिराजा, मी सीतेचा शोध लावीन, ॥ ३५ ॥ आणि, रामा, शत्रूचा वध कर-

ततो ऽतिहर्षात्सुग्रीवः समागम्य रघूत्तमम् ॥ वृक्षशाखां स्वयं छित्त्वा[1] विष्टराय[2] ददौ मुदा ॥ ३२ ॥ हनूमान्लक्ष्मणायादात्सुग्रीवाय च लक्ष्मणः ॥ हर्षेण महता ऽऽविष्टाः सर्व एवावतस्थिरे[3] ॥ ३३ ॥लक्ष्मणस्त्वब्रवीत्सर्वं रामवृत्तान्तमादितः ॥ वनवासाभिगमनं सीताहरणमेव च ॥ ३४ ॥ लक्ष्मणोक्तं वचः श्रुत्वा सुग्रीवो राममब्रवीत् ॥ अहं करिष्ये राजेन्द्र सीताया परिमार्गणम्[4] ॥ ३५॥ साहाय्यमपि ते राम करिष्ये शत्रुघातिनः॥

ततः सुग्रीवः (पू.) समागम्य ॥ (मू.) ददौ. ॥ ३२ ॥ (पू.) सुग्रीवाय च [अदात्.] ॥ महता (मू.). ॥ ३३ ॥ (मू.) आदितः सर्वं रामवृत्तान्तं अब्रवीत्. ॥ ३४ ॥ सुग्रीवः (पू.) – ॥ " राजेन्द्र, (मू.) करिष्ये. ॥ ३५ ॥ राम, शत्रुघातिनः ते (पू.). ॥

---

१ तोडून. २ आसनासाठीं. ३ बसले. ४ शोध.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ण्याच्या कामीं तुला साह्यही करीन. रामचंद्रा, मी प्रत्यक्ष पाहिलेली एक गोष्ट तुला सांगतों, ऐक – ॥३६॥ एके प्रसंगीं मंत्र्यांसहवर्तमान मी पर्वताच्या शिखरावर बसलों होतों. इतक्यांत, आकाशमार्गानें कोणीतरी राक्षस एका उत्तम स्त्रीला घेऊन चालला आहे, - असें आह्मांला दिसून आलें. - ॥ ३७ ॥ ती स्त्री 'रामा ! रामा !' अशा एकसारख्या हांका मारीत होती. आह्मी पर्वतावर आहों, असें पाहून तिनें लागलेच अलंकार उतरिले आणि आपल्या आंगावरील वस्त्रांत बांधून ॥ ३८ ॥ पुन्हां आमच्याकडे पाहून खालीं टाकून दिले. अद्याप तिचें ओरडणें चाललेंच होतें. शेवटीं तो राक्षस तिला घेऊन गेला. प्रभो, मी ते अलंकार

शृणु राम मया दृष्टं किंचित्ते कथयाम्यहम् ॥३६॥ एकदा मन्त्रिभिः सार्धं स्थितोऽहं गिरिमूर्धनि[1] ॥ विहायसा[2] नीयमानां केनचित्प्रमदोत्तमाम्[3] ॥ ३७ ॥ क्रोशन्ती रामरामेति दृष्ट्वा ऽस्मान्पर्वतोपरि ॥ आमुच्याभरणान्याशु स्वोत्तरीयेण भामिनी ॥ ३८ ॥ निरीक्ष्यांधः परित्यज्य क्रोशन्ती तेन रक्षसा ॥ नीता ऽहं भूषणान्याशु गुहायामक्षिपं[12] प्रभो ॥ ३९ ॥

राम, शृणु; अहं, मया किंचित् (मू.). ॥ ३६ ॥ (पू.) स्थितः अहं ॥ केनचित् (मू.) [अपश्यम्]. ॥ ३७ ॥ ' राम, राम, ' इति क्रोशन्ती भामिनी पर्वतोपरि अस्मान् दृष्ट्वा, आशु आभरणानि (मू.) [बध्वा] ॥३८॥ [पुनः अस्मान्] (पू.) ॥ नीता. प्रभो, (मू). ॥३९॥

---

१ पर्वताच्या शिखरावर. २ आकाशमार्गानें. ३ उत्तम स्त्रीला. ४ ओरडणारी. ५ स्त्री. ६ तत्काल. ७ अलंकार. ८ उतरून. ९ आपल्या आंगावरील वस्त्रानें. १० पाहून. ११ गुहेंत. १२ फेंकिता झालों.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लागलेच नेऊन गुहेंत ठेविले. ॥ ३९ ॥ आतां तूं ते पहा आणि तुझेच कीं नाहीं तें ओळख." असें ह्मणून त्या वानरानें ते अलंकार रामाला दाखविले. ॥ ४० ॥ रामानें ते सोडून पाहिले - तों ओळख पटली. - त्यानें तीं सर्व भूषणें आपल्या वक्षस्थलावर ठेविलीं व वारंवार 'हा सीते! हा सीते!' असें ह्मणून एखाद्या अज्ञान प्राण्याप्रमाणें रोदन करण्यास आरंभ केला. ॥ ४१ ॥ ह्यावेळीं कनिष्ठ बंधूनें—लक्ष्मणानें—रामाचें सांत्वन केलें : लक्ष्मण ह्मणाला :--' रामा! आतां जानकीची आपल्याला लवकरच भेट होईल. वानरराजाच्या साह्यानें आपण युद्धांत रावणाचा वध करूं, व त्या सुंदरीला - घेऊन येऊं. -' ॥ ४२ ॥ सुग्रीवही ह्मणाला :– ' रामा! मी तुला प्रतिज्ञापूर्वक सांगतों कीं, युद्धांत रावणाला मारून तुला जानकी

इदानीमपि पश्य त्वं जानीहि तव वा न वा ॥ इत्युक्त्वाऽऽनीय रामाय दर्शयामास वानरः॥ ४० ॥ विमुच्य रामस्तद्दृष्ट्वा हा सीतेति मुहुर्मुहुः ॥ हृदि निक्षिप्य तत्सर्वं रुरोद प्राकृतो यथा ॥ ४१ ॥ आश्वास्य राघवं भ्राता लक्ष्मणो वाक्यमब्रवीत् ॥ अचिरेणैव ते राम प्राप्यते जानकी शुभा ॥ वानरेन्द्रसहायेन हत्वा रावणमाहवे ॥ ४२ ॥ सुग्रीवोऽप्याह हे राम प्रतिज्ञां करवाणि ते ॥ समरे रावणं हत्वा तव दास्यामि जानकीम् ॥ ४३ ॥

त्वं (पू.) [इति च] जानीहि. ' ॥ वानरः (मू.). ॥ ४० ॥ रामः तत् विमुच्य, दृष्ट्वा, तत् सर्वं हृदि निक्षिप्य (मू.), रुरोद. ॥ ४१ ॥ लक्ष्मणः भ्राता राघवं (पू.) – ॥ 'राम, (मू.) रावणं हत्वा शुभा जानकी प्राप्यते. ' ॥ ४२ ॥ (पू.) – ' ते प्रतिज्ञां करवाणि; ॥ (मू.) दास्यामि. ' ॥ ४३ ॥

१ सोडून. २ ठेवून. ३ रडूं लागला. ४ युद्धांत. ५ मारून. ६ देईन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणून देईन.' ॥ ४३ ॥ नंतर, मारुतीनें त्यांच्याजवळ अग्नि प्रज्वलित केला. पुढें राम आणि सुग्रीव दोघांजणांनीं, अग्नि साक्षी असतां, ॥ ४४ ॥ निष्कपटपणें बाहू पसरून परस्परांस आलिंगन दिलें - व मित्र म्हटलें. - सुग्रीव रामाच्या शेजारीं बसला. ॥ ४५ ॥ नंतर, प्रेमभावास्तव त्यानें रघुवीराला आपला सर्व वृत्तांत सांगितला :- तो म्हणाला :- "मित्रा, माझा वृत्तांत ऐक. वालीनें काय काय केलें, - तें मी तुला सांगतों :- ॥ ४६ ॥ मयासुराचा पुत्र अत्यंत मदोन्मत्त मायावी नांवाचा एक दैत्य होता. त्यानें एकदां किष्किंधा नगरी-

ततो हनूमान्प्रज्वाल्य[1] तयोरग्निं समीपतः ॥ तावुभौ रामसुग्रीवावग्नौ साक्षिणि तिष्ठ[2]-
ति ॥ ४४ ॥ बाहू प्रसा[3]र्य चालिंग्य परस्परमकल्मषौ[4] ॥ समीपे रघुनाथस्य सुग्रीवः
समुपा[5]विशत् ॥ ४५ ॥ स्वो[6]दन्तं कथयामास प्र[7]णयाद्रघुनायके ॥ सखे शृणु
ममोदन्तं[8] वालिना यत्कृतं पुरा ॥ ४६ ॥ मयपुत्रोऽथ मायावी नाम्ना प[9]रम-
दुर्मदः ॥ किष्किन्धां समुपागत्य वालिनं समुपाह्वयत्[10] ॥ ४७ ॥

(पू.) अग्निं प्रज्वाल्य, ॥ ['सख्यं कुरुतं,' इति उवाच.] अकल्मषौ (४४ उ. ४५ पू.) ॥ [सखे, इति अवदताम्.] ॥ सुग्रीवः रघुनाथस्य (मू.), ॥ ४४ ॥ ४५ ॥ (पू.) कथयामास – "सखे, पुरा वालिना यत् कृतं, [तं] मम उदन्तं शृणु – ॥ ४६ ॥ अथ नाम्ना (४७ पू.) मयपुत्रः ॥ (४७उ.) महता सिंहनादेन समुपाह्वयत.

१ पेटवून. २ उभा असतां. ३ पसरून. ४ निष्पाप. ५ बसला. ६ स्वतांच्या वृत्तांताला. ७ प्रेमास्तव. ८ वृत्तांताला. ९ फार उन्मत्त. १० हांका मारूं लागला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जवळ येऊन मोठा सिंहनाद केला व वालीला युद्धास बोलाविलें. वालीला तो उपमर्द अगदीं सहन झाला नाहीं. क्रोधानें त्याचे डोळे लाल होऊन गेले. त्यानें बाहेर येऊन त्या दैत्याला एक दृढ मुष्टिप्रहार केला. ॥४७॥४८॥ त्या तडाक्याबरोबर दैत्याची गाळण उडाली. तो पळत पळत आपल्या गुहेंत गेला. वाली आणि मी दोघेजण त्या मायावी दैत्याच्या पाठीस लागलों होतों. पुढें, तो गुहेंत शिरला, असें पाहून त्वेषानें ॥४९॥ वाली मला ह्मणाला :–' तूं बाहेर उभा राहा. मी गुहेंत जातों.' इतकें सांगून वाली गुहेंत शिरला तो,

सिंहनादेन महता वाली तु तदमर्षणः ॥ निर्ययौ क्रोधताम्राक्षो जघान दृढमु-
ष्टिना ॥ ४८ ॥ दुद्राव तेन संविग्नो जगाम स्वगुहां प्रति ॥ अनुदुद्राव तं
वाली मायाविनमहं तथा ॥ ततः प्रविष्टमालोक्य गुहां मायाविनं रुषा ॥
॥ ४९ ॥ वाली मामाह तिष्ठ त्वं बहिर्गच्छाम्यहं गुहाम् ॥ इत्युक्त्वा ऽऽवि-
श्य स गुहां मासमेकं न निर्ययौ'' ॥ ५० ॥

तदमर्षणः क्रोधताम्राक्षः वाली तु (४८ मू.) जघान. ॥ ४७ ॥ ४८ ॥ तेन संविग्नः [सः] (मू.) जगाम. ॥ ततः वाली तं मायाविनं अनुदुद्राव, तथा अहं [अपि अनुदुद्राव]. मायाविनं गुहां प्रविष्टं आलोक्य रुषा ॥ ४९ ॥ (मू.) – ' त्वं बहिः तिष्ठ; अहं गुहां गच्छामि. ' सः इति उक्त्वा, गुहां आविश्य एकं (मू.)! ॥ ५० ॥

१ तें सहन न करणारा. २ क्रोधानें लाल डोळे ज्याचे, असा. ३ बळकट मुठीनें. ४ मारिता झाला. ५ पीडित. ६ पळाला. ७ गेला. ८ मागें धांवला. ९ मागें धांवलों. १० क्रोधानें. ११ बाहेर आला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

‘ मी थोडा वेळ राज्य केलें.’

एक महिना झाला तरी, बाहेर आला नाहीं ! ॥९०॥ महिना लोटल्यावर पुढें त्या गुहेच्या मुखांतून पुष्कळसें रक्त बाहेर आलें ! तें दृष्टीस पडतांच, वाली मेला, असें वाटून मला पराकाष्ठेचें दुःख झालें; माझें सर्वांग तप्त होऊन गेलें. ॥ ९१ ॥ मग मी गुहेच्या द्वारावर एक मोठी थोरली शिळा ठेवून घरीं आलों, आणि अर्थातच लोकांना सांगूं लागलों कीं, ‘ वाली मरण पावला ! त्याला गुहेंत राक्षसानें मारिलें ! ’ ॥ ९२ ॥ तें ऐकून सर्वांना दुःख झालें. पुढें, माझी इच्छा नव्हती तरी, सगळ्या वानरप्रधानमंडळानें मला राज्याभिषेक केला. ॥९३॥हे शत्रुनाशना, त्या वेळीं कांहीं कालपर्यंत मी राज्य चालविलें. नंतर कित्येक दिवसांनीं वाली आला !

मासादूर्ध्वं गुहाद्वारान्निर्गतं रुधिरं बहु ॥ तद्दृष्ट्वा परितप्तांगो मृतो वालीति दुःखितः ॥५१॥ गुहाद्वारि शिलामेकां निधाय गृहमागतः ॥ ततोऽब्रवं मृतो वाली गुहायां रक्षसा हतः ॥५२॥ तच्छ्रुत्वा दुःखिताः सर्वे मामनिच्छन्तमप्युत ॥ राज्येऽभिषेचनं चक्रुः सर्वे वानरमन्त्रिणः ॥ ५३ ॥ शिष्टं तदा मया राज्यं किंचित्कालमरिन्दम ॥ ततः समागतो वाली मामाह परुषं रुषा ॥ ५४ ॥

(पू.) [1]रुधिरं [2]निर्गतं ! ॥ (मू.) [निश्चयेन] दुःखितः परितप्तांगः ॥ ९१ ॥ [अहं] गुहाद्वारि एकां. (मू.) वाली मृतः, [इति ज्ञातीन्] [3]अब्रवम् ॥ ९२ ॥ सर्वे तत् श्रुत्वा दुखिताः. सर्वे वानरमंत्रिणः अनि[4]च्छन्तं अपि मां (मू.). ॥ ९३ ॥ अरि[5]दम, तदा मया किंचित्कालं राज्यं [6]शिष्टं. ॥ (मू.) [7]पौरुषं आह. ॥ ९४ ॥

१ रक्त. २ बाहेर आलें. ३ ह्मणालों. ४ न इच्छिणाऱ्या. ५ शत्रूंचा निग्रह करणारा, अज्ञा. ६ पालन केलें. ७ कठोर.

॥ ७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यानें क्रुद्ध होऊन मजवर अपशब्दांची वृष्टि केली; ॥ ५४ ॥ व अनेक प्रकारें धिक्कार करून शेवटीं मुष्टींनीं मला यथेच्छ ताडन केलें. तेव्हां मी नगरांतून बाहेर निघालों व अत्यंत भीतीस्तव सैरावैरां धांवत सुटलों. ॥ ५५ ॥ सगळ्या लोकांत फिरलों - तरी निर्भय स्थल कोठेंच सांपडेना; जेथें तेथें वाली येईल ह्या भीतीस्तव मनाला अस्वस्थता ! - शेवटीं ह्या ऋष्यमूक पर्वतावर येऊन राहिलों. प्रभो रामचंद्रा, ऋषीच्या शापभयामुळें तो (वाली) ह्या पर्वतावर अगदीं येत नाहीं. ॥ ५६ ॥ तेव्हांपासून माझ्या पत्नीचा उपभोग तोच स्वतां घेत असतो ! त्याच्या बुद्धीला पूर्णपणें भ्रंश झाला आहे ! अशा एकंदर कारणांमुळें मी नित्य दुःखानें संतप्त असतों ! - मला कांहीं सुचत नाहीं ! काय करूं ! दुष्टानें माझी - बायको घेतली व आश्रयही नाहींसा

बहुधा [1]भर्त्सयित्वा मां निजघान च मुष्टिभिः ॥ ततो निर्गत्य नगराद्धावं
परया भिया ॥ ५५ ॥ लोकान् सर्वान्परिक्रम्य ऋष्यमूकं समाश्रितः ॥ ऋषेः
शापभयात्सो ऽपि नायातीमं गिरिं प्रभो ॥ ५६ ॥ तदादि मम भार्यां स स्वयं
भुंक्ते विमूढधीः ॥ अतो दुःखेन संतप्तो हृतदारो हृताश्रयः ॥ ५७ ॥

मां (पू.) निजघान. ॥ ततः [अहं] परया भिया नगरात् (मू.). ॥ ५५ ॥ (पू.). ॥ प्रभो, सः अपि (मू.) न आयाति. ॥ ५६ ॥ विमूढधीः सः (मू.) ॥ ५७ ॥

---

१ धिक्कार करून. २ मारिता झाला. ३ अत्यंत. ४ भीतीनें. ५ बाहेर पडून. ६ पळालों. ७ फिरून. ८ येतो. ९ अति मोहांत पडली बुद्धि ज्याची, असा. १० हरून घेतली स्त्री ज्याची, असा. ११ दूर केला आधार ज्याचा, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो.
समू-सान्त्व.
साहेप्पण.
॥ ८ ॥

केला ! ॥ ९७ ॥ - रामा ! अशा कष्टस्थितींत - मी येथें राहत असतों. आज तुझ्या चरणाचा समागम घडल्यामुळें मी परम सुखी झालों. " कमलनयन रामचंद्राला मित्राचें दुःख पाहून - अतिशय वाईट वाटलें; - त्यांचें सर्वांग तप्त होऊन गेलें. ॥ ९८ ॥ त्यानें तत्क्षणीं सुग्रीवाच्या अग्रभागीं प्रतिज्ञा केली कीं, ' मी तुझ्या स्त्रीचा अपहार करणाऱ्या शत्रूचा लवकरच नाश करीन. ' ॥ ९९ ॥ ह्यावर सुग्रीव ह्मणाला :— ' राजाधिराजा रामचंद्रा ! वाली - ह्मणजे सामान्य नव्हे, - मोठमोठ्या बलाढ्य पुरुषांना देखील भारी आहे! फार तर काय, देवांना देखील त्याचा निग्रह करणें कठिण पडेल ! त्याला तूं मारशील कसा ? ॥ ६० ॥ तूंसुद्धां महाबलाढ्य आहेस. पण, त्याच्या शक्तीबद्दल एक गोष्ट सांगतों, तेवढी ऐकून घे :—

वसाम्यद्य भवत्पादसंस्पर्शात्सुखितो ऽस्म्यहम् ॥ मित्रदुःखेन संतप्तो रामो राजीवलोचनः ॥५८॥ हनिष्यामि तव द्वेष्यं शीघ्रं भार्यापहारिणम् ॥ इति प्रतिज्ञामकरोत्सुग्रीवस्य पुरस्तदा ॥५९॥ सुग्रीवो ऽप्याह राजेन्द्र वाली बलवतां बली ॥ कथं हनिष्यति भवान्देवैरपि दुरासदम् ॥ ६० ॥ शृणु ते कथयिष्यामि तद्बलं बलिनां वर ॥ कदाचिद्दुन्दुभिर्नाम महाकायो महाबलः ॥ ६१ ॥

अहं [अत्र] (पू.). " ॥ (मू.) रामः ॥५८॥ '(पू.) द्वेष्यं शीघ्रं हनिष्यामि,' ॥ (मू.) तदा अकरोत्. ॥ ५९ ॥ (मू.) ! [तं] कथं हनिष्यति ? ॥६०॥ बलिनांवर, (पू.) कथयिष्यामि. ॥ (मू.) ॥६१॥

१ राहतों. २ तुझ्या चरणाच्या स्पर्शेकरून. ३ शत्रूला. ४ मारीन. ५ स्वाधीन करून घेण्यास कठीण, अशा. ६ मारील. ७ मोठें शरीर ज्याचें, असा.

किष्किं-कां.
सर्ग १
वालीला मारण्याची प्रतिज्ञा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुंदुभि नांवाचा एक महाशक्तिमान् दैत्य होऊन गेला. त्याचें शरीर फारच प्रचंड होतें. एकदां तो ॥ ६१ ॥ मोठें थोरलें रेड्याचें रूप धारण करणारा भयंकर दैत्य किष्किंधानगरीस आला आणि वालीला युद्धासाठीं हांका मारूं लागला. रामा, ही रात्रीची वेळ होती; ॥६२॥ पण, ती हांक कानीं आल्याबरोबर वालीच्यानें राहवेना ! त्याचा स्वभाव अतिशय संतापी आहे. त्यानें लागलेंच - बाहेर येऊन - रेड्याचीं शिंगें धरिलीं, त्याला भूमीवर आपटलें, ॥ ६३ ॥ एक पाय त्याच्या आंगावर दिला, हातांनीं त्याचें प्रचंड मस्तक पिळवटून तोडिलें, आणि - कितीसें जड आहे तें - तोलून पाहून पृथ्वीवर फेंकून दिलें ! ! ॥ ६४ ॥ तें शिर मातंगाच्या आश्रमाजवळ पडलें. रामा ! - त्यानें सहज लीलेनेंच फेंकलें तरी पण तें (मस्तक) भूमीवर आपटल्याबरोबर

किष्किन्धामगमद्राम महामहिषरूप[1]धृक् ॥ युद्धाय वालिनं रात्रौ समाह्वयत[2] भीषणः ॥ ६२ ॥ तच्छ्रुत्वा ऽसहमानो ऽसौ वाली परम[3]कोपनः ॥ महिषं शृंगयोर्धृत्वा पातयामास[4] भूतले ॥ ६३ ॥ पादेनैकेन तत्काय[5]मा[6]क्रम्यास्य शिरो महत् ॥हस्ताभ्यां भ्रा[7]मयं[8]श्छित्वा तो[9]लयित्वा ऽक्षिपद्भुवि[10] ॥६४॥ पपात[12] तच्छिरो राम मातंगा[11]श्रमसन्निधौ ॥

(मू.) [असुरः] किष्किंधां अगमत्; रात्रौ युद्धाय वालिनं समाव्हयत. ॥ ६२ ॥ (पू.) वाली ॥ (मू.) पातयामास ! ॥६३॥ एकेन (पू.) शिरः ॥ (मू.) अक्षिपत् ! ॥ ६४ ॥ राम, (पू.) पपात. ॥

१ मोठें रेड्याचें रूप धरणारा. २ बोलाविता झाला. ३ फार रागीट. ४ पाडता झाला. ५ त्याच्या शरीराला. ६ वर पाय देऊन. ७ फिरविणारा. ८ तोडून. ९ तोलून. १० फेंकिता झाला. ११ मातंग ऋषीच्या आश्रमाजवळ. १२ पडलें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वालीला ऋषीच्या शापाचें कारण.

चेंडूसारखें आकाशांत - चार कोस उंच उडालें व तेथून पुन्हां खालीं मुनींच्या आश्रमस्थानीं पडलें. ॥६९॥ उंचावर गेल्यामुळें त्या मस्तकांतून खालीं रक्ताचा पाऊस पडला! तें पाहून मातंगमुनि अत्यंत क्रोधाविष्ट झाले; व त्यांनीं वालीला निक्षून सांगितलें कीं, 'इतउत्तर जर तूं माझ्या पर्वतावर आलास, तर मस्तक तुटून मरण पावशील! ह्यांत अन्यथा होणार नाहीं!' असा शाप मिळाला, तेव्हांपासून तो (वाली) ऋष्यमूक पर्वतावर अगदीं येत नाहीं. ॥ ६६ ॥ ६७ ॥ हें जाणूनच मी तरी येथें निर्भयपणें राहत असतों. रामा, तें पहा त्या दुंदुभीचें पर्वतासारखें शिर पडलें आहे! ॥६८॥ तें फेंकून देण्याचें तुजमध्यें सामर्थ्य असेल, तर तूं वालीचा

योजनात्पतितं तस्मान्मुनेराश्रममण्डले ॥ ६५ ॥ रक्तवृष्टिः पपातोच्चैर्दृष्ट्वा तां क्रोधमूर्च्छितः॥मातंगो वालिनं प्राह यद्यागन्तासि मे गिरिम् ॥ ६६ ॥ इतः परं भग्नशिरा मरिष्यसि न संशयः ॥ एवं शप्तस्तदारभ्य ऋष्यमूकं न यात्यसौ ॥ ६७ ॥ एतज्ज्ञात्वा ऽहमप्यत्र वसामि भयवर्जितः ॥ राम पश्य शिरस्तस्य दुन्दुभेः पर्वतोपमम् ॥ ६८ ॥ तत्क्षेपणे यदा शक्तः शक्तस्त्वं वालिनो वधे॥

[यस्मात्,] योजनात् [ऊर्ध्वदेशात्] (मू.) पतितं, तस्मात् ॥ ६५ ॥ उच्चैः (पू.) दृष्ट्वा क्रोधमूर्च्छितः (बा. ६६ उ.) – ' इतः परं यदि मे गिरिं आगंतासि, [तर्हि] (बा. ६७ पू.) ' ॥ एवं शप्तः असौ (मू.) न याति. ॥ ६६ ॥ ६७ ॥ (पू.) [सन्] अत्र वसामि. ॥ (मू.) शिरः पश्य. ॥ ६८ ॥ त्वं (पू.), [तदा] वालिनः वधे शक्तः. ॥

१ मोठ्यानें. २ येशील. ३ तुटलें मस्तक ज्याचें, असा. ४ शापलेला. ५ तें फेंकण्याविषयीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वध करूं शकशील." असें ह्मणून सुग्रीवानें रामाला तें पर्वतासारखें प्रचंड शिर दाखविलें. ॥ ६९ ॥ रामानें तें पाहिल्याबरोबर, हांसून, पायांच्या अंगठ्यानें सहज दहा योजनें लांब झुगारून दिलें ! तो एक विलक्षणच प्रकार झाला. ॥ ७० ॥ ह्यावेळीं प्रधानांसह सुग्रीवानें 'वाहवा ! शाबास !' असे उद्गार काढिले. शेवटीं सुग्रीव पुन्हां त्या भक्तवत्सल रामचंद्राला ह्मणाला :– ॥ ७१ ॥ 'रघुवीरा ! हे पहा, मोठे थोरले सात ताल आहेत; ह्यांना वाली एकएकाला हालवून सहज निष्पत्र करून टाकितो (हालवून ह्यांचीं सगळीं पानें खालीं पाडितो !) ॥ ७२ ॥ जर तूं एका बाणानें ह्यांना वेधून छिद्र पाडशील, तर

इत्युक्त्वा दर्शयामास शिरस्तद्गिरिसंनिभम् ॥ ६९ ॥ दृष्ट्वा रामः स्मितं कृत्वा पादांगुष्ठेन चाक्षिपत् ॥ दशयोजनपर्यन्तं तदद्भुतमिवाभवत् ॥ ७० ॥ साधु साध्विति संप्राह सुग्रीवो मन्त्रिभिः सह ॥ पुनरप्याह सुग्रीवो रामं भक्तपरायणम् ॥ ७१ ॥ एते ताला महासाराः सप्त पश्य रघूत्तम ॥ एकैकं चालयित्वाऽसौ निष्पत्रान्कुरुतेऽञ्जसा ॥ ७२ ॥ यदि त्वमेकबाणेन विध्वा छिद्रं करोषि चेत् ॥

(मू.) शिरः दर्शयामास. ॥ ६९ ॥ रामः (पू.) दशयोजनपर्यंतं अक्षिपत्; (मू.). ॥ ७० ॥ (पू.) 'साधु, साधु,' इति संप्राह. ॥ सुग्रीवः (मू.) रामं पुनः अपि आह – ॥ ७१ ॥ 'रघूत्तम, पश्य; (पू.) तालाः. ॥ असौ (मू.) कुरुते. ! ॥ ७२ ॥ (पू.) [सप्तसु] छिद्रं करोषि चेत्, ॥

१ पर्वतासारखें. २ हालवून. ३ पर्णरहित. ४ वेधून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामानें ताड तोडिले.

तुझ्या हातून वाली मेलाच, असा मला विश्वास येईल.' रामानें 'बरें' ह्मणून धनुष्य घेतलें व त्याच्यावर बाण जोडिला. ॥ ७३ ॥ आणि तत्काल त्या महासमर्थ रघुवीरानें सात तालांवर संधान धरून बाण सोडिला. तो बाण सातही तालांचा भेद करून व पर्वताला आणि भूमीला लागून ॥ ७४ ॥ पुन्हां रामाच्या भात्यामध्यें पूर्वीप्रमाणें येऊन राहिला. तेव्हां सुग्रीवाला पराकाष्ठेचा विस्मय वाटला. तो अत्यंत आनंदानें रामाला ह्मणाला :– ॥ ७५ ॥ "देवा, तूं त्रैलोक्याधिपति साक्षात् परमेश्वर आहेस, ह्यांत संशय नाहीं. मी पूर्व जन्मीं अपरिमित पुण्य केलें असावें; ह्मणूनच आज मला तुझा समागम घडत आहे. ॥ ७६ ॥

हतस्त्वया तदा वाली विश्वासो मे प्रजायते[1] ॥ तथेति धनुरादाय[2] सायकं तत्र संदधे ॥७३॥ बिभेद[3] च तदा रामः सप्त तालान्महाबलः ॥ तालान्सप्त विनिर्भिद्य[5] गिरिं भूमिं च सायकः[4] ॥ ७४ ॥ पुनरागत्य रामस्य तूणीरे[6] पूर्ववत्स्थितः॥ ततोऽतिहर्षात्सुग्रीवो राममाहातिविस्मितः ॥ ७५ ॥ देव त्वं जगतां नाथः परमात्मा न संशयः ॥ मत्पूर्वकृतपुण्यौघैः[7] संगतो ऽद्य मया सह ॥ ७६ ॥

तदा त्वया वाली हतः [इति] मे (द्वि.). ' ॥ [रामः] (मू.). ॥७३॥ तदा महाबलः (पू.) बिभेद[3] च. ॥ सायकः सप्त (मू.) विनिर्भिद्य, ॥७४॥ (मू.) [सन्] रामं आह–॥७५॥ ' (मू.) संगतः. ॥७६॥

१ उत्पन्न होईल. २ घेऊन. ३ तोडिता झाला. ४ बाण. ५ भेद करून. ६ भात्यांत. ७ मी पूर्वी केलेल्या पुण्याच्या ओघेंकरून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामा ! महान् महान् साधु संसाराची निवृत्ति व्हावी एवढ्यासाठीं तुझी सेवा करितात. तूं मोक्षाचा केवळ सचिव आहेस(जशी राजाची भेट सचिवाच्या द्वारें व्हावयाची, तशी मोक्षप्राप्ति तुझ्या द्वारें व्हावयाची). अशा महासमर्थ पुण्य पुरुषाचें(तुझें)दर्शन झालें असतां, - मी त्याज(तुज)पाशीं क्षुद्र संसारसुख मागावें कसें ? ॥७७॥ स्त्री, पुत्र, द्रव्य, राज्य हें सर्व तुझ्या मायेनें उत्पन्न केलें आहे. ह्मणून, देवाधिदेवा, मी तुझ्याजवळ दुसरें कांहीं मागत नाहीं. मजवर नित्य कृपादृष्टि असूं दे, - ह्मणजे झालें. - ॥७८॥ हे साधूंच्या पालका! आनंदस्वरूपाचा अनुभव हें तुझें रूप होय. एखादा मनुष्य मातीसाठीं भूमि खणीत असावा आणि त्याला द्रव्याचा ठेवा सांपडावा, त्याप्रमाणें महद्भाग्यामुळें मला आज तुझें दर्शन मिळालें ! ॥७९॥ अनादि अविद्येपासून उत्पन्न झालेलें आमचें

त्वां भजान्ति महात्मानः सं[1]सारविनिवृत्तये ॥ त्वां प्राप्य मोक्षसचि[2]वं प्रार्थये ऽहं कथं भवम् ॥७७॥ दा[5]राः पुत्रा धनं राज्यं सर्वं त्वन्मायया कृतम् ॥ अतो ऽहं देवदेवेश नाकांक्षे ऽन्यत्प्रसीद मे ॥ ७८ ॥ आनन्दानुभवं त्वा ऽद्य प्राप्तो ऽहं [8]भाग्यगौरवात् ॥ [9]मृदर्थं य[10]तमानेन नि[11]धानमिव सत्पते ॥ ७९ ॥ अनाद्यवि-द्यासंसिद्धं बन्धनं छिन्नमद्य नः ॥ य[12]ज्ञदानतपःकर्मपूर्तेष्टादिभिरप्यसौ ॥ ८० ॥

(पू.)त्वां भजन्ति.॥अहं मो[2]क्षसचिवं त्वां प्राप्य भ[3]वं कथं प्रा[4]र्थये ? ॥७७॥ देवदेवेश,(मू.)न [6]आकांक्षे: मे प्र[7]सीद॥७८॥सत्पते, अहं अद्य(मू.),प्राप्तः ! ॥७९॥नः अद्य(८०पू.).॥प्रभो, असौ संसृतिः(मू.)॥८०॥

१संसार दूर होण्यासाठीं.२मोक्ष देणाऱ्या.३संसाराला.४मागतों.५बायको.६इच्छितों.७प्रसन्न हो ८दैवाच्या मोठेपणामुळें.९मातीसाठीं. १०यत्न करणारानें.११ठेवा. १२ यज्ञ, दान, तपश्चर्या हीं कर्मैं किंवा विहिरी, धर्मशाळा देवालयें वगैरे बांधणें इत्यादिकांच्यायोगानें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'माझें मन तुझ्या पदीं राहो.'

विषयवासनारूप संसारबंधन आज तुटून गेलें. प्रभो ! यज्ञ, दानें, तपश्चर्या, इष्टापूर्तादि अनेक कर्मं किती जरी केलीं, तथापि हें संसारबंधन कांहीं क्षीण होत नाहीं, उलट पुन्हां अधिकाधिक दृढ होत जातें. तुझ्या चरणाचें दर्शन झालें ह्मणजे मात्र तें नाश पावतें, ह्यांत संशय नाहीं. ॥ ८० ॥ ॥ ८१ ॥ अज्ञान हें सर्व अनर्थांचें मूल होय : ज्या मनुष्याचें अंतःकरण निदान अर्धाक्षण तरी तुझ्या ठिकाणीं स्थिर राहतें, त्याचें अज्ञान तत्काळ नाहींसें होतें. ॥ ८२ ॥ ह्मणून, रामा, माझें मन तुझ्या स्वरूपीं निरंतर लागो; त्यानें दुसऱ्या कोठेंही गुंतूं नये.॥८३॥ ज्याची वाणी 'राम, राम' ह्या मधुर नामाचा क्षणमात्र तरी जप करिते, तो ब्रह्महत्या किंवा मद्यप्राशन करणारा (महापातकी) असला तथापि सर्व पापांपासून मुक्त होतो. ॥८४॥

न जीर्यते[1] पुनर्दार्ढ्यं[2] भजते संसृतिः प्रभो ॥ त्वत्पाददर्शनात्सद्यो नाशमेति[3] न संशयः ॥८१॥ क्षणार्धमपि यच्चित्तं त्वयि तिष्ठत्यचञ्चलम् ॥ तस्याज्ञानमनर्थानां मूलं नश्यति तत्क्षणात् ॥ ८२ ॥ तत्तिष्ठतु मनो राम त्वयि नान्यत्र मे सदा ॥ ॥ ८३ ॥ रामरामेति यद्वाणी मधुरं गायति क्षणम् ॥ स ब्रह्महा[4] सुरापो[5] वा मुच्यते[6] सर्वपातकैः ॥ ८४ ॥

(मू.). ॥ ८१ ॥ यच्चित्तं (पू.) तिष्ठति, ॥ (मू.) अज्ञानं तत्क्षणात् नश्यति. ॥ ८२ ॥ तत्, राम, मे मनः सदा त्वयि तिष्ठतु; न अन्यत्र. ॥ ८३ ॥ यद्वाणी मधुरं (पू.) गायति, ॥ (मू.) मुच्यते.॥८४॥

१ जीर्ण होत्ये. २ बळकटपणास. ३ पावत्ये. ४ ब्रह्महत्या करणारा. ५ मद्य पिणारा. ६ सोडिला जातो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामा, मला शत्रुजयाची इच्छा नाहीं. तसेंच स्त्रीसुख वगैरे कांहीं नलगे; संसारबंधनांतून सोडविणारी केवळ तुझी नित्य भक्ति घडावी, एवढीच माझ्या मनाची इच्छा आहे. ॥ ८५ ॥ रघुवीरा ! मी तरी तुझाच अंशरूपी आहें. तुझ्या मायेनें माझ्या मार्गे हा संसारपाश लावून दिला आहे. म्हणून तूं आपल्या चरणाविषयीं मला भक्ति देऊन ह्या संसाररूपी भयंकर मार्गांतून पार पाड. ॥ ८६ ॥ पूर्वी जोंपर्यंत माझ्या अंतःकरणाला मायेनें वेष्टिलें होतें, तोंपर्यंत मला ' हा आपला मित्र, हा शत्रु, हा उदासीन ' असें वाटत होतें. पण, रामा ! आतां तुझ्या चरणाचें दर्शन झाल्याबरोबर ॥ ८७ ॥ सर्व ब्रह्ममयच दिसूं लागलें ! मला मित्र आहे कोठें आणि शत्रु तरी कोठें आहे ? जोंपर्यंत प्राणी तुझ्या मायेनें बांध-

न कांक्षे ऽरिजयं[1] राम न च दारसुखादिकम् ॥ भक्तिमेव सदा कांक्षे त्वयि बन्धविमोचनीम्[2] ॥८५॥ त्वन्मायाकृतसंसारस्त्वदंशो ऽहं रघूत्तम ॥ स्वपादभक्तिमादिश्य[3] त्राहि[4] मां भवसंकटात् ॥८६॥ पूर्वं मित्रार्युदासीनास्त्वन्मायावृतचेतसः[5] ॥ आसन्मे ऽद्य भवत्पाददर्शनादेव राघव ॥ ८७ ॥ सर्वं ब्रह्मैव मे भाति क मित्रं क च मे रिपुः ॥ यावत्त्वन्मायया बद्धस्तावद्गुणविशेषता ॥ ८८ ॥

राम, [अहं] (पू.) च न काङ्क्षे; ॥ (मू.) भक्तिं एव सदा काङ्क्षे. ॥ ८५ ॥ रघूत्तम, (पू.) त्वदंशः ॥ [अस्मि अतः] मां (मू.) त्राहि. ॥८६॥ राघव, पूर्वं त्वन्मायावृतचेतसः मे (मू.).॥८७॥८८॥

१ इच्छितों. २ बंधनांतून सोडविणाऱ्या. ३ आदिश्य उपदेश करून (देऊन). ४ रक्षण कर. ५ तुझ्या मायेनें वेष्टिलें मन ज्याचें, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'रामा, माया दूर कर.'

लेला असतो, तोंपर्यंत त्याच्यावर सत्त्वादि भिन्न भिन्न गुणांचा पगडा चालतो; ॥ ८८ ॥ तो चालला असेल तितका वेळ शत्रु, मित्र, उदासीन असा भेदभाव असतो, तो (गुणांचा पगडा) नाहींसा झाला कीं भेदबुद्धि गेलीच. अज्ञानामुळें उद्भवलेली ही भेदबुद्धि आहे तावत्काल मृत्यूचें भय आहे : ॥ ८९ ॥ ह्मणून, जो मनुष्य अविद्येच्या भजनीं लागला, तो गाढ अंधकारांत पडावयाचाच. हा पुत्र, स्त्रिया इत्यादि पाश तरी मायामूलकच होय. ती माया तुझी दासी आहे. एवढ्यासाठीं, रघुवीरा, - मी तुजपाशीं ही मागणी मागतों कीं, - ती माया दूर कर. ॥ ९० ॥ माझ्या मनाचा तुझ्या चरणकमलीं लय लागो; वाणी तुझ्या नामांचें

सा यावदस्ति नानात्वं तावद्भवति नान्यथा ॥ यावन्नानात्वमज्ञानात्तावत्काल[1]कृतं भयम् ॥८९॥ अतो ऽविद्यामुपास्ते यः सो ऽन्धे तमसि[2] मज्जति[3] ॥ मायामूलमिदं सर्वं पुत्रदारादिबन्धनम् ॥ अतोत्सारय[4] मायां त्वं दासीं तव रघूत्तम ॥ ९० ॥ त्वत्पादपद्मार्पितचित्तवृत्ति[5]स्त्वन्नामसंगीतकथासु[6] वाणी ॥ त्वद्भक्तसेवातिरतौ[7] करौ मे त्वदंगसंगं लभतां मदंगम्[8] ॥ ९१ ॥

(पू.) नानात्वं भवति; न अन्यथा. ॥ अज्ञानात् (मू). ॥ ८९ ॥ अतः यः (पू.) ॥ द्वि.) माया-मूलं. ॥ अतः रघूत्तम, त्वं तव दासीं मायां उत्सारय. (मू.). ॥ ९० ॥ अहं (पू.) [भूयासं.] वाणी त्वन्नामसंगीतकथासु [तिष्ठतु.] ॥ मे करौ त्वद्भक्तसेवातिरतौ [भूयास्तां.] मदङ्गं (मू.). ॥९१॥

१ मृत्यूनें केलेलें. २ अंधकारांत. ३ बुडतो. ४ दूर कर. ५ तुझ्या चरणकमलीं ठेविली चित्तवृत्ति ज्यानें, असा. ६ तुझ्या नामरूपी गायनानें युक्त कथांचे ठिकाणीं. ७ राहो. ८ माझें अंग.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि सुस्वर कथांचें गायन करो; हात तुझ्या भक्तांची सेवा करण्यांत अत्यंत तत्पर राहोत; माझ्या शरीराला तुझा अंगसंग मिळो; ॥ ९१ ॥ नेत्रांना तुझ्या मूर्तीचें, भक्तांचें आणि स्वतांच्या गुरूचें दर्शन घडो; कर्णांनीं नित्य तुझीं अवतारचरित्रें ऐकावीं; चरणांनीं नेहमीं तुझ्या मंदिरीं गमन करावें; ॥ ९२ ॥ हे गरुडध्वजा, माझे अवयव तुझ्या चरणधूलीनें मिश्र झालेलीं तीर्थें धारण करोत; व मस्तक तुझ्या चरणाला निरंतर प्रणाम करो. - तुझ्या चरणांचें माहात्म्य किती वर्णावें, - शंकर, ब्रह्मा इत्यादि मोठेमोठे देव त्यांची सेवा करितात !" ॥ ९३ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे किष्किंधाकाण्डे प्रथमः सर्गः ॥ १ ॥

- शंकर ह्मणतात :– पार्वति, - रामाला कळून आलें कीं, स्वतांच्या (रामाच्या) शरीराचें आलिंगन घड-

त्वन्मूर्तिभक्तान् स्वगुरुं च चक्षुः पश्यत्वजस्रं संशृणोतु कर्णः ॥ त्वज्जन्मकर्माणि च [3]पादयुग्मं व्रजत्वजस्रं तव मन्दिराणि ॥ ९२ ॥ अंगानि ते [6]पादरजोविमिश्रतीर्थानि [7]बिभ्रत्वहिशत्रुकेतो ॥ शिरस्त्वदीयं [8]भवपद्मजाद्यैर्जुष्टं[9] पदं राम नमत्वजस्रम् ॥९३॥ इति किष्किन्धाकाण्डे प्रथमः सर्गः ॥१॥ इत्थं [11]स्वात्मपरिष्वंगनिर्धूताशेषकल्मषम् ॥ रामः सुग्रीवमालोक्य सस्मितं वाक्यमब्रवीत् ॥ १ ॥

[1]चक्षुः (पू.) [2]पश्यतु. कर्णः त्वज्जन्मकर्माणि संशृणोतु. (मू.) [4]व्रजतु. ॥९२॥ [5]अहिशत्रुकेतो राम, (मू.) [10]नमंतु.' ॥९३॥ इति रामायणान्वये किष्किन्धाकाण्डे प्रथमः सर्गः ॥१॥ रामः सुग्रीवं (बा. १ मू.)

---

१ नेत्र. २ पाहो. ३ चरणद्वय. ४ जावो. ५ सर्पाचा शत्रु. (गरुड) आहे ध्वजावर ज्याच्या, अशा. ६ पायधुळीनें मिसळलेल्या तीर्थांप्रत. ७ बिभ्रतु धारण करो. ८ शंकर ब्रह्मदेव इत्यादिकांनीं. ९ सेविलेल्या. १० वंदन करो. ११ आपल्या शरीराच्या आलिंगनामुळें नाहींशीं झालीं सर्व पापें ज्याचीं, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'लोक मला नांवें ठेवतील!'

त्यामुळें सुग्रीवाचीं अखिल पातकें नष्ट झालीं; ह्मणूनच त्याच्या मुखांतून असे - महाज्ञान्यासारखे उद्गार निघत आहेत. - परंतु त्याच्या मनांत पुढील कार्यसिद्धीसाठीं सुग्रीवावर स्वतांचें मोहकारक मायाजाल पसरावयाचें होतें. एवढ्याकरितां तो हांसत हांसत सुग्रीवाला ह्मणाला :– "मित्रा, तूं माझ्याविषयीं आतां जें कांहीं बोललास, तें अगदीं अक्षरशः खरें आहे; ह्यांत संशय नाहीं. ॥ १ ॥ २ ॥ परंतु, लोक मला असें ह्मणूं लागतील कीं, 'रामचंद्रानें अग्नीला साक्षी ठेवून वानरराजाशीं सख्य केलं, - त्याचा उपयोग तो काय? - त्यानें सुग्रीवाचें कोणतें कार्य साधिलें?' ॥ ३ ॥ असा मजबद्दल लोकापवाद उत्पन्न होईल, ह्याबद्दल अगदीं संदेह नको. ह्मणून, तूं जाऊन वालीला युद्धास बोलाव. तुझें कल्याण असो. ॥ ४ ॥

मायां मोहकरीं तस्मिन्वितन्वन् कार्यसिद्धये ॥ सखे त्वदुक्तं यत्तन्मां सत्यमेव न संशयः ॥२॥ किंतु लोका वदिष्यन्ति मामेवं रघुनन्दनः ॥ कृतवान्किं कपीन्द्राय सख्यं कृत्वा ऽग्निसाक्षिकम् ॥ ३ ॥ इति लोकापवादो मे भविष्यति न संशयः ॥ तस्मादाव्हय भद्रं ते गत्वा युद्धाय वालिनम् ॥ ४ ॥

कार्यसिद्धये तस्मिन् मोहकरीं[1] मायां वितन्वन्[2] [सन्] सस्मितं वाक्यं अब्रवीत् – " सखे यत् मां त्वदुक्तं[3], तत् (बा. २ मू.); ॥ १ ॥ २ ॥ (पू.) एवं वदिष्यन्ति[4] – ' रघुनन्दनः ॥ अग्निसाक्षिकं सख्यं कृत्वा, कपीन्द्राय[5] किं कृतवान्?' ॥ ३ ॥ (पू.). ॥ तस्मात् ते भद्रं, वालिनं गत्वा युद्धाय आव्हय[6]. ॥ ४ ॥

१ मोह घालणाऱ्या. २ पसरणारा. ३ तूं ह्मटलेलें. ४ ह्मणतील. ५ वानरांच्या राजासाठीं. ६ बोलाव.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मी एकाच बाणानें त्याचा वध करून तुला राज्याभिषेक करवीन." सुग्रीव 'बरें, तसें कां होईना.' असें ह्मणून लागलाच किष्किंधेच्या उपवनांत गेला, ॥५॥ व मोठी सिंहनादासारखी गर्जना करून वालीला हांका मारूं लागला. भावाचा शब्द कानीं पडतांच वालीनें क्रुद्ध होऊन डोळे तांबारले ! ॥ ६ ॥ तत्क्षणीं तो घरांतून बाहेर पडून, सुग्रीव वानर होता, त्याठिकाणीं आला. वाली आंगावर येत आहे, - असें पाहून - सुग्रीवानें लागलाच त्याच्या वक्षःस्थलावर प्रहार केला. ॥ ७ ॥ तेव्हां वालीला इतका क्रोध आला कीं त्या आवेशांत तो देहभान विसरला त्यानेंही सुग्रीवावर दोन्ही मुष्टींचे प्रहार चालविले. सुग्रीवानेंही तोच क्रम धरिला. अशा प्रकारें दोघेही क्रुद्ध

बाणेनैकेन तं हत्वा राज्ये त्वामभिषेचये ॥ तथेति गत्वा सुग्रीवः किष्किंन्धोपवनं द्रुतम् ॥५॥ कृत्वा शब्दं महानादं तमाह्वयत वालिनम् ॥ तच्छ्रुत्वा भ्रातृनिनदं रोषैताम्रविलोचनः ॥ ६ ॥ निर्जगाम गृहाच्छीघ्रं सुग्रीवो यत्र वानरः ॥ तमापतन्तं सुग्रीवः शीघ्रं वक्षस्यताडयत् ॥ ७ ॥ सुग्रीवमपि मुष्टिभ्यां जघान क्रोधमूर्छितः ॥ वाली तमपि सुग्रीव एवं क्रुद्धौ परस्परम् ॥ ८ ॥

एकेन (पू.). " ॥ सुग्रीवः (मू.) गत्वा, ॥ ५ ॥ महानादं शब्दं (पू.) आव्हयत. ॥ तत् भ्रातृनिनदं (पू.) [वाली] ॥ ६ ॥ गृहात् शीघ्रं निर्जगाम, यत्र (मू.). [तत्र आगतः]. सुग्रीवः आपतन्तं (मू.). ॥ ७ ॥ क्रोधमूर्च्छितः वाली (पू.). ॥ सुग्रीवः (मू.) क्रुद्धौ ॥ ८ ॥

---

१ किष्किंधेच्या बागेंत. २ हांका मारिता झाला. ३ भावाच्या शब्दाला. ४ क्रोधानें लाल झाले नेत्र ज्याचे, असा. ५ बाहेर आला. ६ आंगावर येणाऱ्या. ७ मारिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होऊन परस्पराशीं ॥८॥ युद्ध करूं लागले. दोघांचीं रूपें इतकीं एकसारखीं होतीं कीं तीं पाहून - रामाला, सुग्रीव कोणता आणि वाली कोणता, तें ओळखितां येईना ! - तो अगदीं अचंबा करीत राहिला. - 'चुकून कदाचित् - सुग्रीवाचा वध होईल,' अशा शंकेनें त्यावेळीं त्यानें बाण सोडिला नाहीं. ॥९॥ पुढें, सुग्रीव भयभीत होत्साता रक्त ओकत पळून आला. वाली आपल्या घरीं गेला. तेव्हां सुग्रीव रामाला ह्मणाला :– ॥ १० ॥ 'रामा ! भाऊरूपी शत्रूकडून मला मारविण्याचा का तुझा विचार आहे? जर माझा वध करावा अशीच तुझी इच्छा असेल, तर हे समर्था ईश्वरा, तूंच प्रत्यक्ष मला मार. ॥११॥ रघुवीरा! सत्य भाषण करण्याबद्दल तुझा नियम आहे. शरण आलेल्या प्राण्यांवर तूं दया करितोस. आणि मग, एवढा विश्वास दाखवून, माझी

[१]अयुद्ध्येतामेकरूपौ दृष्ट्वा रामोऽतिविस्मितः ॥ न मुमोच तदा बाणं सुग्रीव-
वधशंकया ॥९॥ ततो दुद्राव सुग्रीवो वमन् रक्तं भयाकुलः ॥ वाली स्वभवनं
यातः सुग्रीवो राममब्रवीत् ॥१०॥ किं मां घातयसे राम शत्रुणा भ्रातृरूपिणा॥
यदि मद्धनने [६]वाञ्छा त्वमेव जहि मां विभो ॥ ११ ॥ एवं मे प्रत्ययं कृत्वा
सत्यवादिन् रघूत्तम ॥ उपेक्षसे किमर्थं मां शरणागतवत्सल ॥ १२ ॥

(पू.) रामः ॥ (मू.) बाणं न मुमोच. ॥ ९ ॥ ततः भयाकुलः सुग्रीवः [२]रक्तं [३]वमन् [४]दुद्राव. ॥ (मू.) – ॥ १० ॥ 'राम, (पू.) शत्रुणा किं [५]घातयसे ? ॥ विभो, (मू.) [तर्हि] त्वं एव मां [८]जहि. ॥ ११ ॥ (मू.), एवं मे [९]प्रत्ययं कृत्वा मां किमर्थं उपेक्षसे ?' ॥ १२ ॥

१ युद्ध करूं लागले. २ रक्ताला. ३ ओकणारा. ४ पळाला. ५ मारवितोस. ६ मला मारण्याविषयीं. ७ इच्छा. ८ मार. ९ विश्वासाला.

'रामा ! उपेक्षा कां बरें करितोस !'

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशी उपेक्षा कां बरें करीत आहेस?' ॥ १२ ॥ सुग्रीवाचें भाषण ऐकतांच रामाच्या नेत्रांवाटे अश्रु वाहूं लागले. त्यानें सुग्रीवाला पोटाशीं धरून ह्मटलें:– 'बा! भिऊं नकोस. तुमचीं दोघांचीं एकसारखीं रूपें पाहून ॥ १३ ॥ मला शंका उत्पन्न झाली कीं कदाचित् चुकून माझ्या हातून मित्राचाच घात होईल! आणि ह्मणूनच मी बाण सोडिला नाहीं. आतां, भ्रम दूर होण्यासाठीं मी तुझ्यावर कांहीं तरी खूण करितों. ॥१४॥ पुन्हां जाऊन वालीला हांक मार. ह्मणजे शत्रु मेलाच, असें तुला दिसून येईल. भाऊ! मी राम तुझीच शपथ घेऊन सांगतों कीं, क्षणमात्रांत त्या शत्रूचा वध करीन.' ॥ १५ ॥ सुग्रीवाचें अशा प्रकारें सांत्वन

श्रुत्वा सुग्रीववचनं रामः साश्रुविलोचनः[1] ॥ आलिंग्य मा[2] स्म भैषीस्त्वं[3] दृष्ट्वा वामेकरूपिणौ[4] ॥१३॥ मित्रघातित्वमाशंक्य[5] मुक्तवान्[6]सायकं न हि ॥ इदानीमेव ते चिह्नं करिष्ये भ्रमशान्तये[7] ॥१४॥ गत्वा ऽऽह्वय पुनः शत्रुं हतं द्रक्ष्यसि[8] वालिनम् ॥ रामो ऽहं त्वां शपे[9] भ्रातर्हनिष्यामि रिपुं क्षणात् ॥१५॥ इत्याश्वास्य स सुग्रीवं रामो लक्ष्मणमब्रवीत् ॥ सुग्रीवस्य गले पुष्पमालामामुच्य[10] पुष्पिताम् ॥१६॥

रामः सुग्रीववचनं (पू.) [सन्] ॥ आलिङ्गय [आह –] 'त्वं (मू.) दृष्ट्वा, ॥ १३ ॥ (पू.) मुक्तवान्. ॥ (मू.) करिष्ये. ॥ १४ ॥ पुनः शत्रुं (पू.) हतं द्रक्ष्यसि. ॥ भ्रातः, (मू.) हनिष्यामि.' ॥ १५ ॥ सः रामः सुग्रीवं (पू.) – ॥ 'महाभाग, (१६उ.) पुष्पमालां आमुच्य ॥

---

१ अश्रुयुक्त नेत्र ज्याचे, असा. २ नको. ३ भिऊं. ४ सारखीं रूपें ज्यांचीं, अशा. ५ मित्राच्या वधाबद्दल. ६ सोडिता झालेला. ७ भ्रम नाहींसा होण्यासाठीं. ८ पाहशील. ९ शपथ करितों. १० बांधून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो.
समू-सान्व.
सटिप्पण.
॥१८॥

पुन्हां वाली निघाला.

करून राम लक्ष्मणाला ह्मणाला :– ‘ लक्ष्मणा, सुग्रीवाच्या गळ्यांत एक चांगल्या फुललेल्या फुलांची माळ बांध. ॥ १६ ॥ आणि हे महाभागा, त्याला वालीकडे पाठवून दे. ’ लक्ष्मणानें लागलीच माळ बांधून, व ‘ जा ! जा ! ’ असें सांगून मोठ्या गौरवानें ॥ १७ ॥ सुग्रीवाला पाठवून दिलें. त्यानेंही जाऊन रामानें सांगितल्याप्रमाणें केलें – पुन्हां विलक्षण गर्जना करून वालीला हांक मारिली. ॥ १८ ॥ ती ऐकिल्यावर वालीला आश्चर्य वाटलें व फारच क्रोध आला. त्यानें तत्काळ कमर घट्ट बांधून निघण्याची तयारी केली. ॥ १९ ॥ वाली जायाला निघाला असतां तारेनें त्याला धरून निषेधिलें : – ती ह्मणाली :– ‘ प्रिया ! आतां कांहीं आपण जाऊं नये. मला अतिशयच शंका उद्भवली आहे. ॥ २० ॥

प्रेषयस्व महाभाग सुग्रीवं वालिनं प्रति ॥ लक्ष्मणस्तु तदा बद्ध्वा गच्छ गच्छेति सादरम् ॥१७॥ प्रेषयामास सुग्रीवं सो ऽपि गत्वा तथा ऽकरोत् ॥ पुनरप्यद्भुतं शब्दं कृत्वा वालिनमाह्वयत् ॥१८॥ तच्छ्रुत्वा विस्मितो वाली क्रोधेन महता ऽऽवृतः ॥ बद्ध्वा परिकरं सम्यग्गमनायोपचक्रमे ॥१९॥ गच्छन्तं वालिनं तारा गृहीत्वा निषिषेध तम् ॥ न गन्तव्यं त्वयेदानीं शंका मे ऽतीव जायते ॥ २०॥

(१७ पू.) प्रेषयस्व. ’ ॥ (मू.) ॥ १६ ॥ १७ ॥ सुग्रीवं (मू.), ॥ १८ ॥ (पू.) [सन] ॥ परिकरं सम्यक् (मू.). ॥ १९ ॥ तारा तं (पू.) – ॥ ‘ त्वया इदानीं (मू.) शंका जायते. ॥ २० ॥

॥ १२ ॥

१ पाठव. २ पाठविता झाला. ३ उपचक्रमे प्रारंभ करिता झाला. ४ कांचाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां नुकता तुह्मी त्याचा पराभव केला आणि लागलाच तो परत येतो ! ह्यावरून निःसंशय त्याचा कोणीतरी बलाढ्य साह्यकर्ता आला आहे ! ' ॥ २१ ॥ वालीनें तिला सांगितलें : – ‘ सुंदरि ! त्याबद्दल तुला अगदीं देखील शंका नको. हात सोड - आणि घरांत - जा. मी त्या शत्रूकडे जातों, ॥ २२ ॥ व त्याचा वध करून लागलाच येतों. त्याला साह्यकर्ता मिळणार कोण ? आणि जर कदाचित् त्याला साह्य मिळालें असलेंच तर क्षणमात्रांत दोघांचाही वध करून ॥२३॥ येतों. तूं अगदीं खेद करूं नकोस. सुंदरि ! शत्रु बाहेर युद्धासाठीं हांका मारीत आहे, असें कळल्यावर शूराच्यानें घरांत बसवेल कसें ? मी त्याला मारून हा आलोंच

इदानीमेव ते भग्नः[1] पुनरायाति सत्वरः ॥ सहायो बलवांस्तस्य कश्चिन्नूनं समागतः ॥२१॥ वाली तामाह हे सुभ्रु[2] शंका ते व्येतु तद्गता[3] ॥ प्रिये करं परित्यज्य गच्छ गच्छामि तं रिपुम् ॥२२॥ हत्वा शीघ्रं समायास्ये[6] सहायस्तस्य को भवेत् ॥ सहायी यदि सुग्रीवस्तत्तो हत्वोभयं क्षणात् ॥२३॥ आयास्ये मा शुचः शूरः कथं तिष्ठेद्गृहे रिपुम् ॥ ज्ञात्वाऽप्याह्वयमानं हि हत्वाऽऽयास्यामि सुन्दरि ॥ २४ ॥

(पू.) पुनः आयाति ! ॥ तस्य कश्चित् (मू.) ! ' ॥ २१ ॥ (पू.) ते शंका व्येतु. ॥ (मू.) गच्छामि. ॥ २२ ॥ (पू.) सहायः भवेत् ? ॥ (मू.) हत्वा ॥ २३ ॥ (पू.) सुंदरि, आव्हयमानं शत्रुं ज्ञात्वा अपि शूरः गृहे कथं तिष्ठेत् ? [अतः तं] (मू.). ॥ २४ ॥

---

१ पराभव केलेला. २ सुंदर भ्रुकुटी जिच्या, अशा. ३ त्याच्या, विषयींची. ४ दूर होवो. ५ सोडन. ६ येईन. ७ मारून. ८ शोक करूं. ९ बोलावणाऱ्या. १० राहील. ११ येईन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तारा त्याला
सकारण
निषेधित्ये.

समज.' ॥ २४ ॥ तारा ह्मणाली :– "राजाधिराजा ! मी आणखी दुसरी एक गोष्ट (बातमी) सांगत्यें, तेवढी ऐकून घ्या, आणि मग आपल्याला योग्य दिसेल तसें आचरण करा. आपला पुत्र अंगद मृगयेला गेला होता; तेथें कानीं आलेलें कांहीं भाषण त्यानें मला सांगितलें : तें असें :– ॥ २५ ॥ 'अयोध्येचा राजा दशरथाचा पुत्र श्रीरामचंद्र भाऊ लक्ष्मण आणि पत्नी सीता ह्या दोघांना बरोबर घेऊन ॥ २६ ॥ दंडकारण्यांत आला. तेथें सीता रावणानें चोरून नेली. तेव्हां भावासह तो (राम) जानकीचा शोध करीत करीत ॥२७॥ ऋष्यमूकपर्वतावर येऊन सुग्रीवाला भेटला. सुग्रीवानें अग्नीला साक्षी ठेवून त्याच्याशीं सख्य केलें. ॥ २८ ॥

तारोवाच । मत्तो[1] ऽन्यच्छृणु राजेन्द्र श्रुत्वा कुरु यथोचितम्[2] ॥ आह मामंगदः पुत्रो मृगयायां श्रुतं वचः ॥ २५ ॥ अयोध्याधिपतिः श्रीमान् रामो दाशरथिः किल ॥ लक्ष्मणेन सह भ्रात्रा सीतया भार्यया सह ॥ २६ ॥ आगतो दण्डकारण्यं तत्र सीता हृता किल ॥ रावणेन सह भ्रात्रा मार्गमाणो[3] ऽथ जानकीम् ॥ २७ ॥ आगतो ऋष्यमूकाद्रिं सुग्रीवेण समागतः[4] ॥ चकार तेन सुग्रीवः सख्यं चानलसाक्षिकम्[5] ॥ २८ ॥

तारा उ० – "राजेन्द्र, (पू.) कुरु. ॥ (मू.) मां आह – ॥ २५ ॥ '(पू.) रामः ॥ भ्रात्रा (मू.) [च] ॥ २६ ॥ दण्डकारण्यं (पू.) रावणेन सीता हृता. ॥ अथ भ्रात्रा (मू.) मार्गमाणः ॥२७॥ रामः ऋष्यमूकाद्रिं (पू.). ॥ सुग्रीवः तेन अनलसाक्षिकं सख्यं चकार. ॥ २८ ॥

१ मजपासून. २ योग्य असेल तसें. ३ शोधणारा. ४ भेटलेला. ५ अग्नि साक्षी ज्याला, असें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लक्ष्मणासह रामानें सुग्रीवाला प्रतिज्ञापूर्वक सांगितलें आहे कीं, वालीचा युद्धामध्यें वध करून मी तुला राजा करीन.' ॥ २९ ॥ अशा निश्चयानें ते आले आहेत, ह्याबद्दल संशय नलगे. ह्मणून मी सांगत्यें, तें ऐका. अहो! आतांच तुह्मी त्याचा पराभव केला, आणि लागलाच पुन्हां तो आला कसा! ॥ ३० ॥ ह्यासाठीं आपण सर्वथा वैर सोडून देऊन सुग्रीवाला घेऊन यावें, आणि यौवराज्याभिषेक करावा. तसेंच आपण रामाला शरण जावें. ॥३१॥ वानराधिपते! मजकडे, अंगदबाळाकडे, राज्याकडे आणि कुळाकडे कांहीं लक्ष्य पुरवा!" असें बोलून तारा वालीच्या पायां पडली. तिच्या मुखावरून अश्रूंचे ओघळ चालले होते. ॥ ३२ ॥

प्रतिज्ञां कृतवान् रामः सुग्रीवाय सलक्ष्मणः ॥ वालिनं समरे[1] हत्वा[2] राजानं त्वां करोम्यहम् ॥ २९ ॥ इति निश्चित्य तौ यातौ निश्चितं शृणु मद्वचः ॥ इदानीमेव ते भग्नः[4] कथं पुनरुपागतः ॥ ३० ॥ अतस्त्वं सर्वथा वैरं त्यक्त्वा[5] सुग्रीवमानय ॥ यौवराज्येऽभिषिञ्चाशु रामं त्वं शरणं व्रज ॥ ३१ ॥ पाहि[7] मामंगदं राज्यं कुलं च हरिपुंगव[6] ॥ इत्युक्त्वाऽश्रुमुखी[8] तारा पादयोः प्रणिपत्य तम् ॥ ३२ ॥

सलक्ष्मणः रामः सुग्रीवाय (पू.) – ॥ 'अहं (मू.) राजानं करोमि.' ॥ २९ ॥ (पू.) निश्चितं. मद्वचः[3] शृणु. ॥ (मू.) ? ॥ ३० ॥ (मू.) रामं शरणं व्रज. ॥ ३१ ॥ हरिपुङ्गव, (पू.) पाहि." ॥ तं (मू.) पादयोः प्रणिपत्य ॥ ३२ ॥

१ युद्धांत. २ मारून. ३ माझ्या भाषणाला. ४ पराभव केलेला. ५ सोडून. ६ वानरांत श्रेष्ठ, अशा. ७ रक्षण कर. ८ आसवें मुखावर आहेत जिच्या, अशी.

४।५

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वाली तिची समजूत करितो.

फारच भयभीत झाल्यामुळें तिनें हातांनीं वालीचे पाय घट्ट धरून रुदन करण्यास प्रारंभ केला. त्या वेळीं वालीनें तिला पोटाशीं धरून प्रेमपूर्वक असें सांगितलें :– ॥३३॥ " प्रिये, तुमचा स्त्रियांचा स्वभाव ह्मणजे असाच भित्रा : त्याला अनुसरूनच तुला हें भय वाटत आहे. - पण पक्कें लक्षांत ठेव कीं, - मला भीति मुळींच नाहीं. प्रभु रामचंद्र लक्ष्मणासहवर्तमान आला असेल, ॥ ३४ ॥ तर रामाशीं माझा स्नेह जमेल, ह्यांत संशय नाहीं. सर्व सृष्टीचा नियामक साक्षात् नारायण भूमीचा भार दूर करण्यासाठीं रामरूपानें अवतरला आहे, असें मला पूर्वींच कळलें आहे. सुंदरि, तुझें अंतःकरण अगदीं निर्मल व कोमल खरें. त्या परमात्म्याला 'हा आपल्या पक्षाचा, व हा शत्रूच्या पक्षाचा' असा भेद मुळींच वाटत नाहीं. ॥ ३५ ॥ ३६ ॥

हस्ताभ्यां चरणौ धृत्वा रुरोद[1] भयविह्वला ॥ तामालिंग्य तदा वाली सस्नेहमिद-मब्रवीत् ॥ ३३ ॥ स्त्रीस्वभावाद्बिभेषि[2] त्वं प्रिये नास्ति भयं मम ॥ रामो यदि समायातो लक्ष्मणेन समं प्रभुः ॥ ३४ ॥ तदा रामेण मे स्नेहो भविष्यति न संशयः ॥ रामो नारायणः साक्षादवतीर्णो ऽखिलप्रभुः ॥ ३५ ॥ भूभारहरणा-र्थाय श्रुतं पूर्वं मया ऽनघे ॥ स्वपक्षः परपक्षो वा नास्ति तस्य परात्मनः ॥३६॥

भयविह्वला [सती] (पू.) ॥ तदा वाली (मू.) – ॥३३॥ ' त्वं (पू.) भयं न अस्ति. ॥ प्रभुः (मू.) समायातः, ॥ ३४ ॥ (३५ मू.) भूभारहरणार्थाय अवतीर्णः ! अनघे, मया पूर्वं श्रुतम्. ॥ तस्य परात्मनः (बा. मू.). ॥ ३५ ॥ ३६ ॥

१ रडूं लागली. २ भितेस.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पतिव्रते, मी त्याच्या चरणकमलाला वंदन करून त्याला घरीं घेऊन येतों. तो देवाधिदेव भक्तीच्या योगें वश होतो, व भजन करणारांची प्रतिसेवा करितो. ॥ ३७ ॥ सुग्रीव आपण होऊन आंगावर चालून येईल, तर मी क्षणमात्रांत त्याचा वध करीन. तूं 'सुग्रीवाला यौवराज्याभिषेक करावा' असें ह्मणत्येस; ॥ ३८ ॥ पण, प्रिये, तो शत्रु होऊन मला युद्धासाठीं बोलावीत आहे, तर मी तसें (त्याला अभिषेक) कसें बरें करावें? - त्यांत मजकडे कमीपणा येणार नाहीं काय? तूंच विचार कर! - हे शुभलक्षणे! - ज्या - मला शूर समजून सगळे लोक मान देत आहेत, ॥ ३९ ॥ त्याच ह्या वालीनें, - 'बा सुग्रीवा! मी तुला यौवराज्य देतों; युद्धाचा प्रसंग आणूं नकोस.' - असें भित्र्यासारखें

आनेष्यामि गृहं साध्वि नत्वा तच्चरणाम्बुजम् ॥ भजतो ऽनुभजत्येष भक्ति[1]गम्यः सुरे[2]श्वरः ॥ ३७ ॥ यदि स्वयं समायाति सुग्रीवो हन्मि तं क्षणात् ॥ यदुक्तं यौवराज्याय सुग्रीवस्याभिषेचनम् ॥३८॥ कथमाहूयमानो ऽहं युद्धाय रिपुणा प्रिये ॥ शूरो ऽहं सर्वलोकानां संमतः शुभलक्षणे ॥ ३९ ॥ भीतभीतमिदं वाक्यं कथं वाली [8]वदेत्प्रिये ॥ तस्माच्छोकं परित्यज्य तिष्ठ सुन्दरि वे[9]श्मनि ॥ ४० ॥

साध्वि! तच्चरणाम्बुजं नत्वा गृहं आनेष्यामि. ॥ (बा. मू.) [3]भजतः [4]अनुभजति. ॥ ३७ ॥ सुग्रीवः (पू.) हन्मि[5]. ॥ यत् (मू.) उक्तं, ॥ ३८॥ प्रिये! रिपुणा युद्धाय [6]आहूयमानः अहं [तत्] कथं [[7]कुर्याम्?] ॥ शुभलक्षणे! (मू.) अहं! ॥३९॥ प्रिये! वाली (पू.) ॥ सुन्दरि (मू.) ति[10]ष्ठ.' ॥४०॥

१भक्तीनें प्राप्त होण्याजोगा. २देवाधिदेव. ३सेवा करणारांला. ४उलट भजतो. ५मारतों. ६ बोलाविलेला. ७करूं. ८बोलेल. ९घरीं. १०राहा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वाली-सुग्री-
वांचें पन्हा
युद्ध.

भाषण बोलावें कसें? ह्मणून, सुंदरि, तूं शोक करणें सोडून देऊन स्वस्थपणें घरांत बैस." ॥ ४० ॥ तारा शोक करीत होती व तिच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या होत्या. वाली मागें सांगितल्याप्रमाणें तिचें सांत्वन करून सुग्रीवाचा वध करण्याच्या तयारीनें निघाला. ॥ ४१ ॥ इकडे, ज्याच्या गळ्यांत - लक्ष्मणानें - फुलांची माळ बांधिली, तो महापराक्रमी सुग्रीव - युद्धास सिद्ध होताच. - वाली येत आहे असें दृष्टीस पडतांच त्यानें पतंगाप्रमाणें उडी घातली, ॥ ४२ ॥ व वालीवर मुष्टिप्रहार चालविले. वालीनेंही तोच क्रम आरंभिला. वाली सुग्रीवाला मारी तसाच सुग्रीव वालीला प्रहार करी. ॥ ४३ ॥ सध्यांच्या प्रसंगीं सुग्रीव रामाकडे लक्ष ठेवूनच युद्ध करीत होता.

एवमाश्वास्य तारां तां शोचन्तीमश्रुलोचनाम् ॥ गतो वाली समुद्युक्तः सुग्रीवस्य वधाय सः ॥ ४१ ॥ दृष्ट्वा वालिनमायान्तं सुग्रीवो भीमविक्रमः ॥ उत्पपात गले-बद्धपुष्पमालः पतंगवत् ॥४२॥ मुष्टिभ्यां ताडयामास वालिनं सो ऽपि तं तथा ॥ अहन्वाली च सुग्रीवं सुग्रीवो वालिनं तथा ॥४३॥ रामं विलोकयन्नेव सुग्रीवो युयुधे युधि ॥

सुग्रीवस्य वधाय समुद्युक्तः सः वाली शोचन्तीं अश्रुलोचनां तां तारां एवं आश्वास्य गतः. ॥४१ ॥ भीमविक्रमः गलेबद्धपुष्पमालः सुग्रीवः वालिनं आयान्तं दृष्ट्वा पतंगवत् उत्पपात, ॥ ४२ ॥ वालिनं (पू.). ॥ (मू.) अहन्. ॥ ४३ ॥ युधि (पू.) युयुधे. ॥

१ सिद्ध. २ शोक करणाऱ्या. ३ आंसवें नेत्रांत जिच्या, अशा. ४ आश्वासन देऊन. ५ महापराक्रमी. ६ गळ्यांत बांधली फुलांची माळ ज्याच्या, असा. ७ मारी. ८ युद्धांत. ९ युद्ध करी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मार्गे सांगितल्याप्रमाणें - आवेशानें - ते दोघे युद्ध करीत आहेत, असें प्रतापशाली रामचंद्राच्या दृष्टीस आलें. ॥ ४४ ॥ तेव्हां त्या भक्तसंकटनाशन महासमर्थ प्रभूनें, स्वतां वालीच्या दृष्टीस पडणार नाहीं अशा रीतीनें वृक्षांच्या राईआड उभें राहून भात्यांतून बाण काढून इंद्रधनुष्यावर जोडिला, प्रत्यंचा कर्णापर्यंत ओढिली आणि वालीकडे निरखून पाहून व त्याच्या हृदयाचा नीट नेम धरून वज्रासारखा महावेगवान् असा तो बाण सोडिला. ॥ ४५ ॥ ४६ ॥ तो बाण वालीच्या वक्षःस्थळाचें विदारण करून पृथ्वीला कांपवीत व मोठा शब्द करीत आकाशांत उडाला.

इत्येवं युद्धयमानौ तौ दृष्ट्वा रामः प्रतापवान् ॥ ४४ ॥ बाणमादाय तूणीरादैन्द्रे[2]
धनूंषि[3] सन्दधे[4] ॥ आकृष्य कर्णपर्यंतमदृश्यो वृक्षखण्डगः ॥ ४५ ॥ निरीक्ष्य वालिनं
सम्यग्लक्ष्यं तद्धृदयं हरिः ॥ उत्ससर्जाशनिसमं महावेगं महाबलः ॥ ४६ ॥
बिभेद स शरो वक्षो वालिनः कम्पयन्महीम् ॥ उत्पपात महाशब्दं मुञ्चन्स
निपपात ह ॥ ४७ ॥

प्रतापवान् रामः (मू.), ॥ ४४ ॥ तूणीरात्[1] (पू.) ॥ वृक्षखण्डगः[5] अदृश्यः[6] [सन्] (मू.) [7]आकृष्य ॥ ४५ ॥ वालिनं, लक्ष्यं तद्धृदयं च सम्यक् निरीक्ष्य हरिः महाबलः [9]अशनिसमं [10]महावेगं [बाणं] [11]उत्ससर्ज. ॥ ४६ ॥ सः शरः वालिनः वक्षः बिभेद[12], [13]महीं कंपयन् (मू.) [14]उत्पपात. सः निपपात[15] ह. ॥ ४७ ॥

---

१ भात्यांतून. २ अगस्त्य मुनींनीं दिलेल्या ऐंद्र नांवाच्या. ३ धनुष्यावर. ४ जोडिता झाला. ५ वृक्षांच्या राईत असलेला. ६ न दिसणारा. ७ कर्णापर्यंत. ८ ओढून. ९ वज्रासारख्या. १० मोठ्या वेगयुक्त. ११ सोडिता झाला. १२ फाडिता झाला. १३ पृथ्वी-ला. १४ उडाला. १५ खालीं पडला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वाली रामाची निंदा करितो.

इकडे वालीही भूमीवर पतन पावला. ॥४७॥ एक मुहूर्तपर्यंत तर त्याला चेतना नव्हतीच; परंतु मग तो शुद्धीवर आला. तों अग्रभागीं साक्षात् कमलनयन रामचंद्र उभा आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्यानें (रामानें) डाव्या हातांत धनुष्य घेतलें असून उजव्यानें बाण ॥४८॥ धरिला होता; त्याच्या शरीरावर वल्कलरूप वस्त्रें आणि मस्तकीं जटामुकुट होता; त्याचें वक्षःस्थल विशाल असून, वर असलेली टवटवीत वनमाला त्याची शोभा वाढवीत होती; ॥ ४९ ॥ त्याचे बाहु पुष्ट, सुंदर व दीर्घ होते; अंगकांति नूतन दूर्वांकुराप्रमाणें नीलवर्ण होती; त्याच्या दोहों बाजूंना सुग्रीव आणि लक्ष्मण दोघेजण सेवेसाठीं उभे होते. ॥ ५० ॥ असा राम दृष्टीस पडतांच वाली त्याची निंदा करण्यासाठीं हळूहळू (खोल गेलेल्या स्वरानें) बोलूं लागला :– ॥

तदा मुहूर्तं निःसंज्ञो[1] भूत्वा चेतनमाप[2] सः ॥ ततो वाली ददर्शाग्रे रामं राजीव-
लोचनम् ॥ धनुरालम्ब्य वामेन हस्तेनान्येन सायकम्[5] ॥४८॥ बिभ्राणं[6] चीरवसनं[7]
जटामुकुटधारिणम् ॥ विशालवक्षसं भ्राजद्वनमालाविभूषितम् ॥४९॥ पीनचा-[8]
र्वायतभुजं नवदूर्वादलच्छविम्[9] ॥ सुग्रीवलक्ष्मणाभ्यां च पार्श्वयोः[10] परिसेवितम्
॥ ५० ॥ विलोक्य शनकैः प्राह वाली रामं विगर्हयन्[11] ॥

सः (पू.) ॥ ततः वाली अग्रे राजीवलोचनं[3] वामेन[4] हस्तेन (बा. ४८।४९।५० मू.) रामं ददर्श. ॥ ४८ ॥ ४९ ॥ ५० ॥ वाली (पू.) [सन्] प्राह – ॥

१ अचेतन (बेशुद्ध). २ आप पावला. ३ कमलनयन. ४ डाव्या. ५ बाणाला. ६ धरणाऱ्या. ७ वल्कल हेंच वस्त्र. ८ पुष्ट, सुंदर व दीर्घ भुज ज्याचे, अशा. ९ नूतन दूर्वेच्या पत्रासारखी कांति ज्याची, अशा. १० दोन बाजूंकडे. ११ निंदणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

“रामा, मी तुझा असा कोणता अपराध केला होता, कीं ज्यासाठीं तूं मला मारिलेंस? ॥९१॥ वृक्षांच्या राईंत लपून उभें राहून मजवर बाण सोडिलास, हें तुजकडून निंद्य कर्म घडलें. तुला राजधर्म कळत नाहीं, - असें वाटतें. - ॥ ९२ ॥ रामा, असें चोरासारखें युद्ध करून कीर्ति ती कोणती मिळविणार? जर तूं खरा क्षत्रियांचा वंशज आणि मनूच्या कुलांत उत्पन्न झालेला आहेस, ॥ ९३ ॥ तर माझ्या समोर उभा राहून युद्ध कर; ह्मणजे त्याचें फळ (मरण किंवा कीर्ति कांहीं तरी एक) तुला मिळेल. सुग्रीवानें असें तुझें कोणतें कार्य केलें आणि मी कोणतें केलें नाहीं? ॥ ९४ ॥ रामा, ‘रावणानें महारण्यांत तुझी भार्या चोरून नेली,

किं मयाऽपकृतं राम तव येन हतोऽस्म्यहम् ॥ ५१ ॥ राजधर्ममविज्ञाय गर्[5]हितं
कर्म ते कृतम् ॥ [1]वृक्षखण्डे [2]तिरो भूत्वा त्यजता मयि [3]सायकम् ॥५२॥ यशः किं
लप्स्यसे राम [6]चोरवत्कृतसंगरः ॥ यदि क्षत्रियदायादो मनोर्वंशसमुद्भवः ॥ ५३ ॥
युद्धं कृत्वा समक्षं मे प्राप्स्यसे तत्फलं तदा ॥ सुग्रीवेण कृतं किं ते मया वा न
कृतं किमु ॥ ५४ ॥ रावणेन ह्रता भार्या तव राम महावने ॥

‘ राम ! मया तव (मू.) हतः अस्मि. ॥५१॥ (पूर्वी उत्तरार्ध) [4]त्यजता ॥ त्वया (पू.). ॥५२॥ (पू.) किं यशः [7]लप्स्यसे? (मू.), ॥ ५३ ॥ तदा मे समक्षं युद्धं कृत्वा तत्फलं [8]प्राप्स्यसे. ॥ सुग्रीवेण ते (मू.)? ॥ ५४ ॥ राम, महावने रावणेन तव भार्या हृता; ॥

---

१ झाडांच्या राईंत. २ आच्छादित. ३ बाणाला. ४ सोडणाऱ्या. ५ निंदित. ६ चोराप्रमाणें केलें युद्ध ज्यानें, असा. ७ मिळविशील. ८ पावशील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मणून तूं सुग्रीवाला शरण गेलास ' असें आह्मीं ऐकतों ! ॥ ९५ ॥ पण, रघुवीरा, मोठ्या आश्चर्याची गोष्ट कीं, माझा पराक्रम सर्व जगांत प्रसिद्ध असून तुला ठाऊक नाहीं ! - कळला असता तर तूं सुग्रीवाला शरण जातासच ना. फार काय सांगूं ! - राघवा ! जर मनांत आणीन, तर मी अर्ध्या मुहूर्तांत राक्षसकुलासह रावणाला बांधून सीता आणि लंकानगरी ह्यांसुद्धां येथें घेऊन येईन ! रघुनंदना ! ह्या लोकांमध्यें तुझी 'महाधार्मिक ' ह्मणून प्रसिद्धि आहे; ॥९६॥९७॥ मग, पारध्याप्रमाणें एका वानराला मारून धर्माचा संग्रह तो कोणता करणार, सांग. वानराचें मांस तर अभक्ष्य आहे; तेव्हां मला मारून तूं करणार काय ? " ॥ ९८ ॥ अशा प्रकारें वाली पुष्कळ भाषण करीत होता. शेवटीं रामचंद्र त्याला ह्मणाला :-

सुग्रीवं शरणं यातस्तदर्थमिति शुश्रुम ॥ ५५ ॥ बत राम न जानीषे मद्बलं लोकविश्रुतम् ॥ रावणं सकुलं बद्ध्वा ससीतं लंकया सह ॥ ५६ ॥ आनयामि मुहूर्तार्धाद्यदि चेच्छामि राघव ॥ धर्मिष्ठ इति लोके ऽस्मिन् कथ्यसे रघुनन्दन ॥५७॥ वानरं व्याधवद्धत्वा धर्मं कं लप्स्यसे वद ॥ अभक्ष्यं वानरं मांसं हत्वा मां किं करिष्यसि ॥५८॥ इत्येवं बहु भाषन्तं वालिनं राघवो ऽब्रवीत् ॥

तदर्थं (मू.) ॥ ५५ ॥ (पू.) [अपि] न जानीषे ! ॥ (मू.) ॥ ५६ ॥ मुहूर्ताद्धांत् (पू.). राघव, ॥ रघुनन्दन, अस्मिन् लोके (मू.). ॥५७॥ (मू.) हत्वा किं करिष्यसि ? ' ॥ ५८ ॥ राघवः (पू.)- ॥

१ लोकांत प्रसिद्ध. २ ह्मटला जातोस. ३ पारध्याप्रमाणें. ४ मिळवशील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'मी धर्माचें संरक्षण करण्यासाठीं हातांत धनुष्य घेऊन ह्या लोकांत फिरत असतों, ॥५९॥ व अधर्म करणारांचा वध करून सद्धर्माचें पालन करितों. कन्या, भगिनी, भावाची बायको आणि सून ॥ ६० ॥ ह्या सर्वजणी सारख्या होत. जो मूढबुद्धि पुरुष ह्यांच्यापैकीं एकीशींही रममाण होतो, तो पातकी, असें समजावें. राजांनीं अशा प्राण्यांचा नित्य वध करावा : ॥ ६१ ॥ हा धर्म मला पूर्णपणें विदित आहे. बनचरा, तूं तर आपल्या कनिष्ठ बंधूच्या भार्येचा बलात्कारानें उपभोग घेतोस, ह्मणून मी तुझा वध केला. ॥ ६२ ॥ तूं वानर योनींत उत्पन्न झाला आहेस, म्हणून सत्पुरुषांच्या आचरणाचें तत्त्व तुला कळत नाहीं. ते सर्वत्र संचार करून

धर्मस्य गोप्ता लोकेऽस्मिंश्चरामि सशरासनः[1] ॥ ५९ ॥ अधर्मकारिणं हत्वा सद्धर्मं पालयाम्यहम् ॥ दुहिता[2] भगिनी[3] भ्रातुर्भार्या[4] चैव तथा स्नुषा[5] ॥ ६० ॥ समा यो रमते तासामेकामपि विमूढधीः ॥ पातकी स तु विज्ञेयः[9] स वध्यो राजभिः सदा ॥६१॥ त्वं तु भ्रातुः कनिष्ठस्य भार्यायां रमसे बलात् ॥ अतो मया धर्मविदा हतोऽसि वनगोचर ॥ ६२ ॥ त्वं कपित्वान्न जानीषे महान्तो विचरन्ति यत् ॥

'(मू.) [अहं] अस्मिन् लोके चरामि. ॥ ५९ ॥ अहं (मू.) ॥ ६० ॥ [एताः[6]] समाः[7]. विमूढधीः (पू.) रमते[8], ॥ सः तु (मू.) वध्यः[10]. ॥ ६१ ॥ वनगोचर[11], (पू.) रमसे, अतः धर्मविदा[12] (मू.). ॥ ६२ ॥ संचारैः[13] लोकं पुनानाः[14] महान्तः यत् विचरन्ति[15], [तत्] (पू.);

१ धनुष्यसहित. २ कन्या. ३ बहीण. ४ भावाची. ५ सून. ६ ह्या. ७ सारख्या. ८ रममाण होतो. ९ जाणावा. १० वध करण्यास योग्य. ११ वनांत दिसून येणारा (रानवट), अशा. १२ धर्म जाणणाऱ्या. १३ फिरण्यांनीं. १४ पवित्र करणारे. १५ आचरण करितात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'मी स्वतांला धन्य लेखितों.'

लोकांस पवित्र करीत असतात. ह्मणून अशा पुरुषांची निंदा करूं नये.' ॥ ६३ ॥ हें भाषण ऐकिल्याबरोबर वालीला अतिशय भीति वाटली व 'रामचंद्र हा साक्षात् लक्ष्मीपति ईश्वर होय' असें ज्ञान झालें. तत्काल त्यानें रामाला नमस्कार केला आणि ह्मटलें :– ॥ ६४ ॥ "रामा! हे आनंददायका ! हे षड्गुणैश्वर्यसंपन्ना प्रभो ! आतां मला पूर्णपणें समजलें कीं, तूं परमेश्वर आहेस. अज्ञानामुळें इतका वेळ मी जें कांहीं बोललों असेन, त्याची त्वां क्षमा करावी. ॥ ६५ ॥ - रामा ! मी आपल्याला फार धन्य समजतों ! कारण, - प्रत्यक्ष तुझ्या बाणाच्या प्रहारानें आणि विशेषतः तुझ्या अग्रभागीं मी प्राण सोडीत आहें. तुझें दर्शन मोठमोठ्या योग्यांना देखील दुर्लभ असतें. ॥६६॥ प्राणी नेहमीं पुत्रादिकांविषयीं ममतेनें आक्रांत झालेला असो; पण त्यानें मृत्युकालीं

लोकं पुनानाः संचरंतिस्तान्नातिभाषयेत् ॥ ६३॥ तच्छ्रुत्वा भयसंत्रस्तो ज्ञात्वा रामं रमापतिम् ॥ वाली प्रणम्य रभसा रामं वचनमब्रवीत् ॥६४॥ राम राम महाभाग जाने त्वां परमेश्वरम् ॥ अजानता मया किंचिदुक्तं तत्क्षन्तुमर्हसि ॥ ६५॥ साक्षात्त्वच्छरघातेन विशेषेण तवाग्रतः ॥ त्यजाम्यसून्महायोगिदुर्लभं तव दर्शनम् ॥ ६६ ॥ यन्नाम विवशो गृह्णन् म्रियमाणः परं पदम् ॥

(मू.). ' ॥ ६३ ॥ वाली (पू.) ज्ञात्वा, (मू.) – ॥ ६४ ॥ ' (पू.) जाने. ॥ (मू) ॥ ६५ ॥ (पू.) ॥ असून् त्यजामि. तव दर्शनं (मू.) ॥ ६६ ॥ (पू.). ॥

१ अतिभाषयेत् दुर्भाषणें बोलावीं (निंदावें). २ वेगानें. ३ न जाणणाऱ्या. ४ क्षमा करण्यास. ५ योग्य आहेस. ६ प्राणांस. ७ सोडतों. ८ पराधीन (ममतेनें वेडा झालेला). ९ मरणोन्मुख.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जर तुझें नाम घेतलें तर तो देखील परम पदास पावतो. असा महासमर्थ साक्षात् प्रभु तूं आज मरणसमयीं माझ्या अग्रभागीं उभा राहिलास. - तेव्हां मला उत्तम पद मिळेल ह्यांत आश्चर्य काय ? - ॥६७॥ देवा ! मी जाणतों कीं, तूं साक्षात् परमेश्वर आहेस, व जानकी ही मंगलप्रदा लक्ष्मी होय; तूं ब्रह्मदेवाच्या प्रार्थनेवरून रावणाचा वध करण्यासाठीं अवतार घेतलास. ॥ ६८ ॥ रामा, मी आतां तुझ्या उत्तम पदीं जातों. तर मला अनुमोदन दे, व माझ्या अंगदबाळावर कृपादृष्टि ठेव. तो मजसारखाच पराक्रमी आहे. ॥ ६९ ॥ रामा ! माझ्या हृदयाला आपल्या हातानें स्पर्श करून त्यांतील बाणाचें अग्र काढून टाक. " रामानें ' बरें

यातिं साक्षात्स एवाद्य मुमूर्षोर्मे पुरः स्थितः ॥ ६७॥ देव जानामि पुरुषं त्वां श्रियं जानकीं शुभाम् ॥ रावणस्य वधार्थाय जातं त्वां ब्रह्मणा ऽर्थितम् ॥६८॥ अनुजानीहि मां राम यान्तं त्वत्पदमुत्तमम् ॥ मम तुल्यबले बाले अंगदे त्वं दयां कुरु ॥ ६९ ॥ विशल्यं कुरु मे राम हृदयं पाणिना स्पृशन् ॥ तथेति बाणमुद्धृत्य रामः पस्पर्श पाणिना ॥ त्यक्त्वा तद्वानरं देहममरेन्द्रो ऽभवत्क्षणात् ॥ ७० ॥

(मू.) ! ॥ ६७ ॥ देव, (मू.) जातं त्वां जानामि. ॥ ६८ ॥ राम, उत्तमं त्वत्पदं यान्तं मां अनुजानीहि. ॥ त्वं (मू.). ॥ ६९ ॥ राम, पाणिना स्पृशन् [सन्] मे हृदयं विशल्यं कुरु. ' ॥ रामः (द्वि. अ.) पस्पर्श. ॥ [वाली] (मू.) त्यक्त्वा अमरेन्द्रः अभवत्. ॥ ७० ॥

---

१ मरणोन्मुख, अंशा. २ अनुमोदन दे. ३ हातानें. ४ स्पर्श करणारा. ५ शल्यरहित. ६ बाहेर काढून. ७ स्पर्श करिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तारेला वालिवधाची वार्ता कळली.

आहे' असें ह्मणून वालीला हस्तानें स्पर्श केला. तत्क्षणीं वाली वानरशरीर सोडून देऊन श्रेष्ठ देव झाला. ॥ ७० ॥ (शंकर ह्मणाले :– पार्वति !) वालीला रामाच्या बाणाचा प्रहार लागला व त्या प्रभूनें आपल्या पूर्ण सुखमय शीतल हस्तानें स्पर्श केला; तेव्हां तत्काल तो (वाली) वानरशरीराचा त्याग करून परमश्रेष्ठ पदास प्राप्त झाला. - वालीला मिळालेलें - स्थान इतरांस मिळत नाहीं, फार तर काय, परमहंस जनांना देखील प्राप्त होणें कठिण आहे. ॥ ७१ ॥

इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे किष्किंधाकाण्डे द्वितीयः सर्गः ॥ २॥

प्रभु रामचंद्रानें युद्धांत वालीचा वध केला, तेव्हां सगळे वानर भयभीत होऊन किष्किंधेंत पळून आले, ॥ १ ॥ व तारेला ह्मणाले :– " महाभागे ! वालीचा रणांगणांत वध झाला. ॥

वाली रघूत्तमशराभिहतो विमृष्टो रामेण शीतलकरेण सुखाकरेण[1] ॥ सद्यो विमुच्य[3] कपिदेहमनन्यलभ्यं[4] प्राप्तः पदं परमहंसगणैर्दुरापम्[5] ॥ ७१ ॥ इति श्रीम० कि० द्वितीयः सर्गः ॥ २ ॥ निहते वालिनि रणे रामेण परमात्मना ॥ दुद्रुवुर्वानराः सर्वे किष्किन्धां भयविह्वलाः ॥१॥ तारामूचुर्महाभागे हतो वाली रणाजिरे[9] ॥

(पू.) शीतलकरेण विमृष्टः[2] वाली ॥ कपिदेहं (मू.) पदं प्राप्तः. ॥ ७१ ॥ इति द्वितीयः सर्गः ॥२॥ परमात्मना रामेण रणे[6] वालिनि निहते[7] [सति] भयविह्वलाः सर्वे (मू.) दुद्रुवुः[8]. ॥१॥ (पू.) हतः. ॥

---

१ सुखाची खाण, अशा. २ कुरवाळिलें ज्याला, असा. ३ सोडून. ४ दुसऱ्यांस न मिळणाऱ्या. ५ मिळण्यास कठिण अशा. ६ युद्धांत. ७ मरण पावलेल्या. ८ पळाले. ९ रणांगणांत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां अंगदाचें संरक्षण कर. मंत्रिमंडळाला नगराचें रक्षण करण्यास आज्ञा दे. ॥२॥ आह्मी चारी दरवाज्यांचीं कपाटें वगैरे बंद करून नगरीचें रक्षण करितों. बाई ! अगोदर अंगदाला वानरांच्या राज्याचा अभिषेक करा. " ॥३॥ ' वाली मरण पावला ही वार्ता कानीं पडतांच शोकामुळें तारेला मूर्च्छा आली. तिनें आपल्या हातांनीं वरचेवर मस्तक आणि वक्षस्थल बडवून घेऊन शोक करण्यास प्रारंभ केला :- ॥४॥ - ती ह्मणे :- 'मला अंगदाशीं, राज्याशीं, नगराशीं आणि धनाशीं करायाचें आहे काय ! मी आतांच पतीबरोबर प्राणत्याग करणार! ॥५॥ असें ह्मणून रडत रडत ती, ज्या ठिकाणीं पतीचें शव होतें, तेथें त्वरेनें प्राप्त झाली. शोकाचा तीव्र

अंगदं परिरक्षाद्य मन्त्रिणः परि[1]नोदय ॥२॥ चतुर्द्वारकपाटादीन्बद्ध्वा रक्षामहे पुरीम् ॥
वानराणां तु राजानमंगदं कुरु भामिनि ॥३॥ निहतं वालिनं श्रुत्वा तारा शोक-
विमूर्छिता ॥ अताडयत्स्वपाणिभ्यां शिरो वक्षश्च भूरि[2]शः ॥४॥ किमंगदेन राज्येन
नगरेण धनेन वा ॥ इदानीमेव निधनं यास्यामि पतिना सह ॥५॥ इत्युक्त्वा त्वरि-
ता तत्र रुद[5]ती मुक्त[6]मूर्धजा ॥ ययौ तारा ऽतिशोकार्ता यत्र भर्तृकलेवरम् ॥ ६ ॥

अद्य (मू.); ॥ २ ॥ [वयं] (पू.) रक्षामहे. ॥ भामिनि, अंगदं तु (मू.) कुरु. ॥३॥ वालिनं (पू.) तारा ॥ (मू.) अताडयत्. ॥ ४ ॥ ' (पू.) किं ? ॥ (मू.) नि[3]धनं या[4]स्यामि. ' ॥ ५ ॥ (मू.) तारा, यत्र भ[7]र्तृकलेवरं, तत्र ययौ. ॥ ६ ॥

१ प्रेरणा दे. २ वारंवार. ३ मरणाला. ४ जाईन. ५ रडणारी. ६ सुटले केश जिचे, अशी. ७ पतीचें प्रेत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'माझाही वध कर.'

वेग तिला सहन होईना. तिचे केंस अस्ताव्यस्त पसरले होते. ॥ ६ ॥ वाली रक्तानें आणि धुळीनें व्याप्त होऊन तेथें पडला होता. त्याला पाहतांच 'हा नाथा! हा नाथा!' असा आक्रोश करीत तारा त्याच्या पायांवर पडली, ॥ ७ ॥ आणि दीनवाणीनें विलाप करूं लागली. इतक्यांत तिची दृष्टि रामचंद्राकडे गेली. तेव्हां ती त्याला ह्मणाली :– 'रामा! ज्या बाणानें वालीचा वध केलास, त्याच्याच योगानें मला मारून टाक. ॥ ८ ॥ ह्मणजे मी पतिलोकास जाईन. पति माझी वाट पाहत आहे. रघुनंदना! मजवांचून त्याला स्वर्गांत देखील सुख वाटणार नाहीं. ॥ ९ ॥ बा पुण्यपुरुषा! पत्नीच्या वियोगापासून होणारें दुःख किती दुःसह असतें, त्याचा अनुभव तुला मिळाला आहेच. ह्मणून आतांच्या आतां मला वालीला देऊन टाक

पतितं वालिनं दृष्ट्वा रक्तैः पांसुभिरावृतम् ॥ रुदती नाथनाथेति पतिता तस्य पादयोः ॥ ७ ॥ करुणं विलपन्ती सा ददर्श रघुनन्दनम् ॥ राम मां जहि बाणेन येन वाली हतस्त्वया ॥८॥ गच्छामि पतिसालोक्यं पतिर्मामभिकांक्षते ॥ स्वर्गे ऽपि न सुखं तस्य मां विना रघुनन्दन ॥ ९ ॥ पत्नीवियोगजं दुःखमनुभूतं त्वया ऽनघ ॥ वालिने मां प्रयच्छाशुं पत्नीदानफलं भवेत् ॥ १० ॥

वालिनं (पू.) [च] दृष्ट्वा ॥ 'नाथ! नाथ!' इति (मू.) पतिता. ॥७॥ (पू.) ददर्श, [आह च–] 'राम, त्वया (मू.), [तेन] बाणेन मां जहि. ॥ ८ ॥ पतिसालोक्यं (पू.). ॥ रघुनन्दन, तस्य मां विना (मू.) न. ॥ ९ ॥ अनघ, त्वया (मू.). ॥ १० ॥

१ धुळीनें. २ विलाप करणारी. ३ मार. ४पति ज्या लोकीं गेला त्या लोकास. ५ वाट पाहतो. ६प्रयच्छ दे. ७ आशु शीघ्र.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

(वालीच्या स्वाधीन कर); ह्मणजे तुला पत्नीदानाचें फळ मिळेल (तुझ्या पत्नीची भेट होईल). ॥१०॥ सुग्रीवा! रामचंद्रानें वालीचा घात करून त्याच्याकडून तुला राज्य देवविलें आहे. आतां तुला शत्रु कोणी राहिला नाहीं. ह्मणून, बाबा! तूं रुमेसह त्याचा खुशाल उपभोग घे!' ॥११॥ अशाप्रकारें तारा शोक करीत असतां, उदार मनाच्या रामचंद्रानें तत्वज्ञानाचा उपदेश करून कृपेनें तिचें सांत्वन केलें :- तो ह्मणाला :- ॥ १२ ॥ " भित्र्ये! पति हा शोकाचा विषय मुळींच नव्हे; मग त्याच्यासाठीं व्यर्थ शोक कां बरें करीत आहेस? मला खरें खरें सांग कीं, तुझा पति कोणता—हा देह कीं जीव ?॥१३॥काल, प्राक्तन कर्में, आणि सत्त्वादिगुण ह्यांच्या योगें उत्पन्न होणारा हा देह पंचभूतांचा विकार (कार्य) असून त्वचा, मांस, रक्त आणि अस्थि ह्यांनीं युक्त

सुग्रीव त्वं सुखं राज्यं दापितं वालिघातिना॥ रामेण रुमया सार्धं भुंक्ष्व सापत्नव-र्जितम्॥११॥इत्येवं विलपन्तीं तां तारां रामो महामनाः॥ सान्त्वयामास दयया तत्त्वज्ञानोपदेशतः॥१२॥ किं भीरु शोचसि व्यर्थं शोकस्याविषयं पतिम् ॥ पति-स्तवायं देहो वा जीवो वा वद तत्त्वतः॥ १३ ॥ पञ्चात्मको जडो देहस्त्वङ्मांस-रुधिरास्थिमान् ॥ कालकर्मगुणोत्पन्नः सोऽप्यास्तेऽद्यापि ते पुरः॥ १४ ॥

(मू.) [वालिना] दापितं सापत्नवर्जितं राज्यं रुमया सार्धं सुखं भुंक्ष्व. ' ॥ ११ ॥ महामनाः रामः (मू.) सान्त्वयामास— ॥१२॥ ' (पू.) व्यर्थं किं शोचसि? ॥ तव (मू.) वद. ॥१३॥ कालकर्मगु-णोत्पन्नः (मू.) देहः [पतिः इति यदि मन्यसे, तर्हि] सः अपि ते पुरः अद्यापि आस्ते. ॥ १४॥

१ देवविलेलें. २ शत्रुरहित. ३ बरोबर. ४ उपभोग घे. ५ मोठें मन ज्याचें, असा. ६ भित्र्ये. ७ पंचभूतरूपी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'सुख दुःखें कोण भोगितो ? देह कीं जीव ?'

असतो. तो (देह) तर अद्याप तुझ्या पुढें आहेच. ॥१४॥ बरें, तूं जीवाला, आपला पति, असें मानीत असशील - तरीही शोक करण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं; कारण, - जीव निर्विकार आहे; त्याला उत्पत्ति नाहीं; मरण नाहीं, तसाच तो स्थिर राहत नाहीं, किंवा गमनही करीत नाहीं. ॥ १५॥ जीव स्त्री नव्हे, पुरुष नव्हे, किंवा नपुंसकही नव्हे, तर सर्वव्यापी, निर्विकार असून एक आहे; त्याच्या ठिकाणीं द्वितीयभाव नाहीं; तो आकाशाप्रमाणें सर्वत्र व्यापून राहिला असतांही अलिप्त आहे. त्याचें स्वरूप तीन्ही कालीं नष्ट न होणारें ज्ञानमय व शुद्ध होय. अर्थात, त्याच्याबद्दल शोक करणें योग्य कसें होईल !" ॥ १६ ॥ ह्यावर तारा ह्मणाली :– 'रामा ! देह काष्ठाप्रमाणें जड व नाशवंत आहे; आणि आत्मा तर अविनाशी व चैतन्यस्वरूप आहे. मग, रामा, सुखदुःखांचा संबंध तरी आहे कोणाला, तें मला सांग.' ॥ १७ ॥

मन्यसे जीवमात्मानं जीवस्तर्हि निरामयः[1] ॥ न जायते[2] न म्रियते[3] न तिष्ठति[4] न गच्छति[5] ॥१५॥ न स्त्री पुमान्वा षण्ढो[6] वा जीवः सर्वगतो[7] ऽव्ययः ॥ एक एवाद्वितीयो ऽयमाकाशवदलेपकः[8] ॥ नित्यो ज्ञानमयः शुद्धः स कथं शोकमर्हति ॥ १६ ॥ तारोवाच । देहो ऽचित्[9]काष्ठवद्राम जीवो नित्यश्चिदात्मकः ॥ सुखदुःखादिसम्बन्धः कस्य स्याद्राम मे वद ॥ १७ ॥

[यदि] जीवं आत्मानं (मू.) ? ' ॥ १५ ॥१६॥ तारा उ०– 'राम, (पू.). ॥ राम, (मू.).' ॥१७॥

१ निर्विकार. २ उद्भवतो. ३ मरतो. ४ स्थिर राहतो. ५ चालतो. ६ नपुंसक. ७ सर्वव्यापी. ८ अलिप्त. ९अचित् जड.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीरामचंद्र ह्मणाला :– " तारे, जीवाला जोंपर्यंत देह आणि इंद्रियें ह्यांविषयीं 'मी' आणि 'माझीं' असा अभिमान वाटत असतो व 'हीं मजहून वेगळीं आहेत' असा विचार होत नाहीं, तोंपर्यंतच हा संसार लागलेला आहे. ॥ १८ ॥ विषयांचें सतत चिंतन करणाऱ्या मनुष्याला स्वप्नांत अनेक पदार्थ दिसतात; स्वप्नांत दिसणाऱ्या वस्तु मिथ्या होत हें खरें, तथापि जागा होईपर्यंत त्याला ते पदार्थ खोटे वाटत नाहींत; ह्या दृष्टांताप्रमाणेंच हा संसार मिथ्या आरोपिलेला किंवा कल्पित आहे खरा, तथापि आपोआप (विचारावांचून) निवृत्त व्हावयाचा नाहीं. ॥ १९ ॥ वस्तुतः निरर्थक (अत्यंत मिथ्याभूत) व राग, द्वेष इत्यादि विकारांनीं पूर्ण भरलेला असा हा संसार, अनात्म (जड) वस्तूंवर आत्मबुद्धि ठेविल्यामुळें आणि त्या अज्ञानाचें कार्य जो अहंकार त्यापासून, उद्भवतो. ॥ २० ॥ हे शुभलक्षणे, मन हेंच संसार व मन

श्रीराम उ० । अहंकारादिसंबन्धो यावद्देहेन्द्रियैः सह ॥ संसारस्तावदेव स्यादात्मनस्त्वविवेकिनः ॥ १८ ॥ मिथ्यारोपितसंसारो न स्वयं विनिवर्तते ॥ विषयान्ध्यायमानस्य स्वप्ने मिथ्यागमो यथा ॥ १९ ॥ अनाद्यविद्यासंबन्धात्तत्कार्याहंकृतेस्तथा ॥ संसारोऽपार्थकोऽपि स्याद्रागद्वेषादिसंकुलः ॥ २० ॥ मन एव हि संसारो बन्धश्चैव मनः शुभे ॥

श्रीरामः उवाच– ' यावत् देहेंद्रियैः सह (पू.) ॥ तावत् एव (मू.) आत्मनः संसारः स्यात्. ॥ १८ ॥ (मू.), [तथा] स्वयं न विनिवर्तते. ॥ १९ ॥ अपार्थकः अपि रागद्वेषादिसंकुलः संसारः (पू.) स्यात्. ॥ २० ॥ शुभे, (पू.). ॥

१ विचारशून्य ('मी देहांतःकरणादिकांहून वेगळा' असें न समजणाऱ्या.) २ दूर होतो. ३ प्रीति द्वेष इत्यादिकांनीं व्याप्त.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हेंच बंधन होय. आत्मा स्वतांचें मनाशीं ऐक्य मानतो व त्याचे धर्म आपल्यावर ओढून घेतो ह्मणून त्याला मनावरील बंधनाचें दुःख भोगावें लागतें. ॥२१॥ ज्याप्रमाणें अगदीं निर्मल असा एखादा स्फटिकमणि अळिता, पिवडी इत्यादि पदार्थांच्या जवळ असला ह्मणजे त्या त्या पदार्थांच्या वर्णांनीं युक्त दिसूं लागतो, वास्तविक त्याला कोणताच रंग नाहीं, त्याप्रमाणें,॥२२॥ बुद्धि, इंद्रियें इत्यादिकांच्या सामीप्यामुळें आत्म्यावर बलात्कारानें संसाराचा आरोप केला जातो. आत्मा, स्वतांच्या अनुमानाला साधन जें मन, त्याचा स्वीकार करितो, व अविवेकी होऊन त्या मनापासून उद्भवणाऱ्या॥२३॥ विषयांचा उपभोग घेत राहतो; शेवटीं त्याला मनाच्या रागद्वेषादि गुणांनीं बद्ध झाल्याप्रमाणें पराधीन होऊन संसारांत पडावें लागतें. मन प्रथमतः रागद्वेषादि गुण उत्पन्न

आत्मा मनः[1]समानत्वमे[2]त्य तद्गतबन्[3]धभाक् ॥२१॥ यथा विशुद्धः स्फटिको ऽ[4]लक्त-
कादिसमीपगः ॥ तत्त[5]द्वर्णयुग्[6]भाति वस्तुतो नास्ति र[7]ञ्जनम् ॥ २२ ॥ बुद्धी-
न्द्रियादिसामीप्यादात्मनः संसृतिर्बलात् ॥ आत्मा स्व[8]लिंगं तु मनः परि[9]गृह्य
तदु[10]द्भवान् ॥ २३ ॥ का[11]मान् जु[12]षन् गुणैर्बद्धः संसारे वर्तते ऽव[13]शः ॥ आदौ
मनो गुणान् सृष्ट्वा ततः कर्माण्यनेकधा ॥ २४ ॥

(मू.)॥२१॥(मू.)नास्ति,॥२२॥[तथा]आत्मनः(पू.)संसृतिः.॥(मू.)॥२३॥(पू.)वर्तते.॥(मू.)[ससर्ज].।२४।

१ मनाशीं ऐक्याला. २ एत्य पावून. ३ त्या मनाच्या ठिकाणीं असणाऱ्या बंधांना भोगणारा. ४ अळिता इत्यादि पदार्थांच्या जवळ असणारा. ५ त्या त्या (पदार्थांच्या) रंगानें युक्त. ६ आभाति भासतो. ७ रंग. ८ स्वतांच्या अनुमानाला साधन. ९ स्वीकारून. १० त्यापासून उद्भवणाऱ्या. ११ उपभोगांना. १२ सेवन करणारा. १३ पराधीन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करून नंतर त्या गुणांच्या योगानें अनेक प्रकारांचीं कर्मे निर्माण करितें. ॥ २४ ॥ त्या कर्मांचे शुक्ल (हिंसारहित जप, ध्यान इत्यादि), लोहित (हिंसामिश्र यज्ञयागादि), आणि कृष्ण (पापकर्में) असे तीन भेद आहेत. त्या कर्मांच्या गतिही प्रत्येकाच्या योग्यतेप्रमाणें वेगवेगळ्या (उत्तम, मध्यम, अधम) आहेत. जीव अशाप्रकारच्या त्या कर्मांच्या अधीन होऊन प्रलयकालपर्यंत भ्रमण करीत राहतो. ॥ २५ ॥ त्याचा अंतःकरणादिकांवर 'हा मीच ' असा पूर्ण ग्रह असतो म्हणून प्रलय कालीं सर्व भूतांचा संहार झाला असतां, तो वासना आणि स्वतांचीं कर्मे ह्यांसहवर्तमान, त्या अंतःकरणादिकांचें आदि कारण जी अनादि अविद्या, तिच्या ठिकाणीं लीन होऊन राहतो; ॥ २६ ॥ पुन्हां नूतन सृष्टीच्या वेळीं, - जसे गेल्या पावसाळ्याच्या शेवटीं बीजरूपानें लीन होऊन राहिलेले बेडूक दुसऱ्या वर्षाऋतूंत पुन्हां उत्पन्न होतात

शुक्ललोहितकृष्णानि गतयस्तत्समानतः ॥ एवं कर्मवशाज्जीवो भ्रमत्या[1]भूतसं-
प्लवम् ॥ २५ ॥ सर्वो[3]पसंहृतौ जीवो वासनाभिः स्वकर्मभिः ॥ अना[5]द्यविद्या-
वशगस्तिष्ठत्यभिनिवेशतः ॥ २६ ॥ सृष्टिकाले पुनः पूर्ववासना[6]मानसैः सह ॥
[7]जायते पुनरप्येवं [8]घटीयन्त्रमिवावशः ॥ २७ ॥

[कर्माणि] (पू.) गतयः [भवंति.] ॥ (मू.) [2]भ्रमति. ॥ २५ ॥ जीवः (पू.) [च सह] ॥ [4]अभिनिवेशतः (मू.) [सन] तिष्ठति. ॥ २६ ॥ (मू.) [तिष्ठति.] ॥ २७ ॥

१ भूतांचा प्रलय होईपर्यंत. २फिरत असतो. ३सर्वांचा उपसंहार(आटोपून घेणें, प्रलय) होतो तेव्हां. ४अंतःकरणाला ' मीच ' असें मानितो, ह्मणून. ५ जिला आदि (जन्म) नाहीं अशा अविद्येच्या (अंतःकरणादिकांचें आदिकारण जी प्रकृति तिच्या) ठिकाणीं लीन होऊन राहणारा. ६ पूर्वकल्पांतील वासना, आणि मानस म्हणजे मनानें केलेलीं कर्मे ह्यांशीं. ७ जन्मास येतो. ८ रहाटगाडगें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याप्रमाणें, तो (जीव) प्राचीन वासना आणि कर्में ह्यांसह जन्मास येतो. अशा रीतीनें त्याला रहाटगाडग्याप्रमाणें पराधीन होऊन जन्ममरणपरंपरा भोगीत राहावें लागतें! ॥ २७ ॥ पुढें एखादे प्रसंगीं कांहीं विशेष पुण्यकर्माच्या प्रभावानें, पूर्ण शांत व माझें भजन करण्यांत सदा तत्पर अशा सत्पुरुषांचा समागम घडला म्हणजे त्याच्या बुद्धीला 'महासमर्थ ईश्वर म्हणून कोणी आहे' असें वाटूं लागतें. ॥ २८ ॥ तारे! प्राण्याला, माझ्या (रामाच्या) कथा ऐकाव्या, असें वाटणें परम दुर्घट आहे, परंतु सत्समागम मिळाला ह्मणजे त्यांच्याबद्दल श्रद्धा (कथा ऐकण्याबद्दल आस्था) उत्पन्न होते; नंतर, स्वस्वरूपाच्या ज्ञानाला साधनभूत वैराग्य होतें (विषय तुच्छ वाटूं लागतात). ॥ २९ ॥ पुढें, सद्गुरूच्या कृपेनें महावाक्यार्थाचा उपदेश मिळतो व त्याला 'आत्मा देह, इंद्रियें, मन, प्राण आणि अहंकार ह्यांहून वेगळा असून ॥ ३० ॥ तीन्ही काळीं नष्ट न होणारा, आनंदमय व द्वैतरहित आहे' असें प्रत्यक्ष

यदा पुण्यविशेषेण लभते संगतिं सताम् ॥ मद्भक्तानां सुशान्तानां तदा मद्विषया मतिः ॥ २८ ॥ मत्कथाश्रवणे श्रद्धा दुर्लभा जायते ततः ॥ ततः स्वरूपविज्ञानमनायासेन जायते ॥ २९ ॥ तदाऽऽचार्यप्रसादेन वाक्यार्थ-ज्ञानतः क्षणात् ॥ देहेन्द्रियमनःप्राणाहंकृतिभ्यः पृथक् स्थितम् ॥ ३० ॥ स्वात्मानुभवतः सत्यमानन्दात्मानमद्वयम् ॥

(मू.) संगतिं लभते, तदा मद्विषया मतिः [जायते]. ॥ २८ ॥ ततः दुर्लभा (मू.). ॥ २९ ॥ ३० ॥ (पू.) आनन्दात्मानं स्वात्मानुभवतः ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अनुभवसिद्ध ज्ञान प्राप्त होतें. हें ज्ञान झालें कीं तो तत्क्षणींच मुक्त होतो. तारे, हा यथार्थ प्रकार मी तुला निवेदन केला. ॥ ३१ ॥ जो मनुष्य मी सांगितलेल्या ह्या गोष्टीचा नित्य विचार करितो, त्याला संसारांतील दुःखें कधींही भोगावीं लागत नाहींत. ॥ ३२ ॥ तारे, तूं देखील ह्या माझ्या उपदेशाचा सूक्ष्म विचार कर; म्हणजे तुझी बुद्धि निर्मल होईल, तुला दुःखसमूहाचा संपर्क लागणार नाहीं, व शेवटीं कर्मबंधापासून मुक्ति मिळेल. ॥ ३३ ॥ सुंदरि, तुझें भाग्य परम थोर आहे. तूं पूर्व जन्मीं माझी उत्तम प्रकारें भक्ति केली होतीस; ह्मणून तुला मोक्ष मिळावा एवढ्यासाठींच मी ह्या रूपाचें दर्शन दिलें. ॥ ३४ ॥ तूं निरंतर माझ्या स्वरूपाचें ध्यान आणि ह्या उपदेशाचें चिंतन करीत राहा, ह्मणजे संसाराच्या

ज्ञात्वा सद्यो भवेन्मुक्तः सत्यमेव मयोदितम् ॥ ३१ ॥ एवं मयोदितं सम्यगा-
लोचयति यो ऽनिशम् ॥ तस्य संसारदुःखानि न स्पृशन्ति कदाचन ॥ ३२ ॥
त्वमप्येतन्मया प्रोक्तमालोचय विशुद्धधीः ॥ न स्पृश्यसे दुःखजालैः कर्मबन्धा-
द्विमोक्ष्यसे ॥ ३३ ॥ पूर्वजन्मनि ते सुभ्रु कृता मद्भक्तिरुत्तमा ॥ अतस्तव वि-
मोक्षाय रूपं मे दर्शितं शुभे ॥३४॥ ध्यात्वा मद्रूपमनिशमालोचय मयोदितम्॥

(मू.) भवेत्. मया सत्यं एव उदितं. ॥ ३१ ॥ यः (पू.) आलोचयति, ॥ (मू.) न स्पृशन्ति. ॥ ३२ ॥ (पू.); [आलोचनेन] विशुद्धधीः [सती] ॥ दुःखजालैः (मू.). ॥ ३३ ॥ सुभ्रु, ते (पू.) मद्भक्तिः कृता. ॥ शुभे, (मू.) रूपं दर्शितं. ॥ ३४ ॥ मद्रूपं अनिशं (पू.) आलोचय; ॥

१ वर्णिलें. २ विचार करतो. ३ शिवतात. ४ दुःखांच्या समूहांनीं. ५ मुक्त होशील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तारा जीवन्मुक्त झाली.

प्रवाहांतील कार्यें केलींस तरी लिप्त होणार नाहींस. " ॥ ३५ ॥ तारेनें हें रामाचें समग्र भाषण ऐकून घेतलें तेव्हां तिला परम आश्चर्य वाटलें. देहावर अभिमान असल्यामुळें - 'वाली आपला पति' असें वाटून - तिला शोक झाला होता; पण आतां तिनें तो (शोक) सोडून दिला व रघुवीराला वंदन केलें. ॥ ३६ ॥ (शंकर ह्मणाले :—पार्वति !) प्रभु रामचंद्राच्या क्षणमात्र समागमाचें - फल किती विलक्षण आहे पहा :- तारेला आत्मस्वरूपाच्या साक्षात्कारापासून उद्भवणारा आनंद आणि जीवन्मुक्ति प्राप्त झाली; ॥ ३७ ॥ तिच्या अंतःकरणावरील मल दूर झाले व ती अनादि अविद्येचें बंधन सोडून मुक्ति पावली. ॥ ३८ ॥ रामाच्या मुखांतून निघालेलीं हीं उपदेशवचनें कानीं पडतांच सुग्रीवाचेंही ॥ ३८ ॥ सर्व अज्ञान दूर

प्रवाहपतितं कार्यं कुर्वत्यपि न लिप्यसे ॥३५॥ श्रीरामेणोदितं सर्वं श्रुत्वा तारा ऽतिविस्मिता ॥ देहाभिमानजं शोकं त्यक्त्वा नत्वा रघूत्तमम् ॥ ३८ ॥ आत्मानुभवसंतुष्टा जीवन्मुक्ता बभूव ह ॥ क्षणसंगममात्रेण रामेण परमात्मना ॥ ॥ ३७ ॥ अनादिबन्धं[1] निर्धूय[2] मुक्ता सा ऽपि विकल्मषा[3] ॥ सुग्रीवो ऽपि च तच्छ्रुत्वा रामवक्त्रात्[4]समीरितम्[5] ॥३८॥ जहावज्ञानमखिलं स्वस्थचित्तो ऽभवत्तदा ॥

(मू.).' ॥ ३५ ॥ (पू.) तारा ॥ (मू.) नत्वा, ॥ ३६ ॥ (पू.). ॥ परमात्मना रामेण (मू.) ॥३७॥ अपि सा (पू.) मुक्ता [घ कृता.] ॥ (मू.) श्रुत्वा, ॥ ३८ ॥ अखिलं अज्ञानं जहौ[6]; तदा (पू.). ॥

१ प्राचीन कालापासून चालत आलेल्या बंधनाला. २ टाकून. ३ निष्पाप. ४ रामाच्या मुखांतून. ५ बाहेर पडलेलें. ६ टाकिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होऊन चित्त तत्काल स्वस्थ झालें. नंतर रामचंद्र त्या वानरराजाला ह्मणाला :– 'सुग्रीवा ! ॥ ३९ ॥ आपल्या ज्येष्ठ भ्रात्याचे और्ध्वदेहिक संस्कार वगैरे जे कांहीं करणें विहित व न्यायास अनुसरून असतील ते सर्व त्याच्या पुत्राकडून करावेस, अशी माझी तुला आज्ञा आहे. ॥ ४० ॥ सुग्रीवानें 'जशी प्रभूची आज्ञा' असें ह्मणून मुख्य व बलवान् अशा वानरांना - बोलाविलें - आणि समस्त राजोपचारांसह वालीला पुष्पक विमानांत ठेवून उचलून नेलें. ॥ ४१ ॥ नगारे नौबदी वाजूं लागल्या. सुग्रीवानें ब्राह्मण, मंत्री, सैन्यांतील मोठमोठे वीर वानर, नागरिकजन, तारा आणि अंगद ह्यांना बरोबर घेऊन ॥ ४२ ॥ जाऊन

ततः सुग्रीवमाहेदं रामो वानर[1]पुंगवम् ॥ ३९॥ भ्रातुर्ज्येष्ठस्य पुत्रेण यद्युक्तं साम्प[2]-
रायिकम् ॥ कुरु सर्वं यथान्यायं संस्कारादि ममाज्ञया ॥४०॥ तथेति बलिभिर्मु-
ख्यैर्वानरैः परिणीय तम् ॥ वालिनं पुष्पके[4] क्षिप्त्वा[5] सर्वराजोपचारकैः ॥४१॥ भेरि-
दुन्दुभि[6]निर्घोषैर्ब्राह्मणैर्मन्त्रिभिः सह ॥ यूथपै[7]र्वानरैः पौरै[8]स्तारया चांगदेन च॥४२॥

(मू.) सुग्रीवं इदं आह – ॥ ३९ ॥ ज्येष्ठस्य (मू.), [तत्] सर्वं मम आज्ञया [तस्य] पुत्रेण यथान्यायं कुरु. ॥ ४० ॥ तथा इति (मू.) परिणीय[3], ॥ सर्वराजोपचारकैः [युक्तं] (मू.), ॥ ४१ ॥ (मू.) सह ॥ ४२ ॥

---

१ वानरश्रेष्ठ, अशा. २ उत्तरक्रिया. ३ नेऊन. ४ पुष्पक विमानांत. ५ ठेवून. ६ नगारे नौबदी ह्यांच्या घोषांशीं. ७ सैन्याच्या वेगवेगळ्या टोळ्यांचें रक्षण करणारे, अशा. ८ नगरांत राहणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राज्याभिषेकांस रामाची अनुज्ञा.

वालीची सर्व उत्तर क्रिया यथाशास्त्र व मोठ्या दक्षतेनें केली. नंतर तो स्नान करून मंत्रिमंडळासह रामाजवळ आला ॥४३॥ आणि अत्यंत आनंदित मनानें चरणास वंदन करून रामाला ह्मणाला :–'राजाधिराजा! आपण हें अखिल समृद्धींनीं भरलेलें वानरांचें राज्य चालवावें. ॥ ४४ ॥ मी आपला दास लक्ष्मणाप्रमाणें चिरकाल आपल्या चरणकमलाची सेवा करीत राहीन.' हें भाषण ऐकिल्यावर रामचंद्र हांसत हांसत सुग्रीवाला ह्मणाला :– ॥ ४५ ॥ 'सुग्रीवा ! तूं आणि मी एकच, ह्यांत संदेह नाहीं (तूं राज्य भोगलेंस ह्मणजे मला पावलें; तुझ्या माझ्यांत भेदभाव नाहीं). ह्मणून मी तुला आज्ञा देतों कीं, लवकर जाऊन

गत्वा चकार तत्सर्वं यथाशास्त्रं प्रयत्नतः ॥ स्नात्वा जगाम रामस्य समीपं मन्त्रिभिः सह ॥ ४३ ॥ नत्वा रामस्य चरणौ सुग्रीवः प्राह हृष्टधीः ॥ राज्यं प्रशाधि राजेन्द्र वानराणां समृद्धिमत् ॥ ४४ ॥ दासोऽहं ते पादपद्मं सेवे लक्ष्मणवच्चिरम् ॥ इत्युक्तो राघवः प्राह सुग्रीवं सस्मितं वचः ॥ ४५ ॥ त्वमेवाहं न संदेहः शीघ्रं गच्छ ममाज्ञया ॥ पुरराज्याधिपत्ये त्वं स्वात्मानमभिषेचय ॥४६॥

(पू.) चकार. ॥ (मू.) जगाम. ॥ ४३ ॥ हृष्टधीः सुग्रीवः रामस्य चरणौ (पू.) – ॥ '(मू.) राज्यं प्रशाधि.[1] ॥ ४४ ॥ (पू.) सेवे.[2]' ॥ (मू.) प्राह – ॥ ४५ ॥ '(पू.) गच्छ. ॥ त्वं (मू.). ॥ ४६ ॥

१ शासन कर (चालव). २ सेवा करितों.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तूं स्वतांला किष्किंधा नगरीच्या राज्याचा अभिषेक करव. ॥ ४६ ॥ मित्रा ! चवदा वर्षें पर्यंत मला नगरांत प्रवेश करणें नाहीं. माझा भाऊ लक्ष्मण तुझ्या राजधानींत येईल. ॥४७॥ तूं आदरपूर्वक अंगदाला यौवराज्याभिषेक करव. मी कनिष्ठबंधूसह जवळच पर्वताच्या शिखरावर ॥४८॥ पावसाळा संपेपर्यंत राहीन. आतां कांहीं दिवस तूं स्वस्थपणें नगरांत राहा आणि नंतर सीतेचा शोध लावण्यासाठीं यत्न करूं लाग.' ॥४९॥ सुग्रीवानें रामचरणीं साष्टांग नमन करून ह्मटलें :– 'देवा, आपण जशी आज्ञा दिली, तीप्रमाणेंच व्यवस्था करितों.' ॥५०॥ नंतर रामाकडून अनुमोदन मिळालें असतां सुग्रीव लक्ष्मणाला बरोबर घेऊन नगरांत

नगरं न प्रवेक्ष्यामि चतुर्दश समाः सखे ॥ आगमिष्यति मे भ्राता लक्ष्मणः पत्तनं तव ॥४७॥ अंगदं यौवराज्ये त्वमभिषेचय सादरम् ॥ अहं समीपे शिखरे पर्वतस्य सहानुजः ॥ ४८ ॥ वत्स्यामि वर्षदिवसांस्ततस्त्वं यत्नवान् भव ॥ किंचित्कालं पुरे स्थित्वा सीतायाः परिमार्गणे ॥ ४९ ॥ साष्टांगं प्रणिपत्याह सुग्रीवो रामपादयोः ॥ यदाज्ञापयसे देव तत्तथैव करोम्यहम् ॥ ५० ॥ अनुज्ञातस्तु रामेण सुग्रीवस्तु सलक्ष्मणः ॥

सखे, चतुर्दशसमाः (मू.). पत्तनं[1] आगमिष्यति. ॥ ४७ ॥ त्वं यौवराज्ये (पू.) अभिषेचय. ॥ सहानुजः अहं [नगरस्य] (मू.) शिखरे ॥ ४८ ॥ वर्षदिवसान्[3] (मू.) यत्नवान् भव. ' ॥४९॥ (पू.) साष्टाङ्गं प्रणिपत्य आह – ॥ ' देव, अहं (मू.). ' ॥ ५० ॥ रामेण (पू.) सुग्रीवः ॥

---

१ नगराला. २ येईल. ३ वर्षाऋतूच्या दिवसांत. ४ राहीन. ५ शोधाविषयीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ते पर्वतावर राहतात.

आला. तेथें त्यानें रामाच्या आज्ञेप्रमाणें - उभयतांस (स्वतांला व अंगदाला) राज्याभिषेक करविले, ॥ ५१ ॥ आणि लक्ष्मणाची शास्त्रोक्त विधीनें किंवा न्यायास अनुसरून पूजा केली. तेथील कर्तव्यभाग संपल्याबरोबर लक्ष्मण रामचंद्राकडे आला व वंदन करून सेवेसाठीं जवळ उभा राहिला. ॥५२॥ पुढें लागलाच रामचंद्र लक्ष्मणासहवर्तमान तेथून निघाला तो प्रवर्षणनामक पर्वताच्या उच्च व अति विस्तीर्ण अशा शिखरावर गेला. ॥ ५३ ॥ तेथें एक स्फटिक मण्यांची तेजस्वी गुहा त्याच्या दृष्टीस पडली. त्या रमणीय स्थळीं वृष्टि, वायु आणि ऊन ह्यांच्या निवारणाची तजवीज असून जवळच फळें मुळेंही होतीं. तें पाहून रामलक्ष-

गत्वा पुरं तथा चक्रे यथा रामेण चोदि[१]तः ॥ ५१ ॥ सुग्रीवेण यथान्यायं पूजितो लक्ष्मणस्तदा ॥ आगत्य राघवं शीघ्रं प्रणिपत्योपतस्थि[२]वान् ॥ ५२ ॥ ततो रामो जगामाशु लक्ष्मणेन समन्वितः ॥ प्रव[३]र्षणगिरेरूर्ध्वं शिखरं भूरिविस्त[४]रम् ॥ ५३ ॥ तत्रैकं गह्वरं दृष्ट्वा स्फाटि[५]कं दीप्ति[६]मच्छुभम् ॥ वर्षवाता[७]तपसहं फलमू[८]लसमीपगम् ॥ वासा[१०]य रोचयामा[११]स तत्र रामः सलक्ष्मणः ॥ ५४ ॥

पुरं (मू.) तथा चक्रे. ॥ ५१ ॥ तदा (पू.) ॥ शीघ्रं राघवं (मू.). ॥५२॥ (पू.) रामः ॥ (मू.) शिखरं आशु जगाम. ॥ ५३ ॥ सलक्ष्मणः रामः (पू. द्वि.) ग[९]ह्वरं दृष्ट्वा, तत्र (मू.). ॥ ५४ ॥

१ प्रेरणा (आज्ञा) दिलेला. २ जवळ (सेवेसाठीं) उभा राहिला. ३ प्रवर्षण पर्वताच्या. ४ फार विस्तीर्ण. ५ स्फटिकांनीं निर्मिलेल्या. ६ लखलखीत. ७ वृष्टि, वायु आणि ऊन्ह सहन करणाऱ्या. ८ फळांच्या आणि मुळांच्या जवळ जाणाऱ्या (फळें मुळें ज्याजवळ आहेत) अशा. ९ गुहेला. १० राहण्यास. ११ पसंत करिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णांच्या मनांत, तेथेंच राहावें, असें वाटलें. ॥ ९४ ॥ (शंकर ह्मणाले :– पार्वति,) प्रवर्षण पर्वतावर दिव्य मुळें, फळें, व पुष्पें विपुल असून जागोजाग मोत्यांसारख्या स्वच्छ उदकानें भरलेलीं लहान लहान सरोवरें होतीं. चित्रविचित्र वर्णांचे पशु व पक्षी - इकडे तिकडे फिरत असल्यामुळें तो प्रदेश - शोभिवंत दिसे. रघुकुलभूषण राम त्या पर्वतावर राहिला. ॥ ९५ ॥

इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे किष्किंधाकाण्डे तृतीयः सर्गः ॥ ३ ॥

लक्ष्मणासहवर्तमान रामचंद्र पावसाळ्याचे दिवस संपेपर्यंत त्या पर्वतावर सुखानें राहिला. तो कधीं कधीं तेथें असलेल्या रत्नांच्या गुहांत सहजगत्या फिरावयास जाई. पक्क मुळें आणि फळें भक्षण करावयास मिळा-

दिव्यमूल[1]फलपुष्पसंयुते मौक्तिकोपम[2]जलौघपल्वले ॥ चित्रवर्ण[3]मृगपक्षिशोभिते
पर्वते रघुकुलोत्तमो ऽवसत्[4] ॥ ५५ ॥ इति श्रीमदध्या॰ उमा॰ किष्किन्धाकांडे
तृतीयः सर्गः ॥ ३ ॥ तत्र वार्षिकदिनानि राघवो लीलया मणिगुहासु[5] संचरन्[6] ॥
पक्कमूलफलभोगतोषितो लक्ष्मणेन सहितो ऽवसत्सुखम् ॥ १ ॥

रघुकुलोत्तमः (मू.). ॥ ५५ ॥ इति किष्किन्धाकाण्डे तृतीयः सर्गः ॥३॥ (मू.) राघवः वार्षिक[7]दिनानि [व्याप्य] सुखं अवसत्. ॥ १ ॥

---

१ उत्तम मुळें, फळें व फुलें ह्यांनीं युक्त. २ मोत्यांसारखा उदकसमुदाय ज्यांत, अशीं लहान सहान सरोवर जेथें, अशा. ३ चित्रविचित्र वर्णांच्या पशुपक्ष्यांनीं सुशोभित. ४ राहिला. ५ रत्नांच्या गुहांत. ६ फिरणारा. ७ पावसाच्या दिवसांत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यामुळें त्याचें अंतःकरण संतुष्ट असे. ॥ १ ॥ पाण्यानें भरलेले (काळेभोर) मेघ वायुगतीच्या अनुरोधानें त्या पर्वतावर इकडून तिकडे तिकडून इकडे फिरत, त्यांच्यामध्यें वेळोवेळीं विजा चमकत व गर्जना होई; तें पाहून रामाला, हा एखादा हत्तींचा कळप चालला असावा, त्यांतील प्रत्येक हत्तीच्या पाठीवर उत्तम(बावनकशी) सोन्याची झूल घातलेली असावी, आणि त्यांतील कांहीं हत्ती ओरडत असावे, असा भास पडे आणि फार आश्चर्य वाटे.॥२॥कोमल तृण भक्षण करून संतुष्ट व पुष्ट झालेले पशु आणि पक्षी आसमंतात् प्रदेशीं धांवत, व राम दृष्टीस पडला कीं - त्याचें स्वरूप पूर्णपणें बघण्यासाठीं - डोळे ताठ उघडून उभे राहत;॥३॥महामुनि ध्यानांत निमग्न असले ह्मणजे जसे निश्चल असतात त्याप्रमाणें ह्यावेळीं ते (पशुपक्षी) हालचाल अगदी क-

वातनुन्नजल[2]पूरितमेघानन्तरस्तनितवैद्युतगर्भान् ॥ वीक्ष्य विस्मयमगाद्गजयूथान्य-
द्दाहितसुकांचनक[3]क्षान् ॥ २ ॥ नवघा[6]सं समास्वाँद्य दृष्टपुष्टमृगद्विजाः ॥ धार्व-
न्तः परितो रामं वीक्ष्य विस्फा[9]रितेक्षणाः ॥ ३ ॥ न चलन्ति सदा ध्याननिष्ठा इव
मुनीश्वराः ॥ रामं मानुषरूपेण गिरिका[11]ननभूमिषु ॥ ४ ॥

रामः अंतरस्तनितवैद्युतगर्भान् (मू.) गजयूथान [तद्वत्], वीक्ष्य, विस्मयं अगात्. ॥ २ ॥ (पू.). ॥ परितः (मू.) [सन्तः] ॥ ३ ॥ (४ पू.) इव न चलंति. ॥ सिद्धगणाः (४ उ.) ॥

१ मधून मधून गर्जना करणारा विजांचा समुदाय उदरीं ज्यांच्या, अशा. २ वायूनें चालविलेल्या अशा पाण्यानें भरलेल्या मेघांना. ३ घातल्या आहेत उत्तम सोन्याच्या झुली ज्यांवर, अशा. ४ हत्तींच्या कळपांना. ५ पावला. ६ नूतन तृणाला. ७ भक्षून. ८ धांवणारे. ९ ताठ उघडले नेत्र ज्यांनीं, असे. १० हालतात. ११ पर्वतावरील अरण्य प्रदेशीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रीत नसत : - त्यावरून लोकांना असें वाटूं लागलें कीं, - हे मूळचे सिद्धसमुदाय असून, सध्यां प्रभु रामचंद्र मनुष्यरूपानें पर्वतांवर व वनप्रदेशीं संचार करीत आहे असें कळल्यामुळें भूमीवर पशुपक्ष्यांचीं रूपें घेऊन थव्याथव्यांनीं रामाची सेवा करीतच राहिले असावेत. असो. ॥ ४ ॥ ५ ॥ रामचंद्र नित्य योगसाधन करीत असे. एके प्रसंगीं तो, समाधि उतरल्यावर, एकांतीं स्वस्थ बसला होता. ही संधि पाहून लक्ष्मण नम्र होत्साता प्रेमभक्तिपुरस्सर त्याला ॥६॥ ह्मणालाः– 'देवा, पूर्वीं आपण मला जो उपदेश केला, त्याच्या योगानें माझ्या अंतरीं असलेला अनादि अविद्यामूलक संशय दूर झाला. ॥ ७ ॥ राघवा, लोकामध्यें योगी पुरुष ज्या पूजापद्धतीनें तुझी आराधना करितात, तो प्रकार ऐकावा अशी सांप्रत मला इच्छा झाली आहे. ॥ ८ ॥

चरन्तं परमात्मानं ज्ञात्वा सिद्धगणा भुवि ॥ मृगपक्षिगणा भूत्वा राममेवानुसे-विरे ॥ ५ ॥ सौमित्रिरेकदा राममेकान्ते ध्यानतत्परम् ॥ समाधिविरमे भक्त्या प्रणयाह्निनयान्वितः ॥ ६ ॥ अब्रवीद्देव ते वाक्यात्पूर्वोक्ताद्विगतो मम ॥ अनाद्य-विद्यासंभूतः संशयो ह्वदि संस्थितः ॥ ७ ॥ इदानीं श्रोतुमिच्छामि क्रियामार्गेण राघव ॥ भवदाराधनं लोके यथा कुर्वंति योगिनः ॥ ८ ॥

चरन्तं रामं (मू.). ॥४॥५॥ एकदा (पू.) रामं ॥ (मू.) [सन्] ॥६॥ अब्रवीत् – ' देव, ते पूर्वोक्तात् (मू.) संशयः विगतः,॥७॥राघव,[अस्मिन्]लोकें योगिनः (मू.), [तत्] इदानीं श्रोतुं इच्छामि. ॥८॥

१ सेवा करीत. २ लक्ष्मणा. ३ समाधीच्या अंतीं. ४ जिला आदि नाहीं, अशा अविद्येपासून उद्भवलेला. ५ दूर झाला. ६ सांप्रत. ७ तुझें पूजन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नारदमुनि, व्यास, कमलयोनि ब्रह्मदेव इत्यादि महान् महान् योगी तरी, हें(पूजाप्रकारानें तुझें आराधन)च मोक्षसाधन होय, असें नेहमीं ह्मणत असतात. ॥ ९ ॥ राजाधिराजा, ब्राह्मण क्षत्रिय इत्यादि वर्ण, व ब्रह्मचारी गृहस्थ इत्यादि आश्रम ह्यांना मोक्ष देणारें आणि स्त्रियांना व शूद्रांना मुक्ति प्राप्त होण्याचें सुलभ साधन हेंच होय. रामचंद्रा, मी तुझा भाऊ असून तुजवर पूर्ण भक्ति करितों; ह्मणून त्वां ही माझी जिज्ञासा तृप्त करावी. ह्यापासून लोकांवरही अनुग्रह होईल.' ॥ १० ॥ श्रीरामचंद्र ह्मणाला :– "रघुनंदना (लक्ष्मणा)! माझ्या पूजेचे प्रकार अनंत आहेत :- ते सगळे सांगतां येतील कसे? - तथापि, मी तुला ते शास्त्रोक्त पद्धतीस अनुसरून क्रमाक्रमानें थोडक्यांत सांगतों. ॥ ११ ॥ ज्याच्या मनांत मजविषयीं भक्ति उत्पन्न झाली त्या मनुष्यानें, स्वतांच्या शाखेच्या गृह्यसूत्रांत सां-

इदमेव सदा प्राहुर्योगिनो मुक्तिसाधनम्॥नारदोऽपि तथा व्यासो ब्रह्मा कमल[1]संभवः ॥ ९ ॥ ब्रह्म[2]क्षत्रादिवर्णानामाश्रमाणां च मोक्षदम् ॥ स्त्रीशूद्राणां च राजेन्द्र सुलभं मुक्तिसाधनम् ॥ तव भक्ताय मे भ्रात्रे ब्रूहि लोकोप[3]कारकम् ॥ १० ॥ श्रीराम उवाच । मम पूजा[4]विधानस्य नान्तोऽस्ति रघुनन्दन ॥ तथाऽपि वक्ष्ये संक्षेपा[7]द्यथा[5]वदनु[6]पूर्वशः ॥ ११ ॥ स्वगृह्योक्तप्र[8]कारेण द्विज[9]त्वं प्राप्[10]य मानवः ॥

(उ.) ब्रह्मा [इति] ॥ योगिनः (पू.) माहुः. ॥ ९ ॥ (पू. द्वि.) ॥ लोकोपकारकं [भवदाराधनं] (मू.).' ॥१०॥ श्रीरामः उ० – 'रघुनन्दन, (पू.) न अस्ति, ॥ (मू.) वक्ष्ये.॥११॥मानवः (पू.) ॥

१ कमलांत उत्पन्न झालेला. २ ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य ह्या वर्णांच्या. ३ लोकांवर उपकार करणारें. ४ पूजेच्या प्रकाराचा. ५ शास्त्रांत जसें आहे, तसें. ६ क्रमानें. ७ सांगेन. ८ आपल्या गृह्यसूत्रांत सांगितलेल्या प्रकारानें. ९ ब्राह्मणत्वास. १० पावून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गितल्याप्रकारें ब्राह्मणत्व प्राप्त (उपनयन) झालें असतां, सद्गुरूपासून मंत्राचा उपदेश घ्यावा. ॥ १२ ॥ सद्गुरु पूजेचा विधि सांगून देतात; त्या पद्धतीनें मनुष्यानें सद्भावपूर्वक माझीच आराधना करावी. पूजेचीं स्थानें हृदय, अग्नि, मूर्ति वगैरे किंवा सूर्य हीं होत. ॥ १३ ॥ अथवा शालग्रामशिलेच्या ठिकाणींही माझें पूजन करावें. प्रथमतः आळस सोडून शरीरशुद्धीसाठीं प्रातःकालीं स्नान करावें; ॥ १४ ॥ त्यावेळीं आपआपल्या अधिकाराप्रमाणें - ब्राह्मणक्षत्रियवैश्यांनीं - वेदांत व - शूद्रादिकांनीं - तंत्रांत सांगितलेले मंत्र ह्मणावे; मृत्तिका लावणें इत्यादि स्नानाचे सकल विधि आचरावे. संध्या इत्यादि नित्य कर्मांचें

सकाशात्[1]सद्गुरोर्मन्त्रं लब्ध्वा[2] मद्भक्तिसंयुतः ॥१२॥ तेन संदर्शित[3]विधिर्मामेवाराध[4]-
येत्सुधीः॥हृदये वा ऽनले[5] वार्चेत्प्रतिमादौ[6] विभावसौ[7] ॥१३॥ शालग्रामशिलायां
वा पूजयेन्मामतन्द्रितः[8]॥प्रातः स्नानं प्रकुर्वीत प्रथमं देहशुद्धये ॥१४॥ वेदतन्त्रो[10]-
दितैर्मन्त्रैर्मृल्लेपन[11]विधानतः॥संध्यादि कर्म यन्नित्यं तत्कुर्याद्विधिना बुधः ॥ १५ ॥

सद्गुरोः (बा.१२ उ. १३ पू.) मद्भक्तिसंयुतः [सन्] मां एव आराधयेत्, ॥ (मू.) वा अर्चेत्. ॥१२॥ ॥ १३ ॥ [मानवः] अतन्द्रितः [सन्] (पू.) पूजयेत्. ॥ प्रथमं देहशुद्धये (मू.). ॥ १४ ॥ बुधः (पू.) [स्नानं कुर्वन् सन्] यत् नित्यं (मू.) कुर्यात्. ॥ १५ ॥

---

१ पासून. २ मिळवून. ३ दाखविला विधि ज्याला, असा. ४ पूजा करावी. ५ अग्नींत. ६ मूर्ति इत्यादि ठिकाणीं. ७ सूर्यमंडळीं. ८ पूजा करावी. ९ आलस्यरहित. १० वेदांमध्यें आणि तंत्रांत सांगितलेल्या. ११ मृत्तिका लावणें इत्यादि विधींच्यायोगानें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तत्त्व समजून घेऊन यथाविधि अनुष्ठान करावें. ॥१५॥ पूजेच्या आरंभीं त्या सुबुद्ध पुरुषानें ‘सकल कर्मांच्या सिद्धीसाठीं पूजन करितों’ असा संकल्प करावा व आपल्या गुरूची ‘हा रामचंद्र आहे’ अशा बुद्धीनें भक्तिपूर्वक आराधना करावी. ॥ १६ ॥ पाषाणमय मूर्तींना स्नान घालावें, मृत्तिकादिकांच्या मूर्ति असतील तर त्यांवर नुसतें प्रोक्षण करावें, प्रसिद्ध (शास्त्रांत शुद्ध मानलेल्या) गंधपुष्पादिकांनीं माझी पूजा केली असतां सिद्धि प्राप्त होते. ॥ १७ ॥ मनुष्यानें दंभ करणें सोडून देऊन व नियमपूर्वक व्रत स्वीकारून गुरूनें सांगितल्या विधीच्या अनुरोधें माझी पूजा करावी. कुलनंदना, मूर्तींना अलंकार घातले असतां मला

संकल्पमादौ कुर्वीत सिद्ध्यर्थं कर्मणां सुधीः॥स्वगुरुं पूजयेद्भक्त्या मद्बुद्ध्या पूजको मम ॥ १६ ॥ शिला[1]यां स्नप[2]नं कु[3]र्यात्प्रतिमा[4]सु प्रमा[5]र्जनम् ॥ प्रसिद्धैर्गन्धपुष्पाद्यैर्मत्पूजा सिद्धिदायिका ॥ १७ ॥ अमा[7]यिको ऽनुवृत्त्या[8] मां पूजयेन्नियतव्रतः ॥ प्रति[9]मादिष्वलंकारः प्रियो मे कुलनन्दन ॥ १८ ॥

सुधीः कर्मणां सिद्ध्यर्थं आदौ (पू.). ॥ मम पूजकः मद्बुद्ध्या भक्त्या (मू.). ॥१६॥ (पू.) कुर्यात्. ॥ (मू.). ॥ १७ ॥ नि[6]यतव्रतः (पू.) ॥ रघुनन्दन, (मू.) प्रियः. ॥ १८ ॥

---

१ पाषाणाच्या प्रतिमेच्या ठिकाणीं. २ स्नान घालणें. ३ करावें. - ४ मृत्तिका वस्त्र इत्यादिकांनीं केलेल्या - मूर्तींवर. ५ प्रोक्षण. ६ नियमानें पाळिलीं व्रतें ज्यानें, असा. ७ दंभ (ढोंग) न करणारा. ८ गुरूनें सांगितल्या मार्गाच्या अनुरोधें. ९ मूर्ति इत्यादिकांवर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रिय होतात. ॥ १८ ॥ अग्नीमध्यें त्या त्या देवतांच्या उद्देशानें हविर्द्रव्यें टाकून होम करावा; प्रत्यक्ष सूर्यमंडळीं किंवा सूर्याचें चित्र काढून त्याची पूजा करावी. भक्तानें श्रद्धापूर्वक मला नुसतें उदक अर्पण केलें तरी तेवढ्यानें देखील मी संतोष पावतों; ॥ १९ ॥ मग भक्ष्य भोज्यादि पदार्थ आणि गंध, पुष्पें, अक्षता इत्यादि उपचारांच्या योगें संतुष्ट होतों, हें काय वेगळें सांगायाला पाहिजे? अशा रीतीनें सर्व पूजासामग्री मिळवून पूजेस प्रारंभ करावा. ॥२०॥ प्रथम उत्तम आसन सिद्ध करावें; त्याची योजना खालीं दर्भ, त्यावर चर्म आणि सगळ्यांच्यावर वस्त्र अशी असावी. त्या आसनावर देवाकडे मुख करून बसावें. अंतःकरण

अग्नौ यजेत[2] हविषा भास्करे[3] स्थण्डिले[4] यजेत् ॥ भक्तेनोपहृतं प्रीत्यै श्रद्धया मम वार्यपि ॥ १९ ॥ किं पुनर्भक्ष्यभोज्यादि गन्धपुष्पाक्षतादिकम् ॥ पूजाद्रव्याणि सर्वाणि संपाद्य[7]ैवं समारभेत्[8] ॥२०॥ चैला[9]जिनकुशैः सम्यगासनं परिकल्पयेत्[10] ॥ तत्रोपविश्य देवस्य संमुखे[12] शुद्धमानसः ॥ २१ ॥

हविषा[1] (मू.) उपहृतं[5] वारि[6] अपि मम प्रीत्यै [भवति;] ॥ १९ ॥ (पू.) [प्रीत्यै भवति इति] किं पुनः [वक्तव्यं]? ॥ सर्वाणि (मू.) [पूजां] समारभेत्. ॥२०॥ शुद्धमानसः[11] (मू.) उपविश्य[13]॥२१॥

---

१ होमद्रव्यानें. २ यजन करावें. ३ सूर्यमंडळीं. ४ चित्र काढून त्यावर. ५ अर्पण केलेलें. ६ उदक. ७ मिळवून. ८ आरंभावें. ९ वस्त्र, चर्म व दर्भ यांनीं. १० सिद्ध करावें. ११ शुद्ध मन ज्याचें, असा. १२ समोर. १३ बसून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो.
सप्त-सान्व.
सटिप्पण.
॥३३॥

निर्मल राखावें. ॥ २१ ॥ नंतर, अकारादि पन्नास वर्ग आणि केशवादि चोवीस नांवें ह्यांच्या योगें बाह्य आणि आभ्यंतर न्यास करावे. पुढें, नारदपंचरात्रादि ग्रंथांत सांगितल्याप्रमाणें तत्त्वन्यास आणि विष्णुपंजर स्तोत्रानें माझ्या मूर्तिदेहावर महान्यास करावा; त्यानंतर मंत्राच्या वर्णांचा स्वतांच्या शरीरावर आणि मूर्तीवरही न्यास करावा; आलस्य कधींही ठेवूं नये. आपल्या अग्रभागीं डाव्या बाजूला उदककलश ठेवावा, पुष्पादि सामग्री उजवीकडे मांडावी; अर्घ्य, पाद्य देण्यासाठीं आणि मधुपर्काकरितां ॥ २४ ॥ त्याच प्रकारें आचमनासाठीं चार पात्रें सिद्ध ठेवावीं. नंतर, सूर्याप्रमाणें तेजस्वी अशा आपल्या हृदयकमलांत जीवसंज्ञक

ततो न्यासं प्रकुर्वीत मातृका[1] बहि[2]रान्तरम्[3] ॥ केशवादि ततः कुर्यात्तत्त्वन्यासं
ततः परम् ॥२२॥ मन्मूर्ति[5]पञ्जरन्यासं मन्त्रन्यासं[6] ततो न्यसेत् ॥ प्रतिमादावपि
तथा कुर्यान्नित्यमतन्द्रितः ॥ २३ ॥ कलशं स्वपुरो वामे[7] क्षिपेत्पुष्पादि दक्षिणे ॥
अर्घ्यपाद्यप्रदानार्थं मधुपर्कार्थमेव च ॥ २४ ॥ तथैवाचमनार्थं तु न्यसेत्पात्रचतुष्टयम् ॥ हृत्पद्मे भानुविमले मत्कलां जीव[12]सञ्ज्ञिताम् ॥ २५ ॥

(पू.) न्यासं प्रकुर्वीत[4]. ततः (मू.) तत्वन्यासं [च] कुर्यात्. ॥ २२ ॥ ततः (पू.) [च] न्यसेत्[8]; ॥ नित्यं अतन्द्रितः (मू.). ॥ २३ ॥ (पू.) [स्थापयेत्.] पुष्पादि दक्षिणे[9] क्षिपेत्[10]. ॥ (मू.) ॥ २४ ॥ (पू.) न्यसेत्. ॥ भानु[11]विमले (मू.) मत्कलां ॥ २५ ॥

---

१ अकारापासून पन्नास वर्ण. २ बाहेर (हस्तादिकांवर). ३ हृदयादिकांवर. ४ करावा. ५ माझ्या मूर्तीच्या शरीरावर. ६ मंत्रांतील अक्षरांचा न्यास. ७ डाव्या बाजूस. ८ न्यास करावा. ९ उजव्या बाजूला. १० ठेवावें. ११ सूर्यासारख्या स्वच्छ. १२ जीव नांवाच्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

माझ्या कलेचें ॥ २५ ॥ ध्यान करावें; हे शत्रुदमना (लक्ष्मणा), तिनें (जीवकलेनें) स्वतांचें सर्व शरीर व्यापलें आहे असें मनांत वागवावें, आणि त्या माझ्या कलेचेंच नेहमीं मूर्ति इत्यादिकांचे ठिकाणीं आवाहन करावें. ॥ २६ ॥ पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान, वस्त्र, अलंकार इत्यादि जितके उपचार मिळणें शक्य असेल तितक्यांच्या योगानें निष्कपटपणें माझी पूजा करावी. ॥२७॥ अनुकूलता असेल तर कापूर, केशर, कृष्णागर, चंदन, उत्तम प्रकारचीं सुगंध पुष्पें ह्यांच्या योगें माझी समंत्रक आराधना करावी. ॥२८॥ * अगस्त्यसंहितेंत सांगितल्याप्रमाणें दशावरणपूजा करावी; धूप, दीप, सोपस्कर महानैवेद्य आणि पंचार्तिक्यदीप अर्पण करावे; ॥२९॥

ध्यायेत्स्वदेहमखिलं तया व्याप्तमरिन्दम ॥ तामेवावाहयेन्नित्यं प्रतिमादिषु मत्कलाम् ॥ २६ ॥ पाद्यार्घ्याचमनीयाद्यैः स्नानवस्त्रविभूषणैः ॥ यावच्छक्योपचारैर्वा त्वर्चयेन्मामममायया ॥ २७ ॥ विभवे सति कर्पूरकुंकुमागुरुचन्दनैः ॥ अर्चयेन्मन्त्रवन्नित्यं सुगन्धकुसुमैः शुभैः ॥ २८ ॥ दशावरणपूजां वै ह्यागमोक्तां प्रकारयेत् ॥ नीराजनैर्धूपदीपैर्नैवेद्यैर्बहुविस्तरैः ॥ २९ ॥

ध्यायेत्. अरिन्दम, अखिलं स्वदेहं तया व्याप्तं [भावयेत्.] (मू.) तां एव मत्कलां [ध्यात्वा] आवाहयेत्. ॥ २६ ॥ (मू.) मां अर्चयेत्. ॥ २७ ॥ (मू.) सुगन्धकुसुमैः नित्यं मन्त्रवत् मां अर्चयेत्. ॥ २८ ॥ आगमोक्तां (पू.). ॥ बहुविस्तरैः (मू.) नीराजनैः ॥ २९ ॥

---

१ शत्रूंचें दमन (बंदोबस्त) करणाऱ्या. २ आवाहन करावें. ३ निष्कपटपणें. ४ पूजा करावी. ५ ऐश्वर्य. ६ असतांना. ७ कापूर, केशर, कृष्णागर, चंदन ह्यांच्यायोगें. *अगस्त्यसंहिता, पंचरात्रागम इत्यादि ग्रंथ मिळाल्यास ह्या विधीची विशेष माहिती पुरवणींत देण्याचा आमचा विचार आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नेहमीं सर्व पदार्थ श्रद्धेनें निवेदन करीत असावें; कारण, मी ईश्वर भक्तीनें अर्पण केलेले पदार्थ सेवन करितों. मंत्रशास्त्रांत पूर्ण निष्णात अशा त्या पुरुषानें पूजा झाल्यावर यथाविधि हवन करावें. ॥ ३० ॥ अगस्त्यमुनींनीं कुंड घालण्याचे जे विधि सांगितले आहेत, त्यांप्रमाणें कुंड सिद्ध करून त्यामध्यें (अग्नींत) मूलमंत्रानें किंवा पुरुषसूक्ताच्या योगें होम करावा. ॥३१॥ अथवा औपासनाग्नींत चरुरूपी हविर्द्रव्यानें हवन करावें. त्या सुज्ञ मनुष्यानें, तापलेल्या सुवर्णाप्रमाणें देदीप्यमान व दिव्य अलंकारांनीं सुशोभित असा एक पुरुष (मी ईश्वर)

श्रद्धयोपहरेन्नित्यं श्रद्धाभुगहमीश्वरः ॥ होमं कुर्यात्प्रयत्नेन विधिना मन्त्रको-
विदः ॥ ३० ॥ अगस्त्येनोक्तमार्गेण कुण्डेनागमवित्तमः ॥ जुहुयान्मूलमन्त्रेण
पुंसूक्तेनाथवा बुधः ॥ ३१ ॥ अथवौपासनाग्नौ वा चरुणा[5] हविषा तथा
॥ तप्त[6]जाम्बूनदप्रख्यं दिव्या[7]भरणभूषितम् ॥ ३२ ॥ ध्यायेदनल[8]मध्यस्थं
होमकाले सदा बुधः ॥ पार्षदेभ्यो[9] बलिं[10] दत्वा[11] होमशेषं[12] समर्पयेत्[13] ॥ ३३ ॥

नित्यं (पू.); यतः ईश्वरः अहं श्रद्धाभुक्[1]. ॥ मन्त्रकोविदः[2] (मू.) होमं कुर्यात्. ॥ ३० ॥ आगमवि[3]त्तमः बुधः (पू.) [कृतेन] कुण्डेन, ॥ (मू.) जुहुयात्[4]. ॥ ३१ ॥ (पू.) ॥ [जुहुयात्.] बुधः होमकाले सदा (३२ उ. ३३ पू.) [पुरुषं] ध्यायेत्; ॥ (मू.). ॥ ३२ ॥ ३३ ॥

---

१ श्रद्धेनें दिलेलें भक्षण करणारा. २ मंत्रज्ञानांत निष्णात. ३ आगमांचें उत्तम ज्ञान ज्याला, असा. ४ होम करावा. ५ भातानें. ६ तापविलेल्या सुवर्णाची उपमा ज्याला, अशा. ७ तेजःपुंज अलंकारांनीं शोभित. ८ अग्नीमध्यें राहणाऱ्या. ९ हनुमान् इत्यादि पार्षदांना (बाजूकडे असणाऱ्यांना). १० पूजा. ११ अर्पण करून. १२ होमाचा अवशिष्ट भाग. १३ संपवावा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अग्नीच्या मध्यभागीं उभा आहे, असें नित्य होमकालीं ध्यान करावें; शेवटीं, हनुमान् इत्यादि पार्षदांना बलि देऊन होमशेष समाप्त करावा. ॥३२॥३३॥नंतर, मौन धारण करून माझें ध्यान व मंत्राच्या प्रतिवर्णी स्मरण करीत मंत्राचा जप करावा; प्रेमयुक्त अंतःकरणानें मला तांबूल द्यावा; त्या तांबूलांत मुखाला सुवास येईल अशा प्रकारचीं कर्पूरादि द्रव्यें असावीं. ॥ ३४ ॥ मजकरितां नृत्य गायन स्तुतिपाठ इत्यादि करवावे; भूमीवर साष्टांग नमस्कार घालावा; हृदयांत माझें नित्य चिंतन असूं द्यावें; ॥ ३५ ॥ 'मी (राम) प्रसाद देत आहें' अशी भावना करून तो मस्तकीं धारण करावा; हातांनीं माझे चरण धरून भक्तिपूर्वक मस्तकीं ठेवावे; ॥ ३६ ॥ शेवटीं त्या सुबुद्धिसंपन्न पुरुषानें 'प्रभो! घोरसंसारापासून माझें रक्षण कर'

ततो जपं प्रकुर्वीत ध्यायन्मां यतवाक्[1] स्मरन् ॥ मुखवासं[2] च ताम्बूलं दत्वा प्रीतिसमन्वितः ॥ ३४ ॥ मदर्थे नृत्यगीतादि स्तुतिपाठादि कारयेत् ॥ प्रणमेद्दण्डवद्भूमौ हृदये मां निधाय च ॥ ३५ ॥ शिरस्याधाय मद्दत्तं प्रसादं भावनामयम्[3] ॥ पाणिभ्यां मत्पदे मूर्ध्नि गृहीत्वा भक्तिसंयुतः ॥ ३६ ॥ रक्ष मां घोरसंसारादित्युक्त्वा प्रणमेत्सुधीः ॥

मां ध्यायन् [अनुवर्णं] स्मरन् यतवाक् [पुरुषः] जपं प्रकुर्वीत. (मू.) [सन्]॥ ३४ ॥ (पू.). ॥ हृदये मां निधाय, भूमौ दण्डवत्, प्रणमेत् च. ॥ ३५ ॥ भक्तिसंयुतः भावनामयं मद्दत्तं प्रसादं शिरसि आधाय, (मू.), ॥ ॥ ३६ ॥ सुधीः 'घोरसंसारात् मां रक्ष,' (पू.) ॥

---

१ नियमित केली वाणी ज्यानें, असा. २ मुखाला सुवास देणाऱ्या. ३ केवळ कल्पिलेल्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विसर्जन.
फलश्रुति.

अशी प्रार्थना करून नमस्कार करावा, आणि, पूर्वी ध्यान केलें असतां प्रतिमेमध्यें जीवकला जेथून आली त्या स्वांतर्यामीच्या ठिकाणींच ती आतां पुन्हां प्रविष्ट झाली असें चिंतन करावें; हेंच विसर्जन होय. ॥ ३७ ॥ मी सांगितलेल्या ह्या प्रकारानें विधियुक्त पूजा केली असतां मनुष्याला माझ्या अनुग्रहामुळें इहलोकीं आणि परलोकीं उत्तम सिद्धि प्राप्त होते. ॥ ३८ ॥ भक्ति ठेवून प्रतिदिनीं ह्याप्रकारें माझी पूजा करील, तर त्याला माझें सारूप्य प्राप्त होईल, ह्यांत संशय नाहीं. ॥ ३९ ॥ हा अत्यंत गुप्त व परम पवित्र पूजाविधि प्रत्यक्ष मीच तुला सांगितला. पूर्वींचे महान् महान् योगी ह्याप्रमाणें अनुष्ठान करीत आले. मनुष्य जर नित्य ह्याचें पठण किंवा श्रवण करील, तर त्याला यथासांग पूजा के-

उद्वासयेद्यथापूर्वं प्रत्यग्ज्योतिषि[1] संस्मरन् ॥ ३७ ॥ एवमुक्तप्रकारेण पूजयेद्विधि-
वद्यदि॥इहामुत्र च संसिद्धिं प्राप्नोति मदनुग्रहात् ॥ ३८ ॥ मद्भक्तो यदि मामेवं
पूजां चैव दिनेदिने ॥ करोति मम सारूप्यं[3] प्राप्नोत्येव न संशयः ॥ ३९ ॥ इदं
रहस्यं परमं च पावनं मयैव साक्षात्कथितं सनातनम्[4] ॥ पठत्यजस्रं यदि वा
शृणोति यः स सर्वपूजाफलभाङ् न संशयः ॥ ४० ॥

संस्मरन् [सन्] (मू.) उद्वासयेत्[2]. ॥३७॥ (पू.) पूजयेत्, ॥ [तर्हि] मदनुग्रहात् (मू.) ॥३८॥ (पू.) [ध्यात्वा,] दिनेदिने ॥ पूजां करोति, [तर्हि] (मू.). ॥ ३९ ॥ (पू.) इदं रहस्यं ॥ यः अजस्रं (मू.). ' ॥ ४० ॥

१ स्वतांच्या हृदयांत असलेल्या तेजांत. २ विसर्जन करावें. ३ समान रूपाला. ४ पूर्वींपासून चालत आलेल्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याचें फल प्राप्त होईल, ह्यांत संदेह नाहीं. " ॥ ४० ॥ (शंकर म्हणाले :– पार्वति!) लक्ष्मण हा शेषाचा अंश अर्थात महाथोर पुरुष होता. त्यानें प्रश्न केला; तेंव्हां प्रभु रामचंद्रानें, हा आपला पूर्ण भक्त आहे - असें पाहून, - मागें सांगितलेल्या अत्युत्तम पूजाविधीचा त्याला उपदेश केला. ॥ ४१ ॥पुन्हां रामचंद्र मायेचा अवलंब करून अज्ञान्याप्रमाणें दुःखी झाल्यासारखा वागूं लागला; (वास्तविक त्या परमानंदमय प्रभूला दुःख नव्हतेंच); तो मुखानें ' हा सीते! हा सीते!' असा आक्रोश करी. त्याला निद्रा मुळींच येईना. ॥ ४२ ॥ इतक्या अवकाशांत, इकडे किष्किंधा नगरीमध्यें महाबुद्धिमान् मारुतीनें वानरराजाला– सुग्रीवाला–एकांतीं - गांठून - म्हटलें :– ॥ ४३ ॥ "राजा, मी आपल्या हिताचीच एक उत्तम गोष्ट सांगतों; इकडे लक्ष द्या. रामचंद्रानें आपल्यावर पूर्वी अत्युत्तम उपकार केला, ॥ ४४ ॥

एवं परात्मा श्रीरामः क्रियायोगमनुत्तमम् ॥ पृष्टः प्राह स्वभक्ताय शेषांशा[1]य महात्मने ॥ ४१ ॥ पुनः प्राकृतवद्रामो मायामा[2]लम्ब्य दुःखितः ॥ हा सीतेति वदन्नैव निद्रां लेभे कथंचन ॥४२॥ एतस्मिन्नन्तरे तत्र किष्किन्धायां सुबुद्धिमान् ॥ हनूमान्प्राह सुग्रीवमेकान्ते कपिनाय[3]कम् ॥ ४३ ॥ शृणु राजन्प्रवक्ष्यामि तवैव हितमुत्तमम् ॥ रामेण ते कृतः पूर्वमुपकारो ह्यनु[4]त्तमः ॥ ४४ ॥

पृष्टः परात्मा श्रीरामः एवं अनुत्तमं ॥ (मू.) शेषांशाय प्राह. ॥४१॥ रामः (मू.) न लेभे. ॥४२॥(मू.) सुग्रीवं प्राह – ॥४३॥ 'राजन, (पू.) हितं एव प्रवक्ष्यामि. ॥ (मू.) [यः] उपकारः कृतः, ॥४४॥

---

१ शेषाच्या अंशरूप (लक्ष्मणाला). २ आश्रय करून. ३ वानरांचा राजा, अशा. ४ नाहीं उत्तम ज्याहून (अत्युत्तम) असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याचें आपल्याला स्मरण नाहीं, असें मला वाटतें! अशामुळें आपणाकडे कृतघ्नतेचा दोष येऊं पाहत आहे! वाली ह्मणजे त्रैलोक्यांत नांवाजलेला वीर; पण रामानें त्याचा तुमच्यासाठीं वध केला, ॥ ४५ ॥ व तुह्मांला राज्यपद मिळवून दिलें; तारा प्राप्त होणें दुर्घट होतें, परंतु ती मिळाली. तो महाज्ञानसंपन्न रामचंद्र भावासह पर्वताच्या शिखरीं राहून॥४६॥ एकसारखा तुमची वाट पाहत आहे. कारण, त्याचें कर्तव्य कार्य फार मोठें आहे. आणि तुह्मी तर इकडे वानरजातीच्या स्वभावाला अनुसरून स्त्रीलंपट होऊन बसलां आहां! त्याचें तुह्माला भान देखील नाहीं! ॥४७॥ 'सीतेचा शोध करितों' अशी प्रतिज्ञा केलीत, आणि अद्याप त्यासाठीं कांहींच उद्योग करीत नाहीं, अर्थात आपण कृतघ्न झालां - हें उघड दिसतें! पण विचार करा :- वालीप्रमाणें एका क्षणांत यमसदन पहावें लागेल!" ॥ ४८ ॥

कृतघ्नवत्त्वया नूनं विस्मृतः प्रतिभाति मे ॥ त्वत्कृते निहतो वाली वरिस्त्रैलोक्यसंमतः ॥ ४५ ॥ राज्ये प्रतिष्ठितो ऽसि त्वं तारां प्राप्तो ऽसि दुर्लभाम् ॥ स रामः पर्वतस्याग्रे भ्रात्रा सह वसन्सुधीः ॥४६॥ त्वदागमनमेकाग्रम्[1]ईक्षते[2] कार्यगौरवात्॥त्वं तु वानरभावेन स्त्रीसक्तो नावबुध्यसे[3] ॥ ४७ ॥ करोमीति प्रतिज्ञाय सीतायाः परिमार्गणम्[4] ॥ न करोषि कृतघ्नस्त्वं हन्यसे[5] वालिवद् द्रुतम् ॥ ४८ ॥

[सः] (पू.) प्रतिभाति. ॥ (मू.) वाली निहतः. ॥ ४५ ॥ त्वं (पू.) तारां प्राप्तः आसि. ॥ (मू.) रामः ॥४६॥ (पू.) ईक्षते. ॥ (मू.) ! ॥४७॥ सीतायाः परिमार्गणं (मू.) [रामेण] हन्यसे!' ॥४८॥

१ एकाग्रं एकसारखा (दुसरेकडे लक्ष न देतां). २ वाट पाहातो. ३ जाणत नाहींस. ४ शोधाला. ५ मारला जाशील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारुतीचें भाषण ऐकल्याबरोबर सुग्रीव भीतीनें गांगरून गेला व मारुतीला उत्तरादाखल ह्मणाला :– ' हनुमंता! तूं ह्मटलेंस, तें खरें आहे. ॥ ४९ ॥ ह्मणून मी आतां आज्ञा देतों, तीप्रमाणें लवकर व्यवस्था कर. जलद चालणारे दहा हजार वानर आतांच्या आतां दाही दिशांकडे पाठवून दे. ॥ ५० ॥ त्यांनीं सातही द्वीपांतील सगळ्या वानरांना घेऊन यावें. पंधरा दिवसांत सर्व मोठमोठे वानर येथें आले पाहिजेत. ॥ ५१ ॥ पंधरवड्यापुढें जे बाहेर राहतील त्यांचा मजकडून वध होईल; ह्यांत अंतर होणार नाहीं.' अशी हनुमंताला आज्ञा देऊन सुग्रीव गृहकार्यास गेला. ॥ ५२ ॥ मारुति उत्तम बुद्धिमान व त्याच्या मंत्रिमंडळांत प्रमुख

हनूमद्वचनं श्रुत्वा सुग्रीवो भयविह्वलः ॥ प्रत्युवाच हनूमन्तं सत्यमेव त्वयोदितम् ॥ ४९ ॥ शीघ्रं कुरु मदाज्ञां त्वं वानराणां तरस्विनाम् ॥ सहस्राणि दशोदानीं प्रेषयाशु दिशो दश ॥५०॥ सप्तद्वीपगतान्सर्वान्वानरानानयन्तु ते ॥ पक्षमध्ये समायान्तु सर्वे वानरपुंगवाः ॥ ५१ ॥ ये पक्षमतिवर्तन्ते ते वध्या मे न संशयः ॥ इत्याज्ञाप्य हनूमन्तं सुग्रीवो गृहमाविशत् ॥ ५२ ॥ सुग्रीवाज्ञां पुरस्कृत्य हनूमान्मन्त्रिसत्तमः ॥

(पू.) सुग्रीवः ॥ हनूमन्तं (मू.) ॥ ४९ ॥ त्वं मदाज्ञां शीघ्रं कुरु; (पू.) वानराणां ॥ दश (मू.) दिशः प्रेषय. ॥ ५० ॥ ते (मू.) पक्षमध्ये समायान्तु. ॥ ५१ ॥ (पू.) वध्याः; न संशयः. ॥ इति हनूमन्तं (मू.). ॥ ५२ ॥ सुधीः मन्त्रिसत्तमः हनूमान (पू.)

१ जलद चालणाऱ्या. २ पाठव. ३ आणोत. ४ मोठमोठे वानर. ५ उल्लंघन करितील. ६ पुढें करून; वंद्य मानून, किंवा आगोदर कळवून.

४।१०

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारुतीनें दूत पाठविले.

होता. त्यानें वानरांना सुग्रीवाची आज्ञा कळवून तत्क्षणीं दश दिशांकडे पाठवून दिलें. ॥९३॥ त्या वायूच्या प्रिय पुत्राला अंतःकरणापासून - रामकार्य करण्याची - फारच उतावीळ झाली होती. ह्मणून त्यानें वनांत फिरणाऱ्या वानरांतील मुख्य मुख्य (निवडक) वानर - वनोवनींच्या व द्वीपांतरींच्या वानरांस बोलावण्यासाठीं - दूत ह्मणून पाठवून दिले. त्या सर्व वानरांचे गुण असंख्य व सामर्थ्यही अपरिमित होतें; त्यांच्या गति वायूसारख्या व आकृति पर्वताएवढाल्या होत्या. - त्यांनीं आपआपलीं कामें उत्सुकतेनें करावीं ह्मणून - मारुतीनें जातांना त्यांना बक्षिसें देऊन व सत्कार करून संतुष्ट केलें. ॥ ९४ ॥ इति चतुर्थः सर्गः ॥ ४ ॥
- एके दिवशीं - प्रदोषकाळीं रामचंद्र पर्वतावर रत्नशिखरीं बसला होता. सीतेच्या विरहामुळें उत्पन्न

तत्क्षणे प्रेषयामास हरीन्[1]दश दिशः सुधीः ॥ ५३ ॥ अगणित[5]गुणसत्त्वान् वायुवेगप्रचारान् वनचरगणमुख्यान् पर्वताकाररूपान् ॥ पवनहितकुमारः प्रेषयामास दूतानतिरभसतरात्मा दानमानादितृप्तान् ॥५४॥ इति चतुर्थः सर्गः ॥४॥ रामस्तु पर्वतस्याग्रे मणि[7]सानौ निशामुखे ॥ सीताविरहजं शोकम[8]सहन्निदमब्रवीत् ॥ १ ॥

(मू.) प्रे[2]षयामास. ॥ ५३ ॥ अति[3]रभसतरात्मा [4]पवनहितकुमारः (मू.) वनचरगणमुख्यान् दूतान् प्रेषयामास. ॥ ५४ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये किष्किन्धाकाण्डे चतुर्थः सर्गः ॥ ४ ॥ नि-[6]शामुखे (पू.) [स्थितः] रामः ॥ (मू.) – ॥ १ ॥

---

१ वानरांना. २ पाठविता झाला. ३ फार अतिशय वेगयुक्त (उत्कंठित) मन ज्याचें, असा. ४ वायूचा प्रिय पुत्र. ५ असंख्य गुण व शक्ति ज्यांच्या, असा. ६ प्रदोषकाळीं. ७ रत्नशिखरीं. ८ **असहन्** सोसत नाहीं ज्याला, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झालेला शोक त्याच्यानें सहन करवेना तो लक्ष्मणाला ह्मणाला :– ॥ १ ॥ “ लक्ष्मणा ! पहा. माझी सीता राक्षसानें बलात्कारें हरून नेली. ती भामिनी (स्त्री) जिवंत आहे किंवा मरण पावली, ह्याबद्दल मला निश्चय कांहींच करितां येत नाहीं. ॥ २ ॥ कोणी ‘ ती जिवंत आहे ’ असें मला येऊन सांगेल, तर त्यानें माझें अत्यंत प्रिय केल्यासारखें होईल. जर ती साध्वी कोठेंतरी जिवंत असेल, तर ॥ ३ ॥ ज्याप्रमाणें देवांनीं समुद्राचें मंथन करून त्यांतून अमृत काढिलें, त्याप्रमाणें मी, काय पाहिजे तें करून, तिला घेऊन येईन. भाऊ ! माझी प्रतिज्ञा ऐक :– ज्या कोणीं माझी जानकी नेली असेल, ॥ ४ ॥ त्याचें पुत्र, बल, वाहनें सर्वांसह भस्म करून टाकीन. हे सीते ! हा चंद्रवदने ! राक्षसाच्या घरीं राहावें लागल्यामुळें ॥ ५ ॥

पश्य लक्ष्मण मे सीता राक्षसेन ह्रता बलात् ॥ मृता ऽमृता वा निश्चेतुं[1] न जाने ऽद्यापि भामिनीम् ॥२॥ जीवतीति[2] मम ब्रूयात्कश्चिद्धा प्रियकृत्स मे ॥ यदि जानामि तां साध्वीं जीवन्तीं यत्र कुत्र वा ॥ ३ ॥ हठाद्[3]देवाहरिष्यामि सुधामिव पयोनिधेः[4] ॥ प्रतिज्ञां शृणु मे भ्रातर्येन मे जनकात्मजा ॥ ४ ॥ नीता तं भस्मसात्कुर्यां सपुत्रबलवाहनम् ॥ हे सीते चन्द्रवदने वसन्ती राक्षसालये ॥ ५ ॥

‘लक्ष्मण, (पू.) हृता ! ॥ भामिनीं (मू.) न जाने ! ॥ २ ॥ [यः] कश्चित् (पू.) प्रियकृत्. ॥ (मू.) जीवन्तीं जानामि, ॥ ३ ॥ [तर्हि] (पू.) सुधां इव, [6]आहारिष्यामि. ॥ भ्रातः, मे (मू.). ॥ ४ ॥ (पू.) तं [7]भस्मसात्कुर्याम्. ॥ (मू.) [8]वसन्ती ॥ ५ ॥

१ निश्चय करण्यास. २ जिवंत आहे. ३ बलात्कारें. ४ समुद्रापासून. ५ अमृताला. ६ आणीन. ७ भस्मतुल्य करीन. ८ राहणारी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तूं दुःखानें व्याकुळ झाली असशील ! तेथें मी तुझ्या दृष्टीस पडत नाहीं; तेव्हां तूं प्राण तरी कसे धारण करशील ! त्या चंद्रवदनेच्या विरहामुळें चंद्र देखील मला सूर्यासारखा (प्रखर) भासतो ! ॥ ६ ॥ चंद्रा ! तूं प्रथमं आपल्या किरणांनीं जानकीला स्पर्श कर. तिच्या स्पर्शाच्या योगेंकरून तुझे किरण शीतल होतील. नंतर ते (शीतल) किरण माझ्या शरीरावर पाड. सुग्रीव देखील अगदीं दयाशून्य झाला, - असें वाटतें; कारण, - मी इतक्या दुःखांत पडलों आहें; पण तो माझ्या भेटीला सुद्धां येत नाहीं ! ॥ ७ ॥ निष्कंटक राज्य मिळालें तेव्हां आतां एकांतांत स्त्रियांना बरोबर घेऊन अत्यंत कामुक होत्साता मद्य पिण्यांत गुंग राहिला आहे; ह्यावरून, तो कृतघ्न होय, असें उघड झालें. ॥ ८ ॥ शरदृतूस प्रारंभ झाला हें

दुःखार्ता[1] मामपश्यन्ती[2] कथं प्राणान् धरिष्यसि[3] ॥ चन्द्रो ऽपि भानुवद्[4]भाति[5] मम चन्द्राननां विना ॥ ६ ॥ चन्द्र त्वं जानकीं स्पृष्ट्वा[6] करैर्मां स्पृश[7] शीतलैः ॥ सुग्रीवो ऽपि दयाहीनो दुःखितं मां न पश्यति ॥ ७ ॥ राज्यं निष्कण्टकं प्राप्य स्त्रीभिः परिवृतो रहः[8] ॥ कृतघ्नो दृश्यते व्यक्तं पानासक्तो[9] ऽतिकामुकः ॥ ८ ॥ नायाति शरदं पश्यन्नपि मार्गयितुं[10] प्रियाम् ॥

(पू.)त्वं प्राणान् कथं धरिष्यसि ? ॥ चन्द्राननां विना मम (मू.)! ॥६॥(पू.)शीतलैः करैः मां स्पृश. ॥ दयाहीनः(मू.)!॥७॥निष्कण्टकं(मू.)[सुग्रीवः]व्यक्तं कृतघ्नः दृश्यते!॥८॥(पू.)मार्गयितुं न आयाति ! ॥

१ दुःखानें व्याकुळ. २ अपश्यन्ती न पाहणारी. ३ धरशील. ४ सूर्यासारखा. ५ भाति भासतो. ६ स्पर्श करून. ७ स्पर्श कर. ८ एकांतीं. ९ मद्य पिण्यांत गुंग. १० शोधण्यास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पाहत असूनही तो माझ्या प्रियेचा शोध करण्यास येत नाहीं ! त्या दुष्ट कृतघ्नाला मी पूर्वी केलेल्या उपकारांचें विस्मरण पडलें अँ ! ॥ ९ ॥ मी सीतेला हरण करणाऱ्या राक्षसाचा वध करणार आहें, तसाच आधीं नगर आणि बंधुजन ह्यांसह सुग्रीवाचादेखील घात करून टाकतों. वाली मृत्यु पावला तसा माझ्या हातून आज सुग्रीवाचाही अंत होणार ! " ॥ १० ॥ रामचंद्र क्रुद्ध झाला आहे, असें पाहून लक्ष्मण त्याला ह्मणाला :– ' रामा ! सुग्रीवाचें अंतःकरण दुष्ट आहे, त्या अर्थी मी आतांच जाऊन ॥ ११ ॥ त्याचा वध करून तुझ्या जवळ येतों. मला आज्ञा दे. ' असें म्हणून लक्ष्मणानें धनुष्य, खड्ग, आणि बाणभाता घेतला, ॥ १२ ॥ व जाण्याची तयारी केली. तें पाहून राम लक्ष्मणाला ह्मणाला :– " वत्सा, सुग्रीव माझा प्रिय

पूर्वोपकारिणं दुष्टः कृतघ्नो विस्मृतो हि माम् ॥ ९ ॥ हन्मि सुग्रीवमप्येवं सपुरं सहबान्धवम् ॥ वाली यथा हतो मेऽद्य सुग्रीवोऽपि तथा भवेत् ॥ १० ॥ इति रुष्टं समालोक्य राघवं लक्ष्मणोऽब्रवीत् ॥ इदानीमेव गत्वाऽहं सुग्रीवं दुष्टमानसम् ॥ ११ ॥ मामाज्ञापय हत्वा तमायास्ये राम तेऽन्तिकम् ॥ इत्युक्त्वा धनुरादाय खड्गं तूणीरमेव च ॥१२॥ गन्तुमभ्युद्यतं वीक्ष्य रामो लक्ष्मणमब्रवीत् ॥

दुष्टः कृतघ्नः (मू.) विस्मृतः ! ॥ ९ ॥ (पू.) सुग्रीवं अपि हन्मि. ॥ यथा मे (मू.).' ॥ १० ॥ लक्ष्मणः (पू.) समालोक्य, अब्रवीत् – ॥ 'राम, अहं (बा.११ उ.) तं सुग्रीवं (बा.१२ पू.) आयास्ये; राम मां आज्ञापय.' ॥ (मू.) आदाय॥११॥१२॥गन्तुं अभ्युद्यतं लक्ष्मणं वीक्ष्य, रामः अब्रवीत् – ॥

१ क्रुद्ध. २ येईन. ३ आज्ञा दे. ४ घेऊन. ५ सिद्ध.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लक्ष्मण पुन्हां किष्किंधेस गेला.

मित्र आहे. त्याचा त्वां वध करूं नये. ॥ १३ ॥ तर तूं त्याला 'सुग्रीवा! वालीप्रमाणें रामाच्या हातून मरूं नकोस, - ह्मणजे झालें! -' इतकें म्हणून भीति घाल, आणि तो काय सांगतो तेवढें उत्तर घेऊन सत्वर ॥ १४ ॥ इकडे ये. मागाहून मला जें करणें असेल तें करीन, ह्यांत संशय नाहीं." महापराक्रमी लक्ष्मण 'बरें' ह्मणून त्वरेनें किष्किंधेस गेला - ह्यावेळीं त्याची मुद्रा इतकी उग्र दिसत होती कीं, तिकडे पाहणारांना - हा सगळ्या वानरांना जाळून टाकणार कीं काय, - असा भास होई! - रामचंद्राला भूत, भविष्य, वर्तमान सर्व समजत होतें; वास्तविक लक्ष्मी (मायाशक्ति) त्याच्याजवळ नित्य आहेच (तिचा याचा वियोग कधींच नसतो); निर्विषय ज्ञान हेंच त्याचें स्वरूप होय. ॥१५॥१६॥ परंतु जशा एखाद्या अजाण

न हन्तव्यस्त्वया वत्स सुग्रीवो मे प्रियः सखा ॥ १३ ॥ किंतु भीषय सुग्रीवं वालिवन्न हनिष्यसे[1] ॥ इत्युक्त्वा शीघ्रमादाय सुग्रीवप्रति[3]भाषितम् ॥ १४ ॥ आगत्य पश्चाद्यत्कार्यं तत्करिष्याम्यसंशयम् ॥ तथेति लक्ष्मणोऽगच्छत्त्वरितो भीमविक्रमः ॥ १५॥ किष्किन्धां प्रति कोपेन निर्दहन्निव वानरान् ॥ सर्वज्ञो नित्यलक्ष्मीको विज्ञानात्माऽपि राघवः ॥ १६॥ सीतामनुशुशोचार्तः प्राकृतः प्राकृतामिव ॥

'वत्स, (मू.) सुग्रीवः न हन्तव्यः ॥ १३ ॥ (पू.) इति उक्त्वा, भीषय; ॥ [ततः] (मू.) आदाय, ॥१४॥ (१५ पू.) करिष्यामि.' ॥ भीमविक्रमः (बा.१५ उ.१६पू.) निर्दहन् इव लक्ष्मणः 'तथा' इति किष्किन्धां प्रति अगच्छत्. (मू.) ॥ १५ ॥ १६ ॥ आर्तः [सन्] प्राकृतः प्राकृतां इव, (मू.) ॥

१ मारला जाशील. २ भिवव. ३ सुग्रीवाच्या उत्तराला. ४ जाळणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मनुष्यानें लौकिक (जिचा समागम व वियोग होतो त्या)पत्नीचा विरह झाला असतां शोक करावा त्याप्रमाणें, रामानें कष्टी होऊन सीतेसाठीं शोक चालविला. तो प्रभु बुध्यादिकांचा साक्षी, व मायेच्या कार्यांनीं अस्पृष्ट आहे; ॥ १७ ॥ त्याला राग (प्रीति) लोभ इत्यादि विकार मुळींच नाहींत, तेव्हां त्यांपासून उद्भवणारा शोक असेल कसा ? ब्रह्मदेवाची प्रार्थना (मागणी, वर) पूर्ण करावी आणि दशरथराजालाही ॥ १८ ॥ त्याच्या तपश्चर्येचें फल द्यावें, अशा उद्देशांनीं प्रभूनें हा मनुष्यवेष धरिला होता. 'सगळे जन मायेनें मोहित होत्साते अज्ञानयुक्त झाले, ॥ १९ ॥ ह्यांना मोक्ष कसा मिळेल' ह्याबद्दल विचार करितां करितां विष्णूला एक युक्ति सुचली; - ती ही कीं, - सर्व लोकांचीं पापें नष्ट करणारी रामायणसंज्ञक कथा लोकांत प्रसिद्ध करावी. व तेवढ्यासाठींच त्यानें रामरूप घेऊन

बुद्ध्यादिसाक्षिणस्तस्य मायाकार्यातिवर्तिनः[1] ॥ १७ ॥ रागादिरहितस्यास्य तत्कार्यं कथमुद्भवेत् ॥ ब्रह्मणोक्तमृतं[2] कर्तुं राज्ञो दशरथस्य हि ॥ १८ ॥ तपसः फलदानाय जातो मानुषवेषधृक् ॥ मायया मोहिताः सर्वे जना अज्ञानसंयुताः ॥ १९ ॥ कथमेषां भवेन्मोक्ष इति विष्णुर्विचिन्तयन् ॥ कथां प्रथयितुं लोके सर्वलोकमलापहाम्[3] ॥ २० ॥ रामायणाभिधां रामो भूत्वा मानुषचेष्टकः ॥

(मू.). ॥ १७ ॥ (पू.) ? ॥ रामः (मू.). ॥ १८ ॥ (पू.) जातः ॥ (मू.); ॥ १९ ॥ एषां मोक्षः (पू.) विष्णुः ॥ (बा. २० उ. २१ पू.) कथां प्रथयितुं[4] रामः भूत्वा मानुषचेष्टकः ॥

---

१ मायेच्या कार्याच्या पलिकडे असणाऱ्या. २ सत्य. ३ सर्व लोकांचीं पापें दूर करणाऱ्या. ४ प्रसिद्ध करण्यास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मनुष्यासारखे व्यवहार चालविले. वेगवेगळ्या विकारांचा प्रादुर्भव झाला असतां व्यवहार कसकसे होतात तें लोकांना कळावें आणि त्यांची फलसिद्धि व्हावी ह्याकरितां ॥ २० ॥ २१ ॥ त्या त्या कालाला योग्य व्यवहार स्वीकारून तो (ईश्वर) गुणांच्या अधीन असणाऱ्या प्रजांना मोह घालितो, व वस्तुतः गुणरहित असूनही सर्व गुणांच्या ठिकाणीं अनुरक्त झाल्यासारखा भासतो. ॥ २२ ॥ वास्तविक तो विज्ञानपूर्ण आहे; त्याची शक्ति विज्ञानरूपच होय. तो प्राण्यांनीं केलेलीं शुभाशुभ कर्में पाहत असतो, पण गुणयुक्त पदार्थांहून भिन्न आहे. ह्मणूनच तो आकाशाप्रमाणें कामादि विकारांनीं लिप्त होत नाहीं. ॥ २३ ॥ त्याच्या स्वरूपाचें ज्ञान श्रुतिवाक्याच्या योगें कित्येक सनत्कुमारांसारख्या मुनींना मात्र होतें. त्यांनाच त्याची प्राप्ति

क्रोधं मोहं च कामं च व्यवहारार्थसिद्धये ॥ २१ ॥ तत्तत्कालोचितं गृह्णन् मोहयत्यवशाः प्रजाः ॥ अनुरक्त इवाशेषगुणेषु गुणवर्जितः ॥ २२ ॥ विज्ञानमूर्तिर्विज्ञानशक्तिः साक्ष्यगुणान्वितः ॥ अतः कामादिभिर्नित्यमविलिप्तो यथा नभः ॥ २३ ॥ विन्दन्ति मुनयः केचिज्जानन्ति सनकादयः ॥ तद्भक्ता निर्मलात्मानः सम्यग् जानन्ति नित्यदा ॥ २४ ॥ ॥

(मू.); ॥ २० ॥ २१ ॥ तत्तत्कालोचितं[1] [व्यवहारं च] (पू.) मोहयति[3]; ॥ गुणवर्जितः अपि गुणेषु अनुरक्तः इव [भाति]. ॥ २२ ॥ (पू.) ॥ अतः, यथा नभः[4], [तथा] (मू.). ॥ २३ ॥ केचित् सनकादयः मुनयः जानन्ति[6]; विन्दन्ति[7]. [च] ॥ निर्मलात्मानः (मू.) जानन्ति. ॥ २४ ॥

१ त्या त्या कालीं योग्य. २ अस्वतंत्र. ३ मोह घालतो. ४ आकाश. ५ लिप्त नसणारा. ६ जाणतात. ७ पावतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होते. ज्यांचीं अंतःकरणें अत्यंत शुद्ध असतात, ते भक्तही त्याला उत्तमप्रकारें जाणितात. ॥ २४ ॥ भगवान् जन्मराहित असूनही भक्तांच्या मनोरथानुसारें अवतार धारण करितो. असो. इकडे लक्ष्मण निघाला तो लागलाच किष्किंधानगरीच्या समीप येऊन पोंचला. ॥ २५ ॥ त्यानें सर्व वानरांना भय उत्पन्न करण्याच्या इच्छेनें धनुष्याच्या दोरीचा भयंकर टणत्कार केला. वानर किष्किंधेच्या भोंवतालच्या प्राकारा-(कोटा) वर बसले होते. अज्ञानीच ते. त्यांनीं लक्ष्मणाला पाहिल्याबरोबर ॥ २६ ॥ मोठमोठाले पाषाण आणि वृक्ष उचलिले व किलकिल शब्द केला. वानरांना पाहतांच लक्ष्मणानें संतापून डोळे लाल केले. ॥२७॥

भक्तचित्तानुसारेण जायते भगवानजः ॥ लक्ष्मणोऽपि तदा गत्वा किष्किन्धा-नगरान्तिकम् ॥ २५ ॥ ज्या[1]घोषमकरोत्तीव्रं भीषयन् सर्ववानरान् ॥ तं दृष्ट्वा प्राकृतास्तत्र[3] वानरा वप्रमूर्धनि ॥ २६ ॥ चक्रुः किलकिलाशब्दं धृतपाषाणपाद-पाः ॥ तान्दृष्ट्वा क्रोधताम्राक्षो वानरान् लक्ष्मणस्तदा ॥ २७ ॥

भगवान् अजः (मू.) गत्वा, ॥ २५ ॥ सर्ववानरान् भीषयन् [सन्] तीव्रं (मू.) [स्थिताः] प्रा-कृताः वानराः तं दृष्ट्वा, ॥ २६ ॥ धृतपाषाणपादपाः [संतः] (पू.) चक्रुः. ॥ तदा (२७ उ.) ॥

---

१ भिवविणारा. २ धनुष्याच्या दोरीचा टणत्कार. ३ अज्ञानी. ४ धरिले पाषाण आणि वृक्ष ज्यांनीं, असे. ५ क्रोधामुळें लाल झाले नेत्र ज्याचे, असा.

४।११

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अंगद लक्ष्मणाला भेटतो.

तो महापराक्रमी पुरुष धनुष्य लववून (धनुष्यावर दोरी चढवून) वानरांचें निर्मूलन करण्यास सिद्ध झाला. इतक्यांत, लक्ष्मण आला आहे हें कळल्याबरोबर, मुख्यप्रधान अंगद लागलाच निघून तेथें आला. त्यानें वानरांचें निवारण करून व लक्ष्मणाजवळ येऊन त्याला दंडवत प्रणाम केला. ॥ २९ ॥ प्रियजनांच्या उत्कर्षासाठीं झटणें हा लक्ष्मणाच्या स्वभावाचा धर्म असे. त्यानें अंगदाला आलिंगन देऊन ह्मटलें :– ‘ वत्सा ! तूं जा आणि आपल्या चुलत्याला कळव कीं, ॥ ३० ॥ क्रोधामुळें रामाचें स्वरूप फारच भयंकर झालें आहे. व त्याच्या सांगण्यावरून मी (लक्ष्मण) येथें आलों आहें. ’ अंगदानें ‘ बरें ’ ह्मटलें व सुग्रीवाकडे

निर्मूलान्कर्तुमुद्युक्तो धनुरानम्य वीर्यवान् ॥ ततः शीघ्रं समापत्य ज्ञात्वा लक्ष्मणमागतम् ॥२८॥ निवार्य वानरान् सर्वानंगदो मन्त्रिसत्तमः ॥ गत्वा लक्ष्मणसामीप्यं प्रणनाम स दण्डवत् ॥ २९ ॥ ततोंगदं परिष्वज्य लक्ष्मणः प्रियवर्धनः ॥ उवाच वत्स गच्छ त्वं पितृव्याय निवेदय ॥ ३० ॥ मामागतं राघवेण चोदितं रौद्रमूर्तिना ॥ तथेति त्वरितं गत्वा सुग्रीवाय न्यवेदयत् ॥ ३१ ॥

वीर्यवान् लक्ष्मणः धनुः आनम्य[1], वानरान् (२८ पू.). ॥ ततः मंत्रिसत्तमः सः अंगदः (२८ उ.) ज्ञात्वा, सर्वान् वानरान् निवार्य, ॥ (२९ उ.) गत्वा, दण्डवत्, प्रणनाम. ॥ २७ ॥ २८ ॥ २९ ॥ ततः प्रियवर्धनः[2] लक्ष्मणः अंगदं परिष्वज्य[3] ॥ उवाच – ‘ वत्स, त्वं गच्छ, रौद्रमूर्तिना[4] राघवेण चोदितं मां आगतं पितृव्याय[5] निवेदय[6]. ’ ॥ [अंगदः] (मू.). ॥ ३० ॥ ३१ ॥

१ लववून (वर दोरी चढवून). २ प्रिय जनांचा उत्कर्ष करणारा. ३ आलिंगून. ४ उग्र मूर्ति ज्याची, अशा. ५ चुलत्याला. ६ सांग.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जाऊन झालेला वृत्तांत निवेदन केला कीं, ॥ ३१ ॥ लक्ष्मण नगराच्या द्वारीं बाहेर उभा आहे; त्याचे नेत्र क्रोधामुळें लाल झाले आहेत. तें ऐकतांच वानरराजा सुग्रीव अत्यंत भयभीत झाला. ॥ ३२ ॥ त्यानें, आपला मुख्य मंत्री जो हनुमान, त्याला हांक मारून सांगितलें :– ' तूं आतांच अंगदाबरोबर लक्ष्मणाकडे जा, नम्रतापूर्वक ॥ ३३ ॥ भाषण करून क्रुद्ध झालेल्या त्या वीराचें सांत्वन कर, आणि नंतर हळूहळू त्याला मंदिरांत घेऊन ये. मारुतीला पाठवून दिल्यावर वानरराजानें तारेला ह्मटलें :– ॥ ३४ ॥ 'तारे, तूं लक्ष्मणाला सामोरी जा, कोमल भाषणांच्या योगें त्याचें सांत्वन कर आणि शांत झाला ह्मणजे मग त्याला अंतःपुरांत आणून माझी भेट करव. हें काम तुझ्या हातून निर्विघ्नपणें सिद्धीस जाईल - असा मला पूर्ण भरंवसा आहे. - '

लक्ष्मणः क्रोधताम्राक्षः पुरद्वारि बहिः स्थितः ॥ तच्छ्रुत्वा ऽतीव संत्रस्तः सुग्रीवो वानरेश्वरः ॥३२॥ आहूय मन्त्रिणां श्रेष्ठं हनूमन्तमथाऽब्रवीत् ॥ गच्छ त्वमंगदेनाशु लक्ष्मणं विनयान्वितः ॥ ३३ ॥ सान्त्वयन्कोपितं वीरं शनैरानय मन्दिरम् ॥ प्रेषयित्वा[३] हनूमन्तं तारामाह कपीश्वरः ॥ ३४ ॥ त्वं गच्छ सान्त्वयन्ती तं लक्ष्मणं मृदुभाषितैः ॥ शान्तमन्तःपुरं नीत्वा पश्चाद्दर्शय मे ऽनघे ॥ ३५ ॥

(मू.) ॥ ३२ ॥ अथ (पू.) आहूय अब्रवीत् – ॥ ' (मू.) [सन्] अंगदेन [सह] आशु लक्ष्मणं गच्छ; ॥ ३३ ॥ वीर, कोपितं [तं] सान्त्वयन[१] [सन] (पू.) आनय[२].' कपीश्वरः हनूमन्तं (मू.) – ॥ ३४ ॥ 'अनघे, त्वं मृदुभाषितैः (पू.) गच्छ; [तं] शान्तं [कृत्वा,] (मू.) दर्शय[४].' ॥३५॥

१ शांत करणारा. २ आण. ३ पाठवून. ४ भेटव.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारुति लक्ष्मणाला वाड्यांत नेतो.

॥ ३५ ॥ तारा 'बरें आहे' असें ह्मणून मधल्या दालनांत - जेथें स्त्रियांना वागतां येण्याजोगें मर्यादेचें स्थान होतें तेथें - जाऊन बसली. इकडे मारुति अंगदासह निघाला तो लक्ष्मणाजवळ ॥ ३६ ॥ येऊन पोंचला, व शिरसा वंदन करून भक्तिपूर्वक त्याला ह्मणाला :– 'हे वीरा महाभाग्यशाली पुरुषा! यावें. आलां फार उत्तम गोष्ट झाली. घर आपलें आहे. मनांत कांहीं एक शंका न धरितां ॥ ३७ ॥ आंत चला, राजपत्न्यादिकांच्या भेटी घ्या, व सुग्रीवाला भेटा. महाराज! नंतर आपण जी आज्ञा द्याल, तीप्रमाणें वागण्यास आह्मी सर्वथा सिद्ध आहों.' ॥ ३८ ॥ असें ह्मणून मारुतीनें भक्तिपूर्वक लक्ष्मणाला हातीं धरिलें आणि नगरामधून राजवाड्यांत आणिलें. ॥ ३९ ॥

भवत्विति ततस्तारा मध्यकक्षं[1] समाविशत् ॥ हनूमानंगदेनैव सहितो लक्ष्मणान्तिकम् ॥ ३६ ॥ गत्वा ननाम शिरसा भक्त्या स्वागतमब्रवीत् ॥ एहि वीर महाभाग भवद्[2]गृहमशंकितम्[3] ॥ ३७ ॥ प्रविश्य राजदारादीन्[5] दृष्ट्वा[4] सुग्रीवमेव च ॥ यदा ऽऽज्ञापयसे पश्चात्तत्सर्वं करवाणि[6] भो ॥ ३८ ॥ इत्युक्त्वा लक्ष्मणं भक्त्या करेगृह्य[7] स मारुतिः ॥ आनयामास[8] नगरमध्याद्राजगृहं प्रति ॥ ३९ ॥

ततः तारा (मू.) ॥ ३६ ॥ गत्वा शिरसा (पू.) – ॥ '(मू.) [यथा तथा] एहि. ॥ ३७ ॥ (पू.) दृष्ट्वा ॥ भो [लक्ष्मण], पश्चात् (मू.).' ॥ ३८ ॥ सः मारुतिः लक्ष्मणं (मू.) आनयामास. ॥ ३९ ॥

१ मधल्या दालनांत. २ तुमच्या घरास. ३ शंका न धरितां. ४ पे. ५ राजपत्न्या इत्यादिकांना. ६ करीन. ७ हातीं धरून. ८ आणिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लक्ष्मण नगरींत जागोजाग असलेले वानरसेनापतींचे मोठमोठे वाडे अवलोकन करीत राजमंदिरीं गेला. त्या मंदिराला देवेंद्राच्या गृहाची उपमा बरोबर साजत असे. ॥ ४० ॥ तेथें मधल्या दालनांत तारा बसली होतीच. त्या चंद्रवदनेनें आंगावर सर्व अलंकार घातले होते; तारुण्यमदामुळें तिचे नेत्रप्रांत किंचित् रक्तवर्ण दिसत. ॥ ४१ ॥ हास्यपूर्वक भाषण करणें हा तिचा स्वभाव असे. तिनें लक्ष्मणाला नमस्कार करून ह्मटलें. :– 'यावें भावोजी. तुमचें कल्याण असो. तुम्ही सज्जन व भक्तांविषयीं परम दयालु आहां. ॥ ४२ ॥ वानरराजा (सुग्रीव) तर तुमचा भक्त व सेवक आहे; मग त्याच्यावर कोप

पश्यंस्तत्र महासौधान् यूथपानां समंततः ॥ जगाम भवनं राज्ञः सुरेन्द्र[३]भवनोपमम् ॥४०॥ मध्यकक्षे गता तत्र तारा ताराधि[६]पानना ॥ सर्वा[७]भरणसंपन्ना मद[८]रक्तान्तलोचना ॥४१॥ उवाच लक्ष्मणं नत्वा स्मितपूर्वा[९]भिभाषिणी ॥ याहि देवर भद्रं ते साधुस्त्वं भक्तवत्सलः ॥ ४२ ॥ किमर्थं कोपमाकार्षीर्भक्ते भृत्ये कपीश्वरे ॥

लक्ष्मणः (पू.) यूथपानां[१] महासौधान[२] पश्यन [सन] ॥ (मू.) भवनं[४] जगाम[५]. ॥ ४० ॥ तत्र (४१मू.४२पू.) तारा लक्ष्मणं नत्वा उवाच – ॥ ' देवर[१०], याहि; ते भद्रं; (मू.) त्वं ॥ ४१ ॥ ४२ ॥ (पू.) किमर्थ कोपं आकार्षीः[११] ? ॥

१ सैन्यांतील नायकांच्या. २ मोठमोठ्या हवेल्यांना. ३ देवेंद्राच्या मंदिराची उपमा ज्याला, अशा. ४ मंदिरास. ५ गेला. ६ नक्षत्रनायका(चंद्रा)सारखें मुख जिचें, अशी. ७ सर्व अलंकारांनीं युक्त. ८ मदानें रक्तवर्ण प्रांत लोचनांचे जिच्या, अशी. ९ हास्यपूर्वक भाषण करणारी. १० भावोजी. ११ केला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ॰रा॰बो॰
समू॰सान्व॰
सटिप्पण॰
॥ ४३ ॥

कां वैरें केलात ? त्याला फार दिवसपर्यंत एकसारखें दुःखच भोगावें लागलें, विश्रांति किंवा सुखोपभोग घेण्यास अवसरच मिळाला नाहीं. ॥ ४३ ॥ आतां आपण त्याला दुःखपरंपरांतून रक्षिलें. आपल्या अनुग्रहानेंच सुग्रीवाला सुख प्राप्त झालें. - त्यानें तुमच्याशीं सख्य संपादिलें अर्थात, - तो महाबुद्धिमान आहे, - असें म्हणावें लागतें. - ॥ ४४ ॥ परंतु वानरजातीच्या स्वभावाला अनुसरून तो विषयोपभोगांत गुंतून राहिला आणि रघुपतीची सेवा करण्यास आला नाहीं. समर्था, आतां लवकरच नाना देशींचे वानर येथें प्राप्त होतील. ॥ ४५॥ रघुकुलोत्तमा ! दिशांदिशांकडून मोठमोठ्या पर्वतांसारखे प्रचंड वानर बोलावून आणण्यासाठीं दहा हजार वानर दूत पाठविले आहेत. ॥ ४६ ॥ सुग्रीव स्वतां येऊन वानरसेनापतींच्या

बहुकालम्[1]अनाश्वासं दुःखमेवानुभूतवान्[2] ॥४३॥ इदानीं बहुदुःखौघाद्भवद्भिरभिरक्षितः ॥ भवत्प्रसादात्सुग्रीवः प्राप्तसौख्यो महामतिः ॥४४॥ कामासक्तो रघुपतेः सेवार्थं नागतो हरिः ॥ आगमिष्यन्ति हरयो नानादेशगताः प्रभो ॥४५॥ प्रेषिता दशसाहस्रा हरयो रघुसत्तम ॥ आनेतुं वानरान् दिग्भ्यो महापर्वतसन्निभान्॥ ॥ ४६ ॥ सुग्रीवः स्वयमागत्य सर्ववानरयूथपैः ॥

[सः] (मू.) ॥ ४३ ॥ (मू.) सुग्रीवः ॥ ४४ ॥ हरिः[3] कामासक्तः [सन] रघुपतेः (पू.). ॥ प्रभो, (मू.) हरयः[3] आगमिष्यन्ति.॥४५॥ रघुसत्तम, (मू.) वानरान दिग्भ्यः आनेतुं प्रेषिताः. ॥४६॥ (पू.)॥

१ क्षणभर विश्रांतीशिवाय. २ अनुभविता झाला. ३ वानर.

कि॰ष्किं॰कां॰
सर्ग ५
तारा लक्ष्मणाचें सांत्वन करिते.

॥ ४३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हस्तें दैत्यसमूहांचा नाश करवील आणि रावणाचाही वध करील. ॥ ४७ ॥ तो वानरराजा तुमच्या-बरोबर आजच - रामाकडे येईल. - आमच्या गृहांतील अंतःपुर अवलोकन करा. तेथें पुत्र, स्त्री आणि आप्तजन ह्यांनीं वेष्टिलेला सुग्रीव बसला आहे; त्याला भेटून व अभय देऊन आपल्याबरोबर घेऊन चला.' ॥ ४८ ॥ हें तारेचें भाषण ऐकिल्यावर लक्ष्मणाचा क्रोध हळूहळू कमी होऊं लागला. तो, वानराधिपति सुग्रीव जेथें होता, त्या अंतःपुरांत गेला. ॥ ४९ सुग्रीव रुमेला आलिंगन देऊन मंचकावर बसला होता. लक्ष्मणाला पाहिल्याबरोबर तो अतिशय भिऊन व गर्भगळित होऊन तसाच उठला. ॥ ५० ॥

वधयिष्यति दैत्यौघान् रावणं च हनिष्यति ॥४७॥ त्वयैव सहितोऽद्यैव गन्ता वानरपुंगवः ॥ पश्यान्तर्भवनं तत्र पुत्रदारसुहृद्वृतम्[1] ॥ दृष्ट्वा सुग्रीवमभयं दत्वा नय सहैव ते ॥४८॥ ताराया वचनं श्रुत्वा कृशक्रोधो[2]ऽथ लक्ष्मणः ॥ जगा-मान्तःपुरं यत्र सुग्रीवो वानरेश्वरः ॥४९॥ रुमामालिंग्य सुग्रीवः पर्यंके[3] पर्यव-स्थितः ॥ दृष्ट्वा लक्ष्मणमत्यर्थ[4]मुत्पपातातिभीतवत्[5] ॥ ५० ॥

दैत्यौघान् (मू.). ॥ ४७ ॥ (पू.) अद्य एव [रामसमीपं] गंता. ॥ अंतर्भवनं (द्वि.) ॥ सुग्रीवं (मू.) त्वया सह एव नय.' ॥ ४८ ॥ (पू.), ॥ [तत्र] अन्तःपुरं जगाम. ॥ ४९ ॥ (पू.) सुग्रीवः लक्ष्मणं (मू.) उत्पपात. ॥ ५० ॥

१ पुत्र, स्त्रिया, मित्र ह्यांनीं वेष्टित, अशा. २ कमी झाला क्रोध ज्याचा, असा. ३ मंचकावर. ४ अतिशय. ५ उठून उभा राहिला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याचे डोळे मद्याच्या मदानें तारवटले होते. ही स्थिति पाहिल्यावर लक्ष्मण क्रुद्ध होऊन सुग्रीवाला ह्मणाला :— 'दुष्टा दांडग्या! रामचंद्राला अगदीं विसरलास काय! ॥५१॥ ज्यानें वालीसारख्या वीराचा वध केला तो राम(१) हातीं बाण घेऊन आज तुझी वाट पाहत राहिला आहे (किंवा ज्यानें पराक्रमी वालीचा वध केला (२) तो बाण आज तुझी वाट पहात आहे)! तूं माझ्याच हातानें मरण पावून वालीच्या पंथाला जाणार!' ॥ ५२ ॥ लक्ष्मणानें अशा प्रकारें अत्यंत कठोर भाषणें चालविलीं तेव्हां वीर हनुमान त्याला ह्मणाला :— 'महाराज! असें बोलतां कसें? ॥ ५३ ॥ ह्या वानरराजाची रामावर तुमच्यापेक्षांही अधिक भक्ति आहे. तो रामाचें कार्य करण्यास नेहमीं जागा (उद्युक्त) आहे, विसरला नाहीं. ॥ ५४ ॥

तं दृष्ट्वा लक्ष्मणः क्रुद्धो मदविह्वलितेक्षणम्[1] ॥ सुग्रीवं प्राह दुर्वृत्त[2] विस्मृतो ऽसि रघूत्तमम् ॥५१॥ वाली येन हतो वीरः स-बाणो* ऽद्य प्रतीक्षते[3] ॥ त्वमेव वालिनो मार्गं गमिष्यसि मया हतः ॥५२॥ एवमत्यन्तपरुषं[4] वदन्तं लक्ष्मणं तदा ॥ उवाच हनुमान् वीरः कथमेवं प्रभाषसे[5] ॥ ५३ ॥ त्वत्तो ऽधिकतरो रामे भक्तो ऽयं वानराधिपः ॥ रामकार्यार्थमनिशं जागर्ति[6] न तु विस्मृतः ॥ ५४ ॥

(पू.) तं सुग्रीवं दृष्ट्वा क्रुद्धः [सन्] प्राह – ' (मू.) विस्मृतः असि! ॥ ५१ ॥ येन वीरः (पू.). ॥ मया एव हतः (मू.)! ' ॥ ५२ ॥ तदा वीरः हनूमान् (मू.)? ॥ ५३ ॥ रामे (मू.). ॥ ५४ ॥

१ मदानें विव्हल झाले नेत्र ज्याचे, अशा. २ दांडग्या. ३ वाट पाहातो. ४ आति कठोर, अशा. ५ बोलतोस. ६ जागा आहे.

* (१) सबाणः–बाणेन सहितः रामः। बाणानें युक्त असा राम; किंवा (२) सः बाणः तो बाण.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वीरा! हे चोहोंकडून[1] कोट्यवधि वानर येत आहेत पहा. ही मंडळी सीतेच्या शोधासाठीं[2] लवकरच जाईल. ॥ ९५ ॥ सुग्रीव रामाचें सगळें कार्य करील, कांहीं अवशिष्ट ठेवणार नाहीं.' हें मारुतीचें वचन ऐकल्यावर लक्ष्मण लज्जित झाला. ॥ ९६ ॥ सुग्रीवानें अर्घ्यपाद्यादि उपचारांच्यायोगें लक्ष्मणाची उत्तमप्रकारें पूजा केली व त्याला आलिंगन देऊन ह्मटलें:– 'लक्ष्मणा! मी रामाचा दास आहें. त्यानें माझें रक्षण केलें. ॥ ९७ ॥ राम स्वतांच्या तेजानें[3] क्षणार्धांतच सगळ्या लोकांना जिंकील[4] (त्याला साह्याची अपेक्षा नाहीं). वीरा! वानरांसहवर्तमान मी त्याला साह्य करणार, हें नुसतें ह्मणायाचें मात्र!' ॥ ९८ ॥

आगताः परितः पश्य वानराः कोटिशः प्रभो ॥ गमिष्यन्त्यचिरेणैव सीतायाः परिमार्गणम् ॥ ५५ ॥ साधयिष्यति सुग्रीवो रामकार्यमशेषतः ॥ श्रुत्वा हनुमतो वाक्यं सौमित्रिर्लज्जितोऽभवत् ॥५६॥ सुग्रीवोऽप्यर्घ्यपाद्यार्यैर्लक्ष्मणं संप्रपूजयत् ॥ आलिंग्य प्राह रामस्य दासोऽहं तेन रक्षितः ॥ ५७ ॥ रामः स्वतेजसा लोकान् क्षणार्धेनैव जेष्यति ॥ सहायमात्रमेवाहं वानरैः सहितः प्रभो ॥ ५८ ॥

प्रभो, पश्य; परितः कोटिशः (मू.) गमिष्यन्ति. ॥५५ ॥ (पू.) साधयिष्यति. ॥ हनूमतः वाक्यं (मू.) ॥ ५६ ॥ (पू.); ॥ [ततः] (मू.). ॥ ५७ ॥ प्रभो (मू.) अहं सहायमात्रं एव. ॥ ५८ ॥

1 चोहोंकडून. 2 शोधास. 3 आपल्या तेजानें. 4 जिंकील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-गो.
समू-सान्व.
सटिप्पण.
॥४९॥

किष्किं-कां.
सर्ग ५
सुग्रीव रामा-
कडे आला.

लक्ष्मणही सुग्रीवाला ह्मणाला :– ‘ हे महाभाग्यशाली पुरुषा ! मी जें कांहीं न्यूनाधिक बोललों असेन, त्याची क्षमा कर. - क्रोधाच्या आविर्भाव आणून - मी अशीं दुर्भाषणें उच्चारिलीं, तरी माझ्या अंतरीं प्रेम होतें. ॥ ५९ ॥ सुग्रीवा ! आपण आतांच जाऊं चला. प्रभु रामचंद्र जानकीच्या विरहामुळें दुःखाकुल होत्साता अरण्यांत एकटाच बसला आहे. ’ ॥ ६० ॥ वानरराजा (सुग्रीव) ‘बरें तर चला’ असें ह्मणून लक्ष्मणासह रथांत बसला आणि वानरांना बरोबर घेऊन रामाकडेच आला. ॥६१॥ - त्या स्वारीचा थाट काय वर्णावा ! नगारे, नौबदी, अनेक जातींचे असंख्य ऋक्ष (रीस अस्वलें), वानर, शुभ्र छत्रें आणि चंवऱ्या ह्यांच्या योगें सुग्रीव शोभत होता. नील, अंगद ह्यांसारखे मारुतिप्रभृति वानर त्याच्या भोंवतालीं होते. अशा थाटानें तो

सौमित्रिरपि सुग्रीवं प्राह किंचिन्मयोदितम् ॥ तत्क्षमस्व महाभाग[2] प्रणयाद्भाषितं मया ॥५९॥ गच्छामो ऽद्यैव सुग्रीव रामस्तिष्ठति कानने ॥ एक एवातिदुःखार्तो जानकीविरहात्प्रभुः ॥६०॥ तथेति रथमारुह्य लक्ष्मणेन समन्वितः ॥ वानरैः सहितो राजा राममेवा-[3]न्वपद्यत ॥६१॥ भेरीमृदंगैर्बहुऋक्षवानरैः श्वेतातपत्रैर्[4]व्यजनैश्च[5] शोभितः ॥ नीलांगदाद्यैर्हनुमत्प्रधानैः समावृतो राघवमभ्यगाद्धरिः[6] ॥६२॥ इति पञ्चमः सर्गः ॥ ५ ॥

(पू.) – ‘ मया [यत्] किंचित् उदितं, ॥(मू.) प्रणयात् भाषितम्. ॥५९॥ सुग्रीव, (उ.) अतिदुःखार्तः प्रभुः एकः रामः [यत्र] कानने तिष्ठति, [तत्र] अद्य एव गच्छामः.’ ॥ ६० ॥ (मू.). ॥ ६१ ॥ (मू.) राघवं अभ्यगात्. ॥ ६२ ॥ इति किष्किन्धाकाण्डे पंचमः सर्गः ॥ ५ ॥ ॥ ४९ ॥

१ बोललेलें. २ महाभाग्यवंता. ३ जवळ आला. ४ शुभ्र छत्रांनीं. ५ चंवऱ्यांनीं. ६ वानर (सुग्रीव). ७ कडे आला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामचंद्राकडे येऊन पोंचला. ॥६२॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे किष्किंधाकाण्डे पंचमः सर्गः॥५॥

ह्या वेळीं रामचंद्र गुहेच्या द्वारीं शिलातलावर बसला होता; त्यानें जीर्ण वस्त्र आणि चर्म परिधान केलें होतें; त्याच्या श्यामवर्ण तनूला जटामुकुटाचा योगानें अधिक शोभा आली होती; त्याचे नेत्र विशाल, मुद्रा शांत आणि मुखकमळ हास्याच्या योगानें सुंदर दिसे. सीतेच्या विरहामुळें उत्पन्न झालेला संताप - शमावा व कांहीं तरी करमणूक व्हावी म्हणून - तो पशुपक्ष्यांकडे पाहत बसला होता. सुग्रीव आणि लक्ष्मण ह्या दोघांच्याही अंतःकरणांत त्याच्याविषयीं पूर्ण भक्ति वसत असे. दुरून राममूर्ति दृष्टीस पडतांच त्यांनीं रथांतून उतरून धांवत जाऊन त्याच्या चरणांपुढें लोटांगण घातलें.॥१–३॥रामानें सुग्रीवाला आलिंगन दिलें, कुशलप्रश्न विचारिले, जवळ बसवून घेतलें, आणि त्याचा यथायोग्य सत्कार केला. कोणत्या प्रसंगीं कसें वागावें,

दृष्ट्वा रामं समासीनं गुहाद्वारि शिलातले ॥ चैलाजिनधरं श्यामं जटामौलिवि-
राजितम् ॥१॥ विशालनयनं शान्तं स्मितचारुमुखाम्बुजम् ॥ सीताविरहसंतप्तं
पश्यन्तं मृगपक्षिणः ॥२॥ रथाद्दूरात्समुत्पत्त्य[2] वेगात्सुग्रीवलक्ष्मणौ॥रामस्य पा-
दयोरग्रे पेतु[3]र्भक्तिसंयुतौ ॥ ३ ॥ रामः सुग्रीवमालिंग्य पृष्ट्वाऽनामयम्[4]न्तिके ॥
स्थापयित्वा यथान्यायं पूजयामास धर्मवित् ॥ ४ ॥

भक्तिसंयुतौ सुग्रीवलक्ष्मणौ (बा.१ पू.) समासीनं[1] (१ उ. २ मू.) पश्यन्तं रामं दूरात् दृष्ट्वा, (मू.). ॥ १ ॥ २ ॥ ३ ॥ धर्मवित् सः (पू.) पृष्ट्वा[5], अन्तिके[6] (मू.). ॥ ४ ॥

---

१ बसलेल्या. २ उडी मारून उतरून. ३ पडले. ४ अनामयं स्वस्तिक्षेम. ५ विचारून. ६ जवळ.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो धर्म रामाला पूर्णपणें कळत असे. ॥ ४ ॥ सुग्रीवाचें अंतःकरण भक्तीच्यायोगें रामचरणीं नम्र झालें होतें. प्रथमदर्शनविधि आटोपल्यावर तो रामाला ह्मणाला :-'देवा ! तूं पहा वानरांचें प्रचंड सैन्य येत आहे. ॥५॥ ह्यांपैकीं कित्येकजण कुलाचलसंज्ञक पर्वतांवर उत्पन्न झालेले असून शरीरांनीं मेरु-मंदरपर्वतांसारखे आहेत; दुसरे कांहीं नानाप्रकारच्या द्वीपांत, नदीतीरीं व डोंगरांवर राहणारे आहेत. दिसण्यांत पर्वतांप्रमाणें धिप्पाड असून ॥ ६ ॥ पुन्हां इच्छेस येईल तसें रूप धारण करणारे असंख्य वानर येत आहेत. हे सर्व देवांचे अंशावतार होत. सगळेजण युद्धकलेंत निपुण आहेत. ॥ ७ ॥ प्रभो, ह्यांतील कांहींची शक्ति एका हत्ती-एवढी आहे, कांहींची दहा हत्तींइतकी आहे, कित्येकांची दहासहस्र हत्तींप्रमाणें आहे, आणि दुसऱ्या

ततो ऽब्रवीद्रघुश्रेष्ठं सुग्रीवो भक्तिनम्रधीः ॥ देव पश्य समायान्तीं वानराणां महांचमूम्[1] ॥ ५ ॥ कुलाचलाद्रिसंभूता[2] मेरुमन्दरसन्निभाः ॥ नानाद्वीपसरिच्छैलवासिनः[3] पर्वतोपमाः ॥ ६ ॥ असंख्याताः समायान्ति हरयः कामरूपिणः[4] ॥ सर्वे देवांशसंभूताः सर्वे युद्धविशारदाः[5] ॥ ७ ॥ अत्र केचिद्गजबलाः केचिद्दशगजोपमाः ॥ गजायुतबलाः[6] केचिदन्ये ऽमितबलाः प्रभो ॥ ८ ॥

(पू.) सुग्रीवः रघुश्रेष्ठं अब्रवीत् - ॥ '(मू.) पश्य. ॥ ५ ॥ (मू.) ॥ ६ ॥ (पू.) हरयः समायान्ति. ॥ (मू.) ॥ ७ ॥ (पू.). ॥ प्रभो, केचित् (मू.). ॥ ८ ॥

१ मोठ्या सैन्यास. २ सप्त कुल पर्वतांवर जन्मलेले. ३ अनेक द्वीपें (बेटें) नद्या (नदीतीरें), पर्वत ह्या ठिकाणीं राहणारे. ४ इच्छेस येईल तें रूप धरणारे. ५ युद्धांत निपुण. ६ दहा हजार हत्तींच्या शक्तीइतकी शक्ति ज्यांची, असे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कांहींजणांच्या सामर्थ्याचें तर प्रमाणच सांगतां येत नाहीं. ॥ ८ ॥ कित्येकांची अंगकांति काजळाच्या पर्वतासारखी कृष्णवर्ण आहे, कांहींची सुवर्णासारखी आहे; कोणाचे मुखप्रांत रक्तवर्ण आहेत, तसेंच दुसऱ्यांचीं पुच्छें लांबच लांब आहेत. ॥ ९ ॥ कांहीं शुद्ध स्फटिक मण्यांसारखे दिसतात. कित्येक राक्षसांसारखे भासतात; सर्व वानरांच्या मनांत युद्धाची इच्छा आहे; आणि ह्मणूनच ते गर्जना (भुभुःकार) करीत चोहोंकडून इकडे येत आहेत. ॥ १० ॥ प्रभो! हे सगळेजण तुझी आज्ञा मान्य करण्यास सिद्ध आहेत; - ह्यांना वेतनाची अपेक्षा नाहीं, किंवा निर्वाहार्थ अन्नसामग्री मिळवून देणें नलगे. कारण, हे वनांतील - फळें आणि मुळें भक्षण करून राहतात. हा अस्वलांचा राजा जांबवान् होय; शरीरसामर्थ्याप्रमाणें ह्याचें बुद्धिवैभवही असामान्य आहे. ॥ ११ ॥

केचिदञ्जनकूटाभाः[1] केचित्कनकसन्निभाः[2] ॥ केचिद्रक्तान्तवदना[3] दीर्घवालास्तथाऽपरे[4] ॥ ९ ॥ शुद्धस्फटिकसंकाशाः[5] केचिद्राक्षससन्निभाः ॥ गर्जन्तः परितो यान्ति वानरा युद्धकांक्षिणः ॥ १० ॥ त्वदाज्ञाकारिणः सर्वे फलमूलाशनाः[6] प्रभो ॥ ऋक्षाणामधिपो[7] वीरो जाम्बवान्नाम बुद्धिमान् ॥ ११ ॥

(मू.) दीर्घवालाः. ॥ ९ ॥ [केचित्] (पू.). ॥ युद्धकांक्षिणः वानराः गर्जन्तः [सन्तः] परितः यान्ति. ॥ १० ॥ प्रभो, (पू.) त्वदाज्ञाकारिणः. ॥ (मू.) ॥ ११ ॥

---

१ काजळाच्या शिखरासारखी कांति ज्यांची, असे. २ सुवर्णासारखे. ३ तांबडे भाग मुखांचे ज्यांच्या, असे. ४ लांब पुच्छें ज्यांचीं, असे. ५ शुद्ध स्फटिकांसारखे. ६ फळें मुळें भक्षून राहणारे. ७ ऋक्षाणाम् अस्वलांचा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मला मंत्र (मसलत) देण्याच्या कामीं तर ह्याच्या जोडीचा दुसरा सांपडणेंच नाहीं. ह्याच्या हाताखालीं अस्वलांचे कोट्यवधि[1] समुदाय आहेत. हा हनुमान होय. ह्याच्या दृढनिश्चयाची आणि पराक्रमाची सर्वत्र ख्याति आहेच; ॥ १२ ॥ ह्या वायुपुत्राचें तेज जसें अतिशय विलक्षण दिसतें, तसाच हा मंत्री व उत्तम बुद्धिमानही आहे. नल, नील, गवय, गवाक्ष, गंधमादन, ॥ १३ ॥ शरभ, मैंदव, गज, पनस, वलीमुख, सुषेण, तार ॥ १४ ॥ हे सगळे माझ्या सैन्यांतील एकएका वेगळ्या शूर वानरसमूहाचे मुख्य अधिपति होत. त्यांपैकींच हा हनुमंताचा पिता केसरी महाबलाढ्य आहे. रामा, हीं माझ्या सेनेंतील ठळक ठळक नायकांचीं नांवें मी तुला सांगितलीं. ॥ १५ ॥

एष मे मन्त्रिणां श्रेष्ठः कोटिभल्लुकवृन्दपः ॥ हनुमानेष विख्यातो महासत्त्वपराक्रमः ॥ १२ ॥ वायुपुत्रोऽतितेजस्वी मन्त्री बुद्धिमतां वरः ॥ नलो नीलश्च गवयो गवाक्षो गन्धमादनः ॥ १३ ॥ शरभो मैन्दवश्चैव गजः पनसः एव च ॥ वलीमुखो दधिमुखः सुषेणस्तार एव च ॥ १४ ॥ केसरी च महासत्त्वः पिता हनुमतो बली ॥ एते मे यूथपा राम प्राधान्येन मयोदिताः ॥१५॥

कोटिभल्लुकवृन्दपः (पू.). ॥ एषः (मू.) ॥ १२ ॥ (पू.) मन्त्री. ॥ (मू.) ॥ १३ ॥ १४ ॥ (पू.) हनूमतः पिता. ॥ राम, (मू.). ॥ १५ ॥

---

१ अस्वलांच्या कोटि समुदायांचा नायक.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे सगळे दृढनिश्चयी, महाबुद्धिमान् व इंद्रासारखे पराक्रमी असून, प्रत्येकाच्या हाताखालीं कोट कोट वानरांचीं अनेक यूथें (कळप) आहेत. ॥ १६ ॥ रामा, हे सर्व देवांच्या अंशांपासून जन्म पावलेले असून तुझ्या आज्ञेप्रमाणें वागण्यास सिद्ध आहेत. हा भाग्यशाली वानर वालीचा पुत्र अंगद होय. ह्याचें नांव सर्व जगांत विश्रुत आहे. ॥१७॥ ह्या वीराची शक्ति अगदीं वालीसारखी आहे. हा राक्षससैन्याचा क्षय करील. हे आणि इतरही पुष्कळ वानर तुझ्या कार्यासाठीं प्राण देण्यासही तयार आहेत. ॥ १८ ॥ ह्यांचीं युद्ध करण्याचीं शस्त्रें ह्मटलीं ह्मणजे पर्वतांचीं शिखरें होत. शत्रूचा घात करण्याच्या कामांत सगळेजण निष्णात आहेत. रघुवीरा, काय ती आज्ञा दे; आह्मी सर्व तुझ्या स्वाधीन आहों.' ॥ १९ ॥

महात्मानो महावीर्याः शक्रतुल्यपराक्रमाः ॥ एते प्रत्येकतः कोटिकोटिवानरयूथपाः ॥ १६ ॥ तवाज्ञाकारिणः सर्वे सर्वे देवांशसंभवाः ॥ एष वालिसुतः श्रीमानंगदो नाम विश्रुतः ॥ १७ ॥ वालितुल्यबलो वीरो राक्षसानां बलान्तकः ॥ एते चान्ये च बहवस्त्वदर्थे त्यक्तजीविताः ॥ १८ ॥ योद्धारः पर्वताग्रैश्च निपुणाः शत्रुघातने ॥ आज्ञापय रघुश्रेष्ठ सर्वे ते वशवर्तिनः ॥ १९ ॥

(मू.). ॥१६॥ सर्वे (मू.) एष वालिसुतः ॥१७॥ (मू.) ॥१८॥ पर्वताग्रैः (पू.) निपुणाः. ॥ रघुश्रेष्ठ, (मू.). ' ॥ १९ ॥

---

१ महाधैर्यसंपन्न. २ इंद्रासारखा पराक्रम ज्यांचा, असे. ३ सैन्यांचा नाश करणारा. ४ स्वाधीन राहणारे.

सीतेच्या शोधार्थ वानर पाठविले.

- हें भाषण कानीं पडल्याबरोबर - रामानें सुग्रीवाला प्रेमालिंगन दिलें. त्याचे नेत्र आनंदाश्रूंनीं भरून आले. तो ह्मणाला :- 'सुग्रीवा! माझें कोणतें महत् कार्य करावयाचें आहे, तें तूं जाणतोसच. ॥ २० ॥ ह्मणून तुझ्या मनास येत असेल, त्याप्रमाणें ह्यांना जानकीचा शोध करायास सांग (ज्यांना ज्या दिशेस धाडणें योग्य असेल, त्यांना तिकडे पाठव). रामाचें भाषण ऐकून सुग्रीवाच्या मनाला संतोष वाटला. ॥ २१ ॥ त्या वानरराजानें महाबलाढ्य (निवडक) अशा वानरांना पाठविण्याचा बेत योजिला; आगोदर इतर सगळ्या दिशांकडे अनेक वानर पाठवून दिल्यावर ॥ २२ ॥ दक्षिण दिशेकडे मात्र मुद्दाम युवराजा (अंगद), जांबवान्, महासमर्थ मारुति, नल, सुषेण, शरभ, मैंद आणि द्विविद ह्यांना पाठविलें; - कारण त्याला

रामः सुग्रीवमालिंग्य हर्षपूर्णाश्रुलोचनः ॥ प्राह सुग्रीव जानासि सर्वं त्वं कार्यगौरवम् ॥ २० ॥ मार्गणार्थं[2] हि जानक्या नियुंक्ष्व[3] यदि रोचते[1] ॥ श्रुत्वा रामस्य वचनं सुग्रीवः प्रीतमानसः ॥ २१ ॥ प्रेषयामास बलिनो वानरान् वानरर्षभः ॥ दिक्षु सर्वासु विविधान्वानरान् प्रेष्य सत्वरम् ॥ २२ ॥ दक्षिणां दिशमत्यर्थं प्रयत्नेन महाबलान् ॥ युवराजं जाम्बवन्तं हनूमन्तं महाबलम् ॥ २३ ॥

(पू.) [सन्] ॥ प्राह – 'सुग्रीव, त्वं (मू.) जानासि. ॥ २० ॥ यदि रोचते, [तर्हि] जानक्याः (पू.).' ॥ रामस्य वचनं (मू.) [बभूव]. ॥ २१ ॥ वानरर्षभः (पू.) प्रेषयामास. ॥ सर्वासु (मू.) प्रेष्य, ॥ २२ ॥ सुग्रीवः (२३।२४ मू.) अत्यर्थं महाबलान् [ज्ञात्वा] प्रयत्नेन प्रेषयामास,

१ पसंत वाटतें. २ शोधासाठीं. ३ योजना कर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ठाऊक होतें कीं, सगळ्या सैन्यांत - हे अतिशय बलाढ्य आहेत. - ते निघाले तेव्हां - सुग्रीवानें त्यांना असें सांगितलें कीं, ॥ २४ ॥ ‘ तुह्मी सगळेजण मोठ्या यत्नानें त्या सुंदर जनककन्येचा शोध लावा व एक महिन्याच्या आंत परत या. ही माझी आज्ञा नित्य डोळ्यांसमोर वागवा (विसरूं नका). ॥ २५ ॥ वानरहो, जर सीतेचा शोध लावल्यावांचून - परत याल - आणि तसेंच महिन्याहून अधिक एक दिवस बाहेर राहाल, तर मजपासून देहांत शिक्षा मिळेल, - लक्ष्यांत ठेवा. ’ - ॥ २६ ॥ अशा प्रकारें त्या महापराक्रमी वानरांना निरोप देऊन व श्रीरामचंद्राला वंदन करून सुग्रीव त्याच्या पार्श्वभागीं बसला. ॥ २७ ॥

नलं सुषेणं शरभं मैन्दं द्विविदमेव च ॥ प्रेषयामास सुग्रीवो वचनं चेदमब्रवीत् ॥ २४ ॥ विचिन्वन्तु प्रयत्नेन भवन्तो जानकीं शुभाम् ॥ मासादर्वाङ्निवर्तध्वं मच्छासनपुरःसराः ॥ २५ ॥ सीतामदृष्ट्वा यदि वो मासादूर्ध्वं दिनं भवेत् ॥ तदा प्राणान्तिकं दण्डं मत्तः प्राप्स्यथ वानराः ॥ २६ ॥ इति प्रस्थाप्य सुग्रीवो वानरान् भीमविक्रमान् ॥ रामस्य पार्श्वे श्रीरामं नत्वा चोपविवेश सः ॥२७॥

इदं वचनं अब्रवीत् च - ॥ २३ ॥ २४ ॥ ‘(पू.) जानकीं प्रयत्नेन विचिन्वन्तु; ॥ (मू.) [यूयं] मासात् अर्वाक् निर्वर्तध्वम्. ॥ २५ ॥ वानराः, यदि (मू.).’ ॥ २६ ॥ सः सुग्रीवः (पू.) वानरान् इति [उक्त्वा,] प्रस्थाप्य, ॥ श्रीरामं नत्वा च (मू.). ॥ २७ ॥

१ शोध करोत. २ महिन्याहून. ३ पूर्वी. ४ परत या. ५ पावाल. ६ उपविवेश बसला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राम मारुती-
जवळ अंगठी
देतो.

मारुति जावयास सिद्ध झाला असें पाहून, राम त्याला म्हणाला :– 'हनुमंता, खुणेसाठीं ही माझी मुद्रिका(अंगठी) - घेऊन जा, - आणि एकांतीं सीतेला दे. हिच्यावर माझ्या नांवाचीं अक्षरें खोदलीं आहेत. ॥२८॥ वानरश्रेष्ठा ! हें कार्य तुझ्या हातूनच सिद्धीस जाईल, असा मला भरंवसा वाटतो; कारण, तुझें बळ आणि बुद्धिवैभव सर्व मला विदित आहे. असो. आतां जा. - जिकडे जाशील, - तो मार्ग तुला सुखकर व फलदायक होवो.' ॥ २९ ॥ अशाप्रकारें वानरराजानें पाठविलेले ते अंगदप्रभृति वानर सीतेच्या शोधासाठीं पृथ्वीवर इकडे तिकडे पर्यटण करूं लागले. ॥ ३० ॥ फिरतां फिरतां, विंध्याटवीमध्यें एक प्रचंड राक्षस त्यांच्या द-

गच्छन्तं मारुतिं दृष्ट्वा रामो वचनमब्रवीत् ॥ अभिज्ञानार्थमेतन्मे ह्यंगुलीयकमुत्तमम् ॥ मन्नामाक्षरसंयुक्तं सीतायै दीयतां रहः ॥ २८ ॥ अस्मिन् कार्ये प्रमाणं हि त्वमेव कपिसत्तम ॥ जानामि सत्त्वं ते सर्वं गच्छ पन्थाः शुभस्तव ॥ २९ ॥ एवं कपीनां राज्ञा ते विसृष्टाः परिमार्गणे ॥ सीताया अंगदमुखा बभ्रमुस्तत्र तत्र ह ॥ ३० ॥ भ्रमन्तो विन्ध्यगहने ददृशुः पर्वतोपमम् ॥

रामः (पू.) – ॥ '(द्वि.) अंगुलीयकं [गृहाण.] (मू.) एतत् सीतायै रहः दीयताम्. ॥ २८ ॥ कपिसत्तम, त्वमेव (पू.); ॥ ते सर्वं सत्त्वं जानामि. (मू.) पन्थाः शुभः [भवतु.]' ॥ २९ ॥ (पू.) एवं सीतायाः परिमार्गणे विसृष्टाः अङ्गदमुखाः ते (मू.) बभ्रमुः . ॥ ३० ॥ विन्ध्यगहने भ्रमन्तः [वानराः] (पू.)

१ खुणेकरितां. २ अंगठीला. ३ माझ्या नांवाच्या अक्षरांनीं युक्त. ४ एकांतीं. ५ यावें. ६ बळ व बुद्धि. ७ मार्ग. ८ पाठविलेले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ष्टीस पडला. त्याचें शरीर पर्वतासारखें भयंकर होतें; व तो - हातीं सांपडतील ते - मृग हत्ती इत्यादि पशु भक्षण करीत होता. ॥ ३१ ॥ वानरांपैकीं कित्येक वीरांना 'हा रावणच असावा' असें वाटलें; ह्मणून त्यांनीं मोठा किलकिलाट करून मुष्टिप्रहारांच्या योगें क्षणमात्रांत त्याचा वध केला. ॥ ३२ ॥ शेवटीं, '- ज्या अर्थी ह्याला मारण्याच्या कामीं आयास मुळींच पडला नाहीं, त्या अर्थी - हा कांहीं रावण नव्हे' असें ह्मणून ते दुसऱ्या एका मोठ्या अरण्यांत गेले. तेथें ते वानरवीर तृषेनें व्याकुळ आले; पण उदक कोठें मिळेना. ॥ ३३ ॥ अरण्यांत भ्रमण करितां करितां त्यांचीं कंठ, ओष्ठ आणि तालु हीं गात्रें शुष्क होऊन गेलीं. शेवटीं तृणानें आणि गुच्छांनीं आच्छादित अशी एक मोठीथोरली गुहा त्यांच्या दृष्टीस पडली. ॥३४॥

राक्षसं भी[1]षणाकारं भक्षयन्तं मृगान् गजान् ॥ ३१ ॥ रावणोऽयमिति ज्ञात्वा केचिद्वानरपुंगवाः ॥ जघ्नुः[2] किलकिलाशब्दं मुञ्चन्तो मुष्टिभिः क्षणात् ॥ ॥३२॥ नायं रावण इत्युक्त्वा ययुरन्यन्महद्वनम् ॥ तृषार्ताः सलिलं तत्र नाविन्दन्[3] हरिपुंगवाः ॥ ३३ ॥ विभ्रमन्तो महारण्ये शुष्ककण्ठोष्ठतालुकाः ॥ ददृशुर्गह्वरं तत्र तृ[4]णगुल्मावृतं महत् ॥ ३४ ॥

(मू.) [च] भक्षयन्तं राक्षसं ददृशुः. ॥ ३१ ॥ केचित् वानरपुङ्गवाः [राक्षसं] (मू.) जघ्नुः. ॥ ३२ ॥ हरिपुंगवाः (मू.) ययुः, तृषार्ताः [सन्तः] तत्र (मू.). ॥ ३३ ॥ महारण्ये (मू.) गव्हरं ददृशुः. ॥ ३४ ॥

---

१ भयंकर रूप ज्याचें, अशा. २ मारिते झाले. ३ पावले. ४ गवतानें व झुडपांनीं आच्छादित.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तिच्या मुखांतून क्रौंच व हंस हे पक्षी बाहेर आले; त्यांचे पंख भिजलेले आहेत, असें वानरांना दिसलें. तेव्हां, 'येथें निःसंशय पाणी असलें पाहिजे. आपण ह्या प्रचंड गुहेंत शिरूं या,' ॥ ३५ ॥ असें ह्मणून मारुति प्रथम आंत शिरला. त्याच्या मागून सगळेजण गेले. सर्वांनीं बाहूंनीं परस्परांचे बाहु धरिले. प्रत्येकाला, उदक केव्हां मिळतें, अशी उत्कंठा झाली होती. ॥ ३६ ॥ अंधकारांतून बरेंच लांब गेल्यावर, त्या वानरसेनापतींना स्फटिकांसारख्या स्वच्छ उदकानें भरलेलीं सरोवरें आढळलीं. जवळच, कल्पवृक्षांची उपमा साजण्याजोगे ॥ ३७ ॥ व पक्क फळांच्या भारानें नम्र झालेले वृक्ष होते. त्यांवरून मकरंद इतका विपुल गळत होता, कीं प्रत्येक झाडाखालीं मणाआदमणाचें भांडें भरलें असतें! तसेंच, त्या स्थलीं सर्व

आर्द्रपक्षान्[1] क्रौञ्चहंसान्निःसृतान्[2]ददृशुस्ततः ॥ अत्रास्ते सलिलं नूनं प्रविशामो
महागुहाम् ॥३५॥ इत्युक्त्वा हनुमानग्रे प्रविवेश तमन्वयुः ॥ सर्वे परस्परं धृत्वा
बाहून्बाहुभिरुत्सुकाः ॥ ३६ ॥ अन्धकारे महद्दूरं गत्वा ऽपश्यन् कपीश्वराः ॥
जलाशयान्मणिनिभतोयान् कल्पद्रुमोपमान् ॥ ३७ ॥ वृक्षान्पक्वफलैर्नम्रा-
न्मधुद्रोण[3]समन्वितान् ॥ गृहान् सर्वगुणोपेतान् मणिवस्त्रादिपूरितान् ॥ ३८ ॥

ततः निःसृतान् (पू.). ॥ अत्र सलिलं (मू.) प्रविशामः. ॥ ३५ ॥ (पू.) उत्सुकाः (मू.) बाहून् धृत्वा तं अन्वयुः. ॥ ३६ ॥ कपीश्वराः (३७ मू.) जलाशयान्, कल्पद्रुमोपमान् (३८पू.) वृक्षान ॥ (३८ उ. ३९ पू.) ॥ गृहान अपश्यन; ॥

१ भिजले पंख ज्यांचें, अशा. २ बाहेर आलेल्या. ३ मधाच्या द्रोणानें (मणभर मधानें) युक्त.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सामग्रीनें युक्त व रत्नवस्त्रादिकांनीं भरलेलीं गृहें होतीं. ॥ ३८ ॥ त्यांत उत्तमोत्तम भक्ष्य पदार्थ सिद्ध होते; पण मनुष्याच्या वहिवाटीचें चिन्ह कोठेंही दिसेना. तेव्हां सगळे वानर आश्चर्यचकित होऊन गेले. इतक्यांत त्या ठिकाणीं एका मंदिरामध्यें दिव्य सुवर्णसिंहासनावर ॥ ३९ ॥ ध्यान करीत बसलेली एक योगिनी स्त्री त्यांच्या दृष्टीस पडली. तिच्या शरीरावर जीर्ण वस्त्रच होतें, पण कांति जिकडे तिकडे फांकलेली होती. तिला अंतःकरणाच्या निरोधापासून उद्भवणारी योगसिद्धि प्राप्त झाली असावी, - असें दिसे. - ॥ ४० ॥ वानरांनीं कांहीं अंशीं भक्तिपूर्वक व कांहीं अंशीं भीतभीत त्या महाभाग्यवती स्त्रीला नमस्कार घातले. देवी त्या वानरांना पाहून ह्मणाली :– 'तुह्मी कोणत्या उद्देशानें येथें आलां? ॥ ४१ ॥ तुमचें स्थान कोणतें? तसेंच तुह्मी कोणाचे दूत आहां? येथें बलात्कारें प्रवेश करून ह्या माझ्या स्थानाला उप-

दिव्यभक्ष्यान्नसहितान्मानुषैः परिवर्जितान् ॥ विस्मितास्तत्र भवने दिव्ये कनकविष्टरे ॥३९॥ प्रभया दीप्यमानां तु ददृशुः स्त्रियमेकलाम् ॥ ध्यायन्तीं चीरवसनां योगिनीं योगमास्थिताम् ॥ ४० ॥ प्रणेमुस्तां महाभागां भक्त्या भीत्या च वानराः ॥ दृष्ट्वा तान्वानरान्देवी प्राह यूयं किमागताः ॥ ४१ ॥ कुतो वा कस्य दूता वा मत्स्थानं किं प्रधर्षथ ॥

[अतः] विस्मिताः [ते] (३९ उ.) [उपविष्टां] ॥ (४०मू.) स्त्रियं ददृशुः. ॥३७॥३८॥३९॥४०॥ वानराः (मू.) प्रणेमुः.॥ देवी (मू.) दृष्ट्वा प्राह–'यूयं किं आगताः?॥४१॥कुतः आगताः? (पू.)?' ॥

१ सुवर्णाच्या आसनावर. २ उज्ज्वल दिसणाऱ्या. ३ जीर्ण वस्त्र पांघरणाऱ्या. ४ त्रास देतां.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारुति देवीला स्ववृत्तांत सांगतो.

सर्ग (त्रास) कां देतां ? ' हे प्रश्न ऐकिल्यावर हनुमंतानें उत्तर दिलें :– ' देवि, मी तुला सर्व वृत्तांत निवेदन करितों. श्रवण कर. ॥ ४२ ॥ अयोध्यानगरीमध्यें सकलैश्वर्यसंपन्न व महासमर्थ असा एक दशरथनाम राजा होऊन गेला. त्याचा महाभाग्यशाली ज्येष्ठ पुत्र राम ह्या नांवानें प्रख्यात आहे. ॥ ४३ ॥ तो पित्याची आज्ञा वंद्य मानून पत्नी आणि कनिष्ठ बंधु अशा दोघांसह वनांत आला. तेथें कोणी दुष्टानें त्याची साध्वी पत्नी हरून नेली. ॥ ४४ ॥ तिला चोरून नेणारा तो दुष्ट रावण होय. नंतर कनिष्ठ बंधूसह रामचंद्र सुग्रीवाकडे आला. सुग्रीवानें मित्रत्वास्तव आम्हांला ' रामाच्या प्रिय भार्येचा ॥ ४५ ॥ शोध करा ' असें सांगितलें. त्यावरून आम्ही वनोवनीं जानकीचा शोध करूं लागलों; - तहान लागली

तच्छ्रुत्वा हनुमानाह शृणु वक्ष्यामि देवि ते ॥ ४२ ॥ अयोध्याधिपतिः श्रीमान्
राजा दशरथः प्रभुः ॥ तस्य पुत्रो महाभागो ज्येष्ठो राम इति श्रुतः ॥ ४३ ॥
पितुराज्ञां पुरस्कृत्य सभार्यः सानुजो वनम् ॥ गतस्तत्र हृता भार्या तस्य साध्वी
दुरात्मना ॥४४॥ रावणेन ततो रामः सुग्रीवं सानुजो ययौ ॥ सुग्रीवो मित्रभा-
वेन रामस्य प्रियवल्लभाम् ॥४५॥ मृगयध्वमिति[2] प्राह ततो वयमुपागताः ॥

हनुमान तत् श्रुत्वा, आह – ' देवि, (मू.) वक्ष्यामि. ॥४२॥ (पू.) राजा ॥ (मू.). ॥ ४३ ॥ (४४मू.) दुरात्मना[1] रावणेन तस्य साध्वी भार्या हृता. ततः सानुजः (४५ मू.) ॥४४॥४५॥ (पू.) ॥ ५१ ॥

---

१ सांगेन. २ मृगयध्वम् शोधा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

म्हणून - उदकाच्या इच्छेनें ॥ ४६ ॥ कांहीं दैवयोगामुळें ह्या भयंकर मुहेंत शिरलों. कल्याणप्रदे देवि, तूं कोण व येथें कां राहत्येस, तें आह्मांला सांग. ॥ ४७ ॥ - मारुतीचें भाषण ऐकिल्यावर - योगिनीचें अंतःकरण संतुष्ट झालें. तिनें, वानर क्षुधेनें व तृषेनें व्याकुळ झाले आहेत, असें पाहून त्यांना ह्मटलें :– 'वानरहो! फळें व मुळें यथेच्छ भक्षून अमृततुल्य उदक प्राशन करा,॥४८॥आणि नंतर इकडे या; ह्मणजे मी माझा सर्व वृत्तांत तुह्मांला मुळापासून सांगेन.' सगळ्या वानरांनीं 'बरें' ह्मणून उपहार व उदक-प्राशन केलें. नंतर ते आनंदित होऊन ॥ ४९ ॥ देवीच्या जवळ आले आणि हात जोडून उभे

ततो वनं विचिन्वन्तो[1] जानकीं जलकांक्षिणः[2] ॥४६॥ प्रविष्टा गह्वरं घोरं दैवा-द्व समागताः ॥ त्वं वा किमर्थमत्रासि का वा त्वं वद नः शुभे॥४७॥योगिनी च तथा दृष्ट्वा वानरान् प्राह हृष्टधीः ॥ यथेष्टं फलमूलानि जग्ध्वा[3] पीत्वा ऽमृतं पयः ॥४८॥ आगच्छत ततो वक्ष्ये मम वृत्तान्तमादितः॥तथेति भुक्त्वा पीत्वा[4] च हृष्टास्ते सर्ववानराः॥४९॥ देव्याः समीपं गत्वा ते बद्धाञ्जलिपुटाः स्थिताः ॥

वनं उपगताः ततः जानकीं (मू.) वयं ॥ ४६ ॥ घोरं गव्हरं (पू.). ॥ शुभे, (मू.) का वा? नः वद.' ॥ ४७ ॥ (पू.) तथा दृष्ट्वा हृष्टधीः [सती] प्राह – ' (मू.) पीत्वा, ॥ ४८ ॥ (पू.) वक्ष्ये. ' ते सर्ववानराः (मू.). ॥ ४९ ॥ ते (पू.). ॥

१ शोधणारे. २ उदकाची इच्छा करणारे. ३ खाऊन. ४ पिऊन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राहिले. पुढें, ती उत्तमरूपसंपन्न योगिनी[1] हनुमंताला ह्मणाली :— ॥ ५० ॥ "मारुते! विश्वकर्म्याची हेमा ह्मणून परमरूपवती कन्या आहे. त्या स्त्रीनें नृत्य करून श्रीशंकराला संतुष्ट केलें. ॥ ५१ ॥ शंकरानें प्रसन्न होऊन तिला हें विस्तीर्ण दिव्य नगर अर्पण केलें (बक्षिस दिलें). ती सुंदरी ह्या स्थलीं अनंत सहस्त्र वर्षें राहत असे. ॥ ५२ ॥ मी दिव्यनामक गंधर्वाची कन्या आहें. माझें नांव स्वयंप्रभा. हेमेचें माझें सख्य असे. मला मोक्ष मिळावा अशी इच्छा आहे; ह्मणून मी विष्णूची आराधना करण्यांत तत्पर असत्यें. ॥ ५३ ॥ हेमेनें ब्रह्मलोकीं जातांना मला सांगितलें कीं, 'तूं ह्या स्थलीं राहून

ततः प्राह हनूमन्तं योगिनी दिव्यदर्शना ॥ ५० ॥ हेमा नाम पुरा दिव्यरूपिणी विश्वकर्मणः ॥ पुत्री[2] महेशं नृत्येन तोर्षयामास[3] भामिनी ॥५१॥ तुष्टो महेशः प्रददाविदं[4] दिव्यपुरं महत् ॥ अत्र स्थिता सा सुदंती[5] वर्षाणामयुतायुतम्[6] ॥ ५२ ॥ तस्या अहं सखी विष्णुतत्परा मोक्षकांक्षिणी[7] ॥ नाम्ना स्वयंप्रभा दिव्यगन्धर्वतनया पुरा ॥ ५३ ॥ गच्छन्ती ब्रह्मलोकं सा मामाहेदं तपश्चर ॥

(मू.) योगिनी हनूमन्तं प्राह — ॥ ५०॥ " पुरा दिव्यरूपिणी भामिनी (मू.). ॥५१॥ (पू.) दिव्यपुरं प्रददौ. ॥ (मू.) स्थिता. ॥ ५२ ॥ (मू.) दिव्यगन्धर्वतनया अहं तस्याः सखी. ॥ ५३ ॥ ब्रह्मलोकं (पू.) आह —

---

१ अद्भुत रूप जिचें, अशी. २ कन्या. ३ स्त्री. ४ संतोषविती झाली. ५ देता झाला. ६ सुंदर दंत जिचे, अशी. ७ हजारों सहस्त्रें. ८ जाणारी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तपश्चर्या कर. येथें कोणत्याही प्रकारचे प्राणी राहत नाहींत - ह्मणून हें स्थान तप करण्यास फार योग्य आहे. - ॥ ५४ ॥ साक्षात् निर्विकार जगन्निवास परमात्मा त्रेतायुगामध्यें दशरथाचा पुत्र होऊन पृथ्वीचा भार उतरण्यासाठीं अरण्यांत भ्रमण करील. ॥ ५५ ॥ वानर त्याच्या पत्नीचा शोध करितां करितां तुझ्या गुहेंत येतील. तूं मोठ्या प्रयत्नानें (काळजीपूर्वक) त्यांचें आदरातिथ्य करून रामाकडे जा, आणि त्याची स्तुति कर. ॥ ५६ ॥ इतकें केलेंस ह्मणजे तूं, योगिजन जेथें जातात, त्या सनातन विष्णुपदीं प्राप्त होशील. ' वानरहो ! आतां, रामदर्शनासाठीं त्वकर निघून जावें, अशी माझी इच्छा आहे. ॥ ५७ ॥ तुह्मी डोळे मिटा ह्मणजे आपोआप गुहेच्या बाहेर प्राप्त व्हाल. " वानरांनीं तसें केलें (डोळे मिटले).

अत्रैव निवसन्ती[1] त्वं सर्वप्राणिविवर्जिते ॥५४॥ त्रेतायुगे दाशरथिर्भूत्वा नारायणो ऽव्ययः॥ भूभारहरणार्थाय विचरिष्यति कानने[2] ॥ ५५ ॥ मार्गन्तो[3] वानरास्तस्य भार्यामायान्ति ते गुहाम् ॥ पूजयित्वा ऽथ तान् गत्वा रामं स्तुत्वा प्रयत्नतः ॥ ॥५६॥ यातासि[4] भवनं विष्णोर्योगिगम्यं सनातनम् ॥ इतो ऽहं गन्तुमिच्छामि रामं द्रष्टुं त्वरान्विता ॥ ५७ ॥ यूयं पिधद्ध्वम[6]क्षीणि[5] गमिष्यथ बहिर्गुहाम् ॥

'(मू.) अत्र एव निवसन्ती त्वं तपः चर. ॥ ५४ ॥ अव्ययः नारायणः (मू.) विचरिष्यति. ॥ ५५ ॥ तस्य भार्यां (पू.) आयान्ति. ॥ अथ तान् (मू.) गत्वा, प्रयत्नतः स्तुत्वा, ॥ ५६ ॥ (पू.) विष्णोः भवनं यातासि.' ॥ इतः त्वरान्विता (मू.), गन्तुं इच्छामि. ॥५७॥ यूयं अक्षीणि (पू.) गमिष्यथ."

१ राहणारी. २ अरण्यांत. ३ शोधणारे. ४ जाशील. ५ नेत्रांस. ६ मिटा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तों लागलेच ते, पूर्वी जेथें होते, त्या वनांत प्राप्त झाले! ॥ ५८ ॥ ती योगिनीही गुहा सोडून देऊन लागलीच रामाजवळ आली. तेथें तिला सुग्रीवासह रामलक्ष्मणांचें दर्शन मिळालें. ॥ ५९ ॥ त्या सुबुद्धिसंपन्न स्त्रीनें रामाला प्रदक्षिणा घातली अनेक प्रणाम केले; व बोलण्यास उपक्रम करणार तों भक्तिमुळें तिला गहिंवर आला; आंगावर रोमांच उभे राहिले. अशा स्थितींतच ती अडखळणाऱ्या शब्दांनीं रामाला ह्मणाली :– ॥ ६० ॥ 'राजाधिराजा, मी तुझी दासी तुझ्या दर्शनासाठीं येथें आलयें आहें. पुष्कळ सहस्र वर्षेपर्यंत, मी तुझें दर्शन मिळावें ह्मणून गुहेंत राहून तीव्र तपश्चर्या केली. मला त्या तपाचें फल आज मिळालें. ॥ ६१ ॥

तथैव चक्रुस्ते वेगाद्गताः पूर्वस्थितं वनम् ॥ ५८ ॥ सा ऽपि त्यक्त्वा गुहां शीघ्रं ययौ राघवसन्निधिम् ॥ तत्र रामं ससुग्रीवं लक्ष्मणं च ददर्श ह ॥ ५९ ॥ कृत्वा प्रदक्षिणं रामं प्रणम्य बहुशः सुधीः ॥ आह गद्गदया वाचा रोमाञ्चिततनूरुहा ॥ ॥६०॥ दासी तवाहं राजेन्द्र दर्शनार्थमिहागता ॥ बहुवर्षसहस्राणि तप्तं मे दुश्चरं तपः ॥ गुहायां दर्शनार्थं ते फलितं मे ऽद्य तत्तपः ॥ ६१ ॥

ते (मू.) गताः. ॥ ५८ ॥ सा अपि गुहां (पू.) ययौ. ॥(मू.). ॥ ५९ ॥ रोमाञ्चिततनूरुहा सुधीः [योगिनी] रामं प्रदक्षिणं कृत्वा, बहुशः प्रणम्य, (मू.) आह – ॥ ६० ॥ राजेन्द्र, अहं तव (पू.). ॥ मे गुहायां ते दर्शनार्थं (मू.). [यत्] तपः तप्तं, मे तत् तपः अद्य फलितम्. ॥ ६१ ॥

१ उभे राहिले रोमांच जिचे, अशी. २ फळास आलें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां मी तुला नमस्कार करितें. तूं मायेपासून फार दूर आहेस, सर्व प्राण्यांच्या अंतरीं व बाहेर राहतोस पण कोणाला दिसून येत नाहींस. ॥ ६२ ॥ जसें एखाद्या नटानें सोंग घेतलें ह्मणजे त्याला खऱ्या रूपानें (हा अमुक मनुष्य असें) कोणी ओळखीत नाहींत त्याप्रमाणें, तूं योगमायारूपी आच्छादनानें (बुरख्यानें) आच्छादिलेला आहेस ह्मणून मनुष्यशरीर धारण करून वागत असल्यासारखा दिसतोस, व अज्ञानी लोकांना ओळखूं येत नाहींस. ॥ ६३ ॥ ज्यांच्या मनांत भक्ति करण्याची इच्छा असते, त्या सत्पुरुषांचा भक्तियोग सिद्ध करण्यासाठीं तूं अवतार घेतला आहेस. हे षड्गुणैश्वर्यसंपन्ना प्रभो! मी - अबला अर्थात - तमोगुणी आहें; तेव्हां मला तुझ्या स्वरूपाचें ज्ञान व्हावें कसें? ॥ ६४ ॥ रघुवीरा, लोकामध्यें तुला तत्त्वतः जाण-

अद्य हि त्वां नमस्यामि मायायाः परतः स्थितम् ॥ सर्वभूतेषु चाल[2]क्ष्यं बहिरन्त-
रवस्थितम् ॥ ६२ ॥ योगमाया[3]जवनिकाच्छन्नो मानुषवि[4]ग्रहः ॥ न लक्ष्यसे
ऽज्ञानदृशां शैलूष इव रूपधृक् ॥६३॥ महाभाग[5]वतानां त्वं भक्तियो[6]गविधित्स-
या ॥ अवतीर्णो ऽसि भगवन् कथं जानामि तामसी ॥६४ ॥ लोके [11]जानातु यः
कश्चित्तव तत्त्वं रघूत्तम ॥

(मू.) त्वां [1]नमस्यामि. ॥ ६२ ॥ (पू.) ॥ [त्वं,] [7]रूपधृक् [8]शैलूषः इव, [9]अज्ञानदृशां न [2]लक्ष्यसे. ॥६३॥ भगवन्, त्वं (मू.) तामसी [अहं तादृशं त्वां] कथं जानामि! ॥ ६४ ॥ रघूत्तम, (पू.) [11]जानातु; ॥

१ वंदन करितें. २ न दिसणाऱ्या. ३ योगमायारूपी पडद्यानें आच्छादिलेल्या. ४ मनुष्याचें शरीर घेणाऱ्या. ५ महाभगवद्भक्तां-ना. ६ भक्तियोग सिद्ध करण्याच्या इच्छेनें. ७ रूप धरणारा. ८ नट. ९ अज्ञानयुक्त दृष्टि ज्यांची, त्यांना. १० दर्शन देतोस. ११ जाणो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णारे कोणी असतील तर खुशाल असोत. - मला तशी होण्याची इच्छा नाहीं; - तुझें हेंच रूप माझ्या हृदयस्थळीं निरंतर स्फुरत राहो, - ह्मणजे झालें. - ॥ ६५ ॥ रामा! आज तूं आपल्या चरणयुगुलाचें मला दर्शन दिलेंस - त्या अर्थी मी स्वतांला कृतकृत्य मानितें. तुझ्या चरणांचें माहात्म्य किती वर्णावें! - त्यांच्या दर्शनानें मोक्ष मिळतो, संसारसमुद्र अदृश्य होतात, व सन्मार्ग दिसूं लागतात. ॥ ६६ ॥ हे आदिपुरुषा, ज्यांनीं सर्व ऐश्वर्यांचा परित्याग केला, त्या सत्पुरुषांचें सर्वस्व काय तें तूंच आहेस. लौकिक द्रव्य, पुत्र, स्त्री इत्यादि ऐश्वर्यांच्या गर्वानें फुगलेले लोक तुझें स्तवन करण्यास कधींही योग्य व्हावयाचे नाहींत. ॥६७॥ प्रवृत्तिमार्गरूप संसार तुजपासून आपोआप निवृत्त होतो. सर्वसंगपरित्याग करून निर्धन झालेल्या सज्जनांचें धन तूंच होस. तूं स्वस्वरूपाच्या ठिकाणीं सर्वदा रममाण असतोस, अर्थात गुणरहित आहेस; परंतु - ज्या-

ममैतदेव रूपं ते सदा भातु हृदालये॥६५॥राम ते पादयुगलं दर्शितं मोक्षदर्शनम्॥अदर्शनं भवाब्धीनां सन्मार्गपरिदर्शनम् ॥६६॥ धनपुत्रकलत्रादिविभूतिपरिदर्पितः॥अकिंञ्चनधनं त्वा ऽऽद्य नाभिधातुं जनो ऽर्हति ॥६७॥ निवृत्तगुणमार्गाय निष्किञ्चनधनाय ते॥ नमः स्वात्माभिरामाय निर्गुणाय गुणात्मने ॥६८॥

ते (मू.) मम हृदालये सदा भातु. ॥ ६५ ॥ (पू.) भवार्णानां (मू.) पादयुगुलं दर्शितम्. ॥६६॥ आद्य, (पू.) ॥ [जनः] (मू.) न अर्हति. ॥ ६७ ॥ (मू.) ते नमः. ॥ ६८ ॥

१ स्फुरण पावो. २ संसारसमुद्रांचें. ३ द्रव्य, पुत्र, स्त्री इत्यादि ऐश्वर्यांच्या योगें अत्यंत गर्विष्ठ झालेला. ४ निर्धनांचें (साधूंचें) धन अशा. ५ वर्णन करण्यास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रमाणें रज्जु स्वतांच्या ठिकाणीं भासणाऱ्या सर्पाचें कारण असते त्याप्रमाणें, तूंही गुणांचें विवर्तोपादान कारण असल्यामुळें - गुणात्मक आहेस. ॥ ६८ ॥ कालरूपानें जगाचा संहार तूंच करितोस. तुजमध्यें सृष्टि व तिचें पालन करण्याचें सामर्थ्य आहे. अर्थात, तुला आदि, मध्य आणि अंत नाहींत. तूं सर्वत्र समदृष्टीनें वागणारा, सर्वव्यापी व सर्वांतर्यामी आहेस, असें मी समजत्यें. ॥ ६९ ॥ देवा, 'तूं हें मनुष्याच्या स्वरूपाचें केवळ अनुकरण करीत आहेस (वास्तविक मनुष्य नव्हस)' ही गोष्ट कोणालाही कळत नाहीं. तुला कोणी प्रिय नाहीं, शत्रु नाहीं किंवा ह्याहून वेगळा(उदासीन)ही नाहीं. ॥ ७० ॥ तुझ्या मायेनें ज्यांची ज्ञानशक्ति आवृत केली, ते जन तुला तशाप्रकारचा (शत्रु, मित्र व उदासीन ज्याला आहेत असा) समजतात. वास्तविक तूं जन्मरहित, कोणतेंही कार्य न करणारा व सर्वेश्वर असूनही देव, पशुपक्ष्यादि तिर्यग्योनि आणि मनुष्यें इत्यादिकांमध्यें ॥ ७१ ॥

कालरूपिणमीशानमादिमध्यान्तवर्जितम् ॥ समं चरन्तं सर्वत्र मन्ये त्वां पुरुषं परम् ॥ ६९ ॥ देव ते चेष्टितं कश्चिन्न वेद नृविडम्बनम् ॥ न ते ऽस्ति कश्चिद्दयितो[1] द्वेष्यो वा पर एव च ॥ ७० ॥ त्वन्मायापिहितात्मानस्[2]त्वां पश्यन्ति तथाविधम् ॥ अजस्याकर्तुरीशस्य देवतिर्यङ्[3]नरादिषु ॥ ७१ ॥

त्वां (पू.) ॥ सर्वत्र (मू.) पुरुषं मन्ये. ॥ ६९ ॥ (पू.) ते चेष्टितं नृविडम्बनं[4] न वेद. ॥ (मू.) न अस्ति. ॥ ७० ॥ (पू.) त्वां पश्यन्ति. ॥ (मू.) ॥ ७१ ॥

---

१ प्रिय. २ तुझ्या मायेनें वेष्टिल्या ज्ञानशक्ति ज्यांच्या, असे लोक. ३ देव, पशुपक्षी, मनुष्य इत्यादि योनींत. ४ मनुष्याचें अनुकरण.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अवतार घे-
ण्याचीं कारणें.

जन्म घेतोस व निरनिराळीं चरित्रें वगैरे कारितोस पण हें सर्व त्यात्या जातींचें अनुकरण होय. 'तूं स्वस्वरूपापासून च्युत न होणारा परब्रह्मरूप असूनही अवतार घेतोस ह्याचें कारण, तुझ्या मनांत स्वतांच्या भक्तांना आपल्या (ईश्वराच्या) कथा ऐकल्यापासून उद्भवणारी सिद्धि प्राप्त करून द्यावी असा उद्देश असतो, हें होय,' असें ह्मणतात. ॥ ७२ ॥ दुसरे कित्येक लोक 'कोसलदेशींच्या राजाला (दशरथाला) त्याच्या तपाचें फल द्यावें ह्मणून कौसल्येच्या प्रार्थनेवरून तूं जन्म घेतलेंस' असें ह्मणतात. ॥ ७३ ॥ कोणी कोणीतर सांगतात कीं 'दुष्ट राक्षसांचा पृथ्वीला भार झाला आहे, तो दूर करण्यासाठीं ब्रह्मदेवानें प्रार्थना केली, ह्मणून प्रभूनें हा मनुष्य अवतार धरिला.' ॥ ७४ ॥ रघुकुमारा ! तुझें चरणकमल हीं भवसमुद्रांतून पैलतीरीं नेणारी उत्तम नौका होय. जे कोणी तुझ्या कथा ऐकतात

जन्मकर्मादिकं यद्यत्तदत्यन्तविडम्बनम् ॥ त्वामाहुरक्षरं जातं कथाश्रवणेसिद्धये ॥७२॥ केचित्कोसलराजस्य तपसः फलसिद्धये ॥ कौसल्यया प्रार्थ्यमानं जातमाहुः परे जनाः ॥७३॥ दुष्टराक्षसभूभारहरणायार्थितो विभुः ॥ ब्रह्मणा नररूपेण जातो ऽयमिति केचन॥७४॥ शृण्वन्ति गायन्ति च ये कथास्ते रघुनन्दन ॥

यत्, यत् (पू.). ॥ अक्षरं (मू.) जातं आहुः. ॥ ७२ ॥ केचित् परे जनाः (मू.). ॥ ७३ ॥ केचन ब्रह्मणा अयं विभुः (मू.) [आहुः]. ॥ ७४ ॥ रघुनन्दन, ये ते कथाः (पू.), ॥

१ पूर्ण अनुकरण. २ कथा ऐकणें - हा मनोरथ - सिद्धीस जाण्यासाठीं. ३ ऐकतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

किंवा गातात, त्यांना तुझ्या चरणकमलाचें दर्शन मिळतें. ॥ ७५ ॥ देवा ! तूं गुणांचा आधार असूनही गुणविरहित आहेस. मी तर तुझ्या मायेच्या गुणांनीं पूर्णपणें बद्ध झालेली आहें; तेव्हां मला तुझें ज्ञान व्हावें कसें ? तसेंच, सर्वेश्वरा, तूं स्तुतीचा विषय नव्हस, तेव्हां मला तुझी स्तुति कशी करितां येईल? ॥ ७६॥ ह्मणून, हे रघुवीरा, मी - सांप्रत अग्रभागीं दिसत असलेल्या तुझ्या सगुण मूर्तीला - नमस्कार करित्यें. तिनें (मूर्तीनें) धनुष्यबाण हातीं घेतले आहेत. तिच्या समीपभागीं बंधु लक्ष्मण व सुग्रीवादि वानरमंडळी बसली आहे. " ॥ ७७ ॥ अशा प्रकारें त्या महाभक्त योगिनीनें रघुवीराची स्तुति केली; तेव्हां शरणागतांचीं पापें दूर करणारा तो प्रभु प्रसन्न होऊन तिला ह्मणाला :–'तुझ्या मनांत काय इच्छा आहे ? - सांग. - ' ॥ ७८ ॥ ह्यावर तिनें रामचंद्राला भक्तिपूर्वक उत्तर दिलें :– " भक्तवत्सला प्रभो ! मला एवढा वर दे कीं,

पश्यन्ति तव पादाब्जं भवार्णवसुतारणम्[1] ॥ ७५ ॥ त्वन्मायागुणबद्धा ऽहं व्यतिरिक्तं गुणाश्रयम् ॥ कथं त्वां देव जानीयां स्तोतुं वा ऽविषयं विभुम् ॥७६॥
नमस्यामि रघुश्रेष्ठं बाणासनशरान्वितम् ॥ लक्ष्मणेन सह भ्रात्रा सुग्रीवादिभिरन्वितम् ॥७७॥ एवं स्तुतो रघुश्रेष्ठः प्रसन्नः प्रणताघहृत्[2] ॥ उवाच योगिनीं भक्तां किं ते मनसि कांक्षितम्[3] ॥७८॥ सा प्राह राघवं भक्त्या भक्तिं ते भक्तवत्सल ॥

ते (मू.) तव पादाब्जं पश्यन्ति.॥७५॥देव, (मू.) त्वां कथं जानीयाम् ? ॥७६॥ (पू.)भ्रात्रा (मू.) रघुश्रेष्ठं नमस्यामि.'॥७७॥(पू.)रघुश्रेष्ठः॥भक्तां योगिनीं उवाच–' (मू.)?'॥७८॥सा भक्त्या राघवं प्राह–

१ संसारसमुद्र तरण्याचें चांगलें साधन. २ नमस्कार करणारांचीं पापें दूर करणारा. ३ इच्छा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कोणत्याही योनींत जन्मास गेल्यें तरी माझी तुजवर दृढ भक्ति राहावी; ॥ ७९ ॥ नित्य तुझ्या भक्तांचा समागम घडावा, संसारी पुरुषांचें वारें देखील लागूं नये; माझ्या जिव्हेनें भक्तिपुरःसर नेहमीं ' राम राम ' असा जप करावा : ॥ ८० ॥ तसेंच, माझें अंतःकरण सर्वकाळ तुझ्या श्यामसुंदर रूपाचें चिंतन करीत राहो; त्या (माझ्या मनांत येणाऱ्या) मूर्तीच्या दोहोंबाजूंकडे सीता आणि लक्ष्मण दोघें असावीं; हातांत धनुष्यबाण धरिलेले असावे; कटिप्रदेशीं पीतांबर असावा, मस्तकावरील मुकुटानें त्या मूर्तीला शोभा द्यावी, ॥८१॥ आणि बाहुभूषणें नूपुरें, मोत्यांचे हार, कौस्तुभ व कुंडलें ह्या अलंकारांच्या योगानें ती उज्ज्वल दिसावी. प्रभो, रामचंद्रा, ह्यावांचून दुसरा वर मला कांहीं एक नको. " ॥ ८२ ॥ श्रीरामचंद्र ह्मणाला :– 'स्वयंप्रभे !

यत्र कुत्रापि जातायां निश्चलां देहि मे प्रभो ॥७९॥ त्वद्भक्तेषु सदा संगो भूयान्मे प्राकृतेषु[1] न ॥ जिह्वा मे राम रामेति भक्त्या वदतु[2] सर्वदा ॥ ८० ॥ मानसं श्यामलं[3] रूपं सीतालक्ष्मणसंयुतम् ॥ धनुर्बाणधरं पीतवाससं[4] मुकुटोज्ज्वलम् ॥ ॥८१॥ अंगदै[5]र्नूपुरै[6]र्मुक्ताहारैः कौस्तुभकुण्डलैः ॥ भातं[7] स्मरतु मे राम वरं नान्यं वृणे[8] प्रभो ॥८२॥ श्रीराम उवाच । भवत्वेवं महाभागे गच्छ त्वं बदरीवनम्[9] ॥

'प्रभो, (मू.) ते निश्चलां भक्तिं देहि. ॥७९॥ मे (मू.) वदतु. ॥८०॥ राम, मे (८१।८२मू.) रूपं स्मरतु. अन्यं वरं न वृणे. ' ॥ ८१ ॥ ८२ ॥ श्रीरामः उ० – 'महाभागे, एवं (पू.) त्वं बदरीवनं गच्छ. ॥

१ संसारी लोकांत. २ बोलो. ३ श्यामवर्ण (सांवळें). ४ पिंवळें वस्त्र ज्याचें, अशा. ५ बाहुभूषणांनीं. ६ पैजणांनीं. ७ विराजमान. ८ मागत्यें. ९ बदरिकारण्यांत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुझें भाग्य परम थोर आहे. बरें; तूं ह्मणत्येस, त्याप्रमाणें होवो (त्वां मागितलेले वर तुला मिळतील). आतां तूं बदरिकाश्रमीं जा व तेथें माझें चिंतन करीत राहा. मी परमेश्वर आहें - हें तूं जाणत्येस, - त्याअर्थी लवकरच ह्या पांचभौतिक शरीराचा त्याग केलास ह्मणजे तूं माझ्या स्वरूपीं प्राप्त होशील.' ॥ ८३ ॥ स्वयंप्रभेनें हें रामचंद्राचें अमृततुल्य भाषण श्रवण केलें व लागलीच बदरिकाश्रमाची वाट धरिली. त्या पुण्यस्थलीं बोरीच्या झाडांचीं बनें विपुल आहेत. तेथें पोंचल्यावर, ती अंतःकरणांत रघुपतीचें चिंतन करीत राहिली आणि अंतीं शरीरत्याग करून परम पदास पावली. ॥ ८४ ॥

इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे किष्किंधाकाण्डे षष्ठः सर्गः ॥ ६ ॥

असो. इकडे वानरमंडळी एके ठिकाणीं झाडींत बसून विचार करूं लागली. कोणाला कांहीं उपाय

तत्रैव मां स्मरन्ती त्वं त्यक्त्वेदं भूतपञ्चकम्[1] ॥ मामेव परमात्मानमचिरात्प्रतिपद्यसे[2] ॥ ८३ ॥ श्रुत्वा रघूत्तमवचो ऽमृतसारकल्पं[3] गत्वा तदैव बदरीतरुखण्ड[4]जुष्टम् ॥ तीर्थं तदा रघुपतिं मनसा स्मरन्ती त्यक्त्वा कलेवर[5]मवाप[6] परं पदं सा ॥ ८४ ॥ इति षष्ठः सर्गः ॥ ६ ॥ अथ तत्र समासीना[8] वृक्षखण्डेषु[7] वानराः ॥

(द्वि.) त्यक्त्वा, ॥ (मू.).' ॥८३॥ सा अमृतसारकल्पं रघूत्तमवचः (पू.) तीर्थं गत्वा, (मू.) त्यक्त्वा, परं पदं अवाप. ॥ ८४ ॥ इति किष्किन्धाकाण्डे षष्ठः सर्गः ॥ ६ ॥ (पू.) समासीनाः

---

१ पांच भूतांचें कार्य, अशा. २ पावशील. ३ अमृताच्या सार अंशाची बरोबरी करणारें. ४ बोरींच्या वृक्षांच्या राईनें युक्त. ५ शरीराला. ६ पावली. ७ वृक्षांच्या समूहांत. ८ बसलेले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सुचेना. सीतेला शोधतां शोधतां - श्रमामुळें - सर्वजण कृश होत चालले. ॥ १ ॥ अंगद त्या वानरांत प्रमुख होता. तो कांहीं वानरांना ह्मणाला :– “अहो ! आपण फिरायाला लागल्या दिवसापासून एक महिना भरून गेला, ह्यांत अगदीं संशय नाहीं ! ॥२॥ सीतेचा शोध लागला नाहीं, अर्थात राजाज्ञा मोडल्याचा दोष आपणाकडे आला. असेच जर किष्किंधेस गेलों, तर सुग्रीव आपला वध करील. ॥३॥ मी त्याच्या शत्रूचा मुलगा; ह्मणून, ह्या निमित्तानें तो मला आगोदर मारील ! माझ्यावर त्याची प्रीति असेल कोठून ? रामाचा आधार आहे, ह्मणून मी अद्याप तरी जिवंत राहिलों ! ॥४॥ आतां सुग्रीवाला ‘मी रामाचें कार्य केलें नाहीं’

चिन्तयन्तो विमुह्यन्तः[1] सीतामार्गणकर्शिताः[2] ॥१॥ तत्रोवाचांगदः कांश्चिद्वानरान् वानरर्षभः ॥ भ्रमतां गह्वरे ऽस्माकं मासो नूनं गतो ऽभवत् ॥२॥ सीता नाधिगता[3] ऽस्माभिर्न कृतं राजशासनम्[4] ॥ यदि गच्छाम किष्किन्धां सुग्रीवो ऽस्मान् हनिष्यति ॥३॥ विशेषतः शत्रुसुतं मां मिषान्निहनिष्यति॥मयि तस्य कुतः प्रीतिरहं रामेण रक्षितः ॥ ४ ॥ इदानीं रामकार्यं मे न कृतं तन्मिषं भवेत् ॥

(मू.) वानराः सीतामार्गणकर्शिताः [बभूवुः.] ॥ १ ॥ तत्र वानरर्षभः (पू.) उवाच – ॥ ‘ गह्वरे (मू.)! ॥ २ ॥ अस्माभिः (पू.) न कृतम् ! ॥ यदि किष्किन्धां गच्छाम, [तर्हि] (मू.). ॥ ३ ॥ (पू.). ॥ तस्य (मू.). ॥ ४ ॥ (मू.) [इति यत्,]

---

१ कांहीं सुचत नाहीं ज्यांना, असे. २ सीतेचा शोध करतांना कृश झालेले. ३ मिळविली. ४ राजाज्ञा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हें मला मारण्यास आयतेंच निमित्त मिळणार! त्याचें अंतःकरण दुष्ट आहे, हें मी पूर्णपणें ओळखितों. ॥५॥ अहो! वडील बंधूची पत्नी ह्मणजे प्रत्यक्ष मातेसारखी : पण तो दुरात्मा तिचा देखील उपभोग घेण्यास सोडीत नाहीं! ह्मणून, वानरवीरहो! मी त्याच्याजवळ कदापि जाणार नाहीं, ॥ ६ ॥ तर, - गळ्याला फांस लावून घेऊन किंवा दुसऱ्या - कोणत्या तरी मरणाच्या युक्तीनें येथें प्राणत्याग करीन!" हे शब्द उच्चारतांना अंगदाच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले. ती त्याची स्थिति पाहिल्यावर कित्येक मोठमोठ्या वानरांना ॥ ७ ॥ अत्यंत खेद झाला. त्यांच्याही डोळ्यांत अश्रुबिंदु उभे राहिले. शेवटीं ते युवराजाला (अंगदाला) ह्मणाले:– ॥ ८ ॥ 'राजपुत्रा! ह्याबद्दल तूं शोक कशासाठीं करितोस? आह्मी तुझ्या प्राणांचें

तस्य मद्धनने नूनं सुग्रीवस्य दुरात्मनः ॥ ५ ॥ मातृकल्पां[1] भ्रातृभार्यां[2] पापात्मा ऽनुभवत्यसौ[3] ॥ न गच्छेयमतः[4] पार्श्वं तस्य वानरपुंगवाः ॥६॥ त्यक्ष्यामि जीवितं चात्र येन केनापि मृत्युना ॥ इत्यश्रुनयनं केचिद्दृष्ट्वा वानरपुंगवाः ॥७॥ व्यथिताः साश्रुनयना युवराजमथाब्रुवन् ॥८॥ किमर्थं तव शोको ऽत्र वयं ते प्राणरक्षकाः भवामो निवसामो ऽत्र गुहायां भयवर्जिताः ॥ ९ ॥

तत् तस्य दुरात्मनः सुग्रीवस्य मद्धनने नूनं मिषं भवेत्. ॥ ५ ॥ वानरपुङ्गवाः, पापात्मा असौ (मू.) पार्श्वं न गच्छेयम्. ॥ ६ ॥ (मू.) जीवितं त्यक्ष्यामि!' ॥ इति अश्रुनयनं [तं] दृष्ट्वा (मू.) ॥ ७ ॥ (मू.) [सन्तः] युवराजं अब्रुवन् – ॥ ८ ॥ 'अत्र (मू.) [सन्तः] निर्वसामः[6]. ॥ ९ ॥

१ बहुतेक आईसारख्या. २ - वडील - भावाच्या पत्नीला. ३ उपभोगितो. ४ जाईन. ५ सोडीन. ६ राहूं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारुति अंगदाची समजत घालितो.

रक्षण करण्यास सिद्ध आहों. ह्या गुहेंत आपल्याला कोणाची भीति नाहीं. आपण येथेंच राहूं. ॥ ९ ॥ हें नगर इंद्रपुरीसारखें सर्व ऐश्वर्यांनीं भरलेलें आहे; - ह्या ठिकाणीं कोणत्याही प्रकारची उणीव पडणार नाहीं. - ' अशीं त्यांचीं परस्परांशीं हळूहळू चाललेलीं भाषणें मारुतीच्या कानीं गेलीं. ॥ १० ॥ हनुमान नीतिशास्त्रांत निपुण होता. त्यानें अंगदाला पोटाशीं धरून सांगितलें :– " अंगदा! हे भलतेभलते विचार तुझ्या मनांत काय ह्मणून येतात ? - सुग्रीव तुझा वध करील असें कधींही होणें नाहीं. म्हणून ह्या वानरांनीं सांगितलेलें, अविचाराचें कृत्य (गुहेंतच नेहमीं राहणें) करणें अगदीं योग्य नव्हे. ॥ ११॥ अरे ! तूं सुग्रीवाला पहिल्यापासूनच फार आवडता आहेस; त्यांतून, तूं तारेचा मुलगा, ह्मणून तर तो तुजवर पराकाष्ठेचा लोभ करितो. तसेंच रामाचें देखील तुजवरील प्रेम दिवसानुदिवस लक्ष्मणापेक्षांही अधिक होत चाललें आहे.॥ १२॥

सर्वसौभाग्यसहितं[1] पुरं देवपुरोपमम्[2] ॥ शनैः[4] परस्परं वाक्यं वदतां[5] मारुतात्मजः ॥ १० ॥ श्रुत्वांगदं समालिंग्य प्रोवाच नयकोविदः[3] ॥ विचार्यते[6] किमर्थं ते दुर्विचारो न युज्यते[7] ॥ ११ ॥ राज्ञो ऽत्यंतप्रियस्त्वं हि तारापुत्रो ऽतिवल्लभः ॥ रामस्य लक्ष्मणात्प्रीतिस्त्वयि नित्यं प्रवर्धते[8] ॥ १२ ॥

[इदं] पुरं (मू.) [अस्ति.]' ॥ नयकोविदः मारुतात्मजः शनैः परस्परं वदतां (बा. १०।११ मू.). ॥ १० ॥ ११ ॥ (पू.) त्वं राज्ञः अत्यंतप्रियः, ॥ (मू.) प्रीतिः नित्यं प्रवर्धते. ॥ १२ ॥

१ सगळ्या ऐश्वर्यांनीं युक्त. २ देवांच्या नगरासारखें. ३ नीतिशास्त्रांत निष्णात. ४ हळूहळू. ५ बोलणाऱ्यांचें. ६ विचार केला जातो. ७ योग्य आहे. ८ अधिक वाढते.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एकंदरींत तुला रामाची भीति नाहीं, आणि सुग्रीवाची तर मुळींच बाळगायाला नको; बाळा, मी तुझें कल्याण करण्यास निरंतर तत्पर आहें - हें तूं जाणतोसच; म्हणून आतां - दुसऱ्या कोणाला विचारूं देखील नकोस. ॥ १३ ॥ अरे ! 'ह्या गुहेंत राहिलें म्हणजे कोणाला कळायाचें नाहीं व भीति बाळगायाला नको' असें वानर म्हणतात. - तें अगदीं अयोग्य होय; कारण, तूंच पहा, - रामाच्या बाणांनीं ज्याचा भेद होणार नाहीं असा पदार्थ, किंवा रामाचा बाण जेथें पोंचणार नाहीं असें स्थल, त्रैलोक्यांत कोठें तरी आहे काय? ॥ १४॥ वानरश्रेष्ठा ! हे जे वानर तुला सध्यां असा भलता भलता उपदेश करीत आहेत, ते तरी पुत्र स्त्रिया इत्यादिकांना सोडून तुजबरोबर नित्य राहतील कसे ? - विचार कर ! - ॥ १५ ॥ बाळा ! आणखी एक अत्यंत

अतो न राघवाद्भीतिस्तव राज्ञो विशेषतः॥ अहं तव हिते सक्तो वत्स नान्यं विचारय ॥१३॥ गुहावासश्च निर्भेद्य इत्युक्तं वानरैस्तु यत् ॥ तदेतद्रामबाणानामभेद्यं किं जगत्त्रये ॥१४॥ ये त्वां दुर्बोधयन्त्येते वानरा वानरर्षभ ॥ पुत्रदारादिकं त्यक्त्वा कथं स्थास्यन्ति ते त्वया ॥१५॥ अन्यद्गुह्यतमं वक्ष्ये रहस्यं शृणु मे सुत॥

अतः तव (पू.) न, राज्ञः विशेषतः [न]; ॥ (मू.) न विचारय. ॥ १३ ॥ वानरैः (पू.) यत् उक्तं, ॥ तत् एतत् [अयुक्तं]. (मू.) अभेद्यं किं ? ॥ १४ ॥ वानरर्षभ, (पू.) त्वां दुर्बोधयन्ति, ॥ ते त्वया [सह] (मू.)?॥ १५ ॥ सुत, (पू.) वक्ष्ये; मे शृणु – ॥

१ भलताच उपदेश करितात. २ मुलगे, बायका इत्यादिकांना.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'राम मनुष्य नव्हे, देव आहे.'

गुप्त गोष्ट सांगतों; ऐक पण मनांतच ठेव (कोणाजवळ बोलूं नकोस). अरे ! राम कांहीं मनुष्य नव्हे, तर साक्षात् ज्ञानमूर्ति निर्विकार जगन्निवास परमात्मा होय. ॥ १६ ॥ सीता हीं महासमर्थ व जगाला मोह घालणारी माया; आणि लक्ष्मण हा, ज्याचा सर्व भुवनाला आधार, त्या नागराजाचा–शेषाचा–अवतार आहे. ॥ १७ ॥ ब्रह्मदेवानें राक्षससमूहाचा नाश करण्यासाठीं प्रार्थना केली; ह्मणून ह्या सर्वांनीं मायेनें मनुष्यजन्म घेतले आहेत. ह्या तिघांपैकीं प्रत्येकजण एकएकटा जगाचें रक्षण करण्यास समर्थ आहे. ॥ १८ ॥ आपण सगळे वैकुंठवासी विष्णूचे पार्षद आहों; परमात्म्यानें स्वेच्छेनें मनुष्यरूप धरिलें; म्हणून, ॥ १९ ॥

रामो न मानुषो देवः साक्षान्नारायणोऽव्ययः ॥१६॥ सीता भगवती माया जनसंमोहकारिणी ॥ लक्ष्मणो भुवनाधारः[1] साक्षाच्छेषः फणीश्वरः[2] ॥१७॥ ब्रह्मणा प्रार्थिताः सर्वे रक्षोगणविनाशने[3] ॥ मायामानुषभावेन[4] जाता लोकैकरक्षकाः[5] ॥१८॥ वयं च पार्षदाः सर्वे विष्णोर्वैकुण्ठवासिनः ॥ मनुष्यभावमापन्ने[6] स्वेच्छया परमात्मनि ॥ १९ ॥

रामः मानुषः न, [किंतु] साक्षात् देवः अव्ययः नारायणः. ॥१६॥ (पू.) माया. ॥ (मू.) शेषः. ॥ १७ ॥ (पू.) प्रार्थिताः सर्वे ॥ (मू.) जाताः. ॥ १८ ॥ सर्वे (पू.) विष्णोः पार्षदाः. ॥ वयं परमात्मनि स्वेच्छया (१९ उ.) [सति] ॥

---

१ जगाचा आधार. २ नागांचा राजा. ३ राक्षसांच्या समुदायाचा नाश करण्याविषयीं. ४ मायिक मनुष्याच्या रूपानें. ५ लोकांचें एकएकटे रक्षण करणारे. ६ मनुष्यरूपास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आपल्यालाही त्याच्याच मायेच्या योगें वानरजन्में मिळालीं. आपण पूर्वी तपश्चर्येच्या योगें जगत्पतीची आराधना केली; ॥ २० ॥ तेव्हां त्यानेंच आपल्यावर अनुग्रह केला, ह्मणून आपल्याला पार्षदपदवी प्राप्त झाली. आतांही आपण त्याच्याच मायेच्या अनुरोधानें वागून त्याची सेवा करूं, ॥२१॥ व शेवटीं पुन्हां वैकुंठलोकीं जाऊन सुखानें राहूं." मारुतीनें अंगदाला अशाप्रकारें आश्वासन देऊन त्याची समजूत केली. पुढें सगळेजण विंध्यनामक महापर्वतावर गेले, ॥ २२ ॥ आणि हळूहळू जानकीचा शोध करतां करतां दक्षिणमहासागराच्या तीरीं महेंद्रसंज्ञक पर्वताजवळील एका लहानशा पवित्र डुंगीवर येऊन पोंचले. ॥ २३ ॥

वयं वानररूपेण जातास्तस्यैव मायया ॥ वयं तु तपसा पूर्वमाराध्य जगतां पतिम्
॥ २० ॥ तेनैवानुगृहीताः स्मः पार्षदत्वमुपागताः ॥ इदानीमपि तस्यैव सेवां
कृत्वैव मायया ॥२१॥ पुनर्वैकुण्ठमा[2]साद्य सुखं स्थास्याँ[3]महे वयम् ॥ इत्यंगदम-
थाश्वा[4]स्य ततो विन्ध्यं महाचलं[5]म् ॥ २२ ॥ विचिन्[6]वन्तो ऽथ शनकैर्जानकीं
दक्षिणाम्[7]बुधेः ॥ तीरे महेन्द्राख्यगिरेः पवित्रं [8]पादमाययुः ॥ २३ ॥

(२० पू.) वानररूपेण जाताः. ॥ (मू.) आराध्य, ॥ १९ ॥ २० ॥ तेन एव अनुगृहीताः [सन्तः] (पू.) स्मः. ॥ मायया (मू.) ॥ २१ ॥ वयं (पू.). ' ॥ [मारुतिः] इति अंगदं आश्वास्य [स्थितः]. ततः [सर्वे] (मू.) [गताः]. ॥ २२ ॥ अथ शनकैः जानकीं (मू.). ॥ २३ ॥

१ आह्मीं. २ पावून. ३ राहूं. ४ आश्वासन देऊन. ५ मोठ्या पर्वतावर. ६ शोधणारे. ७ दक्षिण समुद्राच्या. ८ पर्वताच्या जवळील लहानशा टेंकडीस.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ते समुद्रतीरीं पोंचले.

तों अग्रभागीं असलेला जलनिधि त्यांच्या दृष्टीस पडला. पलिकडे जाणें कठिण, पाणी खोल किती त्याचाही थांग लागायाचा नाहीं, असा तो महासागराचा उग्र देखावा पाहून वानर भयभीत झाले व प्रत्येकाच्या मुखांतून 'आतां पुढें काय करायाचें!' असे उद्गार येऊं लागले. ॥२४॥ अंगदप्रभृति वानर महापराक्रमी होते खरे; - पण येथें करणार काय? - सगळेजण चिंताक्रांत होऊन समुद्राच्या तीरावर बसले. त्यावेळीं त्यांचे परस्परांशीं मंत्र (मसलती) झाले; ते येणेंप्रमाणें:- ॥ २५ ॥ 'अहो! ह्या गुहेमध्यें फिरतां फिरतांच आपला एक महिना निघून गेला! आजपर्यंत रावणही कोठें दिसला नाहीं किंवा जनककन्या सीताही सांपडली नाहीं! ॥ २६ ॥ सुग्रीवाची शिक्षा करण्याची पद्धत फार तीव्र आहे. तो

दृष्ट्वा समुद्रं दुष्पारमगाधं भयवर्धनम् ॥ वानरा भयसंत्रस्ताः किं कुर्म इतिवादिनः ॥२४॥ निषेदुरुदधेस्तीरे सर्वे चिन्तासमन्विताः ॥ मन्त्रयामासुरन्योन्यमंगदाद्या महाबलाः ॥२५॥ भ्रमतामेव नो मासो गतोऽत्रैव गुहान्तरे ॥ न दृष्टो रावणो वाऽद्य सीता वा जनकात्मजा ॥२६॥ सुग्रीवस्तीक्ष्णदण्डोऽस्मान्निहन्त्येव न संशयः ॥

(२४पू.)समुद्रं दृष्ट्वा ॥ (२४उ.।२५मू.) वानराः उदधेः तीरे निषेदुः; अन्योन्यं मन्त्रयामासुः-॥२४॥ ॥२५॥ 'अत्र एव गुहांतरे(पू..)॥अद्य रावणः (मू.) सीता वा न [दृष्टा]! ॥२६॥तीक्ष्णदण्डः (पू.). ॥

१ ज्याच्या पलिकडे जाणें कठीण, अशा. २ ज्याचा तळ लागत नाहीं, अशा. ३ भीति वाढविणाऱ्या. ४ समुद्राच्या. ५ बसले. ६ विचार करूं लागले. ७ मारील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आपला वध करील, ह्याबद्दल संशयच नको ! सुग्रीवाच्या हातून मरण्यापेक्षां प्रायोपवेश करण्यामध्येंच आपलें अधिक कल्याण आहे ! ' ॥ २७ ॥ शेवटीं सर्वांनीं हा निश्चय ठरवून त्या ठिकाणीं जिकडेतिकडे दर्भ पसरले; व मरणाचा निर्धार करून सगळेजण तेथें बसले. ॥ २८ ॥ इतक्यांत एक गृध्र महेंद्र पर्वताच्या गुहेंतून बाहेर पडून हळूहळू खालीं आला. त्याचें शरीर पर्वतासारखें प्रचंड होतें. ॥ २९ ॥ सर्व मोठमोठे वानर प्रायोपवेशाचा संकल्प करून बसले आहेत, असें पाहिल्यावर तो गृध्र सावकाशपणें - आपल्याशींच पण त्यांना ऐकूं जाईसें मोठ्यानें - बोलूं लागला: – ' - बरेंच झालें ! - आज आपल्याला

सुग्रीववधतो ऽस्माकं श्रेयः प्रायोपवेशनम् ॥२७ ॥ इति निश्चित्य तत्रैव दर्भानास्तीर्य सर्वतः ॥ उपाविवेशुस्ते सर्वे मरणे कृतनिश्चयाः ॥२८ ॥ एतस्मिन्नन्तरे तत्र महेन्द्राद्रिगुहान्तरात् ॥ निर्गत्य शनकैरागाद् गृध्रः पर्वतसन्निभः ॥ २९ ॥ दृष्ट्वा प्रायोपवेशेन स्थितान्वानरपुंगवान् ॥ उवाच शनकैर्गृध्रः प्राप्तो भक्षो ऽद्य मे बहुः ॥ ३० ॥

अस्माकं (मू.) श्रेयः. ' ॥ २७ ॥ इति निश्चित्य, मरणे कृतनिश्चयाः सर्वे ते (पू.) आस्तीर्य, (मू.). ॥ २८ ॥ एतस्मिन् अन्तरे पर्वतसन्निभः गृध्रः (मू.) तत्र आगात्. ॥ २९ ॥ गृध्रः (पू.) दृष्ट्वा शनकैः उवाच – ' अद्य मे बहुः भक्षः प्राप्तः. ॥ ३० ॥

१ ' मरण येईपर्यंत असाच कांहीं न खातां न पितां बसेन ' असा संकल्प करून बसणें. २ अधिक हितकारक. ३ पसरून. ४ बसले. ५ महेन्द्र पर्वताच्या गुहेमधून. ६ बाहेर पडून. ४।१६

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुष्कळ भक्ष्य मिळालें ! ॥३०॥ प्रतिदिनीं एक एक अशा क्रमानें मी सर्वांना खाऊन टाकीन !' हे गृध्राच्या मुखांतून निघालेले शब्द कानीं पडतांच वानर मनांत भिऊन गेले, व परस्परांशीं ह्मणूं लागले :— ॥ ३१ ॥ 'हा गिधाड आह्मां सर्वांना खाणार, ह्यांत संशय नाहीं! वानरवीरहो! आपण रामाचें किंचित् देखील कार्य केलें नाहीं, ॥ ३२ ॥ तसेंच सुग्रीवाचें किंवा आपलें स्वतांचेंही हित करून घेतलें नाहीं! ह्या गिधाडाच्या हातून विनाकारण मरून आपल्याला यमसदनीं जावें लागणार! ॥ ३३ ॥ अहो! जटायु किती तरी धार्मिक व सुबुद्ध होता! त्यानें शत्रूला (रावणाला) बरेंच दमविलें (जेरीस आणिलें). शेवटीं, रामकार्यासाठीं मृत्यु आल्यामुळें, त्याला, योगिजनांना देखील दुर्मिळ असें मोक्षपद प्राप्त झालें! ' ॥३४॥

एकैकशः क्रमात्सर्वान् भक्षयामि दिनेदिने ॥ श्रुत्वा तद्गृध्रवचनं वानरा भीतमानसाः ॥३१॥ भक्षयिष्यति नः सर्वानसौ गृध्रो न संशयः ॥ रामकार्यं च नास्माभिः कृतं किंचिद्धरीश्वराः ॥३२॥ सुग्रीवस्यापि च हितं न कृतं स्वात्मनामपि ॥ वृथा ऽनेन वधं प्राप्ता गच्छामो यमसादनम् ॥३३॥ अहो जटायुर्धर्मात्मा रामस्यार्थे मृतः सुधीः ॥ मोक्षं प्राप दुरावापं योगिनामप्यरिन्दमः[3] ॥ ३४ ॥

दिने, दिने (पू.). '॥ वानराः तत् गृध्रवचनं (मू.) सन्तः [ऊचुः] – ॥ ३१ ॥ ' असौ गृध्रः सर्वान् नः (पू.). ॥ हरीश्वराः[1], अस्माभिः (मू.) न कृतं. ॥३२॥ (पू.) च हितं न कृतं. ॥ अनेन (मू.) गच्छामः[2]. ॥ ३३ ॥ (मू.) जटायुः योगिनां अपि दुरावापं[4] मोक्षं प्राप !' ॥ ३४ ॥

१ वानरांतील प्रमुख. २ यमाच्या गृहास. ३ शत्रूंस दमविणारा. ४ मिळण्यास कठिण, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हें वानरांचें भाषण संपातीच्या कानीं गेलें; तेव्हां - तो ह्मणाला :– " वानरहो ! - तुह्मी आहां तरी कोण? माझ्या भावाचें ' जटायु ' हें नांव घेऊन तुमचें परस्परांशीं बोलणें चाललें आहे, त्यामुळें मला ' आपल्या कानांत अमृतवृष्टि होत आहे कीं काय! ' असा भास होतो. तुह्मी फार सज्जन दिसतां. बोला. तुह्मांला मजपासून किंचित् देखील उपद्रव व्हावयाचा नाहीं. " ॥ ३५ ॥ ३६ ॥ - हें आश्वासन ऐकिल्यावर, वानरमंडळीपैकीं पुढारी - श्रीमान् (इभ्रतदार) अंगद उठला व गृध्राच्या जवळ - जाऊन त्याला - सांगूं लागला :– " गृध्रराजा! दशरथाचा पुत्र सकलैश्वर्यसंपन्न रामचंद्र लक्ष्मणासहवर्तमान, ॥ ३७ ॥ आपली पत्नी जी सीता, तिला बरोबर घेऊन महारण्यांत फिरत असे. त्याची भार्या महासाध्वी सीता

संपातिस्तु तदा वाक्यं श्रुत्वा वानरभाषितम् ॥ के वा यूयं मम भ्रातुः कर्णपीयूषसंनिभम् ॥३५॥ जटायुरिति नामाद्य व्याहरन्तः परस्परम् ॥ उच्यतां वो भयं मा भून्मत्तः प्लवगसत्तमाः ॥ ३६ ॥ तमुवाचांगदः श्रीमानुत्थितो गृध्रसन्निधौ ॥ रामो दाशरथिः श्रीमान् लक्ष्मणेन समन्वितः ॥ ३७ ॥ सीतया भार्यया सार्धं विचचार महावने ॥ तस्य सीता हृता साध्वी रावणेन दुरात्मना ॥ ३८ ॥

(३५पू.) वाक्यं श्रुत्वा [उवाच] – ' प्लवगसत्तमाः[2], (३५ उ. ३६ पू.) व्याहरन्तः[3] यूयं के वा ? (मू.) भयं मा[6] भूत्[4]. ' ॥ ३५ ॥ ३६ ॥ गृध्रसन्निधौ उत्थितः[8] श्रीमान् अंगदः तं उवाच –" (मू.) रामः ॥ ३७ ॥ (पू.) विचचार. ॥ (मू.) रावणेन हृता. ॥ ३८ ॥

१ कानाला अमृतासारखें वाटणारें. २ वानरश्रेष्ठहो. ३ बोलणारे. ४ बोलावें. ५ मजपासून. ६ न. ७ असो. ८ उठलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अंगद गृध्राला वृत्त सांगतो.

दुष्ट रावणानें चोरून नेली. ॥३८॥ रामलक्ष्मण मृगयेसाठीं बाहेर गेले होते, ही संधि साधून तो दुष्ट बलात्कारें सीतेला घेऊन चालला; तेव्हां ती 'रामा! रामा!' असा आक्रोश करूं लागली. तो करुण शब्द महाप्रतापी जटायुनामक गृध्राच्या कानीं गेला. त्यावेळीं त्या पक्षिराजानें रामासाठीं रावणाशीं घोरतर युद्ध केलें. जटायु महापराक्रमी वीर होता खरा, पण रावणाच्या हस्तें मृत्यु पावला. त्याला रामकार्यासाठीं मरण आलें, ॥ ३९ ॥ ४० ॥ आणि रामाच्या हातून अग्नि मिळाला, ह्मणून लागलीच रामरूपीं सायुज्यमुक्ति प्राप्त झाली. रामानें सुग्रीवाकडे येऊन अग्नीसमक्ष त्याच्याशीं सख्य केलें, ॥ ४१ ॥ व सुग्रीवाच्या सांगण्यावरून वालीचा वध केला. वालीचा पराजय करणें किंवा त्याच्या आंगावर चालून जाणें मोठमोठ्या

मृगयां निर्गते रामे लक्ष्मणे च हृता बलात् ॥ रामरामेति क्रोशन्ती[1] श्रुत्वा गृध्रः प्रतापवान् ॥३९॥ जटायुर्नाम पक्षीन्द्रो युद्धं कृत्वा सुदारुणम् ॥ रावणेन हतो वीरो राघवार्थं महाबलः ॥४०॥ रामेण दग्धो रामस्य सायुज्यमगमत्क्षणात् ॥ रामः सुग्रीवमासाद्य[2] सख्यं कृत्वा ऽग्निसाक्षिकम्[3] ॥ ४१॥ सुग्रीवचोदितो हत्वा वालिनं सुदुरासदम्[4] ॥ राज्यं ददौ वानराणां सुग्रीवाय महाबलः ॥ ४२ ॥

(पू.) मृगयां निर्गते [सति] (मू.) बलात् हृता. ॥ प्रतापवान् गृध्रः [तत् क्रोशनं] श्रुत्वा, [रावणं ययौ.] ॥३९॥वीरः महाबलः(पू.)राघवार्थं सुदारुणं युद्धं कृत्वा,(मू.).॥४०॥(पू.)अगमत्.॥(मू.) सख्यं कृत्वा, [तस्थौ]. ॥४१॥ महाबलः (पू.) [रामः] सुदुरासदं वालिनं हत्वा, सुग्रीवाय वानराणां (मू.). ॥४२॥ ॥ ६२ ॥

१ ओरडणारी. २ जवळ येऊन. ३ अग्नि साक्षी ज्याला, अशा. ४ हातीं सांपडण्यास अत्यंत कठिण, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वीरांना देखील फार धोक्याचें वाटे, - इतका तो बलाढ्य होता; त्याला ज्यानें मारिलें, तो किती पराक्रमी असला पाहिजे ह्याचा विचार आपणच करा. असो. - नंतर महासमर्थ रामचंद्रानें सुग्रीवाला वानरांचें राज्य दिलें. ॥४२॥ पुढें महापराक्रमी सुग्रीवानें आह्मासारख्या मोठमोठ्या शक्तिमान् वानरांचे कळप सीतेच्या शोधास पाठविले. ॥४३॥ - निघतांना त्यानें आह्मांला बजावून सांगितलें आहे कीं, - महिना भरण्यापूर्वीं परत या; नाहीं तर तुमचे प्राण घेईन. ह्या आज्ञेप्रमाणें आह्मी फिरूं लागलों, ते ह्या वनांत एका गुहेमध्यें शिरलों. ॥४४॥ तेथेंच महिना संपून गेला. सीता किंवा रावण कोठें कशीं काय आहेत, तीं अद्याप आह्मांला माहीत नाहींत. - परत गेलों तरी जिवाची आशा नाहीं ह्मणून - मरणासाठीं प्रायोपवेशाचा संकल्प करून क्षारसमुद्राच्या तीरीं बसलों आहों. ॥ ४५ ॥ पक्षिराजा ! जर त्या सुंदर सीतेबद्दल कांहीं वार्ता तुला ठाऊक असेल, तर आह्मांला निं-

सुग्रीवः प्रेषयामास सीतायाः परिमार्गणे ॥ अस्मान्वानरवृन्दान्वै महासत्त्वान्महाबलः ॥४३॥ मासादर्वाङ् निवर्तध्वं नो चेत्प्राणान्हरामि वः ॥ इत्याज्ञया भ्रमन्तो ऽस्मिन्वने गह्वरमध्यगाः ॥४४॥ गतो मासो न जानीमः सीतां वा रावणं च वा ॥मर्तुं प्रायोपविष्टाः स्मस्तीरे लवणवारिधेः ॥४५॥ यदि जानासि हे पक्षिन्सीतां कथय नः शुभाम् ॥ अंगदस्य वचः श्रुत्वा संपातिर्हृष्टमानसः ॥४६॥

महाबलः (मू.) अस्मान् प्रेषयामास. ॥ ४३ ॥ ' (पू.) प्राणान् हरामि. ' ॥ (मू.) [वयं] भ्रमन्तः [स्थिताः.] ॥ ४४ ॥ मासः (पू.) न जानीमः. ॥ लवणवारिधेः तीरे (मू.). ॥ ४५ ॥ (पू.) सीतां यदि जानासि, [तर्हि] नः कथय. " ॥ (मू.) संपातिः ॥ ४६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संपाति त्यांना वचन देतो.

वेदन कर." ॥ हें अंगदाचें भाषण श्रवण केल्याबरोबर संपातीच्या अंतःकरणाला आनंद वाटला. ॥ ४६ ॥ तो ह्मणाला :– 'वानरश्रेष्ठहो ! माझा भाऊ जटायु मला फार प्रिय असे. पुष्कळ सहस्र वर्षांनीं आज मला भावाची वार्ता समजली. ॥ ४७ ॥ वानरवीरहो ! मी तुह्मांला वाणीनें साह्य करीन; पण आगोदर भावाला तिलांजलि देण्यासाठीं मला उदकाजवळ न्या. ॥ ४८ ॥ नंतर मी तुमची कार्यसिद्धि होण्यासाठीं सर्व शुभ वार्ता सांगेन.' वानरांनीं 'बरें आहे' असें म्हणून पक्षिराजाला समुद्रतीरीं नेलें. ॥ ४९ ॥ त्यानेंही समुद्रोदकांत स्नान करून भावाला जलांजलि दिला. पुन्हां वानरवीरांनीं त्याला परत स्वस्थानीं नेलें. तेथें स्वस्थ

उवाच मतिप्रियो भ्राता जटायुः प्लवगेश्वराः ॥ बहुवर्षसहस्रान्ते भ्रातृ[1]वार्ता श्रुता
मया ॥ ४७ ॥ वाक्[2]साहाय्यं करिष्ये ऽहं भवतां प्लवगेश्वराः ॥ भ्रातुः सलि[3]लदाना-
य नयध्वं मां जला[4]न्तिकम् ॥ ४८ ॥ पश्चात्सर्वं शुभं वक्ष्ये भवतां कार्यसिद्धये ॥ तथे-
ति निन्युस्ते तीरं समुद्रस्य विहं[6]गमम् ॥ ४९ ॥ सो ऽपि [8]तत्सलिले स्नात्वा भ्रातुर्द-
त्वा जलाञ्जलिम् ॥ पुनः स्वस्थानमासाद्य स्थितो नीतो हरीश्वरैः ॥ संपातिः
कथयामास वानरान्परिहर्षयन् ॥ ५० ॥

उवाच – 'प्लवगेश्वराः, जटायुः (पू.), ॥ मया (मू.). ॥ ४७ ॥ प्लवगेश्वराः, अहं भवतां (मू.) नयध्वं. ॥ ४८ ॥ (पू.) वक्ष्ये. ' ॥ ते (मू.) समुद्रस्य तीरं निन्युः. ॥ ४९ ॥ (पू.) दत्वा, ॥ पुनः हरीश्वरैः नीतः [सन] (मू.) कथयामास – ॥ ५० ॥

१ भावाचा वृत्तांत. २ वाणीनें साह्य. ३ उदक देण्यासाठीं. ४ पाण्याजवळ. ५ न्या. ६ पक्ष्याला. ७ नेते झाले. ८ त्या उदकांत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बसल्यावर संपातीनें वानरांना अत्यंत आनंद होण्यासारखी वार्ता सांगितली : ती येणेंप्रमाणें :- ॥ ९० ॥ “ वानरहो! त्रिकूट पर्वताच्या माथ्यावर लंका ह्मणून नगरी आहे. त्याठिकाणीं सीता अशोकवनांत राक्षसींच्या आश्रयानें सुरक्षित आहे. ॥ ९१ ॥ लंका समुद्रामध्यें येथून शंभर योजनें लांब आहे खरी, पण मला दिसत आहे, सीता देखील माझ्या दृष्टीस पडत आहे, ह्यांत संदेह नाहीं. ॥ ९२ ॥ मी जातीचा गृध्र असल्यामुळें दूरचा पदार्थ पाहूं शकतों. ह्मणून, इतक्या लांबून सीता कशी दिसेल, अशी शंका घेण्याचें कारण नाहीं. आतां, शंभर योजनें विस्तीर्ण अशा ह्या समुद्राचें जो कोणी उल्लंघन करील, ॥ ९३ ॥ तोच सीतेची भेट घेऊन पुन्हां परत येईल, हा निश्चय समजा. रावणानें माझ्या भावाचा वध केला; ह्मणून

लंकानाम नगर्यास्ते त्रिकूटगिरिमूर्धनि ॥ तत्राशोकवने सीता राक्षसीभिः सुरक्षिता ॥ ५१ ॥ समुद्रमध्ये सा लंका शतयोजनदूरतः[2] ॥ दृश्यते मे न संदेहः[3] सीता च परिदृश्यते ॥ ५२ ॥ गृध्रत्वाद्दूरदृष्टिर्मे[4] नात्र संशयितुं[5] क्षमम् ॥ शतयोजनविस्तीर्णं समुद्रं यस्तु लंघयेत्[7] ॥ ५३॥ स एव जानकीं दृष्ट्वा पुनरार्यास्यति[8] ध्रुवम् ॥ अहमेव दुरात्मानं रावणं हन्तुमुत्सहे[9] ॥

‘ त्रिकूटगिरिमूर्धनि[1] (मू.) [अस्ति]. ॥ ५१ ॥ सा लंका मे (मू.) संदेहः न. ॥ ५२ ॥ मे (पू.) न क्षमं[6]. ॥ यः (मू.), ॥ ५३ ॥ (पू.) आर्यास्यति. ॥ एकाकी अहं एव भ्रातृहन्तारं (पू.).

१ त्रिकूट पर्वताच्या माथ्यावर. २ शंभर योजनांच्या पल्ल्यावर. ३ संशय. ४ दूरचें पाहण्याची शक्ति. ५ संशय घेण्यास. ६ योग्य. ७ उल्लंघून पलिकडे जाईल. ८ येईल. ९ उत्सुक आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'पलिकडे जाण्याचा यत्न करा.'

माझ्या मनांत, आपण एकट्यानेंच त्या दुष्टाचा घात करावा, अशी उत्सुकता वाटते; पण काय करूं हो! मला पंख नाहींत, - ह्मणून उपाय नाहीं! - ॥ ५४ ॥ तुह्मी होईल तितकें करून समुद्राचें उल्लंघन करण्यास झटा. नंतर, रघुवीर रामचंद्र राक्षसांच्या राजाचा--रावणाचा--वध करील. ॥ ५५ ॥ शंभर योजनें लांबीचा समुद्र उल्लंघून जावयाचें, लंकेंत शिरायाचें, सीतेला भेटायाचें, तिच्याशीं संभाषण करायाचें आणि समुद्रावरून उडी मारून पुन्हां परत यावयाचें; इतकीं कार्यें करण्यास तुह्मांपैकीं कोण समर्थ आहे, त्याचा आगोदर विचार करा." ॥५६॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे किष्किन्धाकाण्डे सप्तमः सर्गः ॥७॥

भ्रातृहन्तारमेकाकी किंतु पक्षविवर्जितः[2] ॥ ५४ ॥ यतध्वमतियत्नेन लंघितुं सरितांपतिम्[3] ॥ ततो हन्ता रघुश्रेष्ठो रावणं राक्षसाधिपम् ॥ ५५ ॥ उल्लंघ्य सिन्धुं शतयोजनायतं लंकां प्रविश्याथ विदेहकन्यकाम् ॥ दृष्ट्वा समाभाष्य च वारिधिं पुनस्तर्तुं समर्थः कतमो विचार्यताम् ॥ ५६ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे किष्किन्धाकाण्डे सप्तमः सर्गः ॥ ७ ॥

किंतु (मू.) [अस्मि]!॥५४॥(वू.) लंघितुं[4] यतध्वं. ॥(मू.) रावणं हन्ता.॥५५॥शतयोजनायतं सिन्धुं(मू.) समर्थः विचार्यताम्.' ॥ ५६ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये किष्किन्धाकाण्डे सप्तमः सर्गः ॥७॥

१ भावाचा वध करणारास. २ पंखांनीं विरहित असा. ३ नद्यांच्या पतीला (समुद्राला). ४ उल्लंघन करण्यास. ५ यत्न करा. ६ मारील. ७ समुद्रास. ८ तुह्मांपैकीं कोण. ९ विचार करा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हें भाषण ऐकिल्यावर सर्व वानरांचीं अंतःकरणें - संपातीचें इत्थंभूत चरित्र ऐकण्याबद्दल - कौतुकानें भरून गेलीं. ह्मणून त्यांनीं संपातीला प्रश्न केला कीं, पक्षिराज, आपण आपला पहिल्यापासून सर्व वृत्तांत आह्मांला निवेदन करा. ॥१॥ संपातीनें, आपण पूर्वीं काय काय केलें, तें चरित्र सांगण्यास प्रारंभ केलाः - वानरहो ! पूर्वीं मी आणि जटायु असे आह्मी दोघे भाऊ पूर्ण तारुण्यांत होतों, त्या वेळीं ॥ २ ॥ आह्मांला आपल्या शक्तीचा फार गर्व असे. एकदां आमच्या मनांत आलें कीं, आपलें बळ तरी आहे किती तें पाहावें. त्याप्रमाणें, आकाशांत फिरत फिरत सूर्यमंडळापर्यंत जावें, असा विचार ठरवून आह्मी वर जाऊं लागलों. तारुण्यमदामुळें - माघार ह्मणून कोणीच घेतली नाहीं. - ॥ ३ ॥ आह्मी अनेक सहस्त्र योजनें वर

अथ ते कौतुकाविष्टाः[1] संपातिं सर्ववानराः ॥ पप्रच्छुर्[2]भगवन् ब्रूहि स्वमुदन्तं त्वमादितः[3] ॥ १ ॥ संपातिः कथयामास स्ववृत्तान्तं पुरा कृतम् ॥ अहं पुरा जटायुश्च भ्रातरौ रूढयौवनौ[6] ॥ २ ॥ बलेन दर्पितावावां[7] बलजिज्ञासया खगौ ॥ सूर्यमण्डलपर्यन्तं गन्तुमुत्पतितौ[12][13] मदात् ॥३॥ बहुयोजनसाहस्रं गतौ तत्र प्रतापितः ॥

(पू.) संपातिं ॥ (मू.) स्वं उदन्तं ब्रूहि. ॥ १ ॥ (पू.) स्ववृत्तान्तं कथयामास - ॥ पुरा (मू.). ॥२॥ (पू.) आवां बलजिज्ञासया ॥ मदात् (मू.) ॥ ३ ॥ (पू.) जटायुः प्रतापितः.

---

१ कौतुकानें व्याप्त. २ विचारूं लागले. ३ पहिल्यापासून. ४ वृत्तांत. ५ सांग. ६ पूर्ण तारुण्यांत असलेले. ७ गर्विष्ठ. ८ आकाशांत फिरणारे (पक्षी). ९ आह्मी (दोघे). १० बळ जाणण्याच्या इच्छेनें. ११ उन्मत्तपणामुळें. १२ जाण्यास. १३ उडालेले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जटायूचा पूर्व वृत्तांत.

गेलों. तेथें - सूर्याच्या प्रखर उष्णतेनें - जटायूचें शरीर होरपळूं लागलें. - कनिष्ठ बंधु तो! - त्याच्याबद्दल माझ्या मनांत दया उत्पन्न झाली. ह्मणून त्याच्या रक्षणासाठीं मी त्याला आपल्या पंखांनीं आच्छादून ॥ ४ ॥ उभा राहिलों. सूर्यकिरणांनीं माझे पंख जळून गेले! शेवटीं मी ह्या विंध्यपर्वताच्या शिखरावर पडलों. वानर-वीरहो! इतक्या उंचावरून पडल्यामुळें मला मूर्च्छा आली. ॥ ५ ॥ पुढें तीन दिवसांनीं मी पुन्हां शुद्धीवर आलों. पंख दग्ध झाल्यामुळें माझ्या मनाला भ्रम पडला, आपण कोणत्या देशांत आहों, भोंवतालीं पर्वताचीं शिखरें कोणतीं आहेत, तें कांहींच कळेना. ॥ ६ ॥ नंतर हळूहळू डोळे उघडले, तों तेथें एक पुण्य आश्रम माझ्या दृष्टीस पडला. मंद गतीनें चालत मी त्या आश्रमाजवळ गेलों. ॥ ७ ॥

जटायुस्तं परित्रातुं[1] पक्षैराच्छाद्य[2] मोहतः ॥ ४ ॥ स्थितो ऽहं रश्मिभिर्[3]दग्धपक्षो[4]ऽस्मिन्विन्ध्यमूर्धनि[5] ॥ पतितो दूरपतनान्मूर्छितो ऽहं कपीश्वराः ॥५॥ दिनत्रयात्पुनः प्राणसहितो दग्धपक्षकः ॥ देशं वा गिरिकूटान्वा न जाने भ्रान्तमानसः ॥ ६ ॥ शनैरुन्मील्य[6] नयने दृष्ट्वा तत्राश्रमं शुभम् ॥ शनैः शनैराश्रमस्य समीपं गतवानहम् ॥ ७ ॥

मोहतः (मू.), ॥ ४ ॥ (पू.) अहं अस्मिन् विंध्यमूर्धनि ॥ पतितः. कपीश्वराः, अहं (मू.) [आसं.] ॥ ५ ॥ (पू.) ॥ भ्रान्तमानसः [अहं] (मू.). ॥ ६ ॥ अहं (पू.) उन्मील्य, तत्र शुभं आश्रमं दृष्ट्वा (मू.). ॥ ७ ॥

१ रक्षण करण्यास. २ झांकून. ३ किरणांनीं. ४ जळले पंख ज्याचे, असा. ५ पर्वताच्या शिखरांस. ६ उघडून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेथें चंद्रमा ह्या नांवाचे एक पूज्य ऋषि - राहत असत. - माझ्या स्थितीकडे पाहून त्यांना फार आश्चर्य वाटलें. ते मला ह्मणाले:–'संपाते ! आज हें झालें तरी काय ! तुझें शरीर विरूप केलें कोणीं !॥८॥मला पूर्वीची तुझी स्थिति अवगत आहे कीं, तूं अत्यंत बलवान् होतास. तुझे पंख जळले कशामुळें ! तुला योग्य वाटेल तर मला आपला सर्व वृत्तांत सांग.' ॥९॥ तेव्हां मी त्या श्रेष्ठ मुनींला आपलें सकल वृत्त सांगून अत्यंत दुःखपूर्वक ह्मटलें :– 'महाराज! वणव्यासारख्या प्रखर चिंतेनें माझें सर्वांग पोळत आहे – ॥ १० ॥ प्रभो! पंख नाहींसे झाले तेव्हां आतां मी प्राणतरी कसे धारण करावे!' ॥ ११ ॥ मुनींनीं हें माझें भाषण ऐकिलें व

चन्द्रमा नाम मुनिराड् दृष्ट्वा मां विस्मितोऽवदत् ॥ संपाते किमिदं तेऽद्य विरूपं केन वा कृतम् ॥ ८ ॥ जानामि त्वामहं पूर्वमत्यन्तं बलवानसि॥दग्धौ किमर्थं ते पक्षौ कथ्यतां यदि मन्यसे॥९॥ ततः स्वचेष्टितं सर्वं कथयित्वाऽतिदुःखितः॥ अब्रुवं मुनिशार्दूलं दह्येऽहं दाववह्निना ॥ १० ॥ कथं धारयितुं शक्तो विपक्षो जीवितं प्रभो ॥ इत्युक्तोऽथ मुनिर्वीक्ष्य मां दयार्द्रविलोचनः ॥ ११ ॥

(पू.) दृष्ट्वा विस्मितः [सन्] अवदत् – ॥ 'संपाते, अद्य ते इदं किं ! केन वा (मू.) ! ॥ ८ ॥ अहं (पू.) [इति] जानामि. ॥ ते पक्षौ (मू.) [तर्हि] कथ्यतां.' ॥ ९ ॥ ततः सर्वं (पू.) ॥ [अहं] (मू.) अब्रुवं – ' अहं दाववन्हिना दह्ये. ॥ १० ॥ प्रभो, विपक्षः [अहं] जीवितं धारयितुं कथं शक्तः ! ' ॥ इति उक्तः मुनिः अथ मां (मू.) [सन् उवाच –] ॥ ११ ॥

१ मनास येईल. २ वणव्यानें. ३ जळतों. ४ पंखरहित. ५ दयेमुळें ओले झाले नेत्र ज्याचे, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दुःख भोगलेंच पाहिजे.

माझ्या शरीरावरून दृष्टि फिरविली तों दयेनें अंतःकरण कळवळून त्यांच्या नेत्रांत अश्रुबिंदु आले. - त्यांनीं मला ह्मटलें :— ॥ ११ ॥ "वत्सा! मी काय सांगतों तें अगोदर ऐकून घे; आणि नंतर तुझ्या इच्छेस येईल तसें कर. - अरे! देह आणि त्याचें मूळ कारण कर्मे ह्यांचा नाश तत्त्वज्ञानावांचून होणें नाहीं. दुःख भोगावें तेव्हांच संपणार : पहा :- हें दुःख उद्भवण्याला कारण शरीर होय. शरीर तरी कर्मामुळें उत्पन्न झालें आहे. ॥१२॥ पुरुष 'देहावर अहं ह्म० मी' अशी बुद्धि ठेवितो ह्मणूनच त्याच्या हातून सतत कर्में घडत असतात. हा अहंकार अनादि (फार प्राचीन काळापासूनचा) असून जड अविद्येपासून उत्पन्न झालेला अर्थात जड आहे. ॥ १३ ॥ जसा लोखंडाच्या गोळ्यांत मूळचा अग्नि नसतो पण तो (गोळा) तापवून लाल केला कीं अग्नीसारखा दिसूं लागतो व अग्नीचीं दाहादि कार्यें करूं शकतो, त्याप्रमाणें हा अहंकार चैतन्याच्या प्रतिबिंबानें नित्य युक्त राहतो; देहाचें त्याच्याशीं (अहंकाराशीं) तादात्म्य (एकरूपता) होऊन गेलें ह्मणजे देह चेत-

शृणु वत्स वचो मेऽद्य श्रुत्वा कुरु यथेप्सितम् ॥ देहमूलमिदं दुःखं देहः कर्मसमुद्भवः ॥ १२ ॥ कर्म प्रवर्तते देहेऽहंबुद्ध्या पुरुषस्य हि ॥ अहंकारस्त्वनादिः स्यादविद्यासंभवो जडः ॥ १३ ॥ चिच्छायया सदा युक्त स्तप्तायःपिण्डवत्सदा ॥ तेन देहस्य तादात्म्याद्देहश्चेतनवान्भवेत् ॥ १४ ॥

'वत्स, अद्य मे वचः (पू.), [तथा] कुरु. ॥ (मू.). ॥१२॥ पुरुषस्य कर्म (पू.) प्रवर्तते. ॥ (१३ उ., बा. १४ पू.) चिच्छायया सदा युक्तः स्यात्. ॥ (मू.) ॥ १३ ॥ १४ ॥

१ तापलेल्या लोखंडाच्या गोळ्यासारखा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नायुक्त होतो. ॥ १४ ॥ त्या अहंकाराच्या प्रभावानेंच आत्म्याला, देह मी, अशी बुद्धि होते; त्यामुळेंच त्याला सुखें व दुःखें इत्यादि प्राप्त करून देणारा हा संसार भोगावा लागतो. ॥ १९ ॥ आत्मा वस्तुतः विकाररहित आहे; परंतु त्याचें अहंकारादिकांशीं नित्य तादात्म्य कल्पिलें किंवा मिथ्या आरोपिलें —वास्तविक नव्हे—जातें ह्मणूनच तो 'जीव' ही संज्ञा पावतो आणि, मी देह आहें - अथवा देहाहून वेगळा असलों तरी - कर्में मी करितों इत्यादि संकल्प सतत चालवितो, कर्में करीत राहतो, आणि शेवटीं त्यांच्या फलांमुळें बंधन पावतो. तीं कर्में पुण्य किंवा पाप जशीं असतील त्यात्यांप्रमाणें त्याला स्वतांला पराधीन होऊन उच्च नीच योनींत नित्य भ्रमण करावें लागतें— ॥ १६ ॥ १७ ॥ ' मी यज्ञ, दानें इत्यादि पुष्कळ

देहो ऽहमिति बुद्धिः स्यादात्मनो ऽहंकृतेर्बलात् ॥ तन्मूल एष संसारः सुखदुःखादिसाधकः ॥ १५ ॥ आत्मनो निर्विकारस्य मिथ्यातादात्म्यतः सदा ॥ देहो ऽहं कर्म कर्ताहमिति संकल्प्य सर्वदा ॥१६॥ जीवः करोति कर्माणि तत्फलैर्बद्ध्यते ऽवशः ॥ ऊर्ध्वाधो भ्रमते नित्यं पापपुण्यात्मकः स्वयम् ॥ १७ ॥ कृतं मया ऽधिकं पुण्यं यज्ञदानादि निश्चितम् ॥ स्वर्गं गत्वा सुखं भोक्ष्ये इति संकल्पवान्भवेत् ॥ १८॥

आत्मनः अहंकृतेः बलात् (मू.) संसारः. ॥ १९ ॥ निर्विकारस्य (मू.) [अहंबुद्धिः भवति]. ॥ १६ ॥ जीवः कर्माणि करोति, अवशः [सन्] (पू.), ॥ स्वयं पापपुण्यात्मकः नित्यं (मू.). ॥ १७ ॥ (पू.) पुण्यं कृतं; निश्चितं [यथा तथा] ॥ (मू.). ॥ १८ ॥

---

१ वर खालीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशति.'

पुण्यकर्मे केलीं आहेत तेव्हां मला स्वर्गांत जाऊन निश्चयानें सुख भोगायाला सांपडेल,' असा तो संकल्प करितो. ॥ १८ ॥ हा संकल्प मनांत नित्य घोळतच राहतो ह्मणून तो स्वर्गलोकीं जाऊन चिरकाल मोठमोठ्या सुखांचा उपभोग घेतो. परंतु पुण्य क्षीण झालें कीं, मनाला आवडत नसतें तरी, कर्माच्या प्रेरणेमुळें त्याला अधोलोकांत पडावें लागतें. ॥ १९ ॥ प्रथम तो चंद्रमंडलावर पडतो, तेथून किरणद्वारा हिमकणांसह भूमीवर येतो, तेथें पुन्हां व्रीहि इत्यादि धान्यादिकांवर पुष्कळ दिवस राहतो; ॥ २० ॥ त्या धान्याचे चैतुर्विध भोज्य पदार्थ होतात त्यांपैकीं एखाद्यामध्यें तो असतो; पुरुष ते पदार्थ भक्षण करितात; त्या अन्नरसाचें पुन्हां रेत होतें; पुरुष ऋतुकालीं स्त्रीच्या उपस्थेंद्रियांत त्याचा सेक करितो; ॥ २१ ॥

तथैवाध्यासतस्तत्र चिरं भुक्त्वा सुखं महत् ॥ क्षीणपुण्यः पतत्यर्वागनिच्छन्कर्मचोदितः ॥ १९ ॥ पतित्वा मण्डले चेन्दोस्ततो नीहारसंयुतः ॥ भूमौ पतित्वा व्रीह्यादौ तत्र स्थित्वा चिरं पुनः ॥ २० ॥ भूत्वा चतुर्विधं भोज्यं पुरुषैर्भुज्यते ततः ॥ रेतो भूत्वा पुनस्तेन ऋतौ स्त्रीयोनिसिञ्चितः ॥ २१ ॥

(पू.) सुखं भुक्त्वा ॥ (मू.) अनिच्छन् [अपि] अर्वाक् पतति ! ॥ १९ ॥ इन्दोः मण्डले (मू.) पतित्वा तत्र पुनः चिरं स्थित्वा, ॥ २० ॥ चैतुर्विधं भोज्यं (पू.) ॥ रेतः भूत्वा [तिष्ठति] (मू.) [भवति.] ॥ २१ ॥

१ खालीं. २ चंद्राच्या. ३ बर्फानें युक्त. ४ तांदूळ इत्यादि धान्यांत. ५ भक्ष्य, भोज्य, लेह्य (चाटण्याचे श्रीखंड वगैरे), चोष्य (चोखण्याचे ऊंस, शेवग्याच्या शेंगा वगैरे) अशा चार प्रकारचें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रथमदिवशीं तें रेत गर्भवेष्टनानें वेढलें जाऊन व योनिरक्तानें मिश्रित होऊन कलल नांवाच्या रूपास पावतें आणि अधिक दृढ (घट्ट) होतें; ॥ २२ ॥ पुन्हां पांच रात्री गेल्या कीं त्याला बुडबुड्यासारखा आकार येतो; सात रात्री गेल्या कीं त्याची मांसमय पेशी (अंडाकार) बनते. ॥ २३ ॥ पुढें पंधरा दिवस पर्यंत ती पेशी रक्तानें भरलेली राहते. नंतर पंचवीस रात्री झाल्या असतां तीमध्येंच अंकुर उद्भवूं लागतो. ॥ २४ ॥ क्रमानें मान, मस्तक, स्कंध (खांदे), पाठीचा कणा. आणि उदर ह्या पांच वेगवेगळ्या अंगांचे अंकुर पहिल्या

योनिरक्तेन संयुक्तं जरायु[1]परिवेष्टितम् ॥ दिनेनैकेन कललं[2] भूत्वा रूढ[3]त्वमाप्नुयात्[4] ॥ २२ ॥ तत्पुनः पञ्चरात्रेण बुद्बुदाकार[5]तामियात्[6] ॥ सप्तरात्रेण तदपि मांसपेशि-त्व[7]माप्नुयात् ॥ २३ ॥ पक्षमात्रेण सा पेशी रुधिरेण[8] परिप्लुता[9] ॥ तस्या एवांकुरो-त्पत्तिः पञ्चविंशति[10]रात्रिषु ॥ २४ ॥ ग्रीवा[11] शिरश्च स्कन्धश्च पृष्ठवंश[12]स्तथोदरम् ॥ पञ्चधांगानि चैकैकं जायन्ते मासतः क्रमात् ॥ २५ ॥

[सः] एकेन दिनेन (मू.). ॥ २२ ॥ (पू.) ॥ तत् अपि (मू.) ॥ २३ ॥ सा पेशी (पू.) [भवति.] (मू.) [गतासु सतीषु] तस्याः एव अंकुरोत्पत्तिः ॥ २४ ॥ (मू.) जायंते[13]. ॥२५॥

---

१ गर्भवेष्टनानें वेष्टिलेलें. २ रुधिर आणि रेत यांचें मिश्रण. ३ घट्टपणाला. ४ पावतें. ५ बुडबुड्याच्या आकाराला. ६ पावतें. ७ पेशित्वं अंडाकाराला. ८ रक्तानें. ९ थबथबलेली. १० पंचवीस रात्री. ११ मान. १२ पाठीचा कणा. १३ उद्भवतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

महिन्याच्या शेवटीं उत्पन्न होतात. ॥ २५ ॥ हात, पाय, बरगड्या, कमर आणि गुडघे हीं क्रमानेंच दुसऱ्या महिन्यांत उद्भवूं लागतात; ह्यांत अन्यथा होत नाहीं. ॥ २६ ॥ तीन महिन्यांनीं एकामागून एक अवयवांचे सांधे तयार होतात. चवथ्या महिन्यांत अनुक्रमें सर्व अंगुलि उद्भवतात. ॥२७॥ पांचव्या महिन्यांत नाक, कान, डोळे हीं छिद्रें उत्पन्न होतात; दंतपंक्ति नखें, गुह्येंद्रिय ह्यांचा देखील उगम पांचव्याच महिन्यांत होतो. ॥ २८ ॥ सहाव्या महिन्याच्या प्रारंभीं कानांचीं छिद्रें स्पष्ट होतात; गुद, शिश्न किंवा स्त्रीपुरुषांचें ज्याचें त्याचें उपस्थेंद्रिय आणि नाभि हे प्राण्यांचे अवयव सहाव्या महिन्यांत उदय पावतात. ॥ २९ ॥

पाणिपादौ तथा पार्श्वः कटिर्जानु तथैव च ॥ मासद्वयात्प्रजायन्ते क्रमेणैव न चान्यथा ॥ २६ ॥ त्रिभिर्मासैः प्रजायन्ते अंगानां सन्धयः क्रमात् ॥ सर्वांगुल्यः प्रजायन्ते क्रमान्मासचतुष्टये ॥२७॥ नासा कर्णौ च नेत्रे च जायन्ते पञ्चमासतः ॥ दन्तपंक्तिर्नखा गुह्यं पञ्चमे जायते तथा ॥ २८ ॥ अर्वाक्षण्मासतश्छिद्रं कर्णयोर्भवति स्फुटम् ॥ पायुर्मेढ्रमुपस्थं च नाभिश्चापि भवेन्नृणाम् ॥ २९ ॥

(मू.) प्रजायन्ते; अन्यथा न. ॥२६॥ (पू.) प्रजायन्ते. ॥ मासचतुष्टये (मू.) प्रजायन्ते. ॥२७॥ (पू.) जायन्ते ॥ तथा (मू.). ॥ २८ ॥ षण्मासतः (पू.) छिद्रं भवति. ॥ सप्तमे मासि नृणां (मू.). (॥ २९ ॥)

---

१ बरगड्या. २ गुडघे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सातव्या महिन्यांत आंगावरील लव आणि मस्तकावरील केंस उगवतात. सर्व अवयव वेगवेगळे स्पष्ट समजण्याजोगे आठव्या महिन्यांत सिद्ध होतात. ॥ ३० ॥ पक्षिराजा, अशा प्रकारें स्त्रीच्या उदरांत गर्भ वाढत असतो. पांचव्या महिन्यांत जीवाला चेतनाशक्ति प्राप्त होते. (आपण कोठें आहों त्याचा बोध होतो.) ॥ ३१ ॥ माता जें अन्न भक्षण करील त्यांतील सारभूत अंश नाभिद्वारीं असणाऱ्या सूत्राच्या (·नाळाच्या) सूक्ष्म रंध्रांतून गर्भस्थ पिंडाला पोंचतो व त्यावर गर्भाची पुष्टि होते. स्वतांच्या कर्मबलानें तो मरण पावत नाहीं. ॥ ३२ ॥ तेथें मातेच्या जठराग्नीच्या तापानें त्याचें शरीर तापून जातें व त्याला आपलीं सर्व पूर्वजन्में आणि त्यांतील कर्में अनुक्रमानें आठवूं लागतात. त्या कष्टावस्थेंत पश्चात्ताप पावून तो असें ह्मणत असतो :—

सप्तमे मासि रोमाणि शिरःकेशास्तथैव च ॥ विभक्तावयवत्वं च सर्वं संपद्यते ऽष्टमे ॥ ३० ॥ जठरे वर्धते गर्भः स्त्रिया एवं विहंगम ॥ पञ्चमे मासि चैतन्यं जीवः प्राप्नोति सर्वशः ॥ ३१ ॥ नाभिसूत्राल्परंध्रेण[4] मातृभुक्तान्नसारतः[5] ॥ वर्धते गर्भगः पिण्डो न म्रियेत स्वकर्मतः ॥ ३२ ॥ स्मृत्वा सर्वाणि जन्मानि पूर्वकर्माणि सर्वशः ॥ जठरानलतप्तो ऽयमिदं वचनमब्रवीत् ॥ ३३ ॥

(पू.) शिरःकेशाः च [जायन्ते.] अष्टमे सर्वं (मू.). ॥ ३० ॥ विहङ्गम, एवं स्त्रियाः जठरे[2] गर्भः वर्द्धते. (मू.) चैतन्यं प्राप्नोति. ॥ ३१ ॥ गर्भगः[3] पिण्डः (मू.) न म्रियेत. ॥ ३२ ॥ (पू.) पूर्वकर्माणि [च] स्मृत्वा ॥ (मू.) — ॥ ३३ ॥

१ हे पक्षा. २ उदरांत. ३ गर्भांत असलेला. ४ नाभिसूत्राच्या सूक्ष्म छिद्रद्वारा. ५ आईनें खाल्लेल्या अन्नांतील सार अंशाच्या योगें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गर्भस्थ जीवाचा पश्चात्ताप.

॥ ३३ ॥ 'मी आजपर्यंत अनेक सहस्र योनींत जन्मास गेलों व पुत्र, स्त्रिया इत्यादिकांच्या संबंधाचा आणि पशुबांधवांच्या समागमाचा कोट्यवधि वेळां अनुभव घेतला. ॥ ३४॥ कुटुंबपोषणाकडेच चित्त सर्वदा लागलें असल्यामुळें मी केव्हां न्यायानें व केव्हां अन्यायमार्गांनींही द्रव्यसंपादन करीत आलों पण स्वप्नामध्यें देखील कधीं विष्णूचें ध्यान केलें नाहीं ! एकंदरींत मी पूर्ण हतभाग्य खरा ! ॥ ३५ ॥ आतां त्या कृतीचें फळ हें अतिदुःसह गर्भवासदुःख मला भोगावें लागत आहे ! शरीर - ह्मणजे तापलेल्या लोखंडावर टाकलेल्या पाण्याच्या थेंबाप्रमाणें - नश्वर होय; पण मी त्याला, शाश्वत (नित्य राहणारें), असें मानीत आलों व विषयवासनांनीं व्याप्त होऊन ॥ ३६ ॥ भलभलतीं कामें करीत राहिलों, आपल्या हिताचा (आत्मप्राप्तीचा)

नानायोनिसहस्रेषु[1] जायमानो[2] ऽनुभूतवान् ॥ पुत्रदारादिसंबन्धं कोटिशः पशुबान्धवान् ॥ ३४ ॥ कुटुम्बभरणासक्त्या[3] न्यायान्यायैर्धनार्जनम्[4] ॥ कृतं नाकरवं विष्णुचिन्तां स्वप्ने ऽपि दुर्भगः ॥ ३५ ॥ इदानीं तत्फलं भुञ्जे गर्भदुःखं महत्तरम् ॥ अशाश्वते[5] शाश्वतवद्देहे तृष्णासमन्वितः ॥ ३६ ॥ अकार्याण्येव कृतवान्न कृतं हितमात्मनः ॥ इत्येवं बहुधा दुःखमनुभूय स्वकर्मतः ॥ ३७ ॥

'(पू.) अहं (मू.) [च] अनुभूतवान. ॥ ३४ ॥ (मू.) दुर्भग अहं स्वप्ने अपि विष्णुचिन्तां न अकरवं ! ॥ ३५ ॥ (३६ उ.) शाश्वतवत्, तृष्णासमन्वितः [अहं] ॥ (३७ पू.) हितं न कृतं ! ॥ (३७ उ.) अनुभूय, ॥ (३६ पू.) गर्भदुःखं भुञ्जे ! ॥ ३६ ॥ ३७ ॥

१ अनेक सहस्र योनींत. २ उत्पन्न झालेला. ३ कुटुंबाचें पोषण करण्यांत गढण्यामुळें. ४ द्रव्यसंपादन. ५ नश्वर अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उपाय कांहींच केला नाहीं. त्यामुळें स्वतांच्या कर्मानुसार आजपर्यंत मला अनेक प्रकारचीं दुःखें भोगावीं लागलीं - आणि सध्यां ही दशा प्राप्त झाली आहे ! - ॥३७॥ ह्या नरकतुल्य गर्भवासांतून मला केव्हां बरें बाहेर पडतां येईल ! येथून सुटलों कीं पुढें मी नित्य विष्णूचीच पूजा करीत राहीन. ' ॥ ३८ ॥ इत्यादि विचार जीवाच्या मनांत येत असतात, तों त्याची जन्मवेळ भरते. तो योनिद्वाराच्या चिमट्यांत सांपडून अगदीं कासावीस होऊन जातो, ह्या समयीं (जन्मकाळीं) तर त्याला अत्यंत कष्ट होतात. शेवटीं, जसा पातकी नरकांतून सुटावा त्याप्रमाणें तो तेथून बाहेर पडतो ! ॥ ३९ ॥ दुर्गंधीनें भरलेल्या व्रणांतून (योनिरूप क्षतांतून) पडलेला, एखाद्या किड्यासारखा, तो जीव तसाच कांहीं वेळ लोळत पडतो ! पुढें बाल्यादि अवस्थांतील दुःखें ! अशा रीतीनें जन्मास येणाऱ्या प्रत्येक प्राण्याला क्लेश भोगावे लागतात. ॥ ४० ॥

कदा निष्क्रमणं मे स्याद्गर्भान्निरयसन्निभात् ॥ इत ऊर्ध्वं नित्यमहं विष्णुमेवानुपूजये ॥३८॥ इत्यादि चिन्तयन् जीवो योनियन्त्रप्रपीडितः॥ जायमानोऽतिदुःखेन नरकात्पातकी यथा ॥ ३९॥ पूतिव्रणान्निपतितः कृमिरेष इवापरः ॥ ततो बाल्यादिदुःखानि सर्वे एवं विभुञ्जते ॥ ४० ॥

(पू.) गर्भात् मे निष्क्रमणं कदा स्यात् !॥ अहं (मू.).' ॥ ३८ ॥ (मू.). जायमानः जीवः नरकात् पातकी यथा, [तथा बहिः पतति.] ॥ ३९ ॥ (पू.) अपरः कृमिः इव, एषः [पतति,] (मू.) [भुनक्ति]. एवं सर्वे विभुञ्जते. ॥ ४० ॥

१ नरकतुल्य, अशा. २ बाहेर पडणें. ३ दुर्गंधानें भरलेल्या खटांतून. ४ भोगितात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गृध्रा ! तारुण्यादि अवस्थांमध्येंही सर्वत्र दुःखेंच आहेत. तीं तूं अनुभविलीं आहेस व सर्वांना ठाऊक असतात ह्मणून मी पुन्हां वेगळीं सांगत बसलों नाहीं. ॥ ४१ ॥ एतावता, 'देह मी ' हा अभ्यास नित्य चालत असल्यामुळें 'मी कर्ता ' असा अभिमान् वाटत जातो आणि त्याचा परिणाम नरकादियातना व गर्भवासादि दुःखें भोगावीं लागतात ! ॥ ४२ ॥ ह्मणून, प्राण्यानें 'आत्मा स्थूल आणि सूक्ष्म ह्या दोन्ही देहांहून वेगळा असून प्रकृतीचा नियामक आहे ' असें ध्यानीं वागवावें, देहादिकांवरील ममता सोडावी, आणि हें सर्व विश्व आत्मरूप आहे असें ज्ञान संपादन करावें. ॥ ४३ ॥ आत्म्याला जाग्रत् स्वप्न व सुषुप्ति ह्या तीन्ही अवस्था नाहींत; त्याचें स्वरूप सत्यज्ञानादि उपनिषदांत वर्णिल्याप्रमाणें (तीन्ही कालीं

त्वया चैवानुभूतानि सर्वत्र विदितानि च ॥ न वर्णितानि मे गृध्र यौवनादिषु सर्वतः ॥ ४१ ॥ एवं देहो ऽहमित्यस्मादभ्यासान्निरयादिकम् ॥ गर्भवासादिदुःखानि भवन्त्यभिनिवेशतः ॥ ४२ ॥ तस्माद्देहद्वयादन्यमात्मानं प्रकृतेः परम् ॥ ज्ञात्वा देहादिममतां त्यक्त्वा ऽऽत्मज्ञानवान् भवेत् ॥ ४३ ॥ जाग्रदादिविनिर्मुक्तं सत्यज्ञानादिलक्षणम् ॥ शुद्धं बुद्धं सदा शान्तमात्मानमवधारयेत् ॥ ४४ ॥

गृध्र, यौवनादिषु सर्वतः (पू.) [दुःखानि] मे न वर्णितानि. ॥४१॥ (पू.) [जातात्] अभिनिवेशतः निरयादिकं (मू.) च भवन्ति. ॥४२॥ (मू.) आत्मानं ॥ (मू.). ॥४३॥ आत्मानं (मू.). ॥ ४४ ॥

१ तारुण्यादि अवस्थांत. २ नरक इत्यादि.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नष्ट न होणारें असून ज्ञानमय व आनंदमय) आहे. त्याच्या ठिकाणीं मायेपासून उद्भवणारे दोष अगदीं नाहींत तर तो ज्ञानस्वरूप व नित्य शांत आहे असें नित्य ध्यानांत वागवावें. ॥ ४४ ॥ चैतन्यमय आत्मस्वरूपाचें ज्ञान झालें व अविद्येपासून उद्भवणारा - देहादिकांवरील अहंताममतारूप - मोह नष्ट झाला, कीं देह पडो अथवा प्रारब्ध कर्माच्या बलानें राहो, त्या योग्याला मिळून अज्ञानापासून उत्पन्न होणारें सुख किंवा दुःख भोगावें लागत नाहीं. ॥ ४५ ॥ ह्मणून, जसा सर्प आंगावर कांत (मेंग) आली असली म्हणजे ती टाकण्याची वेळ येईपर्यंत तिला धरून राहतो त्याप्रमाणें, तूं प्रारब्ध कर्माचा क्षय होई-पर्यंत देहासहवर्तमान खुशाल राहा. ॥ ४६ ॥ पक्षिराजा ! मी तुला दुसरी एक अत्यंत हिताची गोष्ट सांगतों, ऐक. ॥ ४७ ॥ त्रेतायुगामध्यें जगदाधार निर्विकार परमात्मा दशरथाचा पुत्र होऊन

चिदात्मनि परिज्ञाते नष्टे मोहे ऽज्ञसंभवे॥देहः पततु वा ऽऽरब्धकर्मवेगेन तिष्ठतु॥
योगिनो न हि दुःखं वा सुखं वा ऽज्ञानसम्भवम् ॥४५॥ तस्माद्देहेन सहितो यात्र-
त्प्रारब्धसंक्षयः॥ तावत्तिष्ठ सुखेन त्वं धृतकञ्चुकसर्पवत् ॥ ४६ ॥ अन्यद्वक्ष्यामि
ते पक्षिन् शृणु मे परमं हितम् ॥४७॥ त्रेतायुगे दाशरथिर्भूत्वा नारायणो ऽव्ययः॥

(पू.) मोहे नष्टे [सति] ॥ (मू.) वा. ॥ योगिनः अज्ञानसंभवं (पू.) न. ॥ ४५ ॥ (मू.), सुखेन तिष्ठ. ॥ ४६ ॥ पक्षिन्, ते (मू.) मे शृणु. ॥ ४७ ॥ (पू.) नारायणः, दाशरथिः भूत्वा ॥

१ अज्ञानापासून उद्भवणारा. २ पडो. ३ प्रारब्ध कर्माच्या प्रभावानें. ४ राहो. ५ ज्यानें आंगावर कांत (मेंग) धरिली अशा सर्पाप्रमाणें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'वानरांना सी-
तेचा वृत्तांत
कळव.'

रावणाचा वध करण्यासाठीं दंडकारण्यांत येईल. ॥४८॥ त्याच्या बरोबर त्याची पत्नी सीता आणि लक्ष्मण हीं असतील. अरण्यामध्यें दोघेही भाऊ आश्रमांत नसतील अशा वेळीं जानकीला ॥ ४९ ॥ रावण चोरासारखा येऊन घेऊन जाईल व लंकेंत ठेवील. सुग्रीवाच्या आज्ञेवरून वानर तिचा शोध करीत करीत ॥५०॥ समुद्राच्या तीरीं येतील. तेथें कांहीं कारणपरत्वें तुझा त्यांचा समागम होईल, ह्यांत संदेह नाहीं. ॥ ५१ ॥ त्यावेळीं तूं त्यांना यथार्थपणें, सीता कोठें आहे, तो वृत्तांत सांग. ह्मणजे तत्क्षणींच तुला पुन्हां दोन नवे पंख

रावणस्य वधार्थाय दण्डकानागमिष्यति ॥ ४८ ॥ सीतया भार्यया सार्धं लक्ष्मणेन समन्वितः ॥ तत्राश्रमे जनकजां भ्रातृभ्यां रहिते वने ॥४९॥ रावणश्चोरवन्नीत्वा लंकायां स्थापयिष्यति ॥ तस्याः सुग्रीवनिर्देशाद्वानराः परिमार्गणे ॥ ५० ॥ आगमिष्यन्ति जलधेस्तीरं तत्र समागमः ॥ त्वया तैः कारणवशाद्भविष्यति न संशयः ॥ ५१ ॥ तदा सीतास्थितिं[1] तेभ्यः कथयस्व यथार्थतः ॥

(४९ पू.) [सन्] ॥ (४८ उ.). ॥ तत्र वने (मू.) आश्रमे [स्थितां] जनकजां ॥ ४८ ॥ ॥ ४९ ॥ (पू.). ॥ वानराः सुग्रीवनिर्देशात् (मू.) ॥ ५० ॥ जलधेः तीरं आगमिष्यन्ति. तत्र त्वया तैः [सह] कारणवशात् समागमः (मू.). ॥ ५१ ॥ तदा तेभ्यः (पू.) कथयस्व. ॥

१ सीतेच्या व्यवस्थेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

फुटतील.' ॥ ९२ ॥ अशा प्रकारें त्या चंद्रनामक मुनींनीं मला बोध केला. ते ऋषि एका मुनिसमुदायाचे अधिपति होते. वानरांनो! पहा, मला आतां अत्यंत कोमल असे नवे पंख फुटले! ॥ ९३ ॥ मी आतां जातों. तुमचें कल्याण असो. सीता तुमच्या दृष्टीस पडेल, हा निश्चय समजा. समुद्र उल्लंघून जाणें कठीण तर खरेंच; पण पलिकडे जाण्याचा तुह्मीं यत्न करा. ॥ ९४ ॥ वानरहो! संसाररूप समुद्र इतका विस्तीर्ण आहे कीं त्याला परिमितिच नाहीं: पण ज्याचें केवळ नामस्मरण केलें तर यःकश्चित् मनुष्य देखील

तदैव तव पक्षौ द्वावुत्पत्स्येते[1] पुनर्नवौ ॥ ५२ ॥ बोधयामास मां चन्द्रनामा मुनिकुलेश्वरः ॥ पश्यन्तु पक्षौ मे जातौ नूतनावतिकोमलौ ॥ ५३ ॥ स्वस्ति[3] वो ऽस्तु गमिष्यामि सीतां द्रक्ष्यथ निश्चयम् ॥ यत्नं कुरुध्वं दुर्लंघ्यसमुद्रस्य विलंघने ॥ ५४ ॥ यन्नामस्मृतिमात्रतो ऽपरिमितं[5] संसारवारांनिधिं[6] तीर्त्वा[7] गच्छति दुर्जनो ऽपि परमं विष्णोः पदं शाश्वतम्[8] ॥

तदा एव तव पुनः नवौ द्वौ (मू.)." ॥९२॥ (पू.) [इति] मां बोधयामास. ॥ [भवन्तः] (मू.) पक्षौ पश्यन्तु. ॥ ९३ ॥ वः (पू.) द्रक्ष्यथ. ॥ (मू.) यत्नं कुरुध्वं. ॥ ९४ ॥ वानराः, दुर्जनः अपि (पू.) विष्णोः पदं गच्छति, ॥

---

१ उत्पन्न होतील. २ तुमचें. ३ कल्याण. ४ पाहाल. ५ ज्याला मर्यादा नाहीं, अशा. ६ संसारसमुद्राला. ७ तरून ८ तीन्ही काळीं ज्याचा बाध (नाश) नाहीं, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो समुद्र तरून विष्णूच्या अत्युत्तम शाश्वत पदीं जातो, त्याच त्रैलोक्यपालक प्रभु रामचंद्राचे तुह्मी प्रिय भक्त आहां; तेव्हां तुह्मांला हा लौकिक समुद्र तरून जातां येणार नाहीं काय ? असें होईल तरी कसें? " ॥५५॥

इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे किष्किंधाकाण्डे अष्टमः सर्गः ॥ ८ ॥

गृध्रराज (संपाति) आकाशमार्गें निघून गेला. सगळ्या वानरवीरांना सीतेचा शोध लावण्याची उत्कट इच्छा होती. - संपातीला नवे पंख फुटले असें पाहून त्यांना पूर्ण विश्वास आला कीं, ह्यानें जें जें कांहीं सांगितलें तें तें सगळें खरें असलें पाहिजे अर्थात आपल्याला सीतेचा शोध लागणार. - ह्या पराकाष्ठेच्या आनंदानें त्यांचीं अंतःकरणें भरून गेलीं. ॥ १ ॥ इतक्यांत त्यांची दृष्टि समुद्राकडे गेली तों, आंत मोठमोठ्या सुसरींचे थवे फिरत आहेत, लहान मोठ्या लाटा सारख्या उसळत आहेत, ज्याला स्पर्श करणें ह्मणजे

तस्यैव स्थितिकारिणस्त्रिजगतां रामस्य भक्ताः प्रिया यूयं किं न समुद्रमात्रतरणे शक्ताः कथं वानराः ॥५५॥ इति श्रीम० कि० अष्टमः सर्गः ॥८॥ गते विहायसा गृध्रराजे वानरपुंगवाः ॥ हर्षेण महताऽऽविष्टाः सीतादर्शनलालसाः[4] ॥१॥ ऊचुः समुद्रं पश्यन्तो नक्रचक्र[5]भयंकरम् ॥ तरंगादिभि[6]रुन्नद्ध[7]माकाशमिव दुर्ग्रहम्[8] ॥२॥

तस्य एव त्रिजगतां[1] स्थितिकारिणः[2] रामस्य प्रियाः (मू.) किं कथं च न शक्ताः ?' ॥ ५५ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये किष्किंधाकाण्डे अष्टमः सर्गः ॥ ८ ॥ गृध्रराजे विहायसा[3] गते [सति] महता (मू.) वानरपुंगवाः ॥ १ ॥ (मू.) समुद्रं पश्यन्तः [सन्तः] ऊचुः :- ॥ २ ॥

१ तीन्ही लोकांच्या. २ पालन करणाऱ्या. ३ आकाशमार्गानें. ४ सीतेला पाहण्याविषयीं उत्सुक. ५ सुसरींच्या समुदायाच्या योगें भयंकर अशा. ६ लाटा इत्यादिकांनीं. ७ उसळत असलेल्या. ८ ज्याला स्पर्श करणें अशक्य किंवा कठिण, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आकाशाची मोट बांधण्यासारखें कठिण, अशा त्या समुद्राचें उग्र रूप त्यांच्या दृष्टीस पडलें. ॥ २ ॥ तेव्हां ते (वानर) परस्परांशीं ह्मणाले :– ' ह्याला तरून जायाचें कसें ! ' त्या मंडळींत अंगद ह्मणाला:– ' वानरवीरहो ! ऐका. ॥ ३ ॥ तुह्मी अत्यंत बलाढ्य व शूर आहां. प्रत्येकानें आजपर्यंत अनेक ठिकाणीं पराक्रम गाजविला आहे. ह्या वेळीं जो कोणीं समुद्रापलिकडे जाऊन राजाचें कार्य करील, ॥ ४ ॥ तो ह्या सर्व वानरांचा प्राणदाता होय, ह्यांत संशय नाहीं. ह्मणून असा जो कोणी असेल, त्या महापराक्रमी वानरानें लवकर उठून मजपुढें यावें. ॥ ५ ॥ सर्व वानरांचें, सुग्रीवाचें, फार तर काय रामाचेंही रक्षण केल्याचें

परस्परमवोचन्वै कथमेनं ताराम[1]हे ॥ उवाच चांगदस्तत्र शृणुध्वं वानरोत्तमाः ॥ ३ ॥
भवन्तो ऽत्यंतबलिनः शूराश्च कृत[2]विक्रमाः ॥ को वा ऽत्र वा[3]रिधिं तीर्त्[4]वा राजकार्यं
करिष्यति ॥ ४ ॥ एतेषां वानराणां स प्राणदाता न संशयः ॥ अतोत्तिष्ठतु मे शीघ्रं
पुरतो यो महाबलः ॥ ५ ॥ वानराणां च सर्वेषां रामसुग्रीवयोरपि ॥ स एव
पालको भूयान्नात्र कार्या विचार[5]णा ॥ ६ ॥

(पू.) ! ॥ तत्र अंगदः उवाच – ' (मू.), शृणुध्वं. ॥ ३ ॥ (पू.) च. ॥ (मू.) ? ॥ ४ ॥ [यः करिष्यति,] सः (पू.). ॥ अतः यः महाबलः, [सः] (मू.) शीघ्रं उत्तिष्ठतु. ॥ ५ ॥ सः एव सर्वेषां (पू.) च अपि (मू.) न कार्या. ' ॥ ६ ॥

१ तरू. २ करून - दाखविले - पराक्रम ज्यांनीं, असे. ३ समुद्राला. ४ तरून. ५ संशय.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'प्रत्येकाची श-
क्ति कळूं द्या.'

श्रेय त्याला मिळेल, ह्यांत संशय नाहीं.' ॥ ६ ॥ युवराजानें असें भाषण केलें. - तें ऐकिल्यावर - वानरवीर एकमेकांच्या तोंडांकडे पाहत स्वस्थ राहिले. कोणाच्या मुखांतून एकहेखील शब्द निघेना! ॥ ७ ॥ तेव्हां अंगद ह्मणाला :– 'काम तर झालेंच पाहिजे. ह्यासाठीं सर्वांनीं, आपली शक्ति किती आहे, तें वेगवेगळें सांगावें. नंतर काम कोणाच्या हातून सिद्धीस जाईल, तें आपल्याला ठरवितां येईल.' ॥ ८ ॥ हें अंगदाचें भाषण ऐकिल्यावर त्या वीरांनीं पृथक् पृथक् आपल्या शक्ति सांगितल्या. प्रारंभीं एकानें 'मी दहा योजनें उडून जाईन' असें सांगितलें. पुढील एकएकजण दहा दहा योजनें अधिक सांगत गेला (दुसऱ्यानें 'वीस योजनें उडी मारीन' ह्मणून सांगितलें; तिसऱ्यानें 'तीस योजनें जाईन' ह्मटलें, चवथ्यानें 'चाळीस,' पांचव्यानें 'पन्नास' असा वाढता क्रम चालला). ॥ ९ ॥

इत्युक्ते युवराजेन तूष्णीं वानरसैनिकाः ॥ आसन्नोचुः किंचिदपि परस्परविलोकि[2]नः ॥ ७ ॥ अंगद उवाच ॥ उच्यतां वै बलं सर्वैः प्रत्येकं कार्यसिद्धये ॥ केन वा साध्यते कार्यं जानीमस्तदनंतरम् ॥ ८ ॥ अंगदस्य वचः श्रुत्वा प्रोचुर्वीरा बलं पृथक् ॥ योजनानां दशारभ्य दशोत्तरगुणं जगुः[3] ॥ ९ ॥

युवराजेन (पू.) तूष्णीं आसन, ॥ (मू.) [सन्तः] किंचित् अपि न ऊचुः! ॥ ७ ॥ अंगदः उ० – '(पू.) बलं उच्यतां. ॥ तदनन्तरं (मू.) साध्यते [तत्] जानीमः.' ॥ ८ ॥ वीराः (पू.) बलं प्रोचुः, ॥ (मू.). ॥ ९ ॥

१ स्वस्थ (गुपचिप). २ एकमेकांकडे पाहणारे. ३ बोलले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या वनचर मंडळींत जांबवानानें शंभरांच्या अलिकडली पायरी सांगितली (‘ नव्बद योजनें उडी मारीन ’ असें ह्मटलें). - तो पुढें ह्मणाला :- ‘ पूर्वी परमेश्वरानें त्रिविक्रम (वामन) अवतार घेतला होता, त्याचें पाऊल पृथ्वीच्या परिमाणा(लांबीरुंदी)इतकें विस्तीर्ण होतें; ॥ १० ॥ पण त्याच्या भोंवतीं मी एका दमांत प्रदक्षिणेसारख्या एकवीस वेळ फेऱ्या घातल्या होत्या. आतां मला वृद्धपणानें ग्रासून टाकिलें, ह्मणून मजमध्यें तशी उडी मारण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं. ’ ॥ ११ ॥ अंगदही ह्मणाला :— ‘ मी महासागराच्या पलिकडे जाऊं शकेन; पण पुन्हां परत येववेल कीं नाहीं तें मात्र समजत नाहीं. ’ ॥ १२ ॥

शतादर्वाग्जाम्बवांस्तु प्राह मध्ये वनौकसाम् ॥ पुरा त्रिविक्रमे देवे पादं भूमान-
लक्षणम् ॥ १० ॥ त्रिःसप्तकृत्वो ऽहमगां प्रदक्षिणविधानतः ॥ इदानीं वार्धकग्रं-
स्तो न शक्नोमि विलंघितुम् ॥ ११॥ अंगदो ऽप्याह मे गन्तुं शक्यं पारं महो-
दधेः ॥ पुनर्लंघनसामर्थ्यं न जानाम्यस्ति वा न वा ॥ १२ ॥

वनौकसां[1] मध्ये जांबवान् तु शतात्[2] अर्वाक्[3] प्राह – ॥ ‘ पुरा त्रिविक्रमे देवे [अवतीर्णे सति] (मू.) पादं ॥ १० ॥ अहं (पू.) अगां. ॥ (मू.) न शक्नोमि. ’ ॥ ११ ॥ (पू.) – ‘ मे महोदधेः पारं गन्तुं शक्यं; ॥ (मू.) न जानामि. ’ ॥ १२ ॥

१ वनांत राहणाऱ्या प्राण्यांत (वानर, अस्वलें – ह्या मंडळींत). २ शंभराहून. ३ अलिकडे. ४ तीन विक्रमांनीं (पावलांनीं) - त्रिभुवन व्यापणारा - (वामन). ५ अवतरला होता तेव्हां. ६ पृथ्वीला व्यापणें हें चिन्ह किंवा कार्य ज्याचें, अशा. ७ तीन सते - एकवीस - वेळा. ८ प्रदक्षिणेच्या पद्धतीनें (वाटोळा). ९ गेलों (फिरलों). १० म्हातारपणानें ग्रासलेला. ११ महासागराच्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'काम करणारा मी दाखवितों.'

जांबवानानें त्याला सांगितलें — 'अंगदा! तूं शूर आहेस - व कार्य करून येशील ह्यांत संशय नाहीं; - पण तूं आमचा राजा व आह्मांला वागविणारा आहेस (तूं गेलास ह्मणजे इकडे आह्मांला 'अमुक काम करा, असे वागा ' असें सांगणारा कोणी राहणार नाहीं). करितां, तूं जरी समर्थ आहेस तथापि, मला ह्या कामावर तुझी योजना करितां येत नाहीं.' ॥ १३ ॥ अंगद ह्मणाला :– 'असें असेल तर, आपण पूर्वीप्रमाणें दर्भासनावर स्वस्थ बसून राहूं! हो! काम कोणींच करीत नाहीं, तेव्हां जिवंत राहणेंही शक्य नाहीं!' ॥ १४ ॥ वीर जांबवान् त्याला ह्मणाला :– 'बाळा, ज्याच्या हातून आपली कार्यसिद्धि लवकर होईल, असा वानर मी तुला दाखवून देतों. ॥ १५ ॥

तमाह जाम्बवान्वीरस्त्वं राजा नो नियामकः[1] ॥ न युक्तं त्वां नियोक्तुं मे त्वं समर्थो ऽसि यद्यपि ॥१३॥ अंगद उवाच । एवं चेत्पूर्ववत्सर्वे स्वप्स्यामो दर्भविष्टरे ॥ केनापि न कृतं कार्यं जीवितुं च न शक्यते ॥ १४ ॥ तमाह जाम्बवान्वीरो दर्शयिष्यामि ते सुत ॥ येनास्माकं कार्यसिद्धिर्भविष्यत्यचिरेण च ॥ १५ ॥

जाम्बवान् तं आह – '(पू.) राजा; ॥ यदि अपि (मू.), [तथा अपि] त्वां नियोक्तुं[2] मे न युक्तं[3]. ' ॥ १३ ॥ अंगदः उ० – '(पू.) स्वप्स्यामः[4]. ॥ केन अपि कार्यं (मू.)!' ॥ १४ ॥ वीरः जाम्बवान् तं आह – 'सुत, (मू.) भविष्यति, तं ते दर्शयिष्यामि. ' ॥ १५ ॥

१ वागविणारा. २ योजना करण्यास. ३ योग्य. ४ दर्भाच्या आसनावर. ५ निजूं (बसूं).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इतकें बोलून जांबवानानें मारुति बसला होता - तिकडे मुख वळविलें आणि - त्याला ह्मटलें :– ‘ हनुमंता ! कार्य तर महत्वाचें निघालें आहे, आणि अशा प्रसंगीं तूं अज्ञान्यासारखा आपल्याशींच विचार करीत स्वस्थ बसला आहेस, हें काय ? ह्या वेळीं आपला प्रभाव दाखव. तुझें सामर्थ्य फार मोठें आहे; कारण, तूं साक्षात् वायूचा पुत्र असून वायूसारखा पराक्रमी आहेस. ॥ १६ ॥ १७ ॥ तुझा अवतार केवळ राम-कार्यासाठींच आहे. तुझ्या अतुल शक्तीचें - एकच उदाहरण मीं सांगतों :- जन्मास आलास त्या वेळीं, सूर्यनारायण उगवत आहे, असें तुझ्या दृष्टीस पडलें. ॥ १८ ॥ तेव्हां तुला वाटलें कीं, हें पिकलेलं फळ

इत्युक्त्वा जाम्बवान्प्राह हनूमन्तमवस्थितम् ॥ हनूमन्किं रहस्तूष्णीं स्थी[3]यते कार्य[1]-
गौरवे ॥ १६ ॥ प्राप्ते ऽज्ञेनेव सामर्थ्यं दर्शयाद्य महाबल ॥ त्वं साक्षाद्वायुतनयो
वायुतुल्यपराक्रमः ॥ १७ ॥ रामकार्यार्थमेव त्वं जनि[4]तो ऽसि महात्मना ॥ जात-
मा[5]त्रेण ते पूर्वं दृष्ट्वोद्य[6]न्तं विभावसु[7]म् ॥ १८ ॥ पक्वं फलं जि[8]घृक्षामीत्युत्प्लुतं
बाल[9]चेष्ट्या ॥ योजनानां पञ्चशतं पतितो ऽसि ततो भुवि ॥ १९ ॥

जाम्बवान् (१६ पू.) हनूमन्तं प्राह – ॥ ‘महाबल हनूमन्, कार्यगौरवे प्राप्ते [सति] अज्ञानेन इव, भवता रहः (१६ उ.) ? अद्य (मू.). ॥ १६ ॥ १७ ॥ त्वं (मू.) दृष्ट्वा, ॥ १८ ॥ (मू.) उत्प्लुत; ततः भुवि पतितः असि. ॥ १९ ॥

१ कार्याचा मोठेपणा (मोठा प्रसंग). २ एकांतीं. ३ बसणें होत आहे (बसतोस). ४ निर्मिलेला. ५ नुकता जन्मास आलेला, अशा. ६ उद्यन्तम् उगवणाऱ्या. ७ सूर्याला. ८ घेऊं इच्छितों. ९ मुलासारख्या लीलेनें. १० उड्डाण केलें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारुतीला स्फुरण आलें.

आहे, एवढें आपण ध्यावें. ह्मणून तूं सहज बाललीलेनें पांचशें योजनें उंच उडी मारिलीस व तेथून खालीं भूमीवर पडलास. - तरी तुला कांहीं इजा झाली नाहीं! - ॥ १९ ॥ तेव्हां तुझें बल किती आहे, त्याचें वर्णन कोणाला तरी करवेल काय? हातीं घेतलेलें काम शेवटास न्यावयाचें, असा तुझा नियम असतो. ह्मणून, बा! उठ आणि एवढें रामाचें कार्य करून ये.' ॥ २० ॥ हें जांबवंताचें भाषण ऐकिल्यावर मारुतीला अत्यंत हर्ष झाला. त्यानें सिंहनादासारखी विलक्षण गर्जना केली; - ती कानीं पडली तेव्हां लोकांना असें वाटलें कीं - हा ब्रह्मांड गोल फोडून टाकणार कीं काय कोणजाणे! ॥ २१ ॥ त्यानें पर्वतासारखें प्रचंड रूप धरिलें, त्या वेळीं तर तो प्रतित्रिविक्रम असावा असें भासे. - शक्तीचा प्रत्यय दाखविण्यासाठीं इतकें कृत्य केल्यावर मारुतीनें वानरांना विचारिलें :- 'मी कोणतें काम करूं सांगा. काय समुद्र उल्लंघून

अतस्त्वद्बलमाहात्म्यं को वा शक्नोति वर्णितुम् ॥ उत्तिष्ठ कुरु रामस्य कार्यं नः
पाहि सुव्रत ॥ २० ॥ श्रुत्वा जाम्बवतो वाक्यं हनूमानतिहर्षितः ॥ चकार नादं
सिंहस्य ब्रह्माण्डं स्फोटयन्निव ॥ २१ ॥ बभूव पर्वताकारस्त्रिविक्रम इवापरः ॥
लंघयित्वा जलनिधिं कृत्वा लंकां च भस्मसात् ॥ २२ ॥

(मू.) शक्नोति? ॥ सुव्रत, (मू.) कुरु, नः पाहि.' ॥२०॥ (पू.) श्रुत्वा अतिहर्षितः हनूमान ॥ (मू.) सिंहस्य नादं चकार. ॥ २१ ॥ [सः] अपरः त्रिविक्रमः इव, पर्वताकारः बभूव, [उवाच च–] ' जलनिधिं (मू.) कृत्वा, ॥ २२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जाऊन, लंका जाळूं ॥ २२ ॥ व सगळ्या कुळासह रावणाचा वध करून जानकीला येथें घेऊन येऊं ? किंवा रावणाच्या गळ्यांत दोरी बांधून व डाव्या हातानें ॥ २३ ॥ पर्वतासह लंकानगरीला धरून उचलून रामाच्या पुढें आणून टाकूं ? अथवा त्या शुभलक्षणसंपन्न जानकीला नुसतें पाहूनच येऊं ?' ॥ २४ ॥ हनुमंताचे प्रश्न ऐकिल्यावर जांबवंतानें असें उत्तर दिलें :– ' हनुमंता ! ती सुंदरी जानकी जिवंत आहे, इतकेंच सध्यां पाहून ये. तुझें कल्याण होवो. ॥ २५ ॥ पुढें रामाच्या बरोबर गेल्यावर तुला आपला पराक्रम दाखवितां येईल. बा ! आकाशांतून जाशील, तो मार्ग तुला सुखदायक होवो. ॥ २६ ॥

रावणं सकुलं हत्वा ऽऽनेष्ये जनकनन्दिनीम् ॥ यद्वा बध्वा गले रज्ज्वा[2] रावणं वामपाणिना ॥ २३ ॥ लंकां सपर्वतां धृत्वा रामस्याग्रे क्षिपाम्यहम् ॥ यद्वा दृष्ट्वैव यास्यामि जानकीं शुभलक्षणाम् ॥ २४॥ श्रुत्वा हनूमतो वाक्यं जाम्बवानिदमब्रवीत् ॥ दृष्ट्वैवागच्छ भद्रं ते जीवन्तीं जानकीं शुभाम्॥२५॥ पश्चाद्रामेण सहितो दर्शयिष्यसि पौरुषम् ॥ कल्याणं भवताद्भद्र गच्छतस्ते विहायसा ॥२६॥

सकुलं (पू.) आनेष्ये. ॥ यद्वा[1] (उ.) गले[3] बध्वा[4], वामपाणिना[5] ॥ २३ ॥ सपर्वतां (पू.) क्षिपामि[6]. ॥ (मू.) जानकीं दृष्ट्वा एव यास्यामि ?' ॥ २४ ॥ जाम्बवान् हनूमतः वाक्यं (पू.) – ॥ ' ते भद्रं; (मू.) जानकीं दृष्ट्वा एव आगच्छ. ॥ २५ ॥ (पू.) [त्वं] पौरुषं[7] दर्शयिष्यसि[8]. ॥ (मू.) गच्छतः ते कल्याणं भवतात्[9]. ॥ २६ ॥

१ किंवा. २ दोरीनें. ३ कंठीं. ४ बांधून. ५ डाव्या हातानें. ६ ठेवूं. ७ पराक्रम. ८ दाखविशील. ९ होवो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारुतीचें प्रचंड रूप.

तूं रामाच्या कार्यासाठीं जात आहेस; वायु तुझ्या साह्यासाठीं बरोबर येवो.' जांबवानानें असे आशीर्वाद दिले, वानरवीरांनींही निरोप दिला, तेव्हां मारुति महेंद्रपर्वताच्या शिखरावर गेला. ह्या वेळीं त्यानें जें शरीर घेतलें होतें, तें अत्यंत विलक्षण दिसे. ॥ २७ ॥ अति प्रचंड पर्वतासारखी ती मूर्ति, सुवर्णासारखी अंगकांति, सुंदर तांबडें मुख, मोठ्या नागराजासारखे पुष्कळसे लांब बाहु– अशा एकंदर वर्णनाचा तो महात्मा वायुपुत्र त्या वेळीं सर्व प्राण्यांच्या दृष्टीस पडला. ॥ २८ ॥ इति अ० रा० बोधे कि० कां० नवमः सर्गः ॥९॥

गच्छन्तं रामकार्यार्थं वायुस्त्वामनुगच्छतु[1] ॥ इत्याशीर्भिः[2] समामन्त्र्य[3] विसृष्टः प्लवगाधिपैः[4] ॥ महेन्द्राद्रिशिरो[6] गत्वा बभूवाद्भुतदर्शनः[8] ॥ २७ ॥ महानगेन्द्र[10]प्रतिमो महात्मा सुवर्णवर्णो[11]ऽरुण[12]चारुवक्त्रः ॥ महा[13]फणीन्द्राभसुदीर्घबाहुर्वातात्मजो ऽदृश्यत[14] सर्वभूतैः ॥ २८ ॥ इति श्रीमद० उमामहेश्वरसं० किष्किन्धाकाण्डे नवमःसर्गः ॥ ९ ॥ श्रीम० उ० ।शतेति ॥

वायुः रामकार्यार्थं (पू. द्वि.) विसृष्टः ॥ [हनूमान] (मू.) बभूव. ॥ २७ ॥ सर्वभूतैः महात्मा वातात्मजः (मू.). ॥ २८ ॥ इति नवमः सर्गः ॥ ९ ॥

---

१ मागून जावो. २ आशीर्वादांनीं. ३ निरोप देऊन. ४ मोठमोठ्या वानरांनीं. ५ पाठविलेला. ६ महेंद्र पर्वताच्या मस्तकावर. ७ अद्भुत स्वरूप ज्याचें, असा. ८ सर्व प्राण्यांनीं. ९ वायूचा पुत्र (मारुति). १० मोठ्या उंच पर्वतासारखा. ११ सुवर्णासारखा वर्ण ज्याचा, असा. १२ किंचित् तांबडें सुंदर मुख ज्याचें, असा. १३ मोठ्या श्रेष्ठ सर्पासारखे पुष्कळ लांब बाहु ज्याचे, असा. १४ पाहिला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्ग.	विषय.	पत्र.
१	मारुति उडी मारतो. त्याच्या बुद्धीची परीक्षा पाहण्यासाठीं देव सुरसेला पाठवितात. ती मारुतीला आडवित्ये. मारुति तिला फसवून तिच्या तोंडांत जाऊन बाहेर येतो. समुद्र मारुतीला विसांवा देण्यासाठीं मैनाक पर्वताला पाण्यावर पाठवितो. मारुति त्याचा नुसता आदर करून पुढें जातो. सिंहिकावध. तो लंकेंत पोंचतो. लंका राक्षसी त्याला आडवत्ये, पण खाऊ मिळाल्यावर सीतेची माहिती देत्ये.	१
२	अशोकवनिकेंत सीता मारुतीच्या दृष्टीस पडत्ये. तेथें रावण येऊन रामाची निंदा (ह्या निंदेच्या श्लोकांचा स्तुतिपर अर्थ केला आहे) करितो व सीतेला भीति घालतो. सीता त्याला खडखडीत उत्तर देत्ये. राक्षसी तिला छळतात; पण त्यांतच एक सीतेची कैवारी निवटत्ये. सीता गळ्याला फांस लावून घेण्याची तयारी करित्ये.	९
३	त्याच झाडावर बसलेला मारुति क्रमानें रामचरित्र गातो. तें ऐकून सीतेला आनंद होतो. मारुति तिला भेटून वंदन करितो, रामानें दिलेली खूण देतो, व सर्व वृत्तांत सांगतो. सीता रामाला देण्यासाठीं परत खूण देत्ये व खुणेची गोष्ट सांगत्ये. मारुति फळें खाऊन अशोकवन मोडितो, व राक्षसांना मारितो. इंद्रजित त्याला बांधून घेऊन जातो.	१७
४	सभेंत आणिल्यावर मारुति रावणाला चार समजुतीच्या गोष्टी सांगतो (विषय चांगला). राक्षस मारुतीच्या शेपटीला चिंध्या बांधून वर तेल ओतून आग लावितात. मारुति त्याच शेपटाच्या योगें लंका जाळितो.	३०
५	तो सीतेची आज्ञा घेऊन समुद्र उल्लंघून अलिकडे येतो. वानरांची भेट. ते मधुवनांत मद्यपान करितात, ती कागाळी सुग्रीवाकडे जाते. सुग्रीव त्यावरून ओळखतो कीं, कार्यभाग निःसंशय झाला. पुढें मारुति रामाला सर्व वृत्त सांगतो. राम त्याला दुर्लभ देणगी देतो.	३९

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शंकर ह्मणाले :– पार्वती, वायूचा पुत्र मारुति आनंदाचें केवल निधान (समूह) होय. - लंका आणि महेंद्रपर्वत ह्यांच्या मध्यें - शंभर योजनें एकसारखा समुद्र पसरलेला आहे; त्यांत मगर इत्यादि दुष्ट जलचर राहत असतात, - ह्मणून आंत कोणी प्राणी पडला तर तो पुन्हां परत यावयाची आशा नसते! - तरी पण मारुतीनें तो महासागर उल्लंघून जाण्याचा विचार मनांत योजिला. ॥ १ ॥ त्यानें प्रभु रामचंद्राचें ध्यान करून असें भाषण केलें :– “ वानरहो ! मी आकाशमार्गानें जात आहें. सर्वजण अवलोकन करा. ॥ २ ॥ सकल वीरांनो ! रामानें सोडिलेला महाबाण जसा कधींही फुकट जात नाहीं, त्याप्रमाणेंच मीही कार्य केल्या-वांचून परत यावयाचा नाहीं. आजच रामाची पत्नी व जनकराजाची कन्या सीता माझ्या दृष्टीस पडणार !॥३॥

श्रीमहादेव उवाच ॥ शतयोजन[1]विस्तीर्णं समुद्रं मकरालयम्[2] ॥ लिलंघयिषु[3]रान-
न्दसन्दोहो[4] मारुतात्मजः[5] ॥ १ ॥ ध्यात्वा रामं परात्मानमिदं वचनमब्रवीत् ॥
पश्यन्तु वानराः सर्वे गच्छन्तं मां विहायसा ॥ २ ॥ अमोघं रामनिर्मुक्तं महाबा-
णमिवाखिलाः ॥ पश्याम्यद्यैव रामस्य पत्नीं जनकनन्दिनीम् ॥ ३ ॥

श्रीमहादेवः उ० – (पू.) समुद्रं (मू.) ॥ १ ॥ परात्मानं रामं ध्यात्वा इदं वचनं अब्रवीत् – ‘ सर्वे वानराः, [6]अमोघं [7]रामनिर्मुक्तं महाबाणं इव, [8]विहायसा [9]गच्छन्तं मां [10]पश्यन्तु. अखिलाः, अ-द्यैव रामस्य पत्नीं जनकनन्दिनीं पश्यामि. ॥ २ ॥ ३ ॥

---

१ शंभर योजनें (चारशें कोस) पसरलेल्या. २ मगरांचें घर, अशा. ३ उल्लंघन करूं इच्छिणारा. ४ आनंदाचा समूहरूप. ५ वायुपुत्र. ६ फुकट न जाणारा. ७ रामानें सोडिलेला. ८ आकाशमार्गानें. ९ जाणाऱ्या. १० पाहोत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मग मी कृतार्थ होईन. अशा रीतीनें कार्यभाग पार पडल्यावर मी पुन्हां रामचंद्राचें दर्शन घेईन. अहो ! प्राणोत्क्रमणाच्या समयीं ज्याच्या नामाचें केवल एकवार स्मरण केलें, तरी देखील, ॥ ४ ॥ प्राणी ह्या अपार भवसमुद्राला तरून त्याच्या (रामचंद्राच्या) पदीं प्राप्त होतो; मी तर त्या प्रभूचा प्रत्यक्ष सेवक आहें, शिवाय मजजवळ त्याच्या अवयवरूप अंगुलींतील मुद्रिका आहे, आणि माझ्या हृदयांत त्याचें सतत चिंतन चाललेलें असतें; तेव्हां माझ्यानें ह्या क्षुद्र समुद्राला तरून जाववणार नाहीं काय ? " ॥ ५ ॥ असें म्हणून मारुतीनें आपले बाहु पसरले, पुच्छ लांब केलें, ॥ ६ ॥ मान सरळ केली, दृष्टि वर लाविली, दोन्ही पाय आंखडून पोटाशीं धरिले, व दक्षिणेकडे मुख करून सत्वर उडी मारिली. त्याची गति वायू-

कृतार्थोऽहं कृतार्थोऽहं पुनः पश्यामि राघवम् ॥ प्राणप्रयाणसमये यस्य नाम सकृ[1]-
त्स्मरन् ॥ ४ ॥ नरस्तीर्त्वा[3] भवाम्भोधिमपारं याति तत्पदम् ॥ किं पुनस्तस्य दूतोऽहं
तदंगां[4]गुलिमुद्रिकः ॥ ५ ॥ तमेव हृदये ध्यात्वा लंघयाम्यल्पवारिधिम् ॥ इत्युक्त्वा
हनुमान्बाहू प्रसार्या[5]यतवालधिः ॥ ६ ॥ ऋ[6]जुग्रीवोर्ध्वदृष्टिः सन्नाकुञ्चि[7]तपदद्वयः ॥

(पू.) पश्यामि ! ॥ (मू.) ॥ ४ ॥ नरः अपारं भवाम्भोधिं[2] (५पू.) याति; ॥ (५उ.) तस्य दूतः अहं (६ पू.) लंघयामि [इति] किं पुनः [वक्तव्यं] ? ' ॥ (६ उ. ७मू.) हनुमान ॥

१ एक वेळ. २ संसारसमुद्राला. ३ तरून. ४ त्याच्या अवयवरूप अंगुलींतील मुद्रिका आहे ज्याजवळ, असा. ५ लांब पुच्छ ज्याचें असा. ६ सरळ मान ज्याची असा व ऊर्ध्व दृष्टि ज्याची असा. ७ आंखडले दोन्ही पाय ज्यानें, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सारखी (चपल व अव्याहत) असे. ॥ ७ ॥ आकाशांतून देव पाहत असतां तो त्वरेनें जाऊं लागला. वायूचा पुत्र वायुवेगानें चालला आहे, असें पाहून देवांच्या मनांत, ॥८॥ त्या वानराच्या शक्तीची व बुद्धीची परीक्षा पहावी, असें आलें. ते परस्परांशीं ह्मणाले :– ' हा जात असलेला वानर दिसण्यांत तर महाबुद्धिमान् व वायूसारखा प्रतापी दिसतो. ॥ ९ ॥ परंतु ह्याच्यानें लंकेंत प्रवेश करवेल किंवा नाहीं, एवढी ह्याच्या शक्तीची परीक्षा पाहिली पाहिजे. ' ह्या गोष्टीची देवसमूहाला उत्सुकता होतीच. त्यांनीं असा

दक्षिणाभिमुखस्तूर्णं पुप्लुवेऽनिलविक्रमः ॥ ७ ॥ आकाशात्त्वरितं देवैर्वीक्ष्यमाणो जगाम सः ॥ दृष्ट्वाऽनिलसुतं देवा गच्छन्तं वायुवेगतः ॥८॥ परीक्षणार्थं सत्त्वस्य वानरस्येदमब्रुवन् ॥ गच्छत्येष महासत्त्वो वानरो वायुविक्रमः ॥ ९ ॥ लंकां प्रवेष्टुं शक्तो वा न वा जानीमहे बलम् ॥ एवं विचार्य नागानां मातरं सुरसाभिधाम् ॥ १० ॥ अब्रवीद्देवतावृन्दः कौतूहलसमन्वितः ॥ गच्छ त्वं वानरेन्द्रस्य किंचिद्विघ्नं समाचर ॥ ११ ॥

दक्षिणाभिमुखः[2] [सन] तूर्णं[3] पुप्लुवे[4]. ॥ ५ ॥ ६ ॥ ७ ॥ देवैः (पू.) त्वरितं जगाम. ॥ (मू.) गच्छंतं अनिलसुतं दृष्ट्वा, ॥ ८ ॥ वानरस्य सत्त्वस्य[6] (पू.) – ' (मू.) वानरः गच्छति. ॥ ९ ॥(१०पू.) जानीमहे.'॥ कौतूहलसमन्वितः देवतावृंदः (१०उ.) नागानां मातरं अब्रवीत–'त्वं (मू.).॥१०॥११॥

१ वायूसारखा पराक्रमी. २ दक्षिण दिशेकडे मख ज्याचें, असा. ३ जलद. ४ उडाला. ५ पाहिला जाणारा. ६ बलाच्या व बुद्धीच्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो.
सम्-सान्व
सटिप्पण.
॥ २ ॥

सुंदरकांड.
सर्ग १
त्याची सुर-
सेशीं गांठ.

विचार ठरविला आणि, तत्काल नागांची माता जी सुरसा, तिला सांगितलें :– 'तूं जा, ह्या श्रेष्ठ वानराला कांहीं तरी विघ्न कर, ॥ १० ॥ ११ ॥ ह्याचें शारीरिक बल आणि बुद्धिवैभव कसें काय आहे तें पाहा आणि नंतर लागलीच पुन्हां इकडे ये.' देवांनीं असें सांगितलें तेव्हां ती (सुरसा) हनुमंताला विघ्न करण्यासाठीं तशीच निघाली, ॥ १२ ॥ व मार्ग आडवून मारुतीच्या पुढें उभी राहिली आणि मारुतीला ह्मणाली :– 'हे महाबुद्धिमंता! लवकर येऊन माझ्या मुखांत प्रवेश कर. ॥ १३ ॥ माझा आत्मा क्षुधेनें फारच व्याकुळ झाला आहे. तेव्हां देवांनींच तुझी माझ्या भक्ष्यस्थानीं योजना केली ह्मणायाची!' मारुति तिला ह्मणाला :– 'माते! मी रामचंद्राच्या आज्ञेवरून ॥ १४ ॥ जानकीला शोधण्यासाठीं जात

ज्ञात्वा तस्य बलं बुद्धिं पुनरेहि त्वरान्विता ॥ इत्युक्ता सा ययौ शीघ्रं हनुमद्विघ्नकारणात् ॥१२॥ आवृत्य मार्गं पुरतः स्थित्वा वानरमब्रवीत् ॥ एहि मे वदनं शीघ्रं प्रविशस्व महामते ॥ १३ ॥ देवैस्त्वं कल्पितो भक्षः क्षुधासंपीडितात्मनः ॥ तामाह हनुमान्मातरहं रामस्य शासनात् ॥१४॥ गच्छामि जानकीं द्रष्टुं पुनरागम्य सत्वरः॥

(पू.) [च] ज्ञात्वा, त्वरान्विता [सती] पुनः एहि[1]. ' ॥ (मू.) शीघ्रं ययौ. ॥ १२ ॥ पुरतः मार्गं (पू.) – ॥ 'महामते, (मू.). ॥ १३ ॥ (पू.) [मे] देवैः त्वं भक्षः कल्पितः[2].' हनुमान् तां आह – '(मू.) ॥ १४ ॥ (पू.) गच्छामि, सत्वरः [सन्] पुनः आगम्य, ॥

१ ये. २ बंद करून.

॥ २ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहें; पुन्हां लवकरच परत येईन; रामाला तिचें कुशलवर्तमान कळवीन आणि नंतर तुझ्या मुखांत ॥१५॥ प्रवेश करीन. सुरसे! मला मार्ग दे (रस्ता सोड). तुला नमस्कार असो.' मारुतीनें असें सांगितलें असतां सुरसा पुन्हां ह्मणाली :– 'मी फार भुकेली आहें. ॥ १६ ॥ तूं माझ्या मुखांत शिरून (तेथून सुटलास तर मग पुढें) जा. नाहीं तर मी तुला खाऊन टाकीन.' सुरसेनें असा आग्रह धरिला तेव्हां मारुति ह्मणाला :– 'बरें तर, लवकर आपलें मुख पसर. ॥ १७ ॥ आतां तुझ्या मुखांत प्रवेश करून नंतर मी सत्वर निघून जाईन.' असें बोलून मारुति, आपलें शरीर योजनांइतकें लांब करून, पुढें उभा राहिला. ॥ १८ ॥ तें हनुमंताचें रूप पाहिल्यावर सुरसेनें आपलें मुख पांच योजनांइतकें वाढविलें.

रामाय कुशलं तस्याः कथयित्वा त्वदाननम् ॥१५॥ निवेक्ष्ये देहि मे मार्गं सुरसा-
यै नमोऽस्तु ते ॥ इत्युक्ता पुनरेवाह सुरसा क्षुधिताऽस्म्यहम् ॥ १६ ॥ प्रविश्य
गच्छ मे वक्त्रं नो चेत्त्वां भक्षयाम्यहम् ॥ इत्युक्तो हनुमानाह मुखं शीघ्रं विदारय
॥ १७ ॥ प्रविश्य वदनं तेऽद्य गच्छामि त्वरयाऽन्वितः ॥ इत्युक्त्वा योजना-
यामदेहो भूत्वा पुरः स्थितः ॥ १८ ॥ दृष्ट्वा हनुमतो रूपं सुरसा पञ्चयोजनम् ॥

तस्याः कुशलं (मू.) ॥ १५ ॥ निवेक्ष्ये[1] मे मार्गं (पू.) नमः अस्तु.' ॥ (मू.) पुनः एव आह – अहं क्षुधिता अस्मि. ॥ १६ ॥ मे वक्त्रं[2] प्रविश्य गच्छ, नो चेत् अहं (मू.). ॥ १७ ॥ ते वदनं (पू.) [सन्] गच्छामि (मू.). ॥ १८ ॥ सुरसा हनुमतः रूपं दृष्ट्वा, मुखं पंचयोजनं

१ शिरेन. २ मुखास. ३ उघड. ४ योजना इतका लांब देह ज्याचा, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो तिच्या मुखांत जाऊन आला!

हनुमंतानें आपलें शरीर दुप्पट मोठें केलें. ॥१९॥ तेव्हां सुरसेनें आपलें मुख वीस योजनें लांबविलें. मारुति तीस योजनांइतका झाला. ॥ २० ॥ पुढें, सुरसेनें मुख पन्नास योजनें लांब केलें. तेव्हां हनुमान अंगठ्या-एवढा झाला, ॥ २१ ॥ चटकन तिच्या मुखांत शिरला आणि पुन्हां बाहेर येऊन पुढें उभा ठाकला, व ह्मणाला :– 'देवी ! मी तुझ्या मुखांत प्रवेश करून बाहेर आलों आणि तुला नमस्कार करीत आहें.' ॥२२॥ असें भाषण - ऐकिल्यावर ती - मारुतीकडे पाहून त्याला ह्मणाली :–' बा ! तूं बुद्धिमान पुरुषांत अग्रगण्य

मुखं चकार हनुमान् द्विगुणं[1] रूपम्[2]आदधत् ॥ १९ ॥ ततश्चकार सुरसा योजनानां च विंशतिम्[3] ॥ वक्त्रं चकार हनुमांस्त्रिंशद्योजनसम्मितम्[4] ॥ २० ॥ ततश्चकार सुरसा पञ्चाशद्योजनायतम्[5] ॥ वक्त्रं तदा हनूमांस्तु बभूवांगुष्ठसन्निभः[6] ॥२१॥ प्रविश्य वदनं तस्याः पुनरेत्य पुरः स्थितः ॥ प्रविष्टो निर्गतोऽहं ते वदनं देवि ते नमः ॥ २२ ॥ एवं वदन्तं दृष्ट्वा सा हनूमन्तमथाब्रवीत् ॥

(मू.). ॥ १९ ॥ ततः सुरसा वक्त्रं (पू.) चकार. ॥ (मू.) [वपुः] चकार. ॥ २० ॥ (पू.) वक्त्रं चकार. ॥ (मू.) बभूव. ॥२१॥ तस्याः वदनं (पू.) [सः उवाच –] ॥ 'देवि, अहं ते वदनं प्रविष्टः [सन्] (मू.). ' ॥ २२ ॥ सा (पू.) दृष्ट्वा, अथ अब्रवीत् –

॥ २ ॥

१ दुप्पट. २ धरिता झाला. ३ वीस. ४ तीस योजनां एवढें. ५ पन्नास योजनें लांबीचें. ६ आंगठ्यासारखा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहेस. जा रामाचें कार्य साधून ये. ॥ २३ ॥ वानरा! तुझें बल किती आहे, तें पाहण्यासाठीं देवांनीं मला पाठविलें होतें. बा! आतां सीतेचा शोध लावून तिचें दर्शन घेऊन तूं पुन्हां रामाकडे जाशील, - अशी माझी खात्री झाली. - आतां तूं आपला रस्ता धर.' ॥ २४ ॥ असें बोलून ती देवलोकीं गेली. मारुति पुन्हां, पक्षिराज गरुडाप्रमाणें, वायुमार्गानें पुढें चालला. ॥ २५ ॥ समुद्रामध्यें मैनाक नांवाचा एक पर्वत असे. त्याला रत्नांचीं व सुवर्णाचीं शिखरें होतीं. - देवांनीं सुरसेला सांगितलें, तसेंच इकडे - समुद्रानेंही मैनाकाला म्हटलें :– "हा महासमर्थ वायुपुत्र हनुमान् रामाचें कार्य करण्यासाठीं जात आहे; तूं ह्याला

गच्छ साधय रामस्य कार्यं बुद्धिमतां वर ॥ २३ ॥ देवैः संप्रेषिता ऽहं ते बलं जिज्ञासुभिः कपे ॥ दृष्ट्वा सीतां पुनर्गत्वा रामं द्रक्ष्यसि गच्छ भो॥ २४॥ इत्युक्त्वा सा ययौ देवलोकं वायुसुतः पुनः ॥ जगाम वायुमार्गेण गरुत्मानिव पक्षिराट् ॥ २५॥ समुद्रो ऽभ्याह मैनाकं मणिकाञ्चनपर्वतम् ॥ गच्छत्येष महासत्त्वो हनुमान्मारुतात्मजः ॥ २६ ॥ रामस्य कार्यसिद्ध्यर्थं तस्य त्वं सचिवो भव ॥

'बुद्धिमतां वर, (मू.) साधय. ॥२३ ॥ भो कपे, (पू.) देवैः संप्रेषिता. सीतां ॥ (मू.).' ॥२४॥ सा (पू.) ययौ. वायुसुतः पुनः (मू.) गरुत्मान इव जगाम. ॥ २५ ॥ (२६ पू.) आह – ॥ '(मू.) हनुमान रामस्य कार्यसिद्ध्यर्थं गच्छति. त्वं (२७ पू.). ॥

१ वानरा. २ पाठविलेली. ३ गरुड. ४ सहाय.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सहाय हो. मला पूर्वी सगरांनीं वाढविलें (लहानाचा थोर केलें), ह्मणून माझें 'सागर' - असें नांव पडलें आहे. ॥२६॥२७॥ त्याच्या वंशांत हा दशरथपुत्र प्रभु रामचंद्र उत्पन्न झाला आहे. व त्याचा (रामाचा) कार्यभाग साधण्यासाठीं हा महावानर चालला आहे. ॥ २८ ॥ ह्मणून, तूं लवकर उदकांतून वर नीघ; ह्मणजे मारुति तुझ्या शिखरावर अंमळ विसांवा घेऊन मग पुढें जाईल." तो अतिशय उंच पर्वत 'बरें आहे' असें ह्मणून पाण्यावर प्रगट झाला. ॥ २९ ॥ त्याच्यावर अनेक प्रकारचीं रत्नशिखरें असून एक मनुष्याची आकृति होती. तो मनुष्याकृति पर्वत आकाशमार्गें - जात असलेल्या - मारुतीला ह्मणाला :– 'वानरोत्तमा! मी मैनाक आहें. ॥ ३० ॥ मारुते, तुला विसांवा द्यावा, अशी मला समुद्राची आज्ञा आहे.

सगरैर्वर्धितो यस्मात्पुरा ऽहं सागरो ऽभवम् ॥ २७ ॥ तस्यान्वये[1] बभूवासौ रामो दाशरथिः प्रभुः ॥ तस्य कार्यार्थसिद्ध्यर्थं गच्छत्येष महाकपिः ॥ २८ ॥ त्वमुत्तिष्ठ[2] जलात्तूर्णं त्वयि विश्राम्य[3] गच्छतु ॥ स तथेति प्रादुरभूज्जलमध्यान्महोन्नतः[4]॥ २९॥ नानामणिमयैः शृंगैस्तस्योपरि नराकृतिः ॥ प्राह यान्तं हनूमन्तं मैनाको ऽहं महाकपे ॥ ३० ॥ समुद्रेण समादिष्टस्त्वद्विश्रामाय मारुते ॥

यस्मात् पुरा (मू.). ॥ २६ ॥ २७ ॥ (पू.) रामः बभूव. (मू.) गच्छति. ॥ २८ ॥ त्वं जलात् तूर्णं (२९ पू.).' ॥ नानामणिमयैः शृंगैः महोन्नतः) २९ उ.) प्रादुरभूत्. तस्य उपरि नराकृतिः मैनाकः यान्तं हनूमन्तं प्राह – ' महाकपे, अहं ॥ २९ ॥ ३० ॥ (पू.) समादिष्टः. ॥

१ अन्वये वंशांत. २ उत्तिष्ठ उठ. ३ विसांवा घेऊन. ४ फार उंच.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तर इकडे ये, माझ्या पाठीवरचीं पिकलेलीं अमृततुल्य फळें भक्षण कर, ॥ ३१ ॥ येथें क्षणभर विश्रांति घे आणि नंतर खुशाल पुढें जा.' हें मैनाकाचें भाषण ऐकिल्यावर वायुपुत्र मारुति त्याला ह्मणाला :–॥३२॥ ' मी रामाच्या कार्यासाठीं जात आहें; तेव्हां, - काम झाल्यावांचून, - मला भक्षण करितां येईल कसें ? व मी विसांवा तरी घेऊं कसा ? मला लवकर गेलें पाहिजे. ' ॥ ३३ ॥ इतकें बोलून मारुतीनें - मैनाकाला मान देण्यासाठीं - त्याच्या शिखराला हस्ताग्रानें नुसता स्पर्श केला व पुढील मार्ग धरिला. थोडासा पुढें गेला, तों त्याची सावली एका छायाग्रहानें ओढून धरिली. ॥ ३४ ॥ हा छायाग्रह ह्मणजे सिंहिकानांवाची

आगच्छामृतकल्पानि जग्ध्वा पक्वफलानि मे ॥३१॥ विश्राम्यात्र क्षणं पश्चाद्ग-
मिष्यसि यथासुखम् ॥ एवमुक्तोऽथ तं प्राह हनुमान्मारुतात्मजः ॥३२॥ गच्छतो
रामकार्यार्थं भक्षणं मे कथं भवेत् ॥ विश्रामो वा कथं मे स्याद्गन्तव्यं त्वरितं मया
॥३३॥ इत्युक्त्वा स्पृष्टशिखरः कराग्रेण ययौ कपिः ॥ किंचिद्दूरं गतस्यास्य छायां
छायाग्रहोऽग्रहीत् ॥ ३४ ॥ सिंहिका नाम सा घोरा जलमध्ये स्थिता सदा ॥

मारुते, आगच्छ, मे (मू.) [1]जग्ध्वा, ॥ ३१ ॥ अत्र क्षणं (पू.) गमिष्यसि. ' ॥ (मू.) हनुमान् अथ तं प्राह – ॥ ३२ ॥ 'रामकार्यार्थं (पू.) भक्षणं कथं भवेत् ? ॥ मे (मू.) त्वरितं गन्तव्यं. ' ॥३३॥ कपिः (पू.) [2]स्पृष्टशिखरः [सन्] ययौ. ॥ [3]छायाग्रहः (मू.). ॥ ३४ ॥ (पू.) स्थिता सा ॥

१ खाऊन. २ स्पर्श केला शिखराला ज्यानें, असा. ३ प्राण्याला त्याची सावली धरून ओढणारा ग्रह (पिशाच).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एक भयंकर राक्षसी होती. ती नेहमीं पाण्यामध्यें राही, व आकाशमार्गानें जे प्राणी जातील, त्यांची छाया धरून त्यांना खालीं ओढून भक्षण करी ! ॥ ३९ ॥ तिनें महाप्रतापी मारुतीला धरिलें, तेव्हां तो आपल्याशीं विचार करूं लागला :– ' माझ्या वेगाला प्रतिबंध करणारा हा विघ्नसंतोषी प्राणी येथें कोण बरें असावा ! ॥ ३६ ॥ नवळपास कोणीच दिसत नाहीं ! मला तर हा विलक्षणच प्रकार वाटत आहे ! ' असा विचार करून मारुतीनें अधःप्रदेशीं दृष्टि फिरविली, तों ॥ ३७ ॥ तेथें अवजड शरीराची व अक्राळविक्राळ स्वरूपाची सिंहिका राक्षसी त्याच्या दृष्टीस पडली. लागलीच त्यानें संतापून उदकांत उडी घातली व लत्ताप्रहरांनीं तिचा वध केला. ॥ ३८ ॥ हनुमान् पुन्हां आकाशांत उडाला आणि दक्षिणेकडे तोंड करून

आकाशगा[1]मिनां छायामा[2]क्रम्या[3]कृष्य भक्षयेत् ॥ ३५ ॥ तया गृहीतो[4] हनुमांश्चिन्तयामास वीर्यवान् ॥ केनेदं मे कृतं वेगरोधनं विघ्नकारिणा ॥ ३६ ॥ दृश्यते नैव को ऽप्यत्र विस्मयो मे प्रजायते ॥ एवं विचिन्त्य हनुमानधो दृष्टिं प्रे[5]सारयत् ॥ ३७ ॥ तत्र दृष्ट्वा महाका[6]यां सिंहिकां घोररूपिणीम् ॥ पपात सलिले तूर्णं पद्भ्यामेवाह[7]नद्रुषा ॥ ३८ ॥ पुनरुत्प्लुत्य हनुमान्दक्षिणाभिमुखो ययौ ॥

(मू.). ॥ ३५ ॥ (पू.) [अपि] हनुमान चिन्तयामास –॥ ' (मू.) इदं मे वेगरोधनं कृतं ! ॥ ३६ ॥ अत्र कः अपि न एव दृश्यते; विस्मयः (पू.)! ' ॥ हनुमान (मू.). ॥ ३७ ॥ (पू.) सिंहिकां दृष्ट्वा ॥ तूर्णं सलिले पपात, रुषा (मू.). ॥ ३८ ॥ हनुमान (३९ पू.) ॥

१ आकाशांत जाणारांची. २ पकडून. ३ ओढून. ४ धरलेला. ५ फेंकिता झाला. ६ मोठें शरीर जिचें, अशा. ७ अहनत् मारिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुढें चालला, तो समुद्राच्या दक्षिण तीरावर येऊन पोंचला. त्या स्थळीं फळांनीं भरलेले अनेक वृक्ष होते, ॥ ३९ ॥ चित्रविचित्र पक्षी व पशु इकडे तिकडे फिरत असून नानाप्रकारच्या फुलवेलींनीं तो प्रदेश वेढून सोडिला होता. पुढें, त्रिकूटपर्वताच्या माथ्यावर एक नगर त्याच्या दृष्टीस पडलें. ॥ ४० ॥ त्याच्या सभोंवार एकांत एक, एकांत एक असे अनेक कोट असून प्रत्येक कोटाच्या सभोंवतीं एक एक वेगळा खंदक होता. - ती नगररचना पाहिल्यावर - मारुतीला चिंता उद्भवली कीं ' ह्या लंकेंत आपला प्रवेश होतो कसा ? ॥ ४१ ॥ ह्याच नगरींत रावण राज्य करीत असतो. आपण रात्रीच्या वेळीं सूक्ष्म रूप घेऊन लंकेंत प्रवेश करावा. ' असा विचार ठरवून मारुति रात्र पडेपर्यंत तेथेंच राहिला आणि मग लंकेंत जावयास

ततो दक्षिणमासाद्य कूलं नानाफलद्रुमम् ॥ ३९ ॥ नानापक्षिमृगाकीर्णं नानापुष्पलतावृतम् ॥ ततो ददर्श नगरं त्रिकूटाचलमूर्धनि ॥ ४० ॥ प्राकारैर्बहुभिर्युक्तं परिखाभिश्च सर्वतः ॥ प्रवेक्ष्यामि कथं लंकामिति चिन्तापरोऽभवत् ॥ ४१ ॥ रात्रौ वेक्ष्यामि सूक्ष्मोऽहं लंकां रावणपालिताम् ॥ एवं विचिन्त्य तत्रैव स्थित्वा लंकां जगाम सः ॥ ४२ ॥

(३९ मू. ४० पू.) दक्षिण कूलं आसाद्य,[1] ॥(बा.४० उ.) बहुभिः प्राकारैः,[2] सर्वतः परिखाभिः[3] च युक्तं नगरं ददर्श. ॥ ' लंकां कथं प्रवेक्ष्यामि! ' (मू.). ॥ ३९ ॥ ४० ॥ ४१ ॥ ' अहं सूक्ष्मः [सन्] (पू.) लङ्कां वेक्ष्यामि[4]. ' ॥ सः (मू.). ॥ ४२ ॥

---

१ पोंचून. २ कोटांनीं. ३ खंदकांनीं. ४ शिरेन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारुतीला लंका भिवविते.

निघाला. ॥ ४१ ॥ तो प्रतापी वानर सूक्ष्म रूप घेऊन नगराच्या द्वारांत प्रवेश करूं लागला. तेथें लंका-नगरीची प्रत्यक्ष अधिदेवता राक्षसीचा वेष घेऊन बसलेली असे. ॥ ४२ ॥ हनुमान् आंत शिरणार, इतक्यांत तिनें त्याला भीति घातली (दपटशा देऊन ' मत् जाव ' केला) : - ती ह्मणाली :- ' अरे! वानर-रूप धारण करणारा तूं आहेस कोण? मी लंकिनी प्रत्यक्ष येथें बसल्यें आहें; माझा अनादर करून ॥४४॥ तूं चोरासारखा रात्रीच्या वेळीं आंत शिरत आहेस; तुझ्या मनांत करावयाचें तरी आहे काय? ' ह्या वेळीं लंकेचे डोळे क्रोधानें लाल झाले होते. तिनें इतकें बोलून मारुतीला लाथ मारिली. ॥ ४५ ॥ हनुमंतानेंही ' उँः! ह्यांत काय आहे! ' असें ह्मणून सहजच आपल्या डाव्या मुठीनें एक प्रहार केला (गुद्धा दिला).

धृत्वा सूक्ष्मं वपुर्द्वारं प्रविवेश प्रतापवान् ॥ तत्र लंकापुरी साक्षाद्राक्षसीवेषधारिणी ॥ ४३ ॥ प्रविशन्तं हनूमन्तं दृष्ट्वा लंका व्यतर्जयत् ॥ कस्त्वं वानररूपेण मामनादृत्य लंकिनीम् ॥ ४४ ॥ प्रविश्य चोरवद्रात्रौ किं भवान्कर्तुमिच्छति ॥ इत्युक्त्वा रोषताम्राक्षी पादेनाभिजघान तम् ॥ ४५ ॥ हनुमानपि तां वाममुष्टिना ऽवज्ञया ऽहनत् ॥ तदैव पतिता भूमौ रक्तमुद्वमती भृशम् ॥ ४६ ॥

प्रतापवान [सः] सूक्ष्मं वपुः (मू.) लंकापुरी [आसीत्]. ॥४३॥ लंका (४४ पू.) – 'लंकिनीं मां अनादृत्य वानररूपेण रात्रौ चोरवत् प्रविश्य [गच्छसि], सः त्वं कः? भवान् किं कर्तुं इच्छति? ' (मू.) अभिजघान. ॥ ४४ ॥ ४५ ॥ (मू.) रक्तं उद्वमती [सती] पतिता. ॥ ४६ ॥

१ भिवविती झाली (आंगठ्याजवळचें बोट नाकासमोर उभें धरून). २ उपमर्द करून. ३ मारिती झाली. ४ ओकणारी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तत्क्षणीं ती घेरी येऊन भूमीवर पडली व भडभडां रक्त ओकूं लागली. ॥ ४६ ॥ - कांहीं वेळानें - लंका उठली व प्रतापशाली हनुमंताला ह्मणाली :– 'बा पुण्यपुरुषा हनुमंता ! जा. तुझें कल्याण असो. तूं लंकेला जिंकिलेंस ! ॥४७॥ पूर्वी मला ब्रह्मदेवानें सांगितलें होतें कीं, अट्ठाविसाव्या चौकडींतील त्रेतायुगामध्यें निर्विकार नारायण दशरथाचा पुत्र रामचंद्र होणार आहे; ॥४८॥ योगमायाही जनकराजाच्या घरीं सीतानामक अवतार घेईल; कारण, पृथ्वीचा भार उतरण्यासाठीं मी (ब्रह्मदेवानें) पूर्वी एकदां त्याची ईश्वराची प्रार्थना केली होती; ॥ ४९ ॥ रामचंद्र आपल्या पत्नीला आणि भावाला बरोबर घेऊन महारण्यांत जाईल; सीता ह्मणजे

उत्थाय प्राह सा लंका हनूमन्तं महाबलम् ॥ हनूमन् गच्छ भद्रं ते जिता लंका त्वया ऽनघ ॥ ४७ ॥ पुरा ऽहं ब्रह्मणा प्रोक्ता ह्यष्टाविंशतिपर्यये[1] ॥ त्रेतायुगे दाशरथी रामो नारायणो ऽव्ययः ॥ ४८ ॥ जनिष्यते योगमाया सीता जनकवेश्मनि ॥ भूभारहरणार्थाय प्रार्थितो ऽयं मया क्वचित् ॥ ४९ ॥ सभार्यो राघवो भ्रात्रा गमिष्यति महावनम् ॥

सा लंका (पू.) हनुमन्तं प्राह " (मू.) भद्रं [अस्तु]. अनघ, त्वया लंका जिता. ॥४७॥ ब्रह्मणा पुरा अहं प्रोक्ता – '(बा. ४८ मू.) मया क्वचित् (बा. ४९ उ.) अव्ययः नारायणः, दाशरथिः रामः [इति], योगमाया [च] जनकवेश्मनि[2] सीता [इति] जनिष्यते[3].॥ ४८ ॥ ४९ ॥ (पू.) गमिष्यति. ॥

१ कृत, त्रेता, द्वापर आणि कलि हीं चार युगें संपलीं ह्मणजे एक पर्यय झाला : अशा अठ्ठाविसाव्या पर्ययांत. २ जनकराजाच्या घरीं. ३ उत्पन्न होईल.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आदिमायेचा अवतार होय, रावण तिला चोरून नेईल; ॥५०॥ नंतर रामाशीं सुग्रीवाचें सख्य जमेल; सुग्रीव जानकीच्या शोधासाठीं वानर पाठवील; ॥५१॥ त्यांपैकीं एक वानर रात्रीच्या वेळीं तुझ्या (लंकेच्या) समीप येईल; तूं त्याला धमकी दिलीस कीं, तोही तुला मुष्टिप्रहार करील; ॥ ५२ ॥ हे पुण्यशीले, ज्या वेळीं तो प्रहार लागून तूं मूर्छित होशील; त्या वेळीं रावणाचा नाश होईल; ह्यांत संदेह नाहीं. ॥ ५३ ॥ ह्मणून, हें पुण्य पुरुषा (हनुमंता)! - मी ह्मणतें कीं, - तूं लंका जिंकिलीस - एवढेंच नव्हे, तर - सर्व

तत्र सीतां महामायां रावणो ऽपहरिष्यति ॥ ५० ॥ पश्चाद्रामेण साचिव्यं[1] सुग्रीवस्य भविष्यति ॥ सुग्रीवो जानकीं द्रष्टुं वानरान्प्रेषयिष्यति[2] ॥५१॥ तत्रैको वानरो रात्रावागमिष्यति ते ऽन्तिकम्[3] ॥ त्वया च भर्त्सितः[4] सो ऽपि त्वां हनिष्यति मुष्टिना ॥ ५२ ॥ तेनाहता त्वं व्यथिता भविष्यसि यदा ऽनघे ॥ तदैव रावणस्यान्तो भविष्यति न संशयः ॥ ५३ ॥ यस्मात्त्वया जिता लंका जितं सर्वं त्वया ऽनघ ॥

तत्र रावणः महामायां (मू.). ॥ ५० ॥ पश्चात् सुग्रीवस्य (मू.). ॥ ५१ ॥ (पू.) आगमिष्यति. ॥ (मू.) हनिष्यति. ॥ ५२ ॥ अनघे, यदा त्वं तेन आहता [सती] (मू.).' ॥ ५३ ॥ अनघ, [यस्मात्] त्वया लंका जिता, [तस्मात्] त्वया सर्वं जितं. ॥

---

१ सख्य. २ पाठवील. ३ जवळ. ४ धमकी दिलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कांहीं जिंकिलेंस. - असो. आतां सीता कोठें आहे, तें मी तुला सांगत्यें, ऐक :- रावणाच्या सुंदर अंतःपुराजवळ क्रीडेसाठीं तयार केलेलें एक उत्तम उपवन आहे. ॥ ९४ ॥ त्यामध्यें अनेक प्रकारच्या दिव्य वृक्षांनीं भरलेला अशोकवनिका ह्मणून एक भाग आहे. त्याच्या मध्यभागीं शिंशपा (शिसवा) नांवाचा प्रचंड वृक्ष आहे. ॥ ९९ ॥ त्याच्या खालीं सीता असते. तिच्या भोंवतीं घोर राक्षसींचा सारखा पाहरा असतो. तूं तिला आपल्या डोळ्यांनीं पाहा आणि तसाच लवकर जाऊन - सर्व वृत्तांत - रामचंद्राला कळव. ॥ ९६ ॥ हनुमंता ! रामचंद्राचें स्मरण प्राण्याला भवपाशांतून सोडवितें : त्याच्या भक्तांचा समागम तर अत्यंत दुर्लभ

रावणान्तःपुरवरे क्रीडा[1]काननमुत्तमम् ॥ ५४ ॥ तन्मध्ये ऽशोकवनिका दिव्यपा[2]दपसंकुला ॥ अस्ति तस्यां महावृक्षः शिं[3]शपानाम मध्यमः ॥ ५५ ॥ तत्रास्ते जानकी घोरराक्षसीभिः सुरक्षिता ॥ दृष्ट्वैव गच्छ त्वरितं राघवाय निवेदय ॥५६॥ धन्या ऽहमप्यद्य चिराय राघवस्मृतिर्ममासीद्भवपाश[4]मोचनी ॥

(मू.) क्रीडाकाननं [अस्ति]. ॥५४॥ (पू.) अशोकवनिका ॥ अस्ति. (मू.) महावृक्षः [अस्ति]. ॥ ५५ ॥ (पू.) आस्ते. ॥ गच्छ, [तां] दृष्ट्वा एव त्वरितं (मू.). ॥ ५६ ॥ [यतः] (पू.) राघवस्मृतिः चिराय आसीत्, [अतः] अहं अपि अद्य धन्या. ॥

---

१ क्रीडेसाठीं केलेलें उपवन (बाग). २ स्वर्गींच्या वृक्षांनीं भरलेली. ३ शिंशपा (शिसवा) ह्या नांवाचा; कोणी कोणी, शिंशपा ह्मणजे अशोकवृक्ष, असेंही ह्मणतात. ४ संसाररूप पाश तोडणारी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सीतारामांला शुभ, व रावणाला अशुभ, शकुन.

होय : मला आज फारां दिवसांनीं त्या दोन्ही गोष्टी (रामस्मरण आणि त्याच्या भक्ताचा ह्म० तुझा समागम) प्राप्त झाल्या, ह्मणून मी आपल्याला अत्यंत धन्य मानितें ! तो दाशरथि राम माझ्या हृदयांत सर्वकाळ प्रसन्न मुद्रेनें वास करो.' ॥ ५७ ॥ - शंकर ह्मणाले :– पार्वति ! - मारुति समुद्र उल्लंघून पलिकडे गेला त्याच क्षणीं इकडे पृथ्वीच्या कन्येचा (सीतेचा) व रावणाचा डावा डोळा आणि डावा हात एकसारखा स्फुरण पावूं लागला, तसेंच इकडे रामचंद्राचे उजवे अवयव स्फुरण पावूं लागले (पुरुषांचे उजवे व बायकांचे डावे अवयव स्फुरण पावणें शुभ, आणि पुरुषांचे डावे व बायकांचे उजवे अवयव स्फुरणें अशुभ, असा शास्त्रसिद्धांत आहे : त्याप्रमाणें सीतेला व रामाला शुभ शकुन झाले आणि रावणाला अपशकुन होऊं लागले). असो. ॥ ५८ ॥ इति सुंदरकाण्डे प्रथमः सर्गः॥ १ ॥

तद्भक्तसंगो ऽप्यतिदुर्लभो मम प्रसीदतां दाशरथिः सदा हृदि ॥ ५७ ॥ उल्लंघिते ऽब्धौ पवनात्मजेन धरासुतायाश्च दशाननस्य ॥ पुस्फोर वामाक्षिभुजश्च तीव्रं रामस्य दक्षांगमतीन्द्रियस्य॥ ५८॥इति अ०रामा०सुन्दरकाण्डे प्रथमः सर्गः॥१॥

(मू.) दाशरथिः सदा प्रसीदतां." ॥५७॥ पवनात्मजेन अब्धौ उल्लंघिते सति, (पू.) च (मू.), अतीन्द्रियस्य रामस्य दक्षाङ्गं [च] तीव्रं पुस्फोर. ॥ ५८ ॥ इति सुन्दरकाण्डे प्रथमः सर्गः ॥ १ ॥

१ पृथ्वीच्या कन्येचा (सीतेचा). २ डावा डोळा आणि हात. ३ इंद्रियांच्या गतीच्या पलिकडे असणाऱ्या (इंद्रियांना न कळणाऱ्या). ४ उजवें अंग. ५ स्फुरण पावूं लागलें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुढें, हनुमान् त्या परमसुंदर लंकेंत शिरला आणि रात्रीच्या वेळीं सूक्ष्म रूप घेऊन सर्व नगरभर फिरला. ॥ १ ॥ तो महावानर हनुमान्, सीतेचा शोध हें कार्य करावयाचें, अशा उद्देशानें राजवाड्यांत शिरला. त्यानें तेथील सर्व प्रदेश धुंडाळले, तरी ॥२ ॥ सीता कोठेंच दिसेना ! इतक्यांत त्याला लंकिनीच्या भाषणाचें स्मरण झालें. लागलाच तो अशोकवनांत गेला. हें स्थान फारच रमणीय होतें :– ॥ ३ ॥ जिकडे तिकडे दिव्य वृक्ष सारखे लागून गेले होते; ठिकठिकाणीं रत्नसोपानांच्या पुष्करिणी बांधल्या होत्या; अनेक प्रकारचे पशुपक्षी इकडून तिकडे तिकडून इकडे फिरतांना दृष्टीस पडत. मध्यभागीं असलेल्या भव्य सुवर्ण-मंदिरानें तर तें स्थल फारच शोभिवंत दिसे. ॥ ४ ॥ सभोंवार ओळीनें लावलेल्या वृक्षांवर विपुल फळें आलीं

ततो जगाम हनुमान् लंकां परमशोभनाम् ॥ रात्रौ सू[1]क्ष्मतनुर्भूत्वा बभ्राम[2] परितः पुरीम्
॥ १ ॥ सीतान्वेषणकार्यार्थी प्रविवेश नृपालयम् ॥ तत्र सर्वप्रदेशेषु विविच्य हनुमा-
न्कपिः ॥ २ ॥ नापश्यज्जानकीं स्मृत्वा ततो लंकाभिभाषितम् ॥ जगाम हनुमान्
शीघ्रमशोकवनिकां शुभाम्॥ ३॥[4]सुरपादपसंबाधां रत्नसोपा[5]नवापिकाम् ॥ नानापक्षि[6]मृ-
गाकीर्णां स्वर्णप्रासाद[7]शोभिताम् ॥ ४ ॥ फलैरानम्रशाखाग्रपादपैः परिवारिताम् ॥

(पू.) लंकां जगाम, ॥ (मू.) परितः ब[2]भ्राम. ॥१॥ (मू.) नृपालयं प्रविवेश. तत्र सर्वप्रदेशेषु वि-विच्य[3], ॥२॥ जानकीं न अपश्यत्. (३पू.) स्मृत्वा, ॥ (३ उ. ४ मू. ५पू.) अशोकवनिकां जगाम. ॥

---

१ सूक्ष्म शरीर ज्याचें, असा. २ फिरला. ३ शोधून. ४ देवांच्या वृक्षांनीं गच्च भरलेल्या. ५ रत्नांच्या पायऱ्या ज्यांना, अशा विहिरी जींत, अशा. ६ अनेक प्रकारच्या पशुपक्ष्यांनीं व्याप्त. ७ सुवर्णाच्या मंदिरांनीं सुशोभित. ८ लवलीं फांद्यांचीं अग्रें ज्यांचीं, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असल्यामुळें त्यांचीं शाखाग्रें लवून गेलीं होतीं. अशा त्या उपवनांत मारुति प्रत्येक वृक्षाखालीं सीतेचा शोध करीत चालला. ॥ ५ ॥ तों त्या ठिकाणीं एक अत्युत्तम देवालय त्याच्या दृष्टीस पडलें. - तें इतकें उंच होतें कीं, पाहणारांना - 'हें मेघमंडळाचें चुंबनच घेत आहे कीं काय !' असा भास होई. आंत रत्नखचित स्तंभ शेंकडों होते. तो भव्य प्रासाद पाहून मारुतीला विस्मय वाटला. ॥ ६ ॥ तें मंदिर सोडून मारुति पुन्हां थोडासा पुढें गेला तों तेथें शिंशपावृक्ष त्याच्या दृष्टीस पडला. त्याचीं पानें अगदीं एकाशीं एक लागलेलीं असत, ॥ ७ ॥ ह्मणून त्याच्या खालीं सूर्यकिरणांचें दर्शन कधींच होत नसे. त्यावर जिकडे तिकडे अनेक पक्ष्यांचे थवे बसले होते; त्या सर्व पक्ष्यांचे शरीरवर्ण सुवर्णासारखे होते. त्याच्या मुळाशीं

विचिन्वन्[2] जानकीं तत्र प्रतिवृक्षं[1] मरुत्सुतः[3] ॥५॥ ददर्शाभ्रंलिहं[4] तत्र चैत्यप्रासादमुत्तमम् ॥ दृष्ट्वा विस्मयमापन्नो मणिस्तम्भशतान्वितम् ॥ ६ ॥ समतीत्य[7] पुनर्गत्वा किंचिद्दूरं स मारुतिः ॥ ददर्श शिंशपावृक्षमत्यन्तनिबिडच्छदम्[8] ॥७॥ अदृष्टातपमाकीर्णस्वर्णवर्णविहंगमम्[9][10] ॥ तन्मूले राक्षसीमध्ये स्थितां जनकनन्दिनीम् ॥ ८ ॥

तत्र प्रतिवृक्षं जानकीं (मू.) ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ तत्र (पू.) मणिस्तंभसमन्वितं[5] चैत्यप्रासादं[6] ददर्श. (मू.) ॥ ६ ॥ सः मारुतिः [चैत्यप्रासादं] समतीत्य, पुनः किंचित् दूरं गत्वा, (७ उ. ८ पू.) शिंशपावृक्षं ददर्श. ॥ वीरः हनुमान (८ उ.) भूतले देवतां इव [स्थितां] ॥

१ प्रत्येक वृक्षाखालीं. २ शोधणारा. ३ वायुपुत्र. ४ मेघमंडळाला चाटणाऱ्या. ५ रत्नांच्या खांबांनीं युक्त, अशा. ६ देवालयाला. ७ उल्लंघून. ८ अतिशय दाट पानें ज्याचीं, अशा. ९ नाहीं दिसत सूर्यकिरण ज्यांतून, अशा. १० व्याप्त सुवर्णवर्ण पक्ष्यांनीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राक्षसींच्या मध्यभागीं जानकी बसली आहे, ॥ ८ ॥ असें हनुमंताच्या दृष्टीस पडलें. त्या वीराला - वाटलें कीं - ही - स्वर्गांतील मूर्तिमती - देवताच पृथ्वीतलावर आली आहे. रामाचा वियोग झाला, तेव्हां तिची वेणी जशी होती तशीच अद्याप होती. शरीर तर कृश झालें होतेंच; त्यांतून आंगावर धारण केलेलें वस्त्र मळकट होतें, ह्मणून ती फारच दीन दिसे. ॥ ९ ॥ ह्या वेळीं ती भूमीवर पडली असून मुखानें ' रामा ! रामा ! ' असें ह्मणून एकसारखा शोक करीत होती. रक्षणकर्ता कोणीच मिळेना, ह्मणून त्या सुंदरीनें उपवास करून शरीर कृश केलें होतें. ॥ १० ॥ त्या श्रेष्ठ वानरानें खांदीच्या शेवटल्या पानांमध्यें बसून सीतेकडे अवलोकन केलें - व आपल्याशींच ह्मटलें :- ' मी जानकीचा शोध लाविला ! आपलें काम झालें !

ददर्श हनुमान्वीरो देवतामिव भूतले ॥ एक[1]वेणीं कृशां दीनां मलिनाम्बर[2]धारिणीम्
॥ ९ ॥ भूमौ शया[3]नां शो[4]चन्तीं रामरामेति भाषिणीम् ॥ त्रातारं[5] नाधिगच्छ[6]-
न्तीमुपवास[7]कृशां शुभाम् ॥१०॥ शाखान्तच्छदमध्य[8]स्थो ददर्श कपि[9]कुञ्जरः ॥
कृतार्थोऽहं कृतार्थोऽहं दृष्ट्वा जनकनन्दिनीम् ॥ ११ ॥

(९ उ. १० मू.) जनकनन्दिनीं ददर्श. ॥ ७ ॥ ८ ॥ ९ ॥ १० ॥ कपिकुञ्जरः (पू.) [सन्] जनकनन्दिनीं ददर्श, दृष्ट्वा [उवाच –] ' अहं कृतार्थः ! अहं कृतार्थः ! ॥ ११ ॥

---

१ एक वेणी जिची (रावणानें हरून आणिली त्या दिवसापासून जिनें आपले केंस पुन्हां विंचरले देखील नाहींत), अशा. २ मळकट वस्त्र धारण करणाऱ्या. ३ लोळणाऱ्या. ४ शोक करणाऱ्या. ५ रक्षण करणारास. ६ अधिगच्छन्तीं पावणारी (मिळाला जिला), अशा. ७ उपोषणामुळें कृश. ८ फांदीच्या शेवटाच्या पानामध्यें राहिलेला. ९ वानरांत मोठा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारुतीला राव-ण दिसला.

धन्य माझी ! ॥ ११ ॥ प्रभु रामचंद्राचें कार्य मीच साधिलें ! ! ' इतक्यांत, अंतःपुरांतून कांहीं कलकलाट बाहेर ऐकूं आला. ॥ १२ ॥ ' ही काय बरें गडबड असावी ! ' असें मनांत येऊन मारुति वृक्षाच्या पानांत लपाला; तों रावण इकडेच येत आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्याच्या भोंवतीं स्त्रीजनांचा बराच मोठा परिवार होता. ॥ १३ ॥ त्याला दहा मुखें व वीस बाहु असून त्याच्या शरीराचा वर्ण काळ्या कुळकुळीत काजळाच्या राशीसारखा असे. - ती व्यक्ति आणि तें ऐश्वर्य - पाहून मारुतीला आश्चर्य वाटलें व - ' जर आपली ह्याची दृष्टादृष्ट झाली तर कदाचित् आपलें कार्य पूर्ण होण्यास व्यत्यय येईल ' अशा भीतीनें - तो पानांच्या गुच्छांत दडून बसला. ॥ १४ ॥ रावणाच्या मनांत ह्या वेळीं, ' रामाच्या हातून आपल्याला

मयैव साधितं कार्यं रामस्य परमात्मनः ॥ ततः किलकिलाशब्दो बभूवान्तःपुराद्बहिः ॥ १२ ॥ किमेतदिति सल्लीनो[2] वृक्षपत्रेषु[1] मारुतिः ॥ आयान्तं रावणं तत्र स्त्रीजनैः परिवारितम् ॥ १३ ॥ दशास्यं[3] विंशतिभुजं[4] नीलाञ्जनचयोपमम्[5] ॥ दृष्ट्वा विस्मयमापन्नः पत्रखण्डेष्वलीयत[6][7] ॥ १४ ॥ रावणो राघवेणाशु मरणं मे कथं भवेत् ॥

(पू.) रामस्य कार्यं साधितं !' ॥ ततः अन्तःपुरात् बहिः (मू.). ॥१२॥ (१३ पू.) संलीनः मारुतिः (बा.१३ उ. १४ पू.) आयान्तं रावणं दृष्ट्वा विस्मयं आपन्नः [सन्] (मू.). ॥१३॥ १४ ॥ ' (१५ पू.) मरणं कथं भवेत् !

१ वृक्षाच्या पानांत. २ लपलेला. ३ दहा मुखें ज्याला, अशा. ४ वीस बाहु ज्याला, अशा. ५ काळ्या काजळाच्या राशीसारख्या. ६ पानांच्या समूहांत. ७ अलीयत दडून बसला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लवकर मरण येतें कसें! तो सीतेसाठीं देखील येत नाहीं, ह्याचें कारण काय असावें!' ॥१५॥ असे विचार चालले होते. तो आपल्या अंतःकरणांत रामाचेंच सर्वकाळ चिंतन करीत असे. - मारुति लंकेंत शिरला, - त्या दिवशीं उत्तर रात्रीं राक्षसाधीश्वर रावणाला ॥१६॥ स्वप्न पडलें कीं, रामाच्या आज्ञेवरून कोणी एक वानर आला आहे; त्याला इच्छेस येईल तसें रूप घेतां येतें; सध्यां तो सूक्ष्मरूप घेऊन वृक्षाच्या अग्रावर बसून सीतेकडे पाहत आहे. ॥१७॥ हें विलक्षण स्वप्न पाहिल्यावर, त्यानें आपल्याशींच विचार केला कीं, कदाचित् स्वप्न खरें असेल; तेव्हां येथें आपण अशी युक्ति करावी;–॥१८॥दुर्भाषणरूप बाणांचे जानकीवर प्रहार करून तिला

सीतार्थमपि नायाति रामः किं कारणं भवेत् ॥१५॥ इत्येवं चिन्तयन्नित्यं राममेव सदा हृदि ॥ तस्मिन्दिने ऽपररात्रौ रावणो राक्षसाधिपः ॥ १६ ॥ स्वप्ने रामेण संदिष्टः[1] कश्चिदागत्य वानरः ॥ कामरूपधरः[2] सूक्ष्मो वृक्षाग्रस्थो ऽनुपश्यति ॥१७॥ इति दृष्ट्वा ऽद्भुतं स्वप्नं स्वात्मन्येवानुचिन्त्य सः ॥ स्वप्नः कदाचित्सत्यः स्यादेवं तत्र करोम्यहम् ॥ १८ ॥ जानकीं वाक्शरैर्[3]विद्ध्य[4] दुःखितां नितरामहम् ॥

रामः (१५ उ.) इति एवं नित्यं चिन्तयन् रावणः सदा हृदि रामं एव [ध्यायन् आस्ते]. ॥ राक्षसाधिपः रावणः (मू.) ॥ १५ ॥ १६ ॥ (पू.) आगत्य, ॥ (मू.) [सन्] अनुपश्यति. ॥ १७ ॥ सः (पू.) दृष्ट्वा स्वात्मनि एव अनुचिन्त्य, ॥ '(मू.) करोमि. ॥१८॥ अहं (पू.) दुःखितां करोमि.

१ आज्ञा दिली ज्याला, असा. २ इच्छेस येईल तें रूप धरणारा. ३ भाषणरूप बाणांनीं. ४ वेध करून (दुखवून).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुष्कळ दुःख द्यावें; ह्मणजे वानर तें पाहून रामाला कळवील. ॥ १९ ॥ असा निश्चय ठरवून, तो लागलाच सीतेकडे यावयास निघाला. नूपुरांचा व कमरपट्ट्यांच्या घागऱ्यांचा खुळखुळ शब्द सीतेच्या कानीं पडला. ॥ २० ॥ तेव्हां ती सुंदरी घाबरली व शरीर सांवरून (एकटी होती तेव्हां अस्ताव्यस्त बसली होती, पण आतां आटोपसरपणें) खालीं तोंड घालून बसली. तिच्या नेत्रांत अश्रु आले; अंतःकरण तर सर्वथा रामाकडे लागलें होतें. ॥ २१ ॥ त्यावेळीं रावणही सीतेला पाहून ह्मणाला :– ' सुंदरि, तुझा कटिप्रदेश आणि भ्रुकुटिरचना किती तरी रमणीय दिसतात! सीते! मला पाहून विनाकारण इतका आटोपसर बसण्याचा खटाटोप कशाला केला पाहिजे! ॥ २२ ॥ राम आपल्या धाकट्या भावाला बरोबर घेऊन रानटी पशूंमध्यें

करोमि दृष्ट्वा रामाय निवेदयतु वानरः ॥ १९ ॥ इत्येवं चिन्तयन्सीतासमीपमगमद्द्रुतम् ॥ नूपुराणां किंकिणीनां श्रुत्वा सिञ्जितमंगना ॥ २० ॥ सीता भीता लीयमाना स्वात्मन्येव सुमध्यमा ॥ अधोमुख्यश्रुनयना स्थिता रामार्पितान्तरा ॥ २१ ॥ रावणोऽपि तदा सीतामालोक्याह सुमध्यमे ॥ मां दृष्ट्वा किं वृथा सुभ्रु स्वात्मन्येव विलीयसे ॥ २२ ॥ रामो वनचराणां हि मध्ये तिष्ठति सानुजः ॥

वानरः [तां] (मू.). ' ॥ १९ ॥ (२० पू.) अगमत्. ॥(२० उ.) [च] सिञ्जितं श्रुत्वा (२१ मू.) सीता अङ्गना, स्वात्मनि एव लीयमाना स्थिता. ॥ २० ॥ २१ ॥ तदा (पू.) –॥ ' सुमध्यमे, सुभ्रु, (मू.) ? ॥ २२ ॥ हि सानुजः (पू.). ॥

१ पैंजणांच्या. २ घागऱ्यांचा. ३ शब्द. ४ आवरून बसणारी. ५ सुंदर कटिभाग जिचा अशा. ६ सुंदर भ्रुकुटी जिच्या, अशा स्त्रिये.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राहत असतो; * एखादेवेळीं कोणाच्या दृष्टीस पडतो, कधीं कधीं मुळींच दिसत नाहीं ! ॥ २३ ॥ मी तर त्याला पाहण्यासाठीं पुष्कळ लोक वेगवेगळीं रूपें देऊन पाठविले. त्यांनीं अनेक युक्तिप्रयुक्तींनीं चहूंकडे शोध केला पण तो सांपडतच नाहीं. ॥ २४ ॥ रामाच्या मनांत तुजविषयीं इच्छा किंवा प्रीति कधींच नसते, - ह्मणून मी ह्मणतों कीं, अशा पुरुषाशीं राहून - तुला करायाचें आहे काय ? तूं त्याला नेहमीं आलिंगून असलीस व तो सर्वकाळ तुझ्याजवळ राहिला, तरी ॥ २५ ॥

* रावण महातत्त्वज्ञानी होता त्याचें भाषण वरकमीं जरी निंदेनें ओतप्रोत भरलेलें आहे असें दिसतें; तरी त्यांत गूढपणें रामाची पूर्ण स्तुतिच आहे : तो स्तुतिपर अर्थ आह्मी खालीं देतों :–

राम वनांत राहणाऱ्या तपस्व्यांच्या अंतरीं राहतो. त्याचें दर्शन कित्येक योग्यांना मिळतें, कित्येकांना मिळत नाहीं. ॥ २३ ॥ पाखंडमार्गी लोकांना, त्यांनीं किती प्रयत्न केले तरी, त्याची प्राप्ति होत नाहीं. ॥२४॥ राम पूर्णकाम असल्यामुळें स्त्रीविषयीं निरपेक्ष असे. सीता आदिमाया होय. राम हा परमेश्वर. माया परमेश्वराच्या आश्रयानें असते व परमेश्वर तिच्या समीप असतो तरी, ॥२५॥

कदाचिद्दृश्यते कैश्चित्कदाचिन्नैव दृश्यते ॥२३॥ मया तु बहुधा लोकाः प्रेषितास्तस्य दर्शने ॥ न पश्यन्ति प्रयत्नेन वीक्षमाणाः समंततः ॥२४॥ किं करिष्यसि रामेण निःस्पृहेण सदा त्वयि ॥ त्वया सदाऽऽलिंगितोऽपि समीपस्थोऽपि सर्वदा ॥२५॥

कैश्चित् (मू.). ॥२३॥ (पू.) सम्प्रेषिताः लोकाः ॥ (मू.) वीक्षमाणाः [अपि] न पश्यन्ति. ॥ २४ ॥ त्वयि सदा निःस्पृहेण रामेण किं करिष्यसि ? [यदि] अपि (मू.) समीपस्थः, [तथा] अपि ॥२५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बाचकहो! रावणानें रामाची निंदा केली कीं स्तुति?

त्या रामाच्या अंतःकरणांत मिळून तुजविषयीं प्रेमपाझर अगदीं येत नाहीं! तो तूं दिलेल्या सर्व भोगांचा व तुझ्या गुणांचाही ॥ २६ ॥ उपभोग घेतो पण त्याला त्या गोष्टीची जाण मुळींच नाहीं; इतका तो कृतघ्न व अधम आहे! त्याच्या आंगीं गुणांचा तर लेश नाहीं! तुला मी इकडे आणिलें, तुझ्यासारखी साध्वी पत्नी दुःखानें आणि शोकानें गांजून गेली आहे, ॥ २७ ॥ तरी पण अद्याप तो इकडे येत नाहीं! हृदयांत प्रेमच नाहीं, तेव्हां तो इकडे येतो कशाला!!

तो तिच्या गुणांवर किंवा तिनें उत्पन्न केलेल्या भोगांवर आसक्त होत नाहीं. ॥ २६ ॥ उपभोग भोगिले तरी तो " **जहात्येनां भुक्तभोगामजो ऽन्यः** " ह्या श्रुतींत सांगितल्याप्रमाणें 'मी भोक्ता आहें' असा अभिमान धरीत नाहीं. तो कृतघ्न - **कृतानि हंति सः** – म्हणजे कर्मांचा नाश करणारा आहे (त्याचें दर्शन झालें असतां भक्तांचीं संचित व क्रियमाण कर्मे नष्ट होतात). त्याच्या ठिकाणीं सत्त्व रज तम हे गुण नाहींत. तो अधम – **न धमति=शब्दविषयो भवति** – म्हणजे अवर्णनीय स्वरूपाचा आहे. ... ... ॥ २७ ॥ मायेवर त्याची भक्ति नाहीं हें उघडच होय.

हृदये ऽस्य न च स्नेहस्त्वयि रामस्य जायते ॥ त्वत्कृतान्सर्वभोगांश्च त्वद्गुणानपि राघवः॥२६॥ भुञ्जानो ऽपि न जानाति कृतघ्नो निर्गुणो ऽधमः॥ त्वमानीता मया साध्वी दुःखशोकसमाकुला॥२७॥ इदानीमपि नायाति भक्तिहीनः कथं व्रजेत् ॥

अस्य रामस्य हृदये, त्वयि (पू.). ॥ राघवः (मू.) च अपि ॥ २६ ॥ (पू.) [च] [अस्ति]. मया आनीता साध्वी (मू.) [जाता असि]. ॥ २७ ॥ [रामः] (मू.). [अस्ति] ! ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आंगांत शक्ति नाहीं, ममता नाहीं, पोकळ गर्व मात्र खंडीभर भरला आहे! वास्तविक मूर्ख असून बेटा आपल्याला पंडित समजतो! ॥ २८ ॥ सीते! तूं तर मोठी मानिनी स्त्री आहेस. ज्यानें तुजवर लक्ष्य नाहीं, त्या नराधमाशीं तुला करायाचें आहे काय? मी दैत्यांचा राजा तुजवर अत्यंत अनुरक्त आहें; माझा अंगिकार कर. ॥ २९ ॥ मला वश झालीस, तर तूं देव, गंधर्व, नाग ह्यांची व यक्ष, किन्नर ह्या जातींच्या सर्व स्त्रियांची धनीन होऊन बसशील!' ॥ ३० ॥ हें रावणाचें भाषण ऐकतांच सीतेला अत्यंत क्रोध आला.

तो गुणरहित, ममताशून्य व अमानी ह्म० अहंकारावेगळा होय. ॥ शिवाय तो मूढ – म् (ब्रह्मा) च उः (शिवः) च मू, ताभ्यां ऊढः नियामकत्वेन अभिमतः – ह्मणजे ब्रह्मदेव आणि शंकर ह्यांनीं, आपला नियामक, म्हणून मानलेला आहे. विद्वान पुरुषांमध्यें त्याला मान मिळतो. ॥ २८ ॥ तो नराधम – नराः अधमाः यस्मात् – ह्मणजे मनुष्यांपेक्षांही श्रेष्ठ असून, मायेच्या तंत्रानें न वागणारा आहे. ॥ २९ ॥

निःसत्त्वो[1] निर्ममो[2] मानी मूढः पण्डितमानवान्[3] ॥ २८ ॥ नराधमं त्वद्विमुखं[4] किं करिष्यसि भामिनि॥ त्वय्यतीव समासक्तं मां भजस्वासुरोत्तमम् ॥ २९ ॥ देव-गन्धर्वनागानां यक्षकिन्नरयोषिताम् ॥ भविष्यसि नियोक्त्री[5] त्वं यदि मां प्रतिपद्यसे ॥ ३० ॥ रावणस्य वचः श्रुत्वा सीता ऽमर्षसमन्विता[6] ॥

(मू.)! ॥ २८ ॥ भामिनि, (मू.) मां भजस्व. ॥२९॥ यदि मां प्रतिपद्यसे, [तर्हि] त्वं (पू.) ॥ [च] नियोक्त्री भविष्यसि.' ॥ ३० ॥ (पू.) सीता ॥

१ शक्तिहीन. २ ममताशून्य. ३ स्वतांला शहाणा मानणारा. ४ तुला अनुकूल नसलेल्या. ५ वागविणारी (धनीन). ६ क्रोधयुक्त.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तिनें खालीं तोंड घातलें व, - पतिव्रतांनीं पर पुरुषाशीं प्रत्यक्ष भाषण करणें योग्य नव्हे : तसा अपरिहार्य प्रसंग आलाच तर निदान कांहीं अचेतन वस्तु तरी मध्यस्थ करावी : ह्या नियमानुसार, - मध्यें गवताची काडी ठेवून बोलण्यास प्रारंभ केला :– ॥३१॥ 'दुष्टा! अधमा! रामाची तुला भीति वाटत होती, ह्याबद्दल मुळींच संशय नाहीं! ह्मणूनच तूं गोसांव्याचें सोंग घेतलेंस आणि, जशी कुत्री - मंडपांत कोणी नाहीं असें पाहून - यज्ञांतील हविर्भाग चोरून नेते ती प्रमाणें, रामलक्ष्मण जवळ नसतांना ॥३२॥ मला उचलून आणिलेंस! पण, नीचा! त्या कृत्याचें फळ तुला लवकरच भोगावें लागेल! ज्या वेळीं रामाच्या शरप्रहारांनीं तुझ्या शरीराचे तुकडे उडतील, त्यावेळीं तुला ॥ ३३ ॥ रामाचें मनुष्यरूप कसें काय आहे तें समजेल व यमसदनीं जावें लागेल!!

उवाचाधोमुखी भूत्वा विधाय तृणमन्[1]तरे ॥ ३१ ॥ राघवाद्बि[3]भ्यता नूनं भिक्षुरूपं त्वया धृतम् ॥ रहिते राघवाभ्यां त्वं [5]शुनीव हविर[6]ध्वरे ॥ ३२ ॥ ह्रतवानसि मां नीच तत्फलं प्राप्स्यसे ऽचिरात् ॥ यदा रामशराघातविदारितवपुर्भवान् ॥ ३३ ॥ ज्ञास्यसे मानुषं रामं गमिष्यासि यमान्[8]तिकम् ॥

(मू.) वि[2]धाय उवाच – ॥३१॥ '(पू.) नूनं भि[4]क्षुरूपं धृतं! त्वं राघवाभ्यां (मू.) हविः इव ॥३२॥ मां (पू.) प्राप्स्यसे. ॥ भवान् (मू.) [भविष्यति], ॥३३॥ तदा रामं मानुषं (३४पू.) [च] गमिष्यासि. ॥

१ मध्यें. २ करून (ठेवून). ३ भिणाऱ्या. ४ गोसाव्याचें सोंग. ५ शुनी कुत्री. ६ यज्ञांत. ७ रामाच्या बाणाच्या प्रहारानें छिन्नविच्छिन्न झालें शरीर ज्याचें असा. ८ यमाजवळ.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

समुद्र शुष्क करून किंवा समुद्रावर बाणांचा सेतु बांधून ॥३४॥ युद्धांत तुझा वध करण्यासाठीं रामचंद्र लक्ष्मणासह येणारच. संशय अगदीं नलगे. राक्षसाधमा ! - माझ्या ह्मणण्याची सत्यता तुला लवकरच - कळून येईल ! ॥३५॥ तुझ्या सैन्याचा, पुत्रांचा आणि शेवटीं तुझा घात करून राम मला आपल्या नगरास घेऊन जाईल.' हें जानकीचें कठोर भाषण ऐकून राक्षसाधिपतीला क्रोध आला. कांहीं वेळानें तर कोपाचा वेग अनावर होऊन तो देहभान विसरला व खड्ग उचलून जनककन्येला मारण्यास धांवला ! त्याचे डोळे लाल झाले होते. ॥ ३६ ॥ ३७ ॥ मंदोदरी आपल्या पतीचें कल्याण करण्यास सदा तत्पर असे. प्रस्तुत प्रसंगीं

समुद्रं शोषयित्वा[1] वा शरैर्बध्वा ऽथ वारिधिम्[2] ॥ ३४ ॥ हन्तुं त्वां समरे रामो
लक्ष्मणेन समन्वितः ॥ आगमिष्यत्यसंदेहो[6] द्रक्ष्यसे राक्षसाधम ॥३५॥ त्वां सपुत्रं
सहबलं हत्वा नेष्यति मां पुरम् ॥ श्रुत्वा रक्षःपतिः[9] क्रुद्धो जानक्याः परुषाक्षरम्[10]
॥ ३६ ॥ वाक्यं क्रोधसमाविष्टः खड्गमुद्यम्य सत्वरः ॥ हन्तुं जनकराजस्य तनयां
ताम्रलोचनः ॥ ३७ ॥ मन्दोदरी निवार्याह पतिं पतिहिते रता ॥

लक्ष्मणेन समन्वितः रामः समरे[3] त्वां हन्तुं[4], (३४ उ.) शरैः बध्वा[5] वा (मू.) त्वं द्रक्ष्यसे[7] ! ॥ ३४ ॥ ३५ ॥ सपुत्रं सहबलं (३६ पू.) नेष्यति[8]. '॥ (३६ मू.) वाक्यं श्रुत्वा क्रुद्धः [अभवत्]. (मू.) [सः] खड्गं उद्यम्य, जनकराजस्य तनयां हन्तुं [उद्यतः अभवत्]. ॥ ३६ ॥ ३७ ॥ पतिहिते रता (पू.) निवार्य आह – ॥

---

१ सुकवून. २ समुद्राला. ३ युद्धांत. ४ मारण्यास. ५ बांधून. ६ निःसंशय. ७ पाहशील. ८ नेईल. ९ राक्षसांचा राजा. १० कठोर शब्द.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मंदोदरीच्या मनाचा मोठेपणा.

तिनें पतीला निवारण करून सांगितलें :– 'महाराज! ही काय यःकश्चित् मनुष्यजातीची स्त्री! हिला सोडून द्या. बिचारी दुःखामुळें कृश होऊन गेली आहे! ॥ ३८ ॥ अहो! आपल्या पदरीं देव, गंधर्व, नाग इत्यादि जातींच्या अनेक उत्तम स्त्रिया आहेत; त्यांचे—एकएकींचे—डोळे तारुण्यमदानें मत्त (पाणीदार) दिसतात; शिवाय, त्या केवळ आपल्याला वरण्याची उत्कट इच्छा धरून आहेत. - त्यांना सोडून हिच्या नादीं लागण्यांत अर्थ काय?- ' ॥३९ ॥ नंतर रावणानें तेथें असलेल्या अक्राळविक्राळ मुखांच्या राक्षसींना सांगितलें :– 'तुह्मी सीतेला भय दाखवा, आदरानें वागवा, किंवा दुसरेही वाटतील ते उपाय योजा पण तिच्या मनांत मजविषयीं कामना उद्भवेल आणि तो मला वश होईल अशी लवकर तजवीज करा. ॥ ४० ॥

त्यजैनां मानुषीं दीनां दुःखितां कृपणां कृशाम् ॥३८॥ देवगन्धर्वनागानां बह्व्यः
सन्ति वरांगनाः ॥ त्वामेव वरयन्त्युच्चैर्मदमत्तविलोचनाः ॥३९॥ ततो ऽब्रवी-
द्दशग्रीवो राक्षसीर्विकृताननाः ॥ यथा मे वशगा सीता भविष्यति सकामना ॥
तथा यतध्वं त्वरितं तर्जनादरणादिभिः ॥ ४० ॥

'(मू.) एनां त्यज. ॥ ३८ ॥ उच्चैः मदमत्तविलोचनाः बह्व्यः (पू.) [याः] वराङ्गनाः सन्ति, [ताः] (मू.).' ॥ ३९ ॥ (पू.) राक्षसीः अब्रवीत् – ॥' सीता सकामना [सती] (मू.) यतध्वं. ॥ ४० ॥

१ मदानें धुंद डोळे ज्यांचे, अशा. २ उत्तम स्त्रिया. ३ वेडींविद्रीं तोंडें ज्यांचीं, अशा. ४ अभिलाषयुक्त. ५ भय घालणें, पुन्हां सामोपचारानें बोलणें इत्यादि प्रकारांनीं. ६ यत्न करा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दोनमहिन्यांच्या आंत जर सीता मला वश झाली, तर तिला सर्व सुखें मिळतील आणि मजबरोबर राज्य भोगायास सांपडेल. ॥ ४१ ॥ दोन महिने उलटून गेल्यावर, जर हिनें माझ्या शय्येवर येण्याचें आनंदानें पतकरलें नसेल तर, ह्या मानुषीला मारून हिच्या मांसानें माझ्या प्रातःकाळच्या उपहाराची सिद्धता करा!' ॥ ४२ ॥ इतकें सांगून रावण स्त्रियांसहवर्तमान आपल्या अंतःपुरमंदिरांत गेला. त्या राक्षसिणी जानकीच्या जवळ येऊन आपआपल्या बुद्धीनें योजिलेल्या भिन्नभिन्न उपायांनीं तिला भीति घालूं लागल्या :— ॥ ४३ ॥ त्यांपैकीं एकजण जानकीला ह्मणाली :— 'सीते! तुझें तारुण्य फुकट चाललें! रावणाला वश झालीस तर

द्विमासा[1]भ्यन्तरे सीता यदि मे वशगा भवेत् ॥ तदा सर्वसुखो[2]पेता राज्यं भोक्ष्यति सा मया ॥ ४१ ॥ यदि मासद्वयादूर्ध्वं मच्छय्यां नाभि[3]नन्दति ॥ तदा मे प्रातराशाय हत्वा कुरुत मानुषीम् ॥ ४२ ॥ इत्युक्त्वा प्रययौ स्त्रीभी रावणोऽन्तःपुरालयम् ॥ राक्षस्यो जानकीमेत्य भीषयन्त्यः [5]स्वतर्जनैः ॥ ४३ ॥ तत्रैका जानकीमाह यौवनं ते वृथा गतम् ॥ रावणेन समासाद्य सफलं तु भविष्यति ॥ ४४ ॥

(मू.) [सह] राज्यं भोक्ष्यति. ॥ ४१ ॥ (मू.) हत्वा मे [4]प्रातराशाय कुरुत. ' ॥ ४२ ॥ रावणः इति उक्त्वा, स्त्रीभिः [सह] अन्तःपुरालयं प्रययौ. (मू.) भी[6]षयन्त्यः [बभूवुः]. ॥ ४३ ॥ (पू.)— ' ते यौवनं वृथा गतं. ॥ (मू.). ' ॥ ४४ ॥

---

१ दोन महिन्यांच्या आंत. २ सर्व सुखांनीं युक्त. ३ आनंदानें स्वीकारितें. ४ सकाळच्या फराळाला. ५ स्वतांच्या भिवविण्याच्या कल्पनांनीं. ६ भिवविणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तें सफळ होणार आहे! पहा बाई!' ॥ ४४ ॥ दुसरी क्रोधाचें अवसान आणून बोलली :– 'अहो! उगीच वेळ कशाला लावतां! आतांच हिच्या आंगाचे वेगवेगळे तुकडे पाडून शिजत लावा झालें!' ॥४५॥ तिसरी तर खड्ग उचलून जानकीला मारायला धांवली! दुसरी एकजण आपलें मूळचेंच भयंकर तोंड आणखी अधिक वासून तिला भिववूं लागली! ॥४६॥ अशा प्रकारांनीं त्या अक्राळविक्राळ तोंडांच्या राक्षसी सीतेला भिववीत असतां, त्यांपैकींच त्रिजटा ह्मणून एका वृद्ध राक्षसीनें सर्वांना मागें सारून असें सांगितलें :–॥४७॥ 'दुष्ट राक्षसींनो! माझें भाषण ऐकून घ्या; ह्मणजे तुमचें कल्याण होईल. जानकी रडत्ये आहे; तिला

अपरा चाह कोपेन किं विलम्बेन जानकी ॥ इदानीं छेद्यतामंगं विभज्य च पृथक् पृथक्॥४५॥ अन्या तु खड्गमुद्यम्य जानकीं हन्तुमुद्यता ॥ अन्या करालवदना विदार्यास्यमभीषयत् ॥ ४६ ॥ एवं तां भीषयंतीस्ता राक्षसीर्विकृताननाः ॥ निवार्य त्रिजटा वृद्धा राक्षसी वाक्यमब्रवीत् ॥ ४७ ॥ शृणुध्वं दुष्टराक्षस्यो मद्वाक्यं वो हितं भवेत् ॥ न भीषयध्वं रुदतीं नमस्कुरुत जानकीम् ॥ ४८ ॥

(पू.) आह – 'विलम्बेन किं? इदानीं जानकी छेद्यतां. [अस्याः] अङ्गं पृथक् पृथक्, विभज्य [पच्यतां!]' ॥ ४५ ॥ (पू.). ॥ करालवदना अन्या आस्यं (मू.). ॥ ४६ ॥ त्रिजटा वृद्धा राक्षसी (पू.) राक्षसीः (मू.) – ॥ ४७ ॥ 'दुष्टराक्षस्यः, मद्वाक्यं (पू.). ॥ रुदतीं जानकीं (मू.). ॥४८॥

१ तोडावी. २ फोडी करून. ३ शिजवावें. ४ भयंकर मुख जिचें, अशी. ५ पसरून. ६ भिववूं लागली. ७भिवविणाऱ्या. ८विद्रचा तोंडांच्या. ९ भिववा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भिववूं तर नकाच पण उलट तिच्या पायां पडा. ॥ ४८ ॥ आतांच मला स्वप्नामध्यें, कमलनयन रामचंद्र शुभ्र ऐरावतावर बसून लक्ष्मणासहवर्तमान लंकेंत आला, ॥ ४९ ॥ त्यानें सगळी लंकानगरी जाळिली, युद्धांत रावणाचा वध केला, आणि तो जानकीला आपल्या मांडीवर बसवून पर्वताच्या शिखरावर बसला आहे, असें दिसलें; ॥ ५० ॥ रावण तेलानें नाहलेला व नग्न असून आपल्या मुखांची माळ हातांत घेऊन पुत्र-पौत्रांसह शेणखळींत बुडाला! ॥ ५१ ॥ बिभीषण मात्र भक्तियुक्त व संतुष्ट अंतःकरणानें रामाच्या समीप

इदानीमेव मे स्वप्ने रामः कमललोचनः॥ आ[1]रुह्यैरावतं शुभ्रं लक्ष्मणेन समागतः ॥ ४९ ॥ दग्ध्वा लंकापुरीं सर्वां हत्वा रावणमाहवे ॥ आरोप्य जानकीं स्वांके स्थितो दृष्टो ऽगमूर्धनि ॥ ५० ॥ रावणो गोमयन्हदे तैला[4]भ्यक्तो दि[5]गम्बरः ॥ अगाहत्पुत्रपौत्रैश्च कृत्वा वदनमालिकाम् ॥ ५१ ॥ बिभीषणस्तु रामस्य सन्निधौ हृष्टमानसः ॥ करोति सेवां रामस्य पादयोर्भक्तिसंयुतः ॥ ५२ ॥

(पू.) रामः ॥ शुभ्रं ऐरावतं (मू.), ॥ ४९ ॥ सर्वां लङ्कापुरीं दग्ध्वा, आहवे रावणं हत्वा, स्वाङ्के जानकीं आ[2]रोप्य [च] [3]अगमूर्धनि स्थितः [मया] दृष्टः. ॥ ५० ॥ (पू.) रावणः [6]वदनमालिकां [स्वहस्ते] कृत्वा पुत्रपौत्रैः [सह] गो[7]मयन्हदे [8]अगाहत! ॥ ५१ ॥ भक्तिसंयुतः (पू.) [सन्] (मू.). सेवां करोति. [एवं स्वप्ने मया दृष्टं.] ॥ ५२ ॥

---

१ वर बसून. २ बसवून. ३ पर्वताच्या शिखरावर. ४ तेल चोपडलें ज्याला, असा. ५ दिशा हेंच वस्त्र ज्याचें असा (नग्न). ६ तोंडांच्या माळेला. ७ शेणाच्या डोहांत (शेणखळींत). ८ बुडाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राहून रामचरणांची सेवा करीत आहे; - असें मी पाहिलें ! ! ॥ ९२ ॥ - ह्या वरून मला तर वाटतें कीं, - हजार हिश्शांनीं रामचंद्र हां हां ह्मणतां कुलासह रावणाचा वध करणार, व बिभीषणाला राज्य देऊन ह्या सुवदनेला – जानकीला–अंकीं बसवून घेऊन आपल्या नगरास जाणार. ह्यांत अंतर अगदीं होणार नाहीं. ' ॥ ९३ ॥ त्रिजटेचें भाषण ऐकून राक्षसस्त्रिया घाबरल्या व जागोजाग गुपचिप बसल्या. शेवटीं त्या सगळ्याजणींना गाढ झोंप लागली. ॥ ९४ ॥ राक्षसींनीं भय घातलें त्यामुळें सीता भिऊन अगदीं विव्हळ झाली. रक्षणकर्ता कोणी मिळेना तेव्हां दुःखानें तिला मूर्छा आली. नेत्र आंसवांनीं भरून आले. विचार करतां करतां ती आपल्याशींच ह्मणाली :– ॥ ९५ ॥ ' उजाडलें कीं ह्या

सर्वथा रावणं रामो हत्वा सकुलमञ्जसा ॥ बिभीषणायाधिपत्यं दत्वा सीतां शुभाननाम् ॥ अंके निधाय स्वपुरीं गमिष्यति न संशयः ॥ ५३ ॥ त्रिजटाया वचः श्रुत्वा भीतास्ता राक्षसस्त्रियः ॥ तूष्णीमासंस्तत्र तत्र निद्रावशमुपागताः ॥५४॥ तर्जिता राक्षसीभिः सा सीता भीता ऽतिविह्वला ॥ त्रातारं नाधिगच्छन्ती दुःखेन परिमूर्छिता ॥ अश्रुभिः पूर्णनयना चिन्तयन्तीदमब्रवीत् ॥ ५५ ॥ प्रभाते भक्षयिष्यन्ति राक्षस्यो मां न संशयः ॥

(पू.) रावणं अञ्जसा हत्वा, ॥ (द्वि.) सीतां ॥(मू.).' ॥५३॥ (मू.)॥५४॥ राक्षसीभिः (मू.) सा सीता इदं अब्रवीत – ॥ ५५ ॥ '(पू.) भक्षयिष्यन्ति, न संशयः ! ॥

१ मांडीवर. २ गुपचिप. ३ भिवविलेली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राक्षसी मला खाऊन टाकणार, ह्यांत संशय नाहीं. बरें, आतांच मरण येण्याला काय बरें उपाय योजावा.? ' ॥५६॥ जीव देण्याचा निश्चय झाला परंतु उपाय कांहींच सुचेना. अशा अत्यंत दुःखानें गांजलेली ती सुंदरी कंठ मोकळा सोडून (मोठमोठ्यानें हंबरडा फोडून) रडत वृक्षाची फांदी हातांत धरून पुष्कळ वेळ उभी राहिली. ॥ ५७ ॥ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे सुंदरकाण्डे द्वितीयः सर्गः ॥२॥

- ' होय, होय! बरी युक्ति सुचली! - आपण गळ्याला फांस लावून घेऊन देहत्याग करावा! रामचंद्र जवळ नाहीं, आणि मला ह्या राक्षसांच्या मेळ्यामध्यें राहावें लागत आहे; तेव्हां अशा जीविताचा उपयोग तरी काय! ॥ १ ॥ माझी ही लांब वेणी फांस लावून घ्यायला फार चांगली उपयोगी पडेल. '

इदानीमेव मरणं केनोपायेन मे भवेत् ॥ ५६ ॥ एवं सुदुःखेन परिप्लुता सा विमु[1]-
क्तकण्ठं रुदती[2] चिराय ॥ आलम्ब्य शाखां कृतनिश्चया मृतौ[3] न जानती कंचिदु-
पायमङ्गना ॥५७॥ इति सुन्दरकाण्डे द्वितीयः सर्गः ॥ २ ॥ उद्बन्धनेन[11] वा मोक्ष्ये
शरीरं राघवं विना ॥ जीवितेन फलं किं स्यान्मम रक्षोऽधिमध्यतः ॥ १ ॥ [15]दीर्घा
वेणी ममात्यर्थमुद्बन्धाय भविष्यति ॥

इदानीं एव मे (मू.)! ' ॥ ५६ ॥ (मू.) [4]कृतनिश्चया कंचित् उपायं न [5]जानती [6]अङ्गना [7]शाखां [8]आलम्ब्य [9]चिराय [[10]अतिष्ठत्]. ॥ ५७ ॥ इति अ० रा०- न्वये सुंदरकाण्डे द्वितीयः सर्गः ॥ २ ॥ ' (मू.) [12]मोक्ष्ये. राघवं विना रक्षो[13]अधिमध्यतः जीवितेन[14] मम किं फलं स्यात्? ॥ १ ॥ (पू.).' ॥

१ गळा काढून (धाय मोकलून). २ रडणारी. ३ मरणाविषयीं. ४ केला निश्चय जिनें, अशी. ५ जाणणारी. ६ स्त्री. ७ फांदीला. ८ धरून. ९ पुष्कळ वेळ. १० राहिली. ११ वर बांधून घेण्यानें. १२ सोडीन. १३ राक्षसांच्या मध्यें. १४ जगण्यानें. १५ लांब.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारुती रामच-
रित्र गाऊं ला-
गला.

असा विचार सुचून जानकीनें मनांत मरण्याचा निश्चय केला. आतां ती - त्याप्रमाणें फांस लावून घेणार - असें ॥ २ ॥ मारुतीला दिसून आलें. अद्याप त्याचें रूप लहानच होतें. त्यानें आपल्याशीं थोडासा विचार करून शेवटीं हळू हळूच पण जानकीच्या कानीं जाईल इतक्या बेताच्या स्वरानें भाषण करण्यास प्रारंभ केला : तें येणेंप्रमाणें :– ॥ ३ ॥ ' इक्ष्वाकुवंशांत जन्मलेला दशरथनामें एक प्रतापशाली राजा अयोध्यानगरींत राज्य करीत असे. त्याला जगद्विख्यात असे चार ॥ ४ ॥ पुत्र झाले. ते सगळे देवांसारखे पराक्रमी व तेजस्वी असून सर्व सुलक्षणांनीं संपन्न आहेत. त्यांचीं नांवें राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न हीं होत. ॥ ५ ॥ त्यांपैकीं वडील पुत्र पित्याच्या आज्ञेवरून, भाऊ लक्ष्मण आणि पत्नी सीता, ह्या दोघांसह दंड-

एवं निश्चितबुद्धिं तां मरणायाथ जानकीम् ॥ २ ॥ विलोक्य हनुमान्किंचिद्विचा-
र्यैतदभाषत ॥ शनैःशनैः सूक्ष्मरूपो जानक्याः श्रोत्रगं वचः ॥ ३ ॥ इक्ष्वाकुवं-
शसंभूतो राजा दशरथो महान् ॥ अयोध्याधिपतिस्तस्य चत्वारो लोकविश्रुताः
॥ ४ ॥ पुत्रा देवसमाः सर्वे लक्षणैरुपलक्षिताः ॥ रामश्च लक्ष्मणश्चैव भरतश्चैव
शत्रुहा ॥ ५ ॥ ज्येष्ठो रामः पितुर्वाक्याद्दण्डकारण्यमागतः ॥

अथ एवं मरणाय (मू.) ॥ २ ॥ (पू.) सूक्ष्मरूपः [सन्] (मू.) शनैः, शनैः अभाषत – ॥ ३ ॥ ' (पू.) राजा (मू.) ॥ ४ ॥ (मू.) च पुत्राः [संति]. ॥ ५ ॥ (बा. पू.)

१ कानीं जाईसें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कारण्यांत आला. ॥ ६ ॥ तेथें तो उदार मनाचा पुरुष गोदावरीच्या तीरीं पंचवटींत राहत असे. त्या ठिकाणीं महाभाग्यवती जनककन्या सीता, दुष्ट रावणानें, राम जवळ नसतांना, चोरून नेली. तेव्हां रामाला पराकाष्ठेचें दुःख झालें. पुढें, तो जानकीचा शोध करायास निघाला. ॥ ७ ॥ ८ ॥ इतक्यांत, भूमीवर पडलेला पक्षिराज जटायु त्याच्या दृष्टीस पडला. त्याला स्वर्गलोक मिळवून देऊन लागलाच राम ऋष्यमूक पर्वताजवळ आला. ॥ ९ ॥ रामाला आत्मस्वरूपाचें पूर्ण ज्ञान आहे; - तो संकल्पमात्रानें पाहिजे तें कार्य करूं शकतो; ह्मणून त्याला कोणाच्या साह्याची अपेक्षा नाहीं; परंतु - सुग्रीवानें आपल्या कार्यासाठीं

लक्ष्मणेन सह भ्रात्रा सीतया भार्यया सह ॥ ६ ॥ उवास गौतमीतीरे पञ्चवट्यां महामनाः ॥ तत्र नीता महाभागा सीता जनकनन्दिनी ॥ ७ ॥ रहिते रामचन्द्रेण रावणेन दुरात्मना ॥ ततो रामो ऽतिदुःखार्तो मार्गमाणो ऽथ जानकीम् ॥ ८ ॥ जटायुषं पक्षिराजमपश्यत्पतितं भुवि ॥ तस्मै दत्वा दिवं शीघ्रमृष्यमूकमुपागमत्॥ सुग्रीवेण कृता मैत्री रामस्य विदितात्मनः ॥

भ्रात्रा (मू.) [च] सह दण्डकारण्यं आगतः. ॥ ६ ॥ महामनाः [रामः] (७ पू.) उवास[1]. रामचन्द्रेण रहिते तत्र दुरात्मना रावणेन (७उ.) सीता नीता. (८ उ.) [बभूव.], अथ जानकीं मार्गमाणः[2] [सन्] ॥७॥८॥ (पू.) पतितं अपश्यत्. तस्मै दिवं[3] (मू.). ॥९॥ (पू.) रामस्य[4] मैत्री कृता. ॥

१ राहिला. २ शोधणारा. ३ स्वर्गास. ४ ज्याला आत्मज्ञान आहे, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामाशीं सख्य केलें, - अर्थात उभयतांची मैत्री जमली. - रघुनंदनानें सुग्रीवाची भार्या हरण करणाऱ्या वालीचा वध करून ॥ १० ॥ सुग्रीवाला राज्याभिषेक केला व मित्रकार्य साधिलें. सुग्रीव वानरांचा राजा झाला, तेव्हां त्यानें वानरांना बोलावून आणिलें, ॥ ११ ॥ व चहूंकडे सीतेचा शोध करण्यासाठीं वानर धाडून दिले. त्यांपैकींच मी एक सुग्रीवाचा सचिव वानर आहें. ॥ १२ ॥ संपातीनें सांगितल्यावरून मी लागलाच शंभर योजनें लांबीचा समुद्र उल्लंघून आलों, व सगळ्या लंकानगरांत त्या साध्वी जानकीचा शोध केला; ॥ १३ ॥ - तिकडे कोठें थांग लागेना, म्हणून शेवटीं - हळूहळू अशोकवनिकेंत शोधूं लागलों. तों

तद्भार्यापहारिणं हत्वा वालिनं रघुनन्दनः ॥ १० ॥ राज्येऽभिषिच्य सुग्रीवं मित्रकार्यं चकार सः ॥ सुग्रीवस्तु समानाय्य वानरान्वानरप्रभुः ॥ ११ ॥ प्रेषयामास परितो वानरान्परिमार्गणे ॥ सीतायास्तत्र चैकोऽहं सुग्रीवसचिवो हरिः ॥ १२ ॥ सम्पातिवचनाच्छीघ्रमुल्लंघ्य शतयोजनम् ॥ समुद्रं नगरीं लंकां विचिन्वन् जानकीं शुभाम् ॥ १३ ॥ शनैरशोकवनिकां विचिन्वन् शिंशपातरुम् ॥

रघुमन्दनः (मू.) हत्वा, ॥ १० ॥ सः सुग्रीवं (पू.). ॥ वानरप्रभुः [दूतैः] (मू.) समानाय्य[1], ॥ ११ ॥ [तान्] वानरान् सीतायाः परिमार्गणे[2] परितः प्रेषयामास. (मू.) अहं ॥ १२ ॥ (मू.) उल्लङ्घ्य लङ्कां नगरीं [दृष्ट्वा तत्र] शुभां जानकीं विचिन्वन्[3] ॥ १३ ॥ (१४ पू.) [दृष्ट्वा तत्र] शिंशपातरुं विचिन्वन् ॥

१ आणवून. २ शोधास. ३ शोधणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

येथें एक शिंशपावृक्ष व त्याच्या खालीं दुःखांत बुडून गेल्यामुळें शोक करीत असलेली रामाची पट्टराणी देवी जानकी माझ्या दृष्टीस पडली! मी ज्यासाठीं आलों तो कार्यभाग साधला!!' महाबुद्धिमान् (समय-सूचक) मारुति इतकें बोलून स्वस्थ राहिला. ॥ १४ ॥१९ ॥ तो सर्व वृत्तांत अनुक्रमानें ऐकूं आला, तेव्हां सीतेला आश्चर्य वाटलें. तत्काळ तिच्या मुखांतून पुढील उद्गार निघाले:- 'हें काय बरें माझ्या कानीं येत आहे! हे शब्द आकाशांत वायूनें उच्चारिले (वायूमध्यें उठले) असावे काय! ॥१६॥ मी काय स्वप्नांत आहें? किंवा माझ्या मनाला भ्रम झाला? अथवा हें सगळें खरेंच आहे? छिः, झोंप (स्वप्न) तर नव्हेच; कारण, दुःखामुळें ती मला मुळींच येत नाहीं. बरें भ्रम पडला, असें तरी कसें ह्मणावें? कारण, मला हे भोंव-

अद्राक्षं जानकीमत्र शोचन्तीं दुःखसंप्लुताम् ॥१४॥ रामस्य महिषीं देवीं कृतकृ-त्यो ऽहमागतः ॥ इत्युक्त्वोपरराामाथ मारुतिर्बुद्धिमत्तरः ॥ १५ ॥ सीता क्रमेण तत्सर्वं श्रुत्वा विस्मयमाययौ ॥ किमिदं मे श्रुतं व्योम्नि वायुना समुदीरितम् ॥ १६ ॥ स्वप्नो वा मे मनोभ्रान्तिर्यदि वा सत्यमेव तत् ॥ निद्रा मे नास्ति दुःखेन जानाम्येतत्कुतो भ्रमः ॥ १७ ॥

(१४ उ. १९ पू.) अद्राक्षं. आगतः अहं कृतकृत्यः [संवृत्तः]!' अथ बुद्धिमत्तरः मारुतिः (मू.). ॥ १४ ॥ १९ ॥ (पू.) – ॥ 'इदं मे किं श्रुतं! व्योम्नि वायुना समुदीरितं? ॥ १६ ॥ (पू.) सत्यं एव! ॥ दुःखेन मे (मू.) जानामि; भ्रमः कुतः!' ॥ १७ ॥

१ दुःखांत बुडालेल्या. २ पट्टराणीला. ३ महाबुद्धिमान्. ४ थांबला. ५ आकाशांत. ६ उच्चारिलेलें. ७ मनाचा भ्रम.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारुति सीतेपुढें आला.

तालचे सर्व पदार्थ नीट ओळखितां येत आहेत ! - हे शब्द कोणी तरी उच्चारिले खरोखर; अगदीं संशय नाहीं. - ॥ १७ ॥ माझ्या कानांला अमृतासारखें लागणारें हें वचन ज्या कोणी उच्चारिलें असेल, त्या प्रिय भाषण करणाऱ्या महाभाग्यवान् प्राण्यानें मजपुढें प्रगट व्हावें (मला दर्शन द्यावें). ' ॥ १८ ॥ तें जानकीचें भाषण ऐकिल्याबरोबर मारुति पर्णगुच्छांतून हळूहळू खालीं उतरला व सीतेच्या अग्रभागीं उभा राहिला. ॥ १९ ॥ ज्याचें शरीर चिमणीएवढें, तोंड लाल व अंगकांति पिंवळी, असा एक वानर हळूच सीतेला नमस्कार घालून तिच्यापुढें हात जोडून उभा ठाकला ! ॥ २० ॥ त्याला पाहून सीता भिऊन गेली. - तिला वाटलें कीं, - हा रावण मला फसविण्यासाठीं कपटानें वानररूप घेऊन येथें आला आहे ! ॥ २१ ॥

येन मे कर्ण[1]पीयूषं वचनं समुदीरितम् ॥ स दृश्यतां महाभागः प्रिय[2]वादी ममाग्रतः ॥ १८ ॥ श्रुत्वा तज्जानकीवाक्यं हनुमान्पत्रखण्डतः ॥ अवतीर्य शनैः सीतापुरतः समवस्थितः ॥ १९ ॥ कलविंक[5]प्रमाणांगो रक्ता[6]स्यः पीत[7]वानरः ॥ [8]ननाम शनकैः सीतां प्राञ्जलिः पुरतः स्थितः ॥ २० ॥ दृष्ट्वा तं जानकी भीता रावणोऽयमुपागतः ॥ मां मोहयितुमायातो मायया वानराकृतिः ॥ २१ ॥

(मू.)[3]दृश्यतां.' ॥ १८ ॥ हनुमान (पू.) श्रुत्वा, [4]पत्रखण्डतः शनैः (मू.). ॥ १९ ॥ (पू.) ॥ शनकैः सीतां (मू.). ॥२०॥ तं (पू.) ! ॥ मायया वानराकृतिः [सन] (मू.). ' ॥ २ ॥

१ कानांला अमृतासारखें वाटणारें. २ गोड बोलणारा. ३ दिसो. ४ पानांच्या समूहांतून. ५ चिमणीएवढें शरीर ज्याचें, असा. ६ तांबडें तोंड ज्याचें, असा. ७ पिंवळा वानर. ८ नमस्कार करिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असें मनांत आल्यामुळें ती खालीं तोंड घालून मुकाट्यानें बसली. तेव्हां मारुति पुन्हां सीतेला ह्मणाला :– ‘देवी ! तुझ्या मनांत जी शंका आली आहे, ॥ २२ ॥ तशा प्रकारचा मी नाहीं. माते ! मजविषयींची शंका सोड. मी, कोसलदेशांचा अधिपति जो परमात्मा रामचंद्र, त्याचा दास आहें. ॥ २३ ॥ हे कल्याणकारिणि ! मी, वानरांचा राजा जो सुग्रीव, त्याचा मंत्री आहें. सुंदरि ! मी, सकल प्राण्यांचा प्राण जो वायु, त्याचा पुत्र आहें.’ ॥ २४ ॥ मारुति हात जोडून पुढें उभाच होता. त्याचें तें भाषण ऐकिल्यावर जानकी ह्मणाली :– ‘वानरांची आणि मनुष्यांची मैत्री घडेल कशी ? ॥ २५ ॥

इत्येवं चिन्तयित्वा सा तूष्णीमासीदधोमुखी ॥ पुनरप्याह तां सीतां देवि यत्त्वं विशंकसे[1] ॥ २२ ॥ नाहं तथाविधो[2] मातस्त्यज शंकां मयि स्थिताम् ॥ दासोऽहं कोसलेन्द्रस्य रामस्य परमात्मनः ॥ २३ ॥ सचिवोऽहं हरीन्द्रस्य सुग्रीवस्य शुभप्रदे ॥ वायोः पुत्रोऽहमखिलप्राणभूतस्य[3] शोभने ॥ २४ ॥ तच्छ्रुत्वा जानकी प्राह हनूमन्तं कृताञ्जलिम् ॥ वानराणां मनुष्याणां संगतिर्घटते[4] कथम् ॥ २५ ॥

सीता (पू.) [सती] तूष्णीं आसीत्. ॥ [मारुतिः] तां सीतां (मू.), ॥२२॥ ‘मातः, अहं तथाविधः (मू.) शङ्कां त्यज. ॥ (मू.) रामस्य दासः. ॥२३ ॥ शुभप्रदे, (पू.) सचिवः. ॥ शोभने, (मू.) वायोः पुत्रः. ॥ २४ ॥ जानकी (पू.) हनूमन्तं प्राह –॥ ‘(मू.) च सङ्गतिः कथं घटते; ॥ २५ ॥

१ शंका घेत्येस. २ तशा प्रकारचा. ३ सर्वांचा प्राणरूप. ४ घडते.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'मी त्यांची मै-
त्री जमविली.'

तूं तर ह्मणतोस, कीं मी रामचंद्राचा दास आहें. - पण हें संभवतें कसें ? - ' हा प्रश्न ऐकिल्यावर, पुढें उभा असलेल्या मारुतीला संतोष वाटला. त्यानें जानकीला ह्मटलें :– ॥ २६ ॥ " देवी ! शबरीच्या सांगी-वरून महाबुद्धिमान् रामचंद्र ऋष्यमूकपर्वताकडे आला. ऋष्यमूकपर्वतावर सुग्रीव बसला होता; रामलक्ष्मण त्याच्या दृष्टीस पडले, ॥ २७ ॥ तेव्हां तो भ्याला; व त्यानें, रामाच्या मनांत काय आहे, तें समजून घेण्यासाठीं मला पाठविलें. मी ब्रह्मचाऱ्यासारखें शरीर धारण करून रामाजवळ गेलों. ॥ २८ ॥ रामाचें अंतःकरण निष्कपट आहे असें कळलें, तेव्हां मी त्या दोघां बंधूंना खांद्यांवर घेऊन सुग्रीवाजवळ नेलें, व तेथें त्यांची सुग्रीवाशीं मैत्री करविली. ॥ २९ ॥

यथा त्वं रामचन्द्रस्य दासो ऽहमिति भाषसे ॥ तामाह मारुतिः प्रीतो जानकीं पुरतः स्थितः ॥२६॥ ऋष्यमूकमगाद्रामः शबर्या नोदितः सुधीः ॥ सुग्रीवो ऋष्यमूकस्थो दृष्टवान् रामलक्ष्मणौ ॥ २७ ॥ भीतो मां प्रेषयामास ज्ञातुं रामस्य त्वद्गतम् ॥ ब्रह्मचारिवपुर्धृत्वा गतो ऽहं रामसन्निधिम् ॥ २८ ॥ ज्ञात्वा रामस्य सद्भावं स्कन्धोपरि निधाय तौ ॥ नीत्वा सुग्रीवसामीप्यं सख्यं चाकरवं तयोः ॥ २९ ॥

(पू.) ? ' ॥ पुरतः स्थितः मारुतिः (मू.) आह – ॥ २६ ॥ " (पू.) रामः ऋष्यमूकं ॥ अगात्. ऋष्यमूकस्थः (मू.) दृष्टवान्. ॥ २७ ॥ सः भीतः [सन्] (पू.) ज्ञातुं प्रेषयामास. ॥ अहं (मू.) गतः. ॥ २८ ॥ रामस्य सद्भावं ज्ञात्वा, तौ (मू.) नीत्वा च तयोः सख्यं अकरवं. ॥२९॥ ॥ २० ॥

१ प्रेरिलेला. २ शुद्ध अभिप्रायाला. ३ करिता झालों.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सुग्रीवाची बायको वालीनें हरून घेतली होती. रघुवीरानें एकच बाण मारून वालीचा वध केला आणि सुग्रीवाला वानरांच्या राज्याचा अभिषेक करविला. सुग्रीवानें तुझ्या शोधासाठीं दाहाही दिशांकडे मोठमोठे पराक्रमी वानर वीर पाठविले. ॥ ३० ॥ ३१ ॥ मी जायाला निघालों असें पाहून रामचंद्र मला आदरपूर्वक ह्मणालाः — ॥ ३२ ॥ ‘ वायुपुत्रा ! माझ्या कार्याची भिस्त कायती सर्वथा तुजवर आहे. मी आणि लक्ष्मण दोघेही खुशाल आहों, इत्यादि सर्व वृत्तांत सीतेला सांग. ॥३३॥ खुणेसाठीं ही माझी उत्तम मुद्रिका - मी

सुग्रीवस्य हृता भार्या वालिना तं रघूत्तमः ॥ जघानैकेन बाणेन ततो राज्येऽभ्यषेचयत् ॥३०॥ सुग्रीवं वानराणां स प्रेषयामास वानरान् ॥ दिग्भ्यो महाबलान्वीरान् भवत्याः परिमार्गणे ॥ ३१ ॥ गच्छन्तं राघवो दृष्ट्वा मामभाषत सादरम् ॥ ३२ ॥ त्वयि कार्यमशेषं मे स्थितं मारुतनन्दन ॥ ब्रूहि मे कुशलं सर्वं सीतायै लक्ष्मणस्य च ॥ ३३ ॥ अंगुलीयकमेतन्मे परिज्ञानार्थमुत्तमम् ॥ सीतायै दीयतां साधु मन्नामाक्षरमुद्रितम् ॥ ३४ ॥

वालिना (३० पू.) हृता. रघूत्तमः तं ॥ एकेन बाणेन (३० मू.). वानराणां राज्ये सुग्रीवं अभ्यषेचयत्. सः (मू.) महाबलान् वीरान् वानरान् दिग्भ्यः प्रेषयामास. ॥ ३० ॥ ३१ ॥ राघवः (पू.) दृष्ट्वा सादरं अभाषत — ॥ ३२ ॥ ‘ मारुतनन्दन, मे अशेषं कार्यं (मू.) सर्वं कुशलं सीतायै ब्रूहि. ॥ ३३ ॥ (मू.) एतत् मे अङ्गुलीयकं सीतायै परिज्ञानार्थं दीयतां. ’ ॥ ३४ ॥

१ मारिता झाला. २ तुझ्या. ३ दिशांना ४ वायूच्या पुत्रा. ५ खूण पटण्यासाठीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'ही खुणेची अं- गठी पहा.'

तुजजवळ देतों. - हिच्यावर माझ्या नांवाचीं अक्षरें सुंदर कोरिलेलीं आहेत. ही सीतेला दे.' ॥ ३४ ॥ असें सांगून रामानें आपल्या कराग्रांतून मुद्रिका काढिली आणि माझ्या स्वाधीन केली. देवि ! ती ही मुद्रिका पहा, मी फार जपून आणिली आहे ! " ॥ ३५ ॥ इतकें सांगून वायुपुत्रानें ती मुद्रिका सीतादेवीला दिली; व तो वानर स्वतां दोन्ही हात जोडून नमस्कार करून दूर उभा राहिला. ॥ ३६ ॥ ती रामनामांकित मुद्रिका दृष्टीस पडतांच सीतेला परम आनंद झाला. तिनें ती मुद्रिका मस्तकीं धरिली. ह्या वेळीं तिच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले. ॥ ३७ ॥ - ती ह्मणाली :-' मारुते ! तूं माझा प्राणदाता, मोठा चतुर, व रामाचा खरा

इत्युक्त्वा प्रददौ मह्यं कराग्रादंगुलीयकम् ॥प्रयत्नेन मया ऽऽनीतं देवि पश्यांगुलीयकम् ॥ ३५ ॥ इत्युक्त्वा प्रददौ देव्यै मुद्रिकां मारुतात्मजः ॥ नमस्कृत्वा स्थितो दूराद्बद्धाञ्जलिपुटो[1] हरिः ॥ ३६ ॥ दृष्ट्वा सीता प्रमुदिता[2] रामनामांकितां तदा ॥ मुद्रिकां शिरसा धृत्वा स्रवदानन्दनेत्रजा[3] ॥ ३७ ॥ कपे मे प्राणदाता त्वं बुद्धिमानसि राघवे ॥ भक्तो ऽसि प्रियकारी त्वं विश्वासो ऽस्ति तवैव हि ॥ ३८ ॥

रामः (पू.) मह्यं प्रददौ.। देवि, मया (मू.) पश्य. " ॥ ३५ ॥ मारुतात्मजः हरिः (पू.) नमस्कृत्वा मुद्रिकां प्रददौ, (मू.) [सन] दूरात् स्थितः. ॥ ३६ ॥ तदा (पू.) मुद्रिकां दृष्ट्वा प्रमुदिता, [तां] (मू.) [सती उवाच –] ॥ ३७ ॥ कपे, बुद्धिमान् त्वं (मू.) त्वं [तस्य च] प्रियकारी [असि]; तव एव विश्वासः अस्ति [इति मन्ये]. ॥ ३८ ॥

१ जोडिली ओंजळ ज्यानें, असा. २ आनंदित. ३ गळतात आनंदाश्रु जिचे, अशी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भक्त आणि प्रियकर्ता आहेस. तुझ्यावरच रामाचा पूर्ण विश्वास आहे, - अशी माझी खात्री झाली. - ॥३८॥ तसें नसेल तर तो भलत्याच पुरुषाला मजकडे पाठवील कसा? हनुमंता! माझी कसकशी छळणूक चालते इत्यादि सर्व प्रकार तूं प्रत्यक्ष पाहिलाच आहेस. ॥ ३९ ॥ हा सगळा वृत्तांत रामाला अशा रीतीनें सांग कीं, ऐकल्याबरोबर त्याला माझी दया यावी. बा साधुशिरोमणे! माझे प्राण आतां केवळ दोन महिने राहणार आहेत. तितक्या अवकाशांत ॥ ४० ॥ राम आला नाहीं, तर तो दुष्ट मला खाऊन टाकणार! ह्मणून, अगदीं वेळ न घालवितां, वानरांचा राजा जो सुग्रीव, त्याला बरोबर घेऊन ॥ ४१ ॥ दुसऱ्याही वानरसेनापतींसह प्रभु रामचंद्र जर - इकडे येईल, आणि - पुत्र, सैन्य, सगळ्यांसुद्धां रावणाचा युद्धांत

नो चेन्मत्सन्निधिं चान्यं पुरुषं प्रेषयेत्कथम् ॥ हनुमन्दृष्टमखिलं मम दुःखादिकं त्वया ॥ ३९ ॥ सर्वं कथय रामाय यथा मे जायते दया ॥ मासद्वयावधि प्राणाः स्थास्यन्ति मम सत्तम ॥ ४० ॥ नागमिष्यति चेद्रामो भक्षयिष्यति मां खलः ॥ अतः शीघ्रं कपीन्द्रेण सुग्रीवेण समन्वितः ॥ ४१ ॥ वानरानीकपैः सार्धं हत्वा रावणमाहवे ॥ सपुत्रं सबलं रामो यदि मां मोचयेत्प्रभुः ॥ ४२ ॥

(पू.) मत्सन्निधिं कथं प्रेषयेत् ? ॥ हनुमन्, त्वया (मू.) दृष्टं. ॥३९॥ (पू.) जायते, [तथा] सर्वं रामाय कथय. ॥ सत्तम, मम प्राणाः (मू.). ॥४०॥ रामः (पू.), [तर्हि] खलः मां भक्षयिष्यति. ॥ (मू.) ॥ ४१ ॥ (पू.) प्रभुः रामः आहवे सपुत्रं सबलं रावणं हत्वा (मू.). ॥ ४२ ॥

१ पाठवील. २ राहतील. ३ वानरसेनेच्या नायकांशीं. ४ युद्धांत. ५ सोडवील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वध करून जर मला सोडवील, ॥ ४२ ॥ तरच ब्राह्मणांनीं - अनेक ग्रंथांत - जें त्याच्या (रामाच्या) प्रभावाचें वर्णन केलें आहे, तें योग्य होईल. - असें झालें नाहीं, तर कांहीं उपयोग नाहीं. - वीरा ! तूं तरी - त्याला स्फुरण येईल, अशाच प्रकारें येथील वृत्तांताचें - वर्णन कर. ज्या युक्तीनें रामचंद्र रावणाचा वध करून लवकर मला सोडवील, ॥ ४३ ॥ असे उपाय योज. हनुमंता, वाणीचा असा उपयोग केलास, तर तुला मोठा धर्म घडेल.' मारुतीनेंही तिला सांगितलें :– 'देवि ! रामाला मी भेटलों, कीं तो जसा असेल तसा लागलाच लक्ष्मणाला आणि सैन्यासह सुग्रीवाला बरोबर घेऊन इकडे येईल. त्याचीं आयुधें नित्य सिद्ध असतातच. पुढें तो पराक्रमानें रावणाचा वध करून ॥ ४४ ॥ ४५ ॥ तुला अयोध्येस घेऊन जाईल. जानकी ! ह्याबद्दल अगदीं संशय नलगे.' जानकीनें त्याला विचारिलें :– ' - हनुमंता ! तूं म्हणतोस खरें;

तत्तस्य सदृशं वीर्यं वीर वर्णय वर्णितम् ॥ यथा मां तारयेद्रामो हत्वा शीघ्रं दशाननम् ॥ ४३ ॥ तथा यतस्व हनुमन्वाचा धर्ममवाप्नुहि ॥ हनुमानपि तामाह देवि दृष्टो यथा मया ॥ ४४ ॥ रामः सलक्ष्मणः शीघ्रमागमिष्यति सायुधः ॥ सुग्रीवेण ससैन्येन हत्वा दशमुखं बलात् ॥ ४५ ॥ समानेष्यति देवि त्वामयोध्यां नात्र संशयः ॥

तत् वीर, [ब्राह्मणैः] वर्णितं तस्य वीर्यं सदृशं वर्णय. ॥ (मू.) हत्वा यथा मां तारयेत्, ॥४३॥ हनुमन्, (मू.) – देवि, मया यथा दृष्टः, ॥ ४४ ॥ तथा (पू.) रामः ससैन्येन सुग्रीवेण [सह] शीघ्रं आगमिष्यति, बलात् दशमुखं हत्वा, ॥ ४५ ॥ (४६ पू.) समानेष्यति; अत्र संशयः न. ॥

१ तारील. २ यत्न कर. ३ पाव.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पण - राम ह्या विस्तीर्ण समुद्राला तरून येईल कसा ? त्याचें शरीर - कांहीं पांखरासारखें एवढेंसें नाहीं, तर - विशाल आहे (वास्तविक अर्थ :– त्याच्या स्वरूपाला परिमाण ह्म० इयत्ता नाहीं; तो सर्वव्यापी परमात्मा होय). शिवाय, त्याच्या बरोबर वानरांचीं सैन्यें आणि अनेक सेनापति यावयाचे ! हें होणार कसें ? ' मारुतीनें सांगितलें :– ' ते दोघे श्रेष्ठ पुरुष माझ्या खांद्यांवर बसून ॥ ४६ ॥ ४७ ॥ येतील. वानरांचा अधिपति सुग्रीवही सैन्यासहवर्तमान आकाशमार्गानें क्षणमात्रांतच ह्या विस्तीर्ण समुद्राला तरून येईल व तुजकरितां राक्षससमूहाला जाळून टाकील. ह्यांत संदेह नाहीं. ॥ ४८ ॥ देवि! मला अनुज्ञा दे;

तमाह जानकी रामः कथं वारिधिमाततम्॥ ४६॥तीर्त्वा ऽऽयास्यत्यमेयात्मा वानरा-
नीकपैः सह॥हनुमानाह मे स्कन्धावारुह्य पुरुषर्षभौ॥४७॥ आयास्यतः ससैन्य-
श्च सुग्रीवो वानरेश्वरः॥ विहायसा क्षणेनैव तीर्त्वा वारिधिमाततम् ॥ निर्द[९]हिष्यति
रक्षौघांस्त्वत्कृते नात्र संशयः॥४८॥ [१०]अनुज्ञां देहि मे देवि गच्छामि त्वरया ऽन्वितः॥

जानकी तं आह – ' अमे[१]यात्मा रामः (४७पू.) [२]आयतं वारिधिं ती[३]र्त्वा कथं [४]आयास्यति ? ' ॥ हनुमान् आह – [५]पुरुषर्षभौ (मू.), ॥ ४६ ॥ ४७ ॥ (पू.) सुग्रीवः च ॥ (द्वि.) वारिधिं तीर्त्वा [आयास्यति,] ॥ [७]त्वत्कृते [८]रक्षौघान् (मू.). ॥ ४८ ॥ देवि, मे (पू.). [अहं] त्वरया अन्वितः [सन्] भ्रात्रा सह रामं द्रष्टुं गच्छामि.

---

१ परिमाण नाहीं स्वरूपावें ज्याच्या, असा. २ विस्तीर्ण, अशा. ३ तरून. ४ येईल. ५ पुरुषांतील श्रेष्ठ असे. ६ आकाशमार्गानें. ७ तुझ्याकरितां. ८ राक्षसांच्या समूहांना. ९ जाळील. १० अनुमोदनाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सीता खुणेसाठीं चूडामणि देत्ये.

ह्मणजे मी रामदर्शनासाठीं सत्वर निघून जातों; तेथें गेलों कीं, बंधूसह रामचंद्राला तुजकडे येण्याची त्वरा करीन. ॥ ४९ ॥ पण, देवि! मजजवळ अशी कांहीं तरी खूण दे, कीं जिच्या योगानें रामाला माझा विश्वास येईल. मग मी, तूं दिलेली खूण नीट संभाळून मोठ्या उल्हासानें रामाकडे जाईन.' ॥९०॥ नंतर त्या कमलनयनेनें–सीतेनें– - त्याचें भाषण कितपत खरें आहे, ह्याचा - थोडासा विचार करून लागलाच आपल्या वेणींत असलेला चूडामणि सोडून मारुतीला दिला आणि सांगितलें :– ॥ ९१ ॥ "वानरश्रेष्ठा! हा दाखविलास कीं रामलक्ष्मणांना विश्वास पटेल. आपलें काम चांगलें करण्याचा तुझा निश्चय दिसतो. बा! खुणेसाठीं दुसरी एक गोष्ट मी तुला सांगून ठेवत्यें :– ॥ ९२ ॥ पूर्वीं चित्रकूट पर्वतावर असतांना एके प्रसंगीं

द्रष्टुं रामं सह भ्रात्रा त्वरयामि तवान्तिकम् ॥ ४९ ॥ देवि किंचिदभिज्ञानं देहि मे येन राघवः ॥ विश्वसेन्मां[1] प्रयत्नेन ततो गन्ता[3] समुत्सुकः ॥५०॥ ततः किंचिद्विचार्याथ सीता कमललोचना ॥ विमुच्य केशपाशान्ते[4] स्थितं चूडामणिं[5] ददौ ॥ ५१ ॥ अनेन विश्वसेद्रामस्त्वां कपीन्द्र सलक्ष्मणः ॥ अभिज्ञानार्थमन्यच्च[2] वदामि तव सुव्रत ॥ ५२ ॥ चित्रकूटगिरौ पूर्वमेकदा रहसि स्थितः ॥

[गत्वा च] (मू.) [आगन्तुं] त्वरयामि. ॥ ४९ ॥ (पू.) देहि; येन राघवः मां विश्वसेत्. ततः समुत्सुकः [अहं] (मू.).' ॥५०॥ ततः कमललोचना सीता (मू.), विमुच्य ददौ, [उवाच च –] ॥ ५१ ॥ "(पू.) रामः अनेन त्वां विश्वसेत्. ॥ सुव्रत, तव (मू.) – ॥५२॥ पूर्वं एकदा (पू.) ॥

१ विश्वास ठेवील. २ खूण. ३ जाईन. ४ बुचड्यांत. ५ मस्तकावरील रत्नाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एकांतांत राम माझ्या मांडीवर मस्तक ठेवून निजला होता; ॥ ५३ ॥ इतक्यांत इंद्राचा पुत्र कावळ्याच्या रूपानें तेथें आला. त्यानें मांसाच्या आशेनें, लालसा दिसत असलेला माझ्या पायांचा आंगठा वारंवार नखांचे आणि चोंचीचे प्रहार करून फोडिला ! ॥ ५४ ॥ पुढें राम जागा झाला आणि पाहतो तों माझ्या पायांला क्षत पडलें आहे ! ‘ प्रिये ! मला न आवडणारी ही गोष्ट कोणत्या दुष्टानें केली ? ’ ॥ ५५ ॥ असें ह्मणून त्यानें अग्रभागीं दृष्टि फेंकिली; तों, तो कावळा वरचेवर माझ्या पायांवर उडी घालीत आहे, त्याचें तोंड, नखें आणि चोंच रक्तानें भरलीं आहेत, असें त्याला दिसून आलें. त्यानें संतापून ॥ ५६ ॥

मदंके शिर आधाय निद्राति[1] रघुनन्दनः ॥ ५३ ॥ ऐन्द्रकाकस्तदाऽऽगत्य नखै-
स्तुण्डेन[3] चासकृत् ॥ मत्पादांगुष्ठ[4]मारक्तं विददार[6]ामिषाशया ॥ ५४॥ ततो रामः
प्रबुद्ध्याथ[7] दृष्ट्वा पादं कृतव्रणम्[8] ॥ केन भद्रे कृतं चैतद्विप्रियं[9] मे दुरात्मना ॥५५॥
इत्युक्त्वा पुरतोऽपश्यद्वायसं मां पुनः पुनः ॥ अभिद्रवन्तं[10] रक्तास्य[11]नखतुण्डं
चुकोप ह ॥ ५६ ॥

रघुनन्दनः (मू.) [स्म]. ॥ ५३ ॥ तदा ऐन्द्रकाकः आगत्य, आमिषाशया[2] (पू.) ॥ आरक्तं[5] (मू.). ॥ ५४ ॥ (पू.) दृष्ट्वा, ॥ ‘भद्रे, एतत् मे विप्रियं (मू.) कृतं ? ’ ॥ ५५ ॥ (मू.) वायसं अपश्यत्, चुकोप[12] ह. ॥ ५६ ॥

---

१ झोंप घेतो. २ मांसाच्या आशेनें. ३ चोंचानें. ४ तांबूस. ५ माझ्या पायाच्या आंगठ्याला. ६ फाडिता झाला. ७ जागा होऊन. ८ केला व्रण, ज्याला अशा. ९ दुःखद कृत्य. १० आंगावर धांवून येणाऱ्या. ११ तांबडीं तोंड, नखें व चोंच ज्याचीं अशा. १२ रागावला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एक गवताची काडी घेतली, तिच्यावर दिव्य अस्त्राचा प्रयोग केला आणि सहज ती त्या कावळ्यावर फेंकिली. ती अग्नीसारखी धगधगलेली काडी ॥ ५७ ॥ कावळ्याच्या आंगावर गेली. कावळा भ्याला व त्रैलोक्यांत भटकत फिरला. इंद्र, ब्रह्मदेव इत्यादिकांच्याही हातून रक्षण होण्याची आशा राहिली नाहीं, तेव्हां तो पुन्हां ॥ ५८ ॥ दयासागर रामचंद्राच्या पुढें येऊन भीत भीत पायां पडला. तो शरण आला असें पाहून रामानें त्याला सांगितलें :– ॥ ५९ ॥ 'बाबा! हें माझें अस्त्र तर अमोघ आहे (कधीं फुकट

तृणमेकमुपादाय[1] दिव्यास्त्रेणाभियोज्य[2] तत् ॥ चिक्षेप लीलया रामो वायसोपरि तज्ज्वलत् ॥५७॥ अभ्यद्रवद्[5]वहायसश्च भीतो लोकान् भ्रमन्पुनः ॥ इन्द्रब्रह्मादिभिश्चापि न शक्यो रक्षितुं तदा ॥ ५८ ॥ रामस्य पादयोरग्रे ऽपतद्भीत्या दयानिधेः ॥ शरणागतमालोक्य रामस्तमिदमब्रवीत् ॥ ५९ ॥ अमोघमेतदस्त्रं मे दत्त्वैकाक्षमितो व्रज[8] ॥ सव्यं दत्वा ततः काक एवं पौरुषवाननपि[10] ॥ ६० ॥

रामः लीलया एकं (पू.) [च] ज्वलत्[3] तत् (मू.) चिक्षेप[4]. ॥५७॥ [तत् वायसं] (पू.) भ्रमन् ॥ (मू.) [यदा] रक्षितुं शक्यः न [अभवत्], तदा ॥ ५८ ॥ भीत्या दयानिधेः (पू.). ॥ रामः तं (मू.) – ॥ ५९ ॥ 'एतत् मे अस्त्रं अमोघं[6]. [त्वं] एकाक्षं[7] (पू.).' ॥ काकः सव्यं[9] दत्वा ततः [गतः]. (मू.) ॥ ६० ॥

१ घेऊन. २ जोडून. ३ पेटलेल्या. ४ फेंकिता झाला. ५ आंगावर धांवून गेलें. ६ व्यर्थ न जाणारें. ७ एका डोळ्याला. ८ जा ९ डाव्या. १० पराक्रमी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जायाचें नाहीं). तूं ह्याला निमूटपणें आपला एक डोळा दे आणि जा कसा.' तेव्हां कावळाही त्या अस्त्राला आपला डावा डोळा देऊन निघून गेला. हनुमंता ! रामाचा प्रभाव तर इतका विलक्षण आहे. ॥ ६० ॥ असें असूनही सांप्रत तो राघव माझी उपेक्षा करीत आहे, ती काय ह्मणून ? " हनुमंतानेंही सीतेचें भाषण ऐकून घेतल्यावर तिला सांगितलें:– ॥६१॥ 'देवि ! तूं येथें आहेस , हें रघुवीराला कळलें पुरे; कीं तो क्षणमात्रांत, राक्षसांनीं भरगच्च भरलेल्या लंकेचें भस्म करून टाकील ! ' ॥ ६२ ॥ जानकी ह्मणाली :– ' बाळा (हनुमंता) ! तूं राक्षसांबरोबर युद्ध करणार कसा ? तुझें शरीर तर अगदीं एवढेंसें दिसत आहे ! - आणि मला वाटतें - सगळे वानर तुझ्यासारखेच (लहान लहान) असतील ! ' ॥ ६३ ॥ हें भाषण ऐकतांच मारुतीनें

उपेक्षते[1] किमर्थं मामिदानीं सो ऽपि राघवः ॥ हनूमानपि तामाह श्रुत्वा सीतानुभाषितम् ॥ ६१ ॥ देवि त्वां यदि जानाति स्थितामत्र रघूत्तमः ॥ करिष्यति क्षणाद्भस्म लंकां राक्षसमण्डिताम्[2] ॥६२॥ जानकी प्राह तं वत्स[3] कथं त्वं योत्स्यसे[6] ऽसुरैः[5] ॥ अतिसूक्ष्मवपुः[4] सर्वे वानराश्च भवादृशाः[7] ॥ ६३ ॥ श्रुत्वा तद्वचनं देव्यै पूर्वरूपमदर्शयत् ॥

सः अपि राघवः मां इदानीं किमर्थं उपेक्षते ? (मू.)" श्रुत्वा तां आह – ॥६१॥ 'देवि, रघूत्तमः यदि त्वां अत्र स्थितां जानाति, [तर्हि] (मू.) लङ्कां क्षणात् भस्म करिष्यति. ' ॥ ६२ ॥ जानकी तं प्राह – ' वत्स, अतिसूक्ष्मवपुः त्वं असुरैः [सह] (मू.) सर्वे वानराः च [कथं योत्स्यते] ? ' ॥ ६३ ॥ [मारुतिः] तद्वचनं (बा. पू.)

१उपेक्षा करितो. २राक्षसांनीं भूषविलेल्या. ३बाळा. ४अति लहान शरीर ज्याचें, असा. ५राक्षसांशीं. ६युद्ध करशील. ७ तुझ्यासारखे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'भूक लागली. मी हीं फळें खातों.'

सीतेला आपलें मूळचें रूप दाखविलें; तें मेरु—मंदरपर्वतांसारखें असून राक्षसांच्या समूहाला भय वाटण्याजोगें होतें. ॥ ६४ ॥ हनुमान प्रचंड पर्वताएवढा झाला, असें पाहून सीतेला पराकाष्ठेचा आनंद वाटला. ती त्या श्रेष्ठ वानराला ह्मणाली: — ॥ ६५ ॥ 'बा! बुद्धिसामर्थ्याप्रमाणें तुझें शरीर बलही विलक्षण आहे. तूं हातीं घेतलेलें कार्य पार पाडशील, - अशी माझी खात्री झाली. - आतां येथून लवकर रामाकडे निघून जा! नाहीं तर राक्षसींच्या दृष्टीस पडशील, - त्या रावणाला सांगतील आणि येथें कांहीं भलताच अनर्थ ओढवेल! - जा; मार्गांत तुला कोणत्याहीप्रकारचें संकट न येवो.' ॥ ६६ ॥ वानराला फार क्षुधा लागली होती; ह्मणून तो सीतेला ह्मणाला :—'देवि! तुझें दर्शन झालें; आतां मला पारणा करण्यास मोक-

मेरुमन्दरसंकाशं रक्षोगणविभीषणम् ॥६४॥ दृष्ट्वा सीता हनूमन्तं महापर्वतसन्निभम् ॥ हर्षेण महता ऽऽविष्टा प्राह तं कपिकुञ्जरम् ॥६५॥ समर्थो ऽसि महासत्व द्रक्ष्यन्ति त्वां महाबलम् ॥ राक्षस्यस्ते शुभः पन्था गच्छ रामान्तिकं द्रुतम् ॥ ६६ ॥ बुभुक्षितः कपिः प्राह दर्शनात्पारणं मम ॥ भविष्यति फलैः सर्वैस्तव दृष्टौ स्थितैर्हि मे ॥ ६७ ॥

(मू.) पूर्वरूपं अदर्शयत्. ॥ ६४ ॥ (पू.) दृष्ट्वा,॥ महता हर्षेण आविष्टा [सती] (मू.) प्राह —, ॥ ६५ ॥ 'महासत्व, [त्वं] समर्थः असि. राक्षस्यः महाबलं त्वां द्रक्ष्यन्ति! (मू.) गच्छ.' ॥ ६६ ॥ (पू.) — [तव] दर्शनात् मम पारणं [उचितं]. हि (मू.) सर्वैः फलैः मे [पारणा] भविष्यति.' ॥ ६७ ॥

१ मेरु व मंदर ह्या पर्वतांसारखें. २ राक्षसांच्या समुदायाला भय वाटेल, असें. ३ व्याप्त. ४ वानरश्रेष्ठाला. ५ पाहतील. ६ मार्ग.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ठीक मिळाली. तुझ्या दृष्टीसमोर जीं हीं फळें आहेत, एवढीं सगळीं खाल्लीं कीं माझी क्षुधा भागेल.' ॥६७॥ जानकीनें 'बरें आहे' असें ह्मटलें. तेव्हां मारुतीनें फळें भक्षण केलीं. नंतर जानकीचा निरोप घेऊन तिला वंदन करून तो जावयास निघाला. कांहींसा लांब गेला, इतक्यांत त्याच्या मनामध्यें एक विचार उद्भवला :– ॥ ६८ ॥ 'कामासाठीं एखादा दूत आला, आणि त्यानें स्वामीच्या कार्यांत बिघाड न होईल अशा प्रकारचें दुसरें कांहीं चांगलेंसें काम केल्यावांचून (नुसतें जेवढ्याच्या तेवढें काम करून) परत घरची वाट धरिली, तर तो अधमच होय! ॥ ६९ ॥ ह्मणून आपण, - आपल्या पराक्रमाला शोभेल, असें - कांहीं तरी दुसरें काम करावें, रावणाची भेट घेऊन त्याच्याशीं चार शब्द बोलावे, आणि नंतर रामदर्शनासाठीं निघून जावें.' ॥ ७० ॥

तथेत्युक्तः स जानक्या भक्षयित्वा फलं कपिः॥ ततः प्रस्थापितो ऽगच्छज्जानकीं प्रणिपत्य सः॥ किंचिद्दूरमथो गत्वा स्वात्मन्येवानुचिन्तयत् ॥ ६८॥ कार्यार्थमागतो दूतः स्वामिकार्याविरोधतः ॥ अन्यत्किंचिदसंपाद्य गच्छत्यधम एव सः ॥६९॥ अतो ऽहं किंचिदन्यच्च कृत्वा दृष्ट्वा ऽथ रावणम् ॥संभाष्य च ततो रामदर्शनार्थं व्रजाम्यहम् ॥ ७० ॥

(पू.) फलं भक्षयित्वा, ततः जानक्या [1]प्रस्थापितः [सन्] (द्वि.) अगच्छत्. ॥ अथो सः (मू.) – ॥ ६८ ॥ '(मू.), सः अधमः एव. ॥ ६९॥ (पू.) दृष्ट्वा ॥ (मू.) रामदर्शनार्थं [3]व्रजामि.' ॥ ७० ॥

१ पाठवणी केलेला. २ न संपादून. ३ जातों.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असा मनांत निश्चय करून, त्या महापराक्रमी वानरानें वृक्षांचे समूहच्या समूह उपटले आणि क्षणमात्रांत अशोकवनांतील वृक्ष अगदीं नाहींसे करून टाकिले! ॥ ७१ ॥ त्यानें, सीता ज्या वृक्षा खालीं होती, तेवढा मात्र वगळून बाकीचें सर्व उपवन ओसाड पाडिलें! तो उपवनांतील वृक्ष उपटीत आहे, असें पाहून राक्षसिणी ॥ ७२ ॥ जानकीला विचारूं लागल्या :– ' हा वानरासारखा दिसणारा धिप्पाड वीर आहे कोण ? ' ॥ ७३ ॥ जानकी ह्मणाली :– ' राक्षसांनीं काय माया निर्माण केली आहे, ती तुह्मांला ठाऊक! मी तर दुःखानें आणि शोकानें व्याकुळ झाल्यें आहें; हा कोण, तें कांहीं मला माहीत नाहीं. ' ॥ ७४ ॥

इति निश्चित्य मनसा वृक्षखण्डान्महाबलः ॥ उत्पाट्याशोकवनिकां निर्वृक्षामकरोत्क्षणात् ॥ ७१ ॥ सीताश्रयनगं त्यक्त्वा वनं शून्यं चकार सः ॥ उत्पाटयन्तं विपिनं दृष्ट्वा राक्षसयोषितः ॥ ७२ ॥ अपृच्छन् जानकीं को ऽसौ वानराकृतिरुद्भटः ॥ ७३ ॥ जानक्युवाच । भवत्य एव जानन्ति मायां राक्षसनिर्मिताम् ॥ नाहमेनं विजानामि दुःखशोकसमाकुला ॥ ७४ ॥

महाबलः [मारुतिः] मनसा (मू.) अकरोत्. ॥ ७१ ॥ सः (मू.) विपिनं उत्पाटयन्तं [तं] दृष्ट्वा, ॥ ७२ ॥ जानकीं अपृच्छन् – ' (मू.) कः ? ' ॥ ७३ ॥ जानकी उवाच – ॥ ' (पू.) मायां जानन्ति; ॥ (मू.) अहं एनं न विजानामि. ॥ ७४ ॥

---

१ वृक्षांच्या राईंना. २ उपटून. ३ सीतेला ज्याचा आश्रय, त्या वृक्षाला. ४ राक्षसांच्या बायका. ५ उपवनास. ६ उपटणाऱ्या. ७ दांडगा वीर. ८ ओळखित्ये.

हनुमंताचें कृत्य राक्षसींनीं पाहिलें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सीतेनें असें सांगितलें तेव्हां भयानें राक्षसिणींचो गाळण उडाली. त्यांनीं लागलेंच जाऊन हनुमंतानें केलेला सर्व प्रकार रावणाला कळविला :– ॥ ७५ ॥ ‘ महाराज! कोणी एक महाबलाढ्य प्राणी वानरासारखा देह धारण करून आला आहे! त्याचा पराक्रम अपरिमित दिसतो! त्यानें सीतेबरोबर संभाषण केलें, क्षणमात्रांत अशोकवनांतील सर्व वृक्ष उपटिले, आणि तेथील देवालय मोडून टाकिलें! ॥ ७६ ॥ त्या मंदिराच्या सगळ्या रखवालदारांना मारून तो तेथेंच उभा होता, - व आतांही तेथेंच असेल. - ’ उपवन उद्ध्वस्त केल्याची अत्यंत अप्रिय वार्ता कानीं पडतांच रावण एकदम दचकून उठला. ॥ ७७ ॥ त्या राक्षसाधीश्वरानें - तत्क्षणीं मारुतीच्या आंगावर - दहा कोटि सेवक पाठवून दिले. मारुति त्या मोडलेल्या मंदिराच्या

इत्युक्तास्त्वरितं गत्वा राक्षस्यो भयपीडिताः ॥ हनूमता कृतं सर्वं रावणाय न्यवेदयन् ॥ ७५ ॥ देव कश्चिन्महासत्वो वानराकृतिदेहभृत् ॥ सीतया सह संभाष्य[2] ह्यशोकवनिकां क्षणात् ॥ उत्पाट्य चैत्यप्रासादं[3] बभंञ्ज[4]ामितविक्रमः ॥ ७६ ॥ प्रासादरक्षिणः[5] सर्वान्हत्वा तत्रैव तस्थिवान्[6] ॥ तच्छ्रुत्वा तूर्णमुत्थाय वनभंगं महाऽप्रियम् ॥ ७७ ॥ किंकरान्प्रेषयामास नियुतं राक्षसाधिपः ॥

(पू.) [सत्यः] त्वरितं गत्वा, ॥ (मू.) – ॥७५॥ देव, कश्चित अमितविक्रमः[1] (मू.). ॥ ७६ ॥ (७७पू.) ॥ राक्षसाधिपः तत् वनभङ्गं महाप्रियं (७७ उ.) निंयुतं (७८ पू.) ॥

---

१ अपरिमितपराक्रमी. २ संभाषण करून. ३ देवालयाला. ४ मोडिता झाला. ५ वाड्याच्या रक्षकांना. ६ राहिला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पहिल्या चौकांत बसला होता. ह्या वेळीं त्याचें शरीर पर्वतासारखें प्रचंड होतें. त्यानें, आयुध पाहिजे ह्मणून, तेथीलच एक लोखंडी खांब हातांत घेतला होता. तो आपली शेंपटी थोडी थोडी हलवीत होता. त्याचें तोंड तांबडें व शरीर भयंकर दिसे. ॥ ७८ ॥ ७९ ॥ राक्षसांचा मोठा थवा आपल्या आंगावर चालून येत आहे असें दृष्टीस पडलें, तेव्हां त्यानें सिंहासारखी गर्जना केली. ती ऐकून राक्षस अगदीं गर्भगळित होऊन गेले! ॥ ८० ॥ पुढें तो आकृतीनें भयंकर असा मारुति सगळ्या राक्षसांना बडवीत सुटला. तेव्हां राक्षसांनींही अनेकप्रकारचे अस्त्रसमूह सोडून त्याच्यावर प्रहार चालविले. ॥ ८१ ॥

निर्भग्नचैत्यप्रासादप्रथमांतरसंस्थितः ॥ ७८ ॥ हनूमान्पर्वताकारो लोहस्तम्भकृतायुधः॥ किंचिल्लांगूलचलनो रक्तास्यो भीषणाकृतिः ॥७९॥ आपतन्तं महासंघं राक्षसानां ददर्श सः ॥ चकार सिंहनादं च श्रुत्वा ते मुमुहुर्भृशम् ॥ ८० ॥ हनूमंतमथो दृष्ट्वा राक्षसा भीषणाकृतिम्॥निर्जघ्नुर्विविधास्त्रौघैः सर्वराक्षसघातिनम् ॥८१॥

(मू.) ॥ ७७ ॥ ७८ ॥ (मू.) हनुमान भीषणाकृतिः [बभूव]. ॥ ७९ ॥ सः (पू.) महासङ्घं ददर्श,॥ सिंहनादं च चकार. ते (मू.) मुमुहुः. ॥ ८० ॥ अथो राक्षसाः (पू.) दृष्ट्वा, ॥ (मू.) [तं] विविधास्त्रौघैः निर्जघ्नुः. ॥ ८१ ॥

१ मोडलेल्या देवालयाच्या पहिल्याच चौकांत असलेला. २ लोखंडाचा खांब हेंच केलें आयुध ज्यानें, असा. ३ जराजरा शेंपूट हालविणारा. ४ भयप्रद रूप ज्याचें, असा. ५ आंगावर येणाऱ्या. ६ मोठ्या समुदायाला. ७ अत्यंत. ८ मूर्च्छा येऊन पडले. ९ प्रहार करीत सुटले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंतर, जसा एखादा यूथपति (कळपाचें रक्षण करणारा मत्त गज) माशांना सहज चिरडतो त्याप्रमाणें, हनुमंतानें उठून, लोहमुद्गराच्या योगानें, भोंवतालीं जमलेल्या सगळ्या राक्षसांना चुरून मारून टाकिलें. ॥८२॥ आपले सेवक मरण पावले, ही वार्ता कानीं पडतांच रावण क्रोधामुळें देहभान विसरला. त्यानें मदोन्मत्त असे पांच सेनापति, - बरोबर सैन्य देऊन, - मारुतीवर पाठवून दिले. ॥ ८३ ॥ हनुमंतानें त्या सगळ्यांचाही लोहस्तंभाच्या योगें वध केला. तेव्हां रावणानें संतापून आणखी मंत्र्यांचे सात पुत्र पाठविले. ॥८४॥ त्या वानराधीश्वर मारुतीनें, पूर्वींप्रमाणेंच, आतांही आलेल्या एकून एक राक्षसांचा लोहमुद्गराच्या योगानें वध केला. ॥ ८५ ॥

तत उत्थाय हनुमान्मुद्गरेण समंततः ॥ निष्पिपेष क्षणादेव मशकानिव यूथपः
॥ ८२ ॥ निहतान्किंकरान् श्रुत्वा रावणः क्रोधमूर्छितः ॥ पंच सेनापतींस्तत्र
प्रेषयामास दुर्मदान् ॥ ८३ ॥ हनूमानपि तान्सर्वान् लोहस्तम्भेन चाहनत् ॥
ततः क्रुद्धो मन्त्रिसुतान्प्रेषयामास सप्त सः ॥ ८४ ॥ आगतानपि तान्सर्वान्
पूर्ववद्वानरेश्वरः ॥ क्षणान्निःशेषतो हत्वा लोहस्तम्भेन मारुतिः ॥ ८५ ॥

ततः हनुमान (मू.) मशकान[1] इव निष्पिपेष[2]. ॥ ८२ ॥ रावणः किंकरान् (पू.) [सन्] दुर्मदान्[3] (मू.). ॥ ८३ ॥ (मू.) सप्त मन्त्रिसुतान् प्रेषयामास. ॥ ८४ ॥ वानरेश्वरः मारुतिः (मू.) निःशेषतः हत्वा, ॥ ८५ ॥

---

१ लोखंडी सोडग्यानें. २ माशांना. ३ पीठ करिता झाला. ४ मदोन्मत्त.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व तो पुन्हां पहिल्या जागीं येऊन राक्षसांची वाट पाहत राहिला. पुढें, महाबलाढ्य व प्रतापी असा रावणाचा पुत्र अक्ष चालून आला. ॥ ८६ ॥ ह्याला पाहतांच मारुतीनें मुद्गर घेऊन आकाशांत उडी मारिली व त्वरेनें आकाशांतून खालीं उतरून अक्षाच्या मस्तकावर मुद्गराचा प्रहार केला. ॥ ८७ ॥ त्यासरसा अक्ष मरण पावला. पुढें मारुतीनें त्याचें सगळें सैन्य निःशेष करून (मारून) टाकिलें ! ॥८८॥ राक्षसांच्या राजाला (रावणाला) अक्षाच्या वधाची वार्ता समजली ! तेव्हां तो फारच संतापला व इंद्रजिताला ह्मणाला :–
॥ ८९ ॥ ' पुत्रा ! कुमाराचा (अक्षाचा) वध करणारा तो शत्रु जेथें आहे, त्या स्थळीं मी

पूर्वस्थानमुपाश्रित्य प्रतीक्षन् राक्षसान् स्थितः ॥ ततो जगाम बलवान्कुमारो ऽक्षः प्रतापवान् ॥ ८६ ॥ तमुत्पपात हनुमान् दृष्ट्वा ऽऽकाशे समुद्गरः ॥ गगनात्त्वरितो मूर्ध्नि मुद्गरेण व्यताडयत् ॥८७॥ हत्वा तमक्षं निःशेषं बलं सर्वं चकार सः ॥ ८८ ॥ ततः श्रुत्वा कुमारस्य वधं राक्षसपुंगवः ॥ क्रोधेन महता ऽऽविष्ट इंद्रजेतारमब्रवीत् ॥ ८९ ॥ पुत्र गच्छाम्यहं तत्र यत्रास्ते पुत्रहा[3] रिपुः ॥

(पू.) प्रतीक्षन्[1] स्थितः. ॥ (मू.) अक्षः कुमारः जगाम. ॥८६॥ समुद्गरः हनुमान (पू.) [प्रथमं] उत्पपात, ॥ [ततः] गगनात् त्वरितः [अवतरन्[2]] (मू.). ॥ ८७ ॥ सः तं अक्षं हत्वा, सर्वं बलं (मू.). ॥८८॥ (पू.) कुमारस्य वधं श्रुत्वा, ॥ महता (मू.) – ॥८९॥ '(पू.) आस्ते, तत्र अहं गच्छामि,

१ वाट पाहणारा. २ उतरणारा. ३ पुत्राला मारणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जातों आणि त्याला मारून टाकतों किंवा बांधून तुजजवळ घेऊन येतों. ' ॥ ९० ॥ ह्यावर इंद्रजित् पित्याला ह्मणाला :– ' महाराज ! आपण पूर्ण विचारी आहां; - मी आपल्याला सांगावें असें नाहीं; परंतु अशा प्रसंगीं - शोक सोडिला पाहिजे. मी येथें सिद्ध असतांना आपण असें खेदाचें भाषण काय ह्मणून करितां ? ॥९१॥ ताता ! मी आतां - जाऊन - त्या वानराला ब्रह्मपाशानें बांधून आणितों ! ' इतकें बोलून इंद्रजित् लागलाच रथावर चढला आणि बरोबर पुष्कळ राक्षस घेऊन ॥९२॥ वायुपुत्राच्या जवळ आला. खरोखर त्याचा पराक्रम वीरासारखा असे. पुढें, मोठी थोरली गर्जना मारुतीच्या कानीं गेली. तेव्हां तो प्रतापी वानर, मुसळ उचलून, ॥ ९३ ॥ गरुडाप्रमाणें उडी मारून आकाशांत गेला. मारुति आकाशांत फिरत आहे - असें

हत्वा तमथ वा बध्वा आनयिष्यामि ते ऽन्तिकम् ॥ ९० ॥ इंद्रजित्पितरं प्राह त्यज शोकं महामते ॥ मयि स्थिते किमर्थं त्वं भाषसे दुःखितं वचः ॥ ९१ ॥ बध्वा ऽऽनेष्ये द्रुतं तात वानरं ब्रह्मपाशतः ॥ इत्युक्त्वा रथमारुह्य राक्षसैर्बहुभिर्वृतः ॥ ९२ ॥ जगाम वायुपुत्रस्य समीपं वीरविक्रमः ॥ ततो ऽतिगर्जितं श्रुत्वा स्तम्भमुद्यम्य वीर्यवान् ॥ ९३ ॥ उत्पपात नभोदेशं गरुत्मानिव मारुतिः ॥

अथ तं हत्वा, बध्वा वा (मू.) आनयिष्यामि. ' ॥ ९० ॥ (पू.) – ' महामते, शोकं त्यज. ॥ मयि स्थिते [सति], (मू.) भाषसे ? ॥ ९१ ॥ (पू.) बध्वा द्रुतं आनेष्ये.' ॥ (मू.) ॥ ९२ ॥ वीरविक्रमः [सः] (९३ पू.) जगाम. ॥ वीर्यवान् मारुतिः (९३उ.) गरुत्मान् इव नभोदेशं उत्पपात. ॥

१ उचलून. २ आकाशप्रदेशीं. ३ उडाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पाहून इंद्रजितानें त्याच्यावर - तीक्ष्ण बाणांचे ॥ ९४ ॥ प्रहार केले—मस्तकावर आठ बाण मारिले; पुन्हां हृदयावर तितकेच मारिले; दोन्ही पायांवर मिळून सहा मारिले; आणि, एका बाणानें पुच्छाचा ॥ ९५ ॥ भेद करून, नंतर भयंकर सिंहनाद केला. सर्व्यांच्या प्रसंगीं, त्या प्रतापशाली मारुतीला अत्यंत आनंद वाटला - व हौस आली. - त्यानें आपला मुद्गर उचलून ॥ ९६ ॥ इंद्रजिताचा सारथि मारला व घोड्यांसह रथ क्षणमात्रांत चुरून टाकिला. नंतर, तो बलाढ्य इंद्रजित दुसरा रथ आणवून त्यांत बसला, ॥९७॥ व चटकन ब्रह्मास्त्र सिद्ध करून त्याच्या योगानें त्या श्रेष्ठ वानराला बांधून राजा रावणाच्या जवळ घेऊन चालला.

ततो भ्रमन्तं नभसि[1] हनुमन्तं शिलीमुखैः[2] ॥९४॥ विध्वा तस्य शिरोभागमिषु-भिश्चाष्टभिः पुनः ॥ हृदयं पादयुगलं षड्भिरेकेन वालधिम् ॥ ९५ ॥ भेदयित्वा[3] ततो घोरं सिंहनादमथाकरोत् ॥ ततोऽतिहर्षाद्धनुमांस्तम्भमुद्यम्य वीर्यवान् ॥९६॥ जघान सारथिं[4] साश्वं[5] रथं चाचूर्णयत्[6] क्षणात् ॥ ततोऽन्यं रथमादाय मेघनादो महाबलः ॥ ९७ ॥ शीघ्रं ब्रह्मास्त्रमादाय बध्वा वानरपुंगवम् ॥

ततः [सः] नभसि (मू.) ॥ ९३ ॥ ९४ ॥ विध्वा अष्टभिः इषुभिः (पू.) ॥ हृदयं, षड्भिः पादयुगलं [च] एकेन वालधिं ॥९५॥ (पू.). ॥ ततः वीर्यवान हनुमान (मू.), ॥९६॥ सारथिं (पू.) अचूर्णयत्. ॥ ततः महाबलः मेघनादः (मू.) [युयुधे]. ॥ ९७ ॥ (पू.) बध्वा, ॥

१ आकाशांत. २ बाणांनीं. ३ धार घालून. ४ प्रहार करून. ५ घोड्यांसहित. ६ चुरिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इंद्रजित महाबळाढ्य होता. ॥९८॥ अहो ! लोक ज्याच्या नांवाचा नित्य जप करूं लागले कीं, अज्ञानानें उत्पन्न केलेलें कर्मबंधन क्षणमात्रांत दूर झुगारून, कोटि सूर्यांप्रमाणें तेजःपुंज व कल्याणकारक अशा ईश्वरपदीं तत्काल प्राप्त होतात (असें ज्याच्या नामाचें माहात्म्य), ॥ ९९ ॥ त्या रामाचें चरणकमल मारुतीनें आपल्या हृदयकमलांत सदासर्वकाळ पूर्णपणें स्थापिलें होतें. अर्थात त्याचीं समस्त बंधनें सुटलेलींच होतीं. त्याला ब्रह्मपाश किंवा दुसरींही क्षुद्र बंधनें करणार काय ? ॥१००॥ इति सुन्दरकाण्डे तृतीयः सर्गः॥३॥

मारुति हातांमध्यें पाशबंधन धरून, खरोखरच भ्यालेल्यासारखा (घाबरलेल्या मुद्रेनें), नगर पाहत

निनाय निकटं राज्ञो रावणस्य महाबलः ॥९८॥ यस्य नाम सततं जपन्ति ये ऽज्ञानकर्मकृतबन्धनं क्षणात् ॥ सद्य एव परिमुच्य तत्पदं यान्ति कोटिरविभासुरं शिवम् ॥ ९९ ॥ तस्यैव रामस्य पदाम्बुजं सदा हृत्पद्ममध्ये सुनिधाय मारुतिः ॥ सदैव निर्मुक्तसमस्तबन्धनः किं तस्य पाशैरितरैश्च बन्धनैः ॥ १०० ॥ इति तृतीयः सर्गः॥३॥यान्तं कपीन्द्रं धृतपाशबन्धनं विलोकयन्तं नगरं विभीतवत् ॥

(मू.) निकटं निनाय. ॥ ९८ ॥ ये सततं [illegible] जपन्ति, [ते] (मू.) तत्पदं यान्ति, ॥९९॥ [यः] मारुतिः (मू.) [बभूव], तस्य पाशैः, इतरैः बन्धनैः च [दुःखं] किं ? ॥ १०० ॥ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये सुन्दरकाण्डे तृतीयः सर्गः. ॥३॥ (पू.) विलोकयन्तं तं कपीन्द्रं ॥

१ जवळ. २ नेता झाला. ३ कोट सूर्यांप्रमाणे तेजःपुंज. ४ चांगल्या रीतीनें ठेवून. ५ अगदीं सुटलीं सकळ बंधनें ज्याचीं, असा. ६ धरिलीं पाशरूप बंधनें ज्यानीं, अशा ७ पाहणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चालला होता. नागरिक जन (लंकेंतले राक्षस) त्याच्यावर फारच संतापले होते. ते त्याला पाहाण्यासाठीं चोहोंकडून त्याच्यामागें येत आणि त्याला बुक्के व चापट्या मारीत ! ॥ १ ॥ मारुतीला ब्रह्मदेवाचा वर होता कीं, - माझें अस्त्र तुला पीडा देणार नाहीं. - त्याप्रमाणें ब्रह्मास्त्र त्याच्या शरीराला लागल्याबरोबर निघून गेलें; अर्थात त्याच्या भोंवतीं नुसतें फुसकट दोऱ्यांचें मात्र बंधन राहिलें ! मारुतीला तें समजलें होतें; तथापि, कांहीं महत्त्वाचें कार्य करावयाचें असल्यामुळें, तो तसाच पुढें चालला. ॥ २ ॥ त्या वेळीं रावण सभा भरवून तीमध्यें बसला होता. इंद्रजितानें मारुतीला रावणाच्या पुढें उभें केलें, आणि म्हटलें :–'बाबा ! मी ब्रह्मवरानें बद्ध केलेला हा वानर येथें आला आहे. ह्यानेंच मोठमोठाले दैत्य मारिले. ॥ ३ ॥

अताडयन्मुष्टितलैः सुकोपनाः[1] पौरैः[2] समंतादनुयान्त ईक्षितुम् ॥ १ ॥ ब्रह्मास्त्रमेनं क्षणमात्रसंगमं कृत्वा गतं ब्रह्मवरेण सत्वरम् ॥ ज्ञात्वा हनूमानपि फल्गुरज्जु[6]-भिर्धृतो ययौ कार्यविशेषगौरवात्॥ २ ॥ सभान्तरस्थस्य[9] च रावणस्य तं पुरो निधायाह बलारिजित्तदा ॥ बद्धो मया ब्रह्मवरेण वानरः समागतो ऽनेन हता महासुराः ॥ ३ ॥

ईक्षितुं[3] समन्तात[4] अनुयान्तः[5] (मू.) मुष्टितलैः अताडयन. ॥ १ ॥ (पू.) गतं. ॥ हनूमान [तद्गमनं] (मू.) [अपि] कार्यविशेषगौरवात[7] ययौ. ॥ २ ॥ तदा बलारिर्जित[8] (पू.) पुरः तं निधाय[10] आह –॥ ' (मू.) बद्धः वानरः समागतः; अनेन महासुराः हताः. ॥ ३ ॥

१ अत्यंत क्रोधी. २ नागरिक. ३ पाहण्यास. ४ चोहोंकडून. ५ मागून जाणारे. ६ फुसक्या दोऱ्यांनीं. ७ एका कामाच्या महत्त्वास्तव. ८ इंद्रजित. ९ सभेमध्यें बसलेल्या. १० ठेवून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

महाराज! प्रस्तुत प्रसंगीं ह्याला कोणती शिक्षा करणें योग्य आहे, त्याचा मंत्र्यांबरोबर विचार ठरवून, जें करणें तें करावें. हा वानर सामान्य नव्हे, - एवढें मात्र मी सुचवून ठेवितों! -' सभेमध्यें रावणाच्या समोरच प्रहस्त नांवाचा एक राक्षस बसला होता; शरीराच्या कांतीवरून तर, तो काजळाचा एक पर्वतच असावा, असें वाटे. इंद्रजिताचें भाषण ऐकून घेतल्यावर, त्या राक्षसाधीश्वरानें प्रहस्ताला आज्ञा दिली :– ॥४॥ 'प्रहस्ता! ह्या वानराला, हा कां आला आहे, ह्याचें येथें काय काम आहे, आला कोठून, ह्यानें सगळ्या उपवनाचा विध्वंस काय ह्मणून केला, तसेंच माझे राक्षस बळेंच कां मारिले, हें सर्व विचार.' ॥ ५ ॥ नंतर, प्रहस्तानें मारुतीला आदरपूर्वक (सौम्यपणें) प्रश्न केला :– 'वानरा! तुला कोणीं पाठविलें? तूं अगदीं

यद्युक्तमत्रार्य[1] विचार्य मन्त्रिभिर्विधीयतामेष न लौकिको हरिः॥ ततो त्रिलोक्याह स राक्षसेश्वरः प्रहस्तमग्रे स्थितमञ्जनाद्रिभम्[2] ॥ ४ ॥ प्रहस्त पृच्छैनमसौ किमागतः किमत्र कार्यं कुत एव वानरः॥ वनं किमर्थं सकलं विनाशितं हताः किमर्थं मम राक्षसा बलात् ॥५॥ ततः प्रहस्तो हनुमन्तमादरात्पप्रच्छ केन प्रहितो ऽसि वानर ॥ भयं च ते मा ऽस्तु विमोक्ष्यसे मया सत्यं वदस्वाखिलराजसन्निधौ ॥ ६ ॥

आर्य, अत्र यत् युक्तं, [तत्] मन्त्रिभिः [सह] (पू.) न.' ॥ (मू.) प्रहस्तं त्रिलोक्य आह – ॥४॥ प्रहस्त, एनं पृच्छ. असौ वानरः (पू.) ॥ [आगतः]? वनं (मू.) किमर्थं हताः?' ॥५॥ (पू.) – 'वानर, केन प्रहितः असि? ॥ ते भयं च मा अस्तु. मया [बन्धनात्] (मू.) सत्यं वदस्व.' ॥ ६ ॥

१करावें. २ काजळाच्या पर्वतासारखी कांति ज्याची, अशा. ३विचार. ४ पाठविलेला. ५सोडिला जाशील. ६सर्वांच्या राजाजवळ.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भिऊं नको; जो कांहीं खरा प्रकार असेल, तो ह्या त्रैलोक्याधिपती (रावणा) जवळ निवेदन कर; ह्मणजे मी तुला सोडून देईन. ' ॥ ६ ॥ ह्या वेळीं मारुतीला अत्यंत हर्ष वाटला. त्यानें, आपला शत्रु व त्रैलोक्याला कांट्याप्रमाणें त्रास देणारा असा जो राक्षस (रावण), त्याच्याकडे नीट दृष्टि लावून, अंतःकरणामध्यें वारंवार रामाचें स्मरण करीत, रघुनाथाची पवित्र कथा अनुक्रमानें सांगण्यास प्रारंभ केला :– तो ह्मणाला :–
॥ ७ ॥ " हे देवगण, नाग इत्यादिकांच्या शत्रो ! मी स्पष्टपणें सर्व वृत्तांत सांगतों, ऐकून घे. कुत्र्यानें यज्ञांतील पवित्र होमद्रव्य उचलून नेलें, तर त्याला कोणता बरें लाभ होतो ? पाठींत बडगा बसून कंबर मोडते, एवढाच ! त्याचप्रमाणें, तूं सांप्रत ज्या सर्वशक्तिमान् प्रभूची भार्या चोरून आणून स्वतांच्या नाशाचें

ततोऽतिहर्षात्पवनात्मजो रिपुं निरीक्ष्य लोकत्रयकण्टकासुरम् ॥ वक्तुं प्रचक्रे रघुनाथसत्कथां क्रमेण रामं मनसा स्मरन्मुहुः ॥ ७ ॥ शृणु स्फुटं देवगणाद्यमित्र हे रामस्य दूतोऽहमशेषहृत्स्थितेः ॥ यस्याखिलेशस्य हृताऽधुना त्वया भार्या स्वनाशाय शुनेव सद्धविः ॥ ८ ॥

ततः पवनात्मजः (पू.) निरीक्ष्य, मुहुः मनसा रामं स्मरन् [सन्] क्रमेण (मू.) वक्तुं प्रचक्रे –
॥ ७ ॥ ' हे देवगणाद्यमित्र, स्फुटं शृणु. (पू.) रामस्य दूतः [अस्मि]; ॥ त्वया अधुना (मू.) इव स्वनाशाय हृता. ॥ ८ ॥

१ तीन्ही लोकांचा शत्रु अशा दैत्याला. २ देवगण इत्यादिकांचा शत्रु, अशा. ३ सर्वांच्या हृदयांत वास करणाऱ्या. ४ शुना कुत्र्यानें. ५ पवित्र होमद्रव्य.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

साधन सिद्ध करून ठेविलें आहेस, त्याच सकल प्राण्यांच्या अंतरीं राहत असलेल्या रामचंद्राचा मी दूत आहें. ॥ ८ ॥ त्या रघुवीरानें मतंगपर्वतावर येऊन अग्नीच्या समक्ष सुग्रीवाशीं सख्य संपादिलें, व एकाच बाणानें वालीचा वध करून त्या सुग्रीवालाच वानरांचें आधिपत्य (राज्य) दिलें. ॥ ९ ॥ तो महाबलाढ्य असा वानरांचा अधिपति, रामलक्ष्मणांसह, तुझ्याविषयीं क्रोधानें नुसता जळफळतच, प्रवर्षण पर्वतावर बसला आहे ! बाबा ! त्याच्या आश्रयाला मोठमोठे पराक्रमी असे वानरांचे कोट्यवधि कळप आहेत !॥ १० ॥ त्यानें पृथ्वीच्या कन्येला (सीतेला) शोधण्यासाठीं दहा दिशांकडे मोठमोठाले समर्थ वानर पाठविले. त्यां-

स राघवो ऽभ्येत्य मतंगपर्वतं सुग्रीवमैत्रीमनलस्य सन्निधौ ॥कृत्वैकबाणेन निहत्य वालिनं सुग्रीवमेवाधिपतिं चकार तम् ॥ ९ ॥ स वानराणामधिपो महाबली महाबलैर्वानरयूथकोटिभिः ॥ रामेण सार्धं सहलक्ष्मणेन भो प्रवर्षणे ऽमर्षयुतो ऽवतिष्ठते ॥ १० ॥ संचोदितास्तेन महाहरीश्वरा धरासुतां मार्गयितुं दिशो दश ॥ तत्राहमेकः पवनात्मजः कपिः सीतां विचिन्वञ्छनकैः समागतः ॥ ११ ॥

(पू.) [1]अभ्येत्य, [2]अनलस्य सन्निधौ सुग्रीवमैत्रीं कृत्वा, एकबाणेन वालिनं निहत्य [च] तं (मू.). ॥ ९ ॥ भो, महाबली [3]अमर्षयुतः (मू.) [च] सह प्रवर्षणे [5]अवतिष्ठते. ॥ १० ॥ (पू.) दिशः सं[6]चोदिताः; ॥ तत्र एकः पवनात्मजः कपिः (मू.). ॥ ११ ॥

---

१ जवळ येऊन २ अग्नीच्या. ३ क्रोधयुक्त. ४ वानरांच्या कोट्यवधि कळपांशीं. ५ राहत आहे. ६ पाठविलेले. ७ मोठमोठे वानरवीर. ८ पृथ्वीच्या कन्येला (जानकीला). ९ शोधण्यास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'माझें काम झालें.'

पैकींच मी वायूचा पुत्र एक (सामान्यसा) वानर आहें. मी सीतेचा शोध करीत हळूहळू येथें आलों. ॥ ११ ॥ जिचे नेत्र कमलदलासारखे आहेत, अशी ती जानकी माझ्या दृष्टीस पडली. - माझा कार्यभाग साधला! - आतां, मी जातीचा वानर पडलों; - वानरांना झाडें मोडण्याची आवड फार, हें सर्वत्र प्रसिद्धच आहे: त्याप्रमाणें, आपल्या चंचल स्वभावाला अनुसरून, - मी वनाचा नाश केला! पुढें, आपल्याला मारण्याच्या इच्छेनें कांहीं राक्षस हातीं धनुष्यबाण घेऊन लगट करीत येत आहेत, असें मला दिसून आलें. ॥ १२ ॥ तेव्हां, मी त्यांचा वध केला आणि स्वतांच्या शरीराचें रक्षण केलें; कारण, राजा! सर्व प्राण्यांना आपलें शरीर दुसऱ्याच्या पेक्षां प्रिय असतेंच. पुढें, मेघनाद (इंद्रजित) नांवाचा - एक राक्षस - मला ब्रह्मास्त्रपाशानें बांधून इकडे घेऊन आला. ॥ १३ ॥

दृष्टा मया पद्मपलाशलोचना सीता कपित्वा[1]द्विपिनं विनाशितम् ॥ दृष्ट्वा ततोऽहं र[3]भसा समागतान्मां हन्तुकामान् धृतचा[5]पसायकान् ॥ १२ ॥ मया हतास्ते परिरक्षितं वपुः प्रियो हि देहोऽखि[6]लदेहिनां प्रभो ॥ ब्रह्मास्त्रपाशेन निबध्य मां ततः समागमन्मेघनिनादनामकः ॥ १३ ॥

(पू.) दृष्टा, कपित्वात् [2]विपिनं विनाशितं. ॥ (मू.) [राक्षसान्] दृष्ट्वा, ॥१२॥ मया ते हताः, वपुः परिरक्षितं. प्रभो, (पू.) प्रियः.॥ ततः मेघनिनादनामकः मां (मू.). ॥ १३ ॥

१ वानर स्वभावास्तव. २ अरण्य. ३ वेगानें. ४ मारूं इच्छिणाऱ्या. ५ धरिले धनुष्य-बाण ज्यांनीं, अशा. ६ सकल प्राण्यांच्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रावणा ! मला ब्रह्मदेवाचा वर आहे; त्याच्या प्रभावानें तें अस्त्र माझ्या शरीराचा स्पर्श झाल्याबरोबर आश्रय सोडून निघून गेलें ! हें सर्व मला कळलें आहे; तथापि मी बांधल्यासारखा येथें आलों ह्याचें कारण, माझ्या मनांतून तुला कांहीं हितोपदेश करावा असें आहे, हें होय. - खरोखरच सांगतों, - तुझ्याविषयीं दयारूप रस उत्पन्न होऊन माझें अंतःकरण फारच आर्द्र झालें आहे (तुझी दया येऊन माझें काळीज तटतटां तुटतें) ! ॥ १४ ॥ रावणा ! थोडा सदसद्विचार कर व लोकांना कसकशा गति मिळतात (धर्माचरणानें स्वर्ग मिळतो, अधर्म केला तर नरकांत जावें लागतें) तें मनांत आण; राक्षसी बुद्धीचा अंगिकार करूं नकोस. संसारांतून मुक्त होण्याचें साधन मार्ग म्हटला तर - दुसऱ्याला पीडा न देणें हा होय, असें देवानें सांगितलें आहे; त्या मार्गाचा आश्रय धर; म्हणजे तुझ्या आत्म्याचें अत्यंत कल्याण होईल. ॥ १५ ॥

स्पृष्टैव मां ब्रह्मवरप्रभावतस्त्यक्त्वा गतं सर्वमवैमि रावण ॥ तथाऽप्यहं बद्ध इवागतो हितं प्रवक्तुकामः करुणारसार्द्रधीः ॥ १४ ॥ विचार्य लोकस्य विवेकतो गतिं न राक्षसीं बुद्धिमुपेहि रावण ॥ दैवीं गतिं संसृतिमोक्षहेतुकीं समाश्रयात्यन्तहिताय देहिनः ॥ १५ ॥

रावण, [ब्रह्मास्त्रं] ब्रह्मवरप्रभावतः मां (मू.) अहं बद्धः इव आगतः. ॥ १४ ॥ रावण, विवेकतः लोकस्य गतिं (पू.) न उपेहि,॥ देहिनः अत्यन्तहिताय संसृतिमोक्षहेतुकीं (मू.). ॥ १५ ॥

१ जाणतों. २ सांगूं इच्छिणारा. ३ दयारसानें आर्द्र झाली बुद्धि ज्याची (कळवळलें मन ज्याचें); असा. ४ विचारानें. ५ स्वीकार. ६ अत्यंत कल्याणासाठीं. ७ संसारांतून सुटण्याचें कारण, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'तूं राक्षस नव्हेस तुला दुःख नाहीं.'

तूं तर ब्राह्मण, उत्तम कुळांत जन्मलेला, पौलस्त्याचा पुत्र आणि कुबेराचा बंधु आहेत; - अर्थात् तुझी योग्यता फार मोठी आहे. - नीट विचार करून पहा कीं, देहालाच आत्मा असें मानिलेंत तरी तूं राक्षस नाहींस - तर ब्राह्मण आहेस : - बरें, आत्मबुद्धीनें (आत्मा देहाविरळा आहे असें) पाहूं गेलास तर मग तूं राक्षस नाहींस, हें आदींच उघड आहे. मी ह्मणतों हें खरें नाहीं काय? ॥ १६ ॥ स्थूळ शरीर, बुद्धि (सूक्ष्म शरीर), नेत्रादि इंद्रियें, ह्यांपासून उद्भवणारी आंतर व बाह्य दुःखपरंपरा तुला लागू नाहींच; - कारण, तीं दुःखें ज्याचे धर्म, - तें (चित्त) तूं नव्हेस. तूं - आत्मा आहेस. आत्म्याला दुःखें कां नसावीं, तें सांगतों, एक : दुःखें आहेत असें ह्मटलें तर आत्मा विकारी होईल :- आणि आत्म्याला कोणतेही विकार नाहींत, - असें श्रुति व अनुभव ह्या दोन्ही प्रमाणांवरून सिद्ध आहे. आतां, मी दुःखी, अशी

त्वं ब्राह्मणो ह्युत्तमवंशसंभवः पौलस्त्यपुत्रो ऽसि कुबेरबान्धवः ॥ देहात्मबुद्ध्या ऽपि च पश्य राक्षसो नास्यात्मबुद्ध्या किमु राक्षसो न हि ॥ १६ ॥ शरीरबुद्धीन्द्रियदुःखसन्ततिर्न ते न च त्वं तव निर्विकारतः ॥ अज्ञानहेतोश्च तथैव सन्ततेरसत्त्वमस्याः स्वपतो हि दृश्यवत् ॥ १७ ॥

(पू.) ब्राह्मणः असि. ॥ पश्य; (मू.) [इति] किमु [वक्तव्यं]? ॥ १६ ॥ ते (पू.) त्वं च [तदाश्रयः चित्तं] न ॥ हि स्वपतः दृश्यवत् तथा (मू.) सन्ततेः असत्त्वं एव. ॥ १७ ॥

---

१ शरीर, बुद्धि, इंद्रियें ह्यांपासून उद्भवणारी दुःखपरंपरा. २ विकार नसल्यामुळें. ३ झोंपी गेलेल्याला. ४ दृश्य (दिसणारे जोगचा) पदार्थांप्रमाणें. ५ खोटेपणा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रतीति येते खरी; पण - ती दुःखपरंपरा केवळ अज्ञानमूलक होय. प्राण्याला स्वप्नामध्यें अनेक पदार्थ दिसतात, ते जसे मिथ्या, त्यांप्रमाणेंच ही दुःखपरंपराही असत्य व केवळ कल्पित आहे. ॥ १७ ॥

तुझें स्वरूप तर सत्य आहे. तुला विकार नाहीं; व तो विकार प्रतीतीला येण्याचें कारण अज्ञानही सत्य नव्हे; कारण तुझ्या ठिकाणीं द्वैत मुळींच नाहीं, तेव्हां अज्ञान असेल कोठून ! ज्याप्रमाणें आकाश सर्वत्र भरलेलें असूनही गंधादि गुणांनीं लिप्त होत नाहीं, त्याप्रमाणेंच तूं, - चित्त जेथें राहतें, त्याच - देहांत वास करितोस तथापि अत्यंत सूक्ष्म आहेस ह्मणून चित्ताच्या दुःखादि धर्मांनीं लिप्त होत नाहींस. - ह्यावर तूं ह्मणशील कीं, तर मग संसारी आणि मुक्त ही व्यवस्था नाहींच ह्मणावयाची. तर तसें मात्र नव्हे : - प्राणी सूक्ष्मदेह, इंद्रियें, प्राण, स्थूल शरीर ह्यांच्या समागमामुळें अविचारी होऊन त्यांनाच, आत्मा, असें मानूं लागतो. ह्या अज्ञानामुळें त्याला सर्वप्रकारें बंधन प्राप्त होतें : - एतावता, अविवेक हें संसृतीचें मुख्य कारण

इदं तु सत्यं तव नास्ति विक्रिया विकारहेतुर्न च ते ऽद्वयत्वतः ॥ यथा नभः
सर्वगतं[2] न लिप्यते[3] तथा भवान्देहगतो ऽपि सूक्ष्मकः ॥ देहेन्द्रियप्राणशरीरसंग[4]-
तस्त्वात्मेति बुद्ध्या ऽखिलबन्धभाग्भवेत्[5] ॥ १८ ॥

(पू.) नास्ति; ते अद्वयत्वतः विकारहेतुः च न. ॥ यथा सर्वगतं (द्वि.) [न लिप्यते]. ॥ (मू.). ॥ १८ ॥

---

१ ऐक्यामुळें. २ सर्वत्र असलेलें. ३ लिप्त होतें. ४ सूक्ष्म शरीर, इंद्रियें, प्राण, स्थूल देह ह्यांच्या संबंधामुळें. ५ सकळ बंध भोगणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होय, असें सिद्ध आहे; - ॥ १८ ॥ मी केवळ चैतन्यरूप आहें; मला जन्म नाहीं, व नाश नाहीं; मी शुद्ध आनंदमय आहें' असा विवेक झाला कीं पुरुष मुक्त होतो. 'देह आत्मा नव्हे; कारण, तो (देह) पृथ्वीच्या परमाणूंपासून उत्पन्न झालेला आहे. प्राण आत्मा नव्हे; तर तो (प्राण) नुसता वायु होय. ॥ १९ ॥ मन तर अहंकाराचा विकार, ह्मणून आत्मा नव्हे. बुद्धिही आत्मा नव्हे; कारण, ती प्रकृतीचें कार्य जें महत्तत्त्व त्यापासून उद्भवते. आत्मा चैतन्यरूप, आनंदमय, विकाररहित, देहादिगणाहून वेगळा, सर्वशक्ति, ॥ २० ॥ व निरंजन ह्मणजे उपाधींपासून मुक्त आहे' असें आत्म्याचें झालें कीं तत्काल पुरुष ह्या संसारांतून मुक्त

चिन्मात्रमेवाहमजो ऽहमक्षरो ह्यानन्दभावो ऽहमिति प्रमुच्यते ॥ देहो ऽप्यनात्मा पृथिवीविकारजो न प्राण आत्मा ऽनिल एष एव सः ॥ १९ ॥ मनो ऽप्यहंकारविकार एव नो न चापि बुद्धिः प्रकृतेर्विकारजा ॥ आत्मा चिदानन्दमयो ऽविकारवान्देहादिसंघाद्व्यतिरिक्त ईश्वरः ॥ २० ॥ निरञ्जनो मुक्त उपाधितः सदा ज्ञात्वैवमात्मानमितो विमुच्यते ॥

अहं चिन्मात्रं एव. अहं अजः. अहं अक्षरः (पू.). ॥ पृथ्वीविकारजः (मू.) न. सः एषः अनिलः एव. ॥ १९ ॥ (पू.); [आत्मा] नो. प्रकृतेः विकारजा बुद्धिः अपि [आत्मा] न. ॥ (मू.) ॥२०॥ निरंजनः सदा उपाधितः मुक्तः एवं आत्मानं (पू.). ॥

---

१ चैतन्यरूप. २ जन्मरहित. ३ नाशशून्य. ४ सुटतो. ५ पृथ्वीच्या विकारापासून उत्पन्न होणारा. ६ जड. ७ वायु. ८ देहादि-संघात् देहादि समुदायापासून. ९ अलिप्त.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होतो. रावणा ! तूं महाबुद्धिमान् आहेस; ह्मणून, मी तुला मोक्षाचें अगदीं निश्चित साधन सांगतों, नीट लक्ष्य लावून एैक :— ॥ २१ ॥ विष्णूची भक्ति हें अंतःकरण शुद्ध करण्याचें साधन होय. अंतःकरण शुद्ध झालें कीं, अत्यंत निर्मळ असें (मागें १९।२०।२१ श्लोकांत सांगितल्याप्रमाणें आत्मस्वरूपाचें) ज्ञान होतें. त्याचा निदिध्यास ठेविला असतां परम शुद्ध अशा तत्त्वाचा अनुभव मिळतो. अशा प्रकारें ज्याला उत्तम ज्ञान झालें, तो पुरुष परम पदास प्राप्त होतो. ।२२॥ ह्मणून, बा रावणा ! - मी तुला सांगतां कीं, - आतांपासून तूं रामाची भक्ति करूं लाग. तो राम सकल दुःखांचा परिहार करणारा लक्ष्मीचा पति विष्णु होय. प्रकृतीचा चालक सर्वव्यापी पुराण पुरुष तरी तोच. शरण आलेले भक्तजन त्याला फार प्रिय अस-

अतोऽहमात्यन्तिकमोक्षसाधनं वक्ष्ये शृणुष्वावहितो महामते ॥ २१ ॥ विष्णोर्हि
भक्तिः सुविशोधनं धियस्ततो भवेज्ज्ञानमतीव निर्मलम् ॥ विशुद्धतत्त्वानुभवो भवे-
त्ततः सम्यग्विदित्वा परमं पदं व्रजेत् ॥ २२ ॥ अतो भजस्वाद्य हरिं रमापतिं रामं पुरा-
णं प्रकृतेः परं विभुम् ॥ विसृज्य मौर्ख्यं हृदि शत्रुभावनां भजस्व रामं शरणागत-
प्रियम् ॥ सीतां पुरस्कृत्य सपुत्रबान्धवो रामं नमस्कृत्य विमुच्यसे भयात् ॥ २३ ॥

(मू.) अवहितः [सन्] शृणुष्व. ॥२१॥ विष्णोः भक्तिः धियः (पू.) ज्ञानं भवेत्. ॥ ततः (मू.) ॥२२॥ (पू.) रामं भजस्व. ॥ हृदि मौर्ख्यं, शत्रुभावना [च] (वि.) रामं भजस्व. ॥ सपुत्रबान्धवः [त्वं] (मू.) विमुच्यसे. ॥ २३ ॥

---

१ सावध. २ अत्यंत पवित्र करणारें. ३ जाणून. ४ पावतो. ५ सोडून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

' तूं आत्म्याचा घात करितोस.'

तात. ह्मणून, रावणा! आपल्या मनांतील मूर्खपणा व शत्रुभाव सोडून दे, सीतेला पुढें करून पुत्रबांधवां-सह रामाकडे जा आणि त्याला नमस्कार कर; ह्मणजे भीतिरूप संसारांतून मुक्त होशील. ॥ २३ ॥ पुरुषानें जर, राम हा सर्वांच्या हृदयांत राहणारा, सुखरूपी व अद्वितीय (एक) परमात्मा होय, अशी भक्तिपुरःसर भावना ठेविली नाहीं, तर तो संसारसमुद्राच्या पैल तिरीं जाऊन पोंचेल कसा? ह्या समुद्रांत दुःखरूपी लाटा एकीमागून एक सारख्या उसळत असतात! ॥ २४ ॥ तूं भक्ति न करशील तर, आत्म्याचें रक्षण करण्याची शत्रूप्रमाणें उपेक्षा करितोस असें होईल इतकेंच नव्हे, तर आगोदरच तो आत्मा अज्ञा-नरूप अग्नीनें होरपळत आहे आणखी तूं त्याला स्वतांच्या पापकर्मांनीं अधोगतीला नेत आहेस - असें ह्मणावें

रामं परात्मानमभावयन् जनो भक्त्या हृदिस्थं सुखरूपमद्वयम् ॥ कथं परं तीर-मवाप्नुयाज्जनो भवाम्बुधेर्दुःखतरंगमालिनः ॥ २४ ॥ नो चेत्त्वमज्ञानमयेन वह्निना ज्वलन्तमात्मानमरक्षिता ऽरिवत् ॥ नयस्यधोधः स्वकृतैश्च पातकैर्विमोक्षशंका न च ते भविष्यति ॥ २५ ॥

जनः [यावत्] भक्त्या रामं, (पू.) परमात्मानं अभावयन [अस्ति, तावत] ॥ (मू.) भवाम्बुधेः परं तीरं कथं अवाप्नुयात ? ॥ २४ ॥ (पू.) अरक्षिता; ॥ स्वकृतैः पातकैः अधः अधः नयसि; ते (मू.) न भविष्यति.' ॥ २५ ॥

१ न मानणारा. २ दुःखरूप लाटांच्या माळांनीं युक्त. ३ पावेल. ४ अग्नीनें. ५ पेटणाऱ्या. ६ शत्रूप्रमाणें. ७ न राखणारा. ८ नेतोस.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जागा राहणार नाहीं!" ॥ २१ ॥
लागेल. - मग तुला मोक्ष मिळण्याची आशा देखील करण्याम
हें वायुपुत्राचें भाषण जरी खरोखर अमृतासारखें स्वादिष्ट आहे, तरी रावणाला रुचलें नाहीं, तर कानीं
पडतांच अतिशय झोंबलें. - रुचावें कसें? - राक्षसच तो! अत्यंत संतापानें त्याचे नेत्रप्रांत लाल झाले; आंगाला
तर नुसती आग लागून राहिली. लागलेंच त्यानें मारुतीला दटावून ह्मटलें:— ॥ २६ ॥ 'कायरे ए!
दांडग्यासारखी बडबड कसली लाविली आहेस? हलकट माकड कुठलें! - इतका वेळ मला वाटलें होतें की,
तूं असशील एखादा भेकड. पण छिः! मी अगदीं चुकलों! - तुझें अंतःकरण दुष्ट (बेरडाचें) आहे!
राम तो काय? आणि तो रानवट प्राणी (सुग्रीव) कःपदार्थ? मी त्या नीच माणसाला सुग्रीवासुद्धां तेव्हांच

श्रुत्वा ऽमृतास्वादसमानभाषितं तद्वायुसूनोर्दशकन्धरो ऽसुरः ॥ अमृ[1]ष्यमाणो
ऽतिरुषा कपीश्वरं जगाद रक्तान्तवि[2]लोचनो ज्वलन् ॥ २६ ॥ कथं ममाग्रे
वि[3]लपस्यभीतवत्प्लवंगमानामधमो ऽसि दुष्टधीः ॥ क एष रामः कत[4]मो वनेचरो
निहन्मि सुग्रीवयुतं नराधमम् ॥ २७ ॥

दशकन्धरः असुरः तत् वायुसूनोः (पू.) श्रुत्वा ॥ (मू.) [सन्] कपीश्वरं जगाद - ॥ २६ ॥
'मम अग्रे अभीतिवत (पू.) असि!॥ एषः रामः कः; वनेचरः [च] (मू.) निर्हन्मि. ॥ २७ ॥

१ न सोसणारा. २ लाल झाल्या डोळ्यांच्या कडा ज्याच्या असा. ३ दशमुखी रावण. ४ बोलला. ५ न भ्याल्या (दांडग्या)
सारखा. ६ बडबडतोस. ७ कःपदार्थ. ८ मारतों.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारून टाकीन! ॥ २७ ॥ माकडा! आतां आगोदर तुला मारतों; मग जानकीला, तिच्यामागून लक्ष्मणासह रामाला, पुढें, - तूं ह्मणतोस त्या - बलाढ्य वानराधिपति सुग्रीवाला, त्याच्या बरोबरच त्याच्या वानरांना, एकून एक सगळ्यांना मी लवकरच मारून टाकणार!' रावणाचें भाषण ऐकल्याबरोबर मारुतीचा क्रोधाग्नि अतिशय प्रज्वलित झाला. - प्रेक्षकांना तर, - 'तो त्या राक्षसाला जाळून टाकतो कीं काय!' असें वाटूं लागलें. ॥ २८ ॥ - तो ह्मणाला :- 'अधमा! तुझ्या सारखे एक कोट रावण आले तरी त्यांच्यानें माझी बरोबरी करवणार नाहीं! मी रामाचा दास आहें, - समजलास? - तुह्मांला माझ्या शक्तीचा अंत लागणें नाहीं!' हें मारुतीचें भाषण ऐकतांच रावणानें, अतिशय संतापून शेजारीं बसलेल्या एका राक्षसाला सांगितलें :- ॥ २९ ॥

त्वां चाद्य हत्वा जनकात्मजां ततो निहन्मि रामं सहलक्ष्मणं ततः ॥ सुग्रीवमग्रे बलिनं कपीश्वरं सवानरं हन्म्यचिरेण वानर ॥ श्रुत्वा दशग्रीववचः स मारुतिर्विवृद्धकोपेन दहन्निवासुरम् ॥ २८ ॥ न मे समा रावणकोटयोऽधम रामस्य दासोऽहमपारविक्रमः ॥ श्रुत्वाऽतिकोपेन हनूमतो वचो दशाननो राक्षसमेकमब्रवीत् ॥ २९ ॥

वानर, अद्य त्वां हत्वा, ततः (पू.) सहलक्ष्मणं रामं निहन्मि, ॥ अग्रे (द्वि.) सुग्रीवं अचिरेण हन्मि' सः मारुतिः दशग्रीववचः (मू.) दहन् इव [आह -]. ॥ २८ ॥ 'अधम, रावणकोटयः मे समाः न. (पू.) रामस्य दासः [अस्मि]. '॥ दशाननः हनूमतः वचः (मू.) राक्षसं अब्रवीत् - ॥२९॥

१ जाळणारा. २ नाहीं अंत पराक्रमाचा ज्याच्या, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

' - अरे ! बघतोस काय ? - ह्या वानराला मारून तुकडे उडव ! राक्षसांच्या सर्व मित्रांना आणि बांधवांना हा चमत्कार पाहूं दे ! ' पुढें तो महादैत्य शस्त्र उचलून मारुतीचा वध करण्यास उठला. तेव्हां विभीषणानें त्याचें निवारण करून ह्मटलें : – ' महाराज ! प्रतापशाली पुरुषांनीं, कांहीं झालें तरी, पर राजाकडील वानर मारणें योग्य होणार नाहीं. ॥ २९ ॥ ३० ॥ शिवाय, दूत - ह्मणून आलेल्या - ह्या वानराला मारिलें तर, तुह्मी ज्याच्यावर रोंख धरून हा वध करणार आहां (स्वतां रावणाचा वध होण्याचें बीज पेरीत आहां, असा विभीषणाच्या मनांतील गूढ आशय) त्या रामाला ही वार्ता जाऊन सांगेल कोण ? ॥ ३१ ॥ ह्मणून, - मी ह्मणतों कीं, ह्याला मारणें योग्य नाहीं तर - वधासारखेंच (अपमानद्योतक) दुसरें कांहीं

पार्श्वे स्थितं मारय खण्डशः कपिं पश्यन्तु सर्वे ऽसुरमित्रबान्धवाः ॥ निवारयामास ततो विभीषणो महासुरं सायुधमुद्यतं वधे ॥ राजन्वधार्हो न भवेत्कथंचन प्रतापयुक्तैः पराजवानरः ॥ ३० ॥ हते ऽस्मिन्वानरे दूते वार्तां को वा निवेदयेत् ॥ रामाय त्वं यमुद्दिश्य वधाय समुपस्थितः ॥ ३१ ॥ अतो वधसमं किंचिदन्यच्चिन्तय वानरे ॥ सचिह्नो गच्छतु हरिर्यं दृष्ट्वा ऽऽयास्यति द्रुतम् ॥ ३२ ॥

' कपिं खण्डशः (पू.) पश्यन्तु. ' ॥ (द्वि.) उद्यतं महासुरं निवारयामास – ॥ ' (मू.) कथंचन वधार्हः न भवेत्. ॥ ३० ॥ (पू.) हते [सति], रामाय कः वा वार्तां निवेदयेत् ? (मू.) ॥ ३१ ॥ अतः वानरे (३२ मू.) गच्छतु. सुग्रीवसहितः रामः यं दृष्ट्वा द्रुतं आयास्यति. ॥

१ शौर्ययुक्त पुरुषांनीं. २ पराजाकडील वानर. ३ वानर. ४ येईल.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करण्याचा विचार काढा. जें कांहीं कराल, त्याचें चिन्ह (निशाणी) ह्याच्या आंगावर राहावें. मग हा तिकडे जाईल; व तें चिन्ह दृष्टीस पडलें कीं सुग्रीवासह राम लवकर निघून येईल. नंतर त्याचें तुमचें युद्ध होईल ’ सुग्रीवाचें वचन ऐकिल्यावर रावणही ह्मणाला :– ॥ ३२ ॥ ३३ ॥ ‘ - विभीषण ह्मणतो तें देखील खरेंच आहे. बरें; - वानरांचा मोठा मान ह्मटला ह्मणजे शेपटीवर असतो, असें प्रसिद्ध आहे. ह्मणून, ह्याच्या शेपटीला वस्त्रें वगैरे चांगलीं घट्ट बांधा, ॥ ३४ ॥ त्यांना अग्नि लावा, ह्याची सगळ्या नगरभर धिंड काढा, आणि मग ह्याला सोडून द्या. सगळ्या वानरसेनापतींना तरी कळलेंच पाहिजे ! ’ ॥ ३५ ॥ राक्षसांनीं ‘बरें आहे’ असें ह्मणून मारुतीच्या शेपटीला तागाचीं फडकीं आणि दुसरींही अनेक प्रकारचीं वस्त्रें

रामः सुग्रीवसहितस्ततो युद्धं भवेत्तव ॥ विभीषणवचः श्रुत्वा रावणोऽप्येतद-ब्रवीत् ॥ ३३ ॥ वानराणां हि लांगूले[1] महामानो भवेत्किल ॥ अतो वस्त्रादिभिः पुच्छं वेष्टयित्वा प्रयत्नतः ॥ ३४ ॥ वह्निना योजयित्वैनं भ्रामयित्वा पुरेऽभितः ॥ विसर्जयत[3] पश्यन्तु सर्वे वानरयूथपाः ॥ ३५ ॥ तथेति शणपट्टैश्च[4] वस्त्रैरन्यैरनेकशः ॥ तैलाक्तैर्[5]वेष्टयामासुर्लांगूलं मारुतेर्दृढम् ॥ ३६ ॥ पुच्छाग्रे किंचिदनलं[6] दीपयित्वाऽथ राक्षसाः ॥

ततः तव युद्धं भवेत्.’॥रावणः अपि(मू.)–॥३२॥३३॥ (मू.)वेष्टयित्वा,॥३४॥(पू.)भ्रामयित्वा(मू.)पश्यन्तु.’॥३५॥अथ बलिनः असुराः राक्षसाः (३६पू.) तैलाक्तैः वस्त्रैः च मारुतेः लाङ्गूलं दृढं वेष्टयामासुः॥ ॥ ३७ ॥

१ शेंपटींत. २ गुरफाटून. ३ पाठवून द्या. ४ तागाच्या फडक्यांनीं. ५ तेलानें भिजविलेल्या. ६ अग्नीला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेलांत भिजवून घट्ट गुंडाळिलीं, पुच्छाच्या टोंकाला थोडासा अग्नि लावला. पुढें, महान् महान् बलाढ्य राक्षसांनीं दोऱ्यांनीं त्याला बळकट आंवळून धरून ॥ ३६ ॥ ३७ ॥ वाजत गाजत नगरांत चोहोंकडे फिरविलें, 'हा चोर आहे' असें सांगून दंवडी पिटली, आणि वारंवार त्याला पुष्कळसें बडविलें. ॥ ३८ ॥ हनुमंतानेंही तें सर्व सहन केलें; कारण, त्याच्या मनांत पुढें कांहींतरी करायाचें होतें. पश्चिमद्वाराजवळ जाऊन पोंचल्याबरोबर त्या ठिकाणीं मारुति ॥ ३९ ॥ अगदीं लहान झाला व बंधनांतून बाहेर निसटला. नंतर पुन्हां त्यानें पर्वतासारखें प्रचंड रूप धारण करून एकदम नगराच्या वेशीवर उडी मारिली, ॥ ४० ॥ तेथला एक खांब उपटून हातीं घेतला आणि त्याच्या योगानें एका क्षणांत आपल्या रक्षणासाठीं ह्मणून

रज्जुभिः[1] सुदृढं बद्ध्वा धृत्वा तं बलिनो ऽसुराः ॥ ३७ ॥ समंताद्भ्रामयामासुश्चोरो
ऽयामिति वादिनः ॥ तूर्यघोषैर्घोषयन्तस्ताडयन्तो[2] मुहुर्मुहुः ॥ ३८ ॥ हनूमता ऽपि
तत्सर्वं सोढं[3] किंचिच्चिकीर्षुणा ॥ गत्वा तु पश्चिमद्वारसमीपं तत्र मारुतिः ॥ ३९ ॥
सूक्ष्मो बभूव बन्धेभ्यो निःसृतः पुनरप्यसौ ॥ बभूव पर्वताकारस्तत उत्प्लुत्य गोपु[4]-
रम्[5] ॥ ४० ॥ तत्रैकं स्तम्भमादाय हत्वा तान् रक्षिणः क्षणात् ॥

(मू.) धृत्वा, ॥ ३६ ॥ ३७ ॥ (मू.) ताडयन्तः [सन्तः] समन्तात् भ्रामयामासुः. ॥ ३८ ॥ किंचित् चिकीर्षुणा (पू.). ॥ मारुतिः तत्र (मू.) गत्वा तु ॥ ३९ ॥ (पू.) पुनः अपि ॥ पर्वताकारः (मू.) उत्प्लुत्य ॥ ४० ॥ सः कपिः (४१ पू.) हत्वा, ॥

---

१ दोऱ्यांनीं. २ वाद्यांच्या गजरांनीं. ३ सोशिलें. ४ नगराच्या वेशीवर. ५ उडी मारून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आलेल्या सगळ्या राक्षसांना मारून टाकिलें. पुढें तो, आतां अवशिष्ट राहिलेलें कार्य (लंका जाळणें) करून टाकावें असा विचार ठरवून, ह्या वाड्यावरून त्या वाड्यावर त्या घरावरून दुसऱ्या घरावर ॥ ४१ ॥ उड्या मारीत चालला; त्या वानरानें - मशालीसारख्या - पेटलेल्या आपल्या प्रचंड पुच्छाच्या योगानें बाजार, वाडे, वेशी ह्यांसुद्धां सगळ्या लंकेला आग लाविली. ॥ ४२ ॥ दैत्यांच्या बायका वाड्यांच्या गच्च्यांवर चढून बसल्या होत्या. तेथें देखील चहूंकडून आगीचे लोळ चालूं लागले ! तेव्हां त्या 'हाय हाय ! बाबा ! मुला ! अहो पतिराज! ' असा आक्रोश करूं लागल्या.॥४३॥त्या सर्व स्त्रियांकडे पाहिलें असतां पाहणाराला, ह्या देवताच अग्नीमध्यें पडत आहेत कीं काय, असा भास होई ! (हा रावणाचा विपरीत काल समीप येऊन पोंचला असें सुचविणारा एक अपशकुनच होय.) असो. मारुतीनें विभीषणाचें घर सोडून बाकी सगळ्या नगराची राखरांगोळी उडविली ! ॥ ४४ ॥ नंतर वायुपुत्र हनुमान्

विचार्य कार्यशेषं स प्रासादाग्राद्गृहाद्गृहम्॥४१॥उत्प्लुत्योत्प्लुत्य संदीप्तपुच्छेन महता कपिः॥ ददाह लंकामखिलां साट्टप्रासादतोरणाम् ॥ ४२ ॥ हा तात पुत्र नाथेति क्रन्दमानाः समंततः ॥ व्याप्ताः प्रासादशिखरे ऽप्यारूढा दैत्ययोषितः ॥ ४३ ॥ देवता इव दृश्यन्ते पतन्त्यः पावके ऽखिलाः॥ विभीषणगृहं त्यक्त्वा सर्वं भस्मीकृतं पुरम् ॥ ४४ ॥ तत उत्प्लुत्य जलधौ हनुमान् मारुतात्मजः ॥

कार्यशेषं (४१ उ. ४२ पू.) महता सन्दीप्तपुच्छेन (मू.) लङ्कां ददाह. ॥ ४१ ॥ ४२ ॥ (मू.) ॥४३॥ पावके पतन्त्यः अखिलाः (मू.) भस्मीकृतं. ॥४४॥ ततः सः मारुतात्मजः हनुमान जलधौ उत्प्लुत्य,॥ ॥ ३८ ॥

१ वाड्यावरून. २ पेटलेल्या शेपटीनें. ३ बाजार, वाडे, दरवाजे ह्यांसहित. ४ दैत्यांच्या स्त्रिया. ५ आगींत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

उडी मारून समुद्रावर आला. तेथें त्यानें आपलें पुच्छ उदकांत बुडविलें. - काम मनाप्रमाणें पार पडलें ह्मणून - आतां त्याच्या चित्ताला स्वस्थता वाटली. ॥ ४५ ॥ अग्नीला दुहेरी भीड पडली होती : — एक - हनुमंताचा पिता - वायु स्वतांचा (अग्नीचा) प्रिय मित्र ह्मणून त्याची, आणि दुसरी सीतेनें प्रार्थना केली होती ह्मणून तिची; ह्या कारणामुळें अग्नीनें मारुतीचें पुच्छ किंचित् देखील भाजिलें नाहीं; उलट तो त्यावर अत्यंत शीतल होऊन राहिला होता. ॥ ४६ ॥ अहो ! ज्याचें केवल नामस्मरण केलें असतां लोक समस्त-पापरहित होतात. व तत्काल तापत्रयरूपी दुर्धर अग्नींतून देखील पार पडतात, त्या रघुवीराचाच मारुति हा मुख्य दूत. तेव्हां ह्याला लौकिक अग्नीपासून दाह होईल काय? कसा बरें होईल? ॥ ४७ ॥

॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे सुंदरकाण्डे चतुर्थः सर्गः ॥ ४ ॥

लांगूलं मज्जयित्वाऽन्तः स्वस्थचित्तो बभूव सः ॥ ४५ ॥ वायोः प्रियसखित्वाच्च सीतया प्रार्थितोऽनलः ॥ न ददाह हरेः पुच्छं बभूवात्यन्तशीतलः ॥ ४६ ॥ यन्नाम-संस्मरणधूतसमस्तपापास्तापत्रयानलमपीह तरन्ति सद्यः ॥ तस्यैव किं रघुवरस्य विशिष्टदूतः संतप्यते कथमसौ प्रकृतानलेन ॥ ४७ ॥ इति चतुर्थः सर्गः ॥ ४ ॥

अन्तः (मू.) बभूव. ॥ ४५ ॥ (पू.) ॥ हरेः पुच्छं (मू.) बभूव. ॥ ४६ ॥ (पू.) तरन्ति, ॥ असौ (मू.) किं कथं संतप्यते ? ॥ ४७ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये सुन्दरकाण्डे चतुर्थः सर्गः ॥४॥

१ बुडवून. २ ज्याच्या नांवाच्या स्मरणानें धुवून गेलीं समस्त पापें ज्यांचीं, असे. ३ अध्यात्म अधिदैव अधिभूत ह्या तापत्रयरूप अग्नीला. ४ तरतात. ५ मुख्य दूत. ६ लौकिक अग्नीनें. ७ भाजतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारुति सीतेचा निरोप घेतो.

पुढें, हनुमंतानें सीतेला नमस्कार करून ह्मटलें :– ' देवि! आतां तूं मला रामाकडे जाण्यास आज्ञा दे; ॥ १ ॥ ह्मणजे मी जातों. कनिष्ठबंधूसह राम तुझ्या भेटीसाठीं लवकरच येईल. ' इतकें बोलून मारुतीनें जानकीला तीन प्रदक्षिणा घातल्या, ॥ २ ॥ नमस्कार केला, व जायला निघतांना पुन्हां असें सांगितलें :– ' देवि! येतों आतां. तुला आनंदाचे दिवस लवकरच येतील. रामचंद्र, लक्ष्मण, त्याच्या बरोबर असंख्य वानरांसह सुग्रीव ही मंडळी थोड्याच अवकाशांत तुझ्या दृष्टीस पडेल. ' दुःखानें कृश होऊन गेलेली ती

ततः सीतां नमस्कृत्य हनूमानब्रवीद्वचः ॥ आज्ञापयतु मां देवि भवती रामसन्निधिम् ॥ १ ॥ गच्छामि रामस्त्वां द्रष्टुमागमिष्यति सानुजः ॥ इत्युक्त्वा त्रिः परि-[2]क्रम्य जानकीं मारुतात्मजः ॥ २ ॥ प्रणम्य प्रस्थितो गन्तुमिदं वचनमब्रवीत् ॥ देवि गच्छामि भद्रं ते तूर्णं द्रक्ष्यसि राघवम् ॥ ३ ॥ लक्ष्मणं च ससुग्रीवं वानरा-युत[3]कोटिभिः ॥ ततः प्राह हनूमन्तं जानकी दुःख[4]कर्शिता ॥ ४ ॥

ततः हनूमान् (पू.) अब्रवीत् – ' देवि, [1]भवती मां आज्ञापयतु. [अहं] (मू.) ॥ १ ॥ गच्छामि. सानुजः (पू.). ' ॥ मारुतात्मजः (मू.) त्रिःपरिक्रम्य, ॥ २ ॥ प्रणम्य गन्तुं प्रस्थितः [सन्] (२ पू.) ॥ – ' देवि, गच्छामि. ते भद्रं [अस्तु]. (३ उ. ४ पू.) [सहितं] ससुग्रीवं लक्ष्मणं च द्रक्ष्यसि. ' ॥ (मू.) जानकी हनूमन्तं प्राह – ॥ ३ ॥ ४ ॥

---

१ तूं. २ प्रदक्षिणा घालून. ३ दहा सहस्र वानरांच्या कोट्यवधि थव्यांशीं. ४ दुःखानें कृश झालेली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जानकी त्या वेळीं मारुतीला ह्मणाली :— ॥ ३ ॥ ४ ॥ ‘ बा हनुमंता ! तुझ्याकडे पाहून मी दुःख विसरल्यें होत्यें; आतां तूं चाललास ! ह्या पुढें रामाची वार्ता ऐकायाला मिळणार नाहीं; तेव्हां माझा वेळ तरी जाईल कसा ? ’ ॥ ५ ॥ मारुति ह्मणाला :— ‘ देवि जानकि ! असें असेल तर चल माझ्या खांद्यावर बैस. तुझ्या मनांत असेल तर मी एका क्षणांत तुझी रामाची भेट करून देतों. ’ ॥ ६ ॥ सीता ह्मणाली :— ‘ राम समुद्र शुष्क करून किंवा त्यावर बाणसमूहांच्या योगें सेतु बांधून वानरांसह येथें येईल व युद्धांत रावणाचा वध करून ॥ ७ ॥ जर मला घेऊन जाईल, तर रामाची कीर्ति चिरकाल राहील. ह्मणून - सांगत्यें कीं, -

त्वां दृष्ट्वा विस्मृतं दुःखमिदानीं त्वं गमिष्यसि ॥ इतः परं कथं वर्ते रामवार्ता-
श्रुतिं विना ॥ ५ ॥ मारुतिरुवाच ॥ यद्येवं देवि मे स्कन्धमारोह क्षणमात्रतः ॥ रामेण
योजयिष्यामि मन्यसे यदि जानकि ॥ ६ ॥ सीतोवाच ॥ रामः सागरमाशोष्य
बद्ध्वा वा शरपञ्जरैः ॥ आगत्य वानरैः सार्धं हत्वा रावणमाहवे ॥ ७ ॥ मां नयेद्यदि
रामस्य कीर्तिर्भवति शाश्वती ॥ अतो गच्छ कथं चापि प्राणान्संधारयाम्यहम् ॥ ८ ॥

‘त्वां दृष्ट्वा दुःखं (मू.) कथं वर्ते ?’ ॥ ५ ॥ मा० उ० – ‘देवि, यदि एवं, [तर्हि] (मू.). जानकि, [त्वं] यदि मन्यसे, [तर्हि आचर.] ’ ॥६॥ सी० उ० – ‘ (पू.) बध्वा वा, ॥ वानरैः सार्धं (मू.) रावणं हत्वा, ॥७॥ मां यदि नयेत्, [तर्हि] (मू.) कीर्तिः भवति. ॥ अतः गच्छ. अहं (मू.).’॥८॥

१ रामाच्या कथा ऐकणें. २ राहूं. ३ वर बस. ४ मनास वाटेल. ५ सुकवून. ६ बाणांच्या ताट्यांनीं. ७ बांधून. ८ युद्धांत. ९ नित्य राहणारी. १० धारण करीन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तूं जा. मी कसे तरी प्राण धरून राहीन.' ॥ ८ ॥ सीतेनें असा निरोप दिला. तेव्हां तो प्रतापी वानर, तिला वंदन करून, महासागराच्या पलिकडे जाण्यासाठीं पर्वताच्या शिखरावर गेला. ॥ ९ ॥ तेथें गेल्यावर तो महावीर, पायांनीं पर्वताला दाबून मोठ्या अवसानानें उडी मारून, वायुवेगानें चालता झाला. - त्याचा अतिशय भार पडल्यामुळें, इकडे तो - पर्वत जमिनींत इतका दबला, ॥ १० ॥ कीं, मूळचा तीस योजनें उंच होता तो आतां अगदीं पृथ्वीच्या सपाटीबरोबर झाला! मारुतीनें आकाशांत असतां मोठी गर्जना केली. ॥ ११ ॥ ती ऐकूं आल्याबरोबर सगळ्या वानरांना, मारुति आला, असें समजलें व पराकाष्ठेचा

इति प्रस्थापितो वीरः सीतया प्रणिपत्य ताम् ॥ जगाम पर्वतस्याग्रे गन्तुं पारं महोदधेः ॥ ९ ॥ तत्र गत्वा महासत्त्वः पादाभ्यां पीडयन् गिरिम् ॥ जगाम वायुवेगेन पर्वतश्च महीतलम् ॥ १० ॥ ततो महीसमानत्वं त्रिंशद्योजनमुच्छ्रितः ॥ मारुतिर्गगनान्तस्थो महाशब्दं चकार सः ॥ ११ ॥ तं श्रुत्वा वानराः सर्वे ज्ञात्वा मारुतिमागतम् ॥ हर्षेण महता ऽऽविष्टाः शब्दं चक्रुर्महास्वनम् ॥ १२ ॥

सीतया (पू.) प्रणिपत्य, ॥ महोदधेः पारं गन्तुं (मू.) जगाम. ॥९॥ महासत्त्वः [सः] (पू.) पीडयन् ॥ वायुवेगेन जगाम. (मू.) [जगाम]. ॥१०॥ (पू.) [अपि पर्वतः] महीसमानत्वं [जगाम].॥ गगनान्तस्थः सः (मू.). ॥ ११ ॥ सर्वे वानराः (पू.) ज्ञात्वा महता हर्षेण आविष्टाः [सन्तः] महास्वनं (मू.), [ऊचुः च] – ॥ १२ ॥

१ महासागराच्या. २ दाबणारा. ३ तीस योजनें. ४ उंच. ५ भूमीच्या सपाटीला. ६ आकाशामध्यें असलेला. ७ मोठा दणदणणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आनंद झाला. त्यांनींही, प्रतिध्वनि उठेल, इतका मोठा भुभुःकार केला. ॥ १२ ॥ - कांहींजण ह्मणाले :- ‘ अहो! ही गर्जना मारुतीचीच. ह्या शब्दावरूनच, तो काम करून आला, असें खात्रीनें समजतें. - दुसरे ह्मणाले :- ‘ वानरहो! तोच तोच! हा पहा तो वानरपुंगव - अगदीं आपल्या जवळ येऊन पोंचला!’ - ॥ १३ ॥ अशीं त्या वानरवीरांचीं भाषणें चाललीं आहेत, इतक्यांत मारुति पर्वताच्या शिखरावर उतरला. - आल्याबरोबर - त्यानें वानरांना सांगितलें कीं, ॥ १४ ॥ ‘ सीता दृष्टीस पडली! मी लंकेचा आणि तेथील उपवनाचा सत्यानास उडविला, रावणाशीं संभाषण केलें, आणि नंतर पुन्हां इकडे निघून आलों.’ ॥ १५ ॥ ‘ आतांच्या आतां आपण रामाच्या आणि सुग्रीवाच्या भेटीला जाऊं चला!’

शब्देनैव विजानीमः कृतकार्यः समागतः ॥ हनूमानेव पश्यध्वं वानरा वानरर्ष-भम् ॥ १३ ॥ एवं ब्रुवत्सु वीरेषु वानरेषु स मारुतिः ॥ अवतीर्य गिरेर्मूर्ध्नि वानरा-निदमब्रवीत् ॥ १४ ॥ दृष्टा सीता मया लंका धर्षिता च सकानना ॥ संभाषितो दशग्रीवस्ततोऽहं पुनरागतः ॥ १५ ॥ इदानीमेव गच्छामो रामसुग्रीवसन्निधिम् ॥ इत्युक्त्वा वानराः सर्वे हर्षेणालिंग्य मारुतिम् ॥ १६ ॥

‘ वानराः, (पू.) हनूमान् एव समागतः (मू.) पश्यध्वं.’ ॥ १३ ॥ (पू.) एवं ब्रुवत्सु [सत्सु], सः मारुतिः ॥ गिरेः मूर्ध्नि (मू.) – ॥ १४ ॥ ‘ मया सीता (पू.) लङ्का च धर्षिता. ॥ दशग्रीवः (मू.).’ ॥ १५ ॥ सर्वे वानराः (पू.) गच्छामः, (मू.) आलिङ्ग्य – ॥ १६ ॥

१ पाहा. २ शिखरावर. ३ घाबरविलेली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असें ह्मणून सर्व वानर आनंदानें मारुतीला आलिंगन देण्यास पुढें आले. ॥ १६ ॥ - परंतु सगळ्यांना एकदम भेटतां येईना. ह्मणून - कांहींनीं त्याच्या पुच्छाचें चुंबन घेतलें; कित्येकांना तर इतकी उत्कंठा झाली कीं, ते नाचूं उडूं लागले! पुढें ते सर्वजण मारुतीच्या समागमें प्रस्त्रवण पर्वतावर जावयास निघाले. ॥ १७ ॥ जातांना - वाटेमध्यें, - सुग्रीवानें राखून ठेवलेलें 'मधु' नांवाचें एक वन त्या वीरांच्या दृष्टीस पडलें. तेव्हां ते प्रतापी वानर अंगदाला ह्मणूं लागले :-॥१८॥ 'राजपुत्रा! तूं शूर व महाबुद्धिमान् आहेस. - आपल्याला किती त्रास पडला, काय कष्ट झाले व खायला किती दिवसांत मिळालें नाहीं तें तुला विदित आहेच. - आह्मांला तर फारच क्षुधा लागली आहे; तूं अनुज्ञा दे ह्मणजे आह्मी आज येथील फळें खातों व अमृतासारखें मधुर मद्य प्राशन करितों. ॥ १९ ॥ खायला प्यायला मिळालें कीं मग आमच्या मनांला उल्हास वाटेल.

केचिच्चुचुम्बुर्लांगूलं ननृतुः केचिदुत्सुकाः ॥ हनूमता समेतास्ते जग्मुः प्रस्रवणं गिरिम्
॥ १७ ॥ गच्छन्तो ददृशुर्वीरा वनं सुग्रीवरक्षितम् ॥ मधुसंज्ञं तदा प्राहुरंगदं वानर-
र्षभाः ॥१८॥ क्षुधिताः स्मो वयं वीर देह्यनुज्ञां महामते ॥ भक्षयामः फलान्यद्य पिबामो
ऽमृतवन्मधु ॥ १९ ॥ संतुष्टा राघवं द्रष्टुं गच्छामो ऽद्यैव सानुजम् ॥ २० ॥

केचित् लाङ्गूलं[1] (पू.) [सन्तः] ननृतुः[2]. ॥ (मू.) जग्मुः[3]. ॥ १७ ॥ गच्छन्तः वीराः वानरर्षभाः (मू.) वनं ददृशुः, तदा अङ्गदं प्राहुः - ॥ १८ ॥ 'वीर महामते, वयं (पू.) देहि. ॥ अद्य फलानि (मू.) पिबामः[4]. ॥ १९ ॥ सन्तुष्टाः [वयं] (मू.) राघवं द्रष्टुं गच्छामः.' ॥ २० ॥

१ शेंपटाला. २ नाचले. ३ गेले. ४ पिऊं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंतर लवकरच, आपण कनिष्ठ बंधूसह रामाच्या दर्शनास जाऊं.' ॥ २० ॥ अंगद ह्मणाला :– 'वानरवीरांनो ! हा हनुमान कार्य करून आला आहे; ह्याच्या अनुग्रहाचें फळ ह्मणून मद्य प्राशन करावयाचें. हँ प्या; फळें मुळें खा. चला लवकर आटपा.' ॥ २१ ॥ नंतर वानरांनीं उपवनांत शिरून मद्य पिण्यास प्रारंभ केला. दधिवक्रानें (मुख्यरक्षकानें) पाठविलेल्या रक्षकांना ते मुळींच मोजीनात. ॥ २२ ॥ - वनाचें रक्षण करण्याच्या कामावर असलेले - वीर वानर मद्य पिणाऱ्या ह्या वानरांना मारूं लागले. तेव्हां ह्यांनींही उलट लाथा बुक्या मारून त्यांचीं हाडें नरम केलीं आणि पुन्हां मद्यप्राशन चालविलें. ॥ २३ ॥ दधिवक्र हा सुग्रीवाचा मामा होता. - ह्या उपमर्दामुळें व दांडगाईमुळें - त्याला संताप आला. तो रक्षकांना बरोबर

अंगद उवाच । हनूमान्कृतकार्यो ऽयं पि[1]बतैतत्प्रसादतः ॥ जक्षध्वं फलमूलानि त्वरितं हरिसत्तमाः ॥ २१ ॥ ततः प्रविश्य हरयः पातुमारेभिरे मधु ॥ रक्षिणस्ताननादृत्य दधिवक्रेण नोदि[4]तान् ॥ २२ ॥ पि[9]बतस्ताडयामासुर्वानरान्वानरर्षभाः ॥ ततस्तान्मुष्टिभिः पादैश्चूर्णयित्वा पपुर्मधु ॥ २३ ॥ ततो दधिमुखः क्रुद्धः सुग्रीवस्य स मातुलः ॥ जगाम रक्षिभिः सार्धं यत्र राजा कपीश्वरः ॥ २४ ॥

अङ्गदः उ० – 'अयं (पू.) पि[1]बत. ॥ हरि[2]सत्तमाः, (मू.) [3]भक्षध्वं.' ॥ २१ ॥ ततः हरयः (मू.) तान् [5]रक्षिणः [6]अनादृत्य, मधु [7]पातुं [8]आरेभिरे. ॥ २२ ॥ वानरर्षभाः (पू.) ताडयामासुः. ॥ (मू.) प[10]पुः. ॥ २३ ॥ (पू.) दधिमुखः ॥ (मू.), [तत्र] रक्षिभिः सार्धं जगाम. ॥ २४ ॥

१ प्या. २ वानरश्रेष्ठहो. ३ खा. ४ प्रेरिलेल्या. ५ रक्षकांना. ६ न जुमानून. ७ पिण्यास. ८ आरंभ करिते झाले. ९ पिणाऱ्या. १० प्याले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'बरं! काम झालेंच तर!'

घेऊन, वानरांचा राजा सुग्रीव जेथें होता, त्या ठिकाणीं ॥ २४ ॥ गेला व त्याला सांगूं लागला :– 'राजा! फार दिवसांपासून जतन करून ठेवलेल्या तुझ्या मधुवनाची आज अंगदानें आणि मारुतीनें नासाडी उडविली!' ॥ २५ ॥ दधिमुखानें सांगितलेली गोष्ट ऐकून सुग्रीवाच्या मनाला - वाईट न वाटतां उलट - हर्ष झाला. - तो ह्मणाला :- 'वायुपुत्र सीतेचा शोध लावून आला, ह्याबद्दल संशयच नाहीं. ॥ २६ ॥ तसें नसेल तर माझ्या मधुवनाकडे नुसतें बघण्याचें तरी कोणाचें सामर्थ्य आहे? त्यांत देखिल कार्य मारुतीनेंच केलें असलें पाहिजे, ह्यांत संशय नाहीं.' ॥ २७ ॥ सुग्रीवाचें वचन - ओझरतें ओझरतें - ऐकिल्यावर राम आनंदित होऊन त्याला ह्मणाला :– 'राजा! तूं - दधिवक्राजवळ - जें कांहीं भाषण केलेंस,

गत्वा तमब्रवीद्देव चिरकालाभिरक्षितम्[1] ॥ नष्टं मधुवनं तेऽद्य कुमारेण[2] हनूमता ॥ २५ ॥ श्रुत्वा दधिमुखेनोक्तं सुग्रीवो हृष्टमानसः ॥ दृष्ट्वाऽऽगतो न संदेहः सीतां पवननन्दनः ॥ २६ ॥ नो चेन्मधुवनं द्रष्टुं समर्थः को भवेन्मम ॥ तत्रापि वायुपुत्रेण कृतं कार्यं न संशयः ॥ २७ ॥ श्रुत्वा सुग्रीववचनं हृष्टो रामस्तमब्रवीत् ॥ किमुच्यते त्वया राजन्वचः सीताकथान्वितम् ॥ २८ ॥

(पू.) ॥ ते मधुवनं (मू.) [च] नष्टं. ॥ २५ ॥ (पू.) श्रुत्वा हृष्टमानसः सुग्रीवः [उवाच –] 'पवननन्दनः सीतां (मू.). ॥ २६ ॥ नो चेत् मम (पू.) समर्थः भवेत्? ॥ (मू.) कृतं; संशयः न.' ॥ २७ ॥ सुग्रीववचनं (पू.) – ॥ 'राजन, (मू.) किं वचः उच्यते?' ॥ २८ ॥

१ फार दिवस राखून ठेविलेलें. २ मुलानें – राजपुत्रानें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यांत सीतेची गोष्ट निघाली होती. काय बोललास - सांग पाहूं. - ' ॥ २८ ॥ सुग्रीवानें सांगितलें :- ' देवा ! सीतेचा शोध लागला ! कारण, मारुतिप्रभृति सर्व वानर मधुवनांत शिरले आहेत; ॥ २९ ॥ त्यांनीं तेथील सगळे - भक्ष्य पदार्थ - खाऊन टाकिले व रक्षकांना ताडण केलें : रामचंद्रा ! तुझें कार्य केल्या-शिवाय माझ्या मधुवनाकडे नुसतें बघणें देखील ॥ ३० ॥ त्यांच्यानें झालें नसतें. ह्यावरून त्यांनीं सीतादे-वीचा शोध लाविला हें निश्चित आहे. रक्षकांनो ! तुह्मी भिऊं नका; जा; माझ्या आज्ञेवरून त्यांना, - मी बोलावलें आहे, ह्मणून - सांगा. ॥ ३१ ॥ व अंगदप्रभृति वानरांना माझ्याजवळ घेऊन या.' सुग्रीवाचें

सुग्रीवस्त्वब्रवीद्वाक्यं देव दृष्टाऽवनीसुता ॥ हनूमत्प्रमुखाः सर्वे प्रविष्टा मधुकाननम् ॥ २९ ॥ भक्षयन्ति स्म सकलं ताडयन्ति स्म रक्षिणः ॥ अकृत्वा देव कार्यं ते द्रष्टुं मधुवनं मम ॥३०॥ न समर्थास्ततो देवी दृष्टा सीतेति निश्चितम्॥ रक्षिणो वो भयं माऽस्तु गत्वा ब्रूत ममाज्ञया ॥ ३१ ॥ वानरानंगदमुखानानयध्वं ममान्तिकम् ॥ श्रुत्वा सुग्रीववचनं गत्वा ते वायुवेगतः ॥ ३२ ॥

(पू.) अब्रवीत् - 'देव, अवनी[1]सुता दृष्टा ! ॥ (मू.) प्रविष्टाः, ॥ २९ ॥ सकलं (पू.) ताडयन्ति स्म. ॥ देव, ते कार्यं अकृत्वा मम मधुवनं द्रष्टुं ॥ ३० ॥ (मू.) ब्रूत[2]. ॥ ३१ ॥ अङ्गदप्रमुखान (पू.) आनयध्वं[3]. ' ॥ ते सुग्रीववचनं (पू.) गत्वा, ॥ ३२ ॥

१ पृथ्वीची कन्या. २ सांगा. ३ आण'.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वानर रामाजवळ आले.

भाषण ऐकल्याबरोबर ते रक्षक वायुवेगानें गेले ॥ ३२ ॥ आणि मारुति आदिकरून वानरांना सांगूं लागले कीं, ' तुह्मांला महाराजांनीं - लवकर येण्याविषयीं - आज्ञा दिली आहे. जा. रामलक्ष्मणांसह सुग्रीव तुमच्या भेटीची इच्छा करीत आहे; ॥ ३३ ॥ महावीरहो ! त्या तिघांना अत्यंत आनंद झाला असून त्यांनीं तुह्मांला लवकर येण्यास सांगितलें आहे. ' ते श्रेष्ठ वानर ' बरें ' ह्मणून आकाशांत जाऊन (उड्या मारून) तिकडे चालले. ॥ ३४ ॥ तेथें पोंचल्याबरोबर त्यांनीं हनुमंताला आणि युवराज अंगदाला पुढें करून रामाच्या व सुग्रीवाच्या अग्रभागीं भूमीवर लोटांगणें घातलीं. ॥ ३५ ॥ हनुमंतानें - भूमीवर उतरण्यापूर्वी (आकाशांतूनच) रामाला ' मी सीतेला पाहून आलों; ती खुशाल आहे ' असें सांगितलें, नंतर रामाच्या आणि

हनूमत्प्रमुखानूचुर्गच्छतेश्वरशासनात्॥द्रष्टुमिच्छति सुग्रीवः सरामो लक्ष्मणान्वितः ॥ ३३ ॥ युष्मानतीव हृष्टास्ते त्वरयन्ति महाबलाः॥ तथेत्यम्बरमासाद्य ययुस्ते वानरोत्तमाः ॥ ३४ ॥ हनुमन्तं पुरस्कृत्य युवराजं तथांगदम् ॥ रामसुग्रीवयोरग्रे निपेतुर्भुवि सत्वरम् ॥ ३५ ॥ हनूमान् राघवं प्राह दृष्टा सीता निरामया ॥ साष्टांगं प्रणिपत्याग्रे रामं पश्चाद्धरीश्वरम् ॥ ३६ ॥

(३३ पू.) – 'ईश्वरशासनात् गच्छत. ॥ (३३ उ.) सुग्रीवः युष्मान् द्रष्टुं इच्छति. (३४ पू.) त्वरयन्ति.' ॥ ते वानरोत्तमाः (मू.), ॥ ३३ ॥ ३४ ॥ हनुमन्तं तथा (पू.) [च] पुरस्कृत्य ॥ (मू.) निपेतुः. ॥३५॥ (पू.) – '[मया] सीता निरामया दृष्टा' ॥ (मू.) साष्टांगं प्रणिपत्य [प्राह] – ॥३६॥

१ तुह्मांला. २ आकाशांत. ३ पोंचून. ४ पुढें करून. ५ निरोगी (खुशाल).

॥ ४३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याच्या मागून सुग्रीवाच्या पुढें साष्टांग नमस्कार घातला, व सर्व वृत्त विस्तारानें - सांगण्यास प्रारंभ केला :- ॥ ३६ ॥ " राजाधिराजा! जानकीनें तुला खुशाली कळविण्यास सांगितलें आहे. ती शोकानें व्याप्त झालेली असून अशोकवनिकेंत शिंशपावृक्षाच्या मूळाशीं बसली आहे; ॥ ३७ ॥ प्रभो! तिच्या भोंवतीं राक्षसींचा वेढा असतो; तिनें अन्न वर्ज करून शरीर कृश केलें आहे; ती एक सारखी 'हा रामा! रामा! रामा!' असा शोक करीत असत्ये; आंगावरचें वस्त्र मळकट असतें; ॥ ३८ ॥ वेणी एक (तुझ्या जवळ असतांना जशी होती तशीच) आहे, असें मला दिसून आलें. पुढें, मी वृक्षाच्या फांदीवर एका ठिकाणीं सूक्ष्मरूपानें बसून तुझी कथा वर्णन केली आणि त्या सुंदरीला आश्वासन दिलें : तो प्रकार येणेंप्रमाणें :- ॥ ३९ ॥ मी तुझी कथा जन्मापासून विस्तारानें वर्णन करूं लागलों :- तूं दंडकारण्यांत आलास; तूं जवळ नसतांना

कुशलं प्राह राजेन्द्र जानकी त्वां शुचा[1]ऽन्विता ॥ अशोकवनिकामध्ये शिंशपामूलमाश्रिता ॥३७॥ राक्षसीभिः परिवृता निराहारा कृशा प्रभो ॥ हा राम राम रामेति शोचन्ती मलिनाम्बरा[2] ॥ ३८ ॥ एकवेणी मया दृष्टा शनैराश्वासिता शुभा ॥ वृक्षशाखान्तरे स्थित्वा सूक्ष्मरूपेण ते कथाम् ॥ ३९ ॥ जन्मारभ्य तवात्यर्थं दण्डकागमनं तथा ॥ दशाननेन हरणं जानक्या रहिते त्वयि ॥ ४० ॥

'(मू.) जानकी त्वां कुशलं प्राह. ॥ ३७ ॥ (मू.) ॥ ३८ ॥ शुभा एकवेणी [सा] (पू.) [च] – ॥ [अहं] (मू.) स्थित्वा ते कथां [अवोचम्] – ॥३९॥ (पू.), त्वयि रहिते [सति] जानक्याः ॥४०॥

१ शोकानें. २ मळकट वस्त्र जिचें अशी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारुति तिक-डील वृत्तांत सांगतो.

रावणानें जानकीला चोरून नेलें; ॥ ४० ॥ पुढें तूं सुग्रीवाशीं मैत्री करून वालीचा नाश केलास; सुग्रीवानें जानकीच्या शोधार्थ महाशक्तिमान् महाचतुर व इंद्रियनिग्रही असे वानर पाठविले; ते सगळेजण वेगवेगळ्या दिशांस गेले; त्यांपैकीं एक मी इकडे (लंकेंत) आलों; ॥ ४१ ॥ ४२ ॥ मी सुग्रीवाचा मंत्री व रामाचा दास आहें, जानकी दृष्टीस पडली हें माझें मोठें भाग्य, आज माझा यत्न सफळ झाला.॥ ४३ ॥ असें मी केलेलें वर्णन ऐकल्याबरोबर सीतेनें - आनंदित होऊन - डोळे उघडले (प्रफुल्लित, टवटवीत केले) - व ह्मटलें :- ' कानांला अमृतासारखे वाटणारे हे मंजुळ शब्द कोणी बरें मला ऐकविले? ॥ ४४ ॥

सुग्रीवेण यथा मैत्री कृत्वा वालिनिबर्हणम्[१] ॥ मार्गणार्थं[३] च वैदेह्या[२] सुग्रीवेण विसर्जिता:[४] ॥ ४१ ॥ महाबला महासत्त्वा हरयो जितकाशिन:[५] ॥ गताः सर्वत्र सर्वे वै तत्रैको ऽहमिहागतः ॥ ४२ ॥ अहं सुग्रीवसचिवो दासो ऽहं राघवस्य हि ॥ दृष्टा यज्जानकी भाग्यात्प्रयासः फलितो ऽद्य मे ॥ ४३ ॥ इत्युदीरितमाकर्ण्य सीता विस्फारितेक्षणा[६] ॥ केन वा कर्णपीयूषं श्रावितं मे शुभाक्षरम् ॥ ४४ ॥

वालिनिबर्हणं कृत्वा यथा सुग्रीवेण मैत्री [सफला कृता], वैदेह्याः (मू.) ॥ ४१ ॥ (पू.) सर्वे हरयः सर्वत्र (मू.). ॥ ४२ ॥ (पू) दासः. यत् [मया] भाग्यात् जानकी दृष्टा, अतः मे (मू.). ' फलितः ! ॥ ४३ ॥ (पू.) सीता [उवाच –] ॥ (मू.) श्रावितं. ॥ ४४ ॥

१ वालीच्या वधास. २ जानकीच्या. ३ शोधाकरितां. ४ पाठविलेले. ५ प्राणवायु जिंकून ज्यांनीं इंद्रियें स्वाधीन करून घेतलीं, असे. ६ उघडले डोळे जिनें अशी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हें खरें असेल तर त्यानें (बोलणारानें) माझ्या दृष्टीसमोर यावें (दृष्टीस पडावें).' ह्या वेळीं माझें शरीर वानरासारखेंच पण लहान होतें. मी त्याच रूपानें ॥ ४५ ॥ जानकीला वंदन केलें आणि हात जोडून कांहीं अंतरावर उभा राहिलों. ईश्वरा ! पुढें जानकीनें मला 'तूं कोण ?' इत्यादि पुष्कळसे प्रश्न विचारिले. ॥ ४६ ॥ हे शत्रुनाशना ! मी सर्व वृत्तांत अनुक्रमानेंच देवीला कळविला, आणि शेवटीं तूं दिलेली मुद्रिका दिली, ॥ ४७ ॥ त्यामुळें तिला माझा पूर्ण विश्वास आला, व ती मला ह्मणाली: – 'हनुमंता ! माझे रात्रं-

यदि सत्यं तदा ऽऽयातु मद्दर्शनपथं तु सः ॥ ततो ऽहं वानराकारः सूक्ष्मरूपेण जानकीम् ॥ ४५ ॥ प्रणम्य प्राञ्जलिर्भूत्वा दूरादेव स्थितः प्रभो ॥ पृष्टो ऽहं सीतया कस्त्वमित्यादि बहुविस्तरम् ॥ ४६ ॥ मया सर्वं क्रमेणैव विज्ञापितम-रिन्दम[3] ॥ पश्चान्मया ऽर्पितं देव्यै भवद्दत्तांगुलीयकम् ॥ ४७ ॥ तेन मामतिवि-श्वता वचनं चेदमब्रवीत् ॥ यथा दृष्टा ऽस्मि हनुमन्पीड्यमाना दिवानिशम् ॥ ४८ ॥

(पू.) [1]मद्दर्शनपथं [2]आयातु. ॥ ततः वानराकारः (मू.) ॥ ४५ ॥ (पू.), ॥ सीतया अहं '(मू.)' पृष्टः. ॥ ४६ ॥ अरिन्दम, (मू.) अर्पितं. ॥ ४७ ॥ (४८ पू.) [सा] इदं वचनं अब्रवीत् – 'हनुमन, राक्षसीनां [4]तर्जनैः [5]दिवानिशं [6]पीड्यमाना (४८ उ.)

१ माझ्या दृष्टिमार्गास. २ येवो. ३ शत्रूंस दमविणाऱ्या. ४ भीति दाखविण्यांनीं. ५ दिवसरात्र. ६ पीडली जाणारी.

५।१२

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दिवस कसकसे छळ चालतात, राक्षसी मला कशा भिववितात, तें सर्व तूं पाहिलेंच आहेस; ह्या सगळ्या गोष्टी रामाला कळव.' मी ह्मटलें: –'देवि ! राम देखील एकसारखा तुझ्याविषयीं काळजींतच आहे, ॥ ४८ ॥ ४९ ॥ तुझी वार्ता कांहींच कळत नाहीं, ह्मणून तो अहोरात्र शोक करीत असतो. आतांच मी जाऊन तुझी काय स्थिति आहे, ती रामाला कळवितों. ॥ ५० ॥ ऐकतांक्षणींच राम सुग्रीव, लक्ष्मण, वानरसेनापति, ह्यांना बरोबर घेऊन तुजकडे येईल, ॥ ५१ ॥ व रावणाचा कुलासह निःपात करून तुला आपल्या राजधानीस घेऊन जाईल. पण, देवि ! प्रभु रामचंद्राला माझा विश्वास पटेल, अशी कांहीं तरी खूण दे.' ॥ ५२ ॥

राक्षसीनां तर्जनैस्तत्सर्वं कथय राघवे ॥ मयोक्तं देवि रामोऽपि त्वच्चिंन्तापरिनिष्ठितः ॥ ४९ ॥ परिशोचत्यहोरात्रं त्वद्वार्तां नाधिगम्य सः ॥ इदानीमेव गत्वाऽहं स्थितिं रामाय ते ब्रुवे ॥ ५० ॥ रामः श्रवणमात्रेण सुग्रीवेण सलक्ष्मणः ॥ वानरानीकपैः सार्धमागमिष्यति तेऽन्तिकम् ॥ ५१ ॥ रावणं सकुलं हत्वा नेष्यति त्वां स्वकं पुरम् ॥ अभिज्ञां देहि मे देवि यथा मां विश्वसेद्विभुः ॥ ५२ ॥

(४९ पू.) कथय. ' ॥ (मू.) [अस्ति]. ॥ ४८ ॥ ४९ ॥ सः (पू.) अहोरात्रं परिशोचति[2]. अहं (मू.) स्थितिं ब्रुवे[3]. ॥ ५० ॥ सलक्ष्मणः (पू.), ॥ वानरानीकपैः[4] [च] (मू.) आगमिष्यति, ॥ ५१ ॥ सकुलं (पू.) नेष्यति. ॥ देवि, विभुः (मू.), [तथा] मे अभिज्ञां[5] देहि. ॥ ५२ ॥

१ तुझ्याविषयीं काळजींत पडून राहिलेला. २ शोक करितो. ३ सांगतों. ४ वानरसेनेच्या नायकांशीं. ५ खूण.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मी असें ह्मटलें, तेव्हां तिनें आपल्या केशपाशांत असलेला आवडता चूडामणि काढून मजजवळ दिला, आणि - खुणेची गोष्ट ह्मणून - पूर्वी चित्रकूट पर्वतावर कावळ्याचा जो प्रकार घडला ॥ ५३ ॥ तोही सांगितला. ह्यावेळीं तिचे नेत्र आंसवांनीं भरून गेले होते. शेवटीं तिनें मला आणखी सांगितलें, 'रामाला माझी खुशाली कळव आणि लक्ष्मणाला सांग कीं, मी पूर्वी तुला जे अपशब्द बोलल्यें ॥ ५४ ॥ त्यांची क्षमा कर; बा कुलनंदना ! तसें भाषण केलें हा माझा केवळ मूर्खपणा होय; आतां तूं मजविषयीं दयाळु होऊन राम मला सोडवायाला येईल, अशी व्यवस्था कर.' ॥ ५५ ॥ सीतेनें रडत रडत असें भाषण केलें. तिला पराकाष्ठेचें

इत्युक्ता सा शिरोरत्नं चूडापाशे स्थितं प्रियम् ॥ दत्वा काकेन यद्वृत्तं[1] चित्रकूट-
गिरौ पुरा ॥ ५३ ॥ तदप्याहाश्रुपूर्णाक्षी कुशलं ब्रूहि राघवम् ॥ लक्ष्मणं ब्रूहि मे
किंचिद्दुरुक्तं[2] भाषितं पुरा ॥ ५४ ॥ तत्क्षमस्वा[4]ज्ञभावेन भाषितं कुलनन्दन ॥
तारयेन्मां यथा रामस्तथा कुरु कृपान्वितः ॥ ५५ ॥ इत्युक्त्वा रुदती सीता
दुःखेन महता ऽऽवृता ॥ मया ऽप्याश्वासिता राम वदता सर्वमेव ते ॥ ५६ ॥

(पू.) शिरोरत्नं दत्वा ॥ पुरा चित्रकूटगिरौ (मू.), ॥ तत् अपि आह. अश्रुपूर्णाक्षी [सती संदेशं च आह –] ' राघवं (५४ पू.). ॥ लक्ष्मणं ब्रूहि – पुरा मे [यत्] (मू.), ॥ ५३ ॥५४ ॥ (पू.), [तत्] अ[3]ज्ञभावेन भाषितं; ॥ [त्वं] कृपान्वितः [सन्] रामः यथा मां (मू.). ॥५५॥ (पू.) दुःखेन आवृता [आसीत्]. ॥ राम, ते सर्वं एव वदता मया अपि [सा] (मू.). ' ॥५६ ॥

---

१ वृत्तं घडलेलें. २ दुर्भाषण. मागें अरण्यकांड स. ७ श्लोक ३२।३३।३४ पहा. ३ अजाणपणानें. ४ क्षमा कर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राम मारुती चे आभार मानितो.

दुःख झालें होतें. रामा, मीही तुझी सर्व स्थिति (शोकावस्था) सांगून तिला आश्वासन दिलें. ॥ ५६ ॥ रामा ! नंतर तिनें मला जावयास अनुज्ञा दिली व मी इकडे तुझ्या जवळ निघून आलों. येतां येतां, मी रावणाची प्रिय अशोकवनिका ॥ ५७ ॥ उपटून टाकिली, क्षणमात्रांत तेथील पुष्कळ राक्षसांना मारिलें, रावणाच्या पुत्राचा वध केला, रावणाशीं संभाषण केलें, ॥ ५८ ॥ सगळी लंका जाळिली आणि पुन्हां लागलाच इकडे निघून आलों." हनुमंताचें भाषण ऐकिल्यावर रामाच्या मनाला अतिशय हर्ष झाला. ॥५९॥ - तो ह्मणाला : - 'मारुते ! जें कार्य देवांना देखील करायाला फार कठिण गेलें असतें, तें तूं पार पाडिलेंस. ह्यामुळें तुझा मजवर जो उपकार झाला, त्याची फेड कशानें होणार, तें मला कळत नाहीं. ॥ ६० ॥

ततः प्रस्थापितो राम त्वत्समीपमिहागतः ॥ तदा ऽऽगमन[1]वेलायामशोकवनिकां प्रियाम् ॥५७॥ उत्पाट्य राक्षसांस्तत्र बहून्हत्वा क्षणादहम् ॥ रावणस्य सुतं हत्वा रावणेनाभि[3]भाष्य च ॥ ५८ ॥ लंकामशेषतो दग्ध्वा पुनरप्यगमं क्षणात् ॥ श्रुत्वा हनुमतो वाक्यं रामो ऽत्यन्तप्र[4]हृष्टधीः ॥ ५९ ॥ हनुमंस्ते कृतं कार्यं देवैरपि सुदुष्करम् ॥ उपकारं न पश्यामि तव प्रत्युपकारिणः ॥ ६० ॥

राम, ततः प्रस्थापितः [अहं] (मू.) अशोकवनिकां ॥ ५७ ॥ तत्र [वृक्षान् च] [2]उत्पाट्य, अहं बहून् (पू.) हत्वा, (मू.) ॥५८॥ (पू.) अगमं." ॥ हनुमतः वाक्यं (मू.) रामः [उवाच-] ॥ ५९ ॥ (पू.). ॥ प्रत्युपकारिणः तव उपकारं न पश्यामि. ॥ ६० ॥

१ येतेवेळीं. २ उपटून. ३ बोलून. ४ अत्यंत आनंदलें मन ज्याचें असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राम मारुती चे आभार मानितो.

दुःख झालें होतें. रामा, मीही तुझी सर्व स्थिति (शोकावस्था) सांगून तिला आश्वासन दिलें. ॥ ५६ ॥
रामा ! नंतर तिनें मला जावयास अनुज्ञा दिली व मी इकडे तुझ्या जवळ निघून आलों. येतां येतां, मी
रावणाची प्रिय अशोकवनिका ॥ ५७ ॥ उपटून टाकिली, क्षणमात्रांत तेथील पुष्कळ राक्षसांना मारिलें,
रावणाच्या पुत्राचा वध केला, रावणाशीं संभाषण केलें, ॥ ५८ ॥ सगळी लंका जाळिली आणि पुन्हां
लागलाच इकडे निघून आलों." हनुमंताचें भाषण ऐकिल्यावर रामाच्या मनाला अतिशय हर्ष झाला. ॥५९॥
- तो ह्मणाला :- ' मारुते ! जें कार्य देवांना देखील करायाला फार कठिण गेलें असतें, तें तूं पार पाडिलेंस.
ह्यामुळें तुझा मजवर जो उपकार झाला, त्याची फेड कशानें होणार, तें मला कळत नाहीं. ॥ ६० ॥

ततः प्रस्थापितो राम त्वत्समीपमिहागतः ॥ तदा ऽऽगमन[1]वेलायामशोकवनिकां
प्रियाम् ॥५७॥ उत्पाट्य[2] राक्षसांस्तत्र बहून्हत्वा क्षणादहम् ॥ रावणस्य सुतं हत्वा
रावणेनाभि[3]भाष्य च ॥ ५८ ॥ लंकामशेषतो दग्ध्वा पुनरप्यगमं क्षणात् ॥ श्रुत्वा
हनुमतो वाक्यं रामो ऽत्यन्तप्र[4]हृष्टधीः ॥ ५९ ॥ हनुमंस्ते कृतं कार्यं देवैरपि सुदु-
ष्करम् ॥ उपकारं न पश्यामि तव प्रत्युपकारिणः ॥ ६० ॥

राम, ततः प्रस्थापितः [अहं] (मू.) अशोकवनिकां ॥ ५७ ॥ तत्र [वृक्षान च] उत्पाट्य, अहं
बहून (पू.) हत्वा, (मू.) ॥५८॥ (पू.) अगमं. " ॥ हनुमतः वाक्यं (मू.) रामः [उवाच–]
॥ ५९ ॥ (पू). ॥ प्रत्युपकारिणः तव उपकारं न पश्यामि. ॥ ६० ॥

१ येतेवेळीं. २ उपटून. ३ बोलून. ४ अत्यंत आनंदलें मन ज्याचें असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शंकर ह्मणाले :– पार्वति, मारुतीचें समग्र भाषण ऐकिल्यावर रामाला अतिशय हर्ष झाला; ह्यावेळीं त्याच्या मुखांतून पुढील उद्गार निघाले :– ॥ १ ॥ "अहो! जें कार्य पार पाडणें देवांना देखील परम दुर्घट वाटलें असतें, तें मारुतीनें तडीस नेलें. भूतलावरील दुसऱ्या कोणत्याही प्राण्याला 'हें कार्य मी करीन' अशी गोष्ट नुसती मनांत आणणें सुद्धां शक्य नाहीं! ॥ २ ॥ कारण, शंभर योजनें लांबीच्या समुद्राला उल्लंघून जाईल कोण! तसेंच, अनेक राक्षस जिचें रक्षण करीत आहेत, त्या लंकेची दुर्दशा उडविण्याचें तरी सामर्थ्य कोणत्या प्राण्यांच्या आंगीं सांपडेल! ॥ ३ ॥ एकंदरींत सेवकाचें कर्तव्य ह्मणून जें कांहीं अ-

श्रीमहादेव उवाच ॥ यथावद्भाषितं वाक्यं श्रुत्वा रामो हनूमतः ॥ उवाचानन्तरं वाक्यं हर्षेण महता ऽऽवृतः ॥१॥ कार्यं कृतं हनुमता देवैरपि सुदुष्करम् ॥ मनसा ऽपि यदन्येन स्मर्तुं शक्यं न भूतले ॥२॥ शतयोजनविस्तीर्णं लंघयेत्कः पयोनिधिम् ॥ लंकां च राक्षसैर्गुप्तां को वा धर्षयितुं क्षमः ॥ ३ ॥ भृत्यकार्यं हनुमता कृतं सर्वमशेषतः ॥ सुग्रीवस्येदृशो लोके न भूतो न भविष्यति ॥ ४ ॥

श्रीम० उ० – रामः हनुमतः (मू.) हर्षेण आवृतः [सन्] वाक्यं उवाच – ॥ १ ॥ '(पू.) कार्यं कृतं; ॥ यत् भूतले अन्येन (मू.) न शक्यं. ॥ २ ॥ कः लंघयेत्? ॥ राक्षसैः गुप्तां (मू.)? ॥ ३ ॥ हनुमता सर्वं (पू.) कृतं. ॥ सुग्रीवस्य ईदृशः [भृत्यः] (मू.). ॥ ४ ॥

१ संपूर्णपणें. २ विचार करण्यास. ३ समुद्राला. ४ पलिकडे जाईल. ५ रक्षिलेल्या. ६ धुळीस मिळविण्यास. ७ समर्थ. ८ सेवकाचें कर्तव्य. ९ ह्याच्यासारखा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'समुद्र कसा त-
रावा !'

सतें, तें सगळें मारुतीनें बजाविलें; अवशिष्ट अगदीं ठेविलें नाहीं. सुग्रीवाला जसा हा सेवक मिळाला आहे, असा आजपर्यंत जगांत कोणाला मिळालाही नाहीं व पुढें मिळणारही नाहीं. ॥ ४ ॥ मारुति जानकीचें द-र्शन घेऊन आला, - ह्या कार्याचें महत्त्व मी एवढें समजतों कीं, - त्यानें आज माझें, सगळ्या रघुवंशाचें, ल-क्ष्मणाचें व ह्या वानरराजाचें(सुग्रीवाचें) जिवावरील संकट टाळिलें ! ॥५॥ जानकीचा शोध लावण्याचें काम ह्यानें फारच चांगल्या रीतीनें केलें. खरोखर, समुद्राचें नुसतें मनांत स्मरण झालें, तरी देखील माझें मन जागच्या जागीं थिजून जातें ! ॥ ६ ॥ मगर–सुसरींनीं भरलेला शंभर योजनें लांबीचा समुद्र उल्लंघून पलिकडे जायाचें आणि शत्रूचा वध करायाचा, हें काम माझ्या हातून पार पडणार कसें ! व जानकी माझ्या दृष्टीस पडते कशी ! ! " ॥ ७ ॥ हें रामाचें भाषण ऐकिल्यावर सुग्रीव ह्मणाला :– 'रघुवीरा ! समुद्रामध्यें मोठाल्या

अहं च रघुवंशश्च लक्ष्मणश्च कपीश्वरः ॥ जानक्या दर्शनेनाद्य रक्षिताः स्मो हनू-
मता ॥ ५ ॥ सर्वथा सुकृतं कार्यं जानक्याः परिमार्गणम् ॥ समुद्रं मनसा स्मृत्वा
सीदतीव[1] मनो मम ॥६॥ कथं नक्रझषाकीर्णं[2] समुद्रं शतयोजनम् ॥ लंघयित्वा रिपुं[3]
हन्यां[4] कथं द्रक्ष्यामि[5] जानकीम् ॥७॥ श्रुत्वा तु रामवचनं सुग्रीवः प्राह राघवम् ॥

हनूमता (मू.). ॥ ५ ॥ [अनेन] (पू.) कार्यं सर्वथा सुकृतं. ॥ (मू.) मनः सीदति इव ! ॥ ६ ॥ (पू.) समुद्रं ॥ (मू.) हन्यां, जानकीं कथं द्रक्ष्यामि ! ' ॥ ७ ॥ सुग्रीवः रामवचनं (पू.) प्राह – ॥

१ खिन्न होतें. २ सुसरी, मगर ह्यांनीं भरलेल्या. ३ शत्रूला. ४ मारीन. ५ पाहीन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सुसरी व मगर कितीही भरले असले तरी आपण त्याच्या पलिकडे जाणार, ॥ ८ ॥ लंकेची धूळधाण उडव-णार व लवकरच रावणाला मृत्युपंथास लावणार, - ह्यांत अगदीं संशय नाहीं. - रघुकुलश्रेष्ठा ! चिंता अगदीं सोडून दे : काळजी बाळगिली कीं मनुष्याच्या कार्याचा नाश होतो. ॥ ९ ॥ ह्या महाशक्तिमान् व शूर वानरवीरांकडे पहा. हे तुला प्रिय वाटेल तें काम करण्यास सिद्ध आहेत. - फार तर काय, पण एवढेंच सांगून ठेवितों कीं, - तुझ्यासाठीं अग्नींत प्रवेश करण्यास देखील हे मागें घेणार नाहींत. ॥ १० ॥ प्रथम समुद्र तरून जाण्याची कांहीं युक्ति योज. पुढें, लंका दृष्टीस पडली कीं, रावण मेलाच असें आह्मीं समजतों. ॥ ११ ॥ रामचंद्रा ! तूं धनुष्य घेऊन सिद्ध असलास ह्मणजे तुजपुढें युद्धास उभा राहील (टिकेल) असा

समुद्रं लंघयिष्यामो महानक्रझषाकुलम् ॥८॥ लंकां च विधमिष्यामो हनिष्यामो ऽद्य रावणम् ॥ चिन्तां त्यज रघुश्रेष्ठ चिन्ता कार्यविनाशिनी ॥ ९ ॥ एतान्पश्य महासत्त्वान् शूरान्वानरपुंगवान् ॥ त्वत्प्रियार्थं समुद्युक्तान्प्रवेष्टुमपि पावकम् ॥ १० ॥ समुद्रतरणे बुद्धिं कुरुष्व प्रथमं ततः ॥ दृष्ट्वा लंकां दशग्रीवो हत इत्येव मन्महे ॥ ११ ॥ न हि पश्याम्यहं कंचित्त्रिषु लोकेषु राघव ॥ गृहीतधनुषो यस्ते तिष्ठेदभिमुखो रणे ॥ १२ ॥

‘ (मू.) समुद्रं लंघयिष्यामः. ॥ ८ ॥ (पू.) हनिष्यामः. ॥ रघुश्रेष्ठ, (मू.). ॥९॥ (मू.) अपि प्रवेष्टुं समुद्युक्तान् वानरपुङ्गवान् पश्य. ॥ १० ॥ प्रथमं (पू.) ॥ लङ्कां (मू) ! ॥ ११ ॥ राघव, अहं यः रणे (उ.) तिष्ठेत्, [तं] (पू.) न पश्यामि. ॥ १२ ॥

१ मोठ्या सुसरी, मगर ह्यांनीं पूर्ण. २ धुळधाण करूं. ३ अग्नीला. ४ शिरण्यास. ५ सिद्ध. ६ मानितों. ७ युद्धांत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुरुष मला सगळ्या त्रैलोक्यांत एक देखील कोणी दिसत नाहीं. ॥ १२ ॥ आह्मांला सर्वथा जय मिळणार, ह्यांत संशय नाहीं. मला जिकडून तिकडून शुभ शकुनच दिसून येत आहेत. ' ॥ १३ ॥ भक्तीनें भरलेलें व पराक्रमास उचित असें हें सुग्रीवाचें भाषण ऐकिल्यावर रामानें 'बरें तर; ठीक आहे.' असें ह्मटलें. हनुमान पुढें उभा होताच. राम त्याला ह्मणाला :- ॥ १४ ॥ 'मारुते! आपण कांहीं तरी युक्ति काढून महासागराच्या पलिकडे जाऊं. परंतु लंकेचा बाह्य देखावा कसा काय आहे तो मला सांग. - मी तर असें ऐकितों कीं, - लंकेंत प्रवेश करणें देवांना व दैत्यांना देखील दुर्घट आहे! ॥ १५ ॥ वानरेश्वरा! लंकेचें स्वरूप लक्ष्यांत आलेलें असलें ह्मणजे तिच्या नाशाचा उपाय योजणें

सर्वथा नो जयो राम भविष्यति न संशयः॥ निमित्तानि च पश्यामि यथाभूतानि सर्वशः ॥ १३ ॥ सुग्रीववचनं श्रुत्वा भक्तिवीर्यसमन्वितम्॥ अंगीकृत्याब्रवीद्रामो हनूमन्तं पुरःस्थितम् ॥ १४ ॥ येन केन प्रकारेण लंघयामो महार्णवम्॥ लंकास्वरूपं मे ब्रूहि दुःसाध्यं देवदानवैः ॥ १५ ॥ ज्ञात्वा तस्य प्रतीकारं[3] करिष्यामि कपीश्वर ॥ श्रुत्वा रामस्य वचनं हनूमान्विनयान्वितः ॥ १६ ॥

राम, (पू.). ॥ सर्वशः यथाभूतानि (मू.). ' ॥ १३ ॥ रामः (पू.) सुग्रीववचनं श्रुत्वा, (मू.) हनूमन्तं अब्रवीत् - ॥१४॥ (पू.) लंघयामः ॥ देवदानवैः दुःसाध्यं (मू.). ॥ १५ ॥ कपीश्वर, (पू.).' विनयान्वितः हनूमान (मू.) श्रुत्वा, ॥ १६ ॥

१ योग्य. २ वश करून घेण्यास कठिण. ३ नाशाच्या उपायाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मला ठीक पडेल.’ रामाचें वचन ऐकिल्यावर हनुमान नम्रतापूर्वक ॥ १६ ॥ हात जोडून त्याला सांगूं लागला :– ‘ देवा ! मी जें कांहीं पाहिलें आहे, तें सर्व यथास्थित तुला सांगतों:– प्रभो ! लंकानगरी अलौकिक तर खरीच; ती त्रिकूटपर्वताच्या शिखरावर वसली आहे. ॥ १७ ॥ भोंवतालीं सुवर्णाचे कोट बांधलेले असून आंत सुवर्णमय राजमंदिरें आहेत. सभोंवार निर्मल उदकानें भरलेले अनेक खंदक आहेत. ॥ १८ ॥ ठिकठिकाणीं नानाप्रकारचीं उपवनें असल्यामुळें ती सुशोभित दिसते. जागोजाग दिव्य पुष्करिणी भरलेल्या आहेत. तेथील गृहें रत्नस्तंभांनीं बांधलेलीं असून विलक्षण शिल्परचनेनें शोभविलीं आहेत. ॥१९॥ पश्चिमद्वारावर रक्षणासाठीं हजारों हत्ती व घोडे राहत असतात. उत्तरेकडील द्वारावर घोडेस्वार व पायदळ ह्यांसुद्धां

उवाच प्राञ्जलिर्देव यथादृष्टं ब्रवीमि ते ॥ लंका दिव्या पुरी देव त्रिकूटशिखरे स्थिता ॥ १७ ॥ स्वर्णप्राकारसहिता स्वर्णाट्टालकसंयुता[1] ॥ परिखाभिः[2] परिवृता पूर्णाभिर्निर्मलोदकैः ॥ १८ ॥ नानोपवनशोभाढ्या दिव्यवापीभिरावृता[3] ॥ गृहैर्विचित्रशोभाढ्यैर्मणिस्तंभमयैः शुभैः ॥ १९ ॥ पश्चिमद्वारमासाद्य[4] गजवाहाः[5] सहस्रशः ॥ उत्तरे द्वारि तिष्ठन्ति साश्ववाहाः[6] सपत्तयः[7] ॥ २० ॥

प्रांजलिः [सन्] उवाच – ‘ देव, ते यथादृष्टं ब्रवीमि. ॥ देव, (१८ पू.) निर्मलोदकैः पूर्णाभिः (१८उ.१९ पू.) गृहैः [युक्ता] (१७ उ.). ॥ १७–१९ ॥ (पू.) [तिष्ठन्ति] ॥(पू.) तिष्ठन्ति. ॥ २०॥

१ सुवर्णमय राजमंदिरांनीं युक्त. २ खंदकांनीं. ३ उत्तम विहिरींनीं. ४ धरून; तळ देऊन. ५ हत्ती घोडे. ६ घोडेस्वारांसह. ७ पायदळासह.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हत्तीघोडे आहेत. ॥ २० ॥ पूर्वेकडे दहा कोटि रक्षक वीर राक्षस राहत असतात. दक्षिणद्वारावर तितकेच राहिले आहेत. ॥ २१ ॥ प्रभो, नगरीच्या मध्यभागींच्या बुरुजावर तर असंख्य हत्ती, घोडे, रथ व पायदळ सिद्ध असून लंकेचें सर्वकाळ रक्षण करीत आहे. तेथील वीर अनेक प्रकारचीं अस्त्रें वागविण्यांत कुशल आहेत. ॥२२॥ पाहिजे त्याला आंत शिरतां येऊं नये ह्मणून लंकेंत जाण्याचे मार्ग फार लहान, गुप्त व विचित्र प्रकारानें बांधून ठेविले आहेत. तिच्या भोंवतीं पुष्कळ तोफा ठेवून दिल्या आहेत. देवाधिदेवा! अशी स्थिति असतांही, मी तेथें काय प्रकार केले, ते सांगतों ऐक :– ॥ २३ ॥ मी रावणाच्या सैन्यसमूहाच्या

तिष्ठन्त्यर्बुदसंख्याका:[1] प्राच्यामपि[2] तथैव च ॥ रक्षिणो राक्षसा वीरा द्वारं दक्षिणमाश्रिता: ॥ २१ ॥ मध्यकक्षे ऽप्यसंख्याता गजाश्वरथपत्तय:[3] ॥ रक्षयन्ति सदा लंकां नानास्त्रकुशला:[4] प्रभो ॥ २२ ॥ संक्रमैर्विविधैर्लंका शतघ्नीभिश्च संयुता ॥ एवं स्थिते ऽपि देवेश शृणु मे तत्र चेष्टितम् ॥ २३ ॥ दशाननबलौघस्य चतुर्थांशो मया हत: ॥ दग्ध्वा लंकापुरीं स्वर्णप्रासादो धर्षितो मया ॥ २४ ॥

(पू.) तिष्ठन्ति. तथा एव च ॥ वीरा: (मू.) द्वारं आश्रिता:. ॥२१॥ (पू.) [तिष्ठन्ति]. ॥ प्रभो, (मू.) [वीरा:] सदा लङ्कां रक्षयन्ति. ॥ २२ ॥ लङ्का विविधै: (पू.). ॥ देवेश, (मू.) मे चेष्टितं शृणु- ॥ २३ ॥ मया (पू.). ॥ मया लङ्कापुरीं (मू.). ॥ २४ ॥

१ दहा कोट संख्या ज्यांची, असे. २ पूर्व दिशेकडे. ३ हत्ती, घोडे, रथ, पायदळ. ४ अनेक प्रकारचीं अस्त्रें वापरण्यांत कुशल. ५ लहान पायवाटांनीं; किंवा चोरवाटांनीं. ६ शंभर वीरांचा वध करणाऱ्या शस्त्रांनीं (तोफांनीं). ७ दुर्दशा केली ज्याची, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चवथ्या भागाचा फन्ना उडविला, लंकानगरी जाळिली, सुवर्णमंदिर मोडिलें, ॥ २४ ॥ रघुवीरा! तोफा, फोडिल्या व जागोजाग कोट पाडून लहान वाटा मोठ्या केल्या. देवा! - मला वाटतें कीं, - नुसतें तुझें दर्शन झालें तरी देखील लंकानगरीचें भस्म होईल. ॥ २५ ॥ देवाधिदेवा! चला निघा आपण भोंवतीं बरोबर महावीर वानरांचे कळप घेऊन क्षारसमुद्राच्या तीरीं जाऊं.' ॥ २६ ॥ मारुतीचें भाषण ऐकल्यावर रामचंद्र ह्मणाला :– 'सुग्रीवा! तूं आपल्या सर्व सैनिकांना निघण्यास आज्ञा दे. ॥ २७ ॥ ह्या वेळीं विजय मुहूर्त आहे (आतांच प्रयाण केलें तर जय निश्चयानें मिळेल). ह्मणून मी ह्याच मुहूर्तावर लंकेस जाण्यासाठीं निघतों. लंकेंत राक्षसांची वस्ती फार आहे, ॥ २८ ॥ सभोंवतीं अनेक कोट आहेत, ह्मणून तिचा नाश

शतघ्न्यः[1] संक्रमाश्चैव[2] नाशिता मे रघूत्तम ॥ देव त्वद्दर्शनादेव लंका भस्मीकृता भवेत् ॥२५॥ प्रस्थानं कुरु देवेश गच्छामो लवणाम्बुधेः[4] ॥ तीरं सह महावीरै-र्वानरौघैः[3] समन्ततः ॥ २६ ॥ श्रुत्वा हनूमतो वाक्यमुवाच रघुनन्दनः ॥ सुग्रीव सैनिकान्सर्वान्प्रस्थानायाभिनोदय[5] ॥ २७ ॥ इदानीमेव विजयो मुहूर्तः परिवर्त्तते[6] ॥ अस्मिन्मुहूर्ते गत्वा ऽहं लंकां राक्षससंकुलाम् ॥२८॥ सप्राकारां सुदुर्धर्षां नाशयामि सरावणाम् ॥

रघूत्तम, मे (मू.). ॥ २५ ॥ 'देवेश, (मू.) सह समन्ततः लवणाम्बुधेः तीरं गच्छामः.' ॥२६॥ रघुनन्दनः (पू.) श्रुत्वा उवाच–॥'सुग्रीव, सर्वान (मू.). ॥२७॥ (२८ मू. २९पू.) लङ्कां नाशयामि,॥

१ तोफा. २ लहानवाटा. ३ वानरांच्या समुदायांनीं. ४ क्षारसमुद्राच्या. ५ आज्ञा दे; सांग. ६ आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्वांस निघण्याची आज्ञा.

होणें कठिण खरेंच; परंतु मी रावणासह तिला धुळीस मिळवीन, व सीतेला घेऊन येईन. - ही पहा - माझ्या उजव्या डोळ्याची खालची पापणी लवत आहे. ॥ २९ ॥ हें चपल वानरांचें सर्व सैन्य पुढें चालूं द्या. कळपांवरील अधिकाऱ्यांनीं पुढें, पाठीमागें व बाजूंला चालून सैन्याचें रक्षण करावें. ॥ ३० ॥ मी हनुमंताच्या खांद्यावर बसून पुढें चालतों. लक्ष्मण अंगदावर बसून मागून येईल. सुग्रीवा, तूं मजबरोबर चल. ॥ ३१ ॥ गज, गवाक्ष, गवय, मैंद, द्विविद, नल, नील, सुषेण, जांबवान तसेच दुसरे ॥ ३२ ॥ ह्या सर्व शत्रुघातक सेनापतींनीं चोहोंकडून एकदम निघावें.' रामचंद्रानें वानरांना अशी आज्ञा देऊन व

आनेष्यामि च सीतां मे दक्षिणाक्षि स्फुरत्यधः ॥ २९ ॥ प्रयातु वाहिनी सर्वा वानराणां तरस्विनाम् ॥ रक्षन्तु यूथपाः सेनामग्रे पृष्ठे च पार्श्वयोः ॥ ३० ॥ हनूमन्तमथारुह्य गच्छाम्यग्रेंगदं ततः ॥ आरुह्य लक्ष्मणो यातु सुग्रीव त्वं मया सह ॥ ३१ ॥ गजो गवाक्षो गवयो मैन्दो द्विविद एव च ॥ नलो नीलः सुषेणश्च जाम्बवांश्च तथाऽपरे ॥ ३२ ॥ सर्वे गच्छन्तु सर्वत्र सेनापाः शत्रुघातिनः ॥ इत्याज्ञाप्य हरीन् रामः प्रतस्थे सहलक्ष्मणः ॥ ३३ ॥

सीतां च (मू.) स्फुरति. ॥ २८ ॥ २९ ॥ (पू.) वानराणां वाहिनी प्रयातु. ॥ (मू.) च रक्षन्तु. ॥ ३० ॥ अथ [अहं] (पू.) गच्छामि. ततः लक्ष्मणः अङ्गदं (मू.) [याहि], ॥ ३१ ॥ ३२ ॥ (पू.) सेनापाः सर्वत्र गच्छन्तु.' ॥ सहलक्ष्मणः रामः हरीन् (मू.). ॥ ३३ ॥

१ उजवा डोळा. २ लवतो. ३ वेगवान् अशा. ४ सेना. ५ चालूं लागो. ६ समुदायांचे अधिपति. ७ बाजूंकडे. ८ सेनापति.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लक्ष्मणाला बरोबर घेऊन प्रयाण केलें. ॥ ३३ ॥ त्याच्याबरोबर सुग्रीवही निघाला. प्रभु रामचंद्र मोठ्या हर्षानें सैन्याच्या मध्यभागीं चालत होता. सर्व वानरांचीं शरीरें प्रचंड हत्तींसारखीं होतीं; त्यांना इच्छेस येतील तशीं रूपें घेतां येत असत. ॥ ३४ ॥ ते वीरांसारखे डौलानें चालत व गर्जना करीत दक्षिण दिशेकडे चालले. सर्वजणांनींही सांपडतील तीं फळें खात व मद्य प्राशन करीत पुढील मार्ग क्रमण्याचा क्रम चालविला. ॥ ३१ ॥ जो तो रामापुढें येऊन सांगे कीं, मी आतां रावणाला मारून टाकितों. अशा प्रकारें ते अतुलपराक्रमी श्रेष्ठ वानर पुढें पुढें चालले. ॥ ३१ ॥ रामलक्ष्मण दोघां वानरांच्या खांद्यावर बसले होते, भोंव-

सुग्रीवसहितो हर्षात्सेनामध्यगतो विभुः ॥ वारणेन्द्रनिभाः[1] सर्वे वानराः कामरू[2]पिणः ॥ ३४ ॥ क्ष्वे[3]लन्तः परि[4]गर्जन्तो जग्मुस्ते दक्षिणां दिशम् ॥ भक्षयन्तो ययुः सर्वे फलानि च मधू[5]नि च ॥ ३५ ॥ ब्रुवन्तो राघवस्याग्रे हनिष्यामो ऽद्य रावणम् ॥ एवं ते वानरश्रेष्ठा गच्छन्त्यतुलवि[6]क्रमाः ॥ ३६ ॥ हरिभ्यां[7]मुह्यमानौ[8] तौ शुशुभाते रघूत्तमौ ॥ नक्षत्रैः सेवितौ यद्वच्चन्द्रसूर्याविवाम्बरे[9] ॥ ३७ ॥

(पू.) हर्षात् [जगाम]. ॥ (मू.) वानराः [ययुः]. ॥ ३४ ॥ (पू.) दक्षिणां दिशं जग्मुः. ॥ (मू.) भक्षयन्तः [सन्तः] ययुः. ॥ ३९ ॥ (पू.) हनिष्यामः एवं ब्रुवन्तः (मू.) ते वानरश्रेष्ठाः गच्छन्ति. ॥ ३६ ॥ (मू.) चन्द्रसूर्यौ इव शुशुभाते[10]. ॥ ३७ ॥

१ मोठ्या हत्तींसारखे. २ इच्छेस येईल तसें रूप धरणारे. ३ शूरांना योग्य गतींवर चालणारे. ४ गर्जना करणारे. ५ मद्यें. ६ ज्यांच्या पराक्रमांना तुलना नाहीं, असे. ७ दोघां वानरांनीं. ८ वाहिले जाणारे. ९ अम्बरे आकाशांत. १० शोभले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सैन्य कुच दर-कुच चालले.

तालीं असंख्य वानरमंडळी चालत होती, - तो देखावा पाहून असें मनांत येई कीं, - जर आकाशांत चंद्र व सूर्य एकदम उगवून त्यांच्या भोंवतीं नक्षत्रसमुदाय दिसेल तर त्या देखाव्याची उपमा ह्या रामसैन्याला बरोबर साजेल. ॥ ३७ ॥ हा प्रचंड सैन्यसमूह जिकडे जिकडे जाई, तो सर्व भूप्रदेश आच्छादून जात असे. कित्येक आपलीं शेपटांचीं अग्रें आपटीत; दुसरे झाडें उपटून उचलून घेत; ॥ ३८ ॥ कांहीं पर्वतांवर चढत व वायुवेगानें धांवत सुटत. असंख्य वानर जिकडे तिकडे भरून राहिले होते. ॥ ३९ ॥ राम त्यांचें रक्षण करीत असे ह्मणून ते मोठ्या आनंदानें पुढें चालले होते. तें सैन्य रात्रींदिवसा एकसारखें चालत असे, क्षणभर देखील कोठें गुंतलें नाहीं. ॥ ४० ॥ मलय व सह्य ह्या दोन पर्वतांवर रामाला विचित्र अरण्यें दिसून

आवृत्य[3] पृथिवीं कृत्स्नां जगाम महती चमूः ॥ प्रस्फोटयन्तः[4] पुच्छाग्रानुद्वहन्तश्च पादपान्[5] ॥ ३८ ॥ शैलान्[7]आरोहयन्तश्[8]च जग्मुर्मारुतवेगतः[9] ॥ असंख्यातास्च सर्वत्र वानराः परिपूरिताः ॥ ३९॥ हृष्टास्ते जग्मुरत्यर्थं रामेण परिपालिताः॥गता चमूर्दिवारात्रं क्वचिन्नासज्जत क्षणम् ॥ ४० ॥ काननानि विचित्राणि पश्यन्मलयसह्ययोः ॥ ते सह्यं समतिक्रम्य मलयं च तथा गिरिम् ॥ ४१ ॥

महती चमूः[1] कृत्स्नां[2] पृथ्वीं (पू.). ॥ [वानराः] पुच्छाग्रान (मू.) उद्वहन्तः[6] च ॥३८॥ (पू.) जग्मुः.॥ सर्वत्र (मू.). ॥३९॥ (पू.) ते अत्यर्थं हृष्टाः [सन्तः] जग्मुः. चमूः दिवारात्रं (मू.) न असज्जत[10]. ॥४०॥ [रामः] मलयसह्ययोः विचित्राणि (पू.) [ययौ]. ॥ ते सह्यं, तथा (मू.) च समतिक्रम्य, ॥ ४१ ॥

१ सेना. २ सगळ्या. ३ वेष्टून. ४ आपटणारे. ५ वृक्षांना. ६ उचलणारे.७ पर्वतांना. ८ वर चढणारे. ९ वायुवेगानें. १० गुंतली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आलीं. ते सह्य पर्वत मागें टाकून व तसेच मलयगिरीलाही सोडून ॥ ४१ ॥ क्रमानें समुद्रावर येऊन पोंचले. महासागराची भयंकर गर्जना चालली होती. राम मारुतीच्या खांद्यावरून उतरला, सुग्रीवाला बरोबर घेऊन ॥४२॥उदकाजवळ आला व सुग्रीवाला ह्मणालाः– 'आपण सर्वजण समुद्रावर येऊन पोंचलों. ह्या महासागराच्या उदरांत अनेक मगर राहत असतात.॥४३॥वानरहो ! निरुपायास्तव ह्याच्या पुढें आपल्याला जातां येणार नाहीं. म्हणून सध्यां येथेंच सैन्याचा तळ द्या. मग आपण ह्याला तरून जाण्याचा विचार योजूं.' ॥४४॥ रामाचें वचन ऐकून सुग्रीवानें लागलाच समुद्राजवळ सैन्याचा तळ दिला. मोठमोठे वानर सेनेचें रक्षण करीत होतेच.॥४५॥

आययुश्चानुपूर्व्येण[1] समुद्रं भीमनिःस्वनम्[2] ॥ अवतीर्य हनूमन्तं रामः सुग्रीवसंयुतः ॥४२॥ सलिलाभ्याशमासाद्य[3] रामो वचनमब्रवीत् ॥ आगताः स्मो वयं सर्वे समुद्रं मकरालयम् ॥ ४३ ॥ इतो गन्तुमशक्यं नो निरुपायेन वानराः ॥ अत्र सेनानिवेशो ऽस्तु मन्त्रयामो ऽस्य तारणे ॥ ४४ ॥ श्रुत्वा रामस्य वचनं सुग्रीवः सागरान्तिके ॥ सेनां न्यवेशयत्क्षिप्रं रक्षितां कपिकुञ्जरैः ॥ ४५ ॥

(पू.) समुद्रं आययुः. ॥ हनूमन्तं (मू.) रामः [समुद्रं जगाम]. ॥ ४२ ॥ रामः (पू.) – ॥ ' सर्वे (मू.) समुद्रं आगताः स्मः. ॥ ४३ ॥ वानराः, नः निरुपायेन (मू.) [उपायान्] मन्त्रयामः.' ॥ ४४ ॥ सुग्रीवः रामस्य वचनं (मू.) रक्षितां सेनां न्यवेशयत्. ॥ ४५ ॥

---

१ क्रमानें. २ भयंकर शब्द ज्याचा, अशा. ३ उदकाजवळ. ४ पोंचून. ५ सैन्याचा तळ. ६ विचार करूं. ७ वानरवीरांकडून. ८ तळ देता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मोठाल्या उंच लाटा उसळत आहेत, उग्र नक्र भीति दाखवीत आहेत, खोली किती तें कळत नाहीं, आकाशासारखाच ह्याच्या लांबीरुंदीचा अंत नाहीं, असें समुद्राचें भयंकर रूप दृष्टीस पडतांच ते सर्वजण खिन्न झाले. - समुद्राच्या दर्शनानें सर्वांना दुःख झालें. प्रत्येकाला विचार पडला कीं, वरुणाचें वसतिस्थान जो हा भयंकर समुद्र ह्याला आम्ही तरून जाणार कसे ? ॥ ४६ ॥ ४७ ॥ आमच्या मनांत त्या राक्षसाधमाचा–रावणाचा–वध आतांच करायाचा आहे. अशा चिंतेनें व्याकुल होत्साते सर्वजण रामाच्या शेजारीं येऊन बसले. ॥ ४८॥ रामचंद्राला सीतेचें स्मरण झाल्यामुळें पराकाष्ठेचें दुःख वाटूं लागलें. त्यानें जनककन्या सीतेसाठीं पुष्कळसा विलाप केला. - राम परमेश्वर खरा, परंतु त्याला घेतलेल्या वेषाचा पूर्ण अभिनय उतरण्यासाठीं विलाप करणें भाग होतें; कारण, - त्यानें कांहीं कार्यासाठीं मनुष्यरूप घेतलें होतें. ॥ ४९ ॥

ते समुद्र पाहून खिन्न झाले.

ते पश्यन्तो विषेदुस्तं सागरं भीमदर्शनम्[1] ॥ महोन्नततरंगाढ्यं[3] भीमनक्रभयंकरम् ॥ ४६ ॥ अगाधं गगनाकारं सागरं वीक्ष्य दुःखिताः ॥ तरिष्यामः कथं घोरं सागरं वरुणालयम् ॥ ४७ ॥ हन्तव्यो ऽस्माभिरद्यैव रावणो राक्षसाधमः ॥ इति चिन्ताकुलाः सर्वे रामपार्श्वे व्यवस्थिताः ॥ ४८ ॥ रामः सीतामनुस्मृत्य दुःखेन महता ऽऽवृतः ॥ विलप्य जानकीं सीतां बहुधा कार्यमानुषः ॥ ४९ ॥

(पू.) सागरं पश्यन्तः ते विषेदुः[2]. (मू).॥ ४६ ॥ (मू.) सागरं कथं तरिष्यामः ! ॥ ४७ ॥ (पू.) रावणः हन्तव्यः.॥(मू.).॥४८॥(पू.) दुःखेन आवृतः कार्यमानुषः रामः (मू.) विलप्य[स्थितः].॥४९॥

१ भयंकर दिसणाऱ्या. २ खिन्न झाले. ३ मोठ्या उंच लाटांनीं युक्त.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- वास्तविक ह्मटलें तर - राम हा द्वैतरहित, चैतन्यरूपी, एक, सनातन (नित्य), परमात्मा होय. रामाच्या स्वरूपाचें यथार्थतः ज्ञान ज्या पुरुषाला झालें, ॥ ५० ॥ त्यालादेखील दुःखें वगैरे भोगावीं लागत नाहींत; मग त्या आनंदरूपी निर्विकार परमात्म्याला लागायाचीं नाहींत, हें काय सांगायाला पाहिजे? दुःख, हर्ष, भय, क्रोध, लोभ, मोह, मद इत्यादि ॥५१॥ हीं अज्ञानाचीं चिन्हें आहेत. - ज्ञान झालें कीं अज्ञानाचा नाश होतो; अर्थांत हीं चिन्हें नष्ट होतात; - तेव्हां हीं ज्ञानस्वरूपी परमात्म्याच्या ठिकाणीं राहतील कोठून? दुःखें देहावर अभिमान ठेवणाऱ्या प्राण्याला लागू आहेत, ज्याला देहाचा अभिमान नाहीं त्या ज्ञानरूपी आत्म्याला नाहींत. ॥५२॥ - दुसरा कोणी असेल तर त्यापासून भीति वाटायाची व दुःख व्हावयाचें :- ज्ञान

अद्वितीयश्चिदात्मैकः परमात्मा सनातनः ॥ यस्तु जानाति रामस्य स्वरूपं तत्त्वतो जनः ॥ ५० ॥ तं न स्पृशति दुःखादि किमुतानन्दमव्ययम् ॥ दुःखहर्षभयक्रोधलोभमोहमदादयः ॥ ५१ ॥ अज्ञानलिंगान्येतानि कुतः सन्ति चिदात्मनि ॥ देहाभिमानिनो दुःखं नादेहस्य चिदात्मनः ॥ ५२ ॥ संप्रसादे[1] द्वयाभावात्[2] सुखमात्रं हि दृश्यते ॥ बुद्ध्याद्यभावात्संशुद्धे दुःखं तत्र न दृश्यते ॥

(पू.) ॥ यः तु जनः (मू.) जानाति, ॥ ५० ॥ दुःखादि (मू.) आनन्दं अव्ययं [रामं न स्पृशन्ति इति] किमुत? ॥५१॥ (पू.) कुतः सन्ति? ॥ (मू.) न. ॥५२॥ (पू.). ॥ संशुद्धे तत्र (द्वि.). ॥

१ ज्ञान झालें असतां; किंवा सुषुप्तींत (झोंपेंत). २ दुसरा नसल्यामुळें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रावणाला लाज वाटली.

झालें असतां, किंवा सुषुप्तींत, द्वितीय कोणी नसतो ह्मणून केवल सुखच अनुभवास येतें (१); तसेंच शुद्ध आत्मस्वरूपींही बुद्ध्यादि नसल्यामुळें दुःख दिसून येत नाहीं. ह्यावरून दुःखादि सर्व बुद्धीलाच लागू आहे, ह्यांत संशय नाहीं. ॥ ५३ ॥ राम हा परमात्मा, पुराणपुरुष, नित्य सिद्ध (नाशरहित), नित्यसुखरूपी व कोणतेही व्यापार न करणारा होय. तथापि अज्ञानी लोक तो मायेच्या गुणांशीं आसक्त आहे असें मानितात; ह्मणून त्यांना तो सुखी किंवा दुःखी प्राण्यांसारखा वाटतो. ॥ ५४ ॥ इति युद्धकाण्डे प्रथम सर्गः ॥१॥

हनुमंतानें लंकेमध्यें, देवांनाही करण्याला कठिण जाईल, असें चरित्र केलें; तें पाहून रावणाला लाज वाटली व तोंड थोडें खालीं करावें लागलें! ॥ १ ॥ त्यानें आपल्या सर्व मंत्र्यांना बोलावून आणून असें

अतो दुःखादिकं सर्वं बुद्धेरेव न संशयः ॥ ५३ ॥ रामः परात्मा पुरुषः पुराणो
नि[1]त्योदितो नित्यसुखो निरीहः[2]॥तथापि मायागुणसंगतोऽसौ सुखीव दुःखीव वि-
भाव्यते[3]ऽबुधैः॥५४॥इति युद्धकाण्डे प्रथमः सर्गः॥१॥ लंकायां रावणो दृष्ट्वा कृतं
कर्म हनूमता॥दुष्करं दैवतैर्वाऽपि ह्रिया[4] किंचिदवाङ्मुखः[5]॥१॥ आहूय[6] मन्त्रिणः
सर्वानिदं वचनमब्रवीत् ॥ हनूमता कृतं कर्म भवद्भिर्दृष्टमेव तत् ॥ २ ॥

अतः सर्वं (मू.). ॥ ५३ ॥ (पू.); ॥ तथा अपि अबुधैः (मू.). ॥ ५४ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये युद्धकाण्डे प्रथमः सर्गः ॥१॥ (पू.) दैवतैः अपि दुष्करं हनूमता कृतं कर्म दृष्ट्वा (मू.) [सन] ॥ १ ॥ सर्वान् मन्त्रिणः (पू.) – ॥ ‘ हनूमता [यत्] कर्म कृतं, तत् (मू.). ॥ २ ॥

१ नित्य सिद्ध. २ निर्व्यापार. ३ बद्दल तर्क केला जातो. ४ लज्जेनें. ५ खालीं तोंड ज्याचें, असा ६ हांका मारून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्ग.	विषय.	पत्र.
१	मारुतीच्या मुखानें लंकेचें स्वरूप ऐकून घेऊन राम विजयप्रस्थान करितो समुद्र.	१
२	रावण भितो. राक्षस त्याला उत्तेजन देतात. भावांची विनंति. विभीषण रामाकडे येतो.	७
३	विभीषण रामाची प्रार्थना करितो. त्याला अभयदान. शुकाचा खरपूस समाचार. समुद्र नलाकडून सेतु बांधविण्यास सांगतो.	१४
४	रामेश्वर. सेतुबंधन. वानर लंकेस येतात. शुक रावणाला निरोप व हिताची गोष्ट सांगतो.	२९
५	शुकाचा वृत्तांत. लंकेंत उत्पात. माल्यवानाचा उपदेश. युद्धाचें तोंड. इंद्रजिताचा पराजय.	३३
६	मयशक्ति लक्ष्मणाला लागते. रामरावणांचें पहिलें युद्ध. कालनेमीचा रावणाला उपदेश.	४४
७	कपटी कालनेमि मरण पावतो. मारुति द्रोणपर्वत आणितो. लक्ष्मण शुद्धीवर येतो. कुंभकर्णाचा रावणाला उपदेश.	५१
८	कुंभकर्णाचा वध. नारद रामाची स्तुति करितात. इंद्रजित होमाला बसतो.	६०

सर्ग.	विषय.	पत्र.
९	इंद्रजिताचा होमविध्वंस व वध. रावण सीतेला मारायला धांवतो. सुपार्श्व त्यास परतवितो.	६९
१०	शुक्राच्या सांगीवरून रावण अनुष्ठान आरंभितो. मंदोदरीची विटंबना. अनुष्ठानभंग.	७८
११	इंद्र रथ पाठवितो. घोरयुद्ध. रावणवध.....	८६
१२	विभीषणाचें सांत्वन, रावणाचें उत्तरकार्य. विभीषणाला राज्याभिषेक. सीता अग्नींत शिरते.	९७
१३	इंद्र रामाचा स्तव करितो. अग्नि रामाला खरी सीता देतो. स्तुति. दशरथभेट. इंद्र मेलेले वानर उठवितो. पुष्पकविमानांत बसून सर्वजण परत निघतात.	१०८
१४	मार्गांतील देखावे. वानरपत्न्यांना बरोबर घेणें. भरद्वाजाश्रमीं येणें. मारुतीची भरताकडे पाठवणी. राम नंदिग्रामीं येतो.	११९
१५	भरत राज्य देतो व राम स्वीकारितो. अयोध्याप्रवेश. राज्याभिषेकसमारंभ. त्या वेळचें रामरूप. स्तुति.	१३२
१६	रामराज्यवर्णन. देणग्या. पाठवण्या. माहात्म्य.	१४३

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सांगितलें :- ' प्रधानांनो ! मारुतीनें जें कांहीं कृत्य केलें तें तुह्मीं पाहिलेंच आहे. ॥ २ ॥ अरे ! ज्या लंकेकडे नुसतें वक्र दृष्टीनें पाहणें देखील कठिण,[1] तींत तो शिरला ! सीतेची गांठ पडणें परम दुर्घट,[2] पण तो तिला भेटला ! - इतकेंच नव्हे तर त्यानें आमचे वीर राक्षस मारिले, मंदोदरीच्या अक्षनामक पुत्राचा वध केला, ॥ ३ ॥ सगळ्या लंकेला अग्नि लाविला; व समुद्र उल्लंघून आणि तुह्मां सर्वांच्या हातांवर तुरी देऊन तो स्वस्थपणें परत गेला ! ! ॥ ४ ॥ आतां पुढें आपण करायाचें काय ? तुह्मी युक्ति योजण्यांत कुशल आहां, ह्या वेळीं आपलें बुद्धिसर्वस्व खर्चून असा उपाय शोधून काढा कीं जेणें करून माझें हित होईल. ' ॥ ५ ॥ रावणाचें वचन ऐकून घेतल्यावर राक्षस त्याला ह्मणाले :- " महाराज ! आपण युद्धांत लोकपालांना

प्रविश्य लंकां दुर्धर्षां दृष्ट्वा सीतां दुरासदाम् ॥ हत्वा च राक्षसान्वीरानक्षं मन्दोदरीसुतम् ॥ ३ ॥ दग्ध्वा लंकामशेषेण लंघयित्वा च सागरम् ॥ युष्मान्सर्वानतिक्रम्य स्वस्थो ऽगात्पुनरेव सः ॥ ४ ॥ किं कर्तव्यमितो ऽस्माभिर्यूयं मन्त्रविशारदाः ॥ मन्त्रयध्वं प्रयत्नेन यत्कृतं मे हितं भवेत् ॥ ५ ॥ रावणस्य वचः श्रुत्वा राक्षसास्तमथाब्रुवन् ॥ देव शंका कुतो रामात्तव लोकजितो रणे ॥ ६ ॥

दुर्धर्षां[1] लङ्कां (पू.) सीतां दृष्ट्वा, ॥ वीरान् (मू.) अक्षं च हत्वा, ॥ ३ ॥ (पू.) दग्ध्वा,[3] सागरं लंघयित्वा च ॥ (मू.) पुनः एव अगात्. ॥४॥ इतः अस्माभिः (पू.) यूयं, यत् कृतं ॥ [सत्] (मू.), [तत्] प्रयत्नेन मन्त्रयध्वं.' ॥५॥ राक्षसाः (पू.) -॥ देव, रणे (मू.) तव रामात् शङ्का कुतः ? ॥६॥

१ कडे बघण्यास कठिण, अशा. २ सांपडण्यास कठिण. ३ जाळून. ४ मसलत काढण्यांत कुशल. ५ युक्ति योजा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'रामाला भितां काय ह्मणून ?'

देखील जिंकिलें, आणि आतां ह्या रामाची भीति काय ह्मणून धरून बसलां आहां ? ॥ ६ ॥ इंद्राला तर आपल्या पुत्रानें बांधून आणून नगरांत ठेविलें आहे; आपण स्वतां कुबेराला जिंकून त्याचें पुष्पक विमान घेऊन आलां व सध्यां त्या विमानाचा उपभोग घेत आहां; ॥ ७ ॥ प्रतापशाली राजा ! आपण यमाचा पराभव केला, कालपाशाच्यानें आपलें कांहीं वांकडें झालें नाहीं; वरुणाला तर आपण नुसत्या हूंकारानेंच जिंकिलें; तीच कथा सर्व राक्षसांचीही झाली; ॥ ८ ॥ मयासुर ह्मणजे सर्व दैत्यांत मोठा, पण तो स्वतां भीतीस्तव आपली कन्या तुह्मांला देऊन सांप्रत तुमच्या स्वाधीन होऊन राहिला आहे. मग इतर महादैत्यांचा तो पाड काय राहिला ? ॥ ९ ॥ हनुमंतानें आपली जी कांहीं नासधूस केली, ती केवळ आमच्या

इन्द्रस्तु बध्वा निक्षिप्तः पुत्रेण तव पत्तने ॥ जित्वा कुबेरमानीय पुष्पकं भुज्यते त्वया ॥ ७ ॥ यमो जितः कालदण्डाद्भयं नाभूत्तव प्रभो ॥ वरुणो हूंकृतेनैव जितः सर्वे ऽपि राक्षसाः ॥ ८ ॥ मयो महासुरो भीत्या कन्यां दत्वा स्वयं तव ॥ त्वद्वशे वर्तते ऽद्यापि किमुतान्ये महासुराः ॥ ९ ॥ हनूमद्धर्षणं यत्तु तदवज्ञाकृतं च नः ॥ वानरो ऽयं किमस्माकमस्मिन्पौरुषदर्शने ॥ १० ॥

तव पुत्रेण (पू.) निक्षिप्तः. ॥ त्वया कुबेरं (मू.) आनीय भुज्यते. ॥ ७ ॥ प्रभो, यमः जितः. तव (मू.) [जिताः]. ॥८॥ (पू.) कन्यां दत्वा ॥ अद्य अपि (मू.) [वर्तन्ते इति] किमुत ? ॥ ९ ॥ (पू.) अवज्ञाकृतं. ॥ अयं (मू.) किं [करिष्यति] ? अस्मिन्, पौरुषदर्शने [किं फलं] ? ॥१०॥

॥ ८ ॥

१ नगरांत. २ भोगिलें जातें. ३ पराक्रम दाखविण्यांत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हलगर्जीपणामुळें. यःकश्चित् माकड हें, आमचें करणार काय ? ह्याच्यावर काय प्रताप दाखवावा,' ॥१०॥ अशा विचारानें आह्मीं स्वस्थ बसलों. - 'थोडीशी नासधूस करीत आहेना ? करूं द्या. त्यांत काय आहे ! - मारुति ह्मणजे कःपदार्थ !' असें वाटून आह्मी अगदीं निष्काळजी राहिलों; ह्मणून त्या लांब हनवटीच्या माकडानें आम्हांला फसविलें! ॥११॥'हा असें करणार' हें जर आह्मांला पूर्वीं कळलें असतें तर त्याची काय छाती होती येथून परत जिवंत निघून जाण्याची ? नुसती आज्ञा द्या कीं पुरे, सगळ्या जगांतील वानरें आणि माणसें एकंदर नाहींशीं॥१२॥करून सर्वजण परत येतों. नाहीं तर एकएकाची वेगवेगळ्या प्रदेशावर योजना (नेमणूक) करा." ह्या प्रसंगीं कुंभकर्णानें राक्षसाधिपति रावणाला सांगितलें :– ॥१३॥ "रावणा ! तूं हें काम आरंभिलें

इत्युपेक्षितमस्माभिर्धर्षणं तेन किं भवेत् ॥ वयं प्रमत्ताः किं तेन वञ्चिताः स्मो हनूमता ॥ ११॥ जानीमो यदि तं सर्वे कथं जीवन् गमिष्यति॥ आज्ञापय जगत्कृत्स्नमवानरममानुषम् ॥१२॥ कृत्वा ऽऽयास्यामहे सर्वे प्रत्येकं वा नियोजय ॥ कुम्भकर्णस्तदा प्राह रावणं राक्षसेश्वरम् ॥ १३ ॥ आरब्धं यत्त्वया कर्म स्वात्मनाशाय केवलम्॥न दृष्टो ऽसि तदा भाग्यात्त्वं रामेण महात्मना॥१४॥

(पू.) उपेक्षितं; तेन किं भवेत् ? [अयं] किं [इति] (मू.) वंचिताः स्मः. ॥ ११ ॥ सर्वे [वयं] यदि तं जानीमः [तर्हि सः] (पू.)? ॥ आज्ञापय. कृत्स्नं (मू.) [च] ॥१२॥ कृत्वा सर्वे [वयं] (पू.).' ॥ तदा (मू.) रावणं प्राह – ॥ १३ ॥ "त्वया यत् कर्म आरब्धं, [तत्] केवलं (मू.) रामेण न दृष्टः असि. ॥ १४ ॥ ६।३

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहेस, पण ह्याचा परिणाम, केवळ तुझा स्वतांचा नाश, एवढाच होणार. - अरे! सीतेला चोरून आणिलेंस - त्या वेळींच तूं त्या महाशूर रामचंद्राच्या दृष्टीस पडला नाहींस हें मोठें भाग्य समज! ॥ १४ ॥ रामानें तुला पाहिलें असतें तर, रावणा! तूं जिवंत आला नसतास! राम सामान्य मनुष्य नव्हे, तर देव आहे. तो साक्षात् निर्विकार नारायण होय. ॥ १५ ॥ रामाची पत्नी यशस्विनी सीता ही प्रत्यक्ष भगवती लक्ष्मी. त्या सुंदरीला तूं आणिलेंस पण त्यामुळें सर्व राक्षसांचा नाश होणार आहे, - हें पक्कें लक्ष्यांत ठेव!- ॥ १६ ॥ एखादा मोठा मासा पहिल्यानें विषयुक्त पिंड खातो आणि मागून तडफडत पडतो, त्याप्रमाणेंच तुझी स्थिति झाली आहे:— जानकीला घेऊन आलास आणि आतां 'आतां कसें होईल!' ह्मणून विचारांत पडला आहेस!॥ १७॥ अज्ञानामुळें, तुझ्या हातून होऊं नये, अशी ही गोष्ट झाली. बरें; कांहीं चिंता नाहीं. समर्था!

यदि पश्यति रामस्त्वां जीवन्नायासि रावण ॥ रामो न मानुषो देवः साक्षान्नारायणो ऽव्ययः ॥ १५ ॥ सीता भगवती लक्ष्मी रामपत्नी यशस्विनी ॥ राक्षसानां विनाशाय त्वया ऽऽनीता सुमध्यमा ॥ १६ ॥ विषपिण्डमिवागीर्य[2] महामीनो[3] यथा तथा ॥ आनीता जानकी पश्चात्त्वया किं वा भविष्यति ॥ १७ ॥ यद्यप्यनुचितं[5] कर्म त्वया कृतमजानता ॥

रावण, (पू.) पश्यति, [तर्हि] जीवन् न आयासि. रामः मानुषः (मू.). ॥ १५ ॥ त्वया (पू.) सुमध्यमा[1] सीता (मू.) आनीता. ॥ १६ ॥ यथा (पू.) त्वया जानकी आनीता '(मू.)' [इति] पश्चात् [तप्यसे]. ॥ १७ ॥ अजानता[4] त्वया (पू.), ॥

१ सुंदर मध्यभाग जिचा, अशी (सिंहकटि). २ आगीर्य गिळून. ३ मोठा मासा. ४ न जाणणाऱ्या. ५ अयोग्य.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मी - आपल्या प्रभावानें, - सर्व यथास्थित होईल, अशी व्यवस्था करितों. तूं मनांत न डगमगतां स्वस्थ ऐस." ॥ १८ ॥ कुंभकर्णाचें भाषण ऐकून इंद्रजित् बोलूं लागला :– ' महाराज ! मला आज्ञा द्या; ह्मणजे मी आतां राम, लक्ष्मण, सुग्रीव आणि वानर ह्या सर्वांना मारून पुन्हां आपल्या जवळ येतों. ' ॥ १९ ॥ इतक्यांत तेथें भगवद्भक्तशिरोमणि व बुद्धिमान् पुरुषांत अग्रगण्य असा विभीषण येऊन पोंचला. त्याची अंतःकरणवृत्ति रामचरणयुगुलीं एकाग्र लागून राहिली होती. तो देवांच्या शत्रूला (रावणाला) प्रणाम करून त्याच्याजवळ बसला. ॥ २० ॥ सभेमध्यें एकापेक्षां एक मदोन्मत्त असे कुंभकर्णप्रभृति दैत्य बसले होते.

सर्वं समं करिष्यामि स्वस्थचित्तो भव प्रभो ॥ १८ ॥ कुंभकर्णवचः श्रुत्वा वाक्यमिन्द्रजिदब्रवीत् ॥ देहि देव ममानुज्ञां हत्वा रामं सलक्ष्मणम् ॥ सुग्रीवं वानरांश्चैव पुनर्यास्यामि तेऽन्तिकम् ॥ १९ ॥ तत्रागतो भागवतप्रधानो विभीषणो बुद्धिमतां वरिष्ठः ॥ श्रीरामपादद्वय एकतानः प्रणम्य देवारिमुपोपविष्टः ॥ २० ॥ विलोक्य कुम्भश्रवणादिदैत्यान्मत्तप्रमत्तानतिविस्मयेन ॥

[तथा अपि] प्रभो, (मू.). " ॥ १८ ॥ इन्द्रजित् (पू.) वाक्यं अब्रवीत् – ॥ 'देव, मम [1]अनुज्ञां (द्वि.) रामं, (मू.) हत्वा, पुनः ते [2]अन्तिकं [3]यास्यामि. ' ॥ १९ ॥ (मू.) विभीषणः [5]देवारिं [6]प्रणम्य उपोपविष्टः. ॥ २० ॥ [8]अप्रमत्तः [9]विशुद्धबुद्धिः [सः] [10]मत्तप्रमत्तान (पू.) विलोक्य, ॥

१ अनुमोदनास. २ जवळ. ३ येईन. ४ एकाग्र. ५ देवांच्या शत्रूला. ६ वंदून. ७ जवळ बसला. ८ सावध. ९ अत्यंत शुद्ध बुद्धि ज्याची, असा. १० एकापेक्षां एक उन्मत्त.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विभीषणानें त्या सगळ्या समुदायावरून एकवेळ दृष्टि फिरविली. - ' रामाचे भक्त जे वानर, त्यांच्यापुढें ह्या राक्षसांचा क्षणभर देखील निभाव लागायाचा नाहीं, परंतु हे व्यर्थ फुशारक्या मारीत आहेत, ' असें मनांत येऊन - विभीषणाला पराकाष्ठेचा विस्मय वाटला. रावण कामातुर झाला आहे, हेंही त्याच्या लक्ष्यांत आलें; तथापि, विभीषणाची बुद्धि अत्यंत निर्मल असे व तो स्वतांचें कर्तव्य करण्यांत कधींच चुकत नसे, - ह्या स्वतांच्या स्वभावास अनुसरूनच त्यानें रावणाची कानउघाडणी करण्याकरितां - पुढील भाषण केलें : तो ह्मणाला :- ॥ २१ ॥ " राजा ! कुंभकर्ण, इंद्रजित, महापार्श्व, महोदर, तसेच कुंभ, निकुंभ व अतिकाय हे राक्षस कितीही शूर असोत; तरी ह्यांच्यानें युद्धांत रामापुढें टिकाव धरवणार नाहीं. ॥ २२ ॥ राजा ! ' सीता ' ह्या नांवाच्या प्रबल पिशाचानें तुला पछाडलें आहे, त्याच्या तावडींतून तुझी सुटका होणें

विलोक्य कामातुरमप्रमत्तो दशाननं प्राह विशुद्धबुद्धिः ॥ २१ ॥ न कुम्भकर्णेन्द्रजितौ च राजंस्तथा महापार्श्वमहोदरौ तौ ॥ निकुम्भकुम्भौ च तथा ऽतिकायः स्थातुं न शक्ता युधि राघवस्य ॥ २२ ॥ सीताभिधानेन महाग्रहेण ग्रस्तो ऽसि राजन्न च ते विमोक्षः ॥ तामेव सत्कृत्य महाधनेन दत्वा ऽभिरामाय सुखी भव त्वम् ॥ २३ ॥

(मू.) [च] विलोक्य प्राह - ॥ २१ ॥ राजन्, कुम्भकर्णेंद्रजितौ रामस्य युधि स्थातुं न [शक्तौ]. तथा तौ (पू.) [न शक्तौ] तथा (मू.) न शक्ताः. ॥ २२ ॥ राजन्, त्वं (पू.) न. तां एव महाधनेन [सह] (मू.) दत्वा च सुखी भव. ॥ २३ ॥

१ उभा राहण्यास. २ मोठ्या पिशाचानें.

रावणाला विभीषणाची सांगी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नाहीं. आतां जर तूं सीतेचा सत्कार करून विपुल द्रव्यासह तिला रामाच्या स्वाधीन करशील तर मात्र सुखी होशील. ॥ २३ ॥ जोंपर्यंत रामाच्या तीक्ष्ण बाणांनीं लंकानगर व्यापून राक्षसांचे शिरश्छेद केले नाहींत, तोंपर्यंत (लवकरच) बा ! तूं रामाला जानकी परत नेऊन द्यावीस, हा मार्ग मला प्रशस्त दिसतो. ॥ २४ ॥ ज्यांचीं शरीरें पर्वतासारखीं व पराक्रम मोठ्या सिंहासारखे आहेत, ते नखें व दाढा ह्या शस्त्रांनीं युद्ध करणारे वानर अद्याप तुझ्या लंकेवर चालून आले नाहींत व तिचा नाश करूं लागले नाहींत; - ह्मणून मी सांगतों कीं - असा प्रसंग येण्यापूर्वीच, बा ! तूं लवकर रघुवीराला सीता देऊन टाक. ॥ २५ ॥ मोठमोठाले देव तुझें रक्षण करीत असले, फार तर काय प्रत्यक्ष शंकर तुला राखीत असला, किंवा तूं इंद्राच्या

यावन्न रामस्य शिताः शिलीमुखा लंकामभिव्याप्य शिरांसि रक्षसाम् ॥ छिन्दन्ति तावद्रघुनायकस्य भो तां जानकीं त्वं प्रतिदातुमर्हसि ॥ २४ ॥ यावन्नगाभाः कपयो महाबला हरीन्द्रतुल्या नखदंष्ट्रयोधिनः ॥ लंकां समाक्रम्य विनाशयन्ति ते तावद्द्रुतं देहि रघूत्तमाय ताम् ॥ २५ ॥ जीवन्न रामेण विमोक्ष्यसे त्वं गुप्तः सुरेन्द्रैरपि शंकरेण ॥ न देवराजांकगतो न मृत्योः पातालतोकानपि संप्रविष्टः ॥ २६ ॥

(पू.) शिरांसि न ॥ छिन्दन्ति, तावत् भो, त्वं (मू.). ॥२४॥ (पू.) कपयः ते लङ्कां समाक्रम्य न विनाशयन्ति, (मू.) देहि. ॥ २५ ॥ (पू.) अपि गुप्तः त्वं रामेण जीवन् न विमोक्ष्यसे. देवराजाङ्कगतः अपि न, मृत्योः [लोकं गतः अपि] न, (मू.) अपि [न विमोक्ष्यसे.] ' ॥२६॥

१ तीक्ष्ण. २ बाण. ३ तोडतात. ४ परत देण्यास. ५ पर्वतांसारखे. ६ मोठ्या सिंहासारखे. ७ नखें व दाढा ह्यांच्यायोगें लढणारे. ८ रक्षिलेला. ९ इंद्राच्या मांडीवर बसलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मांडीवर जाऊन बसलास अथवा मृत्युलोकांत किंवा पाताल लोकांत शिरून राहिलास, तरी राम तुला जिवंत सोडणार नाहीं, - हें पक्कें समज !" - ॥ २६ ॥ - शंकर ह्मणाले :– पार्वति, - हें विभीषणाचें सौम्य भाषण खरोखर हितकारक व पथ्यावह होतें. परंतु, जसा मरणोन्मुख प्राणी औषध घेत नाहीं त्याप्रमाणें, त्या दुष्टानें ह्या उपदेशाचा अंगिकार केला नाहीं. ॥ २७ ॥ - बरोबरच आहे, - कालानें जशी प्रेरणा दिली तसा तो वागला. असो. त्या दैत्यानें उलट विभीषणावर तोंड सोडिलें : - तो (रावण) ह्मणाला :- ' - अहो पहा काय चमत्कार ! - मी देत आलों ते भोग भोगून ह्यानें आपलें शरीर पोशिलें; हा माझ्याजवळ राहतो; ॥ २८ ॥ मी नित्य ह्याचें हित करीत असतों; आणि आज हा माझ्याशीं विरुद्ध वागत आहे ! ! मला मित्रभाव दाखवीत आहे खरा परंतु हा माझा शत्रु झाला आहे, ह्यांत संशय नाहीं. ॥ २९ ॥ ह्या नीच कृतघ्नाशीं संगति करणें मला योग्य वाटत नाहीं.

शुभं हितं पवित्रं च विभीषणवचः खलः ॥ प्रतिजग्राह नैवासौ म्रियमाण[2] इवौषधम् ॥ २७ ॥ कालेन नोदितो[4] दैत्यो विभीषणमथाब्रवीत् ॥ मद्दत्तभोगैः पुष्टांगो मत्समीपे वसन्नापि ॥ २८ ॥ प्रतीपमाचरत्येष ममैव हितकारिणः ॥ मित्रभावेन शत्रुर्मे जातो नास्त्यत्र संशयः ॥ २९ ॥ अनार्येण कृतघ्नेन संगतिर्मे न युज्यते[6] ॥

असौ खलः (मू.) इव न एव प्रति[3]जग्राह. ॥ २७ ॥ (पू.) – ' (मू.) ॥ २८ ॥ (पू.) मम एव प्रतीपं आचरति ! ॥ मित्रभावेन मे (मू.) अस्ति. ॥ २९ ॥ मे (पू.). ॥

१ दुष्ट. २ मरणोन्मुख. ३ स्वीकारिता झाला. ४ प्रेरिलेला. ५ विरुद्ध. ६ योग्य आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्ञाति आपल्या ज्ञातिबांधवांचा नाश व्हावा असें सर्वदा इच्छीत असतात, असा नियमच आहे. ॥ ३० ॥ ह्या समुदायापैकीं दुसरा कोणी राक्षस जर असें केवळ एक वाक्य उच्चारील, तर मी त्याचा तत्क्षणीं नाश करीन. नीचा! जन्मास येऊन राक्षसांच्या कुलाला कलंक लाविलास! धिक्कार असो तुला!!' ॥ ३१ ॥ रावणानें अशा कठोर शब्दांनीं निर्भर्त्सना केली, तेव्हां तो महापराक्रमी विभीषण हातांत गदा घेऊन सभें-तून तसाच उडाला. ॥ ३२ ॥ त्याच्याबरोबर त्याच्या चौघा मंत्र्यांनींही उड्या मारिल्या. विभीषणाला अ-तिशय क्रोध आला होता. आकाशांत गेल्यावर उभें राहून त्यानें रावणाला सांगितलें :– ' रावणा! मी

विनाशमभिकांक्षन्ति ज्ञातीनां ज्ञातयः सदा ॥ ३० ॥ यो ऽन्यस्त्वेवंविधं ब्रूयाद्वा-
क्यमेकं निशाचरः ॥ हन्मि तस्मिन् क्षणे एव धिक् त्वां रक्षःकुलाधमम् ॥ ३१ ॥
रावणेनैवमुक्तः सन्परुषं स विभीषणः ॥ उत्पपात सभामध्याद्गदापाणिर्महाबलः
॥ ३२ ॥ चतुर्भिर्मन्त्रिभिः सार्धं गगनस्थो ऽब्रवीद्वचः ॥ क्रोधेन महता ऽऽविष्टो
रावणं दशकन्धरम् ॥ मा विनाशमुपैहि त्वं प्रियवादिनमेव माम् ॥ ३३ ॥

(मू.) ज्ञातीनां विनाशं अभिकांक्षन्ति. ॥३०॥ यः अन्यः निशाचरः (पू.) वाक्यं ब्रूयात्, ॥ [तं] तस्मिन् क्षणे एव हन्मि. (मू.) त्वां धिक्!' ॥ ३१ ॥ (उ.) सः विभीषणः (पू.) उक्तः सन् सभामध्यात् उत्पपात. ॥ ३२ ॥ (पू.) महता (द्वि.) सः दशकन्धरं रावणं, वचः अब्रवीत् – ' त्वं विनाशं (मू.) ॥ ३३ ॥

१ इच्छितात. २ राक्षसांच्या कुलांत नीच. ३ गदा हातांत ज्याच्या असा. ४ उडाला. ५ पाव.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हिताची गोष्ट सांगत असतांही तूं माझा धिक्कार केलास, तरी तुझा नाश होऊं नये - अशीच माझी इच्छा आहे. - कारण, तूं माझा वडील बंधु, ह्मणून मला पित्यासारखा पूज्य आहेस. सर्वांचा संहार करणारा काल रामरूपानें दशरथाच्या घरीं अवतरला आहे. ॥ ३३ ॥ ३४ ॥ - सकल जगाचा संहार करण्याच्या कामीं साह्य करणारी - कालीनामक शक्ति सीता ह्या नांवानें जनकाची कन्या झाली आहे. तीं दोघें (सीता व राम), भूमीचा भार दूर करण्यासाठीं येथें आलीं आहेत. ॥ ३५ ॥ - राम सर्वांचा अंतर्यामी होय :- त्यानें प्रेरणा दिल्यामुळेंच तूं माझा हितोपदेश ऐकत नाहींस. श्रीराम सर्व साक्षी आहे :- तथापि, जसें कमळ चिखलाला लागलेलें असलें तरी चिखलाचे धर्म त्यावर नसतात त्याप्रमाणें, - तो प्रकृतीहून सर्वकाळ पर आहे (तिच्या गुणांशीं संबद्ध नाहीं). ॥ ३६ ॥ तो भूतांच्या बाह्य

धिक्करोषि तथाऽपि त्वं ज्येष्ठो भ्राता पितुः समः ॥ कालो राघवरूपेण जातो दशरथालये ॥ ३४ ॥ काली सीताभिधानेन जाता जनकनन्दिनी ॥ तावुभावागतावत्र भूमेर्भारापनुत्तये ॥ ३५ ॥ तेनैव प्रेरितस्त्वं तु न शृणोषि हितं मम ॥ श्रीरामः प्रकृतेः साक्षात्परस्तात्सर्वदा स्थितः ॥ ३६ ॥ बहिरन्तश्च भूतानां समः सर्वत्र संस्थितः ॥ नामरूपादिभेदेन तत्तन्मय इवामलः ॥ ३७ ॥

(मू.) जातः. ॥ ३४ ॥ (पू.) जाता.॥ (मू.) आगतौ. ॥३५॥ (पू.) हितं न शृणोषि. ॥ श्रीरामः साक्षात् (मू.).॥ ३६ ॥ भूतानां (पू.). ॥ अमलः (मू.) [स्थितः]. ॥ ३७ ॥

१ भार दूर करण्यासाठीं. २ तत्तत्स्वरूपी. ३ सर्वसाक्षी. ४ स्वच्छ.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रदेशीं व अंतरीं अशा सर्व ठिकाणीं एकरूपानें वास करीत असतो, आणि नामें रूपें इत्यादि भेदांनीं तत्तत्स्वरूपीसा भासतो. त्याच्या ठिकाणीं रागलोभादि मल नाहींत. ॥ ३७ ॥ मोठा अग्नि ह्मटला तर एकच होय; पण तो अनेक प्रकारच्या वृक्षांच्या ठिकाणीं लागला (लांकडें जाळीत असला) ह्मणजे त्यांच्या लहान, मोठ्या, लांबोड्या, वाटोळ्या, चतुष्कोण इत्यादि भिन्न भिन्न आकृतींवरूनें अज्ञानदृष्टि जनांना त्या त्या आकारांचा दिसतो, त्याप्रमाणेंच ॥३८॥ परमात्मा - अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय हे - पांच कोश व आकाशादि भूतें ह्यांच्या भेदांमुळें तत्तत्स्वरूपी भासत असतो : ह्यालाच दुसरा दृष्टांत स्फटिकाचा— स्फटिकाला मूळचा रंग नाहीं परंतु तो निळ्या पिंवळ्या ज्या ज्या पदार्थांशीं संयुक्त होईल त्या त्या पदार्थांच्या वर्णाचा दिसतो. ॥ ३९ ॥ तोच परमात्मा नित्यमुक्त असतांही स्वतांच्या मायेच्या गुणांत प्रतिबिंबित झाला ह्मणजे काल, प्रधान, पुरुष आणि अव्यक्त (पालनकर्ता) असा चार प्रकारांचा होतो. ॥ ४० ॥ तो जन्मरहित परमात्मा प्रधानपुरुषांच्या योगेंकरून सर्व जगाची उत्पत्ति करितो

यथा नानाप्रकारेषु वृक्षेष्वेको महानलः[1]॥तत्तदाकृतिभेदेन भिद्यते ऽज्ञानचक्षुषाम्[2]
॥ ३८ ॥ पंचकोशादिभेदेन तत्तन्मय इवाबभौ[4]॥ नीलपीतादियोगेन निर्मलः स्फ-
टिको यथा ॥ ३९ ॥ स एव नित्यमुक्तो ऽपि स्वमायागुणबिम्बितः ॥ कालः प्रधानं
पुरुषो ऽव्यक्तं चेति चतुर्विधः॥ ४० ॥प्रधानपुरुषाभ्यां स जगत्कृत्स्नं सृजत्यजः॥

(मू.) भिद्यते[3], ॥ ३८ ॥ यथा निर्मलः स्फटिकः (उ.), ॥ [तथा] (पू.). ॥ ३९ ॥ ४० ॥ अजः अव्ययः सः (पू.) जगत् सृजति. ॥

१ मोठा अग्नि. २ अज्ञानदृष्टींस. ३ भेद पावतो. ४ भासला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व स्वतां निर्विकार (नाशरहित) असून कालरूपानें जगाचा संहार करितो. ॥ ४१ ॥ तोच कालरूपी भगवान् ब्रह्मदेवाच्या प्रार्थनेवरून तुझा वध करण्यासाठीं मायेनें रामरूप घेऊन येथें आला आहे. ईश्वराचा संकल्प सत्य असतो; तो आपली प्रतिज्ञा अन्यथा होऊं देईल कशी ? ॥ ४२ ॥ - ह्मणून मी तुला सांगतों कीं, - राम तुझा पुत्र, सैन्य, वाहनें ह्यांसह वध करणार. रावणा ! तुझा आणि सगळ्या राक्षसकुलाचा वध झालेला माझ्यानें पाहवणार नाहीं; ह्यासाठीं मी रामाकडे जातों. मी गेलों ह्मणजे तूं आपल्या घरांत

कालरूपेण कलनां जगतः कुरुते ऽव्ययः ॥ ४१ ॥ कालरूपी स भगवान् रामरूपेण मायया ॥ ब्रह्मणा प्रार्थितो देवस्त्वद्वधार्थमिहागतः ॥ तदन्यथा कथं कुर्यात्सत्यसंकल्प ईश्वरः ॥ ४२ ॥ हनिष्यति त्वां रामस्तु सपुत्रबलवाहनम् ॥ हन्यमानं न शक्नोमि द्रष्टुं रामेण रावण ॥ ४३ ॥ त्वां राक्षसं कुलं कृत्स्नं ततो गच्छामि राघवम् ॥ मयि याते सुखी भूत्वा रमस्व भवने चिरम् ॥ ४४ ॥

(मू.) कलनां[1] कुरुते. ॥ ४१ ॥ (पू. द्वि.) [सन्] त्वद्वधार्थं मायया रामरूपेण इह आगतः देवः सत्यसङ्कल्पः ईश्वरः (मू.) ? ॥४२॥ (४३ पू.) हनिष्यति. रावण, ॥ रामेण हन्यमानं[2] त्वां, कृत्स्नं राक्षसं कुलं [च] द्रष्टुं (बा. ४३ उ. ४४ पू.) गच्छामि. ॥ मयि याते[3] [सति, त्वं] (मू.) रमस्व[4]. ॥ ४३ ॥ ४४ ॥

१ संहार. २ मारला जाणाऱ्या. ३ गेलेला. ४ सुखानें रहा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

खुशाल पुष्कळ दिवस सुखानें नांद. " ॥ ४३ ॥ ४४ ॥ रावणाच्या भाषणावरून विभीषणानें क्षणमात्रांत सर्व साहित्यानें भरलेल्या घराचा त्याग केला! त्याच्या मनांत रामाची सेवा करावी अशी इच्छा होती; तेवढ्यासाठीं तो रामाकडे गेला. आतां त्याला स्वतांचे मनोरथ पूर्ण झाल्यासारखें वाटलें. ॥ ४५ ॥

इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे युद्धकाण्डे द्वितीयः सर्गः ॥ २ ॥

महाभाग्यशाली विभीषण चौघां मंत्र्यांसहवर्तमान रामाकडे आला व आकाशांत रामासमोर उभा राहून ॥ १ ॥ उच्च स्वरानें त्याला ह्मणाला :- " हे कमलनयना रामचंद्रा, तूं माझा धनी आहेस. मी, तुझी भार्या ज्यानें

विभीषणो रावणवाक्यतः क्षणाद्विसृज्य सर्वं सपरिच्छदं[1] गृहम् ॥ जगाम रामस्य पदारविन्दयोः सेवाभिकांक्षी[3] परिपूर्णमानसः[4] ॥ ४५ ॥ इति युद्धकाण्डे द्वितीयः सर्गः ॥ २ ॥ विभीषणो महाभागश्चतुर्भिर्मंत्रिभिः सह ॥ आगत्य गगने रामसंमुखे समवस्थितः ॥ १ ॥ उच्चैरुवाच भो स्वामिन् राम राजीवलोचन[6] ॥ रावणस्यानुजो ऽहं ते दारहर्तुर्विभीषणः ॥ २ ॥ नाम्ना भ्रात्रा निरस्तो ऽहं त्वामेव शरणं गतः ॥

(पू.) वि[2]सृज्य, ॥ (मू.) [सन्] जगाम. ॥ ४५ ॥ इति युद्धकाण्डे द्वितीयः सर्गः ॥ २ ॥ महा[5]भागः (मू.) [सन्] ॥ १ ॥ उच्चैः उवाच – ' (२ मू.) रावणस्य अ[8]नुजः, नाम्ना विभीषणः च [अस्मि]. (३ पू.). ॥

---

१ साहित्यासहित, अशा. २ सोडून. ३ सेवा करूं इच्छिणारा. ४ पूर्ण झाला मनोरथ ज्याचा, असा. ५ भाग्यशाली; ज्ञानसंपन्न. ६ कमलासारखे नेत्र ज्याचे, अशा. ७ स्त्री हरण करणाऱ्या. ८ धाकटा भाऊ. ९ घालविलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मूर्खाला उपदेश काय होय ?

चोरून नेली, त्याचा (रावणाचा) कनिष्ठ बंधु. माझें नांव विभीषण - भावानें मला घालवून दिलें, ह्मणून मी तुला शरण आलों. देवा ! रावणाला स्वस्वरूपाचें ज्ञान नाहीं, ह्मणून मी हिताची गोष्ट सांगितली कीं, ॥ २ ॥ ३ ॥ जनकाची कन्या सीता रामाकडे पाठवून दे. हें मी वारंवार सांगितलें, तरी तो ऐकतच नाहीं. कालपाशांनीं त्याला पूर्णपणें स्वाधीन करून घेतलें आहे, - दुसरें काय ह्मणावें ? - ॥ ४ ॥ तो अधम राक्षस मला मारण्यासाठीं खड्ग घेऊन धांवून आला. इतक्यांत लागलाच मी चार सचिवांना बरोबर घेऊन भीतीस्तव ॥ ५ ॥ तुला शरण आलों. रामा ! मला, मोक्ष मिळावा, अशी इच्छा आहे; माझे भवपाश तोड.' विभीषणाचें वचन ऐकिल्यावर सुग्रीवानें रामाला सांगितलें :- ॥ ६ ॥ 'रामा ! हा कोणी तरी कपटी अधम राक्षस आहे. ह्याच्यावर तूं विश्वास ठेवावास, हें मला

हितमुक्तं मया देव तस्य चाविदितात्मनः[1] ॥३॥ सीतां रामाय वैदेहीं प्रेषयेति पुनः पुनः ॥ उक्तोऽपि न शृणोत्येषः कालपाशवशं गतः ॥ ४ ॥ हन्तुं मां खड्गमादाय प्राद्रवद्[2]राक्षसाधमः ॥ ततोऽचिरेण सचिवैश्चतुर्भिः सहितो भयात् ॥५॥ त्वामेव भवमोक्षाय मुमुक्षुः शरणं गतः ॥ विभीषणवचः श्रुत्वा सुग्रीवो वाक्यमब्रवीत् ॥ ६ ॥ विश्वासार्हो न ते राम मायावी[3] राक्षसाधमः ॥

देव, (मू.) तस्य हितं उक्तं- ॥ २ ॥ ३ ॥ वैदेहीं (मू.) एषः न शृणोति. ॥ ४ ॥ राक्षसाधमः मां (मू.) सचिवैः सहितः भयात् ॥५॥ मुमुक्षुः [अहं] भवमोक्षाय (पू.). '॥ सुग्रीवः (मू.) -॥ ६ ॥ 'राम, बली मायावी राक्षसाधमः विशेषेण सीताहर्तुः रावणस्य अनुजः ॥

१ नाहीं कळलें आत्मरूप ज्याला, अशा. २ प्राद्रवत् धांवला. ३ कपटी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

योग्य दिसत नाहीं. त्यांतूनही, - दुसरा कोणी असता तर चिंता नव्हती, पण - हा ह्मणजे ज्यानें सीता चोरून नेली त्या रावणाचा पाठचा भाऊ आहे ! हा महाबलाढ्य दिसतो ! ॥ ७ ॥ ह्याच्याबरोबर अस्त्रें घेऊन तयार असलेले मंत्री आहेत ! त्यांच्या साह्यानें हा आह्मांला एखाद्या विवरांत कोंडून मारून टाकील !! ह्मणून, देवा ! वानरांकडून ह्याचा वध करविण्याची मला आज्ञा दे. ॥ ८ ॥ मला तर असें वाटत आहे. रामा ! तुझ्या बुद्धीचा कसा काय ग्रह झाला आहे, सांग.' सुग्रीवाचें भाषण ऐकून राम हांसत हांसत त्याला म्हणाला :– ॥ ९ ॥ "वानरराजा ! मी मनांत आणिलें, तर अर्ध्या क्षणांत लोकपालांसह सर्व जगाचा संहार उडवीन किंवा निमिषार्धांत नवी सृष्टि करीन. ॥ १० ॥ ह्मणून - तुला सांगतों कीं, - मी

सीताहर्तुर्विशेषेण रावणस्यानुजो बली ॥७॥ मन्त्रिभिः सायुधैरस्मान् विवरे निहनिष्यति ॥ तदाज्ञापय मे देव वानरैर्हन्यतामयम् ॥ ८ ॥ ममैवं भाति ते राम बुद्ध्या किं निश्चितं वद ॥ श्रुत्वा सुग्रीववचनं रामः सस्मितमब्रवीत् ॥ ९ ॥ यदीच्छामि कपिश्रेष्ठ लोकान्सर्वान्सहेश्वरान् ॥ निमिषार्धेन संहन्यां सृजामि निमिषार्धतः ॥ १० ॥ अतो मया ऽभयं दत्तं शीघ्रमानय राक्षसम् ॥ ११ ॥

ते विश्वासार्हः न. ॥७॥ सायुधैः (मू.) हन्यतां [इति] मे आज्ञापय. ॥ ८ ॥ राम, (पू.).' ॥ रामः सुग्रीवचनं (मू.) – ॥९॥ कपिश्रेष्ठ, (पू.) लोकान् ॥ (मू.) संहन्यां. ॥१०॥ (मू.) आनय. ॥११ ॥

---

१ गुहेंत. २ मारीऊ. ३ मारावा. ४ आज्ञा दे. ५ अर्ध्या क्षणांत. ६ उत्पन्न करितों. ७ संहार करीन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्याला अभय दिलें आहे; राक्षसाला लवकर घेऊन ये. ॥ ११ ॥ जो प्राणी केवळ एकदां 'देवा ! मी तुझा आहें' असें ह्मणतो व मजपाशीं अभय मागतो–मग तो कितीही निकृष्ट स्थितींतला किंवा कोणत्याही योनींत जन्मलेला असो–त्याला अभय द्यावयाचें, हें माझें व्रत आहे." ॥ १२ ॥ रामाचें वचन ऐकून सुग्रीवाच्या मनाला हर्ष झाला. पुढें त्यानें विभीषणाला आणून रामाला भेटविलें. ॥ १३ ॥ विभीषणानें रघुवीरापुढें लोटांगण घातलें. त्याच्या मनांत पूर्ण भक्ति उद्भवली होती. आनंदानें त्याचा कंठ भरून आला, व शब्द अडखळूं लागला. ॥ १४ ॥ रामाच्या शरीराचा वर्ण श्यामल, नेत्र विशाल, व मुखकमल प्रसन्न होतें. त्यानें हातांत धनुष्यबाण धरिले असून जवळ लक्ष्मण उभा होता. त्याची मुद्रा शांत दिसे. ॥ १५ ॥

सकृदेव प्रपन्नाय[1] तवास्मीति च याचते[2] ॥ अभयं सर्वभूतेभ्यो ददाम्येतद्व्रतं मम ॥ १२ ॥ रामस्य वचनं श्रुत्वा सुग्रीवो हृष्टमानसः ॥ विभीषणमथानाय्य[3] दर्शयामास राघवम् ॥ १३ ॥ विभीषणस्तु साष्टांगं प्रणिपत्य रघूत्तमम् ॥ हर्षगद्गदया वाचा भक्त्या च परयाऽन्वितः ॥ १४ ॥ रामं श्यामं विशालाक्षं प्रसन्नमुखपंकजम् ॥ धनुर्बाणधरं शान्तं लक्ष्मणेन समन्वितम् ॥ १५ ॥

तव अस्मि इति (पू.) ॥ सर्वभूतेभ्यः [निकृष्टाय अपि] (मू.) व्रतं.' ॥१२॥ (पू.) सुग्रीवः ॥ अथ (मू.) दर्शयामास. ॥१३॥ परया भक्त्या अन्वितः विभीषणः तु रघूत्तमं (१३पू.), (१४।१५मू.) ॥

॥ १५ ॥

---

१ स्वीकारणाऱ्या; ह्मणणाऱ्या; शरण आलेल्या. २ मागणाऱ्या. ३ आणवून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विभीषणानें करसंपुट जोडून त्याची स्तुति करण्यास प्रारंभ केला:– ॥ १६ ॥ विभीषण ह्मणाला :– ' राजाधिराजा रामचंद्रा ! तुला नमस्कार असो. तूं सीतेच्या मनाला रमवितोस; तुला नमस्कार असो. तुझें धनुष्य प्रचंड आहे; तुला मी प्रणाम करितों. हे भक्तवत्सला, तुला नमस्कार असो. ॥ १७ ॥ रामा, तुझ्या स्वरूपाला अंत नाहीं; तें शांत आहे; त्याचें तेज अपरिमित दिसतें; तूं सुग्रीवाचा मित्र व रघुकुलाचा अधिपति होस. तुला अनेक नमस्कार असोत. ॥ १८ ॥ हे थोर पुरुषा ! जगाची उत्पत्ति व नाश होण्याचें कारण तूंच आहेस. - तूं सर्वांचा अंतर्यामी असल्यामुळें - त्रैलोक्याचा गुरु होस. तूं अनादि काळापासून मायानामक गृहिणीबरोबर गृहस्थाश्रम स्वीकारून राहत असतोस. तुला नमस्कार असो. ॥ १९ ॥

कृताञ्जलिपुटो भूत्वा स्तोतुं समुपचक्रमे[1] ॥ १६ ॥ विभीषण उवाच । नमस्ते राम राजेन्द्र नमः सीतामनोरम[2] ॥ नमस्ते चण्डकोदण्ड नमस्ते भक्तवत्सल ॥ १७ ॥ नमो ऽनन्ताय शान्ताय रामायामिततेजसे[4] ॥ सुग्रीवमित्राय च ते रघूणां पतये नमः ॥ १८ ॥ जगदुत्पत्तिनाशानां कारणाय महात्मने ॥ त्रैलोक्यगुरवे ऽनादिगृहस्थाय[5] नमो नमः ॥ १९ ॥

कृतांजलिपुटः भूत्वा, रामं (मू.) ॥ १४ ॥१५॥१६॥ वि० उ० – राजेन्द्र राम, ते (पू.) [ते] नमः.॥ चण्डकोदण्ड[3], ते (मू.) ते नमः. ॥१७॥ (पू.) रामाय नमः (मू.) ते नमः. ॥१८॥ (मू.).॥१९॥

---

१ आरंभ करिता झाला. २ सीतेच्या मनास रमविणाऱ्या. ३ उग्र धनुष्य ज्याचें, अशा. ४ अपरिमित तेज ज्याचें, अशा. ५ अनादि काळापासून गृहस्थाश्रमी. (योगमाया स्वीकारून असलेला).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'तूं जगन्मय भासतोस.'

रामा ! अनंत कोटि ब्रह्माडांचा उत्पादक, रक्षक व अंतीं लयस्थान तूंच होस. तूं इच्छेप्रमाणें वर्तन करणारा (स्वतंत्र) आहेस. तुला नमस्कार असो. ॥ २० ॥ रघुवीरा ! तूं स्थावरजंगमात्मक भूतांच्या बाहेर व आंत व्याप्यव्यापकरूपानें भरलेला आहेस ह्मणून जगन्मय भासत असतोस. ॥ २१ ॥ तुझ्या मायेनें ज्यांचें ज्ञान हरून घेतलें असतें (ज्यांना, हें जग ईश्वररूप होय, असें ज्ञान नसतें) व अर्थांत ज्यांचा आत्मा नष्ट झाल्यासारखा असतो, त्या लोकांचीं अंतःकरणें विपरीत प्रवृत्तिमार्गांत गुंतून राहतात. ह्मणूनच त्यांना नेहमीं पापपुण्यांच्या अनुरोधानें जन्ममरणरूप संसार भोगावा लागतो. ॥ २२ ॥ जोंपर्यंत प्राण्याचें अंतः-करण ज्ञानरूपी तुझ्या ठिकाणीं एकाग्रपणें लागलें नाहीं, तोंपर्यंत, जसें शिंपेच्या तुकड्यावर रुपें भासावें

त्वमादिर्जगतां राम त्वमेव स्थितिकारणम् ॥ त्वमन्ते निधन[1]स्थानं स्वेच्छा[2]चार-स्त्वमेव हि ॥ २० ॥ चराचरा[3]णां भूतानां बहिरन्तश्च राघव ॥ व्याप्यव्यापकरू-पेण भवान् भा[4]ति जगन्मयः ॥ २१ ॥ त्वन्मायया हृतज्ञाना नष्टात्मा[5]नो वि[6]चे-तसः ॥ गतागतं प्रपद्यन्ते पापपुण्यवशात्सदा ॥ २२ ॥ तावत्सत्यं जगद्भाति शुक्तिकारजतं यथा ॥ यावन्न ज्ञायते ज्ञानचेतसा नान्यगा[9]मिना ॥ २३ ॥

राम, त्वं जगतां (मू.) स्वेच्छाचारः [असि]. ॥ २० ॥ राघव, (मू.) भाति. ॥ २१ ॥ (मू.) गताग[7]तं [8]प्रपद्यन्ते.॥२२॥(उ.) ज्ञा[10]नचेतसा [भवान्] न ज्ञायते,॥तावत् यथा(पू.)[तथा]जगत् सत्यं भाति.॥२३॥

१ लय होण्याचें स्थान. २ स्वतांच्या इच्छेप्रमाणें वागणारा. ३ स्थावर जंगम. ४ भासतो. ५ भानशून्य. ६ विपरीत मार्गांकडे मन ज्यांचें, असे. ७ जाण्यायेण्यास. ८ पावतात. ९ दुसरेकडे न जाणाऱ्या. १० ज्ञानस्वरूपावर जें मन, त्यानें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याप्रमाणें, त्यांना जग सत्य भासत असतें. ॥ २३ ॥ व्यापका! हे विषय परिणामीं दुःख देतात, - असें निश्चित ठरलेलें आहे :- तथापि लोकांना तुझ्या स्वरूपाचें ज्ञान नसतें, ह्मणून ते पुत्र, स्त्रिया, गृहें इत्यादिकांच्या ठिकाणीं आसक्त व विषयसुखांत रममाण होऊन राहतात. ॥ २४ ॥ इंद्र, अग्नि, यम, निर्ऋति, वरुण, वायु, कुबेर, रुद्र हे अष्टौ दिक्पाल तुझ्याच विभूति आहेत. पुरुषोत्तम (विष्णु) तूंच. ॥ २५ ॥ ईश्वरा! तूं सूक्ष्माहून अतिसूक्ष्म (कळण्यास अति कठिण) व स्थूलाहून अतिस्थूल (सर्वव्यापक) आहेस. तूं सर्व लोकांचें मातापितरांप्रमाणें समदृष्टीनें पालन पोषण करितोस (मूल चांगलें असो अथवा वाईट असो; आईबाप त्याचें संगोपन उत्तम प्रकारें करितातच; त्याप्रमाणें तूं उच्च नीच सर्व भूतांचें पालन, आवड नावड न धरितां, करितोस) . ॥ २६ ॥ तुला आदि, मध्य, व अंत नाहींत. तुझ्या ठिकाणीं कोणतीही शक्ति कमी नाहीं. तुला वृद्धि व उतारपणही नाहींत. तूं नित्य परि-

त्वदज्ञानात्सदा युक्ताः पुत्रदारगृहादिषु ॥ रमन्ते विषयान्सर्वानन्ते दुःखप्रदान्वि-
भो ॥ २४॥ त्वमिन्द्रो ऽग्निर्यमो रक्षो वरुणश्च तथा ऽनिलः[1] ॥ कुबेरश्च तथा रुद्र-
स्त्वमेव पुरुषोत्तमः ॥ २५ ॥ त्वमणोरप्यणीयांश्च[2][3] स्थूलात्स्थूलतरः[4] प्रभो ॥ त्वं पिता
सर्वलोकानां माता धाता[5] त्वमेव हि ॥ २६ ॥ आदिमध्यान्तरहितः परिपूर्णो
ऽच्युतो ऽव्ययः ॥ त्वं पाणिपादरहितश्चक्षुःश्रोत्रविवर्जितः[6][7] ॥ २७ ॥

विभो, (पू.) युक्ताः ॥ (मू.) विषयान् रमन्ते. ॥ २४ ॥ (मू.).॥ २५ ॥ प्रभो, (पू.) च त्वं सर्वलोकानां पिता; त्वं एव (मू.) ॥ २६ ॥ २७ ॥

---

१ वायु. २ सूक्ष्माहून. ३ अति सूक्ष्म. ४ फार मोठा. ५ पोषण करणारा. ६ हस्तपादरहित. ७ नेत्र व कर्ण यांनीं रहित.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'तूं सर्वशक्ति व निराकार.'

पूर्ण स्थितींत असतोस. तुला हस्त, पाद, नेत्र व कर्ण नाहींत; ॥ २७ ॥ तथापि तूं ऐकतोस, पाहतोस, धरितोस व धांवतोस. तूंच खर दैत्याचा नाश केलास. - अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय ह्या - पांच कोशांहून तूं वेगळा आहेस. तुझ्या ठिकाणीं गुण नाहींत व तुला दुसरा कोणताही आधार नाहीं. ॥ २८ ॥ ' कांहीं तरी आहे, तें अमुक असें मात्र कळत नाहीं ' ह्या ज्ञानाला निर्विकल्प ज्ञान असें ह्मणतात : ईश्वरा ! तूं अशा निर्विकल्प ज्ञानाचा विषय आहेस (तुझी सत्ता आहे एवढें मात्र कळतें, तुझें स्वरूप अमुक प्रकारचें आहे, असें कळत नाहीं); अर्थात तुला आकार नाहीं हें सिद्ध आहे. तुला पूज्य असा दुसरा कोणीच नाहीं. तुला कोणताही विकार नाहीं; ह्मणजे तूं उत्पन्न होणें, उत्पत्तीनंतर असणें, वाढणें, पूर्णदशेस येणें, क्षीण होत जाणें व नाश पावणें ह्या सहा भावविकारांनीं रहित आहेस. ज्याला आदि नाहीं तो प्रकृतीहून पर (तिच्या गुणांशीं असंबद्ध) असलेला पुरुष तूंच. ॥ २९ ॥ तूं मनुष्यासारखा दिसत

श्रोता[1] द्रष्टा[2] ग्रहीता[3] च जवनस्त्वं[4] खरान्तकः[5] ॥ कोशेभ्यो[6] व्यतिरिक्तस्त्वं[7] निर्गुणो निराश्रयः[8] ॥२८॥ निर्विकल्पो[9] निर्विकारो निराकारो निरीश्वरः[10] ॥ षड्भावरहितो[11] ऽनादिः पुरुषः प्रकृतेः परः ॥ २९ ॥ मायया गृह्यमाणस्त्वं मनुष्य इव भाव्यसे[12] ॥

(मू.) [च]. ॥ २८ ॥ २९ ॥ (पू.). ॥

१ ऐकणारा. २ पाहणारा. ३ धरणारा. ४ पळणारा. ५ खर दैत्याला मारणारा. ६ अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, व आनंदमय ह्या पांच कोशांहून. ७ वेगळा. ८ दुसऱ्या आधारावांचून असलेला. ९ कांहीं तरी आहे अशा ज्ञानाचा विषय. १० ज्याला पूज्य कोणी नाहीं, असा. ११ सहा भावविकारांनीं रहित. १२ मानिला जातोस.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहेस; ह्या स्वरूपाचें दर्शन होण्याला कारण तुझी माया होय. जे विष्णुभक्त जन तूं निर्गुण व जन्मरहित आहेस असें जाणितात, ते मोक्ष पावतात. ॥ ३० ॥ प्रभो रामचंद्रा! मला तुझ्या चरणांची उत्तम प्रकारें भक्ति ही निःश्रेणि (शिडी) मिळावी व तिच्या साह्यानें मी ज्ञानयोग नांवाच्या राजवाड्याच्या शिखरावर चढावें, अशी माझी इच्छा आहे. ॥३१॥ हे सीतापते रामचंद्रा! तूं परम दयानिधि पण सांप्रत रावणाचा शत्रु आहेस. तुला मी वारंवार नमस्कार करितों. तूं मला भवसागरांतून सोडव." ॥ ३२ ॥ ही स्तुति ऐकिल्यावर भक्तवत्सल श्रीरामचंद्र प्रसन्न झाला व विभीषणाला ह्मणाला :– भक्तोत्तमा! तुझें कल्याण असो. मी तुला वर देण्यास सिद्ध आहें; पाहिजे तो वर मागून घे.' ॥३३॥ विभीषण ह्मणाला:– 'रघुवीरा! तुझ्या चरणांचें दर्शन

ज्ञात्वा त्वां निर्गुणमजं वैष्णवा मोक्षगामिनः ॥ ३० ॥ अहं त्वत्पादसद्भक्तिनिः-
श्रेणीं प्राप्य राघव ॥ इच्छामि ज्ञानयोगाख्यं सौधमारोढुमीश्वर ॥ ३१ ॥ नमः
सीतापते राम नमः कारुणिकोत्तम ॥ रावणारे नमस्तुभ्यं त्राहि मां भवसागरात्
॥ ३२ ॥ ततः प्रसन्नः प्रोवाच श्रीरामो भक्तवत्सलः ॥ वरं वृणीष्व भद्रं ते
वाञ्छितं वरदो ऽस्म्यहम् ॥ ३३ ॥

वैष्णवाः (मू.) ज्ञात्वा मोक्षगामिनः [भवन्ति]. ॥ ३० ॥ राघव ईश्वर, (मू.) इच्छामि. ॥ ३१ ॥ सीतापते राम, [ते] (पू.), [ते] नमः. रावणारे, तुभ्यं (मू.) त्राहि. ' ॥ ३२ ॥ (पू.) श्रीरामः प्रोवाच –॥' वाञ्छितं वरं वृणीष्व. ते भद्रं. अहं (मू.). ' ॥ ३३ ॥

---

१ मोक्षास जाणारे. २ तुझ्या चरणांची उत्तम भक्ति ह्या शिडीला किंवा जिन्याला. ३ राजमंदिरास. ४ चढण्यास. ५ उत्तम दयावंता. ६ संसारसमुद्रांतून. ७ माग.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'मला भक्ति व ज्ञान दे.'

मिळालें एवढ्यानेंच मी धन्य व कृतकृत्य झालों; माझा सर्व कार्यभाग पार पडला; आणि मला मुक्ति मिळाली; ह्यांत संशय नाहीं. ॥३४॥ रामा ! तुझ्या मूर्तीचें दर्शन मिळाल्यामुळें - मला असें वाटत आहे कीं, - मज सारखा धन्य जगांत कोणी नाहीं, मजसारखा पवित्र कोठें मिळणार नाहीं, फार तर काय सर्व गुणांत माझ्या सारख्या योग्यतेचा पुरुष कोठेंही सांपडायाचा नाहीं. ॥ ३५ ॥ रघुकुमरा ! मी स्वतांच्या पूर्व कर्मां-मुळें ह्या बंधनांत (संसारांत) पडलों आहें. हें बंधन तुटण्यासाठीं तूं मला भक्तीपासून उद्भवणारें आपल्या (तुझ्या) स्वरूपाचें ज्ञान दे व मोक्षप्राप्तीचें साधन असें तुझें ध्यान करण्याकडे माझी प्रवृत्ति कर. ॥३६॥ राजाधिराजा रामचंद्रा ! मी तुजपाशीं विषयसुख मागत नाहीं; तर तुझ्या चरणकमलावर माझी सर्वकाळ

विभीषण उवाच ॥ धन्यो ऽस्मि कृतकृत्यो ऽस्मि कृतकार्यो ऽस्मि राघव ॥ त्वत्पा-
ददर्शनादेव विमुक्तो ऽस्मि न संशयः ॥३४॥ नास्ति मत्सदृशो धन्यो नास्ति मत्सदृशः
शुचिः[1] ॥ नास्ति मत्सदृशो लोके राम त्वन्मूर्तिदर्शनात् ॥ ३५ ॥ कर्मबन्धविनाशाय
त्वज्ज्ञानं भक्तिलक्षणम् ॥ त्वद्ध्यानं परमार्थं च देहि मे रघुनन्दन ॥ ३६ ॥ न याचे
राम राजेन्द्र सुखं विषयसंभवम् ॥ त्वत्पादकमले सक्ता भक्तिरेव सदा ऽस्तु मे ॥३७॥

वि० उ० – ' राघव, (मू.). ॥ ३४ ॥ (बा. उ.) मत्सदृशः धन्यः (पू.) न अस्ति. लोके मत्स-दृशः न अस्ति. ॥३५॥ रघुनन्दन, मे (पू.) त्वज्ज्ञानं ॥ परमार्थं (मू.). ॥३६॥ (पू.) सुखं न याचे[2]. मे (मू.). ' ॥ ३७ ॥

१ पवित्र. २ मागतों.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अखंड भक्ति राहावी, - इतकाच वर मला पाहिजे आहे. -' ॥ ३७ ॥ हें ऐकून रामचंद्र संतुष्ट झाला व 'ठीक आहे' असें ह्मणून राक्षसाला पुन्हां सांगूं लागला :- 'विभीषणा! तुझें कल्याण असो. मी तुला एक सिद्धांताची गुप्त गोष्ट सांगतों, ऐक :- ॥ ३८ ॥ - ह्या जगांत, - जे पुरुष सर्व ठिकाणची आसक्ति सोडून योगाभ्यास व माझी भक्ति करण्यांत दक्ष राहतात आणि ज्यांचे स्वभाव अत्यंत शांत असतात त्यांच्या हृदयामध्यें सीतेसहवर्तमान मी नित्य वास करितों, ह्यांत संशय नाहीं : - अर्थात तुझ्या अंतःकरणांत मी आहेंच; - ॥ ३९ ॥ तूं सर्वदा शांत असतोस; तुझ्याठिकाणीं पाप मुळींच राहिलेलें नाहीं. असेंच माझें नित्य ध्यान करीत गेलास कीं तूं ह्या भयंकर संसारसमुद्रांतून मुक्त होशील. ॥ ४० ॥ तूं केलेलें हें स्तोत्र मला फार आवडलें. जो मनुष्य केवळ माझ्या प्रीत्यर्थ ह्याचा पाठ करील, हें लिहील,

ओमित्युक्त्वा पुनः प्रीतो रामः प्रोवाच राक्षसम् ॥ शृणु वक्ष्यामि ते भद्रं रहस्यं मम निश्चितम् ॥ ३८ ॥ मद्भक्तानां प्रशान्तानां योगिनां वीतरागिणाम् ॥ हृदये सीतया नित्यं वसाम्यत्र न संशयः ॥ ३९ ॥ तस्मात्त्वं सर्वदा शान्तः सर्वकल्मषवर्जितः ॥ मां ध्यात्वा मोक्ष्यसे नित्यं घोरसंसारसागरात् ॥ ४० ॥ स्तोत्रमेतत्पठेद्यस्तु लिखेद्यः शृणुयादपि ॥ मत्प्रीतये ममाभीष्टं सारूप्यं समवाप्नुयात् ॥ ४१ ॥

प्रीतः रामः (पू.) प्रोवाच – ' (मू.) रहस्यं वक्ष्यामि. ॥३८॥ (मू.) न. ॥३९॥ (पू.) त्वं ॥ मां नित्यं (मू.) मोक्ष्यसे. ॥ ४० ॥ यः तु मत्प्रीतये एतत् अभीष्टं स्तोत्रं पठेत्, यः (पू.), [सः] (मू.). ॥४१॥

१ ओम् बरें; ठीक. २ गेली प्रीति ज्यांपासून, त्या. ३ सर्वपापरहित.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

किंवा निदान ऐकेल तरी, त्याला माझी सरूपता मुक्ति प्राप्त होईल.' ॥ ४१ ॥ - शंकर ह्मणाले :- पार्वति, - भक्तजनांवर रामाचें फार प्रेम असतें. तो विभीषणाला इतकें सांगून लक्ष्मणाकडे वळला व त्याला ह्मणाला :- 'लक्ष्मणा! माझ्या दर्शनाचें फळ काय असतें, तें ह्याला आतांच दिसलें (कळलें) पाहिजे : ॥ ४२ ॥ ह्मणून मी ह्याला - येथेंच ह्या क्षणींच - लंकेंतील राज्याचा अभिषेक करणार : तूं समुद्राचें उदक घेऊन ये. जोंपर्यंत सूर्य व चंद्र विद्यमान आहेत, जो कालपर्यंत पृथ्वी स्थिर राहणार आहे, ॥ ४३ ॥ व जितका वेळ माझी कीर्ति जगांत असेल, तोंपर्यंत ह्यानें लंकेचें राज्य करावें.' असें सांगून रामानें लक्ष्मणाकडून कलशांत उदक भरून आणविलें; ॥ ४४ ॥ आणि त्या लक्ष्मीपति प्रभूनें विभीषणाचे चौघे मंत्री

इत्युक्त्वा लक्ष्मणं प्राह श्रीरामो भक्तभक्तिमान् ॥ पश्यत्विदानीमेवैष मम संदर्शने फलम् ॥ ४२ ॥ लंकाराज्ये ऽभिषेक्ष्यामि जलमानय सागरात् ॥ यावच्चन्द्रश्च सूर्यश्च यावत्तिष्ठति मेदिनी ॥ ४३ ॥ यावन्मम कथा लोके तावद्राज्यं करोत्वसौ ॥ इत्युक्त्वा लक्ष्मणेनाम्बु ह्यानाय्य कलशेन तम् ॥ ४४ ॥ लंकाराज्याधिपत्यार्थमभिषेकं रमापतिः ॥ कारयामास सचिवैर्लक्ष्मणेन विशेषतः ॥ ४५ ॥

भक्तभक्तिमान श्रीरामः (पू.) - 'एषः (मू.) पश्यतु. ॥ ४२ ॥ [एनं] (पू.) जलं आनय. ॥ (मू.) च तिष्ठति, ॥ ४३ ॥ यावत् लोके (४४ पू.) राज्यं करोतु.' ॥ रमापतिः (४४ उ.) अम्बु[2] आनाय्य[3], तं (मू.) लक्ष्मणेन [च] कारयामास[4]. ॥ ४४ ॥ ४५ ॥

१ पृथ्वी. २ उदक. ३ आणवून. ४ करविता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व विशेषतः लक्ष्मण ह्यांच्याकडून विभीषणाला लंकेच्या राज्याधिकाराचा अभिषेक करविला. ॥ ४५ ॥ सर्व वानरांनीं 'वाहवा! उत्तम गोष्ट झाली ! !' असें ह्मणून ह्या कृत्याची प्रशंसा केली. सुग्रीवानेंही विभीषणाला आलिंगन देऊन ह्मटलें :–॥ ४६॥ 'विभीषणा ! आपण सर्वजगच प्रभु रामचंद्राचे सेवक आहों; तथापि तूं सर्वांमध्यें मुख्य आहेस. कारण, तूं रामाचा आश्रय केवळ भक्तीस्तव केलास.॥ ४७॥ आतां, रावणाचा नाश करण्याच्या कामीं रामाला त्वां साह्य करावें.' विभीषण ह्मणाला :– ' - सुग्रीवा! मी यःकश्चित् प्राणी! - प्रभु रामचंद्राला साह्य करण्याचें माझें काय सामर्थ्य आहे? तथापि, मी भक्तिपुरःसर निष्कपटपणें यथाशक्ति त्याची सेवा करीन.' ॥ ४८ ॥ रावणानें शुक नांवाचा एक महादैत्य कांहीं निरोप सांगून सुग्रीवाकडे पाठविला

साधु साध्विति ते सर्वे वानरास्तुष्टुवुर्भृशम्[1] ॥ सुग्रीवो ऽपि परिष्वज्य[2] विभीषणमथाब्रवीत् ॥ ४६ ॥ विभीषण वयं सर्वे रामस्य परमात्मनः ॥ किंकरास्[3]तत्र मुख्यस्त्वं भक्त्या रामपरिग्रहात्[4] ॥ ४७॥ रावणस्य विनाशे त्वं साहाय्यं कर्तुमर्हसि ॥ विभीषण उवाच । अहं कियान्सहायत्वे रामस्य परमात्मनः ॥ किं तु दास्यं करिष्ये ऽहं भक्त्या शक्त्या त्वमायया[6] ॥ ४८॥ दशग्रीवेण संदिष्टः[7] शुको नाम महासुरः ॥

(पू.) ' साधु, साधु इति ' भृशं तुष्टुवुः. ॥ सुग्रीवः अपि विभीषणं (मू.) – ॥ ४६ ॥ 'विभीषण, सर्वे (पू.) रामस्य ॥ (मू.) मुख्यः [जातः]. ॥ ४७ ॥ त्वं (पू.).' ॥ वि० उ० – ' (द्वि.) रामस्य सहायत्वे कियान्? ॥ (मू.) [च] दास्यं करिष्ये.' ॥ ४८ ॥ (पू.) ॥

---

१ अत्यंत. २ आलिंगून. ३ सेवक. ४ रामाचा स्वीकार केल्यामुळें. ५ केवढासा. ६ निष्कपटपणें. ७ निरोप दिलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भेदाचा किंवा फितूरीचा प्रयत्न.

होता. तो - इकडे आला व - आकाशांत उभा राहून सुग्रीवाला सांगूं लागला :– ॥ ४९ ॥ ‘ सुग्रीवा ! - वाली व रावण परस्परांना भाऊ मानीत असत; तूं वालीचा भाऊ अर्थात - रावणाचाही भाऊ झालास. त्या राक्षसाधिपतीनें तुला सांगितलें आहे कीं, तूं मोठ्या कुलांत जन्मला असून वनचरांचा राजा आहेस; ॥५०॥ मी तर तुला सख्ख्या भावासारखा लेखितों; मजकडून तुझ्या कोणत्याही वस्तूचा नाश झालेला नाहीं; मी राजपुत्राची पत्नी आणिली, त्याचें तुला काय? ॥५१॥ तूं वानरांना बरोबर घेऊन निमूटपणें किष्किंधेस परत जा; अरे ! लंका हस्तगत करून घेणें देवांना देखील अशक्य आहे, तेथें मानवांचें किंवा वानरसेनापतींचें काय

संस्थितो ह्यम्बरे वाक्यं सुग्रीवमिदमब्रवीत् ॥ ४९ ॥ त्वामाह रावणो राजा भ्रातरं राक्षसाधिपः ॥ महाकुलप्रसूतस्त्वं राजा ऽसि वनचारिणाम् ॥ ५० ॥ मम भ्रातृसमानस्त्वं तव नास्त्यर्थविप्लवः ॥ अहं यदहरं भार्यां राजपुत्रस्य किं तव ॥ ५१ ॥ किष्किन्धां याहि हरिभिर्लंका शक्या न दैवतैः ॥ प्राप्तुं किं मानवैरल्पसत्त्वैर्वानरयूथपैः ॥ ५२ ॥

[1] अम्बरे संस्थितः [2] [सन्] (मू.) वाक्यं अब्रवीत् – ॥ ४९ ॥ “ (पू.) रावणः भ्रातरं त्वां आह – ‘ (मू.) राजा असि. ॥ ५० ॥ त्वं (पू.) न अस्ति. ॥(मू.) भार्यां [6] अहरं, [तत्र] तव [दुःखं] किं ? ॥ ५१ ॥ हरिभिः [सह] (पू.) अपि प्राप्तुं न शक्या; ॥ (मू.) [च] किं [भवेत्] ? ” ॥ ५२ ॥

१ आकाशांत. २ राहिलेला. ३ मोठ्या कुलांत जन्मलेला. ४ वनांत फिरणाऱ्यांचा. ५ द्रव्याचा नाश. ६ आणिता झालों. ७ थोडी शक्ति ज्यांची, अशा. ८ वानरसेनापतींनीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चालणार ? तुमच्या शक्ति त्या किती ? ' ॥ ५२ ॥ तो दैत्य - अशा प्रकारें सुग्रीवाला रावणाचा - निरोप कळवीत होता, इतक्यांत वानरांनीं भराभर वर उड्या मारिल्या आणि लागलीच शुकाला खालीं आणून मुष्टिमोदकांची बिदागी देण्यास प्रारंभ केला ! ॥ ५३ ॥ वानर मारूं लागले तेव्हां शुक रामचंद्राला ह्मणालाः– " महासमर्था रामचंद्रा ! तूं राजाधिराजा आहेस; ' दूतांना मारूं नये व मारीतही नाहींत ' - ही राजनीति तुला विदित असलीच पाहिजे : - तर मग ह्या आपल्या वानरांना आटोपून घे. " ॥५४॥ शुकाचें तें भाषण व रुदन रामाच्या कानीं आलें. तेव्हां त्यानें वानरांना ' ह्याला मारूं नका ' असें सांगून मागें घेतलें. ॥५५॥

तं प्रापयन्तं वचनं तूर्णमुत्प्लुत्य वानराः ॥ प्रापद्यन्त तदा क्षिप्रं निहन्तुं दृढमुष्टिभिः ॥ ५३॥ वानरैर्हन्यमानस्तु शुको राममथाब्रवीत् ॥ न दूतान् घ्नन्ति राजेन्द्र वानरान्वारय प्रभो ॥ ५४ ॥ रामः श्रुत्वा तदा वाक्यं शुकस्य परिदेवितम् ॥ मा वधिष्टेति रामस्तान्वारयामास वानरान् ॥ ५५ ॥

तदा वानराः वचनं प्रापयन्तं तं क्षिप्रं[2] दृढमुष्टिभिः निहन्तुं (मू.). ॥ ५३ ॥ (पू.) – ॥ ' राजेन्द्र, प्रभो, दूतान् (मू.). ' ॥ ५४ ॥ तदा रामः (पू.) वाक्यं, परिदेवितं [च] श्रुत्वा, ॥ (मू.) वारयामास. ॥ ५५ ॥

---

१ पोंचविणाऱ्या. २ लवकर. ३ घट्ट मुष्टींनीं. ४ मारण्यास. ५ मारतात. ६ निवारण कर. ७ शोकास. ८ नको. ९ मारूं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सुग्रीवाचा रावणाला उलट निरोप.

शुक पुन्हां आकाशांत जाऊन सुग्रीवाला विचारूं लागला :– ‘ राजा ! मी आतां जातों, पण रावणाला काय सांगूं, बोल.’ ॥ ५६ ॥ सुग्रीव ह्मणाला :– ‘ - शुका ! रावणाला माझा उलट निरोप सांग कीं, - हे अधम राक्षसा! जसा वाली माझा भाऊ तसाच तूं ! ह्मणून, त्याच्याप्रमाणेंच, लागतील ते उपाय योजून, मी तुझा वध करणारः - वालीला एकट्यालाच मारिलें पण - तुला पुत्र, सैन्य, वाहनें ह्यांसह यमलोकीं पाठविणार ! ॥५७॥ - त्याला ह्मणावें, - रामाची पत्नी घेऊन जाणार कोठें, मला सांग.’ इतकें सांगून सुग्रीवानें, - शुकाच्या मनांत कदाचित् ‘ हीं वानरें एवढा प्रचंड समुद्र उल्लंघून लंकेवर येतात कसचीं आणि काय कसचें ! ’ अशी शंका आली असेल ती दूर करण्यासाठीं, वानरांकडूनच - त्याला बांधविलें; पण रामाच्या आज्ञेवरून पुन्हां सोडून

पुनरम्बरमासाद्य[1][2] शुकः सुग्रीवमब्रवीत् ॥ ब्रूहि राजन्दशग्रीवं किं वक्ष्यामि[3] व्रजा-
म्यहम्[4] ॥ ५६ ॥ सुग्रीव उवाच ॥ यथा वाली मम भ्राता तथा त्वं राक्षसाधम ॥
हन्तव्यस्त्वं मया यत्नात्सपुत्रबलवाहनः ॥ ५७ ॥ ब्रूहि मे रामचन्द्रस्य भार्यां
हृत्वा क्व यास्यसि ॥ ततो रामाज्ञया धृत्वा शुकं बध्वा ऽन्वरक्षयत्[5] ॥ ५८ ॥

शुकः (पू.) – ॥ ‘ (मू.)? ब्रूहि; अहं व्रजामि. ’ ॥५६॥ सु० उ० ‘ राक्षसाधम, (मू.) त्वं यत्नात् हन्तव्यः. ॥ ५७ ॥ (पू.)? ब्रूहि. ’ ॥ (मू.) धृत्वा, बध्वा [च] अन्वरक्षयत्. ॥ ५८ ॥

१ आकाशांत. २ पोंचून. ३ बोलूं. ४ जातों. ५ रक्षण करिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दिलें. ॥ ९८ ॥ रावणानें शार्दूल नांवाचा दुसरा एक राक्षस, - वानरांचें सैन्य किती आहे तें पाहून येण्या-साठीं, पाठविला होता. - त्यानें तें प्रचंड वानरसैन्य पाहून सर्व वृत्तांत रावणाला, - शुकदैत्य येऊन पोंचण्या - पूर्वींच, कळविला. ॥ ९९ ॥ तो ऐकून रावणाला अपार चिंता उद्भवली :- त्याचें धैर्य खचलें व शौर्य नाहींसें झालें. - तो मोठ्यानें उसासे टाकीत मंदिरांत बसून राहिला. इकडे रामानें, समुद्राकडे पाहून नेत्र-प्रांत लाल केले - व लक्ष्मणाला ह्मटलें : - ॥६०॥ "बा पुण्यपुरुषा लक्ष्मणा ! ह्या समुद्राचें अंतःकरण किती दुष्ट आहे पहा ! मी किनाऱ्यावर आलों असतांही हा दुष्ट माझा सत्कार करीत नाहीं व माझ्या दर्शनाला येत नाहीं ! ॥ ६१ ॥ हा मला मनुष्यच समजत आहे ! - ह्याला वाटत असेल कीं, - राम वानरांकडून

शार्दूलो ऽपि ततः पूर्वं दृष्ट्वा कपिबलं महत्॥यथा[१]वत्कथयामास रावणाय स राक्ष-सः ॥ ५९ ॥ दीर्घचिन्तापरो भूत्वा निःश्वस[३]न्नास मन्दिरे ॥ ततः समुद्रमावेक्ष्य रामो रक्तान्तलोचनः ॥ ६० ॥ पश्य लक्ष्मण दुष्टोऽसौ वारिधिर्मा[४]मुपागतम् ॥ नाभिनन्दति दुष्टात्मा दर्शनार्थं ममानघ ॥ ६१ ॥ जानाति मानुषोऽयं मे किं करिष्यति वानरैः ॥

ततः सः शार्दूलः अपि राक्षसः (पू.) कपिबलं दृष्ट्वा, रावणाय (मू.). ॥ ५९ ॥ [रावणः] (पू.) आस.॥ (मू.) रामः [आह –] ॥६०॥ " लक्ष्मण, (पू.) मां ॥ न अभिनन्दति; अनघ, (मू.) दर्शनार्थं [न आयाति]. ॥ ६१ ॥ [समुद्रः], '(पू.) किं करिष्यति ? ' [इति] जानाति. ॥

१ वानरसैन्य. २ पूर्णपणें. ३ श्वास टाकणारा. ४ सामोरा येतो. ५ पापरहित.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राम समुद्रावर संतापतो.

माझें करणार काय? पण, हे वीरा (लक्ष्मणा)! पहा, आज मी समुद्राला सुकवून टाकतों! ॥ ६२ ॥ मग आपले वानर पायींच चालत जातील. त्यांना उगाच ताप नको!" रामाचे नेत्र क्रोधामुळें लाल झाले होते. त्यानें इतकें भाषण करून धनुष्याची प्रत्यंचा चढविली, ॥ ६३ ॥ भात्यांतून प्रलयकाळच्या अग्नी-सारखा प्रखर तेजोयुक्त बाण काढून धनुष्यावर जोडिला, दोरी ओढिली आणि पुन्हां भाषण केलें:– ॥६४॥ 'सर्व भूतांनीं रामाच्या बाणाचा प्रभाव अवलोकन करावा. मी आतांच ह्या नदीपतीचें–समुद्राचें–भस्म करून टाकितों.' ॥ ६५ ॥ रामानें हे शब्द उच्चारिले, त्या वेळीं पर्वत, उपवनें व महारण्यें ह्यांसह

अद्य पश्य महाबाहो शोषयिष्यामि वारिधिम् ॥६२॥ पादैनैव गमिष्यन्ति वानरा विगतज्वराः॥ इत्युक्त्वा क्रोधताम्राक्ष आरोपितधनुर्धरः॥ ६३ ॥ तूणीराद्बाणमादाय कालाग्निसदृशप्रभम् ॥ संधाय चापमाकृष्य रामो वाक्यमथाब्रवीत् ॥ ६४ ॥ पश्यन्तु सर्वभूतानि रामस्य शरविक्रमम् ॥ इदानीं भस्मसात्कुर्यां समुद्रं सरितां पतिम् ॥ ६५ ॥ एवं ब्रुवति रामे तु सशैलवनकानना ॥

महाबाहो, पश्य (मू.) शोषयिष्यामि. ॥ ६२ ॥ विगतज्वराः वानराः (मू.). " ॥ ६३ ॥ रामः (पू.) बाणं आदाय (मू.) वाक्यं अब्रवीत् – ॥ ६४ ॥ (पू.) पश्यन्तु. (मू.) समुद्रं भस्मसात् कुर्यां. ॥ ६५ ॥ रामे तु एवं ब्रुवति [सति], (पू.) ॥

१ मोठे बाहु ज्याचे, अशा २ सुकवीन. ३ निष्काळजी. ४ दोरी चढविलेलें धनुष्य धरणारा. ५ भात्यांतून. ६ घेऊन. ७ कालाग्नीसारखी कांति ज्याची, अशा. ८ बाणाच्या प्रतापास. ९ पाहोत. १० नद्यांच्या. ११ पर्वत, उपवनें, वनें ह्यांसह.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पृथ्वी थरथर कांपूं लागली, स्वर्ग कंपायमान झाला, दिशा अंधकारानें भरून गेल्या, ॥६६॥ समुद्र खवळला व भीतीमुळें मर्यादेचें उल्लंघन करून एक योजन पुढें आला; त्याच्या पोटांतील लहानमोठे मत्स्य, सुसरी व मगर तापून घाबरून गेले. ॥ ६७॥ थोड्याच अवकाशांत साक्षात् समुद्र दिव्य रूप धारण करून व आंगावर दिव्य अलंकार घालून स्वतांच्या कांतीनें सर्व दिशांना प्रकाशित करीत - रामाकडे आला. - ॥ ६८ ॥ त्यानें, आपल्या पोटांतील दिव्य रत्नें - रामाला अर्पण करण्यासाठीं - हातीं घेऊन - बरोबर आणिलीं होतीं, तें महामोल उपायन (नजराणा) रामाच्या चरणांपुढें ठेविलें. ॥ ६९ ॥ रामाचे नेत्रप्रांत लाल झाले होते.

चचाल वसुंधा[1] द्यौश्च[2] दिशश्च तमसा ऽऽवृताः ॥ ६६ ॥ चुक्षुभे सागरो वेलां[6] भयाद्योजनमत्यगात् ॥ तिमिनक्रझषा मीनाः प्रतप्ताः परित्रसुः ॥ ६७ ॥ एतस्मिन्नन्तरे साक्षात्सागरो दिव्यरूपधृक् ॥ दिव्याभरणसंपन्नः स्वभासा भासयन् दिशः ॥ ६८ ॥ स्वान्तस्थदिव्यरत्नानि[11] कराभ्यां परिगृह्य[13] सः ॥ पादयोः पुरतः क्षिप्त्वा रामस्योपायनं बहु ॥ ६९ ॥ दण्डवत्प्रणिपत्याह रामं रक्तान्तलोचनम् ॥

(मू.) चचाल[3]; दिशः च तमसा[4] आवृताः [आसन्]. ॥६६॥ सागरः भयात् (मू.) [सन्तः] परित्रसुः. ॥ ६७ ॥ (मू.) भासयन् [बभूव]. ॥६८॥ सः कराभ्यां[12] (पू.), ॥ रामस्य (मू.) उपायनं[14] क्षिप्त्वा[15], ॥ ६९ ॥ रक्तान्तलोचनं रामं (पू.) – ॥

१ पृथ्वी. २ स्वर्ग. ३ कांपली. ४ अंधकारानें. ५ खवळला. ६ मर्यादेला. ७ उल्लंघून आला. ८ घाबरले. ९ दिव्य अलंकारांनीं युक्त. १० आपल्या कांतीनें. ११ आपल्या पोटांतील दिव्य रत्नें. १२ हातांनीं. १३ घेऊन. १४ नजराणा. १५ ठेवून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'मला दोष देऊं नकोस.'

समुद्र त्याला साष्टांग नमस्कार घालून म्हणाला :– 'हे जगत्पालका त्रैलोक्यरक्षका रामचंद्रा ! माझें रक्षण कर. माझा नाश करूं नको. ॥ ७० ॥ - मी लवकर आलों नाहीं, ह्याबद्दल त्वां मजवर रोष धरूं नये; कारण, - तूंच सर्व जगाची उत्पत्ति करतांना मला उत्पन्न केलेंस त्यावेळीं माझा स्वभाव जड (सुस्त किंवा अज्ञानी) करून ठेविला आहेस. देवा ! तूं जो स्वभाव निर्माण करून दिलास तो अन्यथा करणें कोणाच्या बरें स्वाधीन आहे ? ॥ ७१ ॥ - आकाश, वायु, अग्नि, उदक व पृथ्वी हीं - स्थूल पांच भूतें स्वभावतःच जड आहेत. त्यांना त्या स्थितींत तूंच निर्मिलेंस; ह्मणून तीं तुझी आज्ञा मोडीत नाहींत (तूं दिलेल्या जड स्वभावाला विरुद्ध होईल असें आचरण करीत नाहींत). ॥ ७२ ॥ रामा ! तामस अहंकारापासून भूतें उत्पन्न

त्राहि त्राहि जगन्नाथ राम त्रैलोक्यरक्षक ॥ ७० ॥ जडोऽहं राम ते स्रष्टुः सृजता निखिलं जगत् ॥ स्वभावमन्यथाकर्तुं कः शक्तो देवनिर्मितम् ॥ ७१ ॥ स्थूलानि पंच भूतानि जडान्येव स्वभावतः ॥ सृष्टानि भवतैतानि त्वदाज्ञां लंघयन्ति न ॥ ७२ ॥ तामसादहमो राम भूतानि प्रभवन्ति हि ॥ कारणानुगमात्तेषां जडत्वं तामसं स्वतः ॥ ७३ ॥

' (मू.) राम, त्राहि, त्राहि. ॥ ७० ॥ (पू.) सृजता ते अहं जडः सृष्टः. ॥ देवनिर्मितं (मू.) ? ॥ ७१ ॥ भवता (पू.) जडानि एव (मू.) लंघयन्ति. ॥ ७२ ॥ राम, (मू.) जडत्वं [अस्ति]. ॥ ७३ ॥

१ सृष्टि करणाऱ्या. २ फिरविण्यास. ३ अहमः अहंकारापासून. ४ कारणाच्या संबंधामुळें (कारण आंत शिरल्यामुळें).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होतात. जडत्व (अचेतनपणा) हें तमोगुणाचें कार्य होय. - जशी घटाचें कारण मृत्तिका घटाबरोबर असते त्याप्रमाणें - भूतांचें कारण तामस अहंकार भूतांबरोबर भरून राहिलेला आहे; अर्थात त्याचा गुण जडत्व ह्यांच्यामध्यें स्वतःसिद्धच असतो. ॥ ७३ ॥ प्रभो ! तूं वस्तुतः निर्गुण व निराकार आहेस. परंतु जेव्हां लीलेनें स्वतांच्या ठिकाणीं मायेचे गुण स्वीकारितोस, त्या वेळीं तुला वैराज हें नाम प्राप्त होतें. ॥ ७४ ॥ तो विराट्देह त्रिगुणात्मक असतो; त्याच्या सत्वगुणापासून देव झाले; रजोगुणापासून सृष्टिकर्ते ब्रह्मदेवादि झाले; भूतपति रुद्र हा तुझा क्रोध होय. ॥ ७५ ॥ सांप्रत तुझें स्वरूप मायेनें आच्छादिलेलें असून तूं हें मनुष्यरूप घेतलें आहेस. माझी बुद्धि बोलूनचालून जड; मी अज्ञानी व मूर्ख. तेव्हां मला तुझ्या निर्गुण रूपाचें ज्ञान व्हावें कसें ? ॥ ७६ ॥ हे समर्था देवाधिदेवा ! पशूंना वळवून रस्त्यावर आणावयाचें असेल

निर्गुणस्त्वं निराकारो यदा मायागुणान्प्रभो ॥ लीलयांगीकरोषि त्वं तदा वैराजनामवान् ॥ ७४ ॥ गुणात्मनो विराजश्च सत्त्वाद्देवा बभूविरे[2] ॥ रजोगुणात्प्रजेशा[3]द्या मन्[4]योर्भूतपतिस्तव ॥ ७५ ॥ त्वामहं मायया छन्नं[5] लीलया मानुषाकृतिम् ॥ जडबुद्धिर्जडो मूर्खः कथं जानामि निर्गुणम् ॥ ७६ ॥ दण्ड एव हि मूर्खाणां सन्मार्गप्रापकः प्रभो ॥ भूतानाममरश्रेष्ठ पशूनां लगुडो[6] यथा ॥ ७७ ॥

प्रभो, निर्गुणः निराकारः अपि (मू.) त्वं वैराजनामवान [भवसि]. ॥ ७४ ॥ (पू.). तव ॥ (मू.). ॥ ७५ ॥ (उ.) अहं (पू.) निर्गुणं त्वां कथं जानामि ? ॥ ७६ ॥ अमरश्रेष्ठ प्रभो, यथा (उ.) [तथा] मूर्खाणां भूतानां (पू.). ॥ ७७ ॥

---

१ वैराज हें नांव ज्याला आहे, असा. २ झाले. ३ प्रजापति वगैरे. ४ क्रोधापासून. ५ आच्छादिलेल्या. ६ सोटा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तर काठीचा उपयोग करावा लागतो, त्याचप्रमाणेंच मूर्खांना सन्मार्गी लावण्यास उत्तम साधन, शासन करणें, हेंच होय. ॥ ७७ ॥ हे भक्तवत्सला ईश्वरा! तूं शरणागतांचें हित करितोस ह्मणून मी तुला शरण आलों आहें. मला अभय दे. मी तुला लंकेंत जाण्यासाठीं मार्ग देतों.' ॥ ७८ ॥ राम ह्मणाला :– 'सागरा! हा महाबाण - एकदां धनुष्याला लागला कीं - कांहीं तरी कार्य केल्याशिवाय परत व्हावयाचा नाहीं! ह्याला कोणत्या प्रदेशावर सोडूं सांग. माझा बाण ज्यावर पडेल, त्याचा नाश करण्यास कधीं चुकावयाचा नाहीं. ह्याला कांहींतरी लक्ष्य दाखवून दे.' ॥ ७९ ॥ तो महातेजस्वी महासागर रामाचें भाषण ऐकून व हातांतील महाबाण पाहून त्याला ह्मणाला :– ॥ ८० ॥ 'रामा! उत्तरेकडच्या प्रदेशांत द्रुमकुल्य नांवानें प्रसिद्ध असा एक भाग आहे; तेथें पुष्कळसे दुष्ट पापी लोक राहतात,

शरणं ते व्रजामीश शरण्यं भक्तवत्सल ॥ अभयं देहि मे राम लंकामार्गं ददामि ते ॥ ७८ ॥ राम उवाच । अमोघो[1]ऽयं महाबाणः कस्मिन् देशे[2] निपात्यताम्[3] ॥ लक्ष्यं[4] दर्शय[5] मे शीघ्रं बाणस्यामोघपातिन[3]ः ॥७९॥ रामस्य वचनं श्रुत्वा करे दृष्ट्वा महाशरम् ॥ महोदधिर्महातेजा[6] राघवं वाक्यमब्रवीत् ॥८०॥ रामोत्तरप्रदेशे तु द्रुमकुल्य इति श्रुतः ॥ प्रदेशस्तत्र बहवः पापात्मानो दिवानिशम् ॥ ८१ ॥

भक्तवत्सल ईश, शरण्यं ते (पू.). ॥ राम, मे अभयं देहि. ते (मू.).' ॥७८॥ रा० उ० – '(मू.) बाणस्य लक्ष्यं शीघ्रं दर्शय.' ॥७९॥ महातेजाः महोदधिः (पू.) दृष्ट्वा (मू.) – ॥८०॥ '(मू.) ॥८१॥

१ निष्फल न होणारा. २ पाडावा. ३ व्यर्थ न पडणाऱ्या. ४ नेम मारण्याचें ठिकाण. ५ दाखव. ६ मोठा तेजस्वी. ७महासागर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व रात्रंदिवस ॥ ८१ ॥ मला फार पीडा देतात. रघुवीरा! हा तुझा बाण त्या प्रदेशावर पडूं दे. ’ रामानें बाण सोडिला. तो क्षणमात्रांत त्या भिल्लसमुदायाला ॥ ८२ ॥ मारून पुन्हां येऊन पूर्वीप्रमाणें भात्यांत राहिला. नंतर समुद्र नम्र होऊन रघुवीराला म्हणाला :– ॥ ८३ ॥ “ रामचंद्रा! विश्वकर्म्याचा पुत्र जो नल, त्यानें ह्या माझ्या उदकावर सेतु बांधावा. तो वानर चतुर असून हें कार्य करण्यास समर्थ आहे; कारण, त्याला - ब्रह्मदेवाकडून ‘ तुला सेतु बांधतां येईल ’ असा - वर मिळाला आहे. ॥ ८४ ॥ सेतु बांधलास म्हणजे - लोकांना तुझी कीर्ति कळून येईल; - तुझ्या कीर्तीचें वर्णन करणाऱ्या - सर्व लोकांचीं

बाधन्ते[1] मां रघुश्रेष्ठ तत्र ते पात्यतां शरः ॥ रामेण सृष्टो[3] बाणस्तु क्षणादाभीरमं[4]-
ण्डलम् ॥ ८२ ॥ हत्वा पुनः समागत्य तूणीरे पूर्ववत्स्थितः ॥ ततोऽब्रवीद्रघुश्रेष्ठं
सागरो विनयान्वितः ॥ ८३ ॥ नलः सेतुं करोत्वस्मिन् जले मे विश्वकर्मणः ॥
सुतो धीमान् समर्थोऽस्मिन्कार्ये लब्ध[6]वरो हरिः ॥ ८४ ॥ कीर्तिं जानन्तु ते लोकाः
सर्वलोकमलापहाम् ॥ इत्युक्त्वा राघवं नत्वा ययौ सिन्धुरदृश्यताम् ॥ ८५ ॥

मां (पू.) पा[2]त्यतां. ’ ॥ (मू.) ॥ ८२ ॥ (मू.) [सन्] रघुश्रेष्ठं अब्रवीत् – ॥ ८३ ॥ ‘ अस्मिन् मे जले (मू.) अस्मिन् कार्ये समर्थः [अस्ति]. ॥ ८४ ॥ (पू.) ते कीर्तिं जा[7]नन्तु. ’ ॥ सि[8]न्धुः (मू.) ययौ. ॥ ८५ ॥

---

१ पीडा देतात. २ वर टाकावा. ३ सोडिलेला. ४ भिल्लांच्या समूहाला. ५ भात्यांत. ६ मिळाला वर (ब्रह्मदेवापासून) ज्याला, असा. ७ जाणोत. ८ समुद्र.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पातकें नष्ट होतात. " इतकें सांगून व रामाला वंदन करून समुद्र अदृश्य झाला. ॥ ८५ ॥ नंतर, सुग्रीव आणि लक्ष्मण ह्या उभयतांसह रामानें नलाला वानरांच्या साह्यानें लवकर सेतु बांधण्याची आज्ञा दिली. ॥८६॥ तेव्हां नलालाही पराकाष्ठेचा आनंद झाला. तेथें मोठमोठाले अनेक वानरसेनापति जमले होते; त्यांचीं शरीरें मोठाल्या पर्वतांसारखीं प्रचंड होतीं. त्यांच्या साह्यानें नलानें पर्वत व वृक्ष ह्यांच्या योगें शंभर योजनें लांब, बळकट व विस्तीर्ण असा सेतु बांधिला. ॥ ८७ ॥ इति युद्धकाण्डे तृतीयः सर्गः ॥ ३ ॥

सेतु बांधण्यास आरंभ करण्यापूर्वीं रामानें तेथें ' रामेश्वर ' नांवाच्या शिवलिंगाची स्थापना करून पूजा केली, व लोकांच्या हितासाठीं असें सांगून ठेविलें (प्रसिद्ध केलें) कीं, ॥ १ ॥ जो कोणी पुरुष रामेश्वर

ततो रामस्तु सुग्रीवलक्ष्मणाभ्यां समन्वितः ॥ नलमाज्ञापयच्छीघ्रं वानरैः सेतुबन्धने ॥ ८६ ॥ ततो ऽतिहृष्टः प्लवगेन्द्रयूथपैर्महानगेन्द्रप्रतिमैर्युतो नलः ॥ बबन्ध सेतुं शतयोजनायतं सुविस्तृतं पर्वतपादपैर्दृढम् ॥ ८७ ॥ इति युद्धकाण्डे तृतीयः सर्गः ॥ ३ ॥ सेतुमारभमाणस्तु तत्र रामेश्वरं शिवम् ॥ संस्थाप्य पूजयित्वा ऽऽह रामो लोकहिताय वै ॥ १ ॥ प्रणमेत्सेतुबन्धं यो दृष्ट्वा रामेश्वरं शिवम् ॥

(पू.) रामः तु ॥ (मू.) नलं आज्ञापयत्. ॥८६॥ ततः अतिहृष्टः नलः महानगेन्द्रप्रतिमैः (मू.) सेतुं बबन्ध. ॥ ८७ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये युद्धकाण्डे तृतीयः सर्गः ॥ ३ ॥ सेतुं आरभमाणः तु रामः लोकहिताय (मू.) – ॥ १ ॥ (पू.) दृष्ट्वा सेतुबन्धं प्रणमेत्, ॥

१ पर्वतांनीं व वृक्षांनीं. २ आरंभणारा. ३ स्थापना करून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लिंगाचें दर्शन घेऊन सेतुबंधास वंदन करील, त्याच्यावर मी अनुग्रह करीन, व तो ब्रह्महत्यादि पापांपासून मुक्त होईल; ॥ २ ॥ मनुष्यानें सेतुबंधीं स्नान करून रामेश्वर लिंगाचें दर्शन घ्यावें, तेथें - 'काशीस जाऊन गंगा आणून रामेश्वरावर घालितों' असा - संकल्प करावा, काशीस जावें, ॥ ३ ॥ गंगा आणून रामेश्वरावर अभिषेक करावा आणि ज्यांत गंगा भरून आणिली तो पात्र वगैरे (किंवा कावड) सर्व संभार समुद्रांत टाकावा; ह्मणजे त्याला ब्रह्मप्राप्ति होईल, ह्यांत संशय नाहीं. ॥ ४ ॥ नलानें पहिल्या दिवशीं चवदा योजनें सेतु बांधिला, दुसरे दिवशीं वीस योजनें, ॥ ५ ॥ तिसरे दिवशीं एकवीस योजनें, चवथे

ब्रह्महत्यादिपापेभ्यो मुच्यते मदनुग्रहात् ॥ २ ॥ सेतुबन्धे नरः स्नात्वा दृष्ट्वा रामेश्वरं हरम् ॥ संकल्पनियतो भूत्वा गत्वा वाराणसीं नरः ॥ ३ ॥ आनीय गंगासलिलं रामेशमभिषिच्य च॥समुद्रे क्षिप्ततद्भारो ब्रह्म प्राप्नोत्यसंशयम् ॥४॥ कृतानि प्रथमेनाह्ना योजनानि चतुर्दश॥द्वितीयेन तथा चाह्ना योजनानि तु विंशतिः ॥५॥ तृतीयेन तथा चाह्ना योजनान्येकविंशतिः ॥

[सः] मदनुग्रहात् (मू.). ॥ २ ॥ नरः (पू.) दृष्ट्वा, ॥ (मू.) गत्वा, नरः ॥३॥ गङ्गासलिलं (मू.) [सन्] असंशयं [यथा तथा] ब्रह्म प्राप्नोति. ॥ ४ ॥ (पू.) योजनानि कृतानि. ॥ ५ ॥ तथा (पू.) योजनानि. ॥

१ स्नान करून. २ संकल्पांत दक्ष. ३ काशीस. ४ गंगेचें उदक. ५ स्नान घालून. ६ टाकिला तो भार ज्यानें असा. ७ दिवसानें. ८ वीस.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राम सैन्यासह लंकेस पोंचला.

दिवशीं बावीस योजनें असें ऐकतों, ॥ ६ ॥ व पांचवे दिवशीं तेवीस योजनें. अशा रीतीनें त्या श्रेष्ठ वानरानें—नळानें—समुद्रावर येथून तेथून सारखा सेतु बांधून तयार केला. ॥ ७ ॥ त्या सेतूवरूनच वानर भराभर चालत शंभर योजनें समुद्राच्या पार निघून गेले. वानरसेना इतकी मोठी होती कीं, तिची गणना करतां येत नसे. त्या वानरवीरांनीं सुवेलपर्वताभोंवतीं वेढा दिला. ॥ ८ ॥ राम मारुतीवर व लक्ष्मण अंगदावर बसून गेले. लंकानगरीचा देखावा पाहण्यासाठीं रामचंद्र त्या उंच पर्वतावर चढला. ॥ ९ ॥ लंकानगरी विस्तीर्ण होती; आंत जिकडे तिकडे चित्र विचित्र ध्वज फडकत होते, इमारती एकीशीं एक लागलेल्या

चतुर्थेन तथाचाह्ना द्वाविंशतिरिति श्रुतम् ॥६॥ पंचमेन त्रयोविंशद्योजनानि समंततः ॥ बबन्ध सागरे सेतुं नलो वानरसत्तमः ॥ ७ ॥ तेनैव जग्मुः कपयो योजनानां शतं द्रुतम् ॥ असंख्याताः सुवेलाद्रिं रुरुधुः प्लवगोत्तमाः ॥ ८ ॥ आरुह्य मारुतिं रामो लक्ष्मणोऽप्यंगदं तथा ॥ दिदृक्षू राघवो लंकामारुरोहाचलं महत् ॥ ९ ॥ दृष्ट्वा लंकां सुविस्तीर्णां नानाचित्रध्वजाकुलाम् ॥

तथा (मू.). ॥ ६ ॥ (पू.) ॥ [एवं] वानरसत्तमः नलः (मू.) बबन्ध. ॥ ७ ॥ कपयः (पू.) जग्मुः. ॥ (मू.) सुवेलाद्रिं रुरुधुः. ॥८॥ रामः मारुतिं, तथा (पू.) आरुह्य [जगाम]. ॥ लङ्कां (मू.)अचलं आरुरोह. ॥ ९ ॥ [रामः] (१० मू.) ॥

१ बावीस. २ तेवीस. ३ सुवेलपर्वतास. ४ वेढिते झाले. ५ पाहूं इच्छिणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असून त्यांवर कुशल नकशीकाम केलें होतें; भोंवताळचे कोट व दरवाजे सोन्याच्या विटांनीं बांधलेले होते; ॥ १० ॥ रक्षणासाठीं सभोंवार खंदक खणलेले असून जागोजाग शस्त्रें सिद्ध ठेविलीं होतीं; मधून मधून पाऊलवाटाही ठेविलेल्या असत; अशा रचनेमुळें तें नगर सुंदर दिसत असे. ह्यावेळीं राजवाड्याच्या विस्तीर्णशा उंच गच्चीवर रावण बसला होता. त्याला दहा मुखें होतीं. ॥ ११ ॥ त्याच्या भोंवतीं पराक्रमी प्रधानमंडळी बसली होती. मस्तकांवर दहा मुकुट असल्यामुळें रावण उज्ज्वल दिसे. बाकी त्याच्या शरीराचा वर्ण ह्मटला तर, हें एक काजळाच्या पर्वताचें शिखरच असावें, असें वाटण्याजोगा होता; ह्मणजे त्याची अंगकांति कृष्णवर्ण मेघासारखी होती. ॥ १२ ॥ त्याच्या मस्तकावर पांढरीं शुभ्र अनेक छत्रें धरिलीं होतीं; त्या छत्रांचे दांडे रत्नांचे असत. ह्या राजचिन्हांच्या योगें त्यानें आपल्याला शोभा आणिली होती. तो

चित्रप्रासादसंबाधां स्वर्णप्राकारतोरणाम् ॥१०॥ परिखाभिः शतघ्नीभिः संक्रमैश्च
विराजिताम्॥प्रासादोपरि विस्तीर्णप्रदेशे दशकन्धरः॥११॥ मन्त्रिभिः सहितो वीरैः
किरीटदशकोज्ज्वलः[1]॥नीलाद्रिशिखराकारः[2] कालमेघसमप्रभः[3]॥१२॥ रत्नदण्डैः[4]
सितच्छत्रैरनेकैः[5] परिशोभितः ॥ एतस्मिन्नन्तरे बद्धो मुक्तो रामेण वै शुकः॥१३॥

(१० मू. ११ पू.) लङ्कां दृष्ट्वा [तत्र स्थितः]. ॥ (११ उ.) वीरैः (१२ मू.) दशकन्धरः ॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥ अनेकैः (पू.) [आसीत्]. ॥(मू.) मुक्तः शुकः. ॥ १३ ॥

---

१ दहा मुकुटांनीं तेजःपुंज दिसणारा. २ निळ्या मण्यांच्या पर्वताच्या शिखरासारखा आकार ज्याचा, असा. ३ काळ्या मेघासारखी कांति ज्याची असा. ४ रत्नांचे दांडे ज्यांना, अशा. ५ पांढऱ्या छत्रांनीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शुक रावणाकडे आला.

अशा स्थितींत बसला होता इतक्यांत, वानरांनीं बांधिलें असतां रामानें ज्याला सोडून दिलें, तो शुक ॥ १३ ॥ वानरांच्या हातचा बराच मार खाऊन कसा बसा रावणाकडे येऊन पोंचला. - त्याला पाहून-रावण हांसत हांसतच ह्मणाला :– ' कायरे ! शत्रूंनीं पाठ मऊ केली वाटतें ! ' ॥ १४ ॥ रावणाचें भाषण ऐकून शुक सांगूं लागला :– ' महाराज ! मी समुद्राच्या उत्तर तीरावर जाऊन तुह्मी सांगितलेला निरोप सुग्रीवाला जशाचा तसा सांगितला. इतक्यांत वानर उड्या मारून येऊन लागलेच मला धरून घेऊन गेले. ॥ १५ ॥ व त्यांनीं बुदके मारण्याचा आणि नखांनीं व दांतांनीं माझ्या आंगाचे तुकडे तोडण्याचा सपाटा चालविला. मी ' रामा ! मला सोडव रे सोडव ! ' असा आक्रोश करूं लागलों; तेंव्हां रघुवीरानें

वानरैस्ताडितः सम्यक् दशाननमुपागतः ॥ प्रहसन् रावणः प्राह पीडितः किं परैः शुक ॥ १४ ॥ रावणस्य वचः श्रुत्वा शुको वचनमब्रवीत् ॥ सागरस्योत्तरे तीरेऽब्रुवन्ते वचनं यथा ॥ तत उत्प्लुत्य कपयो गृहीत्वा मां क्षणात्ततः ॥ १५ ॥ मुष्टिभिर्नखदन्तैश्च हन्तुं लोप्तुं[3] प्रचक्रमुः[4] ॥ ततो मां राम रक्षेति क्रोशन्तं[5] रघुपुंगवः ॥ १६ ॥

वानरैः सम्यक् ताडितः [सन्] (पू.). ॥ रावणः (मू.) – ' शुक, परैः पीडितः किं ? ' ॥१४॥ शुकः (पू.) – ॥ "(पू.) [सुग्रीवं प्रति], यथा ते वचनं, [तथा] अब्रुवं[1] (मू.) उत्प्लुत्य[2], मां क्षणात् गृहीत्वा, ततः ॥ १५ ॥ (पू.) [च] प्रचक्रमुः. ॥ ततः रघुपुङ्गवः (मू.)मां ॥ १६ ॥

१ बोललों. २ उडी मारून. ३ तोडण्यास. ४ आरंभ करिते झाले. ५ ओरडणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- वानरांना - ॥ १६ ॥ ' ह्याला सोडून द्या ' असें सांगितलें. वानरवीरांनीं मला सोडिलें. तें वानरांचें सैन्य पाहून मला फारच भीति वाटली. मी लागलाच इकडे निघून आलों. ॥ १७ ॥ राक्षसांचा सेनासमुद्र आणि वानरवीरांचें सैन्य ह्यांची एकी होणें देवदैत्यांचें सख्य जमवून आणण्याप्रमाणें दुर्घट होय. ॥ १८ ॥ हे पहा वानर एकामागून एक नगराच्या कोटाजवळ येऊं लागले. आतां लवकर दोहोंपैकीं एक काय ती व्यवस्था कर — रामाला सीता परत नेऊन दे; किंवा हे समर्था! सत्वर युद्धास तरी सिद्ध हो. ॥ १९ ॥ राम मला ह्मणाला :— ' शुका! रावणाला माझा निरोप सांग कीं, ज्या शक्तीच्या भरंवशावर तूं माझ्या सीतेला चोरून

विसृज्यतामिति प्राह विसृष्टो ऽहं कपीश्वरैः॥ततो ऽहमागतो भीत्या दृष्ट्वा तद्वा-
नरं बलम् ॥१७॥ राक्षसानां बलौघस्य वानरेन्द्रबलस्य च ॥ नैतयोर्विद्यते संधि-
र्देवदानवयोरिव ॥ १८ ॥ पुरप्राकारमायान्ति क्षिप्रमेकतरं कुरु ॥ सीतां वा ऽस्मै
प्रयच्छाशु युद्धं वा दीयतां प्रभो ॥ १९ ॥ मामाह रामस्त्वं ब्रूहि रावणं मद्वचः
शुक ॥ यद्बलं च समाश्रित्य सीतां मे हृतवानसि ॥ २० ॥

(पू.). [ततः] कपीश्वरैः अहं विसृष्टः.॥ (मू.) दृष्ट्वा भीत्या आगतः. ॥१७॥ (मू.) न विद्यते. ॥ १८ ॥ प्रभो, [वानराः] (मू.). ॥ १९ ॥ रामः मां आह — ' शुक, (पू.) रावणं ब्रूहि. ॥ (मू.) सीतां हृतवान् असि, ॥ २० ॥

१ सोडावा. २ तद्. ३ नगराच्या कोटावर. ४ दोहोंपैकीं एक. ५ दे. ६ द्यावें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नेलेंस, ॥ २० ॥ ती आतां दाखव; आपल्या साह्याला सैन्य बांधवजन पाहिजेत तितके खुशाल घे; उद्यां सकाळीं कोट व वेशी ह्यांसह लंकानगरीचा ॥ २१ ॥ आणि राक्षसांच्या सैन्याचा मी बाणांच्या योगें विध्वंस उडवणार; मी भयंकर कोप सोडीन; रावणा ! तूं अवसान धरून ऐस.' ॥ २२ ॥ इतकें बोलून कमलनयन राम स्वस्थ बसला. रावणा ! तिकडे चौघे वीर पुरुष एकत्र झाले आहेत ! ॥२३ ॥ हे बलाढ्यपुरुषा ! श्रीराम, लक्ष्मण, सुग्रीव आणि विभीषण हे चौघेजणच लंकेचीं पाळेंमुळें खणून तिचें भस्म करण्यास समर्थ आहेस ! दुसरे वानर एकीकडेच राहूं दे. रामाचें जितकें कांहीं बल व स्वरूप माझ्या दृष्टीस पडलें आहे आणि त्याचीं शस्त्रें जीं कांहीं मी पाहिलीं आहेत - तेवढ्यांवरून माझ्या मनाचा निश्चय

तद्दर्शय यथाकामं ससैन्यः सहबान्धवः॥ श्वः[1] काले नगरीं लंकां सप्राकारां सतोरणाम् ॥२१॥ राक्षसं च बलं पश्य शरैर्विध्वंसितं मया ॥ घोररोषमहं मोक्ष्ये[2] बलं धारय रावण ॥ २२ ॥ इत्युक्त्वोपरराम[3]ाथ रामः कमललोचनः ॥ एकस्थ[4]ानगता यत्र चत्वारः पुरुषर्षभाः ॥ २३ ॥ श्रीरामो लक्ष्मणश्चैव सुग्रीवश्च विभीषणः ॥ एत एव समर्थास्ते लंकां नाशयितुं प्रभो ॥ २४ ॥

(पू.) [त्वं] तद् यथाकामं दर्शय, ॥ (मू.) नगरीं लङ्कां, ॥२१॥ (पू.) शरैः विध्वंसितं पश्य. ॥ रावण, अहं (मू.). ' ॥ २२ ॥ अथ कमललोचनः रामः (पू.).॥ यत्र (मू.) ॥ २३ ॥ प्रभो, (पू.) च ॥ ते (मू.) समर्थाः. ॥ २४ ॥

१ उद्यां. २ सोडीन. ३ उपरराम उगा राहिला. ४ एके ठिकाणीं जमलेले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झाला आहे कीं, - ॥ २५ ॥ एकटा राम सगळ्या नगराचा नाश करील! बाकीच्या तिघांनीं स्वस्थ बसावें (त्यांची गरज नाहीं). वानरांची अगणित सेना जिकडे तिकडे भरून राहिली आहे, पहा :- ॥ २६ ॥ तींतील पर्वतासारखे धिप्पाड वानर गर्जना करीत आहेत, अवलोकन कर. त्यांची गणना करणें तर शक्य नाहींच; परंतु मुख्य मुख्य मंडळीचीं नांवें मी सांगतों :- ॥ २७ ॥ हा एक वानर लंकेकडे तोंड करून गर्जना करीत उभा आहे, ह्याच्या सभोंवतीं शतसहस्र सेनापति उभे राहिलेले दिसतात, - हा सुग्रीव होय. - ॥ २८ ॥ हा दुसरा इकडे एक पर्वताशिखरासारखा - वानर दिसत आहे, - ह्याची अंगकांति कमलतंतू-

उत्पाट्य भस्मीकरणे सर्वे तिष्ठन्तु वानराः ॥ तस्य यादृग् बलं दृष्टं रूपं प्रहरणानि च ॥ २५ ॥ वधिष्यति पुरं सर्वमेकस्तिष्ठन्तु ते त्रयः ॥ पश्य वानरसेनां तामसंख्यातां प्रपूरिताम् ॥ २६ ॥ गर्जन्ति वानरास्तत्र पश्य पर्वतसन्निभाः ॥ न शक्यास्ते गणयितुं प्राधान्येन ब्रवीमि ते ॥ २७ ॥ एष यो ऽभिमुखो लंकां नर्दंस्तिष्ठति वानरः ॥ यूथपानां सहस्राणां शतेन परिवारितः ॥२८॥सुग्रीवसेनाधिपतिर्नीलो नामाग्निनन्दनः ॥ एष पर्वतशृंगाभः पद्मकिञ्जल्कसन्निभः ॥ २९ ॥

(बा. पू.) तिष्ठन्तु. ॥ (मू.) [दृष्टानि], ॥२५॥ ते त्रयः तिष्ठन्तु. एकः सर्वं पुरं (पू.). ॥ (मू.) वानरसेनां पश्य. ॥ २६ ॥ (पू.) वानराः गर्जन्ति. ॥ ते गणयितुं (मू.) ब्रवीमि. ॥ २७ ॥ एषः यः लङ्कां (मू.) वानरः तिष्ठति, [सः सुग्रीवः.] ॥ २८ ॥ (मू.). ॥ २९ ॥

१ उपटून. २ आयुधें. ३ गर्जना करणारा. ४ सेनेच्या भागांचे अधिपति. ५ कमळाच्या केशरासारखा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रमुख वानरांचीं नांवें.

प्रमाणें आहे, हा सुग्रीवाचा सेनापति अग्नीचा पुत्र नील होय. ॥ २९ ॥ हा ह्या बाजूला मोठ्या त्वेषानें वारंवार शेंपूट आपटीत उभा आहे, हा वालीचा पुत्र अतुलपराक्रमी युवराज अंगद. ॥ ३० ॥ ज्यानें रामाच्या अत्यंत प्रिय जानकीचा शोध लाविला व तुझ्या पुत्राचा वध केला, तो प्रसिद्ध मारुति हा इकडे आहे पहा. ॥ ३१ ॥ ज्याची कांति रुप्यासारखी आहे व जो आतांच सुग्रीवाकडे येऊन लागलाच परत जात आहे, त्या ह्या वानराचें नांव 'श्वेत' होय. ह्याची बुद्धि व शक्ति अद्भुत आहे. ॥ ३२ ॥ दुसरा हा इकडे पाहत आहे कीं नाहीं, ह्या वानराचें नांव रंभ. ह्याचें शरीर जसें सिंहासारखें दिसतें तसाच पराक्रम अतुल व बुद्धिही विलक्षण आहे. हा एकटाच लंकेचा नाश करूं शकेल! ॥ ३३ ॥

स्फोटयत्यभिसंरब्धो लांगूलं च पुनःपुनः ॥ युवराजोंगदो नाम वालिपुत्रो ऽतिवीर्यवान् ॥ ३० ॥ येन दृष्टा जनकजा रामस्यातीव वल्लभा ॥ हनूमानेष विख्यातो हतो येन तवात्मजः ॥ ३१ ॥ श्वेतो रजतसंकाशो महाबुद्धिपराक्रमः ॥ तूर्णं सुग्रीवमागम्य पुनर्गच्छति वानरः ॥ ३२ ॥ यस्त्वेष सिंहसंकाशः पश्यत्यतुलविक्रमः ॥ रम्भो नाम महासत्त्वो लंकां नाशयितुं क्षमः ॥ ३३ ॥

(मू.) वालिपुत्रः लाङ्गूलं पुनः पुनः स्फोटयति. ॥ ३० ॥ (पू.) जनकजा दृष्टा, ॥ एषः हनूमान् [इति] (मू.) हतः. ॥ ३१ ॥ (पू.) [यः] वानरः (मू.) [सः] श्वेतः [नाम]. ॥३२॥ (पू.) पश्यति, ॥ [सः] रम्भः नाम महासत्त्वः [वानरः] (मू.). ॥ ३३ ॥

१ शेंपूट. २ आपटतो. ३ पांढरा. ४ रुप्यासारखा. ५ जलद. ६ सिंहासारखा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राजाधिराजा ! हा एक वानर लंकेकडे जसा कांहीं जाळण्याच्या इच्छेनेंच पाहत आहे हा, ह्याचें नांव शरभ. हा एक कोटि वानरांच्या सेनानायकांचा नायक आहे. ॥ ३४ ॥ तसेच महापराक्रमी पनस, मैंद, द्विविद, ज्यानें सेतु बांधिला तो विश्वकर्म्याचा पुत्र हा नल—असे दुसरेही पुष्कळ आहेत. ॥३५॥ रावणा ! वानरांचें गुणवर्णन किंवा गणती तरी करण्याचें सामर्थ्य आहे कोणाला ? सगळेच शूर आहेत, सर्वांचीं शरीरें प्रचंड आहेत, व प्रत्येकाला युद्धाची इच्छा आहे. ॥ ३६ ॥ हे सगळेजण राक्षससमूहासह लंकेचें नुसतें पीठ करून टाकितील, - ह्यांत संशय नाहीं. - ह्या सैन्यांतील एक एका वीराच्या हाताखालीं

एष पश्यति वै लंकां दिधक्षन्निव वानरः ॥ शरभो नाम राजेन्द्र कोटियूथपनायकः ॥ ३४ ॥ पनसश्च महावीर्यो मैन्दश्च द्विविदस्तथा ॥ नलश्च सेतुकर्ता ऽसौ विश्वकर्मसुतो बली ॥ ३५ ॥ वानराणां वर्णने वा संख्याने वा क ईश्वरः ॥ शूराः सर्वे महाकायाः सर्वे युद्धाभिकांक्षिणः ॥ ३६ ॥ शक्ताः सर्वे चूर्णयितुं लंकां रक्षोगणैः सह ॥ एतेषां बलसंख्यानं प्रत्येकं वच्मि ते शृणु ॥ ३७ ॥

राजेन्द्र, [यः] एषः वानरः (पू.) पश्यति, ॥ [सः] (मू.). ॥३४॥ (मू.) नलः च [अस्ति]. ॥ ३५ ॥ (पू.) ? ॥ सर्वे (मू.). ॥३६॥ (पू.) लङ्कां चूर्णयितुं शक्ताः. ॥ (मू.) वच्मि; शृणु— ॥३७॥

---

१ जाळूं इच्छिणारा. २ सांगतों.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो.
सप्तू-सान्व
सटिप्पण.
॥ ३० ॥

युद्धकाण्ड.
सर्ग ४
राम ईश्वर;
सीता माया.

किती वानर आहेत, ती संख्या सांगतों ऐक. ॥ ३७ ॥ नील, अंगद, हनुमान्, श्वेत, शरभ, पनस, मैंद, रंभ, आणि द्विविद - ह्या प्रत्येकाच्या हाताखालीं एकवीस सहस्र कोटि, शेंकडों शंख (संख्येचें एक स्थान) तसे शेंकडों अर्बुद इतकें सैन्य आहे. ॥ ३८ ॥ सुग्रीवाच्या सचिवांचें बल मी तुला सांगितलें. रावणा! इतरांच्या शक्तीचें वर्णन करायाचें ह्मणशील तर मला सामर्थ्य नाहीं! ॥ ३९ ॥ राम कांहीं मनुष्य नव्हे, तर साक्षात् परमात्मा आदिनारायण होय. सीता ही प्रत्यक्ष जगाचें कारण व जगत्स्वरूपी आदिमाया आहे. ॥ ४० ॥ त्यांच्यापासूनच स्थावरजंगमात्मक जग उत्पन्न झालें. ह्यावरून राम आणि सीता हीं चराचर जगाचीं मातापितरें होत. हे पृथ्वीपालका! त्यांच्याशीं वैर करणारा प्राणी

एषां कोटिसहस्राणि नव पंच च सप्त च ॥ तथा शंखसहस्राणि तथार्बुदशतानि च ॥ ३८ ॥ सुग्रीवसचिवानां ते बलमेतत्प्रकीर्तितम् ॥ अन्येषां तु बलं नाहं वक्तुं शक्तोऽस्मि रावण ॥ ३९ ॥ रामो न मानुषः साक्षादादिनारायणः परः ॥ सीता साक्षाज्जगद्धेतुश्चिच्छक्तिर्जगदात्मिका ॥ ४० ॥ ताभ्यामेव समुत्पन्नं जगत्स्थावरजंगमम् ॥ तस्माद्रामश्च सीता च जगतस्तस्थुषश्च तौ ॥ ४१ ॥

(पू.) कोटिसहस्राणि, ॥ (मू.). ॥ ३८ ॥ ते एतत् (पू.). ॥ रावण, अहं (मू.) शक्तः न अस्मि. ॥ ३९ ॥ (पू.) आदिनारायणः. ॥ (मू.) चिच्छक्तिः. ॥४०॥ (पू.) जगत् समुत्पन्नं. ॥ (मू.) जगतः, तस्थुषः च ॥ ४१ ॥

॥ ३० ॥

१ जंगम. २ स्थावर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जिवंत राहील कसा ? तुला ज्ञान नाहीं, ह्मणूनच तूं, जगाची माता जी जानकी, तिला इकडे घेऊन आलास. ॥ ४२ ॥ अरे ! हा संसार क्षणांत नष्ट होणारा, आणि शरीर तरी क्षणामध्यें नाहींसें होणारेंच; राजा ! हा देह पांच भूतांचा गोळा असून चोवीस तत्वांच्या योगें बनलेला आहे; ॥ ४३ ॥ ह्यांत मळ, मांस, हाडें इत्यादि दुर्गंधी पदार्थ भरलेले आहेत; हा अहंकाराचें तर केवळ माहेरघर होय; अशा जडस्वरूपी देहाची त्वां – चेतन आत्म्यानें – आस्था काय ह्मणून बाळगावी ? ॥ ४४ ॥ ज्याच्यासाठीं तूं ब्रह्महत्यादि घोर पातकें केलींस, तो भोग भोगणारा देह तर येथें पडणार (तुझ्या बरोबर नित्य राहणार नाहीं) ! ॥ ४५ ॥ सुखप्राप्तीचें कारण पुण्य, आणि दुःखप्राप्तीचें कारण पाप होय. तीं दोन्हीं मात्र जीवाबरोबर येतात; व त्यां-

पितरौ पृथिवीपाल तयोर्वैरी कथं भवेत् ॥ अजानता त्वया ऽऽनीता जगन्मातैव जानकी ॥ ४२ ॥ क्षणनाशिनि संसारे शरीरे क्षणभंगुरे ॥ पंचभूतात्मके राजंश्चतुर्विंशतितत्त्वके ॥ ४३ ॥ मलमांसास्थिदुर्गंधभूयिष्ठे ऽहंकृतालये ॥ कैवास्था व्यतिरिक्तस्य काये तव जडात्मके ॥ ४४ ॥ यत्कृते ब्रह्महत्यादिपातकानि कृतानि ते ॥ भोगभोक्ता तु यो देहः स देहो ऽत्र पतिष्यति ॥ ४५ ॥ पुण्यपापे समायातो जीवेन सुखदुःखयोः ॥

(मू.) आनीता. ॥ ४२ ॥ (पू.) [सति], ॥ राजन, (मू.) ॥४३॥ (मू.) काये व्यतिरिक्तस्य तव आस्था का एव ? ॥ ४४ ॥ ते (मू.). ॥ ४५ ॥ सुखदुःखयोः कारणे (पू.)] सह] समायातः.

---

१ मळ, मांस, हाडें, दुर्गंध ह्यांनीं बहुतेक भरलेल्या. २ अहंकाराचें स्थान अशा. ३ शरीरावर. ४ पडेल.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आत्म्याचें स्मरण असूं दे.

च्यामुळेंच देहाचा संबंध वगैरे असल्यामुळें आत्म्याला निरंतर सुखदुःखें भोगावीं लागतात (देहाचा संबंध नसेल तर पुण्यपापें सुखदुःख देऊं शकत नाहींत). ॥ ४६ ॥ जोंपर्यंत परवश झालेल्या आत्म्याला 'मी देह आहें' 'मी कर्में करितों' असा अभिमान असतो, तोंपर्यंतच अविद्येमुळें जन्म मृत्यु भोगावे लागतात. ॥ ४७ ॥ ह्मणून, हे महाबुद्धिमंता, तूं देहादिकांवरील अभिमान सोडून दे. आत्मा अतिनिर्मल, शुद्ध, अपरोक्षज्ञानरूपी, अकर्ता व निर्विकार होय. ॥ ४८ ॥ आत्म्याला स्वस्वरूपाचें (स्वतांच्या शुद्धत्वादिकांचें) ज्ञान नसतें ह्मणून शरीराचा संबंध घडतो आणि मोह पडतो. ह्यासाठीं - माझें तुला इतकेंच सांगणें आहे कीं, - आत्म्याला 'तो शुद्ध ज्ञानरूप व नित्य मुक्त आहे' असें जाण; त्याचें नित्य अवधान असूं दे; ॥ ४९ ॥ पुत्र, स्त्रिया, गृह इत्यादिकांविषयीं वैराग्य धर,

कारणे देहयोगादिना ऽऽत्मनः कुरुतो ऽनिशम् ॥४६॥ यावद्देहो ऽस्मि कर्ता ऽस्मीत्यात्मा ऽहंकुरुते ऽवशः ॥ अध्यासात्तावदेव स्याज्जन्मनाशादिसंभवः ॥ ४७ ॥ तस्मात्त्वं त्यज देहादावभिमानं महामते ॥ आत्मा ऽतिनिर्मलः शुद्धो विज्ञानात्मा ऽचलो ऽव्ययः ॥ ४८॥ स्वाज्ञानवशतो बन्धं प्रतिपद्य विमुह्यति ॥ तस्मात्त्वं शुद्धभावेन ज्ञात्वा ऽऽत्मानं सदा स्मर ॥४९॥ विरतिं भज सर्वत्र पुत्रदारगृहादिषु ॥

[ते] (बा. मू.) [सुखदुःखे] अनिशं[1] कुरुतः. ॥४६॥ (पू.) [सन्] अहंकुरुते,[3] ॥ तावत् एव (मू.) स्यात्. ॥४७॥ तस्मात् महामते, (पू.) त्यज. ॥ (मू.) आत्मा ॥४८॥(मू.)॥४९॥ (पू.) विरतिं[4] भज. ॥

१ सतत. २ करतात. ३ अहंकार करितो. ४ वैराग्यास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कारण, कुत्रीं, डुकरें ह्या शरीरांत फार तर काय नरकांमध्येंही भोग भोगायास मिळतातच. ॥ ५० ॥ आगोदर नरदेह मिळणें दुर्लभ, त्यांतही भरतखंडनामक कर्मभूमीमध्यें जन्मास येणें फार दुर्घट, त्यांतूनही विवेकसंपन्न ब्राह्मणजन्म पराकाष्ठेचा दुर्लभ होय : हें सगळें मिळालें असतां, ॥ ५१ ॥ कोणी तरी विचारी पुरुष देहावर आत्मबुद्धि ठेवून भोगांच्या पाठीस लागून राहील काय ? तुला ब्राह्मणजन्म मिळाला आहे इतकेंच नव्हे, तर तूं पौलस्त्याच्या उत्तम वंशांत जन्मला आहेस. ॥ ५२ ॥ असें असतांना, अज्ञान्यासारखा नित्य भोगांवर आसक्त होऊन त्यांच्या प्राप्तीचे व्यर्थ यत्न कां करीत असतोस ? इतउत्तर तरी

निरयेष्वपि भोगः स्याच्छ्वसूकरतनावपि ॥५०॥ देहं लब्ध्वा विवेकाढ्यं द्विजत्वं च विशेषतः ॥ तत्रापि भारते वर्षे कर्मभूमौ सुदुर्लभम् ॥ ५१ ॥ को विद्वानात्मसात्कृत्वा देहं भोगानुगो भवेत् ॥ अतस्त्वं ब्राह्मणो भूत्वा पौलस्त्यतनयश्च सन् ॥ ५२ ॥ अज्ञानीव सदा भोगाननुधावसि किं मुधा ॥ इतः परं वा त्यक्त्वा त्वं सर्वसंगं समाश्रय ॥ ५३ ॥ राममेव परात्मानं भक्तिभावेन सर्वदा ॥ सीतां समर्प्य रामाय तत्पादानुचरो भव ॥ ५४ ॥

(मू.) भोगः स्यात्. ॥ ५० ॥ (मू.) देहं, विशेषतः विवेकाढ्यं द्विजत्वं च लब्ध्वा, ॥ ५१ ॥ कः विद्वान् देहं (मू.) ॥ ५२॥ (५२ पू.) किं अनुधावसि ? ॥ (५४ उ.) सक्त्वा, परात्मानं (५४ पू.) समाश्रय. ॥ रामाय (मू.). ॥ ५३ ॥ ५४ ॥

१ नरकांत. २ कुत्रीं, डुकरें, ह्या शरीरांत. ३ विचारसंपन्न. ४ आत्मसात् आपलासा. ५ व्यर्थ. ६ मागें धांवतोस.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्वसंगपरित्याग करून नित्य भक्तिपुरःसर प्रभु रामचंद्राचाच आश्रय धरून राहा, सीता रामाला नेऊन दे व सर्वकाळ त्याच्या चरणांची सेवा करीत जा. ॥ ९३ ॥ ९४ ॥ इतकें केलेंस ह्मणजे तूं सर्व पापांपासून मुक्त होत्साता विष्णुलोकीं जाशील. हें न करशील तर मात्र तुला उत्तरोत्तर अधोलोकीं जावें लागेल, मग पुन्हां परत वर येण्याची आशा देखील धरायाला नको. माझ्या उपदेशाचा स्वीकार कर. मी तुझें जेणेंकरून हित होईल, अशीच गोष्ट सांगत आहें. ॥ ९५ ॥ रावणा! साधूंची संगति धर. रामचंद्र भक्तांचीं दुःखें दूर करणारा व शरणागतांचा हितकर्ता होय; त्याची अंगकांति पाचेच्या खड्याप्रमाणें सुंदर आहे; तो हस्तामध्यें नित्य धनुष्यबाण धारण करितो; सुग्रीव, लक्ष्मण व बिभीषण हे तिघे त्याच्या चरणांची सेवा करीत असतात; राजा! तूं सीतेसह रामचंद्राची भक्ति करीत जा." ॥ ९६ ॥ इति चतुर्थसर्गः ॥ ४ ॥

विमुक्तः सर्वपापेभ्यो विष्णुलोकं प्रयास्यसि ॥ नोचेद्गमिष्यसे ऽधोधः पुनरावृत्ति-वर्जितः ॥ अंगीकुरुष्व मद्वाक्यं हितमेव वदामि ते ॥९५॥ सत्संगतिं कुरु भजस्व हरिं शरण्यं श्रीराघवं मरकतोपलकान्तिकान्तम् ॥सीतासमेतमनिशं धृतचापबाणं सुग्रीवलक्ष्मणविभीषणसेवितांघ्रिम्॥९६॥इति युद्धकाण्डे चतुर्थः सर्गः ॥४॥

सर्वपापेभ्यः विमुक्तः [सन्] (पू.). ॥ (द्वि.) [त्वं] अधः अधः गमिष्यसे. ॥ मद्वाक्यं (मू.) वदामि. ॥ ९५ ॥ (मू.) श्रीराघवं अनिशं भजस्व." ॥ ९६ ॥ इति युद्धकाण्डे चतुर्थः सर्गः ॥ ४ ॥

१ पुन्हां येण्याशिवाय. २ पाचेच्या खड्यासारख्या कांतीनें सुंदर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शुकाच्या मुखांतून निघालेलीं उपदेशवचनें खरोखरच अज्ञानाचा विध्वंस करणारीं होतीं, परंतु रावणाला - रुचलीं नाहींत; तर हीं कानीं पडतांच - रावणाचे नेत्र क्रोधानें लाल होऊन गेले; त्यामुळें तो शुकाला जाळीत आहे कीं काय, असा भास पडे! अशा स्थितींत त्यानें भाषण केलें :— ॥ १ ॥ ‘शुका! तुझी बुद्धि अत्यंत दुष्ट आहे! अरे! तूं माझा चाकर असून मजजवळ गुरूसारखीं भाषणें बोलतोस - तुला ह्मणावें तरी काय? - मी त्रैलोक्याला शिक्षण लावणारा! आणि मला तूं उपदेश करीत आहेस! तुला लाज तरी कशी वाटत नाहीं? ॥ २ ॥ तुला मी आतांच मारून टाकिलें असतें; खरोखर, ह्या वेळीं तुझा वध करावा, हेंच योग्य होय! परंतु, तुझे पूर्वोपकार स्मरून मी तुला जीवदान देतों. ॥ ३ ॥ मूर्खा! येथून चालता हो. मी तुझें असें भाषण ऐकून घेणें योग्य नव्हे.’ ‘हा आपला मजवर मोठा अनुग्रहच

श्रुत्वा शुक[1]मुखोद्गीतं वाक्यमज्ञाननाशनम् ॥ रावणः क्रोधताम्राक्षो दहन्निव तमब्रवीत् ॥ १ ॥ अनुजीव्[2]य सुदुर्बुद्धे गुरुवद्भाषसे कथम् ॥ शासिता ऽहं त्रिजगतां त्वं मां शिक्षन्न लज्ज[3]से ॥ २ ॥ इदानीमेव हन्मि त्वां किंतु पूर्वकृतं तव ॥ स्मरामि तेन रक्षामि त्वां यद्यपि वधोचितम्॥ ३॥इतो गच्छ विमूढ त्वमेवं [5]श्रोतुं न मे क्षमम्॥

(पू.) वाक्यं श्रुत्वा ॥ क्रोधताम्राक्षः (मू.) – ॥१॥ ‘(पू.) भाषसे? ॥ अहं त्रिजगतां शासिता. (मू.) [कथं] न लज्जसे? ॥ २ ॥ (पू.) [4]हन्मि; किन्तु तव पूर्वकृतं ॥ (मू.) त्वां रक्षामि. ॥ ३ ॥ विमूढ, त्वं (पू.) न [6]क्षमं.’ ॥

---

१ शुकाच्या मुखांतून उच्चारिलेले. २ सेवका. ३ लाजतोस. ४ मारितों. ५ ऐकण्यास. ६ योग्य.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शुकाचा पूर्वजन्मवृत्तांत.

झाला असें मी समजतों!' इतकें बोलून शुक कांपत कांपत घरीं गेला. ॥ ४ ॥ शुकही पूर्वजन्मीं उत्तम वेदवेत्ता व ब्रह्मज्ञानी ब्राह्मण होता. तो वानप्रस्थांच्या धर्माप्रमाणें स्वकर्में आचरण करून वनांत राहत असे. ॥ ५ ॥ त्या महाबुद्धिमान् ब्राह्मणानें, देवांचा उत्कर्ष व दैत्यांचा नाश व्हावा, एवढ्यासाठीं एकापाठीमागून एक असे अनेक यज्ञ केले. ॥ ६ ॥ शुक देवांचें हित करण्यास तत्पर असे; ह्मणून राक्षस त्याच्याशीं द्वेष करूं लागले. त्या राक्षससमुदायांत वज्रदंष्ट्र नांवानें प्रख्यात असा एक महाराक्षस होता. ॥ ७ ॥ तो शुकाचा घात करण्यास योग्य प्रसंग केव्हां सांपडतो अशी इच्छा धरून टपून बसला होता. एके प्रसंगीं

महाप्रसाद इत्युक्त्वा वेपमानो[1] गृहं ययौ ॥ ४ ॥ शुको ऽपि ब्राह्मणः पूर्वं ब्रह्मिष्ठो[2] ब्रह्मवित्तमः ॥ वानप्रस्थविधानेन[3] वने तिष्ठन् स्वकर्मकृत् ॥५॥ देवानामभिवृद्ध्यर्थं[4] विनाशाय सुरद्विषाम्[5] ॥ चकार यज्ञविततिमविच्छिन्नां महामतिः ॥६॥ राक्षसानां विरोधो ऽभूच्छुको देवहितोद्यतः ॥ वज्रदंष्ट्र इतिख्यातस्तत्रैको राक्षसो महान् ॥ ७ ॥ अन्तरं प्रेप्सुरातिष्ठच्छुकापकरणोद्यतः ॥

(मू.). ॥ ४ ॥ (मू.) ब्राह्मणः [आसीत्]. ॥ ५ ॥ महामतिः [सः] (पू.) विनाशाय [च] अविच्छिन्नां[6] यज्ञविततिं[7] चकार. ॥ ६ ॥ शुकः देवहितोद्यतः[8] [इति ज्ञात्वा[9]] (पू.). ॥ तत्र (मू.) राक्षसः ॥ ७ ॥ (पू.) [सन्] अन्तरं[10] प्रेप्सुः[11] आतिष्ठत्[12]. ॥

---

१ कांपणारा. २ ब्रह्मसाक्षात्कारी. ३ वनांत राहणाऱ्या ऋषींच्या धर्माप्रमाणें. ४ उत्कर्षासाठीं. ५ देवांच्या शत्रूंच्या. ६ अखंडित. ७ यज्ञपरंपरेला. ८ देवांचें हित करण्यास तत्पर. ९ जाणून. १० अवकाश; फट. ११ मिळवूं इच्छिणारा. १२ राहिला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या शुकमुनीच्या आश्रमांत अगस्त्य मुनि आले. ॥ ८ ॥ शुकानें अगस्त्यांचें स्वागत करून त्यांला भोजनास राहविलें. - त्यांनीं शुकाच्या ह्मणण्यास मान दिला. - पुढें अगस्त्यमुनि स्नानाला गेले. ही सांपडलेली संधि साधून ॥ ९ ॥ राक्षसानें अगस्त्याचा वेष घेतला आणि शुकाकडे येऊन त्याला ह्मटलें :– ‘ मुनिवर्या, तुह्मी मला भोजन देणारच, तर त्यांत मांससुद्धां असलें पाहिजे. ॥ १० ॥ मी आज फार दिवसांत बोकडाच्या शरीराचें मांस खाल्लें नाहीं. ’ शुकानें ‘ बरें आहे ’ असें ह्मणून मांसाचे सर्व भोज्य उपस्कर सिद्ध करविले. ॥ ११ ॥ अगस्त्यमुनि भोजनास बसले. इकडे त्या दुष्ट राक्षसानें घरांत शुकाच्या पत्नीला

कदाचिदागतो ऽगस्त्यस्तस्याश्रमपदं मुनेः ॥ ८ ॥ तेन संपूजितो ऽगस्त्यो भोजनार्थं निर्मन्त्रितः ॥ गते स्नातुं मुनौ कुम्भसंभवे प्राप्य चान्तरम् ॥ ९ ॥ अगस्त्यरूपधृक् सो ऽपि राक्षसः शुकमब्रवीत् ॥ यदि दास्यसि मे ब्रह्मन् भोजनं देहि सामिषम् ॥ १० ॥ बहुकालं न भुक्तं मे मांसं छागांगसंभवम् ॥ तथेति कारयामास मांसभोज्यं सविस्तरम् ॥ ११ ॥ उपविष्टे मुनौ भोक्तुं राक्षसो ऽतीवसुन्दरम् ॥

(मू.) आश्रमपदं आगतः. ॥८॥ (पू.). ॥ कुंभसम्भवे मुनौ स्नातुं गते [सति], (मू.) प्राप्य, ॥ ९ ॥ (पू.) – ‘ब्रह्मन, (मू.) दास्यसि, [तर्हि] सामिषं देहि. ॥ १० ॥ मे (पू.) मांसं न भुक्तं. ’॥ (मू.) मांसभोज्यं कारयामास. ॥ ११ ॥ मुनौ भोक्तुं उपविष्टे [सति], (पू.) ॥

---

१ कुंभापासून जन्मलेला (अगस्त्य). २ स्नानास. ३ देशील. ४ मांसासहित. ५ दे. ६ बकऱ्याच्या आंगांतून उत्पन्न झालेलें. ७ मांसाचे भक्ष्यपदार्थ. ८ भोजनास. ९ बसलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याला अगस्त्य-
मुनींचा शाप.

भुरळ घातली व स्वतां तिच्या स्वरूपासारखें सुंदर शरीर धारण करून - बाहेर येऊन - ॥ १२ ॥ अगस्त्य मुनींच्या पात्रांत नरमांसाचे सिद्ध केलेले सर्व पदार्थ वाढिले. वाढण्याचें काम आटोपल्याबरोबर राक्षस गुप्त झाला. मनुष्याचें मांस अपवित्र होय - खाण्यास योग्य नाहीं : तें पात्रांत दृष्टीस पडतांच - अगस्त्यमुनि संतापले व शुकाला ह्मणाले :– ‘ दुर्बुद्धे ! मनुष्याचें मांस अभक्ष्य असतांना तूं मला वाढिलेंस, त्याअर्थीं तूं मनुष्यें खाणारा राक्षस होऊन राहा ! ’ असा शाप मिळाला तेव्हां शुक घाबरला व अगस्त्याला विनवूं लागला :– ‘ मुने, आपण ॥ १३ ॥ १४ ॥ १५ ॥ आतांच सांगितलें कीं, आज मला मांसाचें

शुकभार्यावपुर्धृत्वा तां चान्तर्मोहयन् खलः ॥ १२ ॥ नरमांसं ददौ तस्मै सुपक्वं बहुविस्तरम् ॥ दत्त्वैवान्तर्दधे रक्षस्ततो दृष्ट्वा चुकोप सः ॥ १३ ॥ अमेध्यं मानुषं मांसमगस्त्यः शुकमब्रवीत् ॥ अभक्ष्यं मानुषं मांसं दत्तवानसि दुर्मते ॥ १४ ॥ मह्यं त्वं राक्षसो भूत्वा तिष्ठ त्वं मानुषाशनः ॥ इति शप्तः पुरो भीत्या प्राहागस्त्यं मुने त्वया ॥ १५ ॥ इदानीं भाषितं मेऽद्य मांसं देहीति विस्तरम् ॥

(मू.) राक्षसः ॥१२॥ (१३ पू.) नरमांसं ददौ. रक्षः ॥ (१३ मू.) अगस्त्यः (१४ पू.) दृष्ट्वा चुकोप, [ततः] शुकं अब्रवीत् – ‘दुर्मते, [यतः] त्वं मह्यं (१४ मू.), [अतः] त्वं मानुषाशनः(१५पू.)’.॥ इति शप्तः [शुकः] (मू.) प्राह – ‘मुने, त्वया ॥१३–१५॥ (पू.) मांसं देहि इति इदानीं भाषितं; ॥

१ भुरळ पाडणारा. २ मनुष्याचें मांस. ३ देता झाला. ४ गुप्त झाला. ५ अपवित्र. ६ मनुष्यांस खाणारा. ७ शाप दिलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सोपस्कर भोजन दे. त्याप्रमाणेंच मी आपणाला भोजन अर्पण केलें. मग, अहो ज्ञानवंता ! मला शाप काय ह्मणून देतां ? ' ॥ १६ ॥ शुकाचें भाषण ऐकिल्यावर अगस्त्यमुनि - गोंधळांत पडले. त्यांना आपण मांस-भोजन मागितल्याचें स्मरण होईना ! - ते मुहूर्तमात्र ध्यानस्थ बसले; तेव्हां लागलाच राक्षसाचा सर्व खो-डकरपणा त्यांच्या ध्यानीं आला. मुनि महाबुद्धिमानच होते. त्यांनीं तत्क्षणीं शुकाला सांगितलें :— ॥१७॥ 'बाबा ! राक्षसाच्या मनांत तुझा घात करावयाचा होता, ह्मणून त्यानें हें सर्व कृत्य केलें ! मुनिश्रेष्ठा ! मी तुला केवळ अविचारामुळें शाप दिला, - ह्याबद्दल मला फार वाईट वाटतें; - ॥ १८ ॥ परंतु, माझें हें वचन कधीं अन्यथा व्हावयाचें नाहीं. ह्मणून, तूं राक्षसाचें शरीर धारण करून रावणाचें साह्य करीत ॥ १९ ॥

तथैव दत्तं मे देव किं मे शापं प्रदास्यसि ॥ १६ ॥ श्रुत्वा शुकस्य वचनं मुहूर्तं ध्यानमास्थितः ॥ ज्ञात्वा रक्षःकृतं[1] सर्वं ततः प्राह शुकं सुधीः ॥ १७ ॥ तवापकारिणा सर्वं राक्षसेन कृतं त्विदम् ॥ अविचार्यैव[2] मे दत्तः शापस्ते मुनिसत्तम ॥१८॥ तथापि मे वचो ऽमोघं[3] मेवमेव भविष्यति ॥ राक्षसं वपु[4]रास्थाय[5] रावणस्य सहायकृत् ॥ १९ ॥

देव, तथा एव मे दत्तं [अतः] (मू.) किं प्रदास्यसि ? ॥ १६ ॥ सुधीः [अगस्त्यः] शुकस्य वचनं (पू.).॥ ततः सर्वं रक्षःकृतं (मू.) प्राह — ॥ १७ ॥ ' मुनिसत्तम, इदं तु सर्वं (पू.). मे (मू.) शापः दत्तः. ॥ १८ ॥ (मू.) ॥ १९ ॥

---

१ राक्षसानें केलेलें. २ विचार न करून. ३ अमोघं सत्य. ४ शरीर. ५ स्वीकारून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शापाच्या नि-
वृत्तीची वेळ.

राहा. रामचंद्र येईपर्यंत तुला ह्या योनींत राहावें लागेल. राम रावणाचा वध करण्याकरितां वानरांना बरोबर घेऊन लंकेजवळ येईल; ॥२०॥ पुढें रावण तुला दूत ह्मणून रामाकडे पाठवील; रामाचें दर्शन झालें कीं तुझी शापापासून मुक्तता होईल. नंतर तूं रावणाला तत्त्वज्ञानाचा उपदेश करशील, आणि शेवटीं मुक्त होत्साता परम पदास पावशील.' अगस्त्यमुनींनीं शुकाला असें सांगितलें. खरोखरच शुक हा ब्राह्मणांतील अग्रगण्यांमध्येंही अतिश्रेष्ठ होता. ॥ २१ ॥ २२ ॥ - परंतु ब्रह्मशापामुळें - तत्काल त्याला राक्षस व्हावें लागलें! तो रावणाजवळ जाऊन राहिला. आतां त्यानें दूतरूपानें जाऊन कनिष्ठ बंधूसह रामाचें दर्शन घेतलें, व ॥२३॥

तिष्ठ तावद्यदा रामो दशाननवधाय हि ॥ आगमिष्यति लंकायाः समीपं वानरैः सह ॥ २० ॥ प्रेषितो रावणेन त्वं चारो[१] भूत्वा रघूत्तमम् ॥ दृष्ट्वा शापाद्विनिर्मुक्तो बोधयित्वा च रावणम् ॥ २१ ॥ तत्त्वज्ञानं ततो मुक्तः परं पदमवाप्स्यसि ॥ इत्युक्तो ऽगस्त्यमुनिना शुको ब्राह्मणसत्तमः ॥ २२ ॥ बभूव राक्षसः सद्यो रावणं प्राप्य संस्थितः ॥ इदानीं चाररूपेण दृष्ट्वा रामं सहानुजम् ॥ २३ ॥

तावत् (मू.) लङ्कायाः समीपं आगमिष्यति, ॥ २० ॥ [तदा] रावणेन (२१ मू.) [सन्] रावणं, तत्वज्ञानं बोधयित्वा, ततः मुक्तः [सन्] (२२ पू.). ' ॥ अगस्त्यमुनिना (मू.) ॥ २१ ॥ २२ ॥ सद्यः राक्षसः (मू.) रामं दृष्ट्वा, ॥ २३ ॥

१ दूत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- परत आल्यावर - रावणाला तत्त्वज्ञानाचा उपदेश केला. - त्यामुळें त्याच्या शापाचें पर्यवसान झालें. - तेव्हां तो पूर्वीप्रमाणें ब्राह्मण होऊन ऋषींसह आश्रमीं राहूं लागला. ॥ २४ ॥ इकडे - लंकेंत - माल्यवान् नांवाचा एक वृद्ध महान् राक्षस रावणाजवळ आला. तो मोठा बुद्धिमान् व नीतिशास्त्रांत प्रवीण असून राजाच्या मातेचा प्रिय पिता (आजा) होता. ॥२५॥ त्यानें त्या पराक्रमी राक्षसाला (रावणाला) सांगितलें :–' राजा ! मी काय सांगतों, तें आगोदर अंतःकरण शांत ठेवून ऐकून घे. मग तुझ्या इच्छेस येईल तसा वाग. ॥ २६ ॥ रावणा ! रामाची प्रियभार्या जानकी लंकेंत शिरली, तेव्हांपासून ह्या नगरींत दुश्चिन्हें दिसूं लागलीं आहेत. ॥२७॥

रावणं तत्त्वविज्ञानं बोधयित्वा पुनर्द्रुतम् ॥ पूर्ववद्ब्राह्मणो भूत्वा स्थितो वैखानसैः सह ॥ २४ ॥ ततः समागमद्वृद्धो माल्यवान् राक्षसो महान् ॥ बुद्धिमान्नीतिनिपुणो राज्ञो मातुः प्रियः पिता ॥२५॥ प्राह तं राक्षसं वीरं प्रशान्तेनान्तरात्मना ॥ शृणु राजन्वचो मे ऽद्य श्रुत्वा कुरु यथेप्सितम् ॥ २६ ॥ यदा प्रविष्टा नगरीं जानकी रामवल्लभा ॥ तदादि पुर्यां दृश्यन्ते निमित्तानि दशानन ॥ २७ ॥

(मू.) स्थितः. ॥ २४ ॥ (मू.) मातुः पिता माल्यवान् राक्षसः समागमत्.' ॥२५॥ वीरं तं राक्षसं प्राह – ' राजन्, अद्य मे वचः (मू.) कुरु. ॥ २६ ॥ दशानन, रामवल्लभा जानकी (२७ पू.) प्रविष्टा, (२७ उ.) ॥

१ ऋषींशीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यांवरून, आपला नाश होणार, असें निश्चयात्मक कळून येतें. घोर दुश्चिन्हें कोणतीं, तीं मी सांगतों ऐक :– आकाशांत अतिभयंकर मेघ येऊन कठोर गर्जना करितात ! ॥ २८ ॥ व सर्वकाळ लंकानगरीवर उष्ण रक्ताची वृष्टि चालवितात ! देवांच्या मूर्ति रडतात, घामाघूम होतात, व उलथून पडतात ! ॥ २९ ॥ कालिका प्रत्येक राक्षसाच्या पुढें अवचित उभी राहते, व आपले पांढरे दांत बाहेर काढून खदखदां हांसते ! गाईंच्या पोटीं गर्दभ उपजतात ! मुंगूस व उंदीर ॥ ३० ॥ मांजरांबरोबर युद्ध करितात ! सर्प गरुडाशीं लढण्यास सिद्ध होतात; ॥

घोराणि नाशहेतूनि तानि मे वदतः शृणु ॥ खरस्तनितनिर्घोषा[2] मेघा अतिभयंकराः ॥ २८ ॥ शोणितेना[3]भिवर्षन्ति लंकामुष्णेन सर्वदा ॥ रुदन्ति[6] देवलिंगानि स्विद्यन्ति प्रचलन्ति च ॥ २३ ॥ कालिका पाण्डुरैर्दन्तैः प्रहसत्यग्रतः स्थिता ॥ खरा[11] गोषु[12] प्रजायन्ते[13] मूषका नकुलैः[14] सह ॥ ३० ॥ मार्जारेण तु युध्यन्ति पन्नगा[15] गरुडेन तु ॥

(२८ पू.) निमित्तानि दृश्यन्ते; तानि वदतः मे शृणु – ॥ (मू.) मेघाः ॥ २७ ॥ २८ ॥ उष्णेन (पू.) अभिवर्षन्ति. ॥ देवतालिङ्गानि (मू.). ॥ २९ ॥ अग्रतः स्थिता (मू.) [स्थिताः] मूषकाः ॥ ३० ॥ (पू.) युद्ध्यन्ति. ॥

१ अपशकुन. २ भयंकर गडगडाटाचा शब्द ज्यांचा, असे. ३ रक्तानें. ४ भिजवितात. ५ देवांच्या मूर्ति. ६ रडतात. ७ घामाघूम होतात. ८ कांपतात. ९ पांढऱ्या. १० खिदळणारी. ११ गर्दभ. १२ गाईंच्या पोटीं. १३ उपजतात. १४ मुंगूस. १५ सर्प.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भयंकर, वेडाविद्रा, काळ्या व पिंगट वर्णाचा गोसावडा काळपुरुष सर्वांच्या घरांत वेळोवेळीं डोकावत असतो. हीं व अशींच दुसरीं दुश्चिन्हें दिसतात व उद्भवत असतात. ॥ ३१ ॥ ३२ ॥ ह्मणून, रावणा! कुलाच्या संरक्षणासाठीं कांहीं शांतिकर्म कर. बा! सीतेचा सत्कार करून द्रव्यासह ती लवकर रामाला नेऊन दे. ॥ ३३ ॥ राम प्रत्यक्ष नारायण आहे, हें लक्ष्यांत घे. राघवाविषयीं द्वेष सोडून दे. अरे! ज्ञानीलोक त्याच्या चरणरूप नौकेचा आश्रय धरितात; ह्मणून त्यांचीं अंतःकरणें भक्तीच्या योगें पवित्र होतात; मग ते अर्थातच संसारसागरांतून तरून जातात. एवढ्यावरून, राम मनुष्य नव्हे, हें सिद्ध आहे. तूं

करालो विकटो मुण्डः पुरुषः कृष्णपिंगलः ॥ ३१ ॥ कालो गृहाणि सर्वेषां काले काले त्ववेक्षते ॥ एतान्यन्यानि दृश्यन्ते निमित्तान्युद्भवन्ति च ॥ ३२ ॥ अतः कुलस्य रक्षार्थं शान्तिं कुरु दशानन ॥ सीतां सत्कृत्य सधनां रामायाशु प्रयच्छ भोः ॥ ३३ ॥ रामं नारायणं विद्धि विद्वेषं त्यज राघवे ॥ यत्पादपोतमाश्रित्य ज्ञानिनो भवसागरम् ॥ ३४ ॥ तरन्ति भक्तिपूतान्तास्ततो रामो न मानुषः ॥

(मू.) ॥ ३१ ॥ कालः सर्वेषां (मू.) दृश्यन्ते, उद्भवन्ति च. ॥ ३२ ॥ अतः दशानन, (पू.).॥ भोः! सधनां (मू.). ॥३३॥ (३४ पू.) विद्वेषं त्यज; ॥ ज्ञानिनः (३४ मू.), भक्तिपूतान्ताः [सन्तः] भवसागरं (बा. ३९ पू.) ॥

१ क्रूर. २ विद्रा. ३ मुंडलेला. ४ काळा पिंगट. ५ अवेक्षते डोकावतो. ६ दे. ७ ज्याच्या चरणरूप नौकेला. ८ भक्तीच्या योगें पवित्र झालीं अंतःकरणें ज्यांचीं, असे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

"पालथ्या घागरीवर पाणी."

सर्वांच्या हृदयांत राहणाऱ्या त्या रामचंद्राची भक्तिभावेंकरून सेवा कर. ॥ ३४ ॥ ३१ ॥ जरी तूं दुराचारी आहेस, तरी भक्तीच्यायोगें पवित्र होशील. राजाधिराजा! मी सांगत आहें, असा वाग. ह्मणजे तुझ्या कुलाचें कल्याण होईल.' ॥ ३६ ॥ माल्यवानानें असा हितकारक उपदेश केला. परंतु, रावणाचें अंतःकरण दुष्ट होतें व तो मृत्यूच्या पूर्णपणें अधीन झाला होता, ह्मणून हा उपदेश त्याला सहन झाला (रुचला) नाहीं. - तो ह्मणाला : - ॥ ३७ ॥ 'ह्माताऱ्या! राम ह्मणजे एक गरीब दुबळा मनुष्य! त्याला आधार कायतो माकडांचा! बापानें तर त्याला घालवून दिलें. त्याचे अंतरंगींचे स्नेही ह्मटले ह्मणजे - अशक्त - मुनि! अशी त्याची स्थिति असतांही, तो मोठा समर्थ आहे, असें तुला वाटतें, तें काय ह्मणून? ॥ ३८ ॥

भजस्व भक्तिभावेन रामं सर्वहृदालयम् ॥ ३५ ॥ यद्यपि त्वं दुराचारो भक्त्या पूतो भविष्यसि ॥ मद्वाक्यं कुरु राजेन्द्र कुलकौशलहेतवे ॥ ३६ ॥ तत्तु माल्यवतो वाक्यं हितमुक्तं दशाननः ॥ न मर्षयति दुष्टात्मा कालस्य वशमागतः ॥ ३७ ॥ मानवं कृपणं राममेकं शाखामृगाश्रयम् ॥ समर्थं मन्यसे केन हीनं पित्रा मुनिप्रियम् ॥ ३८ ॥

(मू.) रामं भक्तिभावेन भजस्व. ॥ ३४ ॥ ३५ ॥ (पू.) [तथा अपि] भक्त्या पूतः[1] भविष्यसि. ॥ (मू.) मद्वाक्यं कुरु.' ॥ ३६ ॥ (उ.) दशाननः हितं उक्तं (पू.) न मर्षयति[3]. ॥ ३७ ॥ '(मू.) पित्रा हीनं रामं केन समर्थं मन्यसे? ॥ ३८ ॥

१ शुद्ध. २ कुलाच्या कल्याणासाठीं. ३ सहन करितो.

॥ ३७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- माझा तर तर्क असा वाहतो कीं, - तुला रामानें पाठविलें आहे; ह्मणून तूं ही पाहिजे तशी बडबड लाविली आहेस. जा. तूं म्हातारा व आमचा नातलग आहेस ह्मणून मी तुझें सगळें बोलणें सोसून घेतलें! ॥ ३९ ॥ ह्या तुझ्या मुखांतून निघालेल्या भाषणानें माझ्या कानांची आग करून दिली आहे!!' इतकें बोलून रावण लागलाच सर्व सचिवांना बरोबर घेऊन - सभेंतून - निघून गेला. ॥ ४० ॥ पुढें त्यानें राजवाड्याच्या शिखरावर बसून वानरसेनेंतील वीर अवलोकन केले व जवळ असलेल्या सर्व राक्षसांना युद्धास जाण्याची आज्ञा दिली. ॥ ४१ ॥ इकडे रामचंद्रानेंही लक्ष्मणानें आणून दिलेलें धनुष्य हातीं घेतलें. रावण राजवाड्यावर

रामेण प्रेषितो नूनं भाषसे त्वमनर्गलम्[1] ॥ गच्छ वृद्धो ऽसि बन्धुस्त्वं सोढं[2] सर्वं त्वयोदितम् ॥३९॥ इतो मत्कर्णपदवीं[3] दहत्येतद्वचस्तव ॥ इत्युक्त्वा सर्वसचिवैः सहितः प्रस्थितस्तदा ॥ ४० ॥ प्रासादाग्रे समासीनः पश्यन्वानरसैनिकान् ॥ युद्धायायोजयत्सर्वराक्षसान्समुपस्थितान् ॥ ४१ ॥ रामो ऽपि धनुरादाय लक्ष्मणेन समाहृतम् ॥ दृष्ट्वा[4] रावणमासीनं कोपेन कलुषीकृतः[5] ॥ ४२ ॥

त्वं (पू.) भाषसे! ॥ गच्छ त्वं वृद्धः बन्धुः असि [अतः] (मू.) सोढं! ॥३९॥ इतः तव [मुखात् निःसृतं] एतत् वचः (पू.)!' ॥ [रावणः] (मू.) प्रस्थितः. ॥ ४० ॥ (पू.) पश्यन् ॥ [रावणः] समुपस्थितान् सर्वराक्षसान् (मू.). ॥४१॥ (पू.) धनुः आदाय, ॥ आसीनं रावणं (मू.)[बभूव].॥४२॥

---

१ अनर्गलम् निष्प्रतिबंधपणें. २ सोसलें. ३ माझ्या कानांच्या मार्गांत. ४ जाळतें. ५ खवळलेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

युद्धास जाण्याची आज्ञा.

बसला आहे असें दृष्टीस पडल्याबरोबर तो क्रोधानें खवळून गेला. ॥ ४२ ॥ रावणाच्या मस्तकांवर मुकुट होते व भोंवतीं मंत्रिमंडळ असून तो मध्यभागीं बसला होता. रामानें अर्धचंद्राकृति[1] अशा एकाच बाणाच्या योगें ॥ ४३ ॥ रावणाचां सहस्र श्वेत छत्रें तोडिलीं व दहाही मुकुटांचा छेद केला! तो एक विलक्षणच प्रकार झाला! ॥ ४४ ॥ रावणाला लाज वाटली व तो लागलाच आपल्या मंदिरांत शिरला. नंतर त्या दुष्टानें प्रहस्तप्रभृति सर्व राक्षसांना बोलावून, ॥४५॥ मोठ्या त्वरेनें, वानरांशीं युद्ध करण्यास जाण्याची आज्ञा दिली[2]. त्याप्रमाणें राक्षससेना निघाली. पणव, आनक, गोमुख, दुंदुभि इत्यादि वाद्यें वाजूं लागलीं. ॥ ४६ ॥

किरीटिनं समासीनं मन्त्रिभिः परिवेष्टितम् ॥ शशांकार्धनिभेनैव बाणेनैकेन राघवः ॥ ४३ ॥ श्वेतच्छत्रसहस्राणि किरीटदशकं तथा ॥ चिच्छेद निमिषार्धेन तदद्भुतमिवाभवत् ॥ ४४ ॥ लज्जितो रावणस्तूर्णं विवेश भवनं स्वकम् ॥ आहूय राक्षसान् सर्वान्प्रहस्तप्रमुखान् खलः ॥ ४५ ॥ वानरैः सह युद्धाय नोदयामास सत्वरः ॥ ततो भेरिमृदंगाद्यैः पणवानकगोमुखैः ॥ ४६ ॥

राघवः (पू.) [रावणं दृष्ट्वा], (मू.) बाणेन ॥ ४३ ॥ (पू.), तथा किरीटदशकं ॥ निमिषार्धेन (मू.)! ॥ ४४ ॥ (पू.) भवनं विवेश. ॥ खलः (मू.) राक्षसान् आहूय, ॥ ४५ ॥ सत्वरः [सन्] (मू.) ॥ ४६ ॥

१ चंद्राच्या अर्धासारख्या. २ पाठविता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राक्षस रेडे, उंट, गर्दभ, सिंह, वाघ ह्या वाहनांवर बसून चालले. त्यांनीं तरवारी, शूल, धनुष्यें, फांस, भाले, तोमर, बरच्या हीं आयुधें हातीं घेतलीं होतीं.॥४७॥ लंकेंत जिकडेतिकडे असा देखावा दिसूं लागला. शेवटीं राक्षसमंडळी नगराच्या प्रत्येक वेशीजवळ येऊन पोंचली. रामानें वानरवीरांना पूर्वींच आज्ञा दिली होती;॥४८॥ ह्मणून ते वानरसेनापति पर्वतांचीं लहान लहान शृंगें व मोठमोठालीं शिखरें उचलून आणि नानाजातींचे वृक्ष उपटून घेऊन युद्धासाठीं उभे राहिले होते. ॥ ४९ ॥ रावणाचीं सैन्यें टोळ्याटोळ्यांनीं येत आहेत, असें त्यांच्या दृष्टीस पडलें तेव्हां ते वानर रामाचें प्रिय करावें ह्या इच्छेनें लंकेवर चढले. ॥ ५० ॥

महिषोष्ट्रैः[1] खरैः[2] सिंहैर्द्वीपिभिः[3] कृतवाहनाः ॥ खड्गशूलधनुःपाशयष्टितोमर-
शक्तिभिः ॥ ४७॥ लक्षिताः सर्वतो लंकां प्रतिद्वारमुपाययुः ॥ तत्पूर्वमेव रामेण
नोदिता वानरर्षभाः ॥४८॥ उद्यम्य गिरिशृंगाणि शिखराणि महान्ति च ॥ तरूं[5]-
श्चोत्पाट्य[6] विविधान्युद्धाय हरियूथपाः ॥ ४९ ॥ प्रेक्षमाणा रावणस्य तान्यनी-
कानि[7] भागशः ॥ राघवप्रियकामार्थं लंकामारुरुहु[8]स्तदा ॥ ५० ॥

(मू.) [युक्ताः] ॥ ४७ ॥ लक्षिताः [राक्षसाः] (मू.) नोदिताः. ॥ ४८ ॥ (पू.) शिखराणि [4]उद्यम्य ॥ विविधान् (मू.) [स्थिताः] हरियूथपाः ॥ ४९ ॥ तदा (पू.) प्रेक्षमाणाः [सन्तः] (मू.). ॥ ५० ॥

---

१ रेडे उंटें ह्यांनीं. २ गर्दभांनीं. ३ वाघांनीं. ४ उचलून. ५ तरून् वृक्षांना. ६ उपटून. ७ सैन्यांस. ८ चढले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कित्येक वानरांच्या हातांत वृक्ष दिसत होते, कांहींच्या हातांत पर्वतांचीं शिखरें होतीं, दुसऱ्यांनीं मुठी वळल्या होत्या. पुढें, ते वानरसेनापति आपल्या हाताखालचे—काणाचे सहस्र, कोणाचे कोटि, ॥ ५१ ॥ काणाचे शत कोटि असे—कळप बरोबर घेऊन नगरीला पूर्ण वेढा घालून बसले. कांहीं वानर वर उड्या मारीत, कांहीं खालीं येत, कोणी गर्जना करीत, - अशी जिकडे तिकडे गडबड चालली होती. - ॥ ५२ ॥ 'अतिप्रबल अशा रामचंद्राचा जय असो!', 'महापराक्रमी लक्ष्मण विजय पावो!', 'रामचंद्रानें ज्याचें रक्षण केलें, तो राजा सुग्रीव जय मिळवो!' ॥ ५३ ॥ असे घोष करीत वानर शत्रूंबरोबर युद्ध करूं लागले. हनुमान्,

ते द्रुमैः पर्वताग्रैश्च मुष्टिभिश्च प्लवंगमाः ॥ ततः सहस्रयूथाश्च कोटियूथाश्च यूथपाः ॥५१॥ कोटीशतयुताश्चान्ये रुरुधुर्नगरं भृशम् ॥ आप्लवन्तः प्लवन्तश्च गर्जन्तश्च प्लवंगमाः ॥ ५२ ॥ रामो जयत्यतिबलो लक्ष्मणश्च महाबलः ॥ राजा जयति सुग्रीवो राघवेणानुपालितः ॥५३ ॥ इत्येवं घोषयन्तश्च समं युयुधिरे ऽरिभिः ॥ हनूमानंगदश्चैव कुमुदो नील एव च ॥ ५४ ॥

(पू.) [उपलक्षिताः] प्लवङ्गमाः, ॥ (मू.) च ॥ ५१ ॥ अन्ये (पू.) रुरुधुः. ॥ (मू.) ॥५२॥ 'रामः अतिबलः जयति महाबलः लक्ष्मणः च (पू.) [जयति] (मू.) सुग्रीवः राजा जयति!' ॥ ५३ ॥(पू.) समं युयुधिरे. (मू.) ॥ ५४ ॥

१ वानर. २ वेढिते झाले. ३ वर उडी मारणारे. ४ खालीं उडी टाकणारे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अंगद, कुमुद, नील, ॥ ९४ ॥ नल, शरभ, मैंद, द्विविद, जांबवान्, दधिवक्र, केसरी, तार, ॥ ९५ ॥ व दुसरेही बलाढ्य वानर असे सर्व यूथपति लंकेच्या द्वारांवर उड्या मारून, - राक्षसांनीं बाहेर पडूं नये ह्मणून, - लगट करीत आंत शिरले. ॥ ९६ ॥ वानरांचीं शरीरें प्रचंड होतीं. ते वृक्षांनीं व पर्वतांच्या शिखरांच्या योगें त्या राक्षसांवर प्रहार करीत सुटले. कांहींनीं तर त्वेषानें राक्षसांना ओरबाडण्याचा व चावण्याचा सपाटा चालविला! तेव्हां ते भयंकर राक्षसही क्रोधानें सर्व द्वारांतून ॥ ९७ ॥ वानरांना मागें हटवीत बाहेर आले आणि भिंदिपाल, खड्ग, शूल, कुऱ्हाडी ह्या आयुधांच्या योगें वानरसेनेला बडवीत सुटले. त्यांचीं शरीरें जशीं प्रचंड दिसत तशा शक्तिही मोठ्या होत्या. ॥ ९८ ॥

नलश्च शरभश्चैव मैन्दो द्विविद एव च ॥ जाम्बवान्दधिवक्रश्च केसरी तार एव च॥५५॥ अन्ये च बलिनः सर्वे यूथपाश्च प्लवंगमाः ॥ द्वाराण्युत्प्लुत्य लंकायाः सर्वतो रुरुधुर्भृशम् ॥५६॥ तदा वृक्षैर्महाकायाः पर्वताग्रैश्च वानराः॥ निजघ्नुस्तानि रक्षांसि नखैर्दन्तैश्च वेगिताः ॥ राक्षसाश्च तदा भीमा द्वारेभ्यः सर्वतो रुषा ॥ ५७ ॥ निर्गत्य भिन्दिपालैश्च खड्गैः शूलैः परश्वधैः ॥ निजघ्नुर्वानरानीकं महाकाया महाबलाः ॥ ५८ ॥

(मू.) ॥ ५५ ॥ (पू.) ॥ उत्प्लुत्य, लङ्कायाः (मू.) रुरुधुः ॥ ५६ ॥ तदा महाकायाः वानराः वेगिताः [सन्तः](पू. द्वि.) तानि रक्षांसि निजघ्नुः॥ तदा भीमाः (मू.) ॥ ५७ ॥ निर्गत्य[1], महाकायाः[2] महाबलाः [ते] (पू.) च (मू.) निजघ्नुः[3] ॥ ५८ ॥

---

१ बाहेर पडून. २ मोठालीं शरीरें ज्यांचीं, असे. ३ मारिते झाले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तसेच ते विजयशाली वानरही राक्षसांना बडवीत सुटले. रणभूमीवर जिकडे तिकडे मांसाचा व रक्ताचा चिखल पडला ! ॥ ५९ ॥ हें राक्षसांचें आणि वानरांचें युद्ध इतकें विलक्षण झालें कीं, जगामध्यें जीं घोर युद्धें पूर्वीं झालीं व पुढें होतील त्या सर्वांना हें एक दृष्टांतच होऊन बसलें ! ते शूर राक्षस घोड्यांवर, हत्तींवर आणि सुवर्णमय रथांत बसून युद्ध करीत होते. त्यांनीं गर्जना करून दश दिशा गाजवून सोडिल्या. राक्षसांना तशीच वानरवीरांनाही आपल्या विरुद्ध पक्षास जिंकण्याची इच्छा होती. ॥ ६० ॥ ६१ ॥ वानर राक्षसांना मारीत व राक्षस वानरांना बडवीत. वानर मूळचे देवांचे अंशावतार होते; त्यांतही साक्षात

राक्षसांश्च तथा जघ्नुर्वानरा जितकाशिनः ॥ तथा बभूव समरो मांसशोणितकर्दमः ॥५९॥ रक्षसां वानराणां च संबभूवाद्भुतोपमः ॥ ते हयैश्च गजैश्चैव रथैः काञ्चनसन्निभैः ॥ ६० ॥ रक्षोव्याघ्रा युयुधिरे नादयन्तो दिशो दश ॥ राक्षसाश्च कपीन्द्राश्च परस्परजयैषिणः ॥ ६१ ॥ राक्षसान्वानरा जघ्नुर्वानरश्चैव राक्षसाः ॥ रामेण विष्णुना दृष्टा हरयो दिविजांशजाः ॥ ६२ ॥

तथा जितकाशिनः वानराः (मू.) बभूव. ॥५९॥ (६०पू.) [समरः] सम्बभूव. ॥ ते रक्षोव्याघ्राः दश दिशः नादयन्तः [सन्तः] (६० उ.) रथैः च युयुधिरे. ॥ (मू.) [आसन]. ॥६०॥६१॥ वानराः (पू.) वानरान् च एव जघ्नुः. ॥ (मू.) हरयः [यदा] दृष्टाः, ॥ ६२ ॥

१ जिंकिला प्राणवायु ज्यांनीं, असे; किंवा जयानें शोभणारे. २ मांसाचा आणि रक्ताचा चिखल ज्यांत, असा. ३ एकमेकांस जिंकण्याची इच्छा करणारे. ४ देवांचे अंशावतार.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विष्णुरूपी रामचंद्रानें त्यांवर कृपादृष्टि ठेविली ॥ ६२ ॥ ह्मणून त्यावेळीं ते अमृत प्राशन केल्याप्रमाणें बलाढ्य व आनंदी झाले होते :- राक्षसांची स्थिति अगदीं उलट होती :- ज्यानें सीतेला चोरून आणणें हें पापकर्म केलें तो रावण राक्षसांचा पालक; ह्मणून ॥ ६३ ॥ त्यांचें ऐश्वर्य व सामर्थ्य नष्ट झालें होतें. अशा राक्षसांवर वानर मनापासून झटून प्रहार करीत असत. असें युद्ध चालत असतां शेवटीं तेथें आलेलें राक्षसांचें बहुतेक सैन्य मरण पावलें; त्याचा चवथा भाग मात्र कायतो अवशिष्ट राहिला. ॥६४॥ आपलें सैन्य वानरांनीं मारिलें, असें मेघनादाच्या दृष्टीस पडलें; तेव्हां तो दुर्बुद्धि दैत्य गुप्तरूपानें तेथें आला. त्याला ब्रह्मदेवाकडून वर मिळाला असल्यामुळें वीरश्री प्राप्त झाली होती. ॥६५॥ तो सकल अस्त्रविद्येंत निपुण होता. त्यानें आकाशांतून

बभूवुर्बलिनो हृष्टास्तदा पीतामृता[1] इव ॥ सीताभिमर्शपापेन रावणेनाभिपालितान् ॥ ६३ ॥ हतश्रीकान्[2]हतबलान् राक्षसाञ्जघ्नुरोजसा[3] ॥ चतुर्थांशावशेषेण निहतं राक्षसं बलम् ॥ ६४ ॥ स्वसैन्यं निहतं दृष्ट्वा मेघनादोऽथ दुष्टधीः ॥ ब्रह्मदत्तवरः श्रीमानन्तर्धानं[4] गतोऽसुरः ॥ ६५ ॥ सर्वास्त्रकुशलो व्योम्नि[5] ब्रह्मास्त्रेण समंततः ॥ नानाविधानि शस्त्राणि वानरानीकमर्दयन्[6] ॥ ६६ ॥

(पू.) बलिनः, हृष्टाः च बभूवुः, ॥ (मू.) ॥६३॥ (पू.) जघ्नुः.॥ (मू.) निहतं. ॥ ६४ ॥ अथ दुष्टधीः ब्रह्मदत्तवरः श्रीमान् मेघनादः असुरः (मू.). ॥ ६५ ॥ (पू.) ब्रह्मास्त्रेण [युतानि] ॥ (मू.) [मुंचन्] वानरानीकं अर्दयन् [सः] ॥ ६६ ॥

---

१ प्राशन केलें अमृत ज्यांनीं, असे. २ नष्ट झाली वीरश्री ज्यांची, अशा. ३ पराक्रमानें. ४ गुप्तरूपास. ५ आकाशांत. ६ पीडा देणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ब्रह्मास्त्रासह अनेक प्रकारचीं शस्त्रें जिकडे तिकडे सोडून वानरसेनेची गाळण उडविली, ॥ ६६ ॥ आणि बाणसमूहाची सारखी वृष्टि चालविली. तो एक विलक्षणच प्रकार झाला. राम सकल अस्त्रज्ञ लोकांत श्रेष्ठ होता, पण ब्रह्मास्त्राला मान देण्यासाठीं ॥ ६७ ॥ क्षणभर स्वस्थ बसला. इतक्यांत वानरांचें सैन्य पतन पावत आहे असें रघुवीराला दिसून आलें. तेव्हां तो क्रुद्ध होऊन अग्नीप्रमाणें लाल झाला आणि - लक्ष्मणाला ह्मणाला :- ॥ ६८ ॥ ' लक्ष्मणा ! धनुष्य आण (धनुष्य रामाच्या हातांतच होतें पण क्रोधाच्या आवेशामुळें त्याला त्याचें भान राहिलें नाहीं). मी ब्रह्मास्त्राच्या योगें सर्व राक्षससैन्याला भस्म करून टाकितों. रघुवीरा ! आज माझा पराक्रम अवलोकन कर. ' ॥ ६९ ॥ तो मायावी मेघनाद सावध राहून - रामसैन्यां-

ववर्ष शरजालानि तदद्भुतमिवाभवत् ॥ रामोऽपि मानयन्ब्राह्ममस्त्रमस्त्रविदां वरः
॥ ६७ ॥ क्षणं तूष्णीमुवासाथ ददर्श पतितं बलम् ॥ वानराणां रघुश्रेष्ठश्चुकोपानलसन्निभः ॥ ६८ ॥ चापमानय सौमित्रे ब्रह्मास्त्रेणासुरं क्षणात् ॥ भस्मीकरोमि मे पश्य बलमद्य रघूत्तम ॥ ६९ ॥ मेघनादोऽपि तच्छ्रुत्वा रामवाक्यमतन्द्रितः ॥
तूर्णं जगाम नगरं मायया मायिकोऽसुरः ॥ ७० ॥

[रामोपरि] शरजालानि (पू.). ॥ अस्त्रविदां वरः (मू.) मानयन् [सन्] ॥ ६७ ॥ (मू.) रघुश्रेष्ठः वानराणां बलं पतितं ददर्श, चुकोप, [आह च -] ॥ ६८ ॥ ' सौमित्रे, (मू.) अद्य मे बलं पश्य. ' ॥ ६९ ॥ अतन्द्रितः मायिकः असुरः (पू.) श्रुत्वा, मायया (मू.) जगाम. ॥७०॥

१ बाणसमूहांस. २ गुपचिप. ३ उवास राहिला. ४ संतापला. ५ आळस न धरणारा. ६ कपटी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तील सर्व प्रकार पाहत होता. - रामाचें पूर्वोक्त भाषण त्याच्या कानीं गेलें. लागलाच त्यानें नगरचा मार्ग धरिला. ॥ ७० ॥ वानरसेना पतन पावली असें पाहून रामाला अत्यंत दुःख झालें. तो मारुतीला ह्मणाला :— ‘हनुमंता ! लवकर क्षीरमहासागरावर जा. ॥ ७१ ॥ तेथें द्रोण नांवाचा एक पर्वत आहे; त्यावर उत्तम उत्तम ओषधि उगवत असतात. झटपट जाऊन तेवढा पर्वत घेऊन ये व ह्या महाप्रतापी वानरसमूहाला जिवंत कर. तूं महाबुद्धिमान् आहेस; - हें कार्य तुझ्या हातून सिद्धीस जाईल, अशी मला खात्री वाटते. - एवढें काम केलेंस ह्मणजे तुझी कीर्ति जगांत चिरकाल स्थिर राहील.’ वायुपुत्र (मारुति) ‘देवा ! तुझी आज्ञा प्रमाण’ असें ह्मणून तत्क्षणीं निघून गेला. ॥ ७२ ॥ ७३ ॥ कांहीं वेळानें तो श्रेष्ठ वानर द्रोणपर्वत घेऊन

पतितं वानरानीकं दृष्ट्वा रामोऽतिदुःखितः ॥ उवाच मारुतिं शीघ्रं गत्वा क्षीरमहोदधिम् ॥ ७१ ॥ तत्र द्रोणगिरिर्नाम दिव्यौषधिसमुद्भवः ॥ तमानय द्रुतं गत्वा संजीवय महामते ॥ ७२ ॥ वानरौघान्महासत्त्वान्कीर्तिस्ते सुस्थिरा भवेत् ॥ आज्ञा प्रमाणमित्युक्त्वा जगामानिलनन्दनः ॥ ७३ ॥ आनीय च गिरिं सर्वान्वानरान्वानरर्षभः ॥ जीवयित्वा पुनस्तत्र स्थापयित्वाऽऽययौ द्रुतम् ॥ ७४ ॥

(पू.) रामः ॥ मारुतिं उवाच – ‘(मू.) गत्वा, ॥ ७१ ॥ (७२ पू.) [पर्वतः अस्ति; तत्र] गत्वा, द्रुतं (७२ उ.), महासत्त्वान् वानरौघान् संजीवय. ते (७३ पू.).’ अनिलनन्दनः (मू.). ॥ ७२ ॥ ७३ ॥ वानरर्षभः गिरिं (मू.) आययौ. ॥ ७४ ॥

१ जीवंत कर. २ वायुपुत्र (मारुति).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'सर्व वीरांनीं युद्धास जावें.'

आला व सर्व वानरांना जिवंत करून आणि तो पर्वत पुन्हां जागच्या जाग्यावर नेऊन ठेवून सत्वर परत आला. ॥ ७४ ॥ वानरांचा सेनासमूह पूर्वीप्रमाणें भयंकर गर्जना करूं लागला. तो शब्द ऐकून रावणाला आश्चर्य वाटलें. तो राक्षसांना म्हणाला :– ॥ ७५ ॥ 'रामचंद्र हा देवांनीं उत्पन्न केलेला माझा एक प्रबल शत्रु येथें येऊन पोंचला खरा ! युद्धांत त्याचा वध करण्यासाठीं माझ्या सेनापतींनीं लवकर चलावें. ॥७६ ॥ मंत्री, बांधव जे जे कोणी शूर पुरुष माझें प्रिय करावें असें इच्छीत असतील त्या सर्वांनीं माझ्या आज्ञेस्तव युद्धास जावें. ॥ ७७ ॥ जे कोणी भित्रे राक्षस मृत्यूला भिऊन युद्धाला जाणार नाहींत, ते माझी आज्ञा मोडितात असें समजून मी त्यांचा वध करीन !' ॥ ७८ ॥

पूर्ववद्भैरवं नादं वानराणां बलौघतः ॥ श्रुत्वा विस्मयमापन्नो रावणो वाक्यमब्रवीत् ॥७५॥ राघवो मे महान् शत्रुः प्राप्तो देवविनिर्मितः ॥ हन्तुं तं समरे शीघ्रं गच्छन्तु मम यूथपाः ॥ ७६॥ मन्त्रिणो बान्धवाः शूरा ये च मत्प्रियकांक्षिणः ॥ सर्वे गच्छन्तु युद्धाय त्वरितं मम शासनात् ॥ ७७ ॥ ये न गच्छन्ति युद्धाय भीरवः[3] प्राणविप्लवात्[2] ॥ तान्हनिष्याम्यहं सर्वान्मच्छासनपराङ्मुखान् ॥ ७८ ॥

(पू.) भैरवं[1] नादं ॥ (मू.) – ॥७५॥ 'देवनिर्मितः (पू.) राघवः प्राप्तः. ॥ मम यूथपाः समरे तं (मू.). ॥ ७६ ॥ (पू.), ते च (मू.) त्वरितं युद्धाय गच्छन्तु. ॥ ७७ ॥ (पू.) ये भीरवः युद्धाय न गच्छन्ति, ॥ अहं (मू.) हनिष्यामि. ' ॥ ७८ ॥

१ भयंकर. २ प्राणनाशास्तव. ३ भित्रे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ती आज्ञा ऐकिल्यावर, सगळे युद्धनिपुण[1] राक्षस भयभीत होऊन युद्धाला निघाले : अतिकाय, प्रहस्त, महानाद, महोदर, ॥७९॥ देवशत्रु, निकुंभ, देवांतक, नरांतक, व दुसरेही सगळे बलाढ्य राक्षस वानरांशीं युद्ध करण्याकरितां निघाले. ॥८०॥ हे व दुसरेही पुष्कळ शेंकडों हजारों शूर राक्षस वानरसैन्यांत शिरून त्या सैन्याची दाणादाण करीत सुटले. राक्षसांना आपल्या शक्तीचा मोठा अभिमान असे. ॥८१॥ त्यांनीं भुशुंडि, भिंदिपाल, बाण, खड्ग, कुऱ्हाडी, ह्या व दुसऱ्याही विविध अस्त्रांचे वानरसेनापतींवर प्रहार चालविले. ॥८२॥ ते वानरही पर्वतांचीं शिखरें, नखें, दाढा, बुक्के ह्या शस्त्रांचे प्रहार करून सर्व राक्षससेनापतींचे प्राण

तच्छ्रुत्वा भयसंत्रस्ता निर्जग्मू[2] रणकोविदाः ॥ अतिकायः प्रहस्तश्च महानादमहोदरौ ॥ ७९ ॥ देवशत्रुर्निकुम्भश्च देवान्तकनरान्तकौ ॥ अपरे बलिनः सर्वे ययुर्युद्धाय वानरैः ॥ ८० ॥ एते चान्ये च बहवः शूराः शतसहस्रशः ॥ प्रविश्य वानरं सैन्यं ममन्थु[3]र्बलदर्पिताः॥८१॥ भुशुण्डिभिर्भिन्दिपालैश्च बाणैः खड्गैः परश्वधैः[4] ॥ अन्यैश्च विविधैरस्त्रैर्निजघ्नुर्हरियूथपान् ॥ ८२ ॥ ते पादपैः पर्वताग्रैर्नखदंष्ट्रैश्च मुष्टिभिः ॥ प्राणैर्विमोचयामासुः[5] सर्वराक्षसयूथपान् ॥ ८३ ॥

(पू.) निर्जग्मुः. ॥ (मू.), ॥ ७९ ॥ (मू.) [सह] युद्धाय ययुः. ॥ ८० ॥ (पू.) बलदर्पिताः शूराः वानरं सैन्यं (मू.), ॥ ८१ ॥ (मू.) निजघ्नुः. ॥ ८२ ॥ ते वानराः (पू.) ॥ च सर्वराक्षसयूथपान (मू.). ॥ ८३ ॥

---

१ युद्धांत निपुण. २ बाहेर पडले. ३ मंथन करिते झाले. ४ कुऱ्हाडींनीं. ५ सोडविते झाले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वानरांना शक्ति आली कोठून?

शरीरांतून बाहेर ओढून काढूं लागले। ॥८३॥ कित्येक राक्षस रामानें मारिले, दुसरे सुग्रीवानें मारिले, कांहीं मारुतीनें, कांहीं अंगदानें, कांहीं महाप्रतापी लक्ष्मणानें व बाकीचे दुसऱ्या सेनापतींनीं; एकंदरींत ते सर्व राक्षस मृत्यु पावले। ॥ ८४ ॥ वानरांच्या आंगांत रामाची शक्ति संचरली होती ह्मणून ते बलाढ्य झाले. रामाची शक्ति आंगांत नसती, तर त्यांना इतकी शक्ति आली असती कोठून? ॥८५॥ राम ह्मणजे सर्वशक्तिसंपन्न सर्वरूपी जगत्कर्ता ईश्वर होय. तो नित्य ज्ञानानंदमय असूनही मायेनें मनुष्यरूपाचें अनुकरण करीत राहिला होता ह्मणून युद्धादिलीलारूप माया विस्तृत करीत असे. ॥ ८६ ॥ इति पञ्चमः सर्गः ॥ ५ ॥

रामेण निहताः केचित्सुग्रीवेण तथाऽपरे ॥ हनूमता चांगदेन लक्ष्मणेन महात्मना ॥ यूथपैर्वानराणां ते निहताः सर्वराक्षसाः ॥ ८४ ॥ रामतेजःसमाविश्य वानरा बलिनोऽभवन् ॥ रामशक्तिविहीनानामेवं शक्तिः कुतो भवेत् ॥८५॥ सर्वेश्वरः सर्वमयो विधाता मायामनुष्यत्वविडम्बनेन ॥ सदाचिदानन्दमयोऽपि रामो युद्धादिलीलां वितनोति मायाम् ॥ ८६ ॥ इति श्रीम॰ युद्धकाण्डे पञ्चमः सर्गः ॥ ५ ॥

केचित् (पू.) सुग्रीवेण, ॥ (द्वि.) लक्ष्मणेन च निहताः. ॥ वानराणां (मू.) निहताः. ॥ ८४ ॥ वानराः (मू.) ? ॥८५॥ (मू.) मायामनुष्यत्वविडम्बनेन युद्धादिलीलां मायां वितनोति. ॥८६॥
॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये युद्धकाण्डे पंचमः सर्गः ॥ ५ ॥

१ मारिलेले. २ पावून. ३ विस्तारितो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अतिकाय ज्याचा नायक तें सगळें प्रचंड सैन्य युद्धांत नष्ट झालें, ही वार्ता कानीं आली तेव्हां दुःखामुळें रावणाचें सर्वांग तप्त होऊन गेलें व तो अतिशय क्रुद्ध झाला. ॥ १ ॥ त्या महातेजस्वी राक्षसानें इंद्रजिताला लंकेचें रक्षण करण्यासाठीं मागें ठेवून रामाबरोबर युद्ध करण्यास स्वतां जाण्याची तयारी केली. ॥ २ ॥ तो महाप्रतापी राक्षसेश्वर सर्व शस्त्रास्त्रांनीं भरलेल्या दिव्य रथांत बसून तडक रामाच्या आंगावर चालून गेला. ॥ ३ ॥ त्यानें सर्पांसारखे उग्र बाण सोडून अनेक वानर मारिले व सुग्रीवप्रभृति यूथपतींना भूमीवर पाडिलें. ॥ ४ ॥ इतक्यांत, महाशक्तिमान् विभीषण हातांत गदा घेऊन - राक्ष-

श्रुत्वा युद्धे बलं नष्टमतिकायमुखं महत् ॥ रावणो दुःखसंतप्तः क्रोधेन महता ऽऽवृतः ॥१॥ निधायेन्द्रजितं लंकारक्षणार्थं महाद्युतिः ॥ स्वयं जगाम युद्धाय रामेराक्षसेन्द्रो ... राक्षसः ॥२॥ दिव्यं स्यन्दनमारुह्य सर्वशस्त्रास्त्रसंयुतम् ॥ राममेवाभिदुद्राव[3] मास सुग्रीवप्रमुखान्यूथपान् ...॥३॥ वानरान्बहुशो हत्वा बाणैराशीविषोपमैः ॥ पातया- ...॥गदापाणिं महासत्वं तत्र दृष्ट्वा विभीषणम्॥

रावणः (पू.) बलं नष्टं श्रुत्वा ॥ दुःखसन्तप्तः [सन्] ... राक्षसः (पू.) निधाय, ॥ (मू.) युद्धाय जगाम.. ॥ २ ॥ महाबलैः ...[सन्]. ॥ १ ॥ महाद्युतिः (मू.), ॥ ३ ॥ आशीविषोपमैः बाणैः (मू.) पातयामास. ॥ ४ ॥ तत्र (पू.) दृष्ट्वा, ॥ ...

१ महातेजस्वी. २ ठेवून. ३ आंगावर चालून गेला. ४ ज्यांच्या दाढांत विष असतें त्यांच्या (सर्पाच्या) सारख्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सांबरोबर युद्ध करीत आहे असें - दृष्टीस पडलें; तेव्हां रावणानें विभीषणावर मयासुरानें (स्वतांच्या सास-
ऱ्यानें, मंदोदरीच्या पित्यानें) दिलेली प्रचंड शक्ति सोडिली. ॥ ५ ॥ ती शक्ति विभीषणाचा घात कर-
ण्यासाठीं येत आहे, असें पाहून लक्ष्मणानें विचार केला कीं, विभीषणाला रामानें अभय दिलें आहे, ह्मणून
ह्या दैत्याचा वध होणें योग्य नव्हे; - मजवर ह्या शक्तीचें कांहीं चालणार नाहीं. - ॥६॥ असें आपल्यामनीं
ठरवून, तो प्रतापी लक्ष्मण हातांत भयंकर धनुष्य घेऊन विभीषणापुढें ... सा निश्चळपणें उभा राहिला.
॥ ७ ॥ त्या शक्तीचें सामर्थ्य अमोघ (फुकट ...) होतें; ती लक्ष्मणाच्या आंगावर येऊन पडली.
॥ ८ ॥ मायेपासून उत्पन्न होणाऱ्या जितक्या ... ह्मणून शक्ति जगांत आहेत, तितक्या सगळ्यांचा आधार
महात्मा शेषाचा अंश अर्थात परमेश्वराची विभूति होता. त्याचें ही मायाशक्ति
लक्ष्मण होय; ...

...राज महाशक्तिं मयदत्तां विभीषणे ॥ ५ ॥ तामापतन्तीमालोक्य विभीष-
णविघातिनीम् ॥ दत्ताभयोऽयं रामेण वधार्हो नायमासुरः ॥ ६ ॥ इत्युक्त्वा
लक्ष्मणो भीमं चापमादाय वीर्यवान् ॥ विभीषणस्य पुरतः स्थितोऽकंप[2] इवाच-
लः ॥ ७ ॥ सा शक्तिर्लक्ष्मणतनुं विवेशामोघ[4]शक्तितः ॥ यावन्त्यः शक्तयो लोके
मायायाः संभवन्ति हि ॥ ८ ॥ तासामाधारभूतस्य लक्ष्मणस्य महात्मनः ॥

मयदत्तां (मू.) [1]उत्ससर्ज. ॥ ५ ॥ वीर्यवान् लक्ष्मणः (६ पू.) [शक्तिं] आलोक्य, ॥ ' अयं
रामेण (६ उ.) वधार्हः न, ' ॥(मू.) इव स्थितः. ॥ ६ ॥ ७ ॥ (पू.) [5]लक्ष्मणतनुं विवेश[6]. ॥
हि लोके (मू.) मायायाः सम्भवन्ति, ॥ ८ ॥ (मू.) लक्ष्मणस्य ॥

१ सोडिता झाला. २ निश्चल. ३ पर्वत. ४ निष्फळ न जाणारें सामर्थ्य जिचें अशी असल्यामुळें. ५ लक्ष्मणाच्या शरीरास. ६ शिरली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणार काय? ॥ ९ ॥ तथापि तो स्वतां अंगिकारिलेल्या मनुष्यरूपास अनुकूल असें वर्तन ठेवण्यासाठीं, मूर्छित होऊन भूमीवर पडला. रावण त्याला उचलण्याची खटपट करूं लागला; ॥ १० ॥ हातांनीं किती हिसकाहिसक केली तरी लक्ष्मण किंचित् देखील हालेना, तेव्हां रावणाला पराकाष्ठेचा विस्मय वाटला. (शंकर म्हणाले :- पार्वति !) लक्ष्मण म्हणजे सर्व जगाचें सार होय; विराट् (स्थूल जग) त्याचेंच रूप; तो परमेश्वर ॥ ११ ॥ सर्व लोकांचा आधार असून व्यापक आहे. त्याला तोलणें किंवा उचलणें यःकश्चित् राक्षसाच्या हातून व्हावें कसें? असो. रावणाच्या मनांत लक्ष्मणाला घेऊन जावयाचें आहे, असें मारुतीला दिसून आलें. ॥ १२ ॥ तेव्हां त्यानें संतापून आपल्या वज्रतुल्य मुष्टीच्या योगें रावणाच्या वक्षःस्थलावर

मायाशक्त्या भवेत्किं वा शेषांशस्य हरेस्तनोः ॥९॥ तथापि मानुषं भावमापन्न-स्तदनुव्रतः ॥ मूर्च्छितः पतितो भूमौ तमादातुं दशाननः ॥१०॥ हस्तैस्तोलयितुं[1] शक्तो न बभूवातिविस्मितः ॥ सर्वस्य जगतः सारं विराजं परमेश्वरम् ॥ ११ ॥ कथं लोकाश्रयं विष्णुं तोलयेल्लघुराक्षसः ॥ ग्रहीतुकामं[2] सौमित्रिं रावणं वीक्ष्य मारुतिः ॥ १२ ॥ आजघानोरसि[4] क्रुद्धो वज्रकल्पेन[3] मुष्टिना ॥

(मू.) मायाशक्त्या किं वा भवेत् ? ॥९॥ (पू.) ॥ मूर्छितः [सन्] भूमौ (मू.) तं आदातुं, ॥१०॥ (पू.); [तेन] अतिविस्मितः [आसीत]. ॥ (मू.) ॥ ११ ॥ (पू.) लघुराक्षसः कथं तोलयेत् ? ॥ मारुतिः सौमित्रिं (मू.) वीक्ष्य ॥ १२ ॥ क्रुद्धः [सन] (पू.) उरसि आजघान. ॥

१ उचलण्यास. २ धरण्यास इच्छिणारा. ३ वज्रापेक्षा किंचित् न्यून, अशा. ४ मारिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एकच प्रहार केला. त्याबरोबर रावण गुडघे टेंकून धाडकन भूमीवर पडला! ॥ १३ ॥ तोंडांतून, डोळ्यांतून व नाकांवाटे भडभडां रक्त वाहूं लागलें! डोळे पांढरे झाले! कसें बसें करून एकदांचा तो रथाच्या पाठीमागें जाऊन चढून बसला! ॥ १४ ॥ इकडे मारुति, रावणानें घायाळ करून सोडिलेल्या लक्ष्मणाला बाहूंनीं कवटाळून उचलून, रामाजवळ घेऊन आला. ॥ १५ ॥ तो जन्मरहित स्वयंप्रकाश परमेश्वर (लक्ष्मण) सर्व जड पदार्थांपेक्षां अतिशय जड (वजनदार) होता खरा; परंतु मारुतीच्या प्रेमामुळें व भक्तिस्तव लघु (हलका) झाला (त्याला उचलतांना मारुतीला आयास मुळींच पडला नाहीं). ॥ १६ ॥ लक्ष्मणाला लागलेल्या शक्तीलाही कळून आलें कीं, हा (लक्ष्मण) नारायणाचा अंशावतार आहे; ह्मणून ती लक्ष्म-

तेन मुष्टिप्रहारेण जानुभ्या[1]मपतद्भुवि ॥ १३ ॥ आस्यैश्च नेत्रश्रवणैरुद्वमन् रुधिरं बहु ॥ विघूर्णमाननयनो रथोपस्थ[2] उपाविशत्[3] ॥ १४ ॥ अथ लक्ष्मणमादाय हनूमान् रावणार्दितम् ॥ आनयद्रामसामीप्यं बाहुभ्यां परिगृह्य तम् ॥ १५ ॥ हनूमतः सुहृत्त्वेन भक्त्या च परमेश्वरः ॥ लघुत्व[5]मगम[6]द्देवो गुरूणां[4] गुरुरप्यजः ॥ १६ ॥ सा शक्तिरपि तं त्यक्त्वा ज्ञात्वा नारायणांशजम् ॥

(मू.) अपतत्, ॥ १३ ॥ (पू.) च बहु रुधिरं उद्वमन ॥ विघूर्णमाननयनः [सन्] (मू.). ॥१४॥ (पू.) लक्ष्मणं आदाय, ॥ (मू.) [च] तं रामसामीप्यं आनयत्. ॥ १५ ॥ देवः गुरूणां गुरुः अपि अजः परमेश्वरः (मू.). ॥ १६ ॥ (पू.) ज्ञात्वा, त्यक्त्वा, ॥

१ गुडघ्यांच्या योगें. २ रथाच्या मागील बाजूस. ३ बसला. ४ जड पदार्थांत. ५ हलकेपणास. ६ अगमत् पावला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णाला सोडून रावणाच्या रथाकडे परत गेली. पुढें रावणही हळूहळू ॥ १७ ॥ शुद्धीवर आला. - शूरच तो ! जरा अवसान आल्याबरोबर - लागलाच क्रोधानें धनुष्य हातीं घेऊन तडक रामाच्या आंगावर चालून गेला. त्याला पाहतांच रामही क्रुद्ध झाला. ॥ १८ ॥ रावण रथांत बसला आहे असें पाहून, जगत्प्रभु रामचंद्र तत्क्षणीं महापराक्रमी हनुमंताच्या खांद्यावर बसला आणि रावणासमोर येऊन उभा राहिला. ॥ १९ ॥ रामानें विजेच्या कडकडाटाप्रमाणें कठोर असा आपल्या धनुष्याच्या दोरीचा तीव्र टणत्कार केला, आणि गंभीर वाणीनें राक्षसाधिपतीला ह्मटलें :- ॥ २० ॥ 'हे राक्षसाधमा ! उभा राहा ! माझी सर्वत्र समदृष्टि असते (मी कोणाशीं द्वेष करीत नाहीं); असें अस-

रावणस्य रथं प्रागाद्रावणोऽपि शनैस्ततः ॥ १७॥ संज्ञामवाप्य जग्राह बाणासनमथो रुषा ॥ राममेवाभिदुद्राव दृष्ट्वा रामोऽपि तं क्रुधा ॥ १८ ॥ आरुह्य जगतां नाथो हनूमन्तं महाबलम् ॥ रथस्थं रावणं दृष्ट्वा अभिदुद्राव राघवः ॥ १९ ॥ ज्याशब्दमकरोत्तीव्रं वज्रनिष्पेषनिष्ठुरम् ॥ रामो गम्भीरया वाचा राक्षसेन्द्रमुवाच ह ॥ २० ॥ राक्षसाधम तिष्ठाद्य क्व गमिष्यसि मे पुरः ॥

(मू.) रावणः अपि शनैः ॥१७॥ (पू.) बाणासनं जग्राह, ॥ (मू.) दृष्ट्वा क्रुधा [अभिदुद्राव]. ॥ १८ ॥ जगतां नाथः राघवः रावणं रथस्थं दृष्ट्वा, महाबलं हनूमन्तं (मू.), ॥ १९ ॥ (पू.) ज्याशब्दं अकरोत्. ॥ (मू.) - ॥ २० ॥ '(पू.) तिष्ठ.

---

१ गेली. २शुद्धीस. ३पावून. ४धनुष्य. ५घेता झाला. ६विजेच्या घर्षणा(कडकडाटा)प्रमाणें कठोर. ७धनुष्याच्या दोरीच्या टणत्काराला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तांना तूं माझा असह्य अपराध केलास ! आतां आज माझ्या पुढून जाशील कोठें ? ॥ २१ ॥ ज्या बाणानें जनस्थानीं तुझ्या राक्षसांचा घात केला, त्याच्याच योगें आज मी तुझा वध करितों ! मजसमोर उभा राहा !' ॥ २२ ॥ श्रीरामचंद्राचें भाषण ऐकिल्यावर रावणानें, युद्धांत रामाला खांद्यावर वाहणाऱ्या मारुतीला तीक्ष्ण बाण मारिले. ॥ २३ ॥ तीव्र बाणांचे प्रहार लागले तरी वायुपुत्राचें तेज स्वतांच्या प्रभावानें उत्तरोत्तर वृद्धिंगतच होत चाललें. त्या महावानरानें मोठी गर्जना केली. ॥ २४ ॥ हनुमंताच्या शरीरावर व्रण झाले असें दृष्टीस पडल्याबरोबर रघुवीरानें क्रोधाचा इतका आवेश आणिला कीं त्यावेळीं, तो दुसरा प्रलयकालचा रुद्रच आहे कीं काय, असें

कृत्वा ऽपराधमेवं मे सर्वत्र समदर्शिनः ॥ २१ ॥ येन बाणेन निहता राक्षसास्ते जनालये[1] ॥ तेनैव त्वां हनिष्यामि तिष्ठाद्य मम गोचरे[2] ॥ २२ ॥ श्रीरामस्य वचः श्रुत्वा रावणो मारुतात्मजम् ॥ वहन्तं राघवं संख्ये[3] शरैस्तीक्ष्णैरताडयत् ॥ २३ ॥ हतस्यापि शरैस्तीक्ष्णैर्वायुसूनोः स्वतेजसा ॥ व्यवर्धत[5] पुनस्तेजो ननर्द[6] च महाकपिः ॥ २४ ॥ ततो दृष्ट्वा[4] हनूमन्तं सव्रणं रघुसत्तमः ॥

(मू.) मे एवं अपराधं कृत्वा क्व गमिष्यसि ? ॥२१॥ (पू.) राक्षसाः निहताः, ॥ (मू.) तिष्ठ.' ॥ २२ ॥ रावणः (पू.), संख्ये[3] राघवं वहन्तं[4] मारुतात्मजं तीक्ष्णैः (मू.). ॥ २३ ॥ तीक्ष्णैः शरैः (पू.) तेजः पुनः स्वतेजसा (मू.) ननर्द[6] च. ॥ २४ ॥ ततः रघुसत्तमः (पू.) दृष्ट्वा, ॥

१ जनस्थानीं (पंचवटीजवळ). २ दृष्टासमोर. ३ युद्धांत. ४ वाहणाऱ्या. ५ वाढत चाललें. ६ गर्जना करूं लागला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भासूं लागलें ! ॥ २९ ॥ त्यानें तीक्ष्ण बाण मारून रावणाचा रथ, घोडे, ध्वज, सारथि, शस्त्रसमूह, धनुष्य, छत्र, पताका, सगळें साहित्य क्षणमात्रांत सहज तोडून टाकिलें ! ॥२६॥ पुढें, जसें पूर्वी इंद्रानें पर्वतावर वज्र सोडिलें त्याप्रमाणें, रघुवीरानें तत्काल एक वज्रतुल्य प्रचंड बाण रावणाला मारिला. ॥ २७ ॥ रामबाणाच्या प्रहाराबरोबर त्या वीराचें शरीर थरथर कांपूं लागलें, त्याला मूर्छा आली, व धनुष्य तर हातांतून गळून पडलें ! ती त्याची अवस्था दृष्टीस पडल्यावर रघुवीरानें ॥ २८ ॥ एक अर्धचंद्राकृति बाण मारून त्याचा सूर्यासारखा तेजस्वी मुकुट तोडिला, - आणि त्याला सांगितलें : - ‘ रावणा ! जा. सध्यां तूं

क्रोधमा[1]हारयामास कालरुद्र इवापरः ॥२५॥ साश्वं रथं ध्वजं सूतं शस्त्रौघं धनुरञ्जसा ॥ छत्रं पताकां तरसा चिच्छेद शितसायकैः ॥ २६ ॥ ततो महाशरेणाशु रावणं रघुसत्तमः ॥ विव्याध वज्रकल्पेन पाकारिरिव पर्वतम् ॥ २७ ॥ रामबाणहतो वीरश्चचाल च मुमोह च ॥ हस्तान्निपतितश्चापस्तं समीक्ष्य रघूत्तमः॥२८॥ अर्धचन्द्रेण चिच्छेद तत्किरीटं रविप्रभम् ॥

अपरः कालरुद्रः इव, (मू.), ॥ २५ ॥ (मू.) च शितसायकैः[2], अंजसा[3], तरसा[4] चिच्छेद[5]. ॥२६॥ ततः रघुसत्तमः वज्रकल्पेन[6] (मू.) इव विव्याध[8]. ॥ २७ ॥ (मू.) निपतितः च ! रघूत्तमः तं समीक्ष्य, ॥ २८ ॥ (पू.) तत्किरीटं चिच्छेद, [उवाच – च] ॥

१ स्वीकारिता झाला. २ तीक्ष्ण बाणांच्या योगें. ३ सहज. ४ वेगानें. ५ तोडिता झाला. ६ वज्रतुल्य. ७ पाक दैत्याचा शत्रु (इंद्र). ८ प्रहार करिता झाला. ९ कांपला. १० मूर्छा पावला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'रावणा! आज दमलास. आतां उद्यां ये.'

बाण लागून घायाळ झाला आहेस; मी तुला जाण्यास अनुज्ञा देतों. ॥ २९ ॥ लंकेंत जा. आजचा दिवस विश्रांति घेऊन स्वस्थ हो. मग उद्यां, माझें सामर्थ्य कसें काय आहे, तें तुला पाहतां येईल.' रामाच्या बाणाचा चांगलाच प्रहार लागून गर्व उतरला, तेव्हां रावण ॥३०॥ व्याकुळ व अत्यंत लज्जित होऊन लंकेंत गेला. इकडे रामही, लक्ष्मण भूमीवर निश्चेष्ट पडला आहे, असें पाहून ॥ ३१ ॥ शोक करूं लागला. मनुष्यपणा स्वीकारिला असल्यामुळें त्याला ही लीला करणें भाग पडलें. कांहीं वेळानें तो मारुतीला ह्मणाला :– 'वत्सा! पूर्वीप्रमाणें त्या दिव्य ओषधि आणून लक्ष्मणाला आणि वानरांनाही जीवंत कर.' रामानें अशी

अनुजानामि गच्छ त्वमिदानीं बाणपीडितः ॥ २९ ॥ प्रविश्य लंकामाश्वास्य[1] श्वः पश्यसि बलं मम ॥ रामबाणेन संविद्धो[3] हतदर्पो[4] ऽथ रावणः ॥३०॥ महत्या लज्जया युक्तो लंकां प्राविशदातुरः ॥ रामो ऽपि लक्ष्मणं दृष्ट्वा मूर्छितं पतितं भुवि ॥ ३१ ॥ मानुषत्वमुपाश्रित्य लीलया ऽनुशुशोच ह ॥ ततः प्राह हनूमन्तं वत्स जीवय लक्ष्मणम् ॥ ३२॥ महौषधीः समानीय पूर्ववद्वानरानपि ॥ तथेति राघवेणोक्तो जगामाशु महाकपिः ॥ ३३ ॥

'(मू.) गच्छ. ॥ २९ ॥ लङ्कां (पू.) बलं पश्यासि!' ॥ अथ (मू.) ॥३०॥ (पू.) [सन्] लङ्कां प्राविशत्. ॥ (मू.) पतितं [च] दृष्ट्वा, ॥ ३१ ॥ (मू.) प्राह – 'वत्स, लक्ष्मणं जीवय. ॥ ३२ ॥ (३३ पू) [जीवय].' ॥ (३३ उ.)

१ स्वस्थ होऊन. २ उद्यां. ३ ताडिलेला. ४ नाहींसा झाला गर्व ज्याचा, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आज्ञा दिल्याबरोबर तो महावानर ' ठीक आहे ' असें ह्मणून निघाला. ॥ ३२ ॥ ३३ ॥ मारुति वायूसारख्या वेगानें क्षणमात्रांत महासागर उल्लंघून पलिकडे गेला. इतक्यांत ती वार्ता हेरांनीं रावणाला कळविली: - ते ह्मणाले :- ॥ ३४ ॥ ' महाराज! रामानें लक्ष्मणाला जिवंत करण्यासाठीं दिव्य ओषधि आणण्याकारितां मारुतीला पाठविलें; त्याप्रमाणें तो क्षीरसमुद्राकडे गेला! ' ॥ ३५ ॥ तें दूतांचें भाषण ऐकिल्याबरोबर राजाला पराकाष्ठेची चिंता उद्भवली; तो तशा रात्रीच्या वेळीं एकाकी निघून क्षणमात्रांत कालनेमीच्या घरीं गेला. ॥ ३६ ॥ रावण आपल्या घरीं आला असें पाहून कालनेमीला विस्मय वाटला. त्यानें आगो-

हनूमान्वायुवेगेन क्षणात्तीर्त्वा महोदधिम् ॥ एतस्मिन्नन्तरे चारा रावणाय न्यवेदयन् ॥ ३४ ॥ रामेण प्रेषितो देव हनूमान् क्षीरसागरम् ॥ गतो नेतुं लक्ष्मणस्य जीवनार्थं महौषधीः ॥३५॥ श्रुत्वा तच्चारवचनं राजा चिन्तापरोऽभवत् ॥ जगाम रात्रावेकाकी कालनेमिगृहं क्षणात् ॥ ३६ ॥ गृहागतं समालोक्य रावणं विस्मयान्वितः ॥ कालनेमिरुवाचेदं प्राञ्जलिर्भयविह्वलः ॥ अर्घ्यादिकं ततः कृत्वा रावणस्याग्रतः स्थितः ॥ ३७ ॥

हनूमान् तथा इति [उक्त्वा], (३४ पू.) तीर्त्वा आशु जगाम. (मू.) – ॥ ३३ ॥ ३४ ॥ ' देव, (मू.) नेतुं क्षीरसागरं गतः. ' ॥ ३५ ॥ राजा तच्चारवचनं (मू.) जगाम. ॥ ३६ ॥ रावणं (मू.) ततः रावणस्य अग्रतः स्थितः कालनेमिः प्राञ्जलिः [सन्] इदं उवाच – ॥ ३७ ॥

१ तरून. २ दूत. ३ कळविते झाले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

‘ उजाडेपर्यंत त्याला इकडे येऊं देऊं नको.’

दर रावणाला अर्घ्यादिक पूजोपचार अर्पण केले, आणि नंतर भीतीमुळें कांपत कांपत पुढें उभा राहून व हात जोडून त्याला ह्मटलें.:- ॥ ३७ ॥ ‘ राजाधिराजा! मी आपली कोणती सेवा करावी? आपण इकडे कोणत्या उद्देशास्तव येणें केलें ? ’ रावण दुःखानें अगदीं त्रासून गेला होता; त्यानें कालनेमीला उत्तर दिलें:- ॥ ३८ ॥ ‘ बा ! कालचक्राच्या गर्तानें मजवरही हें संकट येऊन कोसळलें आहे ! मी मारलेल्या शक्तीचा प्रहार लागून वीर लक्ष्मण भूमीवर पडला. ॥ ३९ ॥ त्याला जिवंत करण्यासाठीं ओषधि आणण्याकरितां मारुति गेला आहे. - ह्या वेळीं माझें तुला एवढेंच सांगणें आहे कीं, - मारुतीला जेणें करून विघ्न होईल, अशी कांहीं तजवीज कर. तूं मोठा बुद्धिमान् आहेस; - तुझ्या हातून हें काम निःसंशय पार पडेल. - ॥ ४० ॥ तूं कपटानें मुनिवेष धारण करून त्या प्रबल वानराला फसव आणि उद्यां उजाडेपर्यंत त्याचा वेळ

किं ते करोमि राजेन्द्र किमागमनकारणम् ॥ कालनेमिमुवाचेदं रावणो दुःख-
पीडितः ॥ ३८ ॥ ममापि कालवशतः कष्टमेतदुपस्थितम् ॥ मया शक्त्या हतो
वीरो लक्ष्मणः पतितो भुवि ॥ ३९ ॥ तं जीवयितुमानेतुमोषधीर्हनुमान् गतः ॥
यथा तस्य भवेद्विघ्नं तथा कुरु महामते ॥ ४० ॥ मायया मुनिवेषेण मोहयस्व
महाकपिम् ॥ कालात्ययो यथा भूयात्तथा कृत्वैहि मन्दिरे ॥ ४१ ॥

‘ राजेन्द्र, ते (पू.) किं ? ’॥ दुःखपीडितः रावणः (मू) उवाच – ॥ ३८ ॥ ‘ (पू.) कष्टं उपस्थितं ! ॥ (मू.) पतितः. ॥३९॥ (पू.) आनेतुं हनुमान् गतः. ॥ महामते, (मू.) भवेत्, तथा कुरु. ॥ ४० ॥ (पू.) मोहयस्व. ॥ (मू.) ऐहि.’ ॥ ४१ ॥

१ वेळ घालविणें (विलंब लागणें). २ ये.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तिकडे मोडेल अशी व्यवस्था करून नंतर आपल्या मंदिरांत परत ये. ' ॥ ४१ ॥ रावणाचें भाषग ऐकिल्यावर कालनेमि त्याला ह्मणाला :– " राजा रावणा ! मी आतां काय सांगतों, तें ऐक व खरें समजून नीट लक्ष्यांत वागव. ॥ ४२ ॥ तुझ्या मनाला प्रिय वाटेल ती गोष्ट मी करणारच; - पण तसें केलें असतांमाझे प्राण राहणार नाहींत ! पूर्वी मारीच दैत्य हरणाचें रूप घेऊन अरण्यांत गेला होता, त्याची जशी अवस्था झाली, ॥ ४३ ॥ तशीच माझी होणार, ह्यांत संदेह नाहीं ! ! रावगा ! तुझे पुत्र, पौत्र, बांधव वगैरे सर्व राक्षस मरण पावले ! ॥४४॥ अशा रीतीनें राक्षसकुळाचा नाश करविल्यावर तुला जगून तरी काय करावयाचें आहे ? राज्य, सीता किंवा हा जडस्वरूपी देह ह्या सगळ्याचा तुला उपयोग कोणता ? ॥ ४५ ॥

रावणस्य वचः श्रुत्वा कालनेमिरुवाच तम् ॥ रावणेश वचो मे ऽद्य शृणु धारय[1]
तत्त्वतः ॥ ४२ ॥ प्रियं ते करवाण्येव न प्राणान् धारयाम्यहम्[2] ॥ मारीचस्य यथा
ऽरण्ये पुरा ऽभून्मृगरूपिणः ॥ ४३ ॥ तथैव मे न संदेहो भविष्यति दशानन ॥
हताः पुत्राश्च पौत्राश्च बान्धवा राक्षसाश्च ते ॥ ४४ ॥ घातयित्वा ऽसुरकुलं जीवितेनापि किं तव ॥ राज्येन वा सीतया वा किं देहेन जडात्मना[3] ॥ ४५ ॥

कालनेमिः (पू.) उवाच – ॥ 'ईश रावण, अद्य मे (मू.) तत्त्वतः धारय. ॥४२॥ अहं ते (पू.) न धारयामि. ॥ यथा पुरा (मू.) मारीचस्य अभूत्, ॥ ४३ ॥ दशानन, (पू.) संदेहः न. ॥ ते (मू.) च हताः. ॥ ४४ ॥ असुरकुलं (पू.) किं ? ॥ (मू.) देहेन वा किं ? ॥ ४५ ॥

१ लक्ष्यांत घे. २ मारवून. ३ मृत्तिकारूपी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुझे बाहु प्रचंड आहेत; - तूं प्रतापी वीर आहेस; सर्व खरें; पण शक्तीचा उपयोग असा करावयाचा काय? ह्मणून, मी तुला सांगतों कीं, - सीता रामाच्या स्वाधीन कर, राज्य विभीषणाला दे, आणि तूं खुशाल, जेथं ऋषिगण राहतात, त्या रमणीय अरण्यांत जाऊन राहा. ॥ ४६ ॥ तेथें त्वां प्रातःकाळीं पवित्र उदकांत स्नान करावें, संध्यादिक कर्में आचरावीं, आणि एकांतीं पद्मासनादि सुखावह आसनें घालून बसावें. ॥ ४७ ॥ राजा! बाह्य सर्व विषयांवरील आसक्ति सोडून दे. इंद्रियसमूह बाहेर विषयांकडे ओढ घेत असतो, त्याला हळूहळू अंतर्मुख करून आत्मस्वरूपाकडे लाव. ॥ ४८ ॥ हे पुण्यपुरुषा! आत्मा प्रकृतीहून भिन्न आहे असा नित्य विचार करीत राहा. देह, बुद्धि, इंद्रियें इत्यादि स्थावर

सीतां प्रयच्छ रामाय राज्यं देहि विभीषणे ॥ वनं याहि महाबाहो रम्यं मुनिगणाश्रयम् ॥ ४६ ॥ स्नात्वा प्रातः शुभजले कृत्वा सन्ध्यादिकाः क्रियाः ॥ तत एकान्तमाश्रित्य सुखासनपरिग्रहः ॥ ४७ ॥ विसृज्य सर्वतः संगमितरान्विषयान्बहिः ॥ बहिः[1]प्रवृत्ताक्षगणं शनैः [2]प्रत्यक् [3]प्रवाहय ॥ ४८ ॥ प्रकृतेर्भिन्नमात्मानं विचारय सदाऽनघ ॥ चराचरं जगत्कृत्स्नं देहबुद्धीन्द्रियादिकम् ॥ ४९ ॥

रामाय (पू.) राज्यं देहि. ॥ (मू.) वनं याहि. ॥४६॥ प्रातः शुभजले (पू.) कृत्वा ॥ (मू.) [सन्] ॥४७॥ (पू.) विषयान् च विसृज्य, ॥ (मू.), ॥४८॥ अनघ, (पू.) विचारय. ॥ (मू.) जगत् ॥४९॥

१ बाहेर चालू असलेल्या इंद्रियसमूहास. २ आंत (आत्म्याकडे). ३ वळव.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जंगम सर्व जग ॥ ४९ ॥ —— म्हणजे ब्रह्मदेवापासून अतिसूक्ष्म कीटकापर्यंत जें कांहीं दिसतें व ऐकून ठाऊक आहे तें सर्व—ती प्रकृति होय. तिलाच कोणी 'माया' असें म्हणत असतात. ॥ ५० ॥ जगद्रूपी वृक्षाचे उत्पत्तिस्थितिसंहार होण्याला कारण तीच (प्रकृति) होय. ती - त्रिगुणात्मक असल्यामुळें स्वतांच्या गुणांना अनुरूप अशा - रक्त (तांबड्या, राजस), श्वेत (पांढऱ्या, सात्विक) व कृष्ण (काळ्या, तामस) इत्यादि वर्णांच्या प्रजा नित्य उत्पन्न करीत असते. ॥ ५१ ॥ तिला काम, क्रोध इत्यादि पुत्र आणि हिंसा, तृष्णा वगैरे कन्या होतात. आत्मा (जीव) मूळचा विभु (व्यापक) व ज्ञानरूप आहे; पण प्रकृति अशी सृष्टि करून स्वतां उत्पन्न केलेल्या त्या पदार्थांच्या योगें त्या आत्म्याला नित्य मोहित करिते (त्या पदार्थांवर 'मी' व 'माझे' अशी बुद्धि ठेवायाला लाविते), ॥५२॥ समर्थ आत्म्यावर कर्तृत्वभोक्-

आब्रह्मस्तम्बपर्यन्तं दृश्यते श्रूयते च यत् ॥ सैषा प्रकृतिरित्युक्ता सैव मायेति कीर्तिता ॥५०॥ सर्गस्थितिविनाशानां जगद्वृक्षस्य कारणम् ॥ लोहितश्वेतकृष्णादिप्रजाः सृजति सर्वदा ॥ ५१ ॥ कामक्रोधादिपुत्राद्यान्हिंसातृष्णादिकन्यकाः ॥ मोहयत्यनिशं देवमात्मानं स्वैर्गुणैर्विभुम् ॥ ५२ ॥ कर्तृत्वभोक्तृत्वमुखान् स्वगुणानात्मनीश्वरे ॥ आरोप्य स्ववशं कृत्वा तेन क्रीडति सर्वदा ॥ ५३ ॥

यत् (मू.). ॥ ५० ॥ [सा एव] जगद्वृक्षस्य (मू.) सृजति, ॥ ५१ ॥ (पू.) [च सृजति], ॥ (मू.) देवं स्वैः गुणैः मोहयति. ॥ ५२ ॥ (मू.) क्रीडति. ॥ ५३ ॥

१ ब्रह्मदेवापासून अतिसूक्ष्म कीटकापर्यंत. २ दिसतें. ३ ऐकूं येतें. ४ जगद्रूपी वृक्षाच्या. ५ वर लादून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्वादि स्वतांचे गुण आरोपून त्याला आपल्या अधीन करून घेते आणि मग त्याच्याबरोबर सर्वकाळ क्रीडा
करीत राहते. ॥ ५३ ॥ आत्मा वस्तुतः शुद्ध (दर्शनादिविकाररहित) आहे, परंतु तिचा समागम घडला कीं
स्वस्वरूप विसरून जातो व मायेच्या गुणांनीं मोहित होत्साता जसा कांहीं बाह्य विषय पाहूं (भोगूं) लागतो.
॥ ५४ ॥ पुढें, ज्याला 'मी ज्ञानरूप आहें' असें ज्ञान असतें, त्या सद्गुरूची गांठ पडली व त्यानें उप-
देश केला कीं, ह्याची दृष्टि विषयांपासून पराङ्मुख होते; मग ह्याला शुद्धबुद्धमुक्त अशा आत्मरूपाचें स्पष्ट
दर्शन होऊं लागतेंच. ॥ ५५ ॥ प्राण्याला तसा गुरूपदेश मिळाला व तत्त्वचिंतनाची संवय झाली, कीं तो
जीवन्मुक्त होतो . ह्मणजे प्रकृतीच्या सुखदुःखादि गुणत्रयाहांतून सुटतो. ह्मणून, रावणा! तूंही स्वतांचीं
इंद्रियें स्वाधीन ठेवून अशा प्रकारें आत्मविचार करूं लाग; ॥ ५६ ॥ ह्मणजे लवकरच तुला, आत्मा

शुद्धोऽप्यात्मा यया युक्तः पश्यतीव सदा बहिः॥विस्मृत्य च स्वमात्मानं माया-
गुणविमोहितः ॥ ५४ ॥ यदा सद्गुरुणा युक्तो बोध्यते[1] बोधरूपिणा ॥ निवृत्तदृ-
ष्टिरात्मानं पश्यत्येव सदा स्फुटम् ॥५५॥ जीवन्मुक्तः सदा देही मुच्यते प्राकृतै-
र्गुणैः ॥ त्वमप्येवं सदाऽऽत्मानं विचार्य नियतेन्द्रियः ॥ ५६ ॥ प्रकृतेरन्यमा-
त्मानं ज्ञात्वा मुक्तो भविष्यसि ॥ ध्यातुं यद्यसमर्थोऽसि सगुणं देवमाश्रय ॥५७॥

(पू.) पश्यति इव. ॥ स्वात्मानं (मू.) [भवति]. ॥५४॥ युक्तः यदा बोधरूपिणा (पू.), ॥ [तदा]
निवृत्तदृष्टिः[2] [सन्] सदा स्फुटं (मू.). ॥ ५५ ॥ (पू.) सदा मुच्यते. ॥ त्वं अपि एवं नियते-
न्द्रियः[3] [सन्] (मू.) ॥ ५६ ॥ (पू.). ॥ यदि (मू.) [तर्हि] सगुणं देवं आश्रय. ॥ ५७ ॥

१ उपदेश केला जातो. २ परतली बुद्धि ज्याची, असा. ३ स्वाधीन करून घेतलीं इंद्रियें ज्यानें, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रकृतीहून वेगळा आहे, असें ज्ञान ठसून मुक्ति मिळेल. मी सांगतों असें ध्यान करतां येगें अशक्य वाटत असेल तर, देवाच्या सगुण रूपाचा आश्रय धर. ॥ ९७ ॥ हृदयकमलाच्या कर्णिकेंत (गाभ्यांत) रत्नपुंजांनीं खचलेल्या मृदु व तुळतुळीतशा सुवर्णसिंहासनावर रामचंद्र जानकीसह बसला आहे; ॥ ९८ ॥ त्यानें वीरासन घातलें आहे; त्याचे नेत्र विशाल असून वस्त्र विद्युल्लतेच्या पुंजासारखें आहे; किरीट, हार, बाहुभूषणें, कौस्तुभ इत्यादि अलंकार शरीरावर जागच्या जागीं दिसत आहेत; ॥ ९९ ॥ पैंजणें, कडीं व वनमाळा ह्यांच्या योगें त्याची मूर्ति विशेष खुलत आहे; लक्ष्मण हातांत दोन धनुष्यें (एक स्वतांचें व दुसरें रामाचें) घेऊन सेवेसाठीं जवळ उभा आहे. ॥ ६० ॥ जो पुरुष सर्वांतर्यामी आत्मरूपी रामचंद्राचें

हृत्पद्मकर्णिके[1] स्वर्णपीठे मणिगणान्विते ॥ मृदु[2]श्लक्ष्णतरे तत्र जानक्या सह संस्थितम् ॥ ५८ ॥ वीरासनं[4] विशालाक्षं[5] विद्युत्पुञ्जनिभाम्बरम्[6] ॥ किरीटहारकेयूरकौस्तुभादिभिरन्वितम् ॥ ५९ ॥ नूपुरैः कटकैर्भान्तं[7] तथैव वनमालया ॥ लक्ष्मणेन धनुर्द्वन्द्वकरेण[8] परिसेवितम् ॥ ६० ॥ एवं ध्यात्वा सदाऽऽत्मानं रामं सर्वहृदि स्थितम् ॥

(मू.) स्वर्णपीठे जानक्या सह संस्थितं ॥ ५८ ॥ (मू.) ॥५९॥ (पू.) ॥ धनुर्द्वन्द्वकरेण (मू.) ॥ ६० ॥ (पू.) रामं सदा एवं ध्यात्वा, ॥

---

१ हृदयरूप कमलाच्या कर्णिकेंत (गाभ्यांत). २ फार मृदु व स्निग्ध अशा. ३ सुवर्णाच्या सिंहासनीं. ४ वीरासारखें आसन घालून बसलेल्या. ५ विशाल नेत्र ज्याचे, अशा. ६ विजेच्या राशीसारखें वस्त्र ज्याचें, अशा. ७ शोभत असलेल्या. ८ धनुष्याची जोडी (एक रामाचें व एक स्वतांचें) हातांत ज्याच्या, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भक्तीनें पापें जळून जातात.

अशा प्रकारें नित्य ध्यान करितो. त्याची रामावर अत्युत्तम भक्ति जडते, आणि तो मुक्त होतो, ह्यांत संदेह नाहीं. ॥ ६१ ॥ रावणा! भक्तजन त्याचीं चरित्रें गात असतात : तूं दुसरेकडे मन जाऊं न देतां तीं आख्यानें निरंतर ऐकत जा. असें केलेंस ह्मणजे, जरी तूं पूर्वी असंख्य महापातकें केलीं आहेस, तरी जसा अग्नि लागल्याबरोबर कापसाच्या मोठाल्या राशि जळून जातात, त्याप्रमाणें तीं तुझीं पापें क्षणमात्रांत नष्ट होतील. ॥ ६२ ॥ राम हा परिपूर्ण एक पुराण पुरुष होय. त्याला नांवें व रूपें नाहींत. योगी लोक त्याचें सत्तारूपानें (तो शुद्धबुद्धमुक्तस्वभाव होय, अशा भावनेनें) निरंतर हृदयांत चिंतन करितात. तूं वैर सोडून व निश्चल भक्ति स्वीकारून रामाची सेवा करीत जा. " ॥ ६३ ॥ इति षष्ठः सर्गः ॥ ६ ॥

कालनेमीचें भाषण अमृतासारखें - मधुर व हितकर होतें खरें, परंतु रावणाला गोड लागलें नाहीं. -

भक्त्या परमया युक्तो मुच्यते नात्र संशयः ॥६१॥ शृणु वै चरितं तस्य भक्तैर्नित्यमनन्यधीः॥एवं चेत्कृतपूर्वाणि पापानि च महान्त्यपि ॥ क्षणादेव विनश्यन्ति यथा ऽग्नेस्तूलराशयः ॥ ६२ ॥ भजस्व रामं परिपूर्णमेकं विहाय वैरं निजभक्तियुक्तः ॥ हृदा सदा भावितभावरूपमनामरूपं पुरुषं पुराणम् ॥ ६३ ॥ इति युद्धकाण्डे षष्ठःसर्गः ॥ ६ ॥ कालनेमिवचः श्रुत्वा रावणो ऽमृतसन्निभम् ॥

परमया भक्त्या युक्तः [सन्] (मू.) न. ॥६१॥ [त्वं] अनन्यधीः [सन्] तस्य (पू.) शृणु. ॥ (द्वि.) पापानि ॥ (मू.) [तथा] क्षणात् एव विनश्यन्ति. ॥ ६२ ॥ [त्वं] वैरं विहाय निजभक्तियुतः [सन्] (मू.) रामं भजस्व.' ॥ ६३ ॥ इति षष्ठः सर्गः ॥ ६ ॥ (पू.) कालनेमिवचः श्रुत्वा ॥

१ कापसाच्या राशी. २ चिंतिलें सत्तारूप रूप ज्याचें, अशा. ३ ज्याला नामें व रूपें नाहींत अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जसें तापलेलें तूप आंत पाणी टाकलें असतां पेट घेतें, त्याप्रमाणें हें भाषण कानीं पडल्याबरोबर रावणाच्या आंगाची आग झाली. तो क्रोधानें डोळे लाल करून - कालनेमीला ह्मणाला :- ॥१॥'दुष्टा ! माझी आज्ञा मान्य करीत नाहींस त्याअर्थीं मी तुझा आतांच वध करितों. तूं शत्रूकडून कांहीं लांचलुचपत घेऊन रामाचा दास झाला आहेस ह्मणूनच अशीं भाषणें बोलतोस, - ह्यांत संशय नाहीं ! -' ॥ २ ॥ कालनेमीनें रावणाला उत्तर दिलें :– 'महाराज ! व्यर्थ रागावतां कशाला ? माझें बोलणें आपल्याला रुचत नसेल, तर मी जाऊन - आपण सांगतां - तसें करितों.' ॥ ३ ॥ इतकें बोलून तो महादैत्य कालनेमि तेथून लागलाच निघाला. कारण, रावणानें त्याला पुन्हां मारुतीला विघ्न करण्यास जाण्याविषयीं आग्रहाची आज्ञा दिली,

जज्वाल क्रोधताम्राक्षः सर्पिरद्भि[1]रिवाग्निमत्[2] ॥१॥ निहन्मि त्वां दुरात्मानं मच्छासनपराङ्मुखम् ॥ परैः[5] किंचिद्गृहीत्वा[6] त्वं भाषसे रामकिंकरः ॥ २ ॥ कालनेमिरुवाचेदं रावणं देव किं क्रुधा ॥ न रोचते[7] मे वचनं यदि गत्वा करोमि तत् ॥ ३ ॥ इत्युक्त्वा प्रययौ शीघ्रं कालनेमिर्महासुरः ॥ नोदितो रावणेनैव हनुमद्विघ्नकारणात् ॥ ४ ॥

क्रोधताम्राक्षः [सन्] (मू.) सर्पिः[3] इव जज्वाल[4], [आह च –] ॥ १ ॥ '(पू.) त्वां निहन्मि. ॥ त्वं (मू.) [इव] भाषसे.' ॥ २ ॥ (पू.) इदं उवाच – 'देव, क्रुधा किं ? ॥ (मू.) न रोचते, [तर्हि] गत्वा तत् करोमि.' ॥ ३ ॥ (उ.) नोदितः ॥ (पू.) इति उक्त्वा शीघ्रं प्रययौ. ॥ ४ ॥

---

१ अद्भिः उदकाच्या योगें. २ अग्नियुक्त (तापविलेलें). ३ तूप. ४ पेटला. ५ शत्रूंकडून. ६ घेऊन. ७ रुचतें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कालनेमि दीक्षितांचें तपोवन !

तेव्हां त्याचा निरुपाय झाला. ॥ ४ ॥ त्यानें हिमालयाच्या पार्श्वभागीं (उतरणीवर) जाऊन व महात्मा वायुपुत्र मारुति ज्या मार्गानें जावयाचा ती वाट साधून एक तपोवन तयार केलें, आणि स्वतां मुनीचा वेष धारण करून शिष्यसमुदायासह तेथें तळ दिला. त्याच्या अंतरीं दुष्ट हेतु भरला होता. मारुति त्या वाटेनें जाऊं लागला तों हा रम्य आश्रम त्याच्या दृष्टीस पडला. ॥ ५ ॥ ६ ॥ तेव्हां त्या तेजस्वी वायुपुत्राच्या मनांत विचार आला कीं, पूर्वी मी द्रोणपर्वत आणायला गेलों होतों तेव्हां कांहीं हें उत्तम आश्रमस्थान माझ्या पाहण्यांत आलें नव्हतें; ॥ ७ ॥ मग आज काय मी वाट चुकलों किंवा माझ्या चित्ताला कांहीं भ्रम उत्पन्न झाला आहे (आश्रम नसून मला आश्रम भासत आहे) ? अथवा, सध्यां आपण ह्या आश्रमस्थलीं

स गत्वा हिमवत्पार्श्वे तपोवनमकल्पयत् ॥ तत्र शिष्यैः परिवृतो मुनिवेषधरः खलः ॥ ५ ॥ गच्छतो मार्गमासाद्य वायुसूनोर्महात्मनः ॥ ततो गत्वा ददर्शाथ हनूमानाश्रमं शुभम् ॥ ६ ॥ चिन्तयामास मनसा श्रीमान्पवननन्दनः ॥ पुरा न दृष्टमेतन्मे मुनिमण्डलमुत्तमम् ॥ ७ ॥ मार्गो विभ्रंशितो वा मे भ्रमो वा चित्तसंभवः ॥ यद्वा ऽऽविश्याश्रमपदं दृष्ट्वा मुनिमशेषतः ॥ ८ ॥

खलः सः हिमवत्पार्श्वे (५ मू.) [भूत्वा], (६ पू.) वायुसूनोः मार्गं आसाद्य, तत्र तपोवनं अकल्पयत.॥ ततः हनूमान् (मू.) आश्रमं ददर्श. ॥५॥६॥ (पू.) मनसा चिन्तयामास – ॥ '(मू.) एतत् मुनिमण्डलं न दृष्टं. ॥ ७ ॥ मे (पू.) भ्रमः वा ! ॥ यद्वा आश्रमपदं (मू.) दृष्ट्वा, ॥ ८ ॥

१ दुष्ट. २ गांठून. ३ रचिता झाला. ४ चुकला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शिरावें, सगळ्या मुनींचें दर्शन घ्यावें, ॥ ८ ॥ उदक प्राशन करावें, आणि नंतर त्या अत्युत्तम द्रोणपर्वताकडे जावें.' असें आपल्याशींच बोलून मारुति आश्रमांत शिरला. तो आश्रम औरस चौरस चार कोस पर्यंत पसरला होता. ॥ ९ ॥ आंत केळी, शाल, खजुरी, फणस इत्यादि वृक्ष जिकडे तिकडे सारखे लागले असून त्यांच्या फांद्या पिकलेल्या फळांच्या भारानें लवून गेल्या होत्या; ॥ १० ॥ तेथें - सर्प मुंगूस इत्यादि परस्परांचे हाडवैरी प्राणी आपला - वैरभाव सोडून एकत्र क्रीडा करीत असत; जिकडे तिकडे पवित्रपणा व निर्मल लक्षणें दिसत होतीं. अशा त्या विस्तीर्ण रम्य आश्रमामध्यें तो राक्षस कालनेमि ॥ ११ ॥ कपटयोग स्वीकारून शंकराची आराधना करीत बसला होता. मारुति पूज्यबुद्धिपुरःसर त्या महादैत्याला

पीत्वा जलं ततो यामि द्रोणाचलमनुत्तमम् ॥ इत्युक्त्वा प्रविवेशाथ सर्वतो योजनायतम् ॥ ९ ॥ आश्रमं कदलीशालखर्जूरपनसादिभिः ॥ समावृतं पक्वफलैर्नम्रशाखैश्च पादपैः ॥ १० ॥ वैरभावविनिर्मुक्तं शुद्धं निर्मललक्षणम् ॥ तस्मिन्महाश्रमे रम्ये कालनेमिः स राक्षसः ॥ ११ ॥ इन्द्रयोगं समास्थाय चकार शिवपूजनम् ॥ हनूमानभिवाद्याह गौरवेण महासुरम् ॥ १२ ॥

जलं (९ पू.) द्रोणाचलं यामि.' ॥ (९ उ. १० मू.) समावृतं (११ पू.) आश्रमं प्रविवेश. ॥ रम्ये (मू.) ॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥ (पू.) चकार. ॥ (मू.) आह - ॥ १२ ॥

---

१ जातों. २ योजनाइतकें लांब. ३ केळी, शाल, खजुरी, फणस इत्यादि. ४ लवल्या फांद्या ज्यांच्या, अशा. ५ वृक्षांनीं. ६ वैरभावानें सोडिलेल्या. ७ कपटास. ८ स्वीकारून.

६।१४

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राक्षसाचें कपटी भाषण.

वंदन करून ह्मणाला :- ॥ १२ ॥ 'त्रिकालज्ञ मुने! मी रामाचा दूत आहें. माझें नांव हनुमान. रामाचें कांहीं महत्वाचें कार्य करण्यासाठीं मी क्षीरसमुद्रावर जात आहें. ॥१३॥ परंतु, अहो ब्रह्मनिष्ठ मुने! तृषेमुळें माझा कंठ अगदीं सुकून गेला. येथें पाणी कोठें आहे बरें? मला पोटभर उदक प्यावें अशी इच्छा आहे. मुनिवरा! तें कोठें आहे, मला सांगा.' ॥ १४ ॥ तें मारुतीचें वाक्य ऐकून कालनेमि त्याला ह्मणाला :- 'बा! माझ्या कमंडलूंत उदक आहे तें तूं प्राशन कर, ॥१५॥ हीं पक्व फळें खा, व येथें राहून सुखानें निद्रा घे. पाणी प्याल्याबरोबर लागलेंच जाण्याची त्वरा करण्याचें कारण नाहीं. ॥ १६ ॥ मी स्वतांच्या तपःसामर्थ्यानें भूत भविष्य वर्तमान जाणत असतों. लक्ष्मण शुद्धीवर आला व सगळे वानरही रामाच्या दृष्टि-

भगवन् रामदूतोऽहं हनूमान्नाम नामतः ॥ रामकार्येण महता क्षीराब्धिं गन्तुमुद्यतः ॥ १३ ॥ तृषा मां बाधते ब्रह्मन्नुदकं कुत्र विद्यते ॥ यथेच्छं पातुमिच्छामि कथ्यतां मे मुनीश्वर ॥१४॥ तच्छ्रुत्वा मारुतेर्वाक्यं कालनेमिस्तमब्रवीत् ॥ कमण्डलुगतं तोयं मम त्वं पातुमर्हसि ॥ १५ ॥ भुंक्ष्व चेमानि पक्वानि फलानि तदनन्तरम् ॥ निवसस्व[1] सुखेनात्र निद्रामेहि[2] त्वरा ऽस्तु मा॥१६॥भूतं भव्यं भविष्यं च जानामि तपसा स्वयम् ॥

'(पू.) अहं ॥ महता (मू.) [अस्मि]. ॥ १३ ॥ ब्रह्मन, (मू.), कथ्यतां.' ॥ १४ ॥ कालनेमिः (पू.) श्रुत्वा तं अब्रवीत् – ॥ 'त्वं मम (मू.). ॥१५॥ (पू.) [च] भुङ्क्ष्व. तदनन्तरं ॥ अत्र सुखेन (मू.) अस्तु. ॥ १६ ॥ (पू.) जानामि. ॥

१ राहा. २ एहि ये.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पातानेंच जिवंत झाले.' ॥ १७ ॥ तें ऐकून मारुति ह्मणाला :– 'मुने! मला फारच तृषा लागली आहे; कमंडलूंतील उदकानें ती शांत होत नाहीं. ह्मणून मला एखादें सरोवर दाखवून द्या.' ॥ १८ ॥ कालने-मीनें 'बरें' ह्मणून लागलीच मायेनें निर्मिलेल्या एका बटूला आज्ञा दिली :– 'बटो! ह्या वायुपुत्राला विस्तीर्ण सरोवर दाखव.' ॥ १९ ॥ - पुढें कालनेमि मारुतीकडे वळून ह्मणाला :- 'वायुपुत्रा! डोळे मिटून पाणी पी आणि तसाच मजजवळ ये; ह्मणजे मी तुला मंत्रोपदेश करीन. त्याच्या सामर्थ्यानें तुला ओषधि दिसून येतील.' ॥ २० ॥ मारुति 'बरें' ह्मणून त्वरित बटूनें दाखविलेल्या सरोवरांत शिरला व डोळे मिटून पाणी पिऊं

उत्थितो लक्ष्मणः सर्वे वानरा रामवीक्षिताः॥१७॥तच्छ्रुत्वा हनूमानाह कमण्डलुजलेन मे॥न शाम्यत्यधिका तृष्णा ततो दर्शय मे जलम्॥१८॥तथेत्याज्ञापयामास बटुं माया-विकल्पितम् ॥ बटो दर्शय विस्तीर्णं वायुसूनोर्जलाशयम्॥१९॥निमील्य चाक्षिणी तोयं पीत्वा ऽऽगच्छ ममान्तिकम् ॥ उपदेक्ष्यामि ते मन्त्रं येन द्रक्ष्यसि चौषधीः॥२०॥ तथे-ति दर्शितं शीघ्रं बटुना सलिलाशयम् ॥ प्रविश्य हनुमांस्तोयमपिबन्मीलितेक्षणः ॥२१॥

लक्ष्मणः (मू.) च रामवीक्षिताः [सन्तः उत्थिताः].' ॥ १७ ॥ हनुमान् तत् श्रुत्वा आह – '(पू.) ॥ अधिका तृष्णा (मू.) दर्शय.' ॥१८॥ (पू.) बटुं आज्ञापयामास – ॥ 'बटो, वायुसूनोः (मू.) दर्शय.' ॥ १९ ॥ '[हनुमन्], अक्षीणि (पू.) आगच्छ. ॥ ते मन्त्रं (मू.) द्रक्ष्यसि.' ॥ २० ॥ हनुमान् तथा इति [उक्त्वा], बटुना शीघ्रं (मू.) [सन्] तोयं अपिबत्. ॥ २१ ॥

१ रामानें पाहिलेले. २ शमते (भागते). ३ नेत्र. ४ मिटून. ५ उदक. ६ जवळ. ७ मिटले नेत्र ज्यानें, असा. ८ प्याला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लागला. ॥ २१ ॥ इतक्यांत एक महामाया मकरी तेथें येऊन भराभर त्या महावानराला—मारुतीला—गिळूं लागली! तिचें शरीर फार भयंकर होतें. ॥ २२॥ - हनुमंतानें डोळे उघडले - तों, सुसर आपल्याला गिळांत आहे, असें त्याला दिसून आलें. त्यानें क्रुद्ध होऊन दोन्ही हातांनीं त्या सुसरीचें तोंड फाडून टाकिलें! तत्काल ती मरण पावली! ॥ २३ ॥ इतक्यांत आकाशामध्यें दिव्य स्वरूप धारण करणारी एक स्त्री दिसूं लागली. तिचें नांव 'धान्यमाली' असें होतें. ती मारुतीला ह्मणाली :– ॥ २४ ॥ 'वानरेश्वरा! तुझ्या कृपेनें मी आज शापापासून मुक्त झाल्यें. मी एक अप्सरा आहें. कांहीं कारणामुळें मला मुनीनें शाप दिला

ततश्चागत्य मकरी महामाया महाकपिम् ॥ अग्रसत्तं महावेगान्मारुतिं घोररूपिणी ॥ २२ ॥ ततो ददर्श हनुमान् ग्रसन्तीं मकरीं रुषा ॥ दारयामास हस्ताभ्यां वदनं सा ममार ह ॥२३॥ ततो ऽन्तरिक्षे ददृशे दिव्यरूपधरांगना ॥ धान्यमालीतिविख्याता हनुमन्तमथाब्रवीत् ॥ २४ ॥ त्वत्प्रसादादहं शापाद्विमुक्ता ऽस्मि कपीश्वर ॥ शप्ता ऽहं मुनिना पूर्वमप्सरा कारणान्तरे ॥ २५ ॥

ततः च घोररूपिणी महामाया मकरी[1] (मू.) महावेगात् अग्रसत्[2]! ॥२२॥ (पू.) ददर्श, ॥ (मू.) दारयामास[3]. सा ममार[4] ह. ॥ २३ ॥ (मू.) अङ्गना[6] ददृशे[7]. अथ [सा] हनुमन्तं अब्रवीत् – ॥ २४ ॥ 'कपीश्वर, अहं (पू.). ॥ अहं (मू.) शप्ता अप्सरा [अस्मि]. ॥ २५ ॥

१ सुसर. २ ग्रासूं लागली. ३ फाडिता झाला. ४ मेली. ५ आकाशांत. ६ स्त्री. ७ दिसली. ८ कांहीं कारणामुळें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होता. असो. ॥ २५ ॥ बा पुण्यपुरुषा! - आतां मीं काय सांगत्यें, तें लक्ष्य देऊन ऐक : - आश्रमामध्यें जो पुरुष तूं पाहिलास, तो कालनेमि नामक महादैत्य होय. मार्गामध्यें तुला विघ्न करण्यासाठीं रावणानें त्याला पाठविलें आहे, ॥ २६ ॥ तो मुनि नव्हे तर मुनीसारखा वेष धारण करणारा मुनींचा घातक राक्षस आहे! तूं त्या दुष्टाचा वध कर आणि लागलाच अत्युत्तम द्रोणपर्वताकडे चालता हो. ॥ २७ ॥ तुझा स्पर्श घडल्यामुळें माझीं पातकें नष्ट झालीं. आतां मी ब्रह्मलोकीं जात्यें.' इतकें बोलून ती स्वर्गास गेली. इकडे मारुतिही आश्रमांत आला. ॥ २८ ॥ तो जवळ येत आहे, असें पाहून कालनेमि म्हणाला :—

आश्रमे यस्तु ते दृष्टः कालनेमिर्महासुरः ॥ रावणप्रहितो मार्गे विघ्नं कर्तुं तवानघ ॥ २६ ॥ मुनिवेषधरो नासौ मुनिर्विप्रविहिंसकः ॥ जहि दुष्टं गच्छ शीघ्रं द्रोणाचलमनुत्तमम् ॥२७॥ गच्छाम्यहं ब्रह्मलोकं त्वत्स्पर्शाद्धूतकल्मषा ॥ इत्युक्त्वा सा ययौ स्वर्गं हनूमानप्ययथाश्रमम् ॥ २८ ॥ आगतं तं समालोक्य कालनेमिरभाषत ॥ किं विलम्बेन महता तव वानरसत्तम ॥ २९ ॥

अनघ, ते (पू.) दृष्टः, ॥[सः] मार्गे तव विघ्नं कर्तुं (मू.) ॥ २६ ॥ असौ मुनिः न [क्रिन्तु] (पू.) [अस्ति]. ॥दुष्टं (मू.) द्रोणाचलं गच्छ. ॥ २७ ॥ (पू.) अहं ब्रह्मलोकं गच्छामि. " ॥ (मू.), अथ हनूमान् अपि आश्रमं ययौ. ॥ २८ ॥ कालनेमिः (पू.) – ॥ ' (मू.), तव महता विलम्बेन किं? ॥ २९ ॥

१ मार. २ नाहीं उत्तम ज्याहून (अत्युत्तम), अशा. ३ धुवून गेलीं (नाहींशीं झालीं) पापें जिचीं, अशी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

' वानरवीरा ! इतका वेळ तिकडे काय करीत होतास? ॥ २९ ॥ बरें; आतां मजपासून मंत्र शीक; आणि मला गुरुदक्षिणा दे.' त्यानें असें सांगितलें असतां मारुति घट्ट मूठ आंवळून त्या राक्षसाला ह्मणाला:–॥३०॥ ' ही घे दक्षिणा ! ' असें बोलून मारुतीनें त्याला एक गुद्दा दिला ! तत्क्षणीं तो महादैत्य कालनेमि ऋषिवेष सोडून ॥ ३१ ॥ मारुतीबरोबर युद्ध करूं लागला. दैत्यानें अनेक प्रकारच्या माया निर्माण केल्या; पण हा मारुति ह्मणजे महामायाव्याचा (सर्व जगाचें आदि कारण माया ज्याच्या स्वाधीन, त्या रामाचा) दूत व मायावी (कपटी) राक्षसांचा शत्रु ! - ह्याच्यापुढें क्षुद्र राक्षसी मायांचें काय चालणार ? - ॥३२॥ ह्यानें मस्तकावर एकच मुष्टिप्रहार केला. त्या तडाक्याबरोबर मस्तक फुटून तो दैत्य मरण पावला ! नंतर मारुति क्षीरसमु-

गृहाण मत्तो मन्त्रांस्त्वं देहि मे गुरुदक्षिणाम् ॥ इत्युक्तो हनुमान्मुष्टिं दृढं बद्ध्वा ऽऽह राक्षसम् ॥ ३० ॥ गृहाण दक्षिणामेतामित्युक्त्वा निजघान तम् ॥ विसृज्य मुनिवेषं स कालनेमिर्महासुरः ॥ ३१ ॥ युयुधे वायुपुत्रेण नानामायाविधानतः ॥ महामायिकदूतो ऽसौ हनूमान्मायिनां रिपुः ॥ ३२ ॥ जघान मुष्टिना शीर्ष्णि भग्नमूर्धा ममार सः ॥ ततः क्षीरनिधिं गत्वा दृष्ट्वा द्रोणं महागिरिम् ॥ ३३ ॥

त्वं मत्तः मन्त्रान् (पू.) देहि.' ॥ (मू.) मुष्टिं बध्वा राक्षसं आह – ॥३०॥ 'एतां दक्षिणां गृहाण !' (पू.) निजघान. ॥ (मू.) मुनिवेषं विसृज्य, ॥ ३१ ॥ (पू) युयुधे. ॥ (मू.) असौ हनूमान ॥ ३२ ॥ मुष्टिना शीर्ष्णि (पू.) ममार. ॥ [मारुतिः] (मू.) दृष्ट्वा, ॥ ३३ ॥

१ घे. २ मारिता झाला. ३ सोडून. ४मोठ्या मायाव्याचा (ईश्वराचा, रामाचा) दूत. ५मस्तकावर. ६ फुटलें मस्तक ज्याचें, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

द्रावर गेला. तेथें द्रोण महागिरि त्याच्या दृष्टीस पडला; ॥ ३३ ॥ पण त्यावर ओषधि कोठें दिसत ना! ह्मणून हनुमान् त्या पर्वतालाच उचलून घेऊन सत्वर वायुवेगानें रामाजवळ आला आणि त्याला ह्मणाला :— 'देवाधिदेवा! हा महापर्वत आणिला आहे. ह्याचा जो उपयोग करून घेणें असेल तो करावा. ह्या कामाला विलंब लावणें योग्य नाहीं.' ॥ ३४ ॥ ३५ ॥ हें मारुतीचें वाक्य ऐकून रामाचें अंतःकरण प्रसन्न झालें. त्यानें विलंब न लावितां पर्वतावरील ओषधि काढून घेतल्या. - रामाचा हस्तस्पर्श झाल्याबरोबर ओषधींचें तेज वृद्धिगत झालें. - पुढें त्या महाबुद्धिमान प्रभूनें, - कुशल वैद्याकडून रोग्याला औषध द्यावें असा विचार ठरवून, - सुषेणाकरवीं ॥ ३६ ॥ महासमर्थ लक्ष्मणाची चिकित्सा करविली. तत्क्षणीं लक्ष्मण झोंपेंतून

अदृष्ट्वा[1] चौषधीस्तत्र गिरिमुत्पाट्य[2] सत्वरः ॥ गृहीत्वा वायुवेगेन गत्वा रामस्य सन्निधिम् ॥ ३४ ॥ उवाच हनुमान् राममानीतोऽयं महागिरिः ॥ यद्युक्तं कुरु देवेश विलम्बो नात्र युज्यते ॥ ३५ ॥ श्रुत्वा हनूमतो वाक्यं रामः संतुष्टमानसः ॥ गृहीत्वा चौषधीः शीघ्रं सुषेणेन महामतिः ॥ ३६ ॥ चिकित्सां[3] कारयामास लक्ष्मणाय महात्मने ॥ तत सुप्तोत्थित[4] इव बुद्ध्वा[5] प्रोवाच लक्ष्मणः ॥ ३७ ॥

तत्र ओषधीः (पू.) [सन] ॥ (मू.) गत्वा [स्थितः]. ॥ ३४ ॥ हनुमान् रामं उवाच – '(पू.) आनीतः. ॥ देवेश यत् युक्तं, [तत्] कुरु. अत्र (मू.).' ॥ ३५ ॥ हनूमतः वाक्यं (पू.) महामतिः रामः ओषधीः (मू.) ॥ ३६ ॥ महात्मने लक्ष्मणाय (पू.). ॥ ततः लक्ष्मणः (मू.) – ॥ ३७ ॥

१ न पाहून. २ उपटून. ३ उपचार. ४ निजलेला (झोंप घेऊन) उठलेला. ५ जागा होऊन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लक्ष्मण शुद्धीवर आला.

जागा झाल्यासारखा उठला व ह्मणाला :– ॥३७॥ 'दशानना ! उभा रहा उभा रहा ! जाशील कोणीकडे ! आतां तुझा वध करितों !' लक्ष्मण असें बोलत आहे, हें पाहून रामानें त्याचें मस्तक हुंगिलें आणि॥३८॥मारुतीला ह्मटलें :– वत्सा वानरेश्वरा ! आज केवळ तुझ्या अनुग्रहामुळें माझ्या भावाची पीडा दूर झाली व हा लक्ष्मण माझ्या दृष्टीस पडला ! ' ॥ ३९ ॥ रामचंद्र इतकें भाषण करून व वानरांना आणि सुग्रीवाला बरोबर घेऊन, विभीषणाच्या मताप्रमाणें (कारण, त्याला लंकेंतील सर्व बारीकसारीक माहिती होती) युद्धाच्या तयारीनें उभा राहिला. ॥ ४० ॥ वानरांना युद्धाची मोठी हौस वाटे. ते सगळेजण पाषाण, वृक्ष, व पर्वतांचीं शिखरें घेऊन युद्धासाठीं शत्रूंच्या समोर जावयास निघाले. ॥ ४१ ॥

तिष्ठ[1] तिष्ठ क्व गन्तासि[2] हन्मीदानीं दशानन ॥ इति ब्रुवन्तमालोक्य मूर्ध्न्यवघ्राय[3][4] राघवः ॥ ३८ ॥ मारुतिं प्राह वत्साद्य त्वत्प्रसादान्महाकपे ॥ निरामयं[5] प्रपश्यामि लक्ष्मणं भ्रातरं मम ॥ ३९ ॥ इत्युक्त्वा वानरैः सार्धं सुग्रीवेण समन्वितः ॥ विभीषणमतेनैव युद्धाय समवस्थितः ॥ ४० ॥ पाषाणैः पादपैश्चैव[7] पर्वताग्रैश्च वानराः ॥ युद्धायाभिमुखा भूत्वा ययुः सर्वे युयुत्सवः[6] ॥ ४१ ॥

' दशानन, (पू.) [त्वां] हन्मि ! ' ॥ राघवः (मू.), ॥३८॥ मारुतिं प्राह – ' वत्स महाकपे, (पू.)॥ लक्ष्मणं मम भ्रातरं (मू.) '॥३९॥ (मू.)॥४०॥ सर्वे युयुत्सवः वानराः (मू.). ॥ ४१ ॥

१ उभा राहा. २ जाशील ३ मूर्ध्नि मस्तकीं. ४ अवघ्राय हुंगून. ५ निरोगी अशास. ६ युद्ध करूं इच्छिणारे. ७ वृक्षांनीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इकडे, महादैत्य रावण रामाचे बाण लागून घायाळ झाला होता; सिंहानें हत्तीची किंवा गरुडानें सर्पाची त्रेधा उडवावी, त्याप्रमाणें रामानें रावणाची अवस्था केली होती. ॥ ४२ ॥ महासमर्थ रामचंद्रानें पराभव केला असतां, तो राजा घरीं गेला आणि सिंहासनावर बसून राक्षसांना सांगूं लागला :– ॥ ४३ ॥ " राक्षसांनो ! ब्रह्मदेवानें, मला मनुष्याकडून मृत्यु येईल, असें पूर्वी सांगितलें (ठरविलें) आहे. माझा वध करण्यास समर्थ असा मनुष्य पृथ्वीवर कोणी नाहीं; ॥ ४४ ॥ ह्मणून, साक्षात् नारायण मनुष्य झाला आहे, ह्यांत संशय नाहीं. परमेश्वरच दशरथाचा पुत्र राम होऊन मला मारण्यासाठीं येथें आला आहे. ॥ ४५ ॥ राक्षसवीरांनो ! अनरण्यानें पूर्वी मला शाप दिला आहे कीं 'माझ्या (अनरण्याच्या) वंशांत सनातन

रावणो विव्यथे रामबाणैर्विद्धो[1] महासुरः ॥ मातंगे[2] इव सिंहेन गरुडेनेव पन्नगः[3]
॥ ४२ ॥ अभिभूतो ऽगमद्राजा राघवेण महात्मना ॥ सिंहासने समाविश्य राक्ष-
सानिदमब्रवीत् ॥ ४३ ॥ मानुषेणैव मे मृत्युमाह पूर्वं पितामहः ॥ मानुषो हि न
मां हन्तुं शक्तो ऽस्ति भुवि कश्चन ॥ ४४ ॥ ततो नारायणः साक्षान्मानुषो ऽभून्न
संशयः ॥ रामो दाशरथिर्भूत्वा मां हन्तुं समुपस्थितः ॥ ४५ ॥ अनरण्येन यत्पूर्वं
शप्तो ऽहं राक्षसेश्वराः ॥

महासुरः (पू.) [सन] सिंहेन (मू.) इव विव्यथे.॥४२॥(पू.) राघवेण अभिभूतः [सन गृहं] अगमत्,॥ (मू.) – ॥४३॥ "पितामहः पूर्वं (मू.) मां हन्तुं शक्तः न अस्ति. ॥४४॥(मू.) ॥४५॥ (पू.) शप्तः–॥

१ ताडिलेला. २ हत्ती. ३ सर्प. ४ घायाळ झाला. ५ पराभव केलेला.

परमात्मा अवतार घेईल; ॥ ४६ ॥ त्याच्या हातून पुत्र, पौत्र, बांधव सर्वांसह तूं (रावण) मरण पावशील, ह्यांत किमपि अन्यथा होणें नाहीं!' मला इतकें बोलून अनरण्य स्वर्गास गेला. ॥ ४७ ॥ तोच हा राम मजकारितां (मला मारण्यासाठीं) उत्पन्न झाला आहे, म्हणून माझा वध करणारच! कुंभकर्ण तर बेटा अगदीं मूर्ख आहे, नेहमीं आपला झोंपेंत गढलेला असतो! ॥ ४८ ॥ पण त्याची शक्ति विलक्षण आहे. कोणी तरी त्याला जागा करून मजजवळ घेऊन या." रावणानें असें सांगितलें असतां ते विप्याड राक्षस तसेच गेले व मोठ्या प्रयत्नांनीं ॥ ४९ ॥ कुंभकर्णाला जागा करून रावणाजवळ घेऊन आले. तो राजाला

उत्पत्स्यते च मद्वंशे परमात्मा सनातनः ॥ ४६ ॥ तेन त्वं पुत्रपौत्रैश्च बान्धवैश्च समन्वितः ॥ हनिष्यसे न संदेह इत्युक्त्वा मां दिवं गतः ॥ ४७ ॥ स एव रामः संजातो मदर्थे मां हनिष्यति ॥ कुम्भकर्णस्तु मूढात्मा सदा निद्रावशं गतः ॥ ४८ ॥ तं विबोध्य महासत्त्वमानयन्तु ममान्तिकम् ॥ इत्युक्तास्ते महाकायास्तूर्णं गत्वा तु यत्नतः ॥ ४९ ॥ विबोध्य कुम्भश्रवणं निन्यू रावणसन्निधिम् ॥ नमस्कृत्य स राजानमासनोपरि संस्थितः ॥ ५० ॥

' (मू.) परमात्मा उत्पत्स्यते; ॥४६॥ (पू.) त्वं ॥ (मू.). ' [सः] मां इति उक्त्वा दिवं गतः. ॥ ४७ ॥ (पू.) संजातः; मां हनिष्यति! ॥ (मू.). ॥ ४८ ॥ महासत्त्वं (पू.) आनयन्तु." ॥ (मू) गत्वा, यत्नतः ॥ ४९ ॥ (पू) निन्युः. ॥ सः राजानं (मू.). ॥ ५० ॥

१ उत्पन्न होईल. २ मारिला जाशील. ३ स्वर्गास. ४ जागा करून. ५ मोठीं शरीरें ज्यांचीं, असे. ६ कुंभकर्णास. ७ नेते झाले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नमस्कार करून आसनावर बसला. ॥ ५० ॥ तेव्हां राजा रावण त्या आपल्या भावाला दीन वाणीनें सांगूं लागला :– ' कुंभकर्णा! मोठें संकट पुढें उभें राहिलें आहे! तूं कांहीं तरी मनावर घे. ॥ ५१ ॥ आपले शूर पुत्र, पौत्र व बांधव रामानें मारून टाकिले! माझा मृत्युकाल जवळ आला, - असें वाटतें ! - ह्या वेळीं मी करावें काय ! ॥ ५२ ॥ हा पराक्रमी दशरथपुत्र रामचंद्र सुग्रीवासह मोठी सेना बरोबर घेऊन समुद्र तरून इकडे आला व आमचीं पाळें मुळें खणून काढूं लागला आहे ! ॥५३॥ निवडक निवडक जे कांहीं राक्षस होते, त्यांचा युद्धांत वानरांनीं वध केला ! युद्धामध्यें वानर मरून पडले, असें मला कधींच दिसत नाहीं ! ॥५४॥

तमाह रावणो राजा भ्रातरं दीनया गिरा ॥ कुम्भकर्ण निबोध त्वं महत्कष्टमुपस्थितम् ॥ ५१ ॥ रामेण निहताः शूराः पुत्राः पौत्राश्च बान्धवाः ॥ किं कर्तव्यमिदानीं मे मृत्युकाल उपस्थिते ॥ ५२ ॥ एष दाशरथी रामः सुग्रीवसहितो बली ॥ समुद्रं सबलस्तीर्त्वा[१] मूलं नः परिकृन्तति[२] ॥ ५३॥ ये राक्षसा मुख्यतमा[३]स्ते हता वानरैर्युधि ॥ वानराणां क्षयं युद्धे न पश्यामि कदाचन ॥ ५४ ॥

रावणः राजा (पू.) आह – ॥ ' कुम्भकर्ण, त्वं (मू.)! ॥ ५१ ॥ (पू.) च निहताः. ॥ (मू.) [सति], इदानीं मे किं कर्तव्यं ? ॥ ५२ ॥ (पू.) सबलः रामः समुद्रं तीर्त्वा नः (मू.)! ॥ ५३ ॥ (पू.) हताः. ॥ (मू.) न पश्यामि. ॥ ५४ ॥

१ सैन्यासहित. २ कापून काढितो. ३ अति मुख्य.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कुंभकर्णाचें भाषण.

कुंभकर्णा ! तुझे बाहु प्रचंड (शक्तीनें भरलेले) आहेत. तूं शत्रूचा नाश कर. एवढ्यासाठींच आह्मी तुला जागें केलें. हे महासमर्था! हें काम करणें अत्यंत कठिण आहे खरें, पण भावासाठीं तुला केलें पाहिजे.' ॥ ५५ ॥ हें राजा रावणाचें रडकें भाषण ऐकून कुंभकर्ण खदखदां हांसत सुटला आणि रावणाला ह्मणाला :– ॥ ५६ ॥ "राजा ! पूर्वी एकांतीं मसलती झाल्या त्या वेळीं मीं जें ह्मटलें होतें, तेंच पापकर्माचें फळ आज तुला प्राप्त झालें ! ॥ ५७ ॥ त्या वेळींच मीं तुला सांगितलें कीं, राम परमात्मा नारायण होय व सीता योगमाया आहे. किती उपदेश केला तरी तूं उमजला नाहींस ! ॥ ५८ ॥ एके प्रसंगीं रात्रीच्या वेळीं मी

नाशयस्व महाबाहो यदर्थं परिबोधितः ॥ भ्रातुरर्थे महासत्त्व कुरु कर्म सुदुष्करम् ॥ ५५ ॥ श्रुत्वा तद्रावणेन्द्रस्य वचनं परिदेवितम् ॥ कुम्भकर्णो जहासोच्चैर्वचनं चेदमब्रवीत् ॥ ५६ ॥ पुरा मन्त्रविचारे ते गदितं यन्मया नृप ॥ तदद्य त्वामुपगतं फलं पापस्य कर्मणः ॥५७॥ पूर्वमेव मया प्रोक्तो रामो नारायणः परः ॥ सीता च योगमायेति बोधितो ऽपि न बुध्यसे ॥ ५८ ॥ एकदा ऽहं वने सानौ विशालायां स्थितो निशि ॥

महाबाहो, [तत् वानरबलं] (पू.). ॥ महासत्त्व, (मू.) कर्म कुरु.' ॥ ५५ ॥ कुम्भकर्णः (पू.) श्रुत्वा, उच्चैः जहास, इदं (मू.) – ॥ ५६ ॥ "नृप, मया पुरा ते (पू.) पापस्य कर्मणः फलं गदितं, (मू.). ॥५७॥ मया (पू.) नारायणः प्रोक्तः; ॥ (मू.). ॥५८॥ अहं (पू.) [शिलायां], निशि स्थितः. ॥ ॥ ५८ ॥

१ मोठ्यानें. २ हांसला. ३ उपायाची गुप्त योजना चालली असतां. ४ सांगितलेलें. ५ मिळालें. ६ शिखरावर. ७ विस्तीर्ण शिळेवर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अरण्यांत पर्वताशिखरीं विस्तीर्णशा शिळेवर बसलों होतों. इतक्यांत साक्षात् नारदमुनि माझ्या दृष्टीस पडले. त्यांचें दर्शन सर्व जगांत अलभ्य लाभ समजलें जातें. ॥ ५९ ॥ मी त्यांना विचारिलें :– ‘ महाज्ञानवंता ! आपण कोणीकडून आलां मला सांगा. ’ हा प्रश्न ऐकून नारद ह्मणाले :– ‘ देवांचे कांहीं गुप्त विचार झाले, तेथें मी इतका वेळ बसलों होतों, - हा तिकडूनच आलों. - ॥ ६० ॥ तिकडे काय वृत्तांत झाला तो खरा खरा तुला सांगतों ऐक :– तूं आणि तुझा भाऊ रावण दोघांनीं सर्व देवांना फार त्रास दिला ह्मणून ते विष्णूकडे गेले. ॥ ६१ ॥ त्यांचीं अंतःकरणें भक्तीस्तव विष्णूकडे नित्य लागलेलीं असतात. त्यांनीं त्या समर्थ देवाधिदेवाची स्तुति करून प्रार्थना केली कीं, देवा ! रावण हा त्रैलोक्याला शत्रु उत्पन्न झाला आहे; त्याच्यापुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं; तूं त्याचा वध कर; ॥ ६२ ॥

दृष्टो मया मुनिः साक्षान्नारदो दिव्यदर्शनः ॥ ५९ ॥ तमब्रुवं महाभाग कुतो गन्तासि मे वद ॥ इत्युक्तो नारदः प्राह देवानां [1]मन्त्रणे स्थितः ॥ ६० ॥ तत्रोत्पन्न[2]मुदन्तं ते वक्ष्यामि शृणु तत्त्वतः ॥ [3]युवाभ्यां पीडिता देवाः सर्वे विष्णुमुपागताः ॥ ६१ ॥ ऊचुस्ते देवदेवेशं स्तुत्वा भक्त्या समाहिताः ॥ जहि रावणमक्षो[4]भ्यं देव त्रैलोक्यकण्टकम् ॥ ६२ ॥

मया दिव्यदर्शनः (मू.) दृष्टः. ॥ ५९ ॥ (पू). ॥ इति उक्तः नारदः प्राह – ॥ ६० ॥ (पू.) शृणु. ॥ (मू.). ॥६१॥ (पू) ते देवदेवेशं स्तुत्वा ऊचुः – ॥ ‘देव, (मू.) रावणं जहि. ॥ ६२ ॥

१ विचारस्थानीं. २ वृत्तांताला. ३ तुझी दोघांनीं. ४ नाश करितां येत नाहीं ज्याचा, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याला मनुष्याच्या हातून मृत्यु यावयाचा, असा ब्रह्मदेवानें पूर्वी संकेत करून ठेविला आहे; ह्मणून, तूं मनुष्यरूप घेऊन रावणनामक शत्रूचा घात कर. ॥ ६३ ॥ महाविष्णूनें, बरें आहे, असें ह्मटलें. त्या प्रभूचा संकल्प कधीं अन्यथा व्हावयाचा नाहीं. तो देव सध्यां रघुकुलामध्यें राम ह्या नामें अवतरला आहे. ॥ ६४ ॥ तो तुह्मां सर्वांचा नाश करणार.' इतकें सांगून मुनि स्वर्गास गेले. ह्यावरून, रावणा! राम हा सनातन परब्रह्म होय, असें पक्कें समज, ॥ ६५ ॥ आणि वैरभाव सोडून त्याची भक्ति करूं लाग. त्यानें मायेच्यायोगें मनुष्यरूप स्वीकारिलें आहे. भक्तिभावानें सेवा करणाराला रघुवीर प्रसन्न होतो.॥६६॥

मानुषेण मृतिस्तस्य कल्पिता ब्रह्मणा पुरा ॥ अतस्त्वं मानुषो भूत्वा जहि रावण-
कण्टकम् ॥ ६३ ॥ तथेत्याह महाविष्णुः सत्यसंकल्प ईश्वरः ॥ जातो रघुकुले
देवो राम इत्यभिविश्रुतः ॥६४॥ स हनिष्यति वः सर्वानित्युक्त्वा प्रययौ मुनिः ॥
अतो जानीहि रामं त्वं परं ब्रह्म सनातनम् ॥ ६५ ॥ त्यज वैरं भजस्वाद्य माया-
मानुषविग्रहम् ॥ भजतो भक्तिभावेन प्रसीदति रघूत्तमः ॥ ६६ ॥

ब्रह्मणा पुरा तस्य (मू.) जहि.' ॥ ६३ ॥ (पू.) 'तथा इति' आह. ॥ देवः (मू.) जातः. ॥ ६४ ॥ सः वः सर्वान (पू.) प्रययौ. ॥ अतः त्वं (मू.) जानीहि. ॥६५॥ वैरं (पू.) [रामं] भजस्व. ॥ रघूत्तमः भक्तिभावेन (मू.). ॥ ६६ ॥

१ रावणरूप कांट्याला. २ प्रसिद्ध. ३ मायेनें मनुष्याचें शरीर - घेतलें - ज्यानें, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भक्ति ज्ञान उत्पन्न करिते; व भक्तिच मोक्ष देते. भक्तिहीन प्राण्यानें कांहीं कर्म केलें तरी तें न केल्या-सारखेंच आहे (त्याचें फळ मिळत नाहीं). ॥ ६७ ॥ विष्णूचे अनेक अवतार होऊन गेले. तो जें स्वरूप घेतो, त्याला अनुरूप लीला करीत असतो. अशा सहस्र अवतारांसारखा (सामान्य अवतारांच्या सहस्र पटीनीं मोठा) हा एक रामावतार आहे. हा ज्ञानरूप व कल्याणकारक होय. ॥ ६८ ॥ जे कुशल पुरुष कायावाचामनांनीं नित्य रामाचें भजन करितात, ते अनायासें संसारांतून तरून हरिपदीं प्राप्त होतात. ॥ ६९ ॥ पृथ्वीवर जे शुद्ध मनाचे पुरुष नित्य रामाचें ध्यान करितात व त्याचीं चरित्रें पठण करितात, ते

भक्तिर्जनित्री[1] ज्ञानस्य भक्तिर्मोक्षप्रदायिनी ॥ भक्तिहीनेन यत्किंचित्कृतं सर्वमसत्समम्[2] ॥ ६७ ॥ अवताराः सुबहवो विष्णोर्लीलानुकारिणः ॥ तेषां सहस्रसदृशो रामो ज्ञानमयः शिवः ॥ ६८ ॥ रामं भजन्ति निपुणा मनसा वचसाऽनिशम् ॥ अनायासेन संसारं तीर्त्वा यान्ति हरेः पदम् ॥ ६९ ॥ ये राममेव सततं भुवि शुद्धसत्त्वा ध्यायन्ति तस्य चरितानि पठन्ति सन्तः ॥ मुक्तास्त एव भवभोगमहाहि[3]-पाशैः सीतापतेः पदमनन्तसुखं प्रयान्ति ॥ ७० ॥ इति युद्धकाण्डे सप्तमः सर्गः ॥ ७ ॥

भक्तिः ज्ञानस्य (मू), [तत्] सर्वं असत्समं. ॥ ६७ ॥ लीलानुरूपिणः विष्णोः (पू.) [जाताः]. ॥ (मू.) [अस्ति]. ॥ ६८ ॥ निपुणाः (पू.) भजन्ति, ॥ (मू.) यान्ति. ॥ ६९ ॥ ये शुद्धसत्त्वाः सन्तः (पू.) पठन्ति, ॥ (मू.) मुक्ताः [सन्तः] अनन्तसुखं सीतापतेः पदं प्रयान्ति. ॥ ७० ॥ इति सप्तमः सर्गः ॥ ७ ॥

१ उत्पन्न करणारी. २ नसल्यासारखें. ३ संसार हें शरीर ज्याचें अशा त्या महासर्पाच्या विळख्यातून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

साधु होत. काल हा एक महासर्प आहे; संसार हें त्या सर्पाचें शरीर होय :- सर्व लोक ह्या सर्पाच्या विळख्यांत सांपडले असतात :- पण ते साधु ह्या पाशांतून नित्य मुक्तच असतात. त्यांना सीतापतीच्या अनंतसुखरूपी पदाची प्राप्ति व्हावयाचीच, - ह्यांत संदेह नाहीं. - ॥ ७० ॥

॥ इति सप्तमः सर्गः ॥ ७ ॥

कुंभकर्णाचें भाषण कानीं पडतांच रावणानें भिवया चढविल्या व मुख उग्र केलें. ह्या वेळीं, तो आसनावरून उडतो कीं काय, असें भासे! अशा स्थितींत रावण बोलूं लागला :- ॥ १ ॥ 'कुंभकर्णा! तूं महाबुद्धिमान्, ह्मणून तुझ्या तोंडून चार ज्ञानाच्या गोष्टी ऐकाव्या, एवढ्यासाठीं कांहीं मी तुला येथें आणिलें नाहीं. मी जें कांहीं केलें आहे, त्यांत मिळून (माझ्यासारखें वर्तन ठेवून), तुला रुचेल तर युद्ध कर. ॥ २ ॥ नाहीं तर खुशाल झोंप घ्यायला जा! ह्या वेळीं झोपेनें तुला फारच गुंगविलें असेल!'

कुम्भकर्णवचः श्रुत्वा भ्रुकुटीविकटाननः[1] ॥ दशग्रीवो जगादेदमासनादुत्पतन्निव[2] ॥ १ ॥ त्वमानीतो न मे ज्ञानबोधनाय सुबुद्धिमान् ॥ मया कृतं समीकृत्य[4] युध्यस्व यदि रोचते ॥ २ ॥ नो चेद्गच्छ सुषुप्त्यर्थं[5] निद्रा त्वां बाधतेऽधुना ॥ रावणस्य वचः श्रुत्वा कुम्भकर्णो महाबलः ॥ ३ ॥

(मू.) इदं जगाद[3] - ॥ १ ॥ 'सुबुद्धिमान (पू.) न आनीतः! ॥ यदि रोचते, [तर्हि] (मू.); ॥ २ ॥ नो चेत, [तर्हि] सुषुप्त्यर्थं (पू.) बाधते!' ॥ महाबलः कुम्भकर्णः (मू), ॥ ३ ॥

१ भुंवया वांकड्या केल्यामुळें भयंकर दिसतें मुख ज्याचें, असा. २ उत्पतन् उडणारा. ३ बोलला. ४ स्वीकारून (एकमताचा होऊन). ५ झोंप घेण्यास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रावणाचें भाषण ऐकिल्यावर महापराक्रमी कुंभकर्णाला ॥ ३ ॥ वाटलें कीं, हा संतापला आहे; - ह्यावेळीं
अधिक उपदेश उपयोगी नाहीं. - ह्मणून लागलाच तो युद्धाला निघाला. त्याचें शरीर प्रचंड पर्वतासारखें
होतें. तो नगराचा कोट वलांडून ॥ ४ ॥ वानरवीरांना घाबरवीत नगरांतून सत्वर बाहेर आला. त्यानें इतकी
मोठी गर्जना केली कीं, घोंघो वाजणाऱ्या समुद्रांतून तिचा प्रतिध्वनि उठला ! ॥ ५ ॥ तो क्रोधानें वानरांना
दोन्ही हातांनीं धरून खाऊं व पीडा देऊं लागला. एखाद्या पर्वताला - त्याच्या विस्तीर्ण आकृतीस योग्य -
असे पंख असले ह्मणजे जसा देखावा दिसेल, तसा कुंभकर्ण दिसत होता ! त्याची काळासारखी किंवा
मृत्यूप्रमाणें उग्र आकृति पाहून त्या वेळीं एकूनएक सगळे वानर पळूं लागले. तो महाशक्तिमान् राक्षस

रुष्टो ऽयमिति विज्ञाय तूर्णं युद्धाय निर्ययौ ॥ स लंघयित्वा प्राकारं महापर्वतस-
न्निभः ॥ ४ ॥ निर्ययौ नगरात्तूर्णं भीषयन्हरिसैनिकान् ॥ स ननाद महानादं समु-
द्रमभिनादयन् ॥ ५ ॥ वानरान्कालयामास बाहुभ्यां भक्षयन् रुषा ॥ कुम्भकर्णं
तदा दृष्ट्वा सपक्षमिव पर्वतम् ॥ ६ ॥ दुद्रुवुर्वानराः सर्वे कालान्तकमिवाखिलाः ॥

(मू.) सः प्राकारं लंघयित्वा, ॥ ४ ॥ (पू.) भीषयन् [सन्] नगरात् तूर्णं निर्ययौ. ॥ (मू.)
[सन्] ननाद. ॥ ५ ॥ [सः] (६ पू.) भक्षयन् [सन्] बाहुभ्यां कालयामास. ॥ तदा अ-
खिलाः सर्वे वानराः (६ उ.) इव [स्थितं] कुम्भकर्णं (७ पू.) दृष्ट्वा दुद्रुवुः. ॥

१ वानरवीरांस. २ भिवविणारा. ३ शीघ्र. ४ निघाला. ५ दणाणविणारा. ६ गर्जना करिता झाला. ७ त्रासवूं लागला. ८ पंख-
युक्त. ९ पळाले.

६।१६

हातांत मुद्गर घेऊन वानरांच्या सैन्यांत गरगर फिरे, ॥ ६ ॥ ७ ॥ फिरण्याच्या झपाट्यांत कित्येक वानरांना भूमीवर पाडी, आसपास हाताला लागतील त्यांना तोंडांत टाकी, कांहींना मुद्गरप्रहारानें चुरी, व कित्येकांना अनेक प्रकारें लाथाबुक्या मारून तुडवी. ॥ ८ ॥ विभीषण त्याप्रसंगीं हातांत गदा घेऊन - तेथें आला होता; - कुंभकर्ण त्याचा वडील भाऊ. म्हणून त्या बुद्धिमान राक्षसानें तो (कुंभकर्ण) दृष्टीस पडल्याबरोबर, त्याच्या चरणांस वंदन केलें व म्हटलें :– ॥ ९ ॥ "दादा! मी विभीषण आपला भाऊ वंदन करीत आहें. आपण थोर ज्ञानसंपन्न आहां. मजवर दया करा. रावणाला मी अनेक प्रकारें बोध केला ॥ १० ॥ कीं, सीता रामाला दे; राम साक्षात सर्ववंद्य परमेश्वर आहे. परंतु त्यानें माझें

भ्रमन्तं[2] हरिवाहिन्यां मुद्गरेण महाबलम् ॥७॥ कालयन्तं[3] हरीन्वेगाद्भक्षयन्तं समन्ततः ॥ चूर्णयन्तं मुद्गरेण पाणिपादैरनेकधा ॥ ८ ॥ कुम्भकर्णं तदा दृष्ट्वा गदापाणिर्विभीषणः ॥ ननाम चरणौ तस्य भ्रातुर्ज्येष्ठस्य बुद्धिमान् ॥ ९ ॥ विभीषणोऽहं भ्रातुर्मे दयां कुरु महामते ॥ रावणस्तु मया भ्रातर्बहुधा परिबोधितः ॥ १० ॥ सीतां देहीति रामाय रामः साक्षाज्जनार्दनः ॥

हरिवाहिन्यां (पू.) [युतं] महाबलं ॥ ६ ॥ ७ ॥ हरीन् (पू.) भक्षयन्तं (मू.) चूर्णयन्तं ॥ ८ ॥ कुम्भकर्णं दृष्ट्वा, तदा बुद्धिमान (मू.) भ्रातुः चरणौ ननाम, [उवाच च –] ॥ ९ ॥ "महामते, (१० पू.). भ्रातः, मया (१० मू.) – 'रामाय (११ पू.)' ॥

१ वानरसेनेंत. २ फिरणाऱ्या. ३ त्रासतिणाऱ्या. ४ वानरांना.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ऐकलें नाहीं इतकेंच नव्हे, तर मला मारण्यासाठीं खड्ग उचलून सांगितलें, ॥ ११ ॥ कीं, 'तुला धिक्कार असो! येथून निघून जा!' दादा! भोंवतालच्या दुष्ट पापी राक्षसांच्या नादीं लागून त्यानें मला लाथ कींहो मारिली! म्हणून मी चौघांमंत्र्यांना बरोबर घेऊन रामाला शरण आलों." ॥ १२ ॥ तें सगळें भाषण कानीं पडल्यावर कुंभकर्णाला समजलें कीं, आपला भाऊ जवळ आला आहे. (क्रोधाच्या आवेशामुळें इतका वेळ स्वारीला दादच नव्हती!) मग त्यानेंही विभीषणाला पोटाशीं धरून - म्हटलें: - 'वत्सा! तूं रामचरणाचा आश्रय केलास, - फार चांगली गोष्ट झाली. - बा! तूं तरी जिवंत राहा; ॥ १३ ॥ म्हणजे राक्षसांच्या कुलाचें संरक्षण व हित होईल. तूं महाभगवद्भक्त आहेस, असें मीं पूर्वीच नारदाच्या मुखांतून ऐकिलें आहे. ॥ १४ ॥ बाळा! जा, ह्या वेळीं मला स्वकीय किंवा परकीय कांहींच दिसत अथवा ओळखितां येत नाहीं.

न शृणोति च मां हन्तुं खड्गमुद्यम्य चोक्तवान् ॥ ११ ॥ धिक् त्वां गच्छेति मां
हत्वा पदा पापिभिरावृतः ॥ चतुर्भिर्मन्त्रिभिः सार्धं रामं शरणमागतः ॥ १२ ॥
तच्छ्रुत्वा कुम्भकर्णोऽपि ज्ञात्वा भ्रातरमागतम् ॥ समालिङ्ग्य च वत्स त्वं जीव
रामपदाश्रयः ॥ १३ ॥ कुलसंरक्षणार्थाय राक्षसानां हिताय च ॥ महाभागवतो
ऽसि त्वं पुरा मे नारदाच्छ्रुतम् ॥ १४ ॥ गच्छ तात ममेदानीं दृश्यते न च किंचन ॥

इति बोधितः [अपि] (११ मू.), मां हन्तुं उद्यतः पापिभिः आवृतः [रावणः] मां पदा हत्वा, 'त्वां (१२ पू.)' उक्तवान [ततः अहं] (मू.). ॥ १० ॥ ११ ॥ १२ ॥ कुम्भकर्णः अपि (१३ पू.) ज्ञात्वा, समालिङ्ग्य च [आह -] '(१३ मू.) [सन्] (१४ मू.) जीव. त्वं (१४ मू.) [इति] मे पुरा नारदात् श्रुतं. ॥ १३ ॥ १४ ॥ तात, (मू.) किंचन न दृश्यते.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

माझे नेत्र मदानें धुंद झाले आहेत; - कदाचित चुकून तुलाही प्रहार लागावयाचा! - ' ॥ १५ ॥ कुंभकर्णानें असें सांगितलें, तेव्हां विभीषणाच्या मुखावरून अश्रूंचे ओघळ वाहूं लागले. तो भावाच्या चरणांस वंदन करून रामाच्या पार्श्वभागीं आला आणि चिंताग्रस्त होऊन उभा राहिला. ॥ १६ ॥ इकडे कुंभकर्णही हातांपायांनीं वानरांना चुरीत सैन्यांत फिरूं लागला. गंधहत्तीच्या मदाचा वास आल्याबरोबर जसे हत्ती दूर दूर पळतात त्याप्रमाणें कुंभकर्णाला पाहतांक्षणीं वानरसेना भिऊन पळत सुटली. ॥ १७ ॥ त्याला पाहून रामचंद्रास क्रोध आला. त्यानें व्यवस्थितपणें वायव्यास्त्राची एका शस्त्रावर स्थापना करून तें कुंभकर्णावर

मदीयो वा परो वा ऽपि मदमत्तविलोचनः ॥ १५ ॥ इत्युक्तो ऽश्रुमुखो भ्रातुश्चरणावभिवन्द्य सः ॥ रामपार्श्वमुपागत्य चिन्तापर उपस्थितः ॥ १६ ॥ कुम्भकर्णो ऽपि हस्ताभ्यां पादाभ्यां पेषन्[1]यहरीन् ॥ चचार वानरीं सेनां कालयन् गन्ध[2]हस्तिवत् ॥ १७ ॥ दृष्ट्वा तं राघवः क्रुद्धो वायव्यं[4] शस्त्रमादरात् ॥ चिक्षेप कुम्भकर्णाय तेन चिच्छेद[7] रक्षसः ॥ १८ ॥ समुद्गरं[5] दक्षहस्तं[6] तेन घोरं ननाद सः ॥

[यतः अहं] मदमत्तविलोचनः [अस्मि]. ॥ १५ ॥ (पू.) भ्रातुः चरणौ अभिवन्द्य ॥ (मू.). ॥ १६ ॥ (पू.) पेषयन् ॥ (मू.) कालयन्[3] [सन] चचार. तं दृष्ट्वा क्रुद्धः (१८ पू.) ॥ कुम्भकर्णाय (१८ उ. १९ पू.) चिच्छेद. सः तेन घोरं ननाद. ॥

१ चुरणारा. २ ज्याच्या मदाचा वास आल्याबरोबर दुसरे हत्ती पळून जातात, त्या हत्तीला ' गंधगज ' असें ह्मणतात; त्याच्याप्रमाणें. ३ पळविणारा. ४ वायु देवता ज्याची, अशा. ५ मुद्गरसहित. ६ उजव्या हातास. ७ तोडिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

फेंकिलें आणि त्याच्या योगें त्या राक्षसाचा मुद्गरासह उजवा हात तोडिला. हात तुटल्याबरोबर कुंभकर्णानें भयंकर गर्जना केली. त्या हातानें भूमीवर पडतां पडतां अनेक वानरांना लोळविलें ! ॥ १८ ॥ १९ ॥ कांहीं धूर्त वानर कुंभकर्णाच्या अगदीं आंगाजवळ उभे होते (कुंभकर्ण हात लांब पसरून धांवे. पंज्याजवळ असतील ते त्याच्या हातांत सांपडावयाचे. वानर कसले छट. ते पंजा चुकवून त्याच्या बगलेखालीं उभे राहत व तो जसजसा फिरेल तसतसे बगलेखालून फिरत; हा त्यांचा धूर्तपणा कुंभकर्णाच्या लक्ष्यांत येत नसे). - पण आतां हात तुटला तेव्हां, - भयानें ते सगळेजण थरथर कांपूं लागले, व रामाचें राक्षसाशीं चाललेलें युद्ध टकमक पाहत जागच्याजागीं स्तब्ध उभे राहिले ! ॥ २० ॥ एक हात तुटला तरी कुंभकर्ण दुसऱ्या हातांत वृक्ष उचलून घेऊन युद्धांत रामाला मारण्यासाठीं वेगानें त्याच्या आंगावर धांवला.

स हस्तः पतितो भूमावनेकानर्दयन्कपीन् ॥ १९ ॥ पर्यन्तमाश्रिताः सर्वे वानरा भयवेपिताः ॥ रामराक्षसयोर्युद्धं पश्यन्तः पर्यवस्थिताः ॥ २० ॥ कुम्भकर्णश्छिन्नहस्तः शालमुद्यम्य वेगतः ॥ समरे राघवं हन्तुं दुद्राव तमथोऽच्छिनत् ॥ २१ ॥ शालेन सहितं वामहस्तमैन्द्रेण राघवः ॥ छिन्नबाहुमथायान्तं नर्दन्तं वीक्ष्य राघवः ॥ २२ ॥

(मू.) अर्दयन [सन] भूमौ पतितः. ॥१७॥१८॥१९॥ (पू.) वानराः ॥ (मू.) [सन्तः] पर्यवस्थिताः. ॥ २० ॥ छिन्नहस्तः (२१ मू.) राघवः तं (२२ पू.) अच्छिनत्. ॥ अथ राघवः (मू.) [तं] आयान्तं वीक्ष्य, ॥ २१ ॥ २२ ॥

१ पीडा देणारा. २ जवळच्या भागास. ३ वृक्षास. ४ उचलून. ५ धांवला. ६ तोडिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कुंभकर्णाचे हातपाय तुटले.

पण रामानें इंद्रास्त्राच्या योगें त्याचा तो वृक्षासहित डावा हातही तोडून टाकिला. दोन्ही बाहु तुटले तरी तो गर्जना करीत आंगावर येतच आहे, असें पाहून रामानें ॥ २१ ॥ २२ ॥ दोन अर्धचंद्राकृति तीक्ष्ण बाण घेतले आणि त्यांच्या योगें कुंभकर्णाचे दोन्ही पाय तोडिले. ते पाय सों सों शब्द करीत लंकेच्या दारांत जाऊन पडले; ॥ २३ ॥ दोन्ही हात व दोन्ही पाय तुटले तरी तो अतिभयंकर कुंभकर्ण, जसा राहु चंद्रावर धांवतो त्याप्रमाणें, वडवामुखासारखें आपलें मुख पसरून गर्जना करीत रामाच्या आंगावर धांवला. रघुवीरानें तीक्ष्ण अग्रांचे बाण मारून त्याचें तोंड भरून टाकिलें. ॥ २४ ॥ २५ ॥ बाणांनीं तोंड भरलें तेव्हां तो अतिभयंकर दैत्य घुरघुरूं लागला. पुढें रामानें सूर्यासारखा तेजस्वी असा एक अत्युत्तम बाण

द्वावर्धचन्द्रौ निशितावादायास्य पदद्वयम् ॥ चिच्छेद पतितौ पादौ लंकाद्वारि महास्वनौ ॥ २३ ॥ निकृत्तपाणिपादोऽपि कुम्भकर्णोऽतिभीषणः ॥ वडवामुखवद्वक्त्रं व्यादाय रघुनन्दनम् ॥ २४ ॥ अभिदुद्राव निनदन्राहुश्चन्द्रमसं यथा ॥ अपूरयत्सितैराग्रैश्च सायकैस्तद्रघूत्तमः ॥ २५ ॥ शरपूरितवक्त्रोऽसौ चुक्रोशातिभयंकरः ॥ अथ सूर्यप्रतीकाशमैन्द्रं शरमनुत्तमम् ॥ २६ ॥

(पू.) [बाणौ] आदाय अस्य पदद्वयं ॥ (मू.) [सन्तौ] लङ्काद्वारि पतितौ. ॥ २३ ॥ अतिभीषणः (मू.) ॥ २४ ॥ निनदन् [सन्], यथा (पू.), [तथा] अभिदुद्राव. ॥ रघूत्तमः तत् (मू.) अपूरयत. ॥ २५ ॥ (२६ पू.) असौ चुक्रोश. ॥ अथ रामः (२६ उ.) ॥

१ तीक्ष्ण. २ मोठा शब्द ज्यांचा, असा. ३ तोडिले हातपाय ज्याचे, असा. ४ समुद्राच्या पोटांत औरसचौरस शंभर योजनें विस्तीर्ण असें वडवाग्नीचें कुंड आहे "वडवामुख" म्हणतात: त्यासारखें. ५ मुख. ६ पसरून. ७ तीक्ष्ण अग्रें ज्यांचीं, असा. सूर्यासारख्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

घेऊन त्याच्यावर इंद्रास्त्राची स्थापना केली आणि इंद्राच्या वज्रासारखा किंवा विजेसारखा तो बाण, दैत्य मरावा एवढ्यासाठीं, त्याच्या आंगावर सोडिला. जसा इंद्राच्या वज्रानें वृत्रासुराचा वध केला, त्याप्रमाणें त्या बाणानें त्या राक्षसवीराचें मस्तक तोडून धडावेगळें केलें. तें मस्तक पर्वतासारखें प्रचंड होतें; त्यावरील कुंडलें व दाढा चमकत होत्या. तें कुंभकर्णाचें शिर लंकेच्या दारांत आदळलें आणि धड महासागरांत पडलें. ॥२६॥२७॥२८॥ त्याच्या मस्तकानें दरवाजा बंद केला व धडानें समुद्रांतील नक्रादिक प्राणी चुरून टाकिले ! कुंभकर्ण मरण पावला तेव्हां ऋषींसह देव, गंधर्व, सर्प, पक्षी, ॥ २९ ॥ सिद्ध, यक्ष, गुह्यक आणि अप्सरा

वज्राशनिसमं रामश्[1]चिक्षेपासुरमृत्यवे ॥ स तत्पर्वतसंकाशं स्फुरत्कुण्डलदंष्ट्रकम्
॥ २७ ॥ चकर्त रक्षोधिपतेः शिरो वृत्रमिवा[4]शनिः ॥ तच्छिरः पतितं लंकाद्[5]वारि
[6]कायो महोदधौ ॥ २८ ॥ शिरो ऽस्यारो[7]धयद्द्वारं कायो नक्राद्यचूर्णयत् ॥ ततो देवाः
सऋषयो गन्धर्वाः [8]पन्नगाः [9]खगाः ॥ २९ ॥ सिद्धा यक्षा गुह्यकाश्च अप्सरोभिश्च
राघवम् ॥ [10]ईडिरे [11]कुसुमासारैर्वर्षन्तश्चाभिनन्दिताः ॥ ३० ॥

(२७ पू.) ऐन्द्रं शरं [2]असुरमृत्यवे चिक्षेप[3]. (मू.) ॥ २६ ॥ २७ ॥ (पू.) वृत्रं इव चकर्त. ॥ (मू.) पतितं; कायः [च] महोदधौ [पतितः]. ॥ २८ ॥ अस्य शिरः द्वारं (मू.) ॥ २९ ॥ (पू.) [सह] राघवं ॥(मू.) [सन्तः] अभिनन्दिताः. ॥ ३० ॥

१ इंद्र देवता ज्याची, अशा. २ राक्षस मरावा ह्मणून. ३ फेंकिता झाला. ४ वज्र. ५ कापिता झाला. ६ धड. ७ बंद करितें झालें. ८ सर्प. ९ पक्षी १० स्तुति करिते झाले. ११ पुष्पवृष्टीच्या योगें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशा सर्वांना आनंद झाला. त्यांनीं रामावर ओंजळीच्याओंजळी फुलें उधळलीं व त्याची स्तुति केली. ॥ ३० ॥ त्या प्रसंगीं श्रेष्ठ देवर्षि नारद रामचंद्राच्या दर्शनासाठीं आकाशांतून त्वरेनें खालीं आले. त्यांची अंगकांति जिकडेतिकडे फांकल्यामुळें दशदिशा उज्वल दिसूं लागल्या. ॥ ३१ ॥ रामाचा शरीरवर्ण नीलकमलाप्रमाणें श्यामल होता; मूर्ति अतिसुंदर; हातांत धनुष्य धारण केलेलें; नेत्र किंचित् रक्तवर्ण व विशाल; दुसरा हात इंद्रास्त्रानें गुंतविलेला; ॥ ३२ ॥ असा तो प्रभु, बाणांच्या प्रहारांनीं विव्हल होऊन पडलेल्या वानरांकडे, दयार्द्र दृष्टीनें पाहत होता. ती मूर्ति पाहून नारदाच्या अंतरीं भक्ति उचंबळली. त्यानें सद्गदित वाणीच्या योगें प्रभूची स्तुति करण्यास प्रारंभ केला :– ॥ ३३ ॥ नारद ह्मणाला:– "हे देवाधिदेवा ! तूं सर्व जगाचा स्वामी सनातन परमात्मा आहेस. ज्याला नारायण

आजगाम तदा रामं द्रष्टुं देवमुनीश्वरः ॥ नारदो गगनात्तूर्णं स्वभासा भासयन्दिशः ॥ ३१॥ राममिन्दीवरश्याममुदारांगं धनुर्धरम् ॥ ईषत्ताम्रविशालाक्षमैन्द्रास्त्राञ्चितबाहुकम् ॥ ३२ ॥ दयार्द्रदृष्ट्या पश्यन्तं वानरान् शरपीडितान् ॥ दृष्ट्वा गद्गदया वाचा भक्त्या स्तोतुं प्रचक्रमे ॥ ३३ ॥ नारद उवाच ॥देवदेव जगन्नाथ परमात्मन्सनातन ॥ नारायणाखिलाधार विश्वसाक्षिन्नमो ऽस्तु ते ॥ ३४ ॥

(पू.) नारदः रामं द्रष्टुं, (मू.) भासयन् [सन्] गगनात् तूर्णं आजगाम. ॥ ३१ ॥ [सः] (३२मू.३३) वानरान् पश्यन्तं रामं (मू.) – ॥ ३२॥३३ ॥ नारदः उ० – ' (मू.) नमः अस्तु. ॥३४॥

१ किंचित् तांबूस असे विशाल नेत्र ज्याचे अशा. २ ऐंद्र अस्त्रानें युक्त बाहु ज्याचा, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असें ह्मणतात, तो सकल जगाचा आधार व सर्व विश्वाचा साक्षी तूंच. तुला नमस्कार असो. ॥३४॥ अतिनिर्मल ज्ञान हेंच तुझें वास्तव स्वरूप होय. असें असतांही तूं मायेच्या योगें मनुष्य अवतार घेऊन ' मला इतर जीवांप्रमाणेंच सुखदुःखें भोगावीं लागतात, ' असें दाखवितोस; पण ही केवळ तुझी लोकांना पूर्णपणें फसविण्याची एक युक्ति आहे! ॥३५॥ तूं, सर्वांच्या हृदयांत राहत असूनही, मायेनें आच्छादिला असतोस ह्मणून कोणाला ओळखूं येत नाहींस. - तुझें स्वरूप स्वयंप्रकाश आहे. ज्यांचीं अंतःकरणें शुद्ध होतात, त्यांना तुझें स्पष्ट दर्शन मिळतें. ॥३६॥ रामा! तूं स्वतांचे नेत्र उघडतोस व त्यायोगें हें त्रैलोक्य उत्पन्न करितोस. तसेंच तूं आपले डोळे मिटतोस, आणि त्या रीतीनें विश्वाचा लय करितोस (तुझ्या डोळ्यांची उघडझांप हेच

विशुद्धज्ञानरूपो ऽपि त्वं लोकानतिवञ्चयन्[1] ॥ मायया मनुजाकारः सुखदुःखादिमानिव ॥३५॥ त्वं मायया गूह्यमानः सर्वेषां हृदि संस्थितः ॥ स्वयंज्योतिः[2]-स्वभावस्त्वं व्यक्त एवामलात्मनाम्[4] ॥ ३६ ॥ उन्मीलयन् सृजस्येतन्नेत्रे राम जगत्त्रयम् ॥ उपसंह्रियते सर्वं त्वया चक्षुर्निमीलनात्[6] ॥ ३७ ॥

(मू.) [भासि]. ॥ ३५ ॥ (पू.) त्वं मायया गूह्यमानः[3] [भवसि]. ॥ (मू.) व्यक्तः एव [असि]. ॥ ३६ ॥ राम, [त्वं] नेत्रे उन्मीलयन्[5] [सन्] (पू.) सृजसि. ॥ त्वया (मू.) उपसंह्रियते[7]. ॥३७॥

---

१ अतिशय फसविणारा. २ स्वयंप्रकाश. ३ आच्छादिला जाणारा. ४ निर्मल मनें ज्यांचीं अशांना. ५ उघडणारा. ६ डोळे मिटण्यामुळें. ७ आटोपून घेतलें जातें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जगाचे उत्पत्तिलय होत). ॥३७॥ ज्याच्या आधारानें हें सर्व जग भासतें, ज्याच्यापासून विश्वाचे उत्पत्ति स्थितिलय होतात, व ज्याच्याहून अधिक असें लोकांत कांहीं नाहीं, तें ब्रह्म तूं होस : तुला नमस्कार असो. ॥ ३८ ॥ प्रकृति, पुरुष, आणि स्पष्ट समजणारा (निमेषापासून संवत्सर वगैरे) व स्पष्ट न कळणारा (अणूपासून क्षणापर्यंत) काल हीं ज्याचीं रूपें, असें श्रेष्ठ मुनि समजतात, तो तूंच आहेस. रामा, तुला नमस्कार असो. ॥३९॥ वेदांनीं कित्येक स्थलीं, तुझें स्वरूप विकाररहित व शुद्ध ज्ञानमय होय, असें ह्मटलें आहे : बरें, तेच वेद कांहीं ठिकाणीं, सर्व जग हाच तुझ्या मूर्तीचा आकार, असेंही ह्मणतात. ॥ ४० ॥ देवा, - कोणी ‘ तुझें रूप निर्विकार ’ ह्मणतात; कांहीं लोक ‘ जग हेंच तुझें रूप ’ ह्मणतात, जग तर

यस्मिन्सर्वमिदं भाति यतश्चैतच्चराचरम् ॥ यस्मान्न किंचिल्लोके ऽस्मिंस्तस्मै ते ब्रह्मणे नमः ॥ ३८ ॥ प्रकृतिं पुरुषं कालं व्यक्ताव्यक्तस्वरूपिणम् ॥ यं जानन्ति मुनिश्रेष्ठास्तस्मै रामाय ते नमः ॥ ३९ ॥ विकाररहितं शुद्धं ज्ञानरूपं श्रुतिर्जगौ ॥ त्वां सर्वजगदाकारमूर्तिं चाप्याह सा श्रुतिः ॥ ४० ॥ विरोधो दृश्यते देव वैदिको वेदवादिनाम् ॥ निश्चयं नाधि[2]गच्छन्ति त्वत्प्रसादं विना ऽबुधाः ॥ ४१ ॥

(पू.) [जायते]. ॥ अस्मिन् लोके (मू.). ॥ ३८ ॥ मुनिश्रेष्ठाः यं (पू.) कालं [च] (मू.) ॥ ३९ ॥ श्रुतिः [त्वां] (पू) ॥ सा श्रुतिः (मू.). ॥४०॥ (पू) वैदिकः विरोधः दृश्यते. ॥ अबुधाः त्वत्प्रसादं विना (मू.). ॥ ४१ ॥

१ माती झाली. २ पावतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वेकारी आहे:- एकंदरींत वेदवादी पुरुषांचा अशा वचनांवरून वेदविषयक विरोध वरकमीं एकदम दिसून येतो. तुझी कृपा झाली नाहीं तोंपर्यंत लोक अज्ञानीच असायाचे. त्यांना वेदवचनांचा निश्चित (परस्परांस विरुद्ध नसणारा) अर्थ कळावयाचा नाहीं. ॥ ४१ ॥ - तुझा प्रसाद झाला असतां जो निश्चय समजतो, तो हा :- देवा! तूं मायेच्या योगें क्रीडा करीत असतोस असें ह्मटलें ह्मणजे वेदवचनांत कोणताही विरोध राहत नाहीं : पहा :- जसा सूर्याचा किरणसमूह भ्रमामुळें उदकासारखा भासतो, ॥ ४२ ॥ त्याप्रमाणें, रामा ! हें सर्व जग तुझ्या ठिकाणीं भ्रांतिज्ञानामुळें कल्पिलें जात असतें. - अर्थात, तुझें विकार पावणारें विश्वरूप केवळ मायिक होय; वास्तव ज्ञानरूप तर विकाररहित आहेच, हा सिद्धांत ठरतो व वेदवचनांची अशा प्रकारें एकवाक्यता होते. - देवा! तुझें निर्गुण केवल रूप मनाला कळण्याजोगें देखील नाहीं, ॥ ४३ ॥ तें दिसेल कसें? दिसत नाहीं तर मनुष्यानें भक्ति तरी करावी कशी? ह्मणून ह्या भूतलावर बुद्धिमान् लोक,

मायया क्रीडतो देव न विरोधो [1]मनागपि ॥ रश्मि[3]जालं रवे[2]र्यद्वद्दृश्यते जलवद्भ्रमात्
॥ ४२ ॥ भ्रान्तिज्ञानात्तथा राम त्वयि सर्वं प्रकल्प्यते ॥ मनसोऽवि[4]षयो देव रूपं
ते निर्गुणं परम् ॥ ४३ ॥ कथं दृश्यं भवेद्देव [5]दृश्याभावे [6]भजेत्कथम् ॥ अतस्तवा-
वतारेषु रूपाणि निपुणा भुवि ॥ ४४ ॥

देव, (पू.) विरोधः न.॥ यद्वत् रवेः (मू.) जलवत् दृश्यते, ॥ ४२ ॥ तथा राम, (पू.). ॥ देव, (मू.) ते रूपं ॥ ४३ ॥ दृश्यं (४४ पू) भजेत् ? ॥ अतः भुवि बुद्धिसम्पन्नाः निपुणाः (४४उ.) ॥

१ मनाक् किंचित्. २ सूर्याचें. ३ किरणसमूह. ४ न समजण्याजोगें. ५ दिसण्याजोगें नाहीं तेव्हां. ६ सेवा करावा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'मी तुझें चिंतन करितों.'

तूं वेगवेगळ्या अवतारीं जीं जीं रूपें धरितोस, ॥ ४४ ॥ त्यांचें भजन करितात. पुढें तेच ज्ञानसंपन्न होऊन संसारसमुद्रांतून तरून जातात. भक्तिमार्गांत कामक्रोध इत्यादि अनेक शत्रु आहेत. ॥ ४५ ॥ जसे बोके उंदराला घाबरावितात, त्याप्रमाणें हे शत्रु नेहमीं अंतःकरणाला भिववीत असतात. तुझें नामस्मरण करणाऱ्या जनांच्या अंतरीं तुझें रूपही नित्य प्रकट राहतें. ॥ ४६ ॥ रामा ! हा संसार - समुद्रासारखा विस्तीर्ण आहे खरा; - परंतु, जे लोक तुझी पूजा करण्यांत तत्पर असतात, तुझें कथामृत प्राशन करण्याकडे चित्ताची प्रवृत्ति ठेवितात आणि तुझ्या भक्तांची संगत धरितात, त्यांना तो (संसारसमुद्र) - चिखलांत उमटलेल्या - गाईच्या पावलांत सांचलेल्या पाण्याप्रमाणें अल्प वाटूं लागतो. ॥ ४७ ॥ ह्यासाठीं देवा ! मी तुझ्या सगुण

भजन्ति बुद्धिसंपन्नास्तरन्त्येव भवार्णवम् ॥ कामक्रोधादयस्तत्र बहवः परिपन्थिनः ॥ ४५ ॥ भीषयन्ति सदा चेतो मार्जारा मूषकं यथा ॥ त्वन्नाम स्मरतां नित्यं त्वद्रूपमपि मानसे ॥४६॥ त्वत्पूजानिरतानां ते कथामृतपरात्मनाम् ॥ त्वद्भक्तसंगिनां राम संसारो गोष्पदायते ॥ ४७ ॥ अतस्ते सगुणं रूपं ध्यात्वा ऽहं सर्वदा हृदि ॥ मुक्तश्चरामि लोकेषु पूज्यो ऽहं सर्वदैवतैः ॥ ४८ ॥

भजन्ति, [तावता] भवार्णवं (४१ पू.). ॥ तत्र (मू.), ॥ ४४ ॥ ४५ ॥ यथा मार्जाराः मूषकं, [तथा] (पू.) भीषयन्ति. ॥ नित्यं (मू.) [भवति]. ॥ ४६ ॥ राम, (मू). ॥ ४७ ॥ अतः अहं (पू.) ध्यात्वा, ॥ मुक्तः [सन] लोकेषु (मू.) पूज्यः. ॥ ४८ ॥

१ शत्रु. २ उंदराला. ३ भिवावितात. ४ अंतरीं. ५ चिखलांत उमटलेल्या गाईच्या पावलासारखा होतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रूपाचें हृदयांत सर्वदा चिंतन करीत त्रैलोक्यामध्यें फिरत असतों. - तुझ्या ध्यानाच्या प्रभावानें - मी संसा-तापांतून सुटलों आहें; व ह्मणूनच सर्व देवता मला पूज्य मानितात. ॥ ४८ ॥ रामा! तूं देवांचें हित करण्याच्या इच्छेनें आज मोठें कार्य पार पाडिलेंस : प्रभो! कुंभकर्ण मरण पावला, त्याअर्थी भूमीचा भार उतरलाच, - असें मानावयास चिंता नाहीं. - ॥४९॥ उद्यां लक्ष्मण युद्धामध्यें इंद्रजिताचा वध करील; आणि रामा! परवांचें दिवशीं तूं दशाननाला मारशील! ॥ ५० ॥ देवाधिदेवा! मी सिद्धांसह आकाशांत उभा राहून हा सर्व प्रकार पाहीन. देवा! मजवर कृपादृष्टि असूं दे. मी आतां देवलोकीं जातों." ॥ ५१ ॥ त्रिकालज्ञानी नारदऋषि इतकें बोलून व रामाचा निरोप घेऊन निष्पाप अशा ब्रह्मलोकीं गेले. जातांना वाटेंत देवांनीं त्यांची पूजा केली. ॥ ५२ ॥

राम त्वया महत्कार्यं कृतं देवहितेच्छया ॥ कुम्भकर्णवधेनाद्य भूभारोऽयं गतः प्रभो ॥ ४९ ॥ श्वो[1] हनिष्यति सौमित्रिरिन्द्रजेतारमाहवे[2] ॥ हनिष्यसेऽथ राम त्वं परश्वो[3] दशकन्धरम् ॥ ५० ॥ पश्यामि सर्वं देवेश सिद्धैः सह नभोगतः[4] ॥ अनु[5]-गृह्णीष्व मां देव गमिष्यामि सुरालयम्[6] ॥ ५१ ॥ इत्युक्त्वा राममामन्त्र्य[7] नारदो भगवानृषिः ॥ ययौ देवैः पूज्यमानो ब्रह्मलोकमकल्मषम्[8] ॥ ५२ ॥

(पू.) महत् कार्यं कृतं. ॥ प्रभो, अद्य (मू.) भूभारः गतः. ॥ ४९ ॥ (पू.) हनिष्यति. ॥ (मू.) हनिष्यसे. ॥ ५० ॥ (पू.) [अहं] सर्वं पश्यामि. ॥ देव मां (मू.) गमिष्यामि.' ॥ ५१ ॥ भगवान ऋषिः नारदः (मू.) [सन] अकल्मषं ब्रह्मलोकं ययौ. ॥ ५२ ॥

१ उद्यां २ युद्धांत. ३ परवां. ४ आकाशांत आलेला. ५ कृपा कर. ६ स्वर्गास. ७ विचारून (निरोप घेऊन). ८ निष्पाप.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'राम कोणतेंही कार्य सफाईनें किंवा आयासावांचून पार पाडितो : त्यानें आपला (रावणाचा) महापराक्रमी भाऊ कुंभकर्ण मारिला,' ही गोष्ट रावणाच्या कानीं गेली; तेव्हां शोकामुळें त्याचें सर्वांग तप्त झालें. ॥५३॥ प्रथम तर तो मूर्छा येऊन भूमीवर पडला, पण कांहीं वेळानें शुद्धीवर आला व विलाप करूं लागला. इंद्रजिताला, चुलता मृत्यु पावला, ही वार्ता कळली, आणि पिता अत्यंत व्याकुळ होऊन पडला आहे, - असें दिसून आलें; - तेव्हां तो शोकानें विव्हळ झालेल्या पित्याला ह्मणाला :– ' राजाधिराजा, आपण पोक्त विचारी आहां; - मी आपल्याला सांगावें असें नाहीं; परंतु - शोक करणें सोडून द्या. मी महाबलाढ्य मेघनाद जीवंत असतांना ॥ ५४ ॥ ५५ ॥ आपल्याला शोक करण्याचा प्रसंग येईल कोठून? महाबुद्धिमता !

भ्रातरं निहतं श्रुत्वा कुम्भकर्णं महाबलम् ॥ रावणः शोकसंतप्तो रामेणाक्लिष्टकर्मणा ॥ ५३ ॥ मूर्च्छितः पतितो भूमावुत्थाय विललाप ह ॥ पितृव्यं निहतं श्रुत्वा पितरं चातिविह्वलम् ॥ ५४ ॥ इन्द्रजित्प्राह शोकार्तं त्यज शोकं महामते ॥ मयि जीवति राजेन्द्र मेघनादे महाबले ॥ ५५ ॥ दुःखस्यावसरः कुत्र देवान्तक महामते ॥ व्येतु ते दुःखमखिलं स्वस्थो भव महीपते ॥ ५६ ॥

(पू.) भ्रातरं अक्लिष्टकर्मणा रामेण निहतं श्रुत्वा शोकसन्तप्तः रावणः ॥५३॥ मूर्छितः, भूमौ पतितः [च], (मू.) [दृष्ट्वा], ॥ ५४ ॥ इन्द्रजित् शोकार्तं रावणं प्राह – ' महामते, शोकं त्यज. ॥(मू.) मयि जीवति [सति], ॥५५॥ (पू.). ॥ते अखिलं दुःखं (मू.), स्वस्थः भव. ॥५६॥

१ अनायासें कर्म होतें ज्याचें, अशा. २ शोक करूं लागला. ३ चुलत्याला. ४ देवांचा नाश करणाऱ्या. ५ दूर होवो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आपण देवांशीं शत्रुत्व बांधून त्यांना देखील जर्जर करून सोडिलें, - मग यःकश्चित् मानवाची भीति काय म्हणून धरितां ? - पृथ्वीपते ! आपलें सकल दुःख दूर होवो. आपण स्वस्थ असा. ॥ ९६ ॥ मी शत्रूं-कडील - मुख्य वीर - मारून त्यांचें आणि आपलें दुःख व बल सारखें करून सोडितों. आगोदर निकुंभि-लेंत (विवरांत) जाऊन अग्नीला प्रसन्न करून घेतों ॥ ९७ ॥ व त्याच्यापासून रथादि सामग्री मिळवितों. म्हणजे शत्रूला माझा पराभव करितां येणार नाहीं. ' इतकें बोलून इंद्रजित लागलाच वर सांगितलेल्या होम-स्थलीं गेला. ॥ ९८ ॥ निकुंभिलास्थानीं जाऊन पोंचल्यावर त्यानें तांबडीं फुलें व वस्त्रें आंगावर धारण केलीं, रक्तचंदनाची उटी लावली आणि मौन व्रत स्वीकारून हवन करण्यास प्रारंभ केला. ॥ ९९ ॥ विभीषणाला इंद्रजिताच्या ह्या कृत्याची बातमी कळली. तेव्हां त्यानें रामाला त्या दुष्टानें आरंभिलेल्या होमाचा

सर्वं समीकरिष्यामि हनिष्यामि च वै रिपून् ॥ गत्वा निकुम्भिलां सद्यस्तर्पयित्वा हुता-शनम् ॥ ५७ ॥ लब्ध्वा रथादिकं तस्मादजेयोऽहं भवाम्यरेः ॥ इत्युक्त्वा त्वरितं गत्वा निर्दिष्टं हवनस्थलम् ॥ ५८ ॥ रक्तमाल्याम्बरधरो रक्तगन्धानुलेपनः ॥ निकुम्भिला-स्थले मौनी हवनायोपचक्रमे ॥५९॥ विभीषणोऽथ तच्छ्रुत्वा मेघनादस्य चेष्टितम् ॥

(पू.) हनिष्यामि च, ॥ निकुम्भिलां (मू.) तर्पयित्वा, ॥ ५७ ॥ रथादिकं (पू.) अजेयः भवा-मि. ॥' (मू.) गत्वा, ॥ ५८ ॥ (पू.) ॥ मौनी [सन्] (मू.). ॥ ५९ ॥ अथ (पू.) श्रुत्वा, ॥

१ त्यांची आपली स्थिति सारखी करीन. २ विवरास. ३ अग्नीला. ४ तृप्त करून. ५ पराभव न पावणारा. ६ होम करण्या-च्या स्थानास. ७ तांबडीं फुलें व वस्त्रें धारण करणारा. ८ आरंभिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इंद्रजिताबद्दल बिभीषणाचें मत.

सकल वृत्तांत सांगून ह्मटलें :— ॥ ६० ॥ ' रामा ! मेघनादाची बुद्धि अत्यंत दुष्ट आहे; त्यानें आरंभिलेला हा होम निर्विघ्नपणें शेवटास गेला, तर मेघनादाचा पराभव देवांना किंवा दैत्यांनाही करितां येणार नाहीं ! ॥६१॥ ह्मणून, मी लवकर - जाऊन - लक्ष्मणाकडून रावणपुत्राचा वध करवितों. हे बलवच्छ्रेष्ठा ! लक्ष्मणाला मजबरोबर चलण्यास आज्ञा दे. तुझा कनिष्ठ बंधु मेघनादाचा वध करील, ह्यांत संदेह नाहीं. ' ॥ ६२ ॥ श्रीरामचंद्र ह्मणाला:— 'बिभीषणा! इंद्रजिताला मारण्यासाठीं मीच येतों ह्मणजे झालें. मजजवळ सर्व राक्षसांचा घात करण्यास समर्थ असें प्रचंड आग्नेय अस्त्र आहे, त्याच्या योगें मी शत्रूचा - वध करीन. - ' ॥ ६३ ॥

प्राह रामाय सकलं होमारम्भं दुरात्मानः ॥ ६० ॥ समाप्यते चेद्धोमो ऽयं मेघनादस्य दुर्मतेः ॥ तदा ऽजेयो भवेद्राम मेघनादः सुरासुरैः ॥ ६१ ॥ अतः शीघ्रं लक्ष्मणेन घातयिष्यामि रावणिम् ॥ आज्ञापय मया सार्धं लक्ष्मणं बलिनांवरम् ॥ हनिष्यति न संदेहो मेघनादं तवानुजः ॥ ६२ ॥ श्रीरामउवाच ॥ अहमेवागमिष्यामि हन्तुमिन्द्रजितं रिपुम् ॥ आग्नेयेन महास्त्रेण सर्वराक्षसघातिना ॥ ६३ ॥

(मू.) होमारम्भं प्राह — ॥ ६० ॥ ' दुर्मतेः मेघनादस्य अयं होमः (मू.) अजेयः भवेत्. ॥६१॥ (पू.) घातयिष्यामि. ॥ (द्वि.) लक्ष्मणं आज्ञापय. ॥ तत्र अनुजः मेघनादं (मू.) न. ' ॥६२॥ श्रीराम उवाच — ॥ ' (मू.) महास्त्रेण हन्तुं आगमिष्यामि.' ॥ ६३ ॥

१ संपविला जातो. २ रावणाच्या पुत्राला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विभीषणानेंही त्याला सांगितलें :– ‘ रामा ! ह्याचा वध भलत्याच्या हातून होणें नाहीं. जो पुरुष बारा वर्षेंपर्यंत झोंप व आहार वर्ज करून राहिला असेल, ॥६४॥ त्याच्याच हातून ह्या दुष्टाचा वध होईल, असा ब्रह्मदेवाचा संकेत आहे. लक्ष्मणामध्यें मात्र ते गुण दिसून येतात. तो तुजबरोबर अयोध्येंतून निघून आला, ॥ ६५ ॥तेव्हांपासून, राजाधिराजा रघुवीरा ! तुझ्या सेवेंत दक्ष असतो; ह्मणून त्याला झोंपेचें व आहाराचें स्मरण देखील होत नाहीं. हें सर्व मला ठाऊक आहे. ॥६६॥ ह्मणून, देवाधिदेवा ! लक्ष्मणाला सत्वर मजबरोबर जाण्याविषयीं आज्ञा दे. तो इंद्रजिताला मारील, ह्यांत संशय नाहीं; तो साक्षात् पृथ्वीला मस्तकीं

विभीषणो ऽपि तं प्राह नासावन्यैर्निहन्यते ॥ यस्तु द्वादशवर्षाणि निद्राहारविवर्जितः ॥६४॥ तेनैव मृत्युर्निर्दिष्टो ब्रह्मणा ऽस्य दुरात्मनः ॥ लक्ष्मणस्तु अयोध्याया निर्गम्यायात्त्वया सह ॥ ६५॥ तदादि निद्राहारादीन्न जानाति रघूत्तम ॥ सेवार्थं तव राजेन्द्र ज्ञातं सर्वमिदं मया ॥ ६६ ॥ तदाज्ञापय देवेश लक्ष्मणं त्वरया मया ॥ हनिष्यति न संदेहः शेषः साक्षाद्धराधरः ॥ ६७ ॥

(पू.) – ‘ असौ अन्यैः न निं[1]हन्यते. ॥(मू.), ॥ ६४ ॥ (पू.) अस्य तेन एव मृत्युः निर्दि[2]ष्टः. ॥ (मू.) [यत्[3]प्रभृति] अयोध्यायाः निर्[4]गम्य [5]आयात्, ॥ ६५ ॥ रघूत्तम, तदादि तव सेवार्थं (मू.) इदं सर्वं ज्ञातं. ॥६६॥ (पू.) [सह] लक्ष्मणं आज्ञापय. ॥ [सः] साक्षात् [6]धराधरः शेषः (मू.). ॥६७॥

१ मारिला जातो. २ ठरविलेला. ३ जेव्हांपासून. ४ निघून. ५ आला. ६ पृथ्वीला उचलून धरणारा. ६।१८

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

धरणारा शेष आहे. ॥ ६७ ॥ रामा ! तूं चतुर्दश भुवनांचा अधिपति साक्षात् नारायण आहेस व लक्ष्मण तर शेष होय. तुम्ही दोघे जगद्रूपी नाटकाचे सूत्रधार असून पृथ्वीचा भार उतरण्यासाठीं येथें अवतरलां आहां. ' ॥ ६८ ॥ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे युद्धकाण्डे अष्टमः सर्गः ॥ ८ ॥

विभीषणाचें भाषण ऐकून घेतल्यावर राम ह्मणाला :– ' विभीषणा ! त्या भयंकर राक्षसाचें सगळें कपट मला अवगत आहे– ॥ १ ॥ तो महापराक्रमी, शूर व कपटी असून ब्रह्मास्त्राचे उपक्रमोपसंहार (ब्रह्मास्त्र टाकावें कसें व परत घ्यावें कसें तें) जाणतो. लक्ष्मणाचें स्वरूप व त्यानें केलेली सेवा ही मी जाणून आहें. ॥ २ ॥ - लक्ष्मण स्वतांचे हाल करून माझी सेवा करितो - हें कळत असूनही मी त्याला - निषेधिलें नाहीं

त्वमेव साक्षाज्जगतामधीशो नारायणो लक्ष्मण एव शेषः ॥ युवां धराभारनिवारणार्थं जातौ जगन्नाटकसूत्रधारौ[1] ॥ ६८॥ इति अ॰रा॰युद्धकाण्डे अष्टमः सर्गः ॥८॥ विभीषणवचः श्रुत्वा रामो वाक्यमथाब्रवीत् ॥ जानामि तस्य रौद्रस्य[2] मायां कृत्स्नां[3] विभीषण ॥ १ ॥ स हि ब्रह्मास्त्रवित्[4] शूरो मायावी च महाबलः ॥ जानामि लक्ष्मणस्यापि स्वरूपं मम सेवनम् ॥ २ ॥ ज्ञात्वैवासमहं[5] तूष्णीं भविष्यत्कार्यगौरवात् ॥

(मू.) जातौ. ' ॥ ६८ ॥ इति युद्धकाण्डे अष्टमः सर्गः ॥ ८ ॥ अथ रामः (पू.) वाक्यं अब्रवीत् – ॥ ' विभीषण, (मू.) मायां जानामि. ॥ १ ॥ (पू.). ॥ अहं (मू.) स्वरूपं जानामि. ॥ २ ॥ अहं (पू.) तूष्णीं आसं. ' ॥

१ सृष्टिरूपी नाटकाचे चालक. २ अति तामस, अशा. ३ सगळ्या. ४ ब्रह्मास्त्रास जाणणारा. ५ होतों.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

(‘ स्वतांचे हाल करून घेऊं नको, कांहीं खात जा; झोंप घे, ’ असें सांगितलें नाहीं)- ह्याचें कारण, मला, त्याच्या हातून पुढें महत्त्वाचें कार्य (इंद्रजिताचा वध) व्हावयाचें आहे, असें दिसत होतें, हें होय. ’ इतकें बोलून त्या महाज्ञानी पुरुषानें लक्ष्मणाला हांक मारिली व सांगितलें :– ॥ ३ ॥ ‘ लक्ष्मणा ! मोठें सैन्य बरोबर घेऊन जा आणि रावणाच्या पुत्राचा वध कर. लक्ष्मणा ! मारुति आदिकरून सर्व सेनापतींना समागमें असूं दे. ॥४ ॥ अस्वलांचा राजा जांबवान आपल्या सैन्यासह तुजबरोबर येईल[1]. विभीषणही सचिवांना घेऊन तुझ्या संगतीं येत आहे. ॥५॥ ह्याला त्या प्रदेशाची चांगली माहिती आहे. विवरें कोठें आहेत, तीं सर्व हा जाणितो. ’ रामाची आज्ञा लक्ष्मणानें ऐकून शिरसा मान्य केली. विभीषण जवळ होताच. ॥ ६ ॥

इत्युक्त्वा लक्ष्मणं प्राह रामो ज्ञानवतां वरः ॥ ३ ॥ गच्छ लक्ष्मण सैन्येन महता जहि रावणिम् ॥ हनूमत्प्रमुखैः सर्वैर्यूथपैः सह लक्ष्मण ॥ ४ ॥ जाम्बवानृक्षराजोऽयं सह सैन्येन संवृतः ॥ विभीषणश्च सचिवैः सह त्वामभियास्यति ॥ ५ ॥ अभिज्ञस्तस्य देशस्य जानाति विवराणि सः ॥ रामस्य वचनं श्रुत्वा लक्ष्मणः सविभीषणः ॥ ६ ॥

ज्ञानवतांवरः रामः (मू.) – ॥ ३ ॥ ‘लक्ष्मण, लक्ष्मण, महता (मू.) गच्छ; रावणिं जहि. ॥४॥ सैन्येन सह संवृतः अयं (मू.). ॥५॥ अभिज्ञः[2] सः (६ पू.) जानाति. ’ ॥ भीमपराक्रमः सविभीषणः लक्ष्मणः (६ मू.) ॥

---

१ येईल. २ ज्ञाता (माहितगार).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लक्ष्मणाचा पराक्रम फार प्रखर असे. त्यानें हातांत दुसरें मोठें धनुष्य घेतलें आणि रामाच्या चरणकमलास स्पर्श (वंदन) करून प्रसन्न मुद्रेनें भाषण केलें :- ॥ ७ ॥ ' आज माझ्या धनुष्यापासून सुटलेले बाण इंद्रजिताचें शरीर फाडून भोगावतीच्या उदकांत स्नान करण्यासाठीं पाताळीं जाणार !' ॥८॥ तो लक्ष्मण इतकें बोलून आणि रामाला प्रदक्षिणा घालून इंद्रजिताला मारण्यासाठीं त्वरेनें पावलें उचलीत चालूं लागला. ॥ ९ ॥ पाठीमागून मारुति, बरोबर अनेक सहस्र वानर घेऊन, निघाला. विभीषणही मंत्र्यांसह त्वरित

जग्राह[1] कार्मुकं श्रेष्ठमन्यद्भीमपराक्रमः ॥ रामपादाम्बुजं स्पृष्ट्वा[3] हृष्टः सौमित्रिर-ब्रवीत् ॥ ७ ॥ अद्य मत्कार्मुकान्मुक्ताः शरा निर्भिद्य[4] रावणिम् ॥ गमिष्यन्ति हि पातालं स्नातुं भोगावतीजले[5] ॥ ८ ॥ एवमुक्त्वा स सौमित्रिः परिक्रम्य[7] प्रणम्य तम् ॥ इन्द्रजिन्निधनाकांक्षी[8] ययौ त्वरितविक्रमः ॥ ९ ॥ वानरैर्बहुसाहस्रैर्हनुमा-न्पृष्ठतोऽन्वगात् ॥ विभीषणश्च सहितो मन्त्रिभिस्त्वरितं ययौ ॥ १० ॥

अन्यत् श्रेष्ठं कार्मुकं (मू.) - ॥ ६ ॥ ७ ॥ '(पू.) निर्भिद्य, ॥ (मू.) स्नातुं[6] गमिष्यन्ति.' ॥८॥ त्वरितविक्रमः सः सौमित्रिः तं (पू.) [च] (मू.) [सन्] ययौ. ॥ ९ ॥ हनूमान् बहुसाहस्रैः वानरैः [सह] (पू.). ॥ मन्त्रिभिः सहितः (मू.). ॥ १० ॥

१ धनुष्यास. २ धरिता झाला. ३ स्पर्श करून. ४ विदारण करून. ५ पाताळगंगेच्या उदकांत. ६ स्नान करण्यास. ७ प्रदक्षिणा घालून. ८ इंद्रजिताला मारण्याची इच्छा करणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चालला. ॥ १० ॥ जांबवान व त्याच्या हाताखालचे रीस लक्ष्मणामागें घाईंघाईनें चालूं लागले. लक्ष्मण वानरांसह, निकुंभिला जेथें होती, त्या प्रदेशीं जाऊन पोंचला; ॥ ११ ॥ इतक्यांत दुरून एक सैन्याचा घोळका त्याच्या दृष्टीस पडला. तो समुदाय राक्षसांचा होता. महापराक्रमी लक्ष्मण धनुष्य लववून (सज्य करून) सिद्ध झाला. ॥ १२ ॥ त्याच्या बरोबर वीर अंगद आणि जांबवान हे दोघे तयार झाले. त्या वेळीं राक्षसाधिपति विभीषण लक्ष्मणाला ह्मणाला :– ' लक्ष्मणा ! हे राक्षस पहा. ॥ १३ ॥ हें जें मेघांसारखें काळें कुळकुळीत राक्षसांचें सैन्य दिसत आहे, त्या ह्या प्रचंड फळीला फोडण्याचा यत्न चालूं दे. ॥ १४ ॥

जाम्बवत्प्रमुखा ऋक्षाः सौमित्रिं त्वरया ऽन्वगुः[1]॥ गत्वा निकुम्भिलादेशं लक्ष्मणो वानरैः सह ॥ ११ ॥ अपश्यद्बलसंघातं दूराद्राक्षससंकुलम् ॥ धनुरायम्य[4] सौमित्रि-र्यत्तो[5] ऽभूद्भूरिविक्रमः ॥ १२ ॥ अंगदेन च वीरेण जाम्बवान् राक्षसाधिपः ॥ तदा विभीषणः प्राह सौमित्रिं पश्य राक्षसान् ॥ १३ ॥ यदेतद्राक्षसानीकं मेघश्यामं[6] विलोक्यते ॥ अस्यानीकस्य महतो भेदने यत्नवान् भव ॥ १४ ॥

(मू.) निकुम्भिलोदशं गत्वा, ॥११॥ (पू.) बलसंघातं[2] अपश्यत्. ॥ भूरिविक्रमः[3] सौमित्रिः (मू.). ॥ १२ ॥ वीरेण (पू.) [यत्तः अभूत्]. ॥ तदा राक्षसाधिपः (मू.) प्राह – ' राक्षसान् पश्य. ॥ १३ ॥ (पू.), ॥ महतः (मू.) ॥ १४ ॥

---

१ मागून गेले. २ सैन्यसमूहास. ३ महापराक्रमी. ४ लववून. ५ सिद्ध. ६ मेघांसारखें काळें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्या सैन्याची दाणादाण झाली कीं, रावणाचा पुत्रही दिसून येईल. त्याचें अनुष्ठान संपलें नाहीं, तोंपर्यंत तूं जल्दीनें त्याच्या आंगावर चालून जा. ॥१५॥ त्या दुष्टाला हिंसा करणें हाच परम धर्म वाटतो. वीरा ! तूं त्याचा वध कर.' त्या शुभलक्षणसंपन्न लक्ष्मणानें बिभीषणाचें ऐकून घेतलें, ॥ १६ ॥ व राक्षसाधिपतीच्या पुत्रावर बाणांचा वर्षाव चालविला. वानरसेनापति पाषाण, पर्वतशिखरें व वृक्ष ह्या आयुधांच्या योगें ॥१७॥ चोहोंकडून दैत्यांवर प्रहार करूं लागले. राक्षसांनींही वानरसेनापतींवर व वानरसेनेवर कुऱ्हाडी, तीक्ष्ण बाण, तरवारी, काठ्या, व तोमर ह्या शस्त्रांचा मारा चालविला. शस्त्रांच्या खणाखणीनें - आकाश दुमदुमविलें. -

राक्षसेन्द्रसुतोऽप्यस्मिन् भिन्ने दृश्यो भविष्यति ॥ अभिद्रवाशु यावद्वै नैतत्कर्म समाप्यते ॥१५॥ जहि वीर दुरात्मानं हिंसापरमधार्मिकम् ॥ विभीषणवचः श्रुत्वा लक्ष्मणः शुभलक्षणः॥१६॥ ववर्ष शरवर्षाणि राक्षसेन्द्रसुतं प्रति ॥ पाषाणैः पर्वताग्रैश्च वृक्षैश्च हरियूथपाः ॥१७॥ निर्जघ्नुः सर्वतो दैत्यांस्तेऽपि वानरयूथपान् ॥ परश्वधैः शितैर्बाणैरसिभिर्यष्टितोमरैः ॥ १८ ॥ निर्जघ्नुर्वानरानीकं तदा शब्दो महानभूत् ॥

अस्मिन भिन्ने [सति] (मू.) न समाप्यते, [तावत्] आशु अभिद्रव. ॥ १५ ॥ (पू.) दुरात्मानं जहि.' ॥ शुभलक्षणः लक्ष्मणः (मू.), ॥ १६॥ (पू.) शरवर्षाणि ववर्ष. ॥ हरियूथपाः (मू) ॥ १७ ॥ सर्वतः दैत्यान, (१८ पू.), वानरानीकं [च] (१८ उ. १९ पू.) शब्दः अभूत. ॥

१ संपविलें जातें. २ आंगावर जा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तें वानरांचें व राक्षसांचें युद्ध मोठें तुमुल झालें. ॥ १८ ॥ १९ ॥ आपल्या सर्व सैन्याला अतिशय मार खा[illegible] लागत आहे, असें इंद्रजिताला दिसून आलें. तेव्हां तो लागलाच निकुंभिला आणि होम सोडून देऊन बाहेर पडला. ॥ २० ॥ तो मोठ्या त्वेषानें धनुष्य हातीं घेऊन व रथांत बसून रणभूमीवर आला आणि लक्ष्मणाला युद्धास बोलावून म्हणाला :– ॥ २१ ॥ 'लक्ष्मणा ! मी मेघनाद आहें! तूं माझ्या हातून जिवंत सुटणार नाहींस!' इतक्यांत इंद्रजिताची दृष्टि तेथें असलेल्या चुलत्यावर (बिभीषणावर) गेली; तेव्हां तो त्याला निष्ठुर शब्द बोलला :– ॥ २२ ॥ "अरे! तूं माझ्या पित्याचा सख्खा भाऊ! लंकेंतच जन्मलास व इतका मोठा वाढलास! आणि सांप्रत त्या आपल्या हितकर्त्याला सोडून त्याच्या शत्रूची सेवा करीत

स संप्रहारस्तुमुलः संजज्ञे हरिरक्षसाम् ॥ १९ ॥ इन्द्रजित्स्वबलं सर्वमर्द्यमानं विलोक्य सः ॥ निकुम्भिलां च होमं च त्यक्त्वा शीघ्रं विनिर्गतः ॥ २० ॥ रथमारुह्य सधनुः क्रोधेन महता ऽगमत् ॥ समाह्वयित्वा सौमित्रिं युद्धाय रणमूर्धनि ॥ २१ ॥ सौमित्रे मेघनादो ऽहं मया जीवन्न मोक्ष्यसे ॥ तत्र दृष्ट्वा पितृव्यं स प्राह निष्ठुरभाषणम् ॥ २२ ॥ इहैव जातः संवृद्धः साक्षाद्भ्राता पितुर्मम ॥

हरिरक्षसां (मू.) संप्रहारः संजज्ञे. ॥ १८ ॥ १९ ॥ सः इन्द्रजित् सर्वं (मू). ॥ २० ॥ सधनुः महता क्रोधेन [युतः सः] (पू.) युद्धाय अगमत्, (मू.) समाव्हयित्वा [आह –] ॥ २१ ॥ ' (पू.). ' सः तत्र पितृव्यं (मू.) प्राह – ॥ २२ ॥ ' (पू.) पितुः भ्राता [असि]; ॥

१ युद्ध. २ झालें. ३ पाडिलें जाणारें. ४ धनुष्यसहित. ५ रणांगणांत. ६ बोलावून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहेस अँ! - धिक्कार असो तुला! - ॥ २३ ॥ मी तर तुझ्या पुत्रासारखा आहें. असें असतांना, तूं मजशीं द्वेष करण्यास प्रवृत्त होतोस कसा! खरोखर, तुला 'अत्यंत अधम' व 'नीच मनाचा' हीं विशेषणें योग्य होत!" विभीषणाला असें बोलून इंद्रजितानें आपली दृष्टि मारुतीच्या पाठीवर बसलेल्या लक्ष्मणाकडे वळविली. ॥ २४ ॥ तो (इंद्रजित) ज्या विशाल रथांत बसला होता, त्यांत अनेक शस्त्रें व खड्गें सिद्ध ठेवलेलीं दिसत होतीं. त्यानें एक लांबलचक (साडेसात विती) धनुष्य उचलून त्याचा भयंकर टणत्कार केला. आणि म्हटलें :- ॥ २५ ॥ 'वानरहो! आज माझे बाण तुमच्या प्राणांचे घोट घेणार!' इकडे, शत्रूला

यस्त्वं स्वजनमुत्सृज्य परभृत्यत्वमागतः ॥ २३ ॥ कथं द्रुह्यसि[2] पुत्राय पापीया-
नसि दुर्मतिः ॥ इत्युक्त्वा लक्ष्मणं दृष्ट्वा हनूमत्पृष्ठतः स्थितम् ॥ २४ ॥ उद्यदा[3]यु-
धनिस्त्रिंशे रथे महति संस्थितः ॥ महाप्र[4]माणमुद्यम्य घोरं विस्फारयन्धनुः ॥ २५ ॥
अद्य वो मामका बाणाः प्राणान्पा[6]स्यन्ति वानराः ॥ ततः शरं दाशरथिः संधा-
यामित्र[7]कर्शनः ॥ २६ ॥

(मू.). ॥ २३ ॥ पुत्राय (पू.) असि!' (मू.) लक्ष्मणं दृष्ट्वा, ॥ २४॥ (पू.) रथे संस्थितः ॥ (मू.) उद्यम्य विस्फारयन् [सन् उवाच -] ॥ २५ ॥ 'वानराः! मामकाः बाणाः (पू.)!' (मू.) दाशरथिः शरं सन्धाय, ॥ २६ ॥

---

१ दुसऱ्याच्या सेवेस. २ द्वेष करितोस. ३ उघड ठेविलीं आयुधें व खड्ग ज्यांत, अशा. ४ मोठ्या प्रमाणाचें (साडेसात विती लांब). ५ टणत्कार करणारा. ६ पितील. ७ शत्रूंला त्रासविणारा. ८ जोडून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जर्जर करणारा लक्ष्मण सिद्ध होताच. त्यानेंही लागलाच एक बाण जोडून ॥२६॥ राक्षसेश्वरावर सोडिला. लक्ष्मण क्रोधामुळें सापासारखा फोंफावत होता. इंद्रजितानें डोळे लाल करून लक्ष्मणाकडे पाहिलें. ॥ २७ ॥ लक्ष्मणानें सोडलेले इंद्राच्या वज्रासारखे तीक्ष्ण बाण आंगाला लागल्याबरोबर इंद्रजित क्षणमात्र मूर्छित झाला पण लागलींच त्याचीं इंद्रियें शुद्धीवर आलीं. ॥ २८ ॥ तों, वीर दशरथपुत्र (लक्ष्मण) आपल्या पुढें उभा आहे, असें त्याला दिसून आलें. तो शूर राक्षस क्रोधानें डोळे लाल करून लक्ष्मणाच्या आंगावर धांवून गेला, ॥ २९ ॥ व धनुष्याला बाण जोडून लक्ष्मणाला ह्मणाला :– तूं पहिल्या युद्धप्रसंगीं माझा परा-

ससर्ज राक्षसेन्द्राय क्रुद्धः सर्प इव [1]श्वसन् ॥ इन्द्रजिद्रक्तनयनो लक्ष्मणं [3]समुदैक्षत ॥ २७ ॥ [4]शक्राशनिसमस्पर्शैर्लक्ष्मणेनाहतः शरैः ॥ मुहूर्तमभवन्[5]मूढः पुनः प्रत्या-[6]हृतेन्द्रियः ॥ २८ ॥ ददर्शावस्थितं वीरं वीरो दशरथात्मजम् ॥ सोऽभिचक्राम सौमित्रिं क्रोधसंरक्तलोचनः ॥ २९ ॥ शरान्धनुषि संधाय लक्ष्मणं चेदमब्रवीत् ॥ यदि ते प्रथमे युद्धे न दृष्टो मे पराक्रमः ॥ ३० ॥

(पू.) [सन] राक्षसेन्द्राय [2]ससर्ज. ॥ रक्तनयनः (मू.). ॥२७॥ लक्ष्मणेन (पू.) आहतः ॥ [इन्द्रजित्] मुहूर्तं मूढः (मू.) [आसीत्]. ॥ २८ ॥ वीरः (पू.) ददर्श. ॥ (मू.) सः सौमित्रिं [7]अभिचक्राम, ॥ २९ ॥ (पू.) – ॥ ' (मू.) न दृष्टः, ॥ ३० ॥

---

१ फोंफावणारा. २ सोडिता झाला. ३ पाहता झाला. ४ इंद्राच्या वज्रासारखा स्पर्श ज्यांचा, असा. ५ मूर्छित. ६ शुद्धीवर आलीं इंद्रियें ज्याचीं असा. ७ वर चालून गेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इंद्रजिताचें कवच फाटणें.

क्रम पाहिला नसलास तर ॥ ३० ॥ आज तुला दाखवितों. नीट जपून उभा राहा.' असें बोलून इंद्रजितानें लक्ष्मणाला सात बाण मारिले, ॥ ३१ ॥ आणि मारुतीवर तिखट धारेचे दहा उत्तम बाण सोडिले. तो पराक्रमी राक्षस विभीषणावर क्रोधामुळें दुप्पट खवळला होता; ह्मणून त्यानें धनुष्यापासून शंभर बाण सोडून त्याच्या (विभीषणाच्या) आंगाचे तुकडे काढिले! तसेंच लक्ष्मणानेंही शत्रूवर बाणसमूहाचा नुसता पाऊस पाडिला! ॥ ३२ ॥ ३३ ॥ इंद्रजिताचें सुवर्णासारखें तेजःपुंज कवच बाण लागून तुटून उकललें व रथांत पडलें; तेथें पुन्हां बाण लागल्यामुळें त्याचे तिळाएवढे तुकडे होऊन भूमीवर पडले. ॥ ३४ ॥

अद्य त्वां दर्शयिष्यामि तिष्ठेदानीं व्यवस्थितः ॥ इत्युक्त्वा सप्तभिर्बाणैरभिविव्याध[1] लक्ष्मणम् ॥ ३१ ॥ दशभिश्च हनूमन्तं तीक्ष्णधारैः शरोत्तमैः ॥ ततः शरशतेनैव संप्रयुक्तेन वीर्यवान् ॥ ३२ ॥ क्रोधद्विगुणसंरब्धो[2] निर्बिभेद विभीषणम् ॥ लक्ष्मणो ऽपि तथा शत्रुं शरवर्षैरवाकिरत् ॥ ३३ ॥ तस्य बाणैः सुसंविद्धं[6] कवचं काञ्चनप्रभम् ॥ व्यशीर्यत रथोपस्थे तिलशः पतितं भुवि ॥ ३४ ॥

[तथा अपि] (पू.) तिष्ठ. '॥ (मू.) अभिविव्याध. ॥३१॥ (३२ पू.) हनूमन्तं [विव्याध] ॥ (३२ उ.) [सः] (३३ पू.) [सन्] सम्प्रयुक्तेन शरशतेन एव विभीषणं निर्बिभेद. ॥ (मू.). ॥ ३२ ॥३३॥ (पू.) कवचं ॥ रथोपस्थे (मू.), [पुनः बाणैः] तिलशः [खण्डितं सत्] पतितं. ॥३४॥

१ प्रहार करिता झाला. २ क्रोधामुळें दुप्पट खवळलेला. ३ सोडिलेल्या. ४ भेदिता झाला. ५ आच्छादिता झाला. ६ ताडिलेलें. ७ चिलखत. ८ रथामध्यें. ९ उकललें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेव्हां रावणपुत्राला अतिशयच संताप आला; त्यानें युद्धांत महापराक्रमी शूर लक्ष्मणाला सहस्र बाण मारिले. ॥ ३५ ॥ लक्ष्मणाचेंही दिव्य कवच उकलून खालीं पडलें. दोघांनीं एकमेकांच्या आंगावर धांवून आपल्या घेण्यादेण्याचा निकाल लाविला (उधारी ठेविली नाहीं)! ॥३६ ॥ दोघेही एक सारखे धांपा टाकीत होते. पुन्हां तुमुल युद्ध चालू झालें. उभयतांचीं सर्वांगें बाणांनीं आच्छादिलीं असून जेथून तेथून रक्ताच्या धारा चालल्यामुळें भिजून गेलीं होतीं. ॥ ३७ ॥ दोघेही महापराक्रमी व शूर होते; त्यांनीं पुष्कळ वेळपर्यंत तीक्ष्ण बाणांच्या योगें परस्परांशीं युद्ध केलें; पण कोणालाही जय किंवा पराजय मिळाला नाहीं. ॥ ३८ ॥

ततः शरसहस्रेण संक्रुद्धो रावणात्मजः ॥ बिभेद समरे वीरं लक्ष्मणं भीमविक्रमम्
॥ ३५ ॥ व्यशीर्यतापतद्दिव्यं कवचं लक्ष्मणस्य च ॥ कृतप्रतिकृतान्योन्यं बभूव-
तुरभिद्रुतौ ॥ ३६ ॥ अभीक्ष्णं निःश्वसन्तौ तौ युध्येतां तुमुलं पुनः ॥ शरसंवृत-
सर्वांगौ सर्वतो रुधिरोक्षितौ ॥ ३७ ॥ सुदीर्घकालं तौ वीरावन्योन्यं निशितैः शरैः ॥
अयुध्यतां महासत्त्वौ जयाजयविवर्जितौ ॥ ३८ ॥

(पू.) शरसहस्रेण ॥ (मू.) लक्ष्मणं बिभेद. ॥३५॥ (पू.) कवचं व्यशीर्यत, अपतत् च ॥ (मू.) बभूवतुः. ॥ ३६ ॥ (मू.) तौ पुनः तुमुलं अयुद्ध्येतां. ॥ ३७ ॥ महासत्वौ जयाजयविवर्जितौ तौ वीरौ (मू.). ॥ ३८ ॥

१ प्रहार करिता झाला. २ परस्परांच्या कार्यावर प्रतिकार केला ज्यांनीं असे. ३ वारंवार. ४ रक्तानें भिजलेले. ५ जय किंवा पराजय ह्यांनीं रहित.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इतक्यांत शूर लक्ष्मणानें, आपलें हस्तकौशल्य दाखविण्यासाठीं पांच बाण मारून, रावणपुत्राचा सारथि मारिला, घोड्यांसह रथ चुरला, आणि धनुष्याचे तुकडे उडविले ! इंद्रजितानेंही झटपट दुसरें उत्तम धनुष्य घेऊन सज्य केलें. ॥ ३९ ॥ ४० ॥ लक्ष्मणानें तीन बाण मारून तेंही धनुष्य तोडून टाकिलें, व ज्याचें धनुष्य तुटलें अशा त्या शत्रूवर अनेक बाण सोडिले. ॥ ४१ ॥ इंद्रजिताचा पराक्रम फार प्रखर असे. त्यानें पुन्हां दुसरें धनुष्य घेऊन लक्ष्मणाला सूर्यासारखे चकचकीत तीक्ष्ण बाण मारिले, ॥ ४२ ॥

एतस्मिन्नन्तरे वीरो लक्ष्मणः पञ्चभिः शरैः ॥ रावणेः सारथिं साश्वं रथं च समचूर्णयत् ॥३९॥ चिच्छेद कार्मुकं तस्य दर्शयन्हस्तलाघवम्[1] ॥ सो ऽन्यत्तु कार्मुकं भद्रं सज्यं चक्रे त्वरान्वितः ॥ ४० ॥ तच्चापमपि चिच्छेद लक्ष्मणस्त्रिभिराशुगैः[2] ॥ तमेव च्छिन्नधन्वानं[3] विव्याधानेकसायकैः[4] ॥४१॥ पुनरन्यत्समादाय कार्मुकं भीमविक्रमः ॥ इन्द्रजिल्लक्ष्मणं बाणैः शितैरादित्यसन्निभैः ॥ ४२ ॥

(मू.). ॥ ३९ ॥ (पू.) दर्शयन् [सन्] तस्य कार्मुकं चिच्छेद. ॥ सः तु त्वरान्वितः [सन्] अन्यत् भद्रं (मू.). ॥ ४० ॥ लक्ष्मणः (पू.) चिच्छेद. ॥ (मू.) विव्याध. ॥ ४१ ॥ भीमविक्रमः इन्द्रजित् (पू.) समादाय ॥ (मू.) बाणैः [विव्याध]. ॥ ४२ ॥

१ हस्तचापल्य. २ बाणांनीं. ३ तोडिलें धनुष्य ज्याचें, अशा. ४ अनेक बाणांनीं. ५ तीक्ष्ण.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि दिशा बाणांच्यायोगें भरून टाकून सर्व वानरांची दाणादाण उडविली. नंतर, लक्ष्मणानें एका बाणावर इंद्रास्त्राची स्थापना केली, तो बाण उचलून इंद्रजितावर रोंखून॥४३॥धनुष्यास जोडिला, व धनुष्य घट्ट आंवळून धरून दोरी कर्णापर्यंत ओढिली. अशा तयारीनें उभा राहिल्यावर तो वीर लक्ष्मण रामाच्या चरणकमलाचें स्मरण करीत ह्मणाला :– ॥ ४४ ॥ 'जर (ज्या अर्थी) दाशरथि राम परम धार्मिक, व सत्यवचनी आहे आणि जर त्रैलोक्यांत त्याच्या पुढें टिकणारा शत्रु कोणी नाहीं, तर (त्या अर्थी), हे बाणा! तूं ह्या रावणपुत्राचा वध कर.' ॥ ४५ ॥ वीर लक्ष्मणानें अशी शपथ घालून तो सरळ जाणारा बाण कर्णापर्यंत

बिभेद वानरान्सर्वान्बाणैरापूरयन्दिशः ॥ तत ऐन्द्रं समादाय लक्ष्मणो रावणिं प्रति ॥ ४३ ॥ संधायाकृष्य कर्णान्तं कार्मुकं दृढनिष्ठुरम् ॥ उवाच लक्ष्मणो वीरः स्मरन् रामपदाम्बुजम् ॥ ४४ ॥ धर्मात्मा सत्यसन्धश्च रामो दाशरथिर्यदि ॥ त्रिलो· क्यामप्रतिद्वन्द्वस्तदेनं जहि रावणिम् ॥ ४५ ॥ इत्युक्त्वा बाणमाकर्णाद्विकृष्य तमजिह्मगम् ॥ लक्ष्मणः समरे वीरःससर्जेन्द्रजितं प्रति ॥ ४६ ॥

(पू.) आपूरयन् [सन्] सर्वान् वानरान् बिभेद. ॥ ततः लक्ष्मणः (मू.) ॥४३॥ (पू.) कार्मुकं कर्णान्तं आकृष्य [स्थितः]. ॥ वीरः (मू.) स्मरन् [सन्] उवाच – ॥ ४४ ॥ 'दाशरथिः रामः (मू.) च यदि [स्यात्], तत् एनं रावणिं जहि.' ॥ ४५ ॥ वीरः लक्ष्मणः (पू.) बाणं आकर्णात् विकृष्य, (मू.) ससर्ज. ॥ ४६ ॥

---

१ सत्य प्रतिज्ञा ज्याची, असा. २ ज्याच्या जोडीचा कोणी नाहीं, असा. ३ सरळ जाणाऱ्या(बाणा)ला. ४ सोडिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो. समू-सान्व. सटिप्पण. ॥ ७५ ॥

युद्धकाण्ड सर्ग ९ इंद्रजित मरण पावला.

ओढिला आणि इंद्रजिताच्या आंगावर सोडून दिला.॥४६॥त्या बाणानें इंद्रजिताचें तेजःपुंज मस्तक धडापासून वेगळें करून भूमीवर पाडिलें! त्या शिरावर शिरस्त्राण (मुकुट) होतें व कानांत कुंडलें चमकत होतीं. ॥४७॥ त्या वेळीं देवांना परमानंद झाला. ते रघुवीराची कीर्ति वर्णूं लागले. स्वर्गांतून पुष्पवृष्टि झाली. देवांनीं रामाची स्तुति केली. ॥ ४८ ॥ देव आणि महर्षि ह्यांसह इंद्राला हर्ष झाला. आकाशांत देवांच्या नगाऱ्याचा शब्द ऐकूं येऊं लागला. ॥ ४९ ॥ आकाश स्वच्छ झालें. रावणाचा पुत्र मरण पावला, असें पाहून

स शरः सशिर[1]स्त्राणं श्रीमज्ज्वलितकुण्डलम् ॥ प्र[2]मथ्येन्द्रजितः [3]कायात्पातयामास भूतले ॥ ४७ ॥ ततः प्रमुदिता देवाः कीर्तयन्तो रघूत्तमम् ॥ ववर्षुः पुष्पवर्षाणि स्तुवन्तश्च मुहुर्मुहुः ॥ ४८ ॥ जह[4]र्ष शक्रो भगवान्सह देवैर्महर्षिभिः ॥ आकाशेऽपि च देवानां शुश्रुवे दुन्दुभिस्वनः[5] ॥४९॥ विमलं गगनं चासीत्स्थिरा ऽभूद्वि-[7]श्वधारिणी ॥ निहतं रावणिं दृष्ट्वा जयज[8]ल्पसमन्वितः ॥ ५० ॥

(पू.) ॥ इन्द्रजितः [शिरः] (मू.) पातयामास. ॥ ४७ ॥ (पू.) कीर्तयन्तः, (मू.) स्तुवन्तः च [सन्तः] पुष्पवर्षाणि ववर्षुः. ॥ ४८ ॥ भगवान् (पू.) [च] सह जहर्ष. ॥ (मू.) [6]शुश्रुवे. ॥ ४९ ॥ गगनं च (पू.) स्थिरा अभूत्. ॥ रावणिं (मू.) ॥ ५० ॥

---

१ मुकुटासह. २ हालवून (हिसकाहिसक करून). ३ शरीरापासून. ४ आनंद पावला. ५ नगाऱ्याचा शब्द. ६ ऐकूं आला. ७ पृथ्वी. ८ ' जय ' शब्दानें युक्त.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पृथ्वी स्थिर झाली. देवांनीं लक्ष्मणाचा जयजयकार केला. ॥ ५० ॥ - तो शब्द कानीं पडतांच - लक्ष्मणाचा श्रम दूर झाला. त्या समर्थानें रणांत शंख वाजविला, व सिंहनाद करून धनुष्याच्या दोरीचा टणत्कार केला. ॥५१॥ तो शब्द ऐकून वानरांना हर्ष वाटला व त्यांचे श्रम दूर झाले. वानरवीरांचीं अंतःकरणें समाधान पावलीं. त्यांनीं लक्ष्मणाची स्तुति केली. ॥५२॥ लक्ष्मणाचेंही मन प्रसन्न झालें. तो वानरांना बरोबर घेऊन परत आला. त्यानें हनुमान् आणि बिभीषण दोघांसहवर्तमान जाऊन नम्रतापुरःसर रामाचें दर्शन घेतलें. ॥५३॥ आपला वडील भाऊ राम साक्षात् सर्वव्यापी नारायण होय, हें - लक्ष्मणाला विदित होतें. - त्यानें रामाला वंदन करून म्हटलें :—'रघुवीरा! तुझ्या कृपेनें आज मी युद्धांत रावणपुत्राचा वध केला.'॥५४॥

गतश्रमः स सौमित्रिः शंखमापूरयद्रणे ॥ सिंहनादं ततः कृत्वा ज्याशब्दमकरोद्विभुः ॥५१॥ तेन नादेन संहृष्टा वानराश्च गतश्रमाः॥वानरेन्द्रैश्च सहितः स्तुवद्भिर्हृष्टमानसैः ॥ ५२ ॥ लक्ष्मणः परितुष्टात्मा ददर्शाभ्येत्य राघवम् ॥ हनूमद्राक्षसाभ्यां च सहितो विनयान्वितः ॥ ५३ ॥ ववन्दे भ्रातरं रामं ज्येष्ठं नारायणं विभुम् ॥ त्वत्प्रसादाद्रघुश्रेष्ठ हतो रावणिराहवे ॥ ५४ ॥

(पू.) शंखं आपूरयत्. ॥ ततः विभुः (मू.). ॥५१॥ (पू.) [बभूवुः]. ॥ (मू.) वानरेन्द्रैः सहितः ॥ ५२ ॥ (उ.) परितुष्टात्मा (पू.) ददर्श, ॥५३॥ ज्येष्ठं (पू.) रामं ववन्दे, ॥ [उवाच च —] ' रघुश्रेष्ठ, (मू.) हतः. ' ॥ ५४ ॥

१ भरिता (वाजविता) झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राम लक्ष्मणाची पाठ थोपटतो.

लक्ष्मणाच्या मुखांतून निघालेलें तें वाक्य कानीं पडतांच रघुवीराला आनंद झाला. त्यानें प्रेमपूर्वक लक्ष्मणाला पोटाशीं धरिलें व मस्तक हुंगून गोड शब्दांनीं त्याला ह्मटलें:– ॥९९॥ ‘ लक्ष्मणा ! शाबास ! तूं आज मोठें दुर्घट कार्य पार पाडिलेंस. मला फार संतोष झाला. हे शत्रुदमना ! मेघनाद मेला, आतां आपण सर्व कांहीं जिंकलें, असें ह्मणण्यास चिंता नाहीं ! ॥ ९६ ॥ तीन दिवस आणि तीन रात्री खटपट केलीस, तेव्हां तो मरण पावला आँ ! एकंदरींत तो शूर खरा ! आज तूं माझे सर्व शत्रु नाहींसे केलेस, असें मी समजतों आतां रावण पुत्रशोकास्तव मजबरोबर युद्ध करण्यास येईल. मग मी रावणाला मारितों. ’ महाबलाढ्य मेघनादाचा लक्ष्मणानें वध केला, ही वार्ता कानीं पडल्याबरोबर ॥ ९७ ॥ ९८ ॥

श्रुत्वा तल्लक्ष्मणाद्वक्त्या तमालिंग्य रघूत्तमः ॥ मूर्ध्न्येवघ्राय मुदितः सस्नेहमिदमब्रवीत् ॥ ५५ ॥ साधु लक्ष्मण तुष्टोऽस्मि कर्म ते दुष्करं कृतम् ॥ मेघनादस्य निधने जितं सर्वमरिन्दम ॥ ५६ ॥ अहोरात्रैस्त्रिभिर्वीरः कथंचिद्विनिपातितः ॥ निःसपत्नः कृतोऽस्म्यद्य निर्यास्यति हि रावणः ॥ ५७ ॥ पुत्रशोकान्मया योद्धुं तं हनिष्यामि रावणम् ॥ मेघनादं हतं श्रुत्वा लक्ष्मणेन महाबलम् ॥ ५८ ॥

रघूत्तमः लक्ष्मणात् तत् (मू.) [सन्] सस्नेहं इदं अब्रवीत् – ॥ ५५ ॥ ‘ लक्ष्मण, (पू.) कर्म कृतं. ॥ अरिन्दम, (मू.) जितं. ॥५६॥ त्रिभिः (५७ पू.). ॥ अद्य (५७ उ. ५८ पू.) निर्यास्यति; तं रावणं हनिष्यामि. ’ ॥ महाबलं (मू.) हतं श्रुत्वा, ॥ ५७ ॥ ५८ ॥

१ मरण झालें तेव्हां. २ दिवसरात्रींनीं. ३ शत्रुरहित. ४ निघेल.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रावण घेरी येऊन भूमीवर पडला. कांहीं वेळानें तो शुद्धीवर आला, व विलाप करूं लागला. पुत्रशोक तो! त्याच्या मनाला वाटे कीं, आतां आपण अगदीं निराधार झालों! ॥ ५९ ॥ तो मुलाचे गुण व चरित्रें आठवून आठवून रडे :– 'आज सगळे देवगण, लोकपाल, व महान् महान् ऋषि, ॥ ६० ॥ इंद्रजित मेला असें कळलें कीं, निर्भयपणें खुशाल झोंपा घेतील!' इत्यादि बहुतप्रकारें तो विलाप करूं लागला. त्याची मुलावर फारच प्रीति होती. ॥ ६१ ॥ पुढें तो राक्षसांचा राजा रावण अतिशयच चिडला. त्याला वाटलें कीं, युद्धांत सगळे राक्षस मारवून टाकावे झालें! - ह्मणून, त्यानें सगळ्यांना युद्धास जाण्याची - आज्ञा

रावणः पतितो भूमौ मूर्च्छितः पुनरुत्थितः ॥ विललापातिदीनात्मा पुत्रशोकेन रावणः ॥ ५९ ॥ पुत्रस्य गुणकर्माणि संस्मरन्पर्यदेवयत्[1] ॥ अथ देवगणाः सर्वे लोकपाला महर्षयः ॥ ६० ॥ हतमिन्द्रजितं ज्ञात्वा सुखं स्वप्स्यन्ति[2] निर्भयाः ॥ इत्यादि बहुशः पुत्रलालसो[3] विललाप ह ॥ ६१ ॥ ततः परमसंक्रुद्धो रावणो राक्षसाधिपः ॥ उवाच राक्षसान्सर्वान्निनाशयिषुराहवे[4] ॥ ६२ ॥

(पू.) [सन्] भूमौ पतितः, पुनः उत्थितः. ॥ पुत्रशोकेन (मू.) विललाप. ॥५९॥ (पू.) – ॥ ' अथ सर्वे (मू.) [च] ॥ ६० ॥ इन्द्रजितं (पू.) [सन्तः] सुखं स्वप्स्यन्ति ! ' (मू.) [सन्] विललाप ह. ॥ ६१ ॥ (पू.) आहवे सर्वान् (मू) रावणः ['युद्धाय गच्छध्वं' इति] उवाच. ॥६२॥

१ शोक करूं लागला. २ झोंप घेतील. ३ पुत्राविषयीं वत्सल. ४ नाश करूं इच्छिणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सुपार्श्व कान-
उघाडणी क-
रितो.

दिली. ॥ ६२ ॥ तो शूर राक्षस पुत्र मेल्यामुळें संतप्त होऊन क्रोधाच्या अगदीं अधीन झाला. इतक्यांत त्याला एक विचार सुचला कीं, - सीता मेली कीं राम मरेल! - ह्मणून तो सीतेला मारण्यासाठीं धांवत गेला ॥ ६३ ॥ सीता राक्षसींच्या समुदायामध्यें बसली होती. रावण क्रोधाच्या आवेशांत हातामध्यें खड्ग घेऊन इकडे येत आहे, असें पाहून ती भ्याली व शोकाकुल झाली! ॥ ६४ ॥ ह्या प्रसंगीं रावणाचा सुपार्श्व नामक मंत्री तेथें होता. तो मनाचा निर्मळ, मोठा बुद्धिमान् व विचारी असे. त्यानें रावणाला सांगितलें :– ॥ ६५ ॥ ‘दशवदना! हें काय! तूं प्रत्यक्ष कुबेराचा कनिष्ठ बंधु, वेदविद्येंत नि-

स पुत्रवधसंतप्तः शूरः क्रोधवशं गतः ॥ संवीक्ष्य रावणो बुद्ध्या हन्तुं सीतां प्रदु-
द्रुवे ॥६३॥ खड्गपाणिमथायान्तं क्रुद्धं दृष्ट्वा दशाननम् ॥ राक्षसीमध्यगा सीता
भयशोकाकुला ऽभवत् ॥६४॥ एतस्मिन्नन्तरे तस्य सचिवो बुद्धिमान् शुचिः ॥
सुपार्श्वो नाम मेधावी[1] रावणं वाक्यमब्रवीत् ॥ ६५ ॥ ननु नाम दशग्रीव साक्षा-
द्वैश्रवणानुजः[2] ॥ वेदविद्याव्रतस्नातः[3] स्वकर्मपरिनिष्ठितः[4] ॥ ६६ ॥

(मू.) संवीक्ष्य सीतां हन्तुं प्रदुद्रुवे. ॥ ६३ ॥ अथ राक्षसीमध्यमा सीता (पू.) दृष्ट्वा (मू.). ॥ ६४ ॥ (मू.) तस्य सचिवः रावणं, वाक्यं अब्रवीत् – ॥ ६५ ॥ ६६ ॥

---

१ बुद्धिमान् (आठवणीचा धड). २ कुबेराचा धाकटा भाऊ. ३ वेदविद्या व व्रतें ह्यांत निपुण. ४ स्वकर्माचरणांत दक्ष.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ष्णात, व्रतांमध्यें निपुण, स्वकर्माचरणांत तत्पर, असा ॥ ६६ ॥ अनेक गुणांनीं संपन्न आहेस, असें असून स्त्रीचा वध करूं इच्छितोस, तेव्हां तुला काय ह्मणावें ! ! आह्मांला बरोबर घेऊन रणांगणांत चल, तेथें रामाचा व लक्ष्मणाचा वध कर; ह्मणजे लागलीच सीता तुला प्राप्त होईल. - तिला व्यर्थ मारितोस कां ? - ' त्यानें असें सांगितलें असतां रावण माघारा फिरला. ॥ ६७ ॥ रावणाचें मन दुष्ट होतें खरें; पण ह्या प्रसंगीं त्या हितचिंतकानें सांगितलेलें धार्मिक वचन त्याला मान्य करावेंसें वाटलें. शोकामुळें त्याची बुद्धि मूढ झाली होती. तो घरीं गेला व इष्टमित्रांना बरोबर घेऊन लागलाच पुन्हां सभेंत आला. ॥ ६८ ॥

॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे युद्धकाण्डे नवमः सर्गः ॥ ९ ॥

अनेकगुणसंपन्नः कथं स्त्रीवधमिच्छसि ॥ अस्माभिः सहितो युद्धे हत्वा रामं च लक्ष्मणम् ॥ प्राप्स्यसे जानकीं शीघ्रमित्युक्तः स न्यवर्तत ॥ ६७ ॥ ततो दुरात्मा सुहृदा निवेदितं वचः सुधर्म्यं प्रतिगृह्य रावणः॥गृहं जगामाशु शुचा विमूढधीः पुनः सभां च प्रययौ सुहृद्वृतः ॥ ६८ ॥ इति श्रीम० युद्धकांडे नवमः सर्गः ॥ ९ ॥

(पू.) [त्वं] स्त्रीवधं कथं इच्छसि ? ॥ अस्माभिः सहितः [सन्] (द्वि.) च हत्वा, ॥ जानकीं शीघ्रं प्राप्स्यसे. ' (मू.). ॥ ६७ ॥ ततः दुरात्मा रावणः (पू.) वचः प्रतिगृह्य ॥ शुचा विमूढधीः [सन्] गृहं आशु (मू.) [सन्] सभां प्रययौ. ॥ ६८ ॥ इति युद्धकाण्डे नवमः सर्गः ॥ ९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रावण शुक्रा-
कडे गेला.

तो सभेमध्यें राक्षसमंत्र्यांबरोबर विचार करून उरलेल्या राक्षसांसहवर्तमान रामावर चालून गेला. ॥ १ ॥ हें त्याचें जाणें ह्मणजे पतंगानें पतंगांना बरोबर घेऊन, भडकलेल्या अग्नीवर चाल करण्यासारखेंच होतें! पुढें रामानें युद्धांत त्या सर्व राक्षसांचा वध केला. ॥ २ ॥ रावणाला, स्वतां रामाच्या हातून, वक्षःस्थलावर तीक्ष्ण बाणाचा प्रहार लागला; ह्मणून तो विव्हल होऊन लागलाच लंकेंत शिरला. ॥ ३ ॥ रामचंद्राचा व मारुतीचा अमानुष पराक्रम पुष्कळ वेळां दिसून आला, तेव्हां रावण सत्वर शुक्राचार्यांकडे गेला. ॥ ४ ॥ दशाननानें शुक्राचार्यांना नमस्कार करून व हात जोडून विनंति केली :– ‘ गुरुवर्य! रामचंद्रानें राक्षससेना-

स विचार्य सभामध्ये राक्षसैः सह मन्त्रिभिः ॥ निर्ययौ येऽवशिष्टास्तै राक्षसैः सह राघवम् ॥ १ ॥ शलभः शलभैर्युक्तः प्रज्वलन्तमिवानलम् ॥ ततो रामेण निहताः सर्वे ते राक्षसा युधि ॥ २ ॥ स्वयं रामेण निहतस्तीक्ष्णबाणेन वक्षसि ॥ व्यथित-स्त्वरितं लंकां प्रविवेश दशाननः ॥ ३ ॥ दृष्ट्वा रामस्य बहुशः पौरुषं चाप्यमा-नुषम् ॥ रावणो मारुतेश्चैव शीघ्रं शुक्रान्तिकं ययौ ॥ ४ ॥ नमस्कृत्य दशग्रीवः शुक्रं प्राञ्जलिरब्रवीत् ॥ भगवन् राघवेणैवं लंका राक्षसयूथपैः ॥ ५ ॥

(१ पू.) सह विचार्य ॥ (१ मू.) शलभैः युक्तः (२ पू.) इव निर्ययौ. ॥ (मू.) निहताः. ॥१॥ ॥ २ ॥ (पू.) निहतः ॥ व्यथितः दशाननः (मू.). ॥३॥ रावणः रामस्य, मारुतेः च एव (पू.) पौरुषं दृष्ट्वा, ॥ (मू.). ॥४॥ दशग्रीवः शुक्रं (पू.) [सन्] अब्रवीत् – ॥ ‘ (मू.) सह लङ्का ॥ ५ ॥

१ उरलेले. २ पतंग. ३ पेटलेल्या. ४ अग्नीस.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पतींसह लंकेचा अशा प्रकारें ॥ ५ ॥ नाश चालविला आहे! त्यानें माझे मोठमोठे दैत्य, पुत्र, व बंधुजन मारिले! आपल्यासारख्या उत्तम गुरूंचा आश्रय असतांना मजवर दुःखसमूह कोसळावा कसा?' ॥ ६ ॥ ही विज्ञापना ऐकल्यावर दैत्यांचे गुरु शुक्राचार्य दशाननाला ह्मणाले :– 'रावणा, तूं कांहींतरी प्रयत्नानें एकांतीं होम कर. ॥ ७ ॥ जर अनुष्ठानांत कांहीं विघ्न आलें नाहीं, तर होमाग्नीपासून उत्पन्न झालेला ॥८॥ एक प्रचंड रथ, घोडे, धनुष्य, बाणांनीं भरलेला भाता, इतकें साहित्य तयार होईल. ही सामग्री तुला मिळाली कीं, तूं अजिंक्य होशील. ॥ ९ ॥ मी देतों हे मंत्र घे (शीक), जा; आणि लवकर होम कर.' गुरुजींनीं

विनाशिता महादैत्या निहताः पुत्रबान्धवाः ॥ कथं मे दुःखसंदोहस्त्वयि तिष्ठति सद्गुरौ ॥ ६ ॥ इति विज्ञापितो दैत्यगुरुः प्राह दशाननम् ॥ होमं कुरु प्रयत्नेन रहसि त्वं दशानन ॥ ७ ॥ यदि विघ्नो न चेद्धोमे तर्हि होमानलोत्थितः ॥ ८ ॥ महान् रथश्च वाहाश्च चापतूणीरसायकाः ॥ संभविष्यन्ति तैर्युक्तस्त्वमजेयो भविष्यसि ॥९॥ गच्छ गृहाण मन्त्रान्मद्दत्तान् होमं कुरु द्रुतम् ॥ इत्युक्तस्त्वरितं गत्वा रावणो राक्षसाधिपः ॥ १० ॥

(पू.) [च] निहताः. ॥ त्वयि सद्गुरौ तिष्ठति [सति], (मू.) कथं?' ॥ ६ ॥ (पू.) प्राह – ॥ 'दशानन, त्वं रहसि प्रयत्नेन (मू.). ॥ ७ ॥ यदि होमे (मू.) ॥ ८ ॥ (पू.) च ॥ (मू.). ॥ ९ ॥ मद्दत्तान मन्त्रान (पू.) कुरु. ॥ (मू.) रावणः त्वरितं गत्वा, ॥ १० ॥

---

१ दुःखसमूह.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शत्रुवधार्थ अनुष्ठान.

असें सांगितलें असतां राक्षसाधिपति रावण त्वरित निघाला. ॥ १० ॥ त्यानें आपल्या मंदिरांत पातालासारखी एक गुहा तयार करविली, लंकेचीं द्वारें कवाडें इत्यादि चोहोंकडून भक्कम बंद करून घेतलीं, ॥११॥ जारणमारणाच्या कामीं उपयुक्त ह्मणून सांगितलेली होमसामग्री संपादन केली आणि गुहेंत शिरून एकांतीं होम आरंभिला. त्यानें मौनव्रत धरिलें होतें. ॥ १२ ॥ धुराचा मोठा लोट निघूं लागला. तो दृष्टीस पडल्याबरोबर रावणाचा कनिष्ठ बंधु (बिभीषण) भयभीत झाला. त्यानें रामाला तो होमाचा धूर दाखविला, - व ह्मटलें :- ॥ १३ ॥ ‘ रामा ! पहा रावणानें होम करण्यास प्रारंभ केला आहे ! जर होम समाप्त झाला

गुहां पातालसदृशीं मन्दिरे स्वे चकार ह॥लंकाद्वारकपाटादि बध्वा सर्वत्र यत्नतः ॥ ११ ॥ होमद्रव्याणि संपाद्य यान्युक्तान्याभिचारिके ॥ गुहां प्रविश्य चैकान्ते मौनी होमं प्रचक्रमे ॥ १२ ॥ उत्थितं धूममालोक्य महान्तं रावणानुजः ॥ रामाय दर्शयामास होमधूमं भयाकुलः ॥ १३ ॥ पश्य राम दशग्रीवो होमं कर्तुं समारभत् ॥ यदि होमः समाप्तः स्यात्तदाऽजेयो भविष्यति ॥ १४ ॥

स्वे मन्दिरे (पू.) गुहां चकार ह. ॥ सर्वत्र यत्नतः (मू.), ॥ ११ ॥ अभिचारिके यानि उक्तानि, [तानि] (मू.) [सन्] होमं प्रचक्रमे. ॥ १२ ॥ रावणानुजः उत्थितं महान्तं (पू.), ॥ भयाकुलः [सन्] (मू.) दर्शयामास, [उवाच च –] ॥ १३ ॥ ‘ राम, (मू). ॥ १४ ॥

१ दुसऱ्याच्या घातासाठीं जें अनुष्ठान त्यामध्यें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तर रावण अजिंक्य होईल! ॥ १४ ॥ ह्मणून, होमांत विघ्न करण्यासाठीं लवकर मोठमोठ्या वानरांना पाठवून दे. ' रामानें ' बरें ' ह्मणून सुग्रीवाचें मत घेतलें, आणि अंगदवानराला ॥ १५ ॥ व मारुति आदिकरून महाबलाढ्य वीरांना - तिकडे जाण्याविषयीं - आज्ञा दिली. ते कोट वलांडून रावणाच्या मंदिराजवळ गेले. ॥ १६ ॥ एकंदर दहाकोटि वानर निघाले होते. त्यांनीं तेथें पोंचल्यावर मंदिराच्या पाहरेकऱ्यांचीं हाडें नरम केलीं व क्षणमात्रांत घोडे आणि हत्ती मारून टाकिले. ॥ १७ ॥ पुढें, पांहांटच्या वेळीं सरमेनें हाताची खूण करून वानरांना होमस्थल कोठें आहे तें कळविलें. ही सरमा

अतो विघ्नाय होमस्य प्रेषयाशु हरीश्वरान् ॥तथेति रामः सुग्रीवसंमतेनांगदं कपिम् ॥ १५ ॥ हनूमत्प्रमुखान्वीरानादिदेश महाबलान् ॥ प्राकारं लंघयित्वा ते गत्वा रावणमन्दिरम् ॥ १६ ॥ दशकोट्यः प्लवंगानां गत्वा मन्दिररक्षकान् ॥ चूर्णयामासुरश्वांश्च गजांश्च न्यहनन् क्षणात् ॥ १७॥ ततश्च सरमा नाम प्रभाते हस्तसंज्ञया ॥ विभीषणस्य भार्या सा होमस्थानमसूचयत् ॥ १८ ॥

अतः होमस्य (पू.) प्रेषय.'॥ रामः 'तथा' इति [उक्त्वा], (मू.), ॥१५॥ महाबलान (पू.) ॥ [च] आदिदेश. ॥ ते (मू.) गत्वा [युयुधिरे]. ॥ १६ ॥ प्लवङ्गानां (मू.) न्यहनन्. ॥ १७ ॥ ततः सरमा नाम सा विभीषणस्य भार्या (मू.). ॥ १८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विभीषणाची भार्या होय. ॥ १८ ॥ गुहेच्या तोंडावर आच्छादनासाठीं मोठी शिळा ठेविली होती. महापराक्रमी अंगदानें लाथा मारून तो दगड फोडिला आणि त्या महामुहेंत प्रवेश केला. ॥ १९ ॥ त्या ठिकाणीं रावण डोळे मिटून व निश्चल आसन घालून बसला होता. तो दृष्टीस पडल्याबरोबर, अंगदाची आज्ञा घेऊन, सगळे वानर भराभर आंत शिरले ॥ २० ॥ व तेथें गडबड करूं लागले. त्यांनीं सेवकांना यथेच्छ बडविलें व चोहोंकडून सगळें साहित्य त्या होमकुंडांत टाकिलें. ॥ २१ ॥ मारुतीनें तर संतापून रावणाच्या हातांतील स्रुची बलात्कारें हिसकून घेतली; व तो वानरसेनापति तिच्या योगेंच रावणाला बडवूं लागला. ॥ २२ ॥

गुहापिधानपाषाणमंगदः पादघट्टनैः[1][2]॥ चूर्णयित्वा महासत्त्वः प्रविवेश महागुहाम् ॥ १९ ॥ दृष्ट्वा दशाननं तत्र मीलितांक्षं[3] दृढासनम् ॥ ततोऽगदाज्ञया सर्वे वानरा विविशुर्द्रुतम् ॥ २० ॥ तत्र कोलाहलं चक्रुस्ताडयन्तश्च सेवकान् ॥ संभारांश्चिक्षिपुस्तत्र होमकुण्डे समन्ततः ॥ २१ ॥ स्रुवमाच्छिद्य हस्ताच्च रावणस्य बलाद्रुषा ॥ तेनैव संजघानाशु हनूमान् प्लवगाग्रणीः ॥ २२ ॥

महासत्वः अङ्गदः (मू.) प्रविवेश. ॥ १९ ॥ तत्र (पू.) दशाननं दृष्ट्वा [स्थितः]. ॥ (मू.) विविशुः, ॥ २० ॥ तत्र सेवकान् ताडयन्तः [सन्तः] (मू.) सम्भारान् चिक्षिपुः. ॥ २१ ॥ प्लवगाग्रणीः हनूमान् रुषा रावणस्य हस्तात्, बलात् (मू.) संजघान. ॥ २२ ॥

---

१ गुहेच्या आच्छादनाच्या दगडाला. २ पादप्रहारांनीं. ३ मिटले डोळे ज्यानें, अशा. ४ फेंकिते झाले. ५ वानरांचा पुढारी. ६ हिसकून घेऊन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इकडून तिकडून सगळे वानर त्याला चावत व लांकडांनीं बडवीत. इतके प्रहार लागत होते तरी रावणानें आपलें ध्यान सोडिलें नाहीं; कारण, त्याच्या मनांत - अग्नीपासून रथादि सामग्री मिळवून शत्रूंना - जिंकण्याची इच्छा होती. ॥ २३ ॥ पुढें अंगद त्वरेनें रावणाच्या मंदिराकडे पळत जाऊन अंतःपुरांत शिरला व सुंदर मंदोदरीचा बुचडा धरून तिला घेऊन आला. ॥ २४ ॥ अंगदानें तिला रावणाच्या अगदीं समोर उभें केलें, व ती दीनासारखा आक्रोश करीत असतां, तिची रत्नांनीं सुशोभित केलेली कंचुकी फाडिली. ॥२५॥ चोळीवरील मोत्यें रत्नसमूहासह तुटून भराभर खालीं गळून पडलीं. - वानरांनीं केलेल्या हिसकाहिसकींत, -

घ्नन्ति दन्तैश्च काष्ठैश्च वानरास्तमितस्ततः ॥ न जहौ रावणो ध्यानं हतो ऽपि विजिगीषया ॥ २३ ॥ प्रविश्यान्तःपुरे वेश्मन्यंगदो वेगवत्तरः ॥ समानयत्केशबन्धे धृत्वा मन्दोदरीं शुभाम् ॥ २४ ॥ रावणस्यैव पुरतो विलपन्तीमनाथवत् ॥ विददारांगदस्तस्याः कञ्चुकं रत्नभूषितम् ॥ २५ ॥ मुक्ता विमुक्ताः पतिताः समंताद्रत्नसंचयैः ॥

(पू.) दन्तैः, काष्ठैः च घ्नन्ति [स्म]. ॥ हतः अपि (मू.) ध्यानं न जहौ. ॥ २३ ॥ वेगवत्तरः अङ्गदः (२४ पू.) प्रविश्य, ॥ अनाथवत् विलपन्तीं शुभां मन्दोदरीं (२४ उ. २५ पू.) समानयत्. (मू.) कंचुकं विददार. ॥ २४ ॥ २५ ॥ मुक्ताः विमुक्ताः [सत्यः] (पू.) [सह भुवि] पतिताः. ॥

१ मारतात. २ जिंकण्याच्या इच्छेनें. ३ सोडिता झाला. ४ फार वेगवान्. ५ वेणीच्या ठिकाणीं. ६ फाडिता झाला. ७ मोत्यें. ८ रत्नसमूहांनीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तिचें कटिसूत्र तुटून भूमीवर पडलें! त्यावर चित्रविचित्र रत्नें बसविलीं होतीं. ॥२६॥ तिची निरी कटिप्रदेशापासून सुटली! व सगळे अलंकार जिकडेतिकडे पडले! हा सर्व प्रकार रावणाच्या डोळ्यांसमोरच चालला होता! ॥ २७ ॥ वानर मोठ्या आनंदभरांत आले होते; ते देवांच्या आणि गंधर्वांच्या कन्यांना घेऊन आले. रावणाच्या अग्रभागीं मंदोदरी अतिशय शोक करूं लागली :– ॥ २८ ॥ ती बिचारी करुणस्वरानें बिलाप करीत रावणाला ह्मणाली :– ‘ अरे! तूं पक्का निर्लज्ज आहेस! शत्रु प्रत्यक्ष तुझ्या समोर बायकोला केशपाश धरून असे फरफरां ओढतात, आणि तूं खुशाल होम करीत बसला आहेस! तुला लाज वाटत

श्रोणिसूत्रं निपतितं त्रुटितं रत्नचित्रितम् ॥२६॥ कटिप्रदेशाद्विस्रस्ता नीवी तस्यैव पश्यतः ॥ भूषणानि च सर्वाणि पतितानि समंततः ॥ २७ ॥ देवगन्धर्वकन्याश्च नीता हृष्टैः प्लवंगमैः ॥ मन्दोदरी रुरोदाथ रावणस्याग्रतो भृशम्॥२८॥ क्रोशन्ती करुणं दीना जगाद दशकन्धरम् ॥ निर्लज्जो ऽसि परैरेवं केशपाशे विकृष्यते ॥ २९ ॥ भार्या तवैव पुरतः किं जुहोषि न लज्जसे ॥

रत्नचित्रितं (मू.) [सत्] निपतितं. ॥ २६ ॥ तस्य पश्यतः [सतः] एव, [3]नीवी (पू.). ॥ सर्वाणि (मू.) पतितानि. ॥ २७ ॥ हृष्टैः प्लवङ्गमैः (पू.) [होमस्थानं] नीताः. ॥ अथ (मू.) रुरोद. ॥ २८ ॥ दीना [सा] करुणं क्रोशन्ती [सती] दशकन्धरं [4]जगाद – ॥ ‘ त्वं निर्लज्जः असि [यत् तव] भार्या तव एव पुरतः (२९ उ. ३० पू.)[5] ॥

१ कमरपट्टा. २ तुटलेलें. ३ निरी. ४ बोलली. ५ होम करीत आहेस.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नाहीं काय? दुष्ट शत्रु डोळ्यांदेखत ज्याच्या बायकोला मारतात, ॥ २९ ॥ ३० ॥ त्यानें तत्क्षणीं त्याच जागीं जीव द्यावा! अशा स्थितींत जगण्यापेक्षां मरणें फार चांगलें!! मेघनादा! हाय हाय! वानर तुझ्या मातेचा छळ करीत आहेत रे! ॥ ३१ ॥ तूं जिवंत असतास, तर मजवर असा दुःखाचा प्रसंग आला असता काय? माझ्या पतीनें केवळ स्वतांच्या जीविताची आशा धरिली आणि बायको व लाज अगदीं सोडिली!' ॥ ३२ ॥ तो मंदोदरीचा विलाप ऐकून, राजा दशानन लागलाच उठला. त्यानें खड्ग उचलून 'देवीला (राणीला, मंदोदरीला) सोड!' असें ह्मणत, ॥ ३३ ॥ अंगदाच्या कटिप्रदेशीं

हन्यते पश्यतो यस्य भार्या पापैश्च शत्रुभिः ॥ ३० ॥ मर्तव्यं तेन तत्रैव जीविता-
न्मरणं वरम् ॥ हा मेघनाद ते माता क्लिश्यते बत वानरैः ॥ ३१ ॥ त्वयि जीवति
मे दुःखमीदृशं च कथं भवेत् ॥ भार्या लज्जा च संत्यक्ता भर्त्रा मे जीविताशया
॥ ३२ ॥ श्रुत्वा तद्देवितं राजा मन्दोदर्या दशाननः ॥ उत्तस्थौ खड्गमादाय त्यज
देवीमिति ब्रुवन् ॥ ३३ ॥ जघानांगदमव्यग्रः कटिदेशे दशाननः ॥

यस्य पश्यतः[1] [सतः] (मू.) हन्यते[2], ॥ २९ ॥ ३० ॥ तेन तत्र एव (मू.) क्लिश्यते बत! ॥ ३१ ॥ त्वयि जीवति [सति], मे ईदृशं (पू.)? ॥ मे भर्त्रा जीविताशया (मू.).' ॥ ३२ ॥ राजा दशाननः (पू.) देवितं[3] श्रुत्वा, ॥(मू.) 'देवीं त्यज' इति ब्रुवन् [सन्] उत्तस्थौ. ॥ ३३ ॥ अव्यग्रः दशाननः (पू.) जघान. ॥

१ पाहणारा अशा. २ मारिली जाते. ३ विलापास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रहार केला. रावण अगदीं घाबरला नव्हता. हवनकर्मापासून रावणाला मोठेंच फळ मिळावयाचें होतें. त्या अनुष्ठानाच्या विध्वंस केल्यावर वानर तें स्थल सोडून निघून गेले, ॥ ३४ ॥ व सर्वजण आनंदित होत्साते रामाच्या सन्निध जाऊन उभे राहिले. इकडे रावणानें पुढील उपदेश करून पत्नीचें सांत्वन केलें :– ॥३५॥ " सुंदरि ! सर्व गोष्टी दैवाच्या स्वाधीन आहेत. जीवंत राहणाऱ्या प्राण्याला अमुक प्रसंग भोगावा लागणार नाहीं असा कांहीं नियम आहे काय ? (जो प्रसंग येईल, तो भोगला पाहिजे). हे विशालनयने ! अशा निश्चित ज्ञानाचा आश्रय करून शोक सोडून दे. ॥ ३६ ॥शोक अज्ञानामुळें उद्भवतो; शोक ज्ञानाचा नाश करितो; शरीरादि जड पदार्थांवर ' अहं (मी) ' अशी बुद्धि होण्याला कारण अज्ञान होय; ॥ ३७ ॥ पुत्र स्त्रिया इत्यादिकांचा संबंध घडण्याचें मूळ कारण तरी अज्ञानच; कर्मबंधन, हर्ष, शोक, भय, क्रोध,

ततोत्सृज्य ययुः सर्वे विध्वंस्य हवनं महत् ॥ ३४ ॥ रामपार्श्वमुपागम्य तस्थुः
सर्वे प्रहर्षिताः ॥ रावणस्तु ततो भार्यामुवाच परिसांत्वयन् ॥ ३५ ॥ दैवाधीन-
मिदं भद्रे जीवता किन्न दृश्यते ॥ त्यज शोकं विशालाक्षि ज्ञानमालम्ब्य निश्चि-
तम् ॥ ३६ ॥ अज्ञानप्रभवः शोकः शोको ज्ञानविनाशकृत् ॥ अज्ञानप्रभवा
ऽहंधीः शरीरादिष्वनात्मसु ॥ ३७ ॥ तन्मूलः पुत्रदारादिसंबन्धः संसृतिस्ततः ॥

(मू.) हवनं विध्वंस्य, उत्सृज्य [च] ययुः. ॥३४॥ सर्वे (पू.) तस्थुः. ॥ ततः (मू.) [सन्] उवाच – ॥ ३५ ॥ ' भद्रे, जीवता (मू.) ज्ञानं आलम्ब्य, शोकं त्यज. ॥ ३६ ॥ (पू.). ॥ अनात्मसु शरीरादिषु अहंधीः (मू.) [अस्ति]. ॥ ३७ ॥ (पू.) संसृतिः. ॥

१ ततः (नंतर) + उत्सृज्य (सोडून). २ जगणारानें. ३ जड.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लोभ, मोह, काम इत्यादि सर्व विकार अज्ञानमूलक होत. ॥ ३८ ॥ जन्म, मृत्यु, जरा हे भाव तरी अज्ञानामुळें उद्भवतात. आत्मा तर एक, शुद्ध (निर्गुण), मायाकार्याहून वेगळा, अलिप्त, ॥ ३९ ॥ आनंदरूपी व ज्ञानमय आहे; त्याला सुखदुःखादि कोणतेही भाव नाहींत; त्या अबाधितस्वरूपी आत्म्याचा कोणाशींही संयोग किंवा वियोग होत नाहीं. ॥ ४० ॥ साध्वि ! आजपर्यंत तुझ्या वर्तनाला कोणी दोष दिलेला नाहीं. तूं स्वकीय आत्म्याचें रूप असें जाणून शोक सोडून दे. मी आतांच जातों, व लक्ष्मणासह रामाचा वध करून ॥ ४१ ॥ येतों. नाहीं तर श्रीराम वज्रतुल्य बाणांच्या योगें माझें शरीर छिन्नभिन्न करील. व

हर्षशोकभयक्रोधलोभमोहस्पृहादयः ॥ ३८ ॥ अज्ञानप्रभवा ह्येते जन्ममृत्युजरादयः ॥ आत्मा तु केवलः शुद्धो व्यतिरिक्तो ह्यलेपकः ॥ ३९ ॥ आनन्दरूपो ज्ञानात्मा सर्वभावविवर्जितः ॥ न संयोगो वियोगो वा विद्यते केनचित्सतः ॥ ४० ॥ एवं ज्ञात्वा स्वमात्मानं त्यज शोकमनिन्दिते ॥ इदानीमेव गच्छामि हत्वा रामं सलक्ष्मणम् ॥ ४१ ॥ आगमिष्यामि नो चेन्मां दारयिष्यति सायकैः ॥

[एवं] (मू.), ॥ ३८ ॥ (पू.) च अज्ञानप्रभवाः. ॥ (मू.) ॥ ३९ ॥ (पू.). ॥ सतः केनचित् (मू.) न विद्यते. ॥ ४० ॥ अनिन्दिते, (पू.) ज्ञात्वा शोकं त्यज. ॥ (मू.) रामं हत्वा, ॥ ४१ ॥ (मू.) वज्रकल्पैः सायकैः मां दारयिष्यति. ॥

१ वज्रतुल्य. २ बाणांच्या योगें. ३ विदारण करील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रावणाची इच्छा.

त्याच्या हातून मरण आलें ह्मणजे मी त्याच्या पदास प्राप्त होईन. ॥४२॥ प्रिये! तसा प्रसंग ओढवला तर, तूं माझें एक काम करावेंस, अशी मी तुला आज्ञा देतों :- तूं प्रथम सीतेला मार व मग माझ्याबरोबर अग्नींत प्रवेश कर. " ॥४३॥ हें रावणाचें भाषण ऐकून मंदोदरीला पराकाष्ठेचें दुःख झालें : ती त्याला ह्मणाली :— 'नाथा ! खरोखर, मी काय सांगत्यें, तें ऐकावें, आणि त्याप्रमाणें वागावें. ॥४४॥ महाराज ! आपल्याला काय, आणि दुसरे किती वीर आले तरी त्यांना काय, रामाचा पराभव करतां येणें कधींही शक्य नाहीं. राम साक्षात् देवाधिदेव व प्रकृतीचा आणि जीवांचा नियामक होय. ॥४५॥ ह्याच भक्तवत्सल प्रभु राघवानें पूर्वी एका क-

श्रीरामो वज्रकल्पैश्च ततो गच्छामि तत्पदम् ॥ ४२ ॥ तदा त्वया मे कर्तव्या
क्रिया मच्छासनात्प्रिये ॥ सीतां हत्वा मया सार्धं त्वं प्रवेक्ष्यसि पावकम्[1] ॥ ४३ ॥
एवं श्रुत्वा वचस्तस्य रावणस्यातिदुःखिता ॥ उवाच नाथ मे वाक्यं शृणु सत्यं
तथा कुरु ॥४४॥ शक्यो न राघवो जेतुं त्वया चान्यैः कदाचन ॥ रामो देववरः
साक्षात्प्रधानपुरुषेश्वरः ॥ ४५ ॥ मत्स्यो भूत्वा पुरा कल्पे मनुं वैवस्वतं प्रभुः ॥

ततः तत्पदं गच्छामि. ॥ ४२ ॥ प्रिये, (पू.) कर्तव्या. ॥ त्वं (मू.) प्रवेक्ष्यसि.[2] ॥ ४३ ॥ (पू.) वचः श्रुत्वा अतिदुःखिता [मन्दोदरी] ॥ उवाच - नाथ, मे सत्यं (मू.). ॥ ४४ ॥ (पू.) च कदाचन जेतुं[3] न शक्यः. ॥ (मू.). ॥ ४५ ॥ प्रभुः भक्तवत्सलः राघवः पुरा कल्पे (मू.) मनुं

१ अग्नीस. २ प्रवेश करिशील. ३ जिंकिण्यास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ल्यांत मत्स्यावतार घेऊन वैवस्वत मनूला सकल संकटांतून सोडविलें. ॥४६॥ राम पूर्वी कांसव झाला होता; ह्या कांसवाचें शरीर एक लक्ष योजनें विस्तीर्ण होतें; त्यानें समुद्रमंथनाचे वेळीं आपल्या पाठीवर सुवर्णपर्वत (मंदर) उचलून धारेला.॥४७॥ ह्याच महासमर्थानें एके प्रसंगीं वराहासारखें शरीर धारण करून पृथ्वीला - रसातलांतून - वर आणिलें आणि अतिशय मदोन्मत्त झालेल्या हिरण्याक्षाचा वध केला. ॥४८॥ पूर्वी हिरण्यकशिपु नांवाचा एक दैत्य त्रैलोक्याला कांट्याप्रमाणें छळीत असे; रघुनंदनानें नारसिंह रूप घेऊन त्याचा वध केला. ॥ ४९ ॥ ह्या रघुवीरानें पूर्वी बळीला - बांधून घेतलें व तीनच पावलांनीं त्रैलोक्य आक्रमण करून देवेंद्राला दिलें; इंद्र

ररक्ष सकलापद्भ्यो राघवो भक्तवत्सलः॥ ४६ ॥ रामः कूर्मो ऽभवत्पूर्वं लक्षयोजनविस्तृतः ॥ समुद्रमथने पृष्ठे दधार कनकाचलम् ॥ ४७ ॥ हिरण्याक्षो ऽतिदुर्वृत्तो हतो ऽनेन महात्मना ॥ क्रोडरूपेण वपुषा क्षोणिमुद्धरता क्वचित् ॥ ४८ ॥ त्रिलोककण्टकं दैत्यं हिरण्यकशिपुं पुरा ॥ हतवान्नारसिंहेन वपुषा रघुनन्दनः ॥ ४९ ॥ विक्रमैस्त्रिभिरेवासौ बलिं बद्ध्वा जगत्त्रयम् ॥

ररक्ष. ॥ ४६ ॥ (पू.) कूर्मः अभवत्, ॥ (मू.) दधार. ॥ ४७ ॥ क्वचित् (उ.) अनेन महात्मना अतिदुर्वृत्तः (पू.). ॥ ४८ ॥ पुरा रघुनन्दनः (पू.) दैत्यं (मू.) हतवान्. ॥ ४९ ॥ असौ रघुसत्तमः बलिं बध्वा, त्रिभिः एव (मू.)

१ सकल संकटांपासून. २ सुवर्णपर्वताला (मंदराला). ३ धरिता झाला. ४ वराहरूपी. ५ शरीरानें. ६ पृथ्वीला. ७ उचलणाऱ्या. ८ अतिदुराचारी. ९ पावलांनीं.

ह्याचा सेवक होय. ॥ ५० ॥ एके काळीं, जिकडेतिकडे क्षत्रियस्वरूपी राक्षस उत्पन्न होऊन पृथ्वीला अतिशय भार झाला होता; त्यावेळीं ह्या रामानें - परशुराम अवतार - धरिला, व क्षत्रियांचा अनेक (एकवीस) वेळां संहार करून पृथ्वी जिंकिली आणि मुनीला (कश्यपाला) देऊन टाकिली. ॥ ५१ ॥ तोच परात्पर परमात्मा सांप्रत रघुवंशामध्यें अवतरला आहे. तुझा वध करण्यासाठीं त्याला मनुष्यरूप घ्यावें लागलें : तो हा राम! ॥ ५२ ॥ तूं त्याची भार्या सीता वनांतून बलात्कारें चोरून आणिलीस कशाला बरें ? माझ्या पुत्राचा नाश व्हावा व स्वतांलाही मृत्यु यावा एवढ्यासाठींच कीं नाहीं ? ॥ ५३ ॥ आतां तरी जानकीला

[1]आक्रम्यादात्सुरेन्द्राय [2]भृत्याय रघुसत्तमः ॥ ५० ॥ राक्षसाः क्षत्रियाकारा जाता भूमेर्भरावहाः ॥ तान्हत्वा बहुशो रामो भुवं [3]जित्वा ह्यदान्मुनेः ॥ ५१ ॥ स एव सांप्रतं जातो रघुवंशे परात्परः ॥ भवदर्थे रघुश्रेष्ठो मानुषत्वमुपागतः ॥ ५२ ॥ तस्य भार्या किमर्थं वा हृता सीता वनाद्बलात् ॥ मम पुत्रविनाशार्थं स्वस्यापि निधनाय च ॥ ५३ ॥ इतः परं वा वैदेहीं प्रेषयस्व रघूत्तमे ॥

(मू.) सुरेन्द्राय अदात्. ॥ ५० ॥ (पू.) जाताः; ॥ रामः तान् बहुशः (मू.) [4]अदात्. ॥ ५१ ॥ सः एव परात्परः (पू.) जातः. ॥ रघुश्रेष्ठः (मू.). ॥५२॥ (मू.) बलात्, वनात् किमर्थं हृता ? ॥ ५३ ॥ (पू.) प्रे[6]षयस्व. ॥

१ पायांखालीं घालून. २ सेवकाला. ३ जिंकून. ४ देता झाला. ५ मरण्यासाठीं. ६ पाठव.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रघुवीराकडे पाठवून दे, राज्य विभीषणाच्या स्वाधीन कर व मग आपण वनांत जाऊं.[1] ' ॥ ५४ ॥ मंदोदरीचें भाषण ऐकिल्यावर रावण बोलूं लागला :– ' सुंदरि ! मी रामाकडून युद्धांत पुत्रांचा, भावांचा व राक्षससमूहाचा घात करविला, तेव्हां आतां वनांत जाऊन जिवंत राहूं कसा ? मला लोकांना तोंड तरी कसें दाखवितां येईल ? ॥ ५५ ॥ ह्मणून, मी रामाबरोबर युद्ध कारितों.[2] रामाचे बाण अतिशय भराभर चालत[3] असतात; ते लागून माझें शरीर छिन्नभिन्न होईल, - मग मी मृत्यु पावेन व - त्या विष्णूच्या परमपदास प्राप्त होईन. ॥ ५६ ॥ रामचंद्र विष्णु होय, हें मी जाणतों; जानकी लक्ष्मीचा अवतार, हेंही मला ठाऊक आहे. जाणूनबुजूनच मी जनककन्येला–सीतेला–वनांतून बलात्कारें घेऊन आलों. उद्देश इतकाच कीं,

विभीषणाय राज्यं तु दत्त्वा गच्छामहे वनम् ॥ मन्दोदरीवचः श्रुत्वा रावणो वाक्यमब्रवीत् ॥ ५४ ॥ कथं भद्रे रणे पुत्रान् भ्रातॄन् राक्षसमण्डलम् ॥ घातयित्वा राघवेण जीवामि वनगोचरः ॥ ५५ ॥ रामेण सह योत्स्यामि रामबाणैः सुशीघ्रगैः ॥ विदार्यमाणो यास्यामि तद्विष्णोः परमं पदम् ॥ ५६ ॥ जानामि राघवं विष्णुं लक्ष्मीं जानामि जानकीम् ॥ ज्ञात्वैव जानकी सीता मया ऽऽनीता वनाद्बलात् ॥ रामेण निधनं प्राप्य यास्यामीति परं पदम् ॥ ५७ ॥

(द्वि.) गच्छामहे. रावणः (मू.) – ॥ ५४ ॥ ' (पू.) [च] ॥ राघवेण (मू.) इव कथं जीवामि ? ॥ ५५ ॥ (पू.) रामबाणैः ॥ विदार्यमाणः [सन्] (पू.) यास्यामि. ॥ ५६ ॥ राघवं विष्णुं (पू.) लक्ष्मीं जानामि. ॥ मया, (तृ.) यास्यामि इति ॥ (द्वि.) आनीता. ॥ ५७ ॥

---

१ जाऊं. २ युद्ध करीन. ३ फार वेगानें जाणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामाच्या हातून मरण पावून सद्गतीस जावें. ॥ ५७ ॥ प्रिये! मी तुला सोडून व संसाराचा त्याग करून मृतबंधूंबरोबर गमन करणार. रामानें युद्धांत माझा वध केला ह्मणजे मी, मुमुक्षु लोक ज्या परमानंदमय पवित्र पदाला पावतात, ॥५८॥ त्या गतीस जाईन. - अंतकालीं रामदर्शन झालें ह्मणजे, - ह्या राक्षसदेहांत माझ्या हातून घडलेलीं सर्व पापें धुपून जातील. मग, मुक्ति जरी दुर्लभ आहे, तरी मला निश्चयानें मिळेल. ॥५९॥ प्रिये! हा संसार ह्मणजे एक समुद्रच होय. ह्या समुद्रामध्यें पांच क्लेश (१ अविद्या, २ अस्मिता, ३ राग, ४ द्वेष, ५ अभिनिवेश), व त्या पांचांपासून उद्भवणाऱ्या स्थूलवृत्ति ह्या लाटा उसळत असतात; एकामागून एक येणारीं सुखें व दुःखें हे भोंवरे भरून राहिले आहेत; स्त्री, पुत्र, आप्त, द्रव्य बंधु इत्यादि जलजंतु

विमुच्य त्वां तु संसाराद्गमिष्यामि सह प्रिये ॥ परानन्दमयी शुद्धा सेव्यते या मुमुक्षुभिः ॥ ५८ ॥ तां गतिं तु गमिष्यामि हतो रामेण संयुगे ॥ प्रक्षाल्य कल्मषाणीह मुक्तिं यास्यामि दुर्लभाम् ॥ ५९ ॥ क्लेशादिपञ्चकतरंगयुगं भ्रमाढ्यं दारात्मजाप्तधनबन्धुझषाभियुक्तम् ॥

प्रिये, त्वां (पू.) [मृतबन्धुभिः सह] गमिष्यामि. ॥ मुमुक्षुभिः (मू.) सेव्यते, ॥५८॥ [अहं] संयुगे रामेण हतः [सन्] (पू.), इह कल्मषाणि (मू.) मुक्तिं यास्यामि. ॥ ५९ ॥

---

१ युद्धांत. २ पापें. ३ धुवून. ४ अविद्या (अनित्य अपवित्र व दुःखरूप अशा जड पदार्थांना नित्य पवित्र व सुखरूप आत्मा ह्मणणें), अस्मिता (आहेंपणा – शरीरावेगळा आत्मा नाहीं असें समजणें), राग, द्वेष, अभिमान असे पांच क्लेश ह्या लाटा ज्यांत अशा प्रवृत्तिरूप भ्रमानें संपन्न. ५ स्त्री, पुत्र, इष्ट, द्रव्य, बंधु ह्या मगरांनीं युक्त.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

फिरत असतातच; वडवाग्नीसारखा प्रखर तेजस्वी स्वकीय क्रोध राहतो; आणि मदनरूपी जाळें पसरून ठेविलेलें आहे. मी हा संसारसमुद्र तरून हरिपदीं जातों. ॥ ६० ॥ इति दशमः सर्गः ॥ १० ॥ रावणानें मंदोदरीराणीला प्रेमपूर्वक असें गुह्य सांगून, रामाबरोबर युद्ध करण्यासाठीं रणांगणांत जावयाची तयारी चालविली. ॥ १ ॥ तो, भयंकर राक्षसांना बरोबर घेऊन, रथांत बसला. त्याचा रथ अतिशय बळकट होता; त्याला सोळा चाकें असून संरक्षणासाठीं वरूथ (छपरी) होतें व - मोठा - दांडा होता. ॥२॥ त्याला जे गर्दभ जोडिले होते, त्यांचीं तोंडें पिशाचासारखीं भयंकर होतीं; ह्मणून तो (रथ) दृष्टीस पडला कीं भयं

और्वानलाभनिजरोषमनंगजालं संसारसागरमतीत्य हरिं व्रजामि ॥ ६० ॥ इति श्रीम० युद्धकाण्डे दशमः सर्गः ॥ १० ॥ इत्युक्त्वा वचनं प्रेम्णा राज्ञीं मन्दोदरीं तदा ॥ रावणः प्रययौ योद्धुं रामेण सह संयुगे ॥ १ ॥ दृढं स्यन्दनमास्थाय वृतो घोरैर्निशाचरैः ॥ चक्रैः षोडशभिर्युक्तं सवरूथं सकूबरम् ॥ २ ॥ पिशाचवदनैर्घोरैः खरैर्युक्तं भयावहम् ॥ सर्वास्त्रशस्त्रसहितं सर्वोपस्करसंयुतम् ॥ ३ ॥

(मू.)[४]. ॥ ६० ॥ इति दशमः सर्गः ॥ १० ॥ रावणः तदा (१ पू.) इति वचनं उक्त्वा (१ मू.) योद्धुं षोडशभिः (२ उ. ३ मू.) दृढं स्यन्दनं आस्थाय (२ पू.) वृतः [सन्] प्रययौ. ॥ १ ॥ २ ॥ ३ ॥

---

१ वडवानल ह्या नांवाचा स्वकीय क्रोध ज्यांत आहे अशा. २ मदन हें जाळें ज्यांत, अशा ३ उल्लंघून. ४ जातों. ५ रथास. ६ बसून. ७ छपरीसह. ८ जोकडासह. ९ पिशाचासारखीं मुखें ज्यांचीं, अशा. १० गर्दभांनीं. ११ सर्व साहित्यांनीं युक्त.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वाटे. आंत सर्व शस्त्रें व अस्त्रें ठेविलीं असून सकल साहित्य भरलें होतें. ॥ ३ ॥ रावणाची आकृति फार भयंकर असे. तो अशा थाटानें एकदम बाहेर पडला. रावण दिसण्यांत उग्र होता. व तो रणांत फार निर्दय-पणाचें कृत्य करी. ह्मणून त्याला येतांना पाहिल्याबरोबर वानरसेना, राम तिचें रक्षण करीत होता तरी, घाबरून गेली. ॥ ४ ॥ मारुति उडी मारून रावणाशीं युद्ध करण्यास सरसावला. मारुतीच्या पराक्रमाला उपमाच देतां येत नसे. त्यानें जवळ येऊन राक्षसाच्या वक्षःस्थलावर, ॥ ५ ॥ घट्ट मूठ आंवळून, वेगानें प्रहार केला. त्या मुष्टिप्रहाराबरोबर रावण मूर्छा येऊन गुडघे टेंकून रथांत पडला, पण कांहीं वेळानें पुन्हां सावध झाला व मारुतीला ह्मणाला :– 'तूं शूर आहेस हें मी कबूल करितों.' ॥ ६ ॥ ७ ॥

निश्चक्रामाथ सहसा रावणो भीषणाकृतिः[1] ॥ आयान्तं रावणं दृष्ट्वा भीषणं रणक-र्कशम् ॥ संत्रस्ता ऽभूत्तदा सेना वानरी रामपालिता ॥ ४ ॥ हनूमानथ चोत्प्लुत्य रावणं योद्धुमाययौ ॥ आगत्य हनुमान् रक्षोवक्षस्यतुलविक्रमः ॥ ५ ॥ मुष्टिबन्धं दृढं बद्ध्वा ताडयामास वेगतः ॥ तेन मुष्टिप्रहारेण जानुभ्यां[3] मपतद्रथे ॥ ६ ॥ मूर्च्छितो ऽथ मुहूर्तेन रावणः पुनरुत्थितः ॥ उवाच च हनूमन्तं शूरो ऽसि मम संमतः ॥ ७ ॥

(पू.) रावणः सहसा निश्चक्राम. ॥ तदा रामपालिता वानरी सेना (द्वि.) रावणं आयान्तं दृष्ट्वा (मू.). ॥ ४ ॥ अथ (पू.). ॥ अतुलविक्रमः हनुमान (मू.) ॥ ५ ॥ (पू.) ताडयामास. ॥ [रावणः] (मू.) अपतत्[4]. ॥ ६ ॥ (पू.) हनुमन्तं उवाच – ॥ ' (मू.) असि. ' ॥ ७ ॥

१ भयंकर स्वरूपाचा. २ बाहेर पडला. ३ गुडघ्यांनीं. ४ पडला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारुति त्याला ह्मणाला :– ‘ छिः ! रावणा ! तूं जिवंत राहिलास त्या अर्थी धिक्कार असो मला ! ! बरें पण, रावणा ! तूं अगोदर माझ्या छातीवर एक गुद्दा मारून घे; ॥८॥ कारण, नंतर मी तुला मारणार आहें, त्या प्रहाराबरोबर तूं प्राण सोडशील, ह्याबद्दल संशयच नलगे, - मग, तुझ्या पनांत मला मारायाची इच्छा असेल, ती तशीच राहून जाईल ! ! - ’ रावणानेंही ‘ ठीक आहे’ ह्मणून व स्थलावर मुष्टिप्रहार केला, ॥९॥ त्याबरोबर मारुतीच्या डोळ्यांपुढें काजवे चमकले आणि त्यालां किंचित् मूर्छा आली. वानरेश्वर शुद्धीवर येतांच रावणाला मारण्यास धांवला.॥१०॥तेव्हां राक्षसाधिपति रावण भिऊन दुसरेकडे गेला. हनुमान्, अंगद, नल तसाच नील ॥११॥ हे चौघे सारखे एकाशीं एक उभे होते. त्यांना समोर अग्निवर्ण, सर्परोमा, खड्गरोमा

हनूमानाह तं धिङ् मां यस्त्वं जीवसि रावण ॥ त्वं तावन्मुष्टिना वक्षो मम ताडय रावण ॥८॥ पश्चान्मया हतः प्राणान्मोक्ष्यसे नात्र संशयः ॥ तथेति मुष्टिना वक्षो रावणेनापि ताडितः ॥ ९ ॥ विघूर्ण[1]मानननयनः किंचित्कश्मलमाययौ[2] ॥ संज्ञामवाप्य[3] कपिराट् रावणं हन्तु[4]मुद्यतः ॥ १० ॥ ततोऽन्यत्र गतो भीत्या रावणो राक्षसाधिपः ॥ हनूमानंगदश्चैव नलो नीलस्तथैव च ॥ ११ ॥

हनुमान तं आह – ‘ रावण, मां (पू.). ॥ रावण, (मू.) वक्षः ताडय. ॥ ८ ॥ (पू.) न. ’ ॥ रावणेन अपि ‘ तथा ’ इति [उक्त्वा], (मू.) ॥ ९ ॥ (पू.). ॥ कपिराट् (मू.). ॥ १० ॥ राक्षसाधिपः रावणः भीत्या (मू.) नलः, नीलः च ॥ ११ ॥

१ गरगर फिरताहेत (पांढरे झाले) डोळे ज्याचे असा. २ मूर्च्छेस. ३ शुद्धीस. ४ पावून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चार वानरांचें चौघां राक्षसांशीं युद्ध.

आणि वृश्चिकरोमा॥१२॥हे चौघे मोठे राक्षस दिसले. तेव्हां चौघां वानरांनीं क्रमानें चार दैत्यांशीं युद्ध चालविलें. शेवटीं ते त्या चौघांही पराक्रमी राक्षसांना मारून ॥ १३ ॥ वेगवेगळे भुःभुःकार करीत रामाजवळ गेले. इतक्यांत रावण संतापून दांत ओंठ चावीत ॥ १४ ॥ डोळे वटारून रामाच्या आंगावर धांवला. रावण रथांत बसला होता; व राम - भूमीवरच उभा होता. - पण त्या क्रूर राक्षसानें ती रामाची स्थिति मनांत न आणितां त्याच्यावर वज्रतुल्य महाभयंकर बाणांचे ॥ १५ ॥

चत्वारः [१]समवेता ऽग्रे दृष्ट्वा राक्षसपुंगवान् ॥ [२]अग्निवर्णं तथा [३]सर्परोमाणं [४]खड्गरोमकम् ॥ १२ ॥ तथा वृश्चि[५]करोमाणं निर्जघ्नुः क्रमशो ऽसुरान् ॥ [६]चत्वारश्चतुरो[७] हत्वा राक्षसान् भीमविक्रमान् ॥ १३ ॥ सिंहनादं पृथक्कृत्वा रामपार्श्वमुपागताः ॥ ततः क्रुद्धो दशग्रीवः संदश्य [९]दशनच्छदम् ॥ १४ ॥ वि[१०]वृत्य नयने क्रूरो राममेवान्व[१२]धावत ॥ दशग्रीवो रथस्थस्तु रामं वज्रोपमैः शरैः ॥ १५ ॥

(पू.) दृष्ट्वा, ॥ (मू.), ॥ १२ ॥ (पू.) क्रमशः निर्जघ्नुः. (मू.) राक्षसान् हत्वा, ॥ १३ ॥ पृथक् (मू.) सन्दश्य, ॥ १४ ॥ क्रूरः [सन्] नयने (१५पू.) रथस्थः (१५मू.) महाघोरैः शरैः तोयदैः[१३]

१ मिळालेले. २ अग्नीच्या रंगाचा, अशा. ३ सर्पासारखे आंगावरील केंस ज्याचे, अशा. ४ तरवारींसारखे केंस ज्याचे, अशा. ५ विंचवासारखे केंस ज्याचे, अशा. ६ मारिते झाले. ७ चार. ८ चौघांना. ९ दांतांच्या आच्छादनास (ओंठास). १० चावून. ११ टवकारून. १२ रोंखानें धांवला. १३ मेघ.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रहार चालविले. मेघ उदकाच्या धारा सोडतो त्याप्रमाणें रावण बाण सोडीत होता. त्यानें रामाच्या समक्ष सर्व वानरांनाही जर्जर करून सोडिलें. ॥१६॥ युद्धांत राम मुळींच डगमगला नाहीं तर अग्नीसारख्या चकचकीत व सुवर्णानें मढविलेल्या बाणांचा रावणावर वर्षाव करीत होता. ॥ १७ ॥ रावण रथांत बसला आहे व राम भूमीवर उभा आहे, असें पाहून इंद्रानें मातलीला हांक मारिली व सांगितलें कीं, ॥ १८ ॥ माझा रथ घे व भूमीवर राम उभा आहे त्याजकडे लवकर जा; हे पुण्यवंता! भूतलावर सत्वर जाऊन एवढें माझें कार्य कर. ॥ १९ ॥ इंद्रानें अशी आज्ञा दिली असतां तो देवसारथि मातलि त्याला वंदन करून व लागलेच त्या उत्तम

आजघान महाघोरैर्धाराभिरिव तोयदः ॥ रामस्य पुरतः सर्वान्वानरानपि विव्यथे ॥ १६ ॥ ततः पावकसंकाशैः शरैः काञ्चनभूषणैः ॥ अभ्यवर्षद्रणे रामो दशग्रीवं समाहितः ॥ १७ ॥ रथस्थं रावणं दृष्ट्वा भूमिष्ठं रघुनन्दनम् ॥ आहूय मातलिं शक्रो वचनं चेदमब्रवीत् ॥१८॥ रथेन मम भूमिष्ठं शीघ्रं याहि रघूत्तमम् ॥ त्वरितं भूतलं गत्वा कुरु कार्यं ममानघ॥१९॥एवमुक्तोऽथ तं नत्वा मातलिर्देवसारथिः॥

(१६ पू.) आजघान. ॥ (मू.). ॥ १५ ॥ १६ ॥ ततः रामः समाहितः [सन्] (पू.) शरैः (मू.) अभ्यवर्षत्. ॥ १७ ॥ शक्रः (पू.) [च] दृष्ट्वा मातलिं (मू.) वचनं अब्रवीत्– ॥ १८ ॥ ‘ अनघ, मम रथेन शीघ्रं (पू.) याहि. ॥ (मू.) कार्यं कुरु. ’ ॥ १९ ॥ अथ (पू.) ॥

१ त्रास देऊं लागला. २ अग्नीसारख्या. ३ इंद्र. ४ भूमीवर उभा असणाऱ्या. ५ बोलावून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रथाला हिरवे घोडे जोडून - घेऊन - ॥ २० ॥ रामाचा विजय व्हावा एवढ्यासाठीं रामाजवळ आला. इंद्राचा रथ इतर सगळ्याच प्राण्यांना दिसत नसे. पुढें, त्या रथांत बसलला मातलि हात जोडून रामाला म्हणाला :– 'रघुवीरा! मला देवेंद्रानें पाठविलें आहे. ॥ २१ ॥ प्रभो! हा देवराजाचा रथ, त्यानें तुझा विजय होण्यासाठीं, धाडिला आहे. महाराज! हें सुशोभित इंद्रधनुष्य, हें कधींही न फुटणारें कवच, हा खड्ग, तसेच हे दोन दिव्य भाते–इतकें उपकरण मी आणिलें आहे. - ॥ २२ ॥ रामा! ह्या रथावर आरोहण कर;

ततो हयैश्च संयोज्य हरितैः[1] स्यन्दनोत्तमम्[2] ॥ २० ॥ स्वर्गाज्जयार्थं रामस्य ह्युप-
चक्राम[3] मातलिः ॥ अब्रवीच्च ततो राममप्रतर्क्यरथे[4] स्थितः ॥ प्राञ्जलिर्देवराजेन[5]
प्रेषितोऽस्मि रघूत्तम ॥ २१ ॥ रथोऽयं देवराजस्य विजयाय तव प्रभो ॥ प्रेषि-
तश्च महाराज धनुरैन्द्रं च भूषितम् ॥ अभेद्यं[6] कवचं[7] खड्गं दिव्यतूणीयुगं[8] तथा
॥ २२ ॥ आरुह्य च रथं राम रावणं जहि राक्षसम् ॥

तं नत्वा ततः हरितैः (मू.) संयोज्य [जगाम]. ॥ २० ॥ अप्रतर्क्यरथे स्थितः मातलिः स्वर्गात रामस्य (पू.), ॥ ततः प्रांजलिः [सन्] रामं (द्वि.) च – 'रघूत्तम, [अहं] (मू.). ॥ २१ ॥ प्रभो, (पू) रथः तव विजयाय ॥ (द्वि.) ऐन्द्रं धनुः, ॥ तथा (मू.) च [प्रेषितं]. ॥ २२ ॥ राम, रथं (पू.) ॥

१ हिरव्या. २ उत्तम रथास. ३ जवळ आला. ४ लोकांना न दिसणाऱ्या रथांत. ५ इंद्रानें. ६ न फुटणारें. ७ चिलखत. ८ उत्तम भात्यांची जोडी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मी तुझें सारथ्य करितों. आणि, देवा, तूं, जसा देवेंद्रानें वृत्रासुर मारिला त्याप्रमाणें, त्या राक्षसाचा—रावणाचा—वध कर.' ॥ २३ ॥ मातलीनें असें सांगितलें असतां, राम त्या उत्तम रथाला प्रदक्षिणा घालून व वंदन करून रथावर चढला. ह्या वेळीं, - 'आतां रावणाचा वध लवकरच होणार' असें वाटून - लोकांच्या मुखांवर टवटवी आली. ॥२४॥ नंतर त्या महासमर्थ रामचंद्राचें व त्या कुशल रावणाचें महायुद्ध चालू झालें. तो भयंकर देखावा पाहून प्रेक्षक जनांच्या आंगावर कांटा उभा राहिला ! ॥२५॥ रामचंद्र अस्त्रविद्येंत परिपूर्ण होता; राक्षसाधिपति जें अस्त्र सोडी, त्याचा, राम त्याच अस्त्राच्या योगें प्रतीकार करीत असे—आग्नेय अस्त्रावर आग्नेय अस्त्र सोडी व इंद्रास्त्रावर इंद्रास्त्र सोडी आणि रावणाचें अस्त्र हतवीर्य करीत असे. ॥२६॥

मया सारथिना देव वृत्रं देवपतिर्यथा ॥ २३ ॥ इत्युक्तस्तं परिक्रम्य नमस्कृत्य रथोत्तमम् ॥ आरुरोह रथं रामो लोकाँल्लँक्ष्म्या नियोजयन् ॥ २४ ॥ ततोऽभवन्महायुद्धं भैरवं रोमहर्षणम् ॥ महात्मनो राघवस्य रावणस्य च धीमतः ॥ २५ ॥ आग्नेयेन च आग्नेयं दैवं दैवेन राघवः ॥ अस्त्रं राक्षसराजस्य जघान परमास्त्रवित् ॥ २६ ॥

(मू.) देवपतिः वृत्रं, [तथा] जहि. ' ॥ २३ ॥ इति उक्तः रामः तं रथोत्तमं (पू.) [च] (मू.) [सन्] रथं आरुरोह. ॥ २४ ॥ (उ.) रावणस्य च (पू.) महायुद्धं अभवत्. ॥ २५ ॥ परमास्त्रवित् राघवः (पू.) दैवं च ॥ राक्षसराजस्य (मू.). ॥ २६ ॥

१ जोडणारा. २ रोमांच थरारविणारें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रावणालाही अस्त्रांची चांगली माहिती होती; पुढें त्यानें अत्यंत क्रुद्ध होऊन रामावर एक भयंकर राक्षसी अस्त्र सोडिलें. ॥ २७ ॥ रावणाच्या बाणांचे पृष्ठभाग सुवर्णानें मढविलेले होते; ते बाण धनुष्यापासून सुटले कीं, अत्युग्र विषवान् सर्प होऊन चोहोंकडून रामावर पडत. ॥ २८ ॥त्या सर्पमुखी बाणांच्या मुखांतून अग्नि बाहेर पडे; अशा बाणांच्या योगें, मुख्य व अवांतर मिळून एकंदर सर्व दिशा भरून गेल्या. ॥२९॥ नंतर रामानें, जिकडे तिकडे सर्प पसरले आहेत असें पाहून, त्या अस्त्राला भिवविणारें गरुडास्त्र युद्धांत

ततस्तु ससृजे घोरं राक्षसं चास्त्रमस्त्रवित् ॥ क्रोधेन महता ऽऽविष्टो रामस्योपरि रावणः ॥२७॥ रावणस्य धनुर्मुक्ताः सर्पा भूत्वा महाविषाः॥ शराः कांचनपुंखाभा राघवं परितो ऽपतन् ॥२८॥ तैः शरैः सर्पवदनैर्वमद्भिरनलं मुखैः ॥ दिशश्च विदिशश्चैव व्याप्तास्तत्र तदा ऽभवन् ॥ २९ ॥ रामः सर्पांस्ततो दृष्ट्वा समंतात्परिपूरितान् ॥ सौपर्णमस्त्रं तद्घोरं पुरः प्रावर्तयद्रणे ॥ ३० ॥

ततः अस्त्रवित् महता (उ.) रामस्य उपरि (पू.) ससृजे. ॥ २७ ॥ (पू.) कांचनपुंखाभाः शराः महाविषाः सर्पाः भूत्वा (मू.). ॥ २८ ॥ तदा तत्र दिशः, विदिशः च एव (पू.) अनलं वमद्भिः शरैः (मू.). ॥२९॥ ततः (पू.) सर्पान् दृष्ट्वा, ॥ (मू.) अस्त्रं रणे पुरः प्रावर्तयत्. ॥ ३० ॥

१ अमीला. २ ओकणाऱ्या. ३ अवांतर दिशा. ४ झाल्या. ५ गरुडाच्या. ६ पाठविता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रावणाच्या अग्रभागीं सोडिलें. ॥ ३० ॥ रामानें सोडिलेले बाण गरुडरूपी बनले. गरुड सर्पांचे मारक शत्रु. म्हणून त्या गरुडरूपी बाणांनीं जिकडे तिकडे पसरलेल्या सर्पबाणांचे तुकडे उडविले. ॥ ३१ ॥ युद्धांत रामानें आपल्या अस्त्राचा प्रतीकार केला असें पाहून दशानन त्यावर भयंकर शरसमूहाची वृष्टि करीत सुटला. ॥ ३२ ॥ राम आपलें कार्य चलाखीनें, श्रम न होतां, करीत असे (त्यानें रावणाचे बाण सहज तोडिले). तेव्हां रावणानें पुन्हां शरसमूह सोडून रामाला त्रासविलें व एक भयंकर बाण मातलीला मारिला. ॥ ३३ ॥ रामाच्या रथाचा ध्वज सुवर्णाचा होता; रावणानें अत्यंत क्रोधाविष्ट होऊन तो ध्वज रथाच्या पाठीमागें

रामेण मुक्तास्ते बाणा भूत्वा गरुडरूपिणः ॥ चिच्छिदुः सर्पबाणांस्तान्समन्तात्सर्पशत्रवः ॥ ३१॥ अस्त्रे प्रतिहते युद्धे रामेण दशकन्धरः ॥ अभ्यवर्षत्ततो रामं घोराभिः शरवृष्टिभिः ॥ ३२ ॥ ततः पुनः शरानीकै[1] राममक्लिष्टकारिणम्[2] ॥ अर्दयित्वा[3] तु घोरेण मातलिं प्रत्यविध्यत[4] ॥ ३३ ॥ पातयित्वा रथोपस्थे[5] रथकेतुं च काञ्चनम्[6] ॥ ऐन्द्रानश्वानभ्यहनद्रावणः क्रोधमूर्च्छितः ॥ ३४ ॥

(पू.) सर्पशत्रवः भूत्वा, तान् (मू.) चिच्छिदुः. ॥ ३१ ॥ ततः रामेण युद्धे (पू.) [सति], दशकन्धरः ॥ (मू.) अभ्यवर्षत्. ॥ ३२ ॥ (पू.) रामं ॥ अर्दयित्वा तु घोरेण [बाणेन] (मू.). ॥ ३३ ॥ क्रोधमूर्च्छितः रावणः (पू.) र[7]थकेतुं च पातयित्वा (मू.). ॥ ३४ ॥

१ बाणसमूहांनीं. २ क्लेशावांचून काम करणाऱ्या. ३ जर्जर करून. ४ मारिता झाला. ५ रथाच्या पिछाडीस. ६ सुवर्णाच्या. ७ रथाच्या ध्वजाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पाडिला (बाण मारून लव्हाळ्यासारखा लववीला) आणि इंद्राच्या घोड्यांना जर्जर केलें. ॥ ३४ ॥ रामचंद्राचें शरीर विव्हल झालें, असें पाहून देव, गंधर्व, चारण तसेच पितर ह्या सर्वांना खेद वाटला व महर्षि चिंतातुर झाले; ॥ ३५ ॥ विभीषणासह सकल वानरसेनापतींना तर अतिशय चिंता पडली. दहा तोंडें, वीस हात, हातांत धनुष्यें, असा ॥ ३६ ॥ तो रावण त्या रणांगणीं मैनाक पर्वतासारखा प्रचंड दिसूं लागला! रामाचे डोळे क्रोधानें लाल झाले. त्यानें भुंवया चढविल्या, ॥ ३७ ॥ आणि - स्वतांच्या पराक्रमाला - अनुरूप अशी ईर्षा धरिली. ह्या वेळीं, तो रावणाला जाळणार कीं काय, असा भास पडे! त्यानें, वर्षाऋतूंत आकाशामध्यें जें इंद्रधनुष्य दिसतें, तेवढें विस्तीर्ण असें अद्भुत धनुष्य उचलिलें, ॥ ३८॥

विषेदुर्देवगन्धर्वाश्चारणाः पितरस्तथा ॥ आर्ताकारं[2] हरिं दृष्ट्वा व्यथिताश्च महर्षयः
॥ ३५ ॥ व्यथिता वानरेन्द्राश्च बभूवुः सविभीषणाः ॥ दशास्यो विंशतिभुजः
प्रगृहीतशरासनः ॥ ३६ ॥ ददृशे रावणस्तत्र मैनाक इव पर्वतः ॥ रामस्तु भ्रुकुटिं
बद्ध्वा क्रोधसंरक्तलोचनः ॥ ३७ ॥ कोपं चकार सदृशं निर्दहन्निव राक्षसम् ॥
धनुरादाय देवेन्द्रधनुराकारम्[3]द्भुतम् ॥ ३८ ॥

(पू.) पितरः हरिं (मू.) विषेदुः[1]; महर्षयः च व्यथिताः. ॥ ३५ ॥ सविभीषणाः वानरेन्द्राः च (मू.) ॥ ३६ ॥ (पू.) इव ददृशे. ॥ (मू.) [सन] ॥३७॥ राक्षसं निर्दहन् इव सदृशं (पू.), ॥ (मू.) धनुः आदाय, ॥ ३८ ॥

---

१ खिन्न झाले. २ खिन्न शरीर ज्याचें, अशा. ३ इंद्रधनुष्याच्या आकाराचें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रलयकालच्या अग्नीसारखा लखलखीत बाण हातीं घेतला, व अग्रभागीं उभा असलेल्या शत्रूवर अग्नीसारखी धगधगीत दृष्टि फेंकिली. ॥ ३९ ॥ त्याचें शरीर तेजामुळें प्रदीप्त दिसत होतें. त्या कालरूपी रामचंद्रानें सर्व लोकांच्या समक्ष आपला पराक्रम दाखविण्यास प्रारंभ केला :– ॥ ४० ॥ रामानें धनुष्य कर्णापर्यंत ओढिलें, रावणाला बाण मारिला, व वानरसेनेला आनंद दिला. ह्या वेळीं राममूर्ति कालमृत्यूप्रमाणें उग्र परंतु रमणीय दिसत होती. ॥ ४१ ॥ राम शत्रूवर धांवला त्यावेळीं त्याचें मुख इतकें कोपयुक्त दिसत होतें कीं, तें पाहून सर्व प्राण्यांना भीति वाटली व पृथ्वी थरथर कांपूं लागली. ॥ ४२ ॥

गृहीत्वा पाणिना बाणं कालानलसमप्रभम् ॥ निर्दहन्निव चक्षुर्भ्यां ददृशे रिपुमन्तिके ॥ ३९ ॥ पराक्रमं दर्शयितुं तेजसा प्रज्वलन्निव ॥ प्रचक्रमे कालरूपी सर्वलोकस्य पश्यतः ॥ ४० ॥ विकृष्य चापं रामस्तु रावणं प्रतिविध्य च ॥ हर्षयन्वानरानीकं कालान्तक इवाबभौ ॥ ४१ ॥ क्रुद्धं रामस्य वदनं दृष्ट्वा शत्रुं प्रधावतः ॥ तत्रसुः सर्वभूतानि चचाल च वसुन्धरा[1] ॥ ४२ ॥

(पू.) बाणं गृहीत्वा, ॥ चक्षुर्भ्यां (मू.) ददृशे. ॥ ३९ ॥ (मू.) [रामः] सर्वलोकस्य पश्यतः [सतः रावणवधार्थं] प्रचक्रमे. ॥ ४० ॥ रामः तु चापं (पू.) ॥ वानरानीकं (मू.). ॥ ४१ ॥ सर्वभूतानि शत्रुं प्रधावतः रामस्य (मू.) च चचाल[2]. ॥ ४२ ॥

---

१ पृथ्वी. २ कांपली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामाचें महाभयंकर रूप दिसलें व जिकडे तिकडे अत्यंत दारुण उत्पात दिसूं लागले, तेव्हां सर्व भूतांना त्रास झाला व रावणाला भय पडलें. ॥ ४३ ॥ देवगण, सिद्ध, गंधर्व व किन्नर विमानांत बसून आकाशमार्गी आले होते ते, ॥४४॥ खालीं चाललेलें जगाच्या प्रलयासारखें हें अत्यंत तुमुल युद्ध पाहत, स्तब्ध उभे राहिले. रामानें इंद्रास्त्र घेऊन रावणाचें मस्तक तोडिलें. ॥ ४५ ॥ जशीं ताडाच्या झाडाचीं फळें भूमीवर पडतात, तशीं - रामानें तोडिलेलीं - रावणाचीं अनेक मस्तकें आकाशांतून बदाबद खालीं पडूं लागलीं. तीं रक्तानें

रामं दृष्ट्वा महारौद्रमुत्पातांश्च सुदारुणान् ॥ त्रस्तानि सर्वभूतानि रावणं चाविशद्भयम् ॥ ४३ ॥ विमानस्थाः सुरगणाः सिद्धगन्धर्वकिन्नराः ॥ ४४ ॥ ददृशुः सुमहायुद्धं लोकसंवर्तकोपमम् ॥ ऐन्द्रमस्त्रं समादाय रावणस्य शिरोऽच्छिनत्॥४५॥ मूर्धानो रावणस्याथ बहवो रुधिरोक्षिताः ॥ गगनात्प्रपतन्ति स्म तालादिव फलानि हि ॥ ४६ ॥

सर्वभूतानि (पू.) उत्पातान् च दृष्ट्वा (मू.) अविशत्. ॥ ४३ ॥ (मू.) [च] ॥ ४४ ॥ (पू.) सुमहायुद्धं ददृशुः. ॥ [रामः] (मू.). ॥ ४५ ॥ (पू.) रावणस्य मूर्धानः ॥ (मू.) इव गगनात् प्रपतन्ति स्म. ॥ ४६ ॥

१ महाभयंकर. २ शिरलें. ३ लोकांच्या प्रलयासारखें. ४ रक्तानें भिजलेलें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भिजलेलीं असत. ॥ ४६ ॥ हें युद्ध चाललें असतां दिवस वाटेना, रात्र दिसेना, संध्याकाळ भासेना व दिशाही दिसल्या नाहींत (अनेक दिवस पर्यंत एकसारखें युद्ध चाललें होतें)! - रामानें रावणाचीं मस्तकें अनेक वेळां तोडिलीं - तरी त्याच्या मूळ स्वरूपांत (दहा मस्तकांत) कांहीं कमीपणा दिसून आला नाहीं! ॥ ४७ ॥ तेव्हां रामाचें अंतःकरण आश्चर्यचकित होऊन गेलें. - तो आपल्याशींच ह्मणे : - 'मी रावणाचीं एकासारखीं एक तेजःपुंज अशीं एकशें एक मस्तकें तोडिलीं, ॥४८॥ तरी अद्याप रावणाचें आयुष्य संपत नाहीं व तो थंड होत (मरत) नाहीं! - हें आहे तरी काय!' - तो कौसल्येच्या आनंदसमुद्राला भरती आणणारा चंद्र

न दिनं न च वै रात्रिर्न सन्ध्या न दिशो ऽपि वा ॥ प्रकाशन्ते न तद्रूपं दृश्यते तत्र संगरे ॥४७॥ ततो रामो बभूवाथ विस्मयाविष्टमानसः ॥ शतमेकोत्तरं छिन्नं शिरसां चैकवर्चसाम् ॥ ४८ ॥ नचैव रावणः शान्तो दृश्यते जीवितक्षयात् ॥ ततः सर्वास्त्रविद्वीरः कौसल्यानन्दवर्धनः ॥ ४९ ॥ अस्त्रैश्च बहुभिर्युक्तश्चिन्तयामास राघवः ॥ यैर्यैर्बाणैर्हता दैत्या महासत्त्वपराक्रमाः ॥ ५० ॥

तत्र सङ्गरे दिनं न [प्रकाशते], रात्रिः न [प्रकाशते], सन्ध्या न [प्रकाशते], (पू.) न ॥ (मू.) न दृश्यते. ॥ ४७ ॥ (पू.) बभूव. ॥ अथ [रामेण] एकवर्चसां शिरसां एकोत्तरं (मू.). ॥४८॥ (पू.) शान्तः च न एव दृश्यते. ॥ (मू.) ॥ ४९ ॥ बहुभिः (पू.) चिन्तयामास – ॥ ' (मू.) दैत्याः हताः, ॥ ५० ॥

१ सारखें तेज ज्यांचें, अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

(राम) महापराक्रमी होता. त्याला सर्व अस्त्रें अवगत होतीं इतकेंच नव्हे, तर तीं सगळीं त्याच्या जवळ तयार होतीं. इतकें असूनही रामचंद्राला चिंता उत्पन्न झाली कीं, आजपर्यंत ज्या ज्या बाणांनीं मी महाबलाढ्य व पराक्रमी दैत्य मारिले, ॥ ४९ ॥ ५० ॥ ते ते बाण रावणाला मारण्याच्या कामीं निष्फल होऊन गेले! - आतां करावें काय? - अशा प्रकारें राम चिंताग्रस्त होऊन बसला होता. इतक्यांत जवळच उभा असलेला विभीषण ॥ ५१ ॥ रामाला सांगूं लागला :- " रघुवीरा! ह्याला ब्रह्मदेवानें वर दिला आहे! ' ह्याचे बाहु तुटले व शिरें तोडिलीं तरी, ॥ ५२ ॥ ते पुन्हां उगवावे व तीं पुन्हां उत्पन्न व्हावीं ' असें ब्रह्मदेवानें सांगून ठेविलें आहे. ह्याच्या नाभिस्थानीं कुंडलाच्या आकारासारखें अमृत ठेविलें आहे, ॥ ५३ ॥ रामा! तें अग्न्यस्त्राच्या योगें सुकवून टाक. तसें केलेंस कीं हा मृत्यु पावेल. " रामचंद्र पराक्रमाचें कृत्य सत्वर पार

त एते निष्फलं याता रावणस्य निपातने ॥ इति चिन्ताकुले रामे समीपस्थो विभीषणः ॥ ५१ ॥ उवाच राघवं वाक्यं ब्रह्मदत्तवरो ह्यसौ ॥ विच्छिन्ना बाहवो ऽप्यस्य विच्छिन्नानि शिरांसि च ॥ ५२ ॥ उत्पत्स्यन्ति पुनः शीघ्रमित्याह भगवानजः ॥ नाभिदेशे ऽमृतं तस्य कुण्डलाकारसंस्थितम् ॥५३॥ तच्छोषयानलास्त्रेण तस्य मृत्युस्ततो भवेत्॥विभीषणवचः श्रुत्वा रामः शीघ्रपराक्रमः॥५४॥

(पू) निष्फलं याताः ! '॥ रामे इति चिन्ताकुले [सति], (मू.) ॥ ५१ ॥ (पू.) उवाच – " असौ ब्रह्मदत्तवरः [अस्ति]. ॥ 'अस्य (मू.) ॥ ५२ ॥ पुनः शीघ्रं उत्पत्स्यन्ति[1]' (पू.) आह. तस्य (मू.); ॥ ५३ ॥ तत् अनलास्त्रेण[2] शोषय[3]. ततः (पू.)." ॥ शीघ्रपराक्रमः रामः (मू.) ॥५४॥

युद्धकाण्ड. सर्ग १११
'ह्याच्या बेंबी-तील अमृत सुकव.'

१ उद्भवतील. २ अग्न्यस्त्रानें. ३ सुकव.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पाडीत असे. त्यानें विभीषणाचें वचन ऐकिल्याबरोबर ॥ ५४ ॥ अग्न्यस्त्राची योजना करून राक्षसाच्या नाभीचा भेद केला, नंतर त्याचीं मस्तकें तोडिलीं, व बाहुही तोडून टाकिले. ह्या वेळीं तो महापराक्रमी रघुवीर फारच खवळला होता. पुढें रावणानें एक भयंकर महाशक्ति उचलली व ॥ ५५ ॥ ५६ ॥ विभीषणाला मारण्यासाठीं त्याच्यावर सोडिली. विभीषणाबद्दल रावणाला फारच क्रोध आला होता. रामानें सुवर्णालंकृत तीक्ष्ण बाणांच्या योगें त्या शक्तीचे तुकडे केले. ॥ ५७ ॥ नऊ मस्तकें तुटलीं तेव्हां रावणाचें तेज उतरलें व रूप म्लान होऊन गेलें. तीं भयंकर शिरें छिन्न झालीं असतां तो विरूप दिसूं लागला. ॥५८॥

पावकास्त्रेण संयोज्य नाभिं विव्याध रक्षसः ॥ अनन्तरं च चिच्छेद शिरांसि च महाबलः ॥ ५५ ॥ बाहूनपि च संरब्धो रावणस्य रघूत्तमः ॥ ततो घोरां महाशक्तिमादाय दशकन्धरः ॥ ५६ ॥ विभीषणवधार्थाय चिक्षेप क्रोधविह्वलः ॥ चिच्छेद राघवो बाणैस्तां शितैर्हेमभूषितैः ॥ ५७ ॥ दशग्रीवशिरश्छेदात्तदा तेजो विनिर्गतम् ॥ म्लानरूपो बभूवाथ छिन्नैः शीर्षैर्भयंकरैः ॥ ५८ ॥

(५५ पू.) नाभिं विव्याध. ॥ (५५ उ. ५६ पू.) रावणस्य शिरांसि, बाहून् अपि च चिच्छेद. ॥ ततः दशकन्धरः (मू.) ॥ ५५ ॥ ५६ ॥ क्रोधविव्हलः [सन्] (मू.) बाणैः तां चिच्छेद. ॥ ५७ ॥ तदा (पू.). ॥ अथ [रावणः] छिन्नैः भयंकरैः शीर्षैः (मू.) ॥ ५८ ॥

---

१ मस्तकांनीं.

६।२४

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतां त्याचें एक मुख्य मस्तक व दोन बाहु अवशिष्ट राहिले. तरी पण तो - वीर रणभूमीवर - शोभतच होता. त्यानें पुन्हां क्रुद्ध होऊन अनेक प्रकारच्या शस्त्रास्त्रसमूहाची ॥ ५९ ॥ रामावर वृष्टि चालविली. रामही त्याच्यावर बाणांचा वर्षाव करूं लागला. त्या वेळीं मोठें भयंकर तुमुल युद्ध झालें. पाहणारांच्या आंगांवर रोमांच थरारले. ॥ ६० ॥ पुढें मातलीनें रामाला स्मरण करून दिलें कीं, रघुवीरा! ह्याच्या वधासाठीं लवकर ब्रह्मास्त्र सोड; ॥ ६१ ॥ देवांनीं ह्याचा नाश होण्याची ठरविलेली वेळ सध्यां चालली आहे; राघवा! तूं ह्याचें मस्तक तोडूं नकोस; ॥ ६२ ॥

एकेन मुख्यशिरसा बाहुभ्यां रावणो बभौ ॥ रावणस्तु पुनः क्रुद्धो नानाशस्त्रास्त्रवृष्टिभिः ॥ ५९॥ ववर्ष रामं तं रामस्तथा बाणैर्ववर्ष च ॥ ततो युद्धमभूद्घोरं तुमुलं लोमहर्षणम्[1] ॥ ६० ॥ अथ संस्मारयामास[2] मातली राघवं तदा ॥ विसृजास्त्रं[3] वधायास्य ब्राह्मं शीघ्रं रघूत्तम ॥ ६१ ॥ विनाशकालः प्रथितो[4] यः सुरैः सोऽद्य वर्तते ॥ उत्तमांगं[5] न चैतस्य च्छेत्तव्यं[6] राघव त्वया ॥ ६२ ॥

रावणः (पू.) च बभौ. ॥ रावणः तु पुनः क्रुद्धः [सन्] (मू.) ॥ ५९ ॥ तं रामं (मू.) युद्धं अभूत्. ॥ ६० ॥ अथ तदा मातलिः राघवं (पू.) – ॥ ' रघूत्तम, अस्य (मू.) अस्त्रं, शीघ्रं विसृज. ॥ ६१ ॥ राघव, सुरैः यः (पू.). ॥ त्वया एतस्य (मू.). ॥ ६२ ॥

१ रोमांच थरारविणारें. २ आठवून देता झाला. ३सोड.४ सांगितलेला. ५ मस्तकास. ६ तोडावें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रभो ! मस्तकावर कितीही प्रहार केलेस तरी हा मरणार नाहीं, वक्षस्थलरूप मर्मप्रदेशीं मारशील तर मात्र मरेल. मातलीच्या ह्या भाषणानें रामाला स्मरण करून दिलें; तेव्हां ॥६३॥ त्यानें सर्पाप्रमाणें फौंफावणारा एक प्रदीप्त बाण हातीं घेतला; ह्या बाणाच्या पार्श्वभागीं वायूची स्थापना केली होती, फळावर (शल्यावर) सूर्य आणि अग्नि स्थापिले होते; ॥ ६४ ॥ शरीर आकाशमय (आकाशासारखें विस्तीर्ण) असून, त्याच्या (बाणाच्या) जडपणाला मेरु–मंदरपर्वतांची उपमा साजण्याजोगी होती, व पेरांवर महासमर्थ लोकपाल बसविले होते; ॥ ६५ ॥ त्याचें (बाणाचें) शरीर देदीप्यमान असून तेज सूर्यासारखें होतें. रामानें लोकां-

नैव शीर्ष्णि प्रभो वध्यो[2] वध्य एव हि मर्मणि[3] ॥ ततः संस्मारितो रामस्तेन वाक्येन मातलेः ॥ ६३ ॥ जग्राह स शरं दीप्तं निःश्वसन्तमिवोरगम् ॥ यस्य पार्श्वे[6] तु पवनः फले भास्करपावकौ ॥६४॥शरीरमाकाशमयं गौरवे[11] मेरुमन्दरौ ॥ पर्वस्वपि[12] च विन्यस्ता लोकपाला महौजसः[13] ॥ ६५ ॥ जाज्वल्यमानं वपुषा भातं भास्करवर्चसा ॥ तमुग्रमस्त्रं लोकानां भयनाशनमद्भुतम् ॥ ६६ ॥

प्रभो, [अयं] शीर्ष्णि (पू.) एव वध्यः. ' ॥(मू.) वाक्येन रामः संस्मारितः. ॥ ६३ ॥ (पू.) इव निःश्वसन्तं[4] शरं जग्राह[5]; ॥(मू.) ॥ ६४ ॥ (मू.) लोकपालाः विन्यस्ताः[14]. ॥ ६५ ॥ वपुषा (पू.) भातं[15] ॥ (मू.) अस्त्रं [जग्राह]. ॥ ६६ ॥

---

१ मस्तकावर. २ मारण्यास योग्य. ३ काळजावर. ४ सों सों वाजणाऱ्या. ५ घेता झाला. ६ बाजूस. ७ वायु. ८ अग्रावर. ९ सूर्य व अग्नि. १० आकाशरूप (विस्तीर्ण). ११ जडपणांत. १२ पेरांवर. १३ महासमर्थ. १४स्थाविलेलें. १५शोभत असलेल्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ची भीति दूर करणारें विलक्षण उग्र अस्त्र त्या प्रचंड बाणावर वेदोक्त विधीच्या योगें अभिमंत्रित करून तो बाण धनुष्यास जोडिला. रामाचे भुज पुष्ट व शक्तिसंपन्न होते. ॥ ६६ ॥ ६७ ॥ रामचंद्रानें तो उत्तम बाण धनुष्याला जोडिला, त्या वेळीं सर्व भूतें भयभीत झालीं व पृथ्वी कांपूं लागली. ॥ ६८ ॥ राम रावणावर अतिशय संतापला होता. त्यानें पूर्णपणें तयारी करून धनुष्याची दोरी कर्णापर्यंत ओढिली आणि तो मर्मभेदी बाण शत्रूवर सोडिला ! ॥ ६९ ॥ त्या बाणाचें मुख काळाच्या जबड्यासारखें भयंकर होतें ! वज्रपाणीच्या (इंद्राच्या) हातून सुटलेल्या वज्राप्रमाणें असह्य असा तो बाण रावणाच्या वक्षःस्थलावर

अभिमन्त्र्य ततो रामस्तं महेषुं[1] महाभुजः ॥ वेदप्रोक्तेन विधिना संदधे कार्मुके बली ॥ ६७ ॥ तस्मिन्संधीयमाने तु राघवेण शरोत्तमे ॥ सर्वभूतानि वित्रेसुश्चचाल च वसुन्धरा ॥ ६८ ॥ स रावणाय संक्रुद्धो भृशं[6]मानम्य कार्मुकम् ॥ चिक्षेप परमायत्तस्तमस्त्रं मर्मघातिनम् ॥ ६९ ॥ स वज्र इव दुधर्षो वज्रपाणिविसर्जितः ॥ कृतान्त इव घोरास्यो[9] न्यपतद्रावणोरसि ॥ ७० ॥

ततः महाभुजः बली (मू.) अभिमन्त्र्य कार्मुके[2] सन्दधे[3]. ॥ ६७ ॥ राघवेण (पू.) सन्धीयमाने[4] [सति], ॥ (मू.) च चचाल. ॥ ६८ ॥ परमायत्तः[5] रावणाय संक्रुद्धः (पू.) आनम्य[7] ॥ (मू.) अस्त्रं चिक्षेप[8]. ॥ ६९ ॥ (पू.) वज्रः इव दुर्धर्षः ॥ (मू.) सः रावणोरसि न्यपतत्[10]. ॥ ७० ॥

१ महाबाणास. २ धनुष्यावर. ३ जोडिता झाला. ४ जोडिला जाणारा. ५ फार तत्पर. ६ अत्यंत. ७ लववून. ८ फेंकिता झाला. ९ भयंकर मुख ज्याचें, असा. १० पडला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- मी कार्यें करितों, मला त्यांचें फळ भोगिलें पाहिजे, अशा अभिमानामुळें उत्पन्न होणारा हा - संसार आ-त्म्याला अगदीं लागत नाहीं; आणि बुद्धीला ज्ञान नाहीं, -कारण ती अचेतन जड आहे. -पण हा अविचारानें त्या दोहोंबद्दल अभिमान बाळगतो आणि "मी कर्ता, भोक्ता, संसारी जीव" असा व्यवहार चालवितो! ॥ ३६ ॥ चैतन्याच्या समागमानें जड पदार्थावर चैतन्याचे धर्म भासूं लागतात, व जडाच्या सहवासानें चेतनावर जडाचे धर्म अनुभवास येतात : ह्याला उदाहरण उदकाचा आणि अग्नीचा संयोग (उदक जड असतांही अग्नी-च्या संबंधानें विद्युल्लतेच्या रूपानें प्रकाश पावूं लागतें, व विद्युल्लतेचा प्रकाश उदकाच्या संबंधानें आपलें स्वरूप विसरून अप्रकाश होतो) :- त्याप्रमाणें बुद्धि जड आहे तरी पण आत्म्याच्या सहवासानें तिचा चेतनरूपान भास व " चित्त " ह्या संज्ञेनें व्यवहार होतो, आणि आत्मा चेतन (ज्ञानरूप) असतांही जड देहादिकाच्या सहवासानें स्वतांला अज्ञानी मानूं लागतो.- ॥ ३७ ॥ मनुष्याला जोंपर्यंत तुझ्या चरणाची

आत्मनः संसृतिर्नास्ति बुद्धेर्ज्ञानं न [1]जात्विति ॥ अविवे[2]का[3]द्द्वयं [4]युक्त्वा संसारी-
ति प्रवर्तते ॥ ३६ ॥ जडस्य [6]चित्समायोगाच्चित्त्वं भूयाच्चितेस्तथा ॥ जडसं-
गाज्जडत्वं हि जलाग्न्योर्मेलनं यथा ॥ ३७ ॥ यावत्त्वत्पादभक्तानां [11]संगसौख्यं
न विन्दति ॥ तावत्संसारदुःखौघान्न [12][13]निवर्तेन्नरः सदा ॥ ३८ ॥

(मू.). ॥ ३६ ॥ ३७ ॥ नरः सदा (मू. म.). ॥ ३८ ॥

---

१ जातु कधीं. २ अविचारानें. ३ दोन्ही. ४ जोडून. ५ व्यवहार करितो. ६ चैतन्याच्या संबंधानें. ७ चित्त्वं चेतनपणा. ८ चितेः चैतन्याला. ९ उदक आणि अग्नि यांचें १० संयोग. ११ संगताच्या सुखाला. १२ पावतो. १३ परतेल.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भक्ति करणाऱ्या साधूंच्या समागमाचें सुख मिळत नाहीं, तोंपर्यंत तो संसाररूप दुःखप्रवाहापासून कधींही सुटत नाहीं.॥३८॥सत्पुरुषांचा समागम झाला कीं मनुष्याच्या मनांत तुजविषयीं भक्ति उत्पन्न होते; व तो भक्तीनें तुझी आराधना करूं लागला ह्मणजे माया त्याच्यापासून हळू हळू दूर होऊं लागते आणि उत्तरोत्तर क्षीणता पावते.॥३९॥नंतर, ज्याला तुझ्या स्वरूपाचें पूर्ण यथार्थ ज्ञान आहे असा सद्गुरु त्याला मिळतो; पुढें तुझ्या प्रसादानें त्या गुरूपासून त्याला "तत्त्वमसि" ह्या महावाक्याच्या अर्थाचें ज्ञान होतें; व तो मुक्त होतो. ॥४०॥ह्यावरून इतका सिद्धांत ठरतो कीं, ज्या मनुष्याच्या अंतरीं तुजविषयीं भक्ति उत्पन्न झाली नाहीं त्याला - इतर साधनांनीं - शेंकडों कोटि कल्पांनीं तरी मुक्ति मिळेल किंवा ज्ञान होईल, अशी कोणी शंका देखील बाळगूं नये; - त्याला कधीं ज्ञान व्हावयाचें नाहीं, मोक्ष मिळायाचा नाहीं, - आणि तशीच सुखप्राप्तिही व्हावयाची नाहीं. ॥ ४१ ॥ ह्मणून, - देवा, मी तुजपाशीं एवढें एक मागणें मागून घेतों कीं, - जन्मोजन्मीं

सत्संगलब्धया[1] भक्त्या यदा त्वां समुपासते[2]॥तदा माया शनैर्याति[3] तानवं[4] प्रतिपद्यते॥३९॥ततस्त्वज्ज्ञानसम्पन्नः सद्गुरुस्तेन लभ्यते[5]॥वाक्यज्ञानं[6] गुरोर्लब्ध्वा त्वत्प्रसादाद्विमुच्यते॥४०॥तस्मात्त्वद्भक्तिहीनानां कल्पकोटिशतैरपि॥न मुक्तिशंका विज्ञानशंका नैव सुखं तथा ॥ ४१ ॥ अतस्त्वत्पादयुगले भक्तिर्मे जन्मजन्मनि॥

यदा, (मू. प्र.).॥३९॥ततः तेन (पू. मू.). गुरोः वाक्यज्ञानं त्वत्प्रसादात् लब्ध्वा, विमुच्यते. ॥४०॥ (मू.). ॥४१॥ अतः जन्मजन्मानि त्वत्पादयुगुले मे भक्तिः, ॥

१ सत्समागमानें मिळालेल्या. २ भजतात. ३ क्षीणतेला. ४ पावते. ५ पाविजेतो. ६ महावाक्याचें ज्ञान.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुझ्या चरणयुगुलावर माझी भक्ति जडो आणि मला तुझ्या भक्तांचा समागम घडो. भक्तींनें आणि भक्तांच्या समागमानें मनुष्याचें अज्ञान नष्ट होतें. ॥ ४२ ॥ लोकांमध्यें, तुझी भक्ति करण्यांत तत्पर असणारे व उपदेशद्वारानें तुझ्या तत्त्वज्ञानरूप अमृताची वृष्टि करणारे पुरुष सर्व जगाला पवित्र करूं शकतात. मग ते आपल्या वंशजांना पवित्र करितात हें काय पुन्हां वेगळें सांगायाला पाहिजे ! ॥ ४३ ॥ हे त्रैलोक्याधिपते, तुला नमस्कार असो. हे भक्तींनें वश होणाऱ्या देवा, तुला नमस्कार असो. हे कृपासागरा, हे अनंता, हे रामचंद्रा, तुला नमस्कार असो. ॥ ४४ ॥ देवा, मी लोकांना जिंकण्याच्या इच्छेनें जें जें पुण्य केलें तें तें सर्व तुझ्या बाणाचें लक्ष्य होवो (तुझ्या अमोघ बाणानें नाश पावो). रामचंद्रा तुला नम-

स्यात्त्वद्भक्तिमतां संगो ऽविद्या याभ्यां विनश्यति ॥ ४२ ॥ लोके त्वद्भक्ति-
निरतास्त्वद्धर्मा[2]मृतवर्षिणः ॥ पुनन्ति लोकमखिलं किं पुनः स्वकुलोद्भवान्॥ ४३॥
नमो ऽस्तु जगतांनाथ नमस्ते भक्तिभावन[5] ॥ नमः कारुणिकानन्त रामचन्द्र
नमो ऽस्तु ते ॥ ४४ ॥ देव यद्यत्कृतं पुण्यं मया लोकजिगीषया ॥ तत्सर्वं तव
बाणाय भूयाद्राम नमो ऽस्तु ते ॥ ४५ ॥

त्वद्भक्तिमतां संगः [च] स्यात्, याभ्यां अविद्या वि[1]नश्यति. ॥ ४२ ॥ (मू.) अखिलं लोकं पु[3]नन्ति, पुनः स्वकुलो[4]द्भवान् किं ! ॥४३॥ (मू.).॥४४॥ देव, मया लोकजि[6]गीषया यत् यत् पुण्यं कृतं, (मू.). '

१ नष्ट होते. २ तुझे धर्म ह्या अमृताची वृष्टि करणारे. ३ पवित्र करितात. ४ आपल्या वंशजांना ५ भक्तींनें वश होणाऱ्या. ६ लोकांना जिंकण्याच्या इच्छेनें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्कार असो. ' ॥ ४५ ॥ परशुरामानें अशी स्तुति केली असतां, तो दयाळू षड्गुणैश्वर्यसंपन्न श्रीरामचंद्र प्रसन्न होऊन - त्याला ह्मणाला :- ' ब्राह्मणा, मी तुला प्रसन्न आहें. तुझ्या मनांत जें कांहीं आहे, ॥ ४६ ॥ तें सर्व इच्छित मी तुला देईन. ह्याबद्दल अगदीं संशय धरूं नकोस.' हें ऐकून भार्गवरामही संतुष्ट अंतःकरणानें रामचंद्राला ह्मणाला :- ॥४७॥ ' हे मधुदैत्याचा वध करणाऱ्या विष्णुरूपा रामचंद्रा, जर तुझा मजवर अनुग्रह आहे, तर, तुझ्या भक्तांचा समागम आणि तुझ्या चरणीं दृढ भक्ति, ह्या दोन गोष्टी मला नित्य प्राप्त व्हाव्या, ॥ ४८ ॥ व मी केलेल्या ह्या स्तोत्राचा भक्तिहीन मनुष्यानें जरी नित्य पाठ केला तरी त्याला,

ततः प्रसन्नो भगवान् श्रीरामः करुणामयः ॥ प्रसन्नोऽस्मि तव ब्रह्मन्यत्ते मनसि वर्तते ॥ ४६ ॥ दास्ये तदखिलं कामं मा कुरुष्वात्र संशयम् ॥ ततः प्रीतेन मनसा भार्गवो राममब्रवीत् ॥४७॥ यदि मेऽनुग्रहो राम तवास्ति मधुसूदन ॥ त्वद्भक्तसंगस्त्वत्पादे दृढा भक्तिः सदाऽस्तु मे ॥ ४८ ॥ स्तोत्रमेतत्पठेद्यस्तु भक्तिहीनोऽपि सर्वदा ॥

॥४५॥ (मू.) प्रसन्नः श्रीरामः [उवाच] – ' ब्रह्मन, तव (मू.), ॥ ४६ ॥ तदखिलं कामं दास्ये, अत्र संशयं मा कुरुष्व. ' (मू.) – ॥४७॥ ' राम, मधुसूदन, यदि मे तव अनुग्रहः अस्ति, [तर्हि] सदा, मे (मू. प्र.). ॥ ४८ ॥ भक्तिहीनः अपि यः एतत् स्तोत्रं सर्वदा पठेत्, ॥

१ नको. २ कर. ३ मधु दैत्याचा वध करणाऱ्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुझी भक्ति, ज्ञान आणि अंतकाळीं तुझें स्मरण इतकीं प्राप्त व्हावीं, - ही माझी इच्छा पूर्ण कर. - ' ॥४९॥ रामचंद्रानें ' बरें आहे ' असें म्हटलें, त्याची पूजा केली व त्याला जाण्यास अनुमोदन दिलें. त्याप्रमाणें परशुरामही रामाला प्रदक्षिणा घालून व नमस्कार करून महेंद्र पर्वती निघून गेला. ॥ ५० ॥ - परशुराम गेला, असें पाहिल्याबरोबर - दशरथ राजाला, रामाचा पुनर्जन्म झाला, असें वाटलें व हर्ष झाला. राम जवळ आल्याबरोबर त्यानें त्याला घट्ट पोटाशीं धरिलें. त्याच्या नेत्रांतून आनंदाश्रूंचे प्रवाह वाहूं लागले. ॥ ५१ ॥ नंतर त्याच्या चित्ताला समाधान वाटलें व तो संतुष्ट अंतःकरणानें अयोध्यानगरीस गेला. ते देवांसारखे राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न चौघेजण ॥ ५२ ॥ आपआपल्या पत्नीला घेऊन आपआपल्या मंदिरांत आनंदानें राहिले. त्यांचीं मातापितरें - आनंदांत काळ क्रमूं लागलीं. - सीतेच्या सहवासानें रामालाही अत्यंत संतोष होत

त्वद्भक्तिस्तस्य विज्ञानं भूयादन्ते स्मृतिस्तव ॥ ४९ ॥ तथेति राघवेणोक्तः परिक्रम्य[1] प्रणम्य तम् ॥ पूजितस्तदनुज्ञातो महेन्द्राचलमन्वगात् ॥ ५० ॥ राजा दशरथो हृष्टो रामं मृतमिवागतम् ॥ आलिंग्यालिंग्य हर्षेण नेत्राभ्यां जलमुत्सृजेत्[2] ॥५१॥ ततः प्रीतेन मनसा स्वस्थचित्तः पुरं ययौ ॥ रामलक्ष्मणशत्रुघ्नभरता देवसंमिताः[3] ॥ ५२ ॥ स्वां स्वां भार्यामुपादाय रेमिरे स्वस्वमन्दिरे ॥ मातापितृभ्यां संहृष्टो रामः सीतासमन्वितः ॥ ५३ ॥

तस्य त्वद्भक्तिः, विज्ञानं, अन्ते तव स्मृतिः भूयात्.'॥४९॥(मू.)॥५०–५२॥(बा. पू.मू.)रेमिरे[4].(उ.)॥५३॥

१ प्रदक्षिणा घालून. २ सोडिता झाला. ३ देवांसारखे. ४ रमूं लागले.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असे. ॥९३॥ वैकुंठलोकीं विष्णु लक्ष्मीसह आनंदांत असतात त्याप्रमाणें सीतेसह रामचंद्र - आपल्या प्रासादांत-आनंदांत असत. एकदां, युधाजित ह्या नांवाचा कैकेयीचा भाऊ अर्थात भरताचा मामा ॥ ९४ ॥ प्रेमानें भरताला आपल्या राज्यांत नेण्यासाठीं अयोध्येस आला. दशरथाचा त्याचा चांगला स्नेह होता. ह्मणून, शत्रूंचा पराभव करणाऱ्या त्या राजानें युधाजिताचा सत्कार करून त्याच्या बरोबर भरत आणि शत्रुघ्न ह्या दोघांना पाठविलें. ॥ ९५ ॥ ज्याप्रमाणें, देवांची माता अदिति इंद्राणीसह इंद्राच्या योगानें शोभते, त्याप्रमाणें महाभाग्यवती देवी कौसल्या सीतेसह रामचंद्राच्या संनिधानानें शोभत असे. ॥ ९६ ॥ श्रीरामचंद्र सीतेसहव-

रेमे वैकुण्ठभवने श्रिया[1] सह यथा हरिः ॥ युधाजिन्नाम कैकेयीभ्राता[2] भरतमातुलः[3] ॥ ५४ ॥ भरतं नेतुमागच्छत्स्वराज्यं प्रीतिसंयुतः ॥ प्रेषयामास भरतं राजा स्नेहसमन्वितः ॥ शत्रुघ्नं चापि संपूज्य युधाजितमरिन्दमः ॥ ५५ ॥ कौसल्या शुशुभे देवी रामेण सह सीतया ॥ देवमातेव पौलोम्या[6] शच्या शक्रेण शोभना ॥ ५६ ॥ साकेते लोकनाथ[12]प्रथितगुणगणो लोक[13]संगीतकीर्तिः

यथा (बा. पू. मू.) [तथा] रेमे. (मू. प्र.) ॥ ९४ ॥ प्रीतिसंयुतः [सन्] भरतं स्वराज्यं नेतुं आगच्छत्. स्नेहसमन्वितः अरिन्दमः राजा युधाजितं संपूज्य भरतं शत्रुघ्नं च अपि प्रेषयामास. ॥ ९५ ॥ कौसल्या देवी सीतया सह (बा. मू. प्र.) देवमाता इव शुशुभे. ॥९६॥ (मू.) ।

१ लक्ष्मीशीं. २ कैकेयीचा भाऊ. ३ भरताचा मामा. ४ संतोषानें युक्त असा. ५ शत्रूंस दमविणारा. ६ पुलोम्याची कन्या, अशा. ७ इंद्राणीशीं. ८ इंद्राशीं. ९ भाग्यवती. १० देवांची माता अदिति. ११ शोभली. १२ इंद्रादि लोकपालांनीं ज्याचे गुण गाऊन प्रसिद्ध केले, असा. १३ पृथ्वीवर लोकांनीं ज्याची कीर्ति गाइली, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

र्तमान अयोध्यानगरींत राहत असे. त्याचे अनेक गुण इंद्रादि लोकपालांकडे किंवा पृथ्वीवरील राजमंडळांत प्रसिद्ध होते. लोक त्याची कीर्ति प्रेमानें गात असत. त्याची मूर्ति अशी होती कीं, तिकडे पाहिल्याबरोबर सर्व प्रेक्षकजनांच्या अंतरीं आनंदाचें भरतें येई. त्याचें ऐश्वर्य अखंड आहे. त्याला कोणताही विकार नाहीं. त्याच्या वैभवाला मर्यादा नाहीं. त्यानें माया शक्ति स्वस्वरूपासून नित्य दूर ठेविली आहे. तो - सत्ता आणि स्फूर्ति ह्या रूपांनीं - मायेच्या सर्व कार्यांस व्यापून राहिला आहे व वास्तविक सदा ज्ञानसंपन्न आणि सकलजगाचा चालक असूनही मनुष्यासारखा भासत असतो. ॥ ५७ ॥ **॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे बालकांडे सप्तमः सर्गः ॥ ७ ॥** ह्या बालकांडांत शंकरांनीं सातच सर्ग सांगून दिले आहेत. ह्यांत श्लोक तीनशेंसाठ आहेत. ह्यांचें पठण किंवा श्रवण केलें असतां मनुष्याला मोक्षप्राप्ति होते. ॥ १ ॥

श्रीरामः सीतया ऽऽस्ते[1] ऽखिलजनैर्[2]निकरानन्दसन्दोहमूर्तिः ॥ नित्यं[3]श्रीर्निर्विकारो निरवधिविभवो[4] नित्यमायानिरासो[5] मायाकार्यानुसारी[6] मनुज इव सदा भाति देवो ऽखिलेशः ॥ ५७ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे बालकाण्डे सप्तमः सर्गः ॥ ७ ॥ अध्यात्मबालकाण्डे च सर्गाः सप्तैव शम्भुना ॥ दिष्टाः षष्ट्युत्तरत्रिंशच्छ्लोका मोक्षप्रदा नृणाम् ॥ ३६० ॥ श्रीमहादेव उवाच । [illegible] ॥

सदा मनुजः[7] इव भाति[8]. ॥ ५७ ॥ ॥ इति श्रीरामायणान्वये बालकाण्डे सप्तमः सर्गः समाप्तः ॥ ७ ॥

---

१ असे. २ ज्याची मूर्ति सर्व जनाच्या समूहाला आनंद देत असे, असा. ३ सर्वकाळ ऐश्वर्यसंपन्न. ४ ज्याचें ऐश्वर्य अमर्याद होतें, असा. ५ ज्यानें माया नित्य दूर ठेविली, असा. ६ मायेच्या कार्यास अनुसरणारा. ७ मनुष्य. ८ भासतो

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असे. ॥९३॥ वैकुंठलोकीं विष्णु लक्ष्मीसह आनंदांत असतात त्याप्रमाणें सीतेसह रामचंद्र - आपल्या प्रासादांत-
आनंदांत असत. एकदां, युधाजित ह्या नांवाचा कैकेयीचा भाऊ अर्थात भरताचा मामा ॥ ९४ ॥ प्रेमान
भरताला आपल्या राज्यांत नेण्यासाठीं अयोध्येस आला. दशरथाचा त्याचा चांगला स्नेह होता. ह्मणून, श-
त्रूंचा पराभव करणाऱ्या त्या राजानें युधाजिताचा सत्कार करून त्याच्या बरोबर भरत आणि शत्रुघ्न ह्या
दोघांना पाठविलें. ॥ ९९ ॥ ज्याप्रमाणें, देवांची माता अदिति इंद्राणीसह इंद्राच्या योगानें शोभते, त्याप्रमाणें
महाभाग्यवती देवी कौसल्या सीतेसह रामचंद्राच्या संनिधानानें शोभत असे. ॥ ९६ ॥ श्रीरामचंद्र सीतेसहव-

रेमे वैकुण्ठभवने श्रिया[1] सह यथा हरिः ॥ युधाजिन्नाम कैकेयीभ्राता[2] भरतमा-
तुलः[3] ॥ ५४ ॥ भरतं नेतुमागच्छत्स्वराज्यं प्रीतिसंयुतः ॥ प्रेषयामास भरतं राजा
स्नेहसमन्वितः ॥ शत्रुघ्नं चापि संपूज्य युधाजितमरिन्दमः ॥ ५५ ॥ कौसल्या
शुशुभे देवी रामेण सह सीतया ॥ देवमातेव पौलोम्या[6] शच्या[7] शक्रेण[8] शोभना[9]
॥ ५६ ॥ साकेते लोकनाथप्रथितगुणगणो[12] लोकसंगीतकीर्तिः[13]

यथा (बा. पू. मू.) [तथा] रेमे. (मु. प्र.) ॥ ९४ ॥ प्रीतिसंयुतः [सन्] भरतं स्व-
राज्यं नेतुं आगच्छत्. स्नेहसमन्वितः अरिन्दमः राजा युधाजितं संपूज्य भरतं शत्रुघ्नं च अपि प्रे-
षयामास. ॥ ९९ ॥ कौसल्या देवी सीतया सह (बा. मू. प्र.) देवमाता इव शुशुभे. ॥९६॥ (मू.) ।

१ लक्ष्मीशीं. २ कैकेयीचा भाऊ. ३ भरताचा मामा. ४ संतोषानें युक्त असा. ५ शत्रूंस दमविणारा. ६ पुलोम्याची कन्या, अशा. ७ इंद्राणीशीं. ८ इंद्राशीं. ९ भाग्यवती. १० देवांची माता अदिति. ११ शोभली. १२ इंद्रादि लोकपालांनीं ज्याचे गुण गाऊन प्रसिद्ध केले, असा. १३ पृथ्वीवर लोकांनीं ज्याची कीर्ति गाइली, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इत्यादि – असावे असें शास्त्रांत सांगितलें आहे, ते ते सगळे लक्ष्मणाच्या बुद्धींत दिसून येत). तो रामाला धर्मविषयक अनेक प्रश्न करी; आणि राम त्याला, धर्माचा व अधर्माचा निर्णय कळण्यासाठीं, तशा विषयांनीं भरलेल्या प्राचीन कथा सांगे. ह्याच प्रसंगांत रामानें लक्ष्मणाला सांगितलें कीं, बा ! - न कळतां जरी अधर्म घडला तरी मनुष्याला त्याचें फळ भोगावें लागतें : ब्रह्मस्वापहारासारख्या पापाला तर फारच भिऊन असलें पाहिजे : पूर्वीं नृग ह्मणून एक मोठा धार्मिक राजा होऊन गेला; तो नित्य पुष्कळ गाई ब्राह्मणांना देत असे; त्याच्या गाईंच्या कळपांत एक ब्राह्मणाची गाय चुकून आली होती; राजाला तें ठाऊक नव्हतें, ह्मणून त्यानें इतर गाईंबरोबर तीही गाय दान दिली; पुढें, त्या गाईचा पहिला धनी जो ब्राह्मण, त्याला ती गोष्ट कळली; त्यानें संतापून - शाप दिला; त्या शापामुळें नृगराजाला तिर्यग्योनींत (सरड्याच्या जन्मास) जावें लागलें ! नकळतां देखील घडलेल्या ब्रह्मस्वापहाराचा परिणाम असा होतो ! ! ॥ २ ॥ - अशा अनेक कथा ऐकून व तदनुरूप उत्तम आचरण ठेवून - लक्ष्मणानें आपलें अंतःकरण निर्मळ केलें होतें.

कदाचिदेकान्त उपस्थितं प्रभुं रामं रमालालितपादपंकजम् ॥ सौमित्रिरासादितशुद्धभावनः प्रणम्य भक्त्या विनयान्वितोऽब्रवीत् ॥ ३ ॥

कृतब्रह्मस्वापहारेणपरमधार्मिकस्यापीदृश्यवस्थेतिसर्वथाब्रह्मस्वविमुखताधर्मइतिसूचितम् ॥ २ ॥ **एकांते**विजने **उपस्थितं**प्राप्तम् **विनयान्वितः** सन् भक्त्यागुरुरयमितिबुद्ध्या **प्रणम्य** । अनेनगुरूपसदनप्रकारउक्तः । **आसादितंशुद्धंभावनं**भावनांतः

कदाचित्[1] आसादितशुद्धभावनः[2] सौमित्रिः[3] एकान्ते[4] उपस्थितं[5] प्रभुं[6] रमालालितपादपङ्कजं[7] रामं

१ एके प्रसंगीं. २ मिळविलें शुद्ध अंतःकरण ज्यानें, असा. ३ लक्ष्मण. ४ एकांतांत. ५ बसलेल्या. ६ सर्वशक्तिसंपन्न. ७ लक्ष्मीनें कुरवाळिलें चरणकमल ज्याचें, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एके प्रसंगीं, ज्याचें चरणकमल लक्ष्मीनें कुरवाळिलें तो सर्वशक्ति रामचंद्र एकांतस्थलीं बसला आहे - असें पाहून, लक्ष्मण त्याच्याजवळ गेला - आणि भक्तिपूर्वक नमस्कार करून नम्रपणें त्याला ह्मणाला :- ॥ ३ ॥ " रामचंद्रा ! तूं महाज्ञानी आहेस. वस्तुतः तुला आमच्यासारखें शरीर नाहीं; शुद्ध ज्ञान हेंच तुझें रूप होय. तूं सर्व प्राण्यांचा अंतर्यामी आहेस अर्थात त्यांना वागविणारा तूंच. - रामा ! ह्यावर तूं ह्मणशील :- ' (१) मी सर्वांच्या अंतरीं राहतों, तर सर्वांनाच माझें ज्ञान व्हावें, तें कां होत नाहीं ? (२) बरें, मला

त्वं शुद्धबोधो ऽसि हि सर्वदेहिनामात्मा ऽस्यधीशो ऽसि निराकृतिः स्वयम् ॥
प्रतीयसे ज्ञानदृशां महामते पादाब्जभृंगाहितसंगसंगिनाम् ॥ ४ ॥

करणंयेनसः शुद्धांतःकरणइतियावत् भगवदुक्तकथाश्रवणेनशुद्धांतःकरणइत्यर्थः ॥ ३ ॥ हेमहामते—महतीसर्वविषयामतिर्यस्यतस्यसंबोधनम् त्वं शुद्धबोधो ऽसि अनवच्छिन्नचैतन्यरूपोऽसि सर्वदेहिनामात्मा ऽसि । जीवानांतत्प्रतिबिंबत्वात् । अधीशो ऽसिअंतर्यामित्वान्नियंताऽसि । वास्तवभेदाभावाच्चसर्वात्मत्वम् औपाधिकभेदाच्चनियंतृनियम्यभावोबोध्यः । निराकृतिः अस्मदादिवत्स्वार्जितकर्माधीनशरीराकृतिरहितः । नन्वेवंसर्वैःकथमेवंनज्ञायतेऽतआह ज्ञानदृशां स्वयमेवप्रतीयसे—ज्ञायतेऽनेनेतिज्ञानंवेदांतवाक्यजातंतदेवदृक्दर्शनसाधनंयेषांतेषामितिसंबंधसामान्येषष्ठी तैरित्यर्थः । तादृशदृग्लाभश्चत्वद्भक्त्यधीनइत्याह

भक्त्या प्रणम्य विनयान्वितः [सन्] अब्रवीत् - ॥ ३ ॥ "महामते, त्वं निराकृतिः शुद्धबोधः असि, सर्वदेहिनां आत्मा असि, अधीशः असि, पादाब्जभृङ्गाहितसङ्गसङ्गिनां ज्ञानदृशां स्वयं प्रतीयसे. ॥ ४ ॥

१ भक्तीनें. २ वंदन करून. ३ नम्रतायुक्त. ४ होत्साता. ५ ह्मणाला. ६ महाबुद्धिमंता. ७ तूं. ८ नाहीं शरीर ज्याला, असा. ९ शुद्ध ज्ञानरूप. १० आहेस. ११ सर्व प्राण्यांचा. १२ अंतर्यामी. १३ नियामक. १४ चरणकमळावर भ्रमराप्रमाणें ठेविलें प्रेम ज्यांनीं अशा अंतःकरणांशीं संबंध ज्यांचा, अशा. १५ ज्ञानाचें साधन शास्त्र हें दृष्टि ज्यांची, त्यांना. १६ स्वतां. १७ अनुभवाला येतोस.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जर रूप नाहीं तर योग्यांना मी दिसतों कसा ?' तर ह्या दोन्ही शंकांचीं उत्तरें सांगतों :- (१) ज्या पुरुषांना ज्ञानाचें साधन वेदांतशास्त्र ही दृष्टि प्राप्त झाली असते त्यांनाच तूं (२) आपण होऊन आपलें दर्शन (अनुभव) देतोस. कमलावर जसें भ्रमराचें प्रेम असतें त्याप्रमाणें ज्या पुरुषांचीं अंतःकरणें तुझ्या चरणकमलीं भक्ति ठेवितात, त्यांना ही ज्ञानदृष्टि प्राप्त होते. ॥ ४ ॥ हे महासमर्था ! योगिजन मोक्षप्राप्तीसाठीं तुझ्या चरणकमलाचें ध्यान करितात; तें संसाराची निवृत्ति करितें;

अहं प्रपन्नो ऽस्मि पदाम्बुजं प्रभो भवापवर्गं तव योगिभावितम् ॥ यथा
ऽञ्जसा ऽज्ञानमपारवारिधिं सुखं तरिष्यामि तथा ऽनुशाधि माम् ॥ ५ ॥

पादेति त्वच्चरणकमलयोर्भृंगवदाहितःकृतःसंगोयेनतादृशांतःकरणसंगवताम् त्वच्चरणकमलसंलग्नांतःकरणवतामित्यर्थः ॥ ४ ॥ अथप्रार्थयते अहमिति भवस्यसंसारस्यापवर्गोनिवृत्तिर्यस्मात्तादृशं तव पदांबुजं प्रपन्नो ऽस्मि शरणंप्राप्तोऽस्मि योगिभावितं—योगिभिःसंसारमुक्त्येभावितम् । अनेनतस्यभवापवर्गत्वेसदाचारःप्रमाणमुक्तम् । प्रार्थनीयमाह अपारवारिधिरूपं यदज्ञानंसंसारमूलकारणं यथा सुखमक्लेशेन तरिष्यामि तथा मामनुशाधि शिक्षय । अपारवारिधिमित्यनेनसपारप्रसिद्धसमुद्राद्व्यतिरेकउक्तः अशक्यतरणताऽनेनध्वनिता ॥५॥ अथोत्तरमत्रतारयाति श्रुत्वेति रामः सौमित्रिवचः

प्रभो, अहं[1] योगिभावितं[2] भवापवर्गं[3] तव[4] पदाम्बुजं[5] प्रपन्नः[6] अस्मि[7]; यथा अञ्जसा[8] अपारवारिधिं[9] अज्ञानं सुखं[10] [यथा तथा] तरिष्यामि[11], तथा मां[12] अनुशाधि[13]." ॥ ५ ॥

१ मी. २ योग्यांनीं ध्याइलेल्या. ३ संसाराची निवृत्ति होते ज्यापासून, अशा. ४ तुझ्या. ५ चरणकमलाला. ६ शरण आलेला. ७ आहें. ८ लवकर. ९ विस्तीर्ण समुद्रासारख्या. १० क्लेश न होतां. ११ तरेन. १२ मला. १३ उपदेश कर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मणून मी त्याला (तुझ्या चरणकमलाला) शरण आलों आहें. रामा ! संसाराचें मूल कारण अज्ञान हा एक तरून जाण्याला परम कठिण असा अफाट समुद्र आहे; मी ह्या अज्ञानांतून, क्लेश न होतां लवकर, ज्याच्या योगें पार पडेन असा कांहीं उपाय मला शिकव. " ॥ ५ ॥ (शंकर ह्मणाले :- पार्वति !) राजशिरोमणि रामचंद्र शरणागताचीं दुःखें तत्क्षणीं दूर करीत असे. लक्ष्मणाचें हें समग्र भाषण ऐकून त्याच्या मनाला फार संतोष वाटला. त्यानें अज्ञानरूप अंधकाराच्या नाशासाठीं वेदांनाही मान्य असें आत्मतत्त्वज्ञान

श्रुत्वाऽथ सौमित्रिवचोऽखिलं तदा प्राह प्रपन्नार्तिहरः प्रसन्नधीः ॥ विज्ञानमज्ञानतमोपशान्तये श्रुतिप्रपन्नं क्षितिपालभूषणः ॥ ६ ॥

श्रुत्वा अथशब्दोवाक्यालंकारे तदाश्रवणाव्यवहितकालेएव प्रपन्नानांभक्तानामार्तिंसंसारदुःखंहरतितादृशः प्रसन्नाभ्रमादिहीनाभक्तानुग्रहपराचधीर्यस्यसः क्षितिपालानांराज्ञांभूषणभूतो ऽज्ञानरूपतमसउपशांतयेतदर्थम् संधिरार्षः श्रुतिभिःतमेवविदित्वातिमृत्युमेतीत्यादिश्रुतिभिःप्रपन्नंतत्फलकत्वेनबोधितं विज्ञानमात्मतत्त्वज्ञानमितिसामान्यतःप्रथमंप्राह ॥ ६ ॥

अथ अखिलं[1] सौमित्रिवचः[2] श्रुत्वा[3] प्रसन्नधीः[4] तदा[5] प्रपन्नार्तिहरः[6] क्षितिपालभूषणः[7] [रामः] अज्ञानतमोपशान्तये[8] श्रुतिप्रपन्नं[9] विज्ञानं[10] प्राह[11] — ॥ ६ ॥

---

१ सगळें. २ लक्ष्मणाचें भाषण. ३ ऐकून. ४ संतुष्ट मन ज्याचें, असा. ५ त्याचवेळीं. ६ शरणागतांचीं दुःखें दूर करणारा. ७ राजांमध्यें रत्नभूत. ८ अज्ञानरूप अंधकाराच्या नाशासाठीं. ९ वेदांनीं मान्य केलेलें. १० आत्मतत्त्वज्ञान. ११ सांगता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लक्ष्मणाला सांगितलें : तें येणेंप्रमाणें :— राम ह्मणाला :— ॥ ६ ॥ "- पुरुषानें ज्ञानप्राप्तीसाठीं पहिल्यानें (१) बहिरंग व (२) अंतरंग साधनें सिद्ध केलीं पाहिजेत : तीं अशीं :- प्रथम, (१) आपण ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र ह्या चार वर्णांपैकीं ज्या वर्णांत जन्मलेले असूं, व ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ किंवा संन्यासी ह्या चार आश्रमांपैकीं जो आश्रम स्वीकारिला असेल, त्यांत आचरण करण्याचीं नित्य नैमित्तिक कर्में

आदौ स्ववर्णाश्रमवर्णिताः क्रियाः कृत्वा समासादितशुद्धमानसः ॥ समाप्य
तत्पूर्वमुपात्तसाधनः समाश्रयेत्सद्गुरुमात्मलब्धये ॥ ७ ॥

अथतादृशज्ञानप्राप्तयेक्रमेणबहिरंगांतरंगसाधनान्याह आदाविति **स्ववर्णाश्रमेषु**शास्त्रेण**वर्णिता**याः**क्रिया**नित्यनैमित्तिकयज्ञदानादिरूपास्ताः **कृत्वा समासादितशुद्धमानसः**प्राप्तांतःकरणशुद्धिः **तत्पूर्वमुपात्तसाधनः**—तदनुष्ठानपूर्वकमेवउपात्तानि साधनानिशमदमादीनियेनतादृशः । अनेनकर्मणांबहिरंगत्वंशमादीनामंतरंगत्वंस्फुटमेवोक्तं किंच शमदमवैराग्यदार्ढ्यपर्यंतंकर्मानुष्ठानमेवेतिसूचितं । ततस्तत्कर्मानुष्ठानं **समाप्य**त्यक्त्वासंन्यस्येतियावत् । **आत्मलब्धये**आत्मज्ञानायतत्फलकायतत्त्वमस्यादिवाक्यार्थविचाराय **सद्गुरुं**श्रोत्रियंब्रह्मनिष्ठमित्यादिलक्षणलक्षितं **समाश्रयेत्**सेवेत । अनेनव्युत्पत्तिबलेनस्वयमेववाक्यार्थविचारःक्रियमाणोन

" [पुरुषः] आदौ[1] स्ववर्णाश्रमवर्णिताः[2] क्रियाः[3] कृत्वा[4] समासादितशुद्धमानसः[5] तत्पूर्वं[6] उपात्तसाधनः[7] [सन् तत्] समाप्य[8], आत्मलब्धये[9] सद्गुरुं[10] समाश्रयेत्[11]. ॥ ७ ॥

---

१ आरंभीं. २ आपल्या वर्णाला आणि आश्रमाला सांगितलेल्या. ३ कर्में. ४ करून. ५ करून घेतलें शुद्ध अंतःकरण ज्यानें, असा. ६ कर्मानुष्ठानपूर्वक. ७ मिळविलीं - शांति इंद्रियनिग्रह इत्यादि - साधनें ज्यानें असा. ८ संपवून; सोडून. ९ आत्मज्ञान मिळविण्यासाठीं (महावाक्याचा विचार करण्याकरितां). १० वेदवेत्ता, ब्रह्मज्ञानी अशा गुरूला. ११ भजावें.

शास्त्रोक्त विधीनें आचरण करावीं; (२) आणि अंतःकरण शुद्ध करून घ्यावें, व कर्मानुष्ठानपूर्वक शांति, इंद्रियनिग्रह इत्यादि साधनें संपादावीं. अशाप्रकारें दोन्ही साधनें सिद्ध झालीं ह्मणजे मग कर्मे आचरण करणें सोडून देऊन, आत्मज्ञानासाठीं (आत्मज्ञान करून देणाऱ्या तत्त्वमस्यादि महावाक्यांच्या अर्थाचा विचार करण्याकरितां) वेदज्ञ व ब्रह्मनिष्ठ अशा गुरूचा आश्रय धरावा. ॥ ७ ॥ लक्ष्मणा! प्राण्यानें पूर्वजन्मीं आदरपूर्वक जीं कर्मे संपादन करून ठेविलीं असतात त्यांचें फळ त्याला हें (विद्यमान) शरीर मिळालें असतें : ह्या जन्मांतही तो विषयांवर आसक्त होऊन राहिला ह्मणजे त्याच्या हातून ते

क्रिया शरीरोद्भवहेतुरादृता प्रियाप्रियौ तौ भवतः सुरागिणः ॥ धर्मेतरौ तत्र पुनः शरीरकं पुनः क्रिया चक्रवदीर्यते भवः ॥ ८ ॥

फलायेतिसूचितम् ॥ ७ ॥ संसारस्यभ्रमिमचक्ररूपत्वात्तन्निवृत्तेश्चतत्कारणाज्ञाननिवृत्तिमूलकत्वादज्ञाननिवृत्तेश्चतत्वज्ञानैकसाध्यत्वात्तत्वज्ञानस्यचवेदांतविचारसाध्यत्वात्तदर्थंगुरुसमाश्रयणमित्याह क्रियेति भवःसंसारश्चक्रवद्विपरिवर्तमान ईर्यतेकथ्यते । तदेवोपपादयति आदृताआदरपूर्वपूर्वजन्मार्जिता क्रिया एतस्यशरीरोद्भवस्यजन्मनोहेतुः तत्रजन्मनि सुरागिणोविषयाभिलाषवतः तौशास्त्रप्रसिद्धौ धर्मेतरौधर्माधर्मौ प्रियाप्रियौसुखदुःखजनकौ भवतः । कस्यचिदधर्मेएवसुखत्वबुद्ध्याप्रवृत्तिःकस्यचिद्धर्मे एवंकदाचिदित्य-

आदृता[1] क्रिया[2] शरीरोद्भवहेतुः[3]; [तत्र[4]] सुरागिणः[5] तौ[6] धर्मेतरौ[7] प्रियाप्रियौ[8] भवतः[9]; तत्र[10] पुनः[11] शरीरकं[12]; पुनः क्रिया–[एवं[13]] भवः[14] चक्रवत्[15] ईर्यते[16]. ॥ ८ ॥

१ आदरपूर्वक पूर्वजन्मीं संपादिलेली. २ कर्म. ३ शरीराच्या जन्माला कारण. ४ त्या जन्मांत. ५ विषयांवर प्रीति करणाराला. ६ ते (शास्त्रांत प्रसिद्ध असलेले). ७ धर्म आणि दुसरा (अधर्म). ८ सुख दुःख देणारे अर्थात आवडणारे व न आवडणारे. ९ होतात. १० त्यांत. ११ पुन्हां. १२ देह. १३ अशा प्रकारें. १४ संसार. १५ चक्रासारखा. १६ म्हटला आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

(शास्त्रांत प्रसिद्ध असलेले) धर्म व अधर्म घडतात—एखाद्याच्या मनाला धर्म करणें प्रिय वाटतें, एखाद्याला अधर्म आवडतो : अशा रीतीनें ह्या जन्मांत कर्मसंचय झाला ह्मणजे त्यामुळें प्राण्याला पुन्हां जन्म घ्यावा लागतो : त्या जन्मांतही तो पुन्हां कर्में करितो : एकंदरींत, कर्मापासून जन्म व जन्मामध्यें कर्में—हें संसाराचें रहाटगाडगें सारखें चालावयाचें, असें ह्मणतात. ॥ ८ ॥ ह्या संसाराचें मूळ कारण अज्ञानच होय. संसार सुटण्यासाठीं कर्तव्य ह्मणून जें कांहीं सांगावयाचें किंवा शास्त्रांत सांगितलें आहे, तें

अज्ञानमेवास्य हि मूलकारणं तद्धानमेवात्र विधौ विधीयते ॥ विद्यैव तन्नाश-
विधौ पटीयसी न कर्म तज्जं सविरोधमीरितम् ॥ ९ ॥

प्यूह्यं । एवंतत्रोत्पादितकर्मणा**पुनःशरीरं पुनः**क्रियाइत्येवंचक्रवद्विपरिवृत्तिः । यथाचक्रेभ्राम्यमाणेऽधोभागःकदाचिदुपरिउपरितनश्चाधःपुनरुपरिपुनरधएवंजन्मक्रिययोर्जन्यजनकभावेनपरिवृत्तिरितिबोध्यम् ॥ ८ ॥ तस्यचाज्ञानमेवमूलमित्याह **अज्ञानमेवे**ति **अत्र विधौ**संसारनिवृत्तिलक्षणेकर्तव्येऽर्थे **तद्धानमेव**मूलकारणत्वादज्ञानहानमेव **विधीयते** साधनत्वेनेतिशेषः । ननुकर्मैवतन्नाशकमस्तुकिंज्ञानेनेत्याशंक्याह **विद्यैव**ज्ञानमेव **तन्नाशविधौ**मूलाज्ञाननाशने **पटीयसी**समर्था **न कर्म** समर्थमितिशेषः । यतस्त**त्तज्जं**अज्ञानजं आत्मस्वरूपाज्ञानजन्यदेहाद्यभिमानजन्यत्वात्कर्मणोऽज्ञानजन्यत्वंबोध्यं । ननुतज्जन्यस्यापितन्नाशकत्वंवृश्चिककर्कट्यादौदृष्टमित्याशंक्यतज्ज-

अज्ञानं एव[1] अस्य[2] मूल[3]कारणं. अत्र[4] विधौ[5] तद्धानं[6] एव विधीयते[7]. विद्या[8] एव तन्नाशविधौ[9] पटीयसी[10]; कर्म न. [यतः[11] तत्[12]] तज्जं[13]. [यत्[14]] सविरोधं[15] [तत् नाशकं[16]] ईरितम्[17]. ॥ ९ ॥

---

१ निश्चयानें. २ ह्याचें (संसाराचें). ३ पहिलें (मुख्य) कारण. ४ ह्या. ५ कर्तव्य भागांत. ६ त्याचा त्याग. ७ सांगितला जातो. ८ ज्ञान. ९ अज्ञानाचा नाश करण्याच्या कामीं. १० पूर्ण समर्थ. ११ ज्याअर्थी. १२ तें (कर्म). १३ त्या (अज्ञाना) पासून उत्पन्न झालेलें. १४ जें. १५ विरोधयुक्त. १६ नाश करणारें. १७ ह्मटलेलें आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हेंच कीं, अज्ञान दूर झुगारून द्यावें. त्या मूळ कारणरूप अज्ञानाचा नाश करण्याला समर्थ झटलें तर आत्मज्ञानच आहे. कर्माच्यानें अज्ञानाचा नाश व्हावयाचा नाहीं; कारण, कर्म मुळीं उत्पन्न झालें अज्ञानामुळें, - अर्थात कर्माचा व अज्ञानाचा विरोध किंवा द्वेष नाहीं. - ज्याचा ज्याच्याशीं विरोध असतो तोच त्याचा नाश करितो, असें ह्मणतात. - ह्या लोकसिद्ध गोष्टीवरूनही अज्ञानाचा नाश त्याचें विरोधी जें ज्ञान त्यापासूनच व्हावयाचा, हें उघड आहे. - ॥ ९ ॥ कर्मानुष्ठानापासून अज्ञानाचाही नाश होत नाहीं आणि विषयासक्तिही सुटत नाहीं तर उलट आणखी दोषयुक्त (ज्याचें फल क्षय पावणारें असतें, असें) नवें कर्म उत्पन्न होतें;

नाज्ञानहानिर्न च रागसंक्षयो भवेत्ततः कर्म सदोषमुद्भवेत् ॥ ततः पुनः संसृतिरप्यवारिता तस्माद्बुधो ज्ञानविचारवान्भवेत् ॥ १० ॥

न्यत्वंवाननाशकत्वेप्रयोजकंकिंतुसविरोधत्वमेवेत्याह यत्सविरोधंतदीरितंनाशकमुक्तमित्यर्थः ॥ ९ ॥ अतएवंकर्मणानाज्ञानहानिरित्याह नाज्ञानेत्यादि यतःकर्मणाविरोधाभावान्नाज्ञाननाशो नापिरागनाशोवस्तुतःकर्मानुष्ठानात्पुनःसदोषंक्षयिफलत्वादिदोषविशिष्टंकर्मैवोद्भवेत् ततःकर्मणश्च पुनःसंसारएवेतिनमुक्तिप्रत्याशा तस्माद् बुधोविवेकी ज्ञानविचारवान्-ज्ञायतेऽनेनेतिज्ञानं वेदांतवाक्यंतद्विचारवान्भवेत् ॥ १० ॥

[1]ततः [2]अज्ञानहानिः न; राग[3]सङ्क्षयः च न [4]भवेत्; [5]सदोषं कर्म [6]उद्भवेत्. ततः पुनः अपि [7]अवारिता [8]संसृतिः. [9]तस्मात् [10]बुधः [11]ज्ञानविचारवान् भवेत्. ॥ १० ॥

१ त्या (कर्मा)पासून. २ अज्ञानाचा नाश. ३ आसक्तीचा क्षय. ४ होईल. ५ दोषयुक्त (ज्याचें फल नाशवंत असें). ६ उत्पन्न होईल. ७ निवारण केलें नाहीं जिचें अशी; न चुकणारी. ८ संसार. ९ ह्मणून. १० विवेकी पुरुष. ११ वेदांतवाक्यांचा विचार करणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यापासून पुन्हां संसार भोगावा लागतो, संसाराचें निवारण मुळींच होत नाहीं. - एकंदरींत कर्ममार्गापासून मोक्ष मिळण्याची अशा व्यर्थ आहे. - ह्मणून विवेकी पुरुषानें, ज्यांपासून आत्मज्ञान होतें त्या वेदांतवचनांचा विचार करूं लागावें. ॥ १० ॥ - ' ज्ञान आणि कर्म हीं दोन्ही एके ठिकाणीं होतील तेव्हां मोक्ष मिळतो, ह्यांपैकीं एकटें कोणीच (ज्ञान किंवा कर्म) मोक्ष देऊं शकत नाहीं, ' असें ह्मणणारे कांहीं लोक आहेत : त्यांना ' समुच्चयवादी ' असें ह्मणतात. - प्रस्तुत विषयावर त्यांची अशी शंका असते :- ' जसें वेदमुखानें ज्ञान हें पुरुषार्थाचें (मोक्षप्राप्तीचें) साधन ह्मणून सांगितलें तसेंच कर्मही सांगितलें आहे (प्रमाणें पहा :-

ननु क्रिया वेदमुखेन चोदिता यथैव विद्या पुरुषार्थसाधनम् ॥ कर्तव्यता प्राण-
भृतः प्रचोदिता विद्यासहायत्वमुपैति सा पुनः ॥ ११ ॥

इदानींज्ञानस्यैवमोक्षहेतुत्वंवक्तुंज्ञानकर्मसमुच्चयवाददूषणायानुवदतिसार्धेन **नन्विति नन्विति**शंकायां **यथा विद्या वेदमुखेन**श्रुतिपुराणलक्षणेनब्रह्मविदाप्नोतिपरमित्यादिना **पुरुषार्थसाधनमुक्ता** तथा उभाभ्यामेवपक्षाभ्यांयथाखेपक्षिणांगतिः तथैवज्ञानकर्मभ्यांप्राप्यते ब्रह्मशाश्वतमित्यादिना**क्रियाऽपितत्साधनत्वेनोक्ता** किंचक्रिया **कर्तव्यता** तृतीयार्थेप्रथमा **कर्तव्यतया**आवश्यकेकृत्येअवश्यकर्तव्यतया **प्रचोदिता**नित्यनैमित्तिकरूपा एवंचतदकरणेप्रत्यवायोत्पत्त्याज्ञानोत्पत्तिरेवनस्यात् तस्मात्सा **पुनर्विद्यायाःसहायत्वंप्राप्नोति** घटेजननीयेयथादंडचक्रादीनांपरस्परसहायता ॥ ११ ॥

' [1]ननु, वेद[2]मुखेन चोदि[3]ता क्रिया यथा विद्या, [तथा] एव [4]पुरुषार्थसाधनं. प्रा[5]णभृतः [6]कर्तव्यता प्रचोदिता. सा पुनः विद्या[7]सहायत्वं [8]उपैति. ॥ ११ ॥

---

१ ह्यावर अशी शंका आहे. २ वेदाच्या मुखानें : श्रुति, स्मृति, पुराणें हीं वेदाचीं मुखें होत. ३ करावयास सांगितलेली. ४ पुरुषार्थाचें साधन. ५ प्राण्याला. ६ अवश्य करावी अशी. ७ ज्ञानाला साधन. ८ पावते.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'ब्रह्मज्ञान्याला उत्तम पद मिळतें,' असें एक वेदवचन ह्मणतें; आणि, 'जसे पक्षी दोन्ही पंखांच्या योगें आकाशांत उडतात ह्मणजे त्यांना एका पंखावर उडतां येत नाहीं त्याप्रमाणें ज्ञान आणि कर्म हीं दोन्ही साधनें सिद्ध करावीं तेव्हां शाश्वत ब्रह्मपद प्राप्त होतें,' हा दुसऱ्या वचनाचा अभिप्राय.) : नित्यनैमित्तिक कर्में प्राण्यानें अवश्य केलीं पाहिजेत, असा विधि आहे. आणखी कर्म हें पुन्हां ज्ञानाला साह्य करितें. ॥ ११ ॥ कर्म न केलें असतां दोष लागतो असेंही वेदांनीं सांगितलें आहे. म्हणून मुमुक्षु पुरुषानें हें (कर्म) नित्य केलें पाहिजे.' ह्यावर सिद्धांत्यांचें ह्मणणें असें निघतें कीं,- जसा प्रकाश अंधकाराचा नाश करूं शकतो, तसें ज्ञान हें स्वतंत्रपणें आपलें निश्चित कार्य (मोक्ष) करितें; आपण कोणाचें तरी साह्य घ्यावें, असें त्याच्या (ज्ञा-

कर्माकृतौ दोषमपि श्रुतिर्जगौ तस्मात्सदा कार्यमिदं मुमुक्षुणा ॥ ननु स्वतन्त्रा
ध्रुवकार्यकारिणी विद्या न किंचिन्मनसाऽप्यपेक्षते ॥ १२ ॥

कर्तव्यतेतिस्वोक्तमेवविवृणोति **कर्मेति** वीरहावाएषदेवानांयोग्निमुद्वासयते यावज्जीवमग्निहोत्रंजुहोतीतिश्रुतिः ॥ तत्रसिद्धांतीशंकते **नन्विति ध्रुवंस्थिरंकार्य**मिदंपुरुषार्थमोक्षजानिका **विद्या** यतः**स्वतंत्रा**विनाऽपिसहायेनस्वकार्यसंपादनेसमर्था यथातेजस्तिमिरनिवर्तनसमर्थं **मनसा ऽपि किंचित्**सहायभूतंवस्तु**नापेक्षते** तथाफलेजननीयेसहायांतरसंभावनाऽपिनेतिभावः अनेनविद्याफळजननेनिरपेक्षास्वतंत्रत्वात्तेजोवदित्यनुमानंसूचितम् ॥ १२ ॥

श्रुतिः [१]कर्माकृतौ दोषं अपि [२]जगौ. तस्मात [३]मुमुक्षुणा [४]इदं सदा कार्य.' ननु, स्वतन्त्रा [५]ध्रुवकार्यकारिणी विद्या [६]मनसा अपि किंचित् न [७]अपेक्षते. ॥ १२ ॥

१ कर्म न केलें असतां. २ सांगती झाली. ३ मोक्ष मिळवूं इच्छिणारानें. ४ हें (कर्म). ५ निश्चित (स्थिर राहणारें) कार्य करणारी (मोक्ष देणारी). ६ मनानें. ७ इच्छा करिते.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नाच्या) मनांत देखील येत नाहीं. ॥ १२ ॥ - पण समुच्चयवादी ह्मणतात :- ‘ तसें नाहीं. यज्ञाचें फल - वेदांमध्यें सांगितल्याप्रमाणें - निश्चित मिळावयाचेंच असतें तथापि तो यज्ञ स्वतांच्या पूर्ततेसाठीं प्रयाज अनुयाज इत्यादि दुसऱ्या अंगांची अपेक्षा करितो, त्याचप्रमाणें ज्ञानाचें - फल मोक्ष असें निश्चित खरें, पण - तें ज्ञान, विधीनें सांगितल्याप्रमाणें अनुष्ठान केलेल्या कर्मांचें साह्य घेईल, तेव्हांच मोक्ष देण्यास समर्थ होतें.' ॥ १३ ॥ - लक्ष्मणा ! जसें ‘ केवळ कर्मच मोक्षसाधन ’ ह्मणणें अनुचित तसेंच - हेंही (मागील श्लोकांत

न सत्यकार्यो ऽपि हि यद्वदध्वरः प्रकांक्षते ऽन्यानपि कारकादिकान् ॥ तथैव विद्या विधितः प्रकाशितैर्विशिष्यते कर्मभिरेव मुक्तये ॥ १३ ॥ केचिद्वदन्तीति वितर्कवादिनस्तदप्यसद् दृष्टविरोधकारणात् ॥

समुच्चयवादीपरिहरति **नेति** त्वदुक्तंनेत्यर्थः **सत्यकार्यः**अक्षय्यंहवैचातुर्मास्ययाजिनःसुकृतंभवतीत्यादिवेदेनबोधितःस्थिरकार्योऽ**पिअध्वरः यथा ऽन्यानपि कारकादिकान्**आरादुपकारकप्रयाजाद्यंगानिदेशकालादीनिच **प्रकांक्षते तथा विद्या**पिअग्निहोत्रंजुहोतीत्यादि**विधिवाक्यतः**तत्समूहेन **प्रकाशितैः कर्मभिः सहितैव मुक्तये विशिष्यत**इत्यर्थः विद्या फलदानेकर्मापेक्षा अंगित्वात् प्रयाजाद्यंगापेक्षदर्शादिवदितिसत्प्रतिपक्षानुमानमनेनसूचितम् ॥ १३ ॥ तदनूद्यसिद्धांतीदूषयति **केचिदिति** यत्केचिद्वितर्क-

‘ न. यद्वत् सत्यकार्यः[1] अपि अध्वरः[2] अन्यान्[3] कारकादिकान्[4] प्रकांक्षते[5], तथा एव विद्या विधितः[6] प्रकाशितैः[7] कर्मभिः एव मुक्तये विशिष्यते[8]. ’ ॥१३॥ इति[9] केचित्[10] वितर्कवादिनः[11] वदन्ति[12]. तत् अपि

---

१ स्थिर फल ज्याचें - वेदांमध्यें सांगितलें, - असा. २ यज्ञ. ३ दुसऱ्या. ४ प्रयाज अनुयाज इत्यादि अंगांस. ५ अपेक्षा ठेवितो. ६ आज्ञा करणाऱ्या वचनांनीं. ७ स्पष्ट सांगितलेल्या. ८ समर्थ होते. ९ असे. १० कित्येक. ११ कुतर्क काढून बोलणारे. १२ ह्मणतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तत्त्वज्ञान तें हें.

सांगितलेलें) कित्येक वितर्कवाद्यांचें ह्मणणें अयोग्य होय; कारण, कर्माचा आणि ज्ञानाचा ढळढळीत विरोध दिसून येतो :- पहा :- जड देहावर ‘ मी (चेतन) ’ असा अभिमान ठेवील तेव्हां प्राण्याच्या हातून कर्म वाढत जाईल आणि देहावरील अभिमान सुटेल तेव्हां त्याला ज्ञान प्राप्त होईल. - अशा परस्परांशीं विरोध करणाऱ्या वस्तूंचा समुच्चय (एकत्र वास) घडावा कसा ? - ॥ १४ ॥ परम निर्मल असें आत्मतत्त्वाचें ज्ञान करून देणाऱ्या वेदांतवचनांचा पुष्कळपणें विचार केला असतां शेवटीं जी अंतःकरणाची ब्रह्माकार

देहाभिमानादभिवर्धते क्रिया विद्या गताहंकृतितः प्रसिद्ध्यति ॥ १४ ॥
विशुद्धविज्ञानविरोचनाञ्चिता विद्या ऽऽत्मवृत्तिश्चरमेति भण्यते ॥

वादिन इतिज्ञानकर्मणीसमुच्चित्यमुक्तिसाधनं **वदंति तदप्यसत्**यथाकेवलंकर्मभोक्षसाधनमित्यसत्तथातन्मीलितमित्यप्यसत् त-त्रहेतु**र्दृष्टविरोधकारणात्–दृष्टोयोविरोधः तस्मात्** सर्वलोकदृष्टविरोधरूपात्कारणात्तदसदित्यर्थः विरोधमेवाह **देहाभिमा-नात्क्रिया वर्धते** अनात्मनिदेहादावात्मत्वाभिमानात्क्रियावृद्धिः। **विद्या तु गताहंकृतितः–गताहंकृतिर्यस्यतस्य**नष्टाहंकृतेः **प्रसिद्ध्यति** सार्वविभक्तिकस्तासिः । एवंचाहंकारसत्तामूलकत्वात्क्रियाज्ञानयोःसमुच्चयोविरुद्धइत्यर्थः ॥ १४ ॥ अथपूर्वपक्षयुक्तानुमानं दूषयन्विद्यास्वरूपमाह **विशुद्धंविज्ञानंयेभ्यस्तेषां**वेदांतवाक्यानांयद्विशेषेणरोचनंरलयोरभेदादालोचनंविचार**स्तेनांचिताप्रा-**

दृष्टविरोधकारणात्[1] **असत्**[2]. **क्रिया देहाभिमानात्**[3] **अभिवर्धते**[4]. **विद्या गताहंकृतितः**[5] **प्रसिद्ध्यति**[6]. ॥ १४ ॥ [**सद्भिः**[7]] ‘ **विशुद्धविज्ञानविरोचनांचिता**[8] **चरमा**[9] **आत्मवृत्तिः**[10] **विद्या** ’ **इति भण्यते**[11]. ॥

१ ढळढळीत दिसणाऱ्या विरोधामुळें. २ अयोग्य (चुकीचें). ३ शरीरावर अभिमान ठेविल्यामुळें. ४ वाढते. ५ गेला अहं-कार ज्याचा, त्याची. ६ सिद्ध होते. ७ साधूंनीं. ८ परम निर्मल आत्मज्ञान होतें ज्यापासून त्यांच्या (वेदांतवाक्यांच्या) आलो-चनानें (विचारानें) प्राप्त झालेली. ९ शेवटली. १० ब्रह्माकार अंतःकरणवृत्ति. ११ म्हटली जाते,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वृत्ति बनते, तिला 'तत्त्वज्ञान' असें म्हणतात. कर्म सगळ्या ल्याज अनुयाज इत्यादि कारकांच्या (अंगांच्या) योगें उदय पावतें; आणि तत्त्वज्ञान सकल कारकांचा (कर्तृत्वादि बुद्धीचा) लय करितें. - एतावता, कर्माचें आणि ज्ञानाचें परस्परांशीं वैर आहे, त्यांचा एकत्र वास कधीं व्हावयाचा नाहीं. कर्म चित्तशुद्धि करितें ह्मणून ज्ञानाच्या उत्पत्तीला मात्र कारण आहे. ज्ञानाला आपलें फल मोक्ष देण्याच्या कामीं कर्माची अपेक्षा मुळींच नसते. - ॥ १९ ॥ कर्माचा ज्ञानाशीं विरोध असल्यामुळें दोघांचा समुच्चय होत नाहीं ह्मणून विवेकी (मुमुक्षु) पुरुषानें कर्माचा सर्वथा त्याग करावा (सकाम कर्मे तर कधींच करूं नये

उदेति कर्माखिलकारकादिभिर्निहन्ति विद्याऽखिलकारकादिकम् ॥ १५ ॥
तस्मात्त्यजेत्कार्यमशेषतः सुधीर्विद्याविरोधान्न समुच्चयो भवेत् ॥

पितायाचरमा आत्मवृत्तिर्ब्रह्माकारांतःकरणवृत्तिः सा विद्येति भण्यते विद्वद्भिरितिशेषः । पुनःसमुच्चयवारणायविद्याकर्मणोर्वैषम्यमाह कर्मयज्ञादि अखिलकारकादिभिःकर्तव्यकर्मादिभिरंगैश्चसहितंसदुदेतिफलोन्मुखंभवति विद्या पुनरखिलकारकादि निर्हंतितन्नकर्तृत्वादिबुद्धिंनिहंति । सकलव्यापारपरित्यागेनब्रह्मणिसमाप्तिर्हिविद्या अतः स्वोत्पत्तौचित्तशुद्धिद्वाराकर्मसापेक्षास्वफलेजनयितव्येतन्निरपेक्षैवान्यथाविद्यास्वरूपस्यैवभंगापत्तेरितिपूर्वपक्ष्युक्तहेतोरसिद्धिरितिभावः ॥ १५ ॥ ॥ ॥ ॥
उपसंहरन्मुमुक्षोर्वृत्तिप्रकारमाह तस्मादिति विद्याविरोधात्—विद्यायाःकर्मणासहविरोधेन समुच्चयो न भवेत्तस्मात्सुधीर्मुमुक्षुरशेषतः कर्म त्यजेत् । काम्यंतुसर्वथात्याज्यमेवनित्यनैमित्तिकमपियावच्चित्तशुद्धिकर्तव्यमेव ततोऽपिब्रह्मणिचि-

कर्म अखिलकारकादिभिः उदेति. विद्या अखिलकारकादिकं निर्हन्ति. ॥ १९ ॥ विद्याविरोधात् समुच्चयः न भवेत्. तस्मात् सुधीः अशेषतः कार्यं त्यजेत्. ॥

१ सगळ्या अंगादिकांच्या योगें. २ उदयास येतें. ३ सगळ्या कारकादिकांना (कर्तृत्वादि बुद्धीला). ४ नष्ट करिते. ५ ज्ञानाशीं विरोध असल्यामुळें. ६ मेळ; एके ठिकाणीं राहणें. ७ सुविचारी मनुष्य. ८ सर्वथा. ९ सोडो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अ-रा-बो. समू-सान्व. सटिप्पण. ॥४०॥

पण नित्य नैमित्तिक कर्मेंदेखील चित्तशुद्धीपर्यंतच करावीं). पुढें, सर्व इंद्रियवृत्तींचे विषय (शब्द स्पर्शादि) नित्य सोडून द्यावे आणि केवळ परमानंदमय आत्मरूपीं लय लावणें हेंच काय तें मिळवायाचें अशी स्थिति करून राहावें. ॥ १६ ॥ जोंपर्यंत प्राणी, अज्ञानामुळें, शरीर इंद्रियें इत्यादि अनात्म (जड) वस्तूंवर ' आत्मा (मी, कर्ता)' असा ग्रह ठेवितो, तोंपर्यंतच त्याला वेदांतील कर्मबोधक विधींचें दास्य करावें लागतें ('यज्ञ करावे ' इत्यादि वेदाच्या आज्ञा पाळाव्या लागतात). तो अहंकार सुटला कीं, पुरुष

उत्तरकांड. सर्ग ५ रामगीता. कर्म करण्याची मर्यादा.

आत्मानुसन्धानपरायणः सदा निवृत्तसर्वेन्द्रियवृत्तिगोचरः ॥ १६ ॥ यावच्छरीरादिषु मायया ऽत्मधीस्तावद्विधेयो विधिवादकर्मणाम् ॥

त्तस्थैर्यपर्यंतंकर्तव्यमेव ततस्तदनुसंधानंप्रतिबंधकत्वात्प्रयोजनाभावाच्चतदपित्याज्यमेवेतिभावः । इदानींमुमुक्षुकर्तव्यमाह **निवृत्ताःसर्वेषामिंद्रियाणांगोचराविषयाःशब्दादयोयस्मात्तादृशःसन् आत्मनः**सच्चिदानंदस्या**नुसंधानमेवपरमयनं**प्राप्यंयस्यतथा**विधो भवेत्** । अत्रेंद्रियप्रत्याहारःकर्तव्यत्वेनोक्तस्तेनतत्पूर्वप्राणायामाद्यर्थादाक्षिप्तम् ॥ १६ ॥ रागिविरागिभेदेनकर्मणांकर्तव्यतेत्याह **यावदिति मायया**ऽविद्यया **शरीरादि**ष्वनात्मसु **आत्मधी**रहंकर्तेत्यादिरूपा **यावद्वर्तते** ता**वद्विधिवादकर्मणां**विधिर्यजेतेत्या

[मुमुक्षुः] सदा निवृत्त[1]सर्वेन्द्रियवृत्तिगोचरः [सन्] आत्मानुसन्धानपरायणः[2] [भवेत्]. ॥१६॥
यावत् मायया शरीरादिषु[3] आत्मधीः[4], तावत् विधिवादकर्मणां[5] विधेयः[6] [स्यात्[7]]. ॥

---

१ दूर झाले सर्व इंद्रियांच्या वृत्तींचे विषय ज्यापासून, असा. २ आत्म्याचें स्फुरण हेंच मुख्य मिळवावयाचें आहे ज्याला, असा. ३ शरीर इंद्रियें इत्यादिकांवर. ४ मी अशी बुद्धि ज्याची, असा. ५ विधिवाक्यांनीं सांगितली कर्तव्यता ज्यांची, त्या कर्मांचा. ६ चाकर (आज्ञापालक; कर्मकर्ता). ७ होईल.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

' नेति नेति (हें सत्य नव्हे, तें सत्य नव्हे) ' ह्या वचनांच्या आधारानें सकळ जग मिथ्या आहे असा निर्णय ठरवून परमात्मा जगाहून वेगळा सत्यरूपी आहे असें जाणतो; हें ज्ञान झालें कीं त्यानें कर्मे सोडून द्यावीं (त्याचीं कर्मे सुटतातच). ॥ १७ ॥ - एकाच आत्मरूपाचे ईश्वर आणि जीव हे भेद दोवांच्या दोन

नेतीति वाक्यैरखिलं निषिद्ध्य तज्ज्ञात्वा परात्मानमथ त्यजेत्क्रियाः ॥ १७ ॥
यदा परात्मात्मविभेदभेदकं विज्ञानमात्मन्यवभाति भास्वरम् ॥ तदैव माया
प्रविलीयते ऽञ्जसा सकारका कारणमात्मसंसृतेः ॥ १८ ॥

दिर्वादः कर्तव्यताबोधकोयेषांकर्मणां विधेयोवशवर्तीतत्कर्मकर्ता भवेत् । तदपगमेतुतदखिलंजगन्नेतीतिवाक्यैः अथातआदेशोनेति नेतीत्यादिवाक्यैर्निषिध्यमिथ्यात्वेननिर्णीय तद्विलक्षणतयासत्यत्वेनपरात्मस्वरूपं ज्ञात्वा क्रियास्त्यजेत् निरूपितमेतत् ॥ १७ ॥ आत्मविज्ञानेसत्यवश्यमाविद्यानिवर्ततइत्याह यदेति आत्मनिशुद्धेंऽतःकरणे परमात्मनईश्वस्यात्मनोजीवस्यचयोर्विभेदोमायांतःकरणरूपोपाधिद्वयकृतोविभेदोभेदस्तस्यभेदकंनाशकं भास्वरंप्रकाशशीलं यद्विज्ञानंइतरवृत्त्युपमर्दनपूर्वकंब्रह्माकाराऽखंडावृत्तिर्यदाव भातिअसंभावनादितिरस्कारेणोदेति तदैव सकारकाजन्मांतरप्रापककर्मसहिता मायातज्जीवोपाधिभूताऽविद्या ऽञ्जसाझटिति प्रविलीयतेनश्यति । ननुतन्नाशेऽपिसंसारनाशःकथमतोमायाविशेषणम् आत्मसंसृतेः कारणंसंसारस्योपादानकारणम् एवंचतन्नाशे

अखिलं तत्, ' न इति ' इति वाक्यैः निषिध्य[1], परात्मानं ज्ञात्वा[2], अथ क्रियाः त्यजेत्[3]. ॥ १७ ॥
यदा[4] परात्मात्मविभेदभेदकं[5] भास्वरं[6] विज्ञानं आत्मनि अवभाति[7], तदा एव सकारका[8] आत्मसंसृतेः[9] कारणं माया अंजसा[10] प्रविलीयते[11]. ॥ १८ ॥

---

१ मिथ्या असें पूर्णपणें समजून. २ जाणून. ३ सोडो. ४ जेव्हां. ५ परमात्मा आणि जीवात्मा हा भेद दूर करणारें. ६ प्रकाशरूप. ७ स्फुरण पावतें. ८ उपकरणांसहित. ९ आत्म्याला संसाराचें. १० लवकर. ११ पूर्णपणें लय पावते.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वेगवेगळ्या उपाधींमुळें झाले आहेत : ईश्वराचा उपाधि माया आणि जीवाचा उपाधि अंतःकरण; उपाधि ह्मणजे काय तें पुढील दृष्टांतावरून उघड कळून येईल : पहा :– एका विस्तीर्ण तलावाचें पाणी पाटाच्या द्वारानें झाडाच्या मुळाशीं पाळींत येऊन तुंबलें आहे : ह्या उदाहरणांत तलावांतील पाणी ह्मणजे ईश्वर आणि झाडाच्या पाळींतील पाणी हा जीव : पाणी दोन्ही ठिकाणचें एकच तसा आत्मरूपानें ईश्वर व जीव एकच : तलावाचा बांध हा ईश्वराचा मायारूप उपाधि, आणि झाडाची पाळ हा जीवाचा अंतःकरणरूप उपाधि. असो. - परमात्मा आणि जीव ह्या भेदाचा नाश आत्मतत्त्वज्ञानानें होतो. हें प्रकाशरूप आत्मज्ञान अंतःकरणांत स्फुरण पावूं लागलें कीं, तत्काल अविद्या आपल्या साहित्यांसह (दुसरें जन्म मिळवून देणाऱ्या कर्मांसुद्धां) नष्ट होते. आत्म्याला संसारांत पाडण्याचें कारण ही अविद्याच होय. ॥ १८ ॥ -'तत्त्वमसि (तें ब्रह्मरूप तूं आहेस)' इत्यादि - महावाक्यांच्या आधारानें ज्ञान उत्पन्न होऊन अविद्या

श्रुतिप्रमाणाभिविनाशिता च सा कथं भविष्यत्यपि कार्यकारिणी ॥ विज्ञान-
मात्रादमलाद्द्वितीयतस्तस्मादविद्या न पुनर्भविष्यति ॥ १९ ॥

कार्यनाशोभवत्येवेतिभावः ॥ १८ ॥ उक्तमेवार्थपुनर्दार्ढ्यायाह श्रुतीति तत्त्वमसीत्यादिश्रुतिरूपैःप्रमाणैस्तज्जनितज्ञानेननाशिता साऽविद्या कथमपि कार्यकारिणी भविष्यतीतिकाकुरत्र । सर्वथानेत्यर्थः । असतःकार्यकारित्वासंभवादितिभावः ॥ पुनश्चतस्या-नोद्भवइत्याह विज्ञानमात्रादिति अमलाद्द्वितीयतःशुद्धाद्द्वितीयात्मविषयकाद्विज्ञानमात्रादितरासहकृतान्निदिध्यासनपरिपाकज-

श्रुतिप्रमाणाभिविनाशिता[1] सा च कथं अपि कार्यकारिणी[2] भविष्यति[3] ? [यतः] अविद्या अमला-द्वितीयतः[4] विज्ञानमात्रात्[5] [नष्टा[6]], तस्मात् पुनः न भविष्यति. ॥ १९ ॥

१ श्रुतिवचनरूप प्रमाणांनीं उत्पन्न झालेल्या ज्ञानाच्या योगें नष्ट झालेली. २ कार्य करणारी. ३ होईल. ४ शुद्ध व अद्वितीय (आत्मविषयक). ५ केवळ तत्त्वज्ञानामुळें. ६ नाश पावलेली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नष्ट झाली म्हणजे ती कोणत्या तरी रीतीनें आपलें कार्य (मोह, संसार) करील काय ? कधींही करणार नाहीं. - दोरीवर सर्पाचा भास होऊन भय वाटत होतें; पण आतां 'ती दोरी आहे, सर्प नव्हे' असें पूर्ण ज्ञान झालें : मग आपल्याला 'तो सापच आहे' असें पुन्हां भासून भीति वाटेल काय ? वाटणारच नाहीं, त्याप्रमाणें - ज्या अर्थी, शुद्ध व द्वैतरहित (एक) अशा केवळ आत्मतत्त्वज्ञानानें तिचा नाश केला त्या अर्थी ती अविद्या पुन्हां उत्पन्न होणारच नाहीं. ॥ १९ ॥ - पुरुषाला 'मी कर्में करितों' असा अहंपणा वाटण्याचें कारण अविद्या होय. - जर ती अविद्याच नाश पावली व पुन्हां उत्पन्न होत नाहीं, तर पुरुषाला 'मी अमुक अमुक कर्में करणारा' ही बुद्धि

यदि स्म नष्टा न पुनः प्रसूयते कर्ता ऽहमस्येति मतिः कथं भवेत् ॥ तस्मात्स्वतन्त्रा न किमप्यपेक्षते विद्या विमोक्षाय विभाति केवला ॥ २० ॥

ज्ञानायतोनष्टातस्मात्सा पुनर्न भविष्यति । रज्ज्वज्ञानमूलकस्यसर्पस्यरज्जुज्ञानेननिवृत्तस्ययथानपुनरुत्पत्तिरितिभावः ॥ १९ ॥ विद्यायाइतरनिरपेक्षायाएवमोक्षकारणत्वमुक्तंयुक्तिपूर्वकंपुनःकथयतिश्रोतृदार्ढ्याय यदीति यदि नष्टातत्त्वज्ञाननाशिता सा न पुनः प्रसूयतेनोत्पद्यते तदाकारणाभावादहंमतिः कथं भवेत् कथमपिनभवेदित्यर्थः । तदभावाच्चतत्कालेकर्माभावइतिस्वफलजननेविद्या स्वतंत्राऽइतरनिरपेक्षैव न किमप्यपेक्षते द्वितीयस्यासंभवात् । अतः केवलाऽसहायैव विमोक्षायविभातितत्फलिकाभवतीत्यर्थः ॥ २० ॥

यदि अविद्या नष्टा स्म, पुनः न प्रसूयते[1], [तदा] 'अहं अस्य कर्ता' इति मतिः[2] कथं भवेत् ? तस्मात् स्वतन्त्रा विद्या किं अपि न अपेक्षते, विमोक्षाय केवला विभाति[3]. ॥ २० ॥

---

१ जन्मास येते. २ बुद्धि. ३ शोभते.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'ज्ञान मोक्षसाधन; कर्म नव्हे.'

होईल कशी ? - अशी बुद्धि नाहीं अर्थात ज्ञानकाळीं कर्म नाहीं, हें सिद्ध आहे. - ह्मणूनच - मी ह्मणतें कीं - ज्ञानाला पूर्ण स्वतंत्रता आहे व कोणाच्याही साह्याची अपेक्षा नाहीं; तें एकटेंच मोक्ष देण्याच्या कामीं शोभत आहे. ॥ २० ॥ वेदांतील अर्थवाद वचनांनीं कर्मांची कितीही वाखाणणी केलेली असली तरी तीं सर्व कर्मे सोडून द्यावीं, असें त्या तैत्तिरीय शाखेंतील प्रसिद्ध श्रुतीनें आदरपूर्वक स्पष्टपणें सांगितलें आहे : - त्या श्रुतीचा आशय असा आहे कीं, मोक्ष कर्मांच्या योगें मिळत नाहीं, संततीनें प्राप्त होत नाहीं किंवा द्रव्याच्या योगें आपलासा करून घेतां येत नाहीं, तर केवळ सर्वसंगपरित्यागानें लाभतो. - वाजसनेयी शा-

सा तैत्तिरीयश्रुतिराह सादरं न्यासं प्रशस्ताखिलकर्मणां स्फुटम् ॥ एतावदि-
त्याह च वाजिनां श्रुतिर्ज्ञानं विमोक्षाय न कर्म साधनम् ॥ २१ ॥

अत्रार्थेश्रुतिरपिप्रमाणमित्याह सेति साप्रसिद्धा'नकर्मणानप्रजयाधनेनत्यागेनैके अमृतत्वमानशु'रित्यादिका तैत्तिरीयश्रुतिः प्रशस्तानामर्थवादैःप्राशस्त्येनबोधितानामपिकर्मणां न्यासंत्यागं सादरं स्फुटमाह नतुकर्मसमुच्चयमित्यर्थः । तथावाजिनांवाजसनेयिनाम् 'एतावदरेखल्वमृतत्व'मित्यादिका ज्ञानं विमोक्षाय साधनं न कर्मेत्येतदाह ॥ २१ ॥

सा तैत्तिरीय[1]श्रुतिः प्रशस्ताखिलकर्मणां[2] न्यासं[3], सादरं [यथा तथा] स्फुटं[4] आह. वाजिनां[5] श्रुतिः 'एतावत्[6]' इति च आह - ज्ञानं विमोक्षाय साधनं; कर्म न. ॥ २१ ॥

१ तैत्तिरीय शाखेची 'न कर्मणा' ही श्रुति. २ - वेदामध्यें एखाद्या कर्माची अथवा देवतेची स्तुति किंवा निंदा करणारीं जीं वचनें आहेत, त्यांना 'अर्थवादवाक्यें' ह्मणतात : त्या अर्थवादवाक्यांनीं - ज्यांची प्रशंसा केली त्या सर्व कर्मांच्या. ३ त्यागाला. ४ स्पष्टपणें. ५ वाजसनेयी शाखेची. ६ एतावत् ही (ह्या शब्दानें आरंभ जिचा आहे ती).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

खेच्या ' एतावत् ' ह्या श्रुतीनें तरी असेंच सांगितलें आहे कीं, मोक्षाचें साधन ज्ञान होय, कर्म नव्हे. ॥ २१ ॥ बा समुच्चयवाद्या ! तूं ' यज्ञ ज्ञानासारखा आहे ' असें ह्मटलेंस पण त्याला एकादा समर्पक दृष्टांत दाखविला नाहींस तो ! अरे ! यज्ञांचीं फळें विविध असतात ह्मणून त्यांची सिद्धता - देशकाल, प्रयाज अनुयाज इत्यादि - अनेक अंगांच्या योगें करावी लागते. ज्ञान तर ह्याच्या सर्वथा उलट आहे. - ह्मणून

विद्यासमत्वेन तु दर्शितस्त्वया क्रतुर्न दृष्टान्त उदाहृतः समः ॥ फलैः पृथक्त्वाद्बहुकारकैः क्रतुः संसाध्यते ज्ञानमतो विपर्ययम् ॥ २२ ॥

अहंकारत्यागरूपकारणवैषम्यात् क्रियाज्ञानयोर्वैषम्यमुक्त्वा फलप्रयुक्तमपि वैषम्यमाह **विद्येति** हे समुच्चयवादिन् **त्वया क्रतु**रग्निष्टोमादि**र्विद्यासमत्वेन दर्शितः परंतु समो दृष्टांतो नोदाहृतः** । अनेनक्रतुर्विद्यासमः श्रुतिबोधितकर्तव्यताकत्वादित्यनुमानं निरस्तम् दृष्टांताभावात् अन्वय्येवानुमानं नव्यतिरेकीतिभावः । एतच्चाकरे विस्तरेण प्रपंचितम् ॥ ननु विद्याकर्मणी समे एकफलत्वाच्चक्रदंडादिवदित्यनुमानमिति चेत्तत्राह **फलैः पृथक्त्वात्**—षष्ठ्यर्थे तृतीया—फलानां भेदादित्यर्थः एवं च स्वरूपासिद्धो हेतुरिति भावः । समानकारकत्वमपि हेतुर्नेत्याह **क्रतुर्बहुभिः कारकै**रहंममताभिमानरूपैरांतरैर्बाह्यैश्च देशकालादिनियमैश्च **साध्यते ज्ञानं त्वतो विपर्ययवत्** अतो न तयोः साम्यमिति भावः ॥ २२ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

[हे समुच्चयवादिन्], त्वया क्रतुः[1] विद्या[2]समत्वेन दर्शितः[3]; [परं] तु समः दृष्टान्तः न उदाहृतः[4]. फलैः[5] पृथक्त्वात्[6] बहु[7]कारकैः क्रतुः संसाध्यते[8]. ज्ञानं [तु] अतः विपर्ययं[9]. ॥ २२ ॥

---

१ यज्ञ. २ ज्ञानाच्या तुल्यतेनें. ३ दाखविलेला. ४ सांगितलेला. ५ फलांच्या. ६ भेदामुळें. ७ अनेक साधनांनीं. ८ पूर्ण केला जातो. ९ उलट.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्ञान्यांनीं कर्म सोडावें.

ज्ञानाचें आणि यज्ञाचें साम्य अगदीं नाहीं. - ॥ २२ ॥ - 'कर्म करणें सोडिलें तर - मला दोष लागेल' हा जडाचा धर्म, ज्याला तत्त्वज्ञान नाहीं, त्याच्या ठिकाणीं आढळतो. तत्त्वज्ञान्याला तसें कधीं वाटायाचें नाहीं; - कारण, त्याला कर्तृत्वाचा अभिमान नसतो, व पापादिक धर्म अनात्म्याचे होत, असें निश्चयानें कळत असतें. - 'कर्म अमुक प्रकारानें करावें व अवश्य केलें पाहिजे' अशा वेदाच्या आज्ञा आहेत; पण त्या कोणाला? ज्यांचीं अंतःकरणें कर्मांचीं स्वर्गादिक फलें मिळवण्याकडे गुंतलीं असतील त्यांना, - तत्त्वज्ञान्यांना नव्हत. - ह्मणून, विवेकी पुरुषांनीं आवश्यक कर्में देखील खुशाल सोडून द्यावीं. ॥ २३ ॥

सप्रत्यवायो ह्यहमित्यनात्मधीरज्ञप्रसिद्धा न तु तत्त्वदर्शिनः ॥ तस्माद्बुधैस्त्याज्य-
मपि क्रियात्मभिर्विधानतः कर्म विधिप्रकाशितम् ॥ २३ ॥

नन्वकरणेप्रत्यवायभियाकर्मकार्यमितिचेन्नेत्याह सप्रत्यवायइति कर्मत्यागेनहिनिश्चयेनाहं प्रत्यवायसहितो भविष्यामीत्येवंशुद्धात्मनिअनात्मधर्मस्यधीरज्ञस्यतत्त्वज्ञानविकलस्यप्रसिद्धा न तु तत्त्वदर्शिनः तस्याहंबुद्धेरभावात् पापादेरनात्मधर्मतानिश्चयाच्च। तस्माद्बुधैः कर्म क्रियात्मभिः—षष्ठ्यर्थेतृतीया—क्रियाफलसक्तचित्तानां विधानतोविधानेनेतिकर्तव्यतयायुक्तं कर्मविधिभि-

'अहं सप्रत्यवायः[1]' इति अनात्मधीः[2] अज्ञ[3]प्रसिद्धा; तत्त्व[4]दर्शिनः तु न. तस्मात् बुधैः, क्रियात्[5]माभिः विधानतः विधिप्रकाशितं अपि कर्म त्याज्यं. ॥ २३ ॥

१ दोषी. २ जड धर्माचा आरोप. ३ अज्ञानी जनांत प्रसिद्ध. ४ तत्त्वज्ञान्याला. ५ क्रियांवर (कर्मांच्या फलांवर) चित्तें लागलीं ज्यांचीं, त्यांना.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- ज्याला ज्ञानाची इच्छा झाली व ज्याचा गुरुवेदांतवचनांवर - विश्वास बसला, त्याचें अंतःकरण शुद्धच असतें - परंतु त्यानें आणखी निष्काम कर्में करून चित्त पूर्णपणें शुद्ध करावें; मग गुरूंची कृपा संपादून त्यांच्या मुखें ऐकलेल्या 'तत्त्वमसि' ह्या महावाक्याच्यां आधारें जीवात्म्याचें परमात्म्याशीं ऐक्य आहे ह्याविषयीं मनन व निदिध्यास करून अनुभव मिळवावा. - ह्या ज्ञानाचा साक्षात्कार झाला तरच - सकल दुःखें दूर होऊन - सुख प्राप्त होतें. मग त्या पुरुषाची स्थिति मेरु पर्वताप्रमाणें अत्यंत स्थिर होते (अंतःकरण विषयेच्छांमुळें कधींही क्षुब्ध होत नाहीं). ॥ २४ ॥ - लक्ष्मणा! आतां मी तुला 'तत्त्वमसि' ह्या महावाक्याचा

श्रद्धान्वितस्तत्त्वमसीतिवाक्यतो गुरोः प्रसादादपि शुद्धमानसः ॥ विज्ञाय चैकात्म्यमथात्मजीवयोः सुखी भवेन्मेरुरिवाप्रकम्पनः ॥ २४ ॥ आदौ पदार्थावगतिर्हि कारणं वाक्यार्थविज्ञानविधौ विधानतः ॥

रवश्यकर्तव्यतयाबोधितमपि त्याज्यमित्यर्थः ॥ २३ ॥ अथविरक्तस्यकार्यमाह श्रद्धेति गुरुशास्त्रयोर्विश्वासःश्रद्धातदन्वितोबुभुत्सुःशुद्धमानसोऽपि निष्कामकर्मानुष्ठानाच्छुद्धमानसश्च गुरोःप्रसादाल्लब्धतत्त्वमसीतिवाक्यतः श्रुतमात्मजीवयोरैकात्म्यं विज्ञायमनननिदिध्यासनपरिपाकाभ्यांसाक्षात्कृत्य चएवार्थः साक्षात्कृत्यैव सुखी भवेत् सकलदुःखहीनोभवेदित्यर्थः अप्रकंपनःविषयाभिलाषाक्षोभितांतःकरणः ॥ २४ ॥ महावाक्यंविवरीतुंवाक्यार्थस्यपदार्थबोधपूर्वकत्वमाह आदाविति वि-

अथ श्रद्धान्वितः[1] शुद्धमानसः अपि गुरोः प्रसादात् 'तत्त्वमसि'[2] इति वाक्यतः आत्मजीवयोः[3] ऐकात्म्यं[4] विज्ञाय[5] च मेरुः इव[6] अप्रकम्पनः[7] सुखी भवेत्. ॥ २४ ॥ आदौ विधानतः वाक्यार्थविज्ञानविधौ[8]

१ विश्वासयुक्त. २ 'तें तूं आहेस.' (ह्या वाक्याचाच विस्तृत अर्थ पुढील तीन श्लोकांत आहे). ३ परमात्मा आणि जीवात्मा ह्यांचें. ४ एकरूपत्व. ५ जाणून. ६ सारखा. ७ न हालणारा (निश्चल). ८ वाक्याच्या अर्थाचा बोध होण्यास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

महावाक्यांतील
पदांचे अर्थ.

अर्थ सांगणार आहें. - भ्रम किंवा भूल न होतां कोणत्याही वाक्याचा अर्थ कळण्याचें कारण (साधन), प्रथम त्या वाक्यांतील पदांचा अर्थ समजून घेणें, हें होय. महावाक्यांतील 'तत्' आणि 'त्वम्' ह्या दोन पदांचे अर्थ 'परमात्मा' आणि 'जीव' हे होत; व 'असि' हें पद, ते दोघे एकच आहेत, असें सांगतें. ॥ २९ ॥ - लक्ष्मणा ! ह्यावर तुला शंका येईल कीं 'ईश्वर सर्वज्ञ आहे; जीव तर किंचिज्ज्ञ (ज्याला थोडें ज्ञान असतें, असा), असतो : तेव्हां ह्या दोघांचें ऐक्य व्हावें कसें ?' तर ह्याचेंही उत्तर सांगतों :- जीवाच्या ठिकाणीं 'अहं (मी)' ह्या बुद्धीला कळणें हा धर्म असतो; व ईश्वरावर,

तत्त्वंपदार्थौ परमात्मजीवकावसीति चैकात्म्यमथानयोर्भवेत् ॥ २५ ॥ प्रत्यक्परोक्षादिविरोधमात्मनोर्विहाय संगृह्य तयोश्चिदात्मताम् ॥

धानतःभ्रमप्रमादराहित्येन वाक्यार्थविज्ञानस्यविधावुत्पत्तौ आदौप्रथमंमुख्यमितियावत् पदार्थावगतिःकारणम् हिप्रसिद्धं । तस्यपदत्रयं—'तत्' 'त्वम्' 'असि' इति । तत्रतत्पदार्थःपरमात्मासर्वज्ञत्वादिगुणः त्वंपदार्थोजीवः अनयोस्तत्त्वंपदार्थयोरैकात्म्यंतद्बोधकमसीतिपदम् ॥ २५ ॥ ननुसर्वज्ञत्वादिगुणस्येशस्यकिंचिज्ज्ञत्वधर्मवताजीवेनैकात्म्यंविरुद्धमित्याशंक्याह प्रत्यगिति

पदार्थावगतिः कारणं हि. अथ 'तत्त्वं'पदार्थौ परमात्मजीवकौ; अथ 'असि' इति च अनयोः ऐकात्म्यं भवेत्. ॥ २९ ॥ आत्मनोः प्रत्यक्परोक्षादिविरोधं विहाय, संशोधितां लक्षणया

---

१ पदांचा अर्थ कळणें. २ 'तें' आणि 'तूं' ह्या दोन पदांचे अर्थ. ३ परमात्मा आणि जीव. ४ ह्या दोघांचें. ५ 'मी' अशा बुद्धीनें कळण्याजोगा, आणि न कळणारा इत्यादि धर्मांनीं उत्पन्न केलेल्या विरोधाला. ६ सोडून. ७ चांगला विचार केला जीवद्दल, अशा. ८ लक्षणेनें (लक्षणा तीन प्रकारच्या आहेत : त्यांचीं लक्षणें व उदाहरणें पुढील श्लोकाच्या विवरणांत पहा).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो कोणाला दिसत (कळून येत) नाहीं, हा धर्म असतो : ह्या अशा वेगळ्या धर्मांमुळें जीवात्म्याचा परमात्म्याशीं विरोध झाला आहे; हा विरोध सोडून द्यावा, त्यांच्याविषयीं उत्तम प्रकारें विचार करावा, - ' तत् ' व ' त्वं ' ह्या पदांचा पुढील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें - लक्षणेनें निघणारा अर्थ घेऊन ते दोघेही (ईश्वर आणि जीव) चैतन्यरूपानें एक व - ' तत् ' आणि ' त्वम् ' ह्या पदांचे उद्दिष्ट अर्थ आहेत - असें जाणावें, मग आपला आत्मा तसा (चैतन्यमय) आहे असें समजून चिद्रूपीं मिळून गेल्यासारखें व्हावें (मूळचे ते दोघे एकच आहेत; परंतु जसें, एका बाईची नथ हरवली होती : नथ होती गळ्यांतच अडका-वलेली, पण विस्मरणामुळें ती बाई घाबरून सगळ्या घरभर नथ शोधीत होती; पुढें दुसऱ्या एका बाईनें तिला सांगितलें कीं ' बाई ! ही पहा तुमची नथ तुमच्या गळ्यांत आहे ! ' तेव्हां नथेची धनीन बाई ' माझी

संशोधितां लक्षणया च लक्षितां ज्ञात्वा स्वमात्मानमथाद्वयो भवेत् ॥ २६ ॥

अहंबुद्धिवेद्यत्वंप्रत्यक्त्वंजीवधर्मः परोक्षत्वमीशधर्मस्तदादिधर्मकृतमात्मनोःपरमात्मजीवात्मनोर्विरोधं विहायत्यक्त्वा तयोः संशोधितांयुक्तिभिः सम्यग्विचारितां तत्त्वंपदाभ्यांशक्त्यभावेऽपिवक्ष्यमाणप्रकारयालक्षणया लक्षितां चिदात्मतां संगृह्यत-त्त्वंपदोपास्थितिविषयांकृत्वा स्वमात्मानं तथा ज्ञात्वा ऽथएकात्मज्ञानानंतरं अद्वयो भवेत् चित्स्वरूपतांप्राप्त इवभवेत् । पूर्वमपित-त्स्वरूपएवविस्मृतकंठचामीकरन्यायेनचतत्प्राप्तिरत इवेत्युक्तम् अयंभावः तत्त्वंपदयोर्द्वावर्थौवाच्योलक्ष्यश्च तत्रतत्पदस्यमायोपाधिःसर्वज्ञत्वा दिविशिष्टोवाच्यः त्वंपदस्यापिकिंचिज्ज्ञत्वादिविशिष्टोमायाकार्याविद्योपाधिरविद्यावदंतःकरणोपाधिर्वाच्यः उभयोरपिविशेषणांशत्यागेनशुद्ध-श्चिदात्मालक्ष्यःतत्रवाच्ययोर्विरुद्धधर्मकत्वादैक्यासंभवेऽपिलक्ष्ययोरैक्यंनिर्बाधमेवेति ॥ २६ ॥

च लक्षितां तयोः चिदात्मतां सङ्गृह्य, स्वं आत्मानं ज्ञात्वा अथ अद्वयः भवेत् ॥ २६ ॥

१ पाहिलेल्या. २ चैतन्यरूपाला. ३ समजून घेऊन; मानून. ४ जाणून. ५ भेदरहित; एक.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नथ सांपडली!' असें सांगत फिरूं लागली : वास्तविक पहातां नथ हरवलीच नव्हती. ती सांपडली असें कशाला म्हटलें पाहिजे? पण बाईचा नथ हरवल्याबद्दल पूर्ण ग्रह झाला होता ह्मणून तिचे तसे उद्गार निघाले त्याप्रमाणें जीव जरी चैतन्यरूप व परमात्म्याहून अभिन्न आहे, तरी मनुष्याचा ग्रह, तो परमेश्वराहून वेगळा, असा झाला असतो; ह्मणून, ज्ञान झाल्यावर ईश्वररूपीं मिळून गेल्यासारखें व्हावें, असें सांगितलें). ॥ २६ ॥ - लक्षणा तीन प्रकारच्या आहेत :– (१) जहत्स्वार्थलक्षणा, (२) अजहत्स्वार्थलक्षणा, आणि (३) जहदजहत्स्वार्थलक्षणा. (१) जहत्स्वार्थलक्षणा ह्मणजे सोडिला जातो शब्दाचा मूळचा अर्थ जीमध्यें ती (मूळचा अर्थ संभवत नसल्यामुळें सोडून देऊन त्या धोरणानें दुसरा संभवणारा अर्थ स्वीकारणें) : उदाहरण :– 'गंगायां घोषः (गंगेतील गौळवाडा.)' ह्या वाक्यांत 'गंगायां' ह्या शब्दाचा मूळचा अर्थ 'गंगेच्या प्रवाहांतील' असा आहे. परंतु 'गंगेच्या प्रवाहांत गौळवाडा' बांधला जाणें संभवत नाहीं ह्यासाठीं 'गंगायां' ह्या शब्दाचा मूळचा अर्थ 'गंगाप्रवाहांत' हा सोडून देऊन 'गंगेच्या तीरावरील' असा धोरणानें घेतात व 'गंगायां घोषः' ह्या वाक्याचा एकंदर अर्थ 'गंगेच्या तीरावरील गौळवाडा' असा धरून व्यवहार चालतो. (२) अजहत्स्वार्थलक्षणा ह्मणजे सोडिला जात नाहीं मूळचा अर्थ जीमध्यें ती (शब्दाचा मूळचा अर्थ सोडायाचा नाहींच पण धोरणानें त्याच्यासारखा आणखी दुसराही अर्थ भरीला घ्यावयाचा) : उदाहरण :– 'काकेभ्यो दधि रक्ष्यताम् (कावळ्यांपासून दहीं राखा)' ह्या वाक्यांत 'काकेभ्यः' ह्या पदाचा मूळचा अर्थ 'कावळ्यांपासून' हा सोडायाचा नाहींच पण शिवाय 'मांजरें, कुत्रीं जीं कोणीं दहीं खायला येतील त्यांपासून' असा देखील आणखी अर्थ धोरणानें भरीला घ्यावा लागतो; एकंदरींत 'काकेभ्यो दधि रक्ष्यतां' ह्या वाक्याचा अर्थ 'कावळे, कुत्रीं, मांजरें जीं कोणी दहीं खा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यश किंवा उडवावयाला येतील त्यांना हांकलून दहीं राखावें ' असा घेऊन व्यवहार चालतो. (३) जहदजहत्स्वार्थलक्षणा किंवा भागलक्षणा ह्मणजे कांहीं सोडिला जातो व कांहीं सोडिला जात नाहीं मूळचा अर्थ जीमध्यें ती : उदाहरण :– ' सो ऽयं देवदत्तः (सः ह्मणजे दहा वर्षांपूर्वीं पाहिला होता तो, अयं ह्मणजे सध्यां पुढें उभा असलेला हा देवदत्त.) ' दहा वर्षांपूर्वीं देवदत्त लहान होता त्याला दाढीमिशा नव्हत्या आणि आतां तर त्याचें स्वरूप अगदीं बदलून गेलें आहे परंतु ओळख पटते : ती कशामुळें ! तर मनुष्य देवदत्ताचा दहा वर्षांपूर्वींचा लहान आकार व सध्यांचा दाढीमिशावाला आकार सोडून देऊन न बदलणाऱ्या सामान्य खाणाखुणांकडे लक्ष्य पुरवितो : एकंदरींत सः (पूर्वींचा) आणि अयं (आतांचा) ह्या दोन्ही पदांतील कांहीं मूळचा अर्थ सोडून ओळख पटण्याचा व्यवहार चालतो : महावाक्यांतील 'तत् (माया उपाधि ज्याचा तें चैतन्य–ईश्वर)' व 'त्वं (तूं – अंतःकरण उपाधि ज्याचा तें चैतन्य जीव)' ह्या

एकात्मकत्वाज्जहती न संभवेत्तथा ऽजहल्लक्षणता विरोधतः ॥

उक्तलक्षणास्वरूपमाह **एकात्मकत्वादिति जहती** लक्षणा जहत्स्वार्थलक्षणा यथा गंगायां घोष इत्यत्र गंगापदार्थस्य प्रवाहस्य घोषाधारतानुपपत्त्या सर्वथा तत्परित्यागेन तीररूपार्थलक्षणा सा प्रकृते **न एकात्मकत्वात्** विशिष्टांशस्यैकत्वात् सर्वथा स्वार्थत्यागाभावात् **तथा ऽजहल्लक्षणता** जहत्स्वार्थलक्षणावत्त्वमपि अत्र न **संभवति** यथा काकेभ्यो दधि रक्ष्यतामित्यादौ काकपदस्य स्वार्थात्यागेनैव दध्युपघातके लक्षणा सापि न

एकात्मकत्वात्[1] जहती[2], तथा विरोधतः[3] अजहल्लक्षणता[4] [च] न सम्भवेत्[5]. ॥

---

१ एकस्वरूपी असल्यामुळें. २ टाकावयाचा असतो मूळचा अर्थ जीत, अशी. ३ लक्षण जमत नाहीं ह्मणून. ४ नाहीं टाकावयाचा स्वार्थ जींत, अशी. ५ संभवेल. ६ मागें अठराव्या श्लोकांत उपाधि शब्दाचें व्याख्यान आहे : पहा : ह्या शब्दाची व्युत्पत्ति आधीयते [दुःखं] अनेन इति आधिः, आधेः उप–उपाधिः– चिंतेच्या जवळचा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'तत्' 'त्वं' येथें भागलक्षणा जमते.

पदांमध्यें दोहोंचें ऐक्य होण्याची शक्ति नाहीं ह्मणून लक्षणा तर केलीच पाहिजे. पण ती कोणती करावी ? - जहत्स्वार्थलक्षणा करणें संभवत नाहीं; - कारण ह्या लक्षणेंत पदाचा मूळचा अर्थ सगळा सोडावा लागतो आपल्याला तर दोन्ही पदांचा सगळा अर्थ सोडावयाचा नाहीं, - कारण त्यांतील चैतन्यरूप अर्थ एक आहे - तो आपल्याला घेतला पाहिजे. बरें; - तशीच, अजहत्स्वार्थलक्षणाही करितां येत नाहीं; कारण तेथेंही विरोध येतो - पहा; ह्या लक्षणेंत बाहेरचा अर्थ भरीला घ्यावयाचा पण पदाचा मूळचा अर्थ मुळींच सोडावयाचा नसतो; आपल्याला तर दोन्ही पदांतील 'चैतन्य' एवढाच अर्थ ठेवून बाकीचा सोडावयाचा आहे. आतां राहिली - जहदजहत्स्वार्थलक्षणा किंवा भागलक्षणा; ही मात्र येथें जुळते. हिला कांहीं दोष येत नाहींः जसें 'सो ऽयं देवदत्तः' ह्या उदाहरणांत आपण 'त्यावेळचा लहान' व 'ह्यावेळचा दाढीमिशावाला मोठा' हे दोन्ही धर्म सोडून देवदत्ताच्या सामान्य खुणा– त्याच्या तोंडावर देवींचे वण होते वगैरे– घेतल्या तसेंच 'तत्' व 'त्वं' ह्या

सोऽयंपदार्थाविव भागलक्षणा युज्येत तत्त्वंपदयोरदोषतः ॥ २७ ॥

विरोधतःविशेषणत्यागेनसर्वथास्वार्थात्यागाभावात् । अतो**भागलक्षणा**जहदजहल्लक्षणा **युज्येत अदोषतः**पूर्वोक्तदोषाभावात् विशेष्यांशस्यात्यागाद्विशेषणांशस्यत्यागाच्च । तत्रदृष्टांतः **सोयंपदार्थाविव**यथासोऽयंदेवदत्तइत्यत्रतद्देशादिविशिष्टोतीतानुभवविषयोवतात्पदार्थःएतद्देशादिविशिष्टोऽनुभूयमानोवेदंशब्दार्थः तयोश्चविरुद्धविशेषणकत्वादैक्यासंभवेनदेशादिरूपविशेषणत्यागेनानुभवगतातीतत्वादिविशेषणत्यागेनवालक्षणयैक्यंतद्वदितिभावः ॥ २७ ॥

सो[1]ऽयंपदार्थौ इव तत्त्वंपद[2]योः भाग[3]लक्षणा अदो[4]षतः यु[5]ज्येत. ॥ २७ ॥

१ 'तो' आणि 'हा' ह्या पदांचे अर्थ. २ 'तत्' आणि 'त्वम्' ह्या पदांची. ३ कांहीं भाग मात्र ठेवावयाचा जींत अशी. ४ दोष नाहीं ह्मणून. ५ जुळेल.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पदांचे अनुक्रमानें 'माया उपाधि ज्याचा' व 'अंतःकरण उपाधि ज्याचा' हे अर्थ सोडून बाकीचे 'चैतन्य' एवढे अर्थ घ्यावे. - आणि मागील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें 'असि' ह्या पदानें त्यांचें ऐक्य समजावें. - ॥२७॥

- जीवाचे उपाधि सोडावयाचे ते कोणते, तें सांगतों ऐक :- पूर्व जन्मांत करून ठेविलेल्या कर्मांमुळें उत्पन्न

रसादिपञ्चीकृतभूतसंभवं भोगालयं दुःखसुखादिकर्मणाम् ॥

अथत्याज्यत्वायजीवोपाधिमाह रसादीति रसापृथ्वीआदिर्येषांतानिपंचीकृतानियानिभूतानितेभ्यःसंभवोयस्यतत् रसादिपंचीकृत[1]भूतसम्भवं दुःखसुखादिकर्मणां[2] भोगालयं[3] आद्यन्तवत्[4] आदिकर्मजं[5] मायामयं[6] शरीरं

---

१ पृथ्वी इत्यादि पांच एकवटलेल्या भूतांपासून उत्पन्न झालेलें : पांच भूतें एकत्रटणें ह्याला 'पंचीकरण' असें ह्मणतात : त्याचा प्रकार असा आहे :– पांच भूतांचे प्रत्येकाचे दोन दोन भाग करावयाचे, एक एक भाग तसाच राखून ठेवावयाचा, दुसऱ्या भागाचे चार चार भाग करावयाचे, आणि हे अर्धांचे चवथाले भाग ह्मणजे एकंदर भूताचे अष्टमांश स्वभागाशिवाय इतर भूतांच्या राखून ठेवलेल्या अर्ध्या अर्ध्या भागांत मिळवावयाचे : एकंदर मिश्रण होऊन गोळे तयार होतात, त्यांतील भूतांच्या अंशांचें प्रमाण कोष्टकांत दाखविलें आहे, तें पहावें. आपलीं शरीरें, ज्यांत पृथ्वीचा भाग अर्धा असतो, त्या मिश्रणापासून बनविलीं असतात म्हणजे आपल्या शरीरांत अर्धा अंश पृथ्वी, अष्टमांश पाणी, अष्टमांश तेज, अष्टमांश वायु व अष्टमांश आकाश आहे. ज्यांत उदक अर्धें बाकीचीं भूतें प्रत्येकीं अष्टमांश, तीं शरीरें वरुणलोकीं; तेज अर्धें बाकीचीं भूतें प्रत्येकीं अष्टमांश तीं शरीरें सूर्यलोकीं; अशी व्यवस्था समजावी. २ सुखदुःखांचीं उत्पादक जीं कर्में, त्यांच्या. ३ भोगाचें स्थान. ४ उत्पत्ति व नाश ज्याला आहेत, असें. ५ पूर्वजन्मांतील कर्मांपासून उत्पन्न झालेलें. ६ मायेचें कार्य.

त. गोळे	पृ.	उ.	ते.	वा.	आ
पृथ्वी	१/२	१/८	१/८	१/८	१/८
उदक	१/८	१/२	१/८	१/८	१/८
तेज	१/८	१/८	१/२	१/८	१/८
वायु	१/८	१/८	१/८	१/२	१/८
आकाश	१/८	१/८	१/८	१/८	१/२

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झालेलें हें शरीर, हा जीवाचा स्थूल (अवजड, दिसण्याजोगा, ढोबळ) उपाधि होय. पृथ्वी, उदक, तेज, वायु, आकाश हीं पांच भूतें एकमेकांत मिश्र होऊन बनलेल्या गोळ्यापासून ह्याची उत्पत्ति होते; सुख दुःख इत्यादि प्राप्त करून देणाऱ्या कर्मांचा उपभोग मिळण्याचें स्थान हेंच होय; ह्याला उत्पत्ति व नाश आहेत; हें परंपरेनें (मायेपासून महत्तत्त्व, महत्तत्त्वापासून अहंकार, अहंकारापासून भूतें, व भूतांपासून शरीर, अशा क्रमानें) मायेचें कार्य आहे. ॥ २८ ॥ विद्वान् लोक 'दुसरें एक सूक्ष्म (न दिसणारें) शरीर जीवाचा उपाधि आहे,' असें मानितात. ह्या शरीरांत मन, बुद्धि, दहा इंद्रियें (श्रोत्र, त्वचा, नेत्र, जिव्हा, घ्राण, वाणी, हात, पाय, गुद, जननेंद्रिय) आणि प्राण (प्राण, अपान, व्यान, उदान, समान) इतक्या

शरीरमाद्यन्तवदादिकर्मजं मायामयं स्थूलमुपाधिमात्मनः ॥ २८ ॥ सूक्ष्मं मनो-
बुद्धिदशेन्द्रियैर्युतं प्राणैरपञ्चीकृतभूतसंभवम् ॥

पंचीकरणंचेत्थंएकैकंभूतंद्विधाविभज्यतत्रैकंभागंचतुर्धाविभज्यतेषांभागानांस्वेतरभूतचतुष्टयार्धभागचतुष्टयेसंयोजनेएकैकंभूतंपंचात्मकंभवति भागाधिक्याच्चप्रातिस्विकतयाभूरादिव्यवहारोऽपि **सुखदुःखयोरादीनियानिकर्माणितेषां भोग**स्ततकर्मजसुखदुःखानुभवस्तस्यालयमाश्रयभूत**माद्यंतवत्**उत्पत्तिनाशयोगि **आदिकर्मजं**प्राग्भवीयकर्मजन्यं **मायामयं**परंपरयामायाविकारः तद्विकारभूतविकारत्वात् एतच्छरीरमात्मनः **स्थूलमुपाधिं** वदंतीतिशेषः ॥ २८ ॥ अथसूक्ष्मोपाधिमाह **सूक्ष्ममिति बुधा अन्यतु्स्थूल-**
आत्मनः स्थूलं[1] **उपाधिं**[2] **विदुः**[3]**॥२८॥बुधाः**[4] **मनोबुद्धिदशेन्द्रियैः**[5]**, प्राणैः [च] युतं**[6] **अपंचीकृतभूतसम्भवं**[7]

१ मोठा; दिसणारा. २ मागें १८ श्लोकाचें व्याख्यान पहा. ३ समजतात. ४ विद्वान्. ५ मन, दहा इंद्रियें (श्रोत्र, त्वचा, नेत्र, जिव्हा, नासिका, वाणी, हात, पाय, गुद व जननेंद्रिय) ह्यांच्यायोगें. ६ युक्त. ७ मिश्र न केलेल्या पांच भूतांपासून उत्पन्न झालेलें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कला (भाग) आहेत; ह्याची उत्पत्ति मिश्र न झालेल्या पांच भूतांपासून होते; भोक्त्यांला सुखदुःखादि भोग मिळण्याचें साधन हें होय (स्थूल शरीरांत हें सूक्ष्म शरीर राहत असेल तरच सुखदुःखादिकांचा भोग मिळतो; हें निघून गेलें कीं, प्राणी मरण पावला, असें ह्मणतात). ॥ २९ ॥ - हे जीवाचे दोन उपाधि सांगितले; आतां ईश्वराचा उपाधि सोडावयाचा तो कोणता, तें सांगतों : - माया हें ईश्वराचें उत्तम (' हा ईश्वर ' असा व्यवहार ज्याच्यामुळें चालतो, तें) प्रधान शरीर होय. ह्या शरीराला उत्पत्ति नाहीं (हें पहिल्यापासून आहेच. पण ह्याचा नाश होतो ह्मणजे माया अनेक रूपांनीं परिमाण पावते व शेवटीं तीं सर्व

भोक्तुः सुखादेरनुसाधनं भवेच्छरीरमन्यद्विदुरात्मनो बुधाः ॥ २९ ॥ अनाद्यनि-
र्वाच्यमपीह कारणं माया प्रधानं तु परं शरीरकम् ॥

शरीरविलक्षणं **शरीरं**लिंगदेहाख्यं **आत्मन**उपाधिं**विदुः** । तत्स्वरूपमाह **सूक्ष्मं**चक्षुराद्यविषयः **मनोबुद्धिदशेंद्रियैः प्राणैश्च युतम्** संकल्पात्मकंमनः निश्चयात्मिकाबुद्धिःघ्राणरसनाचक्षुस्त्वक्श्रोत्रेतिपंचज्ञानेंद्रियाणि वाक्पाणिपादपायूपस्थानिकर्मेंद्रियाणि प्राणापानव्यानोदानसमानाश्चप्राणास्तैर्युतंएतत्सप्तदशसमुदायात्मकम् तदाधारभूतान्याह**अपंचीकृतभूतसंभवं**तेभ्यउत्पन्नंअतएवादरम् तथा **भोक्तुःसुखदुःखादेः**सुखदुःखाद्यनुभवस्या**नुसाधनम्** स्थुलशरीरस्यैतदनुगतस्यैवभोगसाधनत्वमितिभावः एतद्वियोगेनैवमरणव्यवहार इतिबोध्यम् ॥ २९ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

इतिजीवोपाधिद्वयमुक्त्वाईशोपाधिमाह **अनादीति अनादि**उत्पत्तिहीनम् । नानाविधपरिणामशालितयापरिणामरूपेणनश्वरामितिअ-

[1]अन्यत् शरीरं आत्मनः [2]सूक्ष्मं [उपाधिं] विदुः; [एतत्] भोक्तुः[3] सुखादेः [4]अनुसाधनं भवेत्. ॥ २९ ॥ [5]अनादि अनिर्वाच्यं[6] अपि इह कारणं माया तु [7]परं [8]प्रधानं शरीरकं. ॥

---

१ दुसरें. २ लहान; न दिसणारा. ३ भोगणाराला. ४ साधन. ५ जन्मरहित. ६ सांगतां येणार नाहीं, असें. ७ उत्कृष्ट. ८ मुख्य.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रूपें नष्ट होतात); ह्या शरीराचें वर्णन करितां येण्याजोगें नाहीं; पण हेंच सकल जगाच्या उत्पत्तीचें कारण होय; · मूळ आत्मा एक असून ह्या भिन्नभिन्न उपाधींमुळें 'जीव' आणि 'ईश्वर' असा वेगळा होऊन राहिला आहे. ह्मणून, - ते उपाधि सोडून, श्रवण, मनन निदिध्यासन ह्या - क्रमानें जीवात्म्याचा परमात्मरूपीं अभेद (ऐक्य) आहे, असें जाणावें. ॥ ३० ॥ - शरीरामध्यें अन्नमय, प्राणमय, मनोमय विज्ञानमय आणि आनंदमय असे पांच - कोश (पदर, कोशेटे) आहेत. जसा स्फटिकाचा खडा - जासुंदीच्या फुलाजवळ ठेविला तर तांबडा दिसतो, पिवडीजवळ ठेविला तर पिंवळा दिसतो, - तसा, आत्मा त्या पांच कोशांच्या संबंधामुळें त्या त्या रूपांचा भासूं लागतो ('मी लठ्ठ किंवा कृश आहें' अशी मनुष्याला प्रतीति येते

उपाधिभेदात्तु यतः पृथक् स्थितं स्वात्मानमात्मन्यवधारयेत्क्रमात् ॥ ३० ॥
कोशेष्वयं तेषु तु तत्तदाकृतिर्विभाति संगात्स्फटिकोपलो यथा ॥

नादित्वमात्रोक्तयानूदितम् । अनिर्वाच्यंसत्त्वासत्त्वाभ्यांनिर्वक्तुमशक्यम् कारणंसकलप्रपंचस्यजनकम् ईदृशीमाया तु ब्रह्मणःपरं ईश्वरव्यवहारसंपादकत्वादुत्कृष्टं प्रधानं शरीरकम् । स्वार्थेकः । एवमुपाधिभेदादेकमेवचैतन्यंयतःपृथक्स्थितंजीवईशइतिभेदबुद्धिविषयमतोलक्षणयोपाधिपरित्यागेनस्वात्मानमात्मनि अवधारयेदभेदेनजानीयात् क्रमाच्छ्रवणमनननिदिध्यासनक्रमेणेत्यर्थः ॥ ३० ॥ अथवाक्यार्थविचारफलमाह कोशेष्विति आनंदमयस्यब्रह्मत्वेअन्नमयप्राणमयमनोमयविज्ञानमयेषुचतुर्षुकोशेषु

यतः तु [१]उपाधिभेदाद [२]पृथक् [३]स्थितं, [अतः] क्रमात् स्वात्मानं आत्मनि [४]अवधारयेत्. ॥ ३० ॥ [५]अयं तेषु कोशे[६]षु तु यथा स्फटिको[७]पलः, [तथा] स[८]ङ्गात् तत्तदा[९]कृतिः विभाति

१ उपाधि भिन्न असल्यामुळें. २ वेगळें. ३ राहिलेलें. ४ एकरूपानें जाणावें. ५ हा (आत्मा). ६ - अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आनंदमय, ह्या पदरांमध्यें. ७ स्फटिक दगड. ८ संबंधामुळें. ९ त्या त्या स्वरूपाचा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्याचें कारण ह्या कोशांचा संबंध होय). महावाक्याचा उत्तम विचार केला असतां ' हा (आत्मा) कोणाशीं संबंध न ठेवणारा, जन्मास न येणारा, व अद्वितीय (एक) आहे' असें कळून येतें. ॥ ३१ ॥ ह्याच्या (आत्म्याच्या) ठिकाणीं स्वप्न, जागृति (जागेपण) आणि सुषुप्ति (झोंप) अशा भेदांनीं तीन प्रकारच्या अवस्था दिसून येतात; पण त्या देखील बुद्धीचेच धर्म होत, - आत्म्याचे नव्हत. - बुद्धि रज, सत्त्व आणि तम ह्या तीन गुणांची झालेली आहे; - आणि त्या तीन्ही अवस्थाही ह्या तीन गुणांचींच अनु-

असंगरूपो ऽयमजो यतो ऽद्वयो विज्ञायते ऽस्मिन्परितो विचारिते ॥ ३१ ॥

बुद्धेस्त्रिधा वृत्तिरपीह दृश्यते स्वप्नादिभेदेन गुणत्रयात्मनः ॥

तत्तत्संगात्तत्तदाकृतिर्विभाति यथा जपादिसंगात्स्फटिको ऽनेकाकृतिर्भाति आनंदमयस्यापि जीवत्वत्वादिनां तु तेन सह पंचसु को-शेष्विति बोध्यं अस्मिन्महावाक्ये परितो विचारिते सम्यग्विचारिते सत्ययमात्मा ऽसंगरूपः अन्नमयादिभिः संगरहित—असंगो नहि-सज्जत इति श्रुतेः अजो ऽद्वयश्च विज्ञायते स्थूलोऽहमित्यादिस्त्वज्ञस्य तत्तत्कोशप्रसंगात्प्रतीतिः स्फटिकवत् तत्त्वज्ञस्य तु न तथा प्रतीतिरि-तिभावः एवंच तत्तदुपाधिकृततद्रूपताप्रतीतिनिरास एव विचारफलमिति भावः ॥ ३१ ॥ जाग्रदाद्यवस्था ऽपि बुद्धिधर्मो नात्मधर्म इत्याह बु-द्धेरिति इह आत्मनि स्वप्नादिभेदेन जाग्रत्स्वप्नसुषुप्तिभेदेन या त्रिधा वृत्तिर्दृश्यते सा ऽपि गुणत्रयात्मनः सत्त्वरजस्तमोरूप-

यतः अस्मिन्[1] परितः[2] विचारिते[3] [सति], अयं असङ्गरूपः[4], अजः[5] अद्वयः[6] च विज्ञायते[7] ॥ ३१ ॥

इह स्वप्नादिभेदेन[8] [या] त्रिधा[9] वृत्तिः[10] दृश्यते[11], [सा] अपि गुणत्रयात्मनः[12] बुद्धेः[13] ॥

१ ह्याविषयीं. २ सर्वथा. ३ विचार केला असतां. ४ संबंध न ठेवणारें रूप ज्याचें, असा. ५ जन्मरहित. ६ नाहीं दुसरा ज्याला, असा (एक). ७ समजून येतो. ८ स्वप्न इत्यादि (जागेपण व झोंप) भेदांमुळें. ९ तीन प्रकारांची. १० अवस्था. ११ दिसते. १२ गुणांचें त्रिकूट हें स्वरूप जिचें, अशा. १३ बुद्धीची.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'अवस्था बुद्धीच्या, आत्म्याच्या, नव्हत.'

क्रमें कार्यें होत (स्वप्न रजोगुणाचें कार्य, जागृति सत्वगुणाचें आणि झोंप तमोगुणाचें). त्या अवस्था आत्म्यावर अनुभवाला येतात हें अगदीं खोटें; कारण त्या अवस्थाच मुळीं खोट्या आहेत : त्यांतील एकदेखील अवस्था नित्य नाहीं : पहा : स्वप्नामध्यें झोंप असते काय ? झोंपेंत जागेपणा दिसून येतो काय ? जागेपणांत झोंप आढळते काय ? - असा त्या अवस्थांचा परस्परांवर व्यभिचार (नसणें) आहे; - तेव्हां त्यांना नित्य ह्मणतां येत नाहीं : अर्थात - त्या खोट्या, हें सिद्ध आहे. आत्मा तर नित्य (उत्पत्तिनाशरहित), तीन्ही गुणांवेगळा, व्यापक, कोणाशीं संबंध न ठेवणारा, व आनंदरूप आहे. अशा आत्म्यावर अनित्य अवस्थांचा अनुभव कधींही वास्तविक घडणार नाहीं; - तसा भास होतो त्याला कारण केवळ बुद्धीचा अध्यास (अध्यास ह्मणजे काय तें पुढें ३७ श्लोकांत स्पष्ट सांगितलें आहे : पहा.) होय. - ॥ ३२ ॥

अन्योऽन्यतोऽस्मिन् व्यभिचारतो मृषा नित्ये परे ब्रह्मणि केवले शिवे ॥३२॥

गुणत्रयस्वरूपाया बुद्धेर्धर्मः उक्तावस्थात्रयस्योक्तमूलकत्वात् । एतदवस्थात्रयस्यास्मिन् अवस्थानं व्यभिचारतो मृषा बुद्ध्यध्यासनिबंधनं नतु वास्तवमित्यर्थः अन्योऽन्यतो व्यभिचारतस्तस्यावस्थात्रयस्य स्वरूपतो मृषात्वात्तद्भानस्य मृषात्वमेव स्वप्नकाले जाग्रत्सुषुप्त्योरभावात् जाग्रति इतरद्वयस्याभावात् सुषुप्तावितरयोरभावात्परस्परं व्यभिचारो बोध्यः ॥ आत्मनस्तदनाश्रयत्वं विशेषणैराह नित्ये उत्पत्तिनाशशून्ये परे गुणत्रयातीते ब्रह्मणि व्यापके केवले ऽसंगे शिवे आनंदरूपे एवंभूते सदैकरसे परस्परव्यभिचारधर्माधानमसंभवीतिभावः

[एतत् अवस्थात्रयं] अस्मिन् नि[1]त्ये प[2]रे ब्र[3]ह्मणि के[4]वले शिवे[5] [6]अन्योन्यतः [7]व्यभिचारतः [8]मृषा. ॥३२॥

१ तिन्ही कालीं नाश न पावणाऱ्या. २ तिन्ही गुणांच्या पलिकडे असणाऱ्या. ३ व्यापक. ४ एक. ५ आनंदमय. ६ परस्परांवर. ७ धर्म राहत नाहींत, ह्मणून. ८ खोटें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देह, इंद्रियें, प्राण, मन आणि जीव ह्यांचा एकमेकांवर अध्यास (३७ श्लोक पहा.) झाल्यामुळें बुद्धीची वृत्ति निरंतर चालत असते; ह्या वृत्तीला मूळ आधार तमोगुणाचा - व रजोगुणाचा - असतो ह्मणून तिच्यापासून होणारे व्यापारही अज्ञानाचे बोधक असतात (ते व्यापार दिसले कीं विद्वानाला हें केवळ अज्ञान होय असें स्पष्ट कळतें). ती बुद्धीची वृत्ति जोंपर्यंत चालू राहते, तोंपर्यंत हा संसार उत्पन्न व्हावयाचाच. - एतावता, जीमध्यें रज आणि तम ह्या गुणांचें आधिक्य असतें, ती बुद्धि संसाराचें कारण होय; ह्मणून तिचा सर्वथा त्याग करावा. - ॥ ३३ ॥ - लक्ष्मणा! महावाक्याचा विचार केल्यावर मग काय करावयाचें

देहेन्द्रियप्राणमनश्चिदात्मनां संघादजस्रं परिवर्तते धियः ॥ वृत्तिस्तमोमूलतया ऽज्ञलक्षणा यावद्भवेत्तावदसौ भवोद्भवः ॥ ३३ ॥ नेतिप्रमाणेन निराकृताखिलो हृदा समास्वादितचिद्घनामृतः ॥

॥३२॥ अथत्याज्यत्वायसंसारमूलभूतांवृत्तिमाह देहेति एषां संघात् इतरेतरध्यासविषयात् अजस्रं यावद्धियोबुद्धेर्वृत्तिस्तमोमूलतया ऽज्ञलक्षणाअज्ञत्वज्ञापिका यावत्परिवर्तते तावद्भवोद्भवःसंसारोद्भवो भवेत् तमःपदंरजसोप्युपलक्षणम् रजस्तमःप्रधानाबुद्धिःसंसारहेतुत्वात्सर्वथात्याज्येतिभावः ॥ ३३ ॥ कृतमहावाक्यविचारस्यकर्तव्यमाह नेतीति अथातआदेशोनेतिनेतीतिप्र-

देहेन्द्रियप्राणमनश्चिदात्मनां संङ्घात् अजस्रं यावत् धियः वृत्तिः तमोमूलतया अज्ञलक्षणा परिवर्तते, तावत् असौ भवोद्भवः भवेत्. ॥३३॥ 'न'इतिप्रमाणेन निराकृताखिलः हृदा समास्वादितचिद्घनामृतः

१ देह, इंद्रियें, प्राण, मन आणि चिदात्मा ह्यांच्या. २ समूहापासून. ३ नेहमीं. ४ जोंपर्यंत. ५ बुद्धीची. ६ अवस्था. ७ तमोगुण मूळ कारण असल्यामुळें. ८ अज्ञान जाणविणारी. ९ चालू आहे. १० तोंपर्यंत. ११ हा. १२ संसाराचा उद्भव. १३ दूर केलें (खोटें असें जाणिलें) सगळें ज्यानें, असा. १४ अंतःकरणानें. १५ उत्तमप्रकारें भोगिलें चैतन्यमय पूर्ण (दुःखरहित) सुख ज्यानें, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेंही सांगतों : ऐक : - पुरुषाला ‘ नेति नेति (अमुक सत्य नव्हे तमुक सत्य नव्हे)’ ह्या श्रुतिप्रमाणावरून, सर्व जग मिथ्या होय, असें पूर्णपणें कळलें आणि - सत्त्वगुणप्रधान (ज्यांत सत्त्वगुणाचें आधिक्य असतें अशा) मनाच्या योगें चैतन्यरूप (ज्ञानमय) केवळ (दुःखरहित) सुखाचा अनुभव मिळाला ह्मणजे त्यानें, जसा तहानेलेला मनुष्य नारळांतील पाणी प्याल्यावर जिच्या आधारानें उदकाची गोडी घेतली त्या कंवचीला फेंकून देतो, त्याप्रमाणें - ज्यांच्या आश्रयावर ज्ञान मिळविलें त्या - सर्व देहेंद्रियादि दृश्य पदार्थांचा त्याग करावा (ब्रह्मज्ञान झाल्यावर त्याज्य किंवा ग्राह्य कांहीं नसतें; परंतु, जिचें भय वाटतें ती वस्तु दूर करावी, ह्या व्यवहाराला अनुसरून ‘त्याग करावा’ असें ह्मटलें; त्या ह्मणण्याचा खरा आशय ‘उदासीन राहावें’ हा होय).॥३४॥

त्यजेदशेषं जगदात्तसद्रसं पीत्वा यथाऽम्भः प्रजहाति तत्फलम् ॥ ३४ ॥

माणेन निराकृतंमिथ्यात्वेनगृहीतमखिलंजगत्येनसः ततोह्रदासत्त्वप्रधानेनमनसा सम्यगास्वादितंचिल्लक्षणंघनामृतंदुःखासंभिन्नंसुखंयेनसःस्वर्गादितुपरिणामदुःखत्वात्तत्संभिन्नमेवएवंभूतो ऽशेषंजगद्देहेंद्रियादिदृश्यसमूहं त्यजेत्हानोपादानबुद्धिविषयंनकुर्यात् किंतूदासीनस्तत्रभवेत् ननुदेहेंद्रियादिभिरेवतज्ज्ञानलाभात्कथमुपजीव्यस्यत्यागइत्याशंक्यदृष्टांतदर्शनेनपरिहरति यथात्तृषावान् आत्तःसद्रसोमाधुर्यंयेनतादृशंनारिकेलनारंगादिफलांतर्वर्त्यंभः पीत्वा तत्स्थानभूतंतत्फलं जहातितत्रोदासीनोभवति तद्वत्सर्वदृश्यसारांशोब्रह्मतल्लाभेसातिनिःसारंदृश्यंनोपादेयंनापिहेयमितिभावः यतोभयादिसंभावनातद्धेयमित्युच्यते ॥ ३४ ॥

अशेषं[1] जगत्, यथा [तृषावान्] आत्तसद्रसं[3] अम्भः[4] पीत्वा[5] तत्फलं[6] प्रजहाति[7], [तथा] त्यजेत्. ॥ ३४ ॥

---

१ समग्र. २ ताहानेलेला. ३ घेतला उत्तम रस ज्याच्यायोगें, असें. ४ उदक. ५ पिऊन. ६ त्याची कंवची. ७ टाकतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आत्मा कधीं (६) मेला नाहीं, (१) उत्पन्न होत नाहीं, (५) क्षीण होत नाहीं, (३) वाढत नाहीं, आणि (२) नवा होऊन, - (४) व रूपांतर पावून - राहत नाहीं ह्मणजे त्याला (१) जायते, (२) अस्ति, (३) वर्धते, (४) विपरिणमते, (५) अपक्षीयते, (६) नश्यति हे सहाही भावविकार लागत नाहींत. ह्यानें (जीवात्म्यानेंही) देहेंद्रियादि सर्वांचें महत्त्व दूर सारिलें आहे (त्याच्यापेक्षां अधिक महत्त्व कोणाचेंच नाहीं). हा सुखरूप, स्वप्रकाश, सर्वव्यापी व ब्रह्माशीं अभिन्न होय.-- ह्याच्यावांचून सर्व पदार्थ

कदाचिदात्मा न मृतो न जायते न क्षीयते नापि विवर्धते ऽनवः ॥ निरस्तसर्वातिशयः सुखात्मकः स्वयंप्रभः सर्वगतो ऽयमद्वयः ॥ ३५ ॥

इतरस्यानित्यत्वेनतत्रवैराग्यार्थमात्मनएवनित्यत्वमाह **कदाचिदिति** कदापीत्यर्थः **अनवः**उत्पत्त्यनंतरंविद्यमानोहिनवःतेनजन्मानंतरास्तित्वंव्यावर्तितं नवत्वाभावेनैवजीर्णत्वाभावादवस्थांतरापत्तिरूपपरिणामोऽपिनिरस्तःअनेन**जायतेऽस्तिवर्धतेविपरिणमतेऽपक्षीयतेनश्यतीतिषड्भावविकारराहित्य**मुक्तं एवंचैतद्भिन्नंसर्वमुक्तषड्भावविकारवत्त्वादनित्यमितिततोविरज्येतेतिबोधितं यतईदृशोतएव**निरस्तःसर्वस्य**देहेंद्रियादे**रतिशयो**महत्त्वं**येन**स्वलाभात्सः यल्लाभान्नापरोलाभःइतिश्रुतेः यतः**सुखात्मकः**आनंदस्वरूपः **स्वयंप्रभः**स्वप्रकाशः देहेंद्रियादिस्तुदुःखस्वरूपःपरप्रकाश्यश्च तस्यभासासर्वमिदंविभातीतिश्रुतेः**सर्वगतो**व्यापकः**अय**महंबुद्धिवि-

[1]अनवः आत्मा कदाचित् न [2]जायते, न अपि [3]वर्धते, न [4]क्षीयते, न [5]मृतः, [6]सुखात्मकः, [7]निरस्तसर्वातिशयः, [8]स्वयंप्रभः, [9]सर्वगतः [च]; अयं अद्वयःअपि. ॥ ३५ ॥

---

१ नवा (उत्पन्न झाल्यावर असणारा) नव्हे. २ उत्पन्न होतो. ३ वाढतो. ४ क्षीण होतो. ५ मेलेला. ६ सुखरूप. ७ दूर टाकलें सर्वांचें महत्त्व ज्यानें, असा. ८ स्वप्रकाश. ९ सर्वव्यापी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संसार भासण्याचें कारण.

विकारी व अनित्य आहेत ह्मणून त्यांविषयीं वैराग्य धरावें. - ॥ ३५ ॥ - ह्यावर एक शंका सहजच उत्पन्न होते कीं, - आत्मा जर अशा प्रकारचा ज्ञानरूप व सुखमय आहे तर त्याच्यावर हा दुःखांनीं भरलेला संसार दिसून येतो कसा? - तर तिचें उत्तर हें :- अज्ञानामुळें लोक आत्म्यावर देहेंद्रियांचा अध्यास (पुढील श्लोक पहा) करितात ह्मणून त्यांना संसाराची प्रतीति येते. तत्त्वज्ञान झालें कीं क्षणमात्रांत अज्ञान लय पावतें; कारण, अज्ञानाचा आणि ज्ञानाचा पूर्ण द्वेष आहे (तीं दोन्ही एकत्र कधीं राहत नाहींत) : अज्ञान नष्ट झालें कीं त्यामुळें उद्भवलेला संसार अर्थातच नाश पावतो :- ॥ ३६ ॥

एवंविधे ज्ञानमये सुखात्मके कथं भवो दुःखमयः प्रतीयते ॥ अज्ञानतो ऽध्यासवशात्प्रकाशते ज्ञाने विलीयेत विरोधतः क्षणात् ॥ ३६ ॥

षयः प्रत्यगात्मा ऽपि **अद्वयः** उक्ताद्वयब्रह्मस्वरूपएव नततो ऽतिरिक्तइतिभावः अयमात्माब्रह्मेतिश्रुतेः ॥ ३५ ॥ ननुएवंविधेविकारशून्येआत्मनिजन्ममरणादिप्रवाहरूपसंसारभानंकथमितिशंकते **एवंविधे**इति **दुःखमयः** दुःखप्रचुर इति । उत्तरयति **अज्ञानमूलकोयो ऽध्यासो**देहांतःकरणादौअहंममेत्यध्यास**स्तद्वशात्** एवंचभ्रांतिरूपातत्प्रतीतिरितिभावः नन्वेवंकथंतस्यसंसारस्यनिवृत्तिस्तत्राह **ज्ञाने**ति आविर्भूतइतिशेषः ज्ञानस्याज्ञान**विरोधित्वा**त्तदुत्पत्ति**क्षणएव**कारणभूताज्ञाननाशात्तत्कार्यसंसारस्यापि**विलय**इत्यर्थः यथारज्जुसर्पस्यलयइत्यर्थः ॥ ३६ ॥

'एवंविधे[1] ज्ञानमये सुखात्मके दुःखमयः भवः कथं प्रतीयते[2]?' अज्ञानतः अध्यासवशात्[3] प्रकाशते[4]. ज्ञाने [आविर्भूते[5] सति], विरोधतः क्षणात् विलीयेत[6]. ॥ ३६ ॥

१ अशा प्रकारच्या. २ अनुभवास येतो. ३ अध्यासामुळें (अध्यासाचें लक्षण पुढील श्लोकांत आहे, पहा). ४ भासतो. ५ प्रगटलें असतां. ६ लय पावेल.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एका पदार्थाचा दुसऱ्या भलत्याच पदार्थावर भ्रांतीमुळें आरोप (नसतीच कल्पना) केला जाणें, ह्याला विद्वान् लोक 'अध्यास' असें ह्मणतात : उदाहरण :– दोरी किंवा चामड्याची वादी मूळची कांहीं सर्प नव्हे, पण त्या दोरीवर अथवा वादीवर सर्पाचा आरोप करणें ह्मणजे तिला सर्प मानणें ह्या गोष्टीला 'दोरीवर किंवा वादीवर सर्पाचा अध्यास केला' असें ह्मणतात. ह्याप्रमाणेंच ईश्वरावर जगाचा अध्यास केला आहे. ॥ ३७ ॥ सर्व विकल्पांचें कारण माया आत्म्याच्या ठिकाणीं वस्तुतः नाहीं; ज्ञान हेंच त्याचें स्वरूप होय; तो सर्वांचें कारण, दुःखरहित आनंदमय, सर्वविकारशून्य दिसणाऱ्या सकल पदार्थांहून वेगळा व व्यापक आहे. त्याच्या-

यदन्यदन्यत्र विभाव्यते भ्रमादध्यासमित्याहुरमुं विपश्चितः॥ असर्पभूते ऽहिविभावनं यथा रज्ज्वादिके तद्वदपीश्वरे जगत् ॥ ३७ ॥ विकल्पमायारहिते चिदात्मके ऽहंकार एषः प्रथमः प्रकल्पितः ॥

अथाध्यासलक्षणमाह यदन्यदिति यदन्यत्सर्पादिकमन्यत्ररज्ज्वादौ भ्रमात्भ्रमजनकाद्दोषाद्विभाव्यतेविज्ञायते अमुं विपश्चितोविद्वांसो ऽध्यासइत्याहुः यथाऽसर्पभूते रज्ज्वादौ अहिविभावनंसर्पारोपोरज्ज्वबुद्धिमूलकस्तद्वदीश्वरेऽपि जगद्देहादिसंसारात्मकंसर्वविभाव्यतेआत्मज्ञानाभावाद्यथार्थतयाज्ञायते ॥ ३७ ॥ आत्मनिजगद्भानेकीदृशोऽध्यासोनिमित्तंतदाह विकल्पेति

यत् अन्यत् [1]भ्रमात् अन्यत्र [2]विभाव्यते, [3]विपश्चितः [4]अमुं '[5]अध्यासं' इति [6]आहुः. यथा [7]असर्पभूते [8]रज्ज्वादिके [9]अहिविभावनं, तद्वत् ईश्वरे अपि जगत्. ॥ ३७ ॥ विकल्प[10]मायारहिते [11]चिदात्मके

---

१ भ्रांतीमुळें. २ कल्पिलें जातें. ३ विद्वान. ४ ह्याला. ५ अध्यास. ६ ह्मणतात. ७ वस्तुतः सर्प नव्हे, अशा. ८ दोरी, वादी इत्यादिकांवर. ९ सर्पाची कल्पना. १० कल्पनांचें कारण जी माया, तिनें रहित. ११ ज्ञानरूप.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वर प्रथम अहंकार कल्पिला गेला, हाच अध्यास होय. - अहंबुद्धि ('मी' असा अभिमान) उत्पन्न होणें हेंच संसाराचें मूळ कारण. - ॥ ३८ ॥ इच्छा–उदासीनत्व, प्रीति–द्वेष, सुख–दुःख ह्या जोड्या ज्यांचे नित्य गुणधर्म तीं - परमेश्वरावर अध्यास केलीं जाणारीं - संसारकारणें बुद्धीवर राहणारीं आहेत; कारण,

अध्यास एवात्मनि सर्वकारणे निरामये ब्रह्मणि केवले परे ॥ ३८ ॥ इच्छादिरागादिसुखादिधर्मिकाः सदा धियः संसृतिहेतवः परे ॥ यस्मात्प्रसुप्तौ तदभावतः परः सुखस्वरूपेण विभाव्यते हि नः ॥ ३९ ॥

सर्वविकल्पकारणमायारहितेवस्तुतस्तंत्सगरहिते चिदात्मकेचित्स्वरूपे सर्वकारणे निरामयेदुःखासंभिन्नानंदमये केवलेसर्वविकारशून्ये परेदृश्यविलक्षणे ब्रह्मणिव्यापके आत्मनि प्रथममहंकारः कल्पितः स एवाध्यासः अहंबुद्ध्यात्मकोऽध्यासएवसर्वसंसारकारणमितिभावः ॥ ३८ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ बुद्धिनिष्ठएवसंसारोनत्वात्मनिष्ठइत्यत्रान्वयव्यतिरेकौप्रमाणयति इच्छादीति परेसर्वसाक्षिणिआत्मनि संसृतिहेतवःभासमानसंसारकारणं सदाकालत्रये ऽपि इच्छादिरागादिसुखादिधर्मिकाःइच्छोपेक्षेरागद्वेषौसुखदुःखेइत्येवमादिद्वंद्वधर्मिकाः धियएव ।

सर्वकारणे निरामये[1] केवले परे[2] ब्रह्मणि[3] आत्मनि प्रथमः[4] प्रकल्पितः[5] एषः अहंकारः अध्यासः एव. ॥ ३८ ॥ परे[6] सदा संसृतिहेतवः[7] इच्छादिरागादिसुखादिधर्मिकाः[8] धियः[9] [एव]; यस्मात् नः[10], प्रसुप्तौ[11] तदभावतः[12] परः[13] सुखस्वरूपेण विभाव्यते[14] हि. ॥ ३९ ॥

१ दुःखरहित; आनंदमय. २ - दिसणाऱ्या सृष्टीहून–वेगळा. ३ व्यापक. ४ आरंभींचा. ५ कल्पिलेला. ६ सर्वांना प्रत्यक्ष पाहणाऱ्या. ७ संसारांचीं कारणें. ८ इच्छा–औदासीन्य, प्रीति–द्वेष, सुख–दुःख हे धर्म ज्यांचे, असे (अशीं). ९ बुद्धीचे. १० आह्मांकडून. ११ झोंपेंत. १२ त्या कारणांच्या अभावामुळें. १३ आत्मा. १४ निश्चयानें जाणिला जातो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- बुद्धि आहे तोंपर्यंतच हीं असतात; बुद्धीची वृत्ति नसते तेव्हां हीं नसतात : पहा :- झोंपेमध्यें बुद्धीची वृत्ति नसते त्यावेळीं सुखदुःख, प्रीति द्वेष कोणतेही धर्म नसतात. - ते आत्म्याचे धर्म असते तर झोंपेंतही अनुभवाला आले असते; आत्मा तर त्यावेळीं असतोच, कारण, झोंप घेऊन उठल्यावर - 'मी सुखानें निजलों होतों' असें मनुष्य ह्मणतो; तेव्हां झोंपेच्या वेळीं सुखानुभव घेणारा आहे हें कबूल करणें भाग पडतें.॥३९॥

अनादि अविद्येपासून उत्पन्न झालेल्या बुद्धीमध्यें चैतन्यप्रकाशाचें प्रतिबिंब पडतें, त्या प्रतिबिंबाला 'जीव' असें ह्मणतात. आणि 'परमात्मा' बुद्धीचें चरित्र पाहत वेगळा (अलग) राहिला असतो; बुद्धीला

अनाद्यविद्योद्भवबुद्धिबिम्बितो जीवः प्रकाशोऽयमितीर्यते चितः ॥ आत्मा धियः साक्षितया पृथक् स्थितो बुद्ध्याऽपरिच्छिन्नपरः स एव हि ॥ ४० ॥

धीषुसतीषुसंसारइत्यन्वयमुक्त्वातद्व्यतिरेकमाह **यस्मात्कारणात्प्रसुप्तौ तदभावात्** धीवृत्त्यभावात् **पर** आत्मा **नोऽस्माभिः** तृतीयार्थे षष्ठी **सुखरूपेण**स्वस्वरूपमात्रेण **विभाव्यते**निश्चीयते नतुसंसारित्वेनेतिभावः सुप्तोत्थितस्यतुसुखमहमस्वाप्समितिप्रत्यभिज्ञानुभवात्तदात्मस्वरूपनिश्चयोऽस्तीतितात्पर्यम् ॥ ३९ ॥ पुनस्तत्त्वंपदार्थस्वरूपमाह **अनादीति** । **अनादिर्याऽविद्यातत उद्भवोयस्याबुद्धे**रंतःकरणस्य**तत्रबिंबितः**प्रतिबिंबितश्चि**तः प्रकाशः** स **जीव इतीर्यते आत्मा**परमात्मा **धियः साक्षितया**धीधर्मासंगेनैव **पृथक् स्थितः** अंतर्यामितयेत्यर्थः जीवोऽहंसुखीत्यादिप्रकारेणांतःकरणधर्माध्यासवान्परमात्मातुसाक्षितयासर्वत्रविद्यमानोऽपिनतथेति·

अनाद्यविद्योद्भवबुद्धि[1]बिम्बितः [2]चितः [यः] प्रकाशः, अयं 'जीवः' इति [3]ईर्यते. आत्मा धियः साक्षितया पृथक् स्थितः. बुद्ध्याऽपरि[4]च्छिन्नपरः सः [सः] एव हि. ॥ ४० ॥

---

१ जिचा आरंभ कधीं झाला तें कळत नाहीं, त्या अविद्येपासून जन्मलेल्या बुद्धींत ज्याची प्रतिच्छाया पडली, असा. २ ज्ञानाचा. ३ ह्मटला जातो. ४ बुद्धीनें न मोजलेला, मोठा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अध्यासाचें कारण.

त्याचा परिच्छेद करितां (मोजमाप काढितां) येत नाहीं, अर्थात तो व्यापक आहे. - हे 'जीव' आणि 'ईश्वर' महावाक्यांतील 'त्वम्' आणि 'तत्' पदांचे अर्थ होत. - ॥ ४० ॥ जसा लोखंडाचा गोळा अग्नींत घालून तापवून लाल केला ह्मणजे अग्नीचा गुण (दाहकता, भाजण्याची शक्ति हा) लोखंडावर

चिद्बिम्बसाक्षात्मधियां प्रसंगतस्त्वेकत्रवासादनलाक्तलोहवत् ॥ अन्योऽन्यम·
ध्यासवशात्प्रतीयते जडाजडत्वं च चिदात्मचेतसोः ॥ ४१ ॥

भावः अतएव बुद्ध्याऽपरिच्छिन्नपरः बुद्धिलक्षणपरिच्छेदरहितः अतएवपरः एवंचज्ञानेनप्रतिबिंबाधारविलयेप्रतिबिंबस्यविलयात्स जीवःसएवपरमात्मैव हिप्रसिद्धं सइत्यस्यचावृत्तिर्बोध्या ॥ ४० ॥ अथबुद्ध्यात्मनोःपरस्पराध्यासवशात्परस्परधर्मभानमितिदार्ढ्यायपुनराह चिद्बिंबेति । चिदात्मचेतसोरन्योन्याध्यासवशात्परस्परतादात्म्यारोपाज्जडाजडत्वं प्रतीयते चेतसोवृत्तीनांज्ञानत्वं जीवात्मनोजडत्वंप्रतीयते अतएवज्ञानाश्रयआत्मेतिचित एवतार्किकव्यवहारः जीवात्मनिजडात्माकथ्यतेबुधैरितिस्मार्तव्यवहारश्च । अत्रहेतुःचिदित्यादि चिद्बिंबंयस्यस चिदाभासःअक्षैःसहितः-साक्षःसेंद्रियःसचासावात्मामनःधीरंतःकरणंतेषां प्रकृष्टसंगादतिसन्निकर्षादध्यासइत्यर्थः । अत्रदृष्टांत अनलाक्तलोहवत् अग्नितप्तलोहपिंडवत् अग्निधर्मोदाहकत्वंलोहधर्मश्च वर्तुलत्वाद्यनलेभासते तत्वहेतुरेकत्र वासात् परस्पराविभागेनवृत्तेरित्यर्थः तद्वदेतयोरपिपरस्परधर्माध्यासइत्यर्थः ॥ ४१ ॥ ॥ ॥ ॥

एकत्र[1]वासात् अन[2]लाक्तलोहवत् चिद्बि[3]म्बसाक्षात्मधियां [4]प्रसङ्गतः चि[5]दात्मचेतसोः अन्योन्यं अद्ध्यासवशात् [6]जडाजडत्वं [7]प्रतीयते. ॥ ४१ ॥

---

१ एके ठिकाणीं राहणें असल्यामुळें. २ अग्नीनें व्यापलेल्या (तापविलेल्या) लोखंडाप्रमाणें. ३ चैतन्याचें प्रतिबिंब, इंद्रियांसहित मन व अंतःकरण ह्यांच्या. ४ निकट संबंधामुळें. ५ चैतन्यप्रतिबिंब आणि अंतःकरण ह्यांच्यावर. ६ जडपणा आणि चेतनपणा. ७ अनुभवास येतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दिसून येतो व लोखंडाचा गुण (काळेपणा हा) अग्नीवर भासतो (‘ लोखंड कढत झालें आहे ’, ‘ अग्नीचा लाल गोळा ’ असें लोक ह्मणतात), ह्याचें कारण लोखंड आणि अग्नि ह्या दोघांचें एके ठिकाणीं राहणें होय, त्याचप्रमाणें चैतन्याचें प्रतिबिंब (जीव), इंद्रियांसहित मन व अंतःकरण ह्यांच्या निकट संबंधामुळें, चिदात्मा आणि मन ह्यांचा परस्परांवर अध्यास (मागें श्लो. ३७ पहा) घडून, आत्म्याचा धर्म चेतनपणा हा मनावर व मनाचा धर्म जडपणा हा आत्म्यावर दिसून येतो. ॥ ४१ ॥ - ह्मणून पुरुषानें - वेदवचनांकडून व गुरूपासून महावाक्याचा अर्थ ऐकावा, - नंतर त्याचें सतत चिंतन करून - ज्ञानाचा अनुभव मिळवावा, आणि आपला आत्मा सर्व उपाधींनीं रहित असून हृदयांत राहतो असा साक्षात्कार झाला असतां सर्व जड देहेंद्रियादि उपकरणांविषयीं उदासीन होऊन राहावें. ॥ ४२ ॥

गुरोः सकाशादपि वेदवाक्यतः संजातविद्यानुभवो निरीक्ष्य तम् ॥ स्वात्मान-
मात्मस्थमुपाधिवर्जितं त्यजेदशेषं जडमात्मगोचरम् ॥ ४२ ॥

उक्तमेवार्थदार्ढ्यायपुनराह **गुरोरिति वेदवाक्यत**इत्यनेनश्रवणं **गुरोःसकाशादपि** ततश्चानेनमननमुक्तं ताभ्यां**संजातोविद्याया** ज्ञानरूपस्यात्मनोऽ**नुभवो**यस्यसः अनेनकृतनिदिध्यासनइत्यर्थः **तं**चिदानंदस्वरूपं **स्वात्मानमुपाधिवर्जितं**रहितोपाधिधर्म**मात्म**

वेदवाक्यतः, गुरोः सकाशात्[1] अपि संजातविद्यानुभवः[2] तं उपाधिवर्जितं[3] स्वात्मानं आत्मस्थं[4] निरीक्ष्य[5], अशेषं आत्मगोचरं[6] जडं त्यजेत्. ॥ ४२ ॥

१ पासून. २ उत्पन्न झाला ज्ञानरूप आत्म्याचा अनुभव ज्याला, असा. ३ उपाधिरहित. ४ अंतरीं राहणाऱ्या. ५ पाहून (जाणून). ६ आत्म्यावर कळणारें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

· जाणावयाचें स्वरूप तें हें :—'मी स्वप्रकाश आहें; मला जन्म नाहीं; मला जोडीदार कोणी नाहीं; मी नित्य प्रकाशमान, अत्यंत निर्मल (ज्याला माया भुरळ घालूं किंवा चाळवूं शकत नाहीं असा), शुद्ध ज्ञानानें भरलेला, कर्तृत्वादि अभिमान न धरणारा, व्यापक व आनंदरूप आहें; मला रूपांतर नाहीं; ॥ ४३ ॥ मी नित्य मुक्त आहें; माझी शक्ति कल्पनेच्या पलिकडे आहे; इंद्रियांना न होणारें ज्ञान हें माझें रूप

प्रकाशरूपो ऽहमजो ऽहमद्वयो ऽसकृद्विभातो ऽहमतीव निर्मलः ॥
विशुद्धविज्ञानघनो निरामयः संपूर्ण आनन्दमयो ऽहमक्रियः ॥ ४३ ॥
सदैव मुक्तो ऽहमचिन्त्यशक्तिमानतीन्द्रियज्ञानमविक्रियात्मकः ॥

स्थंहृत्स्थं निरीक्ष्यअपरोक्षीकृत्याशेषं जडंदृश्यं त्यजेत् तत्रोदासीनोभवेदितिभावः ॥ ४२ ॥ ज्ञेयंनिरुपाधिकंस्वरूपंश्लोकद्वयेनाह प्रकाशेति अहं प्रकाशरूपः स्वप्रकाशःपरप्रकाशहीनः नपरप्रकाशरूपोयथाघटादिः अजो जन्मादिहीनः अद्वयः सजातीयद्वितीयरहित असकृद्विभातः सकृदपिपरेणभासकांतरेणप्रकाशितःसकृद्विभातःनसकृद्विभातोऽसकृद्विभातः नतत्रसूर्योभातिनचंद्रतारकमितिश्रुतेः नतद्भा-सयतेसूर्यइतिस्मृतेश्च अतीवनिर्मलः मायाकृतावरणविक्षेपरहितः विशुद्धविज्ञानघनः विशुद्धचिदेकरसः निरामयः कर्तृत्वाभि-मानरहितः संपूर्णः देशकालपरिच्छेदहीनः आनंदमयः आनंदरूपः स्वार्थेमयट् अक्रियः परिणामहीनः ॥ ४३ ॥ सदैवेति अहं सदैव कालत्रयेऽपि मुक्तः सर्वधर्मरहितः अचिंत्यशक्तिमान् यःपरमात्मा अतींद्रियज्ञानं इंद्रियातिरिक्तज्ञानरूपः यतोवाचोनिवर्तंते-

' अहं प्रकाशरूपः, अहं अजः, अहं अद्वयः, असकृद्विभातः [च]. अहं अतीवनिर्मलः. अहं विशुद्धविज्ञानघनः, निरामयः, सम्पूर्णः, आनन्दमयः, अक्रियः [च]. ॥ ४३ ॥ अहं सदा एव मुक्तः.

१ वारंवार अनुभवलेला. २ अत्यंत शुद्ध. ३ शुद्ध ज्ञानानें पूर्ण. ४ दुःखरहित (अभिमानशून्य). ५ रूपांतर होत नाहीं ज्याचें, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होय; माझा परिणाम (रूपांतर) होत नाहीं; मला अंत व पार नाहींत (मी सर्व काळीं, सगळ्या ठिकाणीं असतों); वेदवेत्ते विद्वान् अहोरात्र हृदयांत ज्याचें चिंतन करितात तो मीच; ' -- ॥ ४४ ॥ लक्ष्मणा ! पुरुष आपल्या मनाला विषयांकडे जाऊं न देतां असें सतत ध्यान करील तर त्याची अंतःकरण-

अनन्तपारो ऽहमहर्निशं बुधैर्विभावितो ऽहं हृदि वेदवादिभिः ॥ ४४ ॥
एवं सदात्मानमखण्डितात्मना विचारमाणस्य विशुद्धभावना ॥
हन्यादविद्यामचिरेण कारकै रसायनं यद्वदुपासितं रुजः ॥ ४५ ॥

अप्राप्यमनसासहइतिश्रुतेः । **अविक्रियात्मको**ऽपरिणामी **अनंतपारः**—अंतःकालतः**पारः**परंतीरंतावविद्यमानौयस्य तेनदेश-कालपरिच्छेदहीनः । ईदृशोयःपरमात्मा**बुधैर्हृदि अहर्निशं विभावितः**सोऽहमित्यर्थः ॥ ४४ ॥ एवंभावनायाःफलमाह **एव-मिति** उक्तरीत्या**सदा आत्मानं अखंडितात्मना**विषयानाकृष्टचित्तेन **विचारमाणस्य**ध्यायतः—धातूनामनेकार्थत्वात्चरमाणएव चारमाणःस्वार्थेऽण् **विशुद्धभावना**ब्रह्माकारांतःकरणवृत्तिरुदेतीतिशेषः साचोदिता**कारकै**र्देहांतरप्रापककर्मभिःसहा**विद्यामचिरेण**

अहं अचिन्त्यशक्तिमान[1], अतीन्द्रियज्ञानं[2], अविक्रियात्मकः[3] [च]. अहं अनन्तपारः[4] अहं वेदवादि[5]-भिः बुधैः हृदि[6] अहर्निशं[7] विभावितः[8]. ' ॥ ४४ ॥ एवं सदा अखण्डात्मना[9] आत्मानं विचारमाणस्य[10] विशुद्धभावना[11] [उदेति[12]. सा], यद्वत् उपासितं[13] रसायनं[14] रुजः[15], [तथा] अविद्यां अचिरेण[16] हन्यात्[17]. ॥ ४५ ॥

१ ज्याची शक्ति कल्पनेच्या पलिकडे आहे, असा. २ इंद्रियांना न कळणारें रूप ज्याचें, असा. ३ रूपांतररहित. ४ ज्याला कालमर्यादा व लांबीरुंदी नाहींत असा. ५ वेदपठन करणारांनीं. ६ अंतरीं. ७ दिवसरात्र. ८ चिंतिलेला. ९ पूर्ण रूपानें. १० विचार करणाराला ११ परम शुद्ध विचार (ज्ञान). १२ उत्पन्न होत्ये. १३ सेवन केलेलें. १४ औषध. १५ रोगाला. १६ विलंब न लावतां. १७ नाश करील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वृत्ति ब्रह्माकार बनून जाईल. ही शुद्ध भावना उत्पन्न झाली कीं, तत्क्षणीं अविद्येचा व तिच्या बरोबर पुनर्जन्माला कारणें ह्मणून जीं कर्में असतील त्यांचाही नाश करिते. तीव्र रसायन सेवन केलें असतां जसा रोगाचा नाश तत्काल होतो, तसाच ही वृत्ति उद्भवली असतां अज्ञानाचा लय होतो. ॥ ४९ ॥
- ध्यान कोणत्या रीतीनें करावें, तेंही सांगतों :— पुरुषानें जेथें कोणाचाही उपसर्ग नसेल अशा - एकांतस्थलीं - योगशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें पद्म किंवा दुसरेंही कोणतें आसन घालून - बसावें, इंद्रियें विषयांव-

विविक्त आसीन उपारतेन्द्रियो विनिर्जितात्मा विमलान्तराशयः ॥ विभावयेदेकमनन्यसाधनो विज्ञानदृक्केवल आत्मसंस्थितः ॥ ४६ ॥

शीघ्रमेव **हन्यात्** **यथोपासितं**सेवितं **रसायनं रुजो हन्यात्तद्वत्** ॥ ४५ ॥ तत्रध्यानेइतिकर्तव्यतामाह **विविक्तइति** निर्जनइत्यर्थः **आसीनो**यथोचितपद्मासनाद्युपविष्टः **उपारतेंद्रियः** तेनशमदमादिसंपन्नः **विनिर्जितात्मा**प्राणायामादिभिर्जितांतःकरणः अतएव**विमलांतराशयो**विशुद्धचित्तः **विज्ञानदृक्**विज्ञानेएवदृक्भावनंयस्यसःद्रष्टृदृश्यभानरहितः अनेननिर्विकल्पकसमाधिरुक्तः **अनन्यसाधनः** तत्त्वज्ञानातिरिक्तमुक्तिसाधनास्तित्वभ्रमरहितः **केवलोऽ**संगः **आत्मसंस्थितः**—आत्मन्येवसंस्थासमाप्तिः **संजातायस्यसः** तेननकदापिविषयांतरसंचारवच्चित्तः **विभावयेत्**ध्यायेत् ॥ ४६ ॥ ॥ ॥ ॥ ॥

विविक्तें[1] आसीनः[2] उपारतेन्द्रियः[3] विनिर्जितात्मा[4] विमलान्तराशयः[5] विज्ञानदृक्[6] अनन्यसाधनः[7] केवलः[8] आत्मसंस्थितः एकं विभावयेत्[9]. ॥ ४६ ॥

---

१ एकांतीं. २ बसणारा. ३ विषयांवरून आटोपून घेतलीं इंद्रियें ज्यानें, असा. ४ पूर्ण जिंकिलें मन ज्यानें असा. ५ अत्यंत शुद्ध अंतःकरण ज्याचें, असा. ६ आत्मज्ञान हें दृष्टि ज्याची, असा. ७ नाहीं दुसरें (ज्ञानावांचून) साधन ज्याजवळ असा. ८ आत्मस्वरूपीं लीन. ९ विचार करो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रून सोडवावीं, प्राणायामादिकांच्या योगें मन जिंकून चित्त शुद्ध करावें, तत्त्वज्ञानावांचून दुसरें मोक्षप्राप्तीचें एखादें तरी साधन असेल हा भ्रम अगदीं सोडावा, कोणत्याही विषयावर आसक्ति ठेवूं नये, केवळ आत्मज्ञानाकडेच लक्ष्य लावावें (पाहणारा वेगळा आणि पाहण्याचा विषय वेगळा हें देखील भान सुटलें पाहिजे), व आत्मरूपींच मिळून जाऊन त्याचेंच एक ध्यान चालवावें. ॥ ४६ ॥ जगाला प्रकाशित (उघड) करणारा परमात्मा होय. - माया त्याच्या जवळ असल्यामुळें तोच - सर्व जगाचें उपादान कारण आहे, - असें लोक मानितात. - पुरुषानें ह्या सर्व जगाचा आत्मरूपीं लय करावा (परमात्म्याच्या अस्तित्वाहून वेगळी जगाची सत्ता नाहीं असें समजावें). - इतक्या योग्यतेला चढलेल्या पुरुषाचें लक्षणच हें कीं - तो पूर्ण ज्ञानानंदमय होऊन राहतो, त्याला आंतर किंवा बाह्य विषयांचें ज्ञान अगदीं नसतें. ॥ ४७ ॥

विश्वं यदेतत्परमात्मदर्शनं विलापयेदात्मनि सर्वकारणे ॥ पूर्णश्चिदानन्दमयो ऽवतिष्ठते न वेद बाह्यं न च किंचिदान्तरम् ॥ ४७ ॥

किंच **यदेतत्** भूतंभविष्यद्वर्तमानं **विश्वं परमात्मादर्शनं**भासकोयस्यतत् तस्यभासासर्वमिदंविभातीतिश्रुतेः । **तत्सर्वकारणे** मायासन्निधानात्सर्वोपादानत्वेनाभिमते **आत्मनि विलापयेत्** उपादानसत्ताव्यतिरेकेणकार्यसत्तांनपश्येत् । तादृशस्यलक्षणमाह **पूर्णः**अवाप्तसमस्तकामः तस्यकाम्याभावात्। **चिदानंदमयः**तद्रूपो **अवतिष्ठते बाह्यमान्तरं च** दृश्यं **न जानाति** सर्वत्रब्रह्मदर्शित्वात्।

यत् एतत् परमात्मदर्शनं[1] विश्वं, [तत्] सर्वकारणे[4] आत्मनि विलापयेत्[2]. [सः] पूर्णः चिदानन्दमयः अवतिष्ठते[3], बाह्यं न वेद. किंचित् आन्तरं च न [वेद]. ॥ ४७ ॥

---

१ परमात्मा दर्शन देतो ज्याचें, असें. २ लीन करावें. ३ राहतो. ४ कार्याबरोबर असणारें (मुख्य) कारण. उदाहरण घटाचें ‘ उपादान ’ कारण मृत्तिका. कुंभाराचें चाक, चाक फिरवावयाची काठी हीं देखील घटाचीं कारणेंच, पण तीं घटाबरोबर राहणारीं नव्हत म्हणून त्यांना ‘ निमित्त कारणें ’. म्हणतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सगळ्या विषयांचे व्यासंग सुटून ब्रह्माकार वृत्ति बनणें, ह्याला 'समाधि' असें ह्मणतात. समाधि सिद्ध होण्यापूर्वी - पुरुषाचें कर्तव्य हें आहे कीं, - त्यानें 'सर्व स्थावर जंगम वस्तूंसह जग' इतका अर्थ 'ओम्' ह्या शब्दांत सामावलेला आहे, असें चिंतन करावें. जग हें प्रणवाचें (ॐकाराचें) वाच्य (त्यांतून निघणारा अर्थ) आणि प्रणव हा जगाचा वाचक शब्द (नांव), ही कल्पना शास्त्रांत प्रसिद्ध आहे. ही वृत्ति तरी अज्ञान आहे तोंपर्यंत राहावयाची, ज्ञान झालें कीं मग नाहीं; - कारण, ज्ञान हें सर्व वृत्तींचा नाश करणारें आहे. - ॥ ४८ ॥ - 'ओम्' ह्या शब्दाचा अर्थ 'सगळें जग' असा कसा होतो, तें ऐकः-

पूर्वं समाधेरखिलं विचिन्तयेदोन्कारमात्रं सचराचरं जगत् ॥ तदेव वाच्यं प्रणवो हि वाचको विभाव्यते ऽज्ञानवशान्न बोधतः ॥ ४८ ॥ अकारसंज्ञः पुरुषो हि विश्वको ह्युकारकस्तैजस ईर्यते क्रमात् ॥

नादितिभावः ॥ ४७ ॥ समाधिसिद्धेः पूर्वं यत्कर्तव्यंतदाह **पूर्वमिति समाधेः** सकलविषयव्यासंगनिवृत्तिपूर्वकंब्रह्माकारवृत्तिःसमाधिस्ततः **पूर्वं अखिलं सचराचरं जगत् ओंकारमात्रं विचिंतयेत्**—**ओंकारो**मीयतेनयेति**मात्रा**प्रमाणंबोधकत्वेनपरिच्छेदको**यस्यतथा**जानीयात् । तदेवविवृणोति **तदेवेति** जगदेवेत्यर्थः **प्रणवो वाचको विभाव्यते** एतत् हिप्रसिद्ध इत्यर्थः । इयंभावन **अज्ञानवशादेव न बोधतः बोधो**निर्विशेषब्रह्मसाक्षात्कारस्तदुत्तरंनेत्यर्थः तस्यसर्ववृत्त्युपमर्दकत्वात् ॥ ४८ ॥ ॥ उक्तमर्थंविवृणोति **अकारेतिं अकारसंज्ञ**स्तद्वाच्यः **पुरुषो हि विश्वको** विश्वएवविश्वकःविश्वशब्देनपरिभाषितः अयंजाग्रत्सा-

समाधेः पूर्वं अखिलं सचराचरं जगत् ॐकारमात्रं विचिन्तयेत्. तत् एव वाच्यं[1], प्रणवः वाचकः[2]. अज्ञानवशात्[3] विभाव्यते[4] हि, बोधतः न. ॥४८॥ अखिलैः[5] अकारसंज्ञः पुरुषः हि विश्वकः[6], उकारः

१ सांगण्याचा विषय. २ सांगणारा. ३ अज्ञानामुळें. ४ कल्पिलें जातें. ५ सर्वांनीं. ६ जाग्रदवस्थेचा साक्षी विराट्.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

‘ अ + उ + म् ’ अशा तीन अक्षरांचा संधि होऊन ‘ ओम् ’ हा शब्द सिद्ध झाला आहे - शरीरांतील जाग्रदवस्थेचा साक्षी (जागेपणचे व्यवहार पाहणारा) जो पुरुष—वेदांतशास्त्रांत ज्याला ‘ विश्व ’ असें ह्मणतात—त्याचीच ‘ अ ’ ही संज्ञा आहे. अनुक्रमानें दुसरा वर्ण ‘ उ ’ हें नांव स्वप्नवृत्तीचा साक्षी व ज्याला वेदांतशास्त्रांत ‘ तैजस ’ अशी संज्ञा आहे, त्या हिरण्यगर्भाचें होय, असें ह्मटलें आहे. तसेंच सगळे लोक सुषुप्तीच्या साक्षी पुरुषाला—वेदांत शास्त्रांतील ‘ प्राज्ञा’ला—‘ म् ’ असें ह्मणतात. हा सगळा प्रकार समाधीच्या पूर्वींचा आहे. तत्त्वज्ञान झाल्यावर पुढें हा विचारच नाहीं. ॥ ४९ ॥ - ‘ जगाचा आत्मरूपीं लय करावा ’ असें ४७ श्लोकांत सांगितलें, आतां तो लय करण्याचा प्रकार सांगतों: - विस्तीर्ण स्थूल देहाचा अभिमान धरून राहणारा ‘ विश्व ’ संज्ञक पुरुष व त्याचा वाचक ‘ अ ’ हा वर्ण असे दोन्ही

प्राज्ञो मकारः परिपठ्यतेऽखिलैः समाधिपूर्वं न तु तत्त्वतो भवेत् ॥ ४९ ॥
विश्वं त्वकारं पुरुषं विलापयेदुकारमध्ये बहुधा व्यवस्थितम् ॥

क्षीविराट् । ततःस्वप्नसाक्षी**तैजसः**तेनपदेनपरिभाषितःलिंगदेहाभिमानीहिरण्यगर्भ **उकारकः**उकारप्रतिपाद्य **ईर्यते** ततः सुषुप्तिसाक्षी-**प्राज्ञपदवाच्यो**मायोपाधिको**मकार**स्तद्वाच्यः **पठ्यते ऽखिलै**र्वेदैः इयंभावना**समाधिपूर्वं**समाधेःपूर्वमेव **न तत्त्वतः** तत्त्वसाक्षात्कारेसतिनभवेत् सर्वस्यब्रह्मणिप्रविलयात् ॥ ४९ ॥ अथविलापनप्रकारमाहद्वाभ्याम् **विश्वं**त्विति **उकारमध्ये बहुधा व्यवस्थितं**स्थूलदेहनिबंधनंस्थूलदेहाभिमानेनास्थितं **विश्वं पुरुषं** तद्वाचकमकारं **च विलापयेत्** तुश्चार्थे विलीनंभावयेत् । ततहि तैजसः क्रमात[1] ईर्यते, मकारः प्राज्ञः[3] परिपठ्यते.[4] [इयं भावना] समाधेः पूर्वं. तत्त्वतः तु न भवेत्. ॥ ४९ ॥ बहुधा व्यवस्थितं[5] विश्वं पुरुषं, अकारं तु[6] उकारमध्ये विलापयेत्. ॥

१ स्वप्नावस्थेचा साक्षी; लिंगशरीराचा अभिमानी. २ म्हटला जातो. ३ सुषुप्तीचा साक्षी. ४ ह्मटला जातो. ५ राहिलेल्या. ६ आणि.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'उ'कारामध्यें मिळून गेले आहेत अशी भावना करावी; नंतर स्वप्नाचा अभिमानी 'तैजस' पुरुष आणि त्याची संज्ञा ओंकारांतील दुसरा वर्ण 'उकार' हे प्रणवाच्या शेवटल्या अक्षरांत म्हणजे 'म'कारांत लीन झाले अशी कल्पना करावी; ॥ ९० ॥ पुढें 'म'कार आणि त्याचा वाच्य जो स्वतांला कारणत्व मानणारा पुरुष 'प्राज्ञ' त्याला ह्या चैतन्यमय परमात्म्याच्या ठिकाणीं मिळवावें, आणि शेवटीं, - 'सर्व जग ज्यांत लय पावलें - तें नित्यमुक्त पर ब्रह्म मी आहें' अशी भावना करावी. अशी भावना होण्याला साधन तत्त्वज्ञान होय. इतक्या योग्यतेस पोंचलेला पुरुष उपाधींतून सुटलेला अर्थात रागद्वेषादिमळरहित असतो

ततो मकारे प्रविलाप्य तैजसं द्वितीयवर्णं प्रणवस्य चान्तिमे ॥ ५० ॥
मकारमप्यात्मनि चिद्धने परे विलापयेत्प्राज्ञमपीह कारणम् ॥ सो ऽहं
परं ब्रह्म सदा विमुक्तिमद्विज्ञानदृङ् मुक्त उपाधितो ऽमलः ॥ ५१ ॥

स्तैजसंलिंगदेहाभिमानिनंपुरुषं तद्वाचकंप्रणवद्वितीयवर्णमुकारंविलीनविश्वकं मकारे विलाप्यविलीनंभावयित्वा ॥ ५० ॥ ततस्तादृशंमकारं तद्वाच्यंप्राज्ञं च कारणंकारणत्वाभिमानिनंपुरुषं इहात्मनि चिद्धने परे विलापयेत्तथाभावयेत् ततः सोऽहं सर्वविलापाधिष्ठानंपरं ब्रह्म विभावयेत् । तद्विशिनष्टि सदाविमुक्तिमत्नित्यमुक्तम् नन्वहंपदार्थस्यरागद्वेषादिमलिनस्यकथंब्रह्मत्वभावनेत्याशंक्याहंपदार्थविशिनष्टि उपाधितो मुक्तः अतएवामलः । तथाभावनेसाधनम् विज्ञानदृक्—विज्ञानंनिदिध्यासनं

ततः अन्तिमे[1] मकारे तैजसं, प्रणवस्य द्वितीयवर्णं च प्रविलाप्य,[2] ॥ ९० ॥ मकारं अपि, कारणं प्राज्ञं अपि [च] इह चिद्धने[3] परे आत्मनि विलापयेत्. [ततः] विज्ञानदृक्[4] उपाधितः मुक्तः अमलः सः अहं सदा विमुक्तिमत्[5] परं ब्रह्म [इति भावयेत]. ॥ ९१ ॥

---

१ शेवटल्या. २ लीन करून. ३ ज्ञानपूर्ण. ४ तत्वज्ञान ही दृष्टि ज्याची, असा. ५ नित्यमुक्त.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- ह्मणून त्याची ब्रह्मरूपीं ऐक्यभावना होण्यास कांहीं अडचण नसते. - ॥ ५१ ॥ अशा प्रकारें नित्य ज्याची परमात्मरूपीं एक भावना जमून गेली, तो पुरुष पुत्रदेहादि सर्वांना विसरून जातो (पुत्र देह इत्यादि विषयांपासून होणारे आनंद परिणामीं दुःखरूप आहेत ह्मणून त्यांपासून विरक्त होतो), व स्वस्वरूपानंदानेंच संतुष्ट असतो; साक्षात् नित्य (ज्याला उपाधींमुळें उत्पन्न होणारीं नांवें व रूपें नाहींत असा) आत्मा, तन्मय सुख व प्रकाश हें त्याचें रूप होय; तो जीवन्मुक्त पुरुष निश्चल उदकानें भरलेल्या समुद्रासारखा शांत असतो. ॥ ५२ ॥

एवं सदा जातपरात्मभावनः स्वानन्दतुष्टः परिविस्मृताखिलः ॥ आस्ते स नित्यात्मसुखप्रकाशकः साक्षाद्विमुक्तो ऽचलवारिसिन्धुवत् ॥ ५२ ॥

ब्रह्ममात्रप्रत्ययाविच्छेदरूपाद्दृक्तत्साक्षात्कारेसाधनंयस्यसः ॥ ५१ ॥ एवंभावनात्रतोलक्षणमाह **एवमिति** । उक्तप्रकारेण **सदा-जातापरमात्मन्येकभावनायस्यसः परिविस्मृतमखिलं**पुत्रदेहादियेनसः अतएव **स्वस्वरूपानंदेनैवतुष्टः** नतुविषयानंदेन तस्यपरिणामेदुःखरूपत्वात्ततोविरक्तइत्यर्थः । **साक्षान्नित्यात्मनिसुखप्रकाशकः**—साक्षादौपाधिकनामरूपभेदराहित्येननित्यमखंडितमात्मस्वरूपंयत्सुखंप्रकाशश्चतद्रूपः एवंरूपो**विमुक्तो**जीवन्मुक्तः **अचलं**निश्चलं**वारियस्यतादृशसिंधुवदास्ते**विषयसंबंध-

एवं सदा [1]जातपरात्मभावनः परि[2]विस्मृताखिलः स्वा[3]नन्दतुष्टः साक्षात् नित्यात्म[4]सुखप्रकाशकः सः विमुक्तः अचल[5]वारिसिन्धुवत् [6]आस्ते. ॥ ५२ ॥

१ झाली परमात्मरूपीं ऐक्यस्थिति ज्याची, असा. २ सर्वथा विस्मरण झालें सर्वांचें (पुत्रदेहादिकांचें) ज्याला, असा. ३ स्वानंदमात्रें संतोष पावलेला. ४ नित्य आत्मसुखाचा प्रकाश हेंच रूप ज्याचें, असा. ५ स्थिर उदक ज्याचें, अशा समुद्रासारखा. ६ असतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशा रीतीनें जो पुरुष नित्य समाधियोगाचा अभ्यास करितो, सगळे इंद्रियांचे विषय सोडून देतो, कामक्रोधादि सर्व शत्रु जिंकितो व षड्गुणसंपन्न (*) आत्म्याला वश करून घेतो, त्याला माझें नित्य दर्शन मिळतें. ॥ ५३ ॥ मुनीनें अशा रीतीनें समस्त बंधनें सोडून नित्य अहोरात्र आत्मचिंतन करीत राहावें, प्रारब्ध कर्म-

एवं सदाऽभ्यस्तसमाधियोगिनो निवृत्तसर्वेन्द्रियगोचरस्य हि ॥ विनिर्जिताशेषरिपोरहं सदा दृश्यो भवेयं जितषड्गुणात्मनः ॥ ५३ ॥ ध्यात्वैवमात्मानमहर्निशं मुनिस्तिष्ठेत्सदा मुक्तसमस्तबन्धनः ॥

रूपलहरीरहितआस्तइत्यर्थः ॥५२॥ ईदृशस्य मत्प्राप्तिर्भवत्येवेत्याह **एवमिति** उक्तप्रकारेण **सदाभ्यस्तसमाधेर्योगिनः निवृत्ताः सर्वेषामिंद्रियाणांगोचरा**विषयाःशब्दादयोयस्य **विनिर्जिताअशेषारिपवः**कामादयोयेनतस्य तज्जयेनविषयेष्वंतःकरणाप्रवृत्तिः सूचिता अतएवसर्वज्ञत्वनित्यत्वनित्यतृप्तत्वबोधरूपत्वस्वतंत्रत्वनित्यमलुप्तत्वानंतरूपाःषड्गुणायस्यतादृशआत्माजितोवशीकृतोयेन **तस्य सदा दृश्यो भवेयम्** एतेनमद्भक्तस्ययोगिनो ऽहंदृश्योनतुभक्तिविमुखस्येतिसूचितम् ॥ ५३ ॥ एवंविधोजीवन्मुक्तःप्रारब्धत्र-

एवं सदा अभ्यस्त[1]समाधियोगिनः निवृत्तसर्वेन्द्रियगोचरस्य[2] विनिर्जिताशेषरिपोः[3] जितषड्गुणात्मनः[4], अहं सदा दृश्यः[5] भवेयं[6]. ॥ ५३ ॥ एवं मुनिः आत्मानं अहर्निशं ध्यात्वा, सदा मुक्तसमस्तबंधनः तिष्ठेत्[7]. ॥ ततः अभिमानवर्जितः प्रारब्धं[8]

१ अभ्यास केला समाधीचा ज्यानें, अशा योग्याला. २ निवृत्त झाले सर्व इंद्रियांचे विषय ज्याचे, अशा. ३ पूर्णपणें जिंकिले सगळे शत्रु ज्यानें, अशा. ४ स्वाधीन करून घेतला षड्गुणसंपन्न आत्मा ज्यानें अशा :(*) सहा गुण सर्वज्ञत्व, नित्यत्व, नित्यतृप्तत्व, ज्ञानरूपत्व, स्वतंत्रत्व आणि नित्यस्फूर्ति हे होत. ५ दिसणारा. ६ होईन. ७ राहील. ८ प्रारब्धकर्मामुळें प्राप्त झालेलें. कर्में तीन प्रकारांचीं आहेत :- (१) संचित, (२) क्रियमाण, आणि (३) प्रारब्ध. संचित म्हणजे सांचवून राशी करून बाजूला ठेव-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वशात् प्राप्त होतील ते भोग भोगावे पण अभिमान मात्र ठेवूं नये; ह्मणजे अंतीं त्याला प्रत्यक्ष माझ्या स्वरूपीं गति मिळेल. ॥ ५४ ॥ संसार हा प्रारंभीं, मध्यें, तसाच अंतींही भय आणि शोक प्राप्त करून देणारा आहे, असें जाणून मुमुक्षु पुरुषानें वेदांतील 'यजेत (यज्ञ करावा)' इत्यादि विधिवचनांनीं करावयास सांगितलेलीं सर्व कर्में सोडून द्यावीं, आणि सर्व प्राण्यांचा आत्मा जो परमेश्वर (मी), त्याची (माझी) भक्ति करावी :- हाच

प्रारब्धमश्नन्नभिमानवर्जितो मय्येव साक्षात्प्रविलीयते ततः ॥ ५४ ॥ आदौ च मध्ये च तथैव चान्ततो भवं विदित्वा भयशोककारणम् ॥ हित्वा समस्तं विधिवादचोदितं भजेत्स्वमात्मानमथाखिलात्मनाम् ॥ ५५ ॥

शेनअनभिमानः भोगानश्नंस्तिष्ठेत् ततोमय्येवविलीयतेमद्रूपोभवतीत्याह ध्यात्वैवमिति ॥५४॥ सर्वधर्मापेक्षयायमेवधर्मोज्यायानित्याह आदौचेति भवंसंसारं आदिमध्यावसानेषुसर्वथा भयशोकयोःकारणं विदित्वा तत्कारणीभूतंविधिवादैर्यजेतेत्यादि ी-

[1]अश्नन् साक्षात् मयि एव [2]प्रविलीयते. ॥ ५४ ॥ [3]भवं, आदौ मध्ये, तथा एव अन्ततः [4]च [5]भयशोककारणं [5]विदित्वा, [6]विधिवादचोदितं समस्तं [7]हित्वा च अथ अखिलात्मनां स्वं आत्मानं [8]भजेत्. ॥ ५५ ॥

लेलें; क्रियमाण ह्मणजे सध्यां आपण जें करीत असतों तें; व प्रारब्ध ह्मणजे ज्याचें फळ आपण सांप्रत भोगीत आहों तें. तीन कर्मांचीं क्रमानें एकत्र गुंफलेलीं तीन उदाहरणें :- एखाद्या श्रीमंत जमीनदारानें आपल्या घरांत (१) धान्याचीं पुष्कळ पोतीं भरून तोंडें बंद करून पुढल्या तुरतुदीसाठीं ठेविलीं आहेत; (२) शेतांत धान्य पेरून त्याची निगा चालविली आहे; व (३) एक पोतें फोडून त्यांतील धान्य खाण्याचा क्रम ठेविला आहे. १ भोगणारा. २ मिळून जातो. ३ संसाराला. ४ भीतीचें व शोकाचें कारण. ५ जाणून. ६ विधिवाक्यांनीं करावयास सांगितलेल्या. ७ सोडून. ८ सेवन करो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'तो मजशीं ऐक्य पावतो.'

सर्व धर्मांत उत्कृष्ट धर्म होय. - ॥५५॥ मी सर्व भूतांचा आधार आहें; पुरुष 'माझ्या स्वरूपीं जीव अभेदानें आहे (परमेश्वर व जीव एकच),' अशी भावना करीत राहिला कीं मजशीं ऐक्य पावतो. उदाहरणें पहा :- नद्यांचें पाणी समुद्रांत शिरलें कीं समुद्ररूप बनतें, दूध दुधांत पडलें कीं एकवटतें, - घागरीच्या पोटांतील - आकाश (पोकळी) - घागर फुटून गेली कीं मोठ्या - आकाशांत मिळतें, - भात्यांतला - वायु - बाहेरील - वाऱ्यांत मिसळून जातो. (असेंच जीवात्म्याचें परमात्म्याशीं एकत्व होतें.) ॥ ५६ ॥

आत्मन्यभेदेन विभावयन्निदं भवत्यभेदेन मया ऽऽत्मना तदा ॥ यथा जलं वारिनिधौ यथा पयः क्षीरे वियद्व्योम्न्यनिले यथा ऽनिलः ॥ ५६ ॥

श्रोदितंबोधितं समस्तंकर्ममार्गकाम्यं हित्वा अखिलात्मनांजीवानांस्वरूपभूतंमामात्मानंपरमेश्वरंभजेत् यथाधनस्यार्जने-नादौदुःखंमध्येपालनकृतंतत्रराजादिकृतभयमंतेनाशेशोकपर्यवसायिदुःखमेवंपदार्थमात्रेद्रष्टव्यम् ॥ ५५ ॥ मय्यभेदभावनयानामरूपाविभा-गेनमद्रूपएवभवतीत्यमुमर्थंसदृष्टांतमाह आत्मनीति आत्मनिसर्वाधिष्ठानेमयि इदंस्वस्वरूपंजीवमभेदेनविभावयन्यदातिष्ठतीति-शेषः तदा मयात्मनापरमेश्वरेणाभेदेन भवतिअभिन्नोभवति तत्रदृष्टांतः यथा समुद्रे प्रविष्टं नद्यादिजलं समुद्रएव यथा क्षीरेगवादिक्षीरे प्रक्षिप्तं पयः क्षीरमेव यथा व्योम्नि महाकाशे घटाद्यवच्छिन्नाकाशोघटादिभंगे यथाचर्मभस्त्रिकाद्यवच्छिन्नोवा-

[यदा] आत्मनि इदं अभेदेन[1] विभावयन्[2] [तिष्ठति], तदा यथा वारिनिधौ[3] जलं, यथा क्षीरे[4] पयः[5], व्योम्नि[6] वियत्[7] [च], यथा अनिले[8] अनिलः, [तथा] मया आत्मना अभेदेन भवति.॥५६॥

१ ऐक्यानें. २ चिंतन करणारा. ३ समुद्रांत. ४ दुधांत. ५ दूध. ६ आकाशांत. ७ आकाश. ८ वायूंत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुरुष प्रारब्ध कर्मामुळें लौकिक व्यवहार करीत राहीना, त्याला ‘ जग खोटेंच आहे ’ असा विचार करितां करितां ऐक्यज्ञान झालें कीं जगावरील सत्यत्वरूप भ्रांति आपोआप नाहींशी होते; कारण श्रुति आणि युक्ति अशा दोन्ही प्रमाणांनीं ‘ जग खोटें ’ असें ठरवून टाकिलें आहे :- वेदांनीं तर ‘ आत्म्याहून दुसरें सर्व

इत्थं यदीक्षेत हि लोकसंस्थितो जगन्मृषैवेति विभावयन्मुनिः ॥ निराकृतत्वा-
च्छ्रुतियुक्तिमानतो यथेन्दुभेदो दिशि दिग्भ्रमादयः ॥ ५७ ॥

युरनिलेमहावायौनामरूपाविभागेनैकीभवतीत्यर्थः ॥ ५६ ॥ एवमात्मतत्त्वज्ञस्यजगत्सत्यत्वभ्रमःस्वतएवापैतीत्याह **इत्थमिति हिरप्यर्थे लोकसंस्थितो**ऽपिजीवन्मुक्तिदशायांप्रारब्धवशाल्लोकव्यवहारंकुर्वन्नपि **जगन्मृषैवेति विभावयन्**सन् **यदि**यदा **इत्थमीक्षेत**ऐकात्म्यंजानीयात्तदा निवृत्तजगत्सत्यत्वभ्रमोभवतीतिशेषः तत्रहेतुः **श्रुतियुक्तिमानतो निराकृतत्वात्** अतोऽन्यदार्तमित्यादिश्रुतिरूपात् जगन्मिथ्यादृश्यत्वात् शुक्तिरजतवदितितदुपबृंहितानुमानरूपात्मानतःप्रमाणतोनिराकृतत्वात् तत्रदृष्टांतो**यथेंदुभेदः** एकचंद्रेद्विचंद्रत्वभ्रमस्तदेकत्वज्ञानेननिवर्तते **यथाचदिशि**प्राच्यादौ**अन्यदिक्त्वभ्रमः** सोऽपितत्त्वज्ञानान्निवर्तते एवंभ्रमतःपुरुषस्यदिक्षुभ्रमणभ्रमोनिकटवर्तिवृक्षादौचभ्रमणभ्रमस्तत्स्थैर्यज्ञानेननिवर्ततेतद्वत् ॥ ५७ ॥

लोकसंस्थितः[1] हि मुनिः ‘ जगत् मृषा[2] एव ’ इति विभावयन् [सन्] इत्थं यदि ईक्षेत[3], [तदा] यथा ईन्दुभेदः[4], दिशि दिग्[5]भ्रमादयः [च, तथा] श्रुतियुक्ति[6]मानतः निराकृतत्वात्[7] [निवृत्त[8]जगत्सत्यत्वभ्रमः भवति]. ॥ ५७ ॥

---

१ लोकांत वागणारा. २ खोटें. ३ पाहील. ४ चंद्राचें अनेकत्व (एकाचे पुष्कळ चंद्र दिसणें). ५ दिशांविषयीं भ्रम (पूर्वेला पश्चिम समजणें, दक्षिणेला पूर्व मानणें) इत्यादि. ६ वेद आणि युक्ति अशा दोन्ही प्रमाणांनीं. ७ दूर केलीं असल्यामुळें ८ दूर झाली जगावरील सत्यपणाची भ्रांति ज्याची, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'माझ्या भक्ताला मी दिसतों.'

मिथ्या' असें सांगितलें आहे; युक्ति तर सांगते कीं, जे जे पदार्थ दिसतात ते सर्व शिंपेच्या तुकड्यावर भासणाऱ्या रुप्याप्रमाणें मिथ्या आहेत. - मनुष्याला कधीं कधीं पित्तादि विकारांमुळें - एका चंद्राचे दोन चंद्र दिसतात, दिशाभूल होते, (पूर्वदिशा दक्षिण वाटते, दक्षण उत्तर भासते) स्वतांला घेरी आली असली कीं भोंवतालचे वृक्ष घरें फिरत आहेत असें भासतें; पण हे सर्व भ्रम 'चंद्र एक आहे', 'अमुक दिशा पूर्व', 'आपल्याला घेरी आली आहे' असें कळलें कीं दूर होतात, त्याप्रमाणें आत्मतत्त्व समजलें असतां जगावरील सत्यत्वभ्रांति उडते. ॥९७॥ - लक्ष्मणा ! असें ज्ञान होण्याला उपाय माझी आराधना करणें हाच होय : पुरुषाला जोंपर्यंत - 'जसा सर्प भासण्याला आधार दोरी, तसा ह्या - सर्व जगाचा आधार मी (परमेश्वर रामचंद्र) आहें' अशी दृष्टि प्राप्त झाली नाहीं, तोंपर्यंत त्यानें, भगवंताची आराधना हाच

यावन्न पश्येदखिलं मदात्मकं तावन्मदाराधनतत्परो भवेत् ॥ श्रद्धालुरत्यूर्जितभक्तिलक्षणो यस्तस्य दृश्यो ऽहमहर्निशं हृदि ॥ ५८ ॥

ईदृशज्ञानेमदाराधनमेवोपायइत्याह यावदिति अखिलंजगत् मदात्मकंमदधिष्ठानकंमद्विवर्तभूतं यावन्न पश्येत्तावन्मत्प्राप्तये श्रद्धालुःभगवदाराधनमेवज्ञानप्रापकमित्यत्रदृढविश्वासवान् अतिशयेनोर्जितावृद्धिमतीभक्तिर्मयिभगवतिपूज्यताबुद्धिरूपालक्षणंचिन्हंयस्यसः तावन्मदाराधननिष्ठो भवेत् एवंहियस्तस्य हृदि अहमहर्निशं दृश्योभवामि येयथामाप्रपद्यंतेतांस्तथैवभजाम्यहमिति स्मृतेः ॥ ५८ ॥

यावत् अखिलं [1]मदात्मकं न पश्येत्[2], तावत् मदाराधनतत्परः[3] भवेत्. यः श्रद्धालुः[4] अत्यूर्जितभक्तिलक्षणः[5], अहं तस्य हृदि अहर्निशं दृश्यः[6] [भवामि]. ॥ ५८ ॥

१ मद्रूप. २ पाहील. ३ माझ्या पूजेंत गुंतलेला. ४ विश्वास ठेवणारा. ५ अति वाढलेली भक्ति हें चिन्ह ज्याचें असा. ६ दिसणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्ञानाचा उपाय होय असा विश्वास ठेवून, माझी पूजा करण्यांत तत्पर राहावें. ज्याच्या ठिकाणीं मजविषयीं अत्यंत वाढलेली भक्ति हें चिन्ह दिसून येईल त्याच्या हृदयांत मी स्वतांचें रूप नित्य प्रकट ठेवितों. ॥५८॥ लक्ष्मणा! तूं मला फार प्रिय आहेस; ह्मणून मी, सर्व वेदांतील सार अंश ह्मणून जो एकत्र करून ठरवून ठेविला होता, तो हा तुला सांगितला. हा तत्त्वविचार फार गुप्त आहे व तसाच राखला पाहिजे. सृष्टीमध्यें जो बुद्धिमान् मनुष्य ह्याचा उत्तम प्रकारें विचार करितो, तो पातकांच्या राशींपासून तत्काल मुक्त होतो. ॥ ५९ ॥ भाऊ! जें हें जग दिसत आहे तीही सर्व मायाच होय, असें समजून मनानें सगळ्यांना दूर ठेव (उदासीन रहा), व स्वतांचें मजशीं ऐक्य असल्याची भावना धर ह्मणजे तुझें अंतःकरण शुद्ध होईल आणि मग तुला दुःख भोगावें न लागतां केवळ सुख प्राप्त होईल. इतकेंच नव्हे तर पुढें

रहस्यमेतच्छ्रुतिसारसंग्रहं मया विनिश्चित्य तवोदितं प्रिय ॥ यस्त्वेतदालोचयतीह बुद्धिमान्स मुच्यते पातकराशिभिः क्षणात् ॥५९॥ भ्रातर्यदीदं परिदृश्यते जगन्मायैव सर्वं परिहृत्य चेतसा ॥

स्वोक्तवचनजातस्यश्रुतिसमत्वंकथमेतदालोचनमपिमदाराधनप्रतिबंधकदुरितध्वंसोपायइत्याह **रहस्य**मिति **श्रुतिसारसंग्रह**त्वेनातिगोपनीयताअप्रमाणशंकाकलंकराहित्यंसूचितम् **आलोचयति**सम्यग्विचारयति ॥ ५९ ॥ अथ भगवान्उक्तमेवार्थसंक्षेपेणदार्ढ्यायपुनराह **भ्रातरि**ति **यदी**तियदित्यर्थे **यदिदं जगत्परिदृश्यते तत्सर्वं मायैवे**ति ज्ञात्वेतिशेषः **चेतसा सर्वं परिहृत्य**तत्रौ-

प्रिय, मया श्रुतिसारसङ्ग्रहं[1] विनिश्चित्य[2], एतत् रहस्यं[3] तव उदितं[4]. यः बुद्धिमान् इह एतत् आलोचयति[5], सः पातकराशिभिः[6] क्षणात् मुच्यते[7]. ॥ ५९ ॥ भ्रातः, यदि इदं जगत् परिदृश्यते, [तत्]

१ वेदाच्या साराचा संग्रह. २ ठरवून. ३ गुप्त. ४ सांगितलें. ५ उत्तम विचार करितो. ६ पातकसमूहांनीं. ७ सुटतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तूं आनंदमय बनून जाशील हा माझा पूर्ण आशीर्वाद आहे. ॥ ६० ॥ माझ्या ठिकाणीं प्रकृतीचे सत्त्वादि गुण नाहींत; मी त्रिगुणात्मक मायेहून पलिकडे आहें; पण कधीं कधीं लोकोत्तर गुणांनीं युक्त असें स्वरूप स्वीकारितों. जो मनुष्य, केव्हांतरी, माझ्या निर्गुण किंवा सगुण रूपाची निर्मळ अंतःकरणानें सेवा करितो, तो भक्त केवळ मी (मद्रूप, माझ्या योग्यतेचा) होय. जसा सूर्य आपल्या किरणांनीं त्रैलोक्याला पवित्र

मद्भावनाभावितशुद्धमानसः सुखी भवानन्दमयो निरामयः ॥ ६० ॥ यः सेवते मामगुणं गुणात्परं हृदा कदा वा यदि वा गुणात्मकम् ॥ सो ऽहं स्वपादा-ञ्चितरेणुभिः स्पृशन् पुनाति लोकत्रितयं यथा रविः ॥ ६१ ॥

दासीन्यंकृत्वा मद्भावनयामदैक्यभावनयाभावितंशुद्धंमानसंयस्यताद्दशस्तिष्ठइत्युपादिश्याशिषंप्राह निरामयः सन् सुखी भव सर्वदुःखनिवृत्त्येतिभावः । ततोंऽतरंगामन्यामाशिषमाह आनंदमयो भव तद्रूपोभवेत्यर्थः । यद्यपिपूर्वमानंदरूपत्वमस्त्येवतथाऽपि तत्प्राप्तिर्विस्मृतकंठस्थभूषणप्राप्तिवत् ॥ ६० ॥ एवंरीत्यास्त्रोपासकस्यलोकपावनत्वमाह यइति कदा वा यदाकदाचिदित्यर्थः हृदा निर्मलेनांतःकरणेन यो मामगुणंप्राकृतसत्त्वरजस्तमोरूपगुणरहितम् सच्चिदानंदरूपत्वात् अतएवगुणात्परंगुणादव्याकृतात्परंमायातीतम् यदिवायद्वेत्यर्थे गुणात्मकं—सर्वज्ञत्वादिलोकोत्तरलावण्यादिगुणवानात्मामूर्तिर्यस्यतंदृश्यमानरूपं सेवते सद्विविधोऽप्यगु-

माया एव [इति ज्ञात्वा], चेतसा सर्वं परिहृत्य, मद्भावनाभावित[1]शुद्धभावनः [तिष्ठ], निरामयः [सन्]सुखी, आनन्दमयः [च] [2]भव. ॥६०॥ यः कदा वा हृदा [3]अगुणं गुणात् [4]परं, यदि वा [5]गुणात्मकं मां [6]सेवते, सः [7]अहं. [सः] [8]स्वपादांचितरेणुभिः [9]स्पृशन् यथा [10]रविः, तथा [11]लोकत्रितयं [12]पुनाति.॥६१॥

१ माझ्या चिंतनानें युक्त शुद्ध मन ज्याचें, असा. २ हो. ३ गुणरहित. ४ पलिकडे असलेल्या. ५ गुणरूपी. ६ सेवा करितो. ७ मी (मद्रूप). ८ आपल्या पायांला लागलेल्या धुळीनें. ९ स्पर्श करणारा. १० सूर्य. ११ त्रैलोक्याला. १२ पवित्र करितो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करितो, तसाच तो भक्तही आपल्या चरणाला लागलेल्या धुळीच्या स्पर्शानें तीन्ही लोकांना शुद्ध करीत असतो. ॥ ६१ ॥ जगाची उत्पत्ति इत्यादि ज्याच्या लीलांचें ज्ञान उपनिषदांचें श्रवण करून मिळवावयाचें तो मी आहें. आणि मीच सर्व वेदांचें तत्त्व असें हें अद्वितीय तत्त्वज्ञान निरूपण केलें. जो मनुष्य गुरूवर भक्ति ठेवून विश्वासपूर्वक ह्याचा पाठ करील, त्याला, त्याची माझ्या वचनांवर भक्ति असेल तर, माझ्या स्वरूपीं गति मिळेल." ॥ ६२ ॥ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणार्थबोधे उत्तरकाण्डे रामगीता ॥ ५ ॥

विज्ञानमेतदखिलश्रुतिसारमेकं वेदान्तवेद्यचरणेन मयैव गीतम् ॥ यः श्रद्धया परिपठेद्गुरुभक्तियुक्तो मद्रूपमेति यदि मद्वचनेषु भक्तिः ॥ ६२ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे उत्तर० श्रीरामगीतायां पञ्चमः सर्गः ॥ ५ ॥

पासकः **अहं** मत्स्वरूपएवमामकइत्यर्थोवा प्रियोहिज्ञानिनोऽत्यर्थमहंसचममप्रियइत्युक्तेः । तादृशोभक्तः **स्वपादलग्नरेणुभिः संस्पृशन् लोकत्रयमपि पुनाति** अज्ञानध्वांतनिरसनेनपवित्रीकरोति **यथा रविः** स्वकरैर्जगद्वितिमिरीकरोतितद्वत् ॥ ६१॥ इदानीमेतद्ग्रंथार्थालोचनासमर्थस्यपाठमात्रतोऽपिमहत्फलमाह **विज्ञानं** विज्ञानजनकंकरणव्युत्परयेतिबोध्यम् **वेदांतैः** रुपनिषद्वाक्यै**र्वेद्यं चरणं** जगज्जन्मादिलक्षणंकर्म**यस्यतेन** ननुपाठमात्रादेतादृशमहत्फलप्राप्तिः कथमित्याशंक्यभक्त्यैवेतिसूचयंस्तत्रहेतुमाह**मद्वचनेषुभाक्ति**र्विश्वासो **यदी**त्यर्थाद्गुरुवाक्यविश्वासस्यैवफलदायकत्वादितिभावः ॥ ६२ ॥ इति श्रीरामवर्मणः कृतौ रामगीतायां सेतौ पंचमः सर्गः ॥५॥

यः गुरुभक्तियुक्तः[1] [सन्] विज्ञानं अखिलश्रुतिसारं एकं वेदान्तवेद्यचरणेन[2] मया एव गीतं एतत् श्रद्धया परिपठेत्[3], [सः], यदि मद्वचनेषु[4] भक्तिः, [तर्हि] मद्रूपं एति[5]।।६२।।इति श्रीरामगीतान्वयः॥५॥

---

१ गुरूच्या भक्तीनें युक्त. २ वेदांतवाक्यांनीं जाणण्याला योग्य चरित्र ज्याचें, अशा. ३ वाचील. ४ माझ्या वाक्यांवर. ५ पावतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

च्यवनादि मुनि रामाकडे आले.

शंकर ह्मणाले :- पार्वति ! एके प्रसंगीं यमुनेच्या तीरीं राहणारे सर्व ऋषि, लवण राक्षसाच्या भीतीस्तव, रामचंद्राची भेट घेण्यासाठीं अयोध्येस आले. ॥ १ ॥ असंख्य ब्राह्मण रामापासून अभय मिळविण्याच्या इच्छेनें, च्यवनभार्गव नामक श्रेष्ठ मुनीला पुढें घालून, - राजवाड्याजवळ - येऊन पोंचले. ॥ २ ॥ रघुकुलोत्तमानें परमभक्तिपूर्वक त्यांची पूजा करून मुनिसमूहाला आनंद देण्यासाठीं मधुर भाषण केलें :-- ॥ ३ ॥ ' मुनिश्रेष्ठहो ! मी आपलें कोणतें कार्य करावें ? आपण कोणत्या उद्देशानें येणें केलें ? - माझ्या हातून आ

श्रीमहादेव उवाच । एकदा मुनयः सर्वे यमुनातीरवासिनः ॥ आजग्मू राघवं द्रष्टुं भयाल्लवणरक्षसः ॥ १ ॥ कृत्वा ऽग्रे तु मुनिश्रेष्ठं भार्गवं च्यवनं द्विजाः ॥ असंख्याताः समायाता रामादभयकांक्षिणः ॥२॥ तान्पूजयित्वा परया भक्त्या रघुकुलोत्तमः॥ उवाच मधुरं वाक्यं हर्षयन्मुनिमण्डलम् ॥३॥ करवाणि मुनिश्रेष्ठाः किमागमनकारणम् ॥

श्रीम० उ० - (पू.) मुनयः ॥ लवणरक्षसः भयात् (मू.) आजग्मु[2]ः ॥ १ ॥ असंख्याताः द्विजाः (उ.) [सन्तः] (पू.) तु अग्रे कृत्वा समाया[3]ताः ॥ २ ॥ रघुकुलोत्तमः (पू.) तान् पूजयित्वा, ॥ मुनिमण्[4]डलं ह[5]र्षयन् [सन्] (मू.) उवाच - ॥ ३ ॥ ' मुनिश्रेष्ठाः, किं कर[6]वाणि ? आगम[7]नकारणं [किं] ? ॥

१ भेटण्यास. २ आले. ३ आले. ४ मुनिसमूहाला. ५ आनंदविणारा. ६ करूं. ७ येण्याचें कारण.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पलें दुःख निरसन होईल अशा बुद्धीनें - प्रीतिपूर्वक आपण मला भेटण्यासाठीं आलां, त्याअर्थी मी कृतार्थ झालों ! ॥ ४ ॥ आपला कार्यभाग कितीही कठिण असला तरी मी करीन. मी आपला सेवक आहें. कारण ब्राह्मण माझें आराध्य दैवत होत. सेवकाला काय ती आज्ञा व्हावी.' ॥ ५ ॥ तें ऐकून च्यवनमुनींला हर्ष झाला. ते लागलेच ह्मणाले :— 'प्रभो ! पूर्वी कृतयुगामध्यें मधु नांवाचा एक महादैत्य ॥ ६ ॥ होऊन गेला. तो अत्यंत धार्मिक व देवांचें आणि ब्राह्मणांचें पूजन करण्यांत तत्पर असे.

धन्यो ऽस्मि यदि यूयं मां प्रीत्या द्रष्टुमिहागताः ॥ ४ ॥ दुष्करं चापि यत्कार्यं भवतां तत्करोम्यहम् ॥ आज्ञापयन्तु मां भृत्यं ब्राह्मणा दैवतं हि मे ॥ ५ ॥ तच्छ्रुत्वा सहसा हृष्टश्च्यवनो वाक्यमब्रवीत् ॥ मधुनामा महादैत्यः पुरा कृतयुगे प्रभो ॥ ६ ॥ आसीदतीव धर्मात्मा देवब्राह्मणपूजकः ॥ तस्य तुष्टो महादेवो ददौ शूलमनुत्तमम् ॥ ७ ॥

यूयं (मू.), [तर्हि] धन्यः अस्मि. ॥ ४ ॥ (पू.) कार्यं, अहं तत् करोमि. भृत्यं मां (मू.). हि ब्राह्मणाः मे दैवतं.' ॥ ५ ॥ (पू.) – ॥ 'प्रभो, पुरा, कृतयुगे (मू.) ॥ ६ ॥ (पू.) आसीत्. ॥ (मू.) शूलं ददौ, ॥ ७ ॥

---

१ तुह्मी. २ सेवकाला. ३ आनंद पावलेला. ४ धर्माकडे मन ज्याचें, असा. ५ देवांची व ब्राह्मणांची पूजा करणारा. ६ नाहीं उत्तम ज्याहून (अत्युत्तम), अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शंकरांनीं प्रसन्न होऊन त्याला एक अत्युत्तम शूल दिला ॥ ७ ॥ आणि सांगितलें कीं, ह्याच्या योगें ज्याला प्रहार करशील, त्याचें भस्म होईल. रावणाची धाकटी बहीण कुंभीनसी त्याची भार्या, हें प्रसिद्ध आहे. ॥ ८ ॥ त्याला तिच्या पोटीं लवण नांवाचा एक महापराक्रमी राक्षस पुत्र झाला. हा अंतःकरणाचा परम निर्दय, कोणालाही न आवरणारा व देवब्राह्मणांचा छळ करणारा आहे. ॥ ९ ॥ राजाधिराजा ! त्यानें आह्मांला फार गांजिलें, ह्मणून आह्मी तुला शरण आलों.' तें ऐकून रामही ह्मणाला :– 'मुनिवरहो ! आतां भय अगदीं बाळगूं नका. ॥ १० ॥ मी लवणाचा नाश करवितों. आपण किंचितही संताप न धरितां

प्राह चानेन यं हंसि[1] स तु भस्मीभविष्यति ॥ रावणस्या[2]नुजा भार्या तस्य कुम्भीनसी श्रुता[3] ॥ ८ ॥ तस्यां तु लवणो नाम राक्षसो भीमविक्रमः ॥ आसीद्दुरात्मा दुर्धर्षो देवब्राह्मणहिंसकः ॥ ९ ॥ पीडितास्तेन राजेन्द्र वयं त्वां शरणं गताः ॥ तच्छ्रुत्वा राघवो ऽब्याह मा ीर्वो मुनिपुंगवाः ॥ १० ॥ लवणं नाशयिष्यामि गच्छन्तु विगतज्वराः ॥

(पू.). ॥ 'कुम्भीनसी' [इति] श्रुता (मू.) भार्या. ॥ ८ ॥ राक्षसः (पू.) ॥ आसीत्. [सः] (मू.) [अस्ति.] ॥ ९ ॥ राजेन्द्र, तेन (पू.).' ॥ राघवः अपि (मू.) – मुनिर्पुङ्गवाः[4], वः[5] भीः[6] मा[7] [भवतु]. ॥ १० ॥ (११ पू.) भवन्तः विगतज्वराः[8] [सन्तः] गच्छन्तु.' ॥

१ मारतोस. २ धाकटी बहीण. ३ प्रसिद्ध. ४ अहो श्रेष्ठ मुनींनो. ५ तुम्हाला. ६ भय. ७ नको. ८ गेला ताप ज्यांचा असे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

परत जावें.' ऋषींना असें आश्वासन दिल्यावर राम भावांकडे वळून ह्मणाला :– 'बोला. लवण राक्षसाला मारून ब्राह्मणांना पूर्ण अभय देण्याचें काम कोण करणार?' तें ऐकून भरत हात जोडून रामाला ह्मणाला:– ॥ ११ ॥ १२ ॥ 'देवा! प्रभो! मीच त्याचा वध करितों. मला आज्ञा दे!' नंतर शत्रुघ्न रामाला नमस्कार करून ह्मणाला :– ॥१३॥ 'रघुवीरा! लक्ष्मणानें युद्धप्रसंगीं मोठें कार्य केलें आहे. इकडे महाबुद्धिमान

इत्युक्त्वा प्राह रामोऽपि भ्रातॄन् को वा हनिष्यति॥ ११ ॥
लवणं राक्षसं दद्याद्ब्राह्मणेभ्योऽभयं महत्॥
तच्छ्रुत्वा प्राञ्जलिः प्राह भरतो राघवाय वै॥ १२ ॥
अहमेव हनिष्यामि देवाज्ञापय मां प्रभो॥
ततो रामं नमस्कृत्य शत्रुघ्नो वाक्यमब्रवीत्॥ १३ ॥
लक्ष्मणेन महत्कार्यं कृतं राघव संयुगे॥

रामः अपि (११ मू.) प्राह– 'कः वा लवणं राक्षसं हनिष्यति, (१२ पू.) अभयं [च] दद्यात्?' भरतः (मू.) [सन्] राघवाय प्राह –॥ ११ ॥ १२॥ प्रभो, (पू.) आज्ञापय.' ॥ ततः शत्रुघ्नः (मू.) –॥ १३ ॥ 'राघव, संयुगे (मू.). ॥ १४ ॥

१ भावांना. २ मारील. ३ मारीन. ४ युद्धांत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शत्रुघ्नाला मथुरेचें राज्य दिलें.

भरतालाही नंदिग्रामांत अतिशय दुःख सोसावें लागलें. ॥१४॥ - आतां राहिलें काम काय तें माझें. - ह्मणून मीच लवणाचा वध करण्यासाठीं जातों. रघुवरा! तुझा अनुग्रह असला कीं मी युद्धांत त्या राक्षसाचा वध करीन.' ॥ १५ ॥ शत्रूंचा सूड उगवणाऱ्या रामचंद्रानें तें वचन ऐकिल्यावर शत्रुघ्नाला मांडीवर घेऊन ह्मटलें :-- 'बा! मी तुला आजच मथुरेच्या राज्याचा अभिषेक करितों.' ॥ १६ ॥ लागलेंच रामानें मोठ्या प्रेमानें लक्ष्मणाकडून अभिषेकाचें सर्व साहित्य आणविलें आणि शत्रुघ्नाची इच्छा नव्हती तरी त्याला अभिषेक करविला. ॥ १७ ॥

नन्दिग्रामे महाबुद्धिर्भरतो दुःखमन्वभूत् ॥ १४ ॥ अहमेव गमिष्यामि
लवणस्य वधाय च ॥ त्वत्प्रसादाद्रघुश्रेष्ठ हन्यां तं राक्षसं युधि ॥१५॥
तच्छ्रुत्वा स्वांकमारोप्य शत्रुघ्नं शत्रुसूदनः ॥ प्राहाद्यैवाभिषेक्ष्यामि मथु-
राराज्यकारणात् ॥ १६ ॥ आनाय्य च सुसंभारान्लक्ष्मणेनाभिषेचने ॥
अनिच्छन्तमपि स्नेहादभिषेकमकारयत् ॥ १७ ॥

(पू.) गमिष्यामि. ॥ रघुश्रेष्ठ, (मू.) हन्यां.' ॥ १५ ॥ शत्रुसूदनः [रामः] (पू.) स्वांकं आरोप्य, ॥ प्राह — '(मू.) अभिषेक्ष्यामि.' ॥ १६ ॥ (पू.) सुसम्भारान् आनाय्य, (मू.). ॥ १७ ॥

१ अनुभविता झाला. २ जाईन. ३ मारीन. ४ शत्रूंना मारणारा. ५ आपल्या मांडीवर. ६ बसवून. ७ अभिषेक करीन. ८ चांगली सामग्री. ९ आणवून. १० न इच्छिणाऱ्या. ११ करविता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुढें राम शत्रुघ्नाला एक दिव्य बाण देऊन ह्मणाला :– ‘ वत्सा ! ह्या बाणाच्या योगें त्या त्रैलोक्याच्या शत्रूचा–लवणाचा–वध कर. ॥ १८ ॥ तो राक्षस, तो (शंकरानें दिलेला) शूल घरीं पुजून ठेवून, अरण्यामध्यें जीवजंतु भक्षण करण्यासाठीं आणि अनेक प्राण्यांचा घात करण्याकरितां जात असतो. ॥ १९ ॥ तो ज्यावेळीं घरीं आला नसेल तर वनांत फिरत असेल, ती वेळ साधून तूं नगराच्या द्वारांत धनुष्य घेऊन सिद्ध उभा राहा. ॥ २० ॥ तो संतापून तुजशीं युद्ध करील. ह्या वेळीं - त्याच्या जवळ शूल नसल्यामुळें - तुला त्याचा वध करितां येईल. अशा रीतीनें त्या क्रूर लवणराक्षसाचा नाश केल्यावर तूं त्या मधुवनाचाही उच्छेद उडव आणि ॥ २१ ॥

दत्वा तस्मै शरं दिव्यं रामः शत्रुघ्नमब्रवीत् ॥ अनेन जहि बाणेन लवणं लोककण्टकम् ॥१८॥ स तु संपूज्य तच्छूलं गेहे गच्छति काननम् ॥ भक्षणार्थं तु जन्तूनां नानाप्राणिवधाय च ॥ १९ ॥ स तु नायाति सदनं यावद्वनचरो भवेत् ॥ तावदेव पुरद्वारि तिष्ठ त्वं धृतकार्मुकः ॥ २० ॥ योत्स्यते स त्वया क्रुद्धस्तदा वध्यो भविष्यति ॥ तं हत्वा लवणं क्रूरं तद्वनं मधुसञ्ज्ञितम् ॥ २१ ॥

रामः तस्मै दिव्यं शरं (पू.) – ॥ ‘ (मू.) लवणं जहि. ॥ १८ ॥ सः तु गेहे तत् शूलं सम्पूज्य, जन्तूनां (मू.) काननं गच्छति. ॥ १९ ॥ (पू.), सदनं न आयाति, ॥ (मू.) [सन्] पुरद्वारि तिष्ठ. ॥ २० ॥ सः क्रुद्धः [सन्] त्वया (२१ पू.) ॥ त्वं (२१ उ.) वनं, तं क्रूरं लवणं हत्वा, ॥

१ वनास. २ घरास. ३ येतो. ४ लढेल.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याच स्थलीं एक नगरी वसवून माझ्या आज्ञेस्तव तेथें राहा. पांच हजार घोडे, त्यांच्या अर्ध्या संख्ये-इतके (अडीच हजार) रथ, ॥ २२ ॥ सहाशें हत्ती, आणि तीस हजार पायदळ – इतकी सेना मागाहून येईल. तूं पुढें जाऊन आगोदर राक्षसांचा समाचार घे.' ॥ २३ ॥ राघवानें शत्रुघ्नाला अशी आज्ञा दिली, त्याचें मस्तक हुंगिलें, आणि अनेक आशीर्वादांच्या योगें उत्तेजन आणून त्याला मुनींबरोबर पाठवून दिलें. ॥ २४ ॥ शत्रुघ्नानेंही रामाच्या आज्ञेप्रमाणें सर्व व्यवस्था लाविली – मधुपुत्राचा (लवणाचा) वध करून मथुरा नगरी वसविली, ॥ २५ ॥ तेथें धनधान्याची समृद्धि केली आणि लोकांना अनेक प्रकारचीं दानें व मान देऊन त्याठिकाणीं राहण्याच्या सोई लावून दिल्या.

निवेश्य नगरं तत्र तिष्ठ त्वं मे ऽनुशासनात् ॥ अश्वानां पंचसाहस्रं रथानां च तदर्धकम् ॥२२॥ गजानां षट्शतानीह पत्तीनामयुतत्रयम् ॥ आगमिष्यति पश्चा-त्त्वमग्रे साधय राक्षसम् ॥२३॥ इत्युक्त्वा मूर्ध्न्यवघ्राय प्रेषयामास राघवः ॥ शत्रुघ्नं मुनिभिः सार्धमाशीर्भिरभिनन्द्य च ॥ २४ ॥ शत्रुघ्नो ऽपि तथा चक्रे यथा रामेण चोदितः ॥ हत्वा मधुसुतं युद्धे मथुरामकरोत्पुरीम् ॥ २५ ॥ स्फीतां जनपदां चक्रे मथुरां दानमानतः ॥ सीता ऽपि सुषुवे पुत्रौ द्वौ वाल्मीकेरथाश्रमे ॥२६॥

नगरं (२२ पू.) तिष्ठ. (मू.) ॥ २१ ॥ २२ ॥ (मू.) साधय.' ॥ २३ ॥ राघवः शत्रुघ्नं (मू.) मुनिभिः सार्धं प्रेषयामास. ॥ २४ ॥ (पू.) तथा चक्रे, ॥ युद्धे मधुसुतं (मू.) अकरोत्. ॥ २५ ॥ मथुरां दानमानतः (पू.). ॥ अथ (मू.) द्वौ पुत्रौ सुषुवे. ॥ २६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इकडे, वाल्मीकीच्या आश्रमीं, सीता दोन पुत्र प्रसवली. ॥ २६ ॥ मुनीनें त्यांचीं, वडील मुलाचें कुश आणि धाकट्याचें लव–अशीं नांवें ठेविलीं. हळूहळू सीतेचे पुत्र विद्यासंपन्न झाले. ॥ २७ ॥ प्रथम मुनीनें त्यांचे उपनयनसंस्कार केले, पुढें त्यांना वेद पढविले आणि लहानपणींच त्यांना सगळें रामायण काव्य शिकविलें. ॥ २८ ॥ रामायण हें आख्यान पूर्वी त्रिपुरासुराचा नाश करणाऱ्या शंकरानें पार्वतीला वेदांचें तात्पर्य कळण्यासाठीं सांगितलें. तेंच काव्य महासमर्थ वाल्मीकिमुनीनें त्या दोघां मुलांकडून पाठ करविलें. ॥ २९ ॥ ते मुलगे अश्विनीकुमारांसारखे सुंदर होते. त्यांचे स्वर (आवाज) कानांला फार मधुर लागत. त्यांना तालसुरांचें ज्ञान उत्तम होतें. ते अरण्यामध्यें रामायणकथा गात इकडे तिकडे फिरत. ॥ ३० ॥

मुनिस्तयोर्नाम चक्रे कुशो ज्येष्ठो ऽनुजो लवः ॥ क्रमेण विद्यासंपन्नौ सीतापुत्रौ
बभूवतुः ॥ २७ ॥ उपनीतौ च मुनिना वेदाध्ययनतत्परौ ॥ कृत्स्नं रामायणं प्राह
काव्यं बालकयोर्मुनिः ॥ २८ ॥ शंकरेण पुरा प्रोक्तं पार्वत्यै पुरहारिणा[1] ॥ वेदोपबृंहणार्थाय[2] तावग्राहयत[3] प्रभुः ॥ २९ ॥ कुमारौ स्वरसंपन्नौ सुन्दरावश्विनाविव ॥
तन्त्रीतालसमायुक्तौ गायन्तौ चेरतुर्वने ॥ ३० ॥

(पू.) कुशः अनुजः लवः ॥ सीतापुत्रौ (मू.). ॥ २७ ॥ मुनिना (पू.) [बभूवतुः]. ॥ मुनिः बालकयोः (मू.) प्राह. ॥ २८ ॥ प्रभुः, पुरहारिणा (पू.) [यत्] प्रोक्तं, [तत्] (मू.). ॥ २९ ॥ (पू.) सुन्दरौ स्वरसम्पन्नौ कुमारौ (मू.) [सन्तौ] वने चेरतुः. ॥ ३० ॥

---

१ त्रिपुरासुराचा वध करणाऱ्या. २ वेदांच्या विस्तारासाठीं. ३ पाठ करविलें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कुशलवांचे गुण.

त्यांचीं रूपें देवांसारखीं मनोहर होतीं. ते ठिकठिकाणीं मुनींच्या समाजांत रामकथा गायन करीत. - आगोदर मुलें मनोहर, त्यांत आवाज गोड, आणि काव्य तर अतिरसाळ; इतके गुण एकत्र असल्यामुळें - कुशलवांचें गायन ज्यांच्या ज्यांच्या कानीं पडलें व त्यांच्या मूर्ति ज्यांनीं ज्यांनीं पाहिल्या ते सर्व मुनि आश्चर्य चकित होऊन पुढील उद्गार काढीत :–॥३१॥ 'अहो! आह्मी आज इतके दिवस जगांत वांचलों व सर्व दिशा पाहिल्या (अनेक प्रदेशीं पुष्कळ दिवस वास केला); परंतु गंधर्वलोकीं, भूलोकीं, किन्नरांमध्यें, देवांत, स्वर्गलोकीं पातालीं, ब्रह्मसदनीं अथवा सगळ्या त्रैलोक्यांत असें गाण्याचें व तालाचें उत्तम कौशल्य आह्मांला कोठेंही दिसलें नाहीं किंवा ऐकायलाही मिळालें नाहीं!' ॥३२॥ अशा रीतीनें मुनि त्यांची प्रतिदिनीं स्तुति करीत. ते दोघे मुलगे वाल्मीकीच्या आश्रमांत एकांतस्थळीं ऋषींबरोबर पुष्कळ दिवसपर्यंत सुखानें राहिले. ॥३३॥

तत्र तत्र मुनीनां तौ समाजे सुररूपिणौ ॥ गायन्तावभितो दृष्ट्वा विस्मिता मुनयोऽब्रुवन् ॥ ३१ ॥ गन्धर्वेष्विह किन्नरेषु भुवि वा देवेषु देवालये पातालेष्वथ वा चतुर्मुखगृहे लोकेषु सर्वेषु च ॥ अस्माभिश्चिरजीविभिश्चिरतरं दृष्टा दिशः सर्वतो नाज्ञायीदृशगीतवाद्यगरिमा नादर्शि नाश्रावि च ॥ ३२ ॥ एवं स्तुवद्भिरखिलैर्मुनिभिः प्रतिवासरम् ॥ आसाते सुखमेकान्ते वाल्मीकेराश्रमे चिरम् ॥ ३३ ॥

मुनयः (मू.) सुररूपिणौ तौ अभितः दृष्ट्वा विस्मिताः [सन्तः] अब्रुवन् – ॥ ३१ ॥ चिरजीविभिः अस्माभिः चिरतरं सर्वतः दिशः दृष्टाः; [परंतु] इह, (पू.) लोकेषु च ईदृशगीतवाद्यमहिमा (मू.). ॥ ३२ ॥ [तौ], प्रतिवासरं (पू.) [सह] (मू.) एकान्ते चिरं सुखं [यथा तथा] आसाते. ॥३३॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इकडे महातेजस्वी रामचंद्रानें, - यज्ञकर्मांत पत्नी अवश्य पाहिजे, ह्मणून- सीतेची सुवर्णप्रतिमा करून तिच्या साह्यानें अनेक अश्वमेधादि यज्ञ केले, त्यांत विपुल दक्षिणा दिल्या. ॥ ३४ ॥ त्या यज्ञामध्यें, समारंभ अवलोकन करण्यासाठीं, सर्व ऋषि, राजर्षि, ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य आले होते. ॥ ३५ ॥ श्रेष्ठ वाल्मीकि मुनिही गायनकलेंत प्रवीण झालेल्या त्या कुशलवांना बरोबर घेऊन तेथें आले आणि रामानें ऋषींना राहण्यासाठीं जो मंडप बांधून ठेविला होता त्यांत उतरले. ॥ ३६ ॥ एके दिवशीं वाल्मीकिमुनि समाधि उतरल्यावर शांतपणें एकांतीं बसले असतां कुशानें गोष्टी बोलतां बोलतां त्यांना ज्ञानशास्त्राविषयीं प्रश्न केला :- कुश

अथ रामो ऽश्वमेधादींश्चकार बहुदक्षिणान् ॥ यज्ञान् स्वर्णमयीं सीतां विधाय विपुलद्युतिः ॥३४॥ तस्मिन्विताने ऋषयः सर्वे राजर्षयस्तथा ॥ ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः समाजग्मुर्दिदृक्षवः ॥ ३५ ॥ वाल्मीकिरपि संगृह्य गायन्तौ तौ कुशीलवौ ॥ जगाम ऋषिवाटस्य समीपं मुनिपुंगवः ॥३६॥ तत्रैकान्ते स्थितं शान्तं समाधिविरमे मुनिम् ॥ कुशः पप्रच्छ वाल्मीकिं ज्ञानशास्त्रं कथान्तरे ॥ ३७ ॥

अथ विपुलद्युतिः[1] रामः (उ.) (पू.) यज्ञान् चकार. ॥ ३४ ॥ (मू.) [यज्ञं] दिदृक्षवः[2] [सन्तः] समाजग्मुः[3]. ॥ ३५ ॥ मुनिपुङ्गवः (पू.) तौ संगृह्य[4], (मू.) जगाम. ॥ ३६ ॥ तत्र कुशः समाधिविरमे (मू.) ज्ञानशास्त्रं पप्रच्छ[5] – ॥ ३७ ॥

---

१ महातेजस्वी. २ पाहूं इच्छिणारे. ३ आले. ४ बरोबर घेऊन. ५ विचारिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

म्हणाला :- ॥ ३७ ॥ 'भगवन्! आपल्या मुखानें सर्व गोष्टी थोडक्यांत ऐकून घ्याव्या, अशी माझी इच्छा आहे. प्राण्याला हें दृढ संसारबंधन उत्पन्न होतें कसें? ॥३८॥ प्राणी ह्या संसारनामक दृढ बंधनांतून सुटतो कसा? हें मला सांगण्याचा अनुग्रह करावा. मुने! आपण सर्वज्ञ आहां - अर्थात ह्या सर्व गोष्टी आपणाला विदित आहेत; - मी आपला शिष्य आहें :- त्याअर्थी मला सांगण्यासही कांहीं प्रतिबंध नाहीं. - ॥ ३९ ॥ वाल्मीकि म्हणाले :-- 'वत्सा! ऐक. मी तुला बंधाचें आणि मोक्षाचें स्वरूप व संसारांतून सुटण्याचें साधन सर्व सांगतों. ऐकून घेतल्यावर मग माझ्या सांगण्याप्रमाणें ॥ ४० ॥ आचरण ठेव म्हणजे तुझें कल्याण होईल व तूं जीवन्मुक्त होशील. कुशा! चैतन्यरूपी आत्म्याला वस्तुतः देहाचा संबंध नाहीं. देह हेंच त्याचें (आत्म्याचें) मोठें गृह होय (जसें घराच्या धन्याचें व घराचें रूप एक नव्हे त-

भगवन् श्रोतुमिच्छामि संक्षेपाद्भवतोऽखिलम् ॥ देहिनः संसृतिबन्धः कथमुत्पद्यते दृढः ॥ ३८ ॥ कथं विमुच्यते देही दृढबन्धाद्भवाभिधात् ॥ वक्तुमर्हसि सर्वज्ञ मह्यं शिष्याय ते मुने ॥ ३९ ॥ वाल्मीकिरुवाच ॥ शृणु वक्ष्यामि ते सर्वं संक्षेपाद्बन्धमोक्षयोः॥ स्वरूपं साधनं चापि मत्तः श्रुत्वा यथोदितम्॥४०॥तथैवाचर भद्रं ते जीवन्मुक्तो भविष्यसि॥देह एव महागेहमदेहस्य चिदात्मनः॥ ४१ ॥

'(पू.) संक्षेपात् श्रोतुं इच्छामि. ॥ देहिनः दृढः (मू.)? ॥३८॥ देही भवाभिधात् दृढबन्धात् (पू.)? ॥ सर्वज्ञ, मुने, ते शिष्याय मह्यं (मू.). ' ॥३९॥ वा० उ० — (मू.) सङ्क्षेपात् वक्ष्यामि. [तत्] मत्तः श्रुत्वा, यथा उदितं, ॥ ४० ॥ तथा एव आचर. ते (पू.) ॥ अदेहस्य चिदात्मनः (मू.). ॥ ४१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सेंच आत्म्याचें आणि देहाचें रूप एक नाहीं). ॥ ४१ ॥ आत्म्याचा ह्या देहामध्यें त्यानेंच कल्पिलेला एक प्रधान आहे. त्याचें नांव अहंकार. हा प्रधान स्वतांचा देहाविषयीं आणि घरावरील अभिमान चिदात्म्यावर आरोपितो (लादतो) आणि ॥ ४२ ॥ त्याच्याशीं एकत्व पावून स्वतांचें सगळें चरित्र ज्ञानानंदरूपी आत्म्यावर दाखवितो. स्वतां अहंकाराचें शरीर प्रकाशित होतें आत्म्याकडूनच (त्याला आंगचें सामर्थ्य ह्मटलें तर अगदीं नसतें, सगळें अत्म्याजवळून उसनें आणलेलें). ॥ ४३ ॥ आत्मा त्याच्याकडे सगळे संकल्प करण्याचें स्वातंत्र्य देतो, आणि स्वतां त्या संकल्परूप शृंखलांनीं बांधला जातो व पुत्र, स्त्रिया घरें इत्यादिकांविषयीं अहोरात्र चिंतन करीत राहतो ! ॥ ४४ ॥ अशा चिंतनामुळें स्वतां प्राण्याला नित्य शोक करीत बसावें लागतें. अहंकाराचे देह अधम, उत्तम आणि मध्यम असे तीन आहेत. ॥ ४५ ॥

तस्याहंकार एवास्मिन्मन्त्री तेनैव कल्पितः ॥ देहगेहाभिमानं स्वं समारोप्य चिदात्मनि ॥ ४२ ॥ तेन तादात्म्यमापन्नः स्वचेष्टितमशेषतः ॥ विदधाति चिदानन्दे तद्भासितवपुः स्वयम् ॥ ४३ ॥ तेन संकल्पितो देही संकल्पनिगडावृतः ॥ पुत्रदारगृहादीनि संकल्पयति चानिशम् ॥ ४४ ॥ संकल्पयन्स्वयं देही परिशोचति सर्वदा ॥ त्रयस्तस्याहमो देहा अधमोत्तममध्यमाः ॥ ४५ ॥

अस्मिन (पू.). ॥ [सः] चिदात्मनि स्वं (मू.), ॥ ४२ ॥ (पू.) स्वयं (उ.) स्वचेष्टितं अशेषतः चिदानन्दे विदधाति. ॥ ४३ ॥ (पू.) [सन] (मू.) सङ्कल्पयति. ॥ ४४ ॥ देही स्वयं (४५पू.) परिशोचति. (४५ मू.)

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संसाराचें कारण अहंकार.

त्या तीन शरीरांचीं अनुक्रमानें तम, सत्त्व, आणि रज अशीं तीन नांवें आहेत. हींच शरीरें जगाच्या रहाटीचीं कारणें होत. संकल्प करतांना वृत्तीमध्यें तमोगुणाचें प्राधान्य असलें कीं, हातानें व्यापारही तामस (निंद्य) घडतात, ॥ ४६ ॥ त्यांचें फळ हा प्राणी पूर्ण तमोगुणी बनून कृमिकीटयोनींत जन्मास येतो, हें होय. सत्त्वगुणमय संकल्पाचें फळ मनुष्याची प्रवृत्ति धर्माकडे व ज्ञानसंपादनाकडे वळत्ये; ॥ ४७ ॥ त्याला मोक्षरूप साम्राज्य अगदीं दूर नसतें, तर तो सुखरूप होऊन राहतो, असें प्रसिद्ध आहे. ज्याच्या संकल्पामध्यें रजोगुणाचें आधिक्य असेल तो प्राणी लौकिक व्यवहारांत दक्ष असतो; ॥ ४८ ॥ त्याला मुलें, स्त्रिया इत्यादिकांबरोबर क्रीडा करीत संसारांत राहणें आवडतें. हे महाबुद्धिमंता (कुशा) ! ज्या पुरुषाचा संकल्प हीं तीन्ही रूपें सोडून देतो, ॥ ४९ ॥

तमःसत्त्वरजःसञ्ज्ञा जगतः कारणं स्थितेः ॥ तमोरूपाद्धि संकल्पान्नित्यं ताम सचेष्टया ॥ ४६ ॥ अत्यन्तं तामसो भूत्वा कृमिकीटत्वमाप्नुयात् ॥ सत्त्वरूपो हि संकल्पो धर्मज्ञानपरायणः ॥४७॥ अदूरमोक्षसाम्राज्यः सुखरूपो हि तिष्ठति ॥ रजोरूपो हि संकल्पो लोके स व्यवहारवान् ॥ ४८ ॥ परितिष्ठति संसारे पुत्रदारानुरञ्जितः ॥ त्रिविधं तु परित्यज्य रूपमेतन्महामते ॥ ४९ ॥

(४६ पू.) त्रयः देहाः जगतः स्थितेः कारणं ॥ (मू.) ॥ ४५ ॥ ४६ ॥ (पू.). ॥ [यस्य] (मू.) [सः] धर्मज्ञानपरायणः ॥ ४७ ॥ (पू.). ॥ [यस्य] (मू.) सः लोके व्यवहारवान्, ॥ ४८ ॥ [ततः] (४९ पू) [सन्] संसारे परितिष्ठति. ॥ महामते, यस्य सङ्कल्पः एतत् (४९उ.)

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याला तो संकल्पच स्वतांचा (संकल्पाचा) क्षय झाला असतां परमपदाची प्राप्ति करून देतो. ह्मणून, तूं सर्व इंद्रियांचें विषयज्ञान सोडून दे, मनाच्या योगें मनाचा निग्रह कर (इंद्रियांना व मनाला विषयांवर जाऊं देऊं नकोस), ॥ ५० ॥ आणि बाह्य विषयांसहित आभ्यंतर विषयांच्या संकल्पांचा क्षय कर. बा पुण्यशीला! तूं जरी सहस्त्र वर्षें तीव्र तपश्चर्या केलीस, पातालांत जाऊन राहिलास, पृथ्वीवर असलास, अथवा वर जाऊनं स्वर्ग धुंडाळिलास तरी, ॥ ५१ ॥ तुला दुःखरहित विकारशून्य व परमशुद्ध अशा आत्मसुखाच्या प्राप्तीचा उपाय संकल्पाचा क्षय करण्याशिवाय दुसरा कोणताही सांपडणार नाहीं. ॥५२॥ ह्मणून तूं मोठ्या धैर्यानें संकल्पाचा क्षय करण्याचा यत्न चालव. ॥ ५३ ॥

संकल्पः परमाप्नोति पदमात्मपरिक्षये ॥ दृष्टीः सर्वाः परित्यज्य नियम्य मनसा मनः ॥ सबाह्याभ्यंतरार्थस्य संकल्पस्य क्षयं कुरु ॥५०॥ यदि वर्षसहस्राणि तपश्चरसि दारुणम् ॥ पातालस्थस्य भूस्थस्य स्वर्गस्थस्यापि तेऽनघ ॥ ५१ ॥ नान्यः कश्चिदुपायोऽस्ति संकल्पोपशमादृते ॥ अनाबाधेऽविकारे स्वे सुखे परमपावने ॥ ५२ ॥ संकल्पोपशमे यत्नं पौरुषेण परं कुरु ॥ ५३ ॥

परित्यज्य [शाम्यति], सः आत्मपरिक्षये परं पदं आप्नोति. [अतः] सर्वाः (द्वि.) नियम्य, (मू.) ॥ ४९ ॥ ५० ॥ (पू.) तपः चरसि, अनघ, [तथा अपि] ॥ ५१ ॥ (पू.) स्वे सुखे अन्यः कश्चित् उपायः न अस्ति. (मू.) यत्नं कुरु. ॥ ५२ ॥ (मू.) ॥ ५३ ॥

१ स्वतांचा नाश झाला असतां. २ पावतो (मिळवून देतो). ३ आवरून. ४ धैर्यानें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे पुण्यपुरुषा! ह्या संकल्परूप तंतूच्या आधारावर सर्व विकार राहतात, असें ह्मटलें आहे. संकल्पतंतु तुटला कीं हे संसारांत पाडणारे विकार कोठें जातात कोण जाणे? ॥ ५४ ॥ ह्यासाठीं, तूं संकल्प सोडून दे व सहजगत्या जो व्यवहार करणें भाग पडेल तेवढा करीत जा. संकल्पाचें जाळें झिजून क्षीण झालें असतां जीव ब्रह्मरूप पावतो. ॥ ५५ ॥ हें विकल्पांचें मोठें जाळें आपोआप सुटणार नाहीं; तूं त्याला बलात्कारें तोडून टाक, ब्रह्मरूपीं मिळालेल्या पुरुषासारखी वृत्ति बनव, निद्रेच्या वेळीं जशी चित्तवृत्ति असते तशी निरंतर राख आणि त्या प्रसिद्ध एक पदाची प्राप्ति करून घे; ह्मणजे तुला सतत सुख मिळेल. ॥ ५६ ॥

इति श्रीमदध्यात्मरायणार्थबोधे उत्तरकाण्डे षष्ठः सर्गः ॥ ६ ॥

संकल्पतन्तौ निखिला भावाः प्रोक्ताः किलानघ ॥ छिन्ने तन्तौ न जानीमः क यान्ति विभवाः पराः॥५४॥ निःसंकल्पो यथाप्राप्तव्यवहारपरो भव ॥ क्षये संकल्पजालस्य जीवो ब्रह्मत्वमाप्नुयात् ॥ ५५ ॥ अधिगतपरमार्थतामुपेत्य प्रसभमपास्य विकल्पजालमुच्चैः ॥ अधिगमय पदं तदद्वितीयं विततसुखाय सुषुप्तचित्तवृत्तिः ॥५६॥ इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे उत्तरकांडे षष्ठःसर्गः ॥ ६ ॥

अनघ, (पू.). ॥ तन्तौ छिन्ने [सति], (मू.) क यान्ति [इति] न जानीमः. ॥ ५४ ॥ (पू.). सङ्कल्पजालस्य क्षये [सति], (मू.). ॥ ५५ ॥ उच्चैः विकल्पजालं, प्रसभं अपास्य, (पू.), तत अद्वितीयं पदं (मू.) [भव]. ॥५६॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये उत्तरकाण्डे षष्ठः सर्गः ॥६॥ ॥ ६९ ॥

१ बलात्कारें. २ टाकून. ३ मिळव. ४ निरंतर सुखासाठीं. ५ निजली चित्तवृत्ति ज्याची, असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वाल्मीकीनें बोध केला असतां कुशाची भ्रांति तत्काल दूर झाली. तेंव्हांपासून पुढें तो अंतर्यामीं योगी बनला व बाह्यात्कारीं मात्र सर्व व्यवहारांचें अनुकरण करीत राहिला. ॥१॥ वाल्मीकीनें त्या सीतेच्या महाबुद्धिमान् पुत्रांना आणखीही सांगून ठेविलें कीं, तुह्मी नगरामध्यें रस्त्यांवर चोहोंकडे गायन करीत फिरा;॥२॥ जर एखादे वेळीं रामचंद्राला गायन ऐकण्याची इच्छा झाली - आणि त्यानें तुह्माला बोलाविलें तर - तुह्मी त्याच्या अग्रभागीं गायन करा; पण तो कांहीं द्रव्य देईल तर तें मात्र घेऊं नका. ॥ ३ ॥ अशी प्रेरणा मिळाली असतां ते दोघे गायन करीत फिरूं लागले. ऋषीनें पूर्वी सांगितल्याप्रमाणें त्यांनीं ठिकठिकाणीं गा-

वाल्मीकिना बोधितोऽसौ कुशः सद्यो गतभ्रमः[1] ॥ अन्तर्युक्तो[2] बहिः सर्वमनुकुर्वश्चचार सः ॥ १ ॥ वाल्मीकिरपि तौ प्राह सीतापुत्रौ महाधियौ ॥ तत्र तत्र च गायन्तौ पुरे वीथिषु[3] सर्वतः ॥ २ ॥ रामस्याग्रे प्रगायेतां[4] शुश्रूषुर्यदि राघवः ॥ न ग्राह्यं वै युवाभ्यां तद्यदि किंचित्प्रदास्यति[5] ॥ ३ ॥ इति तौ चोदितौ तत्र गायमानौ विचेरतुः ॥ यथोक्तं ऋषिणा पूर्वं तत्र तत्राभ्यगायताम् ॥ ४ ॥

(पू.) [बभूव]. ॥ सः (मू.). ॥ १ ॥ (पू.), पुरे सर्वतः वीथिषु (मू.) सीतापुत्रौ प्राह — ॥ २ ॥ ‘ राघवः यदि शुश्रूषुः, [तर्हि] (मू.) [तर्हि] युवाभ्यां[6] तद् न एव ग्राह्यं.’ ॥ ३ ॥ (पू.) तौ विचेरतुः. ॥ ऋषिणा यथा उक्तं, [तथा] (मू.). ॥ ४ ॥

१ गेली भ्रांति ज्याची, असा. २ आंतून योगी. ३ आळोआळीं. ४ गावें. ५ देईल. ६ तुह्मीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यन केलें. ॥ ४ ॥ स्वतांचें पूर्वचरित्र जागोजाग गाइलें जात आहे, ह्मणण्याची पद्धत नवीन प्रकारची सुंदर असून गायनस्वरही - फार मधुर आहेत - असें रामचंद्राच्या कानीं आलें. ॥ ५ ॥ - पुढें त्यानें ह्मणणारांचा शोध करविला तों - ते दोन लहान मुलगे आहेत असें कळलें; तेव्हां रामाला फार कौतुक वाटलें. नंतर यज्ञकर्मांच्या मध्यंतरीं (दोनप्रहरीं विश्रांतीच्या वेळीं) राजानें मोठमोठ्या मुनींना बोलाविलें; ॥ ६ ॥ त्या श्रेष्ठ पुरुषानें राजे, पंडित, वैदिक, पौराणिक, वैयाकरण, वृद्धवृद्ध द्विजाति (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य), ॥ ७ ॥ ह्या सर्वांची सभा भरवून तेथें त्या गाणाऱ्या मुलांना आणविलें. राजे व ब्राह्मणादि लोक सर्वांच्या

तां स शुश्राव काकुत्स्थः पूर्वचर्यां ततस्ततः ॥ अपूर्वपाठजातिं[1] च गेयेन[2] सम[3]भिप्लुताम् ॥५॥ बालयो राघवः श्रुत्वा कौतूहलमुपेयिवान्[4] ॥ अथ कर्मान्तरे राजा समाहूय महामुनीन् ॥ ६ ॥ राज्ञश्चैव नरव्याघ्रः पण्डितांश्चैव नैगमान्[5] ॥ पौराणिकान् शब्दविदो ये च वृद्धा द्विजातयः ॥ ७ ॥ एतान्सर्वान्समाहूय गायकौ संप्रवेशयत्[6] ॥ ते सर्वे हृष्टमनसो राजानो ब्राह्मणादयः ॥ ८ ॥

सः काकुत्स्थः ततः ततः (पू.), गेयेन समभिप्लुतां (मू.) शुश्राव. ॥ ५ ॥ राघवः बालयोः [गायनं] (६ पू.). ॥ अथ नरव्याघ्रः राजा (६ मू.) समाहूय, (७ मू.) ॥ ६ ॥ ७ ॥ (मू.) [च] ॥ ८ ॥

१ ह्मणण्याची अपूर्व चाल. २ गायनानें. ३ युक्त. ४ पावलेला. ५ वैदिक. ६ आणविता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मनांला आनंद वाटला. ॥ ८ ॥ ते रामाकडे आणि त्या मुलांकडे आश्चर्यमुद्रेनें वरचेवर टकमकां पाहत : शेवटीं तेथें जमलेल्या सगळ्या समाजांत परस्परांशीं कानगोष्टी चालू झाल्या :– ॥ ९ ॥ 'कायहो ! हे मुलगे तर हुबेहुब रामासारखे दिसतात ! जशीं कांहीं बिंबाचीं प्रतिबिंबेंच पडलीं आहेत ! ह्यांच्या मस्तकीं जटा नसत्या व आंगावर वल्कलें नसतीं, ॥ १० ॥ तर राममध्यें आणि ह्यांच्यांत विशेष काय आहे, तो आपल्याला कळलाच नसता !' असे लोकांचे परस्परांशीं विस्मयोद्गार चालले होते, इतक्यांत ॥ ११ ॥ त्या दोघां मुनिपुत्रांनीं गाण्यास प्रारंभ केला. मनुष्यांत कधींही दिसून यावयाचें नाहीं असें मधुर गायन

रामं तौ दारकौ[२] दृष्ट्वा विस्मिता ह्यनिमेषणाः ॥ अवोचन्सर्व एवैते परस्परमथागताः ॥ ९ ॥ इमौ रामस्य सदृशौ बिम्बाद्बिम्बमिवोदितौ ॥ जटिलौ यदि न स्यातां न च वल्कलधारिणौ ॥१०॥ विशेषं नाधिगच्छामो राघवस्यानयोस्तदा ॥ एवं संवदतां तेषां विस्मितानां परस्परम् ॥ ११ ॥ उपचक्रमतुर्गातुं तावुभौ मुनिदारकौ ॥ ततः प्रवृत्तं मधुरं गान्धर्वमतिमानुषम् ॥ १२ ॥

अनिमेषणाः[१] [सन्तः] (पू.). ॥ अथ आगताः (मू.) अवोचन् – ॥ ९ ' (मू.) च [यदि] न [स्यातां], ॥ १० ॥ तदा राघवस्य, अनयोः [च] (पू.). ' ॥ विस्मितानां तेषां परस्परं (मू.) [सतां], ॥ ११ ॥ (पू.) गातुं उपचक्रमतुः[३]. ॥ (मू.) गान्धर्वं[४] प्रवृत्तं. ॥ १२ ॥

---

१ पापण्या न मिटणारे. २ पुत्रांना. ३ प्रारंभ करिते झाले. ४ गायन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुलगे द्रव्य घेत नाहींत.

चालू झालें. तिसरे प्रहरच्या वेळीं, गायन ऐकिल्यावर, रघुवीरानें भरताला सांगितलें कीं, ह्यांना दहा सहस्र द्रव्य द्यावें. ॥ १३ ॥ द्रव्य देत असतां मुलगे घेईनात. - ते ह्मणाले : - ‘ राजा! आह्मांला द्रव्याचा काय उपयोग? आह्मीं वनांतील फळें मुळें भक्षून राहणारे! ’ ॥ १४ ॥ इतकें - बोलून व - दिलेलें द्रव्य तेथेंच टाकून कुशलव वाल्मीकिमुनीजवळ गेले. तें स्वतांचेंच सर्व चरित्र ऐकून रामचंद्राला विस्मय वाटला; ॥१५॥ त्यानें, ते सीतेचे पुत्र आहेत असें जाणून, शत्रुघ्न, हनुमान् सुषेण, विभीषण, व अंगद, ह्यांना आज्ञा दिली :–

श्रुत्वा तन्मधुरं गीतमपराह्णे[1] रघूत्तमः ॥ उवाच भरतं चाभ्यां दीयतामयुतं वसु[2] ॥ १३ ॥ दीयमानं सुवर्णं तु न तज्जगृहतुस्तदा ॥ किमनेन सुवर्णेन राजन्नौ वन्यभोजनौ ॥ १४ ॥ इति संत्यज्य संदत्तं जग्मतुर्मुनिसन्निधिम् ॥ एवं श्रुत्वा तु चरितं रामः स्वस्यैव विस्मितः ॥१५॥ ज्ञात्वा सीताकुमारौ तौ शत्रुघ्नं चेदमब्रवीत् ॥ हनूमन्तं सुषेणं च विभीषणमथांगदम् ॥ १६ ॥

राघवः अपराण्हे (पू.) श्रुत्वा भरतं उवाच – ‘ (मू.) दीयतां[3] ’ ॥ १३ ॥ तदा दीयमानं तत् (पू.). ॥ ‘ राजन्, नौ अनेन सुवर्णेन किं? [यतः आवां] (मू.). ॥ १४ ॥ इति [उक्त्वा], सन्दत्तं संत्यज्य[4] (पू.) जग्मतुः. ॥ रामः एवं स्वस्यैव चरितं (मू.), ॥ १५ ॥ तौ सीताकुमारौ (मू.) च इदं अब्रवीत – ॥ १६ ॥

१ तिसरे प्रहरीं. २ द्रव्य. ३ द्यावें. ४ टाकून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ १६ ॥ 'सर्वज्ञ परमोदार श्रेष्ठतम देवतुल्य वाल्मीकि मुनींना सीतेसहवर्तमान येथें घेऊन या. ॥ १७ ॥ जानकीनें ह्या सभेमध्यें लोकांचा विश्वास बसण्यासाठीं शपथ घ्यावी. सकल जनांना, सीता निष्पाप आहे, असें कळलें पाहिजे.' तें वचन ऐकिल्यावर सर्वांना अत्यंत आश्चर्य वाटलें. रामाच्या सेवकांनीं वाल्मीकिमुनीकडे जाऊन त्यांला रामाचें इत्थंभूत ह्मणणें निवेदन केलें. ॥ १८ ॥ १९ ॥ रामाच्या मनांतील सर्व अभिप्राय जाणून वाल्मीकिमुनींनीं दूतांना सांगितलें :– 'उद्यां सीता सर्व लोकांच्या सभेंत शपथ घेईल. ॥ २० ॥ स्त्रियांचें परमदैवत काय तें पतिच होय, ह्यांत संदेह नाहीं.' तें ऐकून सर्व

भगवन्तं महात्मानं वाल्मीकिं मुनिसत्तमम् ॥ आनयध्वं मुनिवरं ससीतं देवसंमितम् ॥ १७ ॥ अस्यास्तु पर्षदो मध्ये प्रत्ययं जनकात्मजा ॥ करोतु शपथं सर्वे जानन्तु गतकल्मषाम् ॥ १८ ॥ सीतां तद्वचनं श्रुत्वा गताः सर्वेऽतिविस्मिताः ॥ ऊचुर्यथोक्तं रामेण वाल्मीकिं रामपार्षदाः ॥ १९ ॥ रामस्य हृद्गतं सर्वं ज्ञात्वा वाल्मीकिरब्रवीत् ॥ श्वः करिष्यति वै सीता शपथं जनसंसदि ॥ २० ॥ योषितां परमं दैवं पतिरेव न संशयः ॥ तच्छ्रुत्वा सहसा गत्वा सर्वे प्रोचुर्मुनेर्वचः ॥ २१ ॥

' (मू.) वाल्मीकिं आनयध्वं. ॥ १७ ॥ जनकात्मजा (१८ पू.) शपथं करोतु. सर्वे सीतां (१८ मू.) जानन्तु.' ॥ सर्वे रामपार्षदाः (१९ पू.) [सन्तः] रामेण यथा उक्तं, [तथा] (मू.) ऊचुः – ॥१८॥१९॥ वाल्मीकिः सर्वं (पू.) – (मू.) श्वः शपथं करिष्यति. ॥ २० ॥ पतिः एव (२१ पू.). ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दूत लागलेच परत गेले; व त्यांनीं ऋषींचें उत्तर रामाला कळविलें. रामही मुनींचा संदेश (निरोप) ऐकिल्यावर लोकांना ह्मणाला :– ' सकल राजे आणि मुनिहो! ऐका ॥ २१ ॥ २२ ॥ उद्यां सीता शपथ घेणार आहे; आपण सर्वांनीं ती ऐकून धर्माधर्माचा काय तो निर्णय ठरवावा. ' रामानें असें सांगितलें असतां - दुसरे दिवशीं - सर्व लोक तो प्रकार पाहण्याच्या इच्छेनें ॥ २३ ॥ तेथें जमले – ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, महान् महान् ऋषि, वानर असे विविधजन कौतुकाविष्ट होऊन तेथें आले.॥२४॥ नंतर मुनिश्रेष्ठ वाल्मीकि सीतेसह तेथें आले. सीता वाल्मीकिमुनींला पुढें करून (मुनींच्या पाठीमागून) व मुख किंचित् खालीं घालून (मर्यादशीलपणें) आली. ॥ २५ ॥ तिनें हात जोडिले होते. तिचा कंठ गहिं-

राघवस्यापि रामोऽपि श्रुत्वा मुनिवचस्तथा ॥ राजानो मुनयः सर्वे शृणुध्व-मिति चाब्रवीत् ॥ २२ ॥ सीतायाः शपथं लोका विजानन्तु शुभाशुभम् ॥ इत्यु-क्ता राघवेणाथ लोकाः सर्वे दिदृक्षवः ॥ २३ ॥ ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः शूद्राश्चैव महर्षयः ॥ वानराश्च समाजग्मुः कौतूहलसमन्विताः ॥ २४ ॥ ततो मुनिवरस्तूर्णं ससीतः समुपागमत् ॥ अग्रतस्तमृषिं कृत्वा ऽऽयान्ती किंचिदवाङ्-मुखी ॥२५॥ कृताञ्जलिर्बाष्पकण्ठी सीता यज्ञं विवेश तम् ॥

सर्वे (२१मू.) राघवस्य अपि मोचुः. तथा (२२ पू.) श्रुत्वा, (मू.) ॥ २१ ॥ २२ ॥ लोकाः (पू.) शपथं विजानन्तु. अथ राघवेण (मू.) ॥ २३ ॥ (मू.) [सन्तः] समाजग्मुः. ॥ २४ ॥ ततः ससीतः (पू.). ॥ तं ऋषिं (मू.) ॥ २५ ॥ (२६ पू.) यज्ञं विवेश. ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वरून आला होता. अशा स्थितींत ती यज्ञमंडपांत शिरली. लक्ष्मी ब्रह्मदेवाच्या पाठीमागून चालत यावी तशी सीता मुनीच्या मागून येत आहे, असें पाहून जनसमूहांतून मोठा साधुवाद ('वाहवा' असा शब्द) उठला. ॥२६॥ त्यावेळीं श्रेष्ठ मुनि वाल्मीकि सीतेसह जनसमाजांत शिरले आणि रामाला ह्मणाले :- ॥२७॥ 'हे दशरथपुत्रा! ही सीता पातिव्रत्यापासून कधींही ढळली नाहीं; ही धर्मप्रमाणें वागणारी ॥ २८ ॥ अर्थात निष्पाप आहे. असें असून, रामा! तूं लोकापवादाला भिऊन भयंकर अरण्यांत माझ्या आश्रमाजवळ बरेच दिवसांपूर्वी हिला सोडून दिलेंस. ॥२९॥ ह्मणून, विश्वासासाठीं सीता तुला आतां कांहीं प्रत्यय दाखविणार आहे. त्या गोष्टीला तूं अनुज्ञा दे. हे दोघे (कुशलव) सीतेचे जुळे जन्मलेले मुलगे आहेत; ॥३०॥

दृष्ट्वा लक्ष्मीमिवायान्तीं ब्रह्माणमनुयायिनीम् ॥ वाल्मीकेः पृष्ठतः सीतां साधुवादो महानभूत् ॥ २६ ॥ तदा मध्ये जनौघस्य प्रविश्य मुनिपुंगवः ॥ सीतासहायो वाल्मीकिरिति प्राह च राघवम् ॥२७ ॥ इयं दाशरथे सीता सुव्रता धर्मचारिणी ॥२८॥ अपापा ते पुरा त्यक्ता ममाश्रमसमीपतः ॥ लोकापवादभीतेन त्वया राम महावने ॥ २९ ॥ प्रत्ययं दास्यते सीता तदनुज्ञातुमर्हसि ॥ इमौ तु सीतातनयाविमौ यमलजातकौ ॥ ३० ॥

(२६ पू.) लक्ष्मीं इव (२६ उ.) आयान्तीं सीतां दृष्ट्वा महान साधुवादः अभूत्. तदा सीतासहायः मुनिपुङ्गवः वाल्मीकिः जनौघस्य (२७ मू.) राघवं इति प्राह-॥' दाशरथे, (मू.). ॥२६॥२७॥२८॥ राम, अपापा अपि [सा] महावने (मू.) त्यक्ता. ॥ २९ ॥ सीता ते (मू.). ॥ ३० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वाल्मीकीची सीतेविषयीं सांगी.

कोणाही शूराला - ह्या तुझ्या पुत्रांचा पराभव करणें फार कठिण जाईल. रघुकुलभूषणा ! मी प्रचेता प्रजापतीचा दहावा पुत्र आहें; यावज्जन्मांत कधीं असत्य भाषण उच्चारिलेलें मला स्मरत नाहीं. - आणि तोच सत्यवक्ता मी - तुला सांगतों कीं, हे मुलगे तुझे आहेत. मी पुष्कळ सहस्र वर्षें उत्तम तपश्चर्या केली आहे, ॥ ३१ ॥ ३२॥ - ती सर्व पणाला लावून सांगतों कीं, - जर सीतेकडून दुराचरण घडलें असेल, तर मला त्या तपश्चर्येचें फळ मुळींच मिळणार नाहीं.' वाल्मीकीनें असें सांगितलें असतां रामानें त्याला प्रतिवचन दिलें :– ॥ ३३ ॥ ' मुने! आपण महाज्ञानी व सदाचरणी आहां. आपलें ह्मणणें सत्य होय. आपल्या पवित्र वचनांनीं माझ्या मनाला विश्वास उत्पन्न केला. ॥ ३४ ॥ जानकीनें लंकेमध्येंही देवांच्या समक्ष मला मोठा प्रत्यय दिला

सुतौ तु तव दुर्धर्षौ तथ्यमेतद्ब्रवीमि ते ॥ प्रचेतसोऽहं दशमः पुत्रो रघुकुलोद्वह ॥३१॥ अनृतं न स्मराम्युक्तं यथेमौ तव पुत्रकौ ॥ बहून्वर्षगणान् सम्यक्तपश्चर्या मया कृता ॥ ३२ ॥ नोपाश्नीयां फलं तस्या दुष्टेयं यदि मैथिली ॥ वाल्मीकिनैवमुक्तस्तु राघवः प्रत्यभाषत ॥ ३३ ॥ एवमेतन्महाप्राज्ञ यथा वदसि सुव्रत ॥ प्रत्ययो जनितो मह्यं तव वाक्यैरकिल्बिषैः ॥ ३४ ॥ लंकायामपि दत्तो मे वैदेह्या प्रत्ययो महान् ॥ देवानां पुरतस्तेन मन्दिरे संप्रवेशिता ॥ ३५ ॥

दुर्धर्षौ [इमौ] तव सुतौ. ते एतत् (पू.).॥ रघुकुलोद्वह, अहं (मू.). ॥ ३१ ॥ यथा अनृतं उक्तं न स्मरामि [तथा] (पू.) [इति सत्यं एव]. ॥ मया (मू.). ॥३२॥ इयं मैथिली यदि दुष्टा, [तर्हि] तस्याः फलं न उपाश्नीयां.' ॥(मू.)– ॥३३॥ (पू.), यथा वदसि, एवं एतत्. ॥ अकिल्बिषैः तव वाक्यैः मह्यं (मू.). ॥ ३४ ॥ वैदेह्या मे लङ्कायां अपि देवानां पुरतः महान् प्रत्ययः दत्तः (मू.).॥३५॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होता; ह्मणून मी तिला मंदिरांत घेतलें. ॥ ३५ ॥ द्विजवरा ! ती ही जानकी निर्दोष असतांही, लोकांच्या भीतीस्तव कांहीं वर्षांपूर्वीं मी हिचा त्याग केला. ह्याबद्दल आपण मला क्षमा करावी. ॥ ३६ ॥ हे दोघे पुत्र कुशलव मजपासूनच जन्मले, हें मी जाणतों. सीता पवित्र आहे असें सर्व पृथ्वीवर प्रसिद्ध झालें, आतां माझी हिजवर प्रीति असो.' ॥३७॥ सर्व देवांना रामाचा उद्देश कळला होता; ह्मणून ते सहस्त्रावधि देव उत्सुकतेनें ब्रह्मदेवाला पुढें घालून तेथें आले. ॥ ३८ ॥ प्रजाजन आनंदित होऊन त्या स्थलीं प्राप्त झाले. रेशमी वस्त्र नेसलेली सीता उत्तरेकडे मुख करून उभी राहिली व भूमीकडे दृष्टि लावून आणि हात जोडून ह्मणाली :— ॥३९॥ 'ज्याअर्थीं मी रामावांचून इतर पुरुषाचें मनामध्यें चिंतन देखील केलें नाहीं, त्या अर्थीं मला पृथ्वी-

सेयं लोकभयाद्ब्रह्मन्नपापा ऽपि सती पुरा ॥ सीता मया परित्यक्ता भवांस्तत्क्ष-न्तुमर्हति ॥३६॥ ममैव जातौ जानामि पुत्रावेतौ कुशीलवौ ॥ शुद्धायां जगती-मध्ये सीतायां प्रीतिरस्तु मे ॥ ३७ ॥ देवाः सर्वे परिज्ञाय रामाभिप्रायमुत्सुकाः ॥ ब्रह्माणमग्रतः कृत्वा समाजग्मुः सहस्रशः ॥३८॥ प्रजाः समागमन्हृष्टाः सीता कौशेयवासिनी ॥ उदङ्मुखी ह्यधोदृष्टिः प्राञ्जलिर्वाक्यमब्रवीत् ॥३९॥ रामादन्यं यथा ऽहं वै मनसा ऽपि न चिन्तये ॥ तथा मे धरणी देवी विवरं दातुमर्हति ॥४०॥

ब्रह्मन्, मया पुरा (पू.) सीता लोकभयात् (मू.). ॥ ३६ ॥ एतौ कुशीलवौ पुत्रौ (पू.) जगती-मध्ये (मू.) प्रीतिः अस्तु. ' ॥३७॥ सर्वे (पू.) परिज्ञाय, उत्सुकाः [सन्तः] ॥ (मू.) समाजग्मुः. ॥ ३८ ॥ हृष्टाः (मू.) सीता प्रांजलिः [सती] वाक्यं अब्रवीत्—॥ ३९ ॥ ' अहं यथा (मू.). ' ॥ ४० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सीता भूगर्भांत शिरली!

देवीनें आपल्या उदरांत स्थल द्यावें.' ॥४०॥ सीतेनें असे प्रतिज्ञेचे शब्द उच्चारिल्याबरोबर पृथ्वीतलांतून एक महाविलक्षण, अतिशय चकचकीत, अत्युत्तम सिंहासन प्रकट झालें; ॥ ४१ ॥ मोठमोठ्या दिव्यदेही नागांनीं तें सूर्यासारखें तेजस्वी सिंहासन उचलून धरिलें होतें. पृथ्वीदेवीनें प्रेमपूर्वक जानकीला बाहूंनीं आलिंगन देऊन ॥ ४२ ॥ 'बाळे! आलीस. फार चांगलें झालें!' असें ह्मटलें आणि तिला त्या सिंहासनावर बसविलें. जानकी सिंहासनीं बसून भूगर्भीं प्रवेश करूं लागली, तेव्हां ॥ ४३ ॥ आकाशांतून तिजवर सारखी पुष्पवृष्टि चालली; देवांच्या मुखांतून 'वाहवा! उत्तम!' असे फार मोठे विलक्षण उद्गार निघाले. ॥ ४४ ॥ आकाशांत आलेले देव, अंतराळीं व भूमीवर असलेले स्थावर जंगम प्राणी मोठमोठे धिप्पाड वानर ह्या सगळ्यांचे,

तथा शपन्त्याः सीतायाः प्रादुरासीन्महाद्भुतम् ॥ भूतलाद्दिव्यमत्यर्थं सिंहासनमनुत्तमम् ॥ ४१ ॥ नागेन्द्रैर्ध्रियमाणं च दिव्यदेहै रविप्रभम् ॥ भूदेवी जानकीं दोर्भ्यां गृहीत्वा स्नेहसंयुता ॥ ४२ ॥ स्वागतं तामुवाचैनामासने संन्यवेशयत् ॥ सिंहासनस्थां वैदेहीं प्रविशन्तीं रसातलम् ॥ ४३ ॥ निरन्तरा पुष्पवृष्टिर्दिव्या सीतामवाकिरत् ॥ साधुवादश्च सुमहान् देवानां परमाद्भुतः ॥ ४४ ॥ ऊचुश्च बहुधा वाचो अन्तरिक्षगताः सुराः ॥ अन्तरिक्षे च भूमौ च सर्वे स्थावरजंगमाः ॥ ४५ ॥

सीतायाः तथा शपन्त्याः [सत्याः] भूतलात् (४१ मू.) दिव्यदेहैः (४२ पू.) सिंहासनं प्रादुरासीत्. ॥ स्नेहसंयुता (मू.), ॥ ४१ ॥ ४२ ॥ तां (पू.) च. ॥ (मू.) प्रविशन्तीं ॥ ४३ ॥ सीतां, दिव्या (पू.) अवाकिरत्. ॥ (मू.) देवानां साधुवादः च [आसीत्]. ॥ ४४ ॥ (पू.) बहुधा वाचः ऊचुः. ॥ सर्वे स्थावरजङ्गमाः (मू.). [ऊचुः]. ॥ ४५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सीतेनें शपथ वाहिली (दिव्य केलें), ह्याबद्दल निरनिराळे उद्गार निघूं लागले (कोणी ह्मणे 'सीतेनें असें करायाचें नव्हतें.' कोणी ह्मणे 'लंकेंत एकदां दिव्य केलें, आणि आतां पुन्हां कशाला करायला पाहिजे होतें?' असे प्रत्येकाचे निरनिराळे विचार बाहेर येऊं लागले). कोणी - 'आतां सीता कोठें जाईल' अशी - चिंता करीत बसले. कोणी - भूमींत शिरतांना दिसलेल्या सीतेचें - ध्यान करूं लागले. ॥४५॥४६॥ कांहींजण रामाकडे पाहत राहिले; कित्येकजण सीतेबद्दल विचार करूं लागले. एकंदरींत कोणाचेंही चित्त स्वस्थ होईना. कांहींवेळपर्यंत तें सगळें स्थल अगदीं स्तब्ध व अचेतन झालें होतें (कोणी हालचाल करीना कीं शब्द बोलेना). ॥ ४७ ॥ सीता पृथ्वीच्या पोटांत शिरली असें पाहून सगळ्या जगाला मोह पडला. रामाला सर्व कळत होतेंच; परंतु पुढील महत्त्वाच्या कर्तव्यावर लक्ष्य देऊन तो ॥ ४८ ॥ अज्ञानी मनुष्या-

वानराश्च महाकायाः सीताशपथकारणात् ॥ केचिच्चिन्तापरास्तस्याः केचिद्ध्या-
नपरायणाः ॥४६॥ केचिद्रामं निरीक्षन्तः केचित्सीतामचेतसः ॥ मुहूर्तमात्रं तत्सर्वं
तूष्णींभूतमचेतनम् ॥४७॥ सीताप्रवेशनं दृष्ट्वा सर्वं संमोहितं जगत् ॥ रामस्तु सर्वं
ज्ञात्वैव भविष्यत्कार्यगौरवम्॥४८॥अजानन्निव दुःखेन शुशोच जनकात्मजाम्॥
ब्रह्मणा ऋषिभिः सार्धं बोधितो रघुनन्दनः ॥ ४९ ॥

महाकायाः (पू.) [बहुधा वाचः ऊचुः]. ॥ केचित् तस्याः (मू.) [आसन्]. ॥ ४६ ॥ (पू.) निरीक्षन्तः [आसन्]. केचित् सीतां [दृष्ट्वा] अचेतसः [आसन्]. तत् सर्वं (मू.) ॥ ४७ ॥ (पू.). संमोहितं. ॥ (मू.). ज्ञात्वा एव ॥ ४८ ॥ (पू.) शुशोच. (मू.) ॥ ४९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सारखा दुःखी होऊन जानकीसाठीं शोक करूं लागला. ऋषींसह ब्रह्मदेवानें रघुकुमाराला बोध केला.॥४९॥ तेव्हां त्यानें स्वप्नांतून जागा झाल्याप्रमाणें उठून अवशिष्ट यज्ञकर्में समाप्त केलीं व तेथें आलेल्या सर्व ऋषींना आणि ऋत्विजांना निरोप दिला. ॥५०॥ निरोप देतांना त्यानें सर्वांना विपुल द्रव्य व रत्नें देऊन संतुष्ट केलें. पुढें प्रभु त्या दोघां मुलांना घेऊन अयोध्येस आला. ॥५१॥ तेव्हांपासून राम नित्य सर्व उपभोगांविषयीं निरिच्छ होत्साता एकांतीं बसे व आत्मचिंतनांत सतत निमग्न राही. ॥ ५२ ॥ एके दिवशीं राम नित्याप्रमाणें एकांतीं ध्यानस्थ बसला होता. कौसल्येला विदित होतें कीं, हा साक्षात् नारायण होय. ती नित्य मधुर भाषण करीत असे. ॥ ५३ ॥ तिनें जवळ येऊन प्रसन्नवदन अशा रामचंद्राला भक्तिपूर्वक वंदन

प्रतिबुद्ध इव स्वप्नाच्चकारानन्तराः क्रियाः ॥ विससर्ज ऋषीन्सर्वानृत्विजो ये समागताः ॥५०॥ तान्सर्वान् धनरत्नाद्यैस्तोषयामास भूरिशः ॥ उपादाय कुमारौ तावयोध्यामगमत्प्रभुः ॥५१॥ तदादि निःस्पृहो रामः सर्वभोगेषु सर्वदा ॥ आत्मचिन्तापरो नित्यमेकान्ते समुपस्थितः ॥ ५२ ॥ एकान्ते ध्याननिरते एकदा राघवे सति॥ ज्ञात्वा नारायणं साक्षात्कौसल्या प्रियवादिनी ॥ ५३ ॥ भक्त्या ऽऽगत्य प्रसन्नं तं प्रणता प्राह हृष्टधीः ॥ राम त्वं जगतामादिरादिमध्यान्तवर्जितः ॥५४॥

स्वप्नात् (पू.) चकार, ॥ सर्वान् ऋषीन् विससर्ज, ये (मू.), ॥ ५० ॥ (पू.) तोषयामास. प्रभुः तौ कुमारौ (मू.). ॥ ५१ ॥ (पू.) निस्पृहः (मू.). ॥ ५२ ॥ राघवे एकदा (मू.) कौसल्या [तं] साक्षात् नारायणं ज्ञात्वा, ॥ ५३ ॥हृष्टधीः [सती] (पू.) [सती] प्राह–‘ (मू.) ॥ ५४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केलें आणि संतुष्ट मनानें प्रश्न केला :– ' रामा ! तूं सर्व जगाचें आदि कारण आहेस. तुला आदि, मध्य व अंत नाहींत. ॥ ९४ ॥ तूं परमात्मा, परमानंदरूपी, पूर्ण, सर्वांतर्यामी व सर्वशक्ति असतांही माझ्या उदरीं जन्म घेतलास हें माझें परमपुण्य होय. ॥ ९५ ॥ रघुकुलवरा ! मला स्वतांच्या वृद्धावस्थेंत आणि तुझाही अवतार समाप्त होण्याच्या वेळीं तुला प्रश्न करण्यास वेळ सांपडला ! अद्यापि माझा अज्ञानापासून उद्भवलेला संसाररूपी बंध निःशेष निवृत्त होत नाहीं ! ॥ ९६ ॥ हे सर्वव्यापका ! मला, सध्यांच्या अवस्थेंतही, ज्यायोगें संसाररूप बंधन नाहींसें करणारें ज्ञान होईल असा संक्षेपांत बोध कर. ' ॥ ९७ ॥ मातेनें विषयोपभोगाविषयीं विरक्त होऊन असा प्रश्न केला असतां, मातृवत्सल, दयालु व परमधार्मिक प्रभु रामचंद्र वृद्धपणामुळें जर्जर झालेल्या आपल्या साध्वी मातेला ह्मणाला :– ॥ ९८ ॥

परमात्मा परानन्दः पूर्णः पुरुष ईश्वरः ॥ जातोऽसि मे गर्भगृहे मम पुण्यातिरेकतः ॥ ५५ ॥ अवसाने ममाप्यद्य समयोऽभूद्रघूत्तम ॥ नाद्याप्यबोधजः कृत्स्नो भवबन्धो निवर्तते ॥ ५६ ॥ इदानीमपि मे ज्ञानं भवबंधनिवर्तकम् ॥ यथा संक्षेपतो भूयात्तथा बोधय मां विभो ॥५७॥ निर्वेदवादिनीमेवं मातरं मातृवत्सलः ॥ दयालुः प्राह धर्मात्मा जराजर्जरितां शुभाम् ॥ ५८ ॥

(पू.) ॥ त्वं (मू.) मे गर्भगृहे जातः असि. ॥ ५५ ॥ रघूत्तम, मम अपि अद्य (मू.) न निवर्तते. ॥ ५६ ॥ विभो, (पू.) ज्ञानं ॥ यथा भूयात्, तथा (मू.) बोधय. ॥ ५७ ॥ मातृवत्सलः दयालुः धर्मात्मा [रामः] एवं (मू.) मातरं प्राह – ॥ ५८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

" माते ! मी मोक्षप्राप्तीला साधन असे तीन मार्ग पूर्वीं सांगून ठेविले आहेत :– (१) कर्मयोग, (२) ज्ञानयोग, आणि (३) अखंड भक्तियोग. ॥ ५९ ॥ आई ! भक्तीचेही तीन भिन्नभिन्न गुणांमुळें तीन प्रकार झाले आहेत : ज्याचा जो स्वभाव त्याप्रमाणें त्याची भक्ति भिन्न असते. ॥ ६० ॥ जो मनुष्य ' अमुक माझा मित्र व अमका शत्रु ' अशी भेददृष्टि ठेवितो व मित्रत्वाचा अथवा शत्रुत्वाचा आग्रह धरून हिंसा, ढोंग किंवा मत्सर साधण्याच्या उद्देशानें माझी भक्ति करितो, त्याला ' तामस ' ह्मणतात. ॥ ६१ ॥ जो मनुष्य ' मी पूजा करणारा वेगळा व ईश्वर वेगळा ' अशी भेदबुद्धि ठेवून स्वर्गादि फळें मिळविण्याच्या इच्छेनें, भोगप्राप्तीसाठीं, व द्रव्य किंवा कीर्ति मिळविण्याकरितां मूर्ति इत्यादि स्थलीं माझी पूजा करितो, तो तर ' राजस ' होय. ॥ ६२ ॥

मार्गास्त्रयो मया प्रोक्ताः पुरा मोक्षाप्तिसाधकाः ॥ कर्मयोगो ज्ञानयोगो भक्तियोगश्च शाश्वतः ॥ ५९ ॥ भक्तिर्विभिद्यते मातस्त्रिविधा गुणभेदतः ॥ स्वभावो यस्य यस्तेन तस्य भक्तिर्विभिद्यते ॥६०॥ यस्तु हिंसां समुद्दिश्य दम्भं मात्सर्यमेव वा ॥ भेददृष्टिश्च संरंभी भक्तो मे तामसः स्मृतः ॥६१॥ फलाभिसन्धिर्भोगार्थी धनकामो यशस्तथा ॥ अर्चादौ भेदबुद्ध्या मां पूजयेत्स तु राजसः ॥ ६२ ॥

(मू.) भक्तियोगः च त्रयः मार्गाः प्रोक्ताः. ॥ ५९ ॥ मातः, (पू.) त्रिविधा भिद्यते. ॥ यस्य यः (मू.). ॥ ६० ॥ (पू.) [करोति], (मू.) च भवति, [सः] मे तामसः भक्तः स्मृतः. ॥६१॥ (पू.) तथा यशः [इच्छन्] ॥ (मू.). ॥ ६२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जो पुरुष, भेदबुद्धीनें कां होईना, पण, पापनाशाकरितां कर्म आचरून तें परमेश्वराला (मला) अर्पण करितो (ईश्वराच्या प्रेरणेनें मी कर्म केलें तें ईश्वराला अर्पित असो, असा संकल्प करितो) अथवा शास्त्रानें 'कर्म अवश्य करावें' असें सांगितलें ह्मणूनच (निरिच्छपणें) करितो, तो भक्त 'सात्विक' होय. - ह्या भक्ताला पुढें निर्गुण भक्ति करावी असें वाटूं लागतें. - ॥ ६३ ॥ मी अनंत गुणांचा आधार आहें; जसें गंगेचें उदक समुद्रांत शिरलें असतां समुद्ररूप बनतें ओळखितां देखील येत नाहीं, त्याप्रमाणें माझ्या गुणांचाच केवल आश्रय धरून (माझें चरित्रवर्णन, ध्यान व चिंतन करून), अंतःकरणाची माझ्या स्वरूपीं अखंड वृत्ति लावणें, हेंच निर्गुण भक्तियोगाचें लक्षण होय. ॥ ६४ ॥ मजविषयीं निष्काम व अखंड भक्ति उद्भवली असतां, ती भक्ताला माझी सलोकता[1], समीपता[2], सरूपता[3] किंवा सायुज्य[4] पाहिजे ती मुक्ति ॥ ६५ ॥

परस्मिन्नर्पितं यस्तु कर्म निर्हरणाय वा ॥ कर्तव्यमिति वा कुर्याद्भेदबुद्ध्या स सात्त्विकः ॥ ६३ ॥ मद्गुणाश्रयणादेव मय्यनन्तगुणालये ॥ अविच्छिन्ना मनोवृत्तिर्यथा गंगाम्बुनोऽम्बुधौ ॥ तदेव भक्तियोगस्य लक्षणं निर्गुणस्य हि ॥ ६४ ॥ अहैतुक्यव्यवहिता या भक्तिर्मयि जायते ॥ सा मे सालोक्यसामीप्यसार्ष्टिसायुज्यमेव वा ॥ ६५ ॥

(पू.) कर्म परस्मिन् अर्पितं [कुर्यात्], ॥ भेदबुद्ध्या (मू.). ॥ ६३ ॥ (पू.) मयि (द्वि.), [तथा] अविच्छिन्ना [या] मनोवृत्तिः, तत् एव निर्गुणस्य (मू.). ॥ ६४ ॥ ६५ ॥

१ मी जेथें असतों त्या लोकीं राहणें. २ माझ्या जवळ असणें. ३ माझ्या सारखें चतुर्भुज पीतांबरधारी रूप धरणें. ४ माझ्या रूपीं मिळून जाणें.

७।२०

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देत्ये पण भक्तजन माझ्या सेवेवांचून दुसरा कशाचाच अंगिकार करीत नाहींत. माते! सालोक्यादि मुक्तींचाही धिक्कार करणें हाच अत्युत्तम भक्तियोग होय. ॥ ६६ ॥ त्याच्या योगें पुरुष तीन्ही गुणांचें उल्लंघन करून माझ्या रूपीं प्राप्त होतो. - आतां कर्मयोग कसा करावयाचा तें सांगतों :- कोणत्याही फलाची इच्छा न धरितां पूर्णपणें धर्माचरण करावें; ॥ ६७ ॥ ज्यांत हिंसा नसेल तें प्रशस्त यज्ञादि कर्म करावें. - अशा कर्मांच्या योगें माझी प्राप्ति होते. आतां भक्तियोग साध्य होण्याचे उपाय सांगतों :- माझें दर्शन घ्यावें, स्तुति करावी, महापूजा बांधावी, स्मरण व वंदन करावें; ॥ ६८ ॥ सर्व भूतीं मी (परमेश्वर) भरलेला आहें अशी भावना ठेवावी, कोणावर आसक्त होऊं नये; असत्य वर्जावें; सज्जनांना पुष्कळ मान द्यावा; दुःखी प्राण्यांवर कृपा करावी; ॥ ६९ ॥ आपल्या समान योग्यतेच्या मनुष्यांशीं मैत्री धरावी; यमनियमादि पाळावे; वेदांत वाक्यें ऐकावीं; माझें नामकीर्तन करावें; ॥ ७० ॥

ददात्यपि न गृह्णन्ति भक्ता मत्सेवनं विना॥ स एवात्यन्तिको योगो भक्तिमार्गस्य भामिनि ॥ ६६ ॥ मद्भावं प्राप्नुयात्तेन अतिक्रम्य गुणत्रयम् ॥ महता कामहीनेन स्वधर्माचरणेन च ॥ ६७ ॥ कर्मयोगेन शस्तेन वर्जितेन विहिंसनम् ॥ मद्दर्शनस्तुतिमहापूजाभिः स्मृतिवन्दनैः ॥ ६८ ॥ भूतेषु मद्भावनया ऽसंगेनासत्यवर्जनैः ॥ बहुमानेन महतां दुःखिनामनुकम्पया ॥६९॥ स्वसमानेषु मैत्र्या च यमादीनां निषेवया ॥ वेदान्तवाक्यश्रवणान्मम नामानुकीर्तनात् ॥ ७० ॥

(पू.) न गृण्हन्ति. ॥ भामिनि, भक्तिमार्गस्य (मू.). ॥ ६६ ॥ तेन गुणत्रयं अतिक्रम्य (मू.). ॥ ६७ ॥ विहिंसनं वर्जितेन शस्तेन (मू.), ॥ ६८ ॥ (पू.), ॥ महतां (मू.), ॥ ६९ ॥ ७० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

साधूंचा समागम धरावा; सरळपणानें वागावें; अहंकार सोडावा; ईश्वराची प्रीति जेणेंकरून होईल ते धर्म आचरण करण्याची आवड धरावी; अशा रीतीनें वर्तन ठेविलें असतां मनुष्याचें अंतःकरण सर्वथा शुद्ध होतें. ॥७१॥ व जसा गंध वायुगतीच्या अनुरोधानें आपल्या आश्रमभूत पुष्पादि पदार्थांवरून निघून नाकांत शिरतो, त्याप्रमाणें तो पुरुष माझे गुण ऐकणें ह्या साधनाच्या योगेंच सत्वर माझ्या स्वरूपीं मिळून जातो. ॥ ७२ ॥ चित्त योगाभ्यासांत रत झालें असतां ह्या रीतीनें आत्मरूपीं संछन्न होतें. मी सर्व प्राणिसमूहांत आत्मरूपानें राहत असतों; ॥ ७३ ॥ माते ! तें माझें स्वरूप न ओळखितां, मूर्ख पुरुष, केवळ बाह्यात्कारें, अनेक यत्न करून संपादिलेल्या विविध गंधपुष्पादि सामग्रीच्या योगें माझी पूजा करील तर त्या पूजेपासून मला संतोष व्हावयाचा नाहीं. ॥ ७४ ॥ प्राण्यांचा अपमान करणाऱ्या मनुष्यानें प्रतिमेच्या ठिकाणीं माझी कितीही पूजा

सत्संगेनार्जवेणैव ह्यहमः परिवर्जनात् ॥ कांक्षया मम धर्मस्य परिशुद्धान्तरो जनः ॥ ७१ ॥ मद्गुणश्रवणादेव याति मामञ्जसा जनः ॥ यथा वायुवशाद्गन्धः स्वाश्रयाद्घ्राणमाविशेत् ॥ ७२ ॥ योगाभ्यासरतं चित्तमेवमात्मानमाविशेत् ॥ सर्वेषु प्राणिजातेषु ह्यहमात्मा व्यवस्थितः ॥ ७३ ॥ तमज्ञात्वा विमूढात्मा कुरुते केवलं बहिः ॥ क्रियोत्पन्नैर्नैकभेदैर्द्रव्यैर्मे नाम्ब तोषणम् ॥ ७४ ॥ भूतावमानिना ऽर्चायामर्चितो ऽहं न पूजितः ॥ ७५ ॥

(पू.) मम धर्मस्य (मू.) परिशुद्धान्तरः [भवति], ॥ ७१ ॥ जनः (पू.) याति. ॥ यथा गन्ध- (मू.), ॥ ७२ ॥ एवं (मू.). ॥ ७३ ॥ विमूढात्मा (पू) कुरुते. ॥ अम्ब, (मू.) न. ॥७४॥७२॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

||७८||

मूर्तिपूजेची मर्यादा.

केली तरी ती न केल्यासारखी होय. ॥ ७५ ॥ जोंपर्यंत मनुष्याच्या मनावर 'मी (ईश्वर) सर्व भूतीं राहत असतों' असा ग्रह स्थिर झाला नाहीं, तोंपर्यंतच त्यानें मूर्ति इत्यादिकांच्या आधारावर स्वकर्मांच्या योगें माझी पूजा करावी. -सर्व भूतीं ईश्वर आहे, असा मनाचा ग्रह झाला कीं मग पूज्यपूजकभावच राहत नाहीं अर्थात मूर्तिपूजा सुटतेच. - ॥ ७६ ॥ स्वात्मा आणि परमात्मा हे भिन्न आहेत असें जो मानितो, त्या भेददृष्टि ठेवणाऱ्या पुरुषाला मृत्यु भय घालणारच, ह्यांत संशय नाहीं. ॥ ७७ ॥ माते! हीं जीं वेगवेगळीं (मोजलीं मापलीं जाणारीं) भूतें दिसतात त्या सर्वांमध्यें मी एक वास करितों ह्मणून, मनुष्यानें भेदबुद्धि सोडून (सर्वत्र ज्ञानरूपी परमात्मा एक आहे असें समजून) ज्ञान, मान, मैत्री इत्यादि पूर्वीं सांगितलेल्या साधनांनीं माझी आराधना करावी. ॥ ७८ ॥ बुद्धिमान् पुरुषानें, मी ज्ञानमय शुद्ध आत्मा जीवरूपानें सर्वभूतीं राहतों असें जाणून, यच्चयावत् प्राण्यांना

तावन्मामर्चयेद्देवं प्रतिमादौ स्वकर्मभिः ॥ यावत्सर्वेषु भूतेषु स्थितं चात्मनि न स्मरेत् ॥ ७६ ॥ यस्तु भेदं प्रकुरुते स्वात्मनश्च परस्य च ॥ भिन्नदृष्टेर्भयं मृत्युस्तस्य कुर्यान्न संशयः ॥ ७७ ॥ मामतः सर्वभूतेषु परिच्छिन्नेषु संस्थितम् ॥ एकं ज्ञानेन मानेन मैत्र्या चार्चेदभिन्नधीः ॥ ७८ ॥ चेतसैवानिशं सर्वभूतानि प्रणमेत्सुधीः ॥ ज्ञात्वा मां चेतनं शुद्धं जीवरूपेण संस्थितम् ॥ ७९ ॥

(उ.), (पू.) अर्चयेत्. ॥ ७६ ॥ (पू.) भेदं प्रकुरुते, ॥ मृत्युः भिन्नदृष्टेः तस्य (मू.). ॥ ७७ ॥ अतः [पुमान्] अभिन्नधीः [सन्] परिच्छिन्नेषु (पू.) एकं मां (मू.). ॥ ७८ ॥ सुधीः (उ.) ज्ञात्वा अनिशं (मू.), ॥ ७९ ॥ ॥ ७८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अंतःकरणापासून नित्य वंदन करावें. ॥ ७९ ॥ सारांश हाच कीं, ईश्वर आणि जीव हे भिन्न आहेत, असें कधींही मनांत आणूं नये. माते! मी तुला भक्तियोग आणि ज्ञानयोग सांगितला. ॥ ८० ॥ ह्यांपैकीं कोणत्याही एकाचा आश्रय केला तरी मनुष्याला शांति प्राप्त होते. ह्मणून, आई! तूं माझें, 'मी सर्व भूतांच्या अंतरीं राहतों - ह्मणून परम पूज्य ईश्वर आहें -' अशा भक्तियोगानें, ॥८१॥ अथवा 'मी तुझा पुत्र आहें' अशा भावनें, नित्य स्मरण करीत जा; ह्मणजे तुला शांतिसुख प्राप्त होईल." रामाचें भाषण ऐकिल्यावर कौसल्येला आनंद वाटला. ॥ ८२ ॥ पुढें ती आपल्या हृदयांत रामाचेंच सर्वदा ध्यान करीत राहिली व शेवटीं संसारबंधन तोडून आणि - सात्विक राजस तामस अशा - तीन्ही गति उल्लंघून अत्युत्तम पदास पावली.

तस्मात्कदाचिन्नेक्षेत[1] भेदमीश्वरजीवयोः ॥ भक्तियोगो ज्ञानयोगो मया मातरुदीरितः[2] ॥ ८० ॥ आलम्ब्यैकतरं[3] वा ऽपि पुरुषः शममृच्छति[4] ॥ ततो मां भक्तियोगेन मातः सर्वहृदिस्थितम् ॥ ८१ ॥ पुत्ररूपेण वा नित्यं स्मृत्वा शान्तिमवाप्स्यसि[5] ॥ श्रुत्वा रामस्य वचनं कौसल्या ऽऽनन्दसंयुता ॥ ८२ ॥ रामं सदा हृदि ध्यात्वा छित्वा संसारबन्धनम् ॥ अतिक्रम्य[6] गतीस्तिस्रो ऽप्यवाप परमां गतिम् ॥ ८३ ॥

(पू.) भेदं न ईक्षेत. ॥ मातः, मया (मू.) [च] उदीरितः ॥ ८० ॥ पुरुषः एकतरं वा अपि (मू.) मां भक्तियोगेन, ॥ ८१ ॥ (पू.). ॥ रामस्य वचनं (मू.) कौसल्या ॥ ८२ ॥ (पू.) छित्वा, ॥ तिस्रः अपि गतीः (मू.) अवाप. ॥ ८३ ॥

---

१ पहावें. २ सांगितलेला. ३ आश्रय धरून. ४ पावतो. ५ पावशील. ६ उल्लंघून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥८३॥ कैकेयीला रामचंद्रानें पूर्वींच (चित्रकूटपर्वतावर भेटायला आली होती तेव्हां) योगाचा उपदेश केला होता. तिची रामाच्या वचनावर पूर्ण विश्वासयुक्त भक्ति होती. ती शांतपणें हृदयांत रघुवीराचें चिंतन करीत असे ह्मणून मरण पावल्यावर स्वर्गलोकीं जाऊन दशरथासह आनंदांत राहिली. तिला तेथें तेजःपुंज शरीर प्राप्त झालें. तशीच लक्ष्मणाच्या मातेचीही (सुमित्रेची) बुद्धि निर्मल झाली होती. तीही परलोकीं पतीच्या सन्निध प्राप्त झाली. ॥ ८४ ॥ ॥ इति उत्तरकाण्डे सप्तमः सर्गः ॥ ७ ॥

शंकर ह्मणाले :– पार्वती राम राज्य चालवीत असतां एके वेळीं महापराक्रमी भरताला युधाजित मामाकडून - आपल्या देशाजवळ असलेल्या गंधर्वदेशांतील कांहीं गंधर्वांचा वध करण्यासाठीं - बोलावणें आलें;

कैकेयी चापि योगं रघुपतिगदितं पूर्वमेवाधिगम्य श्रद्धाभक्तिप्रशांता हृदि रघुतिलकं भावयन्ती गतासुः[1]॥ गत्वा स्वर्गं स्फुरन्ती दशरथसहिता मोदमाना[2]ऽवतस्थे[3] माता श्रीलक्ष्मणस्याप्यतिविमलमतिः प्राप भर्तुः समीपम् ॥ ८४ ॥ इति मातॄणां स्वर्गप्रस्थानं नाम सप्तमः सर्गः ॥७॥ श्रीमहादेव उवाच । अथ काले गते कस्मिन् भरतो भीमविक्रमः॥ युधाजिता मातुलेन ह्याहूतोऽगात्ससैनिकः ॥१॥

कैकेयी च अपि पूर्वं एव रघुपतिगदितं (पू.) [सती] ॥ स्वर्गं (मू.) माता अतिविमलमतिः [सती] भर्तुः समीपं प्राप. ॥ ८४ ॥ इति श्रीमदध्यात्मरामायणान्वये उत्तरकाण्डे सप्तमः सर्गः ॥ ७ ॥ श्रीम० उ० – अथ कस्मिन् काले गते [सति] (पू.) भरतः (मू.) [उन्] ससैनिकः अगात्. ॥ १ ॥

१ गेले प्राण जिचे, अशी. २ आनंद पावणारी. ३ राहिली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मणून भरत सैन्यासह तिकडे जावयास निघाला. ॥ १ ॥ त्या रघुकुमारानें रामाची आज्ञा घेतली, तिकडे जाऊन तीन कोटि गंधर्वनायकांचा वध केला, व तेथें दोन नगरें वसविलीं. ॥ २ ॥ - भरताला दोन पुत्र होते : त्यांचीं नांवें पुष्कर आणि तक्ष अशीं होतीं : त्यानें नवीन वसविलेल्या नगरांचीं नांवें तरी आपल्या पुत्रांच्या नांवांसारखींच ठेविलीं, - पुष्करावती नगरींत पुष्कराला आणि तक्षशिलानामक नगरींत तक्षाला अभिषेक केला, व तेथें त्यांना द्रव्य, धान्य आणि मित्रमंडळी संपादन करून दिली. ॥३ ॥ नंतर भरत पुन्हां परत येऊन रामाच्या सेवेंत तत्पर राहिला. तेव्हां रामचंद्र संतुष्ट होऊन आदरपूर्वक लक्ष्मणाला ह्मणाला :- ॥४॥ 'लक्ष्मणा ! तूं आपल्या दोन्ही मुलांना घेऊन पश्चिम दिशेकडे जा. तिकडे सर्वांना त्रास देणारे दुष्ट

रामाज्ञया गतस्तत्र हत्वा गंधर्वनायकान्॥ तिस्रः कोटीः पुरे द्वे तु निवेश्य[1] रघुनन्दनः ॥ २ ॥ पुष्करं पुष्करावत्यां तक्षं तक्षशिलाह्वये ॥ अभिषिच्य सुतौ तत्र धनधान्यसुहृद्वृतौ ॥ ३ ॥ पुनरागत्य भरतो रामसेवापरो ऽभवत् ॥ ततः प्रीतो रघुश्रेष्ठो लक्ष्मणं प्राह सादरम् ॥ ४ ॥ उभौ कुमारौ सौमित्रे गृहीत्वा पश्चिमां दिशम् ॥ तत्र भिल्लान्विनिर्जित्य दुष्टान् सर्वापकारिणः[2] ॥ ५ ॥

तत्र (पू.) रघुनन्दनः तिस्रः कोटीः गन्धर्वनायकान् हत्वा द्वे (मू.), ॥ २ ॥ (मू.) सुतौ तत्र अभिषिच्य, ॥ ३ ॥ भरतः (मू.) [यथा तथा] प्राह - ॥ ४ ॥ ' सौमित्रे, (पू.) [याहि]. (मू.) भिल्लान् विनिर्जित्य[3]. ॥ ५ ॥

१ वसवून. २ सर्वांना पीडा देणाऱ्या. ३ जिंकून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भिल्ल फार झाले आहेत. त्यांचा पराभव कर. ॥ ५ ॥ अंगद व चित्रकेतु (लक्ष्मणाचे मुलगे) दोघेही महाबुद्धिमान् व पराक्रमी आहेत. त्यांना दोन नगरें वसवून दे. त्यांत हत्ती, घोडे, द्रव्य, रत्नें ह्यांचा संग्रह करव. ॥ ६ ॥ व त्या ठिकाणीं पुत्रांना राज्याभिषेक करून पुन्हां सत्वर मजकडे परत ये. ' लक्ष्मण रामाची आज्ञा मान्य करून हत्ती, घोडे, सैन्य व वाहनें यांसह ॥७॥ तिकडे गेला. त्यानें सर्व शत्रूंचा वध करून तेथें दोघां पुत्रांची स्थापना केली. नंतर तो पुन्हां परत येऊन रामाच्या सेवेंत तत्पर राहिला. ॥ ८ ॥ ह्या गोष्टीला बरेच दिवस लोटले. प्रभु राम नेहमीं धर्ममार्गानें चालत असे. पुढें एके प्रसंगीं, काल, ऋषीचा वेष घेऊन, रामाला भेटण्यासाठीं आला व लक्ष्मणाला ह्मणाला :– ॥ ९ ॥

अंगदश्चित्रकेतुश्च महासत्वपराक्रमौ ॥ द्वयोर्द्वे नगरे कृत्वा गजाश्वधनरत्नकैः
॥६॥ अभिषिच्य सुतौ तत्र शीघ्रमागच्छ मां पुनः ॥ रामस्याज्ञां पुरस्कृत्य गजा-
श्वबलवाहनः ॥७॥ गत्वा हत्वा रिपून् सर्वान् स्थापयित्वा कुमारकौ ॥ सौमित्रिः
पुनरागत्य रामसेवापरो ऽभवत् ॥८॥ ततस्तु काले महति प्रयाते रामं सदा धर्म-
पथे स्थितं हरिम् ॥ द्रष्टुं समागादृषिवेषधारी कालस्ततो लक्ष्मणमित्युवाच॥९॥

(मू.)[युक्ते] द्वे नगरे कृत्वा, ॥६॥ तत्र सुतौ (७ पू.) शीघ्रं आगच्छ. ' ॥ सौमित्रिः (७ उ.) गत्वा, सर्वान् (८ पू.) स्थापयित्वा (मू.). ॥ ७ ॥ ८ ॥ ततः महति काले प्रयाते [सति] ऋषिवेषधारी कालः (पू.) रामं (मू.) – ॥ ९ ॥

१ मान्य करून.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

‘हे बुद्धिमंता (लक्ष्मणा)! मी अतिबल नांवाच्या ऋषीचा दूत असून, पुरुषोत्तमाला (परमेश्वराला) भेटावें, अशी इच्छा करितों. - ही वार्ता आंत जाऊन रामाला - कळव. त्या श्रेष्ठ महर्षीची रामाजवळ फारा दिवसांची कांहीं विज्ञापना आहे. ’ ॥१०॥ लक्ष्मण त्याचें तें भाषण ऐकून सत्वर आंत गेला; व त्यानें तपस्वी आल्याचें वर्तमान रामाला कळविलें. ॥ ११ ॥ लक्ष्मणाच्या मुखांतून ते शब्द निघाल्याबरोबर रामानें त्याला सांगितलें :– ‘ बा! मुनीला सत्कारपूर्वक सत्वर आंत घेऊन ये. ’ ॥ १२ ॥ लक्ष्मणानें ‘आज्ञा प्रमाण’ ह्मणून त्या ऋषीला आंत आणून पोंचविलें. त्या तपोनिधीचें स्वाभाविक तेज, घृताची आहुति दिल्यामुळें प्रज्वलित

निवेदयस्वातिबलस्य दूतं मां द्रष्टुकामं पुरुषोत्तमाय॥ रामाय विज्ञापनमस्ति तस्य महर्षिमुख्यस्य चिरार्य धीमन्॥१०॥ तस्य तद्वचनं श्रुत्वा सौमित्रिस्त्वरया ऽन्वितः॥ आचचक्षे ऽथ रामाय स संप्राप्तं तपोधनम्॥११॥ एवं ब्रुवन्तं प्रोवाच लक्ष्मणं राघवो वचः॥ शीघ्रं प्रवेश्यतां तात मुनिः सत्कारपूर्वकम् ॥१२॥ लक्ष्मणस्तु तथेत्युक्त्वा प्रावेशयत तापसम्॥ स्वतेजसा ज्वलन्तं तं घृतसिक्तं यथा ऽनलम्॥१३॥

‘ धीमन्, [रामं] द्रष्टुकामं (पू.) निवेदयस्व. ॥ (मू.) रामाय विज्ञापनं अस्ति. ’॥ १० ॥ (पू.) सः सौमित्रिः ॥ (मू.) आचचक्षे. ॥ ११ ॥ राघवः (पू.) प्रोवाच– ॥ ‘(मू.) शीघ्रं प्रवेश्यतां. ॥ १२ ॥ (पू.) यथा घृतसिक्तं अनलं, [तथा] (उ.) तापसं प्रावेशयत. ॥ १३ ॥

---

१ बुद्धिमंता. २ फार दिवसांचें. ३ सांगता झाला. ४ तुपानें शिंपलेल्या. ५ अग्नीस. ६ पोंचविता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कालमुनीचा सत्कार.

झालेल्या अग्नीप्रमाणें, दिसत होतें. ॥ १३ ॥ स्वतांच्या अतुल तेजानें प्रकाशमान अशा त्या मुनीनें रामाजवळ जाऊन मधुर वाणीनें त्याला 'तुझा उत्कर्ष होवो (तुला भूलोकींच्या राज्यापेक्षां अधिक योग्यतेचें राज्य मिळो)' असा आशीर्वाद दिला. ॥ १४ ॥ रामानें स्वस्थ अंतःकरणेंकरून त्या मुनीची यथाविधि पूजा केली. मुनीनें रामाला कुशलप्रश्न केले. रामानेंही त्याला खुशाली विचारिली. ॥ १५ ॥ पुढें दिव्य सिंहासनीं बसलेल्या रामचंद्रानें त्या तपोनिधीला विनंति केली :– 'महाराज! आपण ज्यासाठीं येथें आलां, तो - आपल्या गुरूंचा संदेश (निरोप) - मला निवेदन करा.' ॥ १६ ॥ रामानें असें भाषण करून प्रेरणा दिली, तेव्हां मुनि ह्मणाला :– 'रामा! आगोदर येथें आपण दोघेच असूं,

सोऽभिगम्य रघुश्रेष्ठं दीप्यमानः स्वतेजसा ॥ मुनिर्मधुरवाक्येन [1]वर्धस्वेत्याह राघवम् ॥ १४ ॥ तस्मै स मुनये रामः पूजां कृत्वा यथाविधि ॥ पृष्ट्वाऽनामयमव्यग्रो रामः पृष्टोऽथ तेन सः ॥ १५ ॥ दिव्यासने समासीनो रामः प्रोवाच तापसम् ॥ यदर्थमागतोऽसि त्वमिह तत्प्राप[5]यस्व मे ॥ १६ ॥ वाक्येन चोदितस्तेन रामेणाह मुनिर्वचः ॥ [6]द्वन्द्वमेव प्रयोक्त[7]व्यमनालक्ष्यं तु तद्वचः ॥ १७ ॥

स्वतेजसा दीप्यमानः सः मुनिः रघुश्रेष्ठं (मू.) आह. ॥ १४ ॥ अ[2]व्यग्रः रामः तस्मै मुनये [3]अनामयं [4]पृष्ट्वा, यथाविधि (पू.) [स्थितः]. अथ तेन (मू.) रामः [अनामयं] पृष्टः. ॥ १५ ॥ (पू.) प्रोवाच– ॥ 'त्वं इह (मू.) प्रापयस्व.' ॥१६॥ रामेण तेन (पू.) आह– ॥ '(मू.) [तृतीयेन] [8]अनालक्ष्यं. ॥१७॥

१ उत्कर्ष पाव. २ स्वस्थ. ३ खुशाली. ४ विचारून. ५ पोंचव. ६ दोघे. ७ योजावें. ८ न जाणण्याजोगें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशी व्यवस्था कर. तो निरोप कोणाला (तिसऱ्याला) कळतां उपयोगीं नाहीं. ॥ १७ ॥ - मी सांगणार - ती गोष्ट दुसऱ्या कोणी ऐकूंही नये, आणि कोणाला सांगण्यासारखीही नाहीं. प्रभो ! आपण बोलत असतांना कोणी ऐकेल किंवा पाहील, तर त्याचा तूं वध करावास.' ॥ १८ ॥ रामानें 'ठीक आहे' ह्मणून प्रतिज्ञा करून लक्ष्मणाला सांगितलें :– 'लक्ष्मणा ! तूं द्वारावर उभा राहा. ह्या एकांत स्थलीं कोणी मनुष्यानें येऊं नये. ॥ १९ ॥ जर येईल, तर मग तो कोणीही असो, मी त्याचा वध करीन, ह्यांत अंतर होणार नाहीं.' नंतर राम मुनीला ह्मणाला :– 'मुने ! आपल्याला ज्यानें पाठविलें त्याच्या, अथवा ॥२०॥ आपल्या स्वतांच्या, मनांत जें कांहीं बोलावयाची इच्छा असेल, तें सर्व माझ्या अग्रभागीं निवेदन करा.'

नान्येन चैतच्छ्रोतव्यं नाख्यातव्यं च कस्यचित् ॥ शृणुयाद्वा निरीक्षेद्वा यः स वध्य-
स्त्वया प्रभो ॥१८॥ तथेति च प्रतिज्ञाय रामो लक्ष्मणमब्रवीत् ॥ तिष्ठ त्वं द्वारि
सौमित्रे नायात्वत्र जनो रहः ॥ १९॥ यद्यागच्छति को वाऽपि स वध्यो मे न
संशयः ॥ ततः प्राह मुनिं रामो येन वा त्वं विसर्जितः ॥ २० ॥ यत्ते मनीषितं
वाक्यं तद्वदस्व ममाग्रतः ॥ ततः प्राह मुनिर्वाक्यं शृणु राम यथातथम् ॥२१॥

अन्येन च एतत् न (पू.) न आख्यातव्यं. ॥ प्रभो, यः (मू.) वध्यः. ॥ १८ ॥ रामः (पू.) – ॥ 'सौमित्रे, त्वं द्वारि (मू.) जनः न आयातु. ॥ १९ ॥ कः वा अपि (पू.) [तर्हि] सः मे वध्यः; न संशयः.' ॥ रामः ततः मुनिं प्राह – '(मू.), ॥ २० ॥ (पू.) वदस्व.' ॥ ततः मुनिः वाक्यं प्राह – "(मू.) शृणु ॥ २१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

.ब्रह्मदेवाचा निरोप.

तेव्हां, मुनि ह्मणाला :– " रामा ऐक. मी तुला इत्थंभूत प्रकार सांगतों. ॥ २१ ॥ प्रभो ईश्वरा! मला ब्रह्मदेवानें कांहीं कार्यासाठीं तुजकडे पाठविलें आहे. हे शत्रुनाशना देवा! मी तुझा पहिला पुत्र आहें.॥२२॥ वीरा! तूं मायेशीं समागम केलास (तिजकडे पाहिलेंस), तेव्हां मी जन्मास आलों. माझें नांव काल. मी सकल जगाचा संहार करितों. सर्व देव आणि ऋषि ज्याची पूजा करितात, त्या भगवान् ब्रह्मदेवाची तुजजवळ विज्ञापना आहे कीं, ॥ २३ ॥ 'हे महाज्ञानवंता! आतां तुझी स्वर्गलोकाचें रक्षण करण्यासाठीं परत येण्याची वेळ झाली. पूर्वकल्पाच्या समाप्तिकालीं तूं मायेच्या योगें सर्व लोकांचा संहार करून एकटाच राहिला होतास. ॥ २४ ॥ पुढें तूं भार्येचा अंगिकार करून प्रथम एक पुत्र उत्पन्न केलास; तो पुत्र मी.

ब्रह्मणा प्रेषितो ऽस्मीश कार्यार्थे ते ऽन्तिकं प्रभो ॥ अहं हि पूर्वजो देव तव पुत्रः परंतप ॥ २२ ॥ मायासंगमजो वीर कालः सर्वहरः स्मृतः ॥ ब्रह्मा त्वामाह भगवान् सर्वदेवर्षिपूजितः ॥ २३ ॥ रक्षितुं स्वर्गलोकस्य समयस्ते महामते ॥ पुरा त्वमेक एवासीर्लोकान् संहृत्य मायया ॥ २४ ॥ भार्यया सहितस्त्वं मामादौ पुत्रमजीजनः ॥ तथा भोगवतं नागमनन्तमुदकेशयम् ॥ २५ ॥

ईश, प्रभो, (पू.) प्रेषितः अस्मि. ॥ देव, परंतप, (मू.). ॥ २२ ॥ वीर, (पू.). ॥ (मू.) ब्रह्मा त्वां आह – ॥ २३ ॥ ' महामते, ते स्वर्गलोकस्य (पू.) ॥ पुरा त्वं मायया लोकान् संहृत्य (मू.). ॥ २४ ॥ आदौ (मू.) [च] अजीजनः. ॥ २५ ॥

१ आटोपून. २ उदकांत शयन करणाऱ्या. ३ उत्पन्न करिता झालास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तसाच तूं एक प्रचंड शरीराचा नाग उत्पन्न केलास; तो उदकांत राहतो; त्याचें नांव अनंत (शेष). ॥ २५॥ तूं, मायेच्या योगें, महापराक्रमी व महाशक्तिमान् असे मधु–कैटभ नांवांचे दोन दैत्य उत्पन्न करून मारिलेस आणि त्यांच्या मेदाच्या (चरबीच्या) व अस्थींच्या (हाडांच्या) राशीची ॥ २६ ॥ ही पर्वतयुक्त मेदिनी (पृथ्वी) निर्मिलीस. पुढें तूं आपल्या नाभीमध्यें दिव्य सूर्यासारखें कमल निर्माण करून त्यामध्यें माझी उत्पत्ति केलीस, ॥ २७ ॥ मजकडे प्रजापालनाचा अधिकार दिलास आणि मजवर सर्व भार ठेविलास. हे जगत्पालका ! तूं सृष्टि इत्यादि सर्व कामें मजकडे लावून दिलीस; ह्मणून मी तुझी प्रार्थना केली कीं,॥२८॥ प्रभो ! जे कोणी माझ्या वीर्याचा अपहार करितात (माझ्या प्रजांना दुःख देतात), त्यांपासून भूतांचें संरक्षण कर. ह्मणून हे विष्णुरूपा ! पुढें तूं कश्यपापासून वामनरूपी अवतार घेतलास. ॥ २९ ॥

मायया जनयित्वा त्वं द्वौ ससत्त्वौ महाबलौ ॥ मधुकैटभकौ दैत्यौ हत्वा मेदोस्थिसंचयम् ॥ २६ ॥ इमां पर्वतसंबद्धां मेदिनीं पुरुषर्षभ ॥ पद्मे दिव्यार्कसंकाशे नाभ्यामुत्पाद्य मामपि ॥ २७ ॥ मां विधाय प्रजाध्यक्षं मयि सर्वं न्यवेदयत् ॥ सो ऽहं संयुक्तसंभारस्त्वामवोचं जगत्पते ॥ २८ ॥ रक्षां विधत्स्व भूतेभ्यो ये मे वीर्यापहारिणः ॥ ततस्त्वं कश्यपाज्जातो विष्णुर्वामनरूपधृत् ॥ २९ ॥

त्वं (मू.) जनयित्वा, हत्वा [च] मेदोस्थिसंचयं ॥ २६ ॥ (पू.) [निर्मितवान्]. पुरुषर्षभ, ॥ [भवान्] नाभ्यां दिव्यार्कसङ्काशे (मू.) उत्पाद्य, ॥ २७ ॥ मां प्रजाध्यक्षं (पू.). ॥ जगत्पते, (मू.). ॥ २८ ॥ (पू.) [तेभ्यः] रक्षां विधत्स्व. (मू.) विष्णुः जातः. ॥ २९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'यथेच्छसि तथा कुरु.'

हे पृथ्वीप्रतिपालका ! सर्व प्रजांचा संहार होण्याची वेळ आली होती; परंतु तूं राक्षसांचा वध करून भूमीचा भार उतरलास. ॥ ३० ॥ तूं रावणाचा वध करण्याच्या इच्छेनें, अकरा सहस्र वर्षें पृथ्वीवर राहीन, अशी पूर्वी देवांजवळ स्वतां प्रतिज्ञा करून मृत्युलोकीं आलास. तो तुझा इष्ट कार्यभाग पूर्ण झाला.' रामचंद्रा ! मृत्युलोकांत राहण्याची तुझी आयुर्मर्यादा संपली ह्मणून ॥ ३१ ॥ ३२ ॥ मी काल, ऋषिवेष घेऊन, तुजजवळ आलों आहें. 'आतां, पुन्हां राज्य भोगावें' अशी तुझी मनीषा असेल, ॥ ३३ ॥ तर तसें असूं दे (राज्य

हृतवानसि भूभारं वधाद्रक्षोगणस्य च ॥ सर्वासूत्सार्यमाणासु प्रजासु धरणीधर ॥३०॥ रावणस्य वधाकांक्षी मर्त्यलोकमुपागतः ॥ दश वर्षसहस्राणि दश वर्षशतानि च ॥ ३१ ॥ कृत्वा वासस्य समयं त्रिदशेष्वात्मनः पुरा ॥ स ते मनोरथः पूर्णः पूर्णे चायुषि ते नृप ॥ ३२ ॥ कालस्तापसरूपेण त्वत्समीपमुपागमम् ॥ ततो भूयश्च ते बुद्धिर्यदि राज्यमुपासितुम् ॥३३॥ तत्तथा भव भद्रं ते एवमाह पितामहः ॥ यदि ते गमने बुद्धिर्देवलोकं जितेन्द्रिय ॥ ३४ ॥

रक्षोगणस्य वधात् भूभारं (पू.). ॥ धरणीधर, (मू.) उत्सार्यमाणासु [सतीषु], ॥३०॥ (मू.) ॥३१ ॥ पुरा त्रिदशेषु आत्मनः (पू.) कृत्वा [स्थितः असि]. (मू.).' नृप ते आयुषि पूर्णे [सति], ॥ ३२ ॥ कालः [अहं] (मू.) ते बुद्धिः ॥३३॥ (पू.) भद्रं; एवं पितामहः आह. ॥ जितेन्द्रिय, (मू.)गमने बुद्धिः, [तर्हि] ॥ ३४ ॥

१ पीडा दिलेल्या. २ देवांमध्यें. ३ प्रतिज्ञेला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कर). तुझें कल्याण असो. ' असें ब्रह्मदेवानें सांगितलें आहे. रामा ! सर्व इंद्रियवृत्ति तुझ्या स्वाधीन आहेत; तूं देवलोकीं जावयाचा निश्चय केलास तर, ॥ ३४ ॥ देवांना विष्णूचा आधार मिळेल व त्यांचे संताप दूर होतील. ' कालानें सांगितलेला तो ब्रह्मदेवाचा निरोप ऐकिल्यावर ॥ ३५ ॥ त्यावेळीं राम हांसत हांसत त्या सर्वांचा संहार करणाऱ्या पुरुषाला (कालाला) ह्मणाला :– ' मी तुझें वचन ऐकिलें. सांप्रत मलाही तें इष्टच आहे. ॥ ३६ ॥ तूं आलास ह्याबद्दल मी फार संतोष मानिला पाहिजे. माझा अवतार तीन्ही लोकांच्या कार्यासाठीं आहे. ॥ ३७ ॥ तुझें कल्याण असो. मी ज्या स्थानाहून इकडे आलों, तेथें परत येईन. माझ्या मनांत जी गोष्ट होती, तीच घडून आली, ह्यांत अगदीं संशय नाहीं. ॥ ३८ ॥

सनाथा[1] विष्णुना देवा भवन्तु विगतज्वराः[2] ॥ चतुर्मुखस्य तद्वाक्यं श्रुत्वा कालेन भाषितम् ॥ ३५ ॥ हसन् रामस्तदा वाक्यं कृत्स्नस्य[3]ान्तकम्[4]अब्रवीत् ॥ श्रुतं तव वचो मेऽद्य ममापीष्टतरं[5] तु तत् ॥ ३६ ॥ संतोषः परमो ज्ञेयस्त्वदागमनकारणात् ॥ त्रयाणामपि लोकानां कार्यार्थं मम संभवः ॥ ३७ ॥ भद्रं तेऽस्त्वागमिष्यामि यत एवाहमागतः ॥ मनोरथस्तु संप्राप्तो न मेऽत्रास्ति विचारणा[6] ॥३८॥

विष्णुना [त्वया] (पू.) भवन्तु. " ॥ कालेन भाषितं (मू.), ॥ ३५ ॥ (पू.) वाक्यं अब्रवीत् – ॥ ' मे तव वचः (मू.) इष्टतरं. ॥ ३६ ॥ (पू.) परमः सन्तोषः ज्ञेयः ॥ (मू.). ॥ ३७ ॥ ते भद्रं (पू.) अस्तु. अहं यतः आगतः, तत्र आगमिष्यामि. ॥ (मू.) न अस्ति. ॥ ३८ ॥

---

१ साधार. २ दूर झाला ताप ज्यांचा, असे. ३ सर्वांच्या. ४ नाशकर्त्याला. ५ अधिक प्रिय. ६ संशय.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुला! ब्रह्मदेवानें जसें सांगितलें त्याप्रमाणें मी माझे सेवक जे देव त्यांचें सर्व कार्यप्रसंगीं रक्षण करण्यास मायेच्यायोगें उद्युक्त राहावें, हेंच योग्य होय.' ॥ ३९ ॥ त्यांचा असा संवाद चालला होता इतक्यांत दुर्वासामुनि, कांहीं अगत्याच्या कामासाठीं, रामाचें दर्शन घेण्याच्या इच्छेनें राजद्वारीं प्राप्त झाले! ॥ ४० ॥ दुर्वासमुनि, लक्ष्मणाजवळ येऊन त्याला म्हणाले :– 'लवकर मला रामाची भेट करून दे. माझें अतिशय निकडीचें काम आहे.' ॥ ४१ ॥ तें ऐकून लक्ष्मण त्या अग्नीसारख्या तेजस्वी मुनीला ह्मणाला :– महाराज! ह्या वेळीं रामापाशीं आपलें कोणतें कार्य आहे? आपली काय इच्छा आहे, - मला सांगा; - ती मी पूर्ण

मत्सेवकानां देवानां सर्वकार्येषु वै मया ॥ स्थातव्यं मायया पुत्र यथा चाह प्रजापतिः ॥३९॥ एवं तयोः कथयतोर्दुर्वासा मुनिरभ्यगात् ॥ राजद्वारं राघवस्य दर्शनापेक्षया ऽऽद्दतम्[२] ॥ ४० ॥ मुनिर्लक्ष्मणमासाद्य दुर्वासा वाक्यमब्रवीत् ॥ शीघ्रं दर्शय रामं मे कार्यं मे ऽत्यन्तमाहितम् ॥ ४१ ॥ तच्छ्रुत्वा प्राह सौमित्रिर्मुनिं[३]ज्वलनतेजसम् ॥ रामेण कार्यं किं ते ऽद्य किं ते ऽ[४]भीष्टं करोम्यहम् ॥ ४२ ॥

पुत्र, यथा प्रजापतिः आह, [तथा] मया मायया (मू.).' ॥ ३९ ॥ तयोः एवं कथयतोः [सतोः], (मू.) राजद्वारं अभ्यगात्. ॥ ४० ॥ दुर्वासाः (पू.) – ॥ 'मे रामं शीघ्रं दर्शय. मे (मू.).' ॥ ४१ ॥ सौमित्रिः (पू.) प्राह – ॥ 'अद्य ते रामेण किं कार्यं? अहं ते (मू.)? ॥ ४२ ॥

१ बोलत असतां. २ आदरपूर्वक. ३ अग्नीसारख्या तेजस्वी. ४ इच्छित.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करितों. ॥ ४२ ॥ राजा रामचंद्र दुसऱ्या एका कामांत गुंतलेला आहे; - त्याचीच भेट पाहिजे असेल तर कृपा करून - घटकाभर थांबावें.' तें भाषण कानीं पडतांच मुनि क्रोधानें लाल झाले व लक्ष्मणाला म्हणाले :— ॥ ४३ ॥ 'लक्ष्मणा ! ह्या क्षणीं जर तूं मला प्रभु रामचंद्राची भेट करून दिली नाहींस, तर मी दशरथाच्या वंशाचें, इष्टमित्रांसह, भस्म करून टाकीन ! ह्यांत अन्यथा होणार नाहीं ! ' ॥ ४४ ॥ लक्ष्मणानें दुर्वास ऋषींचें तें अत्यंत भयंकर वचन ऐकिलें व त्या वाक्याच्या स्वरूपाचा विचार केला; - तों त्याला वाटलें कीं, - ॥ ४५ ॥ ह्या (दुर्वासारूप) कारणामुळें सगळें कुल लयाला जाण्यापेक्षां आज माझा एक्याचाच नाश होणें बरें. शेवटीं असाच निश्चय करून लक्ष्मण - एकांतीं कालमुनीजवळ बोलत बसलेल्या -

राजा कार्यान्तरे व्यग्रो मुहूर्तं संप्रतीक्ष्यताम् ॥ तच्छ्रुत्वा क्रोधसंतप्तो मुनिः सौमित्रिमब्रवीत् ॥४३॥ अस्मिन् क्षणे तु सौमित्रे न दर्शयसि चेद्विभुम् ॥ रामं सविषयं वंशं भस्मीकुर्यां न संशयः ॥४४॥ श्रुत्वा तद्वचनं घोरमृषेर्दुर्वाससो भृशम् ॥ स्वरूपं तस्य वाक्यस्य चिन्तयित्वा स लक्ष्मणः ॥ ४५ ॥ सर्वनाशाद्वरं मे ऽद्य नाशो ह्येकस्य कारणात् ॥ निश्चित्यैवं ततो गत्वा रामाय प्राह लक्ष्मणः ॥ ४६ ॥

(पू.). ' (मू.) – ॥ ४३ ॥ ' सौमित्रे, (पू.) रामं न दर्शयसि चेत्, [तर्हि] (मू.). ॥ ४४ ॥ सः लक्ष्मणः भृशं घोरं तत् (पू.) वचनं श्रुत्वा, तस्य वाक्यस्य (मू.) [अतिष्ठत्]. ॥ ४५ ॥ लक्ष्मणः, ' अद्य कारणात् एकस्य मे नाशः (पू.) ' एवं (मू.). ॥ ४६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामाकडे गेला; आणि त्यानें दुर्वास आल्याची वार्ता रामाला सांगितली. ॥ ४६ ॥ लक्ष्मणाचें वचन ऐकि- ल्याबरोबर रामानेंही कालाला निरोप दिला, व लागलीच बाहेर येऊन अत्रिपुत्र (दुर्वास) मुनीची भेट घे- तली. ॥ ४७ ॥ रामानें संतुष्ट होऊन मुनीला वंदन केलें व आदरपूर्वक विचारिलें :– 'महाराज! आपलें कोणतें कार्य म्यां करावें?' रघुवीर असें बोलला. ॥ ४८ ॥ तें रामवचन ऐकून दुर्वासमुनि ह्मणाले :– 'रामा! आज मला अनेक सहस्त्र वर्षें केलेल्या उपोषणाची समाप्ति करावयाची आहे. ॥ ४९ ॥ ह्मणून, रघुवीरा! मी तुजकडे सिद्ध असेल तें भोजन करूं इच्छितों.' रामानें मुनीचें भाषण ऐ- कून संतोषपूर्वक ॥ ५० ॥

सौमित्रेर्वचनं श्रुत्वा रामः कालं [1]व्यसर्जयत् ॥ शीघ्रं निर्ग[2]म्य रामोऽपि ददर्शात्रेः सुतं मुनिम् ॥ ४७ ॥ रामोऽभिवाद्य संप्रीतो मुनिं पप्रच्छ[3] सादरम् ॥ किं कार्यं ते करोमीति मुनिमाह रघूत्तमः ॥४८॥ तच्छ्रुत्वा रामवचनं दुर्वासा राममब्रवीत् ॥ अथ वर्षसहस्राणामुपवाससमापनम् ॥४९॥ अतो भोजनमिच्छामि सिद्धं यत्ते रघूत्तम ॥ रामो मुनिवचः श्रुत्वा संतोषेण समन्वितः ॥ ५० ॥

रामः (पू.) अपि (मू.) ददर्श. ॥ ४७ ॥ सम्प्रीतः रामः मुनिं (पू.) [यथा तथा] पप्रच्छ. ॥ रघूत्तमः, ते (मू.). ॥ ४८ ॥ दुर्वासाः तत् रामवचनं (पू.) – '(मू.). ॥ ४९ ॥ रघूत्तम, अतः यत् सिद्धं, [तत्] ते (पू.).' (मू.). ॥ ५० ॥

१ निरोप देता झाला. २ बाहेर येऊन. ३ विचारिता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुनींला यथेच्छ सिद्ध अन्न अर्पण केलें. मुनिही अमृततुल्य अन्न भोजन करून संतुष्ट होत्साते परत गेले. ॥ ५१ ॥ ते स्वस्थानीं निघून गेल्यावर रामाला कालाच्या उक्तीचें स्मरण झालें व अतिशय वाईट वाटलें. त्याचें मन उद्विग्न झालें. तो अत्यंत विव्हल झाला. ॥ ५२ ॥ त्यानें मुख खालीं घातलें. अंतःकरण इतकें दीन होऊन गेलें कीं, त्याच्या मुखांतून शब्द निघेना. रघुवीरानें मनांत जाणिलें कीं, लक्ष्मण मृतप्राय झाला आहे. ॥५३॥ तेव्हां तो सर्वेश्वर खालीं तोंड घालून स्वस्थ बसला. पुढें, राम दुःखानें व्याप्त झाला आहे, कांहीं बोलत नाहीं, चिंतेंत पडला असून प्रीतिपाशाची निंदा करीत आहे, असें पाहून लक्ष्मण त्याला म्हणाला :–

स सिद्धमन्नं मुनये यथावत्समुपाहरत् ॥ मुनिर्भुक्त्वा ऽन्नममृतं संतुष्टः पुनरभ्यगात् ॥५१॥ स्वमाश्रमं गते तस्मिन् रामः सस्मार भाषितम् ॥ कालेन शोकदुःखार्तो विमनाश्चातिविह्वलः ॥ ५२ ॥ अवाङ्मुखो दीनमना न शशाकाभिभाषितुम् ॥ मनसा लक्ष्मणं ज्ञात्वा हतप्रायं रघूद्वहः ॥ ५३ ॥ अवाङ्मुखो बभूवाथ तूष्णीमेवाखिलेश्वरः ॥ ततो रामं विलोक्याह सौमित्रिर्दुःखसंप्लुतम् ॥५४॥ तूष्णींभूतं चिन्तयन्तं गर्हन्तं स्नेहबन्धनम् ॥ मत्कृते त्यज संतापं जहि मां रघुनन्दन ॥५५॥

(मू.) अन्नं भुक्त्वा सन्तुष्टः [सन्] पुनः अभ्यगात्. ॥ ५१ ॥ तस्मिन् स्वं आश्रमं गते [सति], (पू.) सस्मार, (मू.) ॥ ५२ ॥ रघूद्वह, (उ.) ज्ञात्वा (पू.) न शशाक. ॥ ५३ ॥ अथ अखिलेश्वरः (५४ पू) बभूव. ततः सौमित्रिः (५४ उ. ५५ पू.) गर्हन्तं दृष्ट्वा आह – 'रघुनन्दन, (मू.) त्यज, मां जहि. ॥ ५४ ॥ ५५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'रघुकुमरा! मजकरितां संताप करणें सोडून दे. माझा वध कर. ॥ ५४ ॥ ५५ ॥ प्रभो! काळाची गति अशी फिरावयाची हें पूर्वी ठरलेलेंच आहे. तूं प्रतिज्ञाभंग केलास तर मात्र मला निःसंशय नरकांत पडावें लागेल ! ॥ ५६ ॥ जर तुझी मजवर प्रीति असेल व तुझ्या मनांत मजवर अनुग्रह करणें योग्य वाटत असेल, तर शंका सोडून माझा वध कर. समर्था ! तूं सर्व गोष्टी जाणतच आहेस. धर्माचा त्याग करूं नकोस.' ॥ ५७ ॥ तें लक्ष्मणाचें भाषण ऐकिल्यावर रामाचें मन फिरलें. - त्यानें आपल्या सर्व प्रधानांना व वसिष्ठ मुनींला बोलावून आणून सर्व वृत्तांत सांगितला. ॥ ५८ ॥ प्रभु रामानें, मुनि आला होता ही गोष्ट, त्यानें जें जें भाषण केलें तें, व स्वतांची प्रतिज्ञा असें सर्व वृत्त मंडळीला सांगितलें. ॥ ५९ ॥

गतिः कालस्य कलिता पूर्वमेवेदृशी प्रभो ॥ त्वयि हीनप्रतिज्ञे तु नरको मे ध्रुवं भवेत् ॥ ५६ ॥ मयि प्रीतिर्यदि भवेद्यद्यनुग्राह्यता तव ॥ त्यक्त्वा शंकां जहि प्राज्ञ मा मा धर्मं त्यज प्रभो ॥५७॥ सौमित्रिणोक्तं तच्छ्रुत्वा रामश्चलितमानसः ॥ आहूय मन्त्रिणः सर्वान्वसिष्ठं चेदमब्रवीत् ॥५८॥ मुनेरागमनं यत्तु कालस्यापि हि भाषितम् ॥ प्रतिज्ञामात्मनश्चैव सर्वमावेदयत्प्रभुः ॥ ५९ ॥

प्रभो, पूर्वं एव कालस्य (मू.) नरकः भवेत्. ॥ ५६ ॥ प्रभो, यदि (पू.) अनुग्राह्यता, [तर्हि] प्राज्ञ, शङ्कां (मू.) जहि, धर्मं मा त्यज.' ॥ ५७ ॥ (पू.) रामः सर्वान् मन्त्रिणः (मू.). ॥ ५८ ॥ प्रभुः, यत् मुनेः आगमनं, [तत्], (पू.), आत्मप्रतिज्ञां (मू.). ॥ ५९ ॥

१ ठरलेली. २ कळविता झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राम कोणतेंही कार्य अनायासें फार पाडी. रामाचें तें भाषण ऐकिल्यावर उपाध्यायासह सर्व मंत्रिजन हात जोडून त्याला ह्मणाले :– ॥ ६० ॥ 'ईश्वरा! तूं पृथ्वीचा भार हरण करण्यासाठीं अवतार घेतला आहेस. तुझा लक्ष्मणाशीं वियोग व्हावयाचा ही गोष्ट पूर्वीच ठरलेली असून ज्ञानदृष्टी-च्या योगें तुला कळलेली आहे. ॥ ६१ ॥ रामा! सत्वर लक्ष्मणाचा त्याग कर; पण, प्रभो! प्र-तिज्ञाभंग करूं नकोस. प्रतिज्ञात कर्तव्याचा त्याग केला असतां धर्म निष्फल होतो. ॥ ६२ ॥ रामा! सर्व धर्म नाश पावला कीं, त्रैलोक्याचा प्रलय होतो, ह्यांत संशय नाहीं. रघुवीरा! तूं तर सकल लोकांचा

श्रुत्वा रामस्य वचनं मन्त्रिणः सपुरोहिताः ॥ ऊचुः प्राञ्जलयः सर्वे राममक्लिष्ट-कारिणम् ॥ ६० ॥ पूर्वमेव हि निर्दिष्टं तव भूभारहारिणः॥ लक्ष्मणेन वियोगस्ते ज्ञातो विज्ञानचक्षुषा ॥ ६१ ॥ त्यजाशु लक्ष्मणं राम मा प्रतिज्ञां त्यज प्रभो ॥ प्रतिज्ञाते परित्यक्ते धर्मो भवति निष्फलः ॥ ६२ ॥ धर्मे नष्टे ऽखिले राम त्रैलो-क्यं नश्यति ध्रुवम् ॥ त्वं तु सर्वस्य लोकस्य पालको ऽसि रघूत्तम ॥ ६३ ॥

सपुरोहिताः सर्वे मन्त्रिणः (पू.) श्रुत्वा, प्रांजलयः [सन्तः] (मू.) रामं ऊचुः – ॥ ६० ॥ 'भूभारहारिणः तव (पू.). ते विज्ञानचक्षुषा (मू.). ॥ ६१ ॥ प्रभो, राम, लक्ष्मणं आशु (पू.) मा त्यज. (मू.) [सति] धर्मः निष्फलः भवति. ॥ ६२ ॥ राम, अखिले धर्मे नष्टे [सति], (पू.) नश्यति. रघूत्तम, (मू.). ॥ ६३ ॥

१ पृथ्वीचा भार उतरणाऱ्या. २ ठरलेलें. ३ ज्ञानदृष्टीनें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रक्षणकर्ता आहेस; ॥ ६३ ॥ त्याअर्थीं एकव्या लक्ष्मणाचा त्याग करून त्रैलोक्याचें रक्षण करावेंस, हें आह्मांला योग्य दिसतें. ' रामानें त्यांचें तें धर्माच्या आणि अर्थाच्या गोष्टींनीं भरलेलें पवित्र वाक्य ॥ ६४ ॥ सभेमध्यें ऐकून घेतल्यावर लागलेंच लक्ष्मणाला सांगितलें :– ' लक्ष्मणा ! तूं इच्छेस येईल तिकडे जा. धर्माचा लोप होऊं नये. ॥ ६५ ॥ सत्पुरुषांचा त्याग करणें किंवा वध करणें ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच योग्यतेच्या होत. ' रामानें असें सांगितलें असतां लक्ष्मणाचे डोळे दुःखाश्रूंनीं व्याकुळ झाले (भरून आले). ॥ ६६ ॥ तो रामाला वंदन करून लागलाच आपल्या मंदिरांत गेला व तेथून पुढें सरयूवर गेला. तेथें त्यानें आचमन करून हात जोडिले, ॥ ६७ ॥

त्यक्त्वा लक्ष्मणमेवैकं त्रैलोक्यं त्रातुमर्हसि ॥ रामो धर्मार्थसहितं वाक्यं तेषामनिन्दितम् ॥ ६४ ॥ सभामध्ये समाश्रुत्य प्राह सौमित्रिमञ्जसा ॥ यथेष्टं गच्छ सौमित्रे मा भूद्धर्मस्य संशयः ॥ ६५ ॥ परित्यागो वधो वा ऽपि सतामेवोभयं समम् ॥ एवमुक्ते रघुश्रेष्ठे दुःखव्याकुलितेक्षणः ॥ ६६ ॥ रामं प्रणम्य सौमित्रिः शीघ्रं गृहमगात्स्वकम् ॥ ततो ऽगात्सरयूतीरमाचम्य स कृताञ्जलिः ॥ ६७ ॥

एकं लक्ष्मणं एव (पू.). ' ॥ (मू.) तेषां वाक्यं ॥ ६४ ॥ (पू.) प्राह – सौमित्रे, (मू.) मा भूत ॥ ६५ ॥ (पू.) एव समम्. ' ॥ रघुश्रेष्ठे एवं उक्ते [सति], (मू.) ॥ ६६ ॥ सौमित्रिः (पू.) गृहं अगात्. (मू.) [सन्] सरयूतीरं अगात्, आचम्य. ॥ ६७ ॥

१ रक्षण करण्यास. २ शुद्ध.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नऊही द्वारें (इंद्रियच्छिद्रें--दोन नाकपुड्या, दोन डोळे, दोन कान, मुख, शिश्न आणि गुद) बंद केलीं, प्राण मस्तकीं नेला व नाशरहित, सर्वाश्रय आणि निर्विकार अशा वासुदेवसंज्ञक श्रेष्ठ परब्रह्म पदार्चें मनानें चिंतन चालविलें. ॥ ६८ ॥ लक्ष्मणानें प्राणवायूचा रोध केला असतां अग्नीसह सर्व देवांनीं व महर्षींनीं पुष्पवृष्टि करून त्याला आच्छादून टाकिलें आणि त्याची स्तुति केली. ॥ ६९ ॥ नंतर इंद्र लक्ष्मणाला शरीरासह स्वर्गलोकीं घेऊन गेला. कांहींवेळपर्यंत लक्ष्मणाचें शरीर इतर कोणाही देवांना दिसत नव्हतें. ॥ ७० ॥ पुढें, तो विष्णूचा चतुर्व्यूह मूर्तींतील एक चवथा भाग आहे असें मोठमोठ्या देवांना आणि सर्व देवर्षींना दिसून आलें. तेव्हां त्यांनीं लक्ष्मणाची पूजा केली. ॥ ७१ ॥

नव द्वाराणि संयम्य मूर्ध्नि प्राणमधारयत् ॥ यदक्षरं परं ब्रह्म वासुदेवाख्यमव्ययम्॥
पदं तत्परमं धाम चेतसा सोऽभ्यचिन्तयत् ॥६८॥ वायुरोधेन संयुक्तं सर्वे देवाः
सहर्षयः॥ साग्नयो लक्ष्मणं पुष्पैस्तुष्टुवुश्च समाकिरन् ॥६९॥ अदृश्यं विबुधैः कैश्चि-
त्सशरीरं स वासवः॥ गृहीत्वा लक्ष्मणं शक्रः स्वर्गलोकमथागमत् ॥ ७० ॥ ततो
विष्णोश्चतुर्भागं तं देवं सुरसत्तमाः॥ सर्वे देवर्षयो दृष्ट्वा लक्ष्मणं समपूजयन् ॥७१॥

(मू.) परं ब्रह्म, ॥ ६८ ॥ सः तत् परमं (पू.). सहर्षयः साग्नयः सर्वे देवाः (मू.), पुष्पैः समाकिरन् च. ॥ ६९ ॥ सः वासवः शक्रः कैश्चित् विबुधैः (पू.) लक्ष्मणं (मू.). ॥ ७० ॥ ततः सुरसत्तमाः, सर्वे देवर्षयः [च] (मू.) दृष्ट्वा समपूजयन्. ॥ ७१ ॥

१ बंद करून. २ आच्छादिलें आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विष्णूचा अंश लक्ष्मण स्वर्गी गेला व त्याला मोठें थोरलें सर्परूप मिळालें, तेव्हां सिद्धलोकीं गेलेले योगी ब्रह्मदेवासह मोठ्या आनंदानें त्याचें दर्शन घेण्यास आले. ॥ ७२ ॥ इति उत्तरकांडे अष्टमः सर्गः ॥ ८ ॥

शंकर ह्मणाले :– पार्वति ! लक्ष्मणाचा त्याग केल्यावर रामाला परम दुःख झालें. त्यानें आपले मंत्री, नगरांतील व्यापारी, वसिष्ठमुनि अशा सर्वांना बोलावून आणून सांगितलें :– ॥ १ ॥ 'जनहो ! भरत महाबुद्धिमान् आहे; आतां त्याला राज्याभिषेक करावा आणि स्वतां लक्ष्मणाच्या मागून जावें अशी माझी इच्छा आहे.' ॥ २ ॥ रघुवीरानें असें सांगितलें असतां नागरिक आणि देशांतील असे सकल जन दुःखानें

लक्ष्मणे हि दिवमागते हरौ सिद्धलोकगतयोगिनस्तदा ॥ ब्रह्मणा सह समागमन्मुदा द्रष्टुमाहितमहाहिरूपकम् ॥७१॥ इति उत्तरकाण्डे अष्टमः सर्गः ॥८॥

श्रीमहादेव उवाच ॥ लक्ष्मणं तु परित्यज्य रामो दुःखसमन्वितः ॥ मन्त्रिणो नैगमांश्चैव वसिष्ठं चेदमब्रवीत् ॥ १ ॥ अभिषेक्ष्यामि भरतमधिराज्ये महामतिम् ॥ अथ चाहं गमिष्यामि लक्ष्मणस्य पदानुगः ॥ २ ॥ एवमुक्ते रघुश्रेष्ठे पौरजानपदास्तदा ॥ द्रुमा इव च्छिन्नमूला दुःखार्ताः पतिता भुवि ॥ ३ ॥

हरौ (पू.) [सति], तदा सिद्धलोकगतयोगिनः आहितमहाहिरूपकं [तं] द्रष्टुं मुदा (मू.). ॥७२॥ ॥ इति उत्तरकाण्डे अष्टमः सर्गः ॥ ८ ॥ श्रीम० उ० – (पू.) रामः (मू.) – ॥ १ ॥ 'महामतिं (पू.) अभिषेक्ष्यामि. ॥ (मू.) [सन्] गमिष्यामि. ॥ २ ॥ रघुश्रेष्ठे एवं उक्ते [सति], तदा (पू.) ॥ च्छिन्नमूलाः (मू.) [सन्तः] भुवि पतिताः. ॥ ३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विव्हल झाले; ते, मुळें तुटून पडलेल्या वृक्षाप्रमाणें भूमीवर लोळण घेऊं लागले. ॥ ३ ॥ रामानें उच्चारिलेले शब्द भरताच्या कानीं पडले तेव्हां त्याला तर मूर्च्छाच आली. तो राज्याची निंदा करूं लागला व रामाजवळ ह्मणाला :– ॥ ४ ॥ ' प्रभो रघुवीरा ! मी तुला सत्य स्मरून व तुझ्याच पायांची शपथ घेऊन सांगतों कीं, तुजवांचून मला पृथ्वीवरील राज्याची फार तर काय स्वर्गीच्या राज्याची देखील इच्छा नाहीं. ॥ ५ ॥ राजा रामचंद्रा ! ह्या कुशलवांना राज्याभिषेक कर. कुश महाप्रतापी आहे; त्याला दक्षिणेकडील कोसलदेशांचें राज्य दे. आणि लवाला उत्तरेकडील प्रदेशाचें दे. ॥ ६ ॥ शत्रुघ्नाला आणण्यासाठीं लवकर दूत पाठव. आह्मीं स्वर्गलोकीं राहावयास जाणार ही वार्ता त्याला कळली पाहिजे. ' ॥ ७ ॥

मूर्छितो भरतो वाऽपि श्रुत्वा रामाभिभाषितम् ॥ गर्हयामास राज्यं स प्राहेदं रामसन्निधौ ॥ ४ ॥ सत्येन च शपे नाहं त्वां विना दिवि वा भुवि ॥ कांक्षे राज्यं रघुश्रेष्ठ शपे त्वत्पादयोः प्रभो ॥ ५ ॥ इमौ कुशलवौ राजन्नभिषिञ्चस्व राघव ॥ कोशलेषु कुशं वीरमुत्तरेषु लवं तथा ॥ ६ ॥ गच्छन्तु दूतास्त्वरितं शत्रुघ्नानयनाय हि ॥ अस्माकमेतद्गमनं स्ववर्सीय शृणोतु सः ॥ ७ ॥

रामाभिभाषितं श्रुत्वा मूर्च्छितः सः (पू.) राज्यं (मू.) इदं प्राह – ॥ ४ ॥ ' प्रभो, अहं (पू.) वा [यदि] राज्यं काङ्क्षे, [तर्हि] (मू.) शपे. ॥ ५ ॥ राजन्, राघव, (मू.) उत्तरेषु लवं [अभिषिंचस्व]. ॥ ६ ॥ (पू.) गच्छन्तु. ॥ सः (मू.). ॥ ७ ॥

१ निंदा करिता झाला. २ इच्छितों. ३ शपथ घेतों. ४ स्वर्गीं राहण्यासाठीं. ५ ऐको.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भरतानें केलेलें हें भाषण ऐकून सर्व लोकांना अत्यंत भय वाटलें; त्यांनीं त्याच्या मुखाकडे पाहत भूमीवर देह टाकिले. रामाचा वियोग होणार ह्मणून त्यांचें अंतर फारच कळवळलें.॥८॥भगवान् वसिष्ठांना तो देखावा पाहून करुणा आली. ते रामाला ह्मणाले :– 'राजा! तुजविषयीं प्रजांच्या मनांत किती आदर वसत आहे पहा! सर्व जन भूतळावर लोळत आहेत! ॥ ९ ॥ रामा! त्यांच्या अभिप्रायानुरूप तूं अनुग्रह करावास, हें मला योग्य दिसतें.' वसिष्ठगुरूंचें भाषण ऐकिल्यावर रामानें त्या जनांना उठविलें व प्रेमळ शब्दांनीं त्यांचें सांत्वन केलें. ॥१०॥ रामाच्याही मनांत प्रजांविषयीं प्रेमाचें भरतें आलें. तो त्यांना ह्मणाला :– 'मी तुमची कोणती बरें इच्छा पुरवावी सांगा.' तेव्हां प्रजाजन हात जोडून भक्तिपूर्वक रघुवीराला ह्मणाले :– ॥ ११ ॥

भरतेनोदितं श्रुत्वा पतितास्ताः समीक्ष्य[1] तम् ॥ प्रजाश्च भय[2]संविग्ना राम[3]विश्लेष-
कातराः ॥ ८ ॥ वसिष्ठो भगवान् राममुवाच सदयं वचः ॥ पश्य तातादरात्स-
र्वाः पतिता भूतले प्रजाः ॥ ९ ॥ तासां भावानुगं[4] राम प्रसादं कर्तुमर्हसि ॥
श्रुत्वा वसिष्ठवचनं ताः समुत्थाप्य पूज्य च ॥ १० ॥ सस्नेहो रघुनाथस्ताः किं
करोमीति चाब्रवीत् ॥ ततः प्राञ्जलयः प्रोचुः प्रजा भक्त्या रघूद्वहम् ॥ ११ ॥

ताः प्रजाः (पू.) समीक्ष्य, ॥ (उ.) च [सत्यः] भुवि पतिताः. ॥ ८ ॥ भगवान (पू.) उवाच – ॥ 'तात, भूतले पतिताः (मू.) आदरात् पश्य. ॥ ९ ॥ राम, (पू.).' वसिष्ठवचनं (मू.) ॥१०॥ (पू.). ॥ ततः प्रजाः प्रांजलयः [सत्यः] (मू.) प्रोचुः – ॥ ११ ॥

१ पाहून. २ भयभीत. ३ रामाच्या वियोगामुळें विव्हल. ४ अभिप्रायानुरूप.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

'रामा! तुझ्या मनांत जिकडे जावयाचें असेल तिकडे आह्मी पाठोपाठ येणार. ह्यांत आमचा परम संतोष आहे, व हाच अक्षय धर्म होय. ॥ १२ ॥ रामा! तुजबरोबर यावें असा आमचा मनापासून दृढ निश्चय आहे. आह्मी मुलें, बायका सगळ्यांना बरोबर घेऊन तुझ्या पाठोपाठ आतांच निघणार, ह्यांत अंतर होणें नाहीं. ॥ १३ ॥ रघुकुमरा! मग तूं तपोवनांस जा कीं स्वर्गी जायाला निघ.' रामानें त्यांच्या अंतःकरणांचा पूर्ण निश्चय आणि कालाचें भाषण ह्या दोन्ही गोष्टी मनांत आणून ॥ ॥ १४ ॥ त्या आपल्या नागरिक भक्त जनांना 'बरें तर, ठीक आहे' असें सांगि-

गन्तुमिच्छसि यत्र त्वमनुगच्छामहे वयम्॥ अस्माकमेषा परमा प्रीतिर्धर्मो ऽयम-क्षयः ॥ १२ ॥ तवानुगमने राम त्वद्गता नो दृढा मतिः ॥ पुत्रदारादिभिः सार्ध-मनुयामो ऽद्य सर्वथा ॥ १३ ॥ तपोवनं वा स्वर्गं वा पुरं वा रघुनन्दन॥ ज्ञात्वा तेषां मनोदार्ढ्यं कालस्य वचनं यथा ॥ १४ ॥ भक्तं पौरजनं चैव बाढमि-त्याह राघवः ॥ कृत्वैव निश्चयं रामस्तस्मिन्नेवाहनि प्रभुः ॥ १५ ॥

त्वं यत्र (पू.), [तत्र] वयं अनुगच्छामहे.' ॥ (मू.) धर्मः. ॥ १२ ॥ राम, तव अनुगमने नः (मू.) अनुयामः. ॥ १३ ॥ रघुनन्दन, (पू.) [अनुगच्छामः]. यथा कालस्य वचनं, [तथा] (मू.) ज्ञात्वा, ॥ १४ ॥ प्रभुः राघवः रामः तस्मिन् एव अहनि निश्चयं कृत्वा एव (मू.). ॥ १५ ॥

१ मागून येऊं. २ मनापासून असलेली. ३ ठीक.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कुशलव राज्यांवर गेले.

तलें. प्रभु रामचंद्रानें लागलाच त्या दिवशींच निश्चय ठरवून ॥ १५ ॥ कुशलवांना आपआपल्या भागाकडील राज्यावर पाठवून दिलें. आठ सहस्र रथ, एक सहस्र हत्ती ॥ १६ ॥ आणि साठ हजार घोडे इतका लवाजमा एकएकाला दिला. प्रत्येक मुलाला विपुल रत्नें, पुष्कळ द्रव्य आणि आनंदी व पराक्रमी असे सेवक जन मिळाले. ॥ १७ ॥ तेव्हां ते कुश लव रामाला वंदन करून आपआपल्या प्रदेशांवर गेले. जातांना त्यांना फार अवघड वाटलें. इकडे रामानें शत्रुघ्नाला बोलावून आणण्यासाठीं दूत पाठविले. त्या दूतांनीं सत्वर जाऊन शत्रुघ्नाला कळविलें कीं, ॥ १८ ॥ अयोध्येंत कालमुनि आला होता, दुर्वासऋषींनीं एक थेर केला, लक्ष्मण निघून गेला, रामानेंही जाण्याचा निश्चय केला आहे, ॥ १९ ॥ व पुत्रांना अभिषेकही केले.

प्रस्थापयामास च तौ रामभद्रः कुशीलवौ ॥ अष्टौ रथसहस्राणि सहस्रं चैव दन्तिनाम् ॥१६॥ षष्टिं चाश्वसहस्राणामेकैकस्मै ददौ बलम् ॥ बहुरत्नौ बहुधनौ हृष्टपुष्टजनावृतौ॥१७॥अभिवाद्य गतौ रामं कृच्छ्रेण तु कुशीलवौ ॥ शत्रुघ्नानयने दूतान्प्रेषयामास राघवः ॥ ते दूतास्त्वरितं गत्वा शत्रुघ्नाय न्यवेदयन् ॥१८॥ कालस्यागमनं पश्चादत्रिपुत्रस्य चेष्टितम् ॥ लक्ष्मणस्य च निर्याणं प्रतिज्ञां राघवस्य च ॥ १९ ॥ पुत्राभिषेचनं चैव सर्वं रामचिकीर्षितम्॥ श्रुत्वा तद्दूतवचनं शत्रुघ्नः कुलनाशनम्॥२०॥

सः रामभद्रः तौ कुशीलवौ (मू.) सहस्रं च एव ॥ १६ ॥ अश्वसहस्राणां (पू.) ददौ (मू.) ॥ १७ ॥ कुशीलवौ रामं अभिवाद्य (पू.) गतौ. राघवः (१८।१९ मू.). प्रतिज्ञां च (२० पू.) न्यवेदयन्. (मू.) तत्र दूतवचनं श्रुत्वा, ॥ १८ ॥ १९ ॥ २० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ला ह्मणाले :– " मी तुजजवळ एक गुप्त गोष्ट बोलणार आहें, तीपासून तुझाच अभ्युदय होणार आहे, ह्मणून तूं ती नीट ऐकून घे. ॥ ६२ ॥ इंद्रियांचा नियामक परमेश्वर भक्तांवर अनुग्रह करण्याच्या इच्छेनें व रावणाचा वध करून देवांची कार्यसिद्धि करावी एवढ्याकरितां ॥ ६३ ॥ राम ह्या नांवाचें रूप घेऊन पृथ्वीवर आला आहे. परमेश्वरानें आपल्या मायेनें हें एकच मनुष्याचें रूप घेतलें आहे असें नव्हे तर दशरथाचे चारी मुलगे त्याचेच अवतार आहेत. ॥ ६४ ॥ योगमायेनें तुझ्या घरीं सीता ह्या नांवाचा अवतार घेतला आहे - म्हणून तूं अनेक प्रयत्नांनीं सीता रामालाच दे, ॥६५॥ दुसऱ्या कोणाला देऊं नकोस. ही सीता त्या आनंददायक परमात्म्याची अनादि कालापासून भार्या (शक्ति योगमाया) आहे. " असें सांगून त्यावेळीं देवर्षींनीं स्वर्गाच्या मार्गानें प्रयाण केलें. ॥ ६६ ॥ तेव्हांपासून मी " सीता

परमात्मा हृषीकेशो भक्तानुग्रहकाम्यया॥देवकार्यार्थसिद्ध्यर्थं रावणस्य वधाय च॥६३॥
जातो राम इति ख्यातो मायामानुषवेषधृक्[1]॥ आस्ते दाशरथिर्[2]भूत्वा चतुर्धा परमेश्वरः
॥ ६४ ॥ योगमाया ऽपि सीतेति जाता वै तव वेश्मनि[3] ॥ अतस्त्वं राघवायैव देहि
सीतां प्रयत्नतः ॥६५॥ नान्येभ्यः पूर्वभार्यैषा रामस्य परमात्मनः ॥ इत्युक्त्वा प्रययौ
देवगतिं देवमुनिस्तदा ॥ ६६ ॥ तदारभ्य मया सीता विष्णोर्लक्ष्मीर्[4]विभाव्यते ॥

(मू.) ॥ ६३ ॥ (बा. मू.) दाशरथिः जातः परमेश्वरः चतुर्धा भूत्वा, आस्ते. ॥ ६४ ॥ (मू.) जाता. (मू. म.) देहि. ॥ ६५ ॥ (मू.) एषा पूर्वभार्या. " देवमुनिः (मू.) प्रययौ. ॥ ६६ ॥ ...

१ मायेनें मनुष्याचें रूप धरणारा. २ दशरथाचा मुलगा. ३ घरीं. ४ ...

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

फाळानें पडलेल्या रेषेंतून एक सुलक्षणी मुलगी वर आली. ॥ ...
तें. दर्शनाबरोबर मी आपल्या मनाशीं "ही आपली कन्या आहे," अशी गाठ घातल...
जवर तशीच प्रेमदृष्टि ठेवीत आलों. पुढें ती मुलगी मी आपल्या प्रिय पत्नीच्या स्वाधीन केली. ॥ ६० ॥
एकदां मी एकांतांत बसलों असतां, नारदमुनि आपली "महती" नांवाची वीणा वाजवीत व व्यापक प्रभु
नारायणाच्या गुणांचें वर्णन करीत मजकडे आले. ॥ ६१ ॥ मी आसन देऊन त्यांचा उचित सत्कार केला.
त्यामुळें त्यांना समाधान वाटलें. - रीतींचे कुशलप्रश्न विचारणें झाल्यावर - स्वस्थता मिळाली असतां मुनि म-

सीतामुखात्समुत्पन्ना कन्यका शुभलक्षणा ॥ ५९ ॥ तामद्राक्षमहं प्रीत्या पुत्रि-
[2]काभावभाविताम् ॥ अर्पिता प्रियभार्यायै शरच्चन्द्रनिभानना ॥ ६० ॥ एकदा
नारदोऽभ्यागाद्विविक्ते मयि संस्थिते ॥ रणयन्महतीं वीणां गायन्नारायणं वि-
भुम् ॥ ६१ ॥ पूजितः सुखमासीनो मामुवाच सुखान्वितः ॥ शृणुष्व वचनं गुह्यं
तवाभ्युंदयकारणम् ॥ ६२ ॥

[1]सीतामुखात् शुभलक्षणा कन्यका समुत्पन्ना. ॥ ५९ ॥ अहं तां (बा. मू.) [3]अद्राक्षं. [4]शरच्चन्द्रनिभा-
नना [सा] प्रियभार्यायै अर्पिता. ॥ ६० ॥ एकदा, मयि [5]विविक्ते [6]संस्थिते, [7]महतीं वीणां [8]रणयन् वि[9]भुं
नारायणं गायन् नारदः अभ्यागात्. ॥ ६१ ॥ (बा. पू. मू.) मां उवाच—"(मू.) वचनं शृणुष्व. ॥ ६२ ॥

१ तासाच्या तोंडांतून. २ कन्याधर्मानें मानिलेल्या. ३ पाहता झालों. ४ शरदृतूंतील चंद्राप्रमाणें जिचें मुख आहे, अशा.
५ एकांतांत. ६ बसलेल्या. ७ 'महती' ह्या नांवाच्या. ८ वाजविणारा. ९ उत्कर्ष होण्याला कारण, अशा. १९

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कन्या ऊर्मिला मोठ्या आनंदानें लक्ष्मणाला दिली. ॥ ९५ ॥ त्याच्या भावाला मांडवी आणि श्रुतकीर्ति ह्या नांवांच्या दोन कन्या होत्या; त्यांतील मांडवी त्यानें भरताला दिली व दुसरी (श्रुतकीर्ति) शत्रुघ्नाला दिली. ॥ ९६ ॥ सर्व चौवेही भाऊ मूळचेच सुलक्षणसंपन्न होते. आतां विवाह झाल्यावर त्यांना इतकें तेज आलें कीं ते जसे कांहीं दुसरे लोकपालच दिसूं लागले ! ॥ ९७ ॥ नंतर, त्या मिथिलाधिपति जनकराजानें नारदमुनींनीं सांगितलेला आपल्या कन्येचा वृत्तांत वसिष्ठाला आणि विश्वामित्राला निवेदन केला. ॥ ९८ ॥ - तो ह्मणाला :- 'मी यज्ञासाठीं भूमि शुद्ध करण्याकरितां नांगरानें नांगरीत असतां, ॥

तथैव श्रुतकीर्तिं च माण्डवीं भ्रातृकन्यके ॥ भरताय ददावेकां शत्रुघ्नायापरां ददौ ॥ ५६ ॥ चत्वारो दारसंपन्ना भ्रातरः शुभलक्षणाः ॥ विरेजुः प्रभया सर्वे लोकपाला इवापरे॥५७॥ततोऽब्रवीद्वसिष्ठाय विश्वामित्राय मैथिलः ॥ जनकः स्वसुतोदन्तं नारदेनाभिभाषितम्॥५८॥यज्ञभूमिविशुद्ध्यर्थं कर्षतो लांगलेन मे॥

(पू. मू. प्र.) एकां भरताय ददौ, अपरां शत्रुघ्नाय ददौ. ॥ ९६ ॥ शुभलक्षणाः सर्वे दारसंपन्नाः चत्वारः भ्रातरः प्रभया, अपरे लोकपालाः इव, विरेजुः. ॥ ९७ ॥ ततः मैथिलः जनकः नारदेन अभिभाषितं स्वसुतोदन्तं वसिष्ठाय विश्वामित्राय च अब्रवीत् - ॥ ९८ ॥ ' मे यज्ञभूमिविशुध्यर्थं लांगलेन कर्षतः [सतः] ॥

१ भावाच्या. मू... २ सपत्नीक. ३ शोभले. ४ सांगितलेल्या. ५ ... ...ताला. ६ यज्ञ... ...ण्याकरितां. ७ नां...

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रामाच्या हा[illegible] रेषेंत अक्षतायुक्त उदक दिलें आणि नंतर [illegible] हात धरून ॥ ९२ ॥ [illegible]
पाणिग्रहणाच्या विधीप्रमाणें रामाला अर्पण केली. - मुलगी देतांना जनकराजा रामाला म्हणाला :- ' हे रामचंद्रा, ही सीता - स्वरूपानें सुंदर आहे, - हिचे नेत्र कमलपत्रासारखे आहेत, हिच्या आंगावर सोन्या-मोत्यांचे वगैरे अलंकार घातले आहेत, ॥ ९३ ॥ ही माझी कन्या मी तुला देतों. हे रघुवीरा, सतुष्ट हो.' जनकानें असें म्हणून संतुष्ट अंतःकरणानें सीता रामाच्या हातीं दिली. ॥ ९४ ॥ पूर्वी क्षीरसमुद्रानें लक्ष्मी विष्णूला दिली त्यावेळीं त्याला जसा आनंद झाला तसाच आतां जनकाला झाला. पुढें त्यानें आपली औरस

ततः सीतां करे धृत्वा साक्षतोदकपूर्वकम् ॥ ५२ ॥ रामाय प्रददौ प्रीत्या पाणिग्रहविधानतः ॥ सीता कमलपत्राक्षी स्वर्णमुक्तादिभूषिता ॥ ५३ ॥ दीयते मे सुता तुभ्यं प्रीतो भव रघूत्तम ॥ इति प्रीतेन मनसा सीतां रामकरेऽर्पयन् ॥ ५४ ॥ मुमोद जनको लक्ष्मीं क्षीराब्धिरिव विष्णवे ॥ ऊर्मिलां चौरसीं कन्यां लक्ष्मणाय ददौ मुदा ॥ ५५ ॥

(मू. प्र.). ॥ ९२ ॥ (पू. मू. प्र.) प्रददौ - ' (मू.) ॥ ९३ ॥ मे सुता तुभ्यं दीयते. रघूत्तम, प्रीतः भव. ' (मू. प्र.) ॥ ९४ ॥ जनकः, लक्ष्मीं विष्णवे [अर्पयन्] क्षीराब्धिः इव, मुमोद, (मू. प्र.) ददौ. ॥ ९५ ॥

१ अक्षतांसहित उदकपूर्वक. २ पाणिग्रहणाच्या विधीनें. ३ क्षीरसमुद्र. ४ स्वतांच्या अशा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

घोषांनीं आणि नृत्यगायनांच्या शब्दांनीं तो मंडप दुमदुमून गेला होता. जनकानें त्यांमध्यें महामोल रत्नांनीं खचिलेल्या सुवर्णाच्या सिंहासनावर रामाला बसविलें. ॥४८॥ शतानंद उपाध्यायांनीं, वसिष्ठ आणि विश्वामित्र ह्या दोघांना रामाच्या दोहों बाजूंना बसवून, त्यांची अनुक्रमानें पूजा केली. ॥ ४९ ॥ भार्येसह जनकराजानें त्या ठिकाणीं अग्नीची स्थापना करवून यथाविधि होम करविला. सीतेला आंगावर अलंकार घालवून सुशोभित करून तेथें आणिलें. आणि - तिला घेऊन - राजा कमलनयन रामचंद्राजवळ आला. त्यानें रूढीला अनुसरून रामाचे पाय धुतले आणि तें उदक मस्तकीं धारिलें. ॥५०॥५१॥ - त्या उदकाचें माहात्म्य किती

दि[१]व्यरत्नाञ्चिते [२]स्वर्णपीठे रामं न्यवे[३]शयत् ॥ ४८ ॥ वसिष्ठं कौशिकं चैव शता-
नन्दः पुरोहितः ॥ यथाक्रमं पूजयित्वा रामस्योभयपार्श्वयोः ॥ ४९ ॥ स्थाप-
यित्वा स तत्राग्निं ज्वालयित्वा यथाविधि ॥ सीतामानीय शोभाढ्यां नानारत्न-
विभूषिताम् ॥ ५० ॥ सभार्यो जनकः प्रायाद्रामं राजीवलोचनम् ॥ पादौ प्रक्षाल्य
विधिवत्तदपो मूर्ध्न्यधारयत् ॥ ५१ ॥ या धृता मूर्ध्नि शर्वेण ब्रह्मणा मुनिभिः सदा ॥

(मू. प्र.). ॥४८॥ शतानन्दः पुरोहितः वसिष्ठं कौशिकं च एव रामस्य उभयपार्श्वयोः यथाक्रमं पूजयित्वा, ॥४९॥ सः सभार्यः जनकः तत्र अग्निं स्थापयित्वा, यथाविधि ज्वालयित्वा, नानारत्नविभूषितां शोभाढ्यां सीतां आनीय, राजीवलोचनं रामं प्रायात्, (मू. प्र.). ॥५०॥५१॥ (पु.मू.) मूर्ध्नि धृताः. ॥

---

१ दुर्मिळ रत्नांनीं खचलेल्या. २ सुवर्णाच्या सिंहासनावर. ३ बसविता झाला. ४ दोन्ही बाजूंना. ५ होम करून. ६ गेला. ७ त्या उदकाला. ८ मूर्ध्नि मस्तकीं ९ अधारयत् धारिता झाला. १० शंकरानें.

सामग्री भरलेली होती ती पाहून दशरथाला समाधान वाटलें. ॥ ४४ ॥ जनकाला धर्मशास्त्र अवगत होतें. त्यानें उत्तम दिवस पाहून, शुभ लग्नीं, सुमुहूर्तावर, चौघां भावांसह रामाला बोलावून आणविलें. ॥ ४५ ॥ त्यानें विवाहासाठीं सर्व सुंदर वस्तूंनीं शोभविलेला विस्तीर्ण मंडप करविला होता; त्याला रत्नांचे खांब दिले असून सुंदर छत लाविलें होतें, तोरणें बांधिलीं होतीं व मोत्यांच्या झालरी, फुलांच्या माळा आणि फळांचे घूड अडकाविले होते; ॥ ४६ ॥ तेथें वैदिक ब्राह्मणांचा मोठा समाज जमला होता व सुवासिनी इकडे तिकडे फिरत होत्या, ब्राह्मणांनीं आंगांवर सुवर्णाचे अलंकार घातले होते व स्त्रियांनीं उंची वस्त्रें परिधान केलीं असून कंठांत पुतळ्यांच्या माळा घातल्या होत्या; ॥ ४७ ॥ नगारे, दुंदुभि ह्यांच्या

ततः शुभे दिने लग्ने सुमुहूर्ते रघूत्तमम् ॥ आनयामास धर्मज्ञो रामं सभ्रातृकं तदा ॥ ४५ ॥ रत्नस्तम्भसुविस्तारे सु[2]विताने सु[3]तोरणे ॥ मण्डपे सर्वशोभा[4]ढ्ये मुक्तापुष्पफलान्विते ॥ ४६ ॥ वेदविद्भिः सुसंबाधे ब्राह्मणैः स्वर्णभूषितैः ॥ सुवासिनीभिः परितो निष्ककण्ठीभिरावृते ॥ ४७ ॥ भेरीदुन्दुभिनिर्घोषैर्गीतनृत्यैः समाकुले ॥

ततः धर्मज्ञः रघूत्तमं सभ्रातृकं रामं (मू. प्र.) आनयामास. ॥ ४५ ॥ (मू. प्र.) ॥ ४६ ॥ वेदविद्भिः[6] स्वर्णभूषितैः ब्राह्मणैः सुसंबाधे निष्ककण्ठीभिः सुवासिनीभिः परितः आवृते ॥ ४७ ॥ (मू. प्र.) ॥

१ रत्नाचे खांब ज्यांत आहेत अशा व फार विस्तीर्ण अशा. २ ज्याला सुंदर छत लाविलें, अशा. ३ ज्याला मंगल तोरणें लाविलीं, अशा. ४ सर्व शोभांनीं युक्त अशा. ५ ज्याला मोत्यें, फुलें व फळें लाविलीं, अशा. ६ वेद जाणणाऱ्या. ७ सुवर्णाच्या अलंकारांनीं सुशोभित, अशा. ८ पुष्कळ भरलेल्या. ९ ज्यांच्या कंठांत पुतळ्यांच्या माळा आहेत अशा. १० वेढलेल्या.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पितापुत्रांची भेट.

रामलक्ष्मणांनीं तत्काळ पित्याच्या चरणांस वंदन केलें. मुलांना पाहिल्यावर दशरथाला आनंद झाला व तो रामाला ह्मणाला :– ॥ ४१ ॥ ‘ रामा, तुझें प्रफुल्ल कमलासारखें मुख आज माझ्या दृष्टीस पडलें ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय ! विश्वामित्रमुनींच्या अनुग्रहामुळें माझें सर्वस्वी कल्याण झालें !’ ॥४२॥ असें बोलून त्यानें रामाचें मस्तक हुंगिलें व त्याला पुष्कळवेळ पोटाशीं धरिलें. ह्यावेळीं तो, जसा - एखादा योगी समाधीमध्यें - ब्रह्मानंदांत निमग्न होतो, त्याप्रमाणें, हर्षसमुद्रांत गढून गेला. ॥ ४३ ॥ नंतर जनकराजानें राण्या आणि पुत्र ह्यांसह दशरथाला एका सुंदर मंदिरांत नेऊन उतरविलें. त्या मंदिरांत सर्व उपभोगांची

रामस्तु लक्ष्मणेनाशु ववन्दे चरणौ पितुः ॥ ततो हृष्टो दशरथो रामं वचनमब्रवीत् ॥ ४१ ॥ दिष्ट्या पश्यामि ते राम मुखं फुल्लाम्बुजोपमम् ॥ मुनेरनुग्रहात्सर्वं संपन्नं मम शोभनम् ॥ ४२ ॥ इत्युक्त्वा ऽऽघ्राय मूर्धानमालिंग्य च पुनः पुनः ॥ हर्षेण महता ऽऽविष्टो ब्रह्मानन्दगतो यथा ॥ ४३ ॥ ततो जनकराजेन मन्दिरे सन्निवेशितः ॥ शोभने सर्वभोगाढ्ये सदारः ससुतः सुखी ॥४४॥

लक्ष्मणेन [सह] रामः तु पितुः चरणौ आशु ववन्दे. (मू. प्र.) ॥ ४१ ॥ ‘राम, दिष्ट्या[1] फुल्लाम्बुजोपमं[2] ते मुखं पश्यामि. (मू. प्र.) सम्पन्नं. ॥४२॥ इति उक्त्वा, मूर्धानं अवघ्राय[3], पुनः पुनः आलिंग्य च, यथा ब्रह्मानन्दं गतः [तथा] महता हर्षेण आविष्टः[4]. ॥ ४३ ॥ ततः जनकराजेन सदारः ससुतः सुखी दशरथः शोभने सर्वभोगाढ्ये[5] मन्दिरे सन्निवेशितः. ॥ ४४ ॥

१ आनंद (उद्गार). २ फुललेल्या कमळासारख्या. ३ हुंगून. ४ व्याप्त. ५ सर्व उपभोगसामग्रीनें ...

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

[OrderDescription]
,CREATED=21.09.19 12:44
,TRANSFERRED=2019/09/21 at 15:40:04
,PAGES=937
,TYPE=STD
,NAME=S0001889
,Book Name=M-2267-ADHYATAM RAMAYANARTH BODH
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
,FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,FILE22=00000022.TIF
,FILE23=00000023.TIF
,FILE24=00000024.TIF
,FILE25=00000025.TIF
,FILE26=00000026.TIF
,FILE27=00000027.TIF
,FILE28=00000028.TIF
,FILE29=00000029.TIF
,FILE30=00000030.TIF
,FILE31=00000031.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE32=00000032.TIF
,FILE33=00000033.TIF
,FILE34=00000034.TIF
,FILE35=00000035.TIF
,FILE36=00000036.TIF
,FILE37=00000037.TIF
,FILE38=00000038.TIF
,FILE39=00000039.TIF
,FILE40=00000040.TIF
,FILE41=00000041.TIF
,FILE42=00000042.TIF
,FILE43=00000043.TIF
,FILE44=00000044.TIF
,FILE45=00000045.TIF
,FILE46=00000046.TIF
,FILE47=00000047.TIF
,FILE48=00000048.TIF
,FILE49=00000049.TIF
,FILE50=00000050.TIF
,FILE51=00000051.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE52=00000052.TIF
,FILE53=00000053.TIF
,FILE54=00000054.TIF
,FILE55=00000055.TIF
,FILE56=00000056.TIF
,FILE57=00000057.TIF
,FILE58=00000058.TIF
,FILE59=00000059.TIF
,FILE60=00000060.TIF
,FILE61=00000061.TIF
,FILE62=00000062.TIF
,FILE63=00000063.TIF
,FILE64=00000064.TIF
,FILE65=00000065.TIF
,FILE66=00000066.TIF
,FILE67=00000067.TIF
,FILE68=00000068.TIF
,FILE69=00000069.TIF
,FILE70=00000070.TIF
,FILE71=00000071.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE72=00000072.TIF
,FILE73=00000073.TIF
,FILE74=00000074.TIF
,FILE75=00000075.TIF
,FILE76=00000076.TIF
,FILE77=00000077.TIF
,FILE78=00000078.TIF
,FILE79=00000079.TIF
,FILE80=00000080.TIF
,FILE81=00000081.TIF
,FILE82=00000082.TIF
,FILE83=00000083.TIF
,FILE84=00000084.TIF
,FILE85=00000085.TIF
,FILE86=00000086.TIF
,FILE87=00000087.TIF
,FILE88=00000088.TIF
,FILE89=00000089.TIF
,FILE90=00000090.TIF
,FILE91=00000091.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE92=00000092.TIF
,FILE93=00000093.TIF
,FILE94=00000094.TIF
,FILE95=00000095.TIF
,FILE96=00000096.TIF
,FILE97=00000097.TIF
,FILE98=00000098.TIF
,FILE99=00000099.TIF
,FILE100=00000100.TIF
,FILE101=00000101.TIF
,FILE102=00000102.TIF
,FILE103=00000103.TIF
,FILE104=00000104.TIF
,FILE105=00000105.TIF
,FILE106=00000106.TIF
,FILE107=00000107.TIF
,FILE108=00000108.TIF
,FILE109=00000109.TIF
,FILE110=00000110.TIF
,FILE111=00000111.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE112=00000112.TIF
,FILE113=00000113.TIF
,FILE114=00000114.TIF
,FILE115=00000115.TIF
,FILE116=00000116.TIF
,FILE117=00000117.TIF
,FILE118=00000118.TIF
,FILE119=00000119.TIF
,FILE120=00000120.TIF
,FILE121=00000121.TIF
,FILE122=00000122.TIF
,FILE123=00000123.TIF
,FILE124=00000124.TIF
,FILE125=00000125.TIF
,FILE126=00000126.TIF
,FILE127=00000127.TIF
,FILE128=00000128.TIF
,FILE129=00000129.TIF
,FILE130=00000130.TIF
,FILE131=00000131.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE132=00000132.TIF
,FILE133=00000133.TIF
,FILE134=00000134.TIF
,FILE135=00000135.TIF
,FILE136=00000136.TIF
,FILE137=00000137.TIF
,FILE138=00000138.TIF
,FILE139=00000139.TIF
,FILE140=00000140.TIF
,FILE141=00000141.TIF
,FILE142=00000142.TIF
,FILE143=00000143.TIF
,FILE144=00000144.TIF
,FILE145=00000145.TIF
,FILE146=00000146.TIF
,FILE147=00000147.TIF
,FILE148=00000148.TIF
,FILE149=00000149.TIF
,FILE150=00000150.TIF
,FILE151=00000151.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE152=00000152.TIF
,FILE153=00000153.TIF
,FILE154=00000154.TIF
,FILE155=00000155.TIF
,FILE156=00000156.TIF
,FILE157=00000157.TIF
,FILE158=00000158.TIF
,FILE159=00000159.TIF
,FILE160=00000160.TIF
,FILE161=00000161.TIF
,FILE162=00000162.TIF
,FILE163=00000163.TIF
,FILE164=00000164.TIF
,FILE165=00000165.TIF
,FILE166=00000166.TIF
,FILE167=00000167.TIF
,FILE168=00000168.TIF
,FILE169=00000169.TIF
,FILE170=00000170.TIF
,FILE171=00000171.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE172=00000172.TIF
,FILE173=00000173.TIF
,FILE174=00000174.TIF
,FILE175=00000175.TIF
,FILE176=00000176.TIF
,FILE177=00000177.TIF
,FILE178=00000178.TIF
,FILE179=00000179.TIF
,FILE180=00000180.TIF
,FILE181=00000181.TIF
,FILE182=00000182.TIF
,FILE183=00000183.TIF
,FILE184=00000184.TIF
,FILE185=00000185.TIF
,FILE186=00000186.TIF
,FILE187=00000187.TIF
,FILE188=00000188.TIF
,FILE189=00000189.TIF
,FILE190=00000190.TIF
,FILE191=00000191.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE192=00000192.TIF
,FILE193=00000193.TIF
,FILE194=00000194.TIF
,FILE195=00000195.TIF
,FILE196=00000196.TIF
,FILE197=00000197.TIF
,FILE198=00000198.TIF
,FILE199=00000199.TIF
,FILE200=00000200.TIF
,FILE201=00000201.TIF
,FILE202=00000202.TIF
,FILE203=00000203.TIF
,FILE204=00000204.TIF
,FILE205=00000205.TIF
,FILE206=00000206.TIF
,FILE207=00000207.TIF
,FILE208=00000208.TIF
,FILE209=00000209.TIF
,FILE210=00000210.TIF
,FILE211=00000211.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE212=00000212.TIF
,FILE213=00000213.TIF
,FILE214=00000214.TIF
,FILE215=00000215.TIF
,FILE216=00000216.TIF
,FILE217=00000217.TIF
,FILE218=00000218.TIF
,FILE219=00000219.TIF
,FILE220=00000220.TIF
,FILE221=00000221.TIF
,FILE222=00000222.TIF
,FILE223=00000223.TIF
,FILE224=00000224.TIF
,FILE225=00000225.TIF
,FILE226=00000226.TIF
,FILE227=00000227.TIF
,FILE228=00000228.TIF
,FILE229=00000229.TIF
,FILE230=00000230.TIF
,FILE231=00000231.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE232=00000232.TIF
,FILE233=00000233.TIF
,FILE234=00000234.TIF
,FILE235=00000235.TIF
,FILE236=00000236.TIF
,FILE237=00000237.TIF
,FILE238=00000238.TIF
,FILE239=00000239.TIF
,FILE240=00000240.TIF
,FILE241=00000241.TIF
,FILE242=00000242.TIF
,FILE243=00000243.TIF
,FILE244=00000244.TIF
,FILE245=00000245.TIF
,FILE246=00000246.TIF
,FILE247=00000247.TIF
,FILE248=00000248.TIF
,FILE249=00000249.TIF
,FILE250=00000250.TIF
,FILE251=00000251.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE252=00000252.TIF
,FILE253=00000253.TIF
,FILE254=00000254.TIF
,FILE255=00000255.TIF
,FILE256=00000256.TIF
,FILE257=00000257.TIF
,FILE258=00000258.TIF
,FILE259=00000259.TIF
,FILE260=00000260.TIF
,FILE261=00000261.TIF
,FILE262=00000262.TIF
,FILE263=00000263.TIF
,FILE264=00000264.TIF
,FILE265=00000265.TIF
,FILE266=00000266.TIF
,FILE267=00000267.TIF
,FILE268=00000268.TIF
,FILE269=00000269.TIF
,FILE270=00000270.TIF
,FILE271=00000271.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE272=00000272.TIF
,FILE273=00000273.TIF
,FILE274=00000274.TIF
,FILE275=00000275.TIF
,FILE276=00000276.TIF
,FILE277=00000277.TIF
,FILE278=00000278.TIF
,FILE279=00000279.TIF
,FILE280=00000280.TIF
,FILE281=00000281.TIF
,FILE282=00000282.TIF
,FILE283=00000283.TIF
,FILE284=00000284.TIF
,FILE285=00000285.TIF
,FILE286=00000286.TIF
,FILE287=00000287.TIF
,FILE288=00000288.TIF
,FILE289=00000289.TIF
,FILE290=00000290.TIF
,FILE291=00000291.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE292=00000292.TIF
,FILE293=00000293.TIF
,FILE294=00000294.TIF
,FILE295=00000295.TIF
,FILE296=00000296.TIF
,FILE297=00000297.TIF
,FILE298=00000298.TIF
,FILE299=00000299.TIF
,FILE300=00000300.TIF
,FILE301=00000301.TIF
,FILE302=00000302.TIF
,FILE303=00000303.TIF
,FILE304=00000304.TIF
,FILE305=00000305.TIF
,FILE306=00000306.TIF
,FILE307=00000307.TIF
,FILE308=00000308.TIF
,FILE309=00000309.TIF
,FILE310=00000310.TIF
,FILE311=00000311.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE312=00000312.TIF
,FILE313=00000313.TIF
,FILE314=00000314.TIF
,FILE315=00000315.TIF
,FILE316=00000316.TIF
,FILE317=00000317.TIF
,FILE318=00000318.TIF
,FILE319=00000319.TIF
,FILE320=00000320.TIF
,FILE321=00000321.TIF
,FILE322=00000322.TIF
,FILE323=00000323.TIF
,FILE324=00000324.TIF
,FILE325=00000325.TIF
,FILE326=00000326.TIF
,FILE327=00000327.TIF
,FILE328=00000328.TIF
,FILE329=00000329.TIF
,FILE330=00000330.TIF
,FILE331=00000331.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE332=00000332.TIF
,FILE333=00000333.TIF
,FILE334=00000334.TIF
,FILE335=00000335.TIF
,FILE336=00000336.TIF
,FILE337=00000337.TIF
,FILE338=00000338.TIF
,FILE339=00000339.TIF
,FILE340=00000340.TIF
,FILE341=00000341.TIF
,FILE342=00000342.TIF
,FILE343=00000343.TIF
,FILE344=00000344.TIF
,FILE345=00000345.TIF
,FILE346=00000346.TIF
,FILE347=00000347.TIF
,FILE348=00000348.TIF
,FILE349=00000349.TIF
,FILE350=00000350.TIF
,FILE351=00000351.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE352=00000352.TIF
,FILE353=00000353.TIF
,FILE354=00000354.TIF
,FILE355=00000355.TIF
,FILE356=00000356.TIF
,FILE357=00000357.TIF
,FILE358=00000358.TIF
,FILE359=00000359.TIF
,FILE360=00000360.TIF
,FILE361=00000361.TIF
,FILE362=00000362.TIF
,FILE363=00000363.TIF
,FILE364=00000364.TIF
,FILE365=00000365.TIF
,FILE366=00000366.TIF
,FILE367=00000367.TIF
,FILE368=00000368.TIF
,FILE369=00000369.TIF
,FILE370=00000370.TIF
,FILE371=00000371.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE372=00000372.TIF
,FILE373=00000373.TIF
,FILE374=00000374.TIF
,FILE375=00000375.TIF
,FILE376=00000376.TIF
,FILE377=00000377.TIF
,FILE378=00000378.TIF
,FILE379=00000379.TIF
,FILE380=00000380.TIF
,FILE381=00000381.TIF
,FILE382=00000382.TIF
,FILE383=00000383.TIF
,FILE384=00000384.TIF
,FILE385=00000385.TIF
,FILE386=00000386.TIF
,FILE387=00000387.TIF
,FILE388=00000388.TIF
,FILE389=00000389.TIF
,FILE390=00000390.TIF
,FILE391=00000391.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE392=00000392.TIF
,FILE393=00000393.TIF
,FILE394=00000394.TIF
,FILE395=00000395.TIF
,FILE396=00000396.TIF
,FILE397=00000397.TIF
,FILE398=00000398.TIF
,FILE399=00000399.TIF
,FILE400=00000400.TIF
,FILE401=00000401.TIF
,FILE402=00000402.TIF
,FILE403=00000403.TIF
,FILE404=00000404.TIF
,FILE405=00000405.TIF
,FILE406=00000406.TIF
,FILE407=00000407.TIF
,FILE408=00000408.TIF
,FILE409=00000409.TIF
,FILE410=00000410.TIF
,FILE411=00000411.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE412=00000412.TIF
,FILE413=00000413.TIF
,FILE414=00000414.TIF
,FILE415=00000415.TIF
,FILE416=00000416.TIF
,FILE417=00000417.TIF
,FILE418=00000418.TIF
,FILE419=00000419.TIF
,FILE420=00000420.TIF
,FILE421=00000421.TIF
,FILE422=00000422.TIF
,FILE423=00000423.TIF
,FILE424=00000424.TIF
,FILE425=00000425.TIF
,FILE426=00000426.TIF
,FILE427=00000427.TIF
,FILE428=00000428.TIF
,FILE429=00000429.TIF
,FILE430=00000430.TIF
,FILE431=00000431.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE432=00000432.TIF
,FILE433=00000433.TIF
,FILE434=00000434.TIF
,FILE435=00000435.TIF
,FILE436=00000436.TIF
,FILE437=00000437.TIF
,FILE438=00000438.TIF
,FILE439=00000439.TIF
,FILE440=00000440.TIF
,FILE441=00000441.TIF
,FILE442=00000442.TIF
,FILE443=00000443.TIF
,FILE444=00000444.TIF
,FILE445=00000445.TIF
,FILE446=00000446.TIF
,FILE447=00000447.TIF
,FILE448=00000448.TIF
,FILE449=00000449.TIF
,FILE450=00000450.TIF
,FILE451=00000451.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE452=00000452.TIF
,FILE453=00000453.TIF
,FILE454=00000454.TIF
,FILE455=00000455.TIF
,FILE456=00000456.TIF
,FILE457=00000457.TIF
,FILE458=00000458.TIF
,FILE459=00000459.TIF
,FILE460=00000460.TIF
,FILE461=00000461.TIF
,FILE462=00000462.TIF
,FILE463=00000463.TIF
,FILE464=00000464.TIF
,FILE465=00000465.TIF
,FILE466=00000466.TIF
,FILE467=00000467.TIF
,FILE468=00000468.TIF
,FILE469=00000469.TIF
,FILE470=00000470.TIF
,FILE471=00000471.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE472=00000472.TIF
,FILE473=00000473.TIF
,FILE474=00000474.TIF
,FILE475=00000475.TIF
,FILE476=00000476.TIF
,FILE477=00000477.TIF
,FILE478=00000478.TIF
,FILE479=00000479.TIF
,FILE480=00000480.TIF
,FILE481=00000481.TIF
,FILE482=00000482.TIF
,FILE483=00000483.TIF
,FILE484=00000484.TIF
,FILE485=00000485.TIF
,FILE486=00000486.TIF
,FILE487=00000487.TIF
,FILE488=00000488.TIF
,FILE489=00000489.TIF
,FILE490=00000490.TIF
,FILE491=00000491.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE492=00000492.TIF
,FILE493=00000493.TIF
,FILE494=00000494.TIF
,FILE495=00000495.TIF
,FILE496=00000496.TIF
,FILE497=00000497.TIF
,FILE498=00000498.TIF
,FILE499=00000499.TIF
,FILE500=00000500.TIF
,FILE501=00000501.TIF
,FILE502=00000502.TIF
,FILE503=00000503.TIF
,FILE504=00000504.TIF
,FILE505=00000505.TIF
,FILE506=00000506.TIF
,FILE507=00000507.TIF
,FILE508=00000508.TIF
,FILE509=00000509.TIF
,FILE510=00000510.TIF
,FILE511=00000511.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE512=00000512.TIF
,FILE513=00000513.TIF
,FILE514=00000514.TIF
,FILE515=00000515.TIF
,FILE516=00000516.TIF
,FILE517=00000517.TIF
,FILE518=00000518.TIF
,FILE519=00000519.TIF
,FILE520=00000520.TIF
,FILE521=00000521.TIF
,FILE522=00000522.TIF
,FILE523=00000523.TIF
,FILE524=00000524.TIF
,FILE525=00000525.TIF
,FILE526=00000526.TIF
,FILE527=00000527.TIF
,FILE528=00000528.TIF
,FILE529=00000529.TIF
,FILE530=00000530.TIF
,FILE531=00000531.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE532=00000532.TIF
,FILE533=00000533.TIF
,FILE534=00000534.TIF
,FILE535=00000535.TIF
,FILE536=00000536.TIF
,FILE537=00000537.TIF
,FILE538=00000538.TIF
,FILE539=00000539.TIF
,FILE540=00000540.TIF
,FILE541=00000541.TIF
,FILE542=00000542.TIF
,FILE543=00000543.TIF
,FILE544=00000544.TIF
,FILE545=00000545.TIF
,FILE546=00000546.TIF
,FILE547=00000547.TIF
,FILE548=00000548.TIF
,FILE549=00000549.TIF
,FILE550=00000550.TIF
,FILE551=00000551.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE552=00000552.TIF
,FILE553=00000553.TIF
,FILE554=00000554.TIF
,FILE555=00000555.TIF
,FILE556=00000556.TIF
,FILE557=00000557.TIF
,FILE558=00000558.TIF
,FILE559=00000559.TIF
,FILE560=00000560.TIF
,FILE561=00000561.TIF
,FILE562=00000562.TIF
,FILE563=00000563.TIF
,FILE564=00000564.TIF
,FILE565=00000565.TIF
,FILE566=00000566.TIF
,FILE567=00000567.TIF
,FILE568=00000568.TIF
,FILE569=00000569.TIF
,FILE570=00000570.TIF
,FILE571=00000571.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE572=00000572.TIF
,FILE573=00000573.TIF
,FILE574=00000574.TIF
,FILE575=00000575.TIF
,FILE576=00000576.TIF
,FILE577=00000577.TIF
,FILE578=00000578.TIF
,FILE579=00000579.TIF
,FILE580=00000580.TIF
,FILE581=00000581.TIF
,FILE582=00000582.TIF
,FILE583=00000583.TIF
,FILE584=00000584.TIF
,FILE585=00000585.TIF
,FILE586=00000586.TIF
,FILE587=00000587.TIF
,FILE588=00000588.TIF
,FILE589=00000589.TIF
,FILE590=00000590.TIF
,FILE591=00000591.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE592=00000592.TIF
,FILE593=00000593.TIF
,FILE594=00000594.TIF
,FILE595=00000595.TIF
,FILE596=00000596.TIF
,FILE597=00000597.TIF
,FILE598=00000598.TIF
,FILE599=00000599.TIF
,FILE600=00000600.TIF
,FILE601=00000601.TIF
,FILE602=00000602.TIF
,FILE603=00000603.TIF
,FILE604=00000604.TIF
,FILE605=00000605.TIF
,FILE606=00000606.TIF
,FILE607=00000607.TIF
,FILE608=00000608.TIF
,FILE609=00000609.TIF
,FILE610=00000610.TIF
,FILE611=00000611.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE612=00000612.TIF
,FILE613=00000613.TIF
,FILE614=00000614.TIF
,FILE615=00000615.TIF
,FILE616=00000616.TIF
,FILE617=00000617.TIF
,FILE618=00000618.TIF
,FILE619=00000619.TIF
,FILE620=00000620.TIF
,FILE621=00000621.TIF
,FILE622=00000622.TIF
,FILE623=00000623.TIF
,FILE624=00000624.TIF
,FILE625=00000625.TIF
,FILE626=00000626.TIF
,FILE627=00000627.TIF
,FILE628=00000628.TIF
,FILE629=00000629.TIF
,FILE630=00000630.TIF
,FILE631=00000631.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE632=00000632.TIF
,FILE633=00000633.TIF
,FILE634=00000634.TIF
,FILE635=00000635.TIF
,FILE636=00000636.TIF
,FILE637=00000637.TIF
,FILE638=00000638.TIF
,FILE639=00000639.TIF
,FILE640=00000640.TIF
,FILE641=00000641.TIF
,FILE642=00000642.TIF
,FILE643=00000643.TIF
,FILE644=00000644.TIF
,FILE645=00000645.TIF
,FILE646=00000646.TIF
,FILE647=00000647.TIF
,FILE648=00000648.TIF
,FILE649=00000649.TIF
,FILE650=00000650.TIF
,FILE651=00000651.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE652=00000652.TIF
,FILE653=00000653.TIF
,FILE654=00000654.TIF
,FILE655=00000655.TIF
,FILE656=00000656.TIF
,FILE657=00000657.TIF
,FILE658=00000658.TIF
,FILE659=00000659.TIF
,FILE660=00000660.TIF
,FILE661=00000661.TIF
,FILE662=00000662.TIF
,FILE663=00000663.TIF
,FILE664=00000664.TIF
,FILE665=00000665.TIF
,FILE666=00000666.TIF
,FILE667=00000667.TIF
,FILE668=00000668.TIF
,FILE669=00000669.TIF
,FILE670=00000670.TIF
,FILE671=00000671.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE672=00000672.TIF
,FILE673=00000673.TIF
,FILE674=00000674.TIF
,FILE675=00000675.TIF
,FILE676=00000676.TIF
,FILE677=00000677.TIF
,FILE678=00000678.TIF
,FILE679=00000679.TIF
,FILE680=00000680.TIF
,FILE681=00000681.TIF
,FILE682=00000682.TIF
,FILE683=00000683.TIF
,FILE684=00000684.TIF
,FILE685=00000685.TIF
,FILE686=00000686.TIF
,FILE687=00000687.TIF
,FILE688=00000688.TIF
,FILE689=00000689.TIF
,FILE690=00000690.TIF
,FILE691=00000691.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE692=00000692.TIF
,FILE693=00000693.TIF
,FILE694=00000694.TIF
,FILE695=00000695.TIF
,FILE696=00000696.TIF
,FILE697=00000697.TIF
,FILE698=00000698.TIF
,FILE699=00000699.TIF
,FILE700=00000700.TIF
,FILE701=00000701.TIF
,FILE702=00000702.TIF
,FILE703=00000703.TIF
,FILE704=00000704.TIF
,FILE705=00000705.TIF
,FILE706=00000706.TIF
,FILE707=00000707.TIF
,FILE708=00000708.TIF
,FILE709=00000709.TIF
,FILE710=00000710.TIF
,FILE711=00000711.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE712=00000712.TIF
,FILE713=00000713.TIF
,FILE714=00000714.TIF
,FILE715=00000715.TIF
,FILE716=00000716.TIF
,FILE717=00000717.TIF
,FILE718=00000718.TIF
,FILE719=00000719.TIF
,FILE720=00000720.TIF
,FILE721=00000721.TIF
,FILE722=00000722.TIF
,FILE723=00000723.TIF
,FILE724=00000724.TIF
,FILE725=00000725.TIF
,FILE726=00000726.TIF
,FILE727=00000727.TIF
,FILE728=00000728.TIF
,FILE729=00000729.TIF
,FILE730=00000730.TIF
,FILE731=00000731.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE732=00000732.TIF
,FILE733=00000733.TIF
,FILE734=00000734.TIF
,FILE735=00000735.TIF
,FILE736=00000736.TIF
,FILE737=00000737.TIF
,FILE738=00000738.TIF
,FILE739=00000739.TIF
,FILE740=00000740.TIF
,FILE741=00000741.TIF
,FILE742=00000742.TIF
,FILE743=00000743.TIF
,FILE744=00000744.TIF
,FILE745=00000745.TIF
,FILE746=00000746.TIF
,FILE747=00000747.TIF
,FILE748=00000748.TIF
,FILE749=00000749.TIF
,FILE750=00000750.TIF
,FILE751=00000751.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE752=00000752.TIF
,FILE753=00000753.TIF
,FILE754=00000754.TIF
,FILE755=00000755.TIF
,FILE756=00000756.TIF
,FILE757=00000757.TIF
,FILE758=00000758.TIF
,FILE759=00000759.TIF
,FILE760=00000760.TIF
,FILE761=00000761.TIF
,FILE762=00000762.TIF
,FILE763=00000763.TIF
,FILE764=00000764.TIF
,FILE765=00000765.TIF
,FILE766=00000766.TIF
,FILE767=00000767.TIF
,FILE768=00000768.TIF
,FILE769=00000769.TIF
,FILE770=00000770.TIF
,FILE771=00000771.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE772=00000772.TIF
,FILE773=00000773.TIF
,FILE774=00000774.TIF
,FILE775=00000775.TIF
,FILE776=00000776.TIF
,FILE777=00000777.TIF
,FILE778=00000778.TIF
,FILE779=00000779.TIF
,FILE780=00000780.TIF
,FILE781=00000781.TIF
,FILE782=00000782.TIF
,FILE783=00000783.TIF
,FILE784=00000784.TIF
,FILE785=00000785.TIF
,FILE786=00000786.TIF
,FILE787=00000787.TIF
,FILE788=00000788.TIF
,FILE789=00000789.TIF
,FILE790=00000790.TIF
,FILE791=00000791.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE792=00000792.TIF
,FILE793=00000793.TIF
,FILE794=00000794.TIF
,FILE795=00000795.TIF
,FILE796=00000796.TIF
,FILE797=00000797.TIF
,FILE798=00000798.TIF
,FILE799=00000799.TIF
,FILE800=00000800.TIF
,FILE801=00000801.TIF
,FILE802=00000802.TIF
,FILE803=00000803.TIF
,FILE804=00000804.TIF
,FILE805=00000805.TIF
,FILE806=00000806.TIF
,FILE807=00000807.TIF
,FILE808=00000808.TIF
,FILE809=00000809.TIF
,FILE810=00000810.TIF
,FILE811=00000811.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE812=00000812.TIF
,FILE813=00000813.TIF
,FILE814=00000814.TIF
,FILE815=00000815.TIF
,FILE816=00000816.TIF
,FILE817=00000817.TIF
,FILE818=00000818.TIF
,FILE819=00000819.TIF
,FILE820=00000820.TIF
,FILE821=00000821.TIF
,FILE822=00000822.TIF
,FILE823=00000823.TIF
,FILE824=00000824.TIF
,FILE825=00000825.TIF
,FILE826=00000826.TIF
,FILE827=00000827.TIF
,FILE828=00000828.TIF
,FILE829=00000829.TIF
,FILE830=00000830.TIF
,FILE831=00000831.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE832=00000832.TIF
,FILE833=00000833.TIF
,FILE834=00000834.TIF
,FILE835=00000835.TIF
,FILE836=00000836.TIF
,FILE837=00000837.TIF
,FILE838=00000838.TIF
,FILE839=00000839.TIF
,FILE840=00000840.TIF
,FILE841=00000841.TIF
,FILE842=00000842.TIF
,FILE843=00000843.TIF
,FILE844=00000844.TIF
,FILE845=00000845.TIF
,FILE846=00000846.TIF
,FILE847=00000847.TIF
,FILE848=00000848.TIF
,FILE849=00000849.TIF
,FILE850=00000850.TIF
,FILE851=00000851.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE852=00000852.TIF
,FILE853=00000853.TIF
,FILE854=00000854.TIF
,FILE855=00000855.TIF
,FILE856=00000856.TIF
,FILE857=00000857.TIF
,FILE858=00000858.TIF
,FILE859=00000859.TIF
,FILE860=00000860.TIF
,FILE861=00000861.TIF
,FILE862=00000862.TIF
,FILE863=00000863.TIF
,FILE864=00000864.TIF
,FILE865=00000865.TIF
,FILE866=00000866.TIF
,FILE867=00000867.TIF
,FILE868=00000868.TIF
,FILE869=00000869.TIF
,FILE870=00000870.TIF
,FILE871=00000871.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE872=00000872.TIF
,FILE873=00000873.TIF
,FILE874=00000874.TIF
,FILE875=00000875.TIF
,FILE876=00000876.TIF
,FILE877=00000877.TIF
,FILE878=00000878.TIF
,FILE879=00000879.TIF
,FILE880=00000880.TIF
,FILE881=00000881.TIF
,FILE882=00000882.TIF
,FILE883=00000883.TIF
,FILE884=00000884.TIF
,FILE885=00000885.TIF
,FILE886=00000886.TIF
,FILE887=00000887.TIF
,FILE888=00000888.TIF
,FILE889=00000889.TIF
,FILE890=00000890.TIF
,FILE891=00000891.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE892=00000892.TIF
,FILE893=00000893.TIF
,FILE894=00000894.TIF
,FILE895=00000895.TIF
,FILE896=00000896.TIF
,FILE897=00000897.TIF
,FILE898=00000898.TIF
,FILE899=00000899.TIF
,FILE900=00000900.TIF
,FILE901=00000901.TIF
,FILE902=00000902.TIF
,FILE903=00000903.TIF
,FILE904=00000904.TIF
,FILE905=00000905.TIF
,FILE906=00000906.TIF
,FILE907=00000907.TIF
,FILE908=00000908.TIF
,FILE909=00000909.TIF
,FILE910=00000910.TIF
,FILE911=00000911.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE912=00000912.TIF
,FILE913=00000913.TIF
,FILE914=00000914.TIF
,FILE915=00000915.TIF
,FILE916=00000916.TIF
,FILE917=00000917.TIF
,FILE918=00000918.TIF
,FILE919=00000919.TIF
,FILE920=00000920.TIF
,FILE921=00000921.TIF
,FILE922=00000922.TIF
,FILE923=00000923.TIF
,FILE924=00000924.TIF
,FILE925=00000925.TIF
,FILE926=00000926.TIF
,FILE927=00000927.TIF
,FILE928=00000928.TIF
,FILE929=00000929.TIF
,FILE930=00000930.TIF
,FILE931=00000931.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE932=00000932.TIF
,FILE933=00000933.TIF
,FILE934=00000934.TIF
,FILE935=00000935.TIF
,FILE936=00000936.TIF
,FILE937=00000937.TIF
,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection